मार्क्स एन्गल्स

म. ग्रं. सं. ठाणें
विषय निबंध
सं. क्र. ३०४८

साहित्य आणि कला



REFBK-0024272

संदर्भ निबंध [वाङ्मय समीक्षा]

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

सूचना :—खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक/मासिक परत करावे, तसे न केल्यास घटना नियम क्र. ५ [८] नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल.

9 SEP 1984
3 SEP 1984
3 FEB 1985
8 MAY 1986

(क्र. मा. प.)
५०००-१२-८२



सगळ्या देशो-देशींच्या कामगारांनो, एक व्हा !

संदर्भ निबंध [वाङ्मय समीक्षा]
३०४
२४२७२
१७।८।८४

प्रथमावृत्ती : जून १९८४

म/३२३
मुखपृष्ठ : भालचंद्र जोशी

मूल्य : पंचवीस रुपये

On Literature And Art,
—Marx, Engels.
मेझ्दूनारोदनाया क्नीगा,
मॉस्को.

मुद्रक :
आर. व्ही. देवनाळकर
न्यू एज प्रिंटिंग प्रेस,
भूपेश गुप्ता भवन,
८५, सयानी रोड, प्रभादेवी,
मुंबई–४०० ०२५.

प्रकाशक :
आर. जी. देसाई
लोकवाङ्मय गृह प्रा. लि.
भूपेश गुप्ता भवन,
८५, सयानी रोड,
मुंबई–४०० ०२५.

मार्क्स आणि एन्गल्स
यांचे
साहित्य आणि कलाविषयक विचार

अनुवादक : स. ह. मोडक

REFBK-0024272

मेझदूनारोदनाया क्नीगा, मॉस्को
लोकवाङ्मय गृह प्रा. लि., मुंबई २५

इंग्रजी आवृत्तीविषयी प्रकाशकांचे निवेदन

उताऱ्यांचा हा संग्रह रशियन भाषेत प्रसिद्ध झालेल्या दोन ग्रंथांच्या आधारे तयार केलेला आहे : त्यातला एक म्हणजे मार्क्स आणि एन्गल्स यांचे कलाविषयक विचार (मॉस्को, १९६७) आणि दुसरा म्हणजे मार्क्स आणि एन्गल्स यांचे साहित्यविषयक विचार (मॉस्को, १९५८).

त्याबरोबर एन्गल्स यांचे हस्तलिखित "स्लाव भाषा आणि भाषा-शास्त्र" यांतील एक उतारा आणि मार्क्स यांची पत्नी जेन्नी यांचे "समीक्षणात्मक लेख" वगैरेंसारख्या उताऱ्यांचाही समावेश या संग्रहात आहे.

या संग्रहाचे विषयवार विभाग केलेले आहेत. मथळे आणि पोटमथळे संपादकांनी दिलेले आहेत.

यांतले काही अनुवाद प्रोग्रेस पब्लिशर्स यांनी प्रकाशित केलेल्या मार्क्स आणि एन्गल्स यांच्या ग्रंथांच्या विविध संग्रहांतून उद्धृत केलेले आहेत. इतर सगळे विषय अन्य निर्देश नसल्यास मूळ जर्मनवरून अनुवादिलेले आहेत.

पहिली इंग्रजी आवृत्ती : १९७६

पुनर्मुद्रण : १९७८

पहिली मराठी आवृत्ती : १९८४

ऋणनिर्देश

या ग्रंथाच्या प्रस्तावनेचा अनुवाद सिद्धहस्त लेखक श्री. रंगनाथ कुलकर्णी यांनी केलेला आहे.

पुण्याचे एक ऋणानुबंधी श्री. रा. प. नेने यांनी ग्रीक लिपीतील मजकुराचे रोमन लिपीत लिप्यंतर एका ग्रीकभाषिक अमेरिकन पंडिताच्या मदतीने करून घेतले. या बहुमोल मदतीबद्दल त्यांचे विशेष आभार मानायला हवेत.

नामसूचीची अकारविल्हे तयार करण्याच्या कामी कॉ. श्रीपाद गायतोंडे यांची मदत मिळाली.

न्यू एज प्रेसच्या श्री. भागवत पंगेरकर प्रभृति कर्मचाऱ्यांनी या ग्रंथाच्या मुद्रणाचे किचकट काम मनःपूर्वक केले. या सर्वांना मनःपूर्वक धन्यवाद.

अनुक्रमणिका

प्रस्तावना १५

संस्कृतीच्या इतिहासाची भौतिकवादी संकल्पना

सामाजिक असणे आणि सामाजिक जाणीव . . . ३७
१. . . . . ३७
२. . . . . ३८
नैसर्गिक परिस्थिती आणि संस्कृतीचा विकास . . . ४१
निसर्गदृश्ये ४४
ऐतिहासिक भौतिकवादाच्या रासवटीकरणाला विरोध . . . ५३
१. . . . . ५३
२. . . . . ५४
३. . . . . ५४
४. . . . . ५६
५. . . . . ५७
मेहरिंगकृत द लेसिंग लेजंडविषयी एन्गल्स यांचे विचार . . ५८
१. . . . . ५८
२. . . . . ५८
३. एन्गल्स यांचे फ्रॅन्झ मेहरिंग यांस पत्र . . . ५९
वर्गीय संबंध आणि वर्गीय विचारसरणी ६५
१. . . . . ६५
२. . . . . ६८
वर्गीय विचारसरणीच्या शास्त्रीय आणि रासवट संकल्पना . . ७०
एन्गल्स यांचे पॉल अर्न्स्ट यांस पत्र ७०

ऐतिहासिक सातत्य आणि त्याचे अन्तर्विरोध ७४
१. . . . . ७४
२. . . . . ७५
ऐतिहासिक विकासाचे असलग स्वरूप आणि कलेच्या समस्या . . ७७

कलेच्या सर्वसाधारण समस्या

वैचारिक आशय आणि वास्तववाद ८३
१. एन्गल्स यांचे मिन्ना कौट्स्की हिला पत्र . . . ८३
२. एन्गल्स यांचे लंडननिवासी मार्गारेट हार्कनेस हिला पत्र . ८५
३. . . . . ८८
सत्य इतिहासातील करुण रस आणि हास्य रस . . . ९०
१. . . . . ९०
२. . . . . ९१
३. . . . . ९१
४. . . . . ९२
५. . . . . ९२
क्रांतिकारक शोकान्तिकेच्या समस्या ९४
फ्रॅन्झ फॉन सिकिन्जेन या फर्डिनान्ड लासाल याच्या नाटकाविषयी मार्क्स आणि एन्गल्स यांनी त्याला लिहिलेली पत्रे . . ९४
१. मार्क्स यांचे फर्डिनान्ड लासाल यांस पत्र . . . ९४
२. एन्गल्स यांचे फर्डिनान्ड लासाल यांस पत्र . . . ९७
संकीर्ण विषय १०४
भाषा आणि साहित्य १०४
१. . . . . १०४
२. . . . . १०४
काव्य लेखनातील कल्पकता १०५
साहित्यिक शैलीविषयी १०६
१. . . . . १०६
२. . . . . १०७
३. . . . . १०८
४. . . . . १०८
साहित्यिक वादविवादांविषयी १०९
१. . . . . १०९

२. . . . . ११०
३. . . . . १११
४. . . . . १११
५. . . . . ११२
अनुवादाविषयी ११३
१. . . . . ११३
२. . . . . ११४
३. . . . . ११५
४. . . . . ११५
५. . . . . ११६
६. . . . . ११७
७. . . . . ११८

वर्गीय समाजामध्ये कलेचे स्थान

कलेचा उद्‌गम १२१
कलात्मक दृष्टीचा ऐतिहासिक विकास १२१
१. . . . . १२१
२. . . . . १२२
३. . . . . १२२
कलेच्या उद्‌गमामध्ये श्रमाची भूमिका १२४
कलात्मक निर्मिती आणि सौंदर्यनिष्ठ ग्रहणशक्ती . . . १२५
सामाजिक श्रमविभागणी १२६
श्रमविभागणी आणि सामाजिक जाणीव १२६
भांडवलदारी समाजात श्रम आणि श्रमिक बहुजन समाजाची परिस्थिती यांच्यातील दुरावा १२८
पैसा आणि जागतिक संस्कृति १३०
पैशाचे विकृतिकारक सामर्थ्य १३०
भांडवलशाही आणि आध्यात्मिक उत्पादन १३७
कला आणि काव्य यांचा भांडवलदारी उत्पादन-पद्धतीशी संबंध . १३७
भांडवलदारी अभिरुचि आणि तिची उत्क्रान्ति . . . १३८
भांडवलदारी समाजात कलाकाराची कामगिरी . . . १४०
१. . . . . १४०
२. . . . . १४१
३. . . . . १४२

मुद्रणस्वातंत्र्य आणि कलात्मक निर्मितीचे स्वातंत्र्य . . . १४३
१. . . . . १४३
२. . . . . १४३
३. . . . . १४४
४. . . . . १४५
५. . . . . १४७
संन्यास आणि सुखोपभोग १४८
कामकाज आणि खेळ १४९
भांडवलदारी संस्कृति आणि गुन्हा १५१
कामगार वर्गाचे ऐतिहासिक कार्य १५४
कामगार वर्ग आणि संपत्ती १५४
कामगार वर्ग आणि समाजाचा प्रगतिशील विकास . . . १५६
१. . . . . १५६
२. . . . . १५७
कामगार वर्ग आणि संस्कृति १५८
१. . . . . १५८
२. . . . . १५९
३. . . . . १६०
४. . . . . १६०
५. . . . . १६२
६. . . . . १६२
कामगारवर्गीय क्रान्ति आणि भांडवलदारांचा विध्वंसकरणा . . १६३
१. . . . . १६३
२. . . . . १६५

कला आणि कम्युनिझम

इहवादी कम्युनिझमवरील टीका १६९
१. . . . . १६९
२. . . . . १७१
व्यक्तिमत्त्व आणि समाज १७३
१. . . . . १७३
२. . . . . १७५
३. . . . . १७५

स्वातंत्र्य आणि भौतिक श्रम यांचे राज्य १७७
१. . . . . १७७
२. . . . . १७८

सामाजिक विचार, साहित्य आणि कला यांचा इतिहास
प्राचीन काळ, मध्ययुगे आणि ज्ञानजागृति

प्राचीन काळ १८१
मानवी संस्कृतीची प्रभात १८१
पुराणांचा आणि महाकाव्यांचा प्रारंभ . . . १८२
सेमाइट लोकांच्या महाकाव्याची परंपरा . . . १८३
होमरच्या काव्यरचनेतील प्राचीन ग्रीक समाज . . १८४
१. . . . . १८४
२. . . . . १८५
ग्रीक शोकान्तिका १८६
१. . . . . १८६
२. . . . . १८७
प्राचीन लेखकांच्या मते ग्रीसमधील स्त्रियांचा दर्जा . . . १८९
प्राचीन गुलामगिरी आणि जागतिक संस्कृति . . . १९२
१. . . . . १९२
२. . . . . १९३
ग्रीक कलांमधील प्लास्टिक घटक १९४
१. . . . . १९४
२. . . . . १९५
ग्रीक ज्ञानजागृति १९६
१. . . . . १९६
२. . . . . १९७
प्राचीन जगातील धर्म आणि संस्कृती १९८
प्राचीन जगाच्या ऱ्हासाच्या युगातील तत्त्वज्ञानविषयक प्रवृत्ती . . २००
लुक्रीशियस कॅरस २०१
१. . . . . २०१
२. . . . . २०१

होरेस २०३
पेर्सियसची वक्रोक्ति २०३
लुसियन २०४
मध्ययुगीन काळ २०५
जर्मानिक संस्कृती २०५
प्राचीन आणि मध्ययुगीन साहित्यामधील प्रेमाचे स्थान . . २०८
वॅग्नर आणि जर्मानिक महाकाव्ये २१०
सीगफ्रीड याची दंतकथा आणि जर्मन क्रान्तिकारक चळवळ . २११
प्राचीन आयरिश साहित्य २१३
१. . . . . २१३
२. . . . . २१५
३. . . . . २१७
४. . . . . २१७
प्राचीन स्कॅन्डिनेवियन महाकाव्ये २१९
मध्ययुगाच्या आरंभकाळातील डॅनिश काव्य . . . २२१
चान्सोन दे रोलाँ २२३
प्रॉव्हेन्कल साहित्य २२५
१. . . . . २२५
२. . . . . २२६
स्त्री-दाक्षिण्ययुक्त प्रेमकाव्ये २२६
इंग्लंडमधील शेतकऱ्यांचे समतावादी विचार. जॉन बॉल. विल्यम लँगलँडकृत "नांगऱ्या पियर्स याचे गाऱ्हाणे" २२७
जर्मन फोक्सबुखेर २२९
पुनरुज्जीवन
प्राचीन जगाच्या अखेरची परिस्थिती इ. स. ३००— आणि मध्ययुगाच्या अखेरची परिस्थिती इ. स. १४५३— यांच्या दरम्यानचा फरक . २३९
डान्टेपासून गॅरिबाल्डीपर्यंतची इटालियन संस्कृति . २४१
१. . . . . २४१
२. . . . . २४१
डान्टे २४१
पेट्रार्च २४१
बोक्काशियो २४२
महान पुनरुज्जीवन २४४
टिशियन २४४

धर्मसुधारणेच्या कालखंडांतील ग्रोबियन साहित्य २४७
धर्मसुधारणेचे ऐतिहासिक महत्त्व २४९
थॉमस मोअर २५०
१. . . . . २५०
२. . . . . २५०
३. . . . . २५१
४. . . . . २५१
शेक्स्पियर २५२
१. . . . . २५२
२. . . . . २५३
३. . . . . २५३
४. . . . . २५४
काल्डेरॉन २५४
१. . . . . २५४
२. . . . . २५५
३. . . . . २५६
सेर्वान्टिस २५६
१. . . . . २५६
२. . . . . २५७

सामाजिक विचार आणि साहित्य यांचा इतिहास
आधुनिक कालखंड

अभिजात नाट्यातील तीन एकवाक्यता २६१
ला रॉचेफोको २६१
जनजागृतीचे ऐतिहासिक महत्त्व २६२
ज्ञानकोशकारांचा भौतिकवाद २६४
१. . . . . २६४
२. . . . . २६४
ज्ञानजागृति आणि विरोध-विकास २६६
ज्ञानजागृतीचे उपयुक्ततावादी तत्त्वज्ञान २६७
व्हॉल्टेअर २६९
१. . . . . २६९
२. . . . . २७०

दीदरो २७०
१. . . . . २७०
२. . . . . २७१
३. . . . . २७३
रूसो २७३
१. . . . . २७३
२. . . . . २७५
ज्ञानजागृतीच्या क्रान्तिकारक बुद्धिवादी
प्रवृत्तींची प्रतिक्रिया अशी भावना-विवशता २७५
ज्ञानजागृतीच्या ध्येयांचे अरिष्ट २७६
ज्ञानजागृतीतून अद्‌भुतरम्यतावादामध्ये संक्रमण . . . २७८
जुन्या काळाच्या दृष्टिकोनांतून भांडवलदारी प्रगतीची
समीक्षा. सरंजामदारी समाजसत्तावाद . . . २७९
भांडवलशाहीचे मध्यमवर्गीय समालोचन २८०
पूर्वपदस्थापनेच्या कालखंडातील लेखक २८१
फ्रेंच साहित्य २८३
अॅबे प्रेव्होस्त २८३
शेतोब्रियाँ २८३
१. . . . . २८३
२. . . . . २८४
अलेक्झाँडर ड्युमा २८४
लामार्टाइन २८५
१. . . . . २८५
२. . . . . २८५
३. . . . . २८६
व्हिक्टर ह्यूगो २८६
१. . . . . २८६
२. . . . . २८७
३. . . . . २८८
४. . . . . २८८
युजीनी सुए २८९
सुएकृत MYSTERES DE PARIS या कादंबरीच्या
समीक्षात्मक विश्लेषणातून २८९

१. . . . . २८९
२. . . . . २९०
३. . . . . २९४
बाल्झॅक ३०५
१. . . . . ३०५
२. . . . . ३०५
३. . . . . ३०६
४. . . . . ३०७
५. . . . . ३०७
ग्येरे द्युपाँ ३०७
आर्थर रँक ३०८
रेनान ३०८
१. . . . . ३०८
२. . . . . ३०९
झोला ३०९
मोपासाँ ३१०
इंग्रजी आणि आयरिश साहित्य ३११
डॅनियल डोफो ३११
१. . . . . ३११
२. . . . . ३११
स्विफ्ट ३१३
पोप ३१३
शेले व बाययन ३१४
वॉल्टर स्कॉट ३१४
विल्यम कॉबेट याचे सामाजिक लेख ३१५
इंग्रज कामगार वर्गीय कवि मीड ३१७
थॉमस कार्लाइल ३१९
१. . . . . ३१९
२. . . . . ३१९
एकोणिसाव्या शतकाच्या मध्य-काळातील इंग्रज वास्तववादी . . ३३५
कार्लेटन ३३६
बर्नार्ड शॉ ३३६

अॅव्हेलिंग ३३७
१. . . . . ३३७
२. . . . . ३३७
विल्यम मॉरिस ३३७
जर्मन साहित्य ३३९
सतराव्या शतकाच्या मध्य भागापासून ते एकोणिसाव्या शतकाच्या आरंभापर्यंतची जर्मनीची आणि जर्मन संस्कृतीची परिस्थिती . ३३९
१. . . . . ३३९
२. . . . . ३४२
शिलर. त्याच्या कवितेतील उणीवा ३४४
गटे ३४४
१. . . . . ३४४
२. . . . . ३४५
३. . . . . ३४५
४. . . . . ३४५
५. . . . . ३४६
६. कार्ल ग्रुन, UBER GOTHE VOM MENSCHLICHEN STANDPUNKTE डार्मस्टाड्ट, १८४६ . . ३४७
हायने ३७१
१. . . . . ३७१
२. . . . . ३७१
३. . . . . ३७३
४. . . . . ३७३
५. . . . . ३७४
६. . . . . ३७५
" तरुण जर्मनी " ३७५
अलेक्झांडर जुंग ३७६
जर्मन किंवा " खरा " समाजवाद ३७९
१. . . . . ३७९
२. . . . . ३८२
कार्ल बेक, LIEDER VOM ARMEN-MANN, किंवा खऱ्या समाजवादाचे काव्य ३८३
१. . . . . ३८३

२. . . . . ३८४
३. . . . . ३८५
४. . . . . ३८५
गॉट्टफ्रिएड किन्केल ३८६
१. . . . . ३८६
२. . . . . ३८६
फ्रायलिग्राथ ३९१
१. . . . . ३९१
२. . . . . ३९१
३. . . . . ३९३
४. . . . . ३९४
५. . . . . ३९५
६. . . . . ३९६
७. . . . . ३९७
८. . . . . ३९७
९. . . . . ३९७
वीर्थ ३९८
कामगार वर्गीय चळवळीतील श्रेष्ठ व्यक्तिमत्त्वे. योहान्न फिलिप बेकर . ४०२
१. . . . . ४०२
२. . . . . ४०३
३. . . . . ४०४
रशियन साहित्य ४०५
रशियन भाषा ४०५
१. . . . . ४०५
२. . . . . ४०५
३. . . . . ४०६
द ले ऑफ इगोर्स होस्ट ४०६
लोमोनोसोव. स्लाविक भाषा आणि भाषाशास्त्र ४०७
देर्झाविन ४०९
पुश्किन ४१०
चेर्निशेवूस्की आणि दोब्रोल्यूबोव ४११
१. . . . . ४११
२. . . . . ४११
३. . . . . ४१२

पंडित व समीक्षक या नात्याने चेर्निशेव्स्कीचे मूल्यमापन . . ४१२
चेर्निशेव्स्की आणि रशियन ग्रामपंचायती . . . ४१३
१. . . . . ४१३
२. . . . . ४१३
क्रान्तिकारक या नात्याने चेर्निशेव्स्कीची भूमिका . . . ४१७
१. . . . . ४१७
२. . . . . ४१७
३. . . . . ४१८
४. . . . . ४१८
५. . . . . ४१९
श्चेद्रिन ४१९
फ्लेरोव्स्की ४१९

जुन्या काळातील क्रान्तिकारक व विडंबनात्मक लोकगीते

हेर्र टिड्मान्न ४२३
स्तेन्का राझीन विषयीची लोकगीते ४२५
ब्रे गावचा भटजी ४२६
जर्मन क्रान्तिकारक गाणी ४२९
विणकरांचे गाणे ४३०
१८४८ च्या जर्मन क्रान्तीची गाणी ४३१
१. . . . . ४३१
२. . . . . ४३२
लुई बोनापार्टविरुद्ध विडंबनात्मक लोकगीत . . . ४३२
मार्क्स आणि एन्गल्स यांचे कबुलीजबाब . . . ४३४
कार्ल मार्क्स. कबुलीजबाब. ४३४
फ्रेडरिक एन्गल्स. कबुलीजबाब ४३५
मार्क्स आणि एन्गल्स यांच्या आठवणीतील उतारे . ४३६
मार्क्स यांच्या आठवणीतील उतारे ४३६
पॉल लाफार्ग ४३६
१. . . . . ४३६
२. . . . . ४३६
३. . . . . ४३७

ईलियानॉर मार्क्स-ॲव्हेलिंग ४३८
फ्रान्झिस्का कुगेलमान्न ४४०
आन्सेल्मो लॉरेन्झो, ... ४४२
एन्गल्सच्या आठवणीतून ४४३
एन्. एस. रुसानोव ४४३
फान्नी क्राव्चिन्स्काया ४४५
जेन्नी मार्क्स हिचे समीक्षणात्मक लेख ४४७
१. लंडनच्या रंगभूमि-जगतातून ४४७
२. लंडनचा मोसम ४५१
३. इंग्लंडमधील शेक्स्पियरचा अभ्यास . . . ४५४
४. लंडनच्या लायसियम नाट्यगृहात शेक्स्पियरच्या तिसऱ्या रिचर्डचा प्रयोग ४५८
५. लंडनची रंगभूमि ४६२
टीपा ४६९
नामसूचि ४९५
साहित्यिक व पौराणिक नामसूचि . . . ५२४
काही महत्त्वाच्या दुरुस्त्या ५३१

प्रस्तावना

कला आणि कलेचे समाजातील स्थान याविषयी कार्ल मार्क्स आणि फ्रेडरिक एन्गल्स यांचे विचार व्यक्त करणारे उतारे, समग्र ग्रंथ आणि पत्रे या दोहोतून निवड केलेले, या ग्रंथात वाचकांसाठी देण्यात येत आहेत. शास्त्रशुद्ध कम्युनिझमच्या संस्थापकांनी या विषयावर लिहिलेले समग्र लिखाण या ग्रंथांत दिलेले नसले, तरी कलात्मक कृतींविषयी मार्क्स आणि एन्गल्स यांच्या अत्यंत महत्त्वाच्या विचारांचा परिचय या ग्रंथामुळे वाचकांना होईल.

कार्ल मार्क्स आणि फ्रेडरिक एन्गल्स यांना जागतिक कलेविषयी उत्कृष्ट ज्ञान होते आणि साहित्य, शास्त्रीय संगीत व चित्रकला यांवर त्यांचे खरेखुरे प्रेम होते. मार्क्स आणि एन्गल्स या दोघांनीही तारुण्यात कविता केलेल्या आहेत; वस्तुतः एन्गल्स तर एके काळी कवी होण्याचा गंभीरपणे विचार करीत होते.

अभिजात साहित्याशी त्यांचा उत्कृष्ट परिचय होता; एवढेच नव्हे, तर कमी विख्यात, किंवहुना अल्पज्ञात अशा त्यांच्या समकालीन व त्या अगोदरच्याही खूप दूरच्या काळापूर्वी होऊन गेलेल्या अशा लेखकांच्या साहित्याशीही त्यांचा परिचय होता. एस्किलस, शेक्स्पिअर, डिकन्स, फील्डिंग, गटे, हायने, सेर्वान्टिस, बाल्झॅक, डाण्टे, चेर्निशेव्स्की आणि दोब्रोल्यूबोव यांचे त्यांना कौतुक वाटे; आणि साहित्याच्या इतिहासात ज्यांनी स्वतःचा ठसा उमटविला होता अशा इतर अनेक कमी ज्ञात मंडळींचाही उल्लेख ते करीत असत. लोकप्रिय कला, विविध देशांची महाकाव्ये आणि गाणी, कथा, बोधकथा व म्हणी अशा इतर प्रकारचे लोकसाहित्य याविषयी सुद्धा ते प्रगाढ प्रेम व्यक्त करीत असत.

मार्क्स आणि एन्गल्स यांनी आपल्या लिखाणात जागतिक साहित्यातील भांडाराचा व्यापक उपयोग केलेला आहे. साहित्यिक आणि पौराणिक व्यक्तींचे त्यांनी वारंवार केलेले उल्लेख, चिरंतन सत्य सांगणाऱ्या कथांचा, तुलनांचा व अस्सल अवतरणांचा

केलेला उपयोग, आपल्या लिखाणात त्यांची केलेली सिद्धहस्त गुंफण या बाबी म्हणजे त्यांच्या लेखनशैलीची खास वैशिष्ट्ये होत. मार्क्स आणि एन्गल्स यांचे लिखाण त्यातील प्रगाढ आशयासाठी तर लक्षणीय आहेच; पण शिवाय त्यातील अतुलनीय अशा कलात्मक गुणांसाठी देखील लक्षणीय आहे. मार्क्स यांच्या लुई बोनापार्टचे अठरावे ब्रुमेअर या ग्रंथाचा दाखला देऊन विल्हेल्म लीबनेख्ट यांनी मार्क्स ह्यांच्या शैलीची खूपच प्रशंसा केलेली आहे. लीबनेख्ट म्हणतात, "द्वेष, तिरस्कार आणि स्वातंत्र्याबद्दलचे प्रगाढ प्रेम ज्वलंत, घणाघाती आणि उत्तुंग अशा शब्दात कुठे व्यक्त झाले असेल, तर ते अठरावे ब्रुमेअर या ग्रंथात; त्यात टॅसिटसची न्यायप्रिय कठोरता, जुवेनालचा जीवघेणा उपहास आणि डाण्टेचा सात्विक संताप यांचा सुरेख संगम झालेला आहे. इथे त्यांची स्टाइल (शैली) म्हणजे पूर्वीच्या काळात रोमन योद्धयांच्या हाती असलेल्या स्टायलस, धारदार स्टायलेट्टो, लिहायला आणि वार करायला, असा उपयोग असलेला होता. अंतःकरणावर अचूक घाव घालणारा खंजीर म्हणजे लेखन शैली." (मार्क्स आणि एन्गल्स यांच्या आठवणी, मॉस्को, १९५६, पान ५७).

मार्क्स आणि एन्गल्स यांनी आपल्या वृत्तपत्रीय आणि चर्चात्मक ग्रंथात, आणि आपल्या भांडवल व अँटी-ड्युहरिंग यांसारख्या मौलिक सैद्धांतिक ग्रंथात देखील आपले विचार अधिक जोमदारपणे आणि ठसठशीतपणे मांडण्यासाठी कलात्मक संकल्पनांचा वापर केलेला आहे. कामगारवर्गीय पक्षाची निंदानालस्ती करणारा कार्ल वोग्त याच्याविरुद्ध मार्क्स यांनी लिहिलेली हेर वोग्त ही पुस्तिका म्हणजे वरील विधानाचे एक अत्यंत ठळक उदाहरण होय. व्हर्जिल, प्लॉटस आणि पर्सियस यांच्यासारख्या अभिजात लेखकांच्या, मध्ययुगीन जर्मन कवि गॉटफ्रीड फॉन स्ट्रासबुर्ग आणि वूल्फरॅम फॉन एश्चेनबाख, आणि बाल्झॅक, डिकन्स, शिलर आणि हायने यांच्यासारख्या जागतिक साहित्यातील अभिजात लेखकांच्या ग्रंथांचा लेखकाने खुबीने या पुस्तिकेत उपयोग केल्यामुळे तिची बोचक उपहासात्मक शैली विशेष प्रभावी झाली आहे.

मार्क्स आणि एन्गल्स यांना जागतिक कलेविषयी प्रगाढ ज्ञान असल्यामुळे सौंदर्यशास्त्रविषयक खऱ्याखुऱ्या शास्त्रीय तत्त्वांचा ऊहापोह करण्यास त्यांना मदत झाली. त्यामुळे शास्त्रशुद्ध कम्युनिझमच्या संस्थापकांना आधीच्या युगातील सौंदर्यशास्त्राबद्दलच्या गुंतागुंतीच्या प्रश्नांना उत्तरे तर देता आलीच, पण शिवाय ते सौंदर्यशास्त्राची मूलतः नवी विचारशैली तपशीलवारपणे विकसित करू शकले. विरोधविकासात्मक आणि ऐतिहासिक भौतिकवादाची निर्मिती करून आणि इतिहासाच्या भौतिकवादी विचारप्रणालीचा पाया घालून तत्त्वज्ञानाच्या क्षेत्रात त्यांनी प्रचंड क्रांतिकारक उलथापालथ घडवून आणली म्हणूनच ते वरील कामगिरी करू शकले. कला या विषयावर मार्क्स आणि एंगल्स यांचा एकादा प्रमुख ग्रंथ नसला, तरी या विषयावरील त्यांचे विचार एकत्र केल्यानंतर एक समग्र सुसंवादी ग्रंथ होऊ शकतो आणि तो त्यांच्या शास्त्रशुद्ध आणि क्रांतिकारक अशा वेल्टान्श्राउंग चाच तर्कशुद्ध विस्तार

होय. कलेचे स्वरूप आणि तिच्या विकासाचे मार्ग, समाजातील तिचे कार्य आणि तिची सामाजिक उद्दिष्टे त्यात स्पष्ट करण्यात आलेली आहेत. मार्क्सवादी सौंदर्यशास्त्र, मार्क्स आणि एन्गल्स यांच्या समग्र शिकवणुकीप्रमाणेच, समाजाच्या कम्युनिस्ट पुनर्घटनेच्या लढ्याच्या कामाला जुंपलेले आहे.

आपल्या सौंदर्यशास्त्राची सिद्धांतप्रणाली विकसित करताना, मार्क्स आणि एन्गल्स यांनी स्वाभाविकपणेच आपल्या पूर्वसूरींच्या यशःसिद्धींवर आधारूनच विचारास प्रारंभ केला. परंतु प्रमुख सौंदर्यशास्त्रीय समस्यांची--आणि सर्वप्रथम कला आणि वास्तवता यांच्या दरम्यानच्या संबंधांच्या प्रश्नाची—उकल त्यांनी भौतिकवादी विरोधविकासवादाच्या आधारे अगदी मूलतः नवीन पद्धतीने करून दाखवली. आदर्शवादी सौंदर्यशास्त्राच्या मते कला म्हणजे प्रत्यक्ष वास्तवाच्या निश्चितपणे वर असलेली आदर्शाची पुनर्निर्मिती होय. मार्क्स यांच्या आधीच्या कालखंडातील सैद्धांतिकांनी आणि इतिहासतज्ज्ञांनी, कोणत्याही कला-प्रकाराचा मूलस्रोत, तिचा विकास, फुलोरा आणि विनाश यांचा विचार मानवाच्या सामाजिक अस्तित्वाचा संदर्भ ध्यानात न घेता केल्यामुळे या सर्व बाबी त्यांना अनाकलनीयच ठरल्या.

कला आणि साहित्य यांचे आकलन केवळ त्यांच्या विकासाचे अंतर्गत नियम ध्यानात घेऊनच होणे संपूर्णतया अशक्य आहे, असे मार्क्स आणि एन्गल्स यांचे मत होते. त्यांच्या मते, कलेचा आशय, मूलस्रोत, विकास आणि तिची सामाजिक भूमिका सबंध सामाजिक व्यवस्थेच्या पृथक्करणातूनच समजावून घेता येईल; आणि या पृथक्करणात आर्थिक घटक– उत्पादन-संबंधांच्या व्यामिश्र अशा क्रिया-प्रतिक्रियातून होणारा उत्पादन शक्तींचा विकास– निर्णायक भूमिका बजावतो. थोडक्यात म्हणजे, मार्क्स आणि एन्गल्स यांनी सूत्रबद्ध केल्याप्रमाणे कला हा एक सामाजिक जाणिवेचा प्रकार आहे आणि म्हणूनच तिच्यातील बदलाची कारणे माणसांच्या सामाजिक अस्तित्वातच शोधायला हवीत, हे ओघानेच येते.

मार्क्स आणि एन्गल्स यांनी कलेचे सामाजिक स्वरूप आणि इतिहासक्रमातील तिचा विकास दाखवून दिला; वर्गीय अंतर्विरोधांनी ग्रासलेल्या समाजात तिच्यावर वर्गविरोधांचा आणि विशिष्ट वर्गाच्या राजकारणाचा व सिद्धांतप्रणालींचा प्रभाव कसा होता, तेही त्यांनी दाखवून दिले आहे.

मार्क्स आणि एन्गल्स यांनी सौंदर्यदृष्टीच्या खुद्द मूलस्रोताचेच भौतिकवादी स्पष्टीकरण दिले. मानवाच्या कलात्मक कुवती, जगाकडे सौंदर्यदृष्टीने पाहाण्याची, जगाच्या सौंदर्याचे आकलन करण्याची त्याची कुवत आणि कलाकृतींची निर्मिती करण्याची त्याची ताकद ह्या गोष्टी मानवी समाजाच्या प्रदीर्घ विकासाच्या फलश्रुती होत आणि त्या म्हणजे मानवी श्रमशक्तीची फलनिष्पत्ती आहेत, असे त्यांनी दाखवून दिले. १८४४ सालच्या आर्थिक आणि तत्त्वज्ञानविषयक हस्तलिखितात, सुंदरतेचे आकलन आणि पुनर्निर्मिती आणि कलाकृतीचीही निर्मिती करण्याची मानवाची कुवत विकसित

करण्याच्या कामी श्रमशक्तीची भूमिका "सौंदर्याच्या नियमांना अनुसरून असते," हे मार्क्स यांनी दाखवून दिलेले आहे. (मार्क्स आणि एन्गल्स, समग्र ग्रंथ, खंड ३ रा, मॉस्को, १९७५, पृष्ठ २७७).

हाच विचार नंतर एन्गल्स यांनी **निसर्गाचा विरोधविकास** या ग्रंथात विकसित करताना म्हटले आहे, "एकाद्या राफाएलची चित्रे, एकाद्या थोरवाल्डसेनची शिल्पे, एकाद्या पागानिनीचे संगीत असे स्वरूप घेण्यास आवश्यक असलेला परिपूर्णतेचा उच्च दर्जा मानवी हातांना दिलेला आहे" तो श्रमशक्तीच्या प्रयत्नांनी (पाहा, या पुस्तकातील पृष्ठे १२८-१२९). सारांश, मार्क्स आणि एन्गल्स या दोघांनीही ठासून सांगितले आहे की, मानवाला लाभलेली सौंदर्यदृष्टी उपजत नसते, तर तो एक सामाजिकरीत्या प्राप्त करून घेतलेला गुण असतो.

मार्क्सवादाच्या संस्थापकांनी, मानवी विचारांच्या स्वरूपाबद्दलचा विरोधविकासात्मक दृष्टिकोन कलात्मक सर्जनशीलतेच्या पृथक्करणाला लागू केला. भौतिक जगाचा आणि समाजाच्या इतिहासाचा विकास अभ्यासतानाच त्यांनी कलेच्याही विकासाचा अभ्यास करून असा निष्कर्ष काढला की कलेचा आशय आणि घाट एकदाच आणि कायमचे प्रस्थापित होत नाहीत, तर जसजसा भौतिक जगाचा आणि मानवी समाजाचा विकास होत जातो, तसतसे ते निश्चित नियमांनुसार अपरिहार्यपणे विकसित होत जातात आणि बदलतात. प्रत्येक ऐतिहासिक कालखंडाचे अंगभूत सौंदर्यवादी आदर्श असतात आणि त्या विशिष्ट स्वरूपानुसार कलाकृती निर्माण होतात; आणि अन्य परिस्थितीत त्यांची पुनरावृत्ती शक्य नसते. उदाहरणार्थ, राफाएल, लिओनार्दो द विन्सी आणि टीशियन यांच्या कलाकृतींचा तौलनिक विचार करताना मार्क्स आणि एन्गल्स यांनी आवर्जून सांगितले की, "राफाएलच्या कलाकृती तत्कालीन रोमच्या समृद्धीवर आधारित होत्या आणि त्या फ्लॉरेन्टाईन प्रभावाखाली साकार झाल्या, तर लिओनार्दोंच्या कलाकृती फ्लॉरेन्समधल्या परिस्थितीवर आधारित होत्या आणि टीशियनच्या कलाकृती, तदनंतरच्या काळात, व्हेनिसचा जो सर्वस्वी वेगळा विकास झाला, त्यावर आधारलेल्या होत्या." (पृष्ठ १७७).

समाजाच्या विकासाची पातळी आणि त्याची सामाजिक रचना यामुळेच कलाकृतींचा आशय निश्चित केला जातो आणि एकाद्या विशिष्ट साहित्यिक किंवा कलात्मक प्रकाराचे अस्तित्व ठरते, म्हणूनच मार्क्स यांनी असा निष्कर्ष काढला की, निरनिराळ्या कालखंडात कलेची पुनरावृत्ती होत नसते; आणि विशेषतः एकोणिसाव्या शतकाच्या परिस्थितीत प्राचीन ग्रीक कालखंडातील महाकाव्ये किंवा पुराणकथा निर्माण होण्याची अजिबात शक्यता नाही. मार्क्स यांनी लिहिले आहे, "स्वयंचलित यंत्रे, रेल्वे, आगगाडीची इंजिने आणि विजेची तारायंत्रे असताना ग्रीक कल्पनाशक्ती आणि तिच्यातून उद्भवलेली ग्रीक (कला) यांच्यात अनुस्युत असलेला निसर्ग आणि सामाजिक संबंध यांची निर्मिती शक्य तरी आहे का?" (पृष्ठ ८३).

सामाजिक जाणिवेचे प्रकार (आणि विशेषतः कलेचे प्रकार) आणि त्यांचा आर्थिक मूलाधार यांच्यातील संबंधांबाबतचे मार्क्सवादी आकलन उघडझाप करणाऱ्या साचेबंद झडपेसारखे मुळीच नाही, हे मुद्दाम सांगण्याची गरज नाही. मार्क्स आणि एन्गल्स यांच्या मते, कोणतीही सामाजिक बांधणी एकमेकांवर प्रभाव टाकणाऱ्या, क्रिया आणि प्रतिक्रिया करणाऱ्या घटकांनी युक्त अशी व्यामिश्र व गतिशील व्यवस्था असते–या व्यवस्थेत आर्थिक घटक हा फक्त अंतिम पृथक्करणातच निर्णायक घटक असतो. कला म्हणजे आर्थिक व्यवस्थेचा स्थितिशील परिपाक असतो, असे मानायला ते बिलकुल राजी नव्हते. उलटपक्षी, त्यांनी आग्रहाने सांगितले की सामाजिक जाणिवेचे भिन्न भिन्न प्रकार–आणि अर्थातच कलात्मक निर्मितीसकट– ज्या सामाजिक वास्तवातून निर्माण होतात, त्या वास्तवावर क्रियाशील प्रभाव पाडतात.

कलात्मक निर्मितीच्या समस्यांचे समाजशास्त्रीय विकृतीकरण होण्याची शक्यता आधीच ओळखून मार्क्स आणि एन्गल्स यांनी, विशिष्ट वर्गाचे सामाजिक जीवन व सिद्धांतप्रणाली यांचे कलेत पडणारे प्रतिबिंब यांत्रिक पद्धतीने पडत नाही, या वस्तुस्थितीकडे लक्ष वेधले आहे. कलात्मक सृजनशीलता सामाजिक विकासाच्या सर्वसाधारण नियमांनी निबद्ध असते, परंतु तो जाणिवेचा खास प्रकार असल्याने तिची स्वतःची अशी खास वैशिष्ट्ये आणि विशिष्ट असे प्रकार असतात.

कलेचे एक ठसठशीत वेगळे वैशिष्ट्य म्हणजे जसजशी ती विकसित होत जाते, तसतसे तिला लाभणारे सापेक्ष स्वातंत्र्य. ऐतिहासिकदृष्ट्या विशिष्ट सामाजिक रचनांशी कलाकृती निगडित असतात याचा अर्थ असा नव्हे की ती ती सामाजिक रचना नाहीशी होताच त्या कलाकृतींचे महत्त्व नष्ट होते. या मुद्याचा ऊहापोह करताना मार्क्स प्राचीन ग्रीक कला आणि महाकाव्य यांचे उदाहरण देऊन सांगतात, "ते आपल्याला अजून सौंदर्यशास्त्रीय आनंद देतात. आणि काही बाबतीत प्रमाणभूत व अनुल्लंघ्य आदर्श मानले जातात." (पृष्ठ ८४). या घटिताचे ते प्रगाढ स्पष्टीकरण देतात : ग्रीक कलेत वास्तवाचे निर्व्याज आणि त्याबरोबरच निकोप, स्वाभाविक आकलन यांचे प्रतिबिंब दिसते; मानवी समाजाच्या तत्कालीन विकासाच्या प्रारंभिक अवस्थेचे, त्या बालवयीन कालखंडाचे ते वैशिष्ट्यच होय; "स्वाभाविक सत्यप्रियते"ची आस त्यात प्रतिबिंबित झालेली असून तिचे अद्वितीय आकर्षण आणि खास गोडवा सर्वांनाच खेचून घेतो. (पृष्ठ ८४).

ह्या उदाहरणामुळे एका महत्त्वाच्या मार्क्सवादी सौंदर्यशास्त्रीय तत्त्वावर प्रकाश पडतो : कलाकृतींचे परिशीलन करताना, विशिष्ट सामाजिक परिस्थितीचे व संबंधांचे प्रतिबिंब म्हणून मूलतः त्यांच्याकडे पहात असतानाच ज्या वैशिष्ट्यांमुळे या कलाकृतींना चिरंतन मूल्य लाभते त्यांचेही परिशीलन करणे अत्यंत अगत्याचे असते.

कलेचे आणखी एक वैशिष्ट्य असे असते की भौतिक उत्पादनासकट अन्य क्षेत्रातील सामाजिक प्रगतीच्या कालखंडाशी कलात्मक उत्सर्गाचे कालखंड आपसूकपणे

जुळत नाहीत, असे मार्क्स आणि एन्गल्स यांचे मत होते. १८५७-५८ च्या आर्थिक हस्तलिखितात मार्क्स आणि एन्गल्स यांनी लिहिले आहे : "कलेच्या संबंधात सांगायचे, तर समाजाच्या सर्वसाधारण विकासाने उत्तुंग शिखरे गाठली, तेव्हाच कलाकृतींनीही गाठली असे होत नाही, हे सर्वांना ठाऊक आहे; भौतिक पायाशीही त्यांचा मेळ नसतो." (ह्या पुस्तकाचे पृष्ठ ८२). कलेचा विकास आणि सबंध समाजाचा विकास यातील हा असमतोल असण्याचे कारण कोणत्याही कालखंडातील आत्मिक संस्कृती केवळ भौतिक उत्पादनाच्या– समाजाच्या "भौतिक पाया"च्या– विकासाच्या पातळीने निश्चित केली जात नाही, तर त्या कालखंडातील सामाजिक संबंधांच्या विशिष्ट स्वरूपानेदेखील निश्चित केली जाते, हे मार्क्स आणि एन्गल्स यांनी ओळखले होते. दुसऱ्या शब्दात सांगायचे तर, कोणत्याही कालखंडातील सामाजिक संबंधांची खास वैशिष्ट्ये, वर्गीय अंतर्विरोधाच्या विकासाचे प्रमाण आणि मानवी व्यक्तिमत्त्वाच्या विकासासाठी लागणाऱ्या विशिष्ट परिस्थितीचे अस्तित्व, या सर्वांचा कला, तिचे स्वरूप आणि तिचा विकास यांच्यावर प्रभाव पडतो.

भांडवलदारी समाजाच्या संदर्भात सांगायचे झाल्यास, मार्क्स आणि एन्गल्स यांच्या मते, हा असमतोल म्हणजे भांडवलशाहीतील मूलभूत अंतर्विरोधाची, उत्पादनाचे सामाजिक स्वरूप आणि लुबाडणुकीचे खासगी स्वरूप यांच्यातील अंतर्विरोधाची अभिव्यक्ती होय. भांडवलशाहीच्या अंतर्विरोधांचे पृथक्करण करून मार्क्स यांनी काढलेला निष्कर्ष सौंदर्यशास्त्राच्या दृष्टीने अनन्यसाधारण महत्त्वाचा आहे, तो असा की, "आत्मिक निर्मितीच्या काही शाखांना, उदाहरणार्थ, कला आणि काव्य शाखांना, भांडवलदारी उत्पादनपद्धतीचा विरोध असतो" (पृष्ठ १४१). ह्या विधानाचा अर्थ असा नाही की भांडवलशाहीच्या अमदानीत साहित्य आणि कला यांचा विकास होतच नाही, तर त्याचा अर्थ असा आहे की ज्या मानवतावादी आदर्शामुळे जातिवंत कलाकारांना स्फूर्ती मिळते अशांशी भांडवलशाहीच्या व्यवस्थेचे पिळणूक-प्रधान स्वरूप हेच प्रखर अंतर्विरोधात उभे ठाकते. कलाकारांना, त्यांचे आदर्श आणि भांडवलदारी वास्तव यांच्यातील अंतर्विरोधाची जाणीव जेवढी अधिक, तेवढ्या त्यांच्या कलाकृती अधिक मोठ्या आणि अधिक सुस्पष्ट आवाजात (मग त्या प्रत्यक्ष लेखकाचा वर्ग कोणताही असो) भांडवलदारी संबंधांच्या अमानुषपणाविरुद्ध निषेध नोंदवितात. भांडवलदारी समाजाचे कलाविषयक वैर खुद्द भांडवलदारी साहित्यात या ना त्या प्रकारे भांडवलशाहीवरील टीकेलाच जन्म देते; भांडवलदारी वास्तवात शोकात्म संघर्ष भरलेले आहेत असेच चित्रण त्यातून निर्माण होते. मार्क्स आणि एन्गल्स यांच्या मते, भांडवलशाहीच्या अमदानीत होणाऱ्या कलेच्या विकासाचे हे विरोधविकासात्मक उपलक्षण होय. याच कारणामुळे भांडवलदारी समाजाने शेक्स्पिअर, गटे, बाल्झॅक आणि अशा इतर बुद्धिमंत लेखकांना जन्म दिला की जे आपल्या युगाच्या आणि वर्गीय वातावरणाच्या वर उभे राहू शकत होते आणि आपल्या प्रचंड

कलात्मक सामर्थ्याने पिळणूक-प्रधान भांडवलदारी समाजव्यवस्थेतील दोषांवर प्रखर प्रहार करू शकत होते.

ज्या समाजात अंतर्विरोध आहेत, त्यातील कलेच्या वर्गीय स्वरूपाविषयी मार्क्स आणि एन्गल्स यांनी आपल्या ग्रंथांतून अनेक प्रगाढ विचार मांडले आहेत. स्वतःची वर्गीय भूमिका वेगळी असूनही जे थोर लेखक वास्तव जीवनाचे खरेखुरे आणि ठसठशीत चित्रण करू शकले, त्यांच्यावरही वर्गग्रस्त समाजात सत्तारूढ वर्गांच्या विचारांचे आणि हितसंबंधांचे दडपण आले आणि अनेकदा त्यांनी आपल्या कलाकृतीत गंभीर तडजोडी केल्या, असे त्यांनी दाखवून दिले आहे. गटे, शिलर, बाल्झॅक आणि अन्य लेखकांची उदाहरणे घेतल्यावर मार्क्स आणि एन्गल्स यांना असे आढळून आले की त्यांच्यातील विशिष्ट अंतर्विरोध त्यांच्या स्वतःच्या मानसशास्त्रीय ठेवणीतील विशुद्ध वैयक्तिक वैशिष्ट्यांचा परिणाम म्हणून अभिव्यक्त झाले नव्हते, तर समाजाच्या जीवनातील वास्तव अंतर्विरोधांचे ते सैद्धांतिक प्रतिबिंब होते.

मार्क्सवादाच्या संस्थापकांनी आवर्जून सांगितले की वर्ग-वर्गांतील सैद्धांतिक लढ्यात कला हे एक महत्त्वाचे हत्यार असते. पिळणूक करणाऱ्यांची ताकद ती वाढवू शकते त्याचप्रमाणे खच्ची करू शकते. वर्गीय दडपणुकीचे ती समर्थन करू शकते; किंवा उलटपक्षी, श्रमिक जनसमुदायांच्या जाणिवेचा विकास करून व त्यांना शिक्षित करून दडपशहांवर मिळवावयाच्या विजयाच्या जवळ आणण्यास हातभार लावू शकते. म्हणूनच मार्क्स आणि एंगल्स यांनी सरंजामदारी आणि भांडवलदारी संस्कृतीतील पुरोगामी आणि प्रतिगामी घटनांमध्ये स्पष्ट फरक करण्याचे आवाहन केले आणि पक्षाने कलेकडे पाहण्याचा दृष्टिकोन ठरविताना क्रांतिकारक वर्गाच्या भूमिकेवरूनच तिचे मूल्यमापन करावे, असे तत्त्व पुढे मांडले.

कला आणि वर्गलढा यांच्यात संबंध आहेत हे दाखवून देताना हा प्रश्न योजनेत जखडून ठेवण्याच्या प्रयत्नांविरुद्ध मार्क्स आणि एन्गल्स यांनी सदैव झगडा केला. वर्ग हे काही स्थिर आणि अपरिवर्तनीय नसतात, उलट इतिहासाच्या क्रमात वर्गांचे परस्परसंबंध बदलत असतात, समाजाच्या जीवनातील वर्गांच्या भूमिकेत गुंतागुंतीचे बदल होत असतात हे त्यांनी दाखवून दिले आहे. सरंजामशाहीविरोधी लढ्याच्या कालखंडात भांडवलशाही कित्येक लक्षणीय आत्मिक मूल्यांची निर्मिती करू शकली, पण सरंजामशाहीविरोधी क्रांत्यांच्या परिणामी जेव्हा ती स्वतः सत्तेवर आली, तेव्हा तिने स्वतःच सरंजामशाहीविरुद्ध लढ्यात वापरलेले ते हत्यार हळूहळू नाकारायला प्रारंभ केला. ऐतिहासिक प्रांगणात जेव्हा नवी शक्ती– कामगारवर्ग– उदयाला येऊ लागते, तेव्हा भांडवलशाही आपल्या क्रान्तिकारक भूतकाळाशी फारकत घेऊ लागते. अशा परिस्थितीत, भांडवलदारी बुद्धिमंतांपैकी काही व्यक्ती– विशेषतः सांस्कृतिक आणि कला क्षेत्रातील थोर माणसे वास्तवाचे अधिक सखोल आकलन करण्याचे, भांडवलदारी संबंधांच्या चौकटीपलीकडे जाण्याचे आणि कोणत्या तरी कला-प्रकाराद्वारे

त्याविरुद्ध आपला निषेध व्यक्त करण्याचे प्रयत्न करतात, तेव्हा अपरिहार्यपणे भांडवलदारी समाजातील सत्ताधीशांशी त्यांचा संघर्ष होतो व भांडवलदारी भूमिकांपासून ती दूर जातात.

मार्क्स आणि एन्गल्स आपली ज्ञानाची विरोधविकासात्मक आणि भौतिकवादी सिद्धांतप्रणाली कला व साहित्य यांच्या पृथक्करणाला लागू करतात. त्यांच्या मते, कलात्मक निर्मिती हा वास्तवाचे प्रतिबिंब पाडण्याचा एक मार्ग आहे आणि त्याच वेळी वास्तवाचे आकलन व चिंतन करण्याचा मार्ग होय; तसेच मानवजातीच्या आत्मिक विकासावर प्रभाव पाडण्याची अत्यंत शक्तिशाली अशी तरफदेखील आहे. कलेकडे पाहण्याचा हा दृष्टिकोन तिचे सामाजिक महत्त्व आणि समाजाच्या प्रगतीच्या संदर्भातील तिची प्रमुख भूमिका यांच्या भौतिकवादी आकलनाचा पाया होय.

स्वाभाविकपणेच, साहित्य आणि कला यांची चिकित्सा करताना मार्क्स आणि एन्गल्स यांनी आपले लक्ष वास्तववादाच्या प्रश्नावर–कलात्मक कृतींमध्ये वास्तवाचे अत्यंत विनचूक चित्रण येण्याच्या प्रश्नावर केंद्रित केले.

वास्तववाद हा साहित्यातील प्रवाह आणि कलात्मक निर्मितीची पद्धती आहे. जागतिक कलेची ती सर्वश्रेष्ठ यशःसिद्धी आहे असे त्यांना वाटे. एन्गल्स यांनी, सार्वत्रिक मान्यता पावलेली वास्तववादाची शास्त्रपूत व्याख्या केली. त्यांनी लिहिले आहे, "माझ्या मते वास्तववाद म्हणजे तपशीलासकट सत्यता, वैशिष्ट्यपूर्ण परिस्थितीतील वैशिष्ट्यपूर्ण स्वभावचित्रांची सत्यशील पुनर्निर्मिती होय" (पृष्ठ ९०). मार्क्स आणि एन्गल्स यांनी आवर्जून सांगितले आहे की वास्तववादी मांडणी म्हणजे वास्तवाची केवळ नक्कल मुळीच नाही, तर त्या घटनेच्या आशयाचा अंतर्भेद करण्याचा एक मार्ग होय, एका विशिष्ट युगातील वैशिष्ट्यपूर्ण प्रवृत्तींवर प्रकाशझोत टाकू शकेल अशी कलात्मक सर्वसाधारणीकरण करण्याची पद्धती होय. शेक्स्पिअर, सेर्वान्तिस, गटे, बाल्झॅक्, पुश्किन आणि अन्य थोर वास्तववादी लेखकांच्या कलाकृतीत नेमक्या याच बाबींचे मोल त्यांना फार वाटे. डिकन्स, थॅकरे, ब्रॉंटी-भगिनी आणि गॅस्केल या १९ व्या शतकातील इंग्लिश वास्तववाद्यांचे वर्णन मार्क्स यांनी कादंबरीकारांतील अत्यंत तेजस्वी तारे असे करून ते म्हणतात, "त्या वेळच्या सर्व धंदेवाईक राजकारण्यांनी, प्रचारकांनी आणि नीतिवाद्यांनी मिळून जेवढी राजकीय आणि सामाजिक सत्ये जगाला सांगितली नसतील, त्यांच्याहून अधिक सत्ये या लेखकांच्या कादंबऱ्यांतील बोलक्या पानांनी आणि शब्दचित्रांनी सांगितली" (पृष्ठ ३३९). थोर फ्रेंच वास्तववादी लेखक बाल्झॅक यांच्या कलाकृतींचे समीक्षण करताना एन्गल्स यांनी अशीच विचारधारा विकसित केली. कॉमेडी ह्यूमेनविषयी लिहिताना त्यांनी नमूद केले आहे की, बाल्झॅक यांनी वाचकाला "फ्रेंच समाजाचा अत्यंत सुरेख रीतीने वास्तववादी इतिहास सादर केला....त्यामुळेच, अगदी आर्थिक बाबींचा तपशील देखील (उदाहरणार्थ, क्रांतीनंतरची खरी व वैयक्तिक मालमत्तेची फेरव्यवस्था) मी त्या

काळातील सगळ्या धंदेवाईक इतिहास-पंडितांकडून, अर्थशास्त्रज्ञांकडून आणि आकडे-शास्त्रज्ञांकडून मिळून जेवढा शिकलो नाही, तेवढा त्या कलाकृतीतून शिकलो" (पृष्ठ ९१).

मार्क्स आणि एन्गल्स यांनी १८५९ च्या वसंत ऋतूत लासाल यांना लिहिलेल्या पत्रात वास्तववादाबद्दल काही महत्त्वाचे विचार पुढे मांडले आहेत; त्यात त्यांनी, लासाल यांनी जर्मनीतील शेतकरी युद्धापूर्वी १५२२-२३ मध्ये झालेल्या सरदारांच्या बंडावर लिहिलेल्या **फ्रांझ फॉन सिकिंजेन** या ऐतिहासिक नाटकावर कडक टीका केलेली आहे. त्या दोन पत्रांत मार्क्सवादी सौंदर्यशास्त्राची मूलभूत तत्त्वे ग्रथित केलेली असल्याने त्यांचे महत्त्व फार मोठे आहे. (पृष्ठे ९८-१०७).

चित्रणातील सत्यशीलता, वर्ण्य घटनांकडे पाहण्याचा ठोस ऐतिहासिक दृष्टिकोन आणि ज्या वर्गीय परिसरातील असतील त्या व्यक्तिचित्रांचे जिवंत व वैशिष्ट्यपूर्ण वैयक्तिक प्रवृत्तींचे आणि मानसशास्त्राचे प्रतिबिंब दाखवणाऱ्या व्यक्तिरेखा यांचे दर्शन कलाकाराने घडविले पाहिजे, अशी मार्क्स आणि एन्गल्स यांची अपेक्षा होती. खरी-खुरी वास्तववादी कलाकृती निर्माण करणारा कलाकार आपले विचार उपदेशबाजीचे डोस पाजून वाचकांपर्यंत पोचवीत नाही, तर आपल्या कलात्मक अभिव्यक्तीने वाचकांच्या जाणिवेच्या व भावनांना आवाहन करणाऱ्या ठसठशीत प्रतिमांनी पोचवितो. थोर जर्मन कवि आणि नाटककार शिलर— विशेषतः अमूर्त शब्दबंबाळ रचनेच्या त्यांच्या खास आवडीपायी, त्यातील नायक म्हणजे काही विचारांचे अमूर्त व एकसुरी भाषणे पाठ म्हणणारे ठरतात, तोच चुकीचा प्रकार लासाल आपल्या कलात्मक पद्धतीत आणखी भडक करतो, असे मार्क्स आणि एन्गल्स यांचे मत होते. या संदर्भात, शिलरच्या पद्धतीपेक्षा ते शेक्स्पिअरचा वास्तववाद अधिक पसंत करतात. वास्तववादी लेखकाने आशयाची सखोलता आणि उत्तुंग ध्येये यांची सांगड घालून मानवी व्यक्ति-चित्रांची नानाविध स्वरूपे आणि खऱ्याखुऱ्या विकारांचे चित्रण करण्याची शेक्स्पिअरची ताकद अंगी आणण्याचे प्रयत्न करणे महत्त्वाचे आहे, याचा विसर शिलरचे अनुकरण करणाऱ्या लासाल याला पडला, असे उभयतांनी दाखवून दिले आहे.

लासाल याला लिहिलेल्या पत्रात मार्क्स आणि एन्गल्स यांनी साहित्य आणि जीवन, तसेच साहित्य आणि समकाल यांच्या दरम्यानच्या संबंधांच्या प्रश्नाचाही ऊहापोह केला. नाटकात वर्णन केलेले १६ व्या शतकातील प्रसंग आणि १९ व्या शतकाच्या मध्यावरची परिस्थिती यांच्यातील साम्य दाखवण्याचा आणि "१८४८-१८४९ मध्ये क्रांतिकारक पक्षाला.... सोसावा लागलेला विध्वंस" (पृष्ठ ९८) घडवून आणणारा खराखुरा शोकान्त संघर्ष चित्रित करण्याचा मनोदय लासाल याने बाळगला म्हणून काही मार्क्स यांनी त्याचा धिक्कार केलेला नाही, तर त्या संघर्षाचे चुकीचे, आदर्शवादी स्पष्टीकरण त्याने दिले, "क्रांतीची शोकांतिका" अशा तथाकथित युगानुयुगांचे अमूर्त कारण दाखवून त्याने तसे केले, ही नाटककाराची त्यांच्या मते चूक होती;

कारण त्याला कोणताही ठोस ऐतिहासिक किंवा वर्गीय आशय नव्हता. मार्क्स यांनी लासाल याच्यावर टीका केली ती नाटकाच्या राजकीय प्रवृत्तीसाठी नव्हे, तर इतिहासाच्या भौतिकवादी आकलनाच्या आणि कामगारवर्गीय क्रांत्यांकडे पाहावयाच्या जागतिक दृष्टिकोनाच्या मुद्यावरून त्याने मूलतःच चूक केली होती म्हणून मार्क्स यांनी ती टीका केली. साहित्याला राजकारणाच्या वरचे स्थान द्यायचा आणि "कलेसाठी कला" ही सिद्धांतप्रणाली मांडण्याचा प्रयत्न करणे या गोष्टींवर वास्तववादी लेखकांच्या कलाकृतीतून पुरोगामी जागतिक दृष्टिकोन प्रतिबिंबित व्हावा, पुरोगामी विचारांनी त्या परिपूर्ण असाव्यात आणि त्यांनी खऱ्याखुऱ्या प्रासंगिक समस्यांचा ऊहापोह करावा असा त्यांचा आग्रह असे. सैद्धांतिक आणि राजकीय साथीदारी असे जिचे वर्णन करता येईल अशा साहित्यातील हेतुपूर्णतेचे ते स्वागत करीत, ते याच अर्थाने. एन्गल्स यांनी २६ नोव्हेंबर १८८५ रोजी जर्मन लेखिका मिन्ना कौट्स्की हिला लिहिलेल्या पत्रात म्हटले आहे की, "हेतुपूर्ण कवितेच्या विरुद्ध मी मुळीच नाही, शोकान्तिकेचे जनक एस्किलस, आणि सुखांतिकेचे जनक ॲरिस्टोफेनिस हे देखील हेतुपूर्ण कवी होते, डाण्टे आणि सेर्वान्तिस काही कमी नव्हते, आणि शिल्लर याच्या काबाले उंड लिएबे विषयी सर्वांत चांगली गोष्ट अशी सांगता येईल की, तेच पहिले जर्मन राजकारणाविषयीचे समस्याप्रधान नाटक होते. उत्कृष्ट कादंबऱ्या लिहिणारे सर्व आधुनिक रशियन आणि नॉर्वेजियन लेखक हेतुपूर्णच लिहितात." (पृष्ठ ८८). त्याबरोबरच, अक्कलशून्य हेतुपूर्णता–भटकटीत उपदेश, कलात्मक पद्धतीऐवजी शब्दबंबाळ उपदेशपरता आणि जिवंत व्यक्तिचित्रांच्या ऐवजी अमूर्त व्यक्तिरेखा उभ्या करणे यांना मार्क्स आणि एन्गल्स यांचा सक्त विरोध होता. "तरुण जर्मनी" या साहित्यिक चळवळीतील कवींनी उभ्या केलेल्या व्यक्तिचित्रातील कलात्मक न्यूनता आणि साहित्यिक सिद्धहस्तपणाच्या अभावाची जागा राजकीय वादावादीने भरून काढण्याचे प्रयत्न यावर ते टीका करीत. मिन्ना कौट्स्की हिला लिहिलेल्या पत्रात एन्गल्स यांनी खऱ्याखुऱ्या हेतुपूर्णतेची सुयोग्य व्याख्या दिली आहे: "हा हेतू प्रसंगातून आणि प्रत्यक्ष कृतीतूनच सुस्पष्ट व्हायला हवा, मुद्दाम दाखवून द्यायला न लागता स्पष्ट व्हावा आणि ज्या सामाजिक संघर्षाचे वर्णन लेखक करतो त्याची भावी ऐतिहासिक उकल वाचकासाठी बशीत वाढलेल्या तयार पदार्थासारखी लेखकाने सादर करण्याची गरज नसते" (पृ. ८८). पुरोगामी साहित्यात सद्यःकालीन महत्त्वाच्या प्रक्रियांचे सत्यशील, सखोल प्रतिबिंब पडले पाहिजे; पुरोगामी विचार उद्घोषित केले पाहिजेत; आणि समाजातील पुरोगामी शक्तींच्या हितसंबंधांचे रक्षण केले पाहिजे, याविषयी मार्क्स आणि एन्गल्स या दोघांचीही प्रगाढ खात्री झालेली होती. साहित्यातील पक्षीय बाणा ही आधुनिक संज्ञा वापरतानाही हाच अर्थ अभिप्रेत असतो. लासाल यांच्या नाटकात जी बाब अभावाने होती–विचार आणि कलाकुसर यांची जैव एकात्मता–हा गुण खऱ्याखुऱ्या वास्तववादी कलेला अपरिहार्य असतो, असे त्यांना वाटे.

भौतिकवादी सौंदर्यशास्त्राची तत्त्वे आणि कलेच्या विकासाचे मौलिक आणि अत्यंत सर्वसाधारण नियम पुढे मांडताना, शास्त्रशुद्ध कम्युनिझमच्या संस्थापकांनी साहित्यविषयक व कलाविषयक मार्क्सवादी टीकाशास्त्राचा पाया घातला आणि कला व साहित्य यांच्या इतिहासाच्या भौतिकवादी स्पष्टीकरणाची मूलतत्त्वेही पुढे मांडली. त्यांनी आपल्या ग्रंथातून आणि पत्रव्यवहारातून ऐतिहासिक व साहित्यिक प्रक्रिया-विषयक अत्यंत महत्त्वाच्या प्रश्नांवर नवा प्रकाश टाकला, आणि भांडवलदारी साहित्यिक इतिहासज्ञांच्या आकलनशक्तीबाहेर असलेल्या अभिजात व समकालीन अशा दोन्ही प्रकारच्या लेखकांच्या ग्रंथातील अंगोपांगे सुस्पष्ट करून दाखवली. या संग्रहात, मानव-जातीच्या इतिहासातील अत्यंत महत्त्वाच्या युगातील कलात्मक कृतींबद्दलची मार्क्स आणि एन्गल्स यांची मते वाचकाला आढळतील–प्राचीन आणि मध्ययुगीन काळातील कला, पुनरुज्जीवनाच्या कालखंडातील संस्कृति व साहित्य, ज्ञानजागृतीच्या काळातील साहित्य आणि शेवटी, १९ व्या शतकातील रोमँटिक व वास्तववादी लेखकांचे ग्रंथ यांचे त्यांनी केलेले मूल्यमापन वाचकांना यात आढळेल. त्याशिवाय, सर्वसाधारण प्रमुख साहित्यिक आणि कलाविषयक प्रवाह व त्यांच्याबद्दल मार्क्सवादी सौंदर्यशास्त्राच्या जनकांचा दृष्टिकोन, तसेच व्यक्तिगत लेखक आणि कलाकार यांच्याविषयीची त्यांची मतेही वाचकांना या ग्रंथात आढळून येतील.

प्राचीन कलेविषयी मार्क्स आणि एन्गल्स यांच्या मतांचा ऊहापोह सारांशरूपाने वर केलेला आहे. आता इतर युगातील कलेचे मूल्यमापन त्यांनी कसे केले, त्याकडे वळू या.

मध्ययुगीन कालखंडातील समाजव्यवस्था व संस्कृती यांची खास वैशिष्ट्ये याविषयी त्यांनी केलेले खरेखुरे शास्त्रशुद्ध स्पष्टीकरण अत्यंत लक्षणीय आहे. मार्क्स आणि एन्गल्स यांनी मध्ययुगीन रोमँटिक आदर्शांचा बुरखा फाडला आणि त्या-बरोबरच ज्ञानजागृतिवादी लोकांच्या अमूर्त विचारातील विसंगती देखील त्यांनी दाखवून दिली आणि प्रत्यक्षात तो कालखंड सामाजिक व सांस्कृतिक परागतीचाच होता, हे सिद्ध करून दिले. गुलाम-मालकांच्या काळाकडून सरंजामशाही समाजाकडे झालेले संक्रमण ऐतिहासिकदृष्ट्या अपरिहार्य होते आणि सरंजामशाही उत्पादनाच्या पद्धतीची प्रस्थापना हे अगोदरच्या गुलामगिरीच्या राजवटीच्या तुलनेने मानवी समाजाच्या विकासातील पुढचे पाऊल होते, असे त्यांनी दाखवून दिले. त्यायोगे मध्य-युगीन संस्कृती आणि कला यांच्याकडे पाहण्याचा नवा दृष्टिकोन स्वीकारणे व ऐतिहासिक विकासाचा पुरोगामी क्रम प्रतिबिंबित होतो, अशी वैशिष्ट्ये दाखवून देणे त्यांना शक्य झाले. एन्गल्स यांनी लिहिले "....मध्ययुगीन काळाच्या प्रारंभी राष्ट्रांची परस्परात सरमिसळ झाल्याने हळूहळू नवे राष्ट्रगट विकसित झाले," (मार्क्स / एंगल्स **वेर्के**, खंड २१ वा, पृष्ठ ३९५), त्यामुळेच मानवजातीचा आणखी सामाजिक आणि सांस्कृतिक विकास झाला; कारण ती त्याची पूर्व-अट होती. आईसलडमधील व आयर्लंडमधील

एल्डर एड्डा आणि इतर महाकाव्ये, बिओवूल्फ ले ऑफ हिल्देब्रांद आणि चान्सन द रोलाँ ह्या यशोगाथांसारख्या मध्ययुगाच्या प्रारंभकाळातील महाकाव्यांची चिकित्सा करून मार्क्स आणि एन्गल्स यांनी दाखवून दिले की टोळीव्यवस्थेच्या अगदी प्रारंभीच्या टप्प्यांतून युरोपातील राष्ट्रगटांच्या उदयाच्या प्रारंभकाळाशी निगडित असलेल्या संथ संक्रमणाचे प्रतिबिंब या महाकाव्यात पडलेले आढळते. एन्गल्स यांनी दाखवून दिल्याप्रमाणे मध्ययुगातील महाकाव्ये आणि राष्ट्रवीरांचे पोवाडे गाणाऱ्या कविता, प्राचीन जगतातील अभिजात महाकाव्यातील कवितांशी तुलना करता त्यांच्यात नवे सांस्कृतिक-ऐतिहासिक आणि सौंदर्यशास्त्रीय गुण दिसून येतात, हे त्यांचे खास वैशिष्ट्य होय. हीच गोष्ट त्यानंतरच्या सरंजामशाही मध्ययुगीन काळातील भावकाव्यांच्या, मध्ययुगातील रोमँटिक भावगीतांच्या बाबतीत लागू पडते, त्याचे सर्वोत्तम उदाहरण म्हणजे ११ व्या, १२ व्या आणि १३ व्या शतकातील प्रोव्हिन्कल, स्पॅनिश आणि इटालियन भावकवींची कविता हे होय. एन्गल्स यांनी आपल्या "कुटुंब संस्था, खासगी मालमत्ता आणि राज्यसंस्था यांचा उगम" या ग्रंथात म्हटले आहे, "मध्ययुगापूर्वी वैयक्तिक वैषयिक प्रेम अशी कोणतीच गोष्ट अस्तित्वात नव्हती." (पृष्ठ २१५). याच कारणासाठी, प्राचीन काळाशी व लोकांशी तुलना करता मध्ययुगात व्यक्तिगत प्रेमाचा झालेला उदय व त्याचे काव्यात्म उदात्तीकरण हे पुढचे पाऊलच म्हटले पाहिजे. शिवाय, मध्ययुगीन प्रेम-कवितांनी पुढील पिढ्यांवर प्रभाव पाडला आणि आधुनिक युगातील काव्याच्या फुलोऱ्याची पार्श्वभूमी तयार केली.

पुनरुज्जीवनाच्या चळवळीबाबतचा नवा दृष्टिकोन मार्क्स आणि एंगल्स यांनी सूत्रबद्ध केला आणि सिद्ध करून दिला; हा दृष्टिकोन पूर्वीच्या भांडवलदारी सांस्कृतिक इतिहासकारांच्या दृष्टिकोनापेक्षा आणि समकालीन, तसेच नंतरच्या भांडवलदारी इतिहास-लेखन-शास्त्रापेक्षा मूलतःच भिन्न होता. पश्चिम युरोपातील पुनरुज्जीवनाच्या चळवळीच्या ऐतिहासिक अर्थाचे नवे आकलन एन्गल्स यांनी निसर्गाचा विरोधविकास या ग्रंथाच्या प्रस्तावनेत १८७५-७६ मध्ये (पृष्ठे २५१-२५३) अत्यंत विकसित स्वरूपात मांडले. पुनरुज्जीवनाची चळवळ म्हणजे त्या काळातील केवळ सैद्धांतिक आणि आत्मिक जीवनातील उलथापालथच होय, असा दृष्टिकोन पारंपारिक भांडवलदारी शास्त्र मांडीत असे; त्याउलट, एंगल्स यांनी ठासून सांगितले की हा दृष्टिकोन बरोबर नाही. जे बदल झाल्याने मध्ययुगातून आधुनिक काळात संक्रमण झाले, त्या आर्थिक आणि राजकीय बदलांत ह्या नव्या युगाचा उगम आपण शोधला पाहिजे. त्या काळातील संस्कृती, साहित्य आणि कला या क्षेत्रात ज्यायोगे मोठीच झेप घेणे शक्य झाले, त्यातील काही यशःसिद्धी तर अधिक परिपक्व भांडवलदारी समाजात देखील अजोड ठरल्या, अशा त्या घटनांच्या खोल गाभ्यातच एन्गल्स यांनी बुडी मारली. एन्गल्स यांनी दाखवून दिले की पुनरुज्जीवनाच्या काळातील कला आधीच प्रस्थापित झालेल्या भांडवलदारी समाजात इतकेच नव्हे, तर "सर्वसाधारण क्रांतीच्या ऐन भराच्या काळात" विकसित

झाली (फ्रेडरिक एन्गल्स, निसर्गाचा विरोधविकास, मॉस्को, १९७४, पृष्ठ २१). त्या कालखंडातील सामाजिक संबंध सतत बदलणारे आणि अनिश्चित स्वरूपाचे होते; पुढे अधिक परिपक्व भांडवलदारी समाजात हे संबंध म्हणजे काही प्रमाणात व्यक्तीची पुढाकारवृत्ती, बुद्धिमत्ता आणि कुवत. यांच्या विकासाला खीळ घालणारी शक्ती बनल्या नव्हत्या; तर उलटपक्षी, या संबंधांमुळे ह्या शक्तीच्या विकासाला सक्रिय हातभारच लागला. एन्गल्स यांनी म्हटले आहे, "या युगाच्या ह्या क्रांतिकारक स्वरूपामुळे, मानवजातीने आतापर्यंत अनुभवलेल्यांपैकी या सर्वांत मोठ्या पुरोगामी क्रांतीमुळे विचारधन, भावना आणि व्यक्तिचित्रण यांच्या दृष्टीने, सार्वकालीनता आणि विद्वत्ता यांच्या दृष्टीने उत्तुंग अशा थोर कलाकारांचीच अपेक्षा होते, आणि असे उत्तुंग, थोर कलाकारच या काळात निर्माण झाले." म्हणूनच "भांडवलशाहीच्या आधुनिक सत्तेचा पाया ज्यांनी घातला, त्यांच्यावर भांडवलदारी मर्यादा मुळीच नव्हत्या." (पृष्ठे २५२-२५३). एन्गल्स यांनी असेही नमूद केले की, "त्या काळातील नायक अद्याप श्रम-विभागणीचे गुलाम झालेले नव्हते; तदनंतरच्या नायकात आपण अनेकदा उत्पादनाच्या एकांगीपणामुळे तिचे निर्बंधात्मक परिणाम पाहतो." (पृष्ठ २५३). हा विचार स्पष्ट करण्यासाठी एन्गल्स यांनी लिओनार्दो द विन्सी यांचे असे वर्णन केले आहे की, "तो केवळ थोर चित्रकारच होता इतकेच नव्हे, तर एक थोर गणिततज्ज्ञ, यंत्रविशारद आणि अभियंता होता; आणि पदार्थविज्ञान शास्त्रातील अनेक महत्त्वाचे शोध त्याने लावले असल्याने त्या शास्त्राच्या अत्यंत भिन्न भिन्न शाखा त्याच्या ऋणी आहेत;" आणि अल्ब्रेश्त ड्यूरर याच्या कलाकृतीविषयी म्हटले आहे की, "तो चित्रकार, शिल्पकार, वास्तुशिल्पी आणि कोरीव काम करणारा कलाकार होता." आणि तटबंदीच्या बांधकाम पद्धतीचा शोध त्यानेच लावला. पुनरुज्जीवनाच्या कालखंडातील थोर कलाकारांना नानाविध विषयांत आणि व्यापक ज्ञानार्जनात स्वारस्य होते, असे एन्गल्स यांनी दाखवून दिले आहे. (पृष्ठ २५३).

मार्क्स आणि एन्गल्स यांनी पुनरुज्जीवनाच्या कालखंडाचे मूल्यमापन "सार्वत्रिक क्रांती", "सर्वांत मोठी पुरोगामी क्रांती" असे केले असल्याने, त्या युगातील "अति महान" व्यक्तीविषयी त्यांना एवढी प्रगाढ सहानुभूती का वाटते, त्याचे स्पष्टीकरण मिळते. पुनरुज्जीवनाच्या कालखंडातील थोर व्यक्तींकडे त्यांनी केवळ महान पंडित, कलाकार किंवा कवि म्हणूनच पाहिले इतकेच नव्हे, तर जागतिक विज्ञान आणि संस्कृतीचे थोर क्रांतिकारक म्हणूनही पाहिले.

पुनरुज्जीवनाच्या कालखंडातील नायकांचा अत्यंत महत्त्वाचा स्वभावविशेष म्हणजे 'ते सर्वजण समकालीन आंदोलनांच्या प्रवाहात जगतात आणि आपापले कार्य करतात, व्यवहार्य लक्ष्यात उतरतात; ते बाजू घेतात आणि संघर्षात सामील होतात, कोणी बोलून आणि लिहून; कोणी हातात तलवार घेऊन; तर बहुतेक जण दोन्ही आघाड्यांवर राहून" (पृष्ठ २५३). असे एन्गल्स यांचे मत होते. भविष्य काळातील

कलाकारांनीही असेच वागावे अशी एंगल्स यांची अपेक्षा होती, असे ध्यानात येणे अवघड नाही. पुनरुज्जीवनाच्या कालखंडातील लोकांची "बाजू घेण्याची", तत्कालीन विषयांमध्ये रमून राहण्याची त्यांची कुवत, यावर जेव्हा एन्गल्स भर देऊन सांगतात की, याच स्वभावविशेषांमुळे हे नायक भांडवलदारी शास्त्राच्या, आराम-खुर्चीत बसून गप्पा मारणाऱ्या, संकुचित व्यावसायिक आणि सर्वात जास्त म्हणजे १९ व्या शतकातल्या "अलिप्ततावादी" आणि "विशुद्ध कले"चे पोवाडे गाणाऱ्या भांडवलदारी लेखकांच्या आणि कलाकारांच्या पातळीहून कितीतरी वर उचलले जातात. या स्वभावविशेषामुळेच पुनरुज्जीवनाच्या कालखंडातील हे नायक समाज-सत्तावादी संस्कृतीच्या उद्दिष्टांच्या आणि कामगारवर्गाच्या क्रांतिकारक चळवळीच्या अधिक जवळ येऊन ठेपतात.

मध्ययुगातून पुनरुज्जीवनाच्या कालखंडाचे संक्रमण उद्घोषित करणाऱ्या अनेक थोर लेखकांपैकी डाण्टे हा एक थोर लेखक होता, असे मार्क्स आणि एन्गल्स मानीत असत. डाण्टे हा कवी होता आणि मूलग्राही चिंतन करणारा विचारवंत होता, त्या-बरोबरच ज्यांच्या काव्यात पक्षीय बाणा ठासून भरलेला आहे, असा एक योद्धा होता (मार्क्स आणि एन्गल्स, संकलित ग्रंथ, खंड ६ वा, मॉस्को, १९७३, पृष्ठ २७१) आणि त्याचे काव्य त्याच्या राजकीय ध्येयांपासून व आकांक्षांपासून अविभाज्य होते. विल्हेल्म लीबनेख्ट यांच्या मते तर मार्क्स यांना डिव्हाइना कॉमेडिया जवळजवळ तोंडपाठ होती आणि अनेकदा ते त्यातील उतारेच्या उतारे मोठ्याने म्हणून दाखवीत असत. "भांडवल" या ग्रंथाच्या प्रस्तावनेत मार्क्स यांनी शेवटी या महान फ्लॉरेन्टाईन कवीचेच अस्मितादर्शक उद्गार नमूद केले आहेत. "तुम्हाला जायचे आहे त्या मार्गाने जा, आणि लोकांना जे म्हणायचे असेल ते खुशाल म्हणू द्या!" भांडवल या ग्रंथाच्या कर्त्याने आपले अत्यंत आवडते कवि गटे, एस्किलस आणि शेक्स्पिअर यांच्याच पंक्तीला डाण्टे यांना बसवले आहे. एन्गल्स यांनी तर डाण्टे यांचे वर्णन "अतुलनीय अजरामर परिपूर्ण" व्यक्ती (पृष्ठ २४७) आणि "एक उत्तुंग व्यक्तिमत्व" (पृष्ठ २४८) अशा शब्दात केले आहे. थोर स्पॅनिश लेखक सेर्वान्तिस यांच्याविषयी देखील मार्क्स आणि एन्गल्स यांना अत्यंत आदर वाटे. पॉल लाफार्ग यांनी म्हटले आहे की, "इतर सर्व कादंबरीकारांच्या तुलनेत" मार्क्स हे डॉन क्विक्झोट च्या लेखकाला, बाल्झॅकच्या समवेत श्रेष्ठ मानीत असत (पृष्ठ ४३९). शेवटी, शेक्स्पिअर हा त्या दोघांचाही अत्यंत आवडता लेखक होता. त्याच्या-विषयी मार्क्स आणि एन्गल्स यांना किती कौतुक होते, ते सर्वांना ठाऊक आहे. त्याच्या कालखंडातील जीवनाचे त्याने आपल्या नाटकात केलेले दूर पल्ल्याचे चित्रण आणि त्यातील अमर झालेली पात्रे म्हणजे वास्तववादी नाटकाची सर्वोत्कृष्ट उदाहरणे होत, असे त्या दोघांना वाटे. लाफार्ग यांनी लिहून ठेवले आहे की मार्क्स यांनी शेक्स्पि-अरच्या ग्रंथांचा "तपशीलवार अभ्यास" केला. "ह्या इंग्लिश नाटककाराचे विलक्षण

आकर्षण त्यांच्या संबंध कुटुंबाला असे." (पृष्ठ ४३८). एन्गल्स यांचे शेक्स्पिअरबद्दलचे विचार मित्राच्यासारखेच होते. १० डिसेंबर १८७३ रोजी त्यांनी मार्क्स यांना लिहिले, "मेरी वाइव्हज च्या पहिल्या अंकात जेवढे जीवन आणि वास्तवता भरलेली आहे, तेवढी अखिल जर्मन साहित्यात नाही." (पृष्ठ २६०).

शास्त्रशुद्ध कम्युनिझमच्या संस्थापकांनी अभिजात साहित्याची, १७ व्या आणि १८ व्या शतकाच्या साहित्यिक चळवळीची जी अत्यंत महत्त्वाची चिकित्सा केलेली आहे, ती मार्क्स यांनी तारीख २२ जुलै १८६१ रोजी लासाल यांना लिहिलेल्या पत्रात आढळते (पृष्ठ २६९). संस्कृतीच्या विकासाच्या भौतिकवादी आकलनाच्या आधारे, त्या पत्रात मार्क्स यांनी, अभिजातता ही सुप्रसिद्ध त्रिसूत्रीच्या तत्त्वानिशी अभिजात नाट्य आणि अभिजात सौंदर्यशास्त्र यांच्या नियमांची चुकीची समजूत करून घेण्याचा परिणाम आहे, ही अनैतिहासिक कल्पना फेटाळून लावली. त्यांनी दाखवून दिले की अभिजाततेच्या सैद्धांतिकांनी अभिजात ग्रीक नाटक आणि ॲरिस्टॉटलचे काव्यशास्त्र यांच्याविषयी चुकीचा समज करून घेतला हा काही केवळ योगायोग नव्हता, किंवा इतिहासाचे ते चुकीचे आकलन नव्हते, तर ती एक ऐतिहासिक अपरिहार्यताच होती. अभिजाततावादी नाटककारांनी ॲरिस्टॉटलविषयी "चुकीची समजूत" करून घेतली कारण त्या काळच्या विशिष्ट सामाजिक आणि सांस्कृतिक परिसरामुळे तयार झालेल्या त्यांच्या सौंदर्यवादी गरजांना आणि कलात्मक अभिरुचीला पोषक असाच तो "चुकीची समजूत" करून घेतलेला ॲरिस्टॉटल होता.

संस्कृतीचा इतिहास लिहिणाऱ्या पूर्वीच्या पंडितांना विचारांचा वर्गीय आशय आकलन होणे शक्यच नव्हते; मार्क्स आणि एन्गल्स यांनी मात्र १८ व्या शतकातल्या ज्ञानजागृतिपर विचारांचा सामाजिक, वर्गीय-ऐतिहासिक पाया स्पष्टपणे उजेडात आणला. त्यांनी दाखवून दिले की ज्ञानजागृती म्हणजे सामाजिक विचारांची केवळ एक चळवळ नव्हती, तर महान् फ्रेंच राज्यक्रांतीच्या आधी सरंजामी अरेरावीविरुद्ध लढण्यासाठी दंड थोपटून उभ्या राहिलेल्या पुरोगामी भांडवलदारांच्या हितसंबंधांची ती सैद्धांतिक अभिव्यक्ती होती.

१८ व्या शतकातील इंग्रज आणि फ्रेंच ज्ञानजागृतिकारांचे ललित साहित्य आणि सौंदर्यशास्त्रावरील ग्रंथ यांचा वारसा मोलाचा आहे, असे मार्क्स आणि एन्गल्स मानीत असत. ज्ञानजागृतिकारांच्या हालचालींचे त्यांनी जे तपशीलवार पृथक्करण केले आहे त्यावरून दिसून येते की फ्रेंच भांडवलदारी क्रांतीच्या पूर्वतयारीच्या काळातील वर्गलढा आणि समाजाचे जीवन यांच्याशी त्यांचा निकटचा संबंध होता आणि त्यांच्या परंपरेतील मवाळ भांडवलदारी वृत्तीचे आणि लोकशाहीवादी वृत्तीचे घटक यांच्यातील सूक्ष्म भेदाची रेषा या पृथक्करणात दिसून येते.

मार्क्स आणि एन्गल्स यांच्या ग्रंथांवरून आणि पत्रांवरून दिसून येते की ज्ञान-जागृतीच्या युगातील इंग्लिश व फ्रेंच या दोन्ही भाषांतील तत्त्वज्ञानविषयक व आर्थिक

साहित्याचे व ललित साहित्याचे त्यांचे ज्ञान प्रगाढ होते. डेफो, स्विफ्ट, व्होल्टेअर, दीदरो, रूसो, द ॲबे प्रेव्होस्त, बॉमार्शाय यांचा केवळ उल्लेख ते करतात इतकेच नव्हे, तर ज्ञानजागृतीच्या युगातील साहित्यिक जीवनाविषयीच्या अत्यंत महत्त्वाच्या पैलूंबाबत सर्वसाधारण निष्कर्ष काढताना ते त्यांच्या कलाकृतींचा आधार घेत घेत अगदी थोड्या शब्दांत पण अत्यंत हुषारीने त्यांचे सुयोग्य मूल्यमापन देखील करतात.

मार्क्स यांनी आपल्या आवडत्या लेखकांत देनिस दीदरो याचा समावेश केलेला आहे, हे नमूद केले पाहिजे. दीदरो याच्या कादंबऱ्या वाचताना, [विशेषतः ले नेवू द रामो हिला तर ते "अजोड सर्वश्रेष्ठ" कादंबरी म्हणत, (पृष्ठ २७९).] त्यांना आनंद होई. दीदरो याच्या विषयीचे हे मित्राचे मत एन्गल्स यांनाही मान्य होते. १८८६ साली त्यांनी लिहिले : "सत्य आणि न्याय यांच्यासाठीचा उत्साह दाखविण्याकरता कुणी आपले संपूर्ण आयुष्य वेचले असेल, आणि हा वाक्प्रचार चांगल्या अर्थाने वापरल्यास, त्याचे उदाहरण दीदरो हे देता येईल." (पृष्ठ २७९).

ज्ञानजागृति-पर्वाच्या काळातील जर्मनीतील प्रमुख लेखक लेसिंग, गटे, शिलर हेर्डेर आणि वायलँड यांच्याविषयीही मार्क्स आणि एन्गल्स यांनी लिहून ठेवले आहे. तीस वर्षांच्या युद्धामुळे (१६१८ ४८) जर्मनीतील सरंजामदारी विभागणी आणि प्रतिगामी छोट्या छोट्या संस्थानिकांच्या हातात सर्वाधिकार देणारी व्यवस्था बद्धमूल झाली होती; अशा जर्मनीतील आर्थिक, सामाजिक आणि राजकीय परिस्थितीचे दर्शन घडवीत असतानाच "जर्मन साहित्याच्या महान् युगातील" अत्यंत श्रेष्ठ अशा लेखकांपैकी बहुतेकांच्या विचारांवर आणि भावनांवर या परिस्थितीने निश्चित स्वरूपाचा प्रभाव पाडलेला आहे, असे त्यांनी दाखवून दिले (पृष्ठ ३४६). त्या वेळच्या जर्मन साहित्यात प्रचलित सामाजिक स्थितीविषयी बंडखोरीची वृत्ती आणि तिरस्काराची भावना स्पष्ट दिसत होती, त्याचबरोबर (जर्मनीतील प्रभावशाली सामाजिक स्तर असलेल्या) मध्यमवर्गाची भावनाही त्या साहित्यात प्रतिबिंबित झालेली दिसते– जो कोणी सत्तेवर असेल त्याचे कौतुक करणे आणि त्याच्यापुढे लाचारी पतकरणे ही या मध्यमवर्गाची अंगभूत वैशिष्ट्ये होती. गटे आणि हेगेल यांच्याविषयी लिहिताना एन्गल्स यांनी म्हटले आहे : "प्रत्येकजण आपापल्या क्षेत्रात ऑलिम्पियन झिअस होता, आणि तरीही त्यांच्यातल्या एकालाही जर्मन तुच्छतावादापासून स्वतःची मुक्तता करून घेता आली नाही." (पृष्ठ ३४९). गटे, शिलर आणि त्या कालखंडातील इतर जर्मन लेखकांच्या व विचारवंतांच्या उणीवांचे दिग्दर्शन करताना मार्क्स आणि एन्गल्स यांनी त्यांचे जगद्व्यापी आणि प्रगाढ महत्त्व कमी लेखण्याचा मुळीच प्रयत्न केलेला नाही. अगोदरच सांगितले आहे तदनुसार गटे हा मार्क्स यांचा आवडता कवि होता आणि यावरून त्यांची या थोर लेखकाकडे पाहण्याची दृष्टी कळून येते. ज्या समकालीनांना मार्क्स ठाऊक होते, त्यांनी दाखवून दिले आहे की ते ह्या थोर जर्मन कवीचे ग्रंथ सतत वाचीत असत. मार्क्स आणि एन्गल्स हे दोघेही आपल्या

लिखाणात आणि संवादात गटे यांच्या फाऊस्ट आणि इतर ग्रंथांचा वारंवार उल्लेख करीत. १८३७ साली जेव्हा तरुण मार्क्स हे बर्लिन विद्यापीठात विद्यार्थी होते, तेव्हाच त्या थोर कवीविरुद्ध १८३० नंतरच्या दशकात ज्या जर्मन प्रतिगाम्यांनी संघर्ष केला, त्या लढ्याचे एक नेते लूथरवादी ख्रिश्चन धर्मोपदेशक पुस्तकुचेने यांच्याविरुद्ध विडंबनात्मक कविता लिहून मार्क्स यांनी गटे यांचे समर्थन केलेले होते. एन्गल्स यांनी आपल्या वाङ्मयीन समीक्षेपैकी एक निबंध गटे यांच्या ग्रंथांचे पुथक्करण करण्यात खर्च केला आहे. "गद्यातील आणि पद्यातील जर्मन समाजवाद" (पृष्ठे ३५१-३७४). या निबंधात त्यांनी तुच्छतावादी जर्मन "खऱ्या समाजवादाच्या" सौंदर्य-शास्त्रावर हल्ला चढवलेला आहे.

साहित्याच्या खराखुरा शास्त्रशुद्ध इतिहास तपशीलवारपणे अभ्यासण्यासाठी मार्क्स आणि एन्गल्स यांनी केलेले पाश्चात्य रोमँटिसिझमचे पृथक्करण खूपच महत्त्वाचे आहे. महान् फ्रेंच राज्यक्रांतीनंतरच्या युगाचे प्रतिबिंब म्हणून रोमँटिसिझम विचारात घेऊन, त्यातील सगळे अंगभूत सामाजिक अंतर्विरोध ध्यानात घेऊन, त्यांनी दाखवून दिले की भांडवलशाही नाकारून भविष्याची स्वप्ने पाहणारा क्रांतिकारक रोमँटिसिझम वेगळा आणि भूतकाळाच्या दृष्टिकोनातून भांडवलशाहीवर टीका करणारा रोमँटिसिझम वेगळा. भांडवलशाही-पूर्व काळातील सामाजिक समाजव्यवस्थेचे गोडवे गाणाऱ्या रोमँटिक लेखकांमध्येही ते फरक करीत : ज्यांच्या लिखाणात भोळसट मध्यमवर्गीय आदर्शांच्या आणि प्रतिगामी स्वप्नाळू बुरख्याआड लोकशाहीवादी व चिकित्सक मूल्ये दडलेली आढळत, अशा लिखाणांचे त्यांना मोल वाटे; आणि ज्यांची भूतकाळविषयक सहानुभूती म्हणजे उमरावशाहीच्या हितसंबंधांचे समर्थन होती, अशा प्रतिगामी रोमँटिक लेखकांवर ते टीका करीत. बायरन आणि शेली अशांसारख्या क्रांतिकारक रोमँटिक कवींच्या साहित्याचे मार्क्स आणि एन्गल्स विशेषेकरून चाहते होते.

१९ व्या शतकातील वास्तववादी लेखकांच्या मार्क्स आणि एन्गल्स यांनी केलेल्या मूल्यमापनाचा याआधी उल्लेख येऊन गेलाच आहे. मार्क्स आणि एन्गल्स यांच्या मते वास्तववादी परंपरा म्हणजे त्याआधीच्या समग्र साहित्यिक प्रक्रियेची परिणतीच होय. एन्गल्स यांनी गी द मोपासाँ यांच्या लिखाणात, १९ व्या शतकाच्या उत्तरार्धातील वास्तववादी रशियन कादंबरीच्या निर्मितीत आणि नॉर्वेमधील समकालीन नाटककारांत त्यांचा विकास व संपन्नता यांचा शोध घेतला. मार्क्स आणि एन्गल्स यांना रशियाविषयी ज्वलंत कुतूहल होते आणि रशियन क्रांतिकारी चळवळीला ते फार महत्त्व देत असत. रशियातील सामाजिक व आर्थिक जीवनाचा विकास अधिक चांगल्या रीतीने आकलन करता यावा म्हणून ते दोघेही रशियन भाषा शिकले. त्यांचा रशियातील केवळ सामाजिक, आर्थिक व वृत्तपत्रीय लेखनाशीच परिचय होता इतकेच नव्हे, तर त्या देशातील ललित साहित्याशीही त्यांचा चांगला परिचय होता. त्या दोघांनीही पुश्कीन, तुर्गेनेव्ह, साल्तिकोव-श्चेद्रिन, चेर्निशेव्स्की आणि दोब्रोल्यूबोव

यांचे ग्रंथ मूळ रशियन भाषेतून, तर मार्क्स यांनी गोगोल, नेक्रासोव आणि लेर्मोन्तोव् यांचेही ग्रंथ मुळातून वाचलेले होते. लोमोनोसोव, देर्झाविन्, खेम्नित्सर, झुकोव्स्की, बात्युश्कोव आणि क्रायलोव यांच्या ग्रन्थांच्या इंग्रजी अनुवादांशी एन्गल्स सुपरिचित होते. मार्क्स आणि एन्गल्स यांच्या मते पुश्किन यांचे येवगेनी ओनेगिनमधील वर्णन १९ व्या शतकाच्या पूर्वार्धातील रशियन जीवनाचे अत्यंत आश्चर्यकारक वाटेल इतके यथातथ्य चित्रण आहे. दोघांनाही विशेषतः चेर्निशेव्स्की व दोब्रोल्यूबोव प्रिय होते. एन्गल्स यांच्या मते हे क्रांतिकारक लेखक म्हणजे "दोन समाजसत्तावादी लेखिंग" होते. (पृष्ठ ४१४). आणि मार्क्स तर चेर्निशेव्स्की यांना "एक महान् रशियन पंडित आणि समीक्षक" (पान ४१५) म्हणत, तर दोब्रोल्यूबोव यांची तुलना लेखक या नात्याने "लेसिंग आणि दीदरो यांच्याशी" करीत. (पृष्ठ ४१५).

मार्क्स आणि एन्गल्स यांचा साहित्य आणि कला यांच्याकडे पाहण्याचा दृष्टिकोन प्रगाढ आंतरराष्ट्रीयत्ववादी होता हे त्यांचे एक खास वैशिष्ट्य होय. युरीपीय व विगर युरोपीय, लहान व मोठ्या अशा प्रत्येक राष्ट्राचा जागतिक कलेच्या व साहित्याच्या भांडारात आपापला अद्वितीय असा सहभाग असतो अशी श्रद्धा बाळगून ते सर्व राष्ट्रांच्या कलेकडे सारखेच लक्ष पुरवीत असत. इंग्लंड, फ्रान्स, जर्मनी, इटली, स्पेन आणि रशिया या देशांमधील कला आणि साहित्य यांचा विकास, त्याचप्रमाणे पौर्वात्य देशांतील कला आणि संस्कृती यांचे भांडार किंवा आइसलँड आणि नॉर्वे यांसारख्या अगदी लहान देशांतील कला व संस्कृती अशा सर्व बाबतीत त्यांना स्वारस्य वाटे. त्यांनी केलेल्या टिपणांवरून असे दिसते की अमेरिकेतील तद्देशीय मूळ रहिवाशांच्या प्राचीन संस्कृतीविषयीही त्यांना खूपच उत्सुकता वाटत होती.

लोकशाहीवादी आणि क्रांतिकारक असे जे कवी आणि लेखक कामगारवर्गाला जवळचे होते त्यांच्याकडे पाहण्याचा मार्क्स व एन्गल्स यांचा एक खास दृष्टिकोन होता. समकालीन पुरोगामी लेखकांपैकी सर्वोत्कृष्ट लेखकांना समाजसत्तावादी चळवळीकडे ओढण्याचे, प्रशिक्षित करण्याचे आणि त्यांच्यावर अनुकूल संस्कार करण्याचे; तसेच त्यांच्या लेखनकार्यातील दुर्बल अंगांवर मात करण्यासाठी त्यांना मदत करण्याचे कार्य या दोघांनी जीवनभर केले. साहित्यात कामगारवर्गीय क्रांतिकारक प्रवाह निर्माण व्हावा म्हणून मार्क्स आणि एंगल्स यांनी सक्रिय प्रयत्न केले.

थोर जर्मन क्रांतिकारी कवी हाइनरिख हायने यांच्या लिखाणावर मार्क्स यांचा प्रभाव होता. १८४३ साली त्यांची पॅरिसमध्ये भेट झाली. १८४३-४४ मध्ये हायने यांच्या भावकविता व उपहासात्मक लिखाण ऐन भरात असताना त्यांचा आणि मार्क्स यांचा अत्यंत निकटचा व मैत्रीचा संबंध होता. सायलेशियन विणकर आणि जर्मनी तसेच ए विंटर्स टेल यांसारख्या हायने यांच्या कवितांवर मार्क्स यांचा प्रभाव स्पष्ट दिसून येतो. संबंध हयातभर मार्क्स यांनी हायने यांचे कौतुक केले, अखिल मार्क्स कुटुंबाचे ते एक आवडते कवी होते. आपल्या मित्राच्या या मताशी

एन्गल्स संपूर्णपणे सहमत होते आणि हायने हे "सर्व हयात जर्मन कवींमध्ये अत्यंत श्रेष्ठ आहेत," असे त्यांना वाटे (पृष्ठ ३७५). जर्मन प्रतिगाम्यांविरुद्ध लढा देताना हायने यांच्या उपहासगर्भ कवितांमधील ओळी मार्क्स आणि एन्गल्स अनेकदा वापरीत असत. एक कलाकार म्हणून हायने यांचा जो विकास झाला त्यात मार्क्स आणि एन्गल्स यांचा सैद्धान्तिक प्रभाव खूपच मोठा होता आणि त्यायोगेच, कम्युनिस्ट क्रांती अपरिहार्यपणे विजयी होणार हे आकलन होण्यास त्यांना मदत झाली.

१८४८-१८४९ च्या क्रांतिकाळात मार्क्स आणि एन्गल्स यांची जॉर्ज वीर्थ आणि फर्डिनांड फ्रायलिग्राथ या जर्मन कवींशी चांगलीच दोस्ती होती आणि याच काळात त्यांनी त्यांच्याबरोबर न्यू ऱ्हेनिश्चे झायटुंग या वृत्तपत्रात बरोबरीने लेखन केले. एंगल्स यांनी वीर्थ यांचे "जर्मन कामगारवर्गाचे पहिले व अत्यंत महत्त्वाचे कवी" असे वर्णन केले आहे (पृष्ठ ४०२). वीर्थ यांच्या मृत्यूनंतर मार्क्स आणि एन्गल्स यांनी अत्यंत काळजीवंक त्यांच्या साहित्यिक लिखाणाचा संग्रह केला. १८८० च्या दशकात जर्मन सोशल डेमोक्रॅटिक वृत्तपत्रातून एन्गल्स यांनी त्यांचा अत्यंत जोमदार पुरस्कार केला.

१८४८-४९ मध्ये फ्रायलिग्राथ हे जर्मन क्रांतिकारक काव्यक्षेत्रातील एक अभिजात कवि बनले याचे सगळे श्रेय मार्क्स आणि एन्गल्स यांच्या प्रभावाकडे जाते. त्या कालखंडात त्यांनी लिहिलेल्या कविता मार्क्स आणि एंगल्स यांच्या विचाराशी मिळत्याजुळत्या आहेत आणि त्या सर्वोत्कृष्ट आहेत. मार्क्स आणि एन्गल्स यांनी फ्रायलिग्राथकडे जे लक्ष दिले आणि त्याची जी काळजी वाहिली त्यावरून क्रांतिकारक कवींकडे पाहण्याचा त्यांचा दृष्टिकोन कळून येतो आणि आपल्या उदात्त उद्दिष्टासाठी त्यांना मदत करण्याचा त्यांनी जो प्रयत्न केला त्याचे एक चांगले उदाहरण आहे. १८५२ साली क्रांति ह्या नियतकालिकात काम करण्यासाठी फ्रायलिग्राथ ह्यांची जेव्हा मार्क्स यांनी कॉम्रेड जोसेफ वेडेमायर ह्यांच्याकडे शिफारस केली, तेव्हा त्यांनी वेडेमायर ह्यांना आग्रहाने सांगितले की तुम्ही ह्या कवीला प्रोत्साहन देण्यासाठी मित्रत्वाच्या नात्याने स्तुतिपर पत्र लिहा. १८५० नंतरच्या दशकात फ्रायलिग्राथ हे जसजसे मार्क्स आणि एन्गल्स यांच्यापासून दूर जाऊ लागले, तसतसे कवी म्हणून त्यांचे महत्त्व कमी होऊ लागले हा काही केवळ योगायोग नव्हता.

अनेक फ्रेंच आणि इंग्लिश क्रांतिकारक लेखकांशी, विशेषतः चार्टिस्ट पुढारी अर्नेस्ट जोन्स यांच्याशी मार्क्स आणि एन्गल्स यांचे घनिष्ट संबंध होते. १८४० नंतरच्या दशकाच्या उत्तरार्धातील त्यांच्या सर्वोत्कृष्ट कवितांवर मार्क्स आणि एन्गल्स यांच्या विचारांचा प्रभाव दिसून येतो.

मार्क्स यांच्या मृत्यूनंतर १८८० नंतरच्या दशकात आणि १८९० नंतरच्या दशकात, इंग्लंडमधील समाजवादी चळवळीशी सैद्धांतिकदृष्ट्या जवळचे संबंध असलेल्या इंग्लिश लेखकांच्या क्रांतिकारक लिखाणाचा एन्गल्स यांनी काळजीपूर्वक

मागोवा घेतला. मार्गारेट हार्कनेस (पृष्ठ ८९-९२) ह्या लेखिकेने जेव्हा एन्गल्स यांना "एक गरीब मुलगी" ही आपली लघुकथा पाठवली तेव्हा त्यांनी लिहिलेल्या पत्रावरून, इंग्लिश समाजसत्तावादी एडवर्ड ॲव्हेलिंग यांच्या नाटकावर त्यांनी लिहिलेल्या अनेक समीक्षणांवरून आणि इतर अनेक लेखकांच्या सैद्धांतिक विकासाविषयी त्यांनी केलेल्या टिपणावरून ही गोष्ट आपल्याला दिसून येते.

एन्गल्स यांनी आपल्या आयुष्याच्या शेवटी जर्मन सोशल डेमोक्रॅटिक पुढाऱ्यांना लिहिलेल्या पत्रांमध्येही कामगारवर्गीय कलेविषयी त्यांची महत्त्वाची विधाने आढळतात.

अशा रीतीने क्रांतिकारक लढ्याच्या अनुभवांचे आणि उद्दिष्टांचे व्यापक आकलन करून घेऊन आणि अभिजात वाङ्मयाच्या सर्वोत्कृष्ट परंपरा आत्मसात करून कामगारवर्गाच्या मुक्तीसाठी चाललेल्या लढ्यात सक्रिय आणि सर्जनशील माग घेतील असे नव्या प्रकारचे लेखक आणि कलाकार निर्माण करण्यासाठी मार्क्स आणि एन्गल्स यांनी खटपट केली.

भावी कम्युनिस्ट समाजात कलेला फुलोरा कसा येईल याविषयी मार्क्स आणि एन्गल्स यांनी केलेली मोलाची निवेदनेही ह्या संग्रहात आहेत. भांडवलदारी समाजात कलेच्या विकासाच्या आड येणारे अंतर्विरोध समग्र भांडवलदारी समाजाचे परस्परविरोधी स्वरूप स्पष्ट करतात. आणि कामगारवर्गीय क्रांती व समाजाची सामाजिक पुनर्रचना झाल्यानंतरच हे प्रश्न सुटू शकतात, असे मार्क्सवादाच्या संस्थापकांचे मत होते.

नव्या, कम्युनिस्ट समाजातील मौलिक प्रवाह आधीच हेरण्याएवढी बुद्धिमान दूरदृष्टी मार्क्स आणि एन्गल्स यांनी दाखवली. कम्युनिझम म्हणजे सर्वप्रथम व्यक्तीच्या सर्वांगीण आणि सुसंवादी विकासासाठी खरे स्वातंत्र्य होय. मार्क्स यांनी म्हटले आहे, "जेथे आवश्यकता आणि रोजच्या सर्वसामान्य गोष्टी यांच्या विचाराने निश्चित केलेला श्रम संपतो तिथेच खरे स्वातंत्र्याचे अधिराज्य सुरू होते...." (पृष्ठ १८३).

समाजसत्तावादी अमदानीत पिळणुकीपासून मुक्त झालेली श्रमशक्ती हेच सगळ्या आत्मिक (आणि सौंदर्यवादी) सृजनशीलतेचे उगमस्थान ठरते. खरे आर्थिक, राजकीय आणि आत्मिक स्वातंत्र्यच माणसाच्या सृजनशील शक्तींचा संपूर्ण विकास घडवून आणू शकते आणि कामगारवर्गीय क्रांतीच साहित्याच्या विकासात अखंड प्रगतीच्या अनिर्बंध संधी उपलब्ध करून देते, असे मार्क्स आणि एन्गल्स यांनी दाखवून दिले आहे. जगाची कम्युनिस्ट धर्तीवर पुनर्बांधणी करणे हे कामगारवर्गाचे महान ऐतिहासिक कार्य होय. मार्क्स आणि एन्गल्स यांच्या मते कामगारवर्ग हीच जग बदलवून टाकणारी सामाजिक शक्ती असते आणि ती केवळ आर्थिक व राजकीय प्रगतीच घडवून आणते इतकेच नव्हे, तर सांस्कृतिक प्रगतीसुद्धा घडवून आणते; हीच शक्ती मानवजातीच्या उच्चतर आणि सौंदर्यवादी मूल्यांचे परिपूर्ण विकसन होण्यास आवश्यक असलेली परिस्थिती निर्माण करते.

बी. क्रायूलोव



संस्कृतीच्या इतिहासाची भौतिकवादी संकल्पना

सामाजिक असणे आणि सामाजिक जाणीव

१

आपल्या जीवनाच्या सामाजिक उत्पादनामध्ये, माणसे असे निश्चित संबंध प्रस्थापित करतात, की जे अनिवार्य आणि त्यांच्या इच्छेवर अवलंबून नसणारे असतात. हे उत्पादनाचे संबंध. त्यांच्या भौतिक उत्पादक शक्तींच्या विकासाच्या एका निश्चित टप्प्याशी या संबंधांचा मेळ बसलेला असतो. या उत्पादनाच्या संबंधांची एकूण बेरीज म्हणजेच समाजाची आर्थिक रचना, हिच्यावरच कायदेविषयक व राजकीय वरचा इमला चढलेला असतो, आणि सामाजिक जाणिवेच्या निश्चित प्रकारांचा मेळ या रचनेशी बसलेला असतो. भौतिक जीवनाच्या उत्पादनाच्या पद्धतीला धरूनच सर्वसाधारणपणे सामाजिक, राजकीय आणि बौद्धिक जीवन प्रक्रिया चाललेली असते. माणसांची जाणीव ही त्यांचे असणे निश्चित करत नसते, तर उलटपक्षी, त्यांचे सामाजिक असणेच त्यांची जाणीव निश्चित करत असते. त्यांच्या विकासाच्या एका विशिष्ट टप्प्यावर, समाजाच्या भौतिक उत्पादक शक्तींचा संघर्ष उत्पादनाच्या प्रचलित संबंधांशी होतो, किंवा–जे याच गोष्टीचे केवळ कायदेशीर व्यक्त स्वरूप असते–आतापर्यंत ज्या मालमत्तेच्या संबंधांच्या चौकटीत ते कार्यान्वित झालेले असतात त्या मालमत्तेच्या संबंधांशी हा संघर्ष होतो. उत्पादक शक्तींच्या विकासाच्या प्रकारांचे रूप जाऊन या संबंधांना त्यांच्या शृंखलांचे रूप प्राप्त होते. नंतर सामाजिक क्रान्तीच्या युगाचा आरंभ होतो. आर्थिक पाया बदलल्या-बरोबर वरच्या एकंदर प्रचंड इमल्याचे कमी अधिक प्रमाणात झपाट्याने परिवर्तन होते. अशा परिवर्तनाचा विचार करताना एक फरक नेहमीच करायला हवा. तो म्हणजे निसर्ग विज्ञानाच्या रेखीवपणाने निश्चित करता येणारे उत्पादनाच्या आर्थिक परिस्थितीचे भौतिक परिवर्तन आणि कायदेशीर राजकीय, धार्मिक, सौंदर्यविषयक किंवा तत्त्वज्ञानात्मक–थोडक्यांत सांगायचे म्हणजे ज्या वैचारिक प्रकारांमध्ये माणसांच्या या संघर्षाची जाणीव होते आणि माणसे या संघर्षाची तड लावतात–या दोहोंच्या दरम्यानचा फरक. ज्या प्रमाणे एखाद्या व्यक्तीविषयीचे आपले मत ती स्वतःला काय समजते याच्यावर आधारलेले असते, त्याचप्रमाणे परिवर्तनाच्या या कालखंडाची शहानिशा त्याच्या

स्वतःच्या जाणिवेच्या योगाने आपण करू शकत नाही; उलटपक्षी, या जाणिवेचा खुलासा, अधिक चांगली गोष्ट म्हणजे भौतिक जीवनाच्या अंतर्विरोधांवरून, सामाजिक उत्पादक शक्ती व उत्पादनाचे संबंध यांच्या दरम्यानच्या प्रचलित संघर्षावरून, केला पाहिजे. कोणतीही समाजव्यवस्था, तिच्यामध्ये जागा असलेल्या सगळ्या उत्पादक शक्ती विकसित झालेल्या असण्यापूर्वी कधीही नष्ट होत नाही आणि खुद्द जुन्या समाजाच्या गर्भाशयामध्ये उत्पादनाच्या नव्या संबंधांच्या अस्तित्वाची भौतिक परिस्थिती परिपक्व झालेली असण्यापूर्वी उत्पादनाचे हे नवे उच्चतर संबंध कधीही उदयास येणार नाहीत. म्हणून मानवजाती सदैव आपल्या पुढ्यात केवळ अशाच कामगिऱ्या ठेवते, की ज्यांची सोडवणूक तिला करता येते; कारण या प्रकरणाकडे अधिक बारकाईने पाहिल्यास, नेहमी असेच आढळून येईल, की या कामगिरीच्या सोडवणुकीसाठी लागणारी भौतिक परिस्थिती अगोदरच अस्तित्वात असेल किंवा किमानपक्षी ती तयार व्हायची प्रक्रिया चालू झालेली असेल तेव्हाच खुद्द ही कामगिरी उदयास येत आहे. स्थूल रूपरेखेच्या हिशेबी उत्पादनाच्या आशियाई, प्राचीन, सरंजामी आणि आधुनिक भांडवलदारी पद्धतींना समाजाच्या आर्थिक रचनेतील पुरोगामी कालखंड असे नाव देता येते. उत्पादनाचे भांडवलदारी संबंध म्हणजे उत्पादनाच्या सामाजिक प्रक्रियेचा शेवटचा परस्परविरोधी प्रकार होय– परस्परविरोधी म्हणजे व्यक्तिगत परस्परविरोध या अर्थाने नव्हे, तर व्यक्तींच्या जीवनाच्या सामाजिक परिस्थितीतून उद्भवणारे या अर्थाने; त्याच वेळी भांडवलदारी समाजाच्या गर्भाशयात विकसित होत असलेल्या उत्पादक शक्ती त्या परस्परविरोधाच्या सोडवणुकीसाठी भौतिक परिस्थिती निर्माण करत असतात. म्हणून ही सामाजिक रचना मानवी समाजाच्या इतिहासपूर्व कालाची समाप्ती करते.

कार्ल मार्क्स, "अर्थशास्त्रावरील
टीकेमध्ये भर या ग्रंथाची प्रस्तावना"
मार्क्स आणि एन्गल्स, निवडक ग्रंथ,
खंड १ ला, मॉस्को, १९७८, पृष्ठे ३०३ ०४.

२

विचारांचे, संकल्पनांचे, जाणिवेचे उत्पादन हे पहिल्या प्रथम माणसांच्या भौतिक कामगिरीशी व भौतिक व्यवहाराशी थेट एकत्र गुंफलेले असते– म्हणजे वास्तव जीवनाच्या भाषेशी. चिंतन करणे, विचार करणे, माणसांचा बौद्धिक व्यवहार या गोष्टी या टप्प्यावर अजूनही त्यांच्या भौतिक वागणुकीचे थेट व्यक्त स्वरूप अशाच उदयास येत असतात. तीच गोष्ट जनतेच्या राजकारणाच्या, कायद्यांच्या, नीतीच्या, धर्माच्या, अध्यात्मशानाच्या इत्यादींच्या भाषेत व्यक्त झालेल्या बौद्धिक निर्मितीला लागू पडते. माणसे हीच त्यांच्या संकल्पना, विचार, इत्यादींची निर्माती असतात,

म्हणजे खरीखुरी, क्रियाशील माणसे, कारण त्यांच्या उत्पादक शक्तींच्या निश्चित विकासाच्या योगाने आणि या शक्तींशी जुळणाऱ्या अशा व्यवहाराच्या आणि त्याच्या जास्तीत जास्त पुढच्या प्रकारांच्या* योगाने त्यांची परिस्थिती घडलेली असते. जाणीव (das bewusstsein) म्हणजे जाणीवयुक्त असणे (das bewusstse sein) याच्याखेरीज अन्य काहीही असूच शकत नाही, आणि माणसांचे असणे हीच त्यांची प्रत्यक्ष जीवन-प्रक्रिया असते. जर सगळ्या विचारसरणीमध्ये माणसे आणि त्यांचे संबंध हे camera obscura कॅमेऱ्यामध्ये दिसतात त्याप्रमाणे खाली डोके वर पाय असे दिसतात, तर त्यांच्या शारीरिक जीवन-प्रक्रियेतून डोळ्याच्या बाहुलीत वस्तूंचे जसे खाली डोके वर पाय दिसतात, तसेच हे घटित त्यांच्या ऐतिहासिक जीवन-प्रक्रियेतूनच तितक्याच प्रमाणात उदयास येते.

जर्मन तत्त्वज्ञान जसे स्वर्गातून पृथ्वीवर अवतरते, तसे त्याच्या थेट उलट, हे प्रकरण म्हणजे पृथ्वीवरून स्वर्गावर स्वारी करणे आहे. म्हणजे असे, की हाडामासाच्या माणसांकडे दाखल होण्यासाठी माणसे काय म्हणतात, कल्पितात, चिंतितात, त्याच्यापासून सुरुवात करून नव्हे, तसेच माणसांविषयी जे सांगितलेले असते, कल्पिलेले असते, चिंतिलेले असते त्या माणसांच्यापासून सुरुवात करूनही नव्हे, तर खऱ्याखुऱ्या क्रियाशील माणसांच्यापासून सुरुवात करून, आणि त्यांच्या या जीवन-प्रक्रियेचे वैचारिक प्रतिसाद आणि प्रतिध्वनी यांच्या विकासाचे प्रदर्शन करणाऱ्या अशा त्यांच्या खऱ्याखुऱ्या जीवन-प्रक्रियेच्या आधारावर सुरुवात करून माणसांच्या मेंदूंमध्ये जी कल्पिते तयार झालेली असतात, ती देखील, अवश्यमेव, त्यांच्या भौतिक जीवनप्रक्रियेचे निराळे रूप धारण केलेले अवतार असतात, आणि या गोष्टीचा पडताळा इंद्रियानुभव परीक्षणाच्या द्वारा बघता येतो आणि ही गोष्ट भौतिक पूर्वपक्षांशी निगडित झालेली असते. अशा प्रकारे नीती, धर्म, अध्यात्मज्ञान, आणि विचारसरणीचे इतर सगळे प्रकार आणि त्यांच्याशी जुळणारे असे जाणिवेचे प्रकार आपल्या स्वतंत्रपणाचा देखावा अतःपर टिकवून ठेवत नसतात. त्यांना इतिहासही नसतो, आणि त्यांचा विकासही होत नाही; परंतु माणसे, आपल्या भौतिक उत्पादनाचा विकास साधत साधत, आणि आपले भौतिक व्यवहार साधत साधत, या आपल्या प्रत्यक्षातल्या जगासमवेत, आपले विचार करणे देखील बदलतात आणि आपल्या विचार करण्यातून उद्भवलेल्या पैदाशी देखील बदलतात. जाणीव ही जीवनाची

---

* (हस्तलिखितात मुळात असा मजकूर होता:) माणसे हीच त्यांच्या संकल्पना, विचार इत्यादींची निर्माती असतात, आणि भौतिक जीवनाच्या उत्पादनाच्या पद्धतीच्या योगाने, त्यांच्या भौतिक व्यवहाराच्या योगाने आणि सामाजिक व राजकीय रचनेतील त्याच्या आणखी पुढील विकासाच्या योगाने ज्यांची परिस्थिती घडलेली असते, अशीच नेमकी हीच माणसे असतात.

निश्चिती करत नसते, तर जीवनच जाणिवेची निश्चिती करते. पहिल्या धर्तीच्या दृष्टिकोनासाठी आरंभबिंदू म्हणजे जाणीव ही जिवंत व्यक्ती म्हणून हिशेबात घेतलेली असते; वास्तव जीवनाशी जुळणाऱ्या अशा दुसऱ्या धर्तीच्या दृष्टिकोनासाठी खुद्द खऱ्याखुऱ्या जिवंत व्यक्तीच आरंभबिंदू होतात आणि जाणीव ही सर्वस्वी त्यांची जाणीव म्हणून विचारात घेतली जाते.

या धर्तीचा दृष्टिकोन हा पूर्वपक्षविरहीत नसतो. खऱ्याखुऱ्या पूर्वपक्षापासूनच तो सुरुवात करतो आणि एक क्षणभर देखील त्याचा त्याग करत नसतो. या दृष्टिकोनाचा पूर्वपक्ष म्हणजे माणसे, म्हणजे कसल्याही कल्पनारम्य अलगपणानिशी व स्थिरपणानिशी नव्हेत, तर निश्चित परिस्थितीत त्यांच्या प्रत्यक्ष, इंद्रियानुभवगम्यतेनिशी दृश्यमान होणाऱ्या विकासाच्या प्रक्रियेत असलेली माणसे. ज्या क्षणी या क्रियाशील जीवन-प्रक्रियेचे वर्णन करण्यात येते त्या क्षणी इतिहास हा मृत सत्य घटनांचा संग्रह, जसा इंद्रियानुभवपरीक्षणवाद्यांच्या बाबतीत (ते स्वतः अजून अमूर्तच असतात) असतो तसा, किंवा कल्पित विषयांची कल्पित कामगिरी, अध्यात्मवाद्यांच्या बाबतीत असतो तसा–अस्तित्वातच राहत नाही.

जिथे काल्पनिक विवेचन संपते, जिथे खरेखुरे जीवन सुरू होते, तिथे परिणामतः खरेखुरे, निश्चितार्थक विज्ञान सुरू होते, माणसांच्या व्यावहारिक कामगिरीचे विवरण सुरू होते, माणसांच्या विकासाच्या व्यावहारिक प्रक्रियेचे विवरण सुरू होते. जाणिवेविषयीचे पोकळ शब्दावडंबर संपते आणि खऱ्याखुऱ्या ज्ञानाला त्याची जागा द्यावी लागते. जेव्हा वास्तवतेचे वर्णन करण्यात येते, तेव्हा स्वयंपूर्ण तत्त्वज्ञान (die sellestandige Phiosophie) आपल्या अस्तित्वाचे माध्यम घालवून बसते. फार झाले तर त्याची जागा माणसांच्या ऐतिहासिक विकासाच्या निरीक्षणातून काढलेल्या जास्तीत जास्त सर्वसाधारण निष्कर्षांच्या समालोचनाकडूनच तेवढी घेतली जाऊ शकते. खुद्द या निष्कर्षांना, त्यांची खऱ्याखुऱ्या इतिहासापासून फारकत झाली असल्याकारणाने, तशी काडीइतकीही किंमत नाही. त्यांचा उपयोग ऐतिहासिक सामुग्रीची व्यवस्था लावायची सोय म्हणून, त्याच्या वेगवेगळ्या थरांची क्रमवारी दिग्दर्शित करण्यासाठी म्हणून, फार तर होऊ शकतो. परंतु इतिहासाच्या कालखंडांची नीटपणे काटछाट करण्यासाठी तत्त्वज्ञानाप्रमाणे त्यांच्याकडून एखादा उपाय म्हणा, योजना म्हणा सादर होणे त्यांना अजिबात परवडण्याजोगे नाही. उलटपक्षी पूर्वीच्या कालखंडाची म्हणा किंवा सध्याच्या कालखंडाची म्हणा, साधनसामुग्री घेऊन आपण तिची छाननी करायला व व्यवस्था लावायला सुरुवात करतो–आणि ती प्रत्यक्षात सादर करायला लागतो–तेव्हा मात्र अडचणी सुरू होतात.

कार्ल मार्क्स आणि फ्रेडरिक एन्गल्स,
दि जर्मन आयडिऑलॉजी
मार्क्स आणि एन्गल्स, **संकलित ग्रंथ**,
खंड ५ वा, मॉस्को, १९७६, पृष्ठे ३६-३७.

नैसर्गिक परिस्थिती आणि संस्कृतीचा विकास

उत्पादनाच्या सामाजिक पद्धतीपासून एकदा अलग केल्यानंतर श्रमाची उत्पादनक्षमता ही ज्या नैसर्गिक परिस्थितीत ती पार पाडण्यात येते, तिच्यावर अवलंबून असते. ही परिस्थिती पूर्णत्वाने खुद्द माणसाच्या स्वभावाच्या, त्याच्या वंशाच्या, वगैरे, तरी पातळीवर आणता येते, किंवा त्याच्या सभोवार असलेल्या निसर्गाच्या पातळीवर तरी आणता येते. आर्थिक दृष्टिकोनातून बाह्य नैसर्गिक परिस्थितीचे दोन मोठे वर्ग पाडता येतातः चरितार्थाची साधनसामुग्री या नात्याने नैसर्गिक साधनसामुग्री, म्हणजेच जमिनीचा सुपीकपणा म्हणा, मासे असलेले जलाशय म्हणा, वगैरे, आणि श्रमाची साधने असलेली नैसर्गिक साधनसामुग्री, म्हणजे धबधबे, जलवाहतुकीला सोइस्कर अशा नद्या, जंगले, धातू, कोळसा इत्यादि. संस्कृतीच्या आरंभी आरंभी नैसर्गिक साधनसामुग्रीचा पहिला वर्ग हा महत्त्वाचा असतो, मागाहून अधिक पुढारलेल्या समाजामध्ये, दुसरा. उदाहरणार्थ, इंग्लंडची तुलना भारताशी करा, किंवा प्राचीन जगामध्ये, अथेन्स व कॉरिन्थ यांची तुलना काळ्या समुद्राच्या काठी असलेल्या देशांशी करा.

भागविल्याच पाहिजेत अशा नैसर्गिक गरजा जितक्या अधिक कमी, आणि जमीन जितकी अधिक सुपीक आणि हवामान जितके अधिक अनुकूल, तितकी निर्मात्याच्या चरितार्थासाठी व पुनर्निर्मितीसाठी आवश्यक श्रम वेळ अधिक कमी लागतो, आणि तो स्वतःसाठी काम करू शकतो त्याच्यापेक्षा इतरांसाठी तो अधिक काम करू शकतो. सिसिलीच्या दिओदोरसने प्राचीन ईजिप्शियनांच्या संबंधांत असा शेरा दिलाः

तो म्हणतो : "आपल्या मुलांना लहानाची मोठी करण्यासाठी त्यांना इतके अल्प श्रम व खर्च त्यांना पडत होता की त्याच्यावर विश्वासच बसणे शक्य नाही. ते त्यांना अगदी साध्यातले साधे जे प्रथम हाताशी येईल ते अन्न खाऊ घालतात; ते पापायरसच्या मुळ्यांचा खाण्याजोगा व भाजता येण्याजोगा भागही ते त्यांना खाऊ घालतात, त्याचप्रमाणे दलदलीतल्या वनस्पतींची मुळे आणि देठे, कच्ची म्हणा, उकडलेली म्हणा किंवा भाजलेली म्हणा. हवा इतकी आल्हाददायक असते की बहुतेक मुले अनवाणी व नागवीच धावत असतात. म्हणून मुलावर, ते थेट वयात येईपर्यंत आईबापांना एकूण वीस द्राखमांहून अधिक खर्च पडत नाही. ईजिप्तची

लोकसंख्या येवढी मोठी का आहे आणि ते लोक येवढी महान बांधकामे कशी हाती घेतात, याचा मुख्य खुलासा हा असा आहे.'' *

तथापि त्याच्या लोकसंख्येच्या मोठ्या आकारापेक्षा अनुत्पादक कामामध्ये सापेक्षदृष्ट्या मोठ्या लोकसंख्येला कामावर लावायची शक्यता हीच प्राचीन ईजिप्तच्या वास्तुशिल्पाच्या महान बांधकामाला कारणीभूत झाली आहे. ज्याप्रमाणे व्यक्तिगत कामगार जितका अधिक वरकड श्रमाचा पुरवठा करू शकतो तितका त्याच्या आवश्यक श्रमाचा वेळ कमी कमी होत जातो, त्याचप्रमाणे आवश्यक त्या चरितार्थाच्या साधनांच्या उत्पादनासाठी जितके कमी श्रमिक लोक लागतात, तितके इतर कामासाठी अधिक मोठे संख्याबळ उपलब्ध होते.

एकदा का भांडवलदारी उत्पादन प्रस्थापित झाले, की इतर गोष्टी सारख्याच असल्यास, वरकड श्रमाची राशी, श्रमाच्या नैसर्गिक परिस्थितीनुसार आणि सगळ्यांत जास्त महत्त्वाची गोष्ट म्हणजे जमिनीच्या सुपीकपणानुसार, कमी-जास्त होईल. तथापी सगळ्यांत जास्त सुपीक जमीन ही उत्पादनाच्या भांडवलदारी पद्धतीच्या विकासाला देखील जास्तीत जास्त सोइस्कर व अनुकूल असते असे अनुमान यावरून निघत नाही. कारण हा विकास निसर्गावरील माणसाचे वर्चस्व गृहीत धरतो. फाजील सुफल निसर्ग हा "लहान मुलाला जसे मार्गदर्शक लगामाची दोरी लावून धरतात तसे माणसाला हाताने धरून चालवतो;" तो माणसाचा विकास ही निसर्गाची आवश्यकता केल्याशिवाय त्याला आपला विकास करून घ्यायला अटकाव करतो.** भांडवलाची मातृभूमी उष्ण कटिबंधा-

---

* दायोदो, १. प्रकरण ८० [दायोदोरकृत सिसिलियन ऐतिहासिक ग्रंथमाला, खंड पहिला, १८३१]. – संपादक

** "पहिली (नैसर्गिक संपत्ती) जशी अत्यंत उदात्त आणि लाभदायक असते, तशीच ती लोकांना निष्काळजी, चढेल आणि सर्व प्रकारच्या अतिरेकांच्या आहारी गेलेले करून ठेवते; तर याच्या उलट दुसरी जागरूकपणाला, साहित्याला, कलांना आणि घोरणाला सक्तीने उत्तेजन देते." ("परराष्ट्रीय व्यापाराने इंग्लंडचा ठेवा, किंवा आमच्या परराष्ट्रीय व्यापाराचा वाढावा हा आमच्या ठेव्याचा नियम आहे." लेखक लंडननिवासी व्यापारी थॉमस मुन, आता समाहक मल्यासाठी प्रकाशित केले त्याचा पुत्र जॉन मुन याने." लंडन, १६६९, पृष्ठे १८१, १८२). "त्याचप्रमाणे ज्या जमिनीवरील चरितार्थासाठी व खाद्यपदार्थासाठी उत्पादन बऱ्याच मोठ्या प्रमाणात स्वयंस्फूर्त आहे, आणि हवामान कपड्याची व पांघरुणाची काळजी जवळजवळ मुळीच करायला लावत नाही, अशा जमिनीवर लोकांना राहायला लावणे याहून अधिक मोठा शाप कोणता असेल याची मी कल्पनाच करू शकत नाही... दुसऱ्या बाजूलाही अतिरेक असण्याचा संभव असेल. श्रम करूनही उत्पादन करायला असमर्थ अशी जमीनही कसल्याही श्रमाशिवाय भरघोस उत्पादन करणाऱ्या जमिनीइतकीच वाईट असते" ("खाद्यपदार्थांच्या सध्याच्या चढ्या किमतीच्या कारणांची चौकशी." लंडन, १७६७, पृष्ठ १०).

तील हवामानाच्या प्रदेशात, समृद्ध वनस्पतींच्या क्षेत्रात नसते, तर ती समशीतोष्ण कटिबंधात असते. जमिनीचा सर्वंकष सुपीकपणा नव्हे, तर याहून अधिक चांगली गोष्ट म्हणजे तिच्या रासायनिक गुणधर्मांची विविधता, तिची भूगर्भीय रचना, तिची शारीरिक मांडणी, आणि तिच्या नैसर्गिक पैदाशींचा बहुविधपणा—या गोष्टी श्रमाच्या सामाजिक विभागणीचा नैसर्गिक आधार ठरतात, आणि याच गोष्टी, ज्या बहुअंगी परिस्थितीत माणूस सापडतो तिच्या परिणामी, माणसाला आपल्या गरजा, आपले कर्तृत्व, आपल्या श्रमाची साधने व पद्धती वाढवायची प्रेरणा देतात. निसर्गाच्या शक्तीवर सामाजिक नियंत्रण बसवायची, त्याचा काटकसरीने उपयोग करायची आणि कलाकृतींच्या द्वारा त्याचा मोठ्या प्रमाणावर उपभोग घ्यायची आवश्यकता, एका शब्दात सांगायचे म्हणजे निसर्ग जिंकून घ्यायची आवश्यकता हीच उद्योगधंद्याच्या इतिहासात निर्णायक भूमिका बजावते. अशीच आवश्यकता होती पाण्याचा प्रवाह नियमित करायची व त्याचे वितरण करायची ईजिप्तमध्ये *, लॉंबर्डीमध्ये आणि हॉलंडमध्ये वगैरे. अशीच आवश्यकता आज आहे भारतामध्ये, इराणमध्ये वगैरे. इथे कृत्रिम कालव्यातून जमिनीला हवे असलेले पाणी देण्याबरोबर रासायनिक खतांचाही पुरवठा होतो तो डोंगरातून प्रवाहाबरोबर वाहून आणलेल्या गाळाच्या रूपाने. कालव्यांची सोय हे अरबांच्या वर्चस्वाखालील** स्पेन व सिसिली येथे भरभराटलेल्या उद्योगधंद्यांचे रहस्य होते.

कार्ल मार्क्स, ले कापितात्, खंड २ रा,
लिव्र १, १९५४, पृष्ठ १८६-८८
फ्रेंच भाषेतून अनुवादित

---

* नाइल नदीला महापूर केव्हा केव्हा येतात त्या कालखंडांचे गणित करण्याच्या आवश्यकतेतून ईजिप्शियन खगोलशास्त्र निर्माण झाले आणि त्याच वेळी शेतीचे दिग्दर्शक म्हणून धर्मगुरूंच्या जातीचे वर्चस्व निर्माण झाले. "नाईल नदी फुगायला लागते तो वर्षाचा संपात काळ असतो आणि त्या वेळी ईजिप्शियन लोकांना डोळ्यांत तेल घालून लक्ष ठेवावे लागत असे...आपल्या शेतीच्या कामांचे मार्गदर्शन करण्यासाठी त्यांना हे विषुववृत्तीय वर्ष निश्चित करावे लागत असे. म्हणून या वर्षाच्या परत येण्याच्या खुणेसाठी त्यांना आकाशात शोध घ्यावा लागत असे." [क्यूविए **दिस्कोर्स सूर लेस रेव्होल्यूशन्स दू ग्लोन**, संपादक इयू एफेर, पॅरिस, १८६३, पृष्ठ १४१]

** भारतातील पाण्याचे वितरण हा पंचायती उत्पादनाच्या लहान लहान विस्कळित गटांवरील मध्यवर्ती सत्तेचा एक भौतिक आधार होता. भारताच्या मुस्लिम विजेत्यांना हे त्यांच्या इंग्रज वारसदारांपेक्षा अधिक चांगले समजलेले होते. बंगालच्या ओरिसा जिल्ह्यात १९६६ च्या दुष्काळात दहा लाख भारतीयांचे प्राण खर्ची पडले याची या संदर्भात आठवण केल्यास पुरेसे आहे.

निसर्ग-दृश्ये

[टेलेग्राफ फुर डॉयश्च लॅन्ड, अंक १२२ वा, जुलै १८४०]

हेल्लासचे सुदैव असे की त्याच्या रहिवाश्यांच्या धर्मातील जाणिवेला त्याच्या निसर्ग-दृश्याचे स्वरूप पाहणे सादर झाले. हेल्लास ही बहुदैवतवादाची भूमी आहे; तिची सगळी निसर्ग-दृश्ये सुसंवादी चौकटीत बसविलेली आहेत–किंवा निदानपक्षी होती. आणि असे असूनही प्रत्येक वृक्ष, प्रत्येक निर्झर, प्रत्येक पर्वत स्वतःला वाजवीपेक्षा अधिक अग्रभागी आणून घेतो आणि त्याचे आकाश वाजवीपेक्षा किती तरी अधिक निळे आहे, त्याची उन्हे वाजवीपेक्षा किती तरी अधिक झगझगीत आहेत, त्याचा समुद्र वाजवीपेक्षा अधिक सौंदर्यशाली आहे, आणि या गोष्टी आंग्ल कवी शेली याच्या निसर्गाच्या भावनेच्या, @ सर्वव्यापी पॅनच्या, संक्षिप्त आध्यात्मीकरणाने समाधान पावत नाहीत. प्रत्येक सुंदर आकार धारण केलेले व्यक्तिगत उपलक्षण एकेका विशिष्ट दैवतावर हक्क सांगते, प्रत्येक नदीला तिच्या अप्सरा असतील, प्रत्येक राईला तिचे ड्रायाड्स असतील,—आणि अशा प्रकारे हेलेनीज लोकांचा धर्म उदयास आला. इतर प्रदेश इतके दैववान नव्हते; ते कोणत्याच जनतेच्या धर्माचा आधार म्हणून तिच्या कामी आले नाहीत आणि त्यांच्या ठायी गाढ निद्रा घेत असलेल्या धार्मिक प्रतिभावंताला जादूसारखे अस्तित्वात आणण्यासाठी एखाद्या कविमनाची वाट पाहत राहणे त्यांना भाग पडले. आपण जर बिन्जेन येथे ड्रासेनफेल्सवर किंवा रॉचुस्बर्गवर उभे राहिलो आणि द्राक्षवेलींच्या सुगंधाने दरवळलेल्या न्हाइन नदीच्या खोऱ्याकडे टक लावून पाहूं लागलो, तर दूरचे निळे पर्वत क्षितिजाशी एकरूप झालेले, हिरवीगार शेते व द्राक्षवेलींचे मळे सोनेरी उन्हात न्हाऊन निघालेले, निळ्या आकाशाचे प्रतिबिंब नदीत दिसत असलेले–स्वर्ग आपल्या तेजासहित भूतलावर अवतरतो आहे आणि तीत प्रतिबिंबित झालेला दिसत आहे, शिवाचे अवतरण जडामध्ये झालेले आहे आणि

@ निसर्गाची भावना ' स्पिरिट ऑफ नेचर ' हे शब्द मुळात इंग्रजीत आहेत. शेलीच्या काव्यग्रंथांमध्ये, विशेषेकरून ' क्वीन मॅब ' या कवितेत पॅनचे बहुदैवतवादी अलंकारिक प्रतीक सापडते. – संपादक

शब्दाला हाडामांसाचे रूप मिळून त्याचे आपल्या ठायी वास्तव्य झालेले आहे–हेच आहे ख्रिस्ती धर्माचे मूर्तरूप. याच्या थेट विरुद्ध दिशेला आहे उत्तर-जर्मन मैदान; इथे सुक्या देठांखेरीज काही एक नाही आणि माफक गवताला आपल्या दुबळेपणाची जाणीव असल्यामुळे जमिनीवरून ते आपले डोके वर काढतच नाही; अधून मधून एका काळी आव्हान देत असलेला एखादा वृक्ष आता बीज पडून उध्वस्त झालेला आहे; आणि आकाश जितके अधिक तेजस्वी होत आहे, तितका त्याचा स्वयंपूर्ण दिमाख गोणपाटाचे कपडे व भस्माचे पट्टे शिक्षेदाखल लेवून खाली पसरलेल्या कंगाल, पापी पृथ्वीपासून वेगळा उठून दिसत आहे, त्याचा डोळा जो सूर्य तो जळजळीत संतापाने उघड्या ओसाड वाळूकडे तुच्छतेने बघत आहे—हे आहे यहुदी धर्माच्या जागतिक दृष्टिकोनाचे प्रातिनिधिक स्वरूप.

गवती मैदानाचा खूप उपहास झालेला आहे, सगळ्या साहित्याने* त्याच्यावर शिव्याशापांची लाखोली वाहिलेली आहे. आणि प्लाटेनच्या ओएडिपस[२] नाटकातल्या प्रमाणे त्याचा उपयोग उपहासासाठी केवळ पार्श्वभूमी म्हणून केलेला आहे; परंतु त्याच्यातली दुर्मिळ सौन्दर्यस्थळे, त्याचे लपलेले काव्यमय संबंध, ही शोधून काढायची लोकांनी पर्वाच केलेली नाही. या उत्तर-जर्मन सहारा वाळवंटाचे भयदायक, उद्विग्नता आणणारे स्वरूप नीटपणे जाणून घ्यायचे असेल तर आपण खरोखरीच एखाद्या सुंदर प्रदेशात लहानाचे मोठे झालो असलो पाहिजे, पर्वताच्या शिखरांवर किंवा घनदाट जंगल असलेल्या दऱ्याखोऱ्यांतून आपण राहिलो असलो पाहिजे, परंतु तसे आपण असलो तर आपल्याला या प्रदेशाची सुंदर उपलक्षणे देखील ओळखून काढता यायला पाहिजेत, कारण ही उपलक्षणे लिबियातल्या मृगजळाप्रमाणे डोळ्याला नेहमीच दिसतात असे नव्हे. खराखुरा गद्यमय जर्मनी एल्ब नदीच्या पूर्वतीरावरील@ वटाट्यांच्या शेतांतूनच तेवढा सापडू शकतो. परंतु जर्मन वंशांतल्या सगळ्यात जास्त क्रियाशील अशा सॅक्सन लोकांची मातृभूमी तिच्या ओसाडपणात देखील काव्यमय आहे. रात्रीचे वादळ झालेले असावे, ढग भुतांसारखे चन्द्रावरून रांगेने जात असावेत, क्रुद्ध लांब अंतरावरून एकमेकांवर भुंकत असावीत, फुरफुरणारे घोडे अथांग गवती मैदानावरून भरधाव दौडत असावेत आणि लगाम सैल सुटल्यावर हवेने झिजवलेल्या वज्रतुंड दगडांच्या अडथळ्यांवरून आणि हूणांच्या दफनभूमीतील उंचवट्यांवरून उड्डाण करत असावेत; दूर अंतरावर टेकाडावरचे पाणी चांदण्याच्या प्रतिबिंबानिशी लखलखत असावे, काजवे त्याच्यावरून झेपावत असावेत, आणि वादळाचे घोंघावणे अफाट

---

* ब्लासेडौच्या[१] तिसऱ्या खंडात म्हाताऱ्याला गवती मैदानाची काळजी लागून राहिलेली आहे— एन्गल्स यांनी दिलेली टीप.

@ द टेलेग्राफ फूर डॉयश्चलँडमध्ये डाव्या "left" असा शब्द आहे, परंतु तो मुद्रणदोष आहे. –संपादक

ओसाडीतून विचित्र आवाज करीत जात असावे; आपल्या पायाखालची जमीन असुरक्षित वाटते आणि आपली अशी धारणा होते की आपण जर्मन लोककथांच्या राज्यात प्रवेश केला आहे. उत्तर-जर्मन गवती मैदानाशी माझा परिचय झाल्यावर मगच मला ग्रिम बंधूंची किण्डर उण्ड हौस्मार्चेन ही कथा योग्य प्रकारे समजली. या जवळ जवळ सगळ्याच कथांवरून हे उघड दिसून येते की यांचा उगम इथलाच आहे, इथेच रात्र पडल्यावर मानवी घटक गायब होतो आणि लोकांच्या कल्पना-विश्वातून साकार झालेल्या भयदायक ओबडधोबड निर्मिती भर दुपारच्या टळटळीत उन्हात देखील विचित्र वाटणाऱ्या या अफाट ओसाड भूमीवरून तरंगत जातात. या मैदानात वास्तव्य करून राहणारा एकाकी माणूस असल्या वादळी रात्रीच्या वेळी आपल्या मातृभूमीतून वाटचाल करत असताना किंवा एखाद्या उंच मनोऱ्यावरून या अफाट ओसाडीवर नजर टाकत असतांना त्याच्या मनात ज्या भावना जागृत होतात, त्यांचे मूर्तरूप म्हणजे या कथा होत. मग त्याने या मैदानातील वादळी रात्रींच्या आठवणी बालपणापासून आपल्या मनात साठविलेल्या असतात, त्या त्याच्या मनात पुन्हा उभ्या राहतात आणि त्या परीकथांतून साकार होतात. ऱ्हाइन नदीकाठच्या किंवा स्वाबियामधील लोकप्रिय परीकथांच्या उगमाचे रहस्य तुम्ही चोरून ऐकणार नाही, तर उलट इथे विजेच्या कडकडाटाची दर रात्र—लॉबे म्हणतो विजेच्या कडकडाटाची दर तेंजस्वी रात्र–मेघगर्जनांच्या जिभांनी या उगमाचे रहस्य सांगत असते.

या मैदानाच्या माझ्या समर्थन पुराणाचा उन्हाळी धागा वाऱ्यावरोबर उडत उडत बहुधा संपला असता; परंतु हॅनोव्हरच्या * भूमीच्या रंगांनी रंगविलेल्या एका खुणेच्या खांबाला तो अडकून राहिला. या रंगांच्या महत्त्वाचा विचार मी बराच काळ केलेला आहे. आता हे तर खरेच आहे की प्रशियाविषयीच्या [3] आपल्या वाईट गाण्यात थियेर्श्चने त्या रंगांमध्ये जे शोधायचा प्रयत्न केला ते राजेशाही प्रशियन रंग दाखवून देत नाहीत; असे असूनही त्यांच्या गद्यात्मकतेच्या योगाने ते निर्विकार हृदयशून्य नोकरशाहीची आणि प्रशियनिझमवियची ऱ्हाइनलँडरला जे अजूनही संभाव्य असे सापडू शकत नाही, त्याची आपल्याला आठवण करून देतात. काळा आणि पांढरा यांच्यातला झणझणीत विरोध हा निरंकुश राजेशाहीतील राजा आणि प्रजा यांच्या दरम्यानच्या संबंधांचे साम्य उपलब्ध करून देतो; आणि ज्या अर्थी, न्यूटनच्या मतानुसार ते मुळी रंगच नाहीत, त्या अर्थी त्यांच्यावरून असे सूचित होऊ शकते की निरंकुश राजेशाहीतील निष्ठावंत मनोवृत्ती कोणत्याही रंगाचा कैवार घेत नाही. हान्से नगरांच्या जनतांचे रंगेल लाल व पांढरे ध्वज निदानपक्षी त्या जुन्या काळाला शोभत तरी होते; फ्रेंचांचा बाणा (esprit) आपला तेजस्वीपणा तिरंगी ध्वजामध्ये प्रदर्शित करतो, आणि ते तीन्ही रंग बावळट हॉलंडने देखील अंगिकारले आहेत, ते

---

* पिवळा आणि पांढरा— संपादक

बहुधा स्वतःचा उपहास करण्यासाठी त्याने अंगिकारले असावेत; अर्थात सगळ्यांत जास्त सुंदर आणि महत्त्वाचा म्हणजे अजूनही दुःखी असलेला जर्मन तिरंगी ध्वज; परंतु हॅनोव्हेरियन ध्वजाचे रंग! पांढरी विजार घातलेला एखादा झकपक पोशाख केलेला माणूस असावा अशी कल्पना करा आणि त्याचा तासभर भर वेगात पाठलाग होत आहे आणि तो रस्त्याकडेच्या गटारांतून व नव्याने नांगरलेल्या शेतांतून धावत सुटला आहे, लॉटच्या मिठाच्या स्तंभाची[४] कल्पना करा— मागच्या काळातले हॅनोव्हेरियन नुन्क्वुआम रेट्रोर्सम a चे उदाहरण अनेकांना इशारा म्हणून– हे सन्माननीय स्मारक असंस्कृत अरब तरुणांनी चिखलफेक करून ठेवलेले–आणि मग तुम्हाला हॅनोव्हेरियन सरहद्दीवरचा स्तंभ व त्याच्यावरचे राजचिन्ह दिसेल. किंवा त्यातला पांढरा रंग हा राज्याच्या निरुपद्रवी मूलभूत कायद्याचा सूचक असेल आणि पिवळा म्हणजे काही भाडोत्री लेखणीबहाद्दरांनी त्याच्यावर फेकलेली घाण असेल!

विविध प्रदेशांच्या धार्मिक स्वरूपाचे विवेचन पुढे चालू करू या. डच निसर्ग-दृश्ये मूलतःच कॅल्व्हिनिस्ट असतात. हॉलंडच्या दूरवर दिसणाऱ्या दृश्याचा सपशेल गद्यपणा, त्याच्या अध्यात्मीकरणाची अशक्यता, त्याच्याशी खरोखरी जुळणारे असे एकमेव दृश्य म्हणजे करड्या रंगाचे आकाश– हे सगळे डोर्ड्रेख्ट[५] सायनॉडच्या न चुकणाऱ्या निर्णयांच्या सारखाच आपल्यावर प्रभाव पाडते. पवनचक्क्या म्हणजे या निसर्गदृश्यातील अनन्य गतिमान वस्तू, त्या केवळ ईश्वरी आज्ञेच्या आदेशानुसारच स्वतःला हालचाल करू द्यायला वाव देणाऱ्या पूर्वनियोजित नियुक्तांची आठवण करून देतात. आणि या ओसाड सनातनीपणात व्हाइन नदी, खिस्ती धर्माच्या वाहत्या जिवंत बाण्यासारखी असलेली, आपले फलदायी सामर्थ्य हरवून बसते आणि वाळूच्या दिगाने हिचा पूर्णपणे कोंडमारा केलेला असतो; व्हाइन नदीवरून पाहिल्यास तिच्या डच तीरांचा देखावा हा असा दिसतो. देशाचे इतर भाग अधिक सुंदर असतीलही, मला ते ठाऊक नाहीत––रॉटरडॅम, त्याचे छाया असलेले धक्के, त्याचे कालवे आणि त्याची जहाजे, म्हणजे जर्मनीच्या अन्तर्भागातील लहान लहान नगरांतून आलेल्या लोकांना हे वालुकामय प्रदेशातील झऱ्यासारखे ठिकाण आहे; इथे आपल्याला हे समजू शकते की फ्रायलिग्राथसारख्या कवीची कल्पनाशक्ती इथून जलप्रवासाला निघालेल्या फ्रिग्रेट्सबरोबर दूरदूरच्या अधिक समृद्ध किनाऱ्याकडे कशी भराऱ्या मारत जाऊ शकली असेल आणि मग तिथली ओंगळवाणी झीलँड बेटे, तिथे देवनळे आणि बंधारे यांच्याखेरीज काही एक नाहीच, आणि पवनचक्क्या आणि प्रार्थनामंदिरांचे निनाद करणाऱ्या घंटांचे मनोरे, आणि त्यांच्यामधून आगबोट तासन्तास वळणे घेत घेत वाट काढत चाललेली!

---

a कधीही माघार घ्यायची नाही (हॅनोव्हेरियन राजचिन्हाच्या उसळत्या घोड्याखालील भागात कोरलेले वचन) ––संपादक

पण नंतर, किती आनंदी भावनेनिशी आपण ते तुच्छतावादी (फिलिस्टाइन) बंधारे आणि कडक लेसचा पोशाख केलेली कॅल्व्हिनिस्ट सनातनी दुनिया मागे टाकून खुल्या वातावरणात प्रवेश करतो! हेल्व्होयेट्स्लुइस दिसेनासे होते, उजव्या आणि डाव्या अंगाला वाल नदीची तीरे उसळत्या सुप्रसन्न लाटांमध्ये लुप्त होतात, पाण्याचा वालुकासदृश पिवळा रंग बदलतो आणि त्याला हिरवा रंग चढतो, आणि आता जे मागे राहिलेले आहे त्याचा विसर पडतो, आणि आपण गडद निळ्या पारदर्शक समुद्रांत झेप घेतो!

रडकथा संपवा आता, दुःखाचे ते ओझे द्या हो टाकुनी,
चला उठा वेळ जाहली जायची त्या महान मार्गावरुनी.
आकाश येतसे हळूच खाली, व्हाया सागरभेटी—
अन् तुम्ही काय जातसा पुढे हो, थकुनी उदासपोटी?
ओठंगे नभ हे, जगास देते भरभरुनी आनंद
आपुल्या मिठीतिल सुंदरता ही दावुनि होते धुंद
जणु घ्याया चुंबन अपुल्या प्रिय पात्राचे
उसळते लाट ही भिडण्या आकाशाते
अन् तुम्ही काय समजता, संपले जिणे अंधाऱ्या नैराश्यात?
मदनदेव आला वरुनी खाली
ही दुनिया घेतो आपुल्या अमलाखाली
वास्तव्य इथे कायमचे तो करतो मानवरूपी
अन् वास्तवात तो हृदयी तुमच्या सदा स्वस्वरूपी!
मग राज्य येउ दे त्याचे अधिक विमुक्त
उसळू दे त्याचे तेज, नको त्या अंत.

मग बोटीच्या वरच्या भागात चढावे आणि लाटांवर नजर रोखावी, बोटीच्या नाळेने दुभंगलेल्या लाटा फेसाचे पांढरे तुषार तुमच्या डोक्यावरून पलीकडे फेकत असतात. तसेच दूरवर समुद्राच्या हिरव्या पृष्ठभागावर नजर लावावी, तिथे लाटांचे फेसाळ तुरे अखंड अस्वस्थतेनिशी उसळत असतात. तिथे सूर्याचे किरण हजारो नाचऱ्या आरशांतून तुमच्या डोळ्यात प्रतिबिंबित झालेले असतात, तिथे समुद्राचा हिरवा रंग आकाशाच्या निळ्या रंगाशी आणि सूर्याच्या सोनेरी रंगाशी एकरूप झालेला असतो. आणि त्यांतून निर्माण झालेला एक अजब रंग आपल्या सगळ्या बारीकसारीक काळज्या, प्रकाशाच्या वैऱ्यांच्या सगळ्या आठवणी व त्यांचे दगाबाज हल्ले नष्ट करून टाकतो आणि आपण ताठ मानेने विमुक्त अथांग मनाच्या सान्निध्यात जाणिवेनिशी उभे राहतो! याच्याशी तुलना होण्याजोगा एकच प्रभाव

माझ्यावर पडलेला आहे; तत्त्वज्ञान्यांपैकी शेवटच्या तत्त्वज्ञान्याचा @ उदात्त विचार, एकोणिसाव्या शतकाच्या विचाराची ही महाप्रचंड निर्मिती, पहिल्या प्रथम जेव्हा माझ्या मनात या विचाराचा साक्षात्कार झाला, त्या वेळी मला असाच सुखद रोमांचकारी अनुभव आला, निरभ्र आकाशातून समुद्राची ताजी हवा माझ्या अंगावर फुंकर घालत आहे असे मला वाटले; सखोल तत्त्वचिंतने अथांग सागरासारखी माझ्या पुढ्यांत साठून राहिली आणि त्यांच्यावरून नजर वळविताच येत नाही. आणि आपण डोळे फाडफाडून खालची जमीन बघायचा प्रयत्न करतो; आपण देवाशी एकरूप होतो, देवरूप होऊन आपण हालचाल करतो आणि आपले असणे प्राप्त करून घेतो! आपण सागराबर असलो म्हणजे याची आपल्याला जाणीव होते, आपल्याला असे वाटायला लागते की आपल्या सभोवारच्या सगळ्या आसमंतात आणि खुद्द आपल्यात देखील देवाचे श्वसन भरून राहिले आहे; सगळ्या निसर्गाशी आपल्याला जवळीक वाटू लागते; लाटा आपल्याला कितीतरी आपुलकीने पालवतात, आकाश कितीतरी प्रेमभराने धरणीवर पसरलेले असते आणि सूर्य इतक्या अवर्णनीय तेजानिशी प्रकाशत असतो की आपण जणू काय त्याला आपल्या मुठीत पकडून घेऊ शकू असे आपल्याला वाटते.

सूर्य वायव्येकडे अस्ताला जातो; त्याच्या डाव्या अंगाला एक तेजस्वी पट्टा समुद्रातून वर येतो— केंटिश किनारा आणि टेम्स नदीच्या मुखाकडील दक्षिणेचे तीर. अगोदरच संधिप्रकाशाचे धुके सागरावर पसरलेले आहे, फक्त पश्चिमेकडे मात्र संध्याकाळचा जांभळा रंग आकाशावर व पाण्यावर पसरलेला आहे; पूर्वेकडील आकाश गडद निळ्या रंगात न्हाऊन निघालेले आहे आणि शुक्राचा तारा अगोदरच आपल्या तेजानिशी चमचमत आहे. नैर्ऋत्य दिशेकडे क्षितिजाच्या कडेकडेने एक लांबलचक सोनेरी जादूच्या रंगाचा पट्टा दिसतो आहे ते आहे मार्गेट; त्याच्या खिडक्यांतून संध्याकाळची लाली प्रतिबिंबित होत आहे. म्हणून आता आपल्या टोप्या हलवून आनंदाची आरोळी ठोकत आणि मद्याचा चषक संपूर्ण भरून येऊन स्वतंत्र इंग्लंडला अभिवादन करा. गुड नाइट, आणि लंडन शहरी सुखात जाग येऊ दे.

(टेलेग्राफ फुर डॉयश्चलॅन्ड, अंक १२३, ऑगस्ट १८४०)

रेल्वे प्रवासाच्या गद्यमय कंटाळवाणेपणाची तक्रार रेल्वे कधीही पाहिली नसताना तुम्ही करत असता, म्हणून तुम्ही लंडनहून लिव्हरपूलला रेल्वेने जायचा प्रयत्न करावा. रेल्वेचा बावर शोभणारी अशी जर कोणती भूमी कधी काळी तयार केलेली असेल तर ती म्हणजे इंग्लंडच होय. डोळे दिपविणारी सुंदर सीनसीनरी मुळीच नसते, प्रचंड पर्वतांची धुडे मुळीच नसतात, तर हळुवार चढ-उतार असलेल्या

@ बहुधा हेगेल—संपादक

टेकड्यांची ही भूमी आहे, आणि कधीही स्वच्छ नसलेल्या इंग्लिश उन्हात या भूमीला एक आकर्षण लाभलेले असते. या भूमीतील साध्या आकृतींचे किती विविधतापूर्ण गट आहेत याचे आश्चर्य वाटते; थोड्याशा बैठ्या टेकड्यांमधून एक शेत पुढे येते, काही झाडे येतात व चरणारी गुरे येतात, निसर्ग हजारभर आल्हाददायक निसर्गदृश्यांची रचना करतो. सगळ्या शेतांमध्ये झाडे एकेकटी किंवा गटांगटांनी असतात, त्यांचे सौंदर्य इतके अपूर्व असते की सगळा परिसरच बगीच्यासारखा दिसतो. मग एक बोगदा येतो आणि काही मिनिटे गाडी अंधारात असते, मग ती एका खोल पांदीतून बाहेर येते आणि त्यातून पुढे आपण अचानक हसऱ्या व उन्हाने न्हालेल्या शेतांमध्ये दाखल होतो. आणि एखाद्या वेळी रेल्वे लाइन लांबलचक खोरे ओलांडणाऱ्या पुलावरून जाते; खूप खालच्या अंगाला नगरे व खेडी असतात, जंगले व कुरणे असतात, त्यांच्या दरम्यान नदी वळणे घेत घेत वाहत असते; उजव्या व डाव्या अंगाला पार्श्वभूमीशी एकरूप होऊन अदृश्य होत असलेले डोंगर असतात. आणि खोरे जादूच्या प्रकाशात न्हालेले असते, त्याच्यात अर्धवट धुके व ऊर्धवट उन्हे असतात. परंतु आपल्या समोरच्या अजब देखाव्याचे आपण सर्वेक्षण करतो न करतो एवढ्यात आपण एका ओसाड पांदीत शिरतो आणि आपल्याला या अजब देखाव्याची आपल्या कल्पनेत पुनर्निर्मिती करायला अवसर मिळतो. आणि रात्र पडेपर्यंत हे असेच चालू राहते आणि आपले थकलेले डोळे मिटतात व आपल्याला गाढ झोप लागते. अहाहा, इंग्लंडच्या परगण्यांमध्ये समृद्ध काव्य भरलेले आहे! अनेकदा असे वाटायला लागते की जणू काय आपण अजून आनंदी इंग्लंडच्या सुवर्ण युगांतच वावरतो आहोत(a) आणि शेक्स्पियर हातात शिकारी बंदूक घेऊन झुडुपाआड लपत छपत हरणांची चोरून शिकार करायच्या मोहिमेवर असलेला आपल्याला कदाचित दिसेल, किंवा आपल्याला असे वाटते की त्याच्या एकाद्या दिव्य सुखान्त नाटकाचा प्रयोग प्रत्यक्षात या हिरव्या कुरणात चालू झालेला तर नसेल! कारण जिथे जिथे या नाटकांचे प्रवेश होतात असा समज असतो, म्हणजे इटली, फ्रान्स किंवा नाव्हार येथे, तिथे तिथे त्यांची गांवढळ अडाणी पात्रे, त्यांचे दीड शहाणे शिक्षक आणि त्यांच्या गोड तऱ्हेवाइक स्त्रिया, ही सगळी पात्रे मुळात आनंदी इंग्लंडमधीलच * असतात, आणि केवळ इंग्लिश आकाशच तेवढे रंगभूमीवर घडत असलेल्या घटनांना सोईस्कर असते ही गोष्ट लक्षणीयच म्हटली पाहिजे. केवळ काही सुखान्त नाटके, म्हणजे मिड समर नाइट्स ड्रीम सारखी, आणि त्याच्या जोडीला रोमिओ ॲन्ड ज्युलिएट हे नाटक त्यातल्या पात्रांच्या बाबतीत देखील, संपूर्णपणे दक्षिणी वातावरणाला जुळणारी आहेत.

(a) "गोल्डन डेज ऑफ मेरी इंग्लंड" हे शब्द मुळात इंग्रजीच आहेत!
—संपादक

* "मेरी इंग्लंड" हे शब्द मुळात इंग्रजीतच आहेत.—संपादक

आणि आता आपण परत आपल्या पितृभूमीत दाखल होऊ या! चित्रविचित्र आणि रोमँटिक वेस्टफॅलिया हा आपला पुत्र फ्रायलिग्राथ याच्यावर बराच रागावलेला आहे, कारण त्याच्याहूनही सर्वानुमते अधिक चित्रविचित्र आणि रोमँटिक व्हाईन लँड मुळे त्याला त्याचा संपूर्ण विसर पडलेला आहे. त्याला आपण थोड्याशा सांत्वनपर शब्दांनी त्याची समजूत घालू या, म्हणजे दुसरा अंक निवेपर्यंत[६] त्याचा धीर सुटायला नको. वेस्टफॅलिया सभोवार डोंगरांच्या रांगा आहेत आणि त्या बाकीच्या जर्मनीपासून त्याला अलग पाडतात आणि केवळ हॉलंड देशच त्याच्या सन्मुख राहतो, जणू काय त्याला जर्मनीतून बाहेर फेकून दिला आहे. आणि असे असूनही त्याची प्रजा सच्ची सॅक्सन आहे, ती चांगली इमानी जर्मन प्रजा आहे. आणि पर्वत सुंदर दृश्ये सादर करतात; दक्षिणेला रूइर आणि लेन्ने ही खोरी, पूर्वेला वेसेर खोरे, उत्तरेला मिंडेन ते ओस्नाब्रुक ही पर्वतांची रांग–तिथे सर्वत्र सुंदर सौन सौनरीची समृद्धी आहे आणि या प्रांताच्या मधोमध तेवढा कंटाळवाणा वालुकामय प्रदेश आहे आणि ही वालू नेहमीच गवतांतून व धान्यातून वर डोकावते. आणि या प्रांतात सुंदर सुंदर जुनी शहरे आहेत; त्यांतल्या त्यांत गॉथिक धर्तीची प्रार्थनामंदिरे व बाजारांच्या राया असलेले मिन्स्टर नगर आणि तिथले आन्नेटे एलिझाबेथ फॉन द्रोस्ते-हिल्शाफ आणि लेविन श्चूर्किंग. या श्चूर्किंगचा परिचय तिथेच होण्याचा आनंद मला लाभला आणि या महिलेच्या कवितांकडे[७] त्याने माझे लक्ष वेधले, आणि या कवितांच्या बाबतीत जर्मन जनतेला जो ठसका मिळालेला आहे त्याचा काही भाग स्वतःकडे घेण्याची संधी मला हातची घालविता येईना. त्यांच्या बाबतीत हे पुन्हा एकदा सिद्ध झाले की बऱ्याच बढाया मारणारा जर्मन सर्वसंग्राहकपणा कवितेच्या रसग्रहणाकडे फारसे लक्ष देत नाही, लोक कवितासंग्रहांचो पाने चाळतात, यमके शुद्ध आहेत की आणि कविता सफाईदार आहेत का आणि आशय समजायला सोपा आहे का आणि त्यांतल्या प्रतिमांच्या ठळकपणाची किंवा किमानपक्षी झगझगीतपणाची संमृद्धी आहे का एवढे तपासतात आणि निर्णय पूर्ण होतो. परंतु भावनेच्या सच्चेपणाचे, निसर्गाच्या चित्रणांतील हळूवारपणाचे, स्वतंत्र प्रदर्शन, जे केवळ शैली साधू शकतो आणि ज्यात बायरनची धीट कल्पनाशक्ती आहे–– मात्र, हे तर खरेंच आहे, की तिचे बाह्य रूप काहीसे रुक्ष असते आणि भाषा प्रादेशिकतेपासून सर्वस्वी मुक्त नसते––अशा कविता मागे कसलाही मागमूस न ठेवता नाहीशा होतात. परंतु जर कोणी त्या नेहमीपेक्षा अधिक सावकाशीने वाचायला तयार असेल–– आणि तसे पाहिले तर अशला कविता संग्रह आपण वामकुक्षीच्या वेळातच तेवढा वाचायला घेतो— तर आपल्याला असे आढळून येऊ शकते की त्यांचे सौंदर्य आपल्या झोपेच्या आड येते! यात भरीला भर म्हणजे कवयित्री निष्ठावंत कॅथॉलिक पंथीय आहे, आणि मग प्रॉटेस्टंट पंथीयाला असल्या कवितांमध्ये कसलाही रस घ्यावासा वाटणे कसे शक्य आहे? परंतु प्यूरिटिझम[८] (पवित्रता)चे अनुयायित्व माणसाला म्हणा, शिक्षकाला म्हणा, मुख्य

उपाध्याय आल्बर्ट कनॅप याला म्हणा, हास्यास्पद करून ठेवते; तर फ्रॉलीन फॉन ड्रॉस्टे हिची बालिश श्रद्धा तिला फारच छान शोभून दिसते. मनाचे धार्मिक स्वातंत्र्य हे स्त्रियांना जरासे अवघडायला लावणारेच प्रकरण असते. जॉर्ज सँड, श्रीमती शेली a यांजसारख्या व्यक्ती दुर्मिळ असतात; संन्यायाला स्त्रीमनाला बाधा करणे फारच सोपे असते आणि कोणत्याही स्त्रीच्या अंगी असू नये एवढे बुद्धीचे सामर्थ्य वाढविणे त्याला सोपे असते. तथापि, आम्ही नव्याचे पाईक जे विचार पक्के आत्मसात करतो ते सत्य असतील तर स्त्रीहृदय जसे आता आपल्या वाडवडिलांच्या पवित्र श्रद्धेने पुलकित होते, तसेच ते आधुनिक मनाच्या विचारपुष्पांनी पुलकित व्हायची वेळ आता फारशी दूर राहिलेली नाही--नव्या पिढीला नव्याचे ग्रहण आईच्या दुधाबरोबर करायला मिळेल तेव्हाच नव्याचा विजय हाताशी येईल.

फ्रेडरिक एन्गल्स, "निसर्ग-दृश्ये"
(लँडस्केप्स),
मार्क्स आणि एन्गल्स, संकलित ग्रंथ,
खंड २ रा, मॉस्को, १९७५, पृष्ठे ९५-१०१

(a) मेरी वॉल्स्टोनक्राफ्ट-शेली ऊर्फ गॉड्विन.—संपादक

ऐतिहासिक भौतिकवादाच्या रासवटीकरणाला विरोध

१

इतिहासाच्या भौतिकवादी संकल्पनेनुसार, इतिहासातील अंतिमदृष्ट्या निर्णायक घटक म्हणजे वास्तव जीवनाची निर्मिती व पुनर्निर्मिती हा असतो. याहून अधिक मार्क्सनेही कधी सांगितलेले नाही आणि मी देखील कधी सांगितलेले नाही. म्हणूनच जर कोणीतरी या विधानाला तिढा देऊन असे सांगायला लागला की आर्थिक घटक हा एकमेव निर्णायक घटक असतो, तर तो या विधानाचे परिवर्तन अर्थशून्य, अमूर्त व हास्यास्पद शब्दयोजनेत करून ठेवतो. आर्थिक परिस्थिती हा आधार असतो, परंतु वरच्या इमल्याचे विविध घटक – म्हणजे वर्गलढ्याचे आणि त्याच्या फलश्रुतींचे राजकीय प्रकार, यशस्वी लढाईनंतर विजयी वर्गाने प्रस्थापित केलेल्या राज्यघटना इत्यादी प्रकार, कायदेविषयक प्रकार आणि विशेषेकरून या सगळ्या खऱ्याखुऱ्या संघर्षांमध्ये भाग घेणाऱ्यांच्या मेंदूंमध्ये पडलेली त्यांची प्रतिबिंबे, राजकीय, कायदेविषयक, तत्त्वज्ञानविषयक तत्त्वविचार, धार्मिक मते आणि धार्मिक स्मृतींच्या पद्धतींमध्ये त्यांचा झालेला आणखी अधिक विकास–या सगळ्या गोष्टीदेखील ऐतिहासिक लढ्यांच्या ओघावर आपला प्रभाव पाडतात आणि अनेक बाबतीत विशेषेकरून त्यांचा प्रकार निश्चित करतात. या सगळ्या घटकांची एकमेकांवर क्रियाप्रतिक्रिया होत असते आणि त्यांमध्ये अपघातांच्या अमाप गर्दीमध्ये (म्हणजे अशा गोष्टी व घडामोडी की ज्यांचे आतले परस्परसंबंध इतके दूरचे व सिद्ध करण्याला अशक्य असतात की आपण ते अस्तित्वात नसल्याचे मानू शकतो व त्यांच्याकडे दुर्लक्ष करू शकतो), आर्थिक चळवळ अन्ती आपला प्रभाव पाडल्याखेरीज राहत नाही. नाहीतर असे होईल की इतिहासाच्या कोणत्याही कालखंडाला हा तत्त्वविचार लागू करणे हे पहिल्या श्रेणीतल्या साध्या समीकरणाच्या सोडवणुकीपेक्षा देखील अधिक सोपे होऊन बसेल.

एन्गल्स यांचे जोसेफ ब्लॉख यास पत्र,
तारीख २१-२२ सप्टेंबर, १८९०
मार्क्स आणि एन्गल्स, निवडक
पत्रव्यवहार, मॉस्को, १९७५, पृष्ठे ३९४-९५.

२

राजकीय, कायदेविषयक, तात्त्विक, धार्मिक, साहित्यविषयक, कलात्मक, इत्यादी विकास हा आर्थिक विकासावर आधारलेला असतो. परंतु या सगळ्यांची एकमेकांवर क्रियाप्रतिक्रिया होत असते आणि आर्थिक आधारावर देखील होत असते. आर्थिक परिस्थिती हे एकमेव क्रियाशील असे कारण असते आणि बाकीचे सगळे मात्र केवळ अप्रत्यक्ष प्रभाव पाडणारे असते अशातला प्रकार मुळीच नसतो. तर आर्थिक आवश्यकतेच्या आधारावर क्रिया-प्रतिक्रिया चाललेली असते आणि अखेरीस हीच आपला प्रभाव सदैव गाजवते. उदाहरणार्थ, संरक्षक जकाती, खुला व्यापार, चांगली अगर वाईट जमाबंदी पद्धती यांच्या योगाने राज्यसंस्था आपला प्रभाव गाजवते; आणि १८४८ ते १८५० या मुदतीतील जर्मनीच्या शोचनीय आर्थिक परिस्थितीतून उद्भवलेला जर्मन तुच्छतावाद्यांचा (फिलिस्टाइन्सचा) घातक निष्क्रियपणा व नेभळेपणा आणि प्रथम धार्मिकतेत व नंतर भावनाअधीनतेत व राजे आणि सरदार यांच्यापुढे लाचारीच्या प्रदर्शनात आपले स्वरूप व्यक्त करणाऱ्या या सगळ्या गोष्टी आर्थिक परिणामाशिवाय घडलेल्या नव्हत्या. पूर्वावस्थापनेच्या मार्गातील हा मोठ्यांत मोठा अडथळा होता आणि क्रान्तिकारक व नेपोलियनच्या युद्धांनी हे नेहमीचे दुःख तीव्र केले जाईपर्यंत या अडथळ्याला हादरा बसला नाही. म्हणून लोक इकडून तिकडून सोइस्करपणे जशी कल्पना करून ध्यायचा प्रयत्न करतात की आर्थिक परिस्थिती आपोआप प्रभाव निर्माण करते, तशातला प्रकार नसतो. तसे मुळीच नसते. माणसे स्वतःच आपला इतिहास घडवतात, मात्र विशिष्ट वातावरणात ती ही गोष्ट करतात, आणि हे वातावरण त्यांना घडवत असते आणि अगोदरच अस्तित्वांत असलेल्या प्रत्यक्ष संबंधांच्या आधारावरच माणसे ही गोष्ट करतात आणि इतर म्हणजे राजकीय व वैचारिक संबंधांचा प्रभाव त्यांच्यावर कितीही पडत असला तरी अंतिमदृष्ट्या आर्थिक संबंधच निर्णायक ठरतात, आणि तेच प्रत्येकातून शिरकाव करणारा मोक्याचा धागा असतात आणि तेच एकटे सामंजस्याला पोषक ठरतात.

एन्गल्स यांचे डब्ल्यू. बोर्गियस यास पत्र
तारीख २५ जानेवारी १८९४.
मार्क्स आणि एन्गल्स, निवडक ग्रंथ,
खंड ३ रा, मॉस्को, १९७३, पृष्ठे ५०२-०३

३

धर्म, तत्त्वज्ञान, इत्यादि हवेत अधिकाधिक उंचावर विहार करणारी जी विचार-सरणीची क्षेत्रे आहेत, त्यांच्या ठायी एक इतिहासपूर्वकालीन साठा असतो. हा अगोदरच अस्तित्वात असलेला आढळलेला असतो, आणि ऐतिहासिक कालखंडाने तो ताब्यात घेतलेला असतो, त्यालाच आपण आज अर्थशून्यता म्हणायला हवे.

निसर्गाविषयींच्या या विविध प्रकारच्या खोट्या संकल्पना, माणसाच्या स्वतःच्या असण्याविषयींच्या, चेतनांविषयींच्या, जादुमय शक्तींविषयींच्या, इत्यादी ज्या गोष्टी आहेत, त्यांचा आधार म्हणजे बहुतांशी केवळ नकारात्मक आर्थिक घटक असतो; इतिहासपूर्वकालीन कालखंडातील खालच्या पातळीवरच्या आर्थिक विकासाला पूरक अशा निसर्गाविषयींच्या खोट्या संकल्पना आणि याच संकल्पना अंशतः या विकासाच्या परिस्थितीला पोषक, किंबहुना कारणीभूत झालेल्या असतात. आणि आर्थिक आवश्यकता ही निसर्गाच्या वाढत्या ज्ञानाला प्रेरक अशी मुख्य शक्ती होती आणि तशीच ती सतत अधिक प्रमाणात झालेली आहे, तरी देखील या सगळ्या अतिप्राचीन अर्थशून्यपणाची आर्थिक कारणे शोधायचा प्रयत्न करणे ही नुसतीच पंडितंमन्यता ठरेल. विज्ञानाचा इतिहास हा असल्या अर्थशून्यपणाचा क्रमाक्रमाने निचरा करायचा इतिहास आहे; किंवा हवे तर असे म्हणावे की या अर्थशून्यपणाच्या जागी ताज्या पण कमी हास्यास्पद अर्थशून्यपणाची स्थापना करायचा इतिहास आहे. जे लोक या क्षेत्राकडे लक्ष देतात ते आपल्या परीने श्रमविभागणीच्या खास क्षेत्रातले असतात आणि त्यांना असे वाटते की आपण एका स्वतंत्र क्षेत्रात कार्य करीत आहोत आणि ज्या प्रमाणात ते सामाजिक श्रमविभागणीमधील एक स्वतंत्र गट म्हणून तयार झालेले असतात, त्या प्रमाणांत त्यांच्या चुकांसकट त्यांची पैदास आपल्या परीने समाजाच्या सर्वंध विकासावर आपला प्रभाव पाडत असते आणि त्याच्या आर्थिक विकासावर देखील प्रभाव पाडत असते. परंतु असे असून देखील ते स्वतःच आपल्या परीने आर्थिक विकासाच्या दांडग्या प्रभावाखाली असतात. उदाहरणार्थ, तत्त्वज्ञानाच्या बाबतीत भांडवलदारी कालखंडाला ही गोष्ट लागू असल्याचे अतिशय तत्परतेने सिद्ध करता येते. हॉब्ज हा पहिला आधुनिक भौतिकवादी होता (अठराव्या शतकांतला या अर्थाने) परंतु ज्या वेळी संबंध युरोपखंडात सर्वंकष राजेशाहीची चढती कमान होती आणि तिने इंग्लंडच्या जनतेविरुद्ध लढाई आरंभली, त्या वेळी तो सर्वंकष राजेशाहीवादी झाला. लॉक हा धर्माच्या व राजकारणाच्या क्षेत्रात १६८८ च्या तडजोडीचे अपत्य ठरला. इंग्रज ईश्वरवादी आणि त्यांचे अधिक सुसंगत अनुयायी जे फ्रेंच भौतिकवादी, तेच भांडवलदारांचे खरे तत्त्वज्ञ होते, फ्रेंच भौतिकवादी तर भांडवलदारी क्रान्तीचे देखील खरे तत्त्वज्ञ होते. जर्मन तुच्छतावाद (फिलिस्टाइनिझम) हा कान्टपासून हेगेलपर्यंत कधी विधायक तर कधी नकारात्मक रीतीने जर्मन तत्त्वज्ञानामध्ये अनुस्यूत असलेला आढळतो. परंतु श्रमविभागणीतील स्वतंत्र क्षेत्र म्हणून मानल्या गेलेल्या प्रत्येक कालखंडाच्या तत्त्वज्ञानाची पूर्वअट म्हणजे त्याच्या पूर्वसूरींनी त्याच्या स्वाधीन केलेले निश्चित वैचारिक साहित्य असते आणि तेच त्याचा आरंभबिंदु देखील असते. आणि याच कारणास्तव आर्थिक दृष्ट्या मागासलेले देश अजून देखील तत्त्वज्ञानामध्ये अग्रस्थानी राहू शकतात. ज्या इंग्लंडच्या तत्त्वज्ञानावर फ्रेंचांनी भिस्त ठेवली, त्याच्याशी तुलना करता अठराव्या शतकांतला फ्रान्स अग्रस्थानी राहिला आणि

मागाहून या दोहोंशी तुलना करता जर्मनी अग्रस्थानी राहू शकला. परंतु फ्रान्स आणि जर्मनी या दोन्ही देशांमध्ये त्यावेळी तत्त्वज्ञानाला व साहित्याला जो सार्वत्रिक बहार आला, तो आर्थिक पुनरुज्जीवनाचा देखील परिपाक होता. आर्थिक विकासाचे अंतिम वर्चस्व हे माझ्या लेखी या क्षेत्रांमध्ये देखील एक प्रस्थापित सत्य घटना आहे, परंतु खुद्द त्या विशिष्ट क्षेत्राने घालून दिलेल्या अटींच्या चौकटीतच ते कार्यान्वित होते: उदाहरणार्थ, तत्त्वज्ञानामध्ये, पूर्वसूरींनी हाती दिलेल्या प्रचलित तात्त्विक साहित्यावरील आर्थिक प्रभावांच्या कृतीच्या योगाने (आणि हे प्रभाव त्यांच्या परीने सर्वसाधारणपणे त्यांच्या राजकीय वगैरे स्वरूपातच कार्यान्वित होतात). इथे अर्थव्यवस्था नवीन काहीच निर्माण करत नसते, परंतु ती अस्तित्वात असलेले वैचारिक साहित्य कोणत्या मार्गाने बदलले आहे आणि आणखी अधिक विकसित केले आहे तो मार्ग निश्चित करून देते आणि ते देखील बहुतांशी अप्रत्यक्षपणे, कारण राजकीय, कायदेविषयक आणि नैतिक संवेदनाच तत्त्वज्ञानावर मोठ्यात मोठा थेट प्रभाव गाजवितात.

एन्गल्स यांचे कॉन्रॅड श्मिड्ट यास पत्र
तारीख २७ ऑक्टोबर १८९०
मार्क्स आणि एन्गल्स, निवडक
पत्रव्यवहार, मॉस्को, १९७५, पृष्ठे ४००-०१.

४

अधिक तरुण लोक कधी कधी आर्थिक बाजूवर तिच्या योग्यतेपेक्षा अधिक भर देतात या वस्तुस्थितीचा दोष खुद्द मार्क्स व मी अशा आम्हा दोघांकडे अंशतः येतो. आमचे प्रतिस्पर्धी हे नाकारत होते आणि म्हणून त्यांना अनुलक्षून मुख्य तत्त्वावर आम्हाला भर देणे भाग पडले आणि परस्पर क्रिया प्रतिक्रियांमध्ये गुंतलेल्या इतर घटकांची योग्य ती संभावना करायला आम्हाला नेहमीच वेळ, स्थळ किंवा संधी मिळाली नाही. परंतु इतिहासाचा एक विभाग सादर करायचा जेव्हा प्रसंग आला, म्हणजे तत्त्वविचार व्यवहारात लागू करायचा जेव्हा प्रसंग आला तेव्हा मात्र हे प्रकरण वेगळे ठरले आणि तिथे कोणतीही चूक क्षम्य नव्हती. तथापि, दुर्दैवाची गोष्ट म्हणजे फार फार वेळा असे घडते की एक नवा तत्त्वविचार आपल्याला पूर्णपणे समजला आहे असे लोकांना वाटते आणि त्याची मुख्य तत्त्वे त्यांनी आत्मसात केल्याबरोबर, आणि ती देखील नेहमीच बिनचूकपणे नव्हे, विशेष कटकट न करता आपण तो लागू करू शकतो, असे त्यांना वाटते. आणि या ठपक्यांतून मी अधिक अलीकडच्या

"मार्क्सवाद्यांपैकी" अनेकांना वगळू शकत नाही, कारण त्या क्षेत्रांतूनदेखील अत्यंत आश्चर्यकारक मसाला पैदा करण्यात आलेला आहे.

एन्गल्स यांचे जोसेफ ब्लॉख याला पत्र
तारीख २१-२२ सप्टेंबर १८९०
मार्क्स आणि एन्गल्स,
निवडक पत्रव्यवहार, मॉस्को, १९७५,
पृष्ठ ३९६

५

सर्वसाधारण मानाने पाहता, "भौतिकवादी" हा शब्द जर्मनीतील अधिक तरुण लेखकांपैकी अनेकांना एक नुसताच शब्दसमुच्चय म्हणून कामी येतो आणि आणखी अधिक अभ्यास न करता कोणत्याही व प्रत्येक गोष्टीवर तो लेबल म्हणून लावता येतो, म्हणजे ते हे लेबल चिकटवतात आणि मग हा प्रश्न निकालात निघाला असे समजतात. परंतु इतिहासाची आमची संकल्पना ही सगळ्यात जास्त महत्त्वाची गोष्ट म्हणजे अभ्यासाची मार्गदर्शिका असते, हेगेलियन धर्तीवर रचनेसाठी तरफ म्हणून नव्हे, सगळा इतिहास नव्याने अभ्यासला पाहिजे. समाजाच्या विविध रचनांच्या अस्तित्वाच्या परिस्थितीची तपशीलवार तपासणी केली पाहिजे आणि मगच तिच्याशी मिळतेजुळते असे राजकीय, मुलकी-कायदेविषयक, सौंदर्यविषयक, तात्त्विक, धार्मिक वगैरे विचार अनुमान म्हणून काढायचा प्रयत्न करता येतो. आतापर्यंत या बाबतीत फारच अल्प कामगिरी करण्यात आलेली आहे, कारण फारच थोडे लोक या उद्योगाला गंभीरपणे लागलेले आहेत. आम्हाला या क्षेत्रामध्ये फार मोठी मदत हवी आहे, कारण हे क्षेत्र महाप्रचंड आहे, आणि जो कोणी गंभीरपणे काम करील, त्याला खूपच साधता येते आणि स्वतःची ख्याती करून घेता येते. परंतु याच्याऐवजी कितीतरी अधिक तरुण जर्मन लोक ऐतिहासिक भौतिकवाद या शब्दसमुच्चयाचा नुसताच वापर करतात. (आणि प्रत्येक गोष्टीला शब्दसमुच्चयाचे रूप देता येते) तो म्हणजे केवळ अंशासाठी की आपले स्वतःचे सापेक्ष दृष्ट्या तुटपुंजे इतिहासविषयक ज्ञान—कारण आर्थिक इतिहास अजून केवळ बाल्यावस्थेतच आहे— नीटनेटक्या पद्धतीत शक्य तितक्या लवकर रचून मोकळे व्हावे आणि मग ते अशा नादात असतात की, आपण काहीतरी प्रचंड साध्य केले आहे आणि त्यानंतर एखादा बाथ पुढे सरसावू शकतो आणि खुद्द या विषयावरच टीकेचा हल्ला चढवू शकतो, आणि त्याच्या वर्तुळामध्ये या विषयाची अधोगती खरोखरीच केवळ एका शब्दसमुच्चयामध्ये करण्यात आलेली असते.

एन्गल्स यांचे कॉन्रॅड श्मिड्ट यास पत्र,
तारीख ५ ऑगस्ट १८९०,
मार्क्स आणि एन्गल्स, निवडक पत्रव्यवहार,
मॉस्को, १९७५, पृष्ठे ३९३-९४

मेहरिंगकृत द लेस्सिंग लेजंडविषयी एन्गल्स यांचे विचार

१

'द लेस्सिंग लेजंड' स्वतंत्र पुस्तकरूपाने प्रसिद्ध झाल्याचा मला आनंद वाटतो; अशा प्रकारचे ग्रंथ त्यांचे भाग पाडण्यांत आल्याने त्यांची फार हानी होते. प्रशियन इतिहासाच्या सावळ्या गोंधळातून तुम्ही मार्ग काढलात आणि बिनचूक अन्तर्गत संबंध दाखवून दिलेत हे तुम्हाला खूपच गौरवास्पद आहे; प्रशियातील प्रचलित वास्तवता हे सर्वस्वी आवश्यक करून ठेवतात, मग खुद्द हे काम कितीही तापदायक असो. काही मुद्यांच्या बाबतीत मी तुमच्या मताशी संपूर्णपणे सहमत नाही, विशेषेकरून काही स्थळांमध्ये आदल्या कालखंडाशी असलेल्या कारणदर्शक दुव्यांच्या बाबतीत, परंतु याच्यामुळे जर्मन इतिहासाच्या या कालखंडावरील तुमचा ग्रंथ हा उपलब्ध ग्रंथांमध्ये सर्वोत्तम ठरायला कसलाच प्रत्यवाय येत नाही.

एन्गल्स यांचे मेहरिंग यास पत्र,
तारीख ११ एप्रिल १८९३
मार्क्स/एन्गल्स, वेर्के(a) खंड ३९ वा, १९६८, पृष्ठ ६४

२

तुमचा बर्लिनचा वार्ताहर नक्कीच फार फार आत्मनिष्ठ आहे, परंतु लिहायचे कसे हे त्याला अवगत आहे आणि ऐतिहासिक घडामोडींच्या भौतिकवादी संकल्पनेची त्याची ग्रहणशक्ती फार चांगली आहे; प्रचलित घडामोडींच्या त्याच्या जाणकारीविषयी मात्र मी नेहमीच हेच म्हणणार नाही. द लेस्सिंग लेजंड हा ग्रंथ सर्वोत्कृष्ट होता, मात्र काही मुद्यांच्या बाबतीत मी वेगळा अर्थ लावतो.

एन्गल्स यांचे कार्ल कौट्स्की यास पत्र,
तारीख १ जून १८९३
मार्क्स / एन्गल्स, वेर्के, खंड ३९ वा, १९६८,
पृष्ठ ७७-७८

(a) हा आणि इतरत्र संदर्भ मार्क्स/एन्गल्स, वेर्के, डीएट्झ व्हेर्लाग, बर्लिन, याला अनुलक्षून आहे-- संपादक

३

एन्गल्स यांचे फ्रॅन्झ मेहरिंग यास पत्र

लंडन, तारीख १४ जुलै १८९३

प्रिय मिस्टर मेहरिंग,

तुम्ही मला लेस्सिंग लेजंड येवढ्या प्रेमाने धाडून दिलेत त्याबद्दल तुमचे आभार मानायची आज मला पहिली संधी लाभते आहे. पुस्तक पोचल्याची औपचारिक पोच म्हणून उत्तर धाडायला मला नको होते, पण त्याच वेळी त्याच्याविषयी, त्याच्या आशयाविषयी, मला काही तरी सांगायला हवे होते. म्हणून हा उशीर.

मी शेवटून सुरुवात करतो—"ओबेर डेन हिस्टॉरिश्रेन मटीरियालिस्मस" ["ऐतिहासिक भौतिकवादाविषयी"] या परिशिष्टापासून. यामध्ये तुम्ही मुख्य मुद्यांचा सारांश सर्वोत्कृष्टपणे दिलेला आहे आणि कोणाही पूर्वग्रहरहित व्यक्तीची खात्री पटेल असा दिलेला आहे. त्यांत आक्षेप घेण्याजोगे जे काही मला आढळते ते म्हणजे हे की माझ्या योग्यतेपेक्षा तुम्ही मला अधिक श्रेय देत आहात, मी स्वतः कदाचित शोधून काढलेले—म्हणजे यथावकाश– सगळे मोजले असते तर त्याच्यापेक्षाही हे अधिक भरते –परंतु मार्क्सने त्याच्या शीघ्र Coup doeil (ग्रहणशक्ती)ने आणि अधिक व्यापक दृष्टीने ते अधिक झपाट्याने शोधून काढले असते. मार्क्ससारख्या माणसाच्या बरोबर चाळीस वर्षे काम करायचे सुदैव ज्याला लाभले त्याला सर्वसाधारणपणे त्याच्या हयातीत आपल्या योग्यतेप्रमाणे जे आपल्याला वाटते तेवढे श्रेय मिळत नाही. नंतर, अधिक मोठा माणूस जेव्हा दगावतो, तेव्हा अधिक लहान माणसाला सहजासहजी फाजील श्रेय मिळते आणि या घटकेला माझे प्रकरण नेमके असे आहे असे मला दिसते. अखेरीस इतिहास हे सगळे ठीक करील आणि त्या वेळेपर्यंत आपण इहलोक सोडून गेलेले असू आणि अतःपर कशाविषयीही काहीही आपल्याला कळणारच नाही.

नाही तर आणखी एकाच मुद्याची उणीव आहे, तथापि त्याच्या संबंधात आमच्या लेखनात पुरेसा भर द्यायच्या बाबतीत मार्क्सने आणि मी सदैव कसूर केलेली आहे आणि त्याच्या संबंधात आम्ही सगळेच समान अपराधी आहोत. म्हणजे असे, की राजकीय, कायदेविषयक आणि इतर विचारसरणीविषयक कल्पना आणि या कल्पनांच्या माध्यमाच्या द्वारा उद्भवणाऱ्या कृती मूलभूत आर्थिक सत्य घटनातून अनुमानण्यावर आम्ही प्रथम मुख्य भर दिला आणि भर देणे आम्हाला भागच होते. परंतु त्याच वेळी आम्ही आशयाच्या हिशेबी औपचारिक बाजूकडे दुर्लक्ष केले आहे– म्हणजे कोणत्या रीतीने या कल्पना वगैरे अमलात आल्या तिच्याकडे दुर्लक्ष केले आहे. याने आमच्या प्रतिस्पर्ध्यांना गैरसमजांची व विकृतीकरणांची स्वागतार्ह संधी मिळाली, आणि याचे ठळक उदाहरण म्हणजे पॉल बार्थ हे आहे.

विचारसरणी ही अशी प्रक्रिया आहे की ती खरोखरीच तथाकथित विचारवन्ताकडून जाणीवपूर्वक साधली जाते, परंतु ही चुकीच्या प्रकारची जाणीव असते. विचारवन्ताला प्रेरणा देणाऱ्या खऱ्याखुऱ्या गतिशील शक्ती त्याला अज्ञातच राहतात; नाहीतर ही मुळी विचारसरणीयुक्त प्रक्रियाच असणार नाही. म्हणून तो खोट्या किंवा भ्रामक गतिशील शक्तींची कल्पना करून ठेवतो. ती विचार करण्याची प्रक्रिया असते म्हणून तो तिचे बाह्यरूप व आशय ही दोन्ही शुद्ध बुद्धिवादाने अनुमानतो, मग हा बुद्धिवाद त्याचा असो किंवा त्याच्या पूर्वसूरींचा असो. तो सर्वस्वी विचाराच्या साहित्यावर काम करतो आणि हे साहित्य तो तपासणी न करता बुद्धिवादाने निर्माण केलेले काहीतरी म्हणून स्वीकारतो आणि बुद्धीपासून स्वतंत्र अशा अधिक दूरच्या स्रोताचा आणखी पुढील शोध घेत नाही; खरे म्हणजे ही त्याला नेहमीच्या ओघातली बाब असते, कारण ज्या अर्थी सगळी कृति विचाराच्या माध्यमातून होत असते त्या अर्थी तो अंतिमदृष्ट्या विचारावर आधारलेली आहे असे त्याला दिसते.

ऐतिहासिक विचारसरणीनिष्ठाच्या (इथे ऐतिहासिक ही संज्ञा नुसतीच सर्वसमावेशक म्हणजे राजकीय, कायदेविषयक, तत्त्वज्ञानविषयक, धर्मशास्त्रविषयक—थोडक्यात सांगायचे म्हणजे समाजाच्या सगळ्या क्षेत्रांना लागू पडणारी आणि केवळ निसर्गालाच लागू पडणारी नव्हे, अशा अर्थाने घ्यायची) ठायी अशा प्रकारे विज्ञानाच्या प्रत्येक क्षेत्रांतील अशी साधनसामुग्री उपलब्ध असते की जी मागील पिढ्यांच्या विचारातून स्वतंत्रपणे उद्भवलेली आहे आणि या पुढील एकामागून एक येणाऱ्या पिढ्यांच्या मेंदूमध्ये आपल्या स्वतःच्या स्वतंत्र मार्गाच्या द्वारा तिने वाटचाल केलेली आहे. हे तर खरेच आहे की या अगर त्या क्षेत्रांतील बाह्य सत्य घटनांनी या विकासावर संयुक्त-निर्णायक प्रभाव पाडला असण्याचा संभव आहे, परंतु अघोषित पूर्वसमज असा आहे की खुद्द या सत्य घटनादेखील विचाराच्या प्रक्रियेच्याच केवळ फलनिष्पत्ती आहेत. आणि अशा प्रकारे आपण अजूनही निव्वळ विचाराच्याच त्या राजवटीत राहिलेलो आहोत, आणि या विचाराने सकृद्दर्शनी सगळ्यात जास्त कठीण अशा सत्य घटना देखील आपल्या पचनी पाडून घेतलेल्या आहेत.

सगळ्यात जास्त महत्त्वाची गोष्ट म्हणजे, राज्यांच्या राज्यघटनांचा, कायद्यांच्या पद्धतींचा, प्रत्येक वेगळ्या क्षेत्रांतील वैचारिक संकल्पनांचा स्वतंत्र इतिहास, असल्याचा हा जो सगळा देखावा दिसतो, तो बहुतेक लोकांचे डोळे दिपवतो. लूथर आणि कॅल्व्हिन जर अधिकृत कॅथोलिक धर्मावर "मात करतात," किंवा हेगेल जर फिख्ते व कान्ट यांच्यावर "मात करतो," किंवा रूसो आपल्या प्रजासत्ताकीय कॉन्ट्रॅक्ट सोशल च्या योगाने अप्रत्यक्षपणे राज्यघटनावादी मॉन्टेस्क्यूवर "मात करतो," तर ही अशी एक प्रक्रिया आहे की जी धर्मशास्त्र, तत्त्वज्ञान किंवा राज्यशास्त्र यांच्या कक्षेत राहिलेली आहे, आणि विचाराच्या या विशिष्ट क्षेत्रांच्या इतिहासातील एक टप्पा आहे, आणि विचाराच्या कक्षेपलीकडे ती कधीही जात नाही. आणि ज्या अर्थी भांडवलदारी

उत्पादनाच्या अक्षयत्वाच्या व अंतिमत्वाच्या भांडवलदारी भ्रमाची यात भर घालण्यात आली आहे, त्या अर्थी फिजिओक्रॅट्स[१०] आणि ॲडम स्मिथ यांनी मर्कन्टिलिस्टांवर "मात करणे" हे देखील विचाराचाच निव्वळ विजय असे मानले जाते; बदललेल्या आर्थिक सत्य घटनांचे विचारामध्ये पडलेले प्रतिबिंब असे मानले जात नाही, परंतु सदैव व सर्वत्र अस्तित्वात असलेल्या प्रत्यक्ष परिस्थितीचे अंतिमदृष्ट्या साध्य झालेले बिनचूक आकलन असे मानले जाते— वस्तुतः रिचर्ड कोअर-डि लायन आणि फिलिप ऑगस्टस यांनी धर्मयुद्धांच्या मोहिमांमध्ये स्वतःला गुरफटून घेण्याऐवजी खुला व्यापार जर चालू केला असता तर पाचशे वर्षांच्या आपल्या हालअपेष्टा व मूर्खपणा वाचला असता.

या प्रकरणाच्या या उपांगाचे इथे मी केवळ दिग्दर्शन करू शकतो आहे, आणि मला वाटते आपण सगळ्यांनीच याच्याकडे याच्या योग्यतेहून अधिक दुर्लक्ष केले आहे. तशी ती जुनीच कथा आहेः आशयासाठी बाह्यांग सदैवच प्रथमतः दुर्लक्षिण्यात येते. मी म्हणतो आहे तसे मी देखील हे केलेले आहे आणि ही चूक नेहमीच केवळ उशीराच माझ्या ध्यानात आलेली आहे. म्हणून मी कोणत्याही रीतीने याचा ठपका तुमच्यावर मुळीच ठेवत नाही इतकेच नव्हे-- तर अपराध्यांपैकी ज्येष्ठ अपराधी म्हणून मला तसे करायचा मुळी अधिकारच नाही. असे असूनही उलटपक्षी भविष्यकाळासाठी या मुद्याकडे तुमचे लक्ष वेधून ठेवतो.

याच्याशी संबंधित अशी विचारसरणीनिष्ठांची एक चुकीची समजूत आहे ती अशी : इतिहासात भूमिका करणाऱ्या विविध वैचारिक क्षेत्रांना स्वतंत्र ऐतिहासिक विकास नसतो असे आम्ही म्हणतो म्हणून म्हणे त्यांचा इतिहासावर कसलाच प्रभाव पडत नाही असे देखील आम्ही म्हणतो. याचा आधार म्हणजे नेहमीची बिन-विरोधविकासवादी संकल्पना. कारण आणि परिणाम यांना ठोकळेबाजपणाने परस्परविरोधी टोके मानणे, आणि परस्पर क्रिया-प्रतिक्रियांकडे संपूर्ण दुर्लक्ष करणे. हे लोक अनेकदा जवळजवळ जाणूनबुजून विसरतात की एकदा एक ऐतिहासिक घटक इतर अंतिमदृष्ट्या आर्थिक कारणांनी जगात आणला गेल्यानंतर तो आपल्या वातावरणावर प्रतिक्रिया घडवितो आणि घडवू शकतो आणि ज्या कारणातून तो उद्भवलेला असतो त्या कारणांवरदेखील तो प्रतिक्रिया घडवितो. उदाहरणार्थ, तुमच्या ग्रंथाचे पृष्ठ ४७५, त्यात बार्थ हा धर्मगुरु व धर्म याविषयीचे जे विवेचन करतो ते तुम्ही या प्राण्याचा कसा निकाल लावला आहे हे बघून मी खूपच खूष झालो. याचा मूर्खपणा सगळ्या अपेक्षांच्या पलीकडली मजल गाठणारा आहे आणि असल्या माणसाला लिपझिग विद्यापीठामध्ये इतिहासाचा प्राध्यापक करण्यात आले आहे! बयोवृद्ध वाख्स्मुथ–हा देखील जरासा रुक्षच, पण याला सत्य घटनांचे खूपच कौतुक असायचे–तसे पाहिलेत तर हा अगदीच वेगळा माणूस!

बाकीच्या गोष्टींविषयी म्हणाल, तर तुमचे लेख न्यू झीट [११] मध्ये येत असत त्या वेळी त्यांच्याविषयी जे मी पुन्हा पुन्हा म्हणालो त्याचीच मी पुनरुक्ती करू शकतो; तसे पाहिले तर प्रशियन राज्यसंस्थेच्या उगमाचे हे सध्या अस्तित्वात असलेले सर्वोत्तम विवरण आहे. खरे तर मी असे म्हणेन की हे एकमेव चांगले विवरण आहे, बहुतेक प्रकरणांच्या आन्तरसंबंधांचा बारीकसारीक तपशिलांसह त्यांत बिनचूक विकास करून दाखविलेला आहे. वाईट एवढेच वाटते की बिस्मार्कपर्यंतचा पुढचा सगळा विकास तुम्हाला यात समाविष्ट करता आलेला नाही, आणि पुढे केव्हा तरी तुम्ही कराल अशी आशा प्रदर्शित केल्यावाचून राहवत नाही, म्हणजे मग तुम्ही संपूर्ण सुसंगत चित्र इलेक्टर फ्रेडरिक विल्यमपासून ते थेट खाली वयोवृद्ध विल्यमपर्यंत * सादर कराल. कारण तुम्ही अगोदरच प्रास्ताविक तपासण्या केलेल्या आहेत आणि निदानपक्षी मुख्यत्वेकरून त्या जवळजवळ पूर्णच झालेल्या आहेत. हे लटपटते जुने झोपडे कोसळून पडायच्या अगोदर ही गोष्ट केव्हातरी कशीतरी करायला हवी. राजेशाही-देशाभिमानी दंतकथांचा निरास हा जरी वर्गीय वर्चस्व झाकून ठेवणारी राजेशाही बरखास्त करायची खरीखुरी आवश्यक पूर्वअट म्हणून नव्हता (कारण जर्मनीत शुद्ध भांडवदारी प्रजासत्ताक हे अस्तित्वात यायच्या अगोदरच घडामोडींनी कालबाह्य करून ठेवले आहे) तरी देखील या उद्दिष्टासाठी ही एक अत्यंत परिणामकारक तरफ म्हणून कामी येण्याजोगा आहे.

मग जर्मनीच्या सर्वसाधारण हालअपेष्टांचा एक भाग म्हणून प्रशियाच्या स्थानिक इतिहासाचे चित्रण करायला देखील तुम्हाला अधिक जागा व संधी मिळेल. हा मुद्दा असा आहे की इथे मी अधूनमधून तुमच्या मतापासून काहीसा दूर जातो, विशेषेकरून जर्मनीचे तुकडे होण्याच्या पूर्वअटींच्या संकल्पनेच्या बाबतीत आणि सोळाव्या शतकाच्या अवधीत जर्मनीत भांडवलदारी क्रान्ती का फसली याच्या संकल्पनेच्या बाबतीत. मी जर माझ्या पेझंट वॉर[१२] (शेतकरी युद्ध) या ग्रंथाच्या ऐतिहासिक प्रस्तावनेचे काम पुन्हा करायला घेतले आणि ते पुढच्या हिवाळ्यात करीन अशी आशा मी धरून आहे, तर तिथे हे मुद्दे मला विकसित करता येतील. तुम्ही जे दिग्दर्शित केलेले आहेत ते चुकीचे आहेत असे मला म्हणायचे नाही, पण त्यांच्या जोडीला मला इतर मुद्दे मांडायचे आहेत आणि काहीशा वेगळ्या प्रकारे मला त्यांचे गट बनवायचे आहेत.

जर्मन इतिहासाचा अभ्यास करताना—हा इतिहास म्हणजे कंगालपणाच्या सातत्याच्या अवस्थेची कथा आहे—मला असे नेहमी आढळून आले आहे की मिळत्याजुळत्या फ्रेंच कालखंडांशी तुलनाच केवळ प्रमाणांचा बिनचूक विचार निर्माण करते;

---

* पहिला विल्यम—संपादक

कारण तिथे जे घडते आहे ते आमच्या देशात घडत असल्याच्या नेमके उलट घडते आहे. तिथे सरंजामी राज्याच्या विस्कळित भागांतून एका राष्ट्रीय राज्याची स्थापना होते आणि नेमक्या त्याच वेळी आम्ही आमच्या सगळ्यात जास्त मोठ्या अधोगतीच्या कालखंडांतून जात आहोत. तिथे या प्रक्रियेच्या एकंदर ओघामध्ये एक दुर्मिळ वस्तुनिष्ठ तर्कसंगती आहे; तर आमच्या बाबतीत वाढता रुक्ष घरसोडपणा. तिथे, मध्य युगामध्ये उत्तरेकडील फ्रेंच राष्ट्रगटाच्या विरुद्ध इंग्रज विजेता प्रॉव्हेन्कल राष्ट्रगटाला अनुकूल असा हस्तक्षेप करतो आणि परकीय हस्तक्षेपाचे प्रतिनिधित्व करतो आणि इंग्लंडविरुद्ध चाललेली युद्धे ही एका परीने "तीस वर्षांचे युद्ध" ठरतात परंतु तिथे, या युद्धाची समाप्ति परकीय आक्रमकांच्या हकालपट्टीने आणि उत्तरेने दक्षिणेला आपल्या अंकित करण्याने होते. नंतर मध्यवर्ती सत्ता व मांडलिक बर्गंडी यांच्या दरम्यानचा लढा सुरू होतो. हा मांडलिक आपल्या परकीय मामलतींवर भिस्त ठेवतो आणि ब्रान्डेन्बुर्ग-प्रशियाची भूमिका बजावतो; तथापि या लढ्याच्या शेवटी मध्यवर्ती सत्तेचा विजय होतो आणि ती निर्णायकपणे राष्ट्रीय राज्य स्थापन करते, आणि नेमक्या त्याच क्षणी आमच्या देशात राष्ट्रीय राज्य संपूर्णपणे जमीनदोस्त होते. (म्हणजे ज्या अंशाने पवित्र रोमन साम्राज्याच्या अंतर्गत असलेले "जर्मन राजाचे राज्य" हे राष्ट्रीय राज्य म्हणता येईल त्या अंशाने), आणि जर्मन प्रदेशाची मोठ्या प्रमाणावरील लूट सुरू होते. ही तुलना जर्मनांच्या लेखी कमालीचा कमीपणा आणणारी आहे, परंतु नेमक्या त्याच कारणासाठी ती अधिक उद्बोधक आहे; आणि ज्या अर्थी आमच्या कामगारांनी जर्मनीला पुन्हा ऐतिहासिक चळवळीच्या अग्रभागी आणून ठेवले आहे, त्या अर्थी हा लाजिरवाणा भूतकाळ गिळून टाकणे आम्हाला काहीसे अधिक सोपे झाले आहे.

आणि एक विशेषेकरून ठळक असे जर्मनीच्या विकासाचे उपलक्षण म्हणजे ही वस्तुस्थिती आहे की ज्या दोन घटक राज्यांनी अखेरीस जर्मनीची आपसात वाटणी केली त्यांपैकी एकही शुद्ध जर्मन नव्हते -- दोन्हीही जिंकलेल्या स्लाव प्रदेशातील वसाहती होत्या. ऑस्ट्रिया ही बव्हेरियन वसाहत आणि ब्रॅन्डेनबर्ग ही सॅक्सन वसाहत– आणि त्यांनी जर्मनीच्या अंतर्गत सत्ता संपादन केली ती केवळ परकीय, बिन-जर्मन मामलतींच्या पाठिंब्यावर भिस्त ठेवून : ऑस्ट्रियाने हंगेरीच्या पाठिंब्यावर (बोहेमियाची गोष्टच सोडा) आणि ब्रॅन्डेनबर्गने प्रशियाच्या पाठिंब्यावर. पश्चिम सरहद्द ही मोठ्यात मोठ्या संकटात असलेली, तर तिथे असले काहीच घडले नाही; उत्तर सरहद्दीवर जर्मनीचे रक्षण डेन लोकांच्याविरुद्ध करायचे काम डेन लोकांच्याकडेच आले, आणि दक्षिणेकडे वाचविण्याजोगे इतके अल्प होते की सरहद्दीचे रखवालदार जे स्विस लोक त्यांनी जर्मनीपासून स्वतःला अलग करून घेण्यात देखील यश मिळविले!

पण मी सर्व प्रकारच्या फालतू गोष्टींविषयी बोलून राहिलोय. तुमच्या ग्रंथाने माझ्यावर केवढा उत्तेजनकारक प्रभाव पाडला आहे त्याचा पुरावा म्हणून तरी हे विषयान्तर तुमच्या कामी येवो.

पुन्हा एकदा हार्दिक धन्यवादपूर्वक अभिवादन करणारा

आपला,

एफ्. एन्गल्स

मार्क्स आणि एन्गल्स, निवडक पत्रव्यवहार,
मॉस्को, १९७५.
पृष्ठे ४३३-३७.

वर्गीय संबंध
आणि वर्गीय विचारसरणी

१

प्रत्येक कालखंडातील राज्यकर्त्या वर्गाचे विचार हे राज्यकर्ते विचार असतात : म्हणजे जो वर्ग समाजावर राज्य करणारी भौतिक शक्ती असतो, तोच वर्ग त्याच वेळी त्या समाजाची राज्यकर्ती बौद्धिक शक्ति असतो. ज्या वर्गाच्या ताब्यात भौतिक उत्पादनाची साधने असतात, तोच वर्ग परिणामतः बौद्धिक उत्पादनाच्या साधनांवर देखील नियंत्रण ठेवतो, म्हणजे बौद्धिक उत्पादनाच्या साधनांची उणीव असलेल्यांचे विचार एकंदरीने त्याच वर्गाच्या अंकित असतातः राज्यकर्ते विचार म्हणजे वरचढ भौतिक संबंधांची आदर्श अभिव्यक्ती असते, दुसरे-तिसरे अधिक काहीही नसते; विचार म्हणून ग्रहण केलेले वरचढ भौतिक संबंध; म्हणून जे संबंध एका वर्गाला राज्यकर्ता वर्ग बनवितात तेच संबंध त्याच्या वर्चस्वाचे विचार असतात. राज्यकर्त्या वर्गाचे घटक असलेल्या व्यक्तींच्या ठायी इतर गोष्टींच्या जोडीला जाणीव असते, आणि म्हणून त्या विचार करतात. म्हणून ज्या अंशाने त्या व्यक्ती वर्ग या नात्याने राज्य करतात आणि एखाद्या ऐतिहासिक कालखंडाची व्याप्ती व मर्यादा निश्चित करतात त्या अंशाने हे स्वयंसिद्ध आहे की त्या ही गोष्ट त्या कालखंडाच्या सबंध कक्षेमध्ये करतात, आणि म्हणून इतर गोष्टींच्या जोडीला त्या विचारवन्त म्हणूनही राज्य करतात, विचारांचे उत्पादक म्हणून राज्य करतात आणि आपल्या युगाच्या विचारांच्या उत्पादनाचे व वितरणाचे नियमन करतात : अशा प्रकारे त्यांचे विचार त्या कालखंडाचे राज्यकर्ते विचार असतात. उदाहरणार्थ, एखाद्या देशातील ज्या युगामध्ये जिथे राजाची सत्ता, सरदारमंडळ व भांडवलदार वर्चस्वासाठी झगडत आहेत आणि म्हणून जिथे वर्चस्वाची वाटणी झालेली आहे, तिथे सत्तेच्या विभागणीचा सिद्धान्त हा वरचढ विचार असल्याचे सिद्ध होते आणि तो " सनातन नियम " म्हणून व्यक्त करण्यात येतो.

आम्ही अगोदरच वर पाहिले आहे (पृष्ठे [१५-१६]) * तदनुसार आतापर्यंत श्रमविभागणी ही इतिहासाच्या प्रमुख शक्तींपैकी एक शक्ति असते आणि ती राज्यकर्त्या वर्गामध्ये देखील मानसिक व [३१] भौतिक श्रमाची विभागणी म्हणून

---

* पाहा, मार्क्स आणि एन्गल्स, संकलित ग्रंथ, खंड ५ वा, पृष्ठे ४४-४८--संपादक

स्वतःची अभिव्यक्ति करते, म्हणजे या वर्गाच्या अन्तर्गत एक भाग वर्गाचे विचारवन्त म्हणून पुढे येतो (हे विचारवन्त क्रियाशील कल्पक वैचारिकतानिष्ठ असतात, वर्गाच्या स्वतःविषयीच्या भ्रमाची निर्मिती हे ते स्वतःचे चरितार्थाचे प्रमुख साधन करतात, तर या विचारांविषयी व भ्रमांविषयी इतरांची वृत्ती अधिक निष्क्रिय व ग्रहणशील असते. कारण वस्तुतः ते या वर्गाचे क्रियाशील सदस्य असतात आणि त्यांना स्वतःविषयी भ्रम आणि विचार निर्माण करायला कमी वेळ असतो. या वर्गाच्या अन्तर्गत हे वेगळेपण काही प्रमाणात उभय भागांच्या दरम्यान विरोधाच्या व वैरभावाच्या स्वरूपात विकसित होण्याचा संभव असतो, परंतु जेव्हा जेव्हा खुद्द वर्गालाच धोका येईल असा व्यावहारिक संघर्ष उद्भवतो तेव्हा तेव्हा हे विरोध व वैरभाव आपोआप लुप्त होतात आणि तसे झाले म्हणजे राज्यकर्ते विचार हे राज्यकर्त्या वर्गाचे विचार नसल्याचा व या वर्गापासून वेगळी शक्ती त्या विचारांच्या ठायी असल्याचा देखावा देखील लुप्त होतो. विशिष्ट कालखंडामध्ये क्रान्तिकारक विचारांचे अस्तित्व हे क्रांतिकारक वर्गाचे अस्तित्व गृहीत धरून चालते; या दुसऱ्याच्या प्रमेयांविषयी पुरेसे विवेचन अगोदरच वर येऊन गेलेले आहे. (पृष्ठे [१८-१९, २२-२३]) *

आता इतिहासाच्या ओघाचा विचार करताना जर आपण राज्यकर्त्या वर्गाचे विचार खुद्द त्या राज्यकर्त्या वर्गापासून वेगळे काढून ठेवले आणि त्यांना स्वतंत्र अस्तित्व मिळवून दिले, जर हे अगर ते विचार विशिष्ट काळी प्रभावी होते येवढे म्हणण्यापुरतीच मर्यादा आपण आपल्याला घालून घेतली, आणि उत्पादनाची परिस्थिती आणि या विचारांचे उत्पादन यांच्याविषयी विचार करण्याचा शीण आपण आपल्या डोक्याला जर दिला नाही, अशा रीतीने आपण जर विचारांचा स्रोत अशा व्यक्ती व जागतिक परिस्थिती यांच्याकडे दुर्लक्ष केले, तर मग आपण उदाहरणार्थ असे म्हणू शकतो की सरदार लोक वरचढ होते त्या काळी इज्जत व निष्ठा इत्यादि संकल्पना वरचढ होत्या, भांडवलदार वरचढ असताना स्वातंत्र्य, समता वगैरे संकल्पना वरचढ असतात. खुद्द राज्यकर्ता वर्ग एकंदरीने असेच असल्याची कल्पना करून घेतो. इतिहासाची ही संकल्पना सगळ्या इतिहासकारांच्या बाबतीत, विशेषेकरून अठराव्या शतकापासून, समाइक आहे, आणि ती अवश्यमेव अशा घटिताला सामोरी जाईल की सतत अधिकाधिक अमूर्त विचार प्रभावी होतात, म्हणजे असे विचार की जे वाढत्या प्रमाणात वैश्विकतेचे रूप धारण करतात. कारण आपल्या अगोदर राज्य करत असलेल्या वर्गाची जागा स्वतः घेणारा प्रत्येक नवा वर्ग हा, केवळ आपले उद्दिष्ट अंमलात आणण्यासाठी आपला हितसंबंध हा समाजाच्या सगळ्या सदस्यांचा समाईक हितसंबंध आहे असे दाखविणे भाग पडते, म्हणजे आदर्श रूपात व्यक्त केलेला असा दाखविणे भाग पडते. त्याला आपल्या विचारांना वैश्विकतेचे रूप देणे भाग पडते,

---

* कित्ता पृष्ठे ४८-४९ आणि ५२—संपादक

आणि हेच तेवढे बुद्धिनिष्ठ, वैश्विकदृष्ट्या सत्य असे विचार म्हणून सादर करणे त्याला भाग पडते. क्रांती करणारा वर्ग हा सुरुवातीपासूनच जो पुढे सरसावतो तो एका वर्गाच्या विरोधात असतो तो वर्ग म्हणून नव्हे तर एका राज्यकर्त्या वर्गाच्या * विरोधात असलेल्या संबंध समाजाचा प्रतिनिधी म्हणून, समाजाचा एकत्र समुदाय म्हणून, त्याला हे करता येते; कारण सुरुवातीला त्याचे हित अजून खरोखरीच इतर सगळ्या बिन-राज्यकर्त्या वर्गांच्या समाईक हिताशी बहुतांशी संबंधित असते, कारण आतापर्यंत अस्तित्वात असलेल्या परिस्थितीच्या दडपणामुळे त्याच्या हिताला अजून विशिष्ट वर्गाचे विशिष्ट हित म्हणून विकसित होता आलेले नसते. म्हणून त्याचा विजय हा अजून वरचढ भूमिका जिंकून न घेणाऱ्या इतर वर्गांच्या अनेक व्यक्तींचा देखील फायदा करून देतो, परंतु ज्या अंशाने या व्यक्तींना राज्यकर्त्या वर्गात स्वतःची बढती करून घ्यायला हा वर्ग आता समर्थ करतो त्याच अंशाने. फ्रेंच भांडवलदारांनी सरदारांची राजवट उलथून पाडली त्या वेळी याच्या योगाने त्यांनी अनेक कामगार-वर्गीयांना कामगारवर्गाच्या वरच्या पातळीवर आपली बढती करून घेणे शक्य करून ठेवले, परंतु ज्या अंशाने ते भांडवलदार झाले त्याच अंशाने. म्हणून प्रत्येक नवा वर्ग हा अगोदर राज्यकर्ता असलेल्या वर्गाच्या पेक्षा अधिक विस्तृत पायावर वर्चस्व साध्य करतो; उलटपक्षी मग नव्या राज्यकर्त्या वर्गाला बिन-राज्यकर्त्या वर्गाचा विरोध खूपच अधिक धारदारपणाने व सखोलपणाने विकसित होतो या दोन्ही गोष्टी जी वस्तुस्थिती निश्चित करतात ती म्हणजे ही की या नव्या राज्यकर्त्या वर्गाविरुद्ध जो लढा करायचा असतो तो, त्याच्या परीने, पूर्वी राज्य करायला हवे असलेल्या सगळ्या अगोदरच्या वर्गांना साधता येत होता त्यापेक्षा पूर्वीच्या परिस्थितीचा अधिक निश्चित व आमूलाग्र नाश साधायचे उद्दिष्ट आपल्यापुढे ठेवतो.

हा एकंदर देखावा, म्हणजे विशिष्ट वर्गाची राजवट ही केवळ विशिष्ट विचारांची राजवट असते हा देखावा, ज्या क्षणी सर्वसाधारणपणे वर्गीय राजवट ज्या स्वरूपात समाज संघटित झालेला आहे त्या स्वरूपात राहिलेली नसते, म्हणजेच विशिष्ट हित हे सर्वसाधारण हित म्हणून किंवा 'सर्वसाधारण हित' हे राज्यकर्ते म्हणून दाखविणे अतःपर आवश्यक नसते, त्या क्षणी स्वाभाविक समाप्ति पावतो.

कार्ल मार्क्स आणि फ्रेडरिक एन्गल्स,
जर्मन आयडियॉलॉजी (जर्मन विचारसरणी)
मार्क्स आणि एन्गल्स, संकलित ग्रंथ, खंड ५ वा,
मॉस्को, १९७६, पृष्ठे ५९-६१

---

* [मार्क्सने मार्जिनमध्ये लिहिलेली टीप:] (वैश्विकता म्हणजे १. वर्ग-विरुद्ध इस्टेट, २. स्पर्धा, जागतिक व्यवहार, इत्यादि ३. राज्यकर्त्या वर्गाचे मोठे संख्याबळ, ४. समाइक हितसंबंधांचा भ्रम; सुरुवातीला हा भ्रम खरा असतो, ५. विचारसरणीनिष्ठांचा चुकीचा समज आणि श्रमविभागणी.)

२

माणसाचे विचार, मते व संकल्पना, एका शब्दात सांगायचे म्हणजे माणसाची जाणीव ही त्याच्या भौतिक अस्तित्वाच्या परिस्थितीतील. त्याच्या सामाजिक संबंधांतील आणि त्याच्या सामाजिक जीवनातील प्रत्येक बदलाबरोबर बदलते हे आकलन व्हायला सखोल उपजत बुद्धीची जरूरी असते काय?

भौतिक उत्पादन ज्या प्रमाणात बदलते त्या प्रमाणात बौद्धिक उत्पादन आपले स्वरूप बदलते, याखेरीज विचारांचा इतिहास अन्य काय सिद्ध करतो? प्रत्येक ढंगाचे राज्यकर्ते विचार हे त्याच्या राज्यकर्त्यावर्गाचेच विचार होऊन राहिलेले आहेत.

समाजात क्रान्ती घडवून आणणाऱ्या विचारांविषयी लोक जेव्हा बोलतात तेव्हा ते फक्त हीच सत्य गोष्ट व्यक्त करतात की जुन्या समाजाच्या उदरात नव्या समाजाचे घटक निर्माण झालेले आहेत, आणि जुन्या विचारांचे विघटन हे अस्तित्वाच्या जुन्या परिस्थितीच्या विघटनाच्या बरोबरीने वाटचाल करत असते.

प्राचीन जग जेव्हा शेवटचे आचके देत होते, तेव्हा प्राचीन धर्मांवर ख्रिस्ती धर्माने मात केली. अठराव्या शतकामध्ये बुद्धिवादी विचारांपुढे ख्रिस्ती विचार हतबल झाले. त्या वेळी सरंजामी समाजाने त्या वेळच्या क्रान्तिकारक भांडवलदारांशी आपली मरणकाळची लढाई दिली. धार्मिक स्वातंत्र्य आणि सदसद्विवेकबुद्धीचे स्वातंत्र्य हे विचार म्हणजे ज्ञानाच्या राज्यातील खुल्या स्पर्धेच्या वर्चस्वाचे केवळ व्यक्त स्वरूप होते.

असे म्हणता येईल, की "ऐतिहासिक विकासाच्या ओघात धार्मिक, नैतिक, तत्त्वज्ञानात्मक, कायदेविषयक विचारांना मुरड पडली आहे हे निःसंशय. परंतु धर्म, नीती, तत्त्वज्ञान, राज्यशास्त्र आणि कायदा हे या बदलातून सतत टिकून राहिले."

"याच्या भरीला चिरंतन सत्ये आहेत, म्हणजे स्वातंत्र्य, न्याय, वगैरे ती समाजाच्या सगळ्या राज्यांना समाईक आहेत. परंतु कम्युनिझम चिरंतन सत्ये नष्ट करतो, तो सगळा धर्म नष्ट करतो, सगळी नीति नष्ट करतो, नव्या पायावर त्यांची रचना करायच्या ऐवजी तो त्यांना नष्टच करतो; म्हणून सगळ्या मागच्या ऐतिहासिक अनुभवाच्या विरोधात त्याचे हे वर्तन असते."

या आरोपाचे सार कशात साठवलेले आहे? सगळ्या जुन्या समाजाचा इतिहास हा वर्गसंघर्षांच्या विकासाचा इतिहास आहे, या संघर्षांनी वेगवेगळ्या युगांमध्ये वेगवेगळी रूपे धारण केली आहेत.

परंतु त्यांनी कोणतेही रूप धारण केलेले असले तरी एक सत्य घटना सगळ्या मागच्या युगांच्या बाबतीत समाइक आहे, ती म्हणजे समाजाच्या एका भागाचे दुसऱ्या भागाकडून शोषण. मग मागच्या युगांची सामाजिक जाणीव, जरी ती सगळ्या बहुविध

रूपांमध्ये आपले प्रदर्शन करीत असली तरी, काही विशिष्ट समाइक रूपांमध्ये किंवा सर्वसाधारण विचारांमध्ये वावरत असते आणि वर्गीय संघर्ष संपूर्णपणे नाहीसे झाल्या-खेरीज ती पूर्णपणे लुप्त होऊ शकत नाही यात नवल काहीच नाही.

कम्युनिस्ट क्रांती ही पारंपरिक मालमत्ताविषयक संबंधांशी अत्यंत आमूलाग्र स्वरूपात फटकून राहते; मग तिच्या विकासामध्ये पारंपरिक विचारांशी अत्यंत आमूलाग्र फटकून राहणे अनुस्यूत असते यात नवल काहीच नाही.

कार्ल मार्क्स आणि फ्रेडरिक एन्गल्स,
कम्युनिस्ट पक्षाचा जाहीरनामा

मार्क्स आणि एन्गल्स, संकलित ग्रंथ,
खंड ६ वा, मॉस्को, १९७६,
पृष्ठे ५०३-०४

वर्गीय विचारसरणीच्या शास्त्रीय आणि रासवट संकल्पना

एन्गल्स यांचे पॉल अर्न्स्ट यांस पत्र [१४]

लंडन, तारीख ५ जून १८९०

[मसुदा]

प्रिय महाशय,

दुर्दैवाची गोष्ट अशी की हेर बाहर यांच्याविरुद्ध उपयोग करण्यासाठी तुमच्या इच्छेला मान देऊन तुम्हाला पत्र लिहिणे मला जमणार नाही. त्यांतून त्यांच्याशी उघड वाद घालण्यात मी गुंतेन आणि त्यात माझा भलताच वेळ जाईल. म्हणून निव्वळ तुमच्या स्वतःच्या खासगी माहितीसाठी मी हे लिहितोय.

याच्या भरीला, तुम्ही जिला उत्तरेकडील महिलांची चळवळ म्हणता तिची मला अजिबात माहिती नाही; मला इब्सेनच्या फक्त थोड्याच नाटकांचा परिचय आहे आणि भांडवलदारी व मध्यमवर्गीय पुढे पुढे करणाऱ्या महिलांच्या कमी-अधिक पिसाट जाग्रणांबद्दल इब्सेनला जबाबदार धरता येईल का व किती प्रमाणात जबाबदार धरता येईल याची मला काडीइतकीही कल्पना नाही.

महिलांचा प्रश्न हे नाव मिळालेला विषय येवढा विस्तृत आहे की एका पत्रात काहीही सर्वांगपरिपूर्ण किंवहुना समाधानकारक असे त्याच्याविषयी लिहिणे अशक्य आहे. फक्त एक गोष्ट मात्र नक्कीःबाहर दावा करतोय तसे मार्क्सला कधीही "बागता" आले नसते. तो इतका बावळट नव्हता.

या प्रकरणाचा भौतिकवादी दृष्टिकोनातून विचार करायच्या तुमच्या प्रयत्नाविषयी म्हणाल तर मला प्रथमतः हे सांगणे भाग आहे की भौतिकवादी पद्धती हे इतिहासाच्या अभ्यासातील आपले मार्गदर्शक तत्त्व म्हणून न घेता आपल्याला सोइस्कर अशा रीतीने ऐतिहासिक सत्य घटनांना आकार द्यायचा तयार साचा म्हणून तिचा वापर

केल्यास तिला नेमके उलटे रूप मिळाले. आणि बाह्र महाशयांना जर असे वाटत असेल की तुम्हाला ह्या चुकीच्या पद्धतीचा अवलंब करताना आपण तुम्हाला पकडले आहे, तर त्यांचे हे कारण अगदीच चुकीचे नाही असे मला वाटते.

तुम्ही सगळ्या नॉर्वे देशाला आणि तिथे घडत असलेल्या सगळ्या गोष्टींना एकाच कक्षेत घालता; म्हणजे तुच्छता वृत्ती, आणि मग तुम्ही बिनदिक्कतपणे या नॉर्वेजियन तुच्छता वृत्तीच्या अंगी तुमच्या मते जर्मन तुच्छता वृत्तीचे वैशिष्ट्य असलेले गुण चिकटविता. परंतु इथे दोन सत्य घटना मार्गात आड येतात.

पहिली गोष्ट म्हणजे साऱ्या युरोपखंडभर नेपोलियनवर मिळविलेला विजय हा प्रतिगाम्यांनी क्रान्तीवर मिळविलेला विजय ठरला, आणि क्रान्तीची जन्मभूमी जो फ्रान्स, तेथे मात्र पूर्वपदावर आलेल्या कायदेशीर राजवटीपासून उदारमतवादी भांडवलदारी राज्यघटना हिसकावून घेण्याइतका पुरेसा धाक या राजवटीला घालायची स्फूर्ती क्रान्तीने अजूनही दिली, आणि अशा वेळी समकालीन युरोपातील अन्य कोणत्याही राज्यघटनेपेक्षा कितीतरी अधिक लोकशाहीप्रवण राज्यघटना हस्तगत करणे शक्य असल्याचे नॉर्वेला आढळून आले.

दुसरी गोष्ट म्हणजे नॉर्वेला गेल्या वीस वर्षांमध्ये जे साहित्यिक उधाण अनुभवायला मिळालेले आहे त्याला या कालखंडातील रशियाखेरीज अन्य कोणत्याही देशात तुलनाच नाही. हे लोक तुच्छतावादी असोत वा नसोत, परंतु या लोकांनी इतरांपेक्षा कितीतरी अधिक साध्य केलेले आहे आणि इतर साहित्यांवरदेखील आपला ठसा उमटवून ठेवला आहे; तसेच त्यांनी जर्मन साहित्यावर आपला प्रभाव नक्कीच पाडला आहे.

माझ्या मते या सत्य घटना नॉर्वेजियन तुच्छतावादाच्या खास उपलक्षणांची काही प्रमाणात तपासणी करणे आवश्यक करून ठेवतात.

आणि इथे बराच भरीव फरक असल्याचे बहुधा तुम्हाला आढळून येईल. जर्मनीमध्ये तुच्छतावाद हा फसलेल्या क्रान्तीचा परिपाक आहे, खंडित, दडपल्या गेलेल्या विकासाचा परिपाक आहे. भेकडपणा, संकुचित मनोवृत्ती, असहायता आणि पुढाकार घेण्याची अपात्रता—हे खास, अनैसर्गिकरीत्या विकसित झालेले जर्मन तुच्छतावादाचे गुणविशेष आहेत आणि तीस वर्षांच्या युद्धाचा आणि त्यानंतरच्या कालखंडाचा हा परिपाक आहे, आणि जवळ जवळ इतर सगळ्याच महान जनतांच्या शीघ्र प्रगतीचा नेमका हाच कालखंड होता. जर्मनी पुन्हा ऐतिहासिक चळवळीत झोकला गेला तरी जर्मन तुच्छतावादाने आपली ही वैशिष्ट्यपूर्ण उपलक्षणे तशीच टिकवून ठेवली. एक सर्वसाधारण जर्मन नमुना म्हणून जर्मन समाजाच्या इतर सगळ्या वर्गांवर आपला कमी अधिक ठसा उमटविण्याइतकी ती पुरेशी भक्कम होती आणि शेवटी आमचा कामगारवर्ग या संकुचित मर्यादा तोडून बाहेर पडला तोपर्यंत हे असेच

चालू होते. जर्मन कामगारांचा बिन-देशाभिमान [१५] ज्या वस्तुस्थितीने अत्यंत आवेशाने व्यक्त केला आहे ती वस्तुस्थिती म्हणजे ही की त्यांनी सगळी जर्मन तुच्छतावादी संकुचित मनोवृत्ती दूर भिरकावून दिली आहे.

म्हणून जर्मन तुच्छतावाद हे नेहमीचे ऐतिहासिक पर्व नसून आत्यंतिक विडंबन आहे, हा अधोगतीचा प्रकार आहे; जसा पोलिश ज्यू हा ज्यू जातीचे विडंबन असतो तसा. इंग्रज, फ्रेंच वगैरे मध्यमवर्गीय हे जर्मन मध्यमवर्गीयाच्या पातळीवरचे मुळीच नाहीत.

उलटपक्षी नॉर्वेमध्ये छोटा शेतकरीवर्ग आणि मध्यमवर्ग, त्यांत थोडेसे वरच्या मध्यमवर्गाचे मिश्रण असलेला—जसा इंग्लंड व फ्रान्समध्ये सतराव्या शतकात अस्तित्वात होता तसा— यांची मिळून कित्येक शतके समाजाची नेहमीची अवस्था आहे. एखादी अयशस्वी महान चळवळ इथे मुळीच नव्हती, किंवा देशाला जबरदस्तीने जुन्या काळात मागे रेटणारे तीस वर्षांचे युद्धही नव्हते. हा देश मागे रेंगाळत राहिला तो याच्या अलग पडण्याने व नैसर्गिक परिस्थितीमुळे; पण देशातले व्यवहार त्याच्या उत्पादनाच्या परिस्थितीशी पूर्णपणे मिळतेजुळते असेच होते आणि म्हणून ते नेहमीचे राहिलेले होते. फक्त अगदी अलीकडे आधुनिक उद्योगधंद्याचा काही अंश विस्कळीतपणे या देशात आलेला आहे, परंतु भांडवलाच्या केन्द्रीकरणाची जास्तीत जास्त सामर्थ्यशाली तरफ असा जो शेअर बाजार, त्याला इथे मुळीच वाव नाही, आणि दर्यावर्दी व्यापाराचा प्रचंड विस्तार हाच नेमका सनातनी प्रभाव पाडत आहे. कारण इतरत्र सर्वभर शिडाच्या जहाजांची जागा आगबोटी घेत असल्या तरी नॉर्वे आपल्या शिडाच्या जहाजांचे आरमार प्रचंड प्रमाणात वाढवत आहे आणि ते जगातले सगळ्यात जास्त मोठे नसले तरी जगातले दुसऱ्या नंबरचे, सगळ्यात जास्त मोठे शिडाच्या जहाजांचे आरमार नक्कीच झालेले आहे. हे आरमार म्हणजे बहुतांशी छोट्या व मध्यम जहाज-मालकांची मालमत्ता आहे आणि १७२० च्या सुमारास म्हणा जशी इंग्लंडची अवस्था होती तशी ही अवस्था आहे. असे असूनही याने जुन्या कुंठित जीवनामध्ये गति आणलेली आहे आणि या गतीला साहित्याला बहर येण्यामध्ये देखील व्यक्त स्वरूप प्राप्त होत आहे.

नॉर्वेजियन शेतकरी हा भूदास कधीही नव्हता. आणि याच्या योगाने एकंदर विकासाला सर्वस्वी वेगळी अशी पार्श्वभूमी उपलब्ध होत आहे आणि ही एका परीने कॅस्टीलमधील पार्श्वभूमीसारखी आहे. नॉर्वेजियन मध्यमवर्गीय हा स्वतंत्र शेतकऱ्याचा पुत्र आहे आणि या परिस्थितीत अधोगतीला गेलेल्या जर्मन तुच्छतावाद्याच्या तुलनेत तो माणूस आहे. तशाच प्रकारे कनिष्ठ मध्यमवर्गीय नॉर्वेजियन स्त्री ही जर्मन तुच्छतावाद्याच्या पत्नीच्या मानाने आकाशाइतक्या उच्च पातळीवर उभी आहे. आणि, उदाहरणार्थ, इब्सेनच्या नाटकांमध्ये काहीही उणीवा असल्या तरी त्यांच्यामध्ये

कनिष्ठ व मध्यम भांडवलदारांच्या जगाचे प्रतिबिंब आहे हे खरेच आहे, परंतु हे जग आणि जर्मनीतील परिस्थिती यांच्या दरम्यान प्रचंड फरक आहे. इब्सेनच्या नाटकांमध्ये अशा जगाचे प्रतिबिंब आहे की ज्यामध्ये लोकांच्या ठायी अजूनही दानतीचे सामर्थ्य आहे आणि पुढाकार आहे, आणि स्वतंत्रपणे कृति करायची कुवत आहे. मात्र इतर देशांमध्ये रूढ असलेल्या संकल्पनांनुसार त्यांच्या कृती अनेकदा विचित्र दिसायचा संभव असतो. अंतिम निर्णय देण्यापूर्वी मी असल्या गोष्टींचा कसून अभ्यास करणे अधिक पसंत करतो.

उपरिनिर्दिष्ट विषयाकडे, म्हणजे हेर बार्ह यांच्याकडे पुन्हा परत वळू या. जर्मनीतील लोक एकमेकांचा एवढ्या भयंकर गंभीरपणाने विचार करतात याचेच मला आश्चर्य वाटते. हास्यविनोदाला कधी नव्हती त्याहून अधिक बंदी असलेली दिसते आणि कंटाळवाणेपणा हे नागरी कर्तव्य असल्याचे दिसते. नाहीतर तुम्ही "ऐतिहासिकदृष्ट्या विकसित" अशा सगळ्या गोष्टींची उणीव असलेल्या हेर बार्ह याच्या "स्त्री" ची अधिक बारकाईने नक्कीच छाननी केली असती. तिची त्वचा ऐतिहासिकदृष्ट्या विकसित आहे, कारण ती एकतर गोरी किंवा काळी, पिवळी पिंगट किंवा लाल असली पाहिजे—म्हणून तिला मानवी त्वचा असू शकत नाही. तिचे केस ऐतिहासिकदृष्ट्या विकसित आहेत, मग ते भुरभुरते व लोकरीसारखे असोत किंवा कुरळे अथवा सरळ असोत, रंगाने काळे, लाल किंवा भुरे असोत. अशा प्रकारे मानवी केस तिला वर्ज्य आहेत. मग ऐतिहासिकदृष्ट्या विकसित अशी त्वचा व केस आणि "खुद्द ती स्त्री दिसते" हे सगळे काढून घेतल्यावर शिल्लक काय राहिले? काय उदयास येते? नुसते माकड, आन्थ्रोपोपिथेकस; आणि हेर बार्ह ही "अगदी संभाव्य व पारदर्शक" स्त्री हिच्या "नैसर्गिक उपजत गुणांसकट" खुशाल आपल्या बिछान्यात घेऊ देत.

मार्क्स-एन्गल्स, वेर्के, खंड ३७ वा, १९६७,
पृष्ठे ४११-१३

ऐतिहासिक सातत्य आणि त्याचे अन्तर्विरोध

१

एखाद्या वस्तीत उत्क्रांत झालेल्या उत्पादक शक्ती, विशेषेकरून नवे शोध, नंतरच्या विकासासाठी निकामी ठरतात किंवा नाही हे व्यवहाराच्या विस्तारावर निव्वळ अवलंबून असते. अगदी नजीकच्या शेजारापलीकडे जाणारा असा कसलाही व्यवहार मुळी अस्तित्वांतच नसतो, तोपर्यंत प्रत्येक नवा शोध प्रत्येक वस्तीत अलगपणे लावावा लागतो आणि रानटी लोकांचे उद्रेक यांजसारखे केवळ योगायोग, तसेच साधी युद्धे देखील पुढारलेल्या उत्पादक शक्ती व गरजा असलेल्या देशाला सुरुवातीपासून पुन्हा सगळ्या गोष्टी नव्याने करायला भाग पाडायला पुरेसे कारण ठरतात. अतिप्राचीन इतिहासात प्रत्येक नवा शोध रोजच्या रोज नव्याने लावावा लागत होता आणि प्रत्येक वस्तीत स्वतंत्रपणे लावावा लागत होता. सापेक्षदृष्ट्या फारच विस्तृत व्यापार असताना देखील उच्च विकसित उत्पादक शक्ती संपूर्ण विनाशापासून सुरक्षित राहात नाहीत हे फोएनीशियन्सनी सिद्ध केले आहे. या राष्ट्राची व्यापारातून हकालपट्टी होण्याच्या द्वारा, अलेक्झांडरने जिंकल्याच्या द्वारा आणि परिणामतः याचा ऱ्हास होण्याच्या द्वारा, याचे नवे शोध बहुतांशी नंतरचा दीर्घकाळ नष्टच झाले होते. तसाच प्रकार, उदाहरणार्थ, मध्ययुगांतील काचेवर नक्षीकाम करायच्या कलेचा. व्यवहार हा जागतिक व्यवहार झाल्यानंतर मगच आणि मोठ्या प्रमाणावर उद्योगधंदा हा त्याचा आधार झाल्यानंतर मगच. आणि सगळी राष्ट्रे स्पर्धात्मक संघर्षामध्ये खेचली गेल्यानंतर मगच. संपादित उत्पादक शक्तींच्या कायमपणाची पक्की तरतूद केली जाते.

कार्ल मार्क्स आणि फ्रेडरिक एन्गल्स,
दि जर्मन आयडियॉलॉजी
मार्क्स आणि एन्गल्स, संकलित ग्रंथ,
खंड ५वा, मॉस्को, १९७६. पृष्ठ ६७.

२

माणसे स्वतःचा इतिहास स्वतः घडवतात, परंतु आपल्या मनाला येईल तसा तो घडवत नसतात, स्वतः पसंत केलेल्या परिस्थितीत तो घडवत नसतात, तर मागच्या काळातून थेट समोर आलेल्या, सादर झालेल्या आणि संक्रान्त झालेल्या परिस्थितीत तो घडवत असतात. सगळ्या मृत पिढ्यांची परंपरा रात्रीच्या एखाद्या भयंकर स्वप्नासारखी हयात लोकांच्या मेंदूमध्ये थैमान घालत असते. आणि नेमक्या ज्या वेळी माणसे स्वतःमध्ये व वस्तूंमध्ये क्रांति घडवून आणण्यात, पूर्वी कधीही अस्तित्वात नसलेले असे काहीतरी निर्माण करण्यात गुंतलेली असल्याचे दिसते; नेमक्या अशाच क्रांतिकारक अरिष्टाच्या कालखंडांमध्ये माणसे काळजीपूर्वक जुन्या काळाच्या मृतात्म्यांना जागृत करून त्यांना आपल्या सेवेला लावतात, आणि जागतिक इतिहासाचा नवा देखावा या कालमान्य सोंगाच्या रूपामध्ये व या उसन्या भाषेमध्ये सादर करण्यासाठी त्या मृतात्म्यांच्याकडून त्यांची नावे, लढाईच्या घोषणा आणि पोशाख उसने घेतात. अशा प्रकारे लूथरने ॲपॉस्तल पॉल याचा मुखवटा घातला, १७८९ ते १८१४ च्या क्रांतीने आलटून पालटून रोमन प्रजासत्ताकाचे व रोमन साम्राज्याचे सोंग सजविले आणि १८४८ च्या क्रांतीला एकदा १७८९ चे तर एकदा १७९३ ते १७९५ च्या क्रांतिकारक परंपरांचे विडंबन करण्यापलीकडे अधिक चांगले काही ठाऊकच नव्हते. अशाच रीतीने एखादा नवीन भाषा शिकलेला नवशिका आपल्या मातृभाषेत तिचे भाषांतर नेहमीच करून घेतो; परंतु तो जुन्याची आठवण न करता आणि नव्याच्या वापरामध्ये आपली मातृभाषा विसरतो तेव्हाच त्याने नव्या भाषेचे रहस्य आत्मसात केलेले असते व तीत आपले विचार तो मोकळेपणाने व्यक्त करू शकतो.

जागतिक इतिहासाचे हे मृतात्मे जिवंत करण्याचा जो विचार असतो तो लगेच एक ठळक फरक उघड करून दाखवितो. कॅमील देस्मौलिन्स, डान्टन, रॉबस्पियर, सेंट-जस्ट, नेपोलियन, जुन्या फ्रेंच राज्यक्रांतीचे वीरपुरुष तसेच पक्ष आणि बहुजन-समाज यांनी आपल्या काळातली कामगिरी रोमन पोशाख अंगात घालून आणि रोमन शब्दप्रयोगांनिशी बजाविली; ही कामगिरी म्हणजे आधुनिक भांडवलदारी समाजाला शृंखलांतून मुक्त करणे व त्याची उभारणी करणे ही होती. पहिल्यांनी सरंजामी पाया मोडून त्याचे तुकडे तुकडे केले आणि त्या पायावर वाढलेली सरंजामी मुंडकी कापून काढली. दुसऱ्याने फ्रान्सच्या अन्तर्गत अशी परिस्थिती निर्माण केली की जीमध्ये केवळ खुली स्पर्धाच विकसित करता येत होती; वाटून दिलेली जमिनीची मालमत्ता विकाऊ करता येत होती आणि राष्ट्राची शृंखलामुक्त औद्योगिक उत्पादक शक्ती कामी आणता येत होती, आणि फ्रेंच सरहद्दींच्या पलीकडे त्याने सर्वत्र सरंजामी संस्थांचा नायनाट केला तो ज्या अंशाने युरोपखंडामध्ये फ्रान्समधील भांडवलदारी समाजाला सोईस्कर व अद्ययावत् वातावरण उपलब्ध करून देणे आव-

श्यक होते त्या अंशाने. नवी सामाजिक रचना एकदा प्रस्थापित झाल्यावर कालबाह्य कल्पॉसी नष्ट झाले आणि त्यांच्या समवेत तो पुनरुज्जीवित रोमनपणाही नष्ट झाला– ते ब्रूटस, ते ग्रॅच्ची, ते पब्लिकोला,[१६] ते ट्रिब्यून्स, ते सेनेटर्स आणि खुद्द सीझर देखील– हे सगळेच नष्ट झाले. भांडवलदारी समाजाने आपल्या समंजस वास्तवतेनिशी आपले खरे भाष्यकार व प्रवक्ते जन्माला घातले होते ते म्हणजे सेज, कौसिन्स, रोयेस्कोलार्द्स, बेंजामिन कॉन्सन्स आणि गुइझोज; त्याचे खरे लष्करी नेते आपापल्या कचेऱ्यांतल्या टेबलांशी बसले आणि डुक्करतोंड्या अठरावा लुई हा त्यांचा राजकीय प्रमुख होता. संपत्तीचे उत्पादन करण्यात आणि शान्ततापूर्ण स्पर्धात्मक संघर्षामध्ये संपूर्णपणे गढून गेलेल्या या समाजाला आपल्या जन्मकाळी आपल्या पाळण्यावर रोमन काळातील भुतांनी पाहरा केलेला होता याची अतःपर जाण राहिलेली नाही. परंतु भांडवलदारी समाज जरी शौर्यशून्य असला तरी देखील त्याला जन्माला आणण्यासाठी शौर्य, त्याग, दहशत, यादवी युद्ध आणि जनतेच्या लढाया यांची जरूरी लागलीच. आणि आपल्या संघर्षांच्या आशयाच्या भांडवलदारी मर्यादा स्वतः-पासून लपवून ठेवण्यासाठी आणि महान ऐतिहासिक शोकान्तिकेच्या उच्च पातळीवर आपला उत्साह टिकवून ठेवण्यासाठी आपल्याला हवी असलेली ध्येये व कलेचे प्रकार, आत्मवंचना, या गोष्टी रोमन प्रजासत्ताकाच्या अभिजात रुक्ष परंपरांमध्ये या समाजाच्या गुलाम लढवय्यांना सापडल्या. तशाच प्रकारे विकासाच्या आणखी एका टप्प्यावर, एक शतक अगोदर, क्रॉम्वेलने आणि इंग्रज जनतेने आपल्या भांडवलदारी क्रान्तीसाठी बायबलच्या जुन्या करारातील भाषा, आवेश आणि भ्रम उसने घेतलेले होते. खरे उद्दिष्ट साध्य झाल्यानंतर, इंग्रज समाजाचे भांडवलदारी परिवर्तन पूर्ण झाल्यानंतर तत्त्वज्ञ लॉकने बायबलमधल्या हाबाक्कुकला बाजूला सारले.

अशा प्रकारे त्या क्रान्त्यांमध्ये मृतात्म्यांना जाग आणण्याचा उपयोग नव्या संघर्षांचा गौरव करण्याच्या उद्दिष्टाच्या कामी आला, जुन्याचे विडंबन करण्याच्या उद्दिष्टासाठी नव्हे; अंगिकारलेली कामगिरी कल्पनेने भव्य करण्याच्या कामी आला, वास्तवांत तिच्या सोडवणुकीपासून पळ काढण्याच्या कामी नव्हे; क्रांतीचा बाणा पुन्हा एकदा शोधून काढण्याच्या कामी आला, तिच्या भुताला पुन्हा धिंगाणा घालायला लावण्यासाठी नव्हे.

कार्ल मार्क्स, लुई बोनापार्टचे
अठरावे ब्रुमेयर

मार्क्स आणि एन्गल्स, संकलित ग्रंथ,
खंड १ ला, मॉस्को, १९७३, पृष्ठे ३९८–९९

ऐतिहासिक विकासाचे असलग स्वरूप आणि कलेच्या समस्या

६. भौतिक उत्पादनाचा असमान विकास आणि, उदाहरणार्थ, कलेचा असमान विकास. प्रगतीची संकल्पना एकंदरीने नेहमीच्या अमूर्त स्वरूपात समजायची नाही. आधुनिक कला, वगैरे. व्यावहारिक सामाजिक संबंधांच्या अन्तर्गत, म्हणजे, उदाहरणार्थ, शिक्षणामध्ये हा प्रमाणशून्यपणा जेवढा महत्त्वाचा व आकलन करायला कठीण असतो, तेवढा हा नसतो. अमेरिकेचे युरोपशी संबंध. तथापि इथे चर्चेला घ्यायचा खराखुरा कठीण मुद्दा म्हणजे उत्पादनाचे संबंध हे कायदेशीर संबंध या नात्याने या असलग विकासात कसा भाग घेतात. उदाहरणार्थ, रोमन मुलकी कायद्याचा (ही गोष्ट अधिक लहान प्रमाणात फौजदारी व राज्यघटनात्मक कायद्याला लागू असते) आधुनिक उत्पादनाशी संबंध.

७. ही संकल्पना म्हणजे अपरिहार्य विकास असल्याचे दिसते. परंतु योगायोगाचे समर्थन. कसे? (स्वातंत्र्य, वगैरे, देखील) (दळणवळणाच्या साधनांचा प्रभाव. जागतिक इतिहास नेहमीच अस्तित्वात नव्हता; इतिहास ही जागतिक इतिहास या नात्याने फलश्रुति आहे.)

८. प्रारंभबिन्दु हा अर्थातच नैसर्गिकरीत्या निश्चित असे घटकच; आत्मनिष्ठ व वस्तुनिष्ठ असे दोन्हीही. जमाती, वंश, वगैरे.

कलेविषयी म्हणाल, तर तिच्या काही शिखरांचा मेळ समाजाच्या सर्वसाधारण विकासाशी अजिबात बसत नसतो हे सर्वश्रुत आहे; म्हणून त्यांचा मेळ भौतिक वरच्या इमल्याशी म्हणजे जणु काय त्याच्या संघटनेच्या सांगाड्याशी देखील बसत नाही. उदाहरणार्थ, आधुनिक (राष्ट्रांच्या) तुलनेत ग्रीक लोक, तसे पाहिले तर शेक्स्पियर. हे देखील मान्य करण्यात आले आहे की कलेच्या काही शाखा उदाहरणार्थ, महाकाव्ये ही कलात्मक उत्पादन सुरू झाल्यानंतर त्यांच्या युगप्रवर्तक अभिजात स्वरूपात अतःपर निर्माण करताच येत नाहीत; दुसऱ्या शब्दात

सांगायचे म्हणजे कलेच्या कक्षेतील काही महत्त्वाच्या निर्मिती या कलेच्या विकासातील आरंभीच्या टप्प्यांवरच केवळ शक्य असतात. खुद्द कलेच्या कक्षेतील कलेच्या विविध शाखांच्या बाबतीत जर असा प्रकार असेल तर कलेच्या एकंदर क्षेत्रासंबंधात आणि समाजाच्या सर्वसाधारण विकासाशी तिच्या संबंधाबाबत देखील असाच प्रकार असावा हे इतकेसे लक्षणीय मुळीच नाही. अडचण आहे ती या अन्तर्विरोधांना सर्वसाधारण सूत्रात बसवायची. त्यांना खास प्रश्नांचे रूप दिल्याबरोबर त्यांचा अगोदरच उलगडा झालेला असतो.

उदाहरणार्थ, ग्रीक कला आणि शेक्स्पियरची कला यांचा प्रचलित काळाशी संबंध, हा आपण विचारांत घेऊ या. ग्रीक पुराणकथा म्हणजे ग्रीक कलेचे शस्त्रागार आहेत इतकेच नव्हे तर त्या तिचा आधार देखील आहेत हे आपल्याला ठाऊक आहे. स्वयंचलित साचे, रेल्वे गाड्या, इंजने व विजेची तारायंत्रे असताना ग्रीक-कल्पकतेच्या मुळाशी आणि म्हणूनच ग्रीक [कलेच्या] मुळाशी असलेली निसर्गाची व सामाजिक संबंधांची संकल्पना शक्य आहे का? रॉबर्ट्स अँड कंपनीच्या तुलनेत व्हल्कन म्हणा, वीज कंडक्टरच्या तुलनेत ज्युपिटर म्हणा आणि केंदीत मोबिलियेरच्या तुलनेत हर्मीज म्हणा, — काय होय! सगळ्या पुराणकथा कल्पनेत आणि कल्पनेच्या द्वारा निसर्गाच्या शक्तींना आटोक्यात ठेवतात, त्यांच्यावर नियंत्रण गाजवितात आणि त्यांना आकार देतात; म्हणून या शक्तींवर खरे नियंत्रण प्रस्थापित झाल्यावर या पुराणकथा लुप्त होतात. प्रिंटिंग हाऊस स्क्वेअरच्या[१७] जोडीला फामाचे काय होणार? ग्रीक कला ग्रीक पुराणकथा गृहीत धरते; दुसऱ्या शब्दात सांगायचे म्हणजे जनतेच्या कल्पनाशक्तीने अभावित अशा कलात्मक रीतीने. नैसर्गिक व सामाजिक घटिते अगोदरच आत्मसात केलेली असतात. हे ग्रीक कलेचे साहित्य असते, म्हणजे कोणत्याही पुराणकथा नव्हेत, म्हणजे निसर्गाचे प्रत्येक अभावित कलात्मक आत्मसात करणे नव्हे (इथे निसर्ग या संज्ञेत समाजासकट सगळ्या भौतिक घटितांचा समावेश आहे); इजिप्शियन पुराणकथा या ग्रीक कलेचा आधार कधीच होऊ शकल्या नसत्या, तसेच त्यातून ती कधीच उदयासही येऊ शकली नसती. परंतु काही झाले तरी पुराणकथा [ती गृहीत धरते], तथापि निसर्गाकडे पुराणकथात्मक दृष्टिकोनांतून पाहायला प्रतिबंध करणारा सामाजिक विकास, म्हणजे पुराणकथेच्या उदयाला पोषक ठरण्याचा संभव असलेली कोणतीही प्रवृत्ती; म्हणजे असा समाज पुराणकथांपासून स्वतंत्र अशी कल्पनाशक्ती कलाकाराच्या अंगी असायला पाहिजे असा आग्रह धरतो.

आणखी एका उपांगाच्या दृष्टीने विचार केला तर बंदुकीची दारू व बंदुकीच्या गोळ्या यांचा शोध लागल्यानंतर ॲचिलीसची निर्मिती शक्य आहे काय? आणि छापखाना आणि छपाईयंत्र देखील अस्तित्वात असताना होमरचे इलियड हे महाकाव्य निर्माण होणे शक्य तरी आहे काय? छापखान्याच्या उदयाबरोबर गाणे आणि

कथन आणि काव्यस्फूर्ति बंद पडणे अपरिहार्य नाही का, म्हणजे महाकाव्याला आवश्यक अशी परिस्थिती नाहीशी झाल्यावर?

तथापि ग्रीक कला आणि महाकाव्य यांची सांगड सामाजिक विकासाच्या काही प्रकारांशी कशी घातलेली आहे हे समजणे ही आपल्या पुढ्यात उभी असलेली अडचण नाही. अडचण ही आहे की या गोष्टी आपल्याला अजूनही सौंदर्यास्वादक आनंद देतात आणि काही बाबतीत एक परिमाण म्हणून आणि साध्य करता न येण्याजोगे ध्येय म्हणून मानल्या जातात.

प्रौढ माणूस पुन्हा लहान मूल होऊ शकत नाही, नाहीतर तो पोरकट होतो. परंतु लहान मुलाचा बालिशपणा त्याला आनंद देत नाही काय, आणि तो स्वतःच उच्चतर पातळीवर लहान मुलाच्या सच्चेपणाचे पुनरुज्जीवन करायचा प्रयत्न करत नाही काय? प्रत्येक युगातील लहान मूल त्या त्या कालखंडाच्या नैसर्गिक सत्यत्वाचे प्रातिनिधिक स्वरूप नसते काय? तर मग मानवजातीच्या ऐतिहासिक बालपणाने तत्कालीन सुंदर रूप धारण केले असल्याकारणाने आणि हा टप्पा पुन्हा कधीही परत येणारा नसल्याकारणाने आपल्यावर कायमची मोहिनी का घालू नये? काही मुले उद्धट असतात, काही अकालवृद्ध मुले असतात. प्राचीन जनतांपैकी अनेक लोक या कक्षेत मोडतात. ग्रीक लोक म्हणजे नेहमीची लहान मुले. त्यांच्या कलेचे आम्हाला जे आकर्षण वाटते त्याला तिच्या जन्मकाळच्या अपरिपक्व टप्प्याची बाधा होत नाही. उलटपक्षी तिचा आकर्षकपणा हा याचा परिपाक असतो आणि ज्या अपरिपक्व सामाजिक परिस्थितीने तिला जन्म दिला आणि केवळ अशी जी परिस्थितीच तिला जन्म देऊ शकली, ती पुन्हा येणार नाही या वस्तुस्थितीशी हा आकर्षकपणा अविभाज्यपणे निगडित झालेला असतो.

कार्ल मार्क्स, १८५७-५८ च्या
आर्थिक हस्तलिखितांची "प्रस्तावना"

कार्ल मार्क्स. अर्थशास्त्रावरील टीकाटिप्पणीत
भर, मॉस्को, १९७०, पृष्ठे २१५-१७.

कलेच्या सर्वसाधारण समस्या



वैचारिक आशय आणि वास्तववाद

१

एन्गाल्स यांचे मिन्ना कौट्स्की हिला पत्र

लंडन, तारीख २६ नोव्हेंबर १८८५

आता मी डाय आल्टेन उन्ड डाय न्यू एन [नवी आणि जुनी] @ ही देखील वाचली आहे आणि त्याबद्दल मी तुमचे मनःपूर्वक आभार मानतो. स्तेफान[१८] या कादंबरीतील शेतकऱ्यांच्या शब्दचित्रांच्या प्रमाणेच प्रस्तुत कादंबरीतले मिठाच्या खाणीतील कामगारांचे जीवन तुमच्या सिद्धहस्त लेखणीने वर्णन केले आहे. व्हिएन्ना शहरातील प्रतिष्ठित समाजाचे वर्णन देखील बहुतांशी फारच छान वठले आहे. प्रतिष्ठित समाज असलेले व्हिएन्ना हे खरोखरी एकमेव शहर आहे; बर्लिन येथे केवळ "काही वर्तुळे" आहेत, आणि त्याहून अधिक अनिश्चित अशी आणि याच कारणास्तव या शहराची भूमि साहित्यिक लोक, अधिकारी लोक आणि नटवर्ग यांच्या विषयीच्याच तेवढ्या कादंबऱ्यांची निर्मिती करते. तुमच्या कादंबरीच्या या भागातले कथानक कधीमधी फाजील वेगाने विकसित होत आहे किंवा कसे याचा निर्णय तुम्हीच अधिक चांगल्या रीतीने कराल. आमचा असा समज करून देणाऱ्या अनेक गोष्टी व्हिएन्ना शहरात बहुधा अगदी स्वाभाविक दिसतात; या शहराचे विशिष्ट आंतरराष्ट्रीय स्वरूप आणि दक्षिण युरोपीय व पूर्व युरोपीय घटकांचे या शहरातले मिश्रण यांचा विचार केल्यास असे दिसते. दोन्ही क्षेत्रांमधील पात्रे तुमच्या कादंबऱ्यांतल्या सरावाप्रमाणे सुस्पष्ट व्यक्तिरेखा वठलेली आहेत. त्यांच्यापैकी प्रत्येक पात्र हा एकेक नमुना आहे; परंतु त्याच वेळी ती एकेक निश्चित व्यक्तिरेखा देखील आहे. वयोवृद्ध हेगेल

@ मिन्ना कौट्स्की हिची कादंबरी. —संपादक.

याच्या शब्दात सांगायचे म्हणजे "डायझेर" @ आहे, आणि हे असेच असायला हवे. आणि आता, निःपक्षपातीपणा पतकरायचा म्हटल्यास, कशाविषयीतरी मला दोष-दिग्दर्शन करणे भागच आहे, आणि म्हणून मी आर्नोल्डकडे वळतो. हा खरोखरीच जरूरीपेक्षा जास्त लायक माणूस आहे, आणि शेवटी तो कोसळत्या कड्याखाली चेंगरून ठार होतो तेव्हा तो या जगाला त्याच्या फाजील चांगुलपणामुळे झेपण्याजोगा नव्हता असे गृहीत धरूनच आपण कवीच्या न्यायाशी जुळते करून घेऊ शकतो. परंतु लेखक आपल्या स्वतःच्याच नायकाचे जर कौतुक करायला लागला तर ते नेहमीच वाईट असते आणि हीच चूक तुमच्या हातून काही प्रमाणात या बाबतीत झालेली आहे असे मला वाटते. एल्सा हिच्या ठायी देखील एक विशिष्ट व्यक्तिमत्त्व आहे, मात्र हिचेसुद्धा आदर्शीकरण झालेले आहे, परंतु आर्नोल्डच्या बाबतीत व्यक्तिमत्त्वाचा तत्त्वाशी एकजीव याहूनही अधिक मोठ्या प्रमाणात झालेला आहे.

खुद्द ही कादंबरीच तिच्यातल्या या उणीवेचा उद्‌गम उघड करून दाखविते. आपल्या पुस्तकामध्ये आपण जाहीर भूमिका घ्यावी, सगळ्या जगापुढे आपल्या ठाम मतांचा पुरावा मांडावा; अशी इच्छा तुम्हाला जाणवली असल्याचे उघड दिसते. हे तर आता करून झालेले आहे. ज्या टप्प्यावरून तुम्ही पुढे गेलेल्या आहात असा हा टप्पा आहे, आणि याची पुनरुक्ति तुम्ही या स्वरूपात करायची जरूरी नाही. कविता म्हणून पक्षनिष्ठ कवितेला माझा विरोध मुळीच नसतो. शोकान्त नाट्याचा जनक एस्किलस आणि सुखान्त नाट्याचा जनक ॲरिस्टोफेनिस हे दोघेही खूपच पक्षनिष्ठ कवी होते, डान्टे व सेर्वान्टिस हे देखील यात कमी नव्हते. आणि शिलरच्या कबाले बुन्ड लायबे या बाबतीत सांगण्याजोगी सर्वोत्तम गोष्ट म्हणजे हे जर्मन राजकीय समस्या-प्रधान असे पहिलेच नाटक आहे. आधुनिक रशियन व नॉर्वेजियन हे उत्कृष्ट कादंबऱ्यांचे निर्माते असून हे सगळे हेतुनिष्ठ लेखन करतात. तथापि मला असे वाटते की हे उद्दिष्ट उघडपणे दाखवून दिले न जाता खुद्द प्रसंग व कृती यांतून दिसून आले पाहिजे आणि लेखक जे सामाजिक संघर्ष वर्णन करतो त्यांची भावी ऐतिहासिक सोडवणूक वाचकाच्या ताटात वाढायची पाळी लेखकावर येऊ नये. यात आणखी भर घातली पाहिजे ती म्हणजे ही की आमच्या परिस्थितीत कादंबऱ्या बहुतांशी भांडवलदारी वर्तुळांतील म्हणजे जी वर्तुळे थेट आमची नाहीत अशा वर्तुळांतील वाचकांना उद्देशून असतात. अशा प्रकारे समाजसत्तावादी समस्याप्रधान कादंबरी जर सत्य परिस्थितीचे यथार्थ चित्रण करून तिच्या बाबतीतील वरचढ रूढ भ्रमांचा निरास करत असेल, भांडवलदारी जगाच्या आशावादाला हादरे देत असेल, आणि जे अस्तित्वात आहे त्याच्या चिरंतन सत्याविषयी शंका बाणवत असेल आणि संबंधित समस्येची थेट सोडवणूक स्वतः सादर न करता आणि कधीमधी कोणतीही बाजू वरकरणी न घेता

@ "हा एक" —संपादक.

देखील ती हे करत असेल, तर आपले मिशन ती माझ्या मते पूर्णपणे पार पाडत आहे. इथे ऑस्ट्रियन शेतकरी लोक आणि व्हिएन्ना शहरातील "शिष्ट समाज" या दोहोंचेही तुमचे खडान् खडा ज्ञान आणि कौतुकास्पद ताजे व जिवंत चित्रण यांनी भरपूर साहित्य उपलब्ध करून दिले आहे, आणि सोफान या कादंबरीत तुम्ही जे प्रत्यंतर आणून दिले आहे ते म्हणजे हे की तुम्ही आपल्या पात्रांना सूक्ष्म उपरोधानिशी सादर करायला समर्थ आहात, म्हणजे आपण निर्माण केलेल्या पात्रांवर लेखकाचे वर्चस्व असल्याचा हा पुरावा आहे.

परंतु आता मला आवरते घेतले पाहिजे, नाहीतर तुम्हाला कंटाळा आणून मी रडायला लावीन. इथे सगळे काही पूर्वी होते तसेच आहे. कार्ल आणि त्याची पत्नी@ ही दोघे ॲन्हेलिंगच्या संध्याकाळच्या क्लासेसमध्ये शारीर शिकत आहेत आणि कष्टाळूपणाने कामही करत आहेत. मी देखील तसाच माझ्या कामात गढून गेलोय; लेन्चेन, पम्प आणि तिचे पतिराज आज सायंकाळी एक खळबळ उडविणारे नाटक बघायला जात आहेत.

आणि दरम्यान जुने युरोपखंड पुन्हा स्वतःला गतिशील करायच्या तयारीत आहे— आणि बहुधा, वेळ यायच्या अगोदर नव्हे. मी नुसती एवढीच आशा धरून आहे की भांडवलचा तिसरा खंड पूर्ण करायला त्याने मला वेळ द्यावा, आणि मग त्याने सुरुवात करायला हरकत नाही!

हार्दिक स्नेहशीलतेनिशी आणि मनःपूर्वक आदरानिशी मी आहे

तुमचाच

एफ्. एन्गल्स

मार्क्स/एन्गल्स, वेर्के, खंड ३६ वा, १९६७, पृष्ठे ३९३-९४

२

एन्गल्स यांचे लंडननिवासी मार्गारेट हार्कनेस हीस पत्र

[कच्ची प्रत]

[लंडन, एप्रिलचा आरंभ, १८८८]

प्रिय मिस हार्कनेस,

तुमच्या सिटी गर्ल b या कादंबरीची प्रत मेसर्स विझेतेल्ली यांच्या द्वारा मला धाडल्याबद्दल मी तुमचा खूप खूप आभारी आहे. मी ती अत्यंत आनंदाने व

@ कार्ल आणि लुइझी कौट्स्की —संपादक.

b मार्गारेट हार्कनेस हिची कादंबरी. —संपादक.

उत्सुकतेने वाचली. तुमचा अनुवादक माझा मित्र एझाहॉफ म्हणतो तदनुसार ही खरोखरीच इन क्लेइनेस कून्स्टस्वेर्क @ आहे; यात तो अशी भर घालतोय, आणि तुम्हाला हे समाधानकारक वाटेल, की परिणामतः त्याचा अनुवाद जवळ जवळ शब्दशःच व्हायला हवा. कारण काहीही गाळले किंवा कारागिरी करण्याचा प्रयत्न झाला तर मुळाच्या मूल्याचा भाग नष्ट मात्र व्हायचा.

तुमच्या कथेतल्या वास्तववादी सत्याच्या भरीला मला जर जास्तीत जास्त जाणवत असेल तर ते म्हणजे हे की खऱ्याखुऱ्या कलावंताचे धैर्य ती प्रदर्शित करते. फाजील प्रतिष्ठितपणाला न जुमानतां तुम्ही ज्या रीतीने साल्व्हेशन आर्मीचा १९ (मुक्तिफौजेचा) समाचार घेतलेला आहे त्या रीतीतून तुमचे धैर्य प्रदर्शित होते इतकेच नव्हे तर बहुजन समाजावर साल्व्हेशन आर्मीचा एवढा प्रभाव का आहे याची माहिती तुमच्या कथेतून बहुधा प्रथमच या प्रतिष्ठितपणाला मिळेल. परंतु मुख्यत्वेकरून ज्या साध्यासुध्या रीतीने कसल्याही रंगसफेतीशिवाय कामगारवर्गीय तरुणीला मध्यमवर्गीय माणसाने फशी पाडण्याची जुनीपानीच कथा तुमच्या सबंध पुस्तकाचा तुम्ही गड्डा बनविली आहे, तीत तुमचे धैर्य दिसून येते. मध्यम दर्जाचा कलाकार असता तर त्याच्या मते सामान्य असलेल्या कथानकाचे स्वरूप आपण कृत्रिम गुंतागुंतींच्या व सजावटींच्या ढिगांखाली लपवून ठेवणे आपल्याला भाग आहे असे त्याला वाटले असते आणि असे असूनही त्याचा हा डाव उघडकीस आणला जाण्याचे आपल्या नशिबी येणे त्याला चुकले नसते. जुनी कथा सांगणे तुम्हाला परवडू शकले, कारण ती नुसती खरेपणाने सांगून तुम्ही ती नवी करू शकलात.

तुमचे मिस्टर आर्थर ग्रँट हे पात्र सर्वोत्तम आहे.

टीका करण्याजोगे काही तरी मजकूड आहे असे म्हणायचेच झाल्यास ते म्हणजे हे आहे की तसे म्हटले तर ही कथा पुरेशी वास्तववादी अगदीच नाही. माझ्या मते वास्तववादामध्ये तपशिलाच्या सत्यतेच्या भरीला विशिष्ट परिस्थितीतील विशिष्ट स्वभावरेखांची सत्यपूर्ण पुनर्निमिती अभिप्रेत असते. आता तुमच्या स्वभावरेखा त्यांच्या परीने पुरेशा वैशिष्ट्यपूर्ण आहेत, परंतु त्यांच्या सभोवार असलेली व त्यांना क्रियाशील करणारी परिस्थिती बहुधा तितकीच वैशिष्ट्यपूर्ण नाही. सिटी गर्ल या कादंबरीतील कामगारवर्गाचे चित्रण म्हणजे स्वतःला मदत करायला असमर्थ असा आणि स्वतःला मदत करायचा प्रयत्न करायची कसलीही खटपट करत असल्याचे दर्शवीत देखील नसलेला असा निष्क्रिय बहुजन समाज असे झाले आहे. त्याच्या या ग्लानियुक्त दुःखातून त्याला बाहेर काढायचे सगळे प्रयत्न बाहेरून, वरून होत असतात. आता १८०० किंवा १८१० सालाविषयींचे म्हणजे सेंट सायमन व रॉबर्ट ओवेन यांच्या काळातले हे बिनचूक वर्णन असेल, परंतु ज्या माणसाने सुमारे

@ छोटी कलाकृति. --संपादक.

पन्नास वर्षे लढाऊ कामगारवर्गाच्या बहुतेक सगळ्या लढ्यांमध्ये भाग घेण्याचा बहुमान मिळविलेला आहे, त्याला ते १८८७ साली तसे दिसू शकत नाही. आपल्या सभोवार असलेल्या जुलूमकर्त्या माध्यमाविरुद्ध कामगारवर्गाची जी बंडखोर प्रतिक्रिया असते, मनुष्यप्राणी हा आपला दर्जा परत मिळविण्यासाठी त्याचे जे उद्रेकयुक्त, अर्धवट जाणीवयुक्त किंवा पूर्ण जाणीवयुक्त प्रयत्न चाललेले असतात ते इतिहासाचा भाग आहेत आणि म्हणून वास्तवतेच्या राज्यात आपल्याला स्थान असायला पाहिजे असा त्यांचा दावा असतो.

तुम्ही राजरोस समाजसत्तावादी कादंबरी म्हणजे 'टेन्डेझरोमान'@ असे आम्ही जर्मन लोक जिला म्हणतो तशी कादंबरी, लेखकांच्या सामाजिक राजकीय मतांचा गौरव करण्यासाठी लिहिली नाहीत म्हणून मी तुम्हाला दोष मुळीच देत नाही. लेखकाची मते जितकी गुप्त राहतील तितके ते कलाकृतीच्या लेखी अधिक चांगले असते. मी ज्या वास्तववादाचा निर्देश करतो आहे, तो लेखकाची मते काहीही असली तरी डोके वर काढतोच. याचे मी एक उदाहरण देतो. बाल्झॅक हा माझ्या मते सगळ्या passe's, presents et a venir b झोलांच्या पेक्षा किती तरी अधिक मोठा वास्तववादाचा बाङ्मयप्रभु आहे. बाल्झॅक आपल्या ला कोमेदिये ह्यूमेन या कादंबरी मालिकेत फ्रेंच "समाजाचा" विशेषतः "ले मोन्दे पॅरिसियेन" (पॅरिस-मधल्या प्रतिष्ठितांचा) अत्यंत अजब असा वास्तववादी इतिहास बखरीच्या धर्तीवर सादर करतो आणि १८१६ पासून १८४६ पर्यंत जवळजवळ वर्षानुवर्ष वर्णन करतो आणि त्यात १८१५ नंतर स्वतःची पुनर्घटना करून राहिलेल्या आणि शक्य तितका la vieveille politesse francaise c जुन्या फ्रेंच उच्चतेचा दर्जा मिळवायच्या प्रयत्नात असलेल्या सरदारांच्या समाजावर उगवत्या भांडवलदारवर्गाचे पुरोगामी हल्ले कसे होत होते याचे वर्णन सादर करतो. त्याच्या मते आदर्श समाज असलेल्या या समाजाचे उर्वरित अवशेष क्रमाक्रमाने या रासवट एकाक्ष उपटसुंभाच्या आक्रमणापुढे कसे नामोहरम होत होते किंवा त्याच्याकडून भ्रष्ट केले जात होते याचे तो वर्णन करतो; जिच्या सांसारिक बेहमानीपणाचे प्रकार हे ज्या धर्तीवर तिचे लग्न लावून देण्यात आले होते त्या धर्तीशी पूर्णपणे सुसंगत अशी तिची अस्मिता प्रदर्शित करणारे होते, ती सरदारीण भांडवलदारांपुढे कशी नामोहरम होत होती आणि हे भांडवलदार तिच्या पतीला रोख पैशासाठी किंवा चेनीसाठी कसे मूर्ख बनवीत होते याचे तो वर्णन करतो; आणि या मध्यवर्ती चित्रासभोवार फ्रेंच समाजाचा सबंध इतिहास तो उभा करतो आणि या इतिहासातून आर्थिक तपशिलांच्या बाबतीत देखील (उदाहरणार्थ, क्रान्तीनंतरची

@ समस्या प्रधान कादंबरी. —संपादक.

b जुने, सध्याचे व अजून येणार असलेले. —संपादक.

c जुनी फ्रेंच उच्चता. —संपादक

स्थावर व जंगम मालमत्तेची पुनर्रचना) त्या काळखंडातल्या सगळ्या व्यावसायिक इतिहासकारांकडून, अर्थशास्त्रज्ञांकडून व आकडेशास्त्रज्ञांकडून एकत्र मिळून मला जे ज्ञान मिळाले आहे त्याच्यापेक्षा अधिक ज्ञान मला बाल्झॅककडून मिळाले आहे. होय, राजकीयदृष्ट्या बाल्झॅक लेजिटिमिस्ट [२०] होता; त्याचे महान साहित्य चांगल्या समाजाच्या अपरिवर्तनीय अधोगतीवरील शोकगीत आहे, त्याची सहानुभूति संपूर्णपणे विनाशलल्लाटी असलेल्या वर्गाविषयी आहे; परंतु असे असूनही ज्या स्त्री-पुरुष सरदाराविषयी त्याला एवढी अत्यंत सखोल सहानुभूति वाटते त्यांचे वर्णन करताना तो जी अत्यंत धारदार वक्रोक्तिपूर्ण शैली उपयोगात आणतो, तो जी अत्यंत कटुतायुक्त उपरोधिक शैली उपयोगात आणतो, ती अतुलनीय आहे. आणि केवळ ज्यांच्याविषयीच तो उघडउघड कौतुकाने लिहितो ते त्याचे अत्यंत कडवे राजकीय विरोधक आहेत, ते म्हणजे क्लोइत्रे सेंट-मेरीचे [२१] प्रजासत्ताकवादी वीरपुरुष; हे वीरपुरुष त्या काळी (१८३० ते १८३६) बहुजनसमाजाचे खरेखुरे प्रतिनिधी होते. अशा प्रकारे ज्या अर्थी बाल्झॅकला आपल्या वर्गीय सहानुभूतींना व राजकीय पूर्वग्रहांना विरोध करणे भाग पडले; ज्या अर्थी त्याला आपल्या आवडत्या सरदारांच्या अधःपाताची आवश्यकता दिसली; आणि ज्या अर्थी त्याने त्यांचे वर्णन अधिक चांगल्या भवितव्याची लायकी नसलेले लोक असे केले; आणि ज्या अर्थी भविष्यकाळातले खरेखुरे लोक त्या काळी जिथे तेच तेवढे सापडत होते तिथे त्याने पाहिले,-- त्या अर्थी माझ्या मते हा वास्तववादाचा मोठ्यात मोठा विजय आहे, आणि जुन्या बाल्झॅकचे हे जास्तीत जास्त दिव्यभव्य उपलक्षण आहे.

तुमच्या समर्थनार्थ मला हे कबूल केले पाहिजे की सुधारलेल्या जगामध्ये लंडनच्या ईस्ट एंड मधील श्रमिक बहुजन समाजामध्ये कमी क्रियाशील प्रतिकार करणारे, दैवाला अधिक निष्क्रियपणे शरण जाणारे, अधिक hebite's @ लोक अन्यत्र कुठेही सापडणार नाहीत. आणि तुम्ही कामगारवर्गीय जीवनाच्या निष्क्रिय बाजूचे चित्रण करण्यात एकदा समाधान-मानायला तुम्हाला फार चांगली कारणे सापडली आहेत किंवा नाहीत, आणि आणखी एका कलाकृतीसाठी तुम्ही त्यांची क्रियाशील बाजू राखून ठेवली आहे किंवा नाही हे मला कसे कळणार?

मार्क्स आणि एन्गल्स, निवडक पत्रव्यवहार,
मॉस्को, १९७५, पृष्ठे ५७९-८१

३

ज्या लोकांनी क्रान्तीपूर्वी गुप्त मंडळ्यांमध्ये असो किंवा वृत्तपत्रांतून असो, मूव्हमेंट-पार्टीचे [२२] नेतृत्व केले, किंवा मागाहून अधिकार पदावरून नेतृत्व केले,

@ गोंधळलेले, दिङ्मूढ झालेले --संपादक

त्यांचे चित्रण अखेर शेवटी रेम्ब्रंटच्या बिनतडजोडवादी घर्तीनुसार जीवनाच्या संपूर्ण उत्साहानिशी व्हावे याहून अधिक इष्ट असे काहीच नाही. या व्यक्तिमत्त्वांचे चित्रण ही व्यक्तिमत्वे खरोखरी जशी होती तसे याच्यापूर्वी कधीही करण्यात आलेले नाही. परंतु केवळ यांच्या अधिकृत जाम्यानिम्यानिशी व डोक्यावरील तेजोवलयानिशीच तेवढे करण्यात आले आहे. या आदर्शवादी राफेलच्या चित्रांमध्ये सगळा खरेपणा नाहीसा झालेला आहे.

हे तर खरेच आहे की फेब्रुवारी क्रान्तीचे "थोर लोक" आतापर्यंत जसे प्रदर्शित झाले आहेत तसे न करता सध्याच्या दोन प्रकाशनांनी त्यांचा जामानिमा व तेजोवलये काढून टाकली आहेत. यांनी या लोकांच्या खाजगी जीवनात शिरकाव केलेला आहे, यांना यांच्या शर्टांच्या अस्तन्यांनिशी दाखविले आहे, यांच्या सगळ्या विविध हुजऱ्यांचा यांच्या भोवती गराडा पडलेला दाखविलेला आहे. परंतु इतके सगळे असून देखील व्यक्तीचे व घडामोडीचे खरेखुरे व हुबेहुब चित्रण यांच्यात अजिबात झालेले नाही. यांच्या लेखकांविषयी म्हणाल तर एक जण फार पूर्वीपासून लुई फिलिपचा मौचार्द @ असल्याचे उघडकीस आले आहे. आणि दुसरा व्यवसायाने खंदा करवाला असून त्याचे पोलिसांशी संबंध अशाच प्रकारे अत्यंत संदिग्ध आहेत आणि याच्या निरीक्षण शक्तीचे प्रत्यंतर येऊ शकते ते असे की आपण न्हेइनफेल्डेन व बासल यांच्या दरम्यानची "डोळे दिपविणारी चंदेरी शिखरे असलेली आल्प पर्वताची सुंदर रांग" आणि केहल व कार्ल्सरूह यांच्या दरम्यानचा "दूरची शिखरे क्षितिजावर दिसेनाशी झालेला असा न्हेनिश आल्प्स पर्वत" पाहिल्याचा हा दावा करतो. अशा लोकांकडून, विशेषतः ते याच्या भरीला स्वतःचे समर्थन करण्यासाठी लिहितात तेव्हा आपण अर्थात् फेब्रुवारी क्रान्तीचे कमी अधिक अतिशयोक्तिपूर्ण असे chronique scandaleuse b आपल्याला वाचायला मिळणार अशीच अपेक्षा आपण करू शकतो.

कार्ल मार्क्स आणि फ्रेडरिक एन्गल्स,
"ग्रंथांची समीक्षा :
ए. चेनू कृत **Les Conspirateurs**
आणि एल्. दे ला होद्देकृत **La naissance de La Republique"** en Fevrier 1848

मार्क्स आणि एन्गल्स, वेर्के,
खंड ७ वा, १९६९, पृष्ठ २६६

@ गुप्त हेर. —संपादक
b गप्पा पुराण. —संपादक

सत्य इतिहासातील करुणरस आणि हास्यरस

१

जर्मन राजकीय वर्तमानकाळाविरुद्धचा लढा हा आधुनिक राष्ट्रांचा भूतकाळाविरुद्धचा लढा आहे आणि त्यांना अजूनही त्या भूतकाळाच्या आठवणींचा ताप होतो. जुना जमाना त्यांच्या लेखी शोकान्त नाटकाची पूर्तता करून आपली सुखान्त नाटकाची भूमिका जर्मन भूत म्हणून बजावत आहे ही गोष्ट त्यांना उद्‌बोधक वाटते. जुना जमाना हा जोपर्यंत अगोदर अस्तित्वात असलेली जगाची सत्ता होता, आणि उलटपक्षी स्वातंत्र्य ही जोपर्यंत व्यक्तिगत संकल्पना होती, म्हणजे जोपर्यंत हा जमाना आपल्या स्वतःच्या समर्थनावर विश्वास ठेवत होता आणि असा विश्वास ठेवणे त्याला भाग होते, तोपर्यंत त्याचा इतिहास खरोखरीच शोककारी होता. जोपर्यंत अस्तित्वात असलेली जागतिक सुव्यवस्था या नात्याने जुना जमाना नुकत्याच उदयास येत असलेल्या जगाविरुद्ध झगडत होता तोपर्यंत व्यक्तिगत नव्हे, एक ऐतिहासिक चूक त्याची बाजू घेत होती. याच कारणास्तव त्याचा अधःपात शोककारी ठरला.

उलटपक्षी, सध्याची जर्मन राजवट म्हणजे कालबाह्य गोष्ट, सर्वमान्य गृहीत सत्यांच्या राजरोस विरोधात असलेली गोष्ट, जुन्या जमान्याच्या शून्यपणाचे जगासमोर प्रदर्शन करणारी गोष्ट—ही राजवट केवळ अशीच कल्पना करते की आपला स्वतःवर विश्वास आहे आणि अशी मागणी करते की जगाने अशीच कल्पना करून घेतली पाहिजे. या राजवटीचा जर स्वतःच्या गाभ्यावर विश्वास असेल, तर परकीय गाभ्याच्या देखाव्याखाली हा आपला गाभा लपवून ठेवायचा प्रयत्न ती करील काय आणि ढोंग व शब्दच्छल यांचा आसरा घेऊ पाहील काय ? आधुनिक जुना जमाना म्हणजे ज्याचे खरे वीर मेलेले आहेत अशा जागतिक सुव्यवस्थेचा केपळ विदूषक आहे. इतिहास कशाचीच गय करीत नाही आणि जुन्या प्रकाराचे दफन करण्यापूर्वी तो अनेक टप्प्यांतून जात असतो. जागतिक-ऐतिहासिक प्रकाराचा शेवटचा टप्पा म्हणजे त्याचे आनंदपर्यवसायी

रूप असते. ग्रीसच्या देवता अगोदरच एस्किलसच्या प्रॉमिथूस बाउन्ड मध्ये शोककारी रीतीने मरणप्राय जखमी झालेल्या असतात आणि त्यांना ल्यूसिअनच्या डायलॉग्जमध्ये पुन्हा मरावे लागते. इतिहासाचा हा असा ओघ का असतो ? मानवजातीला आपल्या भूतकाळाचा निरोप आनंदाने घ्यायला मिळावा म्हणून या आनंदी ऐतिहासिक भवितव्याचे समर्थनच आम्ही जर्मनीच्या राजकीय अधिकाऱ्यांसाठी करतो आहोत.

कार्ल मार्क्स, "हेगेलच्या कायद्याच्या
तत्त्वज्ञानावरील टीका-टिप्पणीत भर.
प्रस्तावना"
मार्क्स आणि एन्गल्स, संकलित ग्रंथ,
खंड ३ रा, मॉस्को १९७५, पृष्ठे १७८-७९

२

हेगेलने कुठे तरी म्हटले आहे की जगाच्या इतिहासातील मोठ्या महत्त्वाच्या सगळ्या सत्य घटना आणि व्यक्ती जणू काय दोनदा घडत असतात. तो यात जी भर घालायला विसरला ती म्हणजे ही की पहिल्यांदा त्या शोककारी असतात आणि दुसऱ्यांदा त्या फार्स असतात. दान्तनची जागा कॉस्सिदिये घेतो, रॉबेस्पियरची जागा लुई ब्लांक घेतो, १७९३ ते १७९५ च्या मोन्तान्येची जागा १८४८ ते १८५१ चा मोन्तान्ये घेतो, चुलत्याची जागा पुतण्या घेतो. आणि अठराव्या ब्रुमेअरशी संबंधित अशा परिस्थितीत तेच व्यंगचित्र घडून येते !

कार्ल मार्क्स, लुई बोनापार्तचे अठरावे ब्रुमेअर
मार्क्स आणि एन्गल्स, निवडक ग्रंथ,
खंड १ ला, मॉस्को, १९७८, पृष्ठ ३९८

३

अज्ञान म्हणजे राक्षस; आपल्याला अशी घास्ती वाटत असते की अनेक शोकान्तिकांचे ते अजूनही कारण ठरेल; मोठ्यांत मोठ्या ग्रीक कवींनी त्याचे यथायोग्य चित्रण मायसेने व थीबीज या राजघराण्यांच्या हृदयविदारक नाटकांमध्ये शोककारी दैव म्हणून केलेले आहे.

कार्ल मार्क्स, "कोल्नीस्चे त्सायटुंग याच्या
१७९ व्या अंकातील अग्रलेख"
मार्क्स आणि एन्गल्स, संकलित ग्रंथ,
खंड १ ला, मॉस्को, १९७५, पृष्ठ २०२

४

Was Schert mich weib, was schert mich kind,
Ich trage hopres Verlangam;
Lass sic bett in gehn, wenn sie hungrig sind —
Mein Kaiser, Mein Kaiser getangen!

मला बायकोची नाही पर्वा, मला पोराची नाही पर्वा,
मला घोर लागला उच्च उच्च ध्येयांचा;
ती भुकेजली जर असली, तर भीक मागू दे त्यांना—
माझा कैसर हो, कैसर कैदी झाला ! a

जागतिक इतिहास हा नक्कीच मोठ्यांत मोठा कवी असतो; त्याने हायने या कवीचे विडंबन करण्यात देखील यश मिळविले आहे. माझा बादशहा,b माझा बादशहा, कैदी झाला ! आणि यात आणखी भर म्हणजे तो "सडक्या प्रशियनांचा कैदी" झाला आणि गरीब बिचारा विल्यमc बाजूला उभा राहतो आणि प्रत्येकाला शंभराव्यांदा असे आश्वासन देतो की या सगळ्या प्रकरणात आपला मुळीच हात नाही आणि ही निव्वळ परमेश्वराची इच्छा आहे. विल्यमचे हे वागणे नेमके त्या शाळकरी मुलासारखे आहे. त्याला गुरुजींनी विचारले, "जग कुणी निर्माण केले ?" तेव्हा तो उत्तरला. "माफ करा गुरुजी, मी निर्माण केले--परंतु मी ते पुन्हा कधीही निर्माण करणार नाही !"

एन्गल्स यांचे मार्क्स यांस पत्र,
तारीख ४ सप्टेंबर १८७०.

मार्क्स आणि एन्गल्स, निवडक पत्रव्यवहार,
मॉस्को, १९७५, पृष्ठे २३२-३३

५

थोडक्यात सांगायचे म्हणजे कामगारांच्या पक्षाने स्वतःचे[२४] अस्तित्व स्पष्टपणे व अचूकपणे जाहीर केले आहे. याचा अर्थ असा की पुढच्या खेपेस दोन्ही जुने पक्ष त्याच्याशी दोस्ती करायला मागतील. टोरी लोकांचे नेतृत्व जोपर्यंत सध्याच्या गाढवांकडे आहे तोपर्यंत ते विचारात घेतले जाणार नाहीत. लिबरलांना मात्र हिशेबात घेतलेच पाहिजे--आणि त्याचप्रमाणे आयरिश लोकांनाही हिशेबात घेतलेच पाहिजे. पार्नेलवर त्या हास्यास्पद प्रकरणी बहिष्कार टाकण्यात आला त्या वेळी तो अचानक कामगारांशी

---

a हाइरिख हायने याच्या "डाय ग्रेनाडियेरे" या कवितेतून—संपादक.
b तिसरा नेपोलियन—संपादक.
c पहिला विल्यम--संपादक

स्नेहशील झाला, आणि पार्लमेंटमधील आयरिश लोकांना केवळ कामगारच आपल्याला होमरूल[२५] द्यायची पक्की तरतूद करू शकतात असे दिसेल त्या वेळी ते देखील तसेच करतील. नंतर तडजोडी होतील, जे. फेबियन[२६] लोक या निवडणुकीत आपल्या गैरहजेरीने चमकले आहेत, ते देखील पुढे सरसावतील, परंतु असला प्रकार इथे टाळता येत नाही. तथापि प्रगती होत आहे हे तुम्हाला दिसते आहे, आणि हेच महत्त्वाचे आहे.

जागतिक इतिहासाचा विलक्षण उपरोध: दोन्ही जुन्या पक्षांना कामगारांची मनधरणी करणे भाग पडत आहे आणि आपल्याला अग्रभागी राहायचे असेल किंवा वर्चस्व गाठायचे असेल तर आपण कामगारांना सवलती देणे भाग आहे, आणि दोघांनाही असे वाटते की असे करतांना आपण आपल्या स्वतःच्या मागाहून येणाऱ्यांना मदतच करतो आहोत. आणि असे असूनही त्यांना मुळी पर्यायच नाही! ऐतिहासिक विकासाच्या ओघात जो प्रचंड विनोद उघडकीस आलेला आहे, त्याच्या तुलनेत आपला लहानसा विनोद काय होय!

एन्गल्स यांचे ऑगस्ट बेबेल यास पत्र,
तारीख ७ जुलै १८९२.
मार्क्स / एन्गल्स, वेर्के, खंड ३८ वा, १९६८, पृष्ठ ३९३-९४

क्रान्तिकारक शोकान्तिकेच्या समस्या

'फ्रॅन्झ फॉन सिकिन्जेन' या फर्डिनान्ड लासाल याच्या नाटकाविषयी मार्क्स आणि एन्गल्स यांनी त्याला लिहिलेली पत्रे

१

मार्क्स यांचे फर्डिनान्ड लासाल यास पत्र

लंडन, तारीख १९ एप्रिल, १८५९

आता मी फ्रॅन्झ फॉन सिकिन्जेन * कडे येतो. सर्वप्रथम गोष्ट म्हणजे या नाटकाची रचना व त्यातले प्रसंग यांची प्रशंसा करणे मला भाग आहे, आणि अन्य कोणत्याही आधुनिक जर्मन नाटकाविषयी जे म्हणता येईल त्यापेक्षा हे अधिक आहे. दुसरी गोष्ट म्हणजे या कलाकृतीविषयी शुद्ध टीकात्मक वृत्ती धारण करणे बाजूला सारून मी असे म्हणतोय की पहिल्या वाचनानंतर याने माझ्या मनात मोठीच खळबळ उडवून दिली आणि म्हणून जे वाचक भावनेच्या अधिक आहारी जाणारे आहेत, त्यांच्या मनावर हा प्रभाव ते याहूनही अधिक उच्चतर प्रमाणात गाजवील. आणि हे दुसरे फार महत्त्वाचे उपांग आहे.

आता पदकाच्या दुसऱ्या बाजूकडे वळू या. पहिली गोष्ट म्हणजे--आणि हे शुद्ध औपचारिक प्रकरण आहे--तुम्ही हे छंदात लिहिलेले आहे तर तुम्ही आपल्या काव्यपंक्ती जरा अधिक कलात्मकतेने घासूनपुसून तयार करायला हव्या होत्या. परंतु व्यावसायिक कवींना असल्या निष्काळजीपणामुळे केवढाही मोठा धक्का बसण्याचा संभव असला तरी एकंदरीने माझ्या मते हे फायद्याचे कलम आहे. कारण आमच्या epigonous कवींच्या गोतावळ्यात औपचारिक सफाईदारपणाखेरीज अन्य काहीच शिल्लक नाही. दुसरी गोष्ट म्हणजे संकल्पित संघर्ष हा नुसताच शोकपर्यवसायी नाही,

---

* लासालने लिहिलेले नाटक—संपादक

परंतु शोकपर्यवसायी संघर्षानेच १८४८-४९ च्या क्रान्तिकारक पक्षाची सकारण वाताहत घडवून आणली. म्हणून आधुनिक शोकपर्यवसायी नाटकाचा हा मोक्याचा बिंदु करण्याच्या कल्पनेचे मी अत्यंत हार्दिक स्वागत करतो. परंतु मग मी स्वतःला असे विचारतो की तुम्ही घेतलेला विषय हा या संघर्षाचे प्रदर्शन करायला सोईचा आहे किंवा नाही ? बाल्थाझारने खरोखरीच अशी कल्पना केली असण्याचा संभव आहे की सिकिन्जरने आपला उठाव सरदारांच्या आपसातल्या झगड्याआड लपवून ठेवण्याऐवजी जर साम्राज्यसत्तेविरुद्ध व संस्थानिकांविरुद्ध उघड युद्धाचा झेंडा फडकवला असता तर तो विजयी झाला असता. पण हा भ्रम आपण मान्य करू शकतो का ? सिकिन्जेन (आणि त्याच्याच बरोबर कमी अधिक प्रमाणात हुट्टेन) जो नामोहरम झाला तो त्याच्या कावेबाजपणामुळे नव्हे. तो नामोहरम झाला याचे कारण म्हणजे एक सरदार या नात्याने आणि मरणोन्मुख वर्गाचा प्रतिनिधी या नात्याने प्रचलित व्यवस्थेविरुद्ध, किंवा तिच्या नव्या स्वरूपाविरुद्ध म्हणा हवे तर, त्याने उठाव केला, म्हणून तो नामोहरम झाला. सिकिन्जेनच्या अंगचे व्यक्तिगत गुणविशेष व त्याची विशिष्ट संस्कृती, नैसर्गिक कर्तृत्व वगैरे काढून टाका आणि शेवटी जे काय उरते ते म्हणजे–गोट्झ फॉन बेर्लिचिन्जेन. तो दुर्दैवी प्राणी गोट्झ म्हणजे योग्य स्वरूपात बादशहाला व संस्थानिकांना सरदारांकडून होणाऱ्या शोककारी विरोधाचे मूर्तरूप आहे; आणि याच कारणास्तव गटेने त्याला यथायोग्यपणे नायक * केलेला आहे. ज्या अंशाने सिकिन्जेन—आणि काही प्रमाणात हुट्टेन देखील, मला त्याच्या बाबतीत व एका वर्गाच्या सगळ्या विचारवंतांच्या बाबतीत अशा प्रकारची विधाने बरीचशी दुरुस्त करायला हवीत—संस्थानिकांविरुद्ध लढतो (कारण बादशहाशी संघर्ष जो उद्भवतो तो सरदारांचा बादशहा हा संस्थानिकांच्या बादशहाचे रूप धारण करतो म्हणून), त्या अंशाने तो खरोखरीच केवळ डॉन क्विक्झोट असतो, मात्र ऐतिहासिक दृष्ट्या समर्थनीय असा. सरदारी झगड्याच्या मिषाने त्याने उठाव आरंभला या वस्तुस्थितीचा साधा अर्थ असा की त्याने हा उठाव सरदारी धर्तीवर आरंभला. त्याने जर तो वेगळ्या रीतीने आरंभला असता तर त्याला थेट आणि सुरुवातीपासूनच शहरांना व शेतकऱ्यांना आवाहन करावे लागले असते, म्हणजे नेमक्या अशा वर्गांना की ज्यांचा विकास सरदारांच्या नायनाटामध्ये सामावलेला होता.

म्हणूनच, तुम्हाला उर हा संघर्ष गोट्झ फॉन बेर्लिचिन्जेन या नाटकातल्या संघर्षाइतक्या खालच्या पातळीवर आणायचा नव्हता–– आणि तशी तुमची योजना नव्हती–– तर मग सिकिन्जेन व हुट्टेन यांना शरणागती पतकरणे भागच होते. कारण आपण क्रान्तिकारक आहोत अशी त्यांनी कल्पना करून घेतलेली होती (हे गोट्झच्या

---

* गटेचे नाटक गोट्झ फॉन बेर्लिचिन्जेन याला अनुलक्षून मार्क्सने हा उल्लेख केलेला आहे. — संपादक

बाबतीत म्हणता येत नाही) आणि १८३० च्या सुशिक्षित पोलिश सरदारांप्रमाणे एका अंगाने त्यांनी स्वतःला आधुनिक विचारांचे प्रवर्तक करून घेतले तर दुसऱ्या अंगाने त्यांनी प्रत्यक्षात प्रतिगामी वर्गाच्या हितसंबंधांचे प्रतिनिधित्व केले. क्रान्तीच्या सरदारवर्गीय प्रतिनिधींनी— ज्यांच्या ऐक्य व स्वातंत्र्य या घोषणांच्या आड जुन्या साम्राज्याचे व दंडा-कायद्याचे स्वप्न अजून दबा धरून बसलेले होते— तसे असेल तर तुमच्या नाटकातल्या प्रमाणे सगळे लक्ष आपल्याचकडे वेधून घ्यायला नको होते, तर शेतकऱ्यांच्या प्रतिनिधींनी (विशेषेकरून यानाच) आणि शहरातील क्रांतिकारक घटकांच्या प्रतिनिधींनी चांगली ठसठशीत क्रियाशील पार्श्वभूमी तयार करायला हवी होती. तसे झाले असते तर तुम्ही त्यांना अत्याधुनिक विचार अत्यंत बालिश स्वरूपात बोलायला अधिक मोठ्या प्रमाणात वाव देऊ शकला असता, तर उलटपक्षी आता धार्मिक स्वातंत्र्याच्या जोडीला नागरी ऐक्य हाच प्रत्यक्षात मुख्य विचार होऊन राहिला आहे. तसे झाले असते तर मग तुम्हाला आपोआपच शेक्स्पियरच्या धर्तीवर अधिक मोठ्या प्रमाणात लिहिणे भाग पडले असते, तर याच्या उलट मला तुमची सगळ्यात जास्त गंभीर उणीव वाटते ती म्हणजे शिलरच्या धर्तीवर तुम्ही व्यक्तींचे परिवर्तन कालभावनेच्या नुसत्याच प्रवक्त्यांमध्ये करून ठेवता. तुमच्या फ्रॅन्झ फॉन सिकिन्जेन-प्रमाणे तुमच्या खुद्द स्वतःच्या हातून काही प्रमाणात मुत्सद्देगिरीची चूक नाही का झाली ? म्हणजे तुम्ही लूथरपंथीय-सरकारांच्या विरोधी पक्षाला खालच्या वर्गातल्या मुन्झेरवादीविरोधी पक्षाच्या वरचे स्थान नाही का दिले ?

आणखी सांगायचे म्हणजे पात्रांमध्ये स्वभावपरिपोषाची उणीव आहे. मी पाचवा चार्ल्स, बाल्थाझार आणि ट्रियरचा रिचर्ड यांना वगळून हे विधान करतोय. सोळाव्या शतकांतल्या इतका अधिक प्रभावी स्वभाववैशिष्ट्यांचा काळ अन्य कोणता तरी कधी तरी होता काय ? माझ्या मते हुट्टेन हा " स्फूर्तीचा " भलताच जादा प्रतिनिधी आहे आणि हा कंटाळवाणा झालेला आहे. तो त्याच वेळी सैतानी हजरजबाबीपणा असलेली चलाख व्यक्ती नव्हता का, आणि म्हणून तुम्ही त्याच्यावर मोठा अन्याय केलेला नाही काय ?

तुमच्या सिकिन्जेनचे चित्रणदेखील ओघाओघांत सांगायचे म्हणजे फाजील अमूर्त स्वरूपात केलेले आहे. हा तुमचा सिकिन्जेन देखील ज्या मर्यादेपर्यंत त्याच्या सगळ्या व्यक्तिगत हिशेबांपासून स्वतंत्र अशा संघर्षाचा बळी झालेला आहे त्या मर्यादेपर्यंत तो एका अंगाने शहरांशी दोस्ती करणे वगैरे असा उपदेश त्याने आपल्या सरदारांना केला पाहिजे असा दिसतो, तर दुसऱ्या अंगाने शहरांना तो उगारलेल्या मुठीच्या कायद्याच्या न्यायाचा प्रसाद खुशीत येऊन देतो असा दिसतो.

तपशिलांविषयी म्हणाल तर अधूनमधून व्यक्तींची जी अतिरंजित आत्म-परीक्षणे आहेत त्यांच्याबद्दल मी तुम्हाला दोष दिलाच पाहिजे—म्हणजे शिलरविषयी तुम्हाला जी जादा आपुलकी वाटते तिच्यातूनच हे काही तरी निर्माण झाले असावे.

उदाहरणार्थ, पृष्ठ १२१. हुट्टेन आपली जन्मकथा मारीला सांगतो त्या वेळी मारीला जे म्हणू दिले आहे ते सर्वस्वी स्वाभाविक ठरणारेच आहे :

"भावनांचा सगळा पसारा"

वगैरे पासून ते

"वर्षांच्या ओझ्याहुनी ते अधिकच अवजड आहे."

"असे म्हटले आहे" पासून "वय झाले" पर्यंतच्या आदल्या काव्यपंक्ती पाठोपाठ येऊ शकल्या, परंतु "बालिका एका रात्रीत स्त्री होते" (मारीला प्रेमाच्या नुसत्याच अमूर्त स्वरूपापेक्षा अधिक माहीत असते हे जरी त्यात दर्शविलेले असते तरीदेखील) हे अगदीच अनावश्यक होते; परंतु मारीने आपल्या स्वतःच्या "वया" विषयीच्या विचाराने सुरुवात करावी हे अगदीच नको होते. "एका" तासात तिने सगळे सांगितल्यानंतर ती आपल्या वयाविषयीच्या वाक्यात आपल्या भावनेला सर्व-साधारण व्यक्त स्वरूप देऊ शकत होती. आणखी पुढचे म्हणजे नंतरच्या ओळीतील "मी मानते हा माझा हक्क" (म्हणजे सुख) हे विधान वाचून मला धक्काच बसला. आतापर्यंत मारीने जगाविषयीचा आपला दृष्टिकोन टिकवून ठेवलेला होता त्याचे रूपान्तर हक्काच्या सिद्धान्तामध्ये करून तिचा दृष्टिकोन खोटा का म्हणून पाडावा ? या बाबतीतले माझे मत अधिक मोठ्या तपशिलानिशी मी बहुधा आणखी केव्हातरी सांगेन.

सिकिन्जेन आणि पाचवा चार्ल्स यांच्या दरम्यानचा प्रवेश मला विशेषेकरून यशस्वी वाटतो, मात्र संवाद उभयपक्षी फाजील आत्मसमर्थनपर वाटतात; तसेच पुढचे ट्रियर येथील प्रवेश. हुट्टेनची तरवारीविषयीची वाक्ये फारच छान आहेत.

या वेळेला एवढे पुरे.

तुमच्या नाटकाला एक विशेष पाठिराखा तुम्हाला माझ्या पत्नीच्या रूपाने लाभला आहे. मारी हे एकच पात्र असे आहे की ज्याने तिचे समाधान झालेले नाही.

नमस्कार.

आपला, के. एम्.

मार्क्स / एन्गल्स, वेर्के, खंड २९ वा,
१९६७, पृष्ठे ५९०-९३

२

एन्गल्स यांचे फर्डिनान्ड लासाल यास पत्र

मँचेस्टर, तारीख १८ मे १८५९

प्रिय लासाल,

मी इतके दीर्घकाळ लिहिलेले नाही म्हणून तुम्हाला हे काहीसे विचित्र वाटले असेल, त्यातल्यात्यांत तुमच्या सिकिन्जेनविषयी माझे मत मी तुम्हाला कळवायचे

होते म्हणून. परंतु नेमक्या याच गोष्टीने इतका दीर्घकाळ माझे लिहिणे लांबवले. सध्या चांगल्या वाङ्मयाची टंचाई सगळीकडेच जाणवत असल्यामुळे या प्रकारचे पुस्तक वाचायची संधी मला क्वचितच मिळते आणि सांगोपांग निर्णय सांगता येईल, शेवटी पक्के प्रस्थापित झालेले मत देता येईल अशा रीतीने मी एखादे पुस्तक वाचल्याला अनेक वर्षे लोटली आहेत. क्षुल्लक पुस्तकासाठी एवढे कष्ट ध्यायच्या लायकीची ती नसतात. काही थोड्या अधिक चांगल्या इंग्रजी कादंबऱ्या अधून मधून माझ्या आढळात येतात. उदाहरणार्थ थॅकरे, परंतु त्यांचे निर्विवाद साहित्यिक, आणि सांस्कृतिक व ऐतिहासिक महत्त्व असून देखील त्यांना सुद्धा अशा प्रकारे माझे लक्ष वेधून घेता कधीच आलेले नाही. तथापि, माझी निर्णयशक्ति निष्क्रियतेच्या एवढ्या प्रदीर्घ कालानंतर फारच मंद झालेली आहे आणि मी स्वतःला माझे मत द्यायला मोकळीक घेऊ शकण्यापूर्वी कांही वेळ जावा लागला. परंतु तुमचे सिकिन्जेन त्या क्षुद्र वाङ्मयापेक्षा वेगळ्या प्रकारे वागवायच्या योग्यतेचे आहे म्हणून मी हा वेळ घेतला.

तुमची ही कलाकृती म्हणजे सर्वार्थाने, विषय व मांडणी यांच्या हिशेबाने, जर्मन राष्ट्रीय नाटक आहे, आणि तिच्या पहिल्या व दुसऱ्या वाचनाने माझ्या मनांत एवढी खळबळ माजविली की मला ती काही काळ बाजूला ठेवावी लागली. विशेषतः मला सांगायला शरम वाटते की या मंदीच्या काळात माझी अभिरुची खूपच मंद झालेली आहे आणि हलक्या मूल्याच्या गोष्टी देखील पहिल्या वाचनानंतर माझ्यावर काहीसा प्रभाव पाडतात. संपूर्णपणे निःपक्षपाती व्हावे म्हणून, संपूर्णपणे "समीक्षणात्मक" व्हावे म्हणून मी सिकिन्जेन बाजूला ठेवले, म्हणजे मी ते काही परिचिताना उसने दिले (इथे अन्य काही थोडे जर्मन लोक आहेत आणि ते साहित्यिक अर्थाने कमी अधिक सुशिक्षित आहेत). (Habent sua fata libelle @) आपण जर ती उसनी दिली, तर आपल्वांला पुन्हा क्वचितच पाहायला मिळतात, आणि म्हणून मला माझे सिकिन्जेन सक्तीने परत जिंकून घ्यावे लागले. तिसऱ्या व चौथ्या वाचनानंतर माझे मत तेच राहिले आहे हे मी तुम्हाला सांगू शकतो, आणि माझी अशी खात्री झाली की तुमचे सिकिन्जेन टीकेला तोंड देऊ शकते आणि आता मी त्यावरील माझे मत देतो.

जर्मनीतील सध्याच्या अधिकृत कवींपैकी कोणीही असले नाटक लिहायला समर्थ होणार नाही असे मी म्हटले तर हा तुमचा मोठासा गौरव ठरणार नाही हे मी जाणून आहे. असे असूनही ही वस्तुस्थिती आहे आणि ही आमच्या साहित्याचे एवढे मोठे वैशिष्ट्य आहे की हिच्याकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. पहिली गोष्ट म्हणजे बाह्यांगाचा विचार. संविधानकाचा कुशल विकास आणि या कलाकृतीची कमालीची नाट्यपूर्णता पाहून मला सुखद आश्चर्य वाटले. छंदांच्या रचनेत तुम्ही थोडीशी

@ पुस्तकांना त्यांचे स्वतःचे नशीब असते. —संपादक

मोकळीक घेतलेली आहे हे तुम्हीच कबूल केले आहे, तथापि तिच्यामुळे रंगभूमीवर अडथळा येण्यापेक्षा वाचताना अधिक अडथळा येतो. या नाटकाची रंगावृत्ति वाचणे मला आवडले असते; ही नाट्यकृति आहे या अवस्थेत रंगभूमीवर नक्कीच आणता येणार नाही. इथे माझ्या माहितीतला एक तरुण जर्मन कवि (कार्ल सायबेल) आहे. तो आपला देशबांधव आहे आणि माझा दूरचा नातेवाईक आहे. रंगभूमीचा त्याला बराच अनुभव आहे. प्रशियन गार्ड्स् रिझर्व्हिस्ट म्हणून तो कदाचित बर्लिनला येईल. तसे झाले तर मी तुम्हाला देण्यासाठी बहुधा चार ओळी त्याच्याजवळ लिहून देईन. तुमच्या नाटकाविषयी त्याला खूप आदर वाटतोय, परंतु त्यांतल्या एकेका पात्राच्या प्रदीर्घ बोलण्यामुळे ते रंगभूमीवर आणणे सर्वस्वी गैरसोयीचे आहे असे त्याचे मत आहे. या बोलण्यात एक नट नुसताच रंगभूमीवर बोलत राहतो आणि इतर नटांना फालतू म्हणून उभे राहण्याऐवजी आपले सगळे अंगविक्षेप दोन-दोनदा, तीन-तीनदा करावे लागतात. शेवटचे दोन अंक पुरेशा स्पष्टपणाने असे प्रत्यंतर आणून देतात की संवाद चटपटीत व आकर्षक करायला तुम्हाला कसलीच अडचण पडणार नाही, आणि काही प्रवेशांचा अपवाद सोडल्यास (प्रत्येक नाटकाच्या बाबतीत असे असतेच) पहिल्या तिन्ही अंकांच्या बाबतीत हीच गोष्ट करता येईल असे मला वाटते आणि रंगावृत्ति तयार करताना तुम्हाला ही गोष्ट हिशेबात ध्यावी लागेल याबद्दल मला मुळीच शंका नाही. अर्थात् याच्या परिणामी वैचारिक आशयाची हानि होतेच, परंतु हे अनिवार्य असते. विचाराचा अधिक मोठा सखोलपणा आणि जाणीवयुक्त ऐतिहासिक आशय या ज्या गुणांचे श्रेय तुम्ही यथायोग्यपणे जर्मन नाट्याला देता, त्यांचा संपूर्ण एकजीव शेक्स्पियरच्या तेजस्वीपणाशी व मांडणीच्या परिपूर्णतेशी होणे ही गोष्ट बहुधा केवळ भविष्यकाळीच साध्य होईल, बहुधा जर्मनांच्या हातूनदेखील साध्य होणार नाही. काहीही असले तरी यात मला नाट्याचे भवितव्य दिसते. तुमचे सिकिन्जेन हे सर्वस्वी योग्य मार्गावरच आहे; यांतली मुख्य पात्रे निश्चित वर्गांची व प्रवृत्तींची प्रतिनिधी आहेत, आणि म्हणून ती आपल्या काळाच्या निश्चित विचारांची प्रतिनिधी आहेत. त्यांना आपली उद्दिष्टे क्षुद्र व्यक्तिगत वासनांमध्ये गवसत नाहीत, परंतु ती ऐतिहासिक ओघात गवसतात आणि हा ओघ त्यांना आपल्याबरोबर पुढे नेत असतो. परंतु पुढचे पाऊल जे अजून टाकायचे आहे ते म्हणजे हे की खुद्द कृतीनेच ही उद्दिष्टे अधिक तडफदारपणाने, क्रियाशीलपणे आणि एका अर्थाने मूळ स्वरूपात अग्रभागी आणायला हवीत, आणि उलटपक्षी चर्चा (ओघाओघात सांगायचे म्हणजे तुम्ही कोर्टात व जाहीर सभांत तुमची जी जुनी वक्तृत्वाची देणगी प्रत्यंतराला आणून देत होता, ती मला या चर्चांमध्ये ओळखता आली) अधिकाधिक फालतू ठरतात. तुम्ही स्वतः हे ध्येय भावी उद्दिष्ट म्हणून मान्य करता असे दिसते, कारण तुम्ही रंगभूमीवरचे प्रयोगक्षम नाटक व साहित्यिक नाटक यांच्या दरम्यान फरक करता आहात; माझ्या मते या अर्थाने सिकिन्जेन या नाटकाचे रूपान्तर रंगभूमीवरील प्रयोगक्षम नाटकात होऊ शकते, मात्र

काहीसा त्रास सोसून (कारण परिपूर्णता साधणे खरोखरीच सोपे नसते). नाटकातील पात्रांचा स्वभाव परिपोष या गोष्टीशी निगडित आहे. प्रचलित वाईट व्यक्तिचित्रणाविरुद्ध कडाडून बोलायचा तुम्हाला संपूर्ण हक्क आहे; कारण हे व्यक्तिचित्रण म्हणजे नुसताच कोटिबाजपणा असतो आणि जुन्या जमान्यातल्या दरिद्री साहित्याचीही आवश्यक खूण असते. तथापि मला असे वाटते की व्यक्तीचे वैशिष्ट्य हे ती काय करते येवढ्यावरूनच प्रदर्शित होत नसून, ती ते कसे करते येवढ्यावरूनही प्रदर्शित होत असते, आणि या बाबतीत, जर व्यक्तिगत पात्रे काहीशा अधिक ठळकपणाने एकमेकांपासून वेगळी करून दाखविली असती व एकमेकांच्या विरोधात मांडली असती, तर नाटकाच्या वैचारिक आशयाला बाधा आली असती असे मला वाटत नाही. प्राचीनांचे स्वभावरेखन आताशा अतःपर पुरेसे ठरत नाही आणि या बाबतीत नाट्याच्या विकासामध्ये शेक्स्पियरचे महत्त्व जरा अधिक प्रमाणात हिशेबात घेतले असते तर याच्यामुळे मुळीच हानी झाली नसती असे मला वाटते. परंतु हे आनुषंगिक विषय आहेत आणि यांचा नुसताच निर्देश मी करतो आहे तो अशासाठी की मी तुमच्या नाटकाच्या बाह्यांगाकडे देखील लक्ष दिलेले आहे हे तुम्हाला दिसू शकावे म्हणून.

आता ऐतिहासिक आशयाविषयी सांगायचे म्हणजे त्या काळातल्या चळवळीच्या दोन बाजू तुम्हाला सगळ्यांत जास्त वेधक वाटल्या—सरदारांची राष्ट्रीय चळवळ, तिचा प्रतिनिधी सिकिजेन, आणि मानवतावादी-तत्त्वविचारात्मक चळवळ, तिचाच विकास धार्मिक तत्त्वज्ञानाच्या व धर्मपीठांच्या क्षेत्रामध्ये झाला, म्हणजे धर्मसुधारणेची चळवळ—यांचे चित्रण तुम्ही फारच ठसठशीतपणे व नंतरच्या घडामोडींचा समर्थनीय संदर्भ देऊन केलेले आहे. इथे मला सगळ्यांत जास्त आवडतो तो सिकिन्जेन व बादशाह यांच्या दरम्यानचा प्रवेश आणि पोपचा प्रतिनिधी व ट्रूव्हेसचा आर्चबिशप यांच्या दरम्यानचा प्रवेश. (इथे तुम्ही सुसंस्कृत, राजकीय व तात्त्विकदृष्ट्या दूरदर्शी असा पोपचा प्रतिनिधी —याला सौंदर्यविषयक व अभिजात शिक्षण मिळालेले असते — आणि संकुचित मनोवृत्तीचा धर्मनिष्ठ जर्मन संस्थानिक यांच्यातला विरोध सादर करताना सुंदर व्यक्तिचित्रे रेखाटण्यात तुम्ही यशस्वी झालेले आहात,— असे असूनही हे चित्रण या दोन पात्रांच्या प्रातिनिधिक स्वरूपातून थेट पुढे आलेले आहे.) सिकिन्जेन-काळ या प्रवेशातील शब्दचित्र देखील फारच लक्षणीय आहे. हुट्टेनच्या आत्मचरित्राचा आशय आवश्यक म्हणून तुम्ही यथायोग्यपणे वर्णन केलेला आहे, आणि हा आशय नाटकात आणतांना तुम्ही नक्कीच निकराचे साधन पर्यंत केलेले आहे. पांचव्या अंकातील बाल्थाझार व फ्रॅंझ यांच्या दरम्यानचा संवाद देखील मोठ्या महत्त्वाचा आहे. यामध्ये बाल्थाझार आपल्या धन्याला त्याने अनुसरायला हव्या असलेल्या खऱ्याखुऱ्या क्रान्तिकारक धोरणाचा खुलासा करून सांगतो. इथे खराखुरा शोकपर्यवसायी भाग प्रदर्शित होतो; आणि मला असे वाटते की हा एवढा महत्त्वाचा आहे म्हणूनच यावर तिसऱ्या अंकातच अगोदरच काहीसा जोरदारपणे भर द्यायला पाहिजे

होता; कारण तिथे सोइस्कर अशी कित्येक स्थळे आहेत. परंतु मी पुन्हा किरकोळ बाबींच्या रोखाने घसरायला लागलोय.

त्या काळातील शहरे व संस्थानिक यांची भूमिका देखील अनेक प्रसंगी मोठ्या सुस्पष्टपणे सादर झालेली आहे, आणि अशा प्रकारे, तसे म्हणायचे झाले तर, समकालीन चळवळीचे अधिकृत घटक, नीट रीतीने हिशेबात घेतलेले आहेत. तथापि माझी अशी धारणा झालेली आहे की तुम्ही अनधिकृत, खालच्या श्रेणीतल्या, आणि शेतकरी घटकांवर व त्यांच्या तत्त्वविचारांच्या क्षेत्रातील आनुषंगिक प्रतिनिधींवर योग्य भर दिलेला नाही. शेतकरी चळवळ ही तिच्या परीने सरदारांच्या इतकीच राष्ट्रीय व संस्थानिकांना विरोध करणारी होती, आणि लढ्याच्या प्रचंड व्याप्तीनिशी ती खचली; आणि उलटपक्षी सरदारांनी सिकिन्जरला वाऱ्यावर सोडून देऊन आपली ऐतिहासिक भूमिका म्हणजे हुजऱ्यांची भूमिका तत्परतेने मान्य केली, तिच्या विरोधात ही चळवळ खूपच उठून दिसते. नाटकाचा तुम्ही जो अर्थ लावलेला आहे—आणि माझ्या लेखी तो काहीसा फारच अमूर्त व पुरेसा वास्तववादी नाही हे तुम्ही पाहिले असेलच—तो मान्य करून देखील मला असे वाटते की शेतकरी चळवळ ही अधिक बारकाईने लक्ष देण्याच्या योग्यतेची आहे. फ्रिझ जोस बरोबरचा शेतकऱ्याचा प्रवेश जरी वैशिष्ट्यपूर्ण आहे, आणि या "चळवळ्याचे" ठसठशीत व्यक्तिमत्व जरी त्यात खूपच बिनचूकपणे सादर झालेले आहे, तरी देखील तो प्रवेश शेतकऱ्यांच्या असंतोषाचे चित्रण पुरेशा सामर्थ्यानिशी करत नाही—वस्तुतः त्या काळी सरदारांच्या चळवळीच्या तुलनेत या असंतोषाने प्रचंड लोंढ्याचे स्वरूप अगोदरच धारण केलेले होते. नाट्याविषयीच्या माझ्या मतानुसार, आणि हे मत अध्यात्मवादासाठी वास्तववादी भूमिका विसरायला तयार नाही, शिलरसाठी शेक्स्पियर विसरायला तयार नाही, म्हणून त्या काळातील इतक्या अजब विविधरंगी कनिष्ठ समाजाच्या क्षेत्राचा समावेश, याच्या भरीला, नाट्याला उठाव आणण्यासाठी सर्वस्वी नवे साहित्य पुरवून राहिला असता, अग्रभागी असलेल्या सरदारांच्या राष्ट्रीय चळवळीला बहुमोल पार्श्वभूमी पुरवून राहिला असता आणि या चळवळीला योग्य स्वरूपात सादर करून राहिला असता. सरंजामी बंधनांच्या विघटनाच्या या कालखंडामध्ये कितीतरी विचित्र व वेधक नमुने निर्माण झालेले होते, याची उदाहरणे म्हणजे भटके भिकारी राजे, बेकार (lansquents) आणि हरप्रकारचे साहसवाच लोक होते—अशा प्रकारच्या ऐतिहासिक नाटकाला ही फाल्स्टारफच्या धर्तीची पार्श्वभूमी शेक्स्पियरच्या नाटकांतल्यापेक्षा देखील अधिक मोठा परिणाम साधणारी ठरली असती! परंतु याच्याखेरीज मला असे दिसते की शेतकरी चळवळीला नेमके पार्श्वभूमीवर टाकूनच, माझ्या मते सरदारांच्या राष्ट्रीय चळवळीच्या एका उपांगाचे चुकीचे स्वरूप दाखवायची तुम्हाला प्रेरणा झाली असावी आणि त्याच वेळी सिकिन्जेनच्या नशिबातील खराखुरा शेतकरी घटक तुम्ही आपल्या नजरेतून सुटू दिला असावा. मला दिसते ते असे की त्या काळी बादशहाच्या थेट अंकित

असलेले सरदार लोक शेतकऱ्यांशी दोस्ती करायच्या मुळीच विचारात नव्हते. शेतकऱ्यांवर जुलूम करून मिळविलेल्या उत्पन्नावर त्यांचे अवलंबून राहणे याला बाब देत नव्हते. शहरांशी दोस्ती अधिक व्यहार्य ठरली असती. परंतु अशी दोस्ती करण्यात आली नाही, किंवा जी करण्यात आली ती फारच मर्यादित प्रमाणात करण्यात आली. परंतु सरदारांची राष्ट्रीय क्रान्ती केवळ शहरे व शेतकरी यांच्याशी दोस्ती करण्याच्या योगानेच, विशेषतः शेतकऱ्यांशी दोस्ती करण्याच्या योगानेच साधता आली असती. माझ्या मते इथेच एकंदर शोकान्तिकेचे मूळ आहे. म्हणजे शेतकऱ्यांशी दोस्ती ही मूलभूत आहे अशक्य होऊन बसली, आणि म्हणून सरदारांचे धोरण संकुचित असणे भाग पडले आणि ज्याक्षणी सरदारांना राष्ट्रीय चळवळीचे नेतृत्व करायला हवे होते त्याच क्षणी राष्ट्राच्या बहुजनसमाजाने, शेतकऱ्यांनी, त्यांच्या नेतृत्वाचा निषेध केला आणि अशा प्रकारे हे नेतृत्व अवश्यमेव खचून जाणे भाग होते. सिकिन्जेनचा संबंध शेतकऱ्यांशी काही ना काही स्वरूपात खरोखरीच होता या तुमच्या गृहीत धरण्याला इतिहासात कितीसा आधार आहे याचा मला निर्णय देता येत नाही, आणि खरोखरी त्याला काही महत्त्वही नाही. ओघाओघात सांगायचे म्हणजे माझ्या आठवणीनुसार जिथे जिथे हुट्टेन आपल्या लेखनात शेतकऱ्यांना उद्देशून लिहितो तिथे तिथे तो सरदारांविषयीच्या या नाजूक प्रश्नाचा नुसता ओझरता उल्लेख करतो आणि शेतकऱ्यांच्या संतापाचा रोख धर्मोपदेशकांवर केन्द्रित करू पाहतो. परंतु सिकिन्जेन व हुट्टेन यांचा उद्देश शेतकऱ्यांचे बंधविमोचन करण्याचा असल्याने चित्रण करायच्या तुमच्या हक्कावर मी अजिबात आक्षेप घेत नाही. तथापि याच्या योगाने ते दोघेही याच्या निश्चितपणे विरुद्ध असलेले सरदार व शेतकरी याच्या दरम्यान सापडले असा शोककारी अन्तर्विरोध तावडतोब तुमच्या पुढ्यात उभा राहिला. इथेच, माझ्या मते, ऐतिहासिक दृष्ट्या आवश्यक सिद्धान्त आणि तो अमलात आणायची व्यावहारिक अशक्यता यांच्या दरम्यानचा शोककारी संघर्ष आढळला. या उपांगाकडे दुर्लक्ष करून तुम्ही शोककारी संघर्षाची व्याप्ति अधिक लहान करून ठेवता, म्हणणे असे की सिकिन्जेनने बादशहा व साम्राज्य यांना तावडतोब हात घालायच्या ऐवजी केवळ एका संस्थानिकाला हात घातला (मात्र इथे देखील तुमची अचूक उपजतबुद्धि तुम्हाला शेतकऱ्यांना आणायला भाग पाडते) आणि सरदारांच्या बेपर्वाईच्या व भेकडपणाच्या परिणामी, तुम्ही त्याला खुशाल नष्ट होऊ देता. परंतु तुम्ही जर अगोदरच शेतकऱ्यांची गाजणारी चळवळ व सरदार लोकांची मनोवृत्ति अधिक ठाशीवपणाने पुढे आणली असती तर याची हेतुपूर्वकता अगदीच वेगळी झाली असती, आणि ही सरदारमंडळी तर बुन्डेस्चूह व आर्मेकॉन्राड यांच्या[२७] अगोदरच्या शेतकरी कटांच्या कारणाने अधिकच दुरारार्ध्य झालेली होती. अर्थात शेतकऱ्यांची व खालच्या वर्गाची चळवळ नाटकात अन्तर्भूत करता येण्याजोगी ही फक्त एक रीत आहे. असे करायच्या किंवा अधिक चांगल्या प्रकारे करायच्या किमानपक्षी दहा तरी इतर रीती कल्पिता येण्याजोग्या आहेत.

यावरून तुम्हाला हे दिसून येत आहे की सौंदर्यविषयक व ऐतिहासिक अशा दोन्ही दृष्टिकोनातून तुमच्या लेखनाच्या बाबतीत मी फार उच्च म्हणजे सर्वोच्च अपेक्षा धरतो आहे आणि इथे एक आक्षेप घे व तिथे एक आक्षेप घे असे करणे मला भाग पडावे हा तुमच्या लेखी माझ्या पसंतीचा सर्वोत्तम पुरावा आहे. आमच्यामध्ये आपसात, खुद्द पक्षाच्या हितसंबंधांसाठी टीका ही वर्षानुवर्षे अवश्यमेव शक्य तितकी उघड होत आलेली आहे; तथापि सर्वसाधारण मानाने पाहता आपला पक्ष कोणत्याही क्षेत्रामध्ये प्रकट झाला तरी तो सदैव श्रेष्ठ कामगिरी बजावतो याचे नवे प्रत्यंतर आले म्हणजे मी आणि आम्ही सगळेच सदैव खूष झालेलो असतो. आणि ते तुम्ही तुमच्या बाबतीत देखील केलेले आहे.

मार्क्स/एन्गल्स, वेर्के, खंड २९ वा, १९६७,
पृष्ठे ६००-०५

संकीर्ण विषय

भाषा आणि साहित्य

१

विचारांचे परिवर्तन भाषेमध्ये अशा रीतीने होते की त्यांचे वैशिष्ट्य हरवून बसते, तर उलटपक्षी मालाच्या शेजारी जशा किंमती अस्तित्वात असतात, तसे विचारांचे सामाजिक स्वरूप त्यांच्या शेजारी भाषेमध्ये अजूनही अस्तित्वात असते. विचार हे भाषेपासून अलगपणे अस्तित्वात नसतात. जे विचार प्रसार होण्यासाठी व विनिमययोग्य होण्यासाठी त्यांच्या मूळ मातृभाषेपातून परभाषेत प्रथम अनुवादणे भाग असते, ते अगोदरच अधिक प्रमाणात एक सारखेपणा सादर करतात; तथापि हा सारखेपणा मग भाषेत नसतो, परंतु त्याच्या परकेपणात असतो.)

कार्ल मार्क्स, अर्थशास्त्राच्या रूपरेखा
(कच्चा मसुदा)
कार्ल मार्क्स, Grundrisse der
kritik der politischen Okonomie
बर्लिन, १९५८, पृष्ठ ८०.

२

दैनंदिन व्यवहारातील जर्मन भाषेचा बोजडपणा, त्याची सांगड अत्यंत कठीण विषयांचा ऊपापोह करण्यातील तिचा प्रचंड सोइस्करपणा याच्याशी घालणे हे अशा वस्तुस्थितीचे कारण--किंवा लक्षण?—आहे की बहुतेक क्षेत्रांमध्ये मोठ्यात मोठे जर्मन आहेत. परंतु त्याच वेळी सामुदायिक पैदाशी महाभयंकर कचरा आहेत. साहित्य : इंग्लंडमधील अनेक दुय्यम दर्जाचे कवी आणि बहुतेक सगळे फ्रेंच साहित्य व्यापणारे तेजस्वी मध्यम दर्जाचे लेखक यांची जर्मनीमध्ये जवळ जवळ संपूर्ण उणीव

आहे. आमचे दुय्यम दर्जाचे कवी एका पिढीनंतर वाचनीय असे जवळ जवळ राहातच नाहीत. तीच गोष्ट तत्त्वज्ञानाला लागू पडते. कान्ट व हेगेल यांच्या जोडीला आपल्याला हेर्बार्ट, क्रूग, फ्राइज आणि शेवटचे म्हणजे शोपेनहोअर आणि हार्टमान्न असे आपल्याला आढळतात. महापुरुषांच्या प्रतिभेला सुशिक्षित बहुजनसमाजामध्ये विचाराच्या अभावाची जोड असते आणि परिणामतः "विचारवन्तांचे राष्ट्र" या वर्णनाइतके समर्पक वर्णन कोणतेच नसते. हीच गोष्ट लक्षावधी साहित्यिकांना लागू पडते. फक्त भाषेचा कमी अधिक संबंध नसलेल्या प्रकरणांमध्ये परिस्थिती वेगळी आहे आणि दुसऱ्या श्रेणीतले लोक देखील जर्मनीचे महत्त्वाचे ठरतात; ही गोष्ट निसर्गविज्ञानाला-विशेषेकरून, संगीताला लागू पडते. आमचे ऐतिहासिक लेखन वाचण्यायोग्य नसते.

फ्रेडरिक एन्गल्स, "फ्रान्स आणि जर्मनी यांच्या इतिहासाविषयीचे साहित्य"

फोटो प्रतीनुसार प्रकाशित

काव्य लेखनातील कल्पकता

महान कल्पक हे महान कवीदेखील असल्याचे कुणी कधी तरी ऐकले आहे काय ! ते काव्याच्या क्षेत्रात असतात. तसेच राजकारणात असतात. क्रान्त्या कधीही ऑर्डरीप्रमाणे होत नसतात. '४८ आणि '४९ या वर्षाच्या भयंकर अनुभवानंतर, राष्ट्रीय क्रान्त्यांना प्रेरणा द्यायला दूरस्थ नेत्यांच्या कागदी आवाहनांहून काही तरी अधिकाची जरूरी लागते.

कार्ल मार्क्स, "मिलानचा दंगा"
इंग्रजीत लिहिलेले

न्यूयॉर्क डेली ट्रिब्यून, अंक ३ रा,
तारीख ८ मार्च १८५३

साहित्यिक शैलीविषयी

१

प्रुधाँ याचे अगोदरचे प्रयत्न मला अतःपर आठवत नाहीत. वैश्विक भाषेविषयीचे त्याचे शाळकरी लेखन हेच दाखवून देते की ज्या समस्यांच्या सोडवणुकीसाठी त्याला प्राथमिक ज्ञानाची देखील उणीव होती त्या समस्या हाती घ्यायला तो जवळजवळ मुळीच कचरत नसे.

त्याचा पहिला ग्रंथ मालमत्ता म्हणजे काय ? हा सर्वार्थाने त्याचा सर्वोत्तम ग्रंथ आहे. तो युगप्रवर्तक आहे, म्हणजे त्याच्या आशयाच्या नावीन्यासाठी नसला तरी किमानपक्षी ज्या नव्या व साहसी रीतीने जुन्या गोष्टी सांगितलेल्या आहेत त्यांच्यासाठी तरी तो युगप्रवर्तक आहे. त्याला माहीत असलेल्या फ्रेंच समाजसत्तावाद्यांच्या व कम्युनिस्टांच्या ग्रंथांमध्ये "मालमत्ता" ही अर्थात् विविध मार्गांनी टीकेचा विषय झालेली होती इतकेच नव्हे, तर मनोराज्य- वादी धर्तीवर ती "रद्द देखील करण्यात आली होती." या ग्रंथामध्ये प्रुधाँचे जे नाते सेंटसायमन व फूरियेर यांच्याशी आहे ते हेगेलशी फॉयरबाखच्या नात्यासारखेच जवळ जवळ आहे. हेगेलशी तुलना केल्यास फॉयरबाख वैचारिकदृष्ट्या कमालीचा दरिद्री आहे. असे असूनही हेगेलच्या मागाहून तो युगप्रवर्तक ठरला, कारण त्याने अशा काही मुद्यांवर भर दिला की जे खिस्ती जाणिवेला गैर वाटतात. परंतु टीकेच्या प्रगतीसाठी महत्त्वाचे आहेत आणि हेगेलने गूढ अर्धवट-दुर्बोधतेत तसेच सोडून दिले जातात.

प्रुधाँच्या या ग्रंथामध्ये, मला जर ही शब्दयोजना वापरायला मोकळीक असेल तर, अजूनही सामर्थ्यवान पीळदार शैलीचा प्रभाव आहे. आणि या ग्रंथाची शैली हाच माझ्या मते याचा मुख्य गुण आहे. आपल्याला असे दिसून येते की जिथे तो जुन्या गोष्टींची नुसती अवतरणे देत आहे तिथे देखील हा प्रुधाँ स्वतंत्र शोध लावतो; म्हणजे तो जे म्हणतो ते त्याला स्वतःला नवीनच होते, म्हणून त्याची गणना तो नव्यात करतो. चिथावणीखोर आव्हान, आर्थिक क्षेत्रांतल्या "पवित्रांतल्या पवित्रांवर" हात टाकणे, भांडवलदारी व्यवहारज्ञानाचे विडंबन करणारा बहारदार विरोधाभास, घणाघाती टीका, कडवट उपरोध आणि जे अस्तित्वात आहे त्याच्या लाजिरवाणेपणाविषयी अधून मधून दिसून येणारी संतापाची सखोल व अस्सल भावना—या सगळ्यामुळे मालमत्ता म्हणजे काय ? हे पुस्तक प्रथम प्रकाशात आले त्या वेळी ते विजेच्या धक्क्यासारखा परिणाम साधून गेले आणि त्याने फार मोठा प्रभाव निर्माण केला. अर्थशास्त्राच्या काटेकोर शास्त्रीय इतिहासात हे पुस्तक उल्लेख करण्याच्या योग्यतेचे देखील ठरणार नाही. परंतु अशा प्रकारचे सनसनाटी ग्रंथ सभ्य साहित्यांतल्या प्रमाणेच विज्ञानांमध्ये देखील आपली

भूमिका बजावतात. उदाहरणार्थ, लोकसंख्येविषयी हा माल्थसचा ग्रंथ घ्यावा. त्याच्या पहिल्या आवृत्तीत हा ग्रंथ म्हणजे एक "सनसनाटी पुस्तिका" होती आणि यात भरीला भर म्हणजे अथपासून इतिपर्यंत हे वाङ्मयचौर्य होते. आणि असे असूनही मानव जातीची बदनामी करणाऱ्या या ग्रंथाने केवढी तरी प्रेरणा निर्माण केली!

कार्ल मार्क्स, "प्रुधाँविषयी"

मार्क्स आणि एन्गल्स, निवडक ग्रंथ,
खंड २ रा, मॉस्को, १८७५, पृष्ठे २४-२५

२

माझ्या ग्रंथाविषयी[२८] सांगायचे म्हणजे मला तुमच्यासमोर निर्भेळ सत्य मांडायला हवे आहे. तत्त्वविचारात्मक भाग (पहिल्या तीन खंडांचा) पुरा करण्यासाठी तीन प्रकरणे अजून लिहायची आहेत. मग चवथा खंड,[२९] त्याचा ऐतिहासिक व साहित्यिक भाग, लिहायचा राहिलेला आहे. सापेक्षद्वंद्वाच्या बोलायचे म्हणजे मला हा भाग सगळ्यात जास्त सोपा आहे, कारण सगळ्या समस्या पहिल्या तीन खंडांमध्ये सुटलेल्या आहेत; परिणामतः शेवटचा खंड म्हणजे ऐतिहासिक स्वरूपातली जराशी पुनरुक्ती आहे. तथापि सगळे माझ्यासमोर हजर असल्याखेरीज काही हातावेगळे करायला माझे मन घेत नाही. त्यांच्यात काहीही उणीवा असल्या तरी माझ्या ग्रंथांचा एक गुण हा आहे की ती एक कलात्मक परिपूर्ण अशी कृति आहे, आणि हे जे साधले आहे ते केवळ माझ्या पद्धतीने साधले आहे.—सगळे खंड त्यांच्या परिपूर्ण स्वरूपात माझ्या पुढ्यात असायच्या अगोदर मी ते छापून घेत नाही, ही ती पद्धती. जेकब ग्रिम पद्धतीचा[३०] वापर करणे अशक्य आहे, कारण ही पद्धति विरोध विकासात्मकद्वंद्वाच्या मूर्तरूप न दिलेल्या ग्रंथांच्या बाबतीत सर्वसाधारणपणे अधिक चांगल्या प्रकारे सोईची असते.

मार्क्स यांचे एन्गल्स यांस पत्र
तारीख ३१ जुलै १८६५

मार्क्स/एन्गल्स, वेर्के,
खंड ३१ वा, १९६५, पृष्ठ १३२

३

व्होग्सित्चे [३१] यामध्ये (आणि चार वेगवेगळ्या लोकांनी याची एकेक प्रत मजकडे धाडली आहे) ज्या गाढवाने तो लेख लिहिलेला आहे, त्याने आमच्या भल्या जुन्या जर्मनीत दुःखी मार्क्सविषयी बरेच दुःख खदखदायला लावलेले दिसते. मी काहीतरी गंमत करायच्या मूडमध्ये असलो म्हणजे बहुधा मी त्याला एक झकास-पैकी लाथ मारेन. या बैलोबांनी जर कधी काळी मूर आणि मी स्वतः यांच्या दरम्यानचा पत्रव्यवहार वाचला, तर त्यांची दातखीळच बसेल. आमच्या खोडकर हसऱ्या गद्याच्या तुलनेत हायनेचे काव्य म्हणजे पोरखेळ ठरतो. मूर रागाने चिडला असेल पण रडणे— Jamais ! ती जुनी पत्रे मी पुन्हा वाचली त्या वेळी हसता हसता मी गडबडा लोळण घेतली. हा पत्रव्यवहार ऐतिहासिक दृष्टिकोनातून देखील लक्षणीय आहे आणि माझ्यावर जितक्या प्रमाणात हे अवलंबून आहे तितक्या प्रमाणात योग्य हातात सोपविण्यात येणार आहे. दुर्दैवाची गोष्ट अशी की माझ्याजवळची मार्क्सची पत्रे फक्त १८४९ पासूनचीच आहेत, पण किमानपक्षी ती परिपूर्ण तरी आहेत.

एन्गल्स यांचे एदुआर्द बर्नस्टीन यास पत्र,
तारीख १२-१३ जून १८८३

मार्क्स/एन्गल्स, वेर्के, खंड ३६ वा, १९६७,
पृष्ठ ३६

४

आमची शैली व विरामचिन्हे यांच्याविरुद्ध आक्षेप घेणाऱ्या शुद्धतावाद्याला जर्मन किंवा इंग्रजी माहीत असू शकत नाही, नाहीतर जी इंग्रजी वळणे मुळी अस्तित्वातच नाहीत ती तो शोधून काढणार नाही. त्याला एवढे प्रिय असलेले जर्मन म्हणाल, तर ते शाळेत आमच्या डोक्यात कोंबून घातलेले, त्यातली ती दळभद्री लांबलचक वाक्ये आणि क्रियापदे कर्त्यापासून मधल्या दहा मैल लांबीच्या भागाने अलग झालेली आणि वाक्यांच्या शेवटी लोंबत असलेली. — हे बिन-शिकण्यासाठी माझी तीस वर्षे खर्ची पडली. हे नोकरशाही धर्तीचे शाळामास्तरी जर्मन आहे, याच्या लेखी लेस्सिंग मुळी अस्तित्वातच नाही, आणि हे जर्मन आज खुद्द जर्मनीतून देखील नाहीसे होत आहे. या सद्गृहस्थाने जर राइष्टागच्या सदस्यांचे बोलणे ऐकले तर हा काय म्हणेल; त्यांनी या भीतिदायक शब्दरचनांचा त्याग केलेला

आहे, कारण त्यांच्यामुळे जो भयंकर गोंधळ होतो तो त्यांना टाळायचा आहे, आणि ते ज्यूंच्या सारखे बोलतात : "als der Bismarck isl gekommen vor die Zwangswahl, hat er lieber gekusset den Papst auf den Hintern als die Revolution auf den Mund". [बिस्मार्कवर जर पसंतीची सक्ती करण्यांत आली, तर तो क्रान्तीच्या मुखांचे चुंबन घेण्यापेक्षा पोपच्या पार्श्वभागाचे चुंबन घेणे अधिक पसंत करील], इत्यादि. या प्रगतीबद्दल लास्केर्चेन जबाबदार आहे आणि जिच्याबद्दल तो जबाबदार आहे अशी ही एकमेव चांगली गोष्ट आहे. हेर्र शुद्धतावादी जर आपले शाळामास्तरी जर्मन घेऊन जर्मनीला आला तर "तुम्ही 'अमेरिकन' बोलता" असे लोक त्याला सांगतील. "विद्वान जर्मन तुच्छतावादी (फिलिस्टाइन) किती संकुचित मनोवृत्तीचा असतो हे तुम्हाला ठाऊक आहेच," विशेषेकरून अमेरिकेत तो असा दिसतो. जर्मन वाक्यरचना व विरामचिन्हे जी चाळीस अगर पन्नास वर्षांपूर्वी शिकविण्यात येत असत, ती केवळ कचऱ्याच्या टोपलीत फेकण्याच्या योग्यतेची आहेत. हेच आज जर्मन लोक करत आहेत.

एन्गल्स यांचे फ्राइड्रिख सोर्जे यास पत्र
तारीख २९ एप्रिल १८८६

मार्क्स/एन्गल्स, वेर्के, खंड ३६ वा, १९६७,
पृष्ठ ४७७.

साहित्यिक वादविवादांविषयी

१

आणि त्याचा "उत्तेजनकारक परिणाम होणार" आहे असे समजण्यात येते ! त्याची परिणती वस्तुतः त्याच धर्तीवर झालेली आहे, परंतु हेर्र ब्रेन्टानो यांची तशी इच्छा होती म्हणून नव्हे. मार्क्सने आणि मागाहून त्याच्या कन्येने आणि आता मी अशा सगळ्यांनीच या वादविवादाची[३२] विनोदी बाजू सादर करायचा प्रयत्न केलेला आहे. परंतु यामध्ये आम्ही जे काही मोठे किंवा लहान यश संपादन केले आहे, ते हेर्र ब्रेन्टानो यांचा बळी देऊनच संपादन केले आहे. त्यांचे लेख "उत्तेजनकारक" मुळीच नाहीत. त्यांमधला करमणूक होण्याजोगा जो भाग आहे तो सर्वस्वी मार्क्स यांच्या "अजूनही अज्ञात व्यक्तिमत्वाच्या" वरवरच्या स्वरूपावर जे टोले लगावतो, त्यांच्यामुळेच आहे. आणि टोले खाणारे हे गृहस्थ आता उशीरा त्या टोल्यांना "त्याच्या शिवराळ

वादावादीतील उर्मटपणाचे मासले" म्हणून बाजूला सारायला मागत आहेत. व्हॉल्टेअर, बोमार्शाय आणि पॉल लुई कुरिये यांच्या धारदार वादविवादांचे विरोधक म्हणजे जमीनदार, व्यापारी, वकील व इतर कर्तबगार विरोधक या वादविवादांना "शिवराळ वादावादीतले उर्मटपणाचे प्रकार" असे लेबल लावत असत, परंतु याच्यामुळे आज या "उर्मटपणाच्या प्रकारांना" आदर्श व उत्कृष्ट वाङ्मय म्हणून मानले जायला प्रतिबंध झालेला नाही आणि या आणि "शिवराळ वादविवादांच्या" इतर आदर्श नमुन्यांनी आम्हाला एवढा आनंद लाभला आहे की आम्हाला जर्मन विद्यापीठीय वादविवादांच्या क्षेत्रांत गुंतायला शंभर ब्रेन्टानोंना देखील यश मिळणार नाही. त्या विद्यापीठांमध्ये नेभळट दुष्टावा आणि निव्वळ हेवा आणि अत्यंत उदासवाणा कंटाळवाणेपणा यांचेच अधिराज्य आहे.

फ्रेडरिक एन्गल्स, खोटा उतारा दिल्याच्या आरोपावरून मार्क्सविरुद्ध ब्रेन्टानो यांनी घातलेल्या वादविवादाविषयी

मार्क्स/ एन्गल्स, वेर्के,
खंड २२ वा, १९६८, पृष्ठे ११५-१६

२

परंतु, हेर त्काचोव म्हणतात की मी त्यांच्याविरुद्ध "हर एक प्रकारच्या जास्तीत जास्त शिव्यांचा वापर" केलेला आहे. आता एक विशिष्ट प्रकारची शिवीगाळ, तथाकथित बोचक भाषा, हा वक्तृत्वाचा अत्यंत परिणामकारक प्रकार असतो, आणि हिचा वापर जरूर लागेल तेव्हा सगळे मोठमोठे वक्ते करतात आणि सगळ्यात जास्त सामर्थ्यशाली इंग्रज राजकीय लेखक विल्यम कॉबेट याच्या अंगी या बोचक भाषेवर येवढे प्रभुत्व आहे की अजून देखील याचे कौतुक होत असते आणि हा आदर्श म्हणून कामी येतो आणि याची बरोबरी करणारा अजूनही झालेला नाही.

एन्गल्स, Fluchthlings Literature IV

मार्क्स/एन्गल्स, वेर्के, खंड १८ वा, १९६९,
पृष्ठ ५४९

३

सहा जहाल वृत्तपत्रांविरुद्ध रोख असलेला स्टार या[३३] वृत्तपत्राच्या गेल्या अंकांतला ओकॉन्नरचा लेख तुम्ही वाचला पाहिजे. हा शिवराळपणाचा सर्वोत्तम नमुना आहे, अनेक बाबतीत कॉबेटपेक्षा चांगला आहे आणि शेक्स्पियरची आठवण करून देणारा आहे.

एन्गल्स यांचे मार्क्स यास पत्र
तारीख २५-२६ ऑक्टोबर १८४७

मार्क्स-एन्गल्स, वेर्के, खंड २७ वा,
१९६५, पृष्ठ ९९.

४

आता[३४] हे वृत्तपत्र जर्मनीतील आपल्या लोकांना खरोखरीच उत्तेजन व आनंद देऊ शकते, आणि याची त्यांच्यापैकी काही जणाना फारच जरूरी आहे–निदान पक्षी तथाकथित नेत्यांना. रडकथांनी भरलेली अनेक पत्रे मला पुन्हा आलेली आहेत आणि त्यांना मी योग्य रीतीने उत्तरे लिहिली आहेत. बियेरेक देखील सुरुवातीला फारच उदासवाणा होता, परंतु लंडनच्या खुल्या हवेतले दोन दिवस त्याला त्याचा उल्हसितपणा परत मिळवून द्यायला पुरेसे ठरले. वृत्तपत्राने ही खुली हवा जर्मनीला नेलीच पाहिजे, आणि हे उद्दिष्ट मुख्यत्वेकरून शत्रूची संभावना तिरस्काराने व उपहासाने करायच्या योगानेच साध्य होईल. लोक जेव्हा बिस्मार्क आणि कंपनीला नुसतेच हसायला पुन्हा शिकतील तेव्हा बरेचसे पदरात पडलेले असेल. तथापि आपण हे विसरता कामा नये, की याच्यासारखे काही तरी प्रथमच घडलेले आहे, किमानपक्षी बहुसंख्य जनतेच्या बाबतीत प्रथमच घडलेले आहे आणि विशेषेकरून अनेक चळवळये व संपादक आपल्या जराशा सुखासीन जागांवर भलतेच हादरले आहेत. याच कारणास्तव उत्तेजन हवे आहे आणि त्याचबरोबर या गोष्टीची देखील सतत आठवण द्यायला हवी आहे की बिस्मार्क आणि कंपनी हे पहिल्यासारखेच गाढव आहेत, पहिल्यासारखेच Canailles आहेत, पहिल्यासारखीच अनुकंपनीय कळसूत्री बाहुली आहेत, इतिहासाच्या गतीपुढे निष्प्रभ आहेत, खुनांचे[३५] प्रयत्न झाले त्याच्या

अगोदर जसे होते तसेच आहेत. म्हणूनच या बाजारबुणग्यांची फजीती करणारी प्रत्येक थट्टा बहुमोल आहे.

एन्गल्स यांचे एदुआर्द बर्नस्टीन यास पत्र,
तारीख १२ मार्च १८८१

मार्क्स / एन्गल्स, वेर्के, खंड ३५ वा, १९६३,
पृष्ठे १७०-७१

५

म्हणजे तुम्ही देखील शेवटी अशा मताप्रत आले आहात की काही झाले तरी या "शहाण्या माणसांचा" आश्रयाला अगदी चांगला समाचार घेता आला पाहिजे. मी Neue Welt [३६] च्या काही प्रती मागविल्या आहेत, म्हणजे या सद्गृहस्थांची Chez Vux@ माहिती व्हावी. आतापर्यंत मी नुसता अग्रलेखाचाच भाग वाचलेला आहे. जर्मन शाळकरी मुलाचा उर्मटपणा आहे, फारच मिळमिळीत वाचकवर्ग गृहीत धरलेला आहे.

बाकीच्या बाबतीत सांगायचे म्हणजे कानपिचक्यांनी स्वतःला विचलित होऊ देऊ नका, हा लढाईतला पहिला नियम आहे. हे काव्यचरण लक्षात ठेवा :

There's nothing nicer in this world [३६]
Than all one's foes to answer back,
Than about all those clumsy blokes
One's feeble little jokes to crack.

अधिक साजिरे जगामधी या काय असे सांगा
वैऱ्यांचा आमुच्या सगळ्या मुखभंग कराया मिळणे
या महामहा मूर्खांची छान छान टिंगल करणे
याहुनी साजिरे अधिक काय असणार ?

एन्गल्स यांचे एदुआर्द बर्नस्टीन यास पत्र
तारीख २९ जून १८८४

मार्क्स/एन्गल्स, वेर्के, खंड ३६ वा, १९६७,
पृष्ठ १७२

@ त्यांच्या स्वतःच्या तोंडून— संपादक

अनुवादाविषयी

१

पहिल्या प्रकरणाच्या अनुवादाविषयी मतप्रदर्शन
सर्वसाधारणपणे :

१. पी [येपेर] याला अनुवाद करण्यापेक्षा इंग्रजीत स्वतंत्र लिहिण्याचा सराव अधिक आहे हे उघड दिसते. म्हणून त्याने एखादा शब्द सुचत नसल्यास शब्दकोश या ज्ञात साधनांतील सगळ्यात वाईट साधनाचा आधार घेण्याच्या बाबतीत खूपच अधिक सावध राहिले पाहिजे. कारण १०० पैकी ९९ बाबतीत याच्या योगाने त्याला अपरिहार्यपणे कमीत कमी सोईचा शब्द उपलब्ध होईल आणि समानार्थक शब्दांचा घातक गोंधळ अनिवार्यपणे होईल. याची उदाहरणे पुढे दिली आहेत.

२. पी [येपेर] याने प्राथमिक इंग्रजी व्याकरणाचा अभ्यास करावा. तो त्याच्या अनेक चुका करतो — विशेषेकरून उपपदाच्या वापराच्या बाबतीत. वाक्यरचनेच्याही चुका आहेत.

३. इतर सगळ्या गोष्टींपेक्षा अधिक महत्त्वाची गोष्ट म्हणजे पी [येपेर] याने शहरी मध्यम-वर्गीय वाङ्मयीन शैलीत आपली घसरगुंडी होऊ देण्याच्या बाबतीत सावध राहिले पाहिजे; याची कित्येक फारच चिंताजनक उदाहरणे आहेत.

४. पी [येपेर] फ्रेंच भाषेतले तद्भव शब्द जरूरीपेक्षा जास्त प्रमाणात उपयोगात आणतो. हे शब्द कधी कधी सोइस्कर असतात हे खरे आहे, कारण त्यांचा अधिक अमूर्त व कमी रेखीव अर्थ हा अनेकदा शृंगापत्तीतून बाहेर पडण्याचा एक मार्ग होऊन बसतो. तथापि याच्यामुळे सर्वोत्तम उपमा उत्प्रेक्षांची रसहानी होते आणि त्या इंग्रजी वाचकांना अगदीच अनाकलनीय होऊन बसतात. जिथे मुळामध्ये ठसठशीत समूर्त प्रतिमा आहेत तिथे सॅक्सन भाषेच्या तद्भव शब्दांमध्ये तितकीच समूर्त ठसठशीत अभिव्यक्ती उपलब्ध आहे आणि ही शब्दयोजना इंग्रजी वाचकाला सगळ्या गोष्टी ताबडतोब स्पष्ट करून दाखवील.

५. जिथे कठीण उतारे असतील, तिथे शब्दशः अनुवाद करायच्या निमित्ताने पी [येपेर] याला स्वतःला संपूर्ण अर्थशून्य असल्याचे माहीत असताना काही तरी लिहिण्याऐवजी तिथे मागाहून भरून काढण्यासाठी जागा मोकळी सोडणे अधिक चांगले.

६. मुद्दे १ ते ५ सारांशरूपाने सांगायचे म्हणजे, या अनुवादाविरुद्ध घ्यायचा मुख्य आक्षेप हा आहे की हे अनुवादकार्य अत्यंत निष्काळजीपणाने करण्यात आले आहे. पी [येपेर] जेव्हा जेव्हा खरोखरी प्रयत्न करतो तेव्हा तेव्हा तो काही तरी चांगले साध्य करायला समर्थ असल्याचे प्रत्यंतर आणून देणारे अनेक उतारे आहेत.

पण त्याचा निष्काळजीपणा, पहिली गोष्ट म्हणजे, त्याचे काम वादवितो आणि दुसरी गोष्ट म्हणजे मला दुप्पट काम करायला लावतो. त्याने जर किंचित अधिक प्रयत्न केला असता तर किती तरी उतारे अगदी सर्वोत्कृष्ट उतरले आहेत किंवा उतरू शकले असते.

एन्गल्स यांचे मार्क्स यास पत्र,
तारीख २३ सप्टेंबर १८५२

मार्क्स/एन्गल्स, वेर्के, खंड २८ वा, १९६३,
पृष्ठ १३८.

२

काल मी फॅक्टरी कायद्याविषयीचे प्रकरण फ्रेंच अनुवादरूपाने (भांडवल या ग्रंथाच्या) [३८] वाचले. डौलदार फ्रेंचमध्ये ज्या कौशल्याने हा अनुवाद केलेला आहे त्याच्याविषयी योग्य आदर ठेवून देखील त्या सुंदर प्रकरणाविषयी मला वाईट वाटते. त्याच्यातले सगळे सामर्थ्य व रसरशीत जिवंतपणा सपशेल नष्ट झाला आहे. मध्यम-दर्जाचा लेखक डौलदारपणाच्या काही प्रमाणानिशी आपली अभिव्यक्ति करण्यापायी भाषेला खच्ची करून ठेवतो. या आधुनिक बांधीव फ्रेंच भाषेत विचार करणे अधिकाधिक प्रमाणात कठीण होत चाललेले आहे. जवळ जवळ सर्वत्रच विद्वत्तापूर्ण औपचारिक तर्कशुद्धतेपायी वाक्याची उलटापालट करणे आवश्यक झाल्यामुळे मुळातला जोर व जिवंतपणा या अनुवादात नाहीसाच होतो. इंग्रजी भाषांतराला आधार म्हणून फ्रेंच अनुवादाचा वापर करणे ही गंभीर चूक होईल असे मला वाटते. मुळातले अभिव्यक्तीचे सामर्थ्य इंग्रजीमध्ये कमी करायची काहीच जरूरी नाही; खऱ्याखुऱ्या विरोधविकासात्मक उताऱ्यांतून जे जे काही अपरिहार्यपणे नाहीसे झालेले असेल ते ते इतर अनेक उताऱ्यांतील इंग्रजी भाषेच्या अधिक मोठ्या सामर्थ्याने व कमी शब्दांत अधिक आशय व्यक्त करण्याच्या ताकतीने भरून निघेल.

ओघाओघात सांगायचे म्हणजे हेर्र फोकोस्की आपल्या भिकार अनुवादाच्या समर्थनपर सबब म्हणून आपण फार कठीण अशा " लीब्नेख्ट्यन-मार्क्सियन " शैलीत लिहितो असे सांगून टाकले आहे. काय अजब गौरव आहे हा !

एन्गल्स यांचे मार्क्स यास पत्र,
तारीख २९ नोव्हेंबर १८७३

मार्क्स / एन्गल्स, वेर्के, खंड ३३ वा, १९६६,
पृष्ठ ९४

३

मार्क्सने तुमच्याकडे धाडलेला एच. जॉर्जवरील टीकालेख आशयदृष्ट्या इतका सुस्पष्टपणे सर्वोत्कृष्ट आहे, शैलीच्या दृष्टीने इतका एकसंध आहे, की मार्क्सच्या प्रतीच्या मार्जिनमध्ये लिहिलेली भोंगळ इंग्रजी टिपणे भरीला घालून त्याचे सामर्थ्य कमी करणे ही शरमेची गोष्ट ठरते. या टिपणांचा उपयोग मागाहून केव्हाही करता येईल. तुम्हाला हे पत्र लिहिलेले आहे ते, मार्क्सची प्रथा होती तदनुसार, भावी काळात त्याचे प्रकाशन संपूर्ण स्वरूपात व्हावे ही दृष्टी ठेवून लिहिलेले आहे. म्हणून तुम्ही हा छापू दिलात तर तुम्ही औचित्यभंग केला असे मुळीच होणार नाही. तो इंग्रजीत प्रसिद्ध व्हायचा असेल तर तुमच्यासाठी मी याचा अनुवाद करीन. कारण जाहीरनाम्याच्या[३९] अनुवादाने पुन्हा एकदा दाखवून दिल्यानुसार आमच्या जर्मन लेखनाचा आशय साहित्यिक, व्याकरणशुद्ध इंग्रजीत सादर करू शकणारा तिकडे कुणी असेलसे दिसत नाही. त्याच्यासाठी दोन्ही भाषांतील साहित्यिक अनुभव असायला पाहिजे, आणि नुसताच दैनिक वृत्तपत्रांसाठी लिहायचा अनुभव नव्हे. जाहीरनाम्याचा अनुवाद करणे ही भयंकर कठीण गोष्ट आहे. मी पाहिलेल्या अनुवादांमध्ये रशियन अनुवाद हे सर्वोत्तम आहेत.

एन्गल्स यांचे फ्रेडरिख सोर्जे यास पत्र,
तारीख २९ जून १८८३,

मार्क्स/एन्गल्स, वेर्के, खंड ३६ वा, १९६७,
पृष्ठ ४५.

४

प्रिय बर्नस्टीन,

एका गोष्टीच्या बाबतीत तुम्ही खात्री बाळगू शकता : तुमच्यापेक्षा अधिक चांगला अनुवादक नाहीच.[४०] पहिल्या पहिल्या फोलिओमध्ये आशय बिनचूकपणे व बरोबर उतरविण्याच्या प्रयत्नात तुम्ही वाक्यरचनेकडे काहीसे दुर्लक्ष केले आहे— voila. tout. याच्या भरीला, मला मार्क्सची वैशिष्ट्यपूर्ण शैली या अनुवादात आणायची होती, आणि तुम्हाला तर तिचा सराव नाही; म्हणून अनेक फेरबदल करावे लागले.

एकदा जर्मनमध्ये आशय सादर केल्यानंतर तुम्ही हस्तलिखित पुन्हा एकदा वाचा आणि वाक्यरचना सोपी करण्याच्या दृष्टीने वाचा आणि त्याच वेळी, ज्या ज्या ठिकाणी शक्य असेल तिथे तिथे बोजड, शाळामास्तरी वाक्यरचना टाळायची आठवण

ठेवा; तिच्यामध्ये उपवाक्यांच्या अखेरीस क्रियापद सतत ठेवलेले असते (आणि आम्हा सगळ्यांच्या डोक्यात ही घोकून बसविलेली आहे. मग तुम्हाला अडचण मुळीच येणार नाही आणि तुम्ही स्वतःच सगळे ठीकठाक कराल.

एन्गल्स यांचे एदुआर्द बर्नस्टीन यांस पत्र,
तारीख ५ फेब्रुआरी, १८८४

मार्क्स/एन्गल्स, वेर्के, खंड ३६ वा, १९६७,
पृष्ठ ९७.

५

असल्या ग्रंथाचा@ अनुवाद करायला साहित्यिक जर्मन भाषेचे बऱ्यापैकी ज्ञान असणे पुरेसे नाही. मार्क्स दैनंदिन जीवनातील शब्दप्रयोगांचा व प्रांतिक बोलीभाषांतील वाक्प्रचारांचा मुक्तपणे उपयोग करतो; तो नवे शब्द तयार करतो; तो आपले दाखले विज्ञानाच्या प्रत्येक शाखेतून घेतो; त्याने एक डझन भाषांच्या साहित्यातून दृष्टान्त दिलेले आहेत; मार्क्स समजून घेण्यासाठी माणसाचे जर्मन भाषेवर प्रभुत्व तर असलेच पाहिजे, जर्मन बोलीभाषेवर तसेच लिखित जर्मनवर प्रभुत्व असले पाहिजे आणि त्याला जर्मन जीवनाविषयी काही तरी माहीत असले पाहिजे.

याचे एक उदाहरण घेऊ या. ऑक्स्फोर्डच्या काही पदवीपूर्व विद्यार्थ्यांनी चार वल्ह्यांच्या होडीतून डोव्हरची सामुद्रधुनी ओलांडायचा प्रवास केला, त्या वेळी वृत्तपत्रात अशी बातमी आली की त्यांच्यापैकी एकाने वल्हे चुकीचे मारल्याने ते पाण्याखाली दबून राहिले. याचे वर्णन इंग्रजी वाक्प्रचारानुसार त्याने "खेकडा पकडला" असे करतात. ही बातमी देताना कलोन गॅझेटच्या लंडनच्या वार्ताहराने याचा शब्दशः अर्थ लावला आणि इमानेइतबारे आपल्या वृत्तपत्राला कळविले की "एका वल्हे मारणाऱ्याच्या वल्ह्यात खेकडा अडकला." लंडन शहरात अनेक वर्षे वास्तव्य असलेला माणूस त्याला अज्ञात असलेल्या कलेतल्या तांत्रिक संज्ञा पुढ्यात येताक्षणी असली हास्यास्पद घोडचूक करू शकतो, तर ज्याला पुस्तकी जर्मन भाषेचे केवळ कामचलाऊ ज्ञान आहे असा माणूस ज्याच्या ग्रंथांचे भाषांतर करणे जास्तीत जास्त कठीण आहे अशा जर्मन गद्य लेखकाच्या अनुवादाचे काम पतकरू लागला तर त्याच्याकडून आपल्याला कशाची अपेक्षा करणे भाग पडते! आणि खरोखरीच मिस्टर ब्रॉडहाऊस हे "खेकडे पकडण्यात" अत्यंत प्रवीण आहेत हे आपल्याला नक्कीच दिसेल.

@ कार्ल मार्क्स, भांडवल—संपादक.

परंतु याच्या भरीला आणखी अधिक काही तरी लागते. मार्क्स हा आपल्या युगातील एक अत्यंत तडफदार व संक्षेपी लेखक आहे. त्याचा योग्य अनुवाद करणारा जर्मन भाषेवर प्रभुत्व गाजविणारा असला पाहिजे इतकेच नव्हे, तर इंग्रजीवर देखील प्रभुत्व गाजविणारा असला पाहिजे. तथापि मिस्टर ब्रॉडहाऊस हा प्रतिष्ठित पत्रकारिता-कर्तृत्व-संपन्न असल्याचे उघड दिसत असले तरी त्यांचे प्रभुत्व रूढ वाङ्मयीन प्रतिष्ठितपणाने व प्रतिष्ठितपणात उपयोगात आणायच्या इंग्रजीच्या मर्यादित व्याप्तीपुरते आहे. या क्षेत्रात ते सहज वावरतात; परंतु अशा प्रकारची जी इंग्रजी भाषा आहे, तीत दास कापिटालचे भाषांतर कधीच करता येणार नाही. सामर्थ्यशाली जर्मन भाषेच्या अनुवादाला सामर्थ्यशाली इंग्रजी भाषा लागते; भाषेच्या उत्तमोत्तम साधनसामुग्रीचा आधार घ्यावा लागतो; नव्याने निर्माण केलेल्या जर्मन संज्ञा अनुवादताना तशाच प्रकारच्या नव्या संज्ञा इंग्रजीत निर्माण कराव्या लागतात. परंतु मिस्टर ब्रॉडहाऊस यांना अशा अडचणीला तोंड द्यायची पाळी आली, म्हणजे त्यांची साधनसामुग्री त्यांना दगा देते इतकेच नव्हे, तर त्यांचे धैर्य देखील त्यांना दगा देते. आपल्या मर्यादित शब्दभांडाराचा कमीत कमी विस्तार करायची पाळी त्यांच्यावर आली दैनंदिन साहित्यातल्या रूढ इंग्रजीत कमीत कमी नावीन्य आणायची पाळी त्यांच्यावर आली, की ते घाबरतात आणि असले यार करायचा धोका पतकरण्यापेक्षा ते अवघड जर्मन शब्दाचा अनुवाद ते कमीअधिक अनिश्चित संज्ञेने करतात; म्हणजे अशा संज्ञेने की जी त्यांच्या कानाला कटु लागत नाही परंतु जी लेखकाच्या मूळ शब्दाचा अर्थ अस्पष्ट करून ठेवते; किंवा, याहून अधिक वाईट गोष्ट म्हणजे, हा शब्द पुन्हा पुन्हा आल्यावर याचा अनुवाद वेगवेगळ्या संज्ञांची सबंध मालिकाच उपयोगात आणून करतात, म्हणजे तांत्रिक संज्ञेचा अनुवाद एकाच समानार्थक शब्दांत नेहमीच केला पाहिजे, ही गोष्ट ते विसरतात.

फ्रेडरिक एन्गल्स, "मार्क्सचा अनुवाद
कसा करू नये"

इंग्रजीत लिहिलेला लेख

द कॉमनवील, अंक १० वा, नोव्हेंबर १८८५

६

काही का असेना, तू सेनेटर[४१] मध्ये एक अजब गोष्ट केलेली आहेस, म्हणजे इंग्रजीत अनुवाद करायची. या जगातील अत्यंत कठीण गोष्टीच्या बाबतीत तू हे केले आहेस. सगळ्या सुयोग्य अशिष्टपणानिशी तू हे केले आहेस इतकेच नव्हे, तर

मुळातला विनोदीपणा तू जवळ जवळ गाठलेला देखील आहेस. आणि विषय व वृत्त हे दोन्ही अनुवाद करायला बंडखोर आहेत तरी सुद्धा हा एक नंबरच्या साम्राज्यातला[४२] सेनेटर इकडल्या लोकांना अज्ञातच आहे. तू जर मुलगा असतीस तर मी मोलोच्येत्स असे म्हणायला हवे, परंतु रशियन भाषेचा मी पुरेसा दर्दी नाही, म्हणजे त्या शब्द-योजनेचे (इंग्रजीमधील 'यू आर ए ब्रिक' या शब्दयोजनेच्या जवळ येणारी अशीच ती आहे) स्त्रीलिंगी रूप मोलोद्त्झा ! * असे करता येईल का नाही हे मला ठाऊक नाही.

एन्गल्स यांचे लॉरा लाफार्ग हीस पत्र,
तारीख १६ नोव्हेंबर १८८९,

फ्रेडरिक एन्गल्स, पॉल व लॉरा लाफार्ग,
पत्रव्यवहार, खंड २ रा, मॉस्को, १९६०,
पृष्ठ ३४२

७

मत्प्रिय लॉरा,

prosit Neujahr avant tout ! @ Et puis apres,b बॉल्थेर कॉन डेर वोगेलवेइडे याच्या आधुनिकीकृत स्वरूपाचा अनुवाद तू करावास हा विचार मला सहन होऊ शकत नाही, म्हणून मी मूळ गाण्याची प्रत तुला धाडतो आहे. असे तुझे म्हणणे अगदी बरोबर आहे, कवितेच्या प्रत्येक अनुवादामध्ये मुळातले वृत्त आणि चमक ही कायम ठेवलीच पाहिजे. नाही तर फ्रेंचांचा सरधोपट मार्ग पतकारायचा आणि त्याला तावडतोब गद्यरूप द्यायचे.

एन्गल्स यांचे लॉरा लाफार्ग हीस पत्र,
तारीख ८ जानेवारी १८९०

फ्रेडरिक एन्गल्स, पॉल व लॉरा लाफार्ग,
पत्रव्यवहार, खंड २ रा, मॉस्को, १९६०,
पृष्ठ ३५५

---

* हा शब्द मुळात रशियन भाषेतलाच ठेवलेला आहे.
@ सर्वप्रथम, तुला नववर्ष सुखाचे जावो ! – संपादक
b आणि मग. — संपादक

वर्गीय समाजामध्ये कलेचे स्थान

कलेचा उद्गम

कलात्मक दृष्टीचा ऐतिहासिक विकास

१

उद्योगधंद्याचा इतिहास आणि उद्योगधंद्याचे प्रस्थापित वस्तुनिष्ठ अस्तित्व म्हणजे मानवाच्या आवश्यक बलस्थानांचा खुला ग्रंथ कसा असतो, ग्रहण करण्यायोग्य अस्तित्व असलेले मानवी मनोविज्ञान कसे असते, हे आपण पाहतो. आतापर्यंत याची संकल्पना मानवाच्या आवश्यक असण्याशी असलेल्या याच्या संबंधांमध्ये करण्यात आलेली नव्हती, तर उपयुक्ततेशी बाह्य संबंधापुरतीच ती करण्यांत आलेली होती, कारण अलगपणाच्या क्षेत्रामध्ये वावरत असताना लोक केवळ माणसाच्या सर्वसाधारण असण्याच्या पद्धतीचाच तेवढा विचार करू शकत होते--धर्म म्हणा, किंवा इतिहास म्हणा, त्याच्या अमूर्त- सर्वसाधारण स्वरूपात म्हणजे राजकारण, कला, साहित्य इत्यादि स्वरूपात- मानवाच्या आवश्यक बलस्थानांची वास्तवता आणि मानवाची जाति या नात्याने कामगिरी- यांचाच तेवढा विचार करू शकत होते. आपल्या पुढ्यात माणसाची वस्तुनिष्ठीकृत आवश्यक बलस्थाने इंद्रियगम्य, अलग, उपयुक्त वस्तूंच्या स्वरूपात, ताटातुटीच्या स्वरूपात, मामुली भौतिक उद्योगधंद्यामध्ये प्रदर्शित केलेली आहेत (याची संकल्पना त्या सर्वसाधारण हालचालीचा भाग म्हणून करता येते, किंवा त्या हालचालीची संकल्पना उद्योगधंद्याचा एक विशिष्ट भाग म्हणून करता येते, कारण आतापर्यंतचा सगळा मानवी व्यवहार हा श्रम- म्हणजे उद्योगधंदा- हाच राहिलेला आहे- म्हणजे स्वतःपासून अलग राहिलेला व्यवहार.)

ज्या मनोविज्ञानाच्या लेखी हा ग्रंथ, म्हणजे अत्यंत ग्राह्य व उपलब्ध स्वरूपांत असलेला इतिहासाचा विभाग अज्ञात स्वरूपात राहतो, ते अस्सल, आकलनयोग्य व खरेखुरे विज्ञान होऊ शकत नाही.

कार्ल मार्क्स, १८४४ ची अर्थशास्त्रविषयक व तत्त्वज्ञानविषयक हस्तलिखिते

मार्क्स आणि एंगल्स, संकलित ग्रंथ, खंड ३ रा, मॉस्को, १९७५, पृष्ठे ३०२-३

२

ज्या प्रमाणांत तत्त्वविचारात्मक कोड्यांची सोडवणूक हे व्यवहाराचे कार्य असते आणि व्यवहाराच्या द्वारा पार पाडण्यात येते, ज्या प्रमाणात खरा व्यवहार ही खऱ्याखुऱ्या व विधायक तत्त्वविचाराची अट असते, ते प्रमाण, उदाहरणार्थ, काल्पनिकतेत दाखविण्यात येते, काल्पनिक पूजकाची इंद्रियगम्य जाणीव ही ग्रीकांच्या जाणिवेहून वेगळी असते, कारण ग्रीकांचे इंद्रियगम्य अस्तित्व वेगळे असते. इंद्रिय आणि आत्मा यांच्या दरम्यानचे अमूर्त वैर हे तोपर्यंतच आवश्यक असते, की जोपर्यंत निसर्गाविषयीची मानवी भावना, निसर्गाची मानवी जाणीव आणि म्हणून मानवाची नैसर्गिक जाणीव, यांची निर्मिती अजून माणसाच्या स्वतःच्या श्रमाच्या योगाने झालेली नसते.

कार्ल मार्क्स, १८४४ ची अर्थशास्त्रविषयक
व तत्त्वज्ञानविषयक हस्तलिखिते

मार्क्स आणि एन्गल्स, संकलित ग्रंथ,
खंड ३ रा, मॉस्को, १९७५, पृष्ठ ३१२

३

जेव्हा वस्तू ही माणसाच्या लेखी एक मानवी वस्तू होते किंवा वस्तुनिष्ठ माणूस होते, तेव्हाच केवळ माणूस हा आपल्या वस्तूमध्ये स्वतःला हरवून घेत नाही, हे आपण पाहिलेले आहे. जेव्हा वस्तु ही माणसाच्या लेखी सामाजिक वस्तु होते, जेव्हा तो स्वतःच स्वतःच्या लेखी एक सामाजिक असणे होतो, जसा समाज हा या वस्तूमध्ये त्याच्या लेखी एक असणे होतो, तेव्हा हे शक्य असते.

म्हणून एका अंगाने वस्तुनिष्ठ जग हे समाजातील माणसाच्या लेखी सर्वत्र माणसाच्या आवश्यक बलस्थानांचे जग होते— म्हणजे मानवी वास्तवता होते आणि त्या कारणास्तव ते त्याच्या स्वतःच्या आवश्यक बलस्थानांची वास्तवता होते—तेव्हाच सगळ्या वस्तू त्याच्या लेखी त्याचे स्वतःचे वस्तुनिष्ठीकरण होऊन राहतात, त्याचे व्यक्तिमत्व पक्के करणाऱ्या व व्यवहारांत आणणाऱ्या वस्तू होऊन राहतात, त्याच्या वस्तू होतात: म्हणजे खुद्द माणूसच वस्तू होतो. ज्या रीतीने त्या त्याच्या होतात, ती रीत त्या वस्तूंच्या स्वरूपावर अवलंबून असते आणि त्या स्वरूपाशी मिळत्या जुळत्या अशा आवश्यक बलस्थानाच्या स्वरूपावर अवलंबून असते; कारण या नातेसंबंधाचे निश्चित स्वरूपच नेमकी विशिष्ट विधानाची खरी रीत साकार करते. जी वस्तू डोळ्याला

दिसते ती कानाला असते त्याहून निराळी असते, आणि डोळ्याला दिसणारी वस्तू कानाच्या वस्तूहून दुसरीच वस्तू असते. प्रत्येक आवश्यक बलस्थानाचे खास स्वरूप हे नेमके त्याचा खास गाभा असते, आणि म्हणून त्याच्या वस्तुनिष्ठीकरणाची खास रीत देखील असते, वस्तुनिष्ठ दृष्ट्या त्याच्या प्रत्यक्ष जिवंत असण्याची रीत असते. अशा प्रकारे माणूस हा वस्तुनिष्ठ जगामध्ये विचार करण्याच्या कृतीमध्ये असतो इतकेच नव्हे, तर त्याच्या सगळ्या इंद्रियांनिशी असतो.

दुसऱ्या अंगाने, आपण याच्या आत्मनिष्ठ उपांगांनिशी याच्याकडे पाहू या. जसे केवळ संगीत हेच माणसाच्या ठायी संगीताची जाण जागृत करते, अत्यंत सुंदर संगीत हे संगीतशून्य कानाला त्याची जाण मुळीच देत नाही०त्याच्या लेखी ती वस्तु मुळीच नसते-कारण माझी वस्तू ही माझ्या आवश्यक बलस्थानांपैकी एका बलस्थानाचीच केवळ खातरजमा होऊ शकते–म्हणून ज्या अंशाने माझे आवश्यक बलस्थान हे तिच्या स्वतःच्या लेखी आत्मनिष्ठ पात्रता म्हणून अस्तित्वात असते त्या अंशानेच केवळ ती माझ्या लेखी अस्तित्वात असते, कारण माझ्या लेखी वस्तूचा अर्थ हा माझ्या इंद्रियाला गम्य असेल तेवढाच असतो. (त्या वस्तूशी मिळत्या जुळत्या अशा इंद्रियाला गम्य असाच तो अर्थ असतो)-या कारणास्तव सामाजिक माणसाची इंद्रिये ही बिनसामाजिक माणसाच्या इंद्रियांहून वेगळी असतात. माणसाच्या आवश्यक असण्याच्या वस्तुनिष्ठ दृष्ट्या उघड झालेल्या समृद्धीच्या द्वाराच आत्मनिष्ठ मानवी जाणिवेची समृद्धी (संगीताचे ग्रहण करणारा कान, आकृतीचे सौंदर्य ग्रहण करणारा डोळा–– थोडक्यात सांगायचे म्हणजे मानवी समाधानाचे सामर्थ्य असलेली इंद्रिये, अशी इंद्रिये की जी माणसाच्या आवश्यक बलस्थानांचा प्रत्यय स्वतः आणून देतात) एक तर शिकून तयार केलेली किंवा अस्तित्वात आणलेली असते. कारण पंचेंद्रिये इतकेच नव्हे, तर तथाकथित ज्ञानेन्द्रिये देखील, व्यावहारिक इंद्रिये (इच्छा, प्रेम वगैरे), एका शब्दात सांगायचे म्हणजे मानवी इंद्रिय, इंद्रियांचे मानवी स्वरूप, त्याच्या वस्तूमुळे अस्तित्वात येते, मानवीकृत स्वरूपामुळे अस्तित्वात येते. पंचेंद्रियांची रचना हा आजच्या घडीपर्यंतचा जगाच्या एकंदर इतिहासाचा श्रमसायास आहे. रासवट व्यावहारिक गरजेत गुरफटलेल्या इंद्रियाला केवळ मर्यादित अर्थ असतो. उपाशी असलेल्या माणसाला खाद्याचा मानवी आकार अस्तित्वात नसतो, तर खाद्य या नात्याने त्यांचे केवळ अमूर्त अस्तित्वच तेवढे अस्तित्वात असते. ते त्याच्या अत्यंत रासवट स्वरूपांतही असू शकते आणि ही खाण्याची क्रिया प्राण्यांच्या खाण्याच्या क्रियेहून कोणत्या बाबतीत वेगळी असते हे सांगणे कठीण पडेल. काळजीचे ओझे वाहणाऱ्या, दारिद्र्याने जर्जर झालेल्या माणसाला सर्वोत्तम नाट्यप्रयोगाचे इंद्रिय मुळीच नसते; खनिजाचा व्यापारी त्याचे केवळ व्यापारी मूल्यच तेवढे बघतो, परंतु त्या खनिजाचे सौंदर्य व खास स्वरूप बघतच नाही. त्याला खनिजविद्येचे इंद्रिय नसते. अशा प्रकारे, मानवी गाभ्याचे वस्तुनिष्ठीकरण, त्याच्या तत्त्वविचारात्मक व व्याव-

हारिक अशा दोन्ही उपांगांनिशी, माणसाचे इंद्रिय मानवी करण्यासाठी तसेच मानवी व नैसर्गिक सृष्टीच्या एकंदर समृद्धीशी मिळते जुळते असे मानवी इंद्रिय निर्माण करण्यासाठी, जरूरीचे असते.

कार्ल मार्क्स, १८४४ ची अर्थशास्त्रविषयक व तत्त्वज्ञानविषयक हस्तलिखिते

मार्क्स आणि एन्गल्स, संकलित ग्रंथ, खंड ३ रा, मॉस्को, १९७५, पृष्ठे ३०२–०२

कलेच्या उद्गमामध्ये श्रमाची भूमिका

माकडाचे संक्रमण माणसामध्ये होण्याच्या हजारो हजार वर्षांच्या कालखंडामध्ये आमच्या पूर्वजांनी ज्या पहिल्या कामगिऱ्यांसाठी क्रमाक्रमाने आपल्या हातांना जुळते करून घ्यायचे शिक्षण घेतले, त्या केवळ फारच साध्या असू शकल्या असल्या पाहिजेत. सगळ्यात खालच्या थरातले रानटी लोक, ज्यांच्या बाबतीत अधिक प्राणि-सदृश अधोगतीची परिस्थिती ही त्याच वेळी असलेल्या शारीरिक अधोगतीसह गृहीत धरता येते, असे रानटी लोकदेखील या संक्रमणकालीन मानवी प्राण्यांच्यापेक्षा कितीतरी वरचढ आहेत. पहिल्या गारगोटीला मानवी हातांनी सुरीचे रूप देण्याची प्रगति होण्यापूर्वी एवढा कालखंड बहुधा लोटला असेल की त्याच्या तुलनेने आपल्याला माहीत असलेला ऐतिहासिक कालखंड अगदीच क्षुल्लक ठरतो. परंतु निर्णायक पाऊल उचलण्यात आले आहे, हात स्वतंत्र झाला आहे, आणि याच्या पुढे तो सतत अधिक मोठे कौशल्य संपादन करू शकला आहे; अशा प्रकारे संपादन केलेला अधिक मोठा लवचिकपणा हा वंशपरंपरागत झाला आणि पिढ्यान्-पिढ्या वाढत गेला.

अशा प्रकारे हात हा नुसता श्रमाचे साधन आहे इतकेच नव्हे, तर तो श्रमाची पैदास देखील आहे. श्रम, सतत नवनव्या कामगिऱ्यांशी जुळते करून घेणे, स्नायु वगैरेंची वंशपरंपरागत प्रगती आणि अधिक दीर्घकालीन कालखंडांमध्ये खास विकास झालेली हाडे, आणि या पिढीजाद कौशल्याचा नव्या आणि अधिकाधिक गुंतागुंतीच्या कामगिऱ्यांमध्ये सतत नव्याने होत जाणारा वापर, या सगळ्या गोष्टींनी

एखाद्या राफेलची चित्रे निर्माण करण्यासाठी, एखाद्या थोर्वाल्डसेनच्या शिल्पाकृती घडविण्यासाठी, एखाद्या पागानिनीचे संगीत रचण्यासाठी लागणाऱ्या परिपूर्णतेची उच्च कुशलता मानवी हाताला मिळवून दिली आहे.

फ्रेडरिक एन्गल्स, निसर्गाचा विरोध-विकास,
मॉस्को, १९७४, पृष्ठ १७१-७२.

कलात्मक निर्मिती आणि सौंदर्यनिष्ठ ग्रहणशक्ती

उत्पादन हे एखादी गरज भागविण्यासाठी साहित्य उपलब्ध करून देते इतकेच नव्हे, तर त्या साहित्यासाठी गरजदेखील उपलब्ध करून देते. जेव्हा उपभोग हा त्याच्या मुळातल्या प्राथमिक रासवटपणातून व तात्कालिकतेतून पुढे सरसावतो-- आणि त्याचे त्या अवस्थेतले राहणे हे उत्पादन देखील प्राथमिक रासवट स्वरूपाचे असल्याच्या वस्तुस्थितीमुळे असण्याचा संभव होता--तेव्हा तो स्वतःच त्या वस्तूने अस्तित्वांत आणलेल्या इच्छेच्या स्वरूपात असतो. वस्तूसाठी जाणवलेली गरज वस्तूच्या ग्रहणशक्तीने प्रेरित केलेली असते. कलाकृती ही कलात्मक अभिरुचि असलेला व सौंदर्याचा उपभोग घ्यायला समर्थ असलेला रसिक जनसमुदाय निर्माण करते-- आणि इतर कोणत्याही पैदाशीच्या बाबतीत असेच म्हणता येते. तदनुसार उत्पादन हे व्यक्तीसाठी वस्तू पैदा करते इतकेच नव्हे, तर वस्तूसाठी व्यक्ति देखील निर्माण करते.

कार्ल मार्क्स, १८५७-५८ च्या अर्थशास्त्र-विषयक हस्तलिखितांची "प्रस्तावना"

कार्ल मार्क्स, अर्थशास्त्रावरील टीका टिप्पणीत भर, मॉस्को, १९७०, पृष्ठ १९७.

सामाजिक श्रमविभागणी

श्रमविभागणी आणि सामाजिक जाणीव

भाषा ही जाणिवेइतकीच पुरातन आहे, भाषा ही इतर माणसांसाठी देखील अस्तित्वात असलेली व्यावहारिक, खरीखुरी जाणीव आहे, आणि म्हणूनच केवळ ती माझ्यासाठी देखील अस्तित्वात आहे; भाषा ही जाणिवेप्रमाणेच, इतर माणसांशी व्यवहार करण्याच्या गरजेतूनच, आवश्यकतेतूनच केवळ उदयास येते * जिथे संबंध अस्तित्वात असतो, तिथे तो माझ्यासाठी अस्तित्वात असतो; प्राणी स्वतःचा "संबंध" कशाशीही जोडत नाही, तो स्वतःचा मुळी "संबंधच" जोडत नाही. प्राण्याच्या लेखी इतरांशी त्याचा संबंध हा संबंध या नात्याने अस्तित्वातच नसतो. म्हणून जाणीव ही थेट सुरुवातीपासूनच सामाजिक पैदास असते, आणि जोपर्यंत माणसे अस्तित्वात असतात तोपर्यंतच ती टिकून राहते. जाणीव ही प्रथमतः, अर्थातच, सभोवरच्या तात्कालिक इंद्रियगम्य वातावरणाविषयीचीच नुसती जाणीव असते आणि ज्याची आत्मजाणीव वाढत आहे अशा व्यक्तीच्या बाहेर असलेल्या इतर व्यक्ती आणि वस्तू यांच्या मर्यादित संबंधाची ही जाणीव असते. त्याच वेळी ती निसर्गाची जाणीव असते. निसर्ग हा प्रथम संपूर्णपणे परकी, सर्वशक्तिमान आणि अनावर अशी शक्ति या नात्याने माणसांच्या समोर उभा ठाकतो; याच्याशी माणसांचे संबंध शुद्ध प्राणिसदृश असतात आणि याचा पशूप्रमाणेच माणसांना धाक असतो; अशा प्रकारे निसर्गाची ही शुद्ध प्राणिसदृश जाणीव असते (नैसर्गिक धर्म) याचे नेमके कारण हे असते की निसर्गामध्ये अजून इतिहासाने जवळ जवळ मुळीच बदल केलेला नसतो–उलटपक्षी आपल्या सभोवारच्या व्यक्तींशी संबंध ठेवण्याच्या आवश्यकतेची माणसाला होत असलेली जाणीव म्हणजेच तो मुळी समाजातच वावरत आहे या त्याला होत असलेल्या जाणिवेचा हा आरंभ असतो. हा आरंभ म्हणजे या टप्प्यावरील खुद्द सामाजिक

---

* [पुढील शब्द हस्तलिखितात खोडलेले आहेत.] माझ्या सभोवारच्या जगाशी माझा संबंध म्हणजे माझी जाणीव असते.

जीवनाइतकाच प्राणिसदृश असतो. ही नुसतीच कळपाची जाणीव असते, आणि या बिंदूवर माणूस हा मेंढरापासून वेगळा असतो केवळ याच वस्तुस्थितीमुळे की त्याच्या बाबतीत उपजत बुद्धीची जागा जाणिवेने घेतलेली असते किंवा त्याची उपजत बुद्धी हीच जाणीवयुक्त असते. * ही मेंढरासारखी किंवा जमातयुक्त जाणीव वाढलेल्या उत्पादकतेच्या द्वारा, गरजांच्या वाढीच्या द्वारा आणि या दोहोंना मूलभूत असलेल्या लोकसंख्येच्या वाढीचा द्वारा आणखी अधिक विकास व विस्तार पावते. यांच्या बरोबर श्रमविभागणी विकसित होते. मुळात ही श्रमविभागणी म्हणजे लैंगिक कृतीतल्या श्रम-विभागणीखेरीज अन्य काहीच नव्हते, नंतर ही श्रमविभागणी स्वयंस्फूर्तपणे विकसित होते किंवा 'स्वाभाविकपणे' नैसर्गिक पूर्वप्रवृत्तीनुसार (म्हणजे शारीरिक सामर्थ्यानुसार), गरजा, अपघात वगैरे वगैरेनुसार विकसित होते.** श्रमविभागणी ही ज्या क्षणी भौतिक व मानसिक श्रमाची विभागणी उदयास येते त्याच क्षणी खऱ्या अर्थाने ती तशी होते. *** या क्षणापासून पुढच्या काळात आपण अस्तित्वात असलेल्या व्यवहाराच्या जाणिवेहून वेगळेच काही तरी आहोत अशी फुशारकी या जाणिवेला खरोखरी मारता येते, आपण खरोखरीच कशाचे तरी प्रतिनिधित्व, कसल्या तरी सत्य गोष्टीचे प्रतिनिधित्व केल्याशिवायच करत आहोत अशी फुशारकी या जाणिवेला खरोखरी मारता येते; आतापासून पुढच्या काळात जाणीव ही जगापासून स्वतःला मुक्त करून घेण्याच्या अव-स्थेत असते आणि "शुद्ध" तत्त्वविचार, धर्मशास्त्र. तत्त्वज्ञान, नीति इत्यादींची रचना चालू करायच्या अवस्थेत असते. परंतु जरी हा तत्त्वविचार धर्मशास्त्र, तत्त्वज्ञान, नीति वगैरे गोष्टी प्रचलित संबंधांच्या विरोधात उभ्या ठाकत असल्या तरी देखील प्रचलित सामाजिक संबंध हे प्रचलित उत्पादन संबंधांच्या विरोधात उभे ठाकले आहेत म्हणूनच

---

* [मार्क्सलिखित मार्जिनमधील मूळ टीप :] इथे आपल्याला तत्काळ असे दिसून येते, हा नैसर्गिक धर्म किंवा निसर्गाविषयी ही विशिष्ट प्रवृत्ति ही समाजाच्या स्वरूपावरून किंवा याच्या उलट निसर्गाविषयीच्या या विशिष्ट प्रवृत्तीवरून समाजाचे स्वरूप यांची निश्चिती होते. सर्वत्र असते त्याप्रमाणे इथे देखील निसर्ग आणि माणूस यांचे तादात्म्य देखील अशा रीतीने प्रकट होते की माणसांची निसर्गाविषयीची मर्यादित प्रवृत्ति ही त्यांचे एकमेकांशी एकमेकांचे असलेले मर्यादित संबंध निश्चित करते, आणि त्यांची एकमेकांविषयी असलेली मर्यादित प्रवृत्ती ही माणसांचे निसर्गाशी असलेले मर्यादित संबंध निश्चित करते.

** [मार्क्सने मार्जिनमध्ये लिहिलेली टीप, हस्तलिखितात खोडून टाकलेली:] माणसांची जाणीव ही प्रत्यक्ष ऐतिहासिक विकासाच्या ओघांत विकसित होते.

*** [मार्क्सने मार्जिनमध्ये लिहिलेली टीप:] विचारसरणीनिष्ठांचा पहिला प्रकार म्हणजे धर्मगुरु हे याच वेळी उदयास येतात.

केवळ ही गोष्ट घडू शकते; याच्या भरीला, संबंधांच्या विशिष्ट राष्ट्रीय क्षेत्रामध्ये देखील ही गोष्ट घडू शकते, ती राष्ट्रीय कक्षेच्या आत निर्माण झालेल्या विरोधांच्या द्वारा नव्हे तर ही राष्ट्रीय जाणीव आणि इतर राष्ट्रांचे व्यवहार * यांच्या दरम्यान निर्माण झालेल्या विरोधाच्या द्वारा ही गोष्ट घडू शकते. म्हणजे राष्ट्रीय जाणीव आणि एका राष्ट्राची सर्वसाधारण जाणीव यांच्या दरम्यान निर्माण झालेल्या विरोधाच्या द्वारा (आता जसे जर्मनीत घडत आहे तसे.)

कार्ल मार्क्स आणि फ्रेडरिक एन्गल्स,
जर्मन विचारसरणी

मार्क्स आणि एन्गल्स, संकलित ग्रंथ,
खंड ५ वा, मॉस्को, १९७६,
पृष्ठे ४४-४५

भांडवलदारी समाजात श्रम आणि श्रमिक बहुजन समाजाची परिस्थिती यांच्यातील दुरावा

तो [अर्थशास्त्रज्ञ] कामगाराचे रूपान्तर सगळ्या गरजा नसलेल्या संवेदनाशून्य प्राण्यामध्ये करतो, जसे त्याच्या कामगिरीचा बदल सगळ्या कामगिरीपासून शुद्ध अलगपणात करतो, तसे. म्हणून त्याच्या लेखी कामगाराची प्रत्येक चैन आक्षेपार्ह दिसते आणि अत्यंत अमूर्त गरजेपलीकडे जे जे जाईल ते ते–मग ते निष्क्रिय आनंदाच्या क्षेत्रातले का असेना–ती त्याला चैन वाटते. म्हणून अर्थशास्त्र, हे संपत्तीचे शास्त्र, हे त्याच वेळी संन्यासाचे शास्त्र असते, नडीचे शास्त्र असते, बचतीचे शास्त्र असते– आणि ते प्रत्यक्षात असा बिन्दु गाठते की जिथे माणसाला ताज्या हवेची किंवा शारीरिक व्यायामाची जरूरी असूच नये. हे अजब उद्योगाचे शास्त्र हे त्याचवेळी संन्यासाचे शास्त्र असते, आणि याचा खरा आदर्श सन्यस्त परंतु लुटारू चिक्कू माणूस

---

* [मार्क्सने मार्जिनमध्ये लिहिलेली टीप:] धर्म जर्मन लोक आणि विचारसरणी अशा स्वरूपातले.

हा असतो आणि संन्यस्त पण उत्पादक गुलाम हा असतो. त्याचा नैतिक आदर्श म्हणजे असा कामगार असतो की जो आपल्या पगाराचा काही अंश सेव्हिंग्ज बँकेत नेतो. आणि त्याला गुलामी वृत्तीची कला देखील तयार स्वरूपात गवसली आहे आणि या कलेने या आवडत्या आदर्शांला मूर्तरूप दिले आहे. भावनाविवशतेत आकंठ बुडालेल्या स्वरूपात ही कला रंगभूमीवर सादर करण्यांत आलेली आहे. अशा प्रकारे अर्थशास्त्र-- त्याचे दृश्य स्वरूप इहवादी व कामुक असले तरी देखील— हे खरेखुरे नैतिकशास्त्र आहे, सगळ्या शास्त्रांमध्ये सगळ्यात जास्त नैतिक असे शास्त्र आहे. आत्म-त्याग, जीवनाचा त्याग आणि सगळ्या मानवी गरजांचा त्याग हा त्याचा मुख्य सिद्धान्त आहे. खाणे-पिणे व पुस्तके खरेदी करणे तुम्ही जितके अधिक कमी कराल; जितके अधिक कमी तुम्ही नाटकाला, नृत्याच्या कार्यक्रमाला, पानगृहात जाल; जितका अधिक कमी तुम्ही विचार कराल, प्रेम कराल, तत्त्वचिंतन कराल, गाणी म्हणाल, चित्रे काढाल, दांडपट्टा खेळाल, वगैरे, जितके तुम्ही अधिक कमी कराल, तितकी तुम्ही अधिक बचत कराल-- तुमचा खजिना अधिक मोठा होईल आणि त्याला कीडही लागणार नाही आणि गंजही त्याला खाऊन टाकणार नाही-- हे तुमचे भांडवल.

कार्ल मार्क्स, १८४४ ची अर्थशास्त्रविषयक व तत्त्वज्ञानविषयक हस्तलिखिते

मार्क्स आणि एन्गल्स, संकलित ग्रंथ,
खंड ३ रा, मॉस्को १९७५,
पृष्ठे ३०८-९



पैसा आणि
जागतिक संस्कृति

पैशाचे विकृतिकारक सामर्थ्य

माणसाच्या भावना, वासना, वगैरे जर नुसतीच मानववंशशास्त्रीय घटिते [अधिक संकुचित]@ अर्थाने नसतील, परंतु जर ती असण्याची (निसर्गाची) खरीखुरी अस्तित्वनिदर्शक विधाने असतील, आणि त्यांची वस्तु त्यांच्यासाठी एक इंद्रियगम्य वस्तू म्हणून आहे याच कारणासाठी ती केवळ खरोखरी केलेली विधाने असतील, तर मग हे स्पष्ट आहे की:

१. त्यांची विधान करायची अवघी एक रीत आहे असे मुळीच नाही, तर त्यांच्या अस्तित्वाचे, त्यांच्या जीवनाचे, विशिष्ट स्वरूप हे त्यांच्या विधान करायच्या विशिष्ट पद्धतीने तयार झालेले आहे. कोणत्या रीतीने वस्तू त्यांच्यासाठी अस्तित्वात असते, ती रीत त्यांच्या समाधानाची वैशिष्ट्यपूर्ण पद्धती असते.

२. जेव्हा जेव्हा इंद्रियगम्य विधान हे त्या वस्तूच्या तिच्या स्वतंत्र्य स्वरूपांतला थेट नाश दर्शविते (म्हणजे खाण्यात, पिण्यात, वस्तूवर प्रक्रिया करण्यात वगैरे) तेव्हा तेव्हा हे त्या वस्तूचे विधान असते.

३. ज्या अंशाने माणूस आणि म्हणूनच त्याची भावना वगैरे मानवी असते, त्या अंशाने त्या वस्तूचे दुसऱ्याकडून विधान हे त्याचप्रमाणे त्याचे स्वतःचे समाधान असते.

४. केवळ विकसित उद्योगधंद्याच्या द्वाराच-- म्हणजे खासगी मालमत्तेच्या माध्यमाच्या द्वारा--मानवी वासनेचा अस्तित्वदर्शी गाभा, त्याच्या परिपूर्ण स्वरूपात त्याचप्रमाणे त्याच्या माणुसकीच्या स्वरूपात अस्तित्वात येतो; म्हणूनच माणसाचे विज्ञान ही खुद्द त्याच्या स्वतःच्या व्यावहारिक कामगिरीची पैदास असते.

@ हा शब्द हस्तलिखितात स्पष्टपणे वाचता येत नाही.—संपादक

५. खाजगी मालमत्तेचा अर्थ—तिचा दुरावा बाजूस ठेवल्यास—म्हणजे माणसासाठी आवश्यक वस्तूंचे अस्तित्व हा असतो, म्हणजे उपभोगाच्या वस्तू आणि कामगिरीच्या वस्तू या दोन्ही अर्थांनी.

सगळ्या गोष्टी विकत घेण्याचा गुणधर्म अंगी असल्यामुळे, सगळ्या वस्तू हस्तगत करण्याचा गुणधर्म अंगी असल्यामुळे, पैसा ही अशा प्रकारे उत्कृष्ट गुणधर्म असलेली वस्तू असते. त्याच्या गुणधर्मांची विश्वव्यापकता ही त्याच्या अस्तित्वाची सर्वशक्तिमत्ता असते. म्हणून त्याला सर्वशक्तिमान मानतात...पैसा म्हणजे माणसाची गरज आणि वस्तू यांच्या दरम्यानचा मध्यस्थ असतो, त्याचे जीवन व त्याच्या जीवनाची साधने यांच्या दरम्यानचा मध्यस्थ असतो. परंतु जे माझ्यासाठी माझ्या जीवनाची मध्यस्थी करते, ते माझ्यासाठी इतर लोकांच्या अस्तित्वाची देखील मध्यस्थी करते. माझ्या लेखी ती अन्य व्यक्ती असते.

"वाऽरे माणसा! च्या भले, हात आणि पाय
आणि डोके आणि पिछाडी, सगळी तुझीच आहेत!
आणि जीवन गोड आहे तोवर आम्ही जे घेतो
ते आमचे नाही म्हणून जाहीर व्हायचे आहे काय?
सहा घोडे मला परवडतात म्हणा,
म्हणजे त्यांची ताकद ही माझी मालमत्ता नव्हे?
मी खेळाडू सदा दौड करीत जातो,
जणू काय त्यांचे पाय माझ्या मालकीचेच आहेत.'

गटे : फाऊस्ट (मेफिस्टोफेलिस) @

शेक्स्पियर, टिमन ऑफ अथेन्स या नाटकात म्हणतो :

'सोने? पिवळे, चकचकीत, मौल्यवान सोने? नाही रे, देवांनो, मी ऐदी भक्त नाही!....

अशा प्रकारे यातले बरेचसे काळ्याला पांढरे करील, वाईटाला चांगले करील. चुकीच्याला बरोबर करील, हीनाला उदात्त करील, म्हाताऱ्याला तरुण करील, भेकडाला शूर करील.

....इतकेच काय, हे

तुमच्या धर्मगुरूंना व नोकरांना तुमच्या बाजूकडून हिसकून घेईल.

@ गटे, फाऊस्ट भाग १ ला, फाऊस्टची अभ्यासिका; (इंग्रजी अनुवाद गटेचे फाऊस्ट, भाग १ ला, अनुवादक फिलिप वेने, पेन्गिन, १९४९, पृष्ठ ९१ यांतून उद्धृत केलेला आहे),—संपादक

जाडजूड माणसांच्या उशा त्यांच्या मानांखालून हिसकून घेईल:
हा पिवळा गुलाम
धर्मांना एकत्र साधेल व त्यांची मोडतोड करील, पाप्यांना आशीर्वाद देईल;
महारोग जुनाट गौरवाला पात्र ठरवील, चोरांना बढती देईल
आणि त्यांना पदवी देऊन त्यांचा गौरव करील
आणि खासदारांच्या शेजारी खुर्च्यांवर बसवील: हेच ते
हे दुःखी विधवेला पुनर्विवाह करायला लावते;
जिच्या अंगावर क्षते पडलेली असतील, व जिची
वेश्यागृहातून हकालपट्टी झालेली असेल, तिला हे मलमपट्टी करते.
आणि पुन्हा माणसात आणते. अरे,
तू मानवजातीची समाइक वेश्या आहेस,
आणि राष्ट्रांचा धुव्वा उडवायचे सामर्थ्य तुझ्या अंगी आहे.

आणखी पुढचा भाग असा:

"अरे ए राजघातक्या, अरे फूटपाड्या
पिता-पुत्रांच्या दरम्यान! अरे तू भ्रष्टकर्त्या
रतीच्या अतिशुद्ध शीलाच्या! अरे तू पराक्रमी मंगळा!
अरे तू सदा तरुण, रसरशीत, प्रिय आणि नाजुक प्रणयकर्त्या,
तुझा लज्जायुक्त कोमल कटाक्ष पवित्र बर्फ वितळून टाकतो
डायनाच्या मांडीवर साचलेले! अरे तू दृश्य परमेश्वरा!
अशक्यतांना निकटपणे सांधणाऱ्या!
आणि त्यांना एकमेकांचे चुंबन घ्यायला लावणाऱ्या!
अरे तू प्रत्येक भाषेत बोलणाऱ्या, प्रत्येक उद्दिष्ट साधण्यासाठी!
अरे तू हृदयांना वश करणाऱ्या!
अरे तू विचार कर, तुझा गुलाम माणूस बंड करतो,
तू तुझ्या गुणापायी माणसांना घोटाळ्यात घालतोस,
म्हणजे पशूंचे जगावर साम्राज्य व्हावे म्हणून!" @

पैशाच्या खऱ्या स्वरुपाचे चित्रण शेक्स्पियर सर्वोत्कृष्टपणे करतो. त्याचा आशय समजून घेण्यासाठी आपण सर्वप्रथम गटेच्या उताऱ्याच्या विवरणाने सुरुवात करू या.

@ शेक्स्पियर, टिमन ऑफ अथेन्स, अंक ४ था, प्रवेश ३ रा (मार्क्सने मूळात श्लेगेल-टिएक याच्या जर्मन अनुवादाचा उतारा दिलेला आहे.) –संपादक

जे पैशाच्या माध्यमाच्या द्वारा माझ्यासाठी आहे– ज्याच्यासाठी मी पैसे देऊ शकतो (म्हणजे जे पैसा विकत घेऊ शकतो)– ते म्हणजे मी स्वतःच आहे, म्हणजे पैशाचा धनी आहे. पैशाच्या सामर्थ्याची व्याप्ति ही माझ्या सामर्थ्याची व्याप्ति आहे. पैशाचे गुणधर्म हे माझे– पैशाच्या धन्याचे– गुणधर्म आहेत आणि ही आवश्यक सामर्थ्ये आहेत. अशा प्रकारे मी जो कोणी आहे आणि समर्थ आहे, तो माझ्या व्यक्तिमत्वाने मुळीच निश्चित केलेला नाही. मी कुरूप आहे, परंतु स्वतःसाठी मला अत्यंत सुंदर स्त्रिया विकत घेता येतात. म्हणून मी कुरूप नाही, कारण कुरूपपणाचा परिणाम– त्याची प्रतिबंधक शक्ति– पैशाने नष्ट केलेली असते. माझ्या व्यक्तिगत गुणधर्मानुसार मी लंगडा आहे, परंतु पैसा मला चोवीस पाय उपलब्ध करून देतो. म्हणून मी लंगडा नाही. मी वाईट आहे, अप्रामाणिक आहे, विधिनिषेधशून्य आहे, मूर्ख आहे; पण पैशाला मान असतो, आणि म्हणून तो ताब्यात असणाऱ्याला मान असतो. पैसा हे सर्वोच्च चांगले असते, म्हणून त्याचा धनी चांगला असतो. याच्या भरीला, पैसा हा माझा अप्रामाणिक व्हायचा त्रास वाचवतो : म्हणून मी प्रामाणिक असल्याचे गृहीत धरण्यात येते. मी बिनमेंदूचा आहे, परंतु पैसा हा सगळ्या वस्तूंचा खरा मेंदू असतो, तर मग त्याचा धनी बिनमेंदूचा कसा असेल ? याच्या भरीला, तो स्वतःसाठी हुशार लोकांना विकत घेऊ शकतो, आणि ज्याच्या अंगी हुशार लोकांवर प्रभुत्व आहे @ तो हुशार लोकांपेक्षा अधिक हुशार नाही काय ? जो मी पैशाच्या बळावर मानवी मनाला जे हवे असेल ते सगळे करायला समर्थ आहे, त्या माझ्या अंगी सगळ्या मानवी कर्तबगाऱ्या नाहीत का ? म्हणून माझा पैसा माझ्या सगळ्या बिनकर्तबगाऱ्यांचे पतिवर्तन त्यांच्या उलट गोष्टीत करत नाही काय !

पैसा जर मला मानवी जीवनाशी जखडणारे बंधन आहे, समाजाला माझ्याशी जखडणारे बंधन आहे, मला निसर्गाशी व माणसाशी जोडणारे बंधन आहे, तर मग पैसा हा सगळ्या बंधनांचे बंधन नव्हे काय ? तो सगळी बंधने तोडू व जोडू शकत नाही काय ! म्हणून तो विभक्तीकरणाचा विश्वव्यापी कारक देखील नाही काय ! नाणे हेच खरोखरी अलग करते, त्याचप्रमाणे खराखुरा जोडणारा कारक असते-- ही [....]* समाजाची रासायनिक शक्ती असते.

शेक्स्पियर विशेषेकरून पैशाच्या दोन गुणधर्मांवर भर देतो :

१) तो म्हणजे दृश्य दैवत आहे-- सगळ्या मानवी व नैसर्गिक गुणधर्मांचे परिवर्तन त्यांच्या विरोधी गुणधर्मात करणारा आहे, वस्तूंचा विश्वव्यापी गोंधळ घालणारा व त्यांचे विकृतीकरण करणारा आहे : अशक्यतांना तो एकत्र सांधतो.

@ हस्तलिखितांत इंग्रजी " has " ऐवजी " is " आहे.—संपादक

* हस्तलिखितातला हा शब्द वाचता येत नाही. – संपादक

२) तो समाइक वेश्या आहे, लोकांचा व राष्ट्रांचा समाइक मध्यस्थ आहे.

सगळ्या मानवी व नैसर्गिक गुणधर्माचे विकृतीकरण करणे व त्यांचा गोंधळ माजविणे, अशक्यतांना बंधुत्व प्राप्त करून देणे — ही पैशाची ईश्वरी शक्ति — ती माणसांच्या दुरावलेल्या, अलग करणाऱ्या व स्वतःची जडणघडण करणाऱ्या जाति-स्वभावाचे जे रूप असते त्या त्याच्या स्वरूपात असते. पैसा हा मानवजातीचे दुरावा साधणारे कर्तृत्व असतो.

माणूस या नात्याने जे करायला मी असमर्थ आहे, आणि म्हणून, जे करायला माझी व्यक्तिगत आवश्यक बलस्थाने असमर्थ आहेत, ते मी पैशाच्या साधनाने करायला समर्थ आहे. अशा प्रकारे पैसा हा जे तो स्वतः नाही अशा कशामध्ये तरी या बलस्थानांपैकी प्रत्येकाचे रूपान्तर घडवून आणतो–म्हणजे त्याच्या विरुद्ध असलेल्या गोष्टीत त्याचे रूपान्तर घडवून आणतो.

मला जर एखादे विशिष्ट पक्वान्न हवे असले, किंवा पायी जाण्याइतका पुरेसा सामर्थ्यवान नसल्याकारणाने मी पोस्टाच्या गाडीतून जायला मागत असलो, तर पैसा मला ते पक्वान्न व ती पोस्टाची गाडी आणून देतो : म्हणजे असे की माझ्या ईप्सितांचे रूपान्तर तो कल्पनेच्या राज्यात असलेल्या कशातून तरी, त्यांच्या चिंतित, कल्पित किंवा इच्छित अस्तित्वांतून त्यांच्या इंद्रियगम्य प्रत्यक्ष अस्तित्वात करतो— कल्पनेला जीवनाचे रूप देतो, कल्पित असण्याला खऱ्या असण्याचे रूप देतो. ही मध्यस्थी अंमलात आणताना [पैसा] ही खरीखुरी निर्मितिक्षम शक्ति असते.

ज्याच्याजवळ पैसा मुळीच नाही अशा माणसासाठी देखील मागणी अस्तित्वात असते यात शंकाच नाही, परंतु ही त्याची मागणी म्हणजे केवळ कल्पनेची वस्तू असते, मी एक तिऱ्हाइत माणूस या नात्याने माझ्या लेखी ती परिणामशून्य व अस्तित्वशून्य असते, [इतरां] च्या लेखी आणि म्हणून माझ्या लेखी देखील ती असत्य आणि वस्तुशून्य होऊन राहते. पैशावर आधारलेली परिणामकारक मागणी आणि माझी गरज, माझी वासना, माझी इच्छा इत्यादींवर आधारलेली बिनपरिणामकारक मागणी यांच्या दरम्यानचा फरक हा असणे व विचार करणे यांतला हा फरक असतो, माझ्या अन्तर्यामी नुसतीच अस्तित्वात असलेली कल्पना आणि माझ्या बाहेर खरी वस्तु म्हणून अस्तित्वात असलेली कल्पना यांच्यातला हा फरक असतो.

माझ्याजवळ जर प्रवास करायला पैसा नसेल, तर मला प्रवास करायची गरज नाही, म्हणजे खरी व अमलात येण्याजोगी गरज नाही. मला जर अभ्यास करायचा व्यवसाय असेल, परंतु त्यासाठी माझ्याजवळ पैसा नसेल, तर माझा अभ्यास करायचा व्यवसाय नाही–म्हणजे परिणामकारक व्यवसाय नाही, खरा व्यवसाय नाही. उलट पक्षी मला जर खरोखरीच अभ्यास करण्याचा व्यवसाय नसेल, परंतु त्यासाठी इच्छा आणि पैसा असेल, तर त्यासाठी मला परिणामकारक व्यवसाय आहे. पैसा हा बाह्य, विश्वव्यापी माध्यम व कर्तृत्व या नात्याने (म्हणजे माणसापासून माणूस या नात्याने

किंवा मानवी समाजापासून समाज या नात्याने न उद्भवलेले) म्हणजे प्रतिमेला वास्तवतेचे रूप देण्याचे कर्तृत्व या नात्याने आणि वास्तवतेला नुसत्याच प्रतिमेचे रूप देण्याचे कर्तृत्व या नात्याने माणसाच्या व निसर्गाच्या खऱ्याखुऱ्या आवश्यक बलस्थानांचे परिवर्तन, ज्या नुसत्याच अमूर्त कल्पना आहेत आणि म्हणून अपुरी व त्रासदायक कल्पिते आहेत, – खरोखरी नेभळट अशी आवश्यक बलस्थाने आहेत, जी केवळ व्यक्तीच्या कल्पनेतच अस्तित्वात आहेत, – त्यांचे परिवर्तन खऱ्याखुऱ्या आवश्यक बलस्थानांमध्ये व कर्तृत्वांमध्ये करतो. केवळ या गुणधर्माच्या हिशेबी पैसा हा अशा प्रकारे व्यक्तिमत्वांचे सर्वसाधारण विकृतीकरण असतो, तो त्यांचे परिवर्तन त्यांच्या विरुद्ध स्वरूपांत करतो, आणि त्यांच्या गुणधर्मांना परस्परविरोधी गुणधर्म प्रदान करतो.

मग पैसा हा विकृतीकरण करणारी शक्ती म्हणून व्यक्तीच्या विरुद्ध आणि समाजाच्या बंधनांविरुद्ध वगैरे अशा दोहोंच्या विरुद्ध उभा ठाकतो, आणि ही बंधने स्वतःच स्वतंत्र गोष्टी असल्याचा दावा करतात. पैसा निष्ठेचे परिवर्तन अनिष्ठेत करतो, प्रेमाचे द्वेषात करतो, सद्गुणाचे दुर्गुणात, दुर्गुणाचे सद्गुणात, नोकराचे धन्यात, धन्याचे नोकरात, वेडपटपणाचे बुद्धिमत्तेत, आणि बुद्धिमत्तेचे परिवर्तन वेडपणात करतो.

ज्या अर्थी पैसा म्हणजे अस्तित्वात असलेली व क्रियाशील अशी मूल्याची संकल्पना आहे, आणि तो सगळ्या गोष्टींचा गोंधळ माजवतो व त्यांची गल्लत करतो, त्या अर्थी तो म्हणजे सगळ्या गोष्टींचे सर्वसाधारण गोंधळ माजविणे व गल्लत करणेच असते—जगाची उलथापालत असते--सगळ्या नैसर्गिक व मानवी गुणांचा गोंधळ माजविणे व गल्लत करणे असते.

जो कोणी शौर्य विकत घेऊ शकतो तो मेकड असला तरी देखील तो शूर असतो, ज्याअर्थी पैशाचा विनिमय कोणत्याही एका खास गुणाच्या बदल्यात होत नसतो, कोणत्याही एका वस्तूच्या बदल्यात होत नसतो, किंवा कोणत्याही विशिष्ट अशा आवश्यक मानवी शक्तीसाठी होत नसतो, तर माणसाच्या व निसर्गाच्या सगळ्या वस्तुनिष्ठ जगाच्या बदल्यांत होत असतो, म्हणून, त्या अर्थी त्याच्या मालकाच्या दृष्टिकोनातून तो प्रत्येक गुणधर्माचा अन्य प्रत्येक गुणधर्माशी विनिमय करायच्या कामी येतो, मग हा गुणधर्म व वस्तू परस्परविरोधी असल्या तरी कामी येतो. हे अशक्यतांचे बांधवीकरण असते. परस्परविरोधी गोष्टींना तो दिलजमाई करायला लावतो.

माणूस हा माणूसच आहे आणि त्याचे जगाशी नाते माणुसकीचेच आहे असे गृहीत धरावे म्हणजे मग आपल्याला केवळ प्रेमाच्या बदल्यात प्रेमच मिळू शकेल, विश्वासाच्या बदल्यात विश्वासच मिळू शकेल, वगैरे. तुम्हाला जर कलेचा आस्वाद घ्यायला हवा असेल तर तुम्ही कलात्मकदृष्ट्या सुसंस्कृत व्यक्ति असले पाहिजे; तुम्हाला

इतर लोकांवर प्रभाव पाडायला हवे असेल, तर तुम्ही इतर लोकांवर प्रेरक व उत्तेजनकारक परिणाम साधणारी व्यक्ति असले पाहिजे. माणसाशी व निसर्गाशी तुमच्या नात्यांपैकी प्रत्येक नाते ही खास अभिव्यक्ति असले पाहिजे, तुमच्या इच्छेच्या वस्तूंशी, तुमच्या खऱ्याखुऱ्या व्यक्तिगत जीवनाच्या वस्तूशी मिळते जुळते असले पाहिजे. तुम्ही जर बदल्यात प्रेम जागृत केल्याशिवाय प्रेम करत असाल– म्हणजे तुमचे प्रेम करणे या नात्याने प्रेम करणे हे जर प्रतिसादात्मक प्रेम पैदा करत नसेल; जर प्रेम करणारी एक व्यक्ती या नात्याने तुमच्या स्वतःच्या जिवंत अभिव्यक्तीच्या द्वारा तुम्ही स्वतःला प्रिय व्यक्ति करून घेत नसाल, तर मग तुमचे प्रेम हे नेभळट आहे––दुर्दैव आहे.

कार्ल मार्क्स, १८४४ ची अर्थशास्त्रविषयक
व तत्त्वज्ञानविषयक हस्तलिखिते

मार्क्स आणि एन्गल्स, संकलित ग्रंथ,
खंड ३ रा, मॉस्को, १९७५, पृष्ठे ३२२-२६

भांडवलशाही
आणि आध्यात्मिक उत्पादन

कला आणि काव्य यांचा भांडवलदारी उत्पादन पद्धतीशी संबंध

खुद्द स्तोर्च याच्या बाबतीत संस्कृतीचा तत्त्वविचार किरकोळ शब्दसमुच्चयांच्या पलीकडे जात नाही, मात्र अधून मधून काही कल्पक अभिप्राय चुकून माकून आढळतात. —उदाहरणार्थ, भौतिक श्रमविभागणी ही बौद्धिक श्रमविभागणीची पूर्वअट असते हा अभिप्राय. किती प्रमाणात ती अपरिहार्य होती या बाबतीत स्तोर्च किरकोळ शब्दसमुच्चयांच्या पलीकडे जाऊ शकला नाही, आणि ही समस्या त्याने स्वतःसाठी देखील किती अल्प प्रमाणात सूत्रबद्ध केलेली होती, हिची सोडवणूक तर दूरच राहो, हे एकुलत्या एका प्रसंगावरून उघड दिसून येते. आध्यात्मिक उत्पादन आणि भौतिक उत्पादन यांच्या दरम्यानचा संबंध तपासण्यासाठी सगळ्यात जास्त महत्त्वाची गोष्ट म्हणजे खुद्द भौतिक उत्पादनाचे आकलन एक सर्वसाधारण प्रसार म्हणून नव्हे, तर निश्चित ऐतिहासिक प्रकार म्हणून त्याचे आकलन होणे आवश्यक आहे. अशा प्रकारे, उदाहरणार्थ, आध्यात्मिक उत्पादनाचे वेगवेगळे प्रकार भांडवलदारी उत्पादनपद्धतीशी आणि मध्ययुगाच्या उत्पादनपद्धतीशी मिळतेजुळते असतात. खुद्द भौतिक उत्पादनाची संकल्पना जर त्याच्या खास ऐतिहासिक स्वरूपात केलेली नसेल तर त्याच्याशी मिळत्या जुळत्या आध्यात्मिक उत्पादनात खास काय आहे आणि एकमेकांचा परस्परांवर प्रभाव काय आहे हे समजणे अशक्य आहे. नाहीतर आपण कंठाळी विधानांच्या पलीकडे जाऊ शकत नाही. "संस्कृती" विषयी बोलण्याच्या कारणाने हे घडते.

आणखी असे : भौतिक उत्पादनाच्या खास प्रकारातून, पहिली गोष्ट म्हणजे समाजाची खास रचना उद्भवते, दुसरी गोष्ट म्हणजे निसर्गाशी माणसांचा खास संबंध उद्भवतो. त्यांची राज्यसंस्था आणि त्यांचा आध्यात्मिक दृष्टिकोन यांची निश्चिती दोहोकडून होते. म्हणून त्यांच्या आध्यात्मिक उत्पादनाचा प्रकारदेखील निश्चित होतो.

शेवटची गोष्ट म्हणजे, आध्यात्मिक उत्पादनाचा अर्थ जो स्तोर्चने लावलेला आहे त्यामध्ये व्यवसाय म्हणून सामाजिक कामगिऱ्या पार पाडणाऱ्या राज्यकर्त्या वर्गाच्या सगळ्या थरांच्या व्यावसायिक कामगिऱ्यांचा देखील समावेश आहे. या थरांचे अस्तित्व, ते बजावतात त्या कामगिरीप्रमाणेच त्यांच्या उत्पादनसंबंधांच्या खास ऐतिहासिक रचनेवरूनच केवळ समजू शकते.

खुद्द भौतिक उत्पादनाची संकल्पना स्तोर्च ऐतिहासिक दृष्ट्या करत नाही म्हणून—या भौतिक उत्पादनाची संकल्पना तो सर्वसाधारणपणे भौतिक वस्तूंचे उत्पादन अशी करतो आणि या उत्पादनाचा निश्चित ऐतिहासिक दृष्ट्या विकसित असा व खास प्रकार अशी याची संकल्पना तो करत नाही म्हणून—तो अशा आधाराला स्वतःला पारखा करून घेतो की केवळ ज्या आधारावर राज्यकर्त्या वर्गाचे वैचारिक घटक विभाग अंशतः समजू शकतात, या विशिष्ट सामाजिक रचनेत मुक्त आध्यात्मिक उत्पादन अंशतः समजू शकते. तो अर्थशून्य सर्वसाधारण शब्दसमुच्चयांच्या पलीकडे जाऊच शकत नाही. परिणामतः, हा संबंध तो अगोदर गृहीत धरून ठेवतो तितका सोपा नाही. उदाहरणार्थ, भांडवलदारी उत्पादन हे आध्यात्मिक उत्पादनाच्या काही शाखांच्या, उदाहरणार्थ, कलेच्या व कवितेच्या, विरोधात असते. हे जर हिशेबाच्या बाहेर ठेवले, तर अठराव्या शतकांतील फ्रेंचांच्या भ्रमाला याच्यामुळे मार्ग मोकळा होतो आणि या भ्रमाचा फार सुंदर उपहास लेसिंगने [४४] केलेला आहे. प्राचीनांच्या पेक्षा आम्ही यंत्रविद्यावगैरेमध्ये अधिक पुढे आहोत, म्हणून मग आम्हाला देखील महाकाव्य का करता येऊ नये? आणि इलियडच्या जागी हेन्रियाड[४५] का करता येऊ नये?

कार्ल मार्क्स, वरकड-मूल्याचे तत्त्वविचार
भाग १ ला, मॉस्को, १९७५, पृष्ठे २८४-८५.

भांडवलदारी अभिरुचि आणि तिची उत्क्रान्ति

पॉलने दिलेली यशस्वी जर्मन "gout" ची उदाहरणे बहुतांशी खूप खूप जुनी आहेत. [४६] जर्मन बनावटीच्या gravures pour enfants (Bilderbogen) सर्वसाधारणपणे चांगल्या आहेत हे तर पुरेसे सोपेच आहे. गेली ५० पेक्षा अधिक वर्षे त्या मुख्यतः डूसेल्डॉर्फ, म्यूनिक, वगैरे ठिकाणी करण्यात येत आहेत, आणि त्यांची डिझाइन्स तरुण आणि उगवत्या कलाकारांनी तयार केलेली असतात आणि

हे कलाकार थोडेसे पैसे मिळविण्यासाठी हे काम करतात. तथापि ४० वर्षांपूर्वी, मला असे आठवते की, त्या प्रकारचे फ्रेंच gravures जर्मनीत येत असत आणि त्यांतले पुष्कळसे घोडा-आणि-सैनिक-रंगविणाऱ्या ॲडमच्या हातचे असत, आणि कलाकुसरीत वा जिवंतपणात जे जर्मन वस्तूंच्या पेक्षा अतिशय वरचढ असत. हे जर फ्रेंच कलाकारांनी चालू ठेवले नसेल तर याला बाजारपेठ नाही असे त्यांना आढळून आले असले पाहिजे.— खेळण्यांविषयी म्हणशील, तर जर्मन वरचढपणा म्हणजे (१) स्वस्ताई, उपासमारीच्या पातळीवरील घरगुती उद्योग (डॉ. इमॅन्युएल सॅम्स यांनी die Hausindustrie in Thiiringen@ यात अलीकडेच याचे वर्णन केलेले आहे) आणि (२) त्यांचा शोध शेतकऱ्यांनी लावलेला आहे; शहरी लोक लहान मुलांसाठी खेळण्यांचा शोध लावण्याला कधीही लायक ठरणार नाहीत, त्यांतल्या त्यांत फ्रेंच शहरी लोक तर या बाबतीत कमीत कमी लायक असतात, ते तर आपल्या मुलांचा द्वेषच करतात.— फर्निचरच्या बाबतीत पॉल लफार्गने याचे कारण देतो आहे. ते म्हणजे फ्रेंच सरकारचे मूर्खपणाचे जकातीचे धोरण.— फुलांच्या बाबतीत तशाच प्रकारचे कारण: श्रमविभागणी आणि कमी वेतन: लंडनचे ईस्ट एंड आणि जर्मनी यांच्या विरुद्ध स्वस्ताईमध्ये कोण स्पर्धा करू शकणार? सर्वसाधारणपणे सांगायचे म्हणजे भांडवलदारी अभिरुचि ही इतकी अभिरुचिशून्य होत आहे की जर्मनांनीदेखील तिचे समाधान करता येईल अशी आशा धरायचा संभव आहे. आणि कोणताही व्यवसाय जर त्याची बाजारपेठ "स्वस्त आणि घातक" करण्याइतका उध्वस्त झाला असेल तर तुम्ही खुशाल अशी खात्री बाळगावी की जर्मन लोक त्यांत घुसतील आणि आपल्या स्वस्तःच्या श्रमिक बहुजनसमाजाला उपाशी मारून सगळ्या स्पर्धेचा धुव्वा उडवितील. आणि ज्या अर्थी सगळ्या व्यवसायांच्या बाबतीत आता हाच सर्वसाधारणपणे नियम झालेला आहे, त्या अर्थी सगळ्या व्यवसायांमध्ये व सगळ्या बाजारपेठांमध्ये जर्मन माल का दिसू लागला आहे याचा यावरून खुलासा होतो.

एन्गल्स यांचे लॉरा लाफार्ग हीस पत्र,
तारीख १४ जानेवारी १८८४,

फ्रेडरिक एन्गल्स, पॉल व लॉरा लाफार्ग,
पत्रव्यवहार, खंड १ ला, मॉस्को, १९५९,
पृष्ठे १६६-६७

@ धुरिंजियांतील घरगुती उद्योग— संपादक

भांडवलदारी समाजात कलाकाराची कामगिरी

१

उत्पादक श्रमाची व्याख्या इथे भांडवलदारी उत्पादनाच्या दृष्टिकोनातून केलेली आहे आणि इथे ॲडाम स्मिथने या प्रकरणाच्या काळजाला हात घातलेला आहे, मुद्दा बरोबर पकडलेला आहे. हा त्याच्या मोठ्यांत मोठ्या शास्त्रीय गुणांपैकी एक गुण आहे (माल्थसने दिलेल्या यथायोग्य अभिप्रायानुसार, उत्पादक व अनुत्पादक श्रम यांच्या दरम्यानचा हा विमर्शक वेगवेगळेपणा हा सगळ्या भांडवलदारी अर्थशास्त्राचा आधार होऊन राहिलेला आहे) तो म्हणजे हा की उत्पादक श्रमाची व्याख्या तो भांडवलाशी थेट विनिमय होत असलेला श्रम अशी करतो; म्हणजे तो ही व्याख्या करतो ती ज्या विनिमयाच्या द्वारा श्रमाच्या उत्पादनाची परिस्थिति आणि सर्वसाधारणपणे मूल्य, मग तो पैसा असो अथवा क्रयवस्तू असो, यांचे परिवर्तन प्रथम भांडवलामध्ये होते त्या विनिमयाच्या योगाने तो ही व्याख्या करतो (आणि श्रमाचे परिवर्तन त्याच्या शास्त्रीय अर्थाने मोल-मजुरीत करतो.)

बिनउत्पादक श्रम म्हणजे काय असते त्याची सर्वस्वी निश्चिती देखील याच्या योगाने होते. ज्याचा विनिमय भांडवलाशी होत नाही परंतु थेट कमाईशी होतो, म्हणजे वेतनाशी किंवा नफ्याशी होतो, असा श्रम म्हणजे बिनउत्पादक श्रम (अर्थात ज्यांनी ज्यांनी भांडवलदाराच्या नफ्यामध्ये सहभागी म्हणून भाग घेतला असेल त्यांचे विविध प्रकार यांत समाविष्ट आहेत, म्हणजे उदाहरणार्थ व्याज आणि खंड). जिथे सगळा श्रम अंशतः अजून स्वतःला मजुरी देतो (म्हणजे उदाहरणार्थ भूदास शेतावर करत असलेल्या श्रमासारखा श्रम) आणि अंशतः त्याचा उत्पन्नासाठी थेट विनिमय होतो (म्हणजे आशियातील शहरातल्या कारखानदारी श्रमासारखा), तिथे भांडवलदारी अर्थशास्त्राच्या अर्थाने भांडवल अस्तित्वात नसते व मोलमजुरी अस्तित्वात नसते. म्हणून या व्याख्या श्रमाच्या भौतिक गुणधर्मांवरून अनुमानिलेल्या नसतात (म्हणजे त्याच्या पैदाशीच्या स्वरूपावरूनही अनुमानिलेल्या नसतात आणि मूर्त श्रम म्हणून श्रमाच्या विशिष्ट स्वरुपावरूनही अनुमानिलेल्या नसतात), परंतु त्या निश्चित सामाजिक प्रकारावरून, हा श्रम करण्यात आलेल्या उत्पादनाच्या सामाजिक संबंधांवरून अनुमानिलेल्या असतात. उदाहरणार्थ, एखादा नट किंवा एखादा विदूषकदेखील, जर भांडवलदाराच्या (उद्योजकाच्या) सेवेत राहून काम करत असेल आणि पगाराच्या रूपाने त्याला जे भांडवलदाराकडून मिळते त्यापेक्षा अधिक श्रम त्याला परत करत असेल, तर या व्याख्येनुसार तो उत्पादक श्रमिक ठरेल; तर याच्या उलट अंगावर काम करणारा शिंपी भांडवलदाराच्या घरी येत असेल व त्याच्यासाठी त्याच्या

बिजारीला ठिगळ लावून देत असेल, म्हणजे त्याच्यासाठी नुसतेच उपयोग-मूल्य पैदा करत असेल, तर तो बिन-उत्पादक श्रमिक ठरतो. नटाचा किंवा विदूषकाच्या श्रमाचा विनिमय भांडवलाशी होतो, तर शिंप्याच्या श्रमाचा विनिमय उत्पन्नाशी होतो. पहिल्याचा श्रम वरकड मूल्य पैदा करतो; तर दुसऱ्याच्या बाबतीत उत्पन्न उपभोगले जाते.

उत्पादक व बिन-उत्पादक श्रमाची संकल्पना इथे अथपासून इतिपर्यंत पैशाचा मालक असलेल्याच्या दृष्टिकोनातून केलेली आहे; म्हणजे भांडवलदाराच्या दृष्टिकोनातून केलेली आहे, कामगाराच्या दृष्टिकोनातून ती केलेली नाही; म्हणूनच गानिल्ह वगैरेंनी लिहिलेले अर्थशून्य ठरते; त्यांना या प्रकरणाचा इतका अत्यल्प समज आहे की ते वेश्या, हुजऱ्ये वगैरेंचे श्रम किंवा सेवा किंवा कामगिरी काही तरी फायदा आणून देते किंवा नाही असा प्रश्न उपस्थित करतात. लेखक हा उत्पादक श्रमिक असतो. तो विचार पैदा करतो म्हणून नव्हे, तर त्याचे ग्रंथ प्रसिद्ध करणाऱ्या प्रकाशकाला तो श्रीमंत करतो म्हणून उत्पादक श्रमिक असतो, किंवा तो जर भांडवलदारासाठी मोल-मजुरी करणारा असेल तर तो उत्पादक श्रमिक असतो.

कार्ल मार्क्स, वरकड-मूल्याचे तत्त्वविचार
भाग १ ला, मॉस्को, १९७५, पृष्ठ १५७-५८.

२

त्याच प्रकारचा श्रम उत्पादक किंवा बिन-उत्पादक असण्याचा संभव असतो.

उदाहरणार्थ, पॅराडाइज लॉस्ट हे काव्य पाच पौंडांच्या मोबदल्यात ज्याने लिहिले तो मिल्टन बिन-उत्पादक श्रमिक होता. उलट पक्षी जो लेखक आपल्या प्रकाशकासाठी कारखान्याच्या धर्तीवर ग्रंथ पैदा करतो तो उत्पादक श्रमिक असतो. मिल्टनने पॅराडाइज लॉस्ट हे जे पैदा केले तें रेशमाचा किडा ज्या कारणासाठी रेशीम पैदा करतो त्याच कारणासाठी पैदा केले. ती त्याच्या स्वभावाची कामगिरी होती. मागाहून त्याने ही पैदास पाच पौंडांना विकली, परंतु लिपझिक येथील साहित्यिक कामगार आपल्या प्रकाशकाच्या मार्गदर्शनानुसार पुस्तके तयार करतो (उदाहरणार्थ, अर्थशास्त्रावरील संकलने), तो उत्पादक श्रमिक असतो; कारण त्याची पैदास ही सुरुवातीपासूनच भांडवलाच्या सदराखाली येते आणि ती भांडवल वाढविण्याच्याच केवळ उद्दिष्टासाठी अस्तित्वात येते. एखादी गायिका आपले गाणे स्वतःच्या नावे विकते, म्हणून ती बिन-उत्पादक श्रमिका असते. परंतु तीच गायिका जर एखाद्या उद्योजकाने आपल्यासाठी पैसे मिळवायच्या उद्देशाने कामावर ठेवलेली असेल, तर ती उत्पादक श्रमिका होते; कारण ती भांडवल पैदा करते.

कार्ल मार्क्स, वरकड-मूल्याचे तत्त्वविचार
भाग १ ला, मॉस्को, १९७५, पृष्ठ ४०१

३

विन-भौतिक उत्पादन, ते निव्वळ विनिमयासाठी चाललेले असताना देखील, म्हणजे ते क्रयवस्तू पैदा करत असते तेव्हा—

१. त्याची परिणती क्रय-वस्तूंमध्ये उपयोग-मूल्यांमध्ये होते, आणि यांना उत्पादक व उपभोक्ते यांच्याहून वेगळे व स्वतंत्र असे स्वरूप प्राप्त झालेले असते; म्हणून या क्रयवस्तू उत्पादन व उपभोग यांच्या दरम्यानच्या काळामध्ये अस्तित्वात असण्याचा संभव असतो आणि या काळखंडामध्ये यांचे अभिसरण विक्रीयोग्य क्रयवस्तू म्हणजे पुस्तके, चित्रे, एका शब्दात सांगायचे म्हणजे, सगळ्या कलात्मक पैदाशी, त्या पैदा करणाऱ्या कलाकाराच्या कलात्मक पैदाशींहून स्वतंत्र असलेल्या अशा असतात. इथे भांडवलदारी उत्पादन हे फारच मर्यादित प्रमाणात लागू करण्याजोगे असते: उदाहरणार्थ, जेव्हा एखादा लेखक संयुक्त कृतीचा—उदाहरणार्थ, ज्ञानकोशाचा—कर्ता असतो तेव्हा तो इतर अनेक भाडोत्री लेखकांचे शोषण करतो. या क्षेत्रामध्ये बहुतांशी भांडवलदारी उत्पादनाचा संक्रमणकालीन प्रकार अस्तित्वात राहतो, त्यामध्ये विविध शास्त्रीय किंवा कलात्मक उत्पादक, हातकारागीर किंवा तज्ज्ञ हे ग्रंथ व्यवसायाच्या सामुदायिक व्यापारी भांडवलासाठी काम करत असतात— या नात्याचा योग्य अर्थाने भांडवलदारी उत्पादनपद्धतीशी काही एक संबंध नसतो, आणि ते अजून या पद्धतीच्या अमलाखाली औपचारिक रीत्या देखील आणण्यात आलेले नसते. नेमक्या या पारंपारिक प्रकारांमध्ये श्रमाचे शोषण जास्तीत जास्त असते ही वस्तुस्थिती या प्रकरणात कसलाही बदल करत नाही.

२. उत्पादन हे उत्पादनाच्या क्रियेपासून अलग करता येत नाही; उदाहरणार्थ सगळे प्रयोगशील कलाकार, वक्ते, नट, शिक्षक, डॉक्टर, धर्मगुरू वगैरे. इथे देखील भांडवलदारी उत्पादनपद्धती फारच अल्प प्रमाणात आढळते, आणि या प्रकरणाच्या स्वरूपावरून काही थोड्या क्षेत्रांमध्येच लागू करता येते. उदाहरणार्थ, शिक्षणसंस्थांतले शिक्षक हे संस्थांच्या उद्योजकांसाठी नुसतेच मोलमजुरी करणारे श्रमिक असण्याचा संभव असतो; असले अनेक शैक्षणिक कारखाने इंग्लंडमध्ये अस्तित्वात आहेत. जरी हे शिक्षक विद्यार्थ्यांच्या संबंधात उत्पादक श्रमिक नाहीत, तरी देखील ते आपल्या मालकाच्या संबंधात उत्पादक श्रमिक असतात. हा मालक आपल्या भांडवलाचा विनिमय त्यांच्या श्रमशक्तीशी करतो आणि या प्रक्रियेच्या द्वारा स्वतःला श्रीमंत करून घेतो. नाट्यगृहे, करमणुकीची स्थळे इत्यादि प्रकल्पांना हीच गोष्ट लागू पडते. असल्या बाबतीत नटाचे जनतेशी नाते कलाकाराचे असते, परंतु त्याच्या मालकाच्या संबंधांत तो उत्पादक श्रमिक असतो. या क्षेत्रातील भांडवलदारी उत्पादनाची ही

सगळी दृश्य स्वरूपे एकंदर उत्पादनाशी तुलना केल्यास इतकी क्षुल्लक असतात की ती सर्वस्वी हिशेबाच्या बाहेर ठेवता येतात.

कार्ल मार्क्स, वरकड-मूल्याचे तत्त्वविचार,
भाग १ ला, मॉस्को, १९७५, पृष्ठे ४१०-११

मुद्रण-स्वातंत्र्य आणि कलात्मक निर्मितीचे स्वातंत्र्य

१

ठराव मांडणाऱ्याची इच्छा अशी आहे की मुद्रणस्वातंत्र्य हे व्यापारी व्यवहार चालू ठेवायच्या सर्वसाधारण स्वातंत्र्यातून वगळण्यात येऊ नये; ही परिस्थिती अजून चालूच आहे आणि याच्या योगाने हा अन्तर्विरोध म्हणजे विसंगतीचे अभिजात उदाहरण म्हणून पुढे येत आहे.

"हातांची व पायांची कामगिरी मुक्त आहे, परंतु मेंदूच्या कामगिरीवर मात्र नियंत्रण आहे. अधिक हुशार मेंदूच्या बाबतीत तर शंकाच नाही ना ? ईश्वर करो आणि ही गोष्ट निदान सेन्सॉर मंडळीच्या पुरती तरी आक्षेपार्ह न ठरो. परमेश्वर ज्याला अधिकाराची जागा देतो, त्याला सामंजस्य देखील देतो !"

पहिली गोष्ट जी आपल्यापुढे ठळकपणे येते ती म्हणजे ही की मुद्रणस्वातंत्र्याचा समावेश व्यापार स्वातंत्र्य या सदरामध्ये केलेला आहे. तथापी आपण वक्त्याचे मत नुसतेच धुडकावून लावू शकत नाही. रेम्ब्रंटने मॅडोन्नाचे चित्र डच शेतकरी महिला म्हणून रंगविले; मग आमच्या वक्त्याने स्वातंत्र्याचे चित्रण त्याला आवडत्या व परिचित स्वरूपात का करू नये ?

कार्ल मार्क्स, "मुद्रणस्वातंत्र्यावरील चर्चा"

मार्क्स आणि एन्गल्स, संकलित ग्रंथ,
खंड १ ला, मॉस्को, १९७५, पृष्ठे १७१-७२

२

हक्काच्या उच्चतर प्रकाराचे अस्तित्व त्याच्या कनिष्ठ प्रकाराच्या अस्तित्वावरून सिद्ध झाल्याचे मानता येते हा निष्कर्ष कितीही बिनचूक असला, तरी तो कनिष्ठ क्षेत्र हे उच्चतराचे मापक ठरवतो आणि त्याचे नियम हे त्यांच्या स्वतःच्या मर्यादांमध्ये समंजस असले तरी ते त्यांच्या स्वतःच्या क्षेत्राचे नियम नसून उच्चतर क्षेत्राचे आहेत

असा दावा करून त्या नियमांना विडंबनांचे रूप देतो तेव्हा तो लागू करणे चुकीचे ठरते. हा प्रकार म्हणजे जणू काय मी एखाद्या महाराक्षसाला एखाद्या ठेंगूच्या घरात राहायला भाग पाडायला मागतो आहे असा ठरतो.

व्यापाराचे स्वातंत्र्य, मालमत्तेचे स्वातंत्र्य, सदसद्विवेकबुद्धीचे स्वातंत्र्य, मुद्रण-स्वातंत्र्य, न्यायकोर्टांचे स्वातंत्र्य, या सगळ्या एकाच मूळ जातीच्या उपजाती आहेत आणि मूळ जाती म्हणजे कोणतेही खास नाव नसलेले स्वातंत्र्य ही आहे. परंतु या ऐक्यापायी फरक विसरणे आणि विशिष्ट उपजाती हे सगळ्या उपजातींचे मापक, प्रमाण, क्षेत्र ठरविणे हे अगदी चुकीचे आहे. स्वातंत्र्याच्या एका उपजातीकडून होणारी असहिष्णुता आहे; कारण इतर उपजाती स्वतःकडे कमीपणा घ्यायला व आपण स्वतः तिचे मांडलिक असल्याचे जाहीर करायला तयार असतील तरच त्यांचे अस्तित्व चालू द्यायला ती तयार आहे.

व्यापार स्वातंत्र्य हे नेमके व्यापार स्वातंत्र्यच आहे आणि अन्य कोणतेही स्वातंत्र्य नाही; कारण त्याच्या अन्तर्गत असलेल्या व्यापाराचे स्वरूप त्याच्या जीवनाच्या अन्तर्गत नियमांनुसार विकसित होत असते.

कार्ल मार्क्स, "मुद्रण स्वातंत्र्यावरील चर्चा"
मार्क्स आणि एन्गल्स, संकलित ग्रंथ,
खंड १ ला, मॉस्को, १९७५, पृष्ठ १७३

३

विशिष्ट क्षेत्राच्या स्वातंत्र्याचे रक्षण करण्यासाठी किंवहुना ते स्वातंत्र्य समजून घेण्यासाठी मी त्याच्या आवश्यक स्वरूपापासून सुरुवात केली पाहिजे, आणि त्याच्या बाह्य संबंधांपासून नव्हे. परंतु वृत्तपत्रे आपल्या स्वरूपाशी सच्ची असतात काय, आपल्या स्वरूपाच्या उदात्तपणानुसार ती कृती करतात काय, जी वृत्तपत्रे स्वतःला व्यवसायाच्या पातळीइतकी खाली जाण्याची अधोगती पतकरतात ती वृत्तपत्रे स्वतंत्र असतात काय? अर्थात् लेखकाने जगता व लिहिता येण्यासाठी कमाई ही केलीच पाहिजे, परंतु त्याने कमाई करण्यासाठी जगता व लिहिता कामा नये.
बेरँजर जेव्हा हे गाणे म्हणतो :

Je ne vis que pour faire des chansons,
Si vous m'otez ma place Monseigneur,
Je ferai des Chansons pour vivre, @

@ मी जगतो केवळ गाणी रचण्यासाठी,
अहो मिस्टर, तुम्ही जर काढून टाकले मजला,
तर रचीन गाणी मी हो जगण्यासाठी

तेव्हा या त्याच्या धमकीमध्ये एक उपरोधिक कबुली असते, ती म्हणजे ही की कवीला काव्य हे साधन होऊन बसते तेव्हा आपल्या योग्य क्षेत्राला कवी सोडचिठी देतो.

लेखक हा आपल्या लेखनकार्याकडे साधन म्हणून अजिबात बघत नसतो. ते कार्य हे स्वतःच ध्येय असते; ते त्याच्या स्वतःसाठी व इतरांसाठी साधन म्हणून इतके अल्प असते की तो जरूर पडल्यास त्याच्या अस्तित्वासाठी आपल्या अस्तित्वावर पाणी सोडतो. आणखी एका रीतीने पाहिल्यास लेखक हा "माणसाची आज्ञा पाळण्यापेक्षा ईश्वराची आज्ञा पाळा" या तत्त्वाचे पालन करणाऱ्या धर्मोपदेशकासारखा असतो, आणि माणूस या सदरात तो स्वतःचा आपल्या मानवी गरजांसकट व वासनांसकट समावेश करून घेतो. उलटपक्षी, ज्या शिंप्याकडे मी पॅरीसियन फ्रॉक कोटाची ऑर्डर दिलेली असते, तो जर माझ्यासाठी एक रोमन झगा घेऊन आला आणि असे समर्थन करू लागला की 'हे सौंदर्याच्या अमर नियमाशी अधिक सुसंगत आहे,' तर मग काय करायचे!

मूलभूत मुद्रणस्वातंत्र्य हे व्यवसाय नसण्यामध्ये असते. जो लेखक वृत्तपत्र व्यवसायाची अधोगती त्याला भौतिक साधन करण्यात करतो त्याला या अन्तर्गत बिन-स्वातंत्र्यासाठी सेन्सॉरशिप या बाह्य बिन-स्वातंत्र्याची शिक्षा देणेच योग्य ठरते, किंवा असे म्हणावे हवे तर, की त्याचे खुद्द अस्तित्व हीच त्याला शिक्षा असते.

कार्ल मार्क्स, "मुद्रण स्वातंत्र्यावरील चर्चा"

मार्क्स आणि एन्गल्स, संकलित ग्रंथ,
खंड १ ला, मॉस्को, १९७८, पृष्ठे १७४-७५

४

व्यक्ती आपले बौद्धिक जीवन इतरांना जेणेकरून माहीत करून देतात अशी वृत्तपत्रव्यवसाय ही सगळ्यांत जास्त सार्वत्रिक रीत असते. त्याला व्यक्तीविषयी आदर नसतो, तर केवळ बुद्धिमत्तेविषयी आदर असतो. तुमचे बौद्धिक माहिती देण्याचे कर्तृत्व अधिकृत रीत्या खास बाह्य खुणांनी निश्चित करून घेणे तुम्हाला हवे आहे काय? जे मी इतरांसाठी होऊ शकत नाही, ते मी स्वतःसाठी असत नाही आणि असू शकत नाही. मला जर इतरांसाठी आध्यात्मिक शक्ती व्हायला परवानगी मिळत नसेल, तर मग स्वतःसाठी आध्यामिक शक्ती व्हायचा मला मुळीच हक्क नाही; आणि काही व्यक्तींना आध्यात्मिक शक्ति व्हायचा खास हक्क तुम्हाला द्यायला हवा आहे काय? जसा प्रत्येक जण लिहायला-वाचायला शिकतो, तसा प्रत्येकाला लिहिण्या-वाचण्याचा हक्क असायलाच पाहिजे.

तर मग, लेखकांची विभागणी "अधिकृत" व "अनधिकृत" अशी कुणासाठी योजिलेली आहे? खऱ्याखुऱ्या अधिकृतांसाठी ती योजिलेली नाही हे उघडच आहे,

कारण त्याच्याशिवाय त्यांना आपला प्रभाव जाणवता येतो. म्हणून ती "अनधिकृतां-साठी" योजिलेली आहे, कारण त्यांना स्वतःचे रक्षण करून घ्यायला हवे आहे आणि बाह्य खास हक्काच्या साधनाने इतरांवर प्रभाव पाडायला हवे आहे!

याच्या भरीला ही समजावणी वृत्तपत्रविषयक कायदा अनावश्यकही करून ठेवत नाही; कारण शेतकरी इस्टेटीचा एक वक्ता म्हणतो:

"खास हक्क असलेली व्यक्ती देखील आपल्या अधिकाराचे अतिक्रमण करू शकत नाही काय आणि शिक्षेला पात्र होत नाही काय? म्हणून, काही झाले तरी, वृत्तपत्रविषयक कायदा आवश्यक असणार आणि याचा परिणाम असा होईल की वृत्तपत्रविषयक सार्वत्रिक कायदा असताना ज्या अडचणी येतात तशाच अडचणी आपल्याला येतील."

जर्मन माणूस जर आपल्या इतिहासाकडे मागे वळून पाहील, तर त्याला आपल्या मंद राजकीय विकासाच्या मुख्य कारणांपैकी एक कारण, तसेच लेसिंगच्या पूर्वीच्या साहित्याच्या दयनीय अवस्थेचे कारण देखील, "अधिकृत लेखकांचे" अस्तिव हेच असल्याचे आढळून येईल. व्यवसायाने, हुन्नर संघाच्या अगर खास हक्काच्या योगाने असलेले विद्वान लोक, डॉक्टर लोक व इतर, सतराव्या व अठराव्या शतकांतले रुक्ष विद्यापीठीय लेखक, त्यांच्या त्या कडक शेंड्या आणि त्यांचा तो प्रतिष्ठित विद्वज्जड-पणा आणि त्यांचे ते क्षुद्र शब्दच्छल करणारे प्रबंध—या सगळ्यांनी जनता आणि मन यांच्या दरम्यान बांध घातले, जीवन आणि विज्ञान यांच्या दरम्यान बांध घातले, स्वातंत्र्य आणि मानवजाती यांच्या दरम्यान बांध घातले. आपल्या "अनधिकृत" लेखकांनीच आपले साहित्य निर्माण केले. गॉट्श्चेड आणि लेसिंग "अधिकृत" व "अनधिकृत" लेखकाच्या दरम्यानची ही आपली पसंती आहे!

सर्वसाधारणपणे आपल्याला असे "स्वातंत्र्य" आवडते की जे केवळ बहु-वचनातच खरे असते. "स्वातंत्र्यांचे" मर्यादित क्षितिज हे "स्वातंत्र्यासाठी" किती धोकेबाज असते याचा मोठा ऐतिहासिक प्रमाणावरील पुरावा म्हणजे इंग्लंड हा आहे.

"Ce mot des Libertes", व्हॉल्टेअर म्हणतो, "des privileies, suppose l'assujettissemunt. Des Libertes' sont des exemptions de la serritude generale". @

कार्ल मार्क्स, "मुद्रण स्वातंत्र्यावरील चर्चा"
मार्क्स आणि एन्गल्स, संकलित ग्रंथ,
खंड १ ला, मॉस्को, १९७५, पृष्ठे १७७-७८

---

a "हा स्वातंत्र्याचा शब्द, खास हक्कांचा शब्द, हा अंकितपणा समजून चालतो. स्वातंत्र्ये ही सर्वसाधारण गुलामगिरीतून सोडवणुकी असतात." —संपादक

५

वृत्तपत्रांवरील स्टँप ड्यूटी रद्द करायचे बिल काल कॉमन्स सभेत दुसऱ्या वाचनानंतर मंजूर करण्यात आले. बिलाच्या मुख्य तरतुदी अशा आहेत : १. वृत्तपत्रांवरील सक्तीची स्टँप ड्यूटी रद्द करण्यात आली आहे; २. स्टँम्प्ड कागदावर छापलेली नियतकालिके प्रकाशकांनी पोस्टाने विनामूल्य धाडली जाण्याचा खास हक्क उपभोगणे चालू राहील. तिसरे कलम पोस्टातून धाडायच्या छापील मजकुराच्या आकारासंबंधी आहे आणि आणखी एक कलम असे सांगते की स्टॅम्प्ड वृत्तपत्रांनी संभाव्य बदनामी इलाजांविरुद्ध बाँड दिला पाहिजे. वृत्तपत्रांवरील कर बसविण्याच्या जुन्या पद्धतीचे वैशिष्ट्य दर्शवायला दोन गोष्टी पुरेशा आहेत : लंडन शहरात दैनिक वृत्तपत्राचे प्रकाशन करायला किमानपक्षी ५०,००० ते ६०,००० पौंड भांडवल लागते; आणि फारच थोडे अपवाद वगळल्यास सगळी इंग्लिश वृत्तपत्रे नव्या बिलाला निर्लज्जपणे आणि औचित्याचा सपशेल अभाव दर्शवीत विरोध करतात. जुनी पद्धती प्रचलित वृत्तपत्रांना संरक्षण देते आणि विमुक्त आध्यात्मिक उत्पादनाला प्रतिबंध करणे हे सिद्ध करायला आणखी अधिक पुराव्याची गरज आहे काय? कामगारवर्गाच्या हितसंबंधांचे प्रतिनिधित्व करणारी जी थोडी साप्ताहिके आहेत--अर्थात् दैनिक वृत्तपत्रांचा तर प्रश्नच उपस्थित होऊ शकत नाही--ती कामगारांकडून मिळणाऱ्या साप्ताहिक देणग्यांच्या आधारावर तग धरून आहेत. इंग्लंडमधील कामगार युरोपातील कामगार करतात त्यापेक्षा अगदीच वेगळा त्याग समाइक उद्दिष्टांसाठी करतात. इंग्लिश वृत्तपत्रव्यवसायाचा महाराक्षस टाइम्स करुणहास्यरसभरित भावनांनिशी ino aris et fous @ लढतो, म्हणजे वृत्तपत्रीय मक्तेदारीसाठी लढतो, मधेच तो स्वतःची तुलना डेल्फीच्या ओरॅकलशी नम्रपणे करतो, मधेच तो छातीठोकपणे सांगतो की इंग्लंडकडे टिकवून ठेवण्याच्या लायकीची एकच संस्था आहे आणि ती म्हणजे टाइम्स हीच, मध्येच तो जागतिक वृत्तपत्र व्यवसायात अरेरावाच्या भूमिकेवर दावा सांगतो, आणि कसल्याही कुचुककै-नार्दूजी कराराशिवाय[४७] युरोपखंडांतल्या सगळ्याप त्रकारांवर पालकत्वाचा हक्क सांगतो.

कार्ल मार्क्स "नेपोलियन आणि बार्बेस—
वृत्तपत्रांवरील स्टँप ड्यूटी"

मार्क्स/एन्गल्स, वेर्के, खंड ११ वा, १९६९.
पृष्ठे १५८-५९

@ उबाऱ्या-निवाऱ्यासाठी—संपादक

संन्यास आणि सुखोपभोग

जे तत्त्वज्ञान सुखोपभोगाचा उपदेश करते ते युरोपखंडात सिरेनाइक पंथाइतके जुने आहे. ज्याप्रमाणे प्राचीन काळी ग्रीक लोक हेच या तत्त्वज्ञानाचे पुरस्कर्ते होते, त्याप्रमाणे आधुनिक काळात फ्रेंच लोक हेच या तत्त्वज्ञानाचे पुरस्कर्ते आहेत, आणि खरोखरी त्याच कारणांसाठी आहेत, कारण त्यांच्या मनोवृत्तीने व त्यांच्या समाजाने त्यांना सुखोपभोग घेण्यासाठी जास्तीत जास्त समर्थ केले आहे. सुखोपभोगाचे तत्त्वज्ञान म्हणजे सुखोपभोगाचा खास हक्क असलेल्या विशिष्ट सामाजिक वर्तुळांची ही हुशारीची भाषा होती, याहून अधिक ते कधीही काहीही नव्हते. त्यांच्या सुखोपभोगाची रीत आणि त्याचा आशय यांची निश्चिती सदैव उर्वरित समाजाच्या एकंदर रचनेने केलेली होती, आणि तिच्या सगळ्या अन्तर्विरोधांची त्याला बाधा होत होती, ही वस्तुस्थिती जरी बाजूला ठेवली, तरी हे तत्त्वज्ञान विश्वव्यापी स्वरूपावर दावा सांगायला लागले आणि आपण एकंदर समाजाचा जीवनविषयक दृष्टिकोन आहोत असे जाहीर करू लागले, त्या बरोबर ते नुसता शब्दसमुच्चय होऊन राहिले. नंतर ते घसरत घसरत नीतिपाठांचा गौरव करायच्या पातळीवर आले, प्रचलित समाजाला सुधारलेला दिलासा द्यायच्या पातळीवर आले, किंवा त्याचे परिवर्तन त्याच्या विरोधी तत्त्वज्ञानामध्ये झाले, सक्तीचा संन्यास हाच सुखोपभोग असल्याचे ते जाहीर करू लागले.

आधुनिक काळामध्ये सुखोपभोगाचे तत्त्वज्ञान सरंजामशाहीच्या ऱ्हासाबरोबर आणि सरंजामी जमीनदार-सरदारांचे परिवर्तन एकतंत्री राजेशाहीच्या दरबारातील मुखलोलुप उधळ्या सरदारांमध्ये झाल्यावर उदयास आले. या सरदारांमध्ये या तत्त्वज्ञानाने बहुतांशी जीवनाविषयी थेट पोरकट दृष्टिकोन ठेवायचे रूप धारण केले आणि त्याची अभिव्यक्ती आत्मचरित्रे, कविता, कादंबऱ्या, यांमध्ये आढळते. ते क्रान्तिकारक भांडवलदारी अशा थोड्याशा लेखकांच्या हातीच तेवढे खरेखुरे तत्त्वज्ञान झाले आहे. हे लेखक एका अंगाने दरबारी सरदारांच्या संस्कृतीत व जीवनपद्धतीत सहभागी झाले आणि दुसऱ्या अंगाने भांडवलदारवर्गाच्या जीवनाच्या अधिक सर्वसाधारण परिस्थितीवर आधारलेल्या अधिक सर्वसाधारण दृष्टिकोनामध्ये सहभागी झाले. म्हणून हे तत्त्वज्ञान या दोन्ही वर्गांनी स्वीकारले, मात्र सर्वस्वी वेगवेगळ्या दृष्टिकोनातून स्वीकारले. सरदार मंडळीमध्ये ही भाषा सर्वस्वी त्यांच्या इस्टेटींपुरतीच आणि त्या इस्टेटीवरील जीवनाच्या परिस्थिती पुरतीच मर्यादित राहिली, तर भांडवलदारांनी हिला सर्वसाधारण स्वरूप दिले आणि कसलाही भेदभाव न ठेवता प्रत्येक व्यक्तीला उद्देशूनही लागू केली. या व्यक्तींच्या जीवनविषयक परिस्थितीकडे अशा रीतीने दुर्लक्ष करण्यात आले आणि सुखोपभोगाच्या तत्त्वविचाराचे परिवर्तन बेचव व ढोंगी

नैतिक सिद्धान्तामध्ये करण्यात आले. आणखी पुढील विकासाच्या ओघात सरदार वर्गाला उलथून पाडण्यात आले आणि भांडवलदार वर्गाचा संघर्ष त्याच्या विरोधातल्या कामगार वर्गाशी चालू झाला, त्या वेळी सरदार वर्ग हा धर्मनिष्ठ झाला आणि भांडवलदार-वर्ग आपल्या तत्त्वविचारांमध्ये गंभीरपणे नैतिक व काटेकोर झाला, किंवा उपरोक्त ढोंगीपणाच्या आहारी गेला. मात्र सरदार वर्गाने व्यवहारात सुखोपभोगाचा त्याग मुळीच केला नाही, तर भांडवलदार वर्गामध्ये सुखोपभोगाने अधिकृत, आर्थिक रूपदेखील धारण केले—ते म्हणजे चैनबाजीचे.

कोणत्याही विशिष्ट वेळी व्यक्तींना उपलब्ध असलेले सुखोपभोगाचे प्रकार आणि त्यांच्या वास्तव्यातले वर्गीय संबंध व हे संबंध जिच्यांतून उद्‌भवतात ती उत्पादनाची परिस्थिति व व्यवहार, यांच्या दरम्यानचे बंधन शोधून काढणे केव्हा शक्य झाले? जनजीवनाच्या प्रत्यक्ष आशयाच्या बाहेर आतापर्यंत अस्तित्वात असलेल्या व त्याच्या विरोधांत आलेल्या सुखोपभोगांच्या प्रकारांचा संकुचितपणा, सुखोपभोगाचे प्रत्येक तत्त्वज्ञान आणि प्रत्यक्षांत अस्तित्वात असलेला सुखोपभोग यांच्या दरम्यानचे बंधन आणि सगळ्या व्यक्तींना कसलाही भेदभाव न करता सारखे लेखणाऱ्या असल्या तत्त्वज्ञानाचा ढोंगीपणा सगळ्यांचा शोध घेणे केव्हा शक्य झाले? आतापर्यंत अस्तित्वात असलेल्या जगातील उत्पादनाची परिस्थिती व व्यवहार यांच्यावर टीका करणे केव्हा शक्य झाले? म्हणजे भांडवलदार वर्ग व कामगार वर्ग यांच्या विरोधातून कम्युनिस्ट व समाजसत्तावादी मतांचा उदय झाला, तेव्हाच केवळ हे शक्य झाले. याच्या योगाने सगळ्या नीतीचा आधारच उध्वस्त झाला, मग ती नीति संन्यासाची असो, किंवा सुखोपभोगाची असो.

कार्ल मार्क्स आणि फ्रेडरिक एन्गल्स
जर्मन विचारसरणी

मार्क्स आणि एन्गल्स, संकलित ग्रंथ,
खंड ५ वा, मॉस्को, १९७६, पृष्ठे ४१७-१९

कामकाज आणि खेळ

पहिली गोष्ट म्हणजे श्रम ही अशी प्रक्रिया आहे, की जिच्यामध्ये माणूस आणि निसर्ग हे दोघेही भाग घेतात आणि जिच्यामध्ये माणूस स्वेच्छेने आपण स्वतः आणि निसर्ग यांच्या दरम्यानच्या भौतिक क्रिया-प्रतिक्रिया सुरू करतो, त्यांचे नियमन करतो व

त्यांच्यावर नियंत्रण ठेवतो. निसर्गाच्या स्वतःच्या शक्तींपैकी एक शक्ति या नात्याने तो स्वतः निसर्गाच्या विरोधात राहतो, आणि आपल्या स्वतःच्या गरजांना जुळणाऱ्या स्वरूपात निसर्गाच्या पैदाशी हस्तगत करण्यासाठी तो आपले हात व पाय, मस्तक व पंजे, म्हणजे आपल्या शरीराच्या नैसर्गिक शक्ती, यांना तो गतिशील करतो. बाह्य जगावर अशी कृति करून व त्यात बदल करून तो त्याचवेळी आपल्या स्वतःच्या स्वभावातही बदल घडवून आणतो. आपल्या सुप्त सामर्थ्याचा विकास करतो आणि त्यांना आपल्या अधिकाराच्या आज्ञेत क्रियाशील व्हायला भाग पाडतो. आता आपण श्रमाचे आदिम उपजतबुद्धीचे प्रकार विचारात घेत आहोत आणि हे प्रकार केवळ प्राण्याची आठवण आपल्याला करून देतात. ज्या अवस्थेत मानवी श्रम हा अजून आपल्या पहिल्या उपजतबुद्धीच्या टप्प्यावर होता, त्याच्यापासून माणूस हा आपली श्रमशक्ति क्रयवस्तू म्हणून बाजारात विकायला आणायच्या अवस्थेत आला, त्याच्या दरम्यान असंख्य वर्षांचा काळ लोटला. श्रमाच्या ज्या प्रकारावर सर्वस्वी मानवी असा शिक्का बसतो, त्या स्वरूपांतला श्रम आपण गृहीत धरतो. विणकराच्या कामगिऱ्यांसारख्या दिसणाऱ्या कामगिऱ्या कोळी करत असतो, आणि मधमाशी आपल्या पोळ्याच्या रचनेमध्ये अनेक वास्तुशिल्पींना शरमेने खाली मान घालायला लावते, परंतु सगळ्यात जास्त वाईट वास्तुशिल्पी हा सर्वोत्तम मधमाशीहून वेगळा असतो त्याचे कारण म्हणजे तो आपली रचना वास्तवांत उभारण्यापूर्वी ती कल्पनेत उभारतो. प्रत्येक श्रमप्रक्रियेच्या शेवटी आपल्याला अशी फलश्रुति मिळते, की जी तिच्या सुरुवातीलाच श्रमिकाच्या डोक्यांत अगोदरच अस्तित्वात होती. ज्या सामुग्रीवर तो काम करतो, तिच्या स्वरूपात तो बदल घडवून आणतो इतकेच नव्हे, तर तो आपले स्वतःचे असे उद्दिष्ट देखील साध्य करतो, की जे त्याच्या कार्यपद्धतीला नियम घालून देते, आणि ज्याला त्याने आपली इच्छा अंकित करणे भाग असते. आणि हा अंकितपणा म्हणजे एक क्षणिक कृति नसते. शारीरिक अवयवांनी काम करण्याच्या भरीला ही प्रक्रिया, सगळी कामगिरी चालू असताना, माणसाच्या इच्छेला क्रमाक्रमाने त्याच्या उद्दिष्टाशी सुसंवादी व्हायला भाग पाडते. याचा अर्थ बारकाईने लक्ष देणे हा असतो. कामाच्या स्वरूपाने व ज्या पद्धतीने ते अमलात आणायचे त्या पद्धतीकडे तो जितका कमी आकर्षित होतो, आणि आपल्या शारीरिक व मानसिक सामर्थ्यांना खेळ म्हणून कामी येणारे असे काही तरी आपण उपभोगत आहोत असे त्याला जितके कमी वाटते, तितके त्याचे लक्ष अधिक बारकाईने खेचले जाते.

कार्ल मार्क्स, भांडवल, खंड १ ला, १९७४,
पृष्ठे १७३-७४

भांडवलदारी संस्कृती आणि गुन्हेगारी

तत्त्वज्ञानी हा विचार पैदा करतो, कवि हा कविता पैदा करतो, धर्मोपदेशक हा उपदेशपाठ पैदा करतो, प्राध्यापक हा प्रबंध पैदा करतो, इत्यादि. गुन्हेगार हा गुन्हे पैदा करतो. उत्पादनाची ही शेवटची शाखा आणि एकंदर समाज यांच्या दरम्यानच्या बंधनाकडे जर आपण जरा अधिक बारकाईने पाहिले, तर अनेक पूर्वग्रहांपासून आपण आपली स्वतःची सुटका करून घेऊ. गुन्हेगार हा गुन्हे पैदा करतो इतकेच नव्हे, तर तो फौजदारी कायदा देखील पैदा करतो आणि या कायद्याबरोबर तो फौजदारी कायद्यावर व्याख्याने देणारा प्राध्यापकदेखील पैदा करतो आणि याच्या भरीला तो अपरिहार्य प्रबंध देखील पैदा करतो आणि या प्रबंधामध्ये हाच प्राध्यापक आपली व्याख्याने दाखल करून ही व्याख्याने "क्रयवस्तू" म्हणून सर्वसाधारण बाजारपेठेत आणतो. याच्याबरोबर नैसर्गिक संपत्तीत भर पडते. आणि शिवाय व्यक्तिगत सुखोपभोग देखील असतोच—आणि मातबर साक्षीदार हेर प्रोफेसर रॉश्चेर आपल्याला [सांगतात] तदनुसार— त्या प्रबंधाचे हस्तलिखित खुद्द त्याच्या उत्पादनकर्त्याला व्यक्तिगत सुखोपभोग उपलब्ध करून देतेच.

याच्या भरीला गुन्हेगार हा सगळे पोलिसदल आणि फौजदारी न्यायालये, पोलिस शिपाई, न्यायाधीश, फाशी देणारे, पंच, इत्यादि पैदा करतो; आणि व्यापार-व्यवहाराच्या या सगळ्या वेगवेगळ्या शाखा आणि त्यांच्यातून तयार झालेले सामाजिक श्रमविभागणीचे तितकेच अनेक प्रकार, हे मानवी मनाच्या वेगवेगळ्या क्षमता विकसित करतात, नव्या गरजा निर्माण करतात आणि त्या भागवायचे नवे मार्ग निर्माण करतात. नुसत्या छळवादानेच अत्यंत कल्पक अशा यांत्रिक शोधांना जन्म दिलेला आहे आणि आपल्या यंत्रांच्या उत्पादनकार्यात अनेक सन्माननीय कारागिरांना कामाला लावले आहे.

गुन्हेगार हा अंशतः नैतिक व अंशतः शोककारी प्रभाव, जसे प्रकरण असेल तसा, पैदा करतो आणि अशा प्रकारे जनतेच्या नैतिक व सौंदर्यविषयक भावना जागृत करून एक "सेवाच" रूजू करतो. तो फौजदारी कायद्यावरील प्रबंध पैदा करतो इतकेच नव्हे, गुन्हेविषयक कायद्यांचे कलमवार ग्रंथत्व त्यांच्या जोडीला या क्षेत्रातले कायदे करणारे आमदार-खासदार पैदा करतो इतकेच नव्हे, तर कला, ललित साहित्य, कादंबऱ्या आणि शोकान्तिका देखील पैदा करतो, मुल्नरचे ड्यूल्ड आणि शिलरचे राऊबेर इतकेच नव्हे, तर [सोफोक्लीसचे] एडिपस आणि [शेक्स्पियरचे] तिसरा रिचर्ड देखील पैदा करतो. गुन्हेगार हा भांडवलदारी जीवनाच्या कंटाळवाणे-

पणाचा व दैनंदिन सुरक्षिततेचा भंग करतो. अशा प्रकारे तो या जीवनाला खुरटणुकी-पासून दूर ठेवतो आणि ज्याच्या अभावी स्पर्धेची प्रेरणा देखील बोथट झाली असती असा अस्वस्थ तणाव निर्माण करतो. अशा प्रकारे तो उत्पादन शक्तींना उत्तेजन देतो. गुन्ह्याच्या योगाने फालतू लोकसंख्येचा काही भाग श्रमाच्या बाजारपेठेतून बाद होतो आणि अशा प्रकारे श्रमिकांच्या दरम्यानची स्पर्धा तो कमी करतो—काही एका मर्यादेपर्यंत पगाराचे मान किमान पातळीच्या खाली जायला प्रतिबंध करतो—तर गुन्ह्याविरुद्धचा संघर्ष हा या लोकसंख्येचा आणखी एक भाग आपल्यात सामावून घेतो. अशा प्रकारे गुन्हेगार हा बिनचूक समतोल घडवून आणणारे नैसर्गिक "प्रतिद्वंद्वी वजन" म्हणून कामी येतो आणि "उपयुक्त" व्यवसायांचे सबंध क्षेत्र खुले करून ठेवतो.

उत्पादक सामर्थ्याच्या विकासावर गुन्हेगाराचा परिणाम हा तपशीलवार दाखवून देता येतो. चोर जर नसते, तर कुलुपांनी आपली सध्याची सर्वोत्कृष्टपणाची पातळी कधी तरी गाठली असती काय? खोट्या सह्या करणारे जर नसते, तर बँक-नोटा बन-वायच्या कलेने सध्याची परिपूर्णता गाठली असती काय? व्यापारातल्या फसवणुकी जर नसत्या, तर साध्या व्यापाराच्या क्षेत्रात (बाब्बेज्ज पाहा) सूक्ष्मदर्शक यंत्राने शिरकाव केला असता का? व्यावहारिक रसायनशास्त्र हे जितके उत्पादनासाठीच्या प्रामाणिक कळकळीचे ऋणी आहे, तितकेच ते क्रयवस्तूंतील भेसळीचे व ही भेसळ उघड करून दाखवायच्या प्रयत्नांचे ऋणी नाही काय? गुन्हा हा मालमत्तेवरील हल्ला करायच्या आपल्या सततच्या नव्या नव्या पद्धतींच्या द्वारा संरक्षणाच्या नव्या पद्धती सतत जन्माला घालतो, आणि म्हणून, यंत्रांच्या शोधांच्या बाबतीत संप जितके उत्पादक ठरतात तितकाच गुन्हा हा उत्पादक असतो. आणि खासगी गुन्ह्याचे क्षेत्र जरा आपण बाजूला ठेवू: परंतु राष्ट्रीय गुन्हा जर नसता तर जागतिक बाजारपेठ कधी तरी अस्तित्वात आली असती काय? खरे सांगायचे म्हणजे राष्ट्रे देखील अस्तित्वात आली असती काय? आणि थेट आदमच्या काळापासून सतत पापाचे झाड हे त्याच वेळी ज्ञानाचे झाड झालेले नाही काय?

आपल्या मधमाशांची बोधकथा (१७०५) या ग्रंथामध्ये मान्देविल्ले याने अगोदरच असे दाखवून दिले होते की हर प्रकारचा प्रत्येक व्यवसाय हा उत्पादक असतो, आणि या सबंध युक्तिवादाच्या धोरणाला त्याने वाचा फोडलेली होती ती अशी:

"ज्याला आपण या जगातले नैतिक तसेच नैसर्गिक पाप म्हणतो, तेच आप-ल्याला समाजप्रिय प्राणी बनविणारे महान तत्त्व असते, तो सगळ्या व्यापारांचा व उद्योगांचा, निरपवादपणे, भक्कम पाया असतो, जीवनाधार असतो [....] सगळ्या कलांच्या व शास्त्रांच्या अस्सल उगमाचा शोध आपण तिथेच घेतला पाहिजे; आणि [....] ज्या क्षणी पाप बंद होईल, त्या क्षणी समाज सर्वस्वी बरखास्त (dissolved) @ जरी

झाला नाही, तरी बिघडला असलाच पाहिजे" (दुसरी आवृत्ती, लंडन, १७२३, पृष्ठ ४२८).[४८]

भांडवलदारी समाजाच्या तुच्छतावादी समर्थकांच्या पेक्षा केवळ मान्देविल्लेच तेवढा अर्थात् कमालीचा अधिक धीट व अधिक प्रामाणिक होता.

कार्ल मार्क्स, वरकड-मूल्याचे तत्त्वविचार,
भाग १ ला, मॉस्को, १९७५, पृष्ठे ३८७-८८.

@ हस्तलिखितात "नष्ट (destroyed)" असा शब्द आहे. —संपादक

कामगार वर्गाचे ऐतिहासिक कार्य

कामगार वर्ग आणि संपत्ति

कामगार वर्ग आणि संपत्ति परस्परविरोधी असतात; म्हणून त्या दोहोंचा मिळून एक समवाय होतो. दोहोंची निर्मिती खासगी मालमत्तेच्या दुनियेने केलेली असते. प्रश्न असा आहे की या परस्परविरोधामध्ये प्रत्येकाचे नेमके स्थान कोणते आहे. एकाच समवायाच्या त्या दोन बाजू आहेत असे जाहीर करणे पुरेसे नाही.

खासगी मालमत्ता या नात्याने, संपत्ति या नात्याने, खासगी मालमत्तेला स्वतःचे अस्तित्व टिकवून ठेवणे भाग असते आणि म्हणून स्वतःच्या विरोधात असलेल्याचे, म्हणजे कामगारवर्गाचे, अस्तित्व टिकवून ठेवणे भाग असते. या परस्परविरोधाची, स्वयं-संतुष्ट खासगी मालमत्तेची, ही विधायक बाजू असते.

उलट पक्षी कामगार वर्गाला, कामगार वर्ग या नात्याने स्वतःला रद्द करणे भाग असते, आणि अशा रीतीने आपल्या विरोधातली जी खासगी मालमत्ता, जी त्याचे अस्तित्व निश्चित करते आणि जी त्याला कामगार वर्ग करते, तीदेखील रद्द करणे त्याला भाग असते. ही या परस्परविरोधाची नकारात्मक बाजू असते. खुद्द याच्या अंतर्गत असा हा याचा अस्वस्थपणा असतो, यात विरून गेलेली आणि स्वतःला विरून घेणारी अशी ही खासगी मालमत्ता असते.

मालमत्ताधारी वर्ग आणि कामगार वर्ग हे दोन्ही एकच मानवी आत्म-दुरावा सादर करतात. परंतु यातला पहिला वर्ग हा या आत्मदुराव्यामध्ये स्वस्थता वाटणारा व मजबुती लाभलेला असा आपल्याला मानून चेतो, दुरावा हे आपले स्वतःचे सामर्थ्य असे तो ओळखून असतो आणि मानवी अस्तित्वाचा देखावा त्याला त्यात जाणवतो. दुसऱ्याला दुराव्यामध्ये आपला नाश जाणवतो; त्यांत त्याला आपली स्वतःची सामर्थ्यशून्यता दिसते आणि आपल्या अमानुष अस्तित्वाची वास्तवता दिसते. हेगेलची शब्दयोजना उपयोगात आणायची म्हटल्यास आपल्या अधोगतीमध्ये त्याला त्या

अधोगतीविषयीचा संताप दिसतो; हा संताप असा असतो की त्याचा मानवी स्वभाव आणि त्याची जीवनविषयक परिस्थिती यांच्या दरम्यानच्या अन्तर्विरोधाने त्याला हा संताप येणे अवश्यमेव भाग पाडलेले असते, म्हणजे त्या स्वभावाचा हा सपशेल, निर्धारयुक्त आणि सर्वंकष नकार असतो.

म्हणून या परस्परविरोधाच्या अन्तर्गत, खासगी मालमत्तेचा धनी हा सनातनी बाजू असतो आणि कामगार वर्ग हा विघातक बाजू असतो. पहिल्यामधून हा परस्पर-विरोध टिकवून ठेवण्याची कृति उद्‌भवते, तर दुसऱ्यामधून तो नष्ट करण्याची कृति उद्‌भवते.

खरे सांगायचे म्हणजे खासगी मालमत्ता ही स्वतःलाच आपल्या आर्थिक हाल-चालीतून आपल्या स्वतःच्या विनाशाकडे पिटाळून नेते, परंतु ही गोष्ट ती तिच्यावर अवलंबून नसलेल्या विकासाच्या द्वाराच घडवून आणते. म्हणजे हा विकास अभावित असतो आणि खासगी मालमत्तेच्या इच्छेविरुद्ध आणि एकंदर गोष्टींच्या खुद्द स्वभावा-नुसारच हा घडत असतो. मात्र ज्या अर्थी ती कामगार वर्ग म्हणून कामगार वर्ग पैदा करते, स्वतःच्या आत्मिक व शारीरिक दारिद्र्याची जाणीव असलेले दारिद्र्य पैदा करते, आपल्या अमानवीकरणाची जाणीव असलेले अमानवीकरण पैदा करते आणि म्हणून ती आत्मविनाशक असते. खासगी मालमत्ता ही कामगार वर्ग पैदा करून स्वतःला जी शिक्षा फर्मावून घेते तिची अंमलबजावणी कामगार वर्ग करतो. तसेच इतरांसाठी संपत्ति पैदा करून आणि स्वतःसाठी दारिद्र्य पैदा करून मोल-मजुरी जी शिक्षा स्वतःला फर्मावते तिची अंमलबजावणी कामगार वर्गच करतो. कामगार वर्ग विजयी होतो, तेव्हा तो समाजाची सर्वंकष बाजू मुळीच होत नसतो, कारण तो केवळ स्वतःचा व स्वतःच्या विरोधकाचा नाश करूनच विजयी होतो. मग कामगार वर्गही विलयास जातो आणि त्याचबरोबर त्याला निश्चित करणारी त्याच्या विरोधातली जी खासगी मालमत्ता, ती देखील विलयास जाते.

समाजसत्तावादी लेखक कामगार वर्गाला ही जागतिक-ऐतिहासिक भूमिका देतात, तेव्हा टीकात्मक टीका करणारे ढोंगीपणाने मत मांडतात तदनुसार, ते कामगार वर्गीयांना देव मानतात असे मुळीच नसते. प्रकार याच्या उलट आहे. ज्या अर्थी संपूर्णपणे तयार झालेल्या कामगार वर्गामध्ये सगळ्या माणुसकीचा अभाव, किंबहुना माणुसकीच्या देखाव्याचा अभाव जवळ जवळ पूर्ण झालेला असतो; ज्या अर्थी आजच्या समाजातील अत्यंत अमानुष स्वरूपातली जीवनाची सगळी परिस्थिती काम-गार वर्गाच्या जीवनात साररूपाने आलेली असते; ज्या अर्थी माणूस हा कामगार वर्गा-मध्ये स्वतःला हरवून बसलेला आहे आणि असे असूनही त्याच वेळी या हरवण्याची तत्त्वविचारात्मक जाणीव त्याला लाभलेली आहे इतकेच नव्हे, तर तातडीच्या, अतः-पर बाजूला न सारता येण्याजोग्या, अतःपर लपवून ठेवता न येण्याजोग्या, सर्वस्वी आवश्यक गरजेच्या— आवश्यकतेची व्यावहारिक अभिव्यक्ति असलेल्या गरजेच्या

द्वारा— या अमानुषतेविरुद्ध बंड करायला तो थेट लोटला जातो, त्या अर्थी असा निष्कर्ष निघतो की कामगार वर्ग हा स्वतःची मुक्तता करू शकतो आणि त्याने स्वतःची मुक्तता करून घेतलीच पाहिजे. परंतु आपल्या स्वतःच्या जीवनाची परिस्थिती नष्ट केल्याखेरीज तो स्वतःची मुक्तता करून घेऊ शकत नाही. आजच्या समाजातील जी जीवनविषयक अमानुष परिस्थिती त्याच्या स्वत.च्या परिस्थितीत साररूपाने आलेली आहे, ती सगळी नष्ट केल्याखेरीज कामगार वर्ग आपली स्वतःची जीवन-विषयक परिस्थिती नष्ट करू शकत नाही. तो श्रमाच्या कठोर परंतु पोलादी निर्धार मिळवून देणाऱ्या अनुभवातून निरर्थक पार पडलेला नसतो. हा अगर तो कामगार वर्गीय, किंबहुना सगळा कामगार वर्ग त्या क्षणी आपले स्वतःचे उद्दिष्ट काय मानतो असा प्रश्न नाही. कामगार वर्ग हा काय आहे, असा प्रश्न आहे, आणि या असण्या-नुसार त्याला ऐतिहासिकदृष्ट्या काय करणे भाग पडेल, असा प्रश्न आहे. त्याचे उद्दिष्ट आणि त्याची ऐतिहासिक कामगिरी ही दृश्य स्वरूपात आणि अटळपणे त्याच्या स्वतःच्या जीवनविषयक परिस्थितीत आगाऊ सूचित झालेली असतात आणि त्याच-बरोबर आजच्या एकंदर भांडवलदारी संघटनेतच ती आगाऊ सूचित झालेली असतात.

कार्ल मार्क्स आणि फ्रेडरिक एन्गल्स,
द होली फॅमिली

मार्क्स आणि एन्गल्स, संकलित ग्रंथ,
खंड ४ था, मॉस्को, १९७५, पृष्ठे ३५-३७

कामगार वर्ग आणि समाजाचा प्रगतिशील विकास

१

आपल्या या एकोणिसाव्या शतकाचे वैशिष्ट्य अशी एक मोठी सत्य घटना आहे आणि ही अशी सत्य घटना आहे की हिचा इन्कार करायला कोणताही पक्ष धजत नाही. एका अंगाने, पूर्वीच्या मानवी इतिहासातील कोणत्याही युगाने ज्यांची कधी शंका देखील घेतलेली नसेल अशा औद्योगिक व वैज्ञानिक शक्ती उद्भवून कार्यान्वित झाल्या आहेत. दुसऱ्या अंगाने, ऱ्हासाची लक्षणे अस्तित्वात आहेत आणि ही लक्षणे रोमन साम्राज्याच्या उत्तर काळामध्ये नोंदलेल्या भयानक प्रकारांना खूपच मागे

टाकणारी आहेत. आमच्या काळामध्ये प्रत्येक गोष्ट ही तिच्या विरोधी गोष्ट तिच्या गर्भावस्थेत असलेली दिसते. यंत्रसामुग्रीच्या अंगी मानवी श्रम कमी करण्याचे व फलद्रूप करण्याचे अजब सामर्थ्य उपलब्ध झालेले आहे, आणि आपल्याला ती माणसाला उपाशी मारताना व त्याच्याकडून अतिश्रम करून घेताना दिसते. संपत्तीची नवनवी उगमस्थाने कसल्या तरी विचित्र जादूच्या योगाने चणचणीच्या उगमस्थानांचे रूप घेऊन राहिली आहेत. कलेचे विजय हे दानतीच्या नाशाचा मोबदला देऊन खरेदी केलेले दिसतात. ज्या गतीने मानवजाति निसर्गावर प्रभुत्व मिळविते त्याच गतीने माणूस इतर माणसांचा गुलाम झालेला किंवा स्वतःच्या नामुष्कीचा गुलाम झालेला दिसतो. विज्ञानाचा शुद्ध प्रकाश अज्ञानाच्या काळ्या पार्श्वभूमीखेरीज अन्यत्र प्रभावी व्हायला असमर्थ झालेला दिसतो. आपले सगळे नवे शोध व प्रगति भौतिक शक्तींना बौद्धिक जीवन देण्यामध्ये परिणत होत असलेली दिसते आणि मानवी जीवनाला भौतिक शक्तीचे हास्यास्पद रूप देत असताना दिसते. एका अंगाने आधुनिक उद्योगधंदे व विज्ञान, आणि दुसऱ्या अंगाने आधुनिक हालअपेष्टा व विस्कट, यांच्या दरम्यानचा हा जो परस्परविरोध आहे; उत्पादक सामर्थ्ये आणि आपल्या युगांतले सामाजिक संबंध यांच्या दरम्यानचा हा जो परस्परविरोध आहे, ही उघडउघड दिसणारी, प्रचंड प्रभाव पाडणारी आणि खोडून काढता न येण्याजोगी अशी सत्य घटना आहे.

कार्ल मार्क्स, "पीपल्स पेपर, याच्या वाददिवस प्रसंगी केलेले भाषण"

मार्क्स आणि एन्गल्स, निवडक ग्रंथ,
खंड १ ला, मॉस्को, १९७३,
पृष्ठे ५००-०१

२

आणि नेमकी हीच औद्योगिक क्रान्ति अशी आहे की मानवी श्रमाचे उत्पादक सामर्थ्य हिने कैवढ्या तरी उच्च पातळीवर नेऊन ठेवलेले आहे--मानवजातीच्या इतिहासात पहिल्या प्रथमच अशी शक्यता अस्तित्वात आली आहे--म्हणजे सगळ्यांमध्ये व्यावहारिक श्रमविभागणी झाली असे गृहीत धरल्यास समाजाच्या सगळ्या सदस्यांना भरपूर उपभोगता येईल असे पुरेसे उत्पादन करण्याची शक्यता आहे इतकेच नव्हे, तर समृद्ध राखीव निधीची तरतूद करता येईल आणि प्रत्येक व्यक्तीला पुरेशी फुरसद मिळण्याची देखील तरतूद करता येईल, म्हणजे ऐतिहासिक वारशाने आलेल्या संस्कृतीतील जे टिकवून ठेवायला खरोखरीच मोलाचे असेल— विज्ञान, कला, व्यवहाराचे प्रकार— ते टिकवून ठेवता येईल इतकेच नव्हे, तर राज्यकर्त्या

वर्गाच्या या मक्तेदारीचे परिवर्तन सगळ्या समाजाच्या समाईक मालमत्तेमध्ये करता येईल आणि त्याचा आणखी अधिक विकास करता येईल. आणि हाच तर निर्णायक मुद्दा आहे.

फ्रेडरिक एन्गल्स, घरांचा प्रश्न

मार्क्स आणि एन्गल्स. निवडक ग्रंथ,
खंड २ रा, मॉस्को, १९७३, पृष्ठ ३१२

कामगार वर्ग आणि संस्कृति

१

अशा प्रकारे, इंग्लंडमधील लक्षणीय वस्तुस्थिति अशी दिसून येते की समाजामध्ये एखाद्या वर्गाची अवस्था जितकी अधिक खालची असेल, तितका तो शब्दाच्या नेहमीच्या अर्थानुसार अधिक "अशिक्षित" असतो, प्रगतीशी तो अधिक निकटपणे निगडित झालेला असतो आणि त्याचे भवितव्य अधिक मोठे असते. सर्वसाधारणपणे, प्रत्येक क्रान्तिकारक कालखंडाचे हे उपलक्षण असते, विशेषेकरून धार्मिक क्रान्तीमध्ये हे दिसून आले, आणि तिचीच परिणति म्हणजे ख्रिस्ती धर्म ही होती : "गरीब लोक धन्य होत."@ "या जगाचे शहाणपण म्हणजे मूर्खपणा असतो"* इत्यादि. परंतु महान क्रान्तीचे हे पूर्वचिन्ह आता इंग्लंडात आहे त्याप्रमाणे बहुधा याच्या पूर्वी कधीही इतक्या स्पष्टपणे व्यक्त झालेले नव्हते आणि इतक्या रेखीवपणे चित्रित झालेले नव्हते. जर्मनीमध्ये चळवळ ज्या वर्गापासून सुरू होते तो शिकलेला असतो इतकेच नव्हे; तर विद्वान देखील असतो; इंग्लंडमध्ये गेली तीनशे वर्षे सुशिक्षित आणि सगळे विद्वान लोक काळाच्या लक्षणांच्या बाबतीत बहिरे व आंधळे आहेत. इंग्लिश विद्यापीठांचा दयनीय नित्यक्रम साऱ्या जगभर महशूर आहे; त्याच्याशी तुलना केल्यास आमची जर्मन कॉलेजे सोन्यासारखी आहेत; परंतु सगळ्यात जास्त अग्रेसर इंग्रज धर्मशास्त्रज्ञांनी किंवहुना काही सगळ्यात जास्त अग्रेसर इंग्रज निसर्गवेत्त्यांनी ज्या प्रकारचे ग्रंथ निर्माण केले आहेत त्यांची कल्पनादेखील युरोपखंडातले लोक करू शकत नाहीत, आणि आठवड्याच्या "नव्या पुस्तकांच्या यादीत" बहुतांश भरती किती शोचनीय प्रतिगामी प्रकाशनांचीच झालेली असते. इंग्लंड ही अर्थशास्त्राची जन्मभूमी आहे, परंतु प्राध्यापक व व्यवहारी राजकारणी यांच्या विद्वत्तेच्या पातळीचे

@ मॅथ्यू ५ : ३—संपादक
* १ कॉरिन्थियन्स १ : २०—संपादक

काय ! ॲडाम स्मिथचा खुला व्यापार माल्थसच्या लोकसंख्याविषयक तत्त्वविचाराच्या वेडपट निष्कर्षांपर्यंत पुढे रेटण्यांत आला आहे, आणि त्यांतून जुन्या मक्तेदारी पद्धतीचाच एक नवा, अधिक सुधारलेला प्रकार पैदा झालेला आहे, दुसरे तिसरे काही एक नाही, आणि या प्रकाराला सध्याच्या हुजूरपक्षीयांमध्ये प्रतिनिधी सापडत आहेत; या प्रकाराने माल्थसच्या अर्थशून्य तत्त्वविचाराचा यशस्वीपणे मुकाबला केला, परंतु शेवटी तो पुन्हा एकदा माल्थसच्या निष्कर्षांप्रत आला. जिकडे बघावे तिकडे विसंगति ढोंगबाजी बोकाळली आहे, तर याच्या उलट समाजसत्तावाद्यांचे आणि अंशतः चार्टिस्टांचे देखील आर्थिक प्रबंध तिरस्काराने बाजूला फेकले जातात आणि त्यांना केवळ खालच्या वर्गातच वाचक सापडतात. स्ट्राऊसकृत Das Leben Jesu याचे इंग्रजीत भाषांतर झाले. एकाही " प्रतिष्ठित " प्रकाशकाला ते छापायला नकोसे झाले; शेवटी दर भागाला ३ पेनी असे वेगवेगळ्या भागात ते प्रकाशित झाले आणि ते काम एका लहानशा पण तडफदार अशा, प्राचीन ग्रंथांचे प्रकाशन करणाऱ्या प्रकाशन संस्थेने केले. तीच गोष्ट रूसो, व्हॉल्टेअर, हॉल्बॅच वगैरेंच्या अनुवादांच्या बाबतीत घडली. बायरन आणि शेले जवळ जवळ केवळ खालच्या वर्गाकडूनच वाचले जातात; कोणाही " प्रतिष्ठित " व्यक्तीने शेलेचे ग्रंथ आपल्या टेबलावर ठेवायचा अवकाश, की त्याची भयंकर बदनामी झालीच म्हणून समजावे. " गरीब लोक धन्य होत, " हे खरंच आहे, कारण स्वर्गाचे राज्य त्यांचेच आहे, आणि किंतीही उशीर लागला तरी या भूतलाचे राज्य देखील त्यांचेच आहे.

फ्रेडरिक एन्गल्स, " लंडनहून धाडलेली पत्रे "
मार्क्स आणि एन्गल्स, संकलित ग्रंथ,
खंड ३ रा, मॉस्को, १९७५, पृष्ठे ३७९-८०

२

अशा प्रकारे इंग्लंडमधील सुशिक्षित वर्गांची मने सगळ्या प्रगतीला बंद आहेत आणि केवळ कामगार वर्गाच्या दडपणानेच काय ती त्यांची हालचाल काही प्रमाणात चालू राहिलेली आहे. त्यांच्या मोडकळीला आलेल्या संस्कृतीचा वाङ्मयीन आहार देखील खुद्द या वर्गांच्याहून वेगळा असेल अशी अपेक्षाच करता येत नाही. सगळे फॅशनेबल वाङ्मय कधीही न संपणाऱ्या वर्तुळात फिरत असते आणि या ऐदी व स्त्रैण फॅशनेबल समाजाप्रमाणेच ते कंटाळवाणे व भाकड असते.

फ्रेडरिक एन्गल्स, इंग्लंडची परिस्थिती
मार्क्स आणि एन्गल्स, संकलित ग्रंथ,
खंड ३ रा, मॉस्को, १९७५, पृष्ठ ४४६

३

इंग्लंडचे धर्मपीठ चैनीत जगत असताना समाजसत्तावाद्यांनी इंग्लंडमधील कामगार वर्गांना शिक्षण देण्यासाठी प्रचंड कार्य केले. हॉल ऑफ सायन्स* मध्ये अत्यंत साधे कामगार राजकीय, धार्मिक व सामाजिक व्यवहारांविषयी सुस्पष्ट समजदारीने बोलत असलेले ऐकतांना आपल्या आश्चर्याला पारावर राहत नाही; परंतु आपल्याला लक्षणीय लोकप्रिय पुस्तिका बघायला मिळतात आणि समाजसत्तावाद्यांची, उदाहरणार्थ मँचेस्टर येथील बॅट्स याची, व्याख्याने आपल्याला ऐकायला मिळतात, तेव्हा मग आपल्याला आश्चर्य वाटेनासे होते. कामगारांना आता गेल्या शतकांतील फ्रेंच तत्त्वज्ञानाच्या ग्रंथांच्या अनुवादांच्या चांगल्या स्वस्त आवृत्त्या मिळतात. मुख्यत्वे करून रूसो कृत Contract Social, the Syste'me de la Nature [४९] आणि व्हॉल्टेअरचे विविध ग्रंथ आणि याच्या भरीला कम्युनिझमच्या तत्त्वांचे विवरण करणाऱ्या एकेक दोन दोन पेनीच्या पुस्तिका आणि नियतकालिकांतील लेख आहेत. थॉमस पेन व शेले यांच्या ग्रंथांच्या स्वस्त आवृत्त्या देखील कामगारांच्या हाती आहेत.

फ्रेडरिक एन्गल्स, "लंडनहून धाडलेली पत्रे"

मार्क्स आणि एन्गल्स, संकलित ग्रंथ,
खंड ३ रा, मॉस्को, १९७५, पृष्ठ ३८७

४

इथे जे अर्थशास्त्र शिकविण्यात येते, त्याचे दैवत म्हणजे खुला व्यापार, आणि श्रमिक माणसाच्या लेखी याचा मथितार्थ म्हणजे हा की त्याने स्वतःला उपासमारीच्या आहारी जाऊ देण्याहून अधिक बुद्धिनिष्ठ असे तो काहीएक करू शकत नाही. इथे सगळे शिक्षण लाचार, विसविशीत, राज्यकर्त्या राजकारणाच्या आणि धर्माच्या अंकित असलेले, म्हणजे श्रमिक माणसाच्या लेखी निमूटपणे आज्ञापालन, अगतिकता आणि आपल्या नशिबावर हवाला ठेवणे या विषयींचा नुसताच सततचा उपदेश.

साहजिकच श्रमिक बहुजनसमाजाला या संस्थांशी काहीएक कर्तव्य नसते आणि तो कामगार वर्गीय वाचनालयांकडे आणि त्याच्या स्वतःच्या हितसंबंधाशी थेट कर्तव्य असलेल्या विषयांवरील चर्चेमध्ये भाग घेतो; आणि यावर स्वयंसंतुष्ट भांडवलदार आपले समाधान Dixi et salvavi @ या उद्‌गारांवर मानून घेतो आणि जो वर्ग

---

* हा शब्द मुळात इंग्रजीत तसाच ठेवलेला आहे.--संपादक

@ Dixi et salvavi (animam meam) मी बोललो आहे आणि माझ्या (आत्म्याचा) बचाव केला आहे. –संपादक

"मजबूत शिक्षणाच्या फायदयांऐवजी दुष्ट हेतूने प्रेरित झालेल्या भाषणबाजांची संतत बडबड पसंत करतो" त्याच्याविषयी तिरस्कार दर्शवून मोकळा होतो. तथापि, भांडवलदारांच्या मतलबी बडबडीचे मिश्रण नसलेल्या मजबूत शिक्षणाची श्रमिकांना कदर असते हे विशेषतः समाजसत्तावादी b संस्थांमध्ये शास्त्रीय, सौंदर्यविषयक, आणि आर्थिक विषयांवर अनेकदा व्याख्याने होत असतात आणि त्यांना या श्रोत्यांची फार चांगली गर्दी असते, यावरून सिद्ध होते. जर्मनीतील बहुतेक "सुसंस्कृत" भांडवलदारांना जे ज्ञान आहे त्याच्यापेक्षा अधिक ज्ञानसंपन्नतेनिशी अंगावर धड कोट नसलेले कामगार हे भूगर्भशास्त्र, खगोलशास्त्र आणि इतर विषय यांविषयी बोलताना मी अनेकदा ऐकले आहे. आणि इंग्रज कामगारवर्गाने स्वतंत्र शिक्षण घेण्यात केवढ्या मोठ्या प्रमाणावर यश संपादन केले आहे हे विशेषेकरून जी वस्तुस्थिती दर्शवून देते ती म्हणजे ही की आधुनिक तत्त्वज्ञानविषयक, राजकीय आणि काव्यविषयक साहित्य जवळ जवळ केवळ श्रमिक लोकच वाचत असतात. भांडवलदार हा सामाजिक बंधनांच्या व तदनुषंगिक पूर्वग्रहांच्या बंधनांत अडकलेला असतो; यामुळे प्रगतीचा मार्ग खुला करणाऱ्या प्रत्येक गोष्टीपुढे त्याचा थरकाप होतो व तो देवाची करुणा भाकायला लागतो; याच्या उलट कामगार हा या गोष्टीकडे उघड्या डोळ्यांनी बघतो, आणि हिचा आनंदाने व यशस्वीपणे अभ्यास करतो. या बाबतीत विशेषतः समाजसत्तावाद्यांनी कामगार वर्गाच्या शिक्षणासाठी अजब गोष्टी केलेल्या आहेत. त्यांनी फ्रेंच भौतिकवाद्यांच्या म्हणजे हेल्वेटियस, होल्बाच, दीदरो इत्यादींच्या ग्रंथांचे अनुवाद केले आहेत आणि सर्वोत्तम इंग्रजी ग्रंथांच्या समवेत त्यांच्या स्वस्त आवृत्त्यांतून त्यांचा प्रसार केलेला आहे. स्ट्राऊसकृत ख्रिस्तचरित्र (Life of Jesus) आणि प्रुधाँकृत मालमत्ता[५०] या ग्रंथांचा प्रसार देखील केवळ श्रमिकांमध्येच होत आहे. प्रतिभासंपन्न, प्रेषित, कवि शेले आणि आमच्या प्रचलित समाजावर कटु वक्रोक्तीचे कोरडे ओढणारा व रसरशीत शृंगारिक काव्यलेखन करणारा बायरन यांना बहुतेक वाचक कामगार वर्गातच लाभलेले आहेत; भांडवलदारांकडे या लेखकांच्या खच्ची केलेल्या कौटुंबिक आवृत्त्या असतात आणि आजच्या ढोंगी नीतिमत्तेला अनुसरून त्यांची काटछाट केलेली असते. अद्ययावत् काळातले दोन महान व्यवहारी तत्त्वज्ञ म्हणजे बेन्थॅम आणि गॉड्विन, त्यांतल्या त्यात गॉड्विन, हे तर जवळ जवळ सर्वस्वी कामगार वर्गाचीच मालमत्ता झालेले आहेत; कारण जहाल भांडवलदारांमध्ये बेन्थॅमचा एक पंथ जरी असला, तरी त्याच्या शिकवणुकीचा विकास एक पाऊल पुढे नेण्यात केवळ कामगार वर्ग व समाजसत्तावादी हेच यशस्वी झाले आहेत. याच्या आधारावर कामगार वर्गाने मुख्यत्वेकरून नियतकालिके व पुस्तिका असे वाङ्मय तयार केले आहे

---

b १८४५ व १८९२ च्या जर्मन आवृत्त्यांमध्ये इथे असा मजकूर आहे: "सगळ्या कामगारवर्गीय संस्थांमध्ये, विशेषतः समाजसत्तावादी संस्थांमध्ये." –संपादक

आणि अस्सल गुणवत्तेच्या बाबतीत सगळ्या भांडवलदारी वाङ्मयापेक्षा ते किती तरी अधिक पुढारलेले आहे.

फ्रेडरिक एन्गल्स, इंग्लंडमधील
कामगार वर्गाची परिस्थिती

मार्क्स आणि एन्गल्स, संकलित ग्रंथ,
खंड ४ था, मॉस्को, १९७५, पृष्ठे ५२७-२८

५

सर्वसाधारण मानाने जर्मन कामगारांची शैक्षणिक पातळी किंवा शिक्षण ग्रहण करण्याची पात्रता यांच्याविषयी म्हणाल, तर मला वाइटलिंगच्या तेजस्वी ग्रंथांचे स्मरण होते. तत्त्वविचाराच्या बाबतीत याचे ग्रंथ अनेकदा प्रुधाँच्या ग्रंथांहूनही वरचढ आहेत, मग मांडणीच्या बाबतीत प्रुधाँच्या मानाने कमी का असेनात. Garantien der Harmonie und Freiheit हा जो वाइटलिंगचा ग्रंथ आहे, त्यामध्ये त्याने भांडवलदार वर्गाच्या बंधविमोचनाचे--राजकीय बंधविमोचनाचे--विवेचन केले आहे. भांडवलदार वर्गाचे तत्त्वज्ञ व विद्वान लेखक यांच्यासकट या वर्गामध्ये या विषयावरील याच्या तोडीचा एक तरी ग्रंथ आढळेल काय ? जर्मन राजकीय वाङ्मयाचा क्षुद्र, भेकड मध्यम दर्जा जर्मन कामगारांच्या या आवेशपूर्ण आणि तेजस्वी वाङ्मयीन पदार्पणाशी तुलनेसाठी घेतला तरी पुरेसे आहे; कामगारवर्गाच्या या प्रचंड बालबुटांची तुलना जर्मन भांडवलदारांच्या खुज्या, झिजलेल्या राजकीय बुटांशी केली तरी पुरेसे आहे; आणि आपल्याला नक्कीच असे भाकित करणे भाग पडते की ही जर्मन सिंडरेला बाहुली महामहाची आकृति धारण करील असा एक दिवस येईलच.

कार्ल मार्क्स, "'प्रशियाचा राजा आणि सामाजिक सुधारणा. लेखक एक प्रशियन' या लेखाच्या मार्जिनमधील टीकात्मक टिपणे"

मार्क्स आणि एन्गल्स, 'संकलित ग्रंथ',
खंड ३ रा, मॉस्को, १९७५, पृष्ठे २०१-०२

६

या लेखाचा लेखक स्वतः लंडन येथील एका शिलाई कारखान्यात कामगार आहे. आम्ही जर्मन भांडवलदारांना असे विचारतो की काय हो, अशा धर्तीवर खऱ्या चळवळीचे ग्रहण करण्यास समर्थ अशा किती लेखकांचे संख्याबळ तुमच्याकडे आहे ?

कामगार वर्ग मेढेकोटांवर व रणांगणावर लढून आपले निर्णायक विजय संपादन करायच्या अगोदर बौद्धिक विजयांची मालिका जिंकून आपल्या आगामी राजवटीची पूर्वसूचना देत असतो. वाइटलिंग आणि लेखनकार्य करणारे इतर कामगार प्रचलित परिस्थितीवर भावनाविवश, नैतिक व मनोवैज्ञानिक टीका करतात, तिच्या ऐवजी भांडवलदारी समाजाच्या व त्याच्या चळवळीच्या पुढ्यात शुद्ध भौतिकवादी आकलन आणि ते अधिक मनमोकळे असे आकलन, भावनिक लहरींची बाधा न झालेले असे आकलन, इथे कसे सादर झालेले आहे याची नोंद वाचक घेतील. एका पक्षी कारागीर हे आपल्या अर्ध-मध्ययुगीन अवस्थेच्या दासळणुकीचा प्रतिकार करत आहेत आणि कारागीर या नात्याने, विशेषेकरून जर्मनीत आणि मोठ्या प्रमाणावर फ्रान्समध्ये देखील एकी करायला मागत आहेत, तर इथे, दुसऱ्या पक्षी, मोठ्या प्रमाणावरील उद्योगधंदे कारागिरी परिश्रमांना आपल्या अंकित करून घेत आहेत याचे आकलन झालेले आहे आणि हे पुढचे पाऊल म्हणून याचा गौरव केलेला आहे; तर, त्याच वेळी, मोठ्या प्रमाणावरील उद्योगधंद्याच्या फलश्रुती व उत्पादने यांच्यामध्ये, खुद्द इतिहासाने निर्माण केलेल्या आणि रोजच्या रोज स्वतःला नव्याने निर्माण करून घेत असलेल्या, कामगार-वर्गीय क्रान्तीच्या खऱ्याखुऱ्या पूर्वअटी ओळखण्यात आलेल्या आहेत आणि उघड करून दाखविण्यात आलेल्या आहेत.

कार्ल मार्क्स आणि फ्रेडरिक एन्गल्स,
"एक्कॅरियसकृत 'लंडन येथील शिलाईधंदा किंवा बडे व छोटे भांडवल यांच्या दरम्यानचा लढा' या लेखाची संपादकीय टीप"

मार्क्स/एन्गल्स, वेर्के, खंड ७ वा, १९६९, पृष्ठ ४१६

कामगार वर्गीय क्रान्ति आणि भांडवलदारांचा विध्वंसकपणा

१

कामगारांच्या पॅरिस शहराने स्वतःची शौर्यशाली होळी पेटवायच्या कृतीत आपल्या ज्वालांमध्ये इमारतींच्या व स्मारकांच्या होळ्या सामील करून घेतल्या.

कामगार वर्गाच्या जिवंत शरीराचे तुकडे करत असताना त्याच्या राज्यकर्त्यांनी आपल्या घरादारांच्या वास्तुशिल्पांच्या सुस्थितीतल्या अवस्थेनिशी त्यांच्याकडे विजयी उत्साहाने आपल्याला परत यायला मिळेल अशी अपेक्षा त्यांनी अतःपर करता कामा नये. व्हर्सायचे सरकार "आगलावेपणा!" अशी हाकाटी करते आणि हा परवलीचा शब्द आपल्या सगळ्या हस्तकांच्या कानात थेट दूरदूरच्या खेड्यांपर्यंत कुजबुजते आणि घंदेवाइक आगलावे असा संशय घेऊन सर्वत्र आपल्या शत्रूंचा तलास करते. सगळ्या जगातले भांडवलदार लढाईनंतर होणाऱ्या सार्वत्रिक कत्तलीकडे आत्मसंतुष्टपणे बघतात आणि वीट आणि चुना यांचा नाश बघून भीतीने त्यांच्या अंगावर काटा उभा राहतो!

सरकारे आपल्या आरमारांना "मारा, जाळा, उध्वस्त करा" असा सरकारी परवाना देतात म्हणजे तो आगलावेपणाचा परवानाच असतो ना? इंग्रज फौजांनी बेगुमानपणे वॉशिंग्टन येथील कॅपिटॉलला आणि चिनी बादशहाच्या समर पॅलेसला आग लावली, तो आगलावेपणाच होता ना! प्रशियनांनी, लष्करी कारणांसाठी नव्हे, तर निव्वळ सूडबुद्धीने पेट्रोलियमच्या मदतीने शेतोदुनसारखी नगरे व असंख्य खेडी जाळून बेचिराख केली, तो आगलावेपणाच होता ना? थीयर्सने सहा आठवड्यांच्या अवधीत जेव्हा पॅरिस शहरावर तोफा डागल्या, तेव्हा सबब अशी सांगितली की ज्या घरांमध्ये लोक आहेत त्या घरांनाच तेवढी आपल्याला आग लावायची आहे, मग हा आगलावेपणाच होता ना?— युद्धामध्ये आगी लावणे हे इतर कोणत्याही हत्यारांप्रमाणेच कायदेशीर हत्यार असते. शत्रूने ताब्यात ठेवलेल्या इमारतींना आगी लावण्यासाठी त्यांच्यावर तोफांचा मारा करण्यात येतो. त्यांचा बचाव करणाऱ्यांना जर माघार घ्यावी लागली तर ते स्वतःच अशा इमारती, शत्रूला त्यांचा उपयोग करायला प्रतिबंध व्हावा म्हणून, पेटवून देतात. सगळ्या जगातील खड्या लष्करांच्या रणआघाड्यांवर असलेल्या सगळ्या इमारतींच्या नशिबी जळून खाक होणे हेच सदैव अपरिहार्यपणे आलेले असते. परंतु इतिहासात समर्थनीय ठरलेले एकमेव युद्ध म्हणजे गुलाम करणाऱ्यांविरुद्ध गुलाम झालेल्यांचे जे युद्ध असते त्याला म्हणे ही गोष्ट अजिबात लागू नसते! कम्यूनने ५२ आगीचा वापर संरक्षणाचे साधन म्हणून काटेकोरपणाने केला. हौस्मान्नने ज्या लांबलचक, सरळ राजरस्त्यांवर अगोदरच तोफांची मारगिरी चालू केलेली होती, त्या रस्त्यांवर व्हर्सायच्या फौजांना अटकाव व्हावा म्हणून कम्यूनने आगीचा वापर केला; व्हर्सायने आघाडी पुढे रेटण्यासाठी जसा आगीचा वापर केला, तसाच कम्यूनने आपल्या माघार घेणाऱ्या लष्कराच्या संरक्षणार्थ आगीचा वापर केला. कम्यूनने आगी लावून जेवढ्या इमारती जाळल्या, तेवढ्या इमारती किमानपक्षी व्हर्सायने तोफांची मारगिरी करून जाळल्या. कोणत्या इमारतींना बचावकर्त्यांनी आगी लावल्या व कोणत्यांना हल्लेखोरांनी आगी लावल्या हा, आता देखील, एक वादाचा विषय झालेला आहे आणि व्हर्सायच्या फौजांनी कैद्यांची सर्रास कत्तल करायला अगोदरच प्रारंभ केलेला होता, तेव्हाच बचावकर्त्यांनी

आगीचा अवलंब केला--यात भर घालायची म्हणजे कम्यूनने संपूर्ण जाहीर नोटीस देऊन किती तरी अगोदरच सांगितले होते की आपल्यावर निर्वाणीची वेळ आल्यास आपण उध्वस्त पॅरिसखाली स्वतःला गाडून घेऊ, आपण पॅरिसचे दुसरे मॉस्को करू. व्हर्सायच्या सरकारने देखील अशीच प्रतिज्ञा केली होती; परंतु आपल्या दगाबाजीवर पांघरूण घालायच्या हेतूनेच ही प्रतिज्ञा केली होती. या उद्दिष्टासाठी त्रोचूने त्यांना पेट्रोलियम मिळवून दिले होते. पॅरिसच्या जनतेच्या प्राणांची आपल्या वैऱ्यांना काडीइतकीही पर्वा नाही, परंतु पॅरिसमधील आपल्या इमारतींची मात्र फार काळजी आहे, हे कम्यून जाणून होते आणि उलटपक्षी थियर्सने तर कम्यूनला नोटिसच दिली होती की मी निर्घृणपणे सूड घेईन ! एका बाजूला त्याने आपली फौज तयार ठेवली आणि प्रशियनांनी दुसऱ्या बाजूचा सापळा बंद करून ठेवला. त्याबरोबर त्याने जाहीरच केले की " मी निर्घृण होईन ! सूड परिपूर्ण होईल, आणि न्याय कठोर होईल ! " पॅरिसच्या श्रमिकांच्या कृती जर विध्वंसक असतील तर निकरावर आलेल्या बचावाचा तो विध्वंसकपणा होता, तो विजयाचा विध्वंसकपणा नव्हता, म्हणजे ख्रिस्ती धर्मयोध्द्यांनी प्राचीन ख्रिस्तपूर्व खऱ्याखुऱ्या बहुमोल कलाकृतींच्या बाबतीत जसा विध्वंसकपणा केला, तसा हा नव्हता; आणि त्या विध्वंसकपणाचे देखील इतिहासकाराने अनिवार्य म्हणून समर्थन केले आहे--उदयास येत असलेला नवा समाज व कोसळत असलेला जुना समाज यांच्या दरम्यान चालू असलेल्या महाप्रचंड लढ्याचा तुलनात्मकदृष्ट्या शुल्लक आनुषंगिक भाग म्हणून त्याचे समर्थन केले आहे. हौस्मान्नच्या विध्वंसकपणाने पर्यटकांच्या पॅरिस-साठी जागा मिळवून द्यायला ऐतिहासिक पॅरिस जमीनदोस्त केले, त्या मानाने हा विध्वसकपणा कमीच होता !

कार्ल मार्क्स, फ्रान्समधील यादवी युद्ध

मार्क्स आणि एन्गल्स, निवडक ग्रंथ,
खंड २ रा, मॉस्को, १९७३, पृष्ठे २३७-३८.

२

तारीख २३ व २४ एप्रिलची परिस्थिती

कूर्बे महाशयांच्या अध्यक्षतेखाली पॅरिसच्या कलाकारांचे पुनर्मीलन. या बेट्यांना व्हेन्दोम स्तंभ [५३] उध्वस्त व्हायला नको आहे. (संपूर्णपणे खुली चर्चा.) (जाहीर अधिवेशन.) वस्तुतः कम्यूनने आता केवळ नेपोलियनला खाली ओढायचे आणि त्याच्या जागी स्वातंत्र्याची स्थापना करायची ठरविले आहे. (पॅरिस शहरात सुमारे ३,००० कलाकार आहेत.)

"साऱ्या जगातली सगळी मोठी शहरे आमच्या शहराचा हेवा करतात; आमच्या कामगारांच्या बुद्धिमान परिश्रमावर कलेच्या प्रतिभेचे अधिराज्य आहे आणि तिनेच पॅरिस शहराला त्याचा निर्विवाद व अजोड लौकिक मिळवून दिलेला आहे" (असे खुद्द बावळट सॉइर [५४] म्हणते) [पृष्ठ २, स्तंभ ४ था]. असे जाहीर करण्यात आले आहे की स्त्रिया या पुरुषांच्या बरोबरीच्या व्हायच्या आहेत, त्यांना मतदानाचा व निवडून येण्याचा असा दुहेरी हक्क मिळायचा आहे (द अर्टिस्ट क्लब) [पृष्ठ ३, स्तंभ १ ला].

अग्रलेख : स्तंभाच्या विक्रीचा कार्यक्रम आज आहे. आर्कदे ट्रायोम्फ [५५] ढासळायला लागलाय [पृष्ठ ५, स्तंभ ४ था].

कार्ल मार्क्स, "वृत्तपत्रांतील टिपणे"

जर्मन व फ्रेंच भाषांतून लिहिलेली

टाइप केलेल्या प्रतीनुसार प्रकाशित

कला आणि कम्युनिझम

इहवादी
कम्युनिझमवरील टीका

१

त्याच्यासाठी जीवनाचे व अस्तित्वाचे एकमेव उद्दिष्ट म्हणजे थेट शारीरिक ताबा हे असते. श्रमिकाची कक्षा रद्द करण्यात आलेली नसते, परंतु तिचा विस्तार सगळ्या माणसांना लागू केलेला असतो. खासगी मालमत्तेचा संबंध हा वस्तूंच्या जगाच्या समवायाचा संबंध म्हणून टिकून असतो. शेवटची गोष्ट म्हणजे, विश्वव्यापी खासगी मालमत्तेला प्रतिद्वंद्वी म्हणून खासगी मालमत्ता मानायच्या या चळवळीला, विवाह-संस्थेला (हा नक्कीच अनन्यसाधारण खासगी मालमत्तेचा प्रकार असतो) प्रतिद्वंद्वी म्हणून स्त्रियांच्या समवायाच्या पाशवी प्रकाराचे व्यक्त स्वरूप मिळते; या प्रकारामध्ये स्त्री ही समवायाची व समाईक वस्तू होते. स्त्रियांच्या समवायाचा हा विचार या अजून संपूर्णपणे रासवट व विचारशून्य असलेल्या कम्युनिझमचे रहस्य उघड करून दाखवितो. स्त्री जशी विवाहसंस्थेतून सर्वसाधारण वेश्या व्यवसायात* परिणत होते, तशीच संपत्तीची सगळी दुनिया (म्हणजे माणसाचा वस्तुनिष्ठ गाभा) खाजगी मालमत्तेच्या मालकाशी अनन्यसाधारण विवाहाच्या संबंधातून समाजाशी विश्वव्यापी वेश्याव्यवसायाच्या अवस्थेत परिणत होते. कम्युनिझमचा हा प्रकार––ज्या अर्थी तो प्रत्येक क्षेत्रातील माणसाचे व्यक्तिमत्व नाकारतो, त्या अर्थी––खासगी मालमत्तेचे केवळ तर्कसिद्ध व्यक्त स्वरूप असतो म्हणजेच हा नकार असतो. सर्वसाधारण हेवा हा स्वतःला शक्तीचे रूप देतो आणि हेच लोभाने स्वतःची पुनःस्थापना करण्याचे व स्वतःचे समाधान, केवळ अन्य मार्गाने, करण्याचे सोंग घेतलेले असते. प्रत्येक खासगी मालमत्तेचा विचार

---

* वेश्या व्यवसाय म्हणजे श्रमिकाच्या सर्वसाधारण वेश्यावृत्तीची खास अभिव्यक्ती असते. आणि ज्या अर्थी केवळ वेश्या इतकेच नव्हे तर वेश्येचा वापर करणारा हा देखील या संबंधात गुरफटलेला असतो––आणि याचा लांच्छनास्पदपणा याहूनही अधिक मोठा असतो––म्हणजे भांडवलदार वगैरे देखील या सदरात येतो––मार्क्सची टीप.

किमानपक्षी अधिक श्रीमंत खासगी मालमत्तेच्या विरुद्ध हेव्याच्या आणि सगळ्या गोष्टींना समाइक पातळीवर आणायच्या प्रेरणेच्या स्वरूपात वळलेला असतो, म्हणजे हा हेवा आणि ही प्रेरणा स्पर्धेचा गाभा देखील होऊन बसतात. रासवट कम्युनिझम @ म्हणजे या हेव्याची आणि पूर्वसंकल्पित किमान पातळीपासून खालच्या पातळीवर आणण्याची केवळ परिणती असते. त्याला एक निश्चित, मर्यादित दर्जा असतो. खासगी मालमत्तेचे हे नाकारणे हे खरोखरी धारण करणे जवळ जवळ मुळीच नसते हे ज्या वस्तुस्थितीवरून सिद्ध होते ती म्हणजे ही, की संस्कृतीच्या व सुधारणेच्या एकंदर जगाला अमूर्त नकार प्राप्त होतो, फारच थोड्या गरजा असलेल्या व खाजगी मालमत्तेच्या पलीकडे जाण्यात अपेशी ठरलेल्या इतकेच नव्हे तर अजून तिच्यापर्यंत न पोचलेल्या देखील गरीब व रासवट माणसाची अनैसर्गिक साधेपणात अधोगती होते.

समवाय हा केवळ श्रमाचा समवाय असतो, आणि समवायाच्या भांडवलातून मिळालेल्या पगाराची समानता साधलेली असते--म्हणजे विश्वव्यापी भांडवल या नात्याने समवायातून. या संबंधांच्या दोन्ही बाजूंना काल्पनिक विश्वव्यापकतेची उच्च पातळी लाभलेली असते–श्रम म्हणजे प्रत्येक व्यक्ती जीत सामावलेली आहे अशी कक्षा, आणि भांडवल म्हणजे समवायाची सर्वमान्य विश्वव्यापकता व सत्ता.

समवायाच्या कामुकतेची लुटीची वस्तू व साधन हा जो स्त्रीविषयीचा दृष्टिकोन आहे त्यामध्ये माणूस स्वतःच्या अस्तित्वाला ज्या कमालीच्या अधोगतीच्या अवस्थेत ठेवतो तिची अभिव्यक्ती होते; कारण या दृष्टिकोनाचे रहस्य म्हणजे माणसाचा जो संबंध स्त्रीशी असतो आणि ज्या रीतीने हा थेट व नैसर्गिक जातिसंबंध संकल्पिलेला असतो, तिचे निःसंदिग्ध, निर्णायक साधे व सोंग न आणलेले व्यक्त स्वरूप असते. व्यक्तीचा व्यक्तीशी थेट, नैसर्गिक आवश्यक संबंध असतो तोच माणसाचा स्त्रीशी संबंध असतो. या नैसर्गिक जातिसंबंधांमध्ये माणसाचा निसर्गाशी संबंध हा तात्कालिकपणे त्याचा माणसाशी संबंध असतो, जसा त्याचा माणसाशी संबंध हा तात्कालिकपणे त्याचा निसर्गाशी संबंध असतो तसाच–म्हणजे त्याचे स्वतःचे नैसर्गिक स्थान म्हणून मानवी गाभा हा किती प्रमाणात माणसाचा स्वभाव झालेला आहे, किंवा त्याचा स्वभाव माणसाचा मानवी गाभा झालेला आहे हे या नातेसंबंधामध्ये, निरीक्षण करण्याजोग्या वस्तुस्थितीच्या स्वरूपात इंद्रियगम्यरीत्या निदर्शनाला आलेले आहे. म्हणून या नातेसंबंधांवरून आपल्याला माणसाच्या विकासाच्या एकंदर पातळीविषयी मत बनविता येते. या नातेसंबंधाच्या स्वरूपावरून जाति-प्राणी या नात्याने माणूस हा माणूस म्हणून किती प्रमाणात स्वतः झालेला आहे व स्वतःचे आकलन करून घेत आहे याचे अनुमान निघते; माणसाचा स्त्रीशी संबंध हा मनुष्यप्राण्याचा मनुष्यप्राण्याशी

@ हस्तलिखितात "कोम्मूनिस्ट" असा शब्द आहे.—संपादक

असलेला अत्यंत नैसर्गिक असा संबंध आहे. म्हणून माणसाची नैसर्गिक वर्तणूक किती प्रमाणात मानवी झालेली आहे हे यावरून उघडकीस येते, किंवा त्याच्यातील मानवी गाभा हा किती प्रमाणात नैसर्गिक गाभा झालेला आहे--त्याचा मानवी स्वभाव हा किती प्रमाणात त्याच्या बाबतीत नैसर्गिक झालेला आहे हे उघडकीस येते. माणसाची गरज ही किती प्रमाणात मानवी गरज झालेली आहे हे देखील या नाते-संबंधावरून उघडकीस येते; म्हणून अन्य व्यक्ती ही व्यक्ती या नात्याने त्याच्या लेखी किती प्रमाणात गरज झालेली आहे--म्हणजे आपल्या व्यक्तिगत अस्तित्वामध्ये तो त्याच वेळी किती प्रमाणात सामाजिक प्राणी झालेला आहे हे उघडकीस येते.

खाजगी मालमत्तेचा पहिला विधायक नाश--म्हणजे रासवट कम्युनिझम--म्हणजे स्वतःला विधायक समवाय पद्धती म्हणून उभारायला मागत असलेल्या खासगी मालमत्तेच्या क्षुद्रपणाचे हे नुसतेच निदर्शन असते.

कार्ल मार्क्स, १८४४ सालातील अर्थशास्त्रविषयक
व तत्त्वज्ञानविषयक हस्तलिखिते

मार्क्स आणि एन्गल्स, संकलित ग्रंथ,
खंड ३ रा, मॉस्को, १९७५, पृष्ठे २९४-९६

२

चळवळीच्या या पूर्वसूरींमध्ये, धर्माची छटा असलेल्या सगळ्या मध्ययुगीन उठावांचे वैशिष्ट्य असलेला संन्यस्तपणा आपल्याला अगोदरच आढळून येतो, आणि आधुनिक काळामध्ये प्रत्येक कामगारवर्गीय चळवळीच्या आरंभीच्या टप्प्यांवर तो आढळून येतो. नीतीच्या बाबतींतील हा संन्यासी रुक्षपणा, जीवनाच्या सगळ्या आनंदांचा व सगळ्या करमणुकींचा त्याग करण्याची ही मागणी, एका अंगाने स्पार्टन समतेच्या तत्त्वानिशी राज्यकर्त्या वर्गांना विरोध करते, आणि दुसऱ्या अंगाने ही एक आवश्यक अशी संक्रमणाची अवस्था असते, आणि हिच्याशिवाय समाजाचा सगळ्यांत खालचा थर स्वतःला कधीही गतिशील करू शकत नाही. आपली क्रान्तिकारक तडफ विकसित करण्यासाठी, समाजाच्या इतर सगळ्या घटकांच्या बाबतीतील आपल्या स्वतःच्या वैरभावाच्या वृत्तीची जाणीव करून घेण्यासाठी, वर्ग या नात्याने स्वतःचे केन्द्रीकरण करण्यासाठी, प्रचलित समाजव्यवस्थेशी जुळते करून

घेऊ शकणाऱ्या सगळ्या गोष्टींचा त्याग करूनच समाजाच्या खालच्या थरांनी प्रारंभ केला पाहिजे; जी थोडी सुखे त्या क्षणी आपली दुःखद अवस्था कमीत कमी सुसह्य करत असतील, आणि जास्तीत जास्त कठोर जुल्म देखील त्यांच्यापासून त्यांना वंचित करू शकत नसेल, त्यांचा त्यांनी त्याग केला पाहिजे. हा खालच्या वर्गांचा व कामगारवर्गीय संन्यस्तपणा, त्याचे पिसाट अतिरेकी स्वरूप व त्याचा गाभा या दोहोंच्या बाबतीत लूथरवादी नागर नीतीपासून आणि इंग्रज प्यूरिटनांच्या संन्यस्त पणापासून वेगळा आहे (मात्र इंडिपेंडंट्स व अधिक जहाल पंथ यांचा वेगळेपणा निराळा आहे); यांचे एकंदर रहस्य भांडवलदारी काटकसरीत सामावलेले आहे. आधुनिक उत्पादक-शक्तींच्या विकासाने चैनीच्या वस्तूंमध्ये अमाप वाढ केल्यावर आणि अशा प्रकारे स्पार्टन समता फालतू ठरविल्यावर आणि समाजामध्ये कामगार-वर्गाची भूमिका आणि तेणेकरून खुद्द कामगारवर्गच सतत अधिकाधिक क्रान्ति-कारक झाल्यावर हा खालच्या वर्गांचा कामगारवर्गीय संन्यस्तपणा आपले हे क्रान्ति-कारक स्वरूप क्रमाक्रमाने सोडून देतो, ही गोष्ट बुद्धिवादाला धरूनच आहे. हा संन्यस्तपणा बहुजनसमाजातून आणि त्याच्यावर अवलंबून असलेल्या पंथांतून क्रमा-क्रमाने लुप्त होत जातो; मग त्याची अधोगती एकतर भांडवलदारी चिक्कूपणात होते किंवा शब्दशूर सद्गुणीपणात होते, आणि व्यवहारात याची घसरगुंडी होत होत याला तुच्छतावादी किंवा हुन्नरसंघांतल्या कवडीचुंबकपणाचे रूप प्राप्त होते. याच्या भरीला सांगायची गोष्ट म्हणजे सुखोपभोगांचा त्याग करायचा उपदेश कामगारवर्गाला करायची मुळी जरूरच नसते; कारण त्याग करण्याजोगे त्याच्याजवळ अधिक असे जवळजवळ काहीच नसते.

फ्रेडरिक एन्गल्स, जर्मनीतील शेतकरी युद्ध,
मॉस्को, १९७४, पृष्ठे ६३-६४

व्यक्तिमत्त्व आणि समाज

१

इथे देखील, नेहमीप्रमाणेच आपल्या व्यावहारिक उदाहरणांच्या बाबतीत सान्चो पुन्हा दुर्दैवी ठरलेला आहे. त्याला असे वाटते की "तुमच्या संगीताची रचना तुमच्यासाठी कुणीच करू शकत नाही, तुमच्या चित्रांसाठी स्केचेस पूर्ण करू शकत नाही. राफेलची चित्रे त्याच्यासाठी कुणीच काढू शकत नाही." तथापि सान्चोला हे नक्कीच माहीत होऊ शकले असेल की मोझार्टची रेक्वियेम ही संगीतरचना तिच्या बहुतांश भागानिशी अन्य कोणी तरीच केलेली आहे व पूर्ण केलेली आहे, आणि खुद्द राफेलने आपल्या स्वतःच्या फ्रेस्कोजचा (भित्तीचित्रांचा) केवळ क्षुल्लकसा भागच "पूर्ण केलेला" आहे.

त्याची अशी कल्पना आहे की तथाकथित श्रमाच्या संघटकांना प्रत्येक व्यक्तीची सगळी कामगिरी संघटित करायला हवी होती, आणि असे असूनही नेमका त्यांनीच ज्याची संघटना करावी लागते तो थेट उत्पादक श्रम व थेट उत्पादक नसलेला श्रम यांच्या दरम्यान फरक केलेला आहे. तथापि थेट उत्पादक नसलेल्या श्रमाच्या बाबतीत, सॅन्चो कल्पना करतो तदनुसार, प्रत्येकाने राफेलचे काम करावे असे त्यांचे मत मुळीच नव्हते, परंतु ज्याच्या अंगी राफेलचे सुप्त सामर्थ्य असेल त्या कोणालाही अडथळ्याशिवाय आपला विकास करता यावा असे त्यांचे मत होते. सान्चो अशी कल्पना करतो की त्या काळी रोम शहरी अस्तित्वात असलेल्या श्रमविभागणीपासून स्वतंत्र राहून राफेलने आपली चित्रे निर्माण केली. त्याने जर राफेलची तुलना लिओनार्दो दा विन्सी व टीशियन यांच्याशी केली असती, तर राफेलची चित्रे त्या काळांतील रोमच्या भरभराटीवर किती मोठ्या प्रमाणावर अवलंबून होती हे त्याला दिसले असते. ही भरभराट फ्लॉरेन्टाईन प्रभावाखाली झालेली होती. तर लिओनार्दोची चित्रे फ्लॉरेन्समधील परिस्थितीवर अवलंबून होती, आणि टीशियनची चित्रे नंतरच्या कालखंडातील असून ती व्हेनिसच्या सर्वस्वी वेगळ्या विकासावर अवलंबून होती. इतर कोणत्याही चित्रकाराप्रमाणेच राफेलच्या चित्रकलेची निश्चिती त्याच्या अगोदर चित्रकलेत झालेल्या तांत्रिक सुधारणांनी केलेली होती, त्याच्या वस्तीतील समाजाच्या संघटनेने आणि श्रमविभागणीने केलेली होती, आणि शेवटची गोष्ट म्हणजे त्याच्या वस्तीचा व्यवहार ज्या देशांशी होता, त्या सगळ्या देशांच्या श्रमविभागणीने केलेली होती. राफेलसारखी व्यक्ती आपल्या कलेचा विकास करण्यात यशस्वी होते किंवा नाही

हे सर्वस्वी मागणीवर अवलंबून असते, आणि ही मागणी तिच्या परीने श्रमविभागणीवर व तिच्यातून फलद्रूप होणाऱ्या मानवी संस्कृतीच्या परिस्थितीवर अवलंबून असते.

विज्ञानातील व कलेतील अपूर्वाईचे वर्णन करताना स्टिर्नर जी भूमिका घेतो ती भांडवलदारांच्या भूमिकेपेक्षा फारच खालच्या दर्जाची असते. आजच्या घडीला या "अपूर्व" कामगिरीची संघटना करणे आवश्यक असल्याचे अगोदरच आढळून आले आहे. होरेस वेर्ने याने जर आपली चित्रे "केवळ या अपूर्व व्यक्तीच्या अंगी ती निर्माण करण्याचे सामर्थ्य आहे" म्हणून निर्माण झाली असे मानले असते, तर यांतली दहावा हिस्सा चित्रे देखील तयार करायला त्याला वेळ मिळाला नसता. पॅरिस शहरी संगीतिका व कादंबऱ्या यांना जी मोठी मागणी आहे तिने त्यांच्या निर्मितीसाठी लागणाऱ्या कामगिरीची संघटना घडवून आणली; ही संघटना जर्मनीतील हिच्या "अपूर्व" स्पर्धकांपेक्षा किमानपक्षी काही तरी अधिक चांगले उपलब्ध करून देते. खगोलशास्त्रामध्ये आरागो, हर्शल, एन्के आणि बेस्सेल यांजसारख्या लोकांना संयुक्त निरीक्षणे संघटित करणे आवश्यक वाटले आणि त्यानंतरच काही बऱ्यापैकी चांगल्या फलनिष्पत्ती त्यांना लाभल्या. ऐतिहासिक शास्त्रामध्ये "अपूर्व" व्यक्तीला काही एक साधणे सर्वस्वी अशक्य आहे, आणि या क्षेत्रामध्ये देखील श्रमाच्या संघटनेच्या योगानेच फ्रेंचांनी फार पूर्वीच इतर सगळ्या राष्ट्रांना मागे टाकले. ओघाओघाने सांगायचे म्हणजे आधुनिक श्रमविभागणीवर आधारलेल्या या सगळ्या संघटना अजूनदेखील अत्यंत मर्यादित फलनिष्पत्तीच साधून देतात आणि पूर्वीच्या संकुचित अलगपणाच्या तुलनेनेच हे पुढचे पाऊल ठरते हे स्वयंसिद्ध आहे.

याच्या भरीला हे खास भर देऊन सांगितले पाहिजे की सान्चो हा श्रमाची संघटना आणि कम्युनिझम यांची गल्लत करतो आणि या संघटनेविषयीच्या आपल्या शंकांना "कम्युनिझम" उत्तरच देत नाही म्हणून तो आश्चर्यदेखील प्रदर्शित करतो. म्हणजे कोणत्या ताऱ्यावर परमेश्वराने आपले सिंहासन उभारले आहे हे आरागो आपल्याला सांगू शकत नाही म्हणून गॅस्कॉन या खेड्यातल्या मुलाने आश्चर्यचकित व्हावे, तशातलाच हा प्रकार आहे.

विशिष्ट व्यक्तींच्या ठायी कलागुण सर्वस्वी केन्द्रित होणे आणि याच्याशी निगडीत असलेल्या विस्तृत बहुजनसमाजाच्या ठायी त्याची दडपणूक होणे ही श्रमविभागणीची परिणति असते. विशिष्ट सामाजिक परिस्थितीत प्रत्येक जरी सर्वोत्तम चित्रकार असला तरी त्याच्यामुळे त्यांच्यापैकी प्रत्येकजण देखील स्वतंत्र चित्रकार असण्याची शक्यता मुळीच वगळता येत नाही, म्हणजे या बाबतीत देखील "मानवी" व "अपूर्व" श्रम यांच्यातला फरक सपशेल निरर्थक ठरतो. काहीही असले तरी समाजाच्या कम्युनिस्ट संघटनेच्या योगाने कलाकाराला स्थानिक व राष्ट्रीय संकुचितपणाच्या अंकित राहावे लागणे नष्ट होते; हा संकुचितपणा सर्वस्वी श्रमविभागणीतून निर्माण होतो; त्याचबरोबर व्यक्तीने एका निश्चित कलेच्या अंकित होणे देखील नष्ट होते; म्हणजे तो

सर्वस्वी चित्रकारच आणि, शिल्पकारच असणे इत्यादि प्रकार नष्ट होतात; त्याचे खुद्द नावच त्याच्या व्यावसायिक विकासाचा संकुचितपणा व श्रमविभागणीवर त्याचे अवलंबून असणे भरपूर प्रमाणात व्यक्त करते. कम्युनिस्ट समाजात चित्रकार नसतात, परंतु इतर कामगिऱ्यांच्या जोडीला चित्रकलेत गुंतलेले असे लोकच तेवढे असतात.

कार्ल मार्क्स अणि फ्रेडरिक एन्गल्स,
जर्मन विचारसरणी
मार्क्स आणि एन्गल्स, **संकलित ग्रंथ,**
खंड ५ वा, मॉस्को, १९७६, पृष्ठे ३९३-९४

२

कम्युनिस्ट समाज हा एकमेव असा समाज असतो की ज्यामध्ये व्यक्तींचा खराखुरा व मुक्त विकास म्हणजे नुसताच शाब्दिक राहिलेला नसतो. अशा समाजामध्ये हा विकास व्यक्तींच्या संबंधाने नेमका निश्चित केलेला असतो आणि हा संबंध अंशतः आर्थिक पूर्वअटींमध्ये असतो आणि अंशतः सगळ्यांच्या मुक्त विकासाच्या आवश्यक ऐक्यामध्ये असतो, आणि शेवटची गोष्ट म्हणजे हा संबंध प्रचलित उत्पादक शक्तींच्या आधारावरील व्यक्तींच्या कामगिरीच्या सार्वत्रिक स्वरूपामध्ये असतो. म्हणून इथे आपण व्यक्तींचा विचार करतो आहोत तो विकासाच्या एका निश्चित ऐतिहासिक टप्प्यावरील व्यक्तींचा विचार करतो आहोत, केवळ आडमाप निवडून काढलेल्या व्यक्तींचा विचार आपण मुळीच करत नाही. खुद्द कम्युनिस्ट क्रान्ति ही व्यक्तींच्या मुक्त विकासाची सर्वसाधारण अट असते आणि या अनिवार्य कम्युनिस्ट क्रान्तीला डावलून देखील आपण व्यक्तींचा विचार करतो आहोत. तदनुसार आपल्या परस्परसंबंधींविषयींची व्यक्तींची जाणीव ही अर्थातच पूर्णपणे बदललेली असेल आणि म्हणून ती अतःपर "प्रेमाचे तत्त्व" राहणार नाही किंवा त्याच्या पेक्षा अधिक म्हणजे आत्मप्रौढी राहणार नाही.

कार्ल मार्क्स आणि फ्रेडरिक एन्गल्स,
जर्मन विचारसरणी
मार्क्स आणि एन्गल्स, **संकलित ग्रंथ,**
खंड ५ वा, मॉस्को, १९७६, पृष्ठ ४३९

३

हे ताब्यात घेणे ज्या रीतीने अमलात आणले पाहिजे त्या रीतीने आणखी पुढे निश्चित केले जाते. केवळ एकीच्या द्वाराच ते अमलात आणणे शक्य असते. ही एकी खुद्द कामगार वर्गाच्या स्वरूपानुसार, केवळ सार्वत्रिक असू शकणाऱ्या त्याच्या

स्वरूपानुसार आणि क्रान्तीच्या द्वाराच अमलात येते. या क्रान्तीमध्ये एका अंगाने अगोदरच्या उत्पादनपद्धतीची व व्यवहाराची व सामाजिक संघटनेची सत्ता उलथून पाडण्यात येते; आणि दुसऱ्या अंगाने कामगार वर्गाचे सार्वत्रिक स्वरूप व तडफ विकसित होते; यांच्याशिवाय हे ताब्यात घेणे साध्य करताच येत नाही; आणि समाजातील आपल्या अगोदरच्या भूमिकेत कामगार वर्गाला जे जे काही अजूनही चिकटून राहिलेले असते, त्या त्या सगळ्यापासून तो स्वतःला मुक्त करून घेतो.

केवळ याच टप्प्यावर स्वयं-कामगिरी भौतिक जीवनाशी एकजीव होते. हे भौतिक जीवन व्यक्तींचा विकास संपूर्ण व्यक्तींमध्ये होण्याशी आणि सगळ्या नैसर्गिक मर्यादांचा त्याग करण्याशी मिळते जुळते होत असते. श्रमाचे परिवर्तन स्वयं-कामगिरीमध्ये होणे हे अगोदरच्या मर्यादित व्यवहाराचे परिवर्तन व्यक्ती या नात्याने व्यक्तींच्या व्यवहारांत होण्याशी मिळते जुळते होत असते. एकजूट केलेल्या व्यक्तींनी एकूण उत्पादक शक्ती ताब्यात घेण्याच्या योगाने खासगी मालमत्ता नष्ट होते. पूर्वी इतिहासामध्ये विशिष्ट परिस्थिति योगायोग म्हणून सदैव उदयास येत असे, तर आता, व्यक्तींचा अलगपणा आणि प्रत्येक व्यक्तीची स्वतःचा चरितार्थ मिळवायची विशिष्ट रीत, या गोष्टी योगायोगाच्या झालेल्या आहेत.

व्यक्ती अतःपर श्रमविभागणीच्या अंकित नाहीत, म्हणून त्यांना तत्त्वज्ञांनी आदर्श म्हणून "माणूस" या संज्ञेच्या संकल्पनेत बसविलेले आहे, आणि ज्या एकंदर प्रक्रियेची रूपरेखा आम्ही आखलेली आहे, तिला त्यांनी "मानवाची" उत्क्रांतियुक्त प्रक्रिया असे मानले आहे; म्हणजे प्रत्येक ऐतिहासिक टप्प्यावर "माणसाला" आतापर्यंत अस्तित्वात असलेल्या व्यक्तींच्या जागी बसविण्यात आले आणि तोच इतिहासाची प्रेरक शक्ती असे दाखविण्यात आले. अशा प्रकारे ही एकंदर प्रक्रिया म्हणजे "माणसाच्या"* स्वयं-अलगीकरणाची [Selbstent fremdungs progress] प्रक्रिया असे संकल्पिण्यात आले, आणि मूलतः हे ज्या वस्तुस्थितीमुळे घडले ती म्हणजे ही की नंतरच्या टप्प्यावरील सरासरी व्यक्ति ही अगोदरच्या टप्प्यावर सदैव लादण्यात आली आणि नंतरच्या युगाची जाणीव ही अगोदरच्या युगाच्या व्यक्तींवर लादण्यात आली. प्रथमपासूनच प्रत्यक्ष परिस्थितीकडे दुर्लक्ष करत असलेल्या या उलटापालटीच्या द्वारा सगळ्या इतिहासाचे परिवर्तन जाणिवेच्या उत्क्रान्तियुक्त प्रक्रियेमध्ये करण्यात आले.

कार्ल मार्क्स आणि फ्रेडरिक एन्गल्स,
जर्मन विचारसरणी
मार्क्स आणि एन्गल्स, संकलित ग्रंथ,
खंड ५ वा, मॉस्को, १९७६, पृष्ठे ८८-८९

---

* [मार्क्सने मार्जिनमध्ये लिहिलेली टीप :] स्वयं-अलगीकरण

स्वातंत्र्य आणि भौतिक श्रम यांचे राज्य

१

ओघाओघात सांगायचे म्हणजे थेट कामाची वेळ ही स्वतःच मोकळ्या वेळाच्या अमूर्त विरोधात राहत नाही—भांडवलदारी अर्थशास्त्राच्या दृष्टिकोनातून मात्र ती तशी असल्याचे दिसते— ही वस्तुस्थिति स्वयंसिद्ध आहे. फूरियरला हवे होते त्याप्रमाणे काम म्हणजे खेळ होऊ शकत नाही. फूरियरची मोठी कामगिरी म्हणजे त्याने वितरणाला वरचा दर्जा दिलेला नाही, तरी परंतु त्याने खुद्द उत्पादन पद्धतीलाच अंतिम उद्दिष्ट म्हणून उच्चतर दर्जा दिलेला आहे. मोकळा वेळ— हा फुरसतीचा वेळ आणि उच्चतर कामगिरी करण्याचा वेळ असा दोन्ही असतो— याने साहजिकच आपल्या मालकाचे परिवर्तन एका वेगळ्या विषयात केलेले आहे, आणि हा वेगळा विषय या नात्यानेच नंतर थेट उत्पादन प्रक्रियेत प्रवेश करतो. ही प्रक्रिया, एकाच वेळी, उत्क्रान्त होत असलेल्या माणसाच्या संबंधात शिस्त असते, आणि उत्क्रान्त माणसाच्या संबंधात व्यवहार, प्रायोगिक विज्ञान, आणि भौतिकदृष्ट्या निर्मितिक्षम व स्वयंवस्तुनिष्ठीकरण करणारे विज्ञान असते. आणि या उक्रान्त माणसाच्या डोक्यात समाजाचे साठवलेले ज्ञान अस्तित्वात असते. दोहोंच्या लेखी, उत्पादन प्रक्रिया ही एकच वेळी व्यवहार असते, कारण काम म्हटले की हातांचा व्यावहारिक वापर आणि शेतीतल्या प्रमाणे मुक्त हालचाल आलीच.

कार्ल मार्क्स, (अर्थशास्त्रावरील टीकाटिप्पणी कच्चे हस्तलिखित–१९५७-५८ चे)

कार्ल मार्क्स, Grundrisse der Kritik der Politischen Oekonomie
बर्लिन, १९५३, पृष्ठ ६००

२

तसे असेल तर, निश्चित वेळामध्ये, आणि म्हणूनच निश्चित वरकड श्रम-वेळा-मध्ये, किती श्रम-मूल्य पैदा केले पाहिजे, हे श्रमाच्या उत्पादनक्षमतेवर अवलंबून असते. म्हणून समाजाची प्रत्यक्ष संपत्ती, आणि तिची पुनरुत्पादन प्रक्रिया सतत विस्तार-ण्याची शक्यता, या गोष्टी वरकड-श्रमाच्या मुदतीवर अवलंबून नसतात, परंतु त्या त्याच्या उत्पादनक्षमतेवर आणि तो उत्पादनाच्या ज्या कमी अधिक ऐसपैस परिस्थितीत करण्यात येतो त्या परिस्थितीवर अवलंबून असतात. वस्तुतः जिथे आवश्यकतेने व व्याव-हारिक हिशेबांनी निश्चित केलेला श्रम संपतो, तिथे स्वातंत्र्याची राजवट प्रत्यक्षात सुरू होते; अशा प्रकारे एकंदर गोष्टींच्या खुद्द स्वरूपातच ही राजवट प्रत्यक्ष भौतिक उत्पा-दनाच्या क्षेत्राच्या पलीकडे असते. रानटी माणसाला आपल्या गरजा भागविण्यासाठी, जीव जगविण्यासाठी व त्याची पुनर्निर्मिती करण्यासाठी, ज्या प्रमाणे निसर्गाशी झटापट करणे भाग असते, त्याचप्रमाणे सुसंस्कृत माणसाला हेच करणे भाग असते. आणि सगळ्या सामाजिक रचनांमध्ये आणि शक्य तितक्या सगळ्या उत्पादन पद्धतींच्या अमदानीत त्याला हे करणे भाग असते. त्याच्या विकासाबरोबर त्याच्या गरजांच्या परिणामी शारीरिक आवश्यकतेची ही राजवट विस्तारत जाते; परंतु त्याच वेळी, या गरजा भागविणाऱ्या उत्पादनाच्या शक्तीदेखील वाढत जातात. या क्षेत्रातील स्वातंत्र्य हे सामाजिकीकृत माणसाचेच स्वातंत्र्य असू शकते. हा माणूस म्हणजे एकत्र आलेले उत्पादक, निसर्गाशी आपली देवघेव व्यवहारिकपणाने नियंत्रित करणारे उत्पादक, निसर्गाच्या आंधळ्या शक्तींच्या अधिराज्याखाली असण्याऐवजी निसर्गाला आपल्या समाईक नियंत्रणाखाली आणणारे उत्पादक; आणि हे सगळे कमीत कमी उत्साह खर्च करून आणि आपल्या मानवी स्वभावाला अत्यंत अनुकूल व शोभेशा परिस्थितीत साधणारे उत्पादक. परंतु असे असूनदेखील ती अजून आवश्यकतेचीच राजवट राहिलेली असते. तिच्या पलीकडे सुरू होतो तो मानवी उत्साहाचा त्याचा तोच विकास; ही स्वातंत्र्याची खरीखुरी राजवट असते; परंतु ती या आवश्यकतेच्या राजवटीचा आधार घेऊनच बहरू शकते. कामाच्या दिवसाचे तास कमी होणे ही त्यात मूलभूत पूर्वअट असते.

कार्ल मार्क्स, भांडवल, खंड ३ रा,
मॉस्को, १९७१, पृष्ठे ८१९-२०

सामाजिक विचार, साहित्य आणि कला यांचा इतिहास

प्राचीन काळ, मध्ययुगे आणि ज्ञानजागृति

प्राचीन काळ

मानवी संस्कृतीची प्रभात

दुसऱ्या हिमयुगानंतर हवामान क्रमाक्रमाने अधिक उष्ण होत गेले, मनुष्यप्राणी सगळ्या युरोपखंडभर, उत्तर आफ्रिकेत आणि थेट भारतापर्यंत सगळ्या आशिया खंडात उदयास आला, आणि आता नष्ट झालेले अजस्र प्राणी (म्हणजे मॅम्मथ, उभे सुळे असलेला हत्ती, आणि लोकरीसारखे केस असलेला गेंडा), शिकारी प्राणी (म्हणजे गुहेतला सिंह व गुहेतले अस्वल), त्याचबरोबर अवशिष्ट प्राणिजाती (म्हणजे रेनडियर, घोडा, तरस, सिंह, गवा, आणि ऑरोक्स) हे त्याच्याबरोबर उदयास आले. या कालखंडातील आयुधे संस्कृतीची अत्यंत हीन पातळी दर्शवितात; खडबडीत दगडी सुऱ्या, पेअरच्या आकाराचे कुळव किंवा कुऱ्हाडी आणि त्यांचा वापर दांड्याशिवायच केलेला, जनावरांची चामडी साफ करण्यासाठी वापरात असलेल्या तासण्या, कोरणी, ही सगळी गारगोटीची हत्यारे, यांची पातळी आजच्या ऑस्ट्रेलियातील आदिवासींच्या वापरात असलेल्या हत्यारांच्या इतकी अंदाजे आहे. जी हाडे सापडलेली आहेत त्यांच्यावरून या माणसांच्या शरीरयष्टीविषयी कसलेच निष्कर्ष काढता येत नाहीत, परंतु त्यांचा विस्तृत प्रसार आणि त्यांच्या संस्कृतीचा एकजिनसीपणा यांच्यावरून हा कालखंड खूपच प्रदीर्घ होता असे आपण गृहीत धरायला हरकत नाही.

या प्राचीन अश्मयुगीन माणसाचे काय झाले याची आपल्याला काहीच कल्पना नाही. तो अस्तित्वात असलेल्या कोणत्याही प्रदेशातील, भारतातील देखील, सध्याचे मानववंश त्या माणसाचे वंशज आहेत असे मानता येत नाही.

या नष्ट वंशाची अवजारे इंग्लंड, फ्रान्स, स्वित्झर्लंड, बेल्जियम आणि दक्षिण जर्मनी या देशांतील गुहांमध्ये सापडली आहेत. ती बहुतेक सगळी मातीच्या सगळ्यात खालच्या थरांतील आहेत. संस्कृतीच्या सगळ्यात खालच्या पातळीच्या वरच्या अंगाला, तिच्यापासून स्टालाक्टाइटच्या जाड अगर पातळ थराने अलग केलेला असा दुसरा थर असून त्यांतही अवजारे आहेत. नंतरच्या कालखंडातील ही अवजारे असून ही कितीतरी अधिक कौशल्याने तयार केलेली आहेत आणि विविध साहित्यापासून बनविलेली

आहेत, खरे तर ही दगडी अवजारे सफाईदार नाहीत, परंतु त्यांची रचना व बनावट अधिक सोईस्कर आहे. यांच्या जोडीला आपल्याला भाले आणि त्यांची फळे दगडाची; रेनडियरच्या शिंगांची व हाडांची, हाडापासून किंवा शिंगांपासून तयार केलेले खंजीर व शिलाईच्या सुया, त्याचबरोबर जनावरांच्या दातांना भोके पाडून तयार केलेले गळ्यांतले हार, इत्यादि वस्तू सापडतात. काही अवजारांवर रेनडियर, मॅमोथ, ऑरोक्स, सील, देवमासे इत्यादि प्राण्यांच्या ठसठशीत आकृती आहेत, आणि नग्न माणसांचे शिकारीचे देखावे आहेत, शिंगांवरील शिल्पाकृतींचा प्रारंभ देखील आहे.

आदिम अश्मयुगातील माणूस बहुतांशी दक्षिणेकडे उगम असलेल्या प्राण्यांसमवेत सापडला, तर नंतरच्या अश्मयुगातील माणूस उत्तरेकडे उगम असलेल्या प्राण्यांसमवेत सापडला. म्हणजे उत्तरेकडील अस्वलांच्या दोन अवशिष्ट जाती, ध्रुवाकडील कोल्हा, ग्लटन, बर्फातले घुबड. नंतरच्या अश्मयुगातील माणूस बहुधा या प्राण्यांसमवेत ईशान्येकडून खाली सरकत आला. एस्किमो हे त्याचे बहुधा शेवटचे अवशिष्ट वंशज असावेत. उभय संस्कृतींची अवजारे अलग उदाहरणांच्या बाबतीत, इतकेच नव्हे तर एकंदरीने पूर्णपणे मिळती जुळती आहेत. हीच गोष्ट आकृतींना लागू पडते. उभयतांनी जवळ जवळ त्याच प्राण्यांवर चरितार्थ चालविला आणि नष्ट वंशाची जीवनपद्धति, आपण अंदाज करतो आहोत तदनुसार, सर्वस्वी तीच होती.

फ्रेडरिक एन्गल्स, "प्राचीन जर्मन इतिहासाचा अभ्यास"
मार्क्स/एन्गल्स, वेर्के, खंड १९ वा, १९६२,
पृष्ठे ४२५-२६

पुराणांचा व महाकाव्यांचा प्रारंभ

१. आणि २. रानटीपणाचा दर्जा आणि बर्बरतेचा कनिष्ठ दर्जा, हे दोन मानववंशीय कालखंड या भूतलावरील मानवजातीच्या एकंदर अस्तित्वाचा किमान-पक्षी चार-पंचमांश भाग व्यापतात.

कनिष्ठ दर्जामध्ये, मानवजातीचे उच्चतर गुणधर्म विकसित व्हायला प्रारंभ होतो : व्यक्तिगत प्रतिष्ठा, वक्तृत्व, धार्मिक समंजसपणा, नेकी, पौरुष आणि धैर्य, हे आता स्वभावाचे समाइक गुणधर्म झालेले आहेत; पण त्यांच्या जोडीला क्रौर्य, दगलबाजी आणि पिसाटपणा हे दोषही होते. धर्मामध्ये पंचमहाभूतांची पूजा, तिला व्यक्तिग देवतांच्या अंधुक संकल्पनेची जोड, त्यांत महान दैवताची

संकल्पना, उद्धट कवितांची रचना, एकत्र निवासी घरे, आणि मक्याची ब्रेड या गोष्टी या कालखंडातल्या होत. या कालखंडाने एकत्र कुटुंब (सिन्डियास्मियन फॅमिली) आणि टोळ्यांचे संघ देखील निर्माण केले, आणि यांची संघटना फ्रॅट्रीज व जेन्टीज यांमध्ये केली. मानवजातीच्या उन्नतीला फार मोठ्या प्रमाणात हातभार लावणारी कल्पनाशक्ति ही जी महान गुणवत्ता, ती आता पुराणकथा, दंतकथा, आणि परंपरा यांचे अलिखित वाङ्मय निर्माण करत होती. आणि ही अगोदरच मानवजातीला सामर्थ्यशाली प्रेरणा होऊन राहिली होती.

कार्ल मार्क्स, "ल्यूइस मॉर्गनकृत प्राचीन समाज या ग्रंथावरील टिपणे"
जर्मन व इंग्रजी भाषेत लिहिलेली

मार्क्स / एन्गल्स, Ober Kunst and Literatur, खंड १ ला, बर्लिन, १९६७, पृष्ठ ६२४

सेमाइट लोकांच्या महाकाव्याची परंपरा

अरब लोकांनी नैर्ऋत्य भागात वस्ती केली होती आणि त्यांनी ज्या इमारती उभारल्या, त्यांवरून ते ईजिप्शियन, असीरियन वगैरे लोकांइतकेच सुधारलेले होते असे दिसून येते. मुसलमानी स्वारीचा देखील याच्यावरून बराच उलगडा होतो. धार्मिक खुळचटपणाविषयी सांगायचे म्हणजे दक्षिणेकडील प्राचीन शिलालेखांचे अनुसरण त्याने केलेले दिसते; त्यांमध्ये एकेश्वरी पंथाची जुनी राष्ट्रीय-अरबी परंपरा अजूनही प्रामुख्याने आहे (तशी ती अमेरिकन व रेड इंडियनांमध्येही आहे), याच परंपरेचा केवळ एक लहानसा भाग असे हिब्रू परंपरेचे स्वरूप आहे; आणि महंमदाची धार्मिक क्रान्ति, ही प्रत्येक धार्मिक चळवळीप्रमाणेच, औपचारिकदृष्ट्या प्रतिक्रिया होती, जुन्या साध्यासुध्या चालीरीतींकडे तथाकथित परत वळणे होते.

ज्यू लोकांचा तथाकथित पवित्र धर्मग्रंथ हा जुन्या अरबी धार्मिक व जमात-विषयक परंपरेच्या जंत्रीहून अधिक काहीच नाही, आणि ज्यू लोक फार पूर्वी आपल्याच जमातीतल्या परंतु भटक्या शेजाऱ्यांपासून अलग झाल्यामुळे त्या धर्मग्रंथामध्ये दुरुस्ती करण्यात आलेली आहे—ही गोष्ट मला आता पूर्णपणे स्पष्ट झालेली आहे. पॅलेस्टाइनच्या सभोवार अरबी बाजूकडून वाळवंटांखेरीज, बेदूइन भूमीखेरीज अन्य

काहीच नाही, या परिस्थितीवरून त्यांच्या विशिष्ट विकासाचा उलगडा होतो. परंतु प्राचीन अरबी शिलालेख, परंपरा, आणि कुराण आणि सगळ्या वंशावळी वगैरेचा आता उलगडा करण्यातला सहजपणा यावरून हेच सिद्ध होते की मुख्य आशय हा अरबी किंवा सर्वसाधारणपणे सेमेटिक होता, म्हणजे आपल्याला इथे एड्डामध्ये व जर्मन वीरकथांमध्ये जे दिसून येते त्याच्या सारखीच ही अवस्था असल्याचे दिसते.

एन्गल्स यांचे मार्क्स यांना पत्र,
तारीख अंदाजे २६ मे १८५३
मार्क्स आणि एन्गल्स, निवडक पत्रव्यवहार,
मॉस्को, १९७५, पृष्ठ ७४

होमरच्या काव्यरचनेतील प्राचीन ग्रीक समाज

१

होमरच्या कवितांमध्ये, विशेषत : इलियडमध्ये, आपल्याला बर्बरावस्थेच्या उच्च टप्प्याने प्रगतीचा कळस गाठलेला आढळतो. सुधारलेली लोखंडी अवजारे, भाता, जाते, कुंभाराचे चाक, तेल व मद्य तयार करणे, धातुकामाचा विकास कलेमध्ये विकसित होणे, गाड्या, युद्धाचे रथ, फळ्या व तुळया वापरून जहाजबांधणी, कला या नात्याने वास्तुशिल्पाचा प्रारंभ, तटबंदी असलेली नगरे व त्यांमध्ये मनोरे व शत्रूवर हल्ला करायच्या सोई, होमरचे महाकाव्य, आणि एकंदर पुराणवाङ्मय ग्रीकांनी बर्बरावस्थेतून संस्कृतीमध्ये आपले संक्रमण करून घेत असताना आपल्याबरोबर घेतलेल्या वारशातील या मुख्य मुख्य गोष्टी आहेत. सीझरने आणि टॅसिटसने देखील जर्मनांची जी वर्णने केली आहेत त्यांची या गोष्टींशी आपण तुलना केली तर काय आढळते ! संस्कृतीच्या ज्या टप्प्यावरून होमरकालीन ग्रीक लोक उच्चतर टप्प्याच्या दिशेने पुढे जायची तयारी करीत होते, त्या टप्प्याच्या उंबरठ्यावर जर्मन लोक होते. यावरून बर्बरावस्थेच्या वरच्या टप्प्यावर उत्पादनाचा विकास केवढा समृद्ध झालेला होता हे आपण पाहतो.

फ्रेडरिक एन्गल्स, कुटुंबसंस्था, खासगी मालमत्ता
आणि राज्यसंस्था यांचा उगम
मार्क्स आणि एन्गल्स, निवडक ग्रंथ,
खंड ३ रा, मॉस्को, १९७३, पृष्ठ २०८

२

इलियड या महाकाव्यामध्ये माणसांचा राज्यकर्ता ॲगॅमेम्नॉन हा ग्रीकांचा सर्वोच्च राजा म्हणून पुढे येत नसून, वेढा घातलेल्या शहरासमोर राजमंडळाच्या लष्कराचा सरसेनापति म्हणून पुढे आलेला आहे. आणि ग्रीकांच्यामध्ये झगडा पेटला त्या वेळी त्याच्या या गुणाकडे ॲडिस्यूस या सुप्रसिद्ध उताऱ्यांत लक्ष वेधतो : अनेकांचे सेनानायकत्व ही चांगली गोष्ट नव्हे; आपण एकालाच सेनानायक करू या, इत्यादि (या उताऱ्यात मागाहून राजदंडाविषयीच्या लोकप्रिय कवितेची भर घालण्यात आली.)[५७] " इथे ॲडिस्यूस सरकारच्या प्रकाराबद्दल व्याख्यान देत नाही. परंतु रणांगणावरील सरसेनापतीची आज्ञा पाळली पाहिजे अशी त्याची मागणी आहे. ट्रॉय शहरासमोर केवळ एक सेना म्हणून ग्रीक लोक हजर आहेत, त्यांच्या लेखी अगोरा मधील कामकाज हे पुरेसे लोकशाहीप्रधान आहे. देणग्यांविषयी बोलताना म्हणजे लुटीच्या वाटणीबाबत ॲगॅमेम्नॉन याला किंवा अन्य कोणा बासिल्यूसला ही वाटणी करायला ॲचिलीस कधीही सांगत नाही, परंतु " आचाइयान्सच्या पुत्रांना "[५८] म्हणजे जनतेलाच ही वाटणी करायला तो नेहमी सांगतो. " झ्यूसच्या पोटी जन्माला आलेला ", " झ्यूसने लहानाचा मोठा केलेला ", या गुणविशेषांवरून काहीही सिद्ध होत नाही, कारण प्रत्येक कुल (जेन्स) हे कोणा तरी देवाच्या वंशातून जन्माला आलेले असते आणि जमातीच्या प्रमुखाचे कुल हे कोणा " नामांकित " देवाच्या वंशातून जन्माला आलेले असते. गुलाम देखील, म्हणजे ढुक्कर राख्या यूमाकुस आणि इतर हे देखील ईश्वरी '[५९] (दिओई किंवा थेइओई) असल्याचे ॲडिस्सीमध्ये देखील म्हटले आहे, आणि म्हणून इलियड पेक्षा कितीतरी नंतरच्या कालखंडामध्ये हे म्हटले आहे. त्याचप्रमाणे आपल्याला ॲडिस्सीमध्ये हेरॉस हे नाव मुलिओस या भाटाला आणि त्याचबरोबर अंधशाहीर डेमोडोकुस[६०] याला देखील दिलेले आढळते. थोडक्यात सांगायचे म्हणजे बासिलेइया हा जो शब्द ग्रीक लेखक होमरच्या तथाकथित राजेपणाला अनुलक्षून उपयोजितात (कारण लष्करी नेतृत्व हा त्याचा खास वेगळा गुण आहे), तो शब्द त्याच्या जोडीच्या मंडळाला व जनतेच्या सभेलाही लागू आहे, म्हणजे त्याचा अर्थ केवळ— लष्करी लोकशाही असाच आहे." (मार्क्स)

फ्रेडरिक एन्गल्स, कुटुंबसंस्था, खासगी
मालमत्ता आणि राज्यसंस्था यांचा उगम

मार्क्स आणि एन्गल्स, निवडक ग्रंथ,
खंड ३ रा, मॉस्को, १९७३, पृष्ठ २७४

ग्रीक शोकान्तिका

१

या विधानांना पाठिंबा देणारा पुरावा प्राचीन अभिजात वाङ्मयातील असंख्य उताऱ्यांमध्ये बाचोफेनने शोधून काढला आहे. असामान्य कष्टाळूपणाने त्याने हे उतारे एकत्र केले आहेत. त्याच्या मते, "हेटेरिझम"पासून एकपत्नीव्रतापर्यंतची उत्क्रान्ती आणि मातृसत्ताकापासून पितृसत्ताकापर्यंतची उत्क्रांती, विशेषेकरून ग्रीक लोकांमध्ये, धार्मिक विचारांच्या उत्क्रान्तीची परिणती म्हणून होते. नव्या दृष्टिकोनाच्या प्रतिनिधी अशा नव्या देवतांचा शिरकाव जुन्या दृष्टिकोनाचा प्रतिनिधी अशा जुन्या पारंपरिक देवतागणामध्ये होतो आणि अशा रीतीने नव्याकडून जुन्यांना अधिकाधिक मागे रेटण्यात येते. अशा प्रकारे, बाचोफेनच्या मते, पुरुष आणि स्त्री यांच्या परस्पर सामाजिक भूमिकेमध्ये जे ऐतिहासिक बदल घडून आले, ते, ज्या परिस्थितीत माणसे राहतात तिच्या विकासाच्या योगाने नव्हे, तर जीवनाच्या या परिस्थितीचे माणसांच्या मनात जे धार्मिक प्रतिबिंब पडते, त्याच्या योगाने हे बदल घडून आले. तदनुसार, ग्रीकांच्या पराक्रम युगामध्ये घसरणीला लागलेली मातृसत्ता आणि उदयास येत असलेली विजयी पितृसत्ता यांच्या दरम्यानच्या संघर्षाचे नाट्यरूप चित्रण एस्किलसच्या ओरेस्टिया या नाटकात असल्याचा निर्देश बाचोफेन करतो. क्लिटेम्नेस्त्रा हिने, आपला प्रियकर एजिस्थुस याच्यासाठी, ट्रोजन युद्धातून नुकताच परत आलेला आपला पती ॲगॅमेम्नॉन याचा खून केलेला आहे; ॲगॅमेम्नॉनपासून तिला झालेला तिचा पुत्र ओरेस्टेस हा आपल्या आईचा खून करून पित्याच्या खुनाचा सूड घेतो. मातृसत्तेच्या दृष्टीने मातृहत्या हा अत्यंत भयंकर व प्रायश्चित्त नसलेला गुन्हा असतो. म्हणून मातृसत्तेचे राक्षसी रक्षक एरिन्येस हे ओरेस्टेसचा पाठलाग करतात. परंतु अपोल्लोने आपल्या आदेशाच्या द्वारा हा खून करायला ओरेस्टेसला चिथावणी दिलेली असते आणि अथेना या देवतेला याचा न्यायनिवाडा करण्यासाठी पाचारण करण्यांत येते. इथे अपोल्लो व अथेना या देवता पितृसत्तेवर आधारलेल्या नव्या युगाचे प्रतिनिधी असतात आणि त्याचे रक्षण करतात. अथेना दोन्ही बाजू ऐकून घेते. ओरेस्टेस व एरिन्येस यांच्या दरम्यान आता जो वादविवाद सुरू होतो त्यामध्ये हा एकंदर वादविषय संक्षेपाने सादर झालेला आहे– ओरेस्टेस जाहीर करतो की क्लिटेम्नेस्त्रा ही दुहेरी अत्याचाराबद्दल गुन्हेगार आहे; कारण आपल्या पतीचा खून करण्यात तिने त्याच्या पित्याचाही खून केलेला आहे. मग एरिन्येसनी त्याच्यावर खटला का केला, आणि अधिक मोठी गुन्हेगार असलेल्या क्लिटेम्नेस्ट्रावर खटला का नाही केला याचे उत्तर लक्षणीय आहे :

"ज्याचा तिने खून केला त्या माणसाशी तिचे रक्ताचे नाते नव्हते."[११] रक्ताचे नाते नसलेल्या पुरुषाचा खून, जरी खुनी बाईचा तो पती असला तरी क्षम्य आहे

आणि एरिन्येस त्याची दखल घेत नाहीत. त्यांची कामगिरी म्हणजे केवळ रक्ताच्या नात्यातल्या खुनांचा सूड घेणे ही आहे, आणि मातृसत्ताक पद्धतीनुसार यातला सगळ्यांत जास्त राक्षसी गुन्हा म्हणजे मातृहत्या हा होय. आता ओरेस्टेसच्या बचावार्थ अपोल्लो मध्यस्थी करतो. अथेना या प्रश्नावर मत देण्यासाठी एरोपॅजिटेस यांना— अथीनियन न्यायाधीशांना— पाचारण करते. निर्दोष सुटका व गुन्ह्याची शाबिती यांना सारखी मते पडतात. मग अथेना ही कोर्टाची अध्यक्षा या नात्याने आपले मत ओरेस्टेसच्या बाजूने देते आणि त्याची निर्दोष सुटका करते. पितृसत्ताक पद्धतीने मातृसत्ताक पद्धतीवर मात केलेली असते. "कनिष्ठ वंशाचे देव" असे खुद्द एरिन्येस यांनी ज्यांचे वर्णन केले आहे, ते एरिन्येस यांच्यावर मात करतात आणि शेवटी नव्या युगाच्या नव्या अधिकारावर रुजू व्हायला एरिन्येस संमती देतात.

ओरेस्टेया या नाटकाचा हा नवा परंतु सर्वस्वी बिनचूक लावलेला अर्थ हा या सबंध ग्रंथातील एक अत्यंत सुंदर असा भाग आहे, परंतु त्याच वेळी यावरून असे दिसून येते की एस्किलसने आपल्या काळात एरिन्येस, अपोल्लो व अथेना यांच्यावर जेवढा विश्वास ठेवला तेवढाच विश्वास खुद्द बाचोफेन या पात्रांवर ठेवतो आहे; वस्तुतः त्याचे असे मत आहे की ग्रीसच्या शूर वीरांच्या युगामध्ये मातृसत्ताक पद्धती उलक्षून पाडण्याचा व तिच्या जागी पितृसत्ताक पद्धतीची स्थापना करण्याचा चमत्कार या पात्रांनी करून दाखविला. स्पष्टपणे सांगायचे म्हणजे जागतिक इतिहासात धर्माला निर्णायक तरफ मानणारी असली संकल्पना शेवटी निव्वळ गूढवादामध्ये परिणत झाल्याखेरीज राहत नाही.

फ्रेडरिक एन्गल्स, कुटुंबसंस्था, खासगी मालमत्ता आणि राज्यसंस्था यांचा उगम

मार्क्स आणि एन्गल्स, निवडक ग्रंथ,
खंड ३ रा, मॉस्को, १९७३, पृष्ठ १९४-९६

२

नातेसंबंधांची तुरानियन पद्धती (आशिया, आफ्रिका, ऑस्ट्रेलिया) ही अमेरिकेतील गॅनोव्हानियन पद्धतीशी मिळती जुळती असून विकासाच्या त्याच कालखंडामध्ये ग्रीक आणि लॅटिन जमातींमध्ये देखील रूढ असली पाहिजे. याचे एक वैशिष्ट्य : भावांची मुले ही स्वतःच भाऊ आणि बहिणी असतात, आणि म्हणून त्यांचे आपसात विवाह त्याच निर्बंधानुसार निषिद्ध असतात. बहिणींची मुले अशाच प्रकारे संबंधित असतात आणि त्यांना तोच निषेध लागू पडतो. हे पुनालुअन विवाह [१२] जर बाचोफेनला बेकायदेशीर आढळत असतील, तर मग त्या कालखंडातल्या माणसाला, नजीकच्या व दूरच्या चुलत-मावस-मामे भावंडांच्या दरम्यानचे प्रचलित बहुतेक

विवाह, मग ते बापाच्या बाजूने असोत किंवा आईच्या बाजूने असोत, निषिद्ध म्हणजे एका रक्ताच्या भावांच्या व बहिणींच्या दरम्यानच्या विवाहाप्रमाणे, असल्याचे आढळून येईल. यावरून डानाइडेसच्या लोककथेचा उलगडा होतो (एस्किलसने आपले सुप्लिसेस हे नाटक हिच्यावरच आधारलेले आहे.)

डानाऊस आणि ईजिप्टुस हे भाऊ भाऊ होते आणि ते आर्गिव इओ याचे वंशज होते. डानाऊसला वेगवेगळ्या बायकांच्या पोटी झालेल्या पन्नास मुली होत्या होत्या आणि ईजिप्टुसला पन्नास मुलगे होते; ईजिप्टुसने डानाऊसशी सोयरिक करायचा बेत केला; तुरानियन पद्धतीनुसार हे भाऊबहीण होते आणि म्हणून त्यांचे विवाह निषिद्ध होते. पुरुषाच्या वंशातील ही संतती असती तर ती देखील एकाच कुळातली ठरली असती आणि विवाहाला हा आणखी एक अडथळा झाला असता. बेकायदेशीर व रक्तसंबंधाच्या विवाहातून सुटका करून घेण्यासाठी डानाऊसच्या पासन्न मुली—डानाइडेस— या ईजिप्तहून आर्गोसला पळून गेल्या. ही हकीकत प्रॉमिथ्यूसने इओ यास अगोदरच भाकित म्हणून सांगितलेली होती (एस्किलस, ८५३.)

सुप्लिसेस या एस्किलसच्या नाटकात (आर्गोस येथील) आर्गिव्हेस बांधवांना डानाइडेस सांगतात की आपल्याला ईजिप्तमधून हद्दपार करण्यात आलेले नाही.

रक्तपाती कृतीपायी (खुनापायी) जनतेच्या कायद्यानुसार
परी आम्ही [पळून आलो] पुरुषांच्या भयापायी,
ईजिप्टुसच्या पुत्रांसंगे
रक्तनात्यातला अन् अपवित्र विवाह निषिद्ध म्हणोनी

(हा उतारा व्याकरणदृष्ट्या बरोबर नाही असे दिसते; पाहा श्चूट्झ, "एस्किलस" (खंड २ रा, पृष्ठ ३७८).

पुढचा कथाभाग असा : शरणार्थींची हकीकत ऐकून घेतल्यावर आर्गिव्हेजनी आपल्या मंडळामध्ये त्यांना संरक्षण देण्याचा निर्णय घेतला. याचा गर्भितार्थ म्हणजे अशा विवाहांवर बंदी अस्तित्वात आहे आणि त्यांचा आक्षेप खरा आहे. अथेन्स शहरी या शोकान्तिकेचा प्रयोग झाला त्या वेळी खुद्द अथीनियन कायद्याने वारस मुलींच्या व अनाथांच्या बाबतीत भावांच्या मुलांच्या दरम्यान विवाहाची सोय करून दिली व त्याचा पाठपुरावा केला, मात्र हा नियम अशा अपवादात्मक प्रकरणांपुरताच मर्यादित केला असल्याचे दिसते.

कार्ल मार्क्स, "ल्यूइस मॉर्गनकृत
प्राचीन समाज या ग्रंथावरील टिपणे"
जर्मन, इंग्रजी व ग्रीक या भाषांत लिहिलेली
मार्क्स/एन्गल्स Uber Kunst und Literatur,
खंड १ ला, बर्लिन, १९६७, पृष्ठ ६३०

प्राचीन लेखकांच्या मते ग्रीसमधील स्त्रियांचा दर्जा

ग्रीक लोकांमधील कुटुंबसंस्थेचा हा नवा प्रकार, त्याच्या संपूर्ण कडकपणानिशी आपल्या पुढ्यात येतो. मार्क्स नोंद घेतो तदनुसार,[६३] पुराणकथांतील देवतांचा दर्जा अगोदरच्या कालखंडाचा प्रतिनिधी-स्वरूप आहे, आणि त्या काळी स्त्रियांचे स्थान अधिक स्वतंत्र व अधिक आदरणीय असे होते, परंतु ग्रीक वीरांच्या युगामध्ये पुरुषाच्या वर्चस्वामुळे व गुलाम स्त्रियांच्या स्पर्धेमुळे स्त्रियांना अधोगती प्राप्त झालेली आपल्याला अगोदरच आढळून येते. ऑडिस्सीमध्ये टेलेमाचुस आपल्या आईचे बोलणे मध्येच कसे तोडतो व तिला गप्प बसायला फर्मावतो हे आपल्याला वाचायला मिळते. होमरच्या काव्यग्रंथांमध्ये, पकडून आणलेल्या तरुण स्त्रिया विजेत्यांच्या कामवासनेचे विषय होतात; लष्कराचे प्रमुख, एकामागून एका आपल्या दर्जानुसार, सगळ्यांत जास्त सुंदर स्त्रिया स्वतःसाठी पसंत करून घेतात. इलियडचा सगळा कथाभाग, आपल्याला ठाऊक आहे तदनुसार, असल्या गुलाम स्त्रीवरून ॲचिलीस व ॲगॅमेम्नॉन यांच्या दरम्यानच्या भांडणाभोवती फिरत राहतो. होमरच्या प्रत्येक महत्त्वाच्या वीरपुरुषाच्या संबंधात तो आपल्या तंबूत अशा एका कैद केलेल्या तरुणीसमवेत शय्यासोबत करत असल्याचा उल्लेख आहे. या तरुणींना परत घरी नेण्यात येते, त्यांना प्रणय मंदिरात ठेवण्यात येते. एस्किलसच्या नाटकात ॲगॅमेम्नॉनने जसे कॅस्सान्ड्राला[६५] नेले त्याप्रमाणे हा प्रकार असतो. या गुलाम स्त्रियांच्या पोटी जन्माला आलेल्या पुत्रांना आपल्या वडिलांच्या इस्टेटीतला लहानसा हिस्सा मिळतो आणि त्यांना स्वतंत्र नागरिक मानण्यात येते. टयूक्रोस हा टेलामॉनचा असा दासीपुत्र होता आणि त्याला आपल्या वडिलांचे नाव लावायला परवानगी मिळालेली होती. लग्नाच्या पत्नीने हे सगळे चालवून घ्यायचे, परंतु तिने स्वतः मात्र कडक पातिव्रत्य पाळले पाहिजे अशी अपेक्षा असे. ग्रीक शूर वीरांच्या युगामध्ये ग्रीक स्त्रीला नंतरच्या संस्कृतीच्या कालखंडातल्यापेक्षा अधिक आदराने वागवत असत; तथापि पतीच्या बाबतीत म्हणाल, तर ती वस्तुतः त्याच्या कायदेशीर वारसांची केवळ आई असते, त्याची प्रमुख घरकारभारीण असते आणि गुलाम स्त्रियांवर देखरेख करते. आणि या गुलाम स्त्रियांना आपल्या रखेल्या बनवायची त्याला मुभा असते व तशा त्यांना तो आपल्या मर्जीनुसार जरूर बनवतो. एकपतिव्रताच्या जोडीला गुलामगिरीचे अस्तित्व, सुंदर तरुण गुलाम स्त्रिया त्यांच्या सर्वस्वासकट पुरुषाच्या मालकीच्या असलेल्या, याच्या योगाने सुरुवातीपासूनच पातिव्रत्य हे केवळ स्त्रियांसाठीच, परंतु पुरुषासाठी मात्र नाही, असा एकपतिव्रताच्या खास स्वरूपाचा शिक्का त्याच्यावर बसला आणि हे त्याचे स्वरूप आजतागायत टिकून आहे.

नंतरच्या काळातील ग्रीक लोकांविषयी सांगायचे म्हणजे आपण डोरियन्स व आयोनियन्स यांच्या दरम्यान फरक केला पाहिजे. डोरियन्सचे अभिजात उदाहरण

म्हणजे स्पार्टा. त्याच्यामध्ये होमर दर्शवितो त्याच्यापेक्षाही अनेक बाबतीत अधिक प्राचीन वैवाहिक नातेसंबंध होते. स्पार्टामध्ये आपल्याला जोडप्याच्या विवाहाचा एक प्रकार आढळतो—त्या वेळी रूढ असलेल्या संकल्पनांनुसार सरकारने त्यांत दुरुस्ती केलेली असायची—हा प्रकार अजूनही यूथविवाहाचे अनेक अवशेष जतन करून ठेवतो. अपत्यहीन विवाह रद्द होत असत : राजा अलेक्सांड्रियासने (इ. स.पूर्व सुमारे ५६०) आपल्या अपत्यहीन पत्नीच्या जोडीला दुसरी पत्नी केली आणि दोन घरे चालविली; त्याच कालखंडातल्या राजा आरिस्टोनने अगोदरच्या दोन वांझ पत्न्यांच्या जोडीला तिसऱ्या पत्नीची भर घातली, परंतु त्यांतल्या एकीला त्याने सोडचिठ्ठी दिली. उलट पक्षी, कित्येक भावांना मिळून एक समाइक पत्नी करता येत असे. एखाद्या व्यक्तीला आपल्या मित्राची पत्नी भावडली, तर त्याच्याशी तो तिची भागीदारी करू शकत असे; आणि, बिस्मार्क म्हणत असे तदनुसार, आपली पत्नी एखाद्या मदनमस्त 'वारू'च्या स्वाधीन करणे, मग ही व्यक्ती नागरिक नसली तरी देखील, हे योग्य मानले जात असे. प्लूटार्कच्या ग्रंथातील एक उतारा असा आहेः एक स्पार्टन महिला कामुकवृत्तीने आपला पाठलाग करणाऱ्या एका प्रियकराला आपल्या पतीची मुलाखत घ्यायला धाडून देते; यावरून श्रोमान्न[६६] याच्या मते असे दिसते की तिला अजूनही पुष्कळच अधिक लैंगिक स्वातंत्र्य होते. खरा व्यभिचार, म्हणजे आपल्या पतीच्या नकळत पत्नीने बेइमानी करणे, असले प्रकार ऐकूही येत नसत. उलटपक्षी, स्पार्टामध्ये किमानपक्षी त्याच्या उत्कर्षाच्या काळामध्ये घरगुती गुलामगिरी कुणालाही ठाऊक नव्हती; हेलॉट गुलाम हे इस्टेटींवर अलग वास्तव्य करून असत आणि अशा प्रकारे त्यांच्या बायकांशी लैंगिक संबंध ठेवायला स्पार्टियेट्सना[६७] मोहाचे प्रसंग कमी येत असते. या सगळ्या परिस्थितीमध्ये स्पार्टाच्या महिलांना इतर सगळ्या ग्रीक महिलांच्यापेक्षा किती तरी अधिक आदराचे स्थान लाभलेले होते हे अगदी स्वाभाविकच होते. स्पार्टन महिला आणि अथीनियन हेटेरेंपैकी प्रतिष्ठित स्त्रिया याच तेवढ्या अशा ग्रीक स्त्रिया आहेत की ज्यांच्याविषयी प्राचीन लोक आदराने बोलतात आणि ज्यांचे उद्‌गार त्यांना नोंदून ठेवण्याच्या योग्यतेचे वाटतात.

आयोनियन्सच्या बाबतीत—अथेन्स हे त्यांचे वैशिष्ट्यपूर्ण स्थळ आहे—सगळ्या गोष्टी अगदी वेगळ्या असत. मुली फक्त कताई, विणाई व शिलाईकाम शिकत असत, फार झाले तर थोडेसे लेखन-वाचन शिकत असत. त्यांना जवळजवळ एकान्तातच ठेवत असत आणि सोबतीला फक्त इतर स्त्रियाच असत. स्त्रियांचा जानोसा वेगळा असे व तो घराचा स्वतंत्र भाग असे, तो वरच्या मजल्यावर किंवा इमारतीच्या पिछाडीला असे, आणि पुरुषांना, विशेषतः त्रयस्थांना तिथे सहजासहजी जाता येत नसे; पुरुष पाहुणे आले म्हणजे स्त्रिया या भागात जात असत. सोबतीला गुलाम स्त्री घेतल्याखेरीज स्त्रिया घराबाहेर जात नसत; घरी तर त्यांच्यावर जवळजवळ पहाराच असे; ॲरिस्टोफेनिस सांगतो की व्याभिचारी पुरुषांना[६८] घाबरविण्यासाठी मोलो-

स्सियन कुत्रे पाळलेले असत; तर किमानपक्षी, आशियाई नगरांमध्ये स्त्रियांवर पाहरा ठेवण्यासाठी हिजड्यांची नेमणूक केलेली असे; हेरोडोटसच्या काळाइतक्या अगोदरच्या काळात चिओस येथे हे हिजडे व्यापारासाठी तयार करण्यात येत असत, आणि वाल्स्मुथच्या [६९] म्हणण्यानुसार त्यांचा व्यापार केवळ बर्बरांसाठीच होता अशातला प्रकार नव्हता. युरीपीडीजच्या नाटकात पत्नीचे वर्णन ओट्रकुरेमा[७०] म्हणजे घर संभाळणारी वस्तू असे केलेले आहे (हा शब्द नपुंसकलिंगी आहे), आणि मुलांना जन्म देण्याच्या जोडीला घरातली मुख्य मोलकरीण याहून अधिक किंमत तिला अथीनियनच्या लेखी नसे. पतीला व्यायामाचे कार्यक्रम होते, त्याचे सार्वजनिक कार्य होते आणि त्यांतून पत्नीला वगळण्यास येत असे; याच्या भरीला पतीकडे अनेकदा गुलाम स्त्रिया असत आणि अथेन्सच्या भरभराटीच्या काळात वेश्याव्यवसाय विस्तृत प्रमाणात चालत असे, आणि किमानपक्षी सरकारची याला अनुकूलता असे. नेमक्या या वेश्याव्यवसायाच्या आधारावरच तेवढ्या श्रेष्ठ ग्रीक स्त्रिया पुढे आल्या, आणि स्पार्टियाटे महिला जशा आपल्या चारित्र्याने चमकल्या, तशाच या वेश्या प्राचीन स्त्री-जगताच्या सर्वसाधारण पातळीच्या किती तरी वरच्या दर्जाला आपल्या हुशारीने व कलाभिरुचिसंपन्नतेने चढल्या. स्त्री व्हायचे असेल तर प्रथम हेटेरा व्हायला पाहिजे हा अथीनियन कुटुंबसंस्थेला मोठ्यांत मोठा शाप आहे.

कालान्तराने ही अथीनियम कुटुंबसंस्था उर्वरित अथीनियन्सनी इतकेच नव्हे, तर मुख्य भूमीवरील व वसाहतींतील सगळ्या ग्रीक लोकांनी आदर्श मानली व त्यांनी आपली घरगुती नातीगोती हिच्या नमुन्याबरहुकूम वाढत्या प्रमाणात आकाराला आणली. परंतु या सगळ्या एकान्ताला व चौक्या-पाहऱ्यांना न जुमानता आपल्या पतींला फसवायला पुरेसे मोके ग्रीक महिलांनी अनेकदा शोधून काढलेच. ज्या या पतींना आपल्या स्वतःच्या पत्न्यांविषयी कसलेही प्रेम प्रदर्शित करायला शरम वाटली असती, त्यांनी सर्व प्रकारच्या प्रेमाचा वर्षाव हेटेरेंच्यावर करून आपली करमणूक करून घेतली. परंतु स्त्रियांची ही अधोगती खुद्द पुरुषांवरच उलटली आणि तिने त्यांनाही अधोगतीला नेले आणि शेवटी ते लंबडेबाजीच्या विकृतीत मग्न झाले आणि अशा प्रकारे गनिमीडच्या पुराणकथेने त्यांचा स्वतःचा व त्यांच्या देवांचाही अधःपात घडवून आणला.

फ्रेडरिक एन्गल्स, कुटुंबसंस्था,
खासगी मालमत्ता आणि राज्यसंस्था यांचा उगम,

मार्क्स आणि एन्गल्स, निवडक ग्रंथ, खंड ३ रा,
मॉस्को, १९७३, पृष्ठे २३७-३९

प्राचीन गुलामगिरी आणि जागतिक संस्कृती

१

गुलामगिरी शोधून काढण्यात आली होती. जुन्या जमातीच्या पलीकडे विकसित होत असलेल्या सगळ्या जनतांच्या मध्ये ही लवकरच उत्पादनाचा वरचढ प्रकार होऊन बसली, परंतु अखेरीस त्यांच्या अधोगतीच्या प्रमुख कारणांपैकी एक कारण देखील होऊन बसली. गुलामगिरीनेच प्रथम शेती आणि उद्योगधंदे यांच्या दरम्यान मोठ्या प्रमाणावरील श्रमविभागणी शक्य करून ठेवली, आणि याच्या योगाने हेलेनिझमला म्हणजे प्राचीन जगाला बहार आला. गुलामगिरी नसती तर ग्रीक राज्य-संस्था नसती; ग्रीक कला व विज्ञान नसते; गुलामगिरी नसती तर रोमन साम्राज्य नसते. परंतु ग्रीक संस्कृतीने व रोमन साम्राज्याने घातलेला पाया नसता तर आधुनिक युरोप देखील नसते. आपला एकंदर आर्थिक, राजकीय व बौद्धिक विकास अशी एक परिस्थिती गृहीत धरतो की जीमध्ये गुलामगिरी जितकी सार्वत्रिक मान्यता पावलेली होती तितकीच ती आवश्यक होती, हे आपण कधीही विसरता कामा नये. या अर्थाने आपल्याला असेही म्हणण्याचा हक्क आहे की: प्राचीन काळातली गुलामगिरी नसती तर आधुनिक समाजसत्तावाद नसता.

गुलामगिरीला नाके मुरडणे आणि सर्वसाधारण शब्दांत अशाच प्रकारची विधाने करणे आणि असल्या हीन गोष्टींबाबत उच्च नैतिक संतापाचे प्रदर्शन करणे, हे फारच सोपे असते. दुर्दैवाची गोष्ट अशी आहे की यातून जो एकंदर अर्थ निघतो तो सगळ्यांनाच माहीत झालेला असतो. तो म्हणजे हा की या प्राचीन संस्था अतः-पर आपल्या सध्याच्या परिस्थितीशी व या परिस्थितीने निश्चित केलेल्या आपल्या भावनांशी मिळत्या जुळत्या नाहीत. परंतु या संस्था कशा उदयास आल्या, या का अस्तित्वात होत्या आणि इतिहासात यांनी कोणती भूमिका बजाविली, याच्याविषयी यात एक शब्दही सांगितलेला नसतो. आणि या प्रश्नांची आपण जेव्हा छाननी करतो, तेव्हा आपल्याला असे म्हणणे भाग पडते—हे कितीही परस्परविरोधी व पाखंडीपणाचे असले तरीही— की त्या काळी असलेल्या परिस्थितीमध्ये गुलामगिरी चालू होणे हे महान पुढचे पाऊल होते. कारण मानव पशुयोनीतूनच उदयास आला ही तर वस्तु-स्थितीच आहे; आणि परिणामतः त्याला बर्बर अवस्थेतून स्वतःची सुटका करून घेण्यासाठी बर्बर घर्तीचे व जवळ जवळ पाशवी इलाज उपयोगात आणावे लागलेच. जिथे प्राचीन जमातींनी आपले अस्तित्व चालू ठेवलेले आहे, तिथे त्यांनी हजारो वर्षे राज्यसंस्थेच्या अत्यंत क्रूर अशा प्रकाराचा पाया घालून ठेवला, तो प्रकार म्हणजे पौर्वात्य अरेराव-शाही, भारतापासून रशियापर्यंत या जमाती जिथे बरखास्त झाल्या तिथेच जनतेने

आपली स्वतःची प्रगती केली, आणि त्यांची पुढची आर्थिक प्रगती म्हणजे गुलामांच्या श्रमाच्या साधनाने उत्पादनाची वाढ व विकास घडवून आणणे ही होती. जोपर्यंत मानवी श्रम हा अजून इतका कमी उत्पादक होता की चरितार्थाला आवश्यक अशा साधनांपेक्षा फारच अल्प वाढावा उपलब्ध करून देत होता, तोपर्यंत उत्पादक शक्तींची कसलीही वाढ, व्यापाराचा विस्तार, राज्यसंस्थेचा आणि कायद्याचा विकास, किंवा कला व विज्ञान यांचा पाया घालणे, या गोष्टी अधिक मोठ्या श्रमविभागणीच्या योगानेच केवळ साधणे शक्य होते. आणि याचा आवश्यक आधार म्हणजे साधे शारीरिक श्रम करणारा बहुजनसमाज आणि श्रमाचे मार्गदर्शन करणाऱ्या, व्यापार चालविणाऱ्या व सार्वजनिक व्यवहार करणाऱ्या आणि नंतरच्या टप्प्यावर कला व विज्ञान यांच्यामध्ये लक्ष घालणाऱ्या अशा काही थोड्या खास हक्क असलेल्या व्यक्ती, यांच्या दरम्यानची महान श्रमविभागणी हाच होता. या श्रमविभागणीचा सगळ्यांत जास्त सोपा व सगळ्यांत जास्त स्वाभाविक असा प्रकार म्हणजे वस्तुतः गुलामगिरी हाच होता.

फ्रेडरिक एन्गल्स, ॲन्टी-डूहरिंग,
मॉस्को, १९७५, पृष्ठ २०७-०९

२

सिसिलीचे प्राचीन कवी थिओक्रिटस आणि मोस्चुस यांनी आपले समकालीन मेंढपाळ गुलाम यांच्या रम्य जीवनाचे मंडन केले. हे निःसंशय काव्यमय स्वप्नरंजनच होते. परंतु आजच्या सिसिलीच्या "स्वतंत्र" कामगारांच्या रम्य जीवनाचे मंडन करण्याचे धाडस असलेला समकालीन कवी कुठे आहे! या बेटावरच्या शेतकऱ्यांना मेतायागे च्या रोमन पद्धतीच्या कठोर परिस्थितीत देखील आपल्या जमिनींची मशागत करता आली असती तर ते सुखी झाले नसते का! भांडवलदारी समाज-पद्धतीने त्यांना या अशा परिस्थितीत आणून सोडले आहेः स्वतंत्र माणसे प्राचीन काळातील गुलामगिरीसाठी शोक करीत आहेत!

परंतु त्यांना नवा उत्साह येऊ शकतो. सगळ्या देशोदेशींच्या दलित वर्गासाठी नव्या व अधिक चांगल्या समाजाचा प्रभातकाळ येत आहे. सगळीकडे दलितांनी एकजूट आरंभली आहे, सगळीकडे ते सरहद्दींच्या पलीकडे व वेगवेगळ्या भाषांनिशी एकमेकांशी हातमिळवणी करत आहेत, आन्तरराष्ट्रीय कामगार वर्गाची सेना तयार होत आहे आणि होऊ घातलेले नवे शतक या सेनेला विजय मिळवून देईल.

फ्रेडरिक एन्गल्स, "सिसिलीच्या समाजसत्ता-
वाद्यांना अभिवादनपर संदेश"
मार्क्स/एन्गल्स, वेर्के, खंड २२ वा, १९६३, पृष्ठे ४७६-७७

ग्रीक कलांमधील प्लास्टिक घटक

१

अशा प्रकारे अणु स्वतःला आपल्या सापेक्ष अस्तित्वापासून, म्हणजे सरळ रेषेपासून, तिच्यापासून अलग होण्याच्या योगाने, तिच्यापासून वक्र होण्याच्या योगाने, मुक्त करून घेतो; त्याचप्रमाणे एकंदर एपिक्युरियन तत्त्वज्ञान हे, ज्या ज्या ठिकाणी अमूर्त व्यक्तिमत्त्वाची, स्वयंपूर्णतेची आणि इतर वस्तूंशी सगळा संबंध नाकारण्याची संकल्पना त्याच्या अस्तित्वामध्ये प्रतिनिधीस्वरूप व्हावी लागते, त्या त्या असण्याच्या निर्बंधकारक रीतीपासून वक्र होते.

म्हणून कृतीचे उद्दिष्ट हे दुःख आणि गोंधळ यांच्या पासून अलग होण्यात, वक्र होऊन दूर जाण्यात आढळते. म्हणून चांगले म्हणजे वाईटापासून पलायन असते, सुख हे दुःखापासून वक्र होऊन दूर जाणे असते. शेवटची गोष्ट म्हणजे, जिथे अमूर्त व्यक्तिमत्त्व त्यांच्या सर्वोच्च स्वातंत्र्यानिशी व मुक्ततेनिशी उदयास येते, आपल्या सर्वंकषतेत उदयास येते, तिथे असा निष्कर्ष निघतो की जे असणे वक्र होऊन दूर गेलेले असते, ते सगळे असणे असते, या कारणास्तव देव जगापासून वक्र होऊन दूर जातात, त्याची पर्वा करत नाहीत आणि त्याच्या बाहेर वास्तव्य करतात.

एपिक्युरसच्या या देवांचा अनेकदा उपहास करण्यात येतो, हे जे देव मानवी प्राण्यांप्रमाणे खऱ्या जगाच्या इंटरमुंडियामध्ये * वास्तव्य करून असतात, त्यांना देह नसतो, परंतु अर्ध-देह असतो, रक्त नसते, परंतु अर्ध-रक्त असते, आणि ते सुखमय शान्ततेत नांदण्यात संतुष्ट असतात, कसल्याही प्रार्थनेकडे लक्ष देत नसतात, आमच्या व जगाच्या बाबतीत उदासीन असतात, त्यांना जो मान दिला जातो, तो त्यांच्या सौंदर्यासाठी, भव्यतेसाठी व त्यांच्या श्रेष्ठ स्वभावासाठी दिला जातो, आणि कसल्याही लाभासाठी दिला जात नाही.

आणि असे असूनही हे देव म्हणजे एपिक्युरसचे कल्पित नव्हे. ते जरूर अस्तित्वात होते. ते ग्रीक कलेचे प्लास्टिक देव आहेत. रोमन असलेला सिसेरो त्यांच्यावर यथायोग्यपणे राग काढतो;[७१] परंतु ग्रीक असलेला प्लूटार्क जेव्हा असा दावा करतो की देवांचा हा सिद्धांत जरी भीती [७२] व खुळ्या समजुती घालवत असला तरी तो देवांच्या ठायी आनंद किंवा कृपा मुळीच निर्माण करत नाही, परंतु त्याऐवजी

---

* जगांच्या दरम्यानच्या जागा (शब्दशः आन्तर-जगे) —संपादक

हिर्केनियन [७३] माशाशी आपले जे नाते असते ते त्याच्याशी असलेले आपल्याला बहाल करतो, म्हणून त्यातून आपण हानीचीही अपेक्षा करत नाही किंवा लाभाचीही अपेक्षा करत नाही-- तेव्हा एकंदर ग्रीक दृष्टिकोनाचाच त्याला विसर पडलेला असतो. तत्त्वविचारात्मक शान्तपणा हे ग्रीक देवांचे एक प्रमुख वैशिष्ट्य आहे. ॲरिस्टॉटल म्हणतो तद्नुसार : "जे सर्वोत्तम आहे, त्याला कृतीची जरूरी नसते, कारण त्याची सिद्धी ते स्वतःच असते." [७४]

कार्ल मार्क्स, "डॉक्टरेटच्या पदवीचा प्रबंध"

मार्क्स आणि एन्गल्स, संकलित ग्रंथ, खंड १ ला, मॉस्को, १९७५, पृष्ठे ५०-५१.

२

पहिले ग्रीक शहाणे लोक जर खरेखुरे चैतन्य असतील, म्हणजे जडाचे मूर्तरूप ज्ञान असतील, त्यांची वक्तव्ये जर खुद्द जडाइतकीच अस्सल तीव्रता टिकवून ठेवत असतील, जर, जड जसजसे वाढत्या प्रमाणात आदर्शीकृत होत आहे, त्याच्या प्रगतीचे वाहक व्यक्त जडाच्या वास्तवाच्या विरोधात, जनतेच्या वास्तव जीवनाच्या विरोधात आपल्या विशिष्ट वास्तवामध्ये आदर्श जीवन मांडत असतील, तर मग खुद्द आदर्शता हीच जडाच्या केवळ रूपामध्ये असते. जिवंत सत्तांना सुरुंग लावलेला नसतो, या कालखंडातील अत्यंत आदर्श लोक, म्हणजे पायथागोरियन्स आणि एलियाटिक्स, हे राज्यीय जीवनाचा गौरव खरीखुरी बुद्धिमत्ता म्हणून करतात; त्यांची तत्त्वे वस्तुनिष्ठ असतात, म्हणजे त्यांच्यापेक्षा वरचढ अशी ही सत्ता असते, आणि काव्यमय उत्साहानिशी, अर्धवट गूढवादी धर्तीवर ते त्यांचा गौरव करतात; म्हणजे नैसर्गिक उत्साहाचे आदर्शीकरण होण्याइतकी त्याची पातळी उंचावण्याच्या स्वरूपात आणून ठेवते आणि तिचा उपभोग घेत नाही, परंतु तिच्यावर प्रक्रिया करते आणि नैसर्गिकाच्या निश्चितीमध्ये ती अफूट ठेवते. आदर्श जडाचे हे मूर्तरूप त्याचा गौरव करणाऱ्या खुद्द तत्त्वज्ञांच्याच ठायी आढळते. त्याची अभिव्यक्ती प्लास्टिक स्वरूपात काव्यमय असते इतकेच नव्हे, तर त्याची वास्तवता म्हणजे ही स्वतःच प्रकटीकरण असते; ते स्वतःच जिवंत प्रतिमा असतात, प्लास्टिक मोठेपणानिशी जनता आपल्यांतून उदयास येत असलेल्या जिवंत कलाकृती म्हणून ती बघते; इतकी त्यांची कृती पहिल्या शहाण्या लोकांच्या बाबतींतल्या प्रमाणे विश्वव्यापी गोष्टीला साकार करते, तर त्यांची वक्तव्ये म्हणजे खरेखुरे छाप पाडणारे जड असते, म्हणजे कायदे असतात.

म्हणून हे शहाणे लोक म्हणजे सामान्य लोकांसारखे नसतात, म्हणजे ऑलिम्पिक देवाचे पुतळे जसे सामान्य लोकांसारखे नसतात तसेच; त्यांची गती स्वतःच्या ठायी विश्रान्ती असते, त्यांचा जनतेशी म्हणजे जडाशी असलेल्या त्यांच्या संबंधांप्रमाणे तीच वस्तुनिष्ठता असते. डेल्फिक अपोलो दृष्टान्त हे जनतेच्या लेखी दैवी सत्य होते, ते अज्ञात शक्तीचे आवरण असलेले होते, मात्र ग्रीक चैतन्याची उघड खरीखुरी सत्ता पायथियनच्या ट्रायपॉडमधून ध्वनित होती तोपर्यंतच हे देवी सत्य होते; जोपर्यंत ते जनतेचा गाजता तत्त्वविचार होते तोपर्यंतच त्यांच्याविषयी जनतेची तत्त्वविचारात्मक प्रवृत्ती होती, जोपर्यंत जनतेसारखे नव्हते तोपर्यंतच ते जनतेचे होते. तीच गोष्ट या शहाण्या लोकांना लागू पडते. परंतु सोफिस्ट व सॉक्रेटिस यांच्या बाबतीत आणि आनाक्झोरासमधील dunamic @ च्या योगाने परिस्थितीला उलट गती मिळाली.

कार्ल मार्क्स, "एपिक्युरियन तत्त्वज्ञानाविषयींची नोटबुके"

मार्क्स आणि एन्गल्स, संकलित ग्रंथ, खंड १ ला, मॉस्को, १९७५, पृष्ठ ४३६.

ग्रीक ज्ञानजागृती

१

दृश्य स्वर्ग, जीवनाचा जड दुव्वा, राजकीय व धार्मिक जीवनाचे गुरुत्वाकर्षणात्मक सामर्थ्य, यांचा विध्वंस होण्याच्या योगानेच केवळ प्राचीनांचा संघर्ष समाप्त होऊ शकला; कारण चैतन्य हे स्वतःमध्ये एकजीव होण्यासाठी निसर्ग दुभंगणे भाग असते. ग्रीकांनी कलेच्या हेफायेस्टान हातोडीने त्याच्या ठिकऱ्या उडविल्या; त्यांच्या पुतळ्यांमध्ये ते उध्वस्त केले; रोमनाने आपली तरवार त्याच्या हृदयात खुपसली आणि जनता मेल्या, परंतु आधुनिक तत्त्वज्ञान शब्दावरील सील काढून टाकते आणि चैतन्याच्या यज्ञामध्ये त्याला धुराच्या रूपाने जाऊ देते, आणि चैतन्याशी लढणारा चैतन्याचा लढवय्या या नात्याने, निसर्गाच्या गुरुत्वाकर्षणातून खाली आदळलेल्या एकाकी

@ सुप्त सामर्थ्य—संपादक

(मूळ ग्रीक लिपीचे रोमनमध्ये लिप्यन्तर—अनुवादक)

पाखंड्याप्रमाणे नव्हे, तो वैश्विकदृष्ट्या क्रियाशील आहे आणि विश्वात्मकाला पुढे सरसावायला अटकाव करणारी रूपे तो वितळवून टाकतो.

कार्ल मार्क्स, "एपिक्युरियन
तत्त्वज्ञानाविषयीची नोटबुके"

मार्क्स आणि एन्गल्स, संकलित ग्रंथ,
खंड १ ला, मॉस्को, १९७५, पृष्ठ ४३१.

२

जोपर्यंत जगाला गवसणी घालणाऱ्या व सर्वस्वी स्वतंत्र अशा त्याच्या हृदयामध्ये रक्ताच्या एका थेंबाचे तरी स्पंदन चाललेले असेल, तोपर्यंत तत्त्वज्ञान आपल्या विरोधकांना एपिक्युरसच्या या आवाहनपर शब्दात जबाब द्यायला कधीही कंटाळणार नाही :

'Ασεβὴς δέ, οὐχ ὁ τοὺς τῶν πολλῶν θεοὺς ἀναιρῶν,
ἀλλ' ὁ τὰς τῶν πολλῶν δόξας θεοῖς προσάπτων.[a]

Asebes de, oukh ho tous ton pollon theous anairon,
all 'ho tas ton pollon doksas theois prosapton.

तत्त्वज्ञान हा विचार गुप्त मुळीच ठेवत नसते. प्रॉमिथ्यूसची पुढील जबानी :

ἁπλῶ λόγω, τοὺς πάντας ἐχθαίρω θεούς[b]

haplo logo, tous pantas ekhthairo theous

ही तत्त्वज्ञानाची स्वतःची जबानी आहे. मानवी स्वात्मजाणीव ही सर्वश्रेष्ठ देवकोटी आहे असे न मानणाऱ्या सगळ्या स्वर्गस्थ व भूलोकस्थ देवांच्या विरोधातली ही तत्त्वज्ञानाची स्वतःची प्रतिज्ञा आहे. ते याच्या जोडीला अन्य कोणतीही प्रतिज्ञा घेणार नाही.

---

a बहुजनसमाजाने पुजलेल्या देवांना चो धुडकावून लावतो तो माणूस खराखुरा पापी नसतो, परंतु बहुजनसमाज देवांच्या बाबतीत जे मानतो ते देवांविषयी सांगणाराच पापी असतो. [७५] — संपादक

b साध्या शब्दात सांगायचे म्हणजे मी देवांच्या टोळीचा द्वेष करतो (प्रॉमिथ्यूस बाऊंड), [७६] — संपादक

परंतु तत्त्वज्ञानाची नागरी अवस्था वरकरणी अधिक खराब झालेली बघून आनंद झालेल्या गरीब बिचाऱ्या भेकडांना ते प्रॉमिथ्यूसने देवांचा सेवक हर्मीस याला दिलेले उत्तरच पुन्हा देत आहे :

τῆς σῆς λατρείας τὴν ἐμὴν δυςπραξίαν,
σαφῶς ἐπίστασ', οὐκ ἂν ἀλλάξαιμ' ἐγώ.
κρεῖσσον γὰρ οἶμαι τῆδε λατρεύειν πέτρᾳ
ἢ πατρὶ φῦναι Ζηνὶ πιστὸν ἄγγελον.[a]

tes ses latreias ten emen dyspraksian,
saphos epistas', oukh an allaksaim' ego.
khreisson gar oimai tede latreuein petra
e parti psynai Zeni piston angelon.

तत्त्वज्ञानाच्या कालगणनेत प्रॉमिथ्यूस हा सर्वश्रेष्ठ संत व हुतात्मा आहे.

कार्ल मार्क्स, "डॉक्टरेटचा प्रबंध"

मार्क्स आणि एन्गल्स, संकलित ग्रंथ,
खंड १ ला, मॉस्को, १९७५, पृष्ठे ३०-३१

प्राचीन जगातील धर्म आणि संस्कृती

"उच्चतर ऐतिहासिक महत्त्व पावलेल्या त्या राष्ट्रांमध्ये त्यांच्या राष्ट्रीय जीवनाचा बहर त्यांच्या धार्मिक जाणिवेच्या सर्वोच्च विकासाशी मिळता जुळता आहे, आणि त्यांच्या मोठेपणाचा व त्यांच्या सत्तेचा ऱ्हास त्यांच्या धार्मिक संस्कृतीच्या ऱ्हासाशी मिळता जुळता आहे."

---

a खातरी असू दे पक्की पण दुरवस्था ही बदलणार मी नाही रे सेवेसाठी तुझ्या
या पहाडाचा मी आहे सेवक बरवा
झ्यूस पित्याचा इमानी पोऱ्या नाही मी होणार.[७७]
(कित्ता). —संपादक

(ग्रीक लिपीचे हे रोमनमध्ये लिप्यन्तर हार्वर्ड विद्यापीठाच्या संस्कृत विभागाचे मुख व ग्रीक पंडित प्राध्यापक गॅरी टब्ब यांच्या कृपेने साभार उद्धृत —अनुवादक)

सत्य शोधण्यासाठी या लेखकाचे विधान ७८ थेट उलटे केले पाहिजे : त्याने इतिहासाला त्याच्या डोक्यावर उभे केले आहे. प्राचीन जगातील जनतांमध्ये ग्रीस आणि रोम हे नक्कीच सर्वोच्च "ऐतिहासिक संस्कृतीचे" देश आहेत. पेरिक्लीजच्या काळात अन्तर्गत दृष्ट्या आणि अलेक्झांडरच्या काळात बाह्यदृष्ट्या ग्रीसची सर्वोत्तम भरभराट झालेली होती. पेरिक्लीजच्या युगामध्ये तत्त्वज्ञानाचे, कलेचे व वक्तृत्वाचे मूर्तिमंत अवतार ज्यांना म्हणजे येईल असे सोफिस्ट व सॉक्रेटिस यांनी धर्माचे उच्चाटन केले. अलेक्झांडरचे युग हे ॲरिस्टॉटलचे युग होते, आणि ॲरिस्टॉटलने व्यक्तिगत "चैतन्याच्या" अमरत्वाचा सिद्धान्त आणि विधायक धर्माचे देव यांना धुडकावून लावले. आणि रोमची कथा काय सांगावी ! सिसरो वाचा ! रोमने आपल्या विकासाचे शिखर गाठले होते त्या वेळी एपिक्युरियन, स्टोइक व स्केप्टिक यांची तत्त्वज्ञाने हे सुसंस्कृत रोमन लोकांचे धर्म होते. प्राचीन राज्यांच्या नाशावरोबर त्यांचे धर्म देखील नाहीसे झाले याचा आणखी अधिक खुलासा करण्याची जरूरीच नाही, कारण प्राचीनांचा "खरा धर्म" म्हणजे "त्यांच्या राष्ट्रीयत्वाचा", त्यांच्या "राज्यसंस्थेचा" पंथ होता. जुन्या धर्मांचा नाश हा प्राचीन राज्यांच्या नाशाला कारणीभूत झाला नाही, परंतु प्राचीन राज्यांचा नाश हाच जुन्या धर्मांच्या नाशाला कारणीभूत झाला. आणि या अग्रलेखामध्ये आढळलेले हे असले अज्ञान हे स्वतःला "शास्त्रीय संशोधनाचे कायदे करणारे" म्हणवून घेते आणि तत्त्वज्ञानासाठी "फर्माने" लिहून काढते.

"एकंदर प्राचीन जगाचा नाश होणे भाग होते, कारण जनतांनी आपल्या शास्त्रीय विकासामध्ये साध्य केलेली प्रगति ही त्यांच्या धार्मिक मतांवर आधारलेल्या चुकांच्या उघड होण्याशी अवश्यमेव निगडित झालेली होती."

म्हणून या अग्रलेखानुसार, जुन्या धर्मांच्या चुका शास्त्रीय संशोधनाने उघडकीस आणल्याच्या कारणास्तव एकंदर प्राचीन जगाचा नाश झाला. धर्माच्या चुकांविषयी शास्त्रीय संशोधनाने जर मौन पाळले असते, या अग्रलेखाच्या लेखकाने लुक्रीशियस व लुसिएन यांचे ग्रंथ रद्द करायची शिफारस जर रोमन अधिकाऱ्यांना केली असती, तर प्राचीन जग नष्ट झाले नसते काय !

बाकीच्या मुद्यांच्या बाबतीत हेर एच्. यांच्या विद्वत्तेचा विस्ताराने परामर्श घेणे दुसऱ्या लेखावर सोपवून द्यायची परवानगी आम्ही स्वतःला मिळवून घेऊ.

प्राचीन जगाचा नाश जेव्हा जवळ येत होता, त्याच नेमक्या वेळी अलेक्झांड्रियन पंथ उदयास आला. त्याने ग्रीक पुराणकथांचे "शाश्वत सत्य" आणि "शास्त्रीय संशोधनाच्या फलितांशी" त्याची संपूर्ण एकवाक्यता जबरदस्तीने सिद्ध करण्याचा प्रयत्न केला. बादशहा ज्युलियन देखील याच प्रवृत्तीचा होता. या प्रवृत्तीचे असे ठाम

मत होते की नव्याने विकसित होत असलेली काळाची धारणा तिच्याकडे बघू नये म्हणून डोळे मिटून ठेवण्याच्या योगाने ती आपल्याला नाहीशी करता येते.

कार्ल मार्क्स, "कोल्निश्चे त्साय्टुंग या वृत्तपत्राच्या १७९ व्या अंकाचा अग्रलेख"

मार्क्स आणि एन्गल्स, संकलित ग्रंथ, खंड १ ला, मॉस्को, १९७५, पृष्ठे १८१-९०

प्राचीन जगाच्या ऱ्हासाच्या युगांतील तत्त्वज्ञानविषयक प्रवृत्ती

अशा काळी समग्र मनाच्या सेनापतींच्या मतांच्या विरुद्ध मते अर्धवट मनाच्या लोकांची असतात. त्यांच्या मते आपण सशस्त्र दले कमी करून, त्यांचे भाग पाडून, खऱ्या गरजांनिशी शान्तता तह करून, नुकसानीची भरपाई करू शकतो, तर याच्या उलट, अथेन्स शहरावर सर्वनाशाचा धोका ओढवला असताना थेमिस्टोकल्सने अथीनियन लोकांची समजूत घालून शहर सर्वस्वी सोडून देण्यासाठी व समुद्रकाठी अन्यत्र नवे अथेन्स स्थापन करण्यासाठी त्यांचे मन वळवायचा प्रयत्न केला.

अशा सर्वनाशकारी संकटानंतरचा काळ हा पोलादी निर्धाराचा काळ असतो हेही आपण विसरता कामा नये; प्रचंड संघर्षाचे वैशिष्ट्य असलेला हा काळ सुखाचा असतो, आणि कलेच्या महान कालखंडांच्या पाठोपाठ रखडत येत असलेल्या शतकांसमान असलेला काळ शोचनीय असतो. ही शतके, देवांचा पिता झ्यूस याच्या डोक्यांतून पाल्लास ॲथेना जशी उद्भवली तशी मेण, प्लॅस्टर व तांबे यांतून संगमरवरी शिल्पांना आकार देत राहिली. परंतु स्वतः परिपूर्ण असलेल्या व त्याच्या आत्मनिष्ठ विकासाच्या प्रकारांनिशी असलेल्या तत्त्वज्ञानाच्या पाठोपाठ येणारे कालखंड हे महाप्रचंड असतात, कारण त्यांचे ऐक्य साधणारा संघर्ष महाप्रचंड असतो. अशा प्रकारे रोमने स्टोइक, स्केप्टिक व एपिक्युरियन तत्त्वज्ञानाचे अनुयायित्व पतकरले. हे दुःखी व पोलादी निर्धाराचे कालखंड आहेत, कारण त्यांचे देव मृत झालेले आहेत, आणि नवी देवता शुद्ध प्रकाश किंवा शुद्ध अंधार हे दैवाचे काळे उपांग अजूनही उघड करून दाखविते. तिच्या ठायी अजूनही दिवसाच्या रंगांची उणीव आहे.

तथापि दुर्दैवाचा गाभा हा आहे की काळाचे चैतन्य, चिच्छक्तीचे मूलकारण, स्वतःतच मग्न असलेले, स्वतःच्या ठायी सर्व उपांगांनिशी आदर्शरूपात तयार झालेले, त्याला स्वतःशिवाय अस्तित्वात आलेली कोणतीही वास्तवता मान्य करायला मोकळीक

नाही. म्हणून असल्या दुर्दैवामध्ये दैवभोगाची गोष्ट म्हणजे आत्मनिष्ठ रूप, तत्त्वज्ञानाच्या संबंधाची रीत, वास्तवाच्या बाबतीतील आत्मनिष्ठ जाणीव ही आहे.

अशा प्रकारे, उदाहणार्थ, एपिक्युरियन [आणि] स्टोइक तत्त्वज्ञान त्याच्या काळाचे वरदान होते; अशा प्रकारे, वैश्विक सूर्याचा अस्त झाल्यावर पतंग खासगी व्यक्तीच्या दिव्याचा प्रकाश शोधत असतो.

कार्ल मार्क्स, " एपिक्युरियन तत्त्वज्ञानाविषयीची नोटबुके "
मार्क्स आणि एन्गल्स, संकलित ग्रंथ,
खंड १ ला, मॉस्को १९७५, पृष्ठ ४९२

लुक्रीशियस कॅरस

१

ज्यूस ज्याप्रमाणे क्यूरेटेस[७९] यांच्या युद्धनृत्यांच्या कोलाहलात लहानाचा मोठा झाला, त्याप्रमाणे इथे हे जग अणूंच्या खणखणत्या युद्धक्रीडांसमवेत साकार होते.

लुक्रीशियस हा अस्सल रोमन महाकवी आहे; कारण रोमन चैतन्याचे तो गुणगान करतो; होमरच्या आनंदी, भक्कम, एकात्म पात्रांच्या ऐवजी इथे आपल्याला अन्य कोणतेही गुण नसलेले दणदणीत, अफूट शस्त्रसज्ज वीरपुरुष भेटतात, आपल्याला (omnium contra omnes) a युद्ध भेटते. स्वतःसाठी असण्याची रुक्ष आकृती भेटते, देवाशिवाय असलेला स्वभाव आणि जगापासून अलिप्त असा देव भेटतो.

कार्ल मार्क्स, " एपिक्युरियन
तत्त्वज्ञानाविषयीची नोटबुके "

मार्क्स आणि एन्गल्स, संकलित ग्रंथ, खंड १ ला,
मॉस्को, १९७५, पृष्ठ ४७५

२

वसंतऋतू निसर्ग स्वतःला उघड करून दाखवतो, जणू विजयाच्या जाणिवेनिशी आपल्या सगळ्या आकर्षकपणाचे प्रदर्शन मांडतो, तर याच्या उलट हिवाळ्यामध्ये तो आपली लज्जा व नम्रता हिमवर्षावात व बर्फात झाकून घेतो, तसाच लुक्रीशियस हा

---

a सगळ्यांचे सगळ्यांविरुद्ध—संपादक

जगाचा तडफदार काव्यात्म स्वामी आहे आणि प्लूटार्कहून वेगळा आहे. प्लूटार्क आपला क्षुद्र अहंभाव नीतीच्या हिमवर्षावाने व बर्फाने झाकून घेतो. एखादी व्यक्ती काळजीपूर्वक बटने लावून घेतलेली व स्वत ला स्वत त हरवून घेतलेली आपण पाहतो, त्या वेळी आपण अभावितपणेच कोट घरून ठेवतो आणि आपण भानावर आहोत ना याची खात्री करून घेतो, जणू काय आपण स्वतःला हरवून बसू की काय असे आपल्याला भय वाटत असते. परंतु एखादा चटपटीत कसरतपटू पाहिल्यावर आपण स्वतःला विसरून जातो, वैश्विक शक्तींच्या प्रमाणे आपल्या देहाचे उन्नयन झाल्यासारखे आपल्याला वाटते आणि आपण अधिक निर्भयपणाने श्वास घेऊ लागतो. अधिक नैतिकतापूर्ण व अधिक मुक्त मनःस्थितीत कोण असतो ?— सद्गुणाने आपल्या जीवनाबरोबर जीवनाच्या फलश्रुती घालवून बसणे किती अन्यायाचे आहे याचा विचार करणारा, नुकताच प्लूटार्कच्या वर्गातून बाहेर आलेला ? का अमरपणाची पूर्तता झालेली पाहणारा, लुक्रीशियसचे हे साहसी गर्जना-गीत ऐकणारा ? ८० :

" .... कीर्तीच्या उच्च आकांक्षेने आपल्या तीक्ष्ण प्रेरणेनिशा माझ्या हृदयाला विद्ध केले आहे आणि हे करताना तिने माझ्या हृदयात काव्यदेवतेच्या गोड प्रेमाचे आरोपण केले आहे. हीच ती प्रेरणा, की जी, जिथे पूर्वी कुणी कधीही पाऊल ठेवलेले नाही अशा पिएरियन राज्यांमधील पथशून्य क्षेत्रांमधून प्रथम पदार्पण करायला माझ्या चैतन्याला सामर्थ्य देते. वाटेत नवे निर्झर पाहण्यात व त्यांचे जल प्राशन करण्यात केवढा तरी आनंद असतो. ज्या क्षेत्रातून काव्यदेवतेने फुले गोळा करून कोणत्याही मस्तकाला हाराची शोभा आणलेली नाही, तिथली नवी फुले वेचावी आणि मस्तकाभोंवती एक वैभवशाली हार गुंफावा ही केवढी तरी आनंददायक गोष्ट असते. या उदात्त विषयांवर भाष्य करणे, धर्माच्या निरगाठीतून माणसांची मने मुक्त करण्यासाठी धडपडणे, आणि काळ्याकुट्ट अंधाराने भरलेल्या कोपऱ्यांमध्ये काव्यदेवतेच्या चमचमाटानिशी सगळे उजळून टाकणाऱ्या माझ्या कवितेचे तेजस्वी किरण केन्द्रित करणे, हेच माझे श्रमसाफल्य आहे. "

२. ९२१.

जो आपल्या स्वतःच्या साधनसामुग्रीतून सगळ्या जगाची उभारणी करणे पसंत करणार नाही, स्वतःविषयी अनंतकाळपर्यंत काळजी करत बसण्यापेक्षा जगाचा निर्माता होणे पसंत करणार नाही, त्याला चैतन्याने अगोदरच धिक्कारलेले असते, त्याच्यावर मनाईहुकूम बजावलेला असतो, परंतु उलट अर्थाने; त्याची मंदिरातून हकालपट्टी झालेली असते आणि चैतन्याचा अनंतकाळ उपभोग घेण्यापासून त्याला वंचित केलेले असते आणि त्याला स्वतःच्या खासगी सुखाविषयी अंगाई गीते गायला आणि रात्री स्वतःविषयीची स्वप्ने बघायला मोकळीक दिलेली असते.

"वरदहस्त हे सद्‌गुणाचे पारितोषिक नसते, परंतु खुद्द सद्‌गुण हेच सद्‌गुणाचे पारितोषिक असते."[८१]

कार्ल मार्क्स, "एपिक्युरियन
तत्त्वज्ञानाविषयीची नोटबुके"

मार्क्स आणि एन्गल्स, संकलित ग्रंथ,
खंड १ ला, मॉस्को, १९७५, पृष्ठे ४६८-६९.

होरेस

वयोवृद्ध होरेस मला जागोजाग हायनेची[८२] आठवण करून देतो. त्याने होरेसपासून बरेचसे शिकून घेतले आहे आणि तो aufond @ तितकाच बदमाष politite * होता. हा होरेस म्हणे प्रामाणिक माणूस; हा cultus instantis tyranni ला c आव्हान देतो आणि ऑगस्टसपुढे शरणागती पतकरतो. असे असले तरी देखील हा शिवराळ म्हातारा अजूनही हवाहवासा वाटतो.

एन्गल्स यांचे मार्क्स यांस पत्र
तारीख २१ डिसेंबर १८६६

मार्क्स/एन्गल्स, वेर्के, खंड ३१ वा,
१९६५, पृष्ठे २७०-७१

पेर्सियसची वक्रोक्ति

तत्त्वज्ञानी हे एक तर नुसतेच पैसे कमावणारे शाळामास्तर होते किंवा धनिक खुशालचेंडूंचे पगारी विदूषक होते. काही तर गुलाम देखील होते. चांगल्या परिस्थितीत त्यांचे काय झाले याचे एक उदाहरण म्हणजे सेनेका हा स्टोइक व सद्‌गुणाचा व निर्व्यसनीपणाचा उपदेशक नीरो बादशहाच्या दरबारातला नंबर एकचा कारस्थानी होता, आणि लाचारपणाशिवाय त्याला असा होता येणे शक्य नव्हते; त्याने बादशहाकडून पैसे, मालमत्ता, बागबगीचे व राजवाडे बक्षीस म्हणून संपादन केले आणि

@ मुळात — संपादक

* राजकीय बाबतीत — संपादक

© जुलूमकर्त्याच्या धमकी देणाऱ्या चर्चेला — संपादक

बायबलांतल्या लाझारस या गरीब माणसाला तो उपदेश करत होता आणि वस्तुतः त्याच बोधकथेतला तो श्रीमंत माणूस होता. नीरो त्याला धडा शिकवायला मागू लागला तेव्हा मात्र त्याने बादशहाला आपली सगळी बक्षिसे परत घ्यायला सांगितले, आणि आपले तत्त्वज्ञान आपल्याला पुरेसे आहे असे सांगितले. पर्सियससारखे पूर्णपणे अलग पडलेले तत्त्वज्ञानीच तेवढे आपल्या नादान समकालीनांवर वक्रोक्तीचे फटके उगारायचे धैर्य दाखवू शकले. परंतु दुसऱ्या प्रकारच्या विचारवंतांविषयी, म्हणजे कायदेशास्त्रज्ञांविषयी सांगायचे झाल्यास त्यांना नव्या परिस्थितीविषयी उत्साह वाटत होता, कारण इस्टेटींच्या दरम्यानचे सगळे भेदभाव रद्द होण्याच्या योगाने त्यांना आपल्या आवडत्या खासगी कायद्याचे विवरण करायला विस्तृत वाव मिळाला, आणि त्याच्या बरहुकूम त्यांनी बादशहासाठी न भूतो न भविष्यति अशी सरकारी कायद्याची अत्यंत नीच पद्धति तयार केली.

फ्रेडरिक एन्गल्स " ब्रूनो बॉवर आणि आरंभीचा ख्रिस्ती धर्म "

मार्क्स आणि एन्गल्स, धर्माविषयी, १९७५, पृष्ठ १७५-७६

लुसियन

आरंभीच्या ख्रिस्ती धर्मीयांविषयीचा आपला एक सर्वोत्तम स्रोत म्हणजे सामोसाताचा लुसियन; हा अभिजात प्राचीन युगांतला व्हॉल्टेअर; हा प्रत्येक प्रकारच्या धार्मिक खुळ्या समजुतींविषयी सारखाच संशय प्रदर्शित करीत असे, आणि म्हणून ख्रिस्ती धर्मीयांना इतर कोणत्याही प्रकारच्या धार्मिक समाजापेक्षा वेगळ्या रीतीने लेखायला त्याला जुन्या धार्मिक कारणांचेही प्रयोजन नव्हते किंवा राजकीय प्रयोजनही नव्हते. उलट पक्षी त्याने सगळ्यांचाच त्यांच्या खुळ्या समजुतींबद्दल उपहास केला, मग ते गुरूचे पूजक असोत किंवा ख्रिस्ताचे पूजक असोत; त्याच्या उथळ बुद्धिवादी दृष्टिकोनातून एक प्रकारची खुळी समजूत ही दुसऱ्या प्रकारच्या खुळ्या समजुतीइतकीच मूर्खपणाची ठरते.

फ्रेडरिक एन्गल्स, "ख्रिस्ती धर्माच्या आरंभकाळाच्या इतिहासाविषयी "

मार्क्स आणि एन्गल्स, धर्माविषयी, १९७५, पृष्ठ २७७.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
३०२५
दा. क्र. २७.२.८२
विविधज्ञानविस्तार
ग्रंथ. शाखा (स्थळ प्रत)

मध्ययुगीन काळ

जर्मानिक संस्कृती

या शतकाच्या साठीच्या दशकारंभी इच्लेस्विग येथील पीटच्या दोन दलदलींमध्ये खूप मोठ्या महत्त्वाच्या वस्तू सापडल्या; त्यांचा काळजीपूर्वक अभ्यास कोपनहेगन येथे एन्गेलहार्ट याने केला, आणि विविध ठिकाणी फिरल्यानंतर या वस्तू कील म्युझियमध्ये ठेवण्यात आल्या. अशाच प्रकारच्या शोधांपेक्षा यांचा वेगळेपणा यांच्या जोडीला सापडलेल्या नाण्यांवरून ठरला. या नाण्यांवरून या वस्तूंचा काळ बऱ्याच निश्चितपणे ठरविणे शक्य झाले. नीरोपासून सेप्टिमियस सेव्हेरसपर्यंतची सदतीस नाणी सुडेरब्रारप नजीक ताश्रबेर्ग (डॅनिश भाषेत थोर्सब्येर्ग) येथील पीटच्या दलदलीत, आणि नायडॅम येथे समुद्राचे पाणी आत येऊन गाळाने भरलेल्या व पीटच्या दलदलीत रूपान्तरित झालेल्या ठिकाणी टायबेरियसच्या राजवटीपासून मॅक्सिनसच्या (इ. स. २१८) राजवटीपर्यंतची चौतीस नाणी उत्खननांत सापडली. म्हणून या वस्तू निःसंशयपणे इ. स. २२० व इ. स. २५० या कालखंडांतील ठरतात. या वस्तू सर्वस्वी रोमन बनावटीच्या नाहीत; अनेक वस्तू त्या क्षेत्रातील जर्मनांनी बनविलेल्या आहेत. दलदलीच्या भरपूर लोह असलेल्या पाण्यात या वस्तू जवळ जवळ जशाच्या तशा टिकून राहिलेल्या आहेत आणि त्यांच्या योगाने उत्तर-जर्मन धातु-उद्योग, विणाई व जहाज बांधणी उद्योगांची अवस्था आणि रूनिक खुणांच्या द्वारा तिसऱ्या शतकाच्या पूर्वार्धातील लिखित संस्कृतीची अवस्था यांचा आश्चर्यकारक रीतीनी उलगडा होतो.

खुद्द उद्योगधंद्याच्या अवस्थेच्या योगाने तर आपण अधिकच थक्क होतो. सुंदर विणलेले कपडे, नाजूक पादत्राणे, आणि चांगल्या कारागिरीची खोगिरे यांच्यावरून 'टॅसिटियन' जर्मनांच्या संस्कृतीपेक्षा संस्कृतीची खूपच उच्चतर पातळी निदर्शनास येते. धातूच्या देशी वस्तू तर विशेषेकरून स्तिमित करतात.

जर्मनांनी धातूंचे ज्ञान आपल्या आशियाई जन्मभूमीतून आणले असे तौलनिक भाषाशास्त्र सिद्ध करते. धातू खाणीतून काढणे व तिच्यावर काम करणे या गोष्टी देखील बहुधा त्यांना ठाऊक होत्या, परंतु रोमन लोकांशी त्यांचा संघर्ष झाला त्या वेळी त्यांना हे

ज्ञान अगोदरच होते असा संभव जवळ जवळ मुळीच नाही. ऱ्हाइन आणि एल्ब या नद्यांच्या दरम्यान लोखंड किंवा पितळ पैदा होत होते आणि त्यांच्यावर काम होत होते याचे निदानपक्षी कसलेही लक्षण पहिल्या शतकाच्या लेखांमध्ये सापडत नाही; उलट पक्षी याच्या विरोधातला पुरावा सापडतो. आता हे तर खरेच आहे की गॉथ लोक (अप्पर सिलेशियामधले?) खाणीतून लोखंड काढत असत असे टॅसिटस सांगतो आणि टॉलेमी शेजारच्या क्वाडीजना लोखंडाच्या कारखान्यांचे श्रेय देतो; दोन्ही बाबतींत धातु वितळविण्याचे ज्ञान डॅन्यूब नदीच्या दोन्ही तीरांवरून पुन्हा संपादन करता आले असावे. नाण्यांच्या पुराव्यांद्वारा पहिल्या शतकातल्या अशा सापडलेल्या वस्तूंमध्ये धातूच्या देशी वस्तू मुळीच नाहीत, केवळ रोमन वस्तूच आहेत. धातुकाम जर देशी असते तर या सगळ्या रोमन धातुकामाच्या वस्तू जर्मनीत का आणण्यात आल्या असत्या? जर्मनीमध्ये जुने ओतकामाचे साचे, अपुरे ओतकाम आणि पितळेचे तुकडे आपल्याला जरूर सापडतात; परंतु त्यांचा काळ दर्शविणारी नाणी त्याच्या जोडीला कधीही सापडलेली नाहीत; या वस्तू बहुतकरून पूर्व जर्मन काळातील असाव्यात आणि पितळेचे ओतकाम करणाऱ्या भटक्या एट्रुस्कन लोकांनी टाकून दिलेल्या असाव्यात. याच्या भरीला, इकडे येत असलेल्या जर्मनांची धातुकामाची कला सर्वस्वी नष्ट झाली असेल की काय असे विचारणे अर्थशून्य ठरते; सगळ्या सत्य घटना असे दर्शवितात की पहिल्या शतकात धातुकाम त्यांच्या ठायी जवळ जवळ अस्तित्वातच नव्हते.

परंतु ताश्चबोर्गच्या दलदलीत सापडलेल्या वस्तू देशी धातु उद्योगाची अनपेक्षितपणे उच्च पातळी पुन्हा दर्शवितात. इथे बकल्स आहेत, माणसांची व प्राण्यांची चेहेरेपट्टी कोरलेल्या कलाकुसरीच्या धातूच्या पट्ट्या आहेत; डोळे, नाक व तोंड वगळून सबंध चेहरा झाकणारे चांदीचे शिरस्त्राण आहे; विणलेल्या तारेचे चिलखत आहे; हे तर असामान्य मेहनतीचे काम आहे, कारण प्रथम तार ठोकून पातळ करावी लागली असणार (तार काढायचा शोध १३०६ साली लावण्यात आला); सोन्याचा शिर-पट्टा आहे; स्थानिक बनावटीच्या बहुधा नसलेल्या इतर कलाकुसरीच्या वस्तूंविषयी तर सांगायलाच नको. या वस्तू नायडॅमच्या दलदलीत, फूनेनच्या दलदलीत आणि शेवटची गोष्ट म्हणजे बोहेमियात (होरोविस येथे) सापडलेल्या वस्तूंच्या सारख्याच आहेत, आणि या देखील साठीच्या दशकाच्या आरंभीच सापडलेल्या आहेत: मानवी मुद्रा असलेल्या सुंदर पितळी चकत्या, बकल्स, कमरपट्टे इत्यादि सगळ्या वस्तू ताश्चबर्ग येथे सापडलेल्या वस्तूंच्या सारख्याच आणि तदनुसार त्याच कालखंडातल्या आहेत.

तिसऱ्या शतकापासून पुढच्या काळात धातुकामाचा उद्योग क्रमाक्रमाने सुधारत जर्मनीच्या साऱ्या प्रदेशभर पसरला असला पाहिजे; जनतांचे इकडे येऊन स्थायिक होण्याच्या काळापर्यंत, म्हणजे पाचव्या शतकाच्या अखेरीपर्यंत म्हणा, हा उद्योग तुलनात्मक दृष्ट्या पुढारलेला टप्पा गाठून राहिलेला होता. लोखंड व पितळ इतकेच नव्हे, तर सोने व चांदी या धातूंची कारागिरी नियमितपणे चालू होती.

रोमन नाण्यांच्या नमुन्याबरहुकूम सोन्याची पुष्परचना टाकसाळीतून काढण्यात येत असे आणि तिच्या आसनांना सोन्याचा मुलामा देण्यात येत असे; त्याचप्रमाणे कोंदणात बसविलेल्या कलाकुसरीच्या व इनॅमेलच्या वस्तू देखील त्यात आहेत; उच्च दर्जाची अभिरुची दर्शविणाऱ्या कलात्मक रचना, केवळ अंशतःच रोमन कारागिरीवर आधारलेल्या, अशा शोभेनिशी विचित्र आकृती सजविलेल्या अनेकदा आढळतात. ही गोष्ट मुख्यत्वे करून बकल्स, पट्टे व ब्रूच या काही वैशिष्ट्यपूर्ण प्रकार समाइक असलेल्या वस्तूंना लागू पडते. ब्रिटिश म्युझियममध्ये अझोवच्या समुद्रावरील कर्च येथील पट्टे हे इंग्लंडमध्ये सापडलेल्या तशाच प्रकारच्या पट्ट्यांच्या शेजारी मांडून ठेवले आहेत; ते बहुधा धातुकामाच्या एकाच कारखान्यातून आलेले असणे शक्य आहे. या कारागिरीची शैली, अनेकदा भरपूर स्थानिक वैशिष्ट्ये असून देखील, मुळात स्वीडनपासून डान्युब नदीच्या खालच्या भागापर्यंत आणि काळ्या समुद्रापासून फ्रान्स व इंग्लंडपर्यंत एकसारखीच आहे. युरोपखंडातील जर्मन धातु-उद्योगाचा हा पहिला कालखंड जनतेचे स्थलान्तरित होणे थांबल्यावर व ख्रिस्ती धर्माचा सर्वसाधारण स्वीकार झाल्यावर समाप्त होतो. इंग्लंडमध्ये व स्कँडिनेवियात तो काहीसा अधिक काळपर्यंत चालू राहिला.

सहाव्या व सातव्या शतकांतील जर्मनांमध्ये या उद्योगाचा मोठा विस्तार आणि उद्योगाची खास शाखा म्हणून त्याचे वेगळेपण यांचा पुरावा कायद्याच्या ८४ विविध कलमांतून मिळतो. आलामान्नियन कायदेकानूंमध्ये देखील लोहार, तरवारी बनविणारे आणि सोनार यांच्याविषयी अनेक संदर्भ आहेत, आणि जाहीरपणे मान्यता दिलेले (publice probati) असे देखील संदर्भ आहेत. बव्हेरियन कायदा चर्चमध्ये, डयूकच्या राजवाड्यात, लोहाराच्या दुकानात किंवा गिरणीत होणाऱ्या चोरीला अधिक कडक शिक्षा सांगतो, "कारण या चार इमारती सार्वजनिक आहेत आणि सारा वेळ उघड्या असतात." फ्रिसियन कायद्यानुसार सोनाराच्या खुनाबद्दलचा दंड त्याच सामाजिक दर्जाच्या इतरांच्या पेक्षा २५ टक्के वरचढ होता. सालिक कायदा साध्या भूदासाचे मोल १२ सॉलिडी ठरवितो, परंतु लोहार भूदासाचे [faber चे] मोल ३५ सॉलिडी ठरवितो.

एन्गल्स, "अव्वल जर्मन इतिहासात भर," मार्क्स/एन्गल्स, वेर्के, खंड १९ वा, १९६२, पृष्ठे ४५६-५९

प्राचीन आणि मध्ययुगीन साहित्यामधील प्रेमाचे स्थान

मध्ययुगापूर्वी व्यक्तिगत लैंगिक प्रेम असली गोष्ट मुळी अस्तित्वातच नव्हती. व्यक्तिगत सौंदर्य, जवळीक, मनाच्या कलाचा सारखेपणा इत्यादि गोष्टी भिन्नलिंगी लोकांच्या मनात समागमाची इच्छा जागृत करत असत. पुरुष म्हणा, तशाच स्त्रिया म्हणा, हा अत्यंत नाजुक असा संबंध आपण. कोणाशी ठेवावा या बाबतीत सर्वस्वी बेफिकीर तर नव्हत्या हे उघड आहे. परंतु ही गोष्ट आमच्या काळातील लैंगिक प्रेमापासून अजून फार फार दूरची. प्राचीन काळात लग्ने सर्रास आईबापांनी जुळविलेली असत; वरवधू मुकाट्याने याला मान्यता देत असत. प्राचीन काळाला ज्ञात असलेले अल्पस्वल्प परस्पर प्रेम हा कोणत्याही प्रकारे आत्मनिष्ठ कल नव्हता, परंतु ते एक वस्तुनिष्ठ कर्तव्य होते; हे विवाहाचे कारण नव्हते तर ही एक आनुषंगिक गोष्ट होती. प्राचीन काळी आधुनिक अर्थाची प्रेमप्रकरणे अधिकृत समाजाच्या कक्षेबाहेरच केवळ घडतात. ज्या मेंढपाळांच्या प्रेमातील सुखदुःखे थिओक्रिटस व मोस्चुस यांनी गाइलेली आहेत किंवा लोन्गुसने डाफ्निस आणि क्लो या काव्यग्रंथात गाइलेली आहेत, ते केवळ गुलाम आहेत, त्यांना राज्यामध्ये, स्वतंत्र नागरिकांच्या कार्यक्षेत्रामध्ये मुळीच स्थान नाही. तथापि गुलामांमधील दोन प्रकरणे वगळल्यास अधोगतीस लागलेल्या प्राचीन जगाच्या विघटनात्मक पैदाशी असेच प्रेमप्रकरणांचे स्वरूप आपल्याला आढळते; आणि ज्या स्त्रियांशी ही प्रेमप्रकरणे संबंधित आहेत त्या स्त्रिया देखील अधिकृत समाजाच्या कक्षेबाहेच्या आहेत, त्या हेटेरे आहेत, म्हणजेच परक्या किंवा गुलामगिरीतून मुक्त केलेल्या आहेत. हा प्रकार अथेन्स शहरी त्याच्या ऱ्हासाच्या काळाच्या सुरुवातीपासून चालू होता आणि रोम शहरी बादशहांच्या काळात चालू होता. स्वतंत्र स्त्री व पुरुष यांच्या दरम्यान जर प्रेमप्रकरणे खरोखरीच घडली तर ती केवळ व्यभिचाराच्या स्वरूपातली असत. आणि लैंगिक प्रेम हे या संज्ञेच्या आमच्या अर्थाने वयोवृद्ध आनाक्रिऑन या अभिजात प्रेमकाव्ये लिहिणाऱ्या प्राचीन कवीला इतके गैरलागू वाटत होते की प्रिय व्यक्तीचे लिंग ही देखील त्याच्या लेखी संपूर्ण दुर्लक्ष करायची बाब होती.

आमचे लैंगिक प्रेम हे प्राचीनांच्या साध्या लैंगिक वासनेहून, ईरॉसहून, मुळातच वेगळे आहे. पहिली गोष्ट म्हणजे आमचे प्रेम प्रेमविषयाकडून परस्परप्रेम गृहीत धरते; या बाबतीत स्त्रीची भूमिका पुरुषाच्या बरोबरीची असते; उलट पक्षी प्राचीन ईरॉसच्या स्त्रीचा सल्ला नेहमी मुळी घेतलाच जात नसे. दुसरी गोष्ट म्हणजे आमच्या बाबतीत लैंगिक प्रेम हे उत्कटतेची व अक्षयतेची एवढी उच्च पातळी गाठते की दोन्ही पक्ष एकमेकांचे न होणे किंवा वियोग होणे हे मोठ्यांत मोठे नसले तरी मोठे दुर्दैव मानतात;

एकमेकांची होण्यासाठी ते मोठे धोके पतकरतात किंवहुना जीवदेखील धोक्यात घालतात—ही गोष्ट प्राचीनांच्या बाबतीत फार तर केवळ व्यभिचाराच्या प्रकरणांत घडत असे. आणि शेवटची गोष्ट म्हणजे लैंगिक संबंधांचा सरसनिरसपणा ठरविण्यासाठी एक नवा नैतिक दर्जा उद्भवतो. जो प्रश्न विचारण्यात येतो तो म्हणजे असला संबंध कायदेशीर आहे किंवा बेकायदेशीर आहे इतकेच नव्हे, तर तो परस्पर प्रेमातून उद्भवला किंवा नाही हा देखील असतो. सरंजामी किंवा भांडवलदारी व्यवहारात या नव्या दर्जाची वासलात इतर सगळ्या नैतिक दर्जांच्या प्रमाणेच लावण्यात येते—म्हणजे त्याच्याकडे नुसतेच दुर्लक्ष करण्यात येते. परंतु याची अवस्था इतरांहून वाईटही नसते. त्याला इतर सगळ्यांप्रमाणे तत्त्वतः, कागदोपत्री मान्यता असते आणि याहून अधिक अपेक्षा सध्या करता येत नाही.

प्राचीन काळ आपली प्रथा मोडून लैंगिक प्रेमाला आरंभ करायला लागला, त्या वेळी मध्ययुगाने व्यभिचाराला प्रारंभ केला. स्त्रीदाक्षिण्यविषयक प्रेमाचे वर्णन आम्ही अगोदरच केलेले आहे. उषेची गाणी यातूनच उद्भवली. विवाहसंस्था मोडून टाकण्याचा उद्देश असलेला प्रेमाचा असला प्रकार आणि विवाहसंस्थेचा पाया होणारे प्रेम या दोहोंच्या दरम्यान अजून बरीच रुंद दरी आहे आणि स्त्रीदाक्षिण्याच्या युगाने ही दरी पूर्णपणे कधीच भरून काढली नाही. खुशालचेंडू लॅटिन लोकांकडून आपण नीतिमान जर्मन लोकांकडे येतो तेव्हा देखील आपल्याला नायबेलुन्गोन्लिएड[८५] मध्ये असे आढळते की क्रिएमहिल्ड—ही गुप्तपणे सीगफ्रीडच्या प्रेमात सापडलेली असते, तो जितक्या उत्कटपणे तिच्या प्रेमात सापडलेला असतो तितक्याच उत्कटपणे ती त्याच्या प्रेमात सापडलेली असते—असे असूनही ज्याचे नाव त्याला माहीत नसते अशा सरदाराला त्याने तिला अर्पण केलेली आहे अशी माहिती गुन्थरने दिल्यावर त्याला उत्तरादाखल ती एवढेच म्हणते :

"तू विचारायची जरूरच नाही; तू जसा आदेश देशील तशीच मी कायमची होईन. माझ्या सरदारा, माझा पति म्हणून तू ज्याची निवड करशील त्याला मी माझा देह आनंदाने अर्पण करीन"[८६]

या प्रकरणी आपल्या प्रेमाचा विचार होणे शक्य असल्याचे तिच्या कधी मनात देखील येत नाही. ब्रुनहिल्ड हिला कधी पाहिलेले नसताना देखील गुन्थर तिला मागणी घालतो आणि क्रीएमहिल्ड हिच्या बाबतीत एट्झेल हीच गोष्ट करतो. गुन्द्रुन[८७] यामध्ये देखील हाच प्रकार घडतो. त्यांत आयर्लंडचा सिगेबान्ट हा नॉर्वेजियन उटे हिला मागणी घालतो, हेगेलिन्गेनचा हेट्टेल हा आयर्लंडची हिल्डे हिला मागणी घालतो; आणि शेवटची गोष्ट म्हणजे मोरलँडचा सीगफ्रीड, ओर्मानीचा हार्टमुट आणि सीलँडचा हेर्विग हे गुन्द्रुन हिला मागणी घालतात; आणि इथे पहिल्या प्रथमच असा प्रकार घडतो की गुन्द्रुनने स्वखुषीने यांतल्या शेवटच्याला पसंत करायचे ठरविले. सर्वसाधारण नियम म्हणजे युवराजाची वधू त्याच्या आई-वडिलांनी पसंत करायची; ते

जर हयात नसतील तर आपल्या मांडलिकांतल्या सर्वश्रेष्ठ सरदाराच्या सल्लामसलतीनिशी तो स्वतःच ती पसंत करतो, आणि या सरदाराच्या शब्दाला सगळ्या बाबतीत मोठा मान असतो. याहून वेगळे काही असूच शकत नाही. सरदाराच्या, किंवा मानकऱ्याच्या लेखी, खुद्द युवराजाच्या लेखी असल्याप्रमाणेच, विवाह ही राजकीय कृती असते, नव्या सोयरिकींच्या द्वारा सत्तेमध्ये भर घालायची संधी असते; घराण्याचे हित हा निर्णायक घटक असतो, व्यक्तीचा कल नव्हे. विवाहसंबंधांत इथे प्रेम आपला शब्द खरा करायची आशा कशी धरू शकते ?

फ्रेडरिक एन्गल्स, कुटुंबसंस्था, खासगी
मालमत्ता आणि राज्यसंस्था यांचा उगम

मार्क्स आणि एन्गल्स, निवडक ग्रंथ, खंड ३ रा,
मॉस्को, १९७३, पृष्ठ २४९-५१

वॅग्नर आणि जर्मानिक महाकाव्ये

वॅग्नरलिखित नायबेलुंग ८८ मध्ये प्राचीन काळाचे जे सपशेल खोटे वर्णन आलेले आहे त्याच्याविषयी आपले मत अत्यंत कडक शब्दांमध्ये १८८२ च्या ८९ वसंत ऋतूत लिहिलेल्या पत्रात मार्क्स व्यक्त करतो. "भावाने आपल्या बहिणीला आपली वधू म्हणून मिठी मारल्याचे कुणी तरी ऐकले आहे काय ?" वॅग्नरचे हे "उल्लू देव," आणि त्यांच्या प्रेमप्रकरणांना अगदी आधुनिक घर्तीवर रक्ताच्या नात्यांतल्या लैंगिक संबंधाच्या मसाल्याची त्याने दिलेली फोडणी, याबाबत मार्क्सने असे उत्तर दिले : "प्राचीन काळी बहीण ही पत्नी होतीच; आणि ते नैतिकतेला धरूनच होते." [१८८४ च्या आवृत्तीला एन्गल्सने दिलेली टीप.]

वॅग्नरचा एक फ्रेंच मित्र [बोन्निये] आणि चाहता या टीपेशी सहमत नाही आणि तो असे दाखवून देतो की वॅग्नरने आपला आदर्श म्हणून घेतलेल्या ओगिस्द्रेस्का मध्ये म्हणजे पूर्वीच्या एड्डामध्ये ९० लोकी हा फ्रेयाला असा ठपका देतो : "तू आपल्या स्वतःच्या भावाला देवांच्या समक्ष आलिंगन दिलेस." त्याचा असा दावा होता, की त्या काळी अगोदरच भाऊ आणि बहीण यांच्या दरम्यान विवाह निषिद्ध ठरविण्यात आलेला होता. ओगिस्द्रेस्का ही अशा काळाची अभिव्यक्ति आहे की ज्या काळी प्राचीन पुराणकथांवरील श्रद्धेच्या संपूर्णपणे ठिकऱ्या ठिकऱ्या उडालेल्या होत्या; हे देवांचे उपरोधिक वर्णन करणारे खरेखुरे लुसिआनियन वक्रोक्तिपूर्ण काव्य आहे. मेफिस्टोफेलिसप्रमाणे लोकी हे दैवत अशा प्रकारे फ्रेयावर ठपका ठेवत असेल

तर त्याचा हा युक्तिवाद वॅग्नरच्या विरुद्ध आहे. आणखी काही कडव्यांनंतर लोकीने न्-जोर्दला असे देखील म्हटले आहे : "आमच्या बहिणीच्या पोटी तू [असला] पुत्र जन्माला घातलास" [vidh systur thinni gaztu slikan mog], तसे म्हटले तर न्जोर्द हा आसा नाही, परंतु वाना आहे आणि तो यन्ग्लिन्गा सागा (लोककाव्यां) मध्ये ९१ असे म्हणतो की वानांच्या भूमीमध्ये भाऊ आणि बहिणी यांच्या दरम्यानचे विवाह रूढ आहेत आणि तसा प्रकार आसांच्या बाबतीत नाही. यावरून असे दिसते की वाना हे आसांच्या अगोदरचे अधिक जुने देव होते. ते काहीही असले तरी न्जोर्द हा आसांच्यामध्ये त्यांच्या बरोबरीचा म्हणून वास्तव्य करून होता आणि भाऊ व बहिणी यांच्या दरम्यानचे आपसातले विवाह हे किमानपक्षी देवांच्या मध्ये तरी, देवांच्या नॉर्वेजियन सागांची रचना झाली त्या काळी अजून कसलीही शिसारी आणत नसत. वॅग्नरला आपण जर माफ करायचे असेल तर एड्डाच्या ऐवजी आपण गटेचा हवाला देणे अधिक चांगले. कारण गटेने 'देवांचा पोवाडा' व 'बायादेरे' यांमध्ये स्त्रिया धार्मिक विधीत अर्पण करण्याबाबत अशीच चूक केलेली आहे आणि ही गोष्ट तो आधुनिक वेश्याव्यवसायासारखीच असल्याचे सांगत आहे.

फ्रेडरिक एन्गल्स, कुटुंबसंस्था,
खासगी मालमत्ता आणि राज्यसंस्था
यांचा उगम

मार्क्स आणि एन्गल्स, निवडक ग्रंथ,
खंड ३ रा, मॉस्को, १९७३, पृष्ठे २१६-१७

सीगफ्रीड याची दंतकथा आणि जर्मन क्रान्तिकारक चळवळ

सीगफ्रीड याच्या दंतकथेत असे काय आहे, की जे आपल्यावर एवढा जबरदस्त प्रभाव पाडते ? त्या गोष्टीचे खुद्द कथानक नव्हे; या तरुण वीराचे मरण घडवून आणणारी नीच दगलबाजी नव्हे; त्याच्या व्यक्तिमत्वाच्या द्वारा जे सखोल महत्त्व व्यक्त झालेले आहे, ते आपल्यावर प्रभाव पाडते. सीगफ्रीड हा जर्मन तरुणांचा प्रतिनिधी आहे. जीवनाच्या बंधनात न अडकलेले अन्तःकरण आपल्या ठायी आपण अजूनही जपून ठेवलेले असेल, तर आपल्याला सगळ्यांना त्याचा अर्थ कळतो. सीगफ्रीडला आपल्या वडिलांच्या किल्ल्यांतून ज्यांच्या योगाने बाहेर बाहेर पडावे लागले, त्या कृतीच्या ऊर्मी, ते रूढीला आव्हान, आपणा सगळ्यांना आपल्या

ठायी जाणवते; सतत विचार करणे आणि तडफदार कृतीचे तुच्छतावादी भय बाळगणे या गोष्टींची आपल्याला मनापासून शिसारी येते. खुल्या जगात वावरायला आपल्याला हवे असते; व्यवहारीपणाच्या अडथळ्यांवर मात करून जीवनाच्या परिपूर्तीसाठी, कृतीसाठी लढायला आपल्याला हवे असते. विशेषेकरून धर्मसंस्था व राज्यसंस्था यांच्या क्षेत्रामध्ये तुच्छतावाद्यांनी राक्षस देखील उभे केलेले असतात; परंतु ते युग अतःपर राहिलेले नाही; आपल्याला शाळा नामक तुरुंगामध्ये डांबण्यात येते; तिथे आपल्या-सभोवार मुक्त हल्ला करण्याऐवजी क्रूर उपरोधाने आपल्याला 'हल्ला करणे' या ग्रीक क्रियापदाची सर्व अर्थांची व काळांची रूपे चालवायला लावण्यात येतात आणि त्या शिस्तींतून आपली सुटका झाल्यावर या शतकाची देवता जे पोलीस, त्यांच्या ताब्डीत आपण सापडतो. विचार करायला पोलीस, बोलायला पोलीस, चालायला, घोडदौड करायला आणि वाहन चालवायला पोलीस, पासपोर्ट, निवास परवाने आणि कस्टमचे दस्त-ऐवज-- हे सगळे राक्षस जाऊ देत खड्ड्यात ! त्यांनी आपल्याला कृतीचा केवळ देखावा ठेवला आहे, तरवारीऐवजी कोयता दिला आहे; परंतु तरवारीचा वापर करायला मिळणार नसेल तर या कोयत्याने या सगळ्या दांडपट्ट्याच्या कलेचा काय उपयोग ? आणि शेवटी हे अडथळे मोडून टाकल्यानंतर, तुच्छतावाद व बेपर्वाई पायदळी तुड-विल्यानंतर—ऱ्हाइन नदीच्या पलीकडे तो वेसेलचा मनोरा तुम्हाला दिसतो का ? त्या गावचा हा किल्ला, जर्मन स्वातंत्र्याचा बालेकिल्ला असे नाव मिळालेला हा किल्ला— हा जर्मन तरुणांचे स्मशान झालेला आहे, आणि मोठ्यात मोठ्या जर्मन तरुणांच्या जन्मभूमीच्या विरुद्ध दिशेला त्याला असावे लागले आहे. तिथे तुरुंगात कोण बसले ? ज्यांना अर्थशून्य तरवारबहादुरी शिकायची सक्ती नको होती ते, Vulgo द्वंद्वयुद्ध-कर्ते होते ते, डेमॅगॉग्ज [९२] होते ते विद्यार्थी. आता फ्रेडरिक चौथ्या विल्यमने [९३] सार्वत्रिक माफी जाहीर केल्यानंतर ही माफी दया दर्शविणारी कृती होती इतकेच नव्हे तर न्यायाची कृती होती असे आपण म्हणायला हरकत नाही. सगळे पूर्वपक्ष मान्य केले, विशेषतः विद्यार्थी बांधवांविरुद्ध सरकारने इलाज करायची जरूरी मान्य केली, तरी देखील आंधळा आज्ञाधारकपणा व कडक अंकितपणा हा राज्याला हितकारक नसतो हे बघणारे सगळे लोक लोक चळवळीत भाग घेणाऱ्यांना वागणूक देताना त्यांना मानानिशी व प्रतिष्ठेनिशी पूर्वपदावर आणले पाहिजे या माझ्या मताशी नक्कीच सहमत होतील. फ्रान्समध्ये बुर्बोन राजघराण्याची पूर्वपदस्थापना झाल्यानंतर [९४] आणि जुलैच्या क्रान्तीनंतर @ डेमॅगॉग बांधव हे आता असणे जितके अशक्य आहे तितकेच ते त्या वेळी असणे समजण्याजोगे होते. त्या वेळी प्रत्येक स्वतंत्र चळवळ कुणी दडपून टाकली ? युवकांच्या हृदयाचे स्पंदन "हंगामी" पालकत्वाखाली कुणी ठेवले ? आणि त्या दुर्दैवी लोकांना वागणूक कशी मिळाली ? या कायदेशीर मुकदम्याच्या

@ फ्रान्समधील १८३० च्या जुलै महिन्यातील क्रान्ति--संपादक

बाबतीत सार्वजनिक व गुप्त अशा दोन्ही कायद्यांच्या सगळ्या गैरसोई व चुका पूर्णपणे दिसल्या हे नाकारता येईल काय ? सरकारविरुद्ध केलेल्या गुन्ह्यांचे आरोप असलेले खटले स्वतंत्र ज्यूरर्सनी चालविण्या ऐवजी पगारी सरकारी सेवक चालवितात यातला अन्तर्विरोध उघड होत नाही काय ? आणि या सगळ्या शिक्षा तडकाफडकी, म्हणजे व्यापारी म्हणतात तशा "घाऊक प्रमाणांत" देण्यात आल्या हे नाकारता येईल काय ?

परंतु मला व्हाइन नदीकडे जायला हवे आहे, सूर्यास्ताच्या उन्हांत चमचमणाऱ्या तिच्या लाटा वर्म्स येथील सीगफ्रीडच्या दफनभूमीविषयी आणि बुडालेल्या फौजेविषयी त्याच्या मातृभूमीला काय सांगतात हे मला ऐकायला हवे आहे. एखादा स्नेहशील मॉर्गन ल फे हा सीगफ्रीडचा किल्ला बहुधा माझ्यासाठी पुन्हा उभा करील किंवा एकोणिसाव्या शतकातील त्याच्या सुपुत्रांसाठी कोणत्या शौर्यशाली कृती राखून ठेवल्या आहेत हे माझ्या मनश्चक्षूंना दाखवून देईल.

फ्रेडरिक एन्गल्स, " सीगफ्रीडचे जन्मगाव "

मार्क्स आणि एन्गल्स, संकलित ग्रंथ, खंड २ रा, मॉस्को, १९७५, पृष्ठे १३५-३६.

प्राचीन आयरिश साहित्य

१

प्राचीन ग्रीसचे व रोमचे लेखक, आणि ख्रिस्ती धर्मसंस्थापक देखील, आयर्लंड-विषयी फारच अल्प माहिती देतात.

त्या ऐवजी, सोळाव्या व सतराव्या शतकांतील युद्धांमध्ये अनेक आयरिश हस्तलिखिते नष्ट झाली असताना देखील, समृद्ध असे देशी साहित्य अजूनसुद्धा अस्तित्वात आहे. त्यांत काव्ये, व्याकरणे, शब्दसंग्रह, बखरी आणि इतर ऐतिहासिक लेख व कायद्याचे ग्रंथ यांचा समावेश आहे. तथापि फारच थोडे अपवाद वगळल्यास हे सगळे साहित्य, किमानपक्षी आठव्या ते सतराव्या शतकापर्यंतचे, केवळ हस्तलिखित स्वरूपातच अस्तित्वात आहे. कारण आयरिश भाषेच्या लेखी मुद्रणाचे अस्तित्व काही थोडी वर्षेच होते आणि ती भाषा मृत व्हायला लागली तेव्हापासूनच होते. म्हणून या समृद्ध साधनसामुग्रीचा फारच थोडा भाग उपलब्ध आहे. या बखरींपैकी सगळ्यात जास्त महत्त्वाच्या बखरी म्हणजे ॲबॉट तिगेर्नाच (मृत्यु १०८८) याची बखर, अल्स्टरची बखर आणि त्यातल्या त्यात महत्त्वाची म्हणजे चार धन्यांची बखर या होत. यांतली शेवटची बखर १६३२-३६ या मुदतीत डोनेगल येथील एका मठांत

मिळाली. एक फ्रेन्सिस्कन धर्मगुरू मायकेल ओ'क्लेरी याच्या मार्गदर्शनानुसार तिची रचना झाली. त्याला इतर तिघे सीचाइडेज (पुराण वस्तु संशोधक) यांनी मदत केली. ज्या साहित्यातून या बखरीची सिद्धता झाली ते आता जवळ जवळ सगळेच नष्ट झाले आहे. हिचे प्रकाशन अजून अस्तित्वात असलेल्या मूळ डोनेगल येथील हस्तलिखितावरून १८५६ साली झाले. हिचे संपादन हिला इंग्रजी अनुवादाची जोड देऊन ओ'डोनोव्हान @ यांनी केले. अगोदरच्या आवृत्त्या डॉ. चार्ल्स ओ' कॉन्नर[९५] यांनी तयार केलेल्या (चार धन्यांचा पहिला भाग आणि अल्स्टरची बखर), या संहिता व अनुवाद या दोन्ही बाबतीत अविश्वसनीय आहेत.

या बहुतेक बखरींचा आरंभ आयर्लंडची पुराणकथात्मक इतिहासपूर्वकालीन हकीकत सादर करतो. त्याचा आधार म्हणजे जुन्या लोककथा. नवव्या व दहाव्या शतकांतील कवींनी यांची प्रदीर्घ रचना केली आणि नंतर धर्मगुरु-बखरकारांनी त्यांना योग्य तो कालानुक्रम दिला. चार धन्यांची बखर ही जगाचे वर्ष २२४२ या वर्षी सुरू होते. या वर्षी नोआची नात कायेसेर ही महाप्रलयाच्या चाळीस दिवस अगोदर आयर्लंडमध्ये नौकेतून उतरली; इतर बखरीत स्कॉटिश लोकांच्या पूर्वजांचे वर्णन आहे— आयर्लंडमध्ये स्थलांतर करून आलेले हे शेवटचे लोक; जाफेथचे हे थेट वंशज; यांचा संबंध मोझेस, ईजिप्शियन लोक आणि फोएनिशियन लोक यांच्याशी जोडलेला आहे. अशाच प्रकारे मध्ययुगांतील बखरकारांनी जर्मनांच्या पूर्वजांचा संबंध ट्रॉय, आयेनियास किंवा जगज्जेता शिकंदर यांच्याशी जोडलेला आहे. चार धनी या बखरीमध्ये या लोककथेला फार थोडी पृष्ठे दिलेली आहेत (हिच्यातला एकमेव मौल्यवान घटक म्हणजे मूळची लोककथा ही आता देखील वेगळी दाखविण्याजोगी नाही); अल्स्टरची बखर या बखरीत ती अजिबात गाळूनच टाकलेली आहे; आणि टिगरनाच हा त्याच्या काळात अजब वाटण्याजोगा विमर्शक धीटपणाने असा खुलासा करतो की राजा सिम्बाओथ [अंदाजे इ. स. पूर्व ३००] याच्या अगोदरची स्कॉटिश लोकांची सगळी लिखित कागदपत्रे अनिश्चित आहेत. परंतु गेल्या शतकाच्या अखेरीस आयर्लंडमध्ये नव्या राष्ट्रीय जीवनाची जागृति झाल्यावर, आणि तिच्याबरोबर आयरिश साहित्य व इतिहास यांजविषयी नवी आस्था निर्माण झाल्यावर, या धर्मगुरूंच्या लोककथाच त्यांचे अत्यंत मौल्यवान घटक मानण्यात आले. अस्सल केल्टिक उत्साहानिशी आणि खास आयरिश बालसुलभ वृत्तीनिशी, या कथांवरील विश्वास हा राष्ट्रीय देशाभिमानाचा एक मूलभूत भाग म्हणून जाहीर करण्यात आला आणि याच्या योगाने इंग्लिश विद्वत्तेच्या अतिकावेबाज जगाला सगळ्याच आयरिश गोष्टी सपशेल मूर्खपणा

@Annala Rioghachta Eireann आयर्लंडच्या राजघराण्याची बखर, चार धन्यांनी रचलेली, इंग्रजी अनुवादासह संपादन डॉ. जॉन ओ'डोनोव्हान यांनी केले. डब्लिन, १८५६, ७ खंड क्वार्टो आकाराचे.

म्हणून भिरकावून द्यायला हवी ती सबब मिळाली— मात्र भाषाशास्त्र व ऐतिहासिक विमर्शक टीका या क्षेत्रांतील इंग्लिश विद्वत्तेचे स्वतःचे प्रयत्न उर्वरित जगाला पुरेसे माहीत होण्याइतके दिव्यच आहेत म्हणा. @

फ्रेडरिक एन्गल्स, "आयर्लंडचा इतिहास"

मार्क्स आणि एन्गल्स, आयर्लंड जाणि आयरिश प्रश्न, मॉस्को, १९७४, पृष्ठे १९१-९२

२

आतापर्यंत प्राचीन आयर्लंडमधील परिस्थितीविषयीच्या माहितीचा आमचा मुख्य स्रोत सेन्चुस मोर[९७] हाच राहिलेला आहे. प्राचीन कायदेशीर निवाड्यांचा हा संग्रह. नंतर रचलेल्या प्रस्तावनेनुसार याची रचना सेंट पॅट्रिक याच्या आदेशांनुसार झाली. आणि आयर्लंडमध्ये झपाट्याने पसरत असलेल्या ख्रिस्ती धर्माशी त्याच्या मदतीने याचा मेळ घालण्यात आला. आयर्लंडचा उच्च राजा लाय घाइरे [चार धन्यांच्या बखरीनुसार इ. स. ४२८–४९८], मन्स्टरचा कॉर्क व बहुधा अल्स्टरचा संस्थानिक दायरे हे उपराजे, आणि याशिवाय सेंट पॅट्रिक, सेंट बेनिगुस आणि सेंट केर्नेच हे तीन बिशप, आणि डुबथॅच, फेर्गुस आणि रोस्सा हे तीन वकील या सर्वांचे मिळून "कमिशन" तयार करण्यात आले आणि त्याने हा ग्रंथ रचला असा समज

@ त्या काळातली एक सगळ्यात जास्त बालिश पैदास म्हणजे एरीची बखर, गोल स्किओट इबेरचा किंवा आयरिश जनतेचा इतिहास, सिथियन भाषेतल्या फोएनिशियन बोलीतील मूळ हस्तलिखितावरून ओ'कॉनरकृत अनुवाद, लंडन, १८२२, दोन खंड. सिथियन भाषेतील फोएनिशियन बोली म्हणजे साहजिकच केल्टिक आयरिश, आणि मूळ हस्तलिखित हे हवी तशी निवड केलेल्या काव्यमय बखरीचे आहे. प्रकाशक आहे १७९८ चा[९६] परागंदा आर्थर ओ'कॉनर. हा मागाहून इंग्लिश चार्टिस्टांचा नेता झालेल्या फीयर्गस ओ'कॉनरचा चुलता. कॉनॉटचे राजे प्राचीन ओ'कॉनर यांचा हा वंशज दिसतो. आणि आयरिश राजगादीवर हक्क सांगणारा हा तोतया आहे. याचे चित्र मुखपृष्ठासमोर छापले आहे. त्यांत हा देखणा, आनंदी आयरिश चेहऱ्याचा आहे. त्याचा पुतण्या फीयर्गस याच्याशी त्याचे ठळक साम्य आहे. याने उजव्या हातात राजमुकुट पकडून ठेवलेला आहे. खाली असा मथळा आहे: "ओ'कॉनर— सेआर-रिगे, आपल्या वंशाचा प्रमुख, आणि ओ'कॉनर, आपल्या राष्ट्राच्या दलित जनतेचा प्रमुख: "Saumis pas vaincus" [अंकित, जित नव्हे].

आहे— आणि सध्याच्या कमिशनपेक्षा त्या कमिशनने हे काम अधिक स्वस्तात केले यात शंकाच नाही. या कमिशनला हे पुस्तक केवळ प्रकाशितच करावे लागले. चार धनी या ग्रंथामध्ये या ग्रंथाचा लेखनकाल इ. स. ४३८ असा दिलेला आहे.

या ग्रंथाची खुद्द संहिता फार प्राचीन ख्रिस्तपूर्व साहित्यावर आधारलेली असल्याचे उघड दिसते. त्यातली सगळ्यांत जास्त जुनी कायद्याची सूत्रे कवितांबद्ध आहेत आणि त्यांना एक रेखीव वृत्त आहे आणि त्यात तथाकथित स्वर-यमक म्हणजे एक प्रकारचा अनुप्रास किंवा व्यंजन-यमक साधलेले आहे आणि आयरिश कवितेचे वैशिष्ट्य आहे आणि ही कविता अनेकदा संपूर्ण यमक साधते. जुने आयरिश कायदा-विषयक ग्रंथ तथाकथित फेनियन (वेर्ला फेइनी) बोलीतून चौदाव्या शतकात अनुवादिण्यात आले हे निश्चित आहे. ही बोली पाचव्या शतकाची भाषा होती. तिच्यातून हे अनुवाद त्या वेळी प्रचलित असलेल्या आयरिश भाषेत करण्यात आले (प्रस्तावना (खंड १ ला) पृष्ठ ३६ व तदनंतरचा मजकूर). यावरून असे उघडकीस येते की सेन्युस मोर या ग्रंथामध्ये देखील वृत्त कमी-अधिक प्रमाणात काही ठिकाणी ठीकठाक करण्यात आले आहे, परंतु बरेच वेळा या संहितेला निश्चित लयबद्ध गोडवा देणारी अशी यमक प्रास युक्त रचना अधून मधून आढळते. कविता चरणांचे प्रकार शोधून काढण्यासाठी अनुवादाचे वाचन सर्वसाधारणपणे पुरेसे आहे. परंतु सगळ्या ग्रंथात, त्यातल्या त्यात उत्तरार्धात, निःसंशय गद्यमय असे अनेक उतारे आहेत; आणि काव्य हे नक्कीच फार प्राचीन व परंपरेनुसार आलेले असले तरी हे गद्य उतारे ग्रंथाच्या रचनाकारांनीच तयार केलेले दिसतात. ते काहीही असले तरी नवव्या व दहाव्या शतकात रचलेल्या शब्दसंग्रहात सेन्चोर मोर यातले उतारे अनेकदा दिलेले आहेत. या शब्दसंग्रहाचे श्रेय कॅशेलचा राजा आणि बिशप कॉरमॅक यांना देण्यात येते आणि याचे लेखन इंग्रजांच्या स्वारीच्या बरेच अगोदर झालेले आहे.

या सगळ्या हस्तलिखितांमध्ये (यांतले सगळ्यांत जास्त जुने चौदाव्या शतकाच्या आरंभीचे किंवा त्याच्याही अगोदरचे आहे) बहुतांशी अर्थविवरणात्मक अशा टीपा आणि या संहितेवरील अधिक विस्तृत विवरणे आहेत. टीपा जुन्या शब्दसंग्रहांच्या धर्तीवर आहेत; व्युत्पत्तीची जागा द्वर्थी शब्दांनी घेतलेली आहे आणि शब्दांचे खुलासे आणि विवरणपर टीपा वेगवेगळ्या गुणवत्तेच्या आहेत, अनेकदा भलताच विकृत अर्थ दिलेला आहे किंवा किमानपक्षी कायदेविषयक इतर ग्रंथांच्या ज्ञानाशिवाय त्यांचा अर्थबोध बहुतांशी होतच नाही. टीकांचा व टीपांचा काळ अनिश्चित आहे. तथापि बहुतेकांचा काळ बहुधा इंग्रजांच्या स्वारीनंतरचा असावा. त्याच वेळी खुद्द संहितेच्या बाहेर कायद्यांतील विकासाचे केवळ फारच थोडे अवशेष या टीका दर्शवितात आणि ही तपशिलांची अधिक रेखीव प्रस्थापना आहे. याचा बहुतांश भाग शुद्ध खुलासेवजा आहे आणि त्यांचा उपयोग अगोदरच्या काळासंबंधांचा स्रोत म्हणून काहीशा विमर्शकपणाने करता येण्याजोगा आहे.

सेन्चुस मोर मध्ये पुढील विषय आहेत :

१. निर्बंधाचा कायदा (Pfandungsrecht) म्हणजे बहुतेक सगळीच न्याय-दान पद्धती.

२. ओलीस ठेवण्याचा कायदा, तंटयांच्या वेळी वेगवेगळ्या प्रदेशांतले लोक असे ओलीस ठेवत असत.

३. साएर्राथ आणि डाएर्राथ[९८] यांचा कायदा (खाली पाहा); आणि

४. कुटुंबसंस्थेचा कायदा.

यावरून आपल्याला तत्कालीन समाजजीवनाची बरीच मौल्यवान माहिती मिळते, परंतु अनेक शब्दप्रयोगांचा जोपर्यंत उलगडा झालेला नाही आणि बाकीची हस्त-लिखिते प्रसिद्धच झालेली नाहीत तोपर्यंत बराचसा भाग अंधारातच राहिलेला आहे.

साहित्याच्या भरीला वास्तुशिल्पांच्या स्मारकांचे अवशेष, प्रार्थनामंदिरे, गोल मनोरे, तटबंद्या आणि शिलालेख या गोष्टीदेखील इंग्रजांच्या आगमनापूर्वीच्या लोक-स्थितीविषयी आपल्याला ज्ञान उपलब्ध करून देतात.

फ्रेडरिक एन्गल्स, "आयर्लंडचा इतिहास"

मार्क्स आणि एन्गल्स, **आयर्लंड आणि आयरिश प्रश्न,**
मॉस्को, १९७४, पृष्ठे १९४-९६

३

अजून अस्तित्वात असलेली आयरिश कवितांची हस्तलिखिते,— आरंभीच्या माइलिसियन काळापासून[९९] असलेली— त्यांच्या ओळींच्या दरम्यान खुलासे आहेत, त्यांच्या अभावी त्यांचा अर्थच कळला नसता; परंतु खुद्द हे खुलासे आर्ष भाषेतले आहेत आणि ते समजायला फारच जड जातात.

फ्रेडरिक एन्गल्स, **इंग्लंड व आयर्लंड यांच्या इतिहासाविषयीची हस्तलिखिते**

मार्क्स / एन्गल्स, Vber Kunst und Literatur.
खंड १ ला, बर्लिन १९६७, पृष्ठ ३२५

४[१००]

काही आयरिश लोक-संगीत फार प्राचीन आहे, काही गेल्या तीनशे ते चारशे वर्षांत उदयास आलेले आहे, आणि काही तर गेल्या शतकातलेच आहे. त्यांतल्या त्यात बरेचसे लेखन त्या काळी असलेला एक शेवटचा आयरिश शाहीर कॅरोलान याने

केलेले आहे. जुन्या काळी हे शाहीर किंवा हार्पिस्ट--कवी, संगीत रचनाकार आणि गायक ही एकच व्यक्ती असे--बऱ्याच मोठ्या संख्याबळानिशी असत. प्रत्येक आयरिश सरदाराचा स्वतःचा शाहीर त्याच्या किल्ल्यात असे. अनेक शाहीर भटके गायक म्हणून देशभर प्रवास करीत असत. त्यांचा इंग्रजांकडून छळ होत असे. ते राष्ट्रीय व इंग्रज-विरोधी परंपरेचे मुख्य प्रचारक असल्याचे इंग्रजांनी अचूकपणे हेरले होते. फिन्न मॅक कुम्हाल याच्या विजयांविषयीची प्राचीन गाणी (मॅक्फर्सनने हे पात्र आयरिश लोकांकडून चोरले आणि आपल्या ओस्सियन [१०१] या कवितासंग्रहात फिन्गल हे नाव देऊन त्याला स्कॉटिश बनविले; हा कवितासंग्रह सर्वस्वी आयरिश गाण्यांवरच आधारलेला आहे), तारा या प्राचीन राजवाड्याच्या भव्यतेविषयीची गाणी, राजा ब्रियान बोरुम्हा याच्या पराक्रमांविषयीची गाणी, आणि नंतरच्या काळातील आयरिश सरदारांनी सास्सेनाच (इंग्रज) यांच्या विरुद्ध केलेल्या लढायांबाबतची गाणी— ही सगळी या शाहिरांनी राष्ट्राच्या स्मरणात टिकवून ठेवलेली आहेत. आणि स्वातंत्र्यासाठी लढत असलेल्या समकालीन आयरिश सरदारांच्या पराक्रमांचा गौरव देखील या शाहिरांनी केलेला आहे. तथापि सतराव्या शतकामध्ये एलिझाबेथ, पहिला जेम्स, ऑलिव्हर क्रॉम्वेल आणि विल्यम ऑफ ऑरेंज यांनी आयरिश जनतेला सपशेल चिरडून टाकले, तिच्या जमिनी लुटल्या व त्या इंग्रज स्वारीवाल्यांना देऊन टाकल्या, आयरिश जनतेला तिच्या स्वतःच्या मातृभूमीतच निर्वासित केले, आणि तिचे परिवर्तन बहिष्कृतांच्या राष्ट्रामध्ये केले, आणि त्या काळात भटक्या शाहिरांची देखील कॅथोलिक धर्मगुरूंप्रमाणेच ससेहोलपट करण्यात आली, आणि या शतकाच्या आरंभी हे शाहीर क्रमाक्रमाने नष्टप्रायच झाले. त्यांची नावे नष्ट झाली आणि त्यांच्या कवितांपैकी काही थोडे अवशेषच तेवढे शिल्लक राहिले. आणि गुलाम केलेल्या परंतु अजित अशा या जनतेचा त्यांनी मागे ठेवलेला अत्यंत सुंदर असा वारसा म्हणजे त्यांचे संगीत.

आयरिश कविता सगळ्या चार ओळींच्या कडव्यात असत. या कारणास्तव बहुतेक आणि विशेषतः प्राचीन आयरिश गाण्यांचा आधार म्हणजे चार ओळींची यमकयुक्त रचना हाच सदैव असतो. मात्र कधी कधी ही रचना जराशी दडलेली असेल, आणि अनेकदा तिचे ध्रुवपद झालेले असेल किंवा हार्पच्या साथीनुसार ती शेवटी आलेली असेल. या प्राचीन गाण्यांपैकी काही गाणी आता देखील त्यातल्या आयरिश नांवांवरून किंवा सुरुवातीच्या शब्दांवरूनच केवळ माहीत झालेली असतात. आता आयर्लंडच्या मोठ्यात मोठ्या भागात आयरिश भाषा ही फक्त म्हाताऱ्या लोकांनाच समजते किंवा कुणाला देखील अजिबात समजतच नाही अशी अवस्था आहे. परंतु या गाण्यांचा अधिक मोठा भाग, त्यातल्या त्यात अधिक अलीकडला भाग इंग्रजी नांवांनी किंवा संहितांनीच युक्त असतो.

या बहुतेक गाण्यांमध्ये प्रभावीपणाने जाणवणारे औदासीन्य ही आजच्या राष्ट्रीय प्रवृत्तीची अभिव्यक्ती आहे. ज्या जनतेच्या विजेत्यांनी जुलूमजबरदस्तीच्या सदैव

नवनव्या अद्ययावत् पद्धती शोधून काढायचा सपाटा चालविलेला आहे, तिच्या बाबतीत वेगळ्या कशाची अपेक्षा असू शकणार ? यातली अगदी ताजी पद्धती चाळीस वर्षांपूर्वी चालू करण्यात आली, आणि गेल्या वीस वर्षांत तिने अखेरची हद्द गाठली. ती म्हणजे ही की आयरिश लोकांना त्यांच्या घरादारांतून व शेतीवाडीतून हुसकून लावणे— म्हणजे आयर्लंडमध्ये याचा अर्थ देशातूनच हाकून लावणे असा होतो. १८४१ पासून आयर्लंडची लोकसंख्या पंचवीस लाखांनी घटली, आणि तीस लाखांहून अधिक आयरिश लोकांनी देशान्तर केले. हे सगळे इंग्रज घराण्यातल्या बड्या जमीनदारांच्या फायद्यासाठी आणि त्यांच्या चिथावणीने करण्यात आले. आणखी तीन वर्षे हे असेच चालू राहिले तर आयरिश लोक फक्त अमेरिकेतच सापडतील.

फ्रेडरिक एन्गल्स, " आयरिश गाण्यांच्या
संग्रहाच्या प्रस्तावनेसाठी तयार केलेली टिपणे "

मार्क्स आणि एन्गल्स, आयर्लंड आणि आयरिश प्रश्न,
मॉस्को, १९७४, पृष्ठे २७०-७१.

प्राचीन स्कॅन्डिनेवियन महाकाव्ये

आयरिश सरदारांच्या आपसातील भांडणांनी नॉर्समेन लोकांच्यासाठी लुटालूट व वसाहतीकरण सोपे करून ठेवले, किंबहुना सगळे बेट तात्पुरते जिंकून घेणे सोपे करून ठेवले. स्कॅन्डिनेवियन लोक आयर्लंड हे आपले लुटीचे एक नियमित क्षेत्र आहे असे किती प्रमाणात मानत असत हे राग्नर लॉडब्रॉक याचे तथाकथित मरणगीत (Krakumal) [१०२] दाखवून देते. या गाण्याची रचना सुमारे इ. स. १००० या वर्षी नॉर्थंबरलँडचा राजा एल्ला याच्या सर्व-मनोऱ्यात झाली. या गाण्यामध्ये सगळा प्राचीन खिस्तपूर्व रानटीपणा, जणू काय शेवटचा म्हणून, एकत्र करण्यात आलेला आहे आणि राजा राग्नरच्या शौर्यशाली कृती गाण्याच्या रूपाने साजऱ्या करण्याची सबब म्हणून नॉर्डिक जनतेचे आपल्या स्वतःच्या भूमीतील लुटारू हल्ले, तसेच डूनामुन्डेच्या किनाऱ्यापासून फ्लॅन्डर्स, स्कॉटलंडपर्यंतचे (इथे अगोदरच हा उल्लेख बहुधा पहिल्या प्रथमच या शब्दात आलेला आहे) आणि आयर्लंडपर्यंतचे थोडक्यात चित्रित केलेले आहेत. आयर्लंडविषयी या गाण्यात म्हटले आहे :

अम्हि तरवारी हो सपासपा चालविल्या
मुडद्यांच्या राशी रचिल्या
घनघोर लढाई बघुनि खूष लांडगे
मेजवानिसाठी सजले ताव माराया

लोखंड भिडे ते पितळेच्या ढालीला
आयर्लंडचा राजा मार्स्टेइन्न
त्याने लांडग्यास वा गरुडालाही
उपाशी राहू न दिघला
वेध्राफिओर्ध्रामध्ये कावळ्यास नरबळी दिघला
तरवारीच्या खणाखणाटाचा अम्हि खेळ पहाटे मांडिला
लिन्दिसियेसीमध्ये मजेत अम्हि भिडलो तीन राजांना
तिथुनि न सुटेल कुणी जखमि न होता
नच कुणाहि मिळाले पळून हो जायाला
मुडद्याच्या मांसासाठी ससाणा भिडे लांडग्याला
लांडगा सपाटा मारी,
केले त्याने गट्ट कैक मुडद्यांना
आयरिशांच्या रक्ताचे पाट लढाइत वाहुनी
किनारा लाले लाल झाला @

फ्रेडरिक एन्गल्स " आयर्लंडचा इतिहास "
मार्क्स आणि एन्गल्स, आयर्लंड आणि आयरिश प्रश्न,
मॉस्को, १९७४, पृष्ठ २०४-०५

@ " Hiuggu ver medh hiorvi, hverr la thverr of annan;
gladhr vardh gera brodhir getu vidh soknar lecti,
let ei orn ne ylgi so er Irlandi styrdhi,
(mot vardh malms ok ritar) Marsteinn konungr fasta;
vardh i Vedhra firdhi valtafn gefit hrafni.

Hiuggu ver medh hiorvi, hadhum sudhr at morni
leik fyrir Lindiseyri vidh lofdhunga threnna;
farr atti thvi fagna (fell margr i gyn ulfi,
haukr sleit hold medh vargi), at hann heill thadhan kaemi;
Yra blodh i segi aerit fell um skaeru."

वेध्राफिओर्ध्र म्हणजे, आम्ही सांगितले आहे तदनुसार, वॉटरफोर्ड; तसेच लिन्दिसियेरीचा कुठे शोध लागला का नाही हे मला ठाऊक नाही. जॉन्स्टन अनुवाद करतो तदनुसार ते लीन्स्टर मुळीच नव्हे; eyri (बालुकामय भूशिर, डॅनिश भाषेत ore) हे अगदी विशिष्ट स्थळाचा निर्देश करते. valtafn याचा अर्थ ससाण्याचे खाद्य असाही होतो आणि सर्वसाधारणपणे त्याचा अनुवाद इथे असाच केलेला आहे, परंतु ज्या अर्थी रॅव्हन हा ओडिनचा पवित्र पक्षी आहे त्या अर्थी या शब्दाला हे दोन्ही अर्थ आहेत असे उघड दिसते.

मध्ययुगाच्या आरंभ काळातील डॅनिश काव्य

केवळ योगायोगाने जुनी डॅनिश क्याम्पे-विझेर ही कविता माझ्या हाती लागली. बऱ्याचशा कचऱ्याच्या जोडीला हिच्यात अधूनमधून काही फारच छान गोष्टी आहेत. उल्हान्द याने अशीच एक अनुवादिलेली पुढे दिली आहे.

Her Oluf hand rider sa vide,
Alt til sit brollup at byde,
Men dandsen den gaar saa let gennem lunden.

Der dandse fire, og der dandse fem:
Elle kongens daater rekker haanden frem.

"Velkommen, Her Oluf, lad fare din fig:
Bi lidet, og traed her i dandsen med mig."

"Jeg ikke tor, jeg ikke maa:
I morgen skal mit brollup staa."

"Her du, Her Oiuf, traed dandsen med mig:
To bukkeskinds stovle saa giver jeg dig.

To bukkeskinds stovle, sider vel om been:
Forgyldene spore derom spend.

Her du, her Ole, traed dandsen med mig:
En silke-skiorte giver jeg dig.

"En silke-skiorte saa hivid og filn:
Den blegte min moder veg maane skin."

"Jeg ikke tor, jeg ikke maa etc."

"Her du, Her Oluf, traed dandsen med mig:
Et hoved af guld saa giver jeg dig."

"Et hoved af guld kand jeg vel faa:
Men dandse med dig tor jeg ej saa."

"Og vil du ikke dandse med mig,
Sot og sygdom skal folge dig."

Hun slog hannem mellem sine haerde:
Aldrig var hand slagen verre.

Hun lofte, Her Oluf paa ganger rod:
"Og rid nu hiem til din festemo,"

Der hand kom til borgeled:
Der staar hands moder og hviler ved.

"Her du, Her Oluf, kier sonnen min:
Hvi baer du nu saa bleg en kind?"

Og jeg maa vel baere kinden bleg,
For jeg har vaeret i Ellekonens leg."

"Her du, Her Ole, min son saa prud:
Hvad skal jeg svare din unge brud?"

"I skal sige, jeg er udi lunde,
At prove min hest og saa mine hunde."

Aarle om morgen, dag det var:
Da kom den brud med brudeskar.

De skenkte miod, de skenkte viin:
"Hvor er, Her Ole, brudgom min?"

"Her Oluf hand reed sig hen i lunde:
Hand proved sin hest og saa sine hunde."

Hun tog op det skarlagen rod:
Der laa Her Oluf og var dod.@

@ हेर ओलुफ करतो संचार जिकडे अन् तिकडे,
आणाया वऱ्हाड्यांना घोड्यावरून दौडे.

पऱ्या नाचताती हिरव्या हिरव्या रानात,
एल्फ राजकन्या देते त्याच्या हाती हात.

"सुस्वागतम् हेर ओलुफ, पळायला रे काय झालं ?
माझ्या संगे इथे येऊन नाचायला काय झालं ?"

"पण नाचणारही नाही मी अन् थांबणारही नाही
उद्या माझं लगीन आहे, मग इथं कसा राही ?"

(तळटीप पृष्ठ २२३ च्या पायथ्याशी पुढे चालू)

ही संहिता मला उहलँडच्या फारच सुगम संहितेपेक्षा अधिक आवडते. " हेर जॉन " ही आणखी एक संहिता याहूनही अधिक चांगली आहे.

एन्गल्स यांचे मार्क्स यांना पत्र,
तारीख २० जून १८६०,
जर्मन व डॅनिश भाषांत लिहिलेले

मार्क्स/एन्गल्स, वेर्के, खंड ३० वा, १९६४,
पृष्ठ ६५-६७

चान्सोन दे रोलां

उपलब्ध असलेल्या जुन्यात जुन्या प्रॉव्हेन्कल कविता इ. स. ११०० च्या काळातल्या आहेत, पण त्याच्याही अगोदर काव्यरचनेचे प्रयोग झालेले होते यात शंका नाही. क्रमाक्रमाने संख्याबळ वाढत असलेल्या दस्तऐवजांच्या मदतीने पॉलीन पॅरिसने असे प्रत्यंतर आणून दिले आहे, की फॅरियेलच्या मताच्या विरोधात, महाकाव्य प्रथम उत्तर फ्रान्समध्ये उदयास आले आणि तिथून त्याचा दक्षिण फ्रान्समध्ये प्रसार झाला (पृष्ठ ३४२); (la date est certaine (तारीख निश्चित आहे. –संपादक) कारण तेलेल्लेफेरने " चान्सोन दे रोलां "चे गायन हेस्टिंग्जनजीक केले होते;

(तळटीप पृष्ठ २२२ वरून पुढे चालू)

" अरे ऐक ना हेर ओलुफ, माझ्या संगे नाच
देईन बक्षीस तुला मी दोन सोन्याचे टाच.

" शर्ट शुभ्र तेजस्वी आहे किती छान
आई माझी बुडवून चांदण्यात वाढवील त्याची शान "

" पण नाचणारही नाही मी, अन् थांबणारही नाही
उद्या माझं लगीन आहे, इथं कसा राही ! "

" अरे ऐक ना, हेर ओलुफ, माझ्यासंगे नाच
देईन तुला बक्षीस मी सुवर्णाची रास. "

" बेऊन जाईन आनंदानं सोनं तुझं बाई,
पण नाचायची मात्र मला हिंमत होणार नाही. "

(तळटीप पृष्ठ २२४ च्या पायथ्याशी पुढे चालू)

आता असे प्रस्थापित झाले आहे की याची उर्वरित, बहुधा काहीशी विस्तारित संहिता पहिल्या धर्मयुद्धाच्या पूर्वी अस्तित्वात होती. संपादक फ्रान्सिस्क्वे मायकेल, पॅरिस, १८३७, आणि एफ. गेनिन, पॅरिस, १८५०. लेखक आहे थेओरूल्डे (टुरोल्डुस). फ्रान्सचे ऐक्य, शार्लमेनच्या व्यक्तित्वामध्ये प्रातिनिधिक स्वरूप प्राप्त झालेले, म्हणजे ही काल्पनिक सरंजामी राजेशाही, या चान्सोनमध्ये वर्णिलेली आहे; परंतु लोककथांच्या कॅरोलिन्जियन गटाचे नंतरचे कवी, राजेशाहीचे खऱ्या स्वरूपात पुनरुज्जीवन झालेल्या काळातले हे कवी, स्थानिक वीरांचे वर्णन करतात आणि विशेषेकरून 'फिल्स आयमोन' या कवितेत मध्यवर्ती सत्ता जी सरंजामी राजेशाही, तिच्याशी झालेल्या संघर्षाचे वर्णन करतात. (पृष्ठ ३४५-४६).

फ्रेडरिक एन्गल्स, फ्रान्स आणि जर्मनी यांच्या इतिहासाचे साहित्य,
मार्क्स/एन्गल्स Uber kanst und Literatur.
खंड १ ला, बर्लिन, १९६७, पृष्ठ ३३३.

(तळटीप पृष्ठ २२३ वरून पुढे चालू)

"अन्, अरे हेर ओलुफ, तू जर नाचणार नाहीस,
आजारपण अन् प्लेग बध लागेल तुझ्या राशीस."

अन् मग तिने स्पर्श केला त्याच्या छातीला.
कळ आली, कधी नव्हती आली अनुभवाला.

अर्धी शुद्ध गेली त्याची, तिने त्याला घोड्यावर बसवलाः
म्हणालीः "जा आता तुझ्या नवरीला भेटायला."

आला तो घराशी कसाबसा आपल्या,
आई तिथे उभी त्याची झाली घाबऱ्या घुबऱ्या.

"सांग मला चटकन बाळा, काय झालं तुला?
तेज नाही, चेहरा कां रे असा तुझा उतरला?"

"तेज नाही, उतरलेला चेहरा का नाही होणार?
एल्फ राजाच्या राज्यातून मी आलोय म्हणून होणार."

"ऐक बाळा, माझ्या लाडक्या, करू आता काय?
वधूला रे तुझ्या मी सांगू आता काय?"

"सांग तिला गेलो आहे अरण्यात दाटी
घोड्याला अन् कुत्र्याला सराव देण्यासाठी."

(तळटीप पृष्ठ २२५ च्या पायथ्याशी पुढे चालू)

प्रॉव्हेन्कल साहित्य

१

"दक्षिण फ्रान्समधील जनता ही, मध्ययुगामध्ये, आता पोलिश लोक रशियनांच्या जितके नजीक आहेत, त्यांच्यापेक्षा उत्तर फ्रान्समधील जनतेच्या अधिक नजीक नव्हती. मध्ययुगामध्ये दक्षिण फ्रान्सवासीयांना सर्वसाधारणपणे प्रॉव्हेन्कल असे म्हणत असत आणि या लोकांचा "उच्च विकास" झालेला होता इतकेच नव्हे, तर यांच्याकडे युरोपियन विकासाचे नेतृत्व देखील होते. सगळ्या आधुनिक राष्ट्रांमध्ये साहित्यिक भाषा सर्वप्रथम असलेले असे हे लोक होते. त्यांची काव्यसंपदा सगळ्या रोमान्स (लॅटिनोद्भव भाषिक) लोकांमध्ये इतकेच नव्हे तर इंग्रजांमध्ये व जर्मनांमध्ये देखील त्या काळी अतुलनीय असा आदर्श मानली जात असे. सरंजामी स्त्री-दाक्षिण्याच्या बाबतीत कॅस्टिलियन्स व उत्तर फ्रान्सचे रहिवासी आणि इंग्लंडचे नॉर्मन लोक यांच्याशी त्यांची स्पर्धा चालत असे आणि उद्योगधंदे व व्यापार यांच्या बाबतीत ते इटालियनांच्या बरोबरीचे असत. त्यांनी "मध्ययुगीन जीवनाचे" एक उपांग "तेजस्वी रीतीने" विकसित केले इतकेच नव्हे, तर मध्ययुगांच्या काळयाकुट्ट अंधारात प्राचीन ग्रीक संस्कृतीचे तेजःपुंज स्वरूप देखील निर्माण केले."

कार्ल मार्क्स आणि फ्रेडरिक एन्गल्स,
"फ्रँकफुर्ट असेंब्लीतील चर्चा आणि पोलंडचा प्रश्न,"
मार्क्स आणि एन्गल्स, संकलित ग्रंथ, खंड ७ वा, मॉस्को, १९७६

(तळटीप पृष्ठ २२४ वरून समाप्त)

दुसऱ्या दिवशी तांबडे नव्हते फुटले तोवर आली
वधू, घेऊन लवाजमा, दारी उभी राहिली.

त्यांनी केली तयारी, त्यांनी भरले मद्य-प्याले.
"हेर ओलुफ, माझे नवरोजी कुठं आहेत गेले?"

"इथून गेला दौडत तो अरण्यात दाटी,
घोड्याला अन् कुत्र्याला सराव देण्यासाठी."

वधूने उचलला लाल पडदा, डोकावले आत,
हेर ओलुफ होता तिथे, परी जीव नव्हता त्याच्यात.

(ॲलेक्स मिलरकृत इंग्रजी अनुवादावरून)

२

नवव्या शतकामध्ये—नवी फ्रेंको-रोमान्स भाषा इतकी विकसित झालेली होती की Vulgate [१०३] चे भाषांतर कार्य चालू करणे आवश्यक झाले; हा मुद्दा तूर्स (८१३), मेन्झ (८४७) आणि आर्लेस (८५१) येथील कौन्सिलांपुढे चर्चेला आला. फ्रेंच भाषेच्या जास्तीत जास्त जुन्या दस्तऐवजांपैकी दोन असे आहेत : बो एथिअस विषयक कवितेचा अनुवाद (नववे शतक) आणि Waldenses [१०४] ची एक कविता; ही कविता रेनुआर्दने (troubadours च्या इतिहासकाराने) फार महत्त्वाची मानली. --दक्षिण फ्रान्समधील धर्मगुरु बायबलविषयक काव्यरचना करू लागले. आणि बायबलच्या विभागांचे बिनचूक अनुवाद कवितावद्ध स्वरूपात करू लागले. अकराव्या शतकाइतक्या अगोदरच्या काळात Books of Samuel आणि Books of Kings यांचे अनुवाद उपलब्ध होते. या दोहोंना Vulgate मध्ये four books of kings अशी संज्ञा आहे; (निधर्मी प्रॉव्हेन्कल) कवींच्या कवितेला तोडीस तोड म्हणून बायबलविषयक कविता निर्माण करायचा हा प्रयत्न असल्याचे दिसते.

कार्ल मार्क्स, "श्लॉसरकृत जर्मन जनतेसाठी
जगाचा इतिहास" या ग्रंथातील कालक्रमवार उतारे

मार्क्स / एन्गल्स, Uber Kunst und Literatur,
खंड १ ला, बर्लिन, १९६७, पृष्ठ ३३१

स्त्री-दाक्षिण्ययुक्त प्रेम-काव्ये

आधुनिक लैंगिक प्रेम ज्यातून विकसित होऊ शकत होते असा कुटुंबसंस्थेचा एकमेव ज्ञात प्रकार म्हणजे एकपत्नीव्रत हाच होता, तरी देखील हे प्रेम पतिपत्नींचे परस्पर प्रेम या नात्याने सर्वस्वी किंवा प्रामुख्याने देखील याच प्रकारांत विकसित झाले असा यांतून निष्कर्ष निघत नाही. पुरुषाच्या वर्चस्वाखालील काटेकोर एकपत्नीव्रती विवाह संस्थेचे एकंदर स्वरूपच ही गोष्ट विफल करून राहिले. ऐतिहासिक दृष्ट्या क्रियाशील असलेल्या सगळ्या वर्गांमध्ये, म्हणजेच सगळ्या राज्यकर्त्या वर्गांमध्ये विवाह संस्था ही जुळविलेल्या लग्नांच्या काळापासून जशी होती तशीच राहिलेली आहे—म्हणजे आईवापांनी जमविलेली सोईची बाब होऊन राहिलेली आहे. आणि लैंगिक प्रेमाचा पहिला प्रकार जो ऐतिहासिक दृष्ट्या आसक्ति म्हणून उदयास येतो, आणि ही आसक्ति धारण करायचा हक्क कोणत्याही व्यक्तीला (किमानपक्षी राज्य-

कर्त्या वर्गातल्या व्यक्तीला) आहे, ती ही आसक्ति लैंगिक प्रेरणेचा सर्वोच्च प्रकार म्हणून, आणि नेमके हेच तिचे खास उपलक्षण असते, हा या आसक्तीचा पहिला प्रकार म्हणजे मध्ययुगातील स्त्रीदाक्षिण्ययुक्त प्रेम हा आहे, मात्र हे पतिपत्नींचे प्रेम अजिबात नव्हते. उलट पक्षी त्याच्या अभिजात स्वरूपांत ते प्रॉव्हेन्कल लोकांमध्ये व्यभिचार म्हणूनच पूर्णत्वाने वावरते. या व्यभिचाराची गाणी त्यांच्या कवींनी गाइलेली आहेत. सरदार प्रेयसीच्या--म्हणजे दुसऱ्याच्या पत्नीच्या— समवेत कसा पहुडलेला आहे--आणि पहारेकरी बाहेर पहारा देत कसा उभा आहे आणि तांबडे फुटायच्या सुमारास (albas) तो त्याला कशी साद घालतो आहे, म्हणजे कुणाच्या नजरेस न पडता त्याला कसे निसटून जायला मिळते--याचे रसभरित वर्णन या गाण्यांमध्ये केलेले असते. वियोगाचा प्रसंग हे सर्वोच्च रसनिष्पत्ति करणारे या गाण्यांतले प्रकरण असते. उत्तरेकडील फ्रेंच लोकांनी त्याचप्रमाणे बहादुर जर्मनांनी देखील कवितेची हीच शैली अंगिकारली आणि तिच्याशी मिळत्या जुळत्या अशा स्त्री-दाक्षिण्ययुक्त प्रेमाच्या रीतींचा अवलंबही केला; आणि याच सूचक विषयावरील उषेची तीन सर्वोत्तम गाणी आमचा स्वतःचा वृद्ध कवि वूल्फरॅम फॉन एश्चेनबाच याने मागे ठेवलेली आहेत आणि त्याच्या तीन प्रदीर्घ वीररसात्मक कवितांपेक्षा मला हीच जास्त आवडतात. १०५

फ्रेडरिक एन्गल्स, कुटुंबसंस्था, खासगी मालमत्ता आणि राज्यसंस्था यांचा उगम

मार्क्स आणि एन्गल्स, निवडक ग्रंथ, खंड ३ रा, मॉस्को, १९७३, पृष्ठे २४३-४४.

इंग्लंडमधील शेतकऱ्यांचे समतावादी विचार.
जॉन बॉल.
विल्यम लँगलँडकृत " नांगऱ्या पियर्स याचे गाऱ्हाणे "

तहनाम्यानंतर १०६ लगेच जॉन बॉल याला त्याचे उपदेशपाठ ऐकायला सतत बीस वर्षे श्रोते मिळतात. दरबारी फ्रोइसार्ट याला " केंट परगण्यातला वेडा धर्मगुरु " म्हणतो. या धर्मगुरूला पोपचा मनाई हुकूम मिळतो, तुरुंगवास घडतो, तरी देखील केंट परगण्यांतल्या स्मशानभूमींमध्ये याच्या सभोवार दणगट शेतकरी जमा झालेले असतात आणि हे त्याचे श्रोते असतात.

जॉन बॉल याने आवाहनपूर्वक म्हटले आहे : "सज्जन हो, जोपर्यंत मालावर समाइक मालकी नाही, जोपर्यंत शेतकरी व प्रतिष्ठित लोक असा भेदभाव आहे, तोपर्यंत इंग्लंडचे कधीही भले होणार नाही. आपण ज्यांना सरदार म्हणतो, ते कोणत्या हक्काने आमच्यापेक्षा अधिक मोठे लोक आहेत ? कोणत्या आधारावर ते याला लायक आहेत ? ते आमच्यावर भूदासशिरी का लादतात ? आदम आणि ईव्ह हेच जर आम्हा सगळ्यांचेच आईबाप आहेत, तर आमच्यापेक्षा ते अधिक चांगले असल्याचे कसे म्हणू शकतात किंवा सिद्ध करू शकतात ? त्यांच्यासाठी ते आम्हाला श्रम करायला लावतात आणि या कमाईतून ते ऐटीत खर्च करतात, असे जर नसते तर आमच्याहून अधिक चांगले असल्याचे त्यांना म्हणवून घेता आले असते का ? त्यांच्या अंगावर मखमली कपडे असतात, ऊबदार फर आणि एर्माइन ते वापरतात, आणि आमच्या अंगावर लक्तरे असतात. त्यांना मद्य आणि मसाले आणि शुभ्र ब्रेड मिळते; आणि आम्ही ओटच्या रोट्या खातो व नुसतेच पाणी पितो. त्यांना फुरसत असते, आणि सुंदर घरे असतात; आमच्या वाट्याला दुःख आणि श्रम असतात, शेतातून वारा व पाऊस असतो आणि असे असूनही आमच्या जिवावर आणि आमच्या श्रमावर हे लोक आपला दर्जा संभाळून असतात."

लोकप्रिय यमकयुक्त काव्यपंक्तीत समतावादी सिद्धान्ताचा अर्क वस्तुतः साठवलेला आहे. ग्रीन कवी म्हणतो :

> "आदम जेव्हा डुंबत होता आणि ईव्ह सूत कातत होती
> त्या वेळी सभ्यता कोणाच्या घरी पाणी भरत होती ?"

विल्यम लँगलँड कृत "नांगऱ्या पियर्स याचे गाऱ्हाणे" आणि दरबारी चॉसरच्या कँटरबरीच्या कथा यांच्या दरम्यानचा साम्यभेद पारखून बघा. (लँगलँड याला त्याच्या उंच अंगकाठीमुळे "लाँग बिल" असे टोपण नाव मिळालेले होते, हा बहुधा श्रॉपशायरमध्ये जन्मलेला असावा, आणि तिथल्याच शाळेत शिकून त्याला खालच्या दर्जाच्या धर्मगुरूची दीक्षा मिळालेली असावी. आणि तिथून लवकरच त्याने लंडनला प्रयाण केले असावे, इत्यादि.)

कार्ल मार्क्स, "इचलॉसेरकृत
जर्मन जनतेसाठी जगाचा इतिहास या ग्रंथांतील
कालानुक्रमवार उतारे"
इंग्रजी व जर्मन भाषेत लिहिलेले

मार्क्स/एन्गल्स Uber kunst und Literatur,
खंड १ ला, बर्लिन, १९६७, आन्मेर्क १९६

जर्मन फोक्सबुखेर @

एखादे पुस्तक लोकप्रिय असणे, जर्मन जनतेसाठी हे पुस्तक असणे, ही त्या पुस्तकाची मोठीच शिफारस नव्हे काय ? असे असूनही असल्या पुस्तकाच्या बाबतीत बऱ्याच गोष्टींची अपेक्षा करण्याचा हक्क आम्हाला मिळालेला असतो; त्याने सगळ्या समंजस गरजा भागविल्या पाहिजेत आणि त्याचे मूल्य प्रत्येक बाबतीत निर्विवाद असले पाहिजे. लोकप्रिय पुस्तकाची कामगिरी म्हणजे दिवसाचे कष्ट उपसून दमून भागून संध्याकाळी घरी परत आलेल्या शेतकऱ्याला त्याने त्याच्या काबाडकष्टांचा विसर पाडला पाहिजे, त्याच्या ओसाड रानाचे परिवर्तन त्याने सुगंधी गुलाब पुष्पांच्या बगीच्यात केले पाहिजे; कारागिराचा कारखाना व त्याच्या कंगाल खटपट्याचा कोंदट पोटमाळा यांचे रूपान्तर कवितेच्या विश्रामध्ये करणे, सोनेरी राजवाड्यामध्ये करणे, हे या पुस्तकाचे काम असते; आणि सुंदर राजकन्येच्या रूपात त्याच्या दणकट प्रेयसीला सादर करणे हे त्या पुस्तकाचे काम असते; परंतु बायबल-समवेत या पुस्तकाचे आणखीही एक कार्य असते. ते म्हणजे वाचकाच्या नैतिक जाणिवेला स्पष्टता आणणे, त्याच्या सामर्थ्याची, त्याच्या हक्कांची, त्याच्या स्वातंत्र्याची त्याला जागीव करून देणे, त्याचे धैर्य आणि देशप्रेम जागृत करणे, हे ते कार्य.

सर्वसाधारणपणे सांगायचे म्हणजे, लोकप्रिय पुस्तकाच्या बाबतीत ज्या गुणांची रास्त अपेक्षा करता येते ते गुण म्हणजे समृद्ध काव्यमय आशय, सुदृढ विनोद, नैतिक शुद्धता, आणि लोकप्रिय जर्मन पुस्तकाच्या बाबतीत सामर्थ्यशाली, विश्वासू जर्मन बाणा, —हे गुण सर्व काळी तसेच राहिलेले असतात. आणि याच्या जोडीला हे पुस्तक आपल्या युगाशी जुळणारे असले पाहिजे अशी अपेक्षा करायचा देखील आम्हाला हक्क आहे; तसे ते नसेल तर ते जनतेसाठीचे पुस्तक राहणार नाही. सध्याच्या काळाकडे जर आपण विशेषेकरून नजर टाकली, स्वातंत्र्यासाठी चाललेल्या लढ्याकडे नजर टाकली, हा लढा आपली सगळी व्यक्त रूपे कशी निर्माण करतो याच्याकडे जर आपण नजर टाकली, तर आपल्याला काय दिसते ? सनदशीरपणाचा विकास, सरदारांच्या दडपणाचा प्रतिकार, धर्मिष्ठपणाविरुद्ध बुद्धिमत्तेचा लढा, उदास-वाण्या संन्यासीपणाच्या अवशेषांविरुद्ध आनंदीपणाचा लढा,—या प्रवृत्तींची सत्यता व समंजसपणा अशिक्षित व्यक्तीला दाखवून द्यायला लोकप्रिय पुस्तकाने मदत करायला हवी अशी अपेक्षा करण्यात चुकीचे काय असू शकते हे मला तर दिसत नाही. मात्र अर्थात या गोष्टी थेट अनुमानाच्या रूपाने दाखवायच्या नाहीत; परंतु कोणत्याही परिस्थितीत धर्मिष्टपणाच्या सरदारशाहीपुढे लाचारी व लाळघोटेपणा करायला अशा

@ जर्मन फोक्सबुखेर ही त्याच कालखंडातल्या इंग्रजी स्वस्त पुस्तकांसारखी असत. म्हणजे बहुजनसमाजासाठी लिहिलेली स्वस्त लोकप्रिय पुस्तके, लोककथा, गोष्टी, कविता, वगैरे. — संपादक

पुस्तकाने उत्तेजन देता कामा नये. तसेच अगोदरच्या काळातल्या चालीरीती आज पाळणे हास्यास्पद, किंबहुना चुकीचे असते, म्हणून अशा चालीरीतींना लोकप्रिय पुस्तकांत थारा मिळता कामा नये हे तर सांगायलाच नको.

तसेच जी पुस्तके आता खरीखुरी लोकप्रिय जर्मन पुस्तके ठरलेली आहेत आणि सर्वसाधारणपणे या सदरांत गणली जातात, त्यांचा देखील या तत्त्वांनुसार आपण विचार करायला हवा, आणि केला पाहिजे. ही पुस्तके अंशतः मध्ययुगीन जर्मन किंवा रोमान्स कवितेच्या पैदाशी असतात, अंशतः लोकांच्या चुकीच्या समजुती असतात. वरिष्ठ वर्गांनी अगोदरच्या काळात त्यांचा तिरस्कार व उपहास केलेला असतो; आणि अद्‌भुतरम्यतावादी लेखकांनी त्यांना शोधून काढून ती जुळती करून घेतलेली असतात, त्यांचा गौरव देखील केलेला असतो हे आपल्याला ठाऊक आहे. परंतु अद्‌भुतरम्यतावादाने केवळ त्यांचा काव्यमय आशयच तेवढा विचारात घेतलेला असतो, आणि लोकप्रिय पुस्तके म्हणून त्यांचे महत्त्व ध्यानी घ्यायला तो किती असमर्थ असतो हे त्यांच्या बाबतीत गोर्रेसने केलेली कामगिरी दर्शविते.[१०८] गोर्रेसने अगदी अलीकडे दर्शविले आहे तद्‌नुसार, तो आपल्या सगळ्याच निर्णयांना प्रत्यक्षात काव्यरूप देतो. असे असूनही या पुस्तकांविषयांचे नेहमीचे मत अजूनही त्याच्या कामगिरीवर आधारलेले असते आणि मार्बाच तर आपल्या स्वतःच्या प्रकाशनाच्या निवेदनात याचा उल्लेख देखील करतो. मार्बाचने गद्य रूपांत आणि सिम्रॉकने गद्यपद्य रूपांत केलेली या पुस्तकांची तीन नवी दुरुस्त प्रकाशने पुन्हा त्यातली दोन तर जनतेसाठी तयार केलेली असल्यामुळे, विचारात घेतल्यास त्यात वापरलेल्या साहित्याची, त्याच्या लोकप्रियतेच्या मूल्याच्या दृष्टिकोनातून आणखी एकदा बारकाईने तपासणी करायला हवी.

मध्ययुगातील कवितेविषयीची मते जोपर्यंत फारच वेगवेगळी आहेत, तोपर्यंत या पुस्तकांच्या काव्यविषयक मूल्याचे मापन व्यक्तिगत वाचकावर सोपविणे भाग आहे; परंतु ती खरोखरी अस्सल काव्यमय आहे हे साहजिकच कोणीही नाकारणार नाही. लोकप्रिय पुस्तकांच्या कसोटीला ती उतरू शकत नसली तरीदेखील त्यांच्या काव्यात्म आशयाला संपूर्ण मान्यता दिलीच पाहिजे; होय, शिलरच्या शब्दात सांगायचे म्हणजे :

अमर गाण्यामधि जे चिरंजीव आहे,
जीवनामाजी त्या मरण अटळ आहे, @

म्हणून जे जनतेसाठी टिकवून ठेवणे अशक्य असल्याचे सिद्ध होत असेल ते नवे रूप देऊन कवितेसाठी राखून ठेवायला अनेक कवींना आणखी एक कारण मिळायचा संभव असतो.

@ शिलरकृत Die Gotter Griechenlands या कवितेतून उद्‌धृत-संपादक

मुळात जर्मन आणि रोमान्स असलेल्या कथांच्या दरम्यान एक फारच महत्त्वाचा फरक आहे. जर्मन कथा अस्सल लोककथा आहेत, आणि त्यांमध्ये पुरुषाला अग्रस्थानी ठेवलेले आहे; रोमान्स कथांमध्ये स्त्रीला प्राधान्य आहे, म्हणजे एक तर दुःख सोसणारी म्हणून (जेनोवेफा) किंवा प्रेम करणारी म्हणून, आणि आपल्या प्रेमात देखील आसक्तीविषयी उदासीन असलेली अशी. याला फक्त दोन अपवाद आहेत. Die Himonskinder आणि Fortunat. दोन्ही रोमान्स, परंतु लोककथा असलेल्या; याच्या उलट Octavianus, Melusina इत्यादि दरबारी काव्याच्या पैदाशी आहेत आणि त्या केवळ मागाहून गद्यरूपांत जनतेपर्यंत पोचलेल्या आहेत.

—विनोदी कथांपैकी Saloman und Morolf ही एकच तेवढी थेट जर्मन उगम असलेली नाही, तर याच्या उलट Eulenspiegel, Die Schildbiirger, इत्यादि निर्विवादपणे आमच्याच आहेत.

या सगळ्या पुस्तकांचा विचार जर आपण साकल्याने केला आणि सुरुवातीला सांगितलेल्या तत्त्वांचे निकष त्यांना लावले, तर एक गोष्ट स्पष्ट होते. ती म्हणजे ही की ती एकाच बाबतीत या निकषांची परिपूर्ती करतात. म्हणजे त्यांच्यामध्ये काव्य आणि विनोद भरपूर प्रमाणात आहे आणि त्यांचे रूप सर्वसाधारणपणे कमीत कमी शिकलेल्यालासुद्धा सहज समजण्याजोगे आहे. परंतु इतर बाबतींत ती फारच असमाधानकारक आहेत. काही तर संपूर्णपणे विरोधी आशय असलेली आहेत, इतर काही केवळ अंशतः ग्राह्य आहेत. ती मध्ययुगाच्या पैदाशी असल्यामुळे आजच्या युगाच्या खास गरजांची परिपूर्ती करण्यात ती साहजिकच पूर्णपणे असमर्थ ठरतात. म्हणून साहित्याच्या या शाखेचा बाह्य समृद्धपणा कितीही असला, टिएक व गोर्रेस हे हिचा कितीही गाजावाजा करत असले, तरी त्यांच्यामध्ये बऱ्याच त्रुटी आहेत; हा फरक कधी काळी भरून काढायचा आहे किंवा नाही, हा वेगळा प्रश्न आहे आणि याचे उत्तर देण्याची जबाबदारी मी स्वतःकडे घेणार नाही.

आता व्यक्तिगत प्रकरणे विचारात घेऊ या. यांतले सगळ्यांत जास्त महत्त्वाचे पुस्तक म्हणजे निःसंशयपणे Geschichte vom gehornten siegfried. —मला हे पुस्तक आवडते; ही कथा सर्वगुणसंपन्न आहे; हिच्यातले काव्य अत्यंत बहारदार आहे. कधी ते अत्यंत बालसुलभवृत्ती दर्शविते, तर कधी त्यात अत्यंत सुंदर असा करुणेची झालर असलेला विनोद आहे; त्यात बुद्धिमत्तेची चमक आहे—दोन मेकडांच्या दरम्यानच्या झगड्याचा तो अमोल प्रसंग कुणाला ठाऊक नाही! या पुस्तकाला दानत आहे, साहसी, रसरशीत, तारुण्यसुलभ बाणा आहे, प्रत्येक तरुण भटक्या कारागिराला अतःपर जरी राक्षसांशी लढायचे नसले तरीदेखील यातून कित्ता घ्यायला मिळू शकतो; आणि यांतले मुद्रणदोष—माझ्या पुढ्यातल्या (कलोन) आवृत्तीमध्ये[१०८] ते बरेच आहेत—ते आणि त्यांतली विरामचिन्हे एकदा ठीक केल्यावर श्वाब आणि मार्बाच यांची पुस्तके या अस्सल लोकप्रिय शैलीपुढे तुलनेत

टिकणार नाहीत. जनतेनेदेखील त्यांच्याविषयी कृतज्ञता दर्शविली आहे. हे लोकप्रिय पुस्तक मला जितके वेळा आढळले, तितक्या वेळा अन्य आढळलेले नाही.

Herzog Heinrich der howe --दुर्दैवाची गोष्ट अशी की या पुस्तकाची जुनी प्रत मला हस्तगत करता आलेली नाही; एइनबेक १०९ येथे छापलेल्या नव्या आवृत्तीने जुन्या आवृत्तीची जागा संपूर्णपणे घेतलेली दिसते. याची सुरुवात ब्रुन्सविक घराण्याच्या वंशावळीपासून होते. ही वंशावळ १७३५ सालाइतकी मागे जाते; यानंतर हेर्झोग हाइनरिख याचे ऐतिहासिक चरित्र आणि लोकप्रिय लोककथा दिलेली आहे. या पुस्तकात अशी देखील एक कथा आहे की जी हाइनरिख डेर लोवे याच्या लोकप्रिय लोककथेसारखीच बुइल्लोनचा गॉडफ्रे याच्याविषयीची कथा सांगितलेली आहे. जिरासिम नामक पॅलेस्टिनियन महंत याच्याशी संबंधित अशी ॲन्ड्रोनिकस या गुलामाची ही कथा आहे आणि हिचा शेवट बराचसा बदललेला आहे, आणि नव्या अद्‌भूतरम्यतावादी पंथाची एक कविता आहे. या कवितेच्या लेखकाचे नाव मला आठवू शकत नाही. तीत सिंहाची कथा पुन्हा सांगितलेली आहे. अशा प्रकारे ज्या लोककथेवर हे लोकप्रिय पुस्तक आधारलेले आहे ती कथा चलाख प्रकाशकाच्या औदार्याने सजावट करण्यापायी नाहीशीच होते. खुद्द ही लोककथा फारच सुंदर आहे, परंतु बाकीच्या पसाऱ्यात मुळीच गोडी नाही; ब्रुन्सविकच्या इतिहासाची पर्वा स्वाबियनांना कशी असणार? आणि लोकप्रिय पुस्तकाच्या साध्यासुध्या शैलीनंतर शब्दबंबाळ आधुनिक रोमान्सला जागा कुठे असणार? पण ती देखील नाहीशी झालेली आहे; कथेचा रचनाकार प्रतिभासंपन्न माणूस आहे. गेल्या शतकाच्या अखेरीचा धर्मगुरु किंवा शिक्षक म्हणून मला तो दिसतो, आणि तो असे लिहितो :

"अशा प्रकारे प्रवासाचे उद्दिष्ट गाठण्यात आले, पवित्र भूमि त्यांच्या नजरेसमोर दिसू लागली, धार्मिक इतिहासाच्या अत्यंत ठळक आठवणी जिच्याशी निगडित आहेत अशा त्या भूमीवर त्यांनी पाय ठेवले! ज्या पवित्र साधेपणाने या क्षणाकडे आतुरतेने लक्ष लावलेले होते, त्याचे परिवर्तन इथे उत्कट भक्तीमध्ये झाले, इथे त्याला संपूर्ण समाधान गवसले आणि ईश्वराच्या ठायी कमालीचा आनंद झाला."

लोककथेला तिची जुनी भाषा पुन्हा मिळवून द्या, पुस्तकाला पूर्तता आणण्यासाठी इतर अस्सल लोककथांची भर घाला, आणि हे पुस्तक जनतेकडे धाडून द्या, आणि ते त्याची काव्यात्मता सजीव ठेवील; परंतु आहे या स्वरूपात ते जनतेत प्रसृत होण्याच्या लायकीचे नाही.

Herzog Ernst, --या पुस्तकाचा लेखक मोठाच कवी नव्हता, कारण याला सगळे काव्यमय घटक पौर्वात्य परीकथांमध्ये सापडले. पुस्तक चांगले लिहिलेले आहे आणि जनतेला फारच मनोरंजक वाटेल; परंतु एवढ्यावरच सगळे भागले : त्यात असलेल्या कल्पनाचित्रांच्या वास्तवतेवर अतःपर कुणीच विश्वास ठेवणार नाही; म्हणून ते फेरबदल न करता जनतेच्या हाती राहू देता येते.

आता मी जर्मन जनतेने निर्माण केलेल्या व विकसित केलेल्या दोन लोककथांचा विचार करतो. कोणत्याही जनतेला अभिमानास्पद वाटावे असे हे अत्यंत सखोल लोककाव्य आहे. म्हणजे Faust व Der eurge Jade या त्या दोन लोककथा. त्या अर्थांग आहेत; कोणताही कालखंड त्यांचा आशय न बदलता त्यांना नव्या स्वरूपात सादर करू शकतो; आणि गटेनंतर फाऊस्टच्या लोककथेची नवी रूपे होमरनंतरच्या इलियड्सच्या धर्तीची असली तरी ती अजूनही आपल्याला नवी उपांगे उघड करून दाखवितात. नंतरच्या काळातील कवितेच्या लेखी आहासुक्रुस या लोककथेचे महत्त्व तर सांगायलाच नको. परंतु या लोककथा लोकप्रिय पुस्तकांमध्ये कोणत्या स्वरूपात दिसतात हे पाहण्याजोगे आहे! मुक्त कल्पनाशक्तीच्या पैदाशी म्हणून त्या संकल्पिलेल्या नसतात. तर गुलामी, खुळ्या समजुतीची अपत्ये म्हणून त्या संकल्पिलेल्या असतात.

भटक्या यहुद्यांविषयीचे पुस्तक तर बायबलचा आणि इतर शिळ्या लोककथांचा हवाला देऊन त्याचे समर्थन करू पाहणाऱ्या धार्मिक श्रद्धेची देखील अपेक्षा करते, खुद्द लोककथेचा अत्यंत वरवरचा भागच तेवढा त्यात समाविष्ट झालेला आहे, परंतु आहासुएरुस या यहुद्याबाबत एक फारच लांबलचक व कंटाळवाणा ख्रिस्तीधर्मीय उपदेशपाठ ते सादर करते. फाऊस्टविषयीच्या लोककथेला तर मामुली चेटकिणीच्या कथेची अवकळा आणलेली आहे आणि तीत मांत्रिकाच्या रासवट कथांनी तिची सजावट केलेली आहे; लोकप्रिय सुखान्तिकेतली जी काही अल्पस्वल्प काव्यात्मता टिकून राहिलेली आहे, ती जवळ जवळ पूर्णपणे नाहीशीच झालेली आहे. ही दोन पुस्तके कसलाही काव्यात्मक आनंद द्यायला असमर्थ आहेत इतकेच नव्हे, तर त्यांच्या सध्याच्या स्वरूपात ती जुन्या खुळ्या समजुतींना नक्कीच बळकटी आणतील व त्यांचे नव्याने आरोपण करतील; नाही तरी असल्या सैतानी कामगिरीकडून अन्य कशाची अपेक्षा करता येणार? लोककथेची व तिच्या आशयाची जाणीव देखील जनतेतून अजिबात लुप्तच होत असलेली दिसते; फाऊस्ट हा सामान्य मांत्रिकाहून अधिक काहीच नाही. आहासुएरुस हा बायबलमधील जुडाज इस्कॅरियॉटनंतरचा मोठ्यांत मोठा खलपुरुष याहून अधिक काहीच नाही असे मानले जात आहे. परंतु या दोन्ही लोककथा जर्मन जनतेसाठी वाचविणे आणि त्यांच्या अस्सल शुद्ध स्वरूपात त्या पुन्हा सादर करणे आणि त्यांचा सखोल अर्थ कमी शिकलेल्यांना देखील अजिबात न समजण्याजोगा राहणार नाही इतक्या स्पष्टपणाने त्यांचा आशय व्यक्त करणे, हे शक्य होणार नाही काय? मार्बाच व सिम्रॉक यांनी अजून या लोककथांना नवे रूप द्यायचे राहिलेले आहे; या प्रक्रियेत शहाणपणा दर्शवायची त्यांना सुबुद्धी होवो!

आमच्या पुढ्यात लोकप्रिय पुस्तकांची आणखी एक माला आहे. म्हणजे Eulenspiegel, Saloman und Morolf, Der Pfaff vom Kalenberge, Die Sieben Schwaben, आणि Die Schildburger ही विनोदी पुस्तके.

अशी माला फारच थोड्या अन्य राष्ट्रांनी पैदा केलेली आहे. खुसखुशीतपणा, रचना व कसब याची स्वाभाविकता, सुखभावी विनोद आणि त्याला तिखट तिरस्काराची सतत जोड दिलेली––म्हणजे लो फाजील खुनशी होऊ नये म्हणून––त्यातले ठसठशीत हास्यकारक प्रसंग–या सगळ्या गुणांच्या योगाने ही पुस्तके आमच्या बऱ्याचशा साहित्याला लाजेने खाली मान घालायला लावतील. Die Schildburger सारखे पुस्तक निर्माण करायला लागणारी पुरेशी कलकता सध्याच्या कोणत्या लेखकाच्या ठायी आहे! Die Sieben Schwaben यांच्या तुलनेत मूल्ट्ट याचा विनोद किती तरी रुक्ष दिसतो! अर्थात् असल्या गोष्टी पैदा करायला आमच्या काळापेक्षा अधिक निवांत काळ लागत होता. आमचा काळ म्हणजे एखाद्या अस्वस्थ धंदेवाल्याप्रमाणे अन्य कोणत्याही गोष्टीचा विचार करता येण्यापूर्वी आलेल्याला उत्तर द्यावे लागणाऱ्या महत्त्वाच्या प्रश्नाविषयी आपण सतत बोलत असतो,––या पुस्तकांच्या स्वरूपाविषयी सांगायचे म्हणजे त्यात जवळ जवळ मुळीच बदल करायला नको आहे, फक्त अधला मधला नीरस विनोदी चुटका व शैलीच्या विकृती तेवढ्या काढून टाकायला हव्यात. Eulenspiegel च्या कित्येक आवृत्त्यांवर प्रशियन सेन्सॉरचे शिक्के आहेत आणि त्या अगदी परिपूर्ण स्वरूपात नाहीत; थेट सुरुवातीलाच मार्शाचने फार सुंदर वुडकटमध्ये चित्रित केलेला एक रासवट चुटका जाग्यावर नाही.

यांच्याहून अगदी वेगळ्या प्रकारची मुळातली रोमान्स @ भाषातली तीन पुस्तके म्हणजे Genovefa, Greiseldis आणि Hirlanda या तीन कथा होत. यातल्या प्रत्येक कथेमध्ये स्त्री-नायिका आहे आणि ती दुःख भोगणारी स्त्री आहे; धर्माविषयी मध्ययुगाची जी वृत्ती होती तिचे चित्रण या कथा करतात आणि ते फारच काव्यमय रीतीने करतात; फक्त Genovefa आणि Hirlanda यांचे चित्रण भलतेच रूढ संकेतांनुसार आहे. परंतु आज जर्मन जनतेला यांच्याशी काय करायचे आहे? अर्थात् आपण जर्मन जनता ही ग्रिसेल्डिस असल्याची आणि संस्थानिक हे मार्क ग्राफ वाल्थर असल्याची कल्पना करू शकतो; पण मग या सुखान्तिकेचा शेवट या लोकप्रिय पुस्तकात जसा आहे त्याहून अगदी वेगळ्याच प्रकारचा करणे भाग पडेल; दोन्ही बाजूंना योग्य कारणांस्तव काही काही बाबतीत या तुलनेचा राग येईल. ग्रिसेल्डिस हे जर लोकप्रिय पुस्तक राहायचे असेल तर मला ते स्त्रियांच्या दास्यविमोचनासाठी उच्च जर्मन फेडरल असेंब्लीपुढे सादर झालेल्या अर्जाच्या स्वरूपात दिसते. परंतु अशा प्रकारच्या अद्भुतरम्य अर्जाचे स्वागत चार वर्षांपूर्वी कसे झाले १११ हे काही काही बाबतीत आपल्याला ठाऊक आहे, आणि यावरून मला असा मोठा प्रश्न पडतो की, मार्शाचची गणना मागाहून

@ The Telegraph fur Deutschland या वृत्तपत्रात मुळात "रोमँटिक" असा शब्द आहे, तो मुद्रणदोष आहे.—संपादक.

तरुण जर्मनांमध्ये [११२] कशी करण्यात आली नाही. जनतेने ग्रिसेल्डिस आणि जेनोव्हेफा यांच्या भूमिका पुरेसा दीर्घकाळ केलेल्या आहेत, आणि आता तिला रुचिपालट म्हणून सीगफ्रीड व रेइनाल्ड यांच्या भूमिका करू देत; परंतु तिला असे करायला लावायचा योग्य मार्ग म्हणजे या कमीपणा आणणाऱ्या जुन्या कथांचे कौतुक करणे हा तर नक्कीच नव्हे.

Kaiser Octavianus या पुस्तकाचा पहिला भाग त्याच वर्गातला आहे, परंतु दुसरा भाग योग्य अशा प्रेमकथांशी अधिक साम्य असलेला आहे. Helenaची कथा ही Octovianus चे नुसतेच अनुकरण आहे, किंवा कदाचित या दोन्ही कथा म्हणजे एकाच कथेचे दोन वेगवेगळे अवतार असतील. Octavianus चा दुसरा भाग हे सर्वोत्कृष्ट लोकप्रिय पुस्तक असून ते केवळ Siegfried चीच बरोबरी करू शकते; त्यांतला फ्लॉरेन्स व त्याचा पालक पिता क्लेमेन्ट्स यांच्या व्यक्तिरेखा सर्वोत्कृष्ट आहेत. तशीच क्लॉडियसचीही व्यक्तिरेखा आहे; टिएकला हे फार सोपे गेले.[११३] परंतु त्यात सामान्य रक्तापेक्षा सरदारी रक्त अधिक चांगले असते हा विचार अथपासून इतिपर्यंत ओतप्रोत भरलेला नाही काय? आणि हा विचार खुद्द जनतेच्या ठायी देखील आपल्याला कितीदा तरी आढळून येत नाही काय! हा विचार जर Octavianus मधून काढून टाकता येत नसेल—आणि मला वाटते ते अशक्यच आहे—आणि जिथे घटनात्मक जीवन उद्भवायचे असेल, तिथे हा विचार प्रथम काढून टाकलाच पाहिजे असे जर मला वाटत असेल, तर मग हे पुस्तक तुम्हाला हवे तितके काव्यमय राहू दे, cense Carthaginem esse delendam.@

मी उल्लेखलेल्या हालअपेष्टा व सहनशीलता दर्शविणाऱ्या शोककारी कथांच्या विरुद्ध आशय असलेल्या इतर तीन कथा प्रेमाचा गौरव करणाऱ्या आहेत. त्या म्हणजे Magelone, Melugina आणि Tristan या होत. मला Magelone ही कथा लोकप्रिय पुस्तक या नात्याने सगळ्यांत जास्त आवडते; Melusina मध्ये राक्षसी प्रसंग व अतिशयोक्तिपूर्ण कल्पनेच्या भराऱ्या आहेत. म्हणजे ही एक प्रकारची डॉन क्विक्झोट धर्तीची कथा आहे, आणि मला पुन्हा असे विचारणे भाग पडते की जर्मन जनतेला तिची जरूरच काय? याच्यावर कडी करणारी म्हणजे त्रिस्तान व इसोल्दे यांची कथा—हिच्या काव्यमय मूल्यावर मी आक्षेप घेणार नाही; कारण गॉट्फ्रियेड फॉन स्ट्रास्बुर्ग [११३] याने केलेला सुंदर अनुवाद मला आवडतो, तसे त्यात अधूनमधून कथनातले दोष आढळतात, तरीदेखील तो मला आवडतो—परंतु जनतेच्या हाती द्यायला याच्याहून कमी इष्ट असे अन्य कोणतेच पुस्तक नाही. अर्थात् स्त्रियांचे दास्यविमोचन या आधुनिक विषयाशी याचा अधूनमधून निकटचा संबंध येतो; एखादा कुशल कवी Tristan चे रूपांतर आज करायला लागेल तर ओढून-

---

@ माझे मत असे आहे की कार्थेजचा नाश केलाच पाहिजे. — संपादक

ताणून आणलेल्या व कंटाळवाण्या उपदेशपर काव्यरचनेच्या मोहात पडल्याखेरीज राहणार नाही. परंतु लोकप्रिय पुस्तकात हा प्रश्न गैरलागू ठरतो आणि एकंदर कथा व्यभिचाराचे समर्थन करण्याची हीन पातळी गाठते आणि असले पुस्तक जनतेच्या हाती राहू द्यावे किंवा नाही असा मोठाच आक्षेप येतो. दरम्यान हे पुस्तक जवळ जवळ अदृश्यच झाले आहे आणि त्याची एखादी प्रत क्वचितच आढळते.

Die Haimonskinder आणि Fortunat ही आपल्याला ज्यात पुरुष केन्द्रस्थानी पुन्हा दिसतो अशी दोन खरीखुरी लोकप्रिय पुस्तके आहेत. इथे फॉर्च्युनाटचा पुत्र अत्यंत आनंदी विनोदानिशी आपले साहसी लढे करतो, तर तिथे साहसी आव्हान, विरोधातील बेबंद खुमखुमी, शार्लेमेनच्या एकतंत्री जुलुमी सत्तेविरुद्ध तारुण्यसुलभ तडफेनिशी उभी ठाकते आणि आपल्याला सोसाव्या लागलेल्या अपमानांचा सूड खुद्द राजाच्या डोळ्यांदेखत देखील घ्यायला कचरत नाही. लोकप्रिय पुस्तकात अवश्यमेव असलेल्या अनेक उणीवा असला तारुण्यसुलभ बाणा आपल्याला दृष्टीआड करायला मोकळीक देतो; परंतु **Griseldis** मध्ये व त्याच्या सारख्या पुस्तकात तो सांपडतोय कुठे ?

शेवटची परंतु सगळ्यांत जास्त महत्त्वाची पुस्तके म्हणजे **Hundertjahnge Kalendar** ही प्रतिभाशाली निर्मिती, अतिशहाणा **Traumbuch** आणि हमखास यशस्वी **Gluksrad** आणि अशाच प्रकारची खुळ्या समजुतींची प्रजा. गोर्रेसच्या पुस्तकावर ज्याने सहज देखील नजर टाकली असेल त्याला या रद्दीचे समर्थन करायला तो कसले कंगाल शब्दच्छल करतो हे ठाऊक झालेले आहे. या सगळ्या रुक्ष पुस्तकांना प्रशियन सेन्सॉरच्या शिक्क्याचा बहुमान मिळालेला आहे. अर्थात ही बोर्नेच्या पत्रांसारखी [११४] क्रांतिकारकही नाहीत, आणि लोकांच्या मतानुसार **Wally** [११५] जसे अनैतिक आहे तशी अनैतिकही नाहीत. प्रशियन सेन्सॉर अत्यंत कडक असतात हे आरोप कसे चुकीचे आहेत हे यावरून आपल्याला दिसू शकते. असला कचरा जनतेच्या हाती राहू द्यावा किंवा नाही याबाबत अधिक शब्द व्यर्थ दवडायची मला मुळी जरूरच नाही.

उरलेल्या लोकप्रिय पुस्तकांबाबत काही एक सांगायची जरूरीच नाही; **Pontus, Fierbras,** इत्यादींच्या कथा, फार पूर्वीच नाहीशा झाल्या आहेत आणि अतःपर त्यांचा नामनिर्देश व्हायची त्यांची योग्यताच नाही. परंतु कवितेच्या हिताच्या दृष्टीने नव्हे, तर जनहिताच्या दृष्टीने हे साहित्य कसे अपुरे आहे हे या थोड्याशा टिपणांतून मी दाखवून दिले आहे असा मला विश्वास वाटतो. जे आवश्यक आहे ते म्हणजे हे की जुन्या शैलीला जरूर नसताना न डावलणारी अशी रूपान्तरे कसोशीने निवड केलेल्यातून केलेली असावीत आणि जनतेसाठी ती आकर्षक आवृत्त्यांतून सादर व्हावीत. जी टीकेपुढे टिकाव धरू शकत नाहीत अशी कोणतीही पुस्तके जबरदस्तीने काढून टाकणे हे सोपेही नाही आणि संयुक्तिकही

नाही; फक्त जे शुद्ध खुळ्या समजुतीवर आधारलेले असेल त्याला सेन्सॉरचा शिक्का नाकारण्यात यावा. इतर तशी आपोआपच नष्ट व्हायला लागलेली आहेत. **Grisldis** दुर्मिळ झालेले आहे, **Tristan** जवळ जवळ उपलब्धच नाही. अनेक क्षेत्रांमध्ये, उदाहरणार्थ बुपप्टीलमध्ये, एकही प्रत सापडणे शक्य नाही; इतर ठिकाणी म्हणजे कलोन, ब्रेमेन वगैरे ठिकाणी जवळ जवळ प्रत्येक दुकानदार शहराकडे येणाऱ्या शेतकऱ्यांसाठी आपल्या दर्शनी भागात या प्रती ठेवून राहिलेला आहे.

परंतु जर्मन जनतेला आणि यातल्या सर्वोत्तम पुस्तकांना कल्पक रूपान्तरांची जरूरी आहेच ना? अर्थात असली रूपान्तरे निर्माण करणे प्रत्येकाला जमण्याजोगे नाही; निवड करण्यासाठी लागणारी पुरेशी विमर्शक पात्रता व अभिरुची असलेले व जुनी शैली हाताळण्याचे कौशल्य असलेले फक्त दोनच लोक मला माहीत आहेत; ते म्हणजे **ग्रिम** बंधू. परंतु या कामासाठी लागणारा वेळ व प्रवृत्ति त्यांच्याकडे असेल का? मार्बाचचे रुपान्तरकार्य जनतेच्या लेखी अगदी गैरसोईचे आहे. तो जर थेट **Griseldis** पासून सुरुवात करीत असेल तर आपण कशाची आशा धरू शकतो? त्याच्या ठायी एकंदर विमर्शक दृष्टीचीच उणीव आहे, परंतु अजिबात आवश्यक नसलेली काटछाट करायला मोह त्याला आवरता येत नाही; आणि त्याने शैली देखील अगदीच रटाळ व नीरस करून ठेवलेली आहे— **Gehoruter Siegfried** याची व इतर सगळ्या लोकप्रिय आवृत्तींची तुलना त्याच्या रुपान्तराशी करून बघा. वाक्ये तोडून अलग केलेली आणि शब्दांचा क्रम बदललेला याखेरीज त्यात काहीच नाही. याचे एकमेव समर्थन म्हणजे मार्बाचच्या अंगी अन्य कसलीच स्वतंत्र शैली नसल्यामुळे आपण काही तरी स्वतंत्र लिहीत आहोत असा देखावा करण्याचा त्याचा सोस. लोकप्रिय पुस्तकांतले अत्यंत सुंदर उतारे बदलायचे आणि त्यात आवश्यक नसलेली आपल्या पदरची विरामचिन्हे घुसडायची, हे सगळे करायला अन्य कोणत्या गोष्टीने त्याला प्रवृत्त केले असणार? ज्याला लोकप्रिय मूळ संहिता ठाऊक नाही अशा कुणालाही मार्बाचच्या कथा अगदी छानच वाटण्याजोग्या आहेत; पण दोहोंची तुलना करताक्षणी आपल्या लक्षात येते की मार्बाचची एकमेव कामगिरी म्हणजे मुद्रणदोष दुरुस्त करणे एवढीच आहे. त्याचे वूडकट गुणवत्तेत कमी किंवा अधिक असा मोठा फरक असलेले आहेत. --सिंम्राकचे रूपान्तर त्याच्यावर अभिप्राय देण्याइतके अजून पुरेसे पुढारलेले नाही; परंतु त्याच्या प्रतिस्पर्ध्यापेक्षा त्याच्यावर माझा अधिक विश्वास आहे. त्याचे वूडकट देखील मार्बाचच्यापेक्षा सुसंगतपणे अधिक चांगले आहेत.

ही जुनी लोकप्रिय पुस्तके, त्यांचा तो जुन्या धर्तीचा सूर, त्यांचे मुद्रणदोष आणि त्यांचे सुमार वूडकट यांच्याविषयी मला असामान्य काव्यात्म ओढा वाटतो; आपल्या कृत्रिम आधुनिक "परिस्थितीतून, गोंधळातून व सूक्ष्म भेदभावांतून" ती मला दूर घेऊन जातात आणि निसर्गाशी अधिक निकटवर्ती अशा जगात मला नेऊन

सोडतात. परंतु ही गोष्ट प्रस्तुत प्रसंगी महत्त्वाची नव्हे; अर्थात् टिएकने हे काव्यात्म आकर्षण आपला मुख्य युक्तिवाद म्हणून सादर केले--परंतु टिएक, गोर्रेस व इतर सगळे अद्‌भुतरम्यतावादी यांचा अधिकार जर बुद्धिवाद खोडून टाकत असेल आणि जर्मन जनतेचा जर प्रश्न असेल, तर या अधिकाराचा प्रभाव काय असणार?

फ्रेडरिक एन्गल्स, "जर्मन फोक्सबुखेर"
मार्क्स आणि एन्गल्स, संकलित ग्रंथ,
खंड २ रा, मॉस्को, १९७५, पृष्ठे ३२-४०

पुनरुज्जीवन

प्राचीन जगाच्या अखेरची परिस्थिती इ. स. ३००-- आणि मध्ययुगाच्या अखेरची परिस्थिती इ. स. १४५३-- यांच्या दरम्यानचा फरक

१. भूमध्य समुद्राच्या किनाऱ्याच्या कडेकडेने जाणारा संस्कृतीचा एक चिंचोळा पट्टा, मध्येच तो कुठे कुठे आतल्या भूभागात आपले हात पसरत असलेला आणि स्पेन, फ्रान्स, आणि इंग्लंड यांचा अटलांटिक किनारा गाठत असलेला. याच्या उत्तरेकडून जर्मन आणि स्लाव, आणि आग्नेयेकडून अरब यांना सहज आत घुसून मागे रेटता येत असलेले. याच पट्ट्याऐवजी आता संस्कृतीचे एक बंदिस्त क्षेत्र तयार झाले--ते म्हणजे सगळा पश्चिम युरोप आणि त्याचे बाह्य रखवालदार म्हणजे स्कॅन्डिनेविया, पोलंड व हंगेरी.

२. ग्रीक लोक किंवा रोमन लोक हे एका बाजूला व बर्बर लोक दुसऱ्या बाजूला, यांच्या दरम्यानच्या साम्य विरोधाऐवजी आता सहा सुसंस्कृत जनता, त्यांच्या सुसंस्कृत भाषांसह, त्यांत स्कॅन्डिनेवियन भाषांचा समावेश न करता, या सगळ्या क्षेत्रात होत्या. त्या सगळ्या भाषांचा एवढ्या मोठ्या प्रमाणात विकास झालेला होता की चौदाव्या शतकातील साहित्याच्या सामर्थ्यशाली उदयामध्ये त्यांना भाग घेता आला, आणि प्राचीन काळाच्या अखेरीस अगोदरच ऱ्हास होत चाललेल्या व मरणाच्या पंथाला लागलेल्या ग्रीक आणि लॅटिन भाषांच्या संस्कृतीपेक्षा किती तरी अधिक विविधांगी संस्कृतीची या सगळ्या भाषांनी हमी दिली.

३. मध्ययुगातील नागरी लोकांनी निर्माण केलेल्या औद्योगिक उत्पादनाचा व व्यापाराचा कमालीचा उच्चतर विकास; एका अंगाने उत्पादन अधिक परिपूर्ण, अधिक विविध आणि अधिक मोठ्या प्रमाणावर होत असलेले, आणि, दुसऱ्या अंगाने व्यापार अधिक सामर्थ्यशाली झालेला; कारण सॅक्सन, फ्रिसियन व नॉर्मन या लोकांच्या काळापासून सागरसंचार कमालीचा अधिक साहसपूर्ण झालेला, आणि त्याचबरोबर दुसऱ्या अंगाने नवनवे शोध देखील बरेच लागलेले आणि पौर्वात्य शोधांची आयात

झालेली; या शोधांनी ग्रीक साहित्याची आयात व प्रसार पहिल्या प्रथमच शक्य कोटीत आणला व सागरी शोध व भांडवलदारी धार्मिक क्रान्ति या गोष्टी शक्य कोटीत आणल्या इतकेच नव्हे, तर त्यांना कृती करण्यासाठी अगदी वेगळा व शीघ्रतर वाव उपलब्ध करून दिला. याच्या भरीला त्यांनी शास्त्रीय सत्यांचा प्रचंड संभार पैदा केला, मात्र त्यात अजून व्यवस्थितपणा आलेला नव्हता, तरी परंतु प्राचीन काळी एवढा संभार कधीच उपलब्ध झालेला नव्हता : लोहचुंबकीय होकायंत्र, मुद्रण, टाइप, फ्लॅक्सचा कागद (बाराव्या शतकापासून अरबांच्या व स्पॅनिश यहुद्यांच्या वापरांत असलेला, कापसाचा कागद दहाव्या शतकापासूनच उदयास आलेला, आणि तेराव्या व चौदाव्या शतकांमध्ये अगोदरच विस्तृतपणे वापरात असलेला, आणि अरबांच्या काळापासून ईजिप्तमध्ये पपायरस अगदीच कालबाह्य ठरलेला), बंदुकीची दारू, चष्मे, यांत्रिक घड्याळे, कालानुक्रम आणि यंत्रशास्त्र या दोहोंची मोठी प्रगती. (नव्या शोधांबाबत ११ नंबर पाहा.) [११६]

याच्या भरीला प्रवासांनी उपलब्ध करून दिलेले साहित्य (मार्को पोलो, इ. स. १२७२, इत्यादि).

सर्वसाधारण शिक्षण अजून अगदीच वाईट स्थितीत असले तरी देखील विद्यापीठांच्या योगाने पुष्कळच अधिक विस्तारलेले.

कॉन्स्टॅन्टिनोपलचा उदय आणि रोमचा पाडाव यांच्याबरोबर प्राचीन काळाची समाप्ति होते. मध्ययुगाची समाप्ति कॉन्स्टॅन्टिनोपलच्या पाडावाशी अविभाज्यपणे निगडित झालेली आहे. नवे युग ग्रीकांच्याकडे परत जाण्यापासून सुरू होते-- म्हणजे हा नकाराचाच नकार!

फ्रेडरिक एन्गल्स, निसर्गाचा विरोध-विकास,
मॉस्को, १९७४, पृष्ठे १९०-९१.

डान्टेपासून गॅरिबाल्डीपर्यंतची इटालियन संस्कृति

१

इटली ही अभिजाततेची भूमी आहे. आधुनिक काळाच्या प्रभातकाळाच्या महान युगाचा उदय तिथे झाल्यापासून त्या देशाने डान्टेपासून गॅरिबाल्डीपर्यंतचे अतुलनीय अभिजात परिपूर्णतेचे तेजस्वी अवतार निर्माण केलेले आहेत. परंतु त्याच्या अधोगतीच्या व त्याच्यावरील परकीय वर्चस्वाच्या कालखंडाने देखील आपले अभिजात

मुखवटे त्याला वारसाहक्काने प्राप्त करून दिले, त्यांच्यामध्ये दोन विशेषेकरून सुस्पष्ट प्रकारचे आहेत; ते म्हणजे स्गानारेल्ले आणि डुल्कामारा. उभयतांची अभिजात एकात्मता आमचे इल्लुस्त्रे लोरिया यांच्या ठायी झालेली आहे.

फ्रेडरिक एन्गल्स, मार्क्सकृत भांडवल,
खंड ३ रा याची " प्रस्तावना "

कार्ल मार्क्स, भांडवल, खंड ३ रा, १९७४, पृष्ठ १९

२

तुर्र हा व्यक्तिशः माझ्या माहितीतला आहे, हा शूर शिपाईगडी आहे आणि हुषार अधिारी आहे, परंतु लष्करी कामगिरीच्या क्षेत्रापलीकडे तो निव्वळ शून्य आहे, सामान्य माणसांच्या सरासरीपेक्षा खालच्या पातळीवरचा आहे; मनाच्या मशागतीचा व सुसंस्कृत बुद्धिमत्तेचा त्याच्या ठायी अभाव आहे इतकेच नव्हे, तर शिक्षण, ज्ञान, आणि अनुभव यांची जागा भरून काढणारा नैसर्गिक चाणाक्षपणा व उपजतबुद्धि यांचा देखील त्याच्या ठायी अभाव आहे. एका शब्दात सांगायचे म्हणजे तो एक खुशालचेंडू आनंदी माणूस आहे, दुसऱ्यावर विश्वास टाकायचा गुण त्याच्या ठायी असामान्य प्रमाणात लाभलेला आहे, परंतु राजकीय दृष्ट्या कुणावरही तावा ठेवायचा गुण त्याच्या अंगी नाही, मग गॅरिबाल्डीची तर गोष्टच सोडा. गॅरिबाल्डी म्हणजे तेजस्वी माणूस; डान्टे व त्याच्याच बरोबरीने मॅकियाव्हेली यांच्या ठायी जी सूक्ष्म इटालियन प्रतिभा आढळते, ती त्यांच्या ठायी बीजरूपाने अजूनही जाणवते.

कार्ल मार्क्स " आशियातील घडामोडी "
इंग्रजीत लिहिलेला लेख

न्यूयॉर्क डेली ट्रिब्यून, तारीख १५ ऑक्टोबर १८६०

डान्टे

पहिले भांडवलदारी राष्ट्र म्हणजे इटली. सरंजामी मध्ययुगाची अखेर आणि आधुनिक भांडवलदारी युगाचा आरंभ यांच्या सीमारेषेवर एक प्रचंड आकृती उभी आहेः ती म्हणजे एक इटालियन माणूस, डान्टे; हा मध्ययुगाचा अखेरचा कवि आणि

आधुनिक काळाचा पहिला कवि या दोन्ही भूमिका करणारा. इ. स. १३०० सालातल्याप्रमाणे आज एक नवे ऐतिहासिक युग उदयास येऊ घातले आहे. इटली आपल्याला एक नवा डान्टे येईल काय? या नव्या कामगारवर्गीय युगाचा उदयकाळ दर्शविणारा?

फ्रेडरिक एन्गल्स, "इटालियन वाचकास उद्देशून"
("कम्युनिस्ट पक्षाचा जाहीरनामा याच्या इटालियन आवृत्तीची प्रस्तावना")

मार्क्स आणि एन्गल्स, निवडक ग्रंथ,
खंड १ ला, १९७३, पृष्ठ १०७

पेट्रार्च

देखावे बघूनबघून थकवा आला म्हणून मी शिखरावर असलेल्या लाकडी घरात गेलो आणि पेय मागविले. शेरेबहीसोबत ते मला मिळाले. अशा प्रकारच्या वह्यांमध्ये काय आढळायचे हे आपणा सगळ्यांना ठाऊक असते; प्रत्येक तुच्छतावादी इसम या अमरपद मिळवायची पक्की तरतूद करणाऱ्या संस्था असल्याचे मानतो आणि त्यांमध्ये आपले नगण्य नाव व अत्यंत क्षुद्र विचारांपैकी एखादा विचार भावी पिढ्यांना आपण संक्रान्त करू शकतो असे तो मानतो. तो जितका अधिक निर्बुद्ध असेल तितके अधिक प्रदीर्घ भाष्य तो आपल्या नावाला जोडून देतो.

व्यापाऱ्यांना असे सिद्ध करायला हवे असते की कॉफी, ट्रेन-ऑइल किंवा कापूस यांच्या भरीला या सगळ्याचा आणि खुद्द सोन्याचा देखील निर्माता सुंदर निसर्ग हा अजूनही आपल्या हृदयातील एका लहानशा कोपऱ्यात स्थान मिळवून राहिलेला आहे; स्त्रिया आपल्या उसळलेल्या भावना व्यक्त करतात, विद्यार्थी आपली तडफ व बेगुमानपणा व्यक्त करतात, आणि समंजस शिक्षक परिपक्वतेचे जडजंबाल शिफारसपत्र निसर्गाला उद्देशून लिहून काढतात. अनुदार कलांमध्ये डॉक्टरेट मिळालेला एक जण सिसेरोच्या वक्तृत्वशैलीत "दिव्यभव्य उट्ली, रिगीचा घोकेबाज प्रतिस्पर्धी!" असा आपल्या अभिप्रायाचा प्रारंभ करून राहिला. मी चिडून पान उलटले आणि सगळे जर्मन, फ्रेंच व इंग्रजी अभिप्राय न वाचता तसेच सोडून दिले. नंतर मला इटालियन भाषेत पेट्रार्चचे एक सुनीत वाचायला मिळाले. त्याचा स्थूल मानाने अनुवाद असा आहे:

आत्मा उंच भरारि मारुनि तिच्या शोधार्थ तो पातला
नाही भेटलि भूवरी कधि न ती यासाठि आसावला
माझ्या दृष्टिस ना तिने भिडविली नेत्रांजने ती कधी
स्वर्गाच्या तिसऱ्या स्थळी उभि अशी भेटावया ती जधी.

हाती घेउनि हात मंजुळ स्वरे सांगे मला ती असे
ताटातूट कधी न हो म्हणुनिया अश्रूस जागा नसे.
केव्हापासुनि मी पहा ढळविले स्वास्थ्या मनाच्या तुझ्या
घाई फार करून मी परतले माझ्या घरी येथिच्या
" माझा मोद मनास त्या उमजु दे माझी मनीषा अशी
नाही अन्य दुजा सख्या प्रिय मला वांच्छा तुझी मी तशी "
मूर्ती माझि तशीच राहु दिधली तेथे कधीची तशी. '
सोडोनी मम हात का न वदली ती एक शब्दाधिक
माझ्या आवडिचा तिचा स्वर मला ऐकायचा सात्विक
यासाठी नच मी कधीहि ढळलो स्वर्गातुनी आणिक. ११७

ज्या व्यक्तीने हे उतरून ठेवलेले होते तिचे नाव होते जिनोवा-निवासी जोआकिम त्रिओनी. आणि या उताऱ्यामुळे तो ताबडतोब माझा मित्र झाला. कारण इतर अभिप्राय जितके अधिक पोकळ व अधिक अर्थशून्य होते, तितके हे सुनीत असह्या पार्श्वभूमीवर अधिक प्रकर्षाने उठून दिसत होते, आणि त्याने माझ्या भावना अधिकच चाळवल्या. जिथे निसर्ग आपल्या सगळ्या उत्कृष्टतेचे प्रदर्शन मांडतो, जिथे त्याच्या ठायी सुप्त असलेला विचार सोनेरी स्वप्न जागृत करीत नसला तरी स्वतःच सोनेरी स्वप्न अनुभवत असलेला दिसतो, तिथे " निसर्गा, तू किती सुंदर आहेस ! " याच्याहून अधिक काही ज्याला जाणवत नाही आणि म्हणवत नाही त्या माणसाला आपण साध्यासुध्या, उथळ, गोंधळलेल्या जनसमुदायापेक्षा अधिक वरचढ आहोत असे मानायचा काही एक अधिकार नाही. तथापि अधिक सखोल मनामध्ये व्यक्तिगत दुःखे व हालअपेष्टा या निसर्गाच्या वैभवाशी एकरूप होण्यासाठी, नाजुक दिलजमाईमध्ये विलीन होण्यासाठीच तेवढ्या उफाळून येत असतात. ही दिलजमाई या सुनीतात इतक्या सुंदर रीतीने व्यक्त झालेली आहे की तिच्यापेक्षा अधिक सुंदर रीतीने ती व्यक्त करताच येणार नाही. परंतु त्या जिनोवा-निवासी माणसाचा मी मित्र व्हायला आणखी एक परिस्थिती कारणीभूत झाली. म्हणजे माझ्या अगोदर आणखी एकाने प्रियकराचे दुःख या शिखरावर आणून ठेवले होते म्हणायचे; म्हणजे अवघ्या एकच महिन्यापूर्वी माझे हृदय अथांग सौख्याने भरलेले होते आणि ते आता विदीर्ण व उदासवाणे झालेले असताना मी तिथे एकटाच उभा नव्हतो म्हणायचा. आणि निसर्गाच्या सौंदर्यासमक्ष प्रेमाचे दुःख या सगळ्यात जास्त उदात्त व सखोल व्यक्तिगत दुःखाचा उमाळा उघड बोलून दाखवायचा हक्क अन्य कोणत्या दुःखाला असणार !

फ्रडरिक एन्गल्स, " लाम्बर्डीमधील भ्रमन्ती,
१. आल्प्स पर्वतावरून "

मार्क्स आणि एन्गल्स, संकलित ग्रंथ,
खंड २ रा, मॉस्को, १९७५, पृष्ठे १७२-७३

बोक्काशियो

शहरी पाखंडी कृत्यांचा— आणि हीच मध्ययुगातली प्रत्यक्ष अधिकृत पाखंडी कृत्ये आहेत आणि यांचा—रोख मुख्यत्वेकरून धर्मगुरूंच्या विरुद्ध होता. या धर्मगुरूंच्या संपत्तीवर व राजकीय महत्त्वावर त्यांनी हल्ला चढवला. ज्याप्रमाणे आजच्या काळातले भांडवलदार "gouvernement a bon marche" (स्वस्त सरकाराची) मागणी करतात, त्याप्रमाणे मध्ययुगीन व्यापाऱ्यानी मुख्यत्वेकरून "eglise a bon marche" (स्वस्त धर्मसंस्थेची) मागणी केली. धर्मपीठ आणि धर्मशास्त्र यांच्या आणखी अधिक विकासामध्ये ज्यांना केवळ अधोगतीच दिसते अशा कोणत्याही पाखंड्यांप्रमाणेच हे व्यापारी पाखंडी साध्यासुध्या आरंभकाळच्या ख्रिस्ती धर्मपीठाचे पुनरुज्जीवन करायची आणि धर्मगुरूंची राखीव संस्था नष्ट करायची मागणी करीत होते. या स्वस्त व्यवस्थेमुळे जोगी, उपाध्याय आणि रोमन कोर्ट यांना अर्धचंद्र मिळणार होता; थोडक्यात सांगायचे म्हणजे धर्मपीठाच्या सगळ्या खर्चिक घटकाला अर्धचंद्र मिळणार होता. शहरे ही राजे लोकांच्या संरक्षणाखाली असली तरी स्वहक्काने प्रजासत्ताके होती, आणि त्यांनी पोपच्या प्रभुत्वावर हल्ला करायच्या द्वारा सर्वसाधारण शब्दात पहिल्या प्रथम असा सिद्धान्त मांडला की प्रजासत्ताक हा भांडवलदारी राजवटीचा नेहमीचा प्रकार असतो. धर्मशास्त्राच्या व धर्मपीठाच्या कायद्यांच्या काही कलमांना त्यांचा जो विरोध होता त्याचा खुलासा अंशतः अगोदरच्या परिस्थितीवरून व अंशतः त्यांच्या राहणीच्या परिस्थितीवरून होतो. उदाहरणार्थ, ब्रह्मचर्याला त्यांचा जो कडवा विरोध होता, तो बोक्काशियोने दर्शविला आहे त्याहून अधिक चांगल्या रीतीने कधीही दर्शविण्यात आलेला नव्हता.

फ्रेडरिक एन्गल्स, जर्मनीतील शेतकऱ्यांचे युद्ध,
मॉस्को, १९७४, पृष्ठे ४३-४४

महान पुनरुज्जीवन

निसर्गाच्या आधुनिक संशोधनानेच केवळ शास्त्रीय, पद्धतशीर व सर्वांगीण विकास साधलेला आहे. याच्या उलट प्राचीन काळातील तेजस्वी नैसर्गिक-तात्त्विक उपजतबुद्धीचे शोध आणि अरबांनी अत्यंत महत्त्वाचे परंतु अधूनमधून लावलेले शोध, हे बहुतांशी फलश्रुतीशिवायच विलयाला गेले. आणि निसर्गाचे हे आधुनिक संशोधन, अधिक अलीकडील सगळ्या इतिहासाप्रमाणेच ज्या सामर्थ्यशाली युगाला

आम्ही जर्मन लोक धर्मसुधारणा हे नाव देत असतो, त्या युगापासून सुरू झाले, म्हणजे त्या काळी आमच्यावर जे राष्ट्रीय दुर्दैव ओढवले, तेव्हापासून सुरू झाले. हिलाच फ्रेंच लोक पुनरुज्जीवन म्हणतात आणि इटालियन लोक (Cinquecento) ११८असे म्हणतात. मात्र हिचे पूर्ण स्वरूप यांपैकी कोणत्याही संज्ञेतून व्यक्त होत नाही. हे असे युग आहे की जे पंधराव्या शतकाच्या उत्तरार्धात उदयास आले. राजेशाहीने शहरातल्या व्यापाऱ्यांच्या पाठिंब्यानिशी सरंजामी सरदारशाहीची सत्ता मोडून टाकली आणि मूलतः राष्ट्रीयत्वावर आधारलेल्या महान राजेशाह्या प्रस्थापित केल्या आणि यांच्यामधूनच आधुनिक युरोपियन राष्ट्रे आणि आधुनिक भांडवलदारी समाज यांचा विकास झाला. आणि व्यापारी व सरदार अजून एकमेकांशी लढत राहिलेले असतानाच जर्मन शेतकऱ्यांच्या युद्धाने भविष्यकालीन वर्गलढ्याकडे दूरदृष्टीने लक्ष वेधले, आणि अशा रीतीने बंडखोर शेतकऱ्यांना रंगमंचावर आणले इतकेच नव्हे, तर ––त्यांत अतःपर नवीन असे काहीच नव्हते, तर––त्यांच्या पाठोपाठ आधुनिक कामगार वर्गाचा आरंभकाळ उभा केला, आणि हा कामगार वर्ग आपल्या हाती लाल झेंडा घेऊन आणि आपल्या ओठांवर मालाच्या समाइक मालकीची मागणी ठेवून पुढे सरसावला. बायझॅन्टियमच्या पाडावातून वाचलेल्या हस्तलिखितांमध्ये, रोमच्या भग्नावशेषांच्या उत्खननात मिळालेल्या प्राचीन पुतळ्यांमध्ये, पाश्चात्यांना चकित करणारे एक नवे जग उघडकीस आले, ते म्हणजे प्राचीन ग्रीस, त्याच्या तेजस्वी रूपांच्या झगझगाटात मध्ययुगाची भुते नाहीशीच झाली; इटलीमध्ये कलेला न भूतो न भविष्यति असा बहार आला; हा बहार अभिजात प्राचीनतेच्या प्रतिबिंबासमान होता आणि पुन्हा त्याने तेवढी उंची कधीही गाठली नाही. इटली, फ्रान्स आणि जर्मनी या देशांमध्ये नवे साहित्य उदयास आले; हेच ते पहिलेवहिले आधुनिक साहित्य; त्याच्या पाठोपाठ लवकरच इंग्लिश व स्पॅनिश साहित्याची अभिजात युगे अवतरली, जुन्या orbis terrarum च्या ११९ मर्यादांना भगदाड पडले आणि आता पहिल्या प्रथमच जगाचा खराखुरा शोध लागला आणि नंतरच्या जागतिक व्यापाराचा पाया घालण्यात आला आणि हातकारागिरीचे संक्रमण कारखानदारी उत्पादनात झाले आणि याने आपल्या परीने आधुनिक मोठ्या प्रमाणावरील उद्योगधंद्याचा आरंभ करून दिला. माणसांच्या मनावरील धर्मपीठाच्या हुकुमशाहीचा विध्वंस झाला; जर्मन जनतांच्या बहुसंख्यांकांनी प्रॉटेस्टंट पंथ अंगिकारून ही हुकुमशाही थेट धुडकावून लावली आणि लॅटिन लोकांमध्ये स्वतंत्र विचाराचा आनंदी बाणा, अरबांकडून घेतलेला आणि नव्याने शोध लागलेल्या ग्रीक तत्त्वज्ञानाने जोपासलेला, अधिकाधिक मूळ धरू लागला आणि त्याने अठराव्या शतकाच्या भौतिकवादासाठी मार्ग मोकळा करून दिला.

मानवजातीने आतापर्यंत अनुभवलेली ही मोठ्यांत मोठी पुरोगामी क्रान्ति होती, हा काळ असा होता की महापुरुषांच्या कर्तृत्वाला हा आव्हान देत होता आणि याने महापुरुष निर्माण केले— विचाराचे सामर्थ्य असलेले महापुरुष, हे विद्यापीठां-

मध्ये व ज्ञानाच्या क्षेत्रात चमकले. भांडवलदारांची राजवट ज्यांनी स्थापन केली त्या पुरुषांच्या ठायी भांडवलदारी मर्यादांचा लवलेशही नव्हता. उलट पक्षी त्या काळाच्या साहसी स्वरूपाने त्यांना कमी अधिक मोठ्या प्रमाणात स्फूर्ति दिली. त्या काळी असा एकही महत्त्वाचा पुरुष नव्हता की ज्याने विस्तृत प्रवास केलेला नव्हता, ज्याला चार अगर पाच भाषांचे ज्ञान नव्हते आणि जो अनेक क्षेत्रांमध्ये चमकून राहिला. लिओनार्डो डा व्हिन्सी हा महान चित्रकार होता इतकेच नव्हे, तर तो महान गणितशास्त्रज्ञ, यंत्रशास्त्रज्ञ आणि इंजिनियर होता; आणि भौतिकशास्त्राच्या अत्यंत विविध शाखा महत्त्वाच्या शोधांच्या बाबतीत त्याच्या ऋणी आहेत. आल्ब्रेख्ट ड्यूरेर हा चित्रकार, कोरीव काम करणारा, शिल्पकार व वास्तुशिल्पी होता इतकेच नव्हे, तर याच्या भरीला याने तटबंदीची पद्धति शोधून काढली आणि तिच्यामध्ये अशा अनेक कल्पनांचा समावेश होता की ज्या, नंतर पुष्कळ उशीरा मॉन्तालेम्बर्टने आणि आधुनिक जर्मन तटबंदीशास्त्राने पुन्हा अंगिकारल्या. मॅकिॲव्हेली हा मुत्सद्दी, इतिहासकार, कवी आणि त्याच वेळी आधुनिक काळातला पहिला लक्षणीय लष्करविषयक लेखक होता. लूथरने धर्मपीठाचा गोठा साफ केला इतकेच नव्हे तर जर्मन भाषेचा गोठा देखील त्याने साफ केला; त्याने आधुनिक जर्मन गद्याची निर्मिती केली आणि त्याने विजयावर अढळ विश्वास दर्शविणाऱ्या विजयी स्तोत्राची शब्दरचना केली; त्याला संगीतही दिले व हे स्तोत्र सोळाव्या शतकाचे क्रान्तिगीत झाले.[१२०] त्या काळातले वीर पुरुष अजून श्रमविभागणीच्या गुलामगिरीत गुरफटलेले नव्हते; या श्रमविभागणीच्या एकतर्फी उत्पादनातील बंधनकारक परिणाम त्यांच्या वारसांमध्ये आपल्याला अनेकदा हेरता येतात. परंतु त्यांचे एक खास वैशिष्ट्य म्हणजे ते बहुतेक सगळे समकालीन चळवळींच्या व्यावहारिक लढ्याच्या वातावरणात जगत असलेले व आपल्या कामगिऱ्या करत असलेले दिसतात; ते बाजू घेतात आणि लढ्यात सामील होतात, कुणी भाषण व लेखन करीत भाग घेतो, तर आणि आणखी कुणी तरवार चालवून भाग घेतो, आणि अनेक जण दोन्ही प्रकारांनी भाग घेतात. म्हणूनच त्यांच्या व्यक्तिमत्वाला पूर्तता व सामर्थ्य येते, याच्या योगाने ते पूर्ण पुरुष होतात. अभ्यासिकेतले पर्यंक पंडित त्यांच्यात अपवादात्मकच आहेत—ते एक तर दुय्यम वा तिय्यम दर्जाचे असतात किंवा स्वतःची बोटे भाजून घ्यायला नको असलेले सावध तुच्छतावादी असतात.

फ्रेडरिक एन्गल्स, निसर्गाचा विरोधविकास,

मॉस्को, १९७४, पृष्ठ २०-२२

टिशियन

इथला[१२१] प्रत्येक जण आता कलेचा मित्र आहे आणि प्रदर्शनातील चित्रांविषयी चित्रचिवाट करतो आहे. हे प्रकरण plus ou moins @ आर्थिकदृष्ट्या तरी अपेशीच ठरणार. तथापि जाता जाता सांगायचे म्हणजे इथे काही फारच छान चित्रे मांडलेली आहेत, तथापि चांगल्या व सर्वोत्तम चित्रकारांची बहुतेक चित्रे केवळ दुय्यम दर्जाची आहेत. सर्वांत सुंदर चित्रांमध्ये टिशियनने चितारलेला ॲरिओस्टोचा एक विलोभनीय पोर्ट्रेट आहे. आधुनिक व फ्रेंच चित्रसृष्टी फारच वाईट स्थितीत आहे आणि तिचे प्रतिनिधित्व इथे जवळ जवळ नाहीच. चित्रांचा तीन-चतुर्थांश भाग म्हणजे इंग्लिश कचरा आहे. स्पॅनिश व फ्लेमिश चित्रांचे प्रतिनिधित्व सर्वोत्तम आहे आणि त्यांच्यानंतर इटालियनांचा नंबर लागतो. या उन्हाळ्यात कसेही करून तुम्ही सहकुटुंब इकडे यायलाच पाहिजे आणि या गोष्टीकडे एकदा नजर टाकली पाहिजे, s'il y a moyen.b या प्रकरणासंबंधांत Tribune साठी[१२२] काहीही लिहून देण्यात अर्थ नाही, काहीही असले तरी सुरुवात कुठे करायची हे मला कळणार नाही आणि Tribune ला सगळ्या वृत्तपत्रांतून नेहमीची चर्पटपंजरी सापडू शकतेच.

एन्गल्स यांचे मार्क्स यांना पत्र,
तारीख २० मे. १८५७

मार्क्स/एन्गल्स, वेर्के, खंड २९ वा,
१९६७, पृष्ठ १३५.

धर्मसुधारणेच्या कालखंडातील ग्रोबियन साहित्य

धर्मसुधारणेच्या कालखंडाच्या किंचित अगोदर आणि त्या कालखंडाच्या अवधीत जर्मन लोकांमध्ये अशाच एका प्रकारच्या साहित्याचा विकास झाला की त्याचे खुद्द नावच लक्षणीय आहे— ते म्हणजे grobian साहित्य. आमच्या स्वतःच्या काळामध्ये आम्ही सोळाव्या शतकाच्या क्रान्तिकारक युगाशी साधर्म्य असलेल्या क्रान्तीच्या युगाच्या नजीक जात आहोत. मग जर्मन लोकांमध्ये ग्रोबियन साहित्य

@ कमी अधिक प्रमाणात—संपादक
b शक्य असल्यास —संपादक

पुन्हा एकदा उदयास येत आहे याचे नवल मुळीच वाटायला नको. अगदी बिन-सुसंस्कृत अभिरुचि असलेल्या व्यक्तीच्या ठायी देखील असल्या प्रकारचे लेखन जी सौंदर्यविषयक शिसारी निर्माण करते आणि जी शिसारी ते पंधराव्या व सोळाव्या शतकांमध्ये निर्माण करत होते, तिच्यावर ऐतिहासिक विकासाविषयीची आस्था सहज मात करते.

नीरस, शब्दबंबाळ, बढाईखोर, ग्रॅसोनिकल, [१२३] टीकेचा हल्ला करताना उर्मट तडफेचा मोठा देखावा करणारे, आणि असे असूनही इतरांच्या ठायी असाच गुण असेल तर त्याच्या बाबतीत मात्र पिसाट हळवेपणा; उत्साहाच्या प्रचंड अपव्ययानिशी तरवार उगारायची, ती हवेत खूप उंच उचलायची आणि घाव घालताना नुसतीच खाली पडू द्यायची; सतत नीतिपाठ द्यायचे आणि सतत त्यांच्याविरुद्ध वर्तन करायचे; भावनाविवशता व स्खलनशीलता यांचे अत्यंत हास्यास्पद मीलन; प्रस्तुत असलेल्या मुद्याविषयीच केवळ आस्था दर्शवायची आणि असे असूनही सदैव मुद्यालाच बगल द्यायची; जनतेच्या ग्रहणक्षमतेविरुद्ध मध्यमवर्गीय विद्वत्ताप्रचुर अर्धज्ञानीपणाचा वापर सारख्याच उर्मटपणाने करायचा आणि तथाकथित "मजबूत व्यवहारज्ञानाचा" वापर विज्ञानाविरुद्ध करायचा; विशिष्ट आत्मसंतुष्ट ढिलेपणानिशी स्वतःला निरर्गल ऐसपैस वृत्तीत झोकून द्यायचे; बहुजनसमाजाच्या भाषेत तुच्छतावादी संदेश सजवायचा; साहित्यिक भाषेशी झटापट करायची आणि तिला शुद्ध गावठी स्वरूप द्यायचे; लेखकाचे शरीर पार्श्वभूमीवर राहून आपल्या सामर्थ्याची थोडीशी प्रदर्शने करायला आपल्या अंगप्रत्यंगानिशी आसुसलेले असताना त्याच्या रुंद खांद्यांचे प्रदर्शन मांडण्यासाठी व त्याचे अवयव जाहीरपणे ओढण्यासाठी त्याच्याकडे स्वखुषीने अंगुलिनिर्देश करायचा; निरोगी देहात निरोगी मनाचा अधिवास जाहीर करायचा; सोळाव्या शतकाच्या अत्यंत रुक्ष वादविवादांची व त्याच्या शारीरिक तापाची अभावित बाधा झालेली असायची; पोथीनिष्ठ संकुचित विचारसरणीची गुलामगिरी पतकरायची आणि त्याच वेळी सगळ्या खऱ्याखुऱ्या विचाराच्या देखत क्षुद्र व्यवहाराला साद घालायची; प्रतिगाम्यांविरुद्ध संताप प्रदर्शित करायचा, प्रगतीविरुद्ध प्रतिक्रिया व्यक्त करायची; विरोधक हास्यास्पद दिसावा अशी कृती करायला असमर्थ असूनही अनेक प्रकारचे सूर काढून हास्यास्पद रीतीने त्याला शिव्या द्यायच्या; सालोमोन आणि मार्कोल्फ,[१२४] डॉन क्विक्झोट आणि सॅन्को पान्झा, द्रष्टा आणि तुच्छतावादी यांचा एका व्यक्तीच्या ठायी अधिवास; संतापाचा आडमुठा प्रकार आणि संतापी आडमुठेपणाचा प्रकार; या सगळ्यांवर एखाद्या ओथंबलेल्या ढगाप्रमाणे, आत्मसंतुष्ट तुच्छतावाद्याची स्वतःच्या सद्गुणीपणाची जाणीव—असले होते सोळाव्या शतकातले ग्रोबियन साहित्य. आमची स्मृति आम्हाला दगा देत नसेल तर, जर्मन लोकसाहित्याने याचे एक काव्यात्म स्मारक Heineke, der starke knecht या गाण्यात उभारलेले आहे. ग्रोबियन साहित्याचा एक पुनर्निर्माता असल्याचे आणि राष्ट्रांच्या आगामी

वसंतऋतूची पूर्वसूचना देणाऱ्या जर्मन चिमण्यांपैकी या क्षेत्रातील एक चिमणी होण्याचे श्रेय हेर्र हाइन्झेन याजकडे जाते.

कार्ल मार्क्स " नीतिपाठ देणारी समीक्षा
आणि समीक्षात्मक नीती "

मार्क्स आणि एन्गल्स, संकलित ग्रंथ, खंड ६ वा,
मॉस्को, १९७६, पृष्ठे ३१२-१३

धर्मसुधारणेचे ऐतिहासिक महत्त्व

अखेरीस फ्रान्समध्ये प्रॉटेस्टंट पंथाचा नायनाट करण्यात आला, ते फ्रान्सच्या लेखी दुर्दैव मुळीच नव्हते– teste @ बेली, व्हॉल्टेअर आणि दीदरो, परंतु जर्मनीत जर त्याची दडपणूक झाली असती तर ही जर्मनीच्या लेखी इतकेच नव्हे, तर खरोखरी जगाच्या लेखी ही आपत्ती ठरली असती. हिच्या पायी रोमान्स देशांचा विकासाचा कॅथोलिक प्रकार जर्मनीवर लादण्यात आला असता, आणि विकासाचा इंग्रजी प्रकार देखील अर्ध-कॅथोलिक आणि मध्ययुगीन असल्यामुळे (म्हणजे विद्यापीठे वगैरे, कॉलेजे, पब्लिक स्कूल्स हे सगळे प्रॉटेस्टंट मठ असल्यामुळे) शिक्षणाचे सगळे स्वतंत्र जर्मन प्रकार (म्हणजे घरच्या घरी किंवा खासगी संस्थांमध्ये शिक्षण, विद्यार्थ्यांनी कॉलेजाबाहेर राहून स्वतःचे अभ्यासक्रम पसंत करणे) अस्तित्वात राहिले नसते आणि युरोपखंडाचा आत्मिक विकास कमालीचा कंटाळवाणा झाला असता. फ्रान्स आणि इंग्लंड यांनी पूर्वग्रह गाभ्याच्या स्वरूपात नष्ट केलेले आहेत, तर जर्मनीने बाह्य स्वरूपापुरते पूर्वग्रह नष्ट केलेले आहेत; ठराविक नमुने नष्ट केले आहेत. यावरून अंशतः अनुस्यूत होत आलेली गोष्ट म्हणजे प्रत्येक जर्मन गोष्टीचा आकार-शून्यपणा; याचाच संबंध आजच्या घडीपर्यंत लहान लहान संस्थानांच्या मोठ्या संख्येच्या स्वरूपांतल्या मोठ्या गैरसोईशी आहे, परंतु राष्ट्राच्या विकासक्षमतेच्या बाबतीत ही गोष्ट प्रचंड फायद्याची आहे. त्याचे पूर्ण फळ भविष्यकाळीच पदरात पडेल आणि त्या वेळी स्वतःच एकतर्फी असलेल्या या टप्प्यावर मात करण्यात आलेली असेल.

फ्रेडरिक एन्गल्स, " फ्रान्स आणि जर्मनी
यांच्या इतिहासाची साधने "

मार्क्स/एन्गल्स, Uber Kunst und Literatur,
खंड १ ला, १९६७, पृष्ठे ३५२-५३

@ पाहा —संपादक

थॉमस मोअर

१

थॉमस मोअर आपल्या "मनोराज्य" या ग्रंथात म्हणतो की इंग्लंडमध्ये "तुमची मेंढरे किती तरी मवाळ व माणसाळलेली असत आणि किती तरी कमी खाणारी असत, आणि आता मी असे म्हटलेले ऐकतो आहे की ती येवढी मोठी खादाड झालेली आहेत आणि येवढी रानटी झालेली आहेत की ती खुद्द माणसांनाच खातात आणि गट्ट करतात," "मनोराज्य", अनुवादक रॉबिन्सन, संपादक आर्बेर, लंडन, १८६९, पृष्ठ ४१.

कार्ल मार्क्स, भांडवल, खंड १ ला,
मॉस्को, १९७४, पृष्ठ ६७३

२

थॉमस मोअर आपल्या "मनोराज्य" या ग्रंथात म्हणतो : "म्हणून एखादा लोभी व अधाशी खादाड माणूस आणि आपल्या मातृभूमीला थेट प्लेगासारखा छळणारा असा हा माणूस हजारो हजार एकर जमिनीचे एकत्रीकरण करून तिला कुंपणात बंदिस्त करून ठेवतो; म्हणजे तिच्यावरचे शेतकरी आपल्या स्वतःच्या जमिनीवरून बाहेर फेकले जातात. कावेबाजपणाने किंवा फसवणुकीने किंवा हिंसाचारी जुलूमजबरदस्तीने त्यांना हुसकून लावण्यात येते, किंवा त्यांच्यावरील अन्यायाने व त्यांना केलेल्या दुखापतींनी ते इतके त्रस्त होतात की त्यांना आपले सर्वस्व विकून टाकणे भाग पडते. म्हणून या अगर त्या मार्गाने, कसल्या ना कसल्या अगर वाममार्गाने त्यांना निघून जाणे भाग पडले पाहिजे असा प्रकार घडतो. मग हे गरीब, नागवलेले, कंगाल प्राणी, पुरुष, स्त्रिया, नवरे, बायका, पितृहीन मुले, विधवा, तान्ही बाळे असलेल्या दुःखी आया, आणि त्यांची सगळी कुटुंबे, ऐपतीने लहान परंतु संख्याबळाने मोठी, कारण शेतीला अनेक माणसे लागतात—या सगळ्यांना निघून जाणे भाग पडते. काय सांगतोय मी, हे लोक आपल्या नित्याच्या सरावातल्या घरातून बाहेर पडतात आणि दूर पायपीट करत जातात, त्यांना आराम करायला कुठे जागाच सापडत नाही. त्यांची सगळी घरची चीजवस्तू, आधीच फार कमी मोलाची असलेली, त्यांना त्याची धड विक्री करता आली असती, परंतु त्यांची अचानक हकालपट्टी झाल्याने त्यांना ती कवडी मोलाने विकणे भाग पडते. आणि जवळचे सगळे खर्चून होईपर्यंत दूर दूर भटकून भटकून झाल्यावर मग त्यांना चोरी करण्याशिवाय अन्य काय करता येणार ? आणि मग न्यायनिवाडा होऊन फाशी जायचे, नाही तर भीक मागत भटकायचे. आणि मग त्यांना भटके म्हणून तुरुंगात टाकायचे;

कारण ते भटकतात आणि काम करत नाहीत, मात्र ते अगदी मनापासून काम करायला तयार असले तरी कुणी त्यांना कामच देत नाहीत." या ज्या गरीब बिचाऱ्या भटक्यांविषयी थॉमस मोअर सांगतो की त्यांना चोरी करणे भाग पडले. त्यांच्यापैकी "७,२०० लहान-मोठ्या चोरांना" आठव्या हेन्रीच्या कारकीर्दीत "ठार मारण्यात आले."

(हॉलिन्शेड, "इंग्लंडचे वर्णन," खंड १ ला, पृष्ठ १८६.)

कार्ल मार्क्स, भांडवल, खंड १ ला, मॉस्को, १९७४, पृष्ठे ६८७-८८

३

आतापर्यंत, जबरदस्ती — आताच्या पुढे सामाजिकता, शुद्ध पवित्र इच्छा, "न्यायासाठी" मागणी. परंतु थॉमस मोअरने ३५० वर्षांपूर्वी ही मागणी केली, आणि अजून तिची परिपूर्ती व्हायचीच आहे.

फ्रेडरिक एन्गल्स, "ॲन्टी-ड्यूहरिंग साठी पूर्वतयारीचे लेखन"

मार्क्स/एन्गल्स, वेर्के, खंड २० वा, १९६८, पृष्ठ ५८८.

४

थॉमस मोअरविषयीच्या आपल्या ग्रंथामध्ये कार्ल कौट्स्कीने भांडवलदारी ज्ञान-जागृतीचा पहिला प्रकार जो १५ व्या व १६ व्या शतकातला "मानवतावाद" होता त्याचे विकसन मागाहून कॅथोलिक जेसुइट पंथामध्ये कसे झाले हे दाखवून दिले आहे.[१२५] नेमक्या त्याच रीतीने १८ व्या शतकातला त्याचा दुसरा पूर्णपणे परिपक्व असा प्रकार आधुनिक जेसुइट पंथामध्ये म्हणजेच रशियन मुत्सद्देगिरीमध्ये विकसित असलेला आपल्याला इथे दिसतो. ज्या ऐतिहासिक चळवळींच्या ठायी आपल्या उगमस्थानाचा व आपल्या अस्तित्वाच्या परिस्थितीच्या स्पष्ट कल्पनेचा अभाव असतो म्हणून ज्या सर्वस्वी भ्रामक उद्दिष्टे आपल्या पुढ्यात ठेवून असतात, त्या सगळ्यांच्या नशिबी ही स्वाभाविक व अपरिहार्य गोष्ट असते; ती म्हणजे विरोधी गोष्टीत अचानक बदल होणे, आरंभबिन्दूच्या थेट विरुद्ध दिशेकडील बिन्दूकडे हे अन्ती येऊन दाखल होणे. "इतिहासाचा उपरोध" त्यांना निर्दयपणे शिक्षा देतो.

फ्रेडरिक एन्गल्स, "रशियन झारशाहीचे परराष्ट्रीय धोरण"

मार्क्स/एन्गल्स, वेर्के, खंड २२ वा, १९५३, पृष्ठ २१

शेक्स्पियर

१

इंग्लिश शोकान्तिकेचे एक खास वैशिष्ट्य फ्रेंच भावनांना इतके नकोसे वाटते की शेक्स्पियरला दारुडा रानदांडगा[१२६] असे व्हॉल्टेयर म्हणत असे,—हे वैशिष्ट्य म्हणजे उदात्त आणि हीन, भयंकर आणि हास्यास्पद, शौर्यशाली आणि विदूषकी यांचे तिच्या ठायी असलेले खास मिश्रण. परंतु शौर्यशाली नाटकाची नांदी म्हणायची कामगिरी विदूषकावर सोपविणे हे शेक्स्पियर कुठेही करत नाही. हा शोध संयुक्त मंत्रिमंडळासाठी खास राखून ठेवण्यात आला होता. लॉर्ड ॲबर्डीन यांनी इंग्लिश विदूषकाची भूमिका केलेली नसली तरी किमान पक्षी इटालियन पॅन्टालूनची भूमिका[१२७] केलेली आहेच. वरवर पाहणाऱ्याला सगळ्या मोठ्या ऐतिहासिक चळवळी यांनी फार्सची अधोगती गाठलेल्या किंवा किमानपक्षी मामुली रूप गाठलेल्या दिसतात. परंतु याच्यापासून सुरू झालेले एक उपलक्षण म्हणजे रशियाशी युद्ध[१२८] हें नाव असलेल्या शोकान्तिकेचे खास वैशिष्ट्य हे आहे. या शोकान्तिकेची नांदी शुक्रवारी सायंकाळी पार्लमेंटच्या दोन्ही सभागृहांमध्ये म्हणण्यात आली आणि तिथे मंत्रिमंडळाच्या संदेशाला उत्तरादाखल मंत्रिमंडळाचे निवेदन एकाच वेळी चर्चेला घेण्यात आले आणि सर्वानुमते मंजूर करण्यात आले आणि बकिंगहॅम राजवाड्यात आपल्या सिंहासनावर विराजमान असलेल्या राणीला काल तिसरे प्रहरी सादर करण्यात आले.

कार्ल मार्क्स, "युद्धाविषयीची पार्लमेंटमधील चर्चा",
इंग्रजीत लिहिलेला लेख

न्यू यॉर्क डेली ट्रिब्यून, तारीख १७ मार्च १८५४

२

त्या लफंग्या रोडेरिख बेनेडिक्सने "शेक्स्पियेरोमानिया"[१२९]च्या विरुद्ध एका जाडजूड भारुडाच्या स्वरूपात घाणेरडी दुर्गंधी सोडून ठेवली आहे. त्याने त्यात बारकाव्यानिशी असे सिद्ध केले आहे की आमच्या महान कवींच्या पुढे, किंबहुना आधुनिक काळातल्या कवींच्या पुढेदेखील शेक्स्पियरचा मुळीच टिकाव लागत नाही. शेक्स्पियरला त्याच्या उच्चासनावरून म्हणे भिरकावून द्यायचे, कशासाठी? तर केवळ लष्टंभारती बेनेडिक्सला त्याच्या जागी उभे करायचे म्हणून! मेरी वाइव्हज्‌च्या एकट्या पहिल्या अंकातच एकंदर जर्मन साहित्यांतल्यापेक्षा अधिक जिवंतपणा आणि वास्तवता आहे, आणि लाऊस[१३०] हा त्याचा कुत्रा क्रॅब याच्या समवेत एकटाच सगळ्या जर्मन आनंदपर्यवसायी नाटकांच्या एकूण संभारापेक्षा अधिक मोलाचा आहे. शेक्स्पियर

अनेकदा आपल्या पात्रपरिपोषामध्ये बेधडकपणे काटछाट करतो आणि अशा रीतीने कंटाळवाणी बडबड आटोपशीर करून ठेवतो आणि यांच्या बाबतीत हा वजनदार बुद्धाचा बेनेडिक्स त्याच्या उलट जितके गंभीर तितकेच स्वस्तातले युक्तिवाद करण्यात मशगुल राहील. मात्र वास्तव जीवनात ते अटळ असते. त्याच्या मनासारखे होऊ द्या, झाले.

एन्गल्स यांचे मार्क्स यांना पत्र
तारीख १० डिसेंबर १८७३

मार्क्स आणि एन्गल्स, निवडक पत्रव्यवहार,
मॉस्को, १९७५, पृष्ठ २६९

३

मालमत्तेचा सगळ्यांत जास्त सार्वत्रिक असा प्रकार जो पैसा आणि व्यक्तिगत वैशिष्ट्य यांच्या दरम्यान किती अल्प संबंध असतो, त्यांचा एकमेकांशी थेट विरोध किती प्रमाणात असतो, हे आमच्या तत्त्वविचारक मध्यमवर्गीयापेक्षा शेक्सपियरला अगोदरच किती तरी अधिक चांगले माहीत होते :

अशा प्रकारे यातले बरेचसे काळ्याला पांढरे करील, वाईटाला चांगले करील,
चुकीच्याला बरोबर करील, हीनाला उदात्त करील, म्हाताऱ्याला तरुण करील,
भेकडाला शूर करील.

हा पिवळा गुलाम.....
महारोगाचा गौरव करील.....
हेच ते
हे दुःखी विधवेला पुनर्विवाह करायला लावते;
जिच्या अंगावर क्षते पडलेली असतील, व जिची
वेश्यागृहातून हकालपट्टी झालेली असेल, तिला हे
मलमपट्टी करते
आणि पुन्हा माणसात आणते.....
अरे तू दृश्य परमेश्वरा;
अशक्यतांना निकटपणे सांधणाऱ्या,
आणि त्यांना एकमेकांचे चुंबन घ्यायला लावणाऱ्या![१३१]

कार्ल मार्क्स आणि फ्रेडरिक एन्गल्स,
जर्मन विचारसरणी,

मार्क्स आणि एन्गल्स, संकलित ग्रंथ, खंड ५ वा,
मॉस्को, १९७६, पृष्ठे २३०-३१

४

संध्याकाळच्या वेळी विरंगुळा म्हणून मी मूळ ग्रीक भाषेतून रोमन यादवी युद्धांवरील ॲप्पियनचा ग्रंथ वाचतोय. फारच मौल्यवान ग्रंथ. हा लेखक जन्माने ईजिप्शियन आहे. श्व्लोस्सेर म्हणतो की याला "आत्मा नाही," याचे कारण बहुधा हे असावे की या यादवी युद्धांमध्ये तो भौतिक पायाच्या मुळाशी जाऊ पाहतोय. एकंदर प्राचीन इतिहासात स्पार्टाकस अत्यंत उत्कृष्ट माणूस असल्याचे उघडकीस आले आहे. महान सेनापती (गॅरिबाल्डी नव्हे), उदात्त स्वभावाचा, प्राचीन कामगारवर्गाचा खराखुरा प्रतिनिधी. पॉम्पे म्हणजे भलताच घाणेरडा; याने आपली लायकी असलेली कीर्ती लुकुल्लसच्या (मिथाइडेट्सविरुद्धच्या) विजयाचे श्रेय प्रथम उपटून, आणि नंतर सेर्टोरियुसच्या (स्पेन) विजयांचे वगैरे श्रेय उपटून संपादन केली, आणि सुल्ला व इतर यांचा "तरुण माणूस" म्हणून कीर्ती संपादन केली. सेनापती या नात्याने तो रोमन काळातला ऑडिलॉन बॅरट होता. सीझरच्या विरुद्ध आपले पाणी दाखवायची पाळी त्याच्यावर येताक्षणी--तो नालायक कुचकामी असल्याचे सिद्ध झाले. सीझरने आपल्याला विरोध करत असलेल्या या तुच्छतावाद्याला गोंधळात टाकण्यासाठी मोठ्यात मोठ्या लष्करी चुका--जाणूनबुजून मूर्खपणाच्या चुका--केल्या. एपिरसमध्ये लढ्याच्या अवधीत एखाद्या साध्या रोमन सेनापतीने--क्रॅस्सुसने म्हणा--त्याला सहा वेळा नेस्तनाबूद केले असते. परंतु पॉम्पेच्या बाबतीत सर्व काही शक्य होते. पॉम्पे खरोखरी काय होता[१३२] याची थोडीशी कल्पना शेक्स्पियरला त्याच्या Love's Labour Lost या नाटकात आलेली दिसते.

मार्क्स यांचे एन्गल्स यांना पत्र
तारीख २० फेब्रुवारी १८६१

मार्क्स आणि आणि एन्गल्स, **निवडक पत्रव्यवहार**,
मॉस्को, १९७५, पृष्ठे ११५-१६

कालडेरॉन

१

ही सत्ता[१३३] इतक्या भोंगळपणाने स्थापन केलेली, इतक्या भेदरटपणाने तयार केलेली, असल्या कालबाह्य आठवणी आपल्या प्रमुखपदी मिरवणारी—हिच्यावर क्रान्ती घडवून आणायची व नेपोलियनचा पाडाव करायची कामगिरी सोपविण्यात आली. तिची जाहीर निवेदने जितकी जोरदार असायची, तितक्याच तिच्या

कामगिऱ्या नेभळट असायच्या, आणि याचे कारण म्हणजे राज्यकर्त्या गटाने एक स्पॅनिश कवी डॉन मॅनुएल क्विन्टाना याला आपला कार्यवाह म्हणून नेमायची अभिरुचि दर्शविली आणि आपली जाहीर निवेदने लिहायचे काम त्याच्यावर सोपविले.

काल्डेरॉनचे बढाईखोर नायक जसे खऱ्याखुऱ्या मोठेपणाची गल्लत नेहमीच्या वैशिष्ट्याशी करून आपल्या सगळ्या पदव्यांची कंटाळवाणी नामावली सांगून आपली ग्वाही करत असत, तसे या राज्यकर्त्या गटाने स्वतःच्या उच्च भूमिकेला शोभेशा पदव्या व मानसन्मान यांची फर्माने जाहीर करण्यात पहिल्या प्रथम स्वतःला गुंतवून घेतले.

कार्ल मार्क्स, 'क्रान्तिकारक स्पेन"
इंग्रजीत लिहिलेला लेख
न्यूयॉर्क डेली ट्रिब्यून,
तारीख २० ऑक्टोबर १८५४

२

माझ्या फावल्या वेळात मी आता स्पॅनिश भाषेचा अभ्यास करतोय. काल्डेरॉनपासून सुरुवात केली. याचा Magicio Prodigioso या कॅथोलिक Faust कलाकृतीतून गटेने अलग अलग उतारे उसने घेतले इतकेच नव्हे, तर आपल्या स्वतःच्या Faust मधील सगळ्या प्रवेशांची संकल्पनाच उसनी घेतली. नंतर, horribile dictu, @ ज्या गोष्टी मला फ्रेंचमधून वाचणे अशक्य झाले असते त्या मी स्पॅनिश अनुवादातून वाचल्या. म्हणजे शेतोब्रियाँच्या Atala आणि Rene या कलाकृती आणि बेर्नार्डिन हे सेंट पियेरे याच्या ग्रंथातील काही भाग. आता मी Don Quixote वाचण्यात गढून गेलोय. मला असे आढळत आहे की इटालियन भाषेसाठी सुरुवातीला शब्दकोशाची गरज लागते, तिच्यापेक्षा स्पॅनिश भाषेसाठी त्याची अधिक गरज लागते.

मार्क्स यांचे एन्गल्स यांना पत्र,
तारीख ३ मे १८५४
मार्क्स/एन्गल्स वेर्के, खंड २८ वा,
१९६३, पृष्ठ ३५६

@ सांगायला भयंकर वाटते की—संपादक

३

स्पॅनिश नाटकामध्ये प्रत्येक नायकाच्या जोडीला दोन-दोन विदूषक असतात. काल्डेरॉन खुद्द पवित्र सायप्रियनला, म्हणजेच स्पॅनिश फाऊस्टला, मास्कोन व क्लारिन यांची जोड देतो. त्याच रीतीनुसार प्रतिगामी जनरल फॉन राडोवित्झ याच्या दिमतीला दोन विदुषकी ॲडज्यूटंट फ्रँकफूर्टच्या पार्लमेंटमध्ये होते, त्यातला एक होता त्याचा खुषमस्कऱ्या लिच्नोव्स्की आणि दुसरा होता त्याचा विदूषक विन्के.

कार्ल मार्क्स, "हेर वोग्ट"

मार्क्स/एन्गल्स, वेर्के, खंड १४ वा, १९६९, पृष्ठ ६०६

सेर्वान्टिस

१

सेर्वान्टिसने कुठेतरी एका प्रतिष्ठित alguacil चे @ व त्याच्या कारकुनाचे वर्णन केले आहे. हा महाभाग सार्वजनिक नीतीच्या रक्षणासाठी संशयास्पद चारित्र्य नसलेल्या[१३४] दोन स्त्रिया ठेवत असे. या परोपकारी पऱ्या मोठ्या जत्रांमध्ये किंवा इतर उत्सवाच्या प्रसंगी अशा पोशाखात वावरत असत की पक्षी त्याच्या पंखांवरून दुरून ओळखता येत असे. एखाद्या नवागताला जाळ्यात पकडणे त्यांना जर जमले तर आपण कोणत्या हॉटेलात गेलो आहोत ते आपल्या प्रियकरांना तावडतोब कळवायची व्यवस्था काही तरी युक्ति काढून त्या करत असत. मग तो alguacil आणि त्याचा कारकून त्या खोलीवर धाड घालत असत. त्या बाया भयंकर घाबरल्याचा बहाणा करीत असत आणि हे दोघे आपल्या प्रिय पात्रांना गठविणाऱ्यांविरुद्ध संतापाचे नाटक करत असत आणि त्या तिऱ्हाइताने खूप वेळ गयावया केल्यानंतर आणि नुकसानभरपाई-दाखल योग्य तेवढी रक्कम दिल्यानंतर त्याला निघून जाऊ देत असत. अशा प्रकारे ते स्वार्थ आणि सार्वजनिक नीतीचे हितसंबंध यांची सांगड घालत असत, कारण त्यांची शिकार झालेला इसम पुढचा काही काळ आपल्या अयोग्य प्रवृत्तींच्या आहारी न जाण्याची काळजी घेत असे.

नीतीच्या या राखणदारांप्रमाणेच प्रशियन सुव्यवस्थेचे वीर लष्करी कायद्याच्या अमदानीत नेहमीची शांतता राहायची पक्की तरतूद करण्यासाठी एका साध्या कार्य-पद्धतीचा अवलंब करतात. दारूच्या धुंदीतले न्यायाचे काही आधारस्तंभ चिथावणी

@ स्पॅनिश पोलिसांचा हस्तक –– संपादक

द्यायला घाबरायचे, तितकेच चिथावणीखोर असे काही तरवारबहाद्दर जनतेत गडबड माजवायला तयार असायचे आणि अशा प्रकारे एखाद्या दूरच्या शहरात किंवा खेड्यांत बंडखोरीची प्रवृत्ती जागृत केल्यावर लष्करी कायदा जारी करायची संधी उपलब्ध करून मिळते, आणखी अधिक अयोग्य दंगलीच्या विरुद्ध सगळ्या प्रांताच्या संरक्षणाची तरतूद करायला मिळते आणि त्या प्रांताच्या घटनात्मक हक्कांचे उरलेसुरले अवशेष त्याला फसवून नष्ट करता येतात.

कार्ल मार्क्स आणि फ्रेडरिक एन्गल्स
"नव्या लष्करी कायद्याची सनद"

मार्क्स/एन्गल्स, वेर्के, खंड ६ वा, १९६८,
पृष्ठ ४९५-९६

२

तथापि हे तरी स्पष्ट आहे की मध्ययुगे कॅथोलिक पंथावर गुजराण करू शकली नाहीत, आणि प्राचीन जग राजकारणावरही गुजराण करू शकले नाही. उलटपक्षी ज्या पद्धतीनुसार त्यांनी चरितार्थ चालविला तो पद्धतीच, इथे राजकारणाने आणि तिथे कॅथोलिक पंथाने मुख्य भूमिका कां बजावली याचा खुलासा करते. बाकीच्या बाबतीत म्हणाल तर, उदाहरणार्थ, रोमन प्रजासत्ताकाच्या इतिहासाशी अल्पसा परिचय देखील हे माहीत व्हायला पुरेसा आहे की त्याचा गुप्त इतिहास हा त्याच्या जमिनीच्या मालमत्तेचा इतिहास आहे. उलट पक्षी स्त्रीदाक्षिण्ययुक्त पराक्रम हा समाजाच्या सगळ्या आर्थिक प्रकारांशी मिळताजुळता असतो अशी चुकीची कल्पना करून घेतल्याबद्दल डॉन क्विक्झोटने फार पूर्वीच याची शिक्षा सोसलेली आहे.

कार्ल मार्क्स, भांडवल, खंड १ ला, मॉस्को,
१९७४, पृष्ठ ८६

सामाजिक विचार आणि साहित्य यांचा इतिहास

आधुनिक कालखंड

अभिजात नाट्यातील तीन एकवाक्यता

उदाहरणार्थ, चवदाव्या लुईच्या अमदानीतील फ्रेंच नाटककारांच्या तीन एकवाक्यतांची[१३५] तत्त्वविचारात्मक रचना ही ग्रीक नाटकाविषयीच्या (आणि त्याचा भाष्यकार ॲरिस्टॉटल याच्या विषयीच्या) चुकीच्या समजुतीवर आधारलेली आहे हे नक्कीच आहे. उलट पक्षी हे देखील तितकेच नक्की आहे की त्यांनी ग्रीकांचा अर्थ आपल्या स्वतःच्या कलेच्या गरजांशी मिळत्याजुळत्या रीतीनुसार लावला आणि म्हणून ते या तथाकथित "अभिजात" नाट्याला दीर्घकाळ हट्टाने चिकटून राहिले, आणि दारियेने व इतरांनी त्यांना ॲरिस्टॉटलचा अर्थ बिनचूकपणे समजावून सांगितला तरी त्यानंतर देखील ते तसेच चिकटून राहिले.

मार्क्स यांचे फर्डिनांड लासाल यास पत्र,
तारीख २२ जुलै १९६१

मार्क्स/एन्गल्स, वेर्के, खंड ३० वा, १९६४,
पृष्ठे ६१४-१५

ला रॉचेफोको

माझ्या पुस्तक संग्रहांची फेरमांडणी करत असतांना मला ला रॉचेफोको कृत Reflexions etc. ची[१३६] एक छोटी जुन्या आवृत्तीची प्रत मिळाली. ती चाळत असतांना मला हे सापडले :

"डोके ठिकाणावर असणे हा आत्म्याचे दोष लपविण्यासाठी शोधून काढण्यात आलेला शरीराचा एक गूढ रहस्यमय प्रकार असतो."

म्हणजे Stern ने हे ला रॉचे फोकोकडूनच लुबाडले एकूण!

ही वचने देखील फार छान आहेत :

"आपण सगळे इतरांच्या आपत्ती सोसायला पुरेसे सामर्थ्यवान असतो."

"म्हाताऱ्या लोकांना अतःपर वाईट उदाहरणे घालून देता येत नाहीत याच्या समाधानासाठी म्हणून चांगला उपदेश देणे आवडते."

"राजे नाण्यांच्या टाकसाळीप्रमाणे माणसांची टाकसाळ चालवितात, स्वतःला हवे ते मूल्य ते त्यांना देतात आणि त्यांच्या खऱ्या किंमतीनुसार नव्हे, तर त्यांच्या विनिमयाच्या दरानुसार ते स्वीकारणे आपल्याला भाग पडते."

"व्यसने जेव्हा आपल्याला सोडून जातात, तेव्हा आपणच त्यांना सोडून दिले आहे अशा समजुतीने आपण स्वतःची खुशामत करून घेतो."

"माफकपणा हा आत्म्याचा सुस्तपणा व आळशीपणा असतो, जशी महत्त्वाकांक्षा ही त्याची क्रियाशीलता व तडफ असते, त्याप्रमाणे."

"जे आपल्याला कंटाळा आणतात त्यांना आपण अनेकदा क्षमा करतो, परंतु ज्यांना आपण कंटाळा आणतो त्यांना आपण कधीही क्षमा करू शकत नाही."

"प्रेमी जनांना एकमेकांच्या सहवासाचा कंटाळा कधीही येत नाही याचे कारण म्हणजे ते नेहमी स्वतःविषयीच बोलत असतात."

मार्क्स यांचे एन्गल्स यांना पत्र
तारीख २६ जून १८६९
जर्मन व फ्रेंच भाषांतून लिहिलेले

मार्क्स/एन्गल्स, बेर्के, खंड ३२ वा, १९६५, पृष्ठे ३२६-२७.

जनजागृतीचे ऐतिहासिक महत्त्व

आधुनिक समाजसत्तावाद म्हणजे त्याच्या मूळ स्वरूपात काय असतो? आजच्या समाजात मालक व बिनमालक, भांडवलदार व पगारी कामगार यांच्या दरम्यान अस्तित्वात असलेल्या वर्गीय विरोधांना, एका अंगाने मान्यता देण्याची थेट परिणती; तर दुसऱ्या अंगाने, उत्पादनामध्ये अस्तित्वात असलेल्या अराजकाला मान्यता देण्याची थेट परिणती. परंतु, त्याच्या तत्त्वविचारात्मक स्वरूपात, आधुनिक समाजसत्तावाद हा मुळात अठराव्या शतकातील महान फ्रेंच तत्त्वज्ञान्यांनी घालून दिलेल्या तत्त्वांचा अधिक तर्कशुद्ध विस्तार असल्याचा वरपांगी दिसतो. प्रत्येक नव्या तत्त्वविचाराप्रमाणे, आधुनिक समाजसत्तावादाला पहिल्या प्रथम हाताशी तयार असलेल्या बौद्धिक रूढ भांडवलाशी स्वतःचा संबंध जोडणे भाग पडले, मग त्याची पाळेमुळे [भौतिक]@ आर्थिक सत्य घटनांमध्ये कितीही खोल रुजलेली असोत.

@ एन्गल्स यांनी आपल्या समाजसत्तावाद : मनोराज्यात्मक व शास्त्रीय या ग्रंथासाठी ॲन्टी-ड्यूहरिंग या आपल्या ग्रंथातील तीन प्रकरणांच्या संहितेचे पुनर्लेखन करताना मागाहून जो मजकूर भरीला घातला तो हा पेटीकंसातील मजकूर आहे.

फ्रान्समध्ये ज्या महापुरुषांनी लोकांची मने आगामी क्रान्तीसाठी तयार केली, ते स्वतःच आत्यंतिक क्रान्तिकारक होते. त्यांना कोणत्याही प्रकारची कसलीही बाह्य सत्ता मान्य नव्हती. धर्म, निसर्गविज्ञान, समाज, राजकीय संस्था--यातल्या प्रत्येक गोष्टीवर अत्यंत निर्भीड टीकेचे प्रहार करण्यात आले, बुद्धिवाद हा प्रत्येक गोष्टीचा एकमेव मानदंड झाला. तो काळच असा होता की हेगेल म्हणतो तदनुसार, त्या काळी जग स्वतःच्या डोक्यावर उभे राहिले; [१३७] पहिल्या प्रथम अशा अर्थाने की मानवी डोक्याने आणि त्याच्या विचारांतून निघालेल्या तत्त्वांनी सगळ्या मानवी कृतीचा व संबंधाचा आपण पाया आहोत असा दावा मांडला; परंतु क्रमाक्रमाने अशा देखील अधिक व्यापक अर्थाने, की जी वास्तवता या तत्त्वांच्या विरोधात होती, तिला वस्तुतः खाली डोके वर पाय अशी उभी करणे भाग होते. त्या वेळी अस्तित्वात असलेला समाजाचा व सरकारांचा प्रत्येक प्रकार, प्रत्येक जुनी पारंपरिक समजूत, बुद्धिवादाला अग्राह्य म्हणून अडगळीच्या खोलीत फेकून देण्यात आली; आतापर्यंत जगाने स्वतःला सर्वस्वी पूर्वग्रहांचेच नेतृत्व घेऊ दिलेले होते; जुन्या काळातील प्रत्येक गोष्ट केवळ कीव करण्याच्या व तिरस्कार करण्याच्याच योग्यतेची होती. आता, पहिल्या-प्रथम, सूर्यप्रकाश उदयास आलेला आहे, [बुद्धिवादाचे राज्य] उदयास आलेले आहे; यापुढे खुळ्या जमजुती, अन्याय, खास हक्क, जुलूम जबरदस्ती, या सगळ्यांना बाजूला सारून निसर्गावर व मानवाच्या जन्मसिद्ध हक्कांवर आधारलेल्या चिर सत्याचे, चिर न्यायाचे, समतेचे अधिराज्य येणार आहे.

आज आपण हे जाणून आहोत की बुद्धिवादाचे हे अधिराज्य म्हणजे भांडवलदारांच्या आदर्शात वसणाऱ्या राज्याहून अधिक काहीच नव्हते, या चिर न्यायाला आपली फलश्रुति भांडवलदारी न्यायामध्ये गवसली; या समतेने कायद्याच्या चौकटीतली भांडवलदारी समतेची अधोगती स्वतःवर लादून घेतली; भांडवलदारी मालमत्ता ही मानवाच्या मूलभूत हक्कांपैकी एक हक्क म्हणून जाहीर करण्यात आली; आणि बुद्धिवादाचे सरकार, रूसोचा सामाजिक करार, हा भांडवलदारी लोकशाही प्रजासत्ताक म्हणून उदयास आले, ते केवळ तशाच स्वरूपात उदयास येऊ शकले. अठराव्या शतकातले महान विचारवन्त, त्यांच्या पूर्वसूरींच्या प्रमाणेच, त्यांच्या कालखंडाने घालून दिलेल्या मर्यादांच्या पलीकडे जाऊ शकलेच नाहीत.

फ्रेडरिक एन्गल्स, ॲन्टी-डूहरिंगची
" प्रस्तावना "

एन्गल्स, ॲन्टी-डूहरिंग, मॉस्को,
१९७५, पृष्ठे २४-२५

ज्ञानकोशकारांचा भौतिकवाद

१

दरम्यानच्या काळात भौतिकवादाने इंग्लंडहून फ्रान्सकडे स्थलांतर केले आणि तिथे, कार्टेसिअॅनिझमची [१३८] एक शाखा असलेला, तत्त्वज्ञान्यांचा आणखी एक भौतिकवादी पंथ, याच्याशी त्याची गाठ पडली व उभयतांचा एकजीव झाला. फ्रान्समध्येदेखील पहिल्या प्रथम हा सर्वस्वी सरदारी सिद्धान्त होऊन राहिला. परंतु लवकरच त्याच्या क्रान्तिकारक स्वरूपाने स्वतःची छाप पाडली. फ्रेंच भौतिकवाद्यांनी आपली टीका धार्मिक श्रद्धेच्या विषयांपुरती मर्यादित ठेवली नाही; त्यांनी या टीकेचा विस्तार त्यांच्या आढळात आलेल्या कोणत्याही शास्त्रीय परंपरेपर्यंत किंवा राजकीय संस्थेपर्यंत वाढवत नेला; आणि आपला सिद्धान्त विश्वाला लागू पडणारा आहे हा आपला दावा सिद्ध करण्यासाठी त्यांनी सगळ्यांत जास्त जवळचा मार्ग पतकरला आणि, ज्याच्यामुळे त्यांना ज्ञानकोशकार हे नाव मिळाले, त्या ज्ञानकोश या प्रचंड ग्रंथराजामध्ये त्यांनी ज्ञानाच्या सगळ्या विषयांना आपला सिद्धान्त घीटपणाने लागू केला. अशा प्रकारे, त्याच्या दोन स्वरूपांपैकी—म्हणजे कट्टर भौतिकवाद किंवा ईश्वरवाद यांच्यापैकी— या अगर त्या स्वरूपांत हा सिद्धान्त फ्रान्समधील सगळ्या सुसंस्कृत तरुणांचे ब्रीद होऊन बसला; तो एवढ्या मोठ्या प्रमाणांत, की महान क्रान्तीचा जेव्हा उद्रेक झाला, त्या वेळी इंग्रज राजेशाहीवाद्यांनी जन्माला घातलेल्या सिद्धान्ताने फ्रेंच प्रजासत्ताकवाद्यांना व दहशतवाद्यांना तत्त्वविचारात्मक ध्वज दिला आणि मानवी हक्कांच्या जाहीरनाम्याची[१३९] संहिता उपलब्ध करून दिली.

फ्रेडरिक एन्गल्स, समाजसत्तावाद : मनोराज्यात्मक आणि शास्त्रीय

मार्क्स आणि एन्गल्स, निवडक ग्रंथ,
खंड ३ रा, मॉस्को, १९७३, पृष्ठ १०७

२

जसा कार्टेसियन भौतिकवाद यथायोग्य निसर्गविज्ञानात प्रवेश करतो, तसा फ्रेंच भौतिकवादाचा दुसरा प्रकार थेट समाजसत्तावादाच्या व कम्युनिझमच्या दिशेने वाटचाल करतो.

भौतिकवाद हा कम्युनिझमशी व समाजसत्तावादाशी कसा अवश्यमेव निगडित आहे हे भौतिकवादाच्या शिकवणुकीवरून पाहायला कसलीही मोठी सखोल दृष्टी असायची मुळीच जरूरी नाही. या शिकवणुकीत माणसांच्या मूळ चांगुलपणावर व समान बौद्धिक पात्रतेवर भर दिलेला आहे. अनुभव, सवय व शिक्षण यांच्या सर्वशक्तिमानतेवर भर दिलेला आहे; आणि माणसावरील वातावरणाचा प्रभाव, उद्योगधंद्याचे महान महत्त्व, उपभोगाचे समर्थन, इत्यादि; भौतिकवाद हा कम्युनिझमशी व समाजसत्तावादाशी कसा अवश्यमेव निगडित असतो;-- याच्यावर भर दिलेला आहे. माणूस जर आपले सगळे ज्ञान, संवेदना वगैरे इंद्रियांच्या जगापासून व त्यांत मिळविलेल्या अनुभवापासून संपादन करत असेल, तर मग जे करणे भाग असते ते म्हणजे इंद्रियगम्य जगाची रचना अशा रीतीने करायची की त्यांत जे खरोखरी मानवी असेल त्याचा अनुभव माणूस घेतो व त्याच्याशी परिचित होतो आणि माणूस या नात्याने तो स्वतःची जाणीव करून घेतो. बिनचूकपणे समजलेले हित हे जर सगळ्या नीतीचे तत्त्व असेल, तर माणसाच्या खासगी हिताचा मेळ मानव जातीच्या हिताशी घातला गेलाच पाहिजे. भौतिकवादी अर्थाने माणूस जर अस्वतंत्र असेल, म्हणजे हे अगर ते टाळायच्या विधातक शक्तीच्या द्वारा स्वतंत्र नव्हे, तर आपल्या खऱ्याखुऱ्या व्यक्तिमत्त्वाचा प्रभाव पाडायच्या विधायक शक्तीच्या द्वारा स्वतंत्र असेल, तर गुन्ह्याला शिक्षा व्यक्तीच्या ठायी करता कामा नये, तर गुन्ह्याचे समाजविरोधी स्रोत नष्ट केले पाहिजेत आणि प्रत्येक माणसाला आपल्या असण्याचे जिव्हाळ्याचे प्रकटीकरण करायला सामाजिक वाव देण्यात आला पाहिजे. माणूस वातावरणाकडून साकार होत असेल, तर त्याचे वातावरण मानवी केले पाहिजे. माणूस जर स्वभावतःच समाजप्रिय असेल तर तो आपला खरा स्वभाव केवळ समाजातच विकसित करील आणि त्याच्या स्वभावाच्या सामर्थ्याचे मोजपाम अलग अलग व्यक्तीच्या सामर्थ्याच्या योगाने नव्हे, तर समाजाच्या योगाने केले पाहिजे.

ही आणि यांच्यासारखी विधाने जुन्यात जुन्या फ्रेंच भौतिकवाद्यांच्या लेखनामध्ये जवळ जवळ अक्षरशः आढळून येतात. त्यांचे मूल्यमापन करायचे हे स्थळ नव्हे. लॉक याच्या अव्वल इंग्रज अनुयायांपैकी एक जो मॅन्डेव्हिल्ले, त्याचा ॲपॉलॉजिया ऑफ व्हाइसेस (दुर्गुणांचे समर्थन) हा ग्रंथ म्हणजे भौतिकवादाच्या समाजसत्तावादी प्रवृत्तींचा विशिष्ट नमुना आहे. आधुनिक समाजामध्ये दुर्गुण हा अपरिहार्य आणि उपयुक्त @ असतो असे तो सिद्ध करतो. हे आधुनिक समाजाचे समर्थन मुळीच नव्हते.

फूरियर तर फ्रेंच भौतिकवाद्यांच्या शिकवणुकीपासूनच थेट आपल्या युक्तिवादांचा प्रारंभ करतो. बाबूव्हिस्ट हे रासवट अपसंस्कृत भौतिकवादी होते, परंतु विकसित

@ बर्नाड डे मॅन्डेव्हिल्ले कृत मधमाश्यांची बोधकथा : किंवा खासगी दुर्गुण, सार्वजनिक फायदे. --संपादक

कम्युनिझमदेखील फ्रेंच भौतिकवादापासूनच थेट उद्‌भवलेला आहे. त्याला हेल्वेटियसने दिलेल्या स्वरूपांत तो फ्रेंच भौतिकवाद इंग्लंड या आपल्या मातृभूमीकडे परत गेला. बेन्थॅमने आपल्या अचूक समजलेल्या हिताची पद्धती हेल्वेटियसच्या नीतीवर आधारली, आणि ओवेनने इंग्लिश कम्युनिझमची स्थापना करण्यासाठी बेन्थॅमच्या पद्धतीपासूनच आरंभ केला. फ्रेंचमन कॅबेट हा हद्दपारीत असताना इंग्लंडमध्ये वास्तव्य करीत होता आणि तिथे कम्युनिस्ट विचारांच्या प्रभावाखाली आला आणि फ्रान्सला परतल्यानंतर कम्युनिझमचा अत्यंत उथळ प्रतिनिधी असूनही अत्यंत लोकप्रिय प्रतिनिधी झाला. ओवेनप्रमाणे अधिक शास्त्रीय दृष्टिकोन असलेले फ्रेंच कम्युनिस्ट, म्हणजे देझामी, गी आणि इतर, यांनी भौतिकवादाच्या शिकवणुकीचा विकास हा खऱ्या मानवतावादाची शिकवण म्हणून आणि कम्युनिझमचा तर्कसिद्ध आधार म्हणून केला.

कार्ल मार्क्स आणि फ्रेडरिक एन्गल्स,
द होली फॅमिली

मार्क्स आणि एन्गल्स, संकलित ग्रंथ,
खंड ४ था, मॉस्को, १९७५, पृष्ठे १३०-३१

ज्ञानजागृती आणि विरोध-विकास

दरम्यानच्या काळात, अठराव्या शतकातील फ्रेंच तत्त्वज्ञानाच्या समवेत व त्याच्या नंतर नवे जर्मन तत्त्वज्ञान उदयास आलेले होते आणि त्याची परिणति हेगेलच्या ठायी झाली. त्याचा मोठ्यात मोठा गुण म्हणजे त्याने विरोधविकास हा बुद्धिवादाचा सर्वोच्च प्रकार म्हणून पुन्हा अंगिकारला. जुने ग्रीक तत्त्वज्ञ हे सगळे जन्मजात नैसर्गिक विरोधविकासवादी होते आणि ॲरिस्टॉटल हा त्यांच्यातला सर्वोत्तम ज्ञानकोशयुक्त बुद्धिमत्ता असलेला तत्त्वज्ञ असून त्याने अगोदरच विरोधविकासवादी विचाराच्या अत्यंत आवश्यक प्रकारांचे विश्लेषण केलेले होते. उलटपक्षी नव्या तत्त्वज्ञानामध्ये देखील जरी विरोधविकासाचे तेजस्वी विवरणकर्ते असले (उदाहरणार्थ, देकार्त आणि स्पिनोझा) तरी देखील हे तत्त्वज्ञान विशेषेकरून इंग्रजांच्या प्रभावाच्याद्वारा तथाकथित अध्यात्मवादी विवेचन पद्धतीमध्ये अधिकाधिक घट्टपणे रुतून बसले. हिचे अठराव्या शतकातील फ्रेंचांवर देखील जवळ जवळ संपूर्ण वर्चस्व होते, निदानपक्षी त्यांच्या खास तत्त्वज्ञानविषयक कामगिरीवर तर होतेच होते. तरीदेखील मर्यादित अर्थाने तत्त्वज्ञानाच्या क्षेत्राबाहेर, फ्रेंचांनी विरोधविकासाचे सर्वोत्तम नमुने

निर्माण केले. या संदर्भात आपण दीदरोकृत Le Neven de Rameau आणि रूसोकृत Discours fur L'origine et les fundements de L'inegalite' parmi les hommes @ यांचे स्मरण केले तरी पुरेसे आहे.

फ्रेडरिक एन्गल्स, ॲन्टी-डूहरिंगची
"प्रस्तावना"

एन्गल्स, ॲन्टी-डूहरिंग, मॉस्को, १९७५,
पृष्ठे २७-२८

ज्ञानजागृतीचे उपयुक्ततावादी तत्त्वज्ञान

जनतेच्या सगळ्या बहुविध संबंधांचे विलीनीकरण एकाच उपयुक्ततेच्या संबंधामध्ये करण्याचा जो उघड दिसणारा हास्यास्पदपणा आहे, हे जे उघड दिसणारे आध्यात्मिक अमूर्तपण आहे, ते ज्या वस्तुस्थितीतून निर्माण होते ती म्हणजे ही की आधुनिक भांडवलदारी समाजामध्ये सगळे संबंध हे व्यवहारामध्ये एकाच अमूर्त द्रव्यविषयक व्यापारी संबंधाच्या अंकित असतात. हॉब्झ आणि लॉक यांच्याकरवी हा तत्त्वविचार पुढे आला, पहिल्या व दुसऱ्या इंग्लिश क्रान्त्यांच्या काळामध्ये, म्हणजे भांडवलदारांनी राजकीय सत्ता ज्या पहिल्या वहिल्या लढायांमध्ये जिंकून घेतली त्या काळामध्ये, पुढे आला. हा तत्त्वविचार याच्या अगोदरच्या काळातही आढळतो, तो अर्थात अर्थशास्त्राच्या लेखकांमध्ये गृहीत धरलेली पूर्व समजूत म्हणून आढळतो. अर्थशास्त्र हे उपयुक्ततेच्या या तत्त्वविचारांचे खरेखुरे शास्त्र आहे; त्याचा खरा आशय त्याला फिजिओक्रॅटस्‌मध्ये प्राप्त झालेला आहे, कारण अर्थशास्त्राचे पद्धतशीर विवरण करणारे तेच पहिले होते. हेल्वेटियस आणि हॉल्बॅच यांच्या ठायी या सिद्धान्ताचे आध्यात्मीकरण झालेले आपल्याला अगोदरच आढळू शकते, आणि क्रान्तीपूर्वी फ्रेंच भांडवलदारांनी अंगिकारलेल्या विरोधाच्या वृत्तीशी हा सिद्धान्त पूर्णपणे मिळताजुळता असाच आहे. हॉल्बॅच हा व्यक्तींच्या एकंदर कामगिरीचे त्यांच्या परस्पर व्यवहारांतील, उदाहरणार्थ, भाषण, प्रेम इत्यादि व्यवहारांतील चित्रण हे उपयुक्तता व उपयोगीकरण यांचा संबंध म्हणून करतो. म्हणून इथे अगोदर गृहीत धरलेले प्रत्यक्ष संबंध म्हणजे भाषण, प्रेम हे आहेत, ते व्यक्तींच्या निश्चित गुणांची निश्चित प्रकटीकरणे आहेत. आता हे जे

@ माणसांमधील विषमतेचा उद्‌गम व तिचे आधार या विषयाचे विवेचन —संपादक

संबंध आहेत त्यांना विशिष्ट अर्थ आहे असे समजण्यात येत नाही, परंतु त्यांच्यावर आरोपित केलेल्या कसल्यातरी तिसऱ्याच संबंधाची ते अभिव्यक्ति आहेत, म्हणजे उपयुक्तता किंवा उपयोगीकरण याचा संबंध याची ते अभिव्यक्ति आहेत असे समजण्यात येते. ही वेगळ्या शब्दातली पुनरुक्ति अर्थशून्य व अनमान धपक्याची व्हायची केवळ तेव्हांच थांबते, की जेव्हा या संबंधांना व्यक्तीच्या लेखी त्यांच्या स्वतःच्या हिशेबी अर्थ राहतो, तो म्हणजे स्वयंस्फूर्त कामगिरी म्हणून नव्हे, तर सोंगे म्हणून हा अर्थ राहतो, मात्र ही सोंगे उपयोगीकरणाच्या कक्षेतली मुळीच नसतात, परंतु उपयुक्ततेचा संबंध असे नाव असलेल्या प्रत्यक्षांतल्या तिसऱ्या उद्दिष्टाची व संबंधाची सोंगे असतात.

शाब्दिक सोंगाला केवळ तेव्हाच अर्थ प्राप्त होतो की जेव्हा ते प्रत्यक्षातल्या सोंगाची अभावित किंवा जाणूनबुजून केलेली अभिव्यक्ति असते. या बाबतीत उपयुक्ततेच्या संबंधाला अगदी निश्चित असा अर्थ असतो. तो म्हणजे हा की अन्य कुणाची तरी हानि करून मला स्वतःचा फायदा करून घेता येतो (exploitation de l'homme par l'homme); याच्या भरीला या बाबतीत कोणत्या तरी संबंधापासून मला जो उपयोग होतो तो या संबंधातून सर्वस्वी बाहेरचा असतो, कारण आपण वर कर्तबगारीच्या (Vermogen) संबंधात पाहिले आहे तदनुसार प्रत्येक कर्तबगारीकडून तिच्याशी संबंध नसलेल्या अशा पैदाशीची मागणी करण्यात आली, आणि हा संबंध सामाजिक संबंधांतून निश्चित करण्यात आलेला असतो—आणि नेमका हाच उपयुक्ततेचा संबंध असतो. हे सगळे प्रत्यक्षांत भांडवलदाराच्या बाबतीत लागू असते. भांडवलदाराच्या लेखी केवळ एकच संबंध त्याच्या स्वतःच्या हिशेबी लागू असतो—तो म्हणजे शोषणाचा संबंध; इतर सगळे संबंध केवळ तो त्यांना या एका संबंधात सामील करू शकत असेल तेवढ्याच प्रमाणात लागू असतात; आणि जिथे शोषणाच्या संबंधाच्या थेट अंकित करून घेता येत नाहीत असे संबंध जर त्याच्या आढळात आले तर तिथे देखील तो या संबंधांना किमानपक्षी आपल्या कल्पनेत अंकित करून घेतो. या वापराची भौतिक अभिव्यक्ती म्हणजे पैसा; हा पैसा सगळ्या वस्तू, लोक व सामाजिक संबंध यांच्या मूल्याचे प्रतिनिधित्व करतो. ओघाओघात सांगायचे म्हणजे आपल्याला एका दृष्टिक्षेपात असे दिसते की "उपयोगीकरण" ही कक्षा इतर लोकांशी माझे जे व्यवहाराचे प्रत्यक्ष संबंध आहेत त्यातून प्रथम अलग करण्यात येते. (परंतु विचारातून आणि निव्वळ इच्छेतून मुळीच नव्हे) आणि नंतर हे संबंध खुद्द त्यांच्यातून अलग करण्यात आलेल्या कक्षेची वास्तवता असल्याचे दर्शविण्यात येते, म्हणजे ही कार्यपद्धतीची सर्वस्वी आध्यात्मिक रीत असते. नेमक्या त्याच रीतीने आणि त्याच समर्थनानिशी हेगेल सगळ्या संबंधांचे चित्रण वस्तुनिष्ठ आत्म्याचे संबंध असे करतो. म्हणूनच हॉब्बेचचा तत्त्वविचार हा त्या वेळी फ्रान्समध्ये नुकत्याच विकसित होत असलेल्या भांडवलदारांविषयींचा ऐति-

ऐतिहासिकदृष्ट्या समर्थनीय ठरलेला तात्त्विक भ्रम आहे; या भांडवलदारांना लागलेली शोषणाची तळमळ ही जुन्या सरंजामी बेड्यांतून मुक्त झालेल्या व्यवहाराच्या परिस्थितीतील व्यक्तींच्या संपूर्ण विकासासाठी लागलेली तळमळ म्हणून अजूनही मानली जाऊ शकली. भांडवलदारांच्या दृष्टिकोनातून बंधविमोचन म्हणजेच स्पर्धा ही अर्थात अठराव्या शतकाच्या लेखी अधिक मुक्त विकासासाठीच नव्या कर्तबगारीला व्यक्तींना उपलब्ध करून द्यायचा एकमेव संभाव्य मार्ग होती. या भांडवलदारी व्यवहाराशी जुळणाऱ्या अशा जाणिवेची तत्त्वविचारात्मक घोषणा, परस्पर शोषणाची जाणीव ही सगळ्या व्यक्तींचा सार्वत्रिक परस्परसंबंध म्हणून घोषणा, हे देखील धाडसी व उघडउघड पुढचे पाऊल होते. ती अशा प्रकारची ज्ञानजागृती होती, की जी सरंजामशाहीच्या अमदानीतील शोषणाच्या राजकीय, पुरुषप्रधान, धार्मिक व भावनात्मक सजावटीचा अर्थ धर्मनिरपेक्ष रीतीने लावत होती; ही सजावट त्या काळी अस्तित्वात असलेल्या शोषणाच्या प्रकाराशी मिळतीजुळती होती आणि तिला विशेषतः अनियंत्रित राजेशाहीच्या तत्त्वविचारक लेखकांनी पद्धतशीर रूप दिलेले होते.

कार्ल मार्क्स आणि फ्रेडरिक एन्गल्स
जर्मन विचारसरणी
मार्क्स आणि एन्गल्स, संकलित ग्रंथ,
खंड ५ वा, पृष्ठे ४०९-१०

व्हॉल्टेअर

१

रशियन सरदार हे तरुण वयात जर्मन विद्यापीठांमध्ये व पॅरिस शहरी शिक्षण घेतलेले असतात. पाश्चात्यांकडून जे अत्यंत जहाल मिळण्याजोगे असेल ते सदैव आत्मसात करायची त्यांची वृत्ती असते. हा शुद्ध gourmandise (आघाशीपणा) असतो आणि फ्रेंच सरदार वर्गाच्या एका भागाने देखील अठराव्या शतकाच्या अवघीत याच रीतीने आपली कामगिरी चालविलेली होती. त्या काळी व्हॉल्टेअर आपल्या स्वतःच्या ज्ञानजागृतिविषयक तत्त्वज्ञानाला अनुलक्षून असे म्हणाला : "Ce n'est pas pour les tailleurs et les mottiers"@ असे असून

@ हे शिंप्यांसाठी आणि चांभारांसाठी नव्हे.--संपादक

देखील याच्या योगाने या रशियनांना सरकारी नोकरीत शिरकाव होताक्षणी बदमाष होण्यापासून प्रतिबंध होत नाही.

मार्क्स यांचे लुडविग कुगेलमान्न यांस पत्र,
तारीख १२ ऑक्टोबर १८६८
मार्क्स / एन्गल्स, वेर्के, खंड ३२ वा, १९६५,
पृष्ठ ५६७

२

त्या काळी जागृत "लोकमत" युरोपात अगोदरच उपलब्ध होते. टाइम्स वृत्तपत्राने ही वस्तू आपल्या कारखान्यात अजून पैदा करायला सुरुवात केली नसली, तरी देखील दीदरो, व्हॉल्टेअर, रूसो आणि अठराव्या शतकातील इतर फ्रेंच लेखक यांच्या प्रचंड प्रभावाच्या योगाने निर्माण केलेले त्या प्रकारचे लोकमत अस्तित्वात होते. शक्य असल्यास लोकमत आपल्या बाजूला असणे महत्त्वाचे आहे हे रशियाला नेहमी ठाऊक असे, आणि ते तसे आपल्या बाजूला करून घ्यायची काळजी देखील रशिया घेत असे. राणी कॅथेराइन दुसरी हिचा दरबार हे त्या काळातल्या ज्ञानी पुरुषांचे, त्यातल्या त्यात फ्रेंचांचे, प्रमुख ठिकाण करण्यात आले होते; महाराणीने आणि तिच्या दरबाराने अत्यंत ज्ञानी तत्त्वांचा अंगिकार केलेला होता आणि त्यांना फसविण्यात तिने इतके चांगले यश मिळविले, की व्हॉल्टेअर आणि इतर अनेक या "उत्तरेकडील सेमिरामिसचे" गुणगान करू लागले आणि त्यांनी असे जाहीर केले की रशिया हा जगातला सगळ्यांत जास्त पुरोगामी देश आहे, हे उदारमतवादी तत्त्वांचे माहेरघर आहे, आणि हा देश धार्मिक सहिष्णुतेचा वाली आहे.

फ्रेडरिक एन्गल्स, "श्रमिक वर्गांना पोलंडशी
काय करायचे आहे"
इंग्रजीत लिहिलेला लेख
द कॉमनवेल्थ, तारीख ५ मे १८६६

दीदरो

१

मानवजाती, किमानपक्षी सध्याच्या क्षणी, एकंदरीने पाहता पुरोगामी दिशेने वाटचाल करीत आहे या ठाम मताचा संबंध भौतिकवाद व अध्यात्मवाद यांच्या

दरम्यानच्या विरोधाशी अजिबात नाही. फ्रेंच भौतिकवाद्यांनी आणि तितक्याच प्रमाणात ईश्वरवादी व्हॉल्टेअर व रूसो यांनी हे ठाम मत जवळ जवळ पिसाट प्रमाणात कवटाळून धरले, आणि त्यांनी अनेकदा याच्यासाठी मोठ्यात मोठे व्यक्तिगत त्याग केले. उदाहरणार्थ, जर कधी काळी कोणी "सत्य आणि न्याय यांच्यासाठीच्या उत्साहाप्रीत्यर्थ"-- ही शब्दयोजना चांगल्या अर्थाने उपयोगात आणायची—आपले सगळे आयुष्य अर्पण केले असेल, तर ते म्हणजे दीदरो याने. म्हणून हा सगळा अध्यात्मवाद [१४०] आहे असे जर स्टार्के जाहीर करत असेल, तर यावरून एवढेच सिद्ध होते की या संदर्भात त्याच्या लेखी भौतिकवाद हा शब्द आणि या दोन प्रवृत्तींच्या दरम्यानचा सगळा विरोध आपला सगळा अर्थ घालवून बसलेला आहे.

फ्रेडरिक एन्गल्स, लुडविग फॉयरबाख आणि अभिजात तत्त्वज्ञानाचा अन्त

मार्क्स आणि एन्गल्स, निवडक ग्रंथ, खंड ३ रा, मॉस्को, १९७३, पृष्ठे ३५२-५३

२

आज मला आमच्या घरी Neveu de Rameau या ग्रंथाच्या दोन प्रतींचा योगायोगाने शोध लागला, आणि म्हणून मी त्यातली एक प्रत तुम्हाला पाठवीत आहे. ही अपूर्व कलाकृति तुम्हाला पुन्हा एकदा मोठा आनंद देईल. या विषयाला अनुलक्षून वृद्ध हेगेल म्हणतो :

"आपल्या स्वतःच्या चिन्ताक्रान्त व विदीर्ण अवस्थेची जाणीव असणे आणि तदनुसार स्वतःची अभिव्यक्ती करणे;— याचा अर्थ म्हणजे स्वतःच्या अस्तित्वावर, सगळ्याला व स्वतःला देखील व्यापून राहिलेल्या गोंधळावर, तिरस्कारयुक्त हसण्याचा मारा करणे असा होतो. त्याच वेळी हा सगळा गोंधळ मरणाच्या पंथाला लागलेला आहे आणि असे असूनही तो तसा करत असल्याची स्वतःला जाणीव आहे.

....हा अशी परिस्थिती आहे की जीमध्ये सगळ्या संबंधांच्या स्वरूपाच्या चिंधड्या झालेल्या आहेत, आणि हे त्या सगळ्यांचे जाणीवयुक्त चिंधड्या होणे आहे.... आत्म्यामध्ये या परत येण्याच्या बाबतीत सगळ्या वस्तूंचे वैयर्थ्य हे त्याचे स्वतःचे वैशिष्ट्यपूर्ण वैयर्थ्य आहे, किंवा ते स्वतःचे वैयर्थ्य आहे..... परंतु केवळ स्वयं-जाणीव ही उठाव करण्याला जागृत करण्याच्या योगानेच तिला स्वतःच्या विशिष्ट ओढाताण झालेल्या व उध्वस्त अवस्थेची जाण येते. या जगाच्या प्रत्येक भागाला असे आढळून येते की आपला आत्मा तिथे व्यक्त झालेला आहे किंवा त्याच्याविषयी बोलले जात आहे आणि तो काय आहे ते त्याच्याविषयी म्हटल्याचे त्याला आढळून

येत आहे. प्रामाणिक आत्मा हा प्रत्येक क्षण म्हणजे कायमची व आवश्यक वास्तवता मानतो, आणि असंस्कृत व विचारशून्य अवस्था मानतो, ही अवस्था विचार करत नसते आणि आपण नेमके उलट करत आहोत हे तिला ठाऊक असते. तथापि चिन्ताक्रांत व विदीर्ण आत्म्याला या उलट कृतीची जाणीव असते; वस्तुतः ती सर्वंकष उलट कृतीची अवस्था असते. तिथे संकल्पनात्मक तत्त्वाचे वर्चस्व असते, प्रामाणिक आत्म्याच्या बाबतीत ते दूर दूर असलेले विचार एकाच एकात्मतेत एकत्र करते, आणि म्हणून त्याच्या अर्थावर आवरण घालणारी भाषा ही तडफेने व बुद्धिमत्तेने (geistreich) भरलेली असते.

आत्म्याने उच्चारलेला आशय, आणि स्वतःविषयी उच्चारलेला, हा मग सगळ्या संकल्पनांचा व वास्तवांचा उलट प्रकार व विकृतीकरण होतो, स्वतःची व इतरांची सार्वत्रिक फसवणूक होतो. ही फसवणूक सांगण्यात व्यक्त झालेला निर्लज्जपणा हा नेमक्या त्याच हिशेबाने मोठ्यांत मोठे सत्य होतो....जो निवांत आत्मा अन्तःकरणाच्या साध्या प्रामाणिकपणाच्या भरात चांगल्याचे व सत्याचे संगीत स्वराचा मेळ व सुराचा एकसाचीपणा यांत असल्याचे मानतो, म्हणजे सुरेल तारेमध्ये असल्याचे मानतो, इत्यादि" (यानंतर दीदरोच्या ग्रंथातील उतारा दिलेला आहे)[१४१]

हेगेलच्या भाष्यापेक्षाही अधिक मनोरंजक भाष्य एम्. जूल्स जानीन[१४२] याने केलेले आहे आणि त्यातले उतारे ग्रंथाच्या परिशिष्टात दिलेले आहेत. cardinal de la mer @ असा शोध लावतो की दीदरोच्या Rameau मध्ये कसल्याही नैतिक संदेशाची उणीव आहे आणि रामेओचा विकृतपणा हा तो "जन्मतः सद्गृहस्थ" नाही याविषयीची त्याला जी खंत वाटते तीतून उद्भवला आहे असा शोध लावून त्याने ही उणीव दुरुस्त केलेली आहे. या कोनशिलेवर त्याने जो कोत्झेबुएनियन कचऱ्याचा दीग उभारलेला आहे, त्याचे प्रयोग लंडन शहरी राणा भीमदेवी (मेलोड्रॅमॅटिक) शैलीत चाललेले असतात. दीदरोकडून जूल्स जानीनपर्यंतचा मार्ग म्हणजे इंद्रियविज्ञान शास्त्रज्ञ ज्याला पीछेहाटीचे स्वरूपान्तर म्हणतात तोच नेमका आहे : म्हणजे फ्रेंच राज्यक्रान्तीच्या पूर्वीचे फ्रान्सचे मन, आणि लुई फिलिपच्या अमदानीतले फ्रान्सचे मन!

मार्क्स यांचे एन्गल्स यांस पत्र,
तारीख १५ एप्रिल १८६९

मार्क्स/एन्गल्स, वेर्के, खंड ३२ वा, १९६५,
पृष्ठे ३०३-०४

@ सागराचा कार्डिनल. –संपादक

३

Rameau ग्रंथाबद्दल अनेक धन्यवाद. हा मला फार मोठा आनंद देईल.

एन्गल्स यांचे मार्क्स यांस पत्र,
तारीख १६ एप्रिल १८६९
मार्क्स/एन्गल्स, वेर्के, खंड ३२ वा, १९६५,
पृष्ठ ३०५

रूसो

१

शेवटची गोष्ट म्हणजे : रूसोचा समतेचा सिद्धान्त देखील—आणि ड्रूहरिंगचा सिद्धांत हा याचाच केवळ क्षीण व विकृत प्रतिध्वनी आहे—हेगेलियन नकाराचा नकार या सिद्धान्ताने सुइणीची कामगिरी केली नसती तर जन्मालाच आला नसता—मात्र ही गोष्ट हेगेल जन्माला यायच्या सुमारे वीस वर्षे अगोदर घडली. आणि याची शरम मुळीच न बाळगता हा सिद्धांत आपल्या पहिल्या प्रदर्शनात[१४३] आपल्या विरोध-विकासात्मक उगमाचा शिक्का जवळ जवळ दिमाखाने मिरवतो. निसर्गाच्या व रानटी अवस्थेत माणसे समान होती; आणि रूसो तर भाषा देखील निसर्गाच्या अवस्थेचे विकृतीकरण असल्याचे मानतो. म्हणून एकाच जातीच्या मर्यादेत असलेली प्राण्यांची समता प्राणिमानवांच्यापर्यंत विस्तारण्याचे त्याचे म्हणणे पूर्णपणे समर्थनीय ठरते; हेगेलने अलिकडेच या प्राणि-मानवांचे वर्गीकरण प्रमेयदृष्ट्या आलाली : वाचाशून्य असे केले आहे. परंतु समानता असलेल्या या प्राणिमानवांच्या ठायी असा एक गुण होता की जो त्यांना इतर प्राण्यांवर मात करायला उपयोगी ठरला : तो म्हणजे परिपूर्णत्व, म्हणजे आणखी अधिक विकास करण्याची क्षमता; आणि हे विषमतेचे कारण ठरले. म्हणून विषमतेचा उदय ही प्रगती आहे असे रूसो मानतो. परंतु या प्रगतीमध्ये एक अंतर्विरोध सामील होता. तो म्हणजे त्याच वेळी ही परागती होती.

"सगळी पुढची प्रगती [मूळ अवस्थेच्या पलीकडील] म्हणजे वरकरणी व्यक्तिगत माणसाच्या परिपूर्णतेच्या दिशेने टाकलेली अमुक इतकी पावले असा अर्थ होता, परंतु वास्तवात ही वंशाच्या ऱ्हासाच्या दिशेने टाकलेली पावले असा अर्थ होता .....धातुविद्या आणि शेती या दोन कला अशा होत्या की यांच्या शोधाने ही महान क्रान्ति निर्माण केली" (प्राचीन अरण्याचे परिवर्तन लागवडीला आणलेल्या जमिनीत करणे, परंतु याच्या जोडीला मालमत्तेच्या द्वारा दारिद्र्य आणि गुलामगिरी यांचा प्रारंभ झाला). "कवीच्या लेखी सोने आणि चांदी, परंतु तत्त्वज्ञान्याच्या लेखी लोखंड आणि धान्य, —यांनीच माणसांना सुधारले आहे आणि मानवजातीचा विध्वंस केला आहे."

संस्कृतीची प्रत्येक नवी प्रगति ही त्याच वेळी विषमतेची नवी प्रगती ठरते. संस्कृतीच्या उदयाबरोबर उदयास आलेल्या समाजाने उभारलेल्या सगळ्या संस्था त्यांच्या मूळ उद्दिष्टाच्या उलट स्वरूपात बदलतात.

"ही एक निर्विवाद वस्तुस्थिती आहे, आणि सगळ्या सार्वजनिक कायद्याचे मूलभूत तत्त्व आहे, की जनता आपल्या स्वातंत्र्याच्या रक्षणार्थ आपल्या प्रमुखांच्या नेमणुका करतात, आणि त्या त्यांनी आपल्याला गुलाम करण्यासाठी नव्हे."

आणि असे असूनही हे प्रमुख अवश्यमेव जनतेवर जुलूम करणारे होतात, आणि आपला जुलूम अशा बिन्दूपर्यंत तीव्र करून ठेवतात की त्या बिंदूवर विषमता, कमालीचा अतिरेक गाठल्यानंतर ती पुन्हा तिच्या विरुद्ध रूपात बदल करून येते आणि समतेचे कारण होऊन बसते : अरेरावाच्या पुढ्यात सगळेच समान असतात--म्हणजे सारखेच शून्य असतात.

"इथे आपल्याला विषमतेचे आत्यंतिक स्वरूप भेटते. म्हणजे असा अंतिम बिंदू की जो वर्तुळाची परिपूर्तता करतो आणि जिथून आपण सुरुवात केली त्या बिन्दूला भेटतो : इथे सगळ्या खासगी व्यक्ती पुन्हा एकदा समान होतात, म्हणजे केवळ याच कारणासाठी, की त्या शून्य असतात आणि त्या प्रजाजनांना त्यांच्या धन्याच्या इच्छेखेरीज अन्य कोणताही कायदा नसतो." परंतु अरेराव हा जोपर्यंत जबरदस्तीचा वापर करायला समर्थ असतो तोपर्यंतच तो धनी असतो आणि आणि म्हणून "जेव्हा त्याची हकालपट्टी होते," तेव्हा त्याला "जबरदस्तीच्या वापराबाबत तक्रार करता येत नाही.... जबरदस्तीनेच केवळ त्याला सत्तेवर टिकवून ठेवले, आणि जबरदस्तीच केवळ त्याला उलथून पाडते; अशा प्रकारे प्रत्येक गोष्ट आपला नैसर्गिक मार्ग अनुसरते."

आणि म्हणून विषमता पुन्हा एकदा बदलून समतेचे रूप घेते; तथापि पूर्वीच्या वाचाहीन आदिम मानवांची ही नैसर्गिक समता नसते, परंतु सामाजिक कराराची ही उच्चतर समता असते. जुलूमकर्त्यांवर जुलूम करण्यात येतो. हा नकाराचा नकार असतो.

म्हणून आपल्याला अगोदरच रूसोच्या ठायी मार्क्सच्या भांडवल या ग्रंथात विकसित केलेल्या विचाराशी तंतोतंत मिळती जुळती अशी विचाराची दिशा आढळते इतकेच नव्हे, तर मार्क्सने उपयोगात आणलेल्या विरोध-विकासाच्या शब्दयोजनेची तीच सबंध मालिका तपशीलवार आढळते. म्हणजे ज्या प्रक्रिया आपल्या स्वरूपात परस्परविरोधी असतात, त्यांच्यामध्ये अन्तर्विरोध असतो; एका अतिरेकाचे परिवर्तन त्याच्या विरोधी अतिरेकात होते; आणि शेवटी एकंदर गोष्टीचा गाभा म्हणून, नकाराचा नकार होतो.

फ्रेडरिक एन्गल्स, ॲन्टी-ड्यूहरिंग,
मॉस्को, १९७५, पृष्ठे १५९-६१

२

इतिहासकार रॉमेर याच्या प्रमाणे मध्यवर्गीयांचा पिंड एका-अंगाने आणि दुसऱ्या-अंगाने असा असतो. हे त्याच्या आर्थिक हितसंबंधांना पोषक असे असते, आणि म्हणून त्याच्या राजकारणाला, धार्मिक, शास्त्रीय व कलात्मक मतांना पोषक असते. तसेच त्याच्या नीतीला आणि सगळ्याच गोष्टींना पोषक असते. याच्या भरीला तो जर प्रुधाँप्रमाणे चलाख माणूस असेल तर तो लवकरच आपल्या स्वतःच्या अन्तर्विरोधांशी खेळ करायला शिकेल आणि परिस्थितीनुसार त्यांचा विकास ठसठशीत, नेत्रदीपक, मध्येच निंदाखोर, मध्येच तेजस्वी अशा परस्परविरोधी गोष्टींच्या स्वरूपात करून ठेवील या सगळ्यांना चालना देणारा एकमेव उद्देश असतो, तो म्हणजे स्वतःचा पोकळ अभिमान, आणि त्याच्या लेखी, तसेच सगळ्या पोकळ अभिमानी लोकांच्या लेखी, एकमेव प्रश्न म्हणजे क्षणिक यश हा असतो, त्या दिवसापुरती सनसनाटी गोष्ट हा असतो. अशा प्रकारे साधी नैतिक हिकमत, जी, उदाहरणार्थ, एखाद्या रूसोला सत्ताधाऱ्यांशी तडजोड करण्याच्या देखाव्यापासून देखील सदैव दूर ठेवून राहिली, ती अवश्यमेव विलयाला जाते.

कार्ल मार्क्स, प्रुधाँविषयी,

मार्क्स आणि एन्गल्स, निवडक ग्रंथ,
खंड २ रा, मॉस्को, १९७३, पृष्ठ ३०

ज्ञानजागृतीच्या क्रान्तिकारक व बुद्धिवादी प्रवृत्तींची प्रतिक्रिया अशी भावनाविवशता

कोणताही विकास, मग त्याचा गाभा काहीही असो, हा विकासाच्या वेगवेगळ्या टप्प्यांची मालिका म्हणून सादर होण्याजोगा असतो, सादर करता येतो, आणि हे टप्पे एकमेकाशी अशा रीतीने निगडित असतात की एक टप्पा दुसऱ्याचा नकार होऊन बसतो. उदाहरणार्थ, एखाद्या जनतेचा विकास जर निरकुंश राजेशाहीतून घटनात्मक राजेशाहीत होत असेल, तर ती आपल्या अगोदरच्या राजकीय अस्तित्वाला नकारात्मक रूप देते. कोणत्याही क्षेत्रामध्ये आपल्या अगोदरच्या अस्तित्वाच्या पद्धतीला नकारात्मक रूप दिल्याखेरीज आपण विकसित होऊच शकत नाही. नकाराचे रूपान्तर नीतीच्या भाषेत करणे म्हणजे : नाकारणे.

नाकारणे ! हा परवलीचा शब्द घेऊन तुच्छतावादी माणूस टीकाकाराच्या भूमिकेविषयी कोणतीही घटना समजून न घेता धिःकारू शकतो; आपला विकासाला अयोग्य असा अविकास हा नैतिक स्वच्छपणा म्हणून तिच्या शेजारी गंभीरपणे मांडू शकतो. अशा प्रकारे राष्ट्रांच्या धार्मिक कल्पनाविलासाने भोंळेपणाच्या युगाला, सुवर्ण युगाला, इतिहास-पूर्वकालात संक्रमित करून, म्हणजे अशा काळामध्ये संक्रमित करून की ज्या काळात कसलाही ऐतिहासिक विकास मुळी घडलाच नाही आणि म्हणून नकारही झाला नाही व नाकारणेही झाले नाही—या कल्पनाविलासाने बहुतांशी इतिहासाचा अधिक्षेप केला आहे. अशा प्रकारे क्रान्तीच्या गदारोळाच्या युगांमध्ये, अठराव्या शतकातल्या प्रमाणे जोरदार, आवेशपूर्ण नकार देण्याच्या व नाकारण्याच्या काळांमध्ये, गेस्नेरा सारखे प्रामाणिक, सदिच्छा प्रेरित, सुसंस्कृत, आदरणीय दांडगेश्वर पुढे सरसावतात आणि कल्पनारम्य युगांच्या विकासाला अक्षम अशा अवस्थेला इतिहास भ्रष्ट करण्याच्या विरोधात उभी करतात. तथापि असे असूनही या कल्पनारम्यतावादी कवींना या गोष्टीचे श्रेय द्यायला हवे की ते एक प्रकारचे समीक्षात्मक नीतिवादीही होते आणि नीतीचा उपदेश करणारे समीक्षकही होते, आणि नैतिकतेचे श्रेय मेंढपाळाला द्यावे किंवा मेंढरांना द्यावे या बाबतीत ते सदसद्विवेकबुद्धीला स्मरून घरसोडवृत्ती धारण करीत आहेत.

कार्ल मार्क्स, "नीतीचा उपदेश करणारी समीक्षा आणि समीक्षणात्मक नैतिकता"

मार्क्स आणि एन्गल्स, संकलित ग्रंथ, खंड ६ वा, मॉस्को, १९७६, पृष्ठे ३१७-१८.

ज्ञानजागृतीच्या ध्येयांचे अरिष्ट

क्रान्तीचे अग्रदूत असलेले अठराव्या शतकातले फ्रेंच तत्त्वज्ञानी हे अस्तित्वात असलेल्या सगळ्याचा न्यायनिवाडा करणारी एकमेव गोष्ट म्हणून बुद्धीलाच कौल कसा लावत असत हे आपण "प्रस्तावनेमध्ये" १४४ पाहिले. बुद्धिवादी सरकार, बुद्धिवादी समाज, यांची स्थापना करण्यात आली; जे जे काही चिरस्थायी बुद्धिवादाच्या विरोधात असेल, ते ते सगळे निर्घृणपणे भिरकावून देण्यात यायचे होते. तसेच त्या वेळी नुकता कुठे भांडवलदार म्हणून उत्क्रान्त होत असलेला जो अठराव्या शतकातला नागरिक होता,

तो म्हणजे वास्तवात या चिरस्थायी बुद्धिवादाचा आदर्शीकृत समज असण्याखेरीज अन्य काहीही नव्हता हे देखील आपण पाहिले. फ्रेंच राज्यक्रान्तीने या बुद्धिवादी समाजाला व सरकाराला अस्तित्वात आणलेले होते.

परंतु ही नवी सुव्यवस्था, अगोदरच्या परिस्थितीच्या तुलनेत पुरेशी बुद्धिवादी असली, तरी ती सर्वस्वी बुद्धिवादी अजिबात नाही असे उघडकीस आले. बुद्धिवादावर आधारलेली राज्यसंस्था संपूर्णपणे कोसळली. रुस्सोच्या सामाजिक कराराची परिणति दहशतीच्या राजवटीत झाली, आणि स्वतःच्या राजकीय कर्तृत्वावरचा विश्वास हरवून बसलेल्या भांडवलदारांनी या राजवटीला सोडून प्रथम डायरेक्टोरेटच्या भ्रष्टाचाराचा आश्रय घेतला आणि शेवटी त्यांनी नेपोलियनच्या अरेरावशाहीच्या पंखाखाली आश्रय घेतला. अभिवचन दिलेल्या शाश्वत शान्ततेचे परिवर्तन अन्तहीन विजिगीषु युद्धामध्ये झाले. बुद्धिवादावर आधारलेल्या समाजाची अवस्था याहून अधिक चांगली झाली नाही. श्रीमंत आणि गरीब यांच्या दरम्यानचा वैरभाव सर्वसाधारण भरभराटीमध्ये विरून जाण्याऐवजी हुन्नरसंघ व इतर खास हक्क रद्द करण्याच्या योगाने याला काही प्रमाणात समेटाचे स्वरूप प्राप्त झाले असले तरी धर्मपीठाच्या धर्मादाय संस्था रद्द होण्याच्या योगाने हा वैरभाव तीव्र स्वरूप धारण करून राहिलेला आहे. [सरंजामी बेड्यांतून "मालमत्तेची मुक्तता" होणे हे जवळ जवळ पूर्ण झाले असले तरी या मुक्ततेची परिणती छोटे भांडवलदार व छोटे जमीनदार यांना आपली छोटी मालमत्ता विकण्याच्या स्वातंत्र्यात झालेली आहे. बड्या भांडवलदारांच्या व बड्या जमीनदारांच्या जीवघेण्या स्पर्धेपुढे चेंगरून गेल्यामुळे त्यांनाच आपल्या मालमत्ता विकण्याचे स्वातंत्र्य या छोट्यांना मिळाले आहे; आणि अशा प्रकारे, छोटे भांडवलदार व छोटे जमीनमालक शेतकरी यांच्यापुरते म्हणाल, तर "मालमत्तेपासून मुक्तता" असे त्यांच्या स्वातंत्र्याचे स्वरूप झालेले आहे.] भांडवलदारी आधारावरील उद्योगधंद्याच्या विकासाने श्रमिक बहुजन समाजाचे दारिद्र्य आणि दुःख ही समाजाच्या अस्तित्वाची परिस्थिती करून ठेवलेली आहे. [रोख रकमेचा व्यवहार हा, कार्लाइलच्या भाषेत सांगायचे म्हणजे, माणूस आणि माणूस यांच्या दरम्यानचा अधिकाधिक प्रमाणांतला एकमेव दुवा होऊन राहिला आहे.] [१४५] गुन्ह्यांची संख्या वर्षानुवर्ष वाढत राहिली. पूर्वीच्या काळी सरंजामी दुर्व्यसने दिवसाढवळ्या उघडपणे मिरवत असत; त्यांचे निर्मूलन जरी झालेले नसले तरी किमानपक्षी ती आता पार्श्वभूमीवर रेटण्यांत आली. त्यांच्या जागी आलेली भांडवलदारी दुर्व्यसने, आतापर्यंत गुप्तपणे चाललेली होती ती आता अधिक बहरून तरारू लागली आहेत. व्यापार हा अधिकाधिक प्रमाणात फसवणूक होऊन राहिला. क्रान्तिकारक ब्रीदामधील "बंधुत्व" हे स्पर्धेच्या लढाईतील लुच्चेगिरीच्या व चढाओढींच्या स्वरूपात व्यवहारात आले. जबरदस्तीने जुलूम करण्याची जागा भ्रष्टाचाराने घेतली; पहिली सामाजिक तरफ या नात्याने तरवारीची जागा सोन्याने घेतली. पहिल्या

रात्रीचा हक्क सरंजामी सरदारांकडून भांडवलदारी कारखानदारांकडे बदली होऊन आला. वेश्याव्यवसाय न भूतो न भविष्यति इतक्या प्रमाणात वाढला. खुद्द विवाहसंस्था ही पूर्वीप्रमाणे कायदेशीर रीत्या मान्य स्वरूपात राहिली ती वेश्याव्यवसायाचा अधिकृत बुरखा म्हणून राहिली आणि याच्या भरीला व्यभिचाराच्या भरदार पिकांची तिला जोड मिळाली.

एका शब्दात सांगायचे म्हणजे तत्त्वज्ञान्यांनी दिलेल्या सुंदर अभिवचनांच्या तुलनेत "बुद्धिवादाच्या विजयांतून" जन्माला आलेल्या सामाजिक व राजकीय संस्था या घोर निराशा करणारी व्यंगचित्रे ठरल्या.

फ्रेडरिक एन्गल्स, ॲन्टी-डूहरिंग,
मॉस्को, १९७५, पृष्ठे २९१-९२

ज्ञानजागृतीतून अद्‌भुतरम्यतावादाम ध्ये संक्रमण

फ्रेंच राज्यक्रांती आणि तिच्याशी संबंधित असलेली ज्ञानजागृती यांच्याविरुद्ध झालेली पहिली प्रतिक्रिया म्हणजे साहजिकच प्रत्येक मध्ययुगीन गोष्ट ही अद्‌भुतरम्य मानणे अशी होती; ग्रिम याजसारखे लोक देखील हिच्यातून मुक्त नव्हते. दुसरी प्रतिक्रिया म्हणजे प्रत्येक राष्ट्राच्या मध्ययुगापलीकडील प्राचीन युगामध्ये डोकावणे ही होती, आणि ही गोष्ट समाजसत्तावादी प्रवृत्तीशी मिळती जुळती आहे, मात्र त्या विद्वान लोकांना तिच्याशी आपला काही तरी संबंध आहे याची कसलीही कल्पना नाही. मग जे जे स्तीत जास्त जुने आहे त्यात जास्तीत जास्त नवे गवसल्याचे त्यांना आश्चर्य वाटते– समतावाद्यांना देखील हे आश्चर्य वाटते आणि ते इतक्या प्रमाणात वाटते की त्याच्या योगाने धुर्‍याँचा देखील थरकाप झाला असता.

मार्क्स यांचे एन्गल्स यांना पत्र
तारीख २५ मार्च १८६८
मार्क्स आणि एन्गल्स, निवडक पत्रव्यवहार,
मॉस्को, १९७५, पृष्ठ १८९

जुन्या काळाच्या दृष्टिकोनांतून भांडवलदारी प्रगतीची समीक्षा. सरंजामदारी समाजसत्तावाद

फ्रान्स आणि इंग्लंड या देशांतील सरदार मंडळींच्या ऐतिहासिक स्थानामुळे आधुनिक भांडवलदारी समाजाविरुद्ध पुस्तिका लिहिणे हा त्यांचा धंदाच होऊन बसला. १८३० च्या जुलै महिन्यातील फ्रेंच राज्यक्रान्तीमध्ये आणि इंग्लंडमधील सुधारणा आंदोलनामध्ये या सरदार मंडळींनी पुन्हा एका तिरस्करणीय उपटसुंभापुढे शरणागती पतकरली. तेव्हापासून पुढच्या काळात गंभीर राजकीय संघर्ष होण्याचा अजिबात प्रश्नच राहिला नाही. केवळ वाङ्मयीन लढाईच तेवढी शक्य होऊन राहिली. परंतु साहित्याच्या राजवटीत देखील पूर्वपदस्थापनेच्या कालखंडांतील * जुन्या घोषणा अशक्य होऊन बसल्या होत्या.

सहानुभूती जागृत करण्यासाठी सरदार मंडळींना आपल्या स्वतःच्या हितसंबंधांकडे डोळेझाक करणे भाग पडले आणि भांडवलदारांविरुद्धचे आपले दोषारोपण शोषित कामगारवर्गाच्या हितासाठीच केवळ सूत्रबद्ध करणे भाग पडले, असे दिसते. अशा प्रकारे सरदार मंडळींनी आपल्या धन्यांविरुद्ध निंदापुराणे रचून आणि आगामी सर्वनाशाची दुष्ट भाकिते त्यांच्या कानांत कुजबुजून त्यांच्यावर सूड उगविला.

अशा रीतीने सरंजामी समाजसत्तावाद उदयास आला : अर्धी रडकथा, आणि अर्धे निंदापुराण; अर्धा जुन्या काळाचा प्रतिध्वनी आणि अर्धा भावी काळाचा धोका; अधून मधून आपल्या कटु, कोटिबाज व भेदक टीकेने भांडवलदारांच्या थेट काळजावर प्रहार करणे; परंतु परिणामाच्या बाबतीत सदैव हास्यास्पद, कारण आधुनिक इतिहासाच्या वाटचालीचे आकलन करण्याच्या संपूर्ण असमर्थतेमुळे.

जनतेला आपल्या बाजूला वळविण्यासाठी सरदार मंडळींनी ध्वजाच्या जागी कामगारवर्गीय भिकेची झोळी मिरविली. परंतु जनता त्यांना जितक्या वेळा सामील व्हायला गेली तितक्या वेळा तिला त्यांच्या पार्श्वभागावर जुने सरंजामी बोधचिन्ह दिसले, आणि ते पाहून तिने मोठमोठ्याने बेअदब हसून त्यांना सोडचिठी दिली.

---

* ही पूर्वपदस्थापना म्हणजे इंग्लंडमधील १६६० ते १६८९ पर्यंतची पूर्वपदस्थापना नव्हे, परंतु ही १८१४ ते १८३० पर्यंतची फ्रेंच पूर्वपदस्थापना होय. [१८८८ च्या इंग्रजी आवृत्तीला एन्गल्सने दिलेली टीप.]

फ्रेंच घराणेशाहीवाल्यांच्या एका विभागाने आणि "तरुण इंग्लंडने"[१४६] या देखाव्याचे प्रदर्शन केले.

कार्ल मार्क्स आणि फ्रेडरिक एन्गल्स,
कम्युनिस्ट पक्षाचा जाहीरनामा,

मार्क्स आणि एन्गल्स, संकलित ग्रंथ,
खंड ६ वा, मॉस्को, १९७६, पृष्ठे ५०७-०८

भांडवलशाहीचे मध्यमवर्गीय समालोचन

सरंजामी सरदार मंडळी हा भांडवलदारांनी देशोधडीला लावलेला एकमेव वर्ग नव्हता, आधुनिक भांडवलदारी समाजाच्या वातावरणात ज्याची अस्तित्वाची परिस्थिती झुरून झुरून नष्ट करणारी ठरली असा एकमेव हा नव्हता. मध्ययुगीन शहरी व्यापारी आणि छोटे जमीनधारक शेतकरी हे आधुनिक भांडवलदारांचे पूर्वसूरी होते. जे देश औद्योगिक दृष्ट्या व व्यापारी दृष्ट्या अगदीच अल्प विकसित झालेले आहेत, त्यांमध्ये हे दोन वर्ग उगवत्या भांडवलदारांसमवेत अजूनही रखडत असतात.

ज्या देशांमध्ये आधुनिक संस्कृति पूर्णपणे विकसित झालेली आहे, त्यांमध्ये मध्यमवर्गीयांचा एक नवा वर्ग तयार झालेला असतो आणि तो कामगार वर्ग व भांडवलदार वर्ग यांच्या दरम्यान हेलकावे खात असतो आणि भांडवलदारी समाजाचा एक पूरक विभाग म्हणून स्वतःचे सतत नूतनीकरण करत असतो. तथापि, स्पर्धेच्या परिणामी या वर्गाचे व्यक्तिगत सदस्य कामगार वर्गामध्ये सतत खाली भिरकावले जात आहेत, आणि जसजसा आधुनिक उद्योगधंद्याचा विकास होत आहे, तसतसा त्यांना असादेखील क्षण जवळ येत असलेला दिसत आहे की ज्या वेळी ते आधुनिक समाजाचा स्वतंत्र विभाग म्हणून पूर्णपणे विलयाला जातील आणि त्यांच्या जागा कारखानदारी, शेती व व्यापार यांमध्ये देखरेख करणारे, बेलिफ व दुकानवाले घेतील.

फ्रान्ससारख्या देशांमध्ये, जिथे शेतकरी हे एकंदर लोकसंख्येचा निम्म्याहूनही अधिक भाग आहेत, तिथे ही गोष्ट साहजिकच होती की भांडवलदारांविरुद्ध कामगार वर्गाचा कैवार घेणारे लेखक, भांडवलदारी राजवटीवर टीका करताना शेतकरी व मध्यमवर्ग यांच्या ध्वजाचा उपयोग करत असत, आणि या मधल्या वर्गांच्या दृष्टिकोनातून कामगार वर्गाची बाजू मांडत असत. अशा प्रकारे मध्यमवर्गीय समाजसत्तावाद उदयास आला. सिस्माँडी हा फ्रान्समध्ये इतकेच नव्हे, तर इंग्लंडमध्ये देखील या पंथाचा प्रमुख होता.

समाजसत्तावादाचा हा पंथ आधुनिक उत्पादनाच्या परिस्थितीतील अन्तर्विरोधांची फोड मोठ्या बारकाईने करत असे. आर्थिकवाद्यांच्या ढोंगी सबबी तो उघड करून दाखवत असे. यंत्रसामुग्री व श्रमविभागणी यांचे घातक परिणाम तो निर्विवादपणे सिद्ध करून दाखवत असे; भांडवल व जमीन यांचे मूठभर लोकांच्या हाती केन्द्रीकरण होणे; अतिरिक्त उत्पादन आणि अरिष्टे, त्याने मध्यम वर्गाचा व शेतकऱ्याचा अपरिहार्य नाश, कामगारवर्गाचे दुःख, उत्पादनातील अराजक, संपत्तीच्या वितरणातील ढळढळीत विषमता, राष्ट्रांच्या दरम्यानचे सर्वनाशकारी औद्योगिक युद्ध, जुन्या नैतिक बंधनांचा, जुन्या कौटुंबिक संबंधांचा, जुन्या राष्ट्रगटांचा विध्वंस त्याने दाखवून दिला.

तथापि त्याच्या विधायक उद्दिष्टाच्या बाबतीत समाजसत्तावादाचा हा प्रकार एक तर उत्पादनाची व विनिमयाची जुनी साधने, आणि त्यांच्याबरोबर जुने मालमत्ताविषयक संबंध आणि जुना समाज पूर्वपदावर आणायची उमेद धरतो, किंवा आधुनिक उत्पादनाच्या व विनिमयाच्या साधनांचा कोंडमारा जुन्या मालमत्ताविषयक संबंधांच्या चौकटीत करून ठेवायची उमेद धरतो; वस्तुतः हे संबंध त्या साधनांच्या योगाने उध्वस्त झालेले असतात आणि हे उध्वस्त होणे भाग असते. दोहोपैकी कोणत्याही बाबतीत हा प्रकार प्रतिगामीही असतो व मनोराज्यवादीही असतो.

याचे शेवटचे शब्द म्हणजे : कारखानदारीसाठी संघटित हुन्नरसंघ; शेतीमध्ये पितृसत्ताक संबंध.

अखेर शेवटी, जेव्हा खणखणीत ऐतिहासिक सत्य घटनांनी आत्मवंचनेचे सगळे उत्तेजित करणारे परिणाम उधळून लावले, तेव्हा समाजसत्तावादाचा हा प्रकार बेशुद्धीच्या दुःखद झटक्यात समाप्त झाला.

कार्ल मार्क्स आणि फ्रेडरिक एन्गल्स,
कम्युनिस्ट पक्षाचा जाहीरनामा,
मार्क्स आणि एन्गल्स, **संकलित ग्रंथ**, खंड ६ वा,
मॉस्को, १९७६, पृष्ठे ५०९-१०

पूर्वपदस्थापनेच्या कालखंडातील लेखक

एका फार प्रख्यात प्रतिगामी लेखकाने मोठ्या आवाजात असा दावा केला की एखादा द मेस्त्रे आणि एखादा द बोनाल्ड याचा सर्वोच्च अध्यात्मवाद म्हणजे अखेर शेवटी पैसा हाच होता, आणि पैशाचा प्रत्येक प्रश्न हा थेट सामाजिक प्रश्न नाही काय ? पूर्वपदस्थापनेच्या कालखंडांतील लोकांनी जी वस्तुस्थिती लपवून ठेवली नाही

ती म्हणजे ही, की चांगले राजकारण पूर्वपदावर आणण्यासाठी मालमत्तेचे चांगले हक्क, सरंजामी मालमत्ता, नैतिक मालमत्ता, यांना पूर्वपदावर आणणे आवश्यक आहे. राजेशाहीवरील निष्ठा ही खंड आणि वेठबिगार रद्द करू शकत नाही हे सर्वश्रुत आहे.

कार्ल मार्क्स आणि फ्रेडरिक एन्गल्स,
"पोलंडच्या प्रश्नाविषयी"

मार्क्स आणि एन्गल्स, संकलित ग्रंथ,
खंड ६ वा, मॉस्को, १९७६, पृष्ठ ५४६

फ्रेंच साहित्य

ॲबे प्रेव्होस्त

टिंडलची भावनात्मक गरज [१४७] काही एक सिद्ध करत नाही. शेव्हालियर डेस ग्रियो याला देखील मानोन लेस्कॉ हिच्यावर प्रेम करायची व हिला ताब्यात ध्यायची भावनात्मक गरज होती आणि तिने तर स्वतःला व त्याला पुन्हा पुन्हा विकून घेतले; तिच्यासाठी तो पत्त्यांचा जुगार खेळणारा व वेश्यांचा दलाल झाला, आणि टिंडलला जर त्याला दोष द्यायला हवा असेल, तर तो आपल्या "भावनात्मक गरजेने" त्याला उत्तर देईल!

फ्रेडरिक एन्गल्स, निसर्गाचा विरोधविकास,
मॉस्को, १९७४, पृष्ठ २०१

शेतोब्रियाँ

१

प्रिय फ्रेडरिक!

स्पॅनिश भाषेतला कचरा अभ्यासतांना मी माननीय शेतोब्रियाँ याच्या कलृप्त्या देखील हेरून ठेवल्या आहेत. हा छान लेखक अठराव्या शतकातला सरदारी संशयवाद व व्हॉल्टेअरवाद यांची सांगड एकोणिसाव्या शतकातल्या सरदारी भावनाविवशतेशी व अद्‌भुतरम्यतावादाशी अत्यंत ओंगळवाण्या घर्तीवर घालतो. साहजिकच, ही सांगड शैलीच्या हिशेबी, फ्रान्समध्ये युगप्रवर्तक ठरणे भागच होते; मात्र शैलीमध्ये देखील, सगळ्या कलात्मक कलृप्त्या असून सुद्धा, खोटेपणा अनेकदा डोळ्यात खुपतो. याच्या राजकीय मतांविषयी म्हणाल, तर या प्राण्याने आपल्या congress de Verone [१४८

यामध्ये आपले स्वरूप पूर्णपणे उघड करून दाखविले आहे आणि एकमेव प्रश्न हा आहे की याला अलेक्सान्द्र पावलोविच @ याच्याकडून रोख पैसा मिळालेला आहे, की नुसत्या खुशामतीवरच हा विकला गेला, तसे पाहिले तर हा घमेंडखोर पोशाखी माणूस अन्य कोणापेक्षाही अधिक प्रमाणात खुशामतीच्या आहारी जाणारा आहे.

मार्क्स यांचे एन्गल्स यांना पत्र,
तारीख २६ ऑक्टोबर १८५४
मार्क्स/एन्गल्स, वेर्के, खंड २८ वा,
१९६३, पृष्ठ ४०४

२

उर्वरित सांगायचे म्हणजे, मी शेतोब्रियाँ १४९ वरील सेंट-ब्यूव्हेचा ग्रंथ वाचला. हा शेतोब्रियाँ अत्यंत किळसवाणा लेखक असल्याचे मला नेहमीच आढळून आले आहे. हा माणूस फ्रान्समध्ये प्रख्यात आहे, कारण प्रत्येक बाबतीत तो फ्रेंच बढाईखोरपणाचा अत्यंत अभिजात असा अवतार आहे. आणि हा बढाईखोरपणा अठराव्या शतकातल्या हलक्या फुलक्या पोरकट पोशाखातला नसून अद्भुतरम्यतावादाची वस्त्रे अंगावर चढविलेला व नवनव्या शब्दप्रयोगांचा वापर करून जिकडे तिकडे नाचत असलेला दिसतो. असला खोटा सखोलपणा, बायझान्टाइन अतिशयोक्तपणा, भावनेशी चोरटा खेळ, विविधरूपी शिलेरिझम, शब्दांचे चित्रण, नाट्यात शोभणारे दिव्यत्व, किंवा थोडक्यात सांगायचे म्हणजे खोट्या विधानांची असली पंचमेळ खिचडी पूर्वी साध्य करण्यात आलेली नाही, न बाह्य स्वरूपामध्ये किंवा न आशयामध्ये.

मार्क्स यांचे एन्गल्स यांना पत्र,
तारीख ३० नोव्हेंबर १८७३
मार्क्स/एन्गल्स, वेर्के, खंड ३३ वा, १९६६, पृष्ठ ९६.

अलेक्झांडर डयुमा

त्याच्या [लुई ब्लांकच्या] ऐतिहासिक ग्रंथांसंबंधांत सांगायचे म्हणजे ए. डयुमा आपले औपरोधिक लेख जसे लिहितो, तसे याचे ग्रंथ असतात. पुढच्या प्रकरणासाठी लागणारे तेवढेच साहित्य तो सदैव अभ्यासतो. Histore des dix/ans यांज-

@ अलेक्झांडर पहिला —संपादक

सारखे ग्रंथ कसे तयार होतात ते हे असे. एका अंगाने याच्या योगाने त्याच्या निवेदनांना एक विशिष्टपणाचा ताजेपणा लाभतो, कारण तो जे निवेदन करतो ते वाचकाला जितके नवीन असते तितकेच किमानपक्षी त्याच्या लेखी नवीन असते; दुसऱ्या अंगाने पाहिल्यास हे सगळे अगदीच मिळमिळीत असते.

मार्क्स यांचे एन्गल्स यांना पत्र,
तारीख २३ फेब्रुवारी १८५१,

मार्क्स/एन्गल्स, वेर्के, खंड २७ वा, १९६५,
पृष्ठ १९४

लामार्टाइन

१

लामार्टाइन दर सरत्या दिवसागणीक अधिकाधिक खोलात बुडत आहे ..... तो आपली सगळी भाषणे केवळ भांडवलदारांना उद्देशून करतो आणि त्यांची समजूत घालायचा प्रयत्न करतो. हंगामी सरकारचा निवडणूक जाहीरनामा देखील सर्वस्वी भांडवलदारांना उद्देशून त्यांना धीर देण्यासाठी आहे. याच्या परिणामी ते बेटे उर्मट होतात यात काहीच नवल नाही.

एन्गल्स यांचे मार्क्स यांना पत्र,
तारीख १८ मार्च १८४८

मार्क्स/एन्गल्स, वेर्के, खंड २७ वा, १९६५,
पृष्ठ १२३

२

लामार्टाइन म्हणजे भांडवलदारी प्रजासत्ताकाने हे स्वतःचे काल्पनिक चित्र तयार केलेले होते. स्वतःसाठी त्याने केलेली ही उत्साहमय, विलक्षण, ध्येयवादी संकल्पना होती, त्याच्या स्वतःच्या वैभवाचे हे स्वप्न होते. कोण कोण काय काय कल्पना करू शकतो हा अगदीच लक्षणीय प्रकार आहे! एओलुसने आपल्या थैलीतून जसे सगळे वारे बाहेर सोडले, तशी लामार्टाइनने हवेची सगळी भुते मुक्त केली, भांडवलदारी प्रजासत्ताकाचे सगळे शब्द-समुच्चय मुक्त केले आणि ते त्याने पूर्वेकडे व पश्चिमेकडे उडवून लावले; हे सगळया राष्ट्रांच्या बंधुत्वाचे पोकळ शब्द होते, फ्रान्सकडून सगळ्या राष्ट्रांच्या आगामी मुक्ततेविषयी आणि सगळ्या राष्ट्रांसाठी फ्रान्स करीत असलेल्या त्यागाविषयी हे शब्द होते.

त्याने काहीच केले नाही.

लामार्टाइनच्या शब्दसमुच्चयांशी मिळत्या जुळत्या कृतींचा पुरवठा करायचे काम पतकरणारा म्हणजे कॅन्हेन्नॅक हा होता आणि त्याचे बाह्य मुखंड म्हणजे बास्टाइड हा होता.

कार्ल मार्क्स आणि फ्रेडरिक एन्गल्स,
"इटलीत इंग्रज-फ्रेंचांची मध्यस्थी,"
मार्क्स आणि एन्गल्स, संकलित ग्रंथ,
खंड ७ वा, मॉस्को, १९७६, पृष्ठ ४८२

२

आम्ही पुरेशा अनेक वेळा असे दाखवून दिले आहे की फेब्रुवारी आणि मार्च या महिन्यांतल्या क्रान्त्यांनंतर[१५०] अद्भुतरम्यतावादी स्वप्ने उदयास आली. ती म्हणजे अशा प्रकारची : जनतेच्या विश्वव्यापी बंधुत्वनिष्ठ ऐक्याविषयींची तळमळीची कल्पनारम्य चित्रे; युरोपियन प्रजासत्ताक संघराज्य; चिरस्थायी जागतिक शान्तता;— या सगळ्या गोष्टी मूलतः त्या काळातल्या प्रमुख प्रवक्त्यांचा अमर्याद गोंधळलेपणा व निष्क्रियता दडवून ठेवणारा बुरखा होत्या, दुसरे तिसरे काहीही नव्हते. क्रान्तीचे रक्षण करण्यासाठी काम करणे भाग होते हे जनतेने बघितलेच नाही, तिला ते बघायला नकोच होते; कोणतेही खरेखुरे क्रान्तिकारक इलाज अंमलात आणायला ती असमर्थ किंवा नालूष होती; काही जणांची संकुचित मनोवृत्ती आणि इतरांची प्रतिक्रान्तिकारक कारस्थाने यांचा परिणाम असा झाला की जनतेला क्रान्तिकारक कृतींचे आदेश देण्याऐवजी नुसत्याच क्रान्तिकारक शाब्दिक घोषणा देण्यात आल्या. तो लकेगा लामार्टाइन त्याच्या शब्दबंबाळ घोषणांनिशी काव्यमय अलंकारिक पोकळ शब्दावडंबराच्या आड दडवून ठेवलेला, जनतेचा विश्वासघात करणाऱ्या या कालखंडाचा अभिजात नायक होता.

फ्रेडरिक एन्गल्स, "लोकशाहीप्रधान पॅन-स्लाव्हिझम"
मार्क्स आणि एन्गल्स, संकलित ग्रंथ,
खंड ८ वा, मॉस्को, १९७६

व्हिक्टर ह्यूगो

१

माझा जो विषय[१५१] आहे त्याच्याविषयी जवळ जवळ त्याच वेळी विवेचन करणाऱ्या लेखनापैकी फक्त दोन ग्रंथ लक्ष देण्याच्या योग्यतेचे आहेत : ते म्हणजे व्हिक्टर ह्यूगोकृत छोटा नेपोलियन आणि प्रुधाँकृत Coup d' Etat.

Coup d' Etat च्या जबाबदार प्रकाशकाविरुद्ध कटु आणि उपरोधिक टीका-प्रहार करण्याची मर्यादा व्हिक्टर ह्यूगोने स्वतःवर घालून घेतली आहे. खुद्द घडलेला प्रसंग हा त्याच्या ग्रंथांत आकाशींच्या कुऱ्हाडीसारखा दिसतो. त्यांत एका व्यक्तीची हिंसात्मक कृति हीच तेवढी त्याला दिसते. त्याच्या हे लक्षात येत नाही की जगाच्या इतिहासात जोड नसलेल्या पुढाकाराच्या व्यक्तिगत सामर्थ्याचे आरोपण तिच्यावर करून तो या व्यक्तीला लहान करण्याऐवजी मोठी करतो आहे. प्रुधाँ आपल्या परीने Coup d' Etat हा अगोदरच्या ऐतिहासिक विकासाचा परिपाक असल्याचे प्रदर्शित करू पाहतो आहे. तथापि, त्याच्या नकळत Coup d' Etat चा त्याने लावलेला ऐतिहासिक अर्थ हा त्याच्या नायकाचे ऐतिहासिक समर्थन होऊन बसतो आहे. अशा प्रकारे तो आमच्या तथाकथित वस्तुनिष्ठ इतिहासकारांच्या धर्तीची चूक करतो आहे. उलट पक्षी एका विद्रूप सामान्य व्यक्तीला नायकाची भूमिका करणे ज्यांच्यामुळे शक्य झाले अशी परिस्थिती आणि संबंध फ्रान्समध्ये वर्गलढ्याने कसे निर्माण केले हे मी दाखवून देतो आहे.

कार्ल मार्क्स, "लुई बोनापार्टचे अठरावे ब्रुमेअर याच्या दुसऱ्या आवृत्तीची लेखकाची प्रस्तावना"

मार्क्स आणि एन्गल्स, निवडक ग्रंथ, खंड १ ला, मॉस्को, १९७३, पृष्ठे ३९४-९५

२

तो "अथांग" व अत्यंत सावळागोंधळयुक्त जर्मनी व्हिक्टर ह्यूगो च्या कल्पना विश्वाबाहेर कधीच अस्तित्वात नव्हता. केवळ संगीत, स्वप्ने आणि ढग यांच्यामध्येच तेवढी गोडी असल्याचे समजला जाणारा जर्मनी हा भूतलावरील गोष्टींची चिंता फ्रेंच भांडवलदारांवर व पत्रकारांवर सोपवून राहिला.

एन्गल्स यांचे पॉल लाफार्ग यास पत्र, तारीख ५ डिसेंबर १८९२

फ्रेडरिक एन्गल्स, पॉल आणि लॉरा लाफार्ग, पत्रव्यवहार, खंड ३ रा, मॉस्को, १९६३, पृष्ठ २१९.

३

जसजसा काळ लोटत आहे तसतसे युद्धाला त्रासदायक स्वरूप प्राप्त होत आहे.[१५२] फ्रेंचांना अजून पुरेसा मार देण्यांत आलेला नाही, आणि जर्मन गाढवांनी खूपच फाजील विजय संपादन केलेले आहेत. व्हिक्टर ह्यूगो फ्रेंच भाषेतून अर्थशून्य लेखन करतो आहे आणि देखणा विल्यम जर्मन भाषेचा दुरुपयोग करतो आहे :[१५३]

"Nun lebe wohl mit bewegtem Herzen am Schluss einess solchen Briefes." @

हा काय राजा होणार?! आणि जगातल्या सगळ्यात जास्त सुसंस्कृत राष्ट्राचा? आणि त्याच्या पत्नीने ते छापवून घेतले आहे!

एन्गल्स यांचे मार्क्स यांस पत्र,
तारीख १३ सप्टेंबर १८७०

मार्क्स/एन्गल्स, वेर्के, खंड ३३ वा, १९६६, पृ. ६३

४

किल्ल्यावर तोफांचा भडिमार हा युद्धाच्या कायद्यानुसार मोकळीक असलेला इलाज अजूनही मानण्यात येत असला, तरी देखील मुलकी माणसांच्या खूपच हालअपेष्टा होणार असे ज्यात गृहीत धरले जाते असा हा इलाज असतो; त्या स्थळाचा पाडाव घडवून आणण्याचा योग्य संभव असल्याखेरीज असला प्रयत्न करणाऱ्या कोणालाही इतिहास आताच्या काळात दोषच देईल. एखाद्या व्हिक्टर ह्यूगोच्या chauvinisme (राष्ट्रीय दुरभिमानाचे) आम्हाला हसू येते. तो पॅरिस हे पवित्र शहर मानतो—भलतेच पवित्र!—आणि त्याच्यावर हल्ला करायच्या प्रत्येक प्रयत्नाला तो पापाचरण मानतो. आम्ही पॅरिस शहर हे इतर कोणत्याही तटबंदी असलेल्या शहरासारखे आहे असे मानतो; हे शहर जर स्वतःचे संरक्षण करायचे पसंत करत असेल, तर याने योग्य हल्ल्याचे सगळे धोके पतकरलेच पाहिजेत. म्हणजे उघडे खंदक, वेढा देणाऱ्यांच्या तोफांचे मोर्चे आणि फुटकळ तोफगोळे बिनलष्करी इमारतींवर पडणे, हे धोके.

फ्रेडरिक एन्गल्स, "युद्धाविषयी टिपणे"
इंग्रजीत लिहिलेली

पाल्माल् गॅझेट, तारीख १३ ऑक्टोबर १८७०

@ आणि आता निरोप घेतो, असल्या पत्राच्या शेवटी धडधडत्या हृदयानिशी.
—संपादक

युजीनी सुए

युजीनी सुए याची प्रख्यात कादंबरी पॅरिसची गुप्त रहस्ये लोकांच्या मनावर, त्यांतल्या त्यात जर्मनीतील लोकांच्या मनावर, सखोल ठसा उमटवून राहिलेली आहे; मोठ्या शहरांतील "तळागाळाच्या श्रेणीतल्या" लोकांच्या वाट्याला जे दुःख आणि नैराश्य येते त्याचे चित्रण या कादंबरीने ठसठशीत रीतीने केलेले आहे; म्हणून सर्वसाधारणपणे गरीब लोकांच्या अवस्थेकडे जनतेचे लक्ष वेधल्याखेरीज ती राहू शकली नाही. जर्मनीचा टाइम्स म्हणजे आल्गेमेइने झायटुंग हे वृत्तपत्र म्हणते तदनुसार, गेल्या दहा वर्षांच्या अवधीत कादंबरी लेखनाच्या शैलीमध्ये संपूर्ण क्रान्ति घडून आलेली आहे याचा शोध जर्मनांना लागण्याचा आरंभ होत आहे; पूर्वी अशा प्रकारच्या कथांचे नायक राजे व संस्थानिक असायचे, त्यांच्या जागी आता गरीब, तिरस्कृत वर्ग, त्याच्या नशिबी आलेले प्रसंग, त्यांचे आनंद व हालअपेष्टा हे अद्‌भुतरम्य कथेचे विषय करण्यात आले आहेत; शेवटी त्यांना असे आढळून येत आहे की कादंबरी लेखकांचा हा नवा वर्ग, म्हणजे जी सँड, ई. सुए, आणि बॉझ,@ हे लोक खरोखरी काळाची खूण आहेत.

फ्रेडरिक एन्गल्स, "युरोपखंडातील चळवळी"
मार्क्स आणि एन्गल्स, संकलित ग्रंथ,
खंड ३ रा, मॉस्को, १९७५, पृष्ठ ४१५

सुएकृत MYSTERES DE PARIS या कादंबरीच्या समीक्षात्मक विश्लेषणातून

१

खानावळी, एकांतस्थळे व गुन्हेगारांची भाषा यांचे जे चित्रण युजीनी सुए करतो, त्याच्याविषयी हेर स्झेलिगा असे "रहस्य" उघड करून दाखवितो की "लेखकाला" जे अभिप्रेत आहे ते म्हणजे त्या भाषेचे किंवा त्या एकांतस्थळांचे चित्रण करणे हे नव्हे, तर--

"पापाच्या मूळ स्रोतांचे रहस्य आपल्याला शिकविणे, इत्यादि" "नेमक्या अत्यंत गर्दीच्या ठिकाणीच....गुन्हेगारांना घरच्यासारखे वाटते."

@ चार्ल्स डिकन्स – संपादक

एखाद्या निसर्ग शास्त्रज्ञाला जर आपण सांगितले की मधमाशीच्या पोळ्यातल्या खणाविषयी तो मधमाशीचा खण म्हणून त्याला आस्था नसते, ज्याने त्याचा अभ्यास केलेला नसेल त्याला त्यात कसलेही रहस्य असल्याचे वाटत नाही, कारण मधमाशीला खुल्या हवेत व फुलावर "नेमके घरच्यासारखे वाटते," तर तो काय म्हणेल? गुन्हेगारांची एकांत स्थळे व त्यांची भाषा यांमध्ये गुन्हेगाराच्या स्वभावाचे प्रतिबिंब दिसते, ती त्याच्या अस्तित्वाचा भाग असतात, त्यांचे वर्णन हे त्याच्या वर्णनाचा भाग असते, जसे petite maison चे वर्णन हे femme galante च्या वर्णनाचा भाग असते, तसे.

सर्वसाधारणपणे पॅरिसवासीयांना आणि पॅरिसच्या पोलिसांना देखील गुन्हेगारांची एकांत स्थळे म्हणजे एवढी "रहस्यमय" वाटतात की त्यांच्यापर्यंत जायला पोलिसांना वाव मिळावा म्हणून खुद्द या क्षणीच cite मध्ये रुंद व दिवे असलेले रस्ते तयार करण्यात येत आहेत.

शेवटची गोष्ट म्हणजे युर्जीन सुए स्वतःच सांगतो की वर निर्दिष्ट केलेल्या वर्णनात आपण आपल्या वाचकांच्या "Sur la curiosite' craintive" @ वर भिस्त ठेवलेली होती. तशी महाशय युर्जीनसुए याने आपल्या सगळ्याच कादंबऱ्यांमध्ये वाचकांच्या भेकड कुतूहलावर भिस्त ठेवली आहे. Atar Gull, Salamandre, Plick and Plock, etc. इत्यादींची आठवण करणे पुरेसे व्हावे.

कार्ल मार्क्स आणि फ्रेडरिक एन्गल्स,
द होली फॅमिली
मार्क्स आणि एन्गल्स, संकलित ग्रंथ,
खंड ४ था, मॉस्को, १९७५, पृष्ठ ५७

२

Lhourincurr हा व्यवसायाने खाटीक होता. परिस्थितीच्या फेऱ्यात सापडल्यामुळे निसर्गाचा हा सामर्थ्यशाली पुत्र खुनी होतो. रुडोल्फची त्याच्याशी योगायोगाने गाठ पडते ती नेमकी तो फ्लर द मारी हिची छेड काढत असताना. रुडोल्फ या चलाख गुंडाच्या डोक्यावर काही प्रभावी, जोरदार ठोसे लगावतो, आणि अशा प्रकारे त्याच्या आदराला पात्र होतो. मागाहून, गुन्हेगारांचा नेहमीचा राबता असलेल्या खानावळीत चौरीनूर याची सहृदय वृत्ती उघडकीस येते. "तुझ्या ठायी अजूनही अंतःकरण व स्वाभिमान आहे", असे रुडोल्फ त्याला सांगतो. या शब्दांच्या योगाने रुडोल्फ त्याच्या ठायी स्वभिमान बाणवतो. चौरीनूर सुधारतो, किंवा हेर स्झेलिगा म्हणतो तदनुसार,

@ भेकड कुतूहलावर. — संपादक

त्याचे परिवर्तन "नैतिक प्राण्यामध्ये" होते. रुडोल्फ त्याला आपल्या संरक्षणाखाली घेतो. रुडोल्फच्या मार्गदर्शनानुसार चौरीनूर याचे शिक्षण कसे चालू असते याचा आपण मागोवा घेऊ या.

पहिला टप्पा : चौरीनूर याला पहिला धडा मिळतो, तो ढोंगबाजी, बेइमानी, कावेबाजपणा आणि **बनवाबनवी** या गोष्टींचा.

या सुधारलेल्या चौरीनूरचा वापर, Vidoog स्वतः सुधारलेल्या गुन्हेगारांचा जसा करत असे, तसाच नेमका रुडोल्फ करतो, म्हणजे तो त्याला mouchard @ आणि agent provocuteur (पोलिसांचा गुप्त खबरी) बनवतो. तो त्याला असा सल्ला देतो की त्याने maitre d' ecole@ याच्याकडे आपले "चोरी न करायचे तत्त्व" आपण बदलले आहे अशी बतावणी करावी आणि रुडोल्फने लावलेल्या सापळ्यात त्याला घुलवून आणण्यासाठी चोरीचा मनसुबा सुचवावा. आपल्याला मामा बनवण्यात येत आहे असे चौरीनूर याला वाटते. Mouchard व agent provocateur या भूमिका करायच्या सूचनेचा तो निषेध करतो. रुडोल्फ या निसर्ग-पुत्राची सहज खात्री पटवून देतो ती समीक्षकात्मक समीक्षेचा "शुद्ध" शब्दच्छल वापरात आणून—म्हणजे "**चांगल्या नैतिक**" कारणांसाठी केलेली नीच कृती ही नीच नसते हे सांगून, चौरीनूर हा agent provocateur. या नात्याने आणि मित्रत्वाचे व विश्वासाचे ढोंग करून आपल्या माजी सहकाऱ्याला झुलवून विनाशाकडे लोटत नेतो. आपल्या आयुष्यात **पहिल्या प्रथमच तो नीचपणाचे** कृत्य करतो.

दुसरा टप्पा. यानंतर आपल्याला चौरीनूर हारु डोल्फचा garde malade c म्हणून काम करत असलेला आढळतो. रुडोल्फला त्याने प्राणसंकटातून वाचविलेले असते.

चौरीनूर हा असा **आदरणीय नैतिक** प्राणी झालेला असतो की आपल्याकडून गालिचा खराब होईल या भीतीपोटी तो नीग्रो डॉक्टर डेव्हिड याची जमिनीवर बसायची सूचना धुडकावून लावतो. खरे म्हणजे तो खुर्चीवर बसायला भलताच **भिडस्त-**पणा करतो प्रथम तो खुर्ची उलटी करतो आणि मग तिच्या पुढच्या पायांवर तो बसतो. त्याने प्राणसंकटांतून वाचविलेल्या रुडोल्फला उद्देशून बोलताना "monsei gneur" म्हणण्याऐवजी "मित्रा" किंवा Moneseiur असे संबोधतो आणि त्याची माफी मागायला कधीही चुकत नाही.

या निर्घृण निसर्गपुत्राला केवढे तरी अजब शिक्षण मिळते हे! बुलडॉग ला आपल्या धन्याविषयी जशी आपुलकी असते तशीच आपुलकी आपल्याला रुडोल्फ-

---

@ पोलिसांचा हस्तक -- संपादक

b The "maitre d'ecole" --हे त्याच्या सहकारी गुन्हेगारांनी त्याला दिलेले टोपणनाव आहे. --संपादक

© आजारपणांत शुश्रूषा करणारा. –संपादक

विषयी वाटते असे तो रुडोल्फजवळ कबूल करतो, त्या वेळी चौरीनूर आपल्या समीक्षणात्मक परिवर्तनाचे अत्यंत अंतरंगातले रहस्य व्यक्त करतो : "Je me sens pour vous, comme qui dirait L'attachement d'un boule dogne pour son maitre." या माजी खाटकाचे परिवर्तन कुत्र्यामध्ये झाले. यापुढे त्याच्या सगळ्या गुणांची परिणति कुत्र्याच्या गुणामध्ये होणार, म्हणजे आपल्या धन्याविषयीची शुद्ध "devouement" (निष्ठा). त्याचे स्वातंत्र्य, त्याचे व्यक्तिमत्त्व पूर्णपणे विलयाला जाणार. परंतु ज्याप्रमाणे वाईट चित्रकारांना आपली चित्रे कशाची प्रातिनिधिक आहेत हे सांगणारी लेबले आपल्या चित्रांना लावावी लागतात, त्याप्रमाणे युजीन सुए याला 'बुलडॉग" चौरिनूरवर लेबल लावावे लागते. हा चौरीनूर स्तब्ध ठासून सांगत असतो : "हे दोन शब्द म्हणजे 'तुझ्याठायी अजूनही अन्तःकरण व स्वाभिमान आहे--' या दोन शब्दांनी माझ्यातून माणूस घडवलाय." थेट शेवटच्या श्वासापर्यंत चौरीनूरला आपल्या कामगिऱ्यांचा प्रेरक उद्देश आपल्या व्यक्तिमत्त्वात सापडणार नाही, पण त्या लेबलात सापडेल. या नैतिक सुधारणेचा पुरावा म्हणून तो अनेकदा आपल्या स्वतःच्या सर्वोत्कृष्टपणाचे व इतर व्यक्तींच्या दुष्टपणाचे चिन्तन करीत राहील. आणि प्रत्येक वेळी तो नैतिक वाक्यांची फेक करायला लागला की रुडोल्फ त्याला म्हणेल : "तू असं बोलायला लागलास की मला ते बोलणं आवडतं." चोरीनूर हा साधासुधा बुलडॉग झालेला नाही, परंतु तो नैतिक बुलडॉग झालेला आहे.

तिसरा टप्पा. चौरीनूरच्या रांगड्या परंतु धाडसी धसमुसळेपणाच्या जागी आलेल्या मध्यमवर्गीय प्रतिष्ठितपणाचे आम्ही अगोदरच कौतुक केले आहे. आता आपल्याला असे कळून येते की "नैतिक प्राण्याला" शोभेशा रीतीनुसार त्याने मध्यमवर्गीयाची चालण्याची ढब व मुद्रा धारण केली आहे.

A le voir marcher-on l'ent priis pour le bourgeois le plus inoffensil du monde" @

या प्रकारापेक्षादेखील अधिक दुःखदायक गोष्ट म्हणजे त्याच्या समीक्षण दृष्ट्या सुधारलेल्या जीवनाला रुडोल्फ जो आशय देतो तो आहे. तो त्याला आफ्रिकेला धाडून देतो--"श्रद्धाशून्यांच्या जगापुढे पश्चात्तापाचा एक जिवंत व बोधप्रद नमुना म्हणून कामी यावा म्हणून." भविष्यकाळी त्याला स्वतःच्या मानवी स्वभावाचे प्रतिनिधित्व करावे लागणार नाही; परंतु खिस्ती धर्मसूत्राचे प्रतिनिधित्व करावे लागेल.

चौथा टप्पा. समीक्षणदृष्ट्या झालेल्या नैतिक परिवर्तनाने भीतीच्या व व्यवहारी शहाणपणाच्या नियमांनुसार वागणाऱ्या शांत स्वभावी व सावध माणसाचे रूप चौरीनूरला मिळवून दिले आहे.

@ तो चालत असताना पाहिले म्हणजे आपल्याला तो जगातला सगळ्यांत जास्त निरुपद्रवी भांडवलदार वाटला असता. —संपादक

मुर्फ आपल्या भडभड्या साधेपणाच्या भरात शाळेतल्या एकेक कथा सतत सांगत सुटतो Le chourienent n'a pas dit un mot de l'exe'cution du maitre d'e'colefi de peur de se trouver compromis." @

अशा प्रकारे maitre d 'e' cole ला मिळालेली शिक्षा ही बेकायदेशीर कृति होती हे चौरीनूरला ठाऊक आहे. परंतु आपली अवघडल्यासारखी अवस्था होईल या भीतीपोटी तो तिच्याविषयी बोलत नाही. शाहणा चौरीनूर !

पाचवा टप्पा. चौरीनूरने आपले नैतिक शिक्षण इतक्या परिपूर्णतेप्रत नेऊन ठेवले आहे की तो रुडोल्फविषयीच्या आपल्या कुत्र्यासमान वृत्तीला सुसंस्कारित रूप देतो— त्याला त्याची जाणीव होऊन राहते. जर्मेनला नैतिक धोक्यांतून वाचविल्यानंतर तो त्याला सांगतो :

" माझा एक रक्षणकर्ता आहे. धर्मोपदेशकांचा देव जसा असतो तसा तो माझा आहे—तो असा आहे की तो आपल्याला त्याच्यासमोर गुडघे टेकायला लावतो."

आणि कल्पनेत तो आपल्या देवासमोर गुडघे टेकतो.

तो जर्मेनला सांगतो : " मशूर रुडोल्फ तुझं संरक्षण करतो. मी 'monseigneur' म्हणायला हवं असलं तरी मी 'monseieur' असंच म्हणतो. परंतु त्याला 'Monseiur रुडोल्फ' म्हणायला सरावलोय आणि तो मला तसं म्हणायला मोकळीक देतो."

" अचाट जागृति आणि फुलोरा ! " समीक्षणात्मक आनंदाच्या भरात स्झेलिगा उद्गारतो.

सहावा टप्पा. चौरीनूर आपली शुद्ध de 'vouement ची किंवा नैतिक बुलडॉगपणाची कारकीर्द आपल्या दिलदार धन्यासाठी शेवटी स्वतःवर सुरामारीचे मरण ओढवून घेऊन मानाने संपवतो. ज्या क्षणी स्क्वेलेट राजपुत्राला आपल्या सुऱ्याची धमकी देतो, त्या क्षणी चौरीनूर मारेकऱ्याचा हात आवरतो. स्क्वेलेट त्याच्यावरच सुऱ्याचा वार करतो. परंतु मरता मरता रुडोल्फला उद्देशून चौरीनूर म्हणतो :

" माझा सारखा एखादा मातीचा ढेपसा (बुलडॉग) कधी कधी तुमच्यासारख्या महान व दिलदार धन्याच्या उपयोगी पडू शकतो असे मी म्हणालो ते बरोबरच होतं. "

या श्वानसदृश वक्तव्यात चौरीनूरचे एकंदर समीक्षणात्मक जीवन एखाद्या सुभाषितासारखे सामावलेले आहे आणि त्याच्या तोंडी घातलेले याच्या भरीचे लेबल असे आहे :

@ " स्वतःची अवस्था अवघडल्यासारखी होईल या भीतीपोटी चौरीनूरने maitre d 'e' cole याला देण्यात आलेल्या शिक्षेविषयी एक अवाक्षर काढले नाही. — संपादक

"मशूर रुडोल्फ, आपली फिटंफाट झाली. मला अन्तःकरण व स्वाभिमान असल्याचं तुम्हीच मला सांगितलं होतं."

हेर स्झेलिगा बेंबीच्या देठापासून उद्‌गारतो:

"श्चुरिमान्न @ याला रुडोल्फने [!] पुन्हा मानवजातीत परत आणला हा त्याचा केवढा तरी सद्‌गुण होता म्हणायचा [!]!"

कार्ल मार्क्स आणि फ्रेडरिक एन्गल्स,
द होली फॅमिली
मार्क्स आणि एन्गल्स, संकलित ग्रंथ, खंड ४ था,
मॉस्को, १९७५, पृष्ठे १६३-६५

३

आपल्याला मारी भेटते ती गुन्हेगारांच्या खाणावळीच्या मालकिणीची गुलाम वेश्या गुन्हेगारांच्या गराड्यात असलेली अशी भेटते. या अधोगतीच्या अवस्थेत तिने मानवी आत्म्याचा उदात्तपणा, सभोवारच्या लोकांवर प्रभाव पाडणारा मानवी निगर्वीपणा व मानवी सुंदरपणा टिकवून ठेवलेला असतो, आणि हे गुण तिला गुन्हेगार जगाच्या काव्यमय फुलाच्या पातळीवर चढवून ठेवतात आणि यांच्यामुळे तिला फ्लर द मारी हे नाव लाभते.

फ्लर द मारी हिच्या मूळ स्वरूपाची तुलना तिच्या समीक्षणात्मक परिवर्तनाशी करता यावी म्हणून तिच्या पहिल्या प्रवेशापासून आपण तिचे लक्षपूर्वक निरीक्षण केले पाहिजे.

तिच्या अंगी चंचलपणा असूनदेखील फ्लर द मारी ही आपल्या अंगची तडफ, उत्साह, आनंदीपणा, स्वभावाचा लवचिकपणा— यांचे तावडतोब प्रत्यंतर आणून देते—तिच्या अमानुष परिस्थितीतील मानवी विकासाचा खुलासा करणारे असे हेच तेवढे गुण आहेत.

चौरीनूर तिची छेड काढतो, तेव्हा ती आपल्या कात्रीच्या मदतीने आपला बचाव करते. याच परिस्थितीत ती प्रथम आपल्याला आढळते. महा भयंकर पाशवीपणाचा कसलाही प्रतिकार न करता शरणागति पतकरणारे असहाय्य कोकरू अशा स्वरूपात ती दिसत नाही; आपल्या इक्कांचे रक्षण करणारी आणि सामना देणारी अशी ती तरुणी आहे.

@ श्चुरिमान्न हे चौरीनूरचे जर्मन भाषेतले रूप आहे. — संपादक

रू ऑ फेव्हेस या रस्त्यावरील गुन्हेगारांच्या खानावळीत ती चौरीनूर व रुडोल्फ यांना आपल्या जीवनाची कहाणी सांगते. हे सांगत असताना तो चौरीनूरच्या कोटिबाजपणाला हसते. ती स्वतःकडेच दोष घेते, कारण तुरुंगांतून सुटल्यावर तिने तिथे कमावलेले ३०० फ्रँक काम शोधण्यात खर्चायच्या ऐवजी करमणुकींवर उधळून टाकलेले असतात. "पण मला कुणी सल्ला द्यायलाच नव्हतं," असे ती सांगते. आपल्या जीवनाच्या सर्वनाशाची आठवण-- म्हणजे गुन्हेगारांच्या खानावळीच्या मालकिणीला तिने स्वतःला विकून घेणे--तिला उदासपणा आणते. आपल्या बालपणापासून पहिल्याप्रथमच तिने या घडामोडींची आठवण केलेली असते.

"Le fait est, que ca me chagrine de regarder ainsi derrie're mon ... ca doit bien bon d'etre bonnete."@

चौरीनूर तिची चेष्टा करतो व 'तू प्रामाणिक झालंच पाहिजेस' असे तो तिला सांगतो, तेव्हा ती उद्गारते :

"Honne'te, mon dieu ! bt avee quoi done veux-tu que je sois honne'te?"(b)

ती आग्रहपूर्वक सांगते की "रडायचे झटके येणारी" अशी आपण नाही: "Je ne suis pas pleurnicheuse"(c); परंतु जीवनांतली तिची अवस्था उद्वेग आणणारी आहे--"Can'est pas gai."(d) शेवटी, ख्रिस्तीधर्ममतांतल्या पश्चातापाच्या विरोधांत ती पूर्वकाळाचा मानवी न्यायनिवाडा करते; हा निवाडा मुक्त व सामर्थ्यशाली स्वभावाला अनुरूप असा, एकाच वेळी स्टोइक (समाधानी) व एपिक्युरियन (निवडवादी) असतो :"

" Enfin ce qui est fait, est fait."(e)

आता आपण फ्लर द मारी पहिल्या प्रथम रुडोल्फ समवेत फिरायला जाते, तेव्हा तिच्याबरोबर जाऊं या.

"तुझ्या भयंकर अवस्थेच्या जाणिवेनं तुला बहुधा अनेकदा दुःख वाटलं असणार," रुडोल्फ नैतिक धडे द्यायला टपलेला असताना म्हणतो.

@ "खरी गोष्ट अशी आहे की या रीतींने मी मागे बघू लागल्ये की याचं मला दुःख होतं... प्रामाणिक असणं छानच असलं पाहिजे."—संपादक

(b) "प्रामाणिक! देवा रे देवा! मी कशाशी प्रामाणिक असावं असं हवंय तुला!" -- संपादक

(c) "मी रडूबाई कुक्कुबाळ नाही हं!"--संपादक

(d) "ती सुखाची नाही."--संपादक

(e) "बरं तर, जे झालं ते झालं."--संपादक

"होय तर," ती उत्तरते, "अनेकदा मी सेन नदीच्या काठावरून नदीच्या पाण्यात डोकावून पाहिलंय, परंतु त्या वेळी मी फुलांकडे व सूर्याकडे टक लावून बघत असे आणि स्वतःशी म्हणत असेः नदी तिथं कायमचीच असणार आणि अजून माझं सतरावं वर्ष संपलेलं नाही. कुणी सांगावं? Dans ces moments — la il me semblait que mon sort n'e'tait pas me'rite', qu'il y avait en moi quelque chose de bon. Je me disais, on m'a bieu tourmente,' mais au moins je n'ai jamais fait de mal'a personne." @

फ्लर द मारी आपली अवस्था आपण स्वतः स्वतंत्रपणे निर्माण केलेली आहे असे मानत नाही, आपल्या स्वतःच्या व्यक्तिमत्वाची ती अभिव्यक्ती आहे असे ती मानत नाही, परंतु आपल्यावर अन्याय होऊन ही अवस्था ओढवलेली आहे असे ती मानते. तिचे वाईट दिवस बदलू शकतात. ती अजून लहानच आहे.

भले आणि बुरे, या गोष्टी मारीच्या संकल्पनेनुसार भले आणि बुरे, यांच्या नैतिक परिणती नाहीत. ती भली आहे, कारण तिने कधीही कुणालाही दुःख दिलेले नाही, आपल्या सभोवारच्या अमानुष वातावरणाशी ती सदैव माणुसकीने वागलेली आहे. ती भली आहे, कारण उन्हे आणि फुले तिला आपला स्वतःचा प्रकाशमान व फुलोऱ्याने बहरलेला स्वभाव उघड करून दाखवितात. ती भली आहे, कारण अजून ती तरुण आहे, आशा व तडफ तिच्या अंगी ओतप्रोत आहेत. तिची अवस्था भली नाही, कारण ती तिच्यावर अस्वाभाविक दडपण आणते, कारण ती तिच्या मानवी उपजत प्रेरणांची अभिव्यक्ती नाही, तिच्या मानवी आकांक्षांची परिपूर्ति नाही; कारण ती छळवादाने भरलेली आहे, तिच्यात आनंदाचा अभाव आहे. ती जीवनातील आपल्या अवस्थेचे मोजमाप आपल्या स्वतःच्या व्यक्तिमत्त्वाच्या योगाने करते, तिच्या मूळ स्वभावाच्या योगाने करते, जे भले आहे त्या ध्येयाच्या योगाने ती हे मोजमाप करत नाही.

सभोवतालच्या नैसर्गिक वातावरणात, जिथे भांडवलदारी जीवनाच्या बेड्या गळून पडलेल्या असतात आणि जिथे ती आपला स्वतःचा प्रभाव मोकळेपणाने प्रदर्शित करू शकते, उदंड भावनेनिशी, निसर्गाच्या सौंदर्याकडे पाहून झालेल्या मानवी आनंदानिशी; तिथे या गोष्टी असे दर्शवितात की तिच्या सामाजिक अवस्थेने तिच्या वरवरच्या भागावर केवळ ओरखडे काढून ठेवलेले आहेत आणि हे तिचे नुसतेच दुर्दैव आहे, आणि ती स्वतः भलीही नाही किंवा बुरीही नाही, परंतु ती मानवी आहे.

@ "अशा प्रसंगी मला असं वाटायचं की माझ्यावर आलेला प्रसंग हा माझ्यावर अन्याय झालेला आहे, माझ्यात काहीतरी चांगलं आहेच आहे. लोकांनी मला पुरेपूर छळलंय; असं मी स्वतःशी म्हणायची, परंतु किमानपक्षी मी कुणाचंही कधीही नुकसान तर केलेलं नाही."—संपादक

"Monseur Rudolphe, quel bonheur.... de l'herbe' des champs! Si voux vouliez me permettre', de descendre, il fait si beau.... j' aimerais tant a' courir dans ces prairies!" @

गाडीतून उतरून ती रुडोल्फसाठी फुले तोडून घेते, "इतका आनंद झालाय की तोंडातून शब्द निघत नाही," इत्यादि इत्यादि.

रुडोल्फ तिला सांगतो की "मी तुला मादाम जॉर्ज हिच्या शेतीवाडीवर नेणार आहे. तिथं तुला कबुतरांची खुराडी, गाईंचे गोठे, इत्यादि पाहायला मिळतील. तिथं दूध, लोणी, फळं वगैरे असतात." या बालिकेसाठी ते खरेखुरे शुभाशीर्वाद असतात. ती खुषीत येईल आणि हाच तिचा मुख्य विचार असतो.

"C'est d n'y nas croire .... comme je veux m'amuser!" (b) आपल्यावर ओढवलेल्या दुर्दैवाच्या जबाबदारीतला आपला स्वतःचा हिस्सा किती आहे याचा खुलासा ती रुडोल्फजवळ अत्यंत साध्यासुध्या रीतीने करते. "Tout mon sort est venu de ce que jen'ai pas e'conomise mon argent!" (c) म्हणून ती त्याला काटकसर करायचा आणि सेव्हिंग बँकेत पैसे ठेवायचा सल्ला देते. रुडोल्फ तिच्यासाठी जे हवेतले किल्ले बांधतो, त्यांच्या योगाने तिच्या कल्पनेचा वारू बेफाम दौडत सुटतो. ती उदास होते याचे एकमेव कारण म्हणजे तिला

"वर्तमानाचा विसर पडलेला आहे" आणि "आनंदी व हसऱ्या अस्तित्वाच्या स्वप्नांशी वर्तमानाचा जो विरोध आहे, तो तिला तिच्या अवस्थेच्या क्रूरपणाचे स्मरण करून देतो."

आतापर्यंत आपल्याला फ्लर द मारी ही तिच्या मूळ बिनसमीक्षणात्मक स्वरूपात पाहायला मिळालेली आहे. युजीन याने आपल्या संकुचित जागतिक दृष्टिकोनाच्या क्षितिजाच्या वर भरारी मारलेली आहे. त्याने भांडवलदारी पूर्वग्रहाच्या श्रीमुखात भडकावून दिली आहे. तो आता फ्लर द मारी हिला नायक रुडोल्फ याच्या हाती त्याच्या अविचाराचे प्रायश्चित्त घेण्यासाठी आणि सगळ्या वयोवृद्ध स्त्री-पुरुषांच्या, पॅरिसच्या सगळ्या पोलिसदलाच्या, प्रचलित धर्माच्या आणि "समीक्षणात्मक समीक्षेच्या" टाळ्या मिळविण्यासाठी सोपवून देईल.

@ "मशूर रुडोल्फ, केवढं तरी सुख आहे हे! .... हिरवळ, शेते! तुम्ही मला बाहेर पडायला द्याल का? हवा फारच छान आहे....या कुरणांतून बागडणं मला कितीतरी आवडेल म्हणून सांगू." --संपादक

(b) "काहीतरी मजा करायला मिळावी म्हणून मी किती आसुसलेली आहे याच्यावर तुमचा भरवसा नाही बसू शकणार!"--संपादक

(c) "मी माझे पैसे साठवून ठेवले नाहीत ही वस्तुस्थितीच माझ्या एकंदर दुर्दैवाचं कारण आहे."--संपादक

फ्लर द मारीला रुडोल्फ जिच्या स्वाधीन करतो ती मादाम जॉर्ज ही एक दुःखी, रोगभ्रम असलेली आणि धर्मनिष्ठ महिला असते. ती तावडतोब चिकण्या-चुपड्या शब्दांत या मुलीचे स्वागत करते : "जे देवाची भक्ति करतात व त्याला भितात, आणि जे अनुताप आहेत व पश्चात्ताप करतात, त्यांना देव आशीर्वाद देतो." "शुद्ध समीक्षणवादी" रुडोल्फ हा खुळ्या समजुतीत काळ्याचे पांढरे झालेल्या लापोंटे या क्षुद्र धर्मगुरूला बोलावून घेतो. फ्लर द मारी हिची समीक्षणात्मक सुधारणा करण्याचे मिशन या धर्मगुरूकडे असते.

आनंदाने व बिनआव्हानेने मारी या धर्मगुरूला भेटते. आपल्या खिस्ती पाशवीपणाच्या भरात युजीन सुए याची "अजब उत्पत्तबुद्धि" तावडतोब त्याला तिच्या कानात असे कुजबुजायला लावते की "जिथे पश्चात्ताप आणि तपस्या सुरू होतात, तिथे शरम समाप्त होते," म्हणजेच चर्चमध्ये; चर्च हेच एकमेव तारक असते. त्याला बाहेर फिरण्यातल्या स्वच्छंदी आनंदीपणाचा विसर पडतो; हा आनंद निसर्गाच्या कृपेने व रुडोल्फच्या स्नेहशील सहानुभूतीने निर्माण केलेला होता आणि गुन्हेगारांच्या खाणावळ-मालकिणीकडे परत जाणे भाग पडायच्या विचाराबीच तेवढी या आनंदाला बाधा होत होती.

धर्मगुरु लापोर्ते हा तावडतोब इहवादातील वृत्ती धारण करतो. त्याचे पहिले उद्‌गार असे असतात :

"प्रिय बाळे, देवाची दया अपार असते ! तुला तुझ्या कठीण प्रसंगांमध्ये त्यानं टाकून दिलं नाही यावरून त्यानं हे तुला सिद्ध करून दिलं आहे.... ज्या उदारहृदयी माणसानं तुला वाचविलं आहे, त्यानं धर्मग्रंथाच्या उक्तीची परिपूर्ती केलेली आहे" (नोंद घ्या--धर्मग्रंथाची उक्ती, मानवी उद्दिष्ट नव्हे !); "खरोखर, जे देवाला साद घालतात, त्यांच्या सन्निध देव असतो, तो त्यांच्या इच्छांची परिपूर्ती करील....तो त्यांचा आवाज ऐकेल आणि त्यांना तारेल....देव आपली कामगिरी पार पाडेल."

मारीला अजून धर्मगुरूच्या उपदेशाचा बुरा अर्थ समजू शकत नाही. ती उत्तरते: 'ज्यांनी माझ्यावर दया केली आणि मला देवाकडे परत आणलं, त्यांच्यासाठी मी प्रार्थना करेन."

तिचा पहिला विचार देवाविषयीचा नाही, तो तिच्या मानवी तारकाविषयीचा आहे आणि तिला त्याच्यासाठी प्रार्थना करायला हवी आहे, तिच्या स्वतःच्या मुक्तीसाठी प्रार्थना करायला तिला नको आहे. ती आपल्या प्रार्थनेला इतरांच्या मुक्ततेच्या काहीशा प्रभावाचे कारण सांगते. खरे म्हणजे ती अजून इतकी बालिश आहे की आपल्याला परमेश्वराकडे अगोदरच परत आणण्यात आले आहे असे ती समजते. हा बिनसनातनी भ्रम नष्ट करणे आपले कर्तव्य आहे असे या धर्मगुरूला वाटते.

तिचे बोलणे मध्येच तोडून तो सांगतो: "लवकरच, लवकरच तू मुक्तीला लायक होशील, आपल्या महान चुकांपासून मुक्तीला लायक होशील....कारण, प्रेषितांच्या

वचनाचा पुन्हा एकदा आधार द्यायचा म्हणजे, जे अधःपाताच्या कड्यावर आहेत त्यांना परमेश्वर धरून ठेवतो."

धर्मगुरु ज्या अमानुष शब्दांचा उपयोग करतो ते पाहण्यात आपण कसूर करू नये. लवकरच तू मुक्तीला लायक होशील. तुझ्या पापांना अजून क्षमा करण्यात आलेली नाही.

जसा लापोर्ते तिला पहिल्या भेटीत तिच्या पापांची जाणीव बहाल करतो, तसा रुडोल्फ तिचा निरोप घेताना तिला सोनेरी क्रूस भेटीदाखल देतो, म्हणजे पुढे तिच्यापुढे वाढून राहिलेल्या खिस्ताच्या क्रूसावर चढण्याचे प्रतीक तिला देतो.

मारी अगोदरच काही काळ मादाम जॉर्ज हिच्या शेतावर मुक्काम करून राहिलेली आहे. प्रथम आपण तो वयोवृद्ध धर्मगुरु आणि मादाम जॉर्ज यांच्या दरम्यानचा संवाद ऐकून घेऊ या.

त्याच्या मते मारीच्या बाबतीत "लग्नाचा" प्रश्नच नाही, 'कारण धर्मगुरूने हमी दिली असताना देखील कोणाही माणसाला तिचे तारुण्य भ्रष्ट करणाऱ्या तिच्या भूतकाळाला तोंड देण्याची हिंमतच होणार नाही." याच्या भरीला तो सांगतो: "तिला मोठमोठ्या चुकांचे प्रायश्चित्त घ्यायचे आहे, तिच्या नैतिक जाणिवेनं तिला सरळ मार्गावर राहायला लावायला पाहिजे होतं."

सामान्यातला सामान्य भांडवलदार जसे सिद्ध करील, तसे ती चांगली राहू शकली असे तो सिद्ध करतो: "आज पॅरिस शहरात अनेक नीतिमान लोक आहेत." या ढोंगी धर्मगुरूला हे अगदी चांगले ठाऊक आहे की दिवसाच्या कोणत्याही तासात, दाट गर्दीच्या रस्त्यातून, पॅरिसचे हे नीतिमान लोक allamettes @ वगैरे वस्तू मध्यरात्रीपर्यंत विकत असलेल्या सात ते आठ वर्षे वयाच्या मुलींकडे दुर्लक्ष करून पुढे जात असतात. मारी स्वतः हेच करीत असे आणि या मुलींच्या नशिबी, जवळजवळ निरपवाद रीतीने, मारीच्या नशिबी आले तेच येणार आहे.

मारीच्या तपस्येविषयी धर्मगुरूने मनाशी निश्चय करून ठेवलेला आहे; स्वतःच्या मनात त्याने अगोदरच तिचा धिक्कार केलेला आहे. धर्मगुरू लापोर्तेसमवेत संध्याकाळी तो घरी जात असताना आपण तिच्या पाठोपाठ जाऊ या.

"बघितलंस, बाळे," तो आपले चिकणेचुपडे वक्तृत्व आरंभतो, "ते अथांग क्षितिज पाहा. त्याच्या मर्यादा अतःतर दिसेनाशा झाल्या आहेत" (कारण संध्याकाळच झालेली आहे), "ही शान्तता व हा अफाटपणा आपल्याला अक्षयत्वाची कल्पना देत आहे असं मला वाटतंय....मारी, मी हे तुला सांगतोय, कारण निर्मितीच्या सुन्दरतांविषयी तू संवेदनाक्षम आहस....ज्या भावना तुला स्फूर्ति देतात त्याच्या धार्मिक कौतुकानं अनेकदा माझ्या भावना हेलावलेल्या आहेत——तू मात्र इतका दीर्घकाळ धार्मिक भावनेला पारखी होऊन राहिलेली होतीस."

@ आगकाड्या.—संपादक.

मारीला जो निसर्गाच्या सुन्दरतांविषयीचा बालसुलभ ता:कालिक आनंद झालेला होता त्याच्यात बदल करून त्याला धार्मिक कौतुकाचे रूप देण्यात धर्मगुरु अगोदरच यशस्वी झालेला आहे. तिच्या लेखी निसर्ग अगोदरच भक्तिभावपूर्ण ख्रिस्तीकृत निसर्ग झालेला आहे, त्याची निर्मिती म्हणून अधोगती करण्यात आलेली आहे. अवकाशाचा पारदर्शक सागर भ्रष्ट करण्यात आलेला असून त्याला साठलेल्या अक्षयत्वाचे काळेकुट्ट रूप देण्यात आले आहे तिला हे अगोदरच ठाऊक झालेले आहे की आपल्या अस्तित्वाचे सगळे मानवी अविष्कार "पापी", धर्मशून्य, खऱ्या धार्मिक रूपाला पारखे झालेले, अपवित्र आणि देवविहीन होते. तिच्या स्वत:च्या दृष्टीने धर्मगुरूकडून तिला पतित दिसायला लावणे भाग होते. त्याच्याकडून तिची नैसर्गिक, आत्मिक सामुग्री व कृपेची साधने पायाखाली तुडविली जाणे भाग होते; कारण तो तिला अभिवचन देत असलेला बाप्तिस्मा म्हणजेच दैवी कृपेचे साधन स्वीकारायला तिला भाग पाडणे आवश्यक होते.

मारीला त्याच्याकडे कबुलीजबाब द्यायला हवा असतो आणि आपल्याबाबत सौम्यपणा पतकरायला त्याला ती विनंती करते तेव्हा तो उत्तरतो :

"परमेश्वरानं आपण दयाळू असल्याचं तुला दाखवून दिलं आहे."

तिला जी क्षमा करण्यात येते तीत मारीला संबंधित मानवी प्राण्याची तिच्याविषयीची म्हणजे अन्य मानवी प्राण्यांविषयीची स्वाभाविक, स्वयंसिद्ध वृत्ती दिसता कामा नये असा प्रकार होतो. या क्षमेत तिला अफाट, निसर्गातीत, अतिमानुष व मेहेरबानीची वृत्ती दिसणे भाग होते; मानवी क्षमेमध्ये तिला ईश्वरी दया दिसणे भाग होते. सगळी मानवी व स्वाभाविक नाती देवांशी जोडलेल्या नात्यांमध्ये रूपांतरित करून त्यांना तिने अतिमानवी रूप देणे भाग होते. धर्मगुरूच्या बडबडीला ज्या रीतीने फ्लर द मारी आपल्या उत्तरामध्ये मान्यता देते तीवरून धार्मिक सिद्धांताने तिला अगोदरच केवढ्या प्रमाणात बिघडविले आहे हे दिसून येते.

आपल्या सुधारलेल्या अवस्थेचे तिने सूतोवाच करताक्षणी ती म्हणाली की आपल्याला केवळ आपल्या नव्या सुखाची जाण आलेली होती.

"प्रत्येक क्षणाला मी मशूर रुडोल्फचा विचार करायची, मी अनेकदा वर स्वर्गाकडे नजर लावायची आणि तिथे देवाचा शोध न घेता मशूर रुडोल्फचा शोध घ्यायची व त्याचे आभार मानायची. होय, गुरुमहाराज. मी कबूल करत्ये की देवाच्या पेक्षा मी त्याचाच विचार अधिक करत होत्ये; कारण जे केवळ देवच करू शकला असता ते त्यानं माझ्यासाठी केलं... मी सुखी होत्ये, इतकी सुखी की महान संकटातून ज्याची कायमची सुटका झाली असेल त्याच्याइतकी सुखी."

आपण जीवनातील एक नवी सुखाची अवस्था खरोखरी तशी असलेली अवस्था म्हणून साधेपणाने पत्करली, आपल्याला एक नवे सुख जाणवले, त्याच्या

विषयीची आपली वृत्ती नैसर्गिक आहे, निसर्गातीत नाही, हे चुकीचे असल्याचे फ्लर द मारी हिला अगोदरच आदळून येते. ज्या माणसाने आपली सुटका केली तो खरोखरी आपला तारक असल्याचे आपण पाहतो, त्याच्या जागी कोणता तरी काल्पनिक तारक म्हणजे परमेश्वर असल्याचे मानण्याऐवजी त्यालाच आपण तारक मानतो याबद्दल ती स्वतःला दोष देते. तिने अगोदरच धार्मिक ढोंगीपणात स्वतःला अडकवून घेतलेले असते. आपल्या बाबतीत दुसऱ्या माणसाने जी लायकी संपादन केलेली आहे ती देवाला देण्यासाठी हा ढोंगीपणा त्याच्याकडून काढून घेतो आणि माणसामध्ये जे जे काही मानवी आहे ते ते सगळे त्याला बावडे असल्याचे व जे जे काही अमानुष आहे ते ते सगळे खरोखरी आपले असल्याचे हा ढोंगीपणा सर्वसाधारणपणे मानतो.

मारी आपल्याला असे सांगते की तिचे विचार, तिच्या भावना, तिची जीवनविषयक वृत्ती यांच्यामध्ये जे धार्मिक परिवर्तन घडून आले, ते मादाम जॉर्ज आणि लापोर्ते यांनी घडवून आणले.

"रुडोल्फने मला cite हून जेव्हा दूर नेले, तेव्हा मला माझ्या अधोगतीची मोघम जाणीव अगोदरच आलेली होती. परंतु तुमच्याकडून आणि मादाम जॉर्ज यांच्याकडून मला जे शिक्षण, सल्ला व दाखले मिळाले त्यांनी मला हे समजून घ्यायला लावलं....की मी दुर्दैवी असण्यापेक्षा अपराधी अधिक आहे....तुम्ही आणि मादाम जॉर्ज यांनी मला माझ्या अधोगतीच्या अथांग खोलीची जाण करून घ्यायला लावली."

याचा अर्थ असा की आपल्या अधोगतीच्या मानवी आणि म्हणून सुसह्य जाणिवेच्या जागी अक्षय पापाची खिस्ती आणि म्हणून असह्य जाणीव आणून देण्याचे श्रेय ती धर्मगुरु लापोर्ते आणि मादाम जॉर्ज यांना देते. तो धर्मगुरु आणि ती धर्मवेडी यांनी तिला खिस्ती दृष्टिकोनातून स्वतःचा न्यायनिवाडा करायला शिकविले आहे.

ज्या आत्मिक दुर्दैवामध्ये आपण फेकल्या गेलो आहोत त्याची खोली मारीला जाणवते. ती म्हणते :

"भल्याची व बुऱ्याची जाणीव जर माझ्या लेखी एवढी भयानक होणं भाग होतं, तर माझ्या दुर्दैवी अवस्थेत मला तसंच राहू देण्यात का आलं नाही ? ....मला जर दुर्लौकिकातून खेचून काढण्यात आलं नसतं तर हालअपेष्टा व मारहाण यांनी लवकरच माझा बळी घेतला असता. निदानपक्षी, ज्या शुद्धतेची मी निरर्थक इच्छा सदैव धरणार आहे, त्या शुद्धतेविषयीच्या अज्ञानात तरी मी मरायला हवं होतं."

यावर तो हृदयशून्य धर्मगुरू उत्तरतो :

"ज्या कर्दमातून तुला वाचविण्यात आलं आहे, त्यात अत्यंत उदात्त व्यक्ती देखील जर एकच दिवस बुचकळून निघाली असती, तर तिच्यावर कायमचा शिक्का बसला असता. ईश्वरी न्यायालयाचा अविचलितपणा हा असा असतो !"

अंसल्या मवाळ स्वरात उच्चारलेल्या त्याच्या या धर्मगुरुमुखातल्या शापाने सखोल जखमी होऊन फ्लर द मारी उद्गारते :

" म्हणून मी निराश झालं पाहिजे असं दिसतंय तुम्हाला ! "

तो केस पांढरे झालेला धर्माचा गुलाम उत्तरतो:

" तुझ्या जीवनातून हे उध्वस्त पान पुसून टाकायची आशा तू सोडून दिली पाहिजेस, परंतु देवाच्या अपार दयेवर विश्वास ठेवला पाहिजेस. बाळे, इथं इहलोकात अश्रू, पश्चात्ताप आणि तपस्या या गोष्टी तुझ्या वाट्याला येतील, परंतु एके दिवशी वर तिथं स्वर्गात, तुला क्षमा व अक्षय सौख्य मिळेल ! "

वर स्वर्गात अक्षय सौख्य व क्षमा मिळण्यावर समाधान मानण्याइतकी मारी अजून पुरेशी मूर्ख झालेली नाही.

" देवा रे देवा ! माझ्यावर दया कर ! " ती उद्गारते. " मी अजून कितीतरी लहान आहे.... Malheur a moil" @

मग त्या धर्मगुरूचा ढोंगी शब्दच्छल शिगेला पोचतो:

" उलटपक्षी, मारी, तुझ्या वाट्याला सुख आहे. परमेश्वरानं तुला हा हा कटू परंतु उद्धारकर्ता पश्चात्ताप धाडलाय ना, तेच तुझ्या वाट्याचं सुख आहे ! त्यावरून तुझ्या आत्म्याची धर्मप्रवणता दिसून येते....तुझ्या प्रत्येक दुःखाची तिथं वर मोजदाद चाललेली असते. माझ्यावर विश्वास ठेव, देवानं तुला काही काळ कुमार्गावर सोडून दिलं ते केवळ तुझ्यासाठी पश्चात्तापाचं वैभव आणि तपस्येला मिळणारं चिरंतन पारितोषिक राखून ठेवावं म्हणून. "

या क्षणापासून मारीला पापाच्या जाणिवेने गुलाम केलेले असते. ती आपल्या अगोदरच्या जीवनातील अत्यंत दुःखी परिस्थितीत प्रेमपात्र मानवी व्यक्तिमत्व विकसित करू शकली, आपल्या बाह्य अधोगतीत तिला आपला मानवी गाभा हा आपला खरा गाभा असल्याची जाणीव होती. आता मानवी समाजाच्या ज्या घाणीने तिला बाह्यात्कारी स्पर्श केलेला आहे, तीच घाण तिचे अत्यंत आंतरिक जीवन होऊन बसते आणि त्या घाणीपायी तिला होणारा सततचा रोगभ्रमकारक आत्मक्लेश हेच तिचे कर्तव्य होऊन बसते, खुद्द देवाने नेमून दिलेले जीवितकार्य होऊन बसते, तिच्या अस्तित्वाचे आत्म-उद्दिष्ट होऊन बसते. पूर्वी ती स्वतःविषयी "Je ne suis pas pleurniecheuse" असे म्हणायची आणि "Ce qui est fait, est fait" हे तिला ठाऊक होते. आता आत्मक्लेश हे तिचे भले असणार आणि पश्चात्ताप हे तिचे वैभव असणार.

मागाहून असे उघडकीस येते की फ्लर द मारी ही रुडोल्फची कन्या असते. पुन्हा ती गेरोल्डस्टीनची राजकन्या म्हणून आपल्याला भेटते. तिचे तिच्या वडिलांशी चाललेले संभाषण आपण चोरून ऐकतो :

@ " माझ्या वाट्याला दुःखच ! "— संपादक

"En vain je prie Dieu de me delivrer de ces obsessions, de remplir uniquement mon coeur de son pieux amour, de ses saintes esperances, de me prendre enfin tonte entiere, puisque je voux me donner toute entiere, a lui ... il n'exauce par mes voeux — sans doute, parce que mes preoccupations terrestres me rendent indigne d'entrer en commun avec lui."@

माणसाला जेव्हा असे कळून चुकलेले असते की त्याची अतिक्रमणे म्हणजे परमेश्वराविरुद्ध केलेले अपार गुन्हे आहेत, तेव्हा आपण स्वतःला सर्वस्वी परमेश्वराच्या स्वाधीन करून घेतले आणि जगाला आणि जगातल्या व्यवहारांना सर्वस्वी मेलो, तरच केवळ आपल्याला मुक्तीची आणि दयेची खात्री असू शकते. फ्लर द मारी हिला जेव्हा हे कळून चुकते की आपल्या अमानुष अवस्थेतून आपली मुक्तता हा परमेश्वराचा चमत्कार आहे, तेव्हा असल्या चमत्काराला पात्र होण्यासाठी तिला स्वतःलाच साधू होणे भाग आहे. तिच्या मानवी प्रेमाचं परिवर्तन धार्मिक प्रेमात झाले पाहिजे, सुखासाठी चाललेल्या धडपडीचे परिवर्तन चिरंतन सुखासाठीच्या धडपडीमध्ये झाले पाहिजे, संसारी समाधानाचे परिवर्तन पवित्र आशेमध्ये झाले पाहिजे, लोकांशी एकरूप होण्याचे परिवर्तन परमेश्वराशी एकरूप होण्यात झाले पाहिजे. परमेश्वराने तिला सर्वस्वी आपल्याकडे घेतले पाहिजे. परमेश्वर तिला सर्वस्वी आपल्याकडे का घेत नाही हे ती स्वतःच उघड करून सांगते. अजून तिने स्वतःला सर्वस्वी समर्पण केलेले नसते, तिचे अन्तःकरण अजूनही संसारी गोष्टीमध्ये व्यग्र व गुंतलेले आहे. तिच्या सामर्थ्यशाली स्वभावाची ही शेवटची धुगधुगी असते. ती जगाला पूर्णपणे मरून जाऊन मठात दाखल होऊन स्वतःला संपूर्णपणे परमेश्वराच्या स्वाधीन करते.

पापांचा साठा नसे ज्याने केला
मठ हे ठिकाण नसे त्याला
साठा हा बहुविध आणि मोठा असो
झडकरी असो वा उशिराचा असो
व्यथित हृदयाला तपस्येचा मोद
न चुके तयाला गोड गोड

(गटे)[१५४]

@ "देवानं मला या मनोयातनांतून सोडवावं, त्याच्या केवळ पवित्र प्रेमानं आणि त्याच्या पावन आशांनी माझं अंतःकरण भरून यावं म्हणून मी निरर्थक देवाची प्रार्थना करते; एका शब्दात सांगायचं म्हणजे त्यानं मला सर्वस्वी आपल्याकडे घ्यावं, कारण मी स्वतःला सर्वस्वी त्याच्या स्वाधीन करू इच्छिते....तो माझी इच्छा पूर्ण करत नाही; कारण माझी भू-लोकांवरील व्यवधानं त्याच्याशी एकरूप व्हायला मला अपात्र ठरवतात हे निःसंशय."—संपादक

मठामध्ये रुडोल्फच्या कारवायांच्या द्वारा फ्लर द मारी हिला ॲबेसच्या (प्रमुख जोगिणीच्या) पदावर चढती मिळते. प्रथम ती ही नेमणूक स्वीकारायला नकार देते, कारण आपण या पदाला अपात्र आहोत असे तिला वाटते. वयोवृद्ध ॲबेस तिचे मन वळविते.

"Je vous dirai plus, machere fille, avant d'entrer an bercail votre existence surail 'ete' aussi e'gare'e, qu'elle a ete au contraire pure et louable .... que les vertus evangeliques, dont vous avex donne' 'exemple depuis votre sejour ici expieraient et rache'teraient encore aux yeux du Seigneur un passe' si coupable quil fut" @

ॲबेस जे सांगते त्यावरून आपल्याला असे दिसून येते की फ्लर द मारी हिच्या भूतलावरील सद्‌गुणांचे रूपान्तर धार्मिक सद्‌गुणांमध्ये झालेले आहे, किंवा असे म्हणावे हवे तर, की तिचे खरे सद्‌गुण धार्मिक बिडंबनांखेरीज अन्य कोणत्याही स्वरूपात अतःपर प्रगट होऊ शकत नाहीत.

मारी ॲबेसला उद्देशून उत्तरते:

"Sainte mere — je crois maintenant pouvoir acepter."(b)

मठातले आयुष्य मारीच्या व्यक्तिमत्वाला मानवत नाही—ती मरते. ख्रिस्ती धर्म तिची केवळ कल्पनेत समजूत घालतो, किंवा असे म्हणावे हवे तर, की तिची ख्रिस्ती समजूत म्हणजे नेमका तिच्या खऱ्या जीवनाचा व गाभ्याचा नाश असतो—तिचा मृत्यू असतो.

अशा प्रकारे रुडोल्फने प्रथम फ्लर द मारी हिचा बदल पश्चात्तप पापिणीमध्ये केला, नंतर या पश्चात्तप पापिणीचा बदल जोगिणीमध्ये केला, आणि शेवटी जोगिणीचा बदल प्रेतामध्ये केला. तिच्या स्मशानयात्रेच्या वेळी तो कॅथोलिक धर्मगुरू इतकेच नव्हे, तर तो समीक्षणात्मक धर्मगुरु स्झेलिगादेखील तिच्या समाधीला अनुलक्षून उपदेश-पाठ म्हणतो.

@ "बाळे, मी आणखी सांगतो : जर या मठात दाखल होण्यापूर्वी तुझं जीवन जितकं चुकांनी भरलेलं होतं, तितकंच उलटपक्षी ते शुद्ध व प्रशंसनीय होतं....तर तू इथं असल्यापासून ज्या धार्मिक गुणांचं उदाहरण घालून दिलेलं आहेस, त्या अर्थी परमेश्वराच्या दृष्टीनं तू आपल्या पूर्वचरित्राचं प्रायश्चित्त घेतलं आहेस व त्यातून स्वतःला शुद्ध करून घेतलं आहेस, मग ते पूर्वचरित्र किती का पापमय असेना."

—संपादक

(b) "हे पवित्र माते, मला आता विश्वास वाटतोय की मी हे पद स्वीकारू शकत्ये." —संपादक

तिच्या "**निरागस**" अस्तित्वाला तो तिचे "क्षणभंगुर" अस्तित्व म्हणतो; "चिरंतन व अविस्मरणीय अपराधाच्या" विरोधात तो ते मांडतो. तिचा "शेवटचा श्वास" हा "क्षमेची व माफीची प्रार्थना" होता, या वस्तुस्थितीची तो प्रशंसा करतो. परंतु ज्याप्रमाणे तो प्रॉटेस्टंट धर्मगुरु परमेश्वराच्या दयेची आवश्यकता, मृताचा सार्वत्रिक मूळ पापामध्ये सहभाग आणि त्याच्या पापाच्या जाणिवेची तीव्रता यांचा ऊहापोह केल्यानंतर मृताच्या गुणांची स्तुती ऐहिक शब्दामध्ये करणे आपल्याला भाग आहे असे म्हणतो, त्याचप्रमाणे हेर स्झेलिगा देखील पुढील शब्दयोजनेचा वापर करतो :

"आणि असे असूनही व्यक्तिशः तिने क्षमायाचना करण्याजोगे काहीच केलेले नाही."

शेवटी तो मारीच्या समाधीवर चर्चमधील व्यासपीठावर करायच्या वक्तृत्वाचे एक कमालीचे निस्तेज फूल टाकतो :

"मनुष्यप्राणी अंतरंगात क्वचितच शुद्ध असतात, तरी तिने या जगापुढे आपले डोळे मिटले आहेत."

आमेन!

कार्ल मार्क्स आणि फ्रेडरिक एन्गल्स,
द होली फॅमिली

मार्क्स आणि एन्गल्स, संकलित ग्रंथ, खंड ४ था,
मॉस्को, १९७५, पृष्ठे १६८-७६

बाल्झॅक

१

अशा प्रकारे उदाहरणार्थ, बाल्झॅक, याने लोभीपणाच्या प्रत्येक छटेचा इतका आमूलाग्र अभ्यास केलेला आहे की म्हातारा सावकार गोब्सेक हा क्रयवस्तूंच्या साठ्याचा ढीग करायला प्रारंभ करतो तेव्हा त्याला दुसरे बालपण आले आहे असे याने म्हटले आहे.

कार्ल मार्क्स, भांडवल, खंड १ ला,
मॉस्को १९७४, पृष्ठ ५५२

२

बाल्झॅक हा वास्तवतेचे जे सखोल आकलन करतो, त्याच्या बाबतीत सर्वसाधारणपणे तो लक्षणीय आहे. त्याची शेवटची कादंबरी Les paysans हिच्यामध्ये

त्याने एका छोट्या शेतकऱ्याचे यथायोग्य वर्णन केले आहे. हा शेतकरी आपल्या सावकारासाठी अनेक बारीकसारीक कामे मोफत करतो. त्याला सावकाराची भलाई राखायची फारच उत्सुकता असते. त्याची अशी कल्पना असते की आपण या सावकाराला विनामूल्य काहीच देत नाही, कारण आपल्या श्रमाला रोख गुंतवणुकीचा खर्च काहीच पडत नाही. सावकार मात्र अशा प्रकारे एका दगडाने दोन कुत्री मारतो. तो पगाराच्या पोटी रोख गुंतवणूक वाचवतो आणि शेतकरी त्याच्या स्वतःच्या शेताला श्रमाच्या फायद्यापासून वंचित केल्यामुळे क्रमाक्रमाने देशोधडीला लागतो आणि सावकार आपल्या सावकारी कोळ्याच्या जाळ्यात त्याला अधिकाधिक गुरफटत राहतो.

कार्ल मार्क्स, भांडवल, खंड ३ रा,
मॉस्को, १९७४, पृष्ठ ३९

३

Progress [१५५] मधील पॉलचा लेख मी खूप खुषीत येऊन वाचला. त्याने आपला मुद्दा अनेकदा अचूक विशद केलेला आहे. etrennes@ च्या कालखंडानंतर लवकरच Ble' [१५६] प्रकाशित होईल आणि त्याच्या पाठोपाठ लवकरच ती कादंबरी [१५७] येईल अशी आपण आशा धरू या. ती कादंबरी वाचायला मी अत्यंत उत्सुक आहे. पॉल हा बाल्झॅकच्या पावलावर पाऊल टाकतो आहे म्हणजे छानच होईल हे ! ओघाओघाने सांगायचे म्हणजे माझी तब्बेत बरी नसली की मी बाल्झॅकखेरीज अन्य जवळ जवळ काहीच वाचत नसतो आणि या जबरदस्त मुरब्बी लेखकाचा मी भरपूर आनंद लुटला आहे. तिथे १८१५ पासून १८४४ पर्यंतचा जो फ्रान्सचा इतिहास आहे. तो सगळे Vaulabelles, Capefigures, Louis Blancs et tutti quanti यांच्यापेक्षा कितीतरी अधिक आहे. आणि केवढा तरी धीटपणा ! त्याच्या कवित्वयुक्त न्याय-निवाड्यामध्ये केवढा तरी क्रान्तिकारक विरोध-विकास भरलेला आहे !

एन्गल्स यांचे लॉरा लाफार्ग हीस पत्र,
तारीख १३ डिसेंबर १८८३
फ्रेडरिक एन्गल्स, पॉल आणि लॉरा लाफार्ग,
पत्रव्यवहार,
खंड १ ला, मॉस्को, १९५९, पृष्ठ १६०

@ नववर्षाच्या भेट वस्तूंच्या--संपादक

४

एक छोटा माणूस[१५८] बाल्झॅकची एक कादंबरी प्रथमच वाचतो (आणि ती देखील the cabinel des antiques किंवा Pere Goriot), तेव्हा तो भलताच वरचढ होतो आणि ती फार पूर्वीपासून कसली तरी सामान्य गोष्ट आहे असे तिच्याविषयी कमालीच्या तिरस्काराने बोलतो. याच्याविषयी आपण काय म्हणू शकतो !

एन्गल्स यांचे मार्क्स यांना पत्र,
तारीख ४ ऑक्टोबर १८५२
मार्क्स/एन्गल्स, वेर्के, खंड २८ वा, १९६३,
पृष्ठ १५२

५

या क्षणी मी तुम्हाला भगदी थोड्या ओळी व लिहू शकतोय, कारण घरमालकाचा मुनीम इथे आहे आणि त्याच्या पुढ्यात मला बाल्झॅकच्या कॉमेडीमधील मेर्कादेची भूमिका करणे भाग आहे. बाल्झॅकविषयी सांगायचे म्हणजे त्याच्या Le chef-d'OEuvre Inconnu आणि Melmoth re'concilie या कथा वाचायची मी तुम्हाला शिफारस करतो. या दोन छोट्या chefs d'oeuvres आनंददायक उपरोधाने भरलेल्या आहेत.

मार्क्स यांचे एन्गल्स यांना पत्र,
तारीख २५ फेब्रुवारी, १८६७
मार्क्स/एन्गल्स, वेर्के, खंड ३१ वा, १९६५,
पृष्ठ २७८

प्येरे ज्यूपाँ

१८४६ साली फ्रान्समधील शहरी लोकसंख्या २४.४२ टक्के आणि ग्रामीण लोकसंख्या ७५.५८ होती; १८६१ साली शहरी २८.८६, तर ग्रामीण ७१.१४ टक्के असे आकडे होते. गेल्या पाच वर्षांच्या अवधीत लोकसंख्येच्या ग्रामीण टक्केवारीतील घट याहूनही अधिक लक्षणीय झालेली आहे. १८४६ सालाइतक्या अगोदरच्या काळात प्येरे ज्यूपाँ याने आपल्या "Ouvrier" या कवनात असे म्हटले आहे :

Mal ve'tus loges dans des rtous,
Sous les combles, dans les de'combres,
Nous vivons avec les hiboux
En les larrons amis des ombres.

घाणेरड्या नाल्याच्या काठी।
केरकचऱ्याच्या ढिगात
राहती जिथे दिवाभीत घुबडे।
आणि चोर पापकर्मी सारे।
तेथेच राहतो आम्हीही बिचारे
चिंध्या फक्त पांघरणारे
झोपडीच्या आश्रयाने.

[मराठी अनुवाद : वसंत तुळपुळे अनुवादित भांडवल खंड १ ला पृष्ठ ६०० वरील टीपेतून उद्धृत]

कार्ल मार्क्स, भांडवल, खंड १ ला,
मॉस्को, १९७४, पृष्ठ ६४८

आर्थर रँक

रँक याची कादंबरी [१५९] फारच छान आहे.

एन्गल्स यांचे मार्क्स यांना पत्र, तारीख २२ ऑक्टोबर १८६९
मार्क्स/एन्गल्स, वेर्के, खंड ३२ वा, १९६५, पृष्ठ ३७६

रेनान

१

लाझारसविषयी [१६०] सांगायचे म्हणजे मला रेनानकृत जीसस चरित्राची आठवण येते. अनेक दृष्टींनी ही नुसतीच कादंबरी आहे आणि तिच्यात बहुमूर्तिवादी-गूढगुंजनात्मक कल्पनाविलासांची रेलचेल आहे. तथापि काही रीतींनी हे पुस्तक याच्या अगोदरच्या जर्मन पुस्तकांपेक्षा वरचढ आहे आणि ते फार प्रदीर्घ नसल्यामुळे तुम्ही ते वाचलेच पाहिजे. साहजिकच ते जर्मन अभ्यासांवर आधारलेले आहे.

अगदी लक्षणीय. इथे हॉलंडमध्ये जर्मन समीक्षणात्मक धर्मशास्त्रीय पंथ इतका a' l'ordre du jour@ आहे की धर्मगुरू चर्चमधील व्यासपीठावरून याच्याविषयीची आपली निष्ठा उघडपणे जाहीर करतात.

मार्क्स यांचे एन्गल्स यांना पत्र,
तारीख २० जानेवारी १८६४

मार्क्स/एन्गल्स, वेर्के, खंड ३० वा, १९६४,
पृष्ठ ३८६.

२

इथे मी अजवल काळातील ख्रिस्ती धर्माचा अभ्यास करतोय, रेनान [१६१] आणि बायबल वाचतोय. रेनान भयंकर उथळ आहे, परंतु एक व्यवहारी माणूस या नात्याने जर्मन विद्यापीठीय धर्मशास्त्रज्ञांच्यापेक्षा त्याचा दृष्टिकोन अधिक व्यापक आहे. नाही-तरी त्याचे पुस्तक ही कादंबरीच आहे आणि तिला Philostratus वरील त्याची टीका सारख्याच प्रमाणात लागू करता येते : हिचा आपल्याला ऐतिहासिक साधन म्हणून वापर करता येतो. जसा, उदाहरणार्थ, अलेक्झांडर डयुमा थोरला याच्या कादं-बऱ्यांचा वापर Fronde कालखंडाबाबत आपण करू, तसा. व्यक्तिगत मुद्यांबाबत मी त्याच्या भयानक चुका पकडल्या आहेत. याच्या भरीला तो अमर्याद आगाऊपणाने जर्मनांच्या ग्रंथातून भुरट्या चोऱ्या करतो.

एन्गल्स यांचे व्हिक्टर ॲडरल यास पत्र
तारीख १९ ऑगस्ट, १८९२

मार्क्स / एन्गल्स, वेर्के, खंड ३८ वा, १९६८,
पृष्ठ ४३१

झोला

मला एक परिचय पत्र (पॉलला उद्देशून b) कोर्निग्जबर्गचा एक तरुण डॉक्टर कॉन्रॅड श्मिड्ट याला देणे भाग पडले. हा question sociale मध्ये लुडबूड

@ रोजच्या व्यवहारातला--संपादक
(b) लाफार्ग.--संपादक

करतो. मला आजवर भेटलेल्यांतला हा बहुधा सगळ्यांत जास्त कच्चा तरुण आहे; हा इथे सुमारे तीन महिने होता, सज्जन माणूस दिसतोय, म्हणजे आजकाल जसे सज्जन असतात तितकाच, म्हणजे frisst keine Schuhnagel and sauft keine Tinte. @ पॉल जर त्याला "materialistsche Geschichtsanschauung© इथे सोडून देईल, तर त्याला तो फारसा त्रास देणार नाही. तो झोलाचे कौतुक करतो. त्याच्या ठायी त्याने "materialistiskhe Geschichtsanschauung"(b) चा शोध लावलाय.

एन्गल्स यांचे लॉरा लाफार्ग हीस पत्र,
तारीख १५ जून १८८०
फ्रेडरिक एल्गल्स, पॉल आणि
लॉरा लाफार्ग, पत्रव्यवहार,
खंड २ रा, मॉस्को, १९६०, पृष्ठ ५०

मोपासाँ

सोमवारी रात्री १६२ मी Bel Ami वाचून संपविली होती आणि त्यात प्रदर्शित केलेल्या पॅरीसियन वृत्तपत्रव्यवसायाचे रवंथ करत होतो, ते वर्णन अतिशयोक्तिपूर्ण असले पाहिजे असा विचार करीत होतो, आणि तेवढ्यात काय गंमत झाली--मंगळवारी सकाळी तुझ्या व पॉलच्या मला आलेल्या पत्राने माझ्या पुढ्यात Bel Ami मधला एक प्रसंग—म्हणजे प्रत्यक्ष जीवनातला--उलगडून दाखविला, आणि म्हणून मला गी द मोपासाँला अभिवादन करणे भाग आहे. ठीक तर, तूर्तास येवढेच पुरे. Faut-il done etre canaille pour avoir un journal quotidien a paris ! १६३ *

एन्गल्स यांचे लॉरा लाफार्ग हीस पत्र,
तारीख ५ फेब्रुवारी १८८७
इंग्रजीत लिहिलेले
फोटो कॉपीवरहुकूम प्रकाशित

(a) बुटांचे खिळे मुळीच खात नाही आणि शाई मुळीच पीत नाही.--संपादक

(b) इतिहासाची भौतिकवादी संकल्पना.--संपादक

* पॅरिस शहरी दैनिक वृत्तपत्र प्रसिद्ध करायचे म्हणजे आपण खरोखरीच खलपुरुष झाले पाहिजे काय !

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
३०२६
दा. क. २७-२-७२
निर्लेखनार्ह
ग्रंथ शाखा (स्थळ प्रत)

इंग्रजी आणि आयरिश साहित्य

डॅनियल डीफो

१

मार्क्सचा रॉबिन्सन हा डॅनियल डीफोचा अस्सल मूळचा रॉबिन्सन आहे, त्याच्यातून दुय्यम उपलक्षणे देखील घेतलेली आहेत--फुटलेल्या जहाजातून वाचविलेला कचरा, वगैरे. मागाहून त्याच्याकडे त्याचा स्वतःचा फ्रायडेदेखील होता, आणि तो असाच जहाज फुटलेला व्यापारी होता, आणि तो, माझी जर चूक होत नसेल तर, एका काळी गुलामांचा व्यापार करत होता. एका शब्दांत सांगायचे म्हणजे, खराखुरा "भांडवलदार" होता.

एन्गल्स यांचे कार्ल कौट्स्की यास पत्र,
तारीख २० सप्टेंबर १८८४

मार्क्स/एन्गल्स, वेर्के, खंड ३६ वा, १९६७
पृष्ठ २१०

२

ज्या अर्थी रॉबिन्सन क्रूसोचे अनुभव हा अर्थशास्त्रज्ञांच्या * लेखी आवडता विषय आहे, त्या अर्थी आपण याच्या वेटाबर जाऊन त्याच्याकडे एकदा नजर टाकू या.

---

* रिकार्डोकडे देखील रॉबिन्सन क्रूसोच्या धर्तीच्या त्याच्या कथा आहेत. "तो आदिम शिकारी आणि आदिम मच्छिमार यांना थेट क्रयवस्तूंचे मालक बनवितो, मासे आणि शिकार केलेले प्राणी यांचा विनिमय या विनिमय-मूल्यांमध्ये ज्या

(पुढील पानाच्या पायथ्याशी पुढे चालू)

तो जरी नेमस्त असला, तरी त्याच्या काही थोड्या गरजा त्याला भागवाव्याच लागतात, आणि म्हणून त्याला विविध प्रकारांचे थोडेसे उपयुक्त काम करणे भाग असते, उदाहरणार्थ हत्यारे व फर्निचर तयार करणे, शेळ्या-बोकडांना माणसाळणे, मासे मारणे आणि शिकार करणे. त्याच्या प्रार्थना यांजसारख्या गोष्टी आपण मुळीच हिशेवात घेत नाही; कारण त्याला आनंद देण्याचा त्या एक स्रोत आहेत आणि तो त्यांच्याकडे तेवढीच करमणूक म्हणून पाहतो. त्याच्या कामात विविधता असली तरीदेखील तो हे जाणून आहे की आपल्या श्रमाचा प्रकार कसलाही असला तरी ही कामगिरी केवळ एकाच रॉबिन्सनची आहे आणि परिणामतः ही कामगिरी म्हणजे मानवी श्रमाच्या वेगवेगळ्या रीती आहेत, दुसरे तिसरे काहीच नाही. खुद्द आवश्यकताच त्याला आपला वेळ कामाच्या वेगवेगळ्या प्रकारांच्या दरम्यान बिनचूकपणे वाटून देणे भाग पाडते. एक प्रकार त्याच्या सर्वसाधारण कामगिरीतील अन्य प्रकारापेक्षा अधिक मोठी जागा व्यापत असेल तर ते उद्दिष्ट म्हणून पुढे ठेवलेले उपयुक्त परिणाम साधण्यातील अधिक मोठ्या वा अधिक लहान अडचणींवर मात करण्यावर अवलंबून असते. ही गोष्ट आमचा मित्र रॉबिन्सन लवकरच अनुभवावरून शिकतो, आणि फुटक्या जहाजातून एक घड्याळ, एक खतावणी, एक लेखणी व शाई हस्तगत केल्यानंतर तो जन्मजात इंग्रजाप्रमाणे हिशेव ठेवायला सुरुवात करतो. त्याच्या स्टॉकबुकात त्याच्या मालकीच्या उपयुक्त वस्तूंची एक यादी असते, त्यांच्या उत्पादनासाठी आवश्यक अशा कामगिऱ्यांची यादी असते; आणि शेवटची गोष्ट म्हणजे या वस्तूंच्या निश्चित परिमाणांना सरासरी किती श्रम-काल पडतो, याची नोंद असते. रॉबिन्सन आणि त्याने स्वतः निर्मिलेली संपत्ती असलेल्या या वस्तू यांच्या दरम्यानचे सगळे संबंध हे इथे इतके साधे व सुस्पष्ट आहेत की कसल्याही परिश्रमाशिवाय मिस्टर सेडली टेलर यांना देखील ते आकलनीय आहेत. आणि असे असूनही मूल्याची निश्चिती करण्यास आवश्यक असे सगळे त्या संबंधांमध्ये समाविष्ट आहे.

कार्ल मार्क्स, भांडवल, खंड १ ला,
मॉस्को, १९७४, पृष्ठ ८१

(मागील पानावरून समाप्त)

प्रमाणात श्रम-काल समाविष्ट आहे त्या प्रमाणात करतो. या प्रसंगी तो ज्या अंशाने या लोकांची हत्यारे हिशेबात घ्यावी लागतात त्या अंशाने १८१० साली लंडन एक्स्चेंजवर चालू उपयोगात असलेले वार्षिक तक्ते या लोकांना हिशेबात वापरायला लावण्याचा कालक्रम विपर्यय करतो. 'मिस्टर ओवेन यांचे समांतरभुज चौकोन' हे त्याला परिचित असलेले, भांडवलदारी प्रकारांच्या भरीला, समाजाचा एकमेव प्रकार असलेले दिसतात." (कार्ल मार्क्स : "Zur kritik वगैरे," पृष्ठे ३८-३९.)

स्विफ्ट

१७२७ साली 'आयर्लंडच्या राज्याचे संक्षिप्त दर्शन' यामध्ये चराऊ राना-विषयी स्विफ्ट लिहितो : "जमिनीच्या सुधारणेविषयी म्हणाल, तर जे थोडे लोक तसा प्रयत्न करतात किंवा लागवड करतात, ते लोभीपणाद्वारा म्हणा किंवा कौशल्याच्या अभावाद्वारा म्हणा, सर्वसाधारणपणे पहिल्यापेक्षा अधिक वाईटच अवस्था करून ठेवतात, झाडे लावण्यातही यशस्वी होत नाहीत, किंवा झुडुपे लावण्यातही यशस्वी होत नाहीत आणि चराऊ राने करायच्या नादी लागून सिथियन लोकांच्या धर्तीनुसार रोजच्या रोज देशातली वस्ती उठवून लावत आहेत."

फ्रेडरिक एन्गल्स, "इंग्लंड आणि आयर्लंड यांच्या इतिहासाबाबतचे हस्तलिखित"
इंग्रजी भाषेत लिहिलेले

मार्क्स/एन्गल्स, Uber kunst und Literatur, खंड १ ला, १९६७, पृष्ठ ४०९

पोप

National-Zeitung १६४ ने पोप कवीचे उद्‌गार खरे करून दाखविले आहेत.

साम्राज्य जुने पूर्वपदावर आणू
यास्तव ती अजुनी झटते जणू
जन्मजात देवता, तिचा तो
मठपणा कधिहि न मरतो. १६५

परंतु पोप कवीचे मठपणाचे राज्य हे National-Zeitung च्या राज्याहून वेगळे आहे ते या अर्थाने, की तिथे "मठ नंबर दोन आजच्या घडीला राज्य करतोय, जसा एका काळी मठ नंबर एक राज्य करीत होता," तर इथे, म्हातारा मठ, म्हणजे मठ नंबर एक अजूनही प्रभाव गाजवतोय.

कार्ल मार्क्स, "हेर व्होग्ट"
मार्क्स/एन्गल्स, वेर्के,
खंड १४ वा, १९६९, पृष्ठ ५९३

शेले आणि बायरन *

मार्क्सला जसे तत्त्वज्ञ व अर्थशास्त्रज्ञ चांगल्या प्रकारे अवगत व समजत होते, तसेच त्याला कवी देखील चांगल्या प्रकारे अवगत व समजत होते, आणि तो म्हणायचा :

"बायरन आणि शेले यांच्या दरम्यानचा खरा फरक म्हणजे हा आहे, की जे त्यांना समजून घेतात व त्यांच्यावर प्रेम करतात त्यांना बायरन त्याच्या छत्तिसाव्या वर्षी निधन पावला हा ते दैवयोग मानतात; कारण तो जर अधिक काळ जगला असता तर तो प्रतिगामी भांडवलदार झाला असता : याच्या उलट शेलेचा एकोणतीस वर्षांच्या वयाला मृत्यू झाल्याचे त्यांना वाईट वाटते; कारण तो आमूलाग्र क्रान्तिकारक होता आणि तो समाजसत्तावादाच्या अग्रदलाचा सुसंगतपणे कैवार घेत राहिला असता."

एडवर्ड ॲव्हेलिंग आणि ईलियानॉर मार्क्स-ॲव्हेलिंग,
"शेले समाजसत्तावाद्याच्या भूमिकेत"
Die Neue Zeit, VI Jg., 1888, पृष्ठ ५४१

वॉल्टर स्कॉट

स्कॉटलंडमधील जमात पद्धतीचा पाडाव १७४५ च्या बंडाच्या १६६ दडपणुकीपासून सुरू होतो. या पद्धतीचा स्कॉच क्लॅनशी नेमका कोणता दुवा आहे याचा शोध लावणे बाकी राहिलेले आहे; तो एक दुवा आहे यांत मुळीच शंका नाही. वॉल्टर स्कॉटच्या कादंबऱ्या स्कॉटलंडच्या हायलँड्समधील क्लॅन आपल्या डोळ्यांसमोर ठसठशीतपणे उभा करतात. मॉर्गन म्हणतो तदनुसार, हा क्लॅन म्हणजे

"संघटना व बाणा यांच्या बाबतीत जमातीचा सर्वोत्तम नमुना आहे आणि जमात जीवनाचा तिच्या सदस्यांवरील प्रभाव दर्शविणारे एक असामान्य चित्र आहे.... त्यांच्या झगड्यांमध्ये व रक्तपाती बदला घेण्यामध्ये, जमातींनी त्यांची स्थलनिश्चिती करण्यामध्ये, त्यांच्या जमिनींचा त्यांनी समाईक वापर करण्यामध्ये, क्लॅनच्या सदस्याने आपल्या प्रमुखावर निष्ठा ठेवण्यामध्ये आणि सदस्यांनी एकमेकांवर निष्ठा ठेवण्यामध्ये, ही जमातनिष्ठ समाजाची नेहमीची व सातत्याने असणारी उपलक्षणे असतात.... आनुवंशिकता पुरुषप्रधान होती, म्हणजे पुरुषांची मुले क्लॅनची सदस्य राहत असत, तर स्त्रियांची मुले त्यांच्या त्या त्या वडिलांच्या क्लॅन्सची सदस्य राहत असत."

फ्रेडरिक एन्गल्स, कुटुंबसंस्था, खाजगी मालमत्ता व राज्यसंस्था यांचा उद्गम,
मार्क्स आणि एन्गल्स, निवडक ग्रंथ, खंड ३ रा, मॉस्को, १९७३, पृष्ठे २९६-९७

---

* अपवाद म्हणून हा मार्क्सची कन्या ईलियानॉरकृत मार्क्सच्या आठवणीतला उतारा ग्रंथाच्या मुख्य भागात समाविष्ट केला आहे. — संपादक

विल्यम कॉबेट याचे सामाजिक लेख

बिल @ ज्यांनी मांडले, ते मिस्टर कॉबेट हे सुप्रसिद्ध विल्यम कॉबेट यांचे चिरंजीव आहेत आणि आपल्या वडिलांनी ज्या बरोचे प्रतिनिधित्व केले त्याच बरोचे ते प्रतिनिधी आहेत. त्यांच्या जागेप्रमाणेच ते आपल्या वडिलांचे वारसदार आहेत, आणि म्हणून ते खरोखरी स्वतंत्र आहेत, परंतु सध्याच्या पक्षांच्या अवस्थेशी ते जरासे फटकूनच असतात. विल्यम कॉबेट हे जुन्या इंग्रज जहालवादाचे अत्यंत कर्तबगार प्रतिनिधी होते. किंबहुना ते या जहालवादाचे निर्मातेच होते म्हणानात. यांनीच सर्वप्रथम टोरीज व व्हिग्ज यांच्या दरम्यानच्या वंशपरंपरागत पक्षीय युद्धाचे रहस्य उघड करून दाखविले, आइतखाऊ व्हिग सरदारमंडळाच्या बनावट उदारमतवादाचे पितळ उघडे पाडले, प्रत्येक स्वरूपातल्या जमीनदारशाहीला विरोध केला, प्रस्थापित धर्मपीठाच्या ढोंगी लुटारूपणाचा उपहास केला आणि दोन प्रमुख अवतार धारण केलेल्या धनिकशाहीवर हल्ला केला—हे दोन अवतार म्हणजे "थ्रेडनीडल स्ट्रीटवरील थेरडी" (बँक ऑफ इंग्लंड) आणि मिस्टर मक्वर्म आणि कंपनी (राष्ट्रीय सावकार). १६७ राष्ट्रीय कर्ज रद्द करा, धर्मपीठांच्या इस्टेटी जप्त करा, आणि सर्व प्रकारचा कागदी पैसा रद्द करा, असे प्रस्ताव त्यांनी मांडले. स्थानिक स्वराज्यावर राजकीय केन्द्रीकरणाची होत असलेली अतिक्रमणे त्यांनी पावलापावलागणिक हेरली आणि इंग्रज प्रजेच्या खास हक्कांची व स्वातंत्र्याची ही पायमल्ली म्हणून त्यांनी हिचा धिःक्कार केला. हा औद्योगिक केन्द्रीकरणाचा आवश्यक परिपाक आहे हे त्यांना समजले नाही. राष्ट्रीय सनदेमध्ये ज्यांचे मागाहून एकत्रीकरण करण्यात आले त्या सगळ्या राजकीय मागण्यांचा त्यांनी पुकारा केला: असे असूनही त्यांच्या लेखी या मागण्या म्हणजे औद्योगिक कामगाराच्या असण्यापेक्षा छोट्या औद्योगिक मध्यम वर्गाच्या राजकीय सनदेच्या स्वरूपातल्या होत्या. ते उपजतबुद्धीने व सहानुभूतीच्या हिशेबी खालच्या वर्गातले होते, परंतु त्यांच्या बुद्धीने मध्यम वर्गीय सुधारणावादाच्या मर्यादा क्वचितच तोडून पुढे झेप घेतली असेल. जमीनदार, बँकवाले, सार्वजनिक सावकार आणि प्रस्थापित धर्मपीठाचे धर्मगुरू यांच्या इतकेच बहुजन समाजाशी वैर धरणाऱ्या गिरणी मालकशाहीच्या अस्तित्वाचा संशय विल्यम कॉबेट यांना जो येऊ लागला तो १८३४ सालापर्यंत म्हणजे त्यांच्या निधनाच्या किंचित अगोदर, नव्या पुअर लॉच्या १६८ स्थापनेनंतरच्या काळापर्यंत त्यांना आलेला नव्हता. अशा प्रकारे एका अंगाने ते आधुनिक चार्टिस्टांचे पूर्वसूरी होते, तर दुसऱ्या अंगाने, कितीतरी अधिक प्रमाणांत, ते कट्टर जॉन बुल होते. ते एकाच वेळी इंग्लंडची अत्यंत प्रतिगामी आणि अत्यंत विघातक अशी व्यक्ती होते—जुन्या इंग्लंडचा विशुद्ध असा मूर्तिमंत अवतार आणि अत्यंत धाडशी असा

@ दहा तासांच्या कामाच्या दिवसाचे बिल. — संपादक

तरुण इंग्लंडचा प्रेरक अशा एकाच वेळी दोन भूमिका ते करत होते. धर्मसुधारणेच्या कालखंडापासून इंग्लंडच्या अधोगतीला प्रारंभ झाला, आणि १६८८ च्या तथाकथित गौरवशाली क्रान्तीपासून इंग्रज जनतेची बाह्यात्कारी लाचारी सुरू झाली असे त्यांचे मत होते. म्हणून त्यांच्या लेखी क्रान्ति म्हणजे नावीन्य नव्हते, परंतु क्रान्ति म्हणजे पूर्वपदस्थापना होती, क्रान्ति म्हणजे नव्या युगाची निर्मिती नव्हती, परंतु क्रान्ति म्हणजे "चांगल्या जुन्या काळाची" पूर्वपदस्थापना होती. त्यांना जे दिसू शकले नाही ते म्हणजे हे होते, की इंग्रज जनतेच्या वरवरच्या अधोगतीचा मेळ मध्यम वर्गाच्या वरचढपणाच्या प्रारंभाशी नेमका बसत होता, आधुनिक व्यापार व उद्योगधंदे यांच्या विकासाशी बसत होता, आणि जसजशी त्यांची वाढ होत होती, तसतशी त्याच गतीने जनतेची भौतिक परिस्थिती ऱ्हास पावत होती आणि राजकीय केन्द्रीकरणापुढे स्थानिक स्वराज्य विलयाला जात होते. अठराव्या शतकापासून नुन्या इंग्रज समाजाच्या अधोगती-पोटी जे मोठमोठे बदल होत होते ते त्यांच्या डोळ्यांत खुपत होते आणि त्यांचे अन्तः-करण विदीर्ण करत होते. परंतु त्यांना जरी परिणाम दिसत होते तरी त्यांना कारणे समजत नव्हती, कार्यान्वित झालेल्या नव्या सामजिक प्रेरणा समजत नव्हत्या. त्यांना आधुनिक भांडवलदार दिसले नाहीत, परंतु वंशपरंपरागत अधिकाराची मक्तेदारी घेऊन बसलेला सरदारमंडळाचा एक विभाग तेवढाच त्यांना दिसत होता आणि हा विभाग मध्यम वर्गाच्या नव्या गरजा व आकांक्षा यांच्यामुळे आवश्यक झालेल्या बदलांना कायद्याची मंजुरी देऊन राहिलेला होता. त्यांना यंत्र दिसत होते, परंतु त्याच्या मागची गुप्त प्रेरक शक्ती दिसत नव्हती. म्हणून त्यांच्या दृष्टीने १६८८ सालापासूनच्या सगळ्या बदलांची जबाबदारी व्हिग्जकडे होती. इंग्लंडच्या ऱ्हासाचे आणि जनतेच्या अधोगतीचे मुख्य प्रेरक त्यांच्या मते व्हिग्ज हेच होते. म्हणूनच ते व्हिग सरदार मंडळांचा पिसाटपणे द्वेष करीत होते आणि त्याचा सतत पुन्हा पुन्हा धिक्कार करत होते. म्हणूनच एक विचित्र घटित दिसत होते ते म्हणजे हे, की मध्यम वर्गाच्या अतिक्रमणांविरुद्ध असलेल्या बहुजनसमाजाचे उपजतबुद्धीने प्रतिनिधित्व करणारे विल्यम कॉबेट हे जगाच्या दृष्टीने आणि स्वतःच्या ठाम मतानुसार वंशपरंपरागत सरदार मंडळाच्या विरुद्ध असलेल्या औद्योगिक मध्यमवर्गाचे प्रतिनिधी म्हणून वावरत होते. लेखक या नात्याने त्यांच्याहून वरचढ कुणीच झालेला नाही.

सध्याचे मिस्टर कॉबेट हे बदललेल्या परिस्थितीत आपल्या वडिलांचे राजकारण पुढे चालवून अवश्यमेव उदारमतवादी हुजूरपक्षीयांच्या वर्गात रुतून बसले आहेत.

कार्ल मार्क्स, "लेयार्ड यांची चौकशी. दहा तासांच्या
कामाच्या दिवसाबाबतचा लढा"
इंग्रजीत लिहिलेला लेख
न्यूयॉर्क डेली ट्रिब्यून, तारीख २२ जुलै १८५३

इंग्रज कामगारवर्गीय कवि मीड

भूदासाचा धनी हा बर्बर होता आणि तो शेतकऱ्याला गुरासमान मानत होता; कामगारांचा मालक हा सुधारलेला असतो आणि तो आपल्या कामगाराला यंत्र मानतो. थोडक्यात सांगायचे म्हणजे दोघांची अवस्था समान असण्यापासून दूर नसते आणि दोघांतल्या एकाची जर गैरसोय होत असेल तर ती स्वतंत्र श्रमिकाची असते. दोघेही गुलामच असतात, परंतु त्यांच्यात एकच फरक असतो तो म्हणजे एकाची गुलामगिरी बिनढोंगी, उघड आणि प्रामाणिक असते; दुसऱ्याची गुलामगिरी कावेबाज, लुच्चेगिरीची, प्रच्छन्न, त्याच्या स्वतःपासून आणि अन्य सगळ्यांपासून फसवेगिरीने लपवून ठेवलेली असते, म्हणजे जुन्या गुलामगिरीपेक्षा ही ढोंगी@ गुलामगिरी अधिक वाईट असते. दानशूर टोरींनी कामगारांना गोरे गुलाम असे नाव दिले ते त्यांचे करणे बरोबरच होते. परंतु ढोंगी प्रच्छन्न गुलामगिरीने स्वातंत्र्याचा हक्क, किमानपक्षी बाह्य स्वरूपात, मान्य केलेला असतो; ही स्वातंत्र्यप्रेमी लोकमतापुढे शरणागती पतकरलेली असते, आणि यातच जुन्या गुलामगिरीच्या तुलनेत ऐतिहासिक प्रगती साठविलेली असते, म्हणजे स्वातंत्र्याचा तत्त्वाचा पुकारा केलेला असतो आणि हे तत्त्व अंमलात आणलेले आहे याची खबरदारी दलित लोक एके दिवशी घेतील, हीच ती प्रगती. (b)

शेवटी एका कवितेची काही कडवी दिसली आहेत. ही कविता फॅक्टरी पद्धती-विषयीच्या खुद्द कामगारांच्या भावना व्यक्त करते. बर्मिंगहॅमचा एडवर्ड पी. मीड याने ती लिहिलेली असून तीत कामगारांमध्ये रूढ असलेल्या मतांचे बिनचूक प्रकटीकरण आहे.

एक आहे राजा अन् निर्घृण राजा;
कवीच्या स्वप्नातला राजा नव्हे तो;
पण नीच जुलूमशहा तो,
गोऱ्या गुलामांना ठाऊक आहे चांगला तो;
आणि तो निर्घृण राजा म्हणजे बा.फ.

@ १८४५ च्या व १८९२ च्या जर्मन आवृत्त्यांमध्ये "ढोंगी" ऐवजी "धर्मशास्त्रीय" अशी शब्दयोजना आहे. खालच्या बाजूला "गोरे गुलाम" हे शब्द इंग्रजीत दिलेले आहेत व त्यांच्यानंतर जर्मन प्रतिशब्द दिलेले आहेत. —संपादक

(b) नंतरचा परिच्छेद व कविता हा मजकूर १८८७ची अमेरिकन व १८९२ ची इंग्रजी या आवृत्त्यांतून गाळलेला होता. परंतु तो या उताऱ्याला लेखकाने दिलेल्या टीपेत समाविष्ट केलेला आहे. —संपादक

त्याला एक आहे हात, लोखंडी हात,
आणि एकच हात त्याला जरी असला
तरी त्या दांडग्या हातात आहे जादू,
तिने लाखोंना केले बरबाद.

त्याचा बाप प्राचीन मोलोच,
हिम्मनच्या खोऱ्यातला प्राचीन मोलोच,
त्याचा बाप होता तसाच हा.
याच्या पोटात पेटली आहे आग,
आणि मुले हा त्याचा आहार.

त्याचे धर्मगुरू भुकेलेली टोळी,
रक्तपिपासू चढेल नि साहसी,
तेच त्याच्या हाताचे प्रचंड चालक
रक्ताला देतात सोन्याचे रूप.

ओंगळ लाभासाठी गुलामी बेड्यांत
निसर्गाचे हक्क सगळे बांधतात,
सुंदर स्त्रियांच्या वेदनांची विटंबना ते करतात,
आणि पुरुषांचे अश्रू तर बघतच नाहीत.

श्रम-पुत्रांचे उसासे, कण्हणे
त्यांच्या कानांना संगीतासारखे लागते गोड;
आणि मुलांमुलींच्या हाडांचे सांगाडे
बाफ-राजाच्या नरकात दिसतात.

बाफ-राजा जन्माला आल्यापासून
भूवरच्या या नरकानी
सगळीकडे निराशा पसरली,
देवाने सुखासाठी दिलेले मन, शरीरानिशी,
त्याचा इथे मुडदाच पडतो.

फ्रेडरिक एन्गल्स, इंग्लंडमधील कामगारवर्गाची परिस्थिती
मार्क्स आणि एन्गल्स, संकलित ग्रंथ,
खंड ४ था, मॉस्को, १९७५, पृष्ठे ४७३-७७

थॉमस कार्लाइल

१

गेल्या वर्षात "सुशिक्षित समाजा"च्या करमणुकीसाठी किंवा ज्ञानसंवर्धनासाठी जे सगळे जाडजूड ग्रंथ व लहान लहान पुस्तिका इंग्लंडमध्ये प्रकाशित झाल्या आहेत, त्या सगळ्यांमध्ये वाचण्यायोग्य असा वरील ग्रंथ हाच एकमेव आहे. उदास व रंजक गुंतागुंती असलेल्या सगळ्या अनेक खंडात्मक कादंबऱ्या, सगळ्या ज्ञानदायक व चिंतनात्मक, विद्वत्ताप्रचुर आणि बिनविद्वत्ताप्रचुर अशा वायबलच्या समीक्षा—आणि कादंबऱ्या व ज्ञानदायक ग्रंथ हे इंग्रजी साहित्याचे दोन नित्याचे खाद्यप्रकार आहेत—हे सगळे प्रकार सदसद्विवेकबुद्धीला रुखरुख लागू न देता आपण न वाचता तसेच सोडून द्यायला हरकत नसते. बहुधा आपल्याला भूगर्भशास्त्र, अर्थशास्त्र, इतिहास व गणितशास्त्र या विषयांवरील काही पुस्तके आढळतील आणि त्यात नावीन्याचा लहानसा कण असतो—तथापि या अभ्यास करायच्या बाबी असतात, पण त्या आपण वाचत नाही. त्या रुक्ष, विशिष्टीकृत विज्ञानशाखा असतात, ओसाड वनस्पतिशास्त्रीय तरू असतात आणि त्यांची मुळे ज्या मातीतून पोषण मिळवितात त्या मानवतेच्या सर्वसाधारण मातीतून फार पूर्वीच तोडून काढलेली असतात. कितीही शोध करा, पण कार्लाइलचा ग्रंथ हा असा एकच ग्रंथ आहे की जो मानवी हृदयाची तार छेडतो, मानवी संबंध सादर करतो आणि मानवी दृष्टिकोनाचे अवशेष दर्शवितो.

फ्रेडरिक एन्गल्स, "थॉमस कार्लाइलकृत
इंग्लंडची परिस्थिती, पूर्वीची आणि प्रचलित"
मार्क्स आणि एन्गल्स, **संकलित ग्रंथ,**
खंड ३ रा, मॉस्को, १९७३, पृष्ठ ४४४

२

थॉमस कार्लाइल हा असा एकमेव इंग्रज लेखक आहे की ज्याच्यावर जर्मन साहित्याने थेट व फारच ठळक असा प्रभाव पाडलेला आहे. किमानपक्षी सौजन्य म्हणून तरी जर्मन माणसाने त्याच्या साहित्याची दखल घेतल्याशिवाय राहू नये.

गुइझोच्या अगदी ताज्या प्रकाशनाने (न्यू व्हेनिश्चे त्साय्टुंगचा अंक क्रमांक २)[१६९] आपल्याला भांडवलदारवर्गाच्या बौद्धिक सामर्थ्याचा ऱ्हास होत असल्याचे दाखवून दिले आहे. कार्लाइलच्या प्रस्तुत दोन पुस्तिकांमध्ये प्रचलित तीव्र ऐतिहासिक संघर्षांना तोंड देताना साहित्यिक प्रतिभेचा ऱ्हास आपल्या निदर्शनाला येतो. या संघर्षांना ही प्रतिभा आपल्या मान्यता न मिळालेल्या, थेट, भविष्यवाणीनिदर्शक स्फूर्तीनिशी तोंड देण्याचा प्रयत्न करते.

ज्या काळी भांडवलदारांची मते, अभिरुचि व विचार हे सगळ्या अधिकृत इंग्रजी साहित्याला गुलामगिरीत ठेवून राहिले होते, त्या काळात साहित्यामध्ये भांडवलदारांच्या विरोधात उभा ठाकण्याचे श्रेय थॉमस कार्लाइलकडे जाते; आणि तो ही गोष्ट अशा रीतीने करतो की ती कधीकधी क्रान्तिकारक देखील असते. उदाहरणार्थ, फ्रेंच राज्यक्रान्तीचा इतिहास, क्रॉमवेलचे त्याने केलेले समर्थन, चार्टिस्ट चळवळीवरील त्याची पुस्तिका आणि भूतकाळ आणि वर्तमानकाळ, या त्याच्या ग्रंथांमध्ये. परंतु या सगळ्या ग्रंथांमध्ये वर्तमानाची समीक्षा माणसाच्या ठिकाणी देवभावना कल्पिणाऱ्या विलक्षण अनैतिहासिक मध्ययुगाशी निकटपणे निगडित झालेली आहे. इंग्रज क्रान्तिकारकांचे देखील हेच वैशिष्ट्य अनेकदा असते. उदाहरणार्थ कॉबेट आणि चार्टिस्टांपैकी काहीजण. भूतकाळामध्ये तो किमानपक्षी समाजाच्या निश्चित टप्प्यावरील अभिजात कालखंडाचे कौतुक तरी करतो, आणि वर्तमानकाळ त्याला निराश करतो आणि भविष्यकाळाची त्याला धास्ती वाटते. जिथे त्याला क्रान्तीची ओळख पटते किंवा तो खरोखरीच तिच्या ठिकाणी देवभावना कल्पितो, तिथे ती त्याच्या लेखी एकाच व्यक्तीच्या म्हणजे एखाद्या क्रॉमवेलच्या किंवा एखाद्या डान्टनच्या ठायी केन्द्रित होते. त्यांच्याविषयीची त्याची वृत्ती म्हणजे तशीच वीरपूजानिदर्शक आहे, की जशी त्याने आपल्या वीरपुरुष आणि वीरपूजा यांजविषयीच्या व्याख्यानांमध्ये मांडलेली आहे, म्हणजे निराशा उदरी बाळगणाऱ्या वर्तमानकाळापासून सुटका करून घेण्याचा एकमेव आसरा, एकमेव नवा धर्म, याची निदर्शक आहे.

कार्लाइलची शैली त्याच्या विचारांशी मिळतीजुळती अशीच आहे. इंग्रजी भाषेतील आधुनिक भांडवलदारी पेक्स्निफ-शैलीच्या[१७०] विरोधातली ही थेट जबरदस्त प्रतिक्रियारूप आहे. या पेक्स्निफ शैलीचे नेभळट उसने अवसान, तिच्या सावध वळसेवेलांट्या, आणि गोंधळलेला, भावनाविवश, नीतिबाजपणाचा कंटाळवाणेपणा, तिचे मूळ प्रवर्तक जे सुशिक्षित लंडनवासी, त्यांच्यातून ती सगळे इंग्रजी साहित्य व्यापून राहिली आहे. याच्या विरोधात कार्लाइलने इंग्रजी भाषा ही जणू काय सर्वस्वी कच्चा माल असल्याप्रमाणे उपयोगात आणली आणि तिला सर्वस्वी नवे वळण देणे त्याला भाग पडले. प्राचीन शब्द आणि वाक्प्रचार पुन्हा रूढ करण्यात आले आणि नव्याने शोधून काढण्यात आले. हे जर्मन धर्तीवर आणि त्यातल्या त्यात जीन पॉलच्या धर्तीवर करण्यात आले. ही नवी शैली अनेकदा हीन अभिरुचि दर्शवून राहिली आणि हिने प्रचंड अवसान आणले, परंतु तिने कितीदातरी तेजस्वी व सदैव स्वतंत्र स्वरूप धारण केले. या बाबतीत देखील नंतरच्या काळातल्या पुस्तिका या लक्षणीय स्वरूपातले माधार घेतलेले पाऊल ठरतात.

ओघाओघात सांगायचे म्हणजे एकंदर जर्मन साहित्यापैकी कार्लाइलवर ज्या महामनाचा सगळ्यांत मोठा प्रभाव पडला तो हेगेल नसून साहित्यिक औषधविक्या जीन पॉल हा आहे ही गोष्ट वैशिष्ट्यपूर्ण म्हणायला हवी.

प्रतिभेच्या पंथाची भागीदारी स्ट्रॉससमवेत कार्लाइल करतो खरा, पण प्रस्तुत पुस्तिकांमध्ये प्रतिभा गायब झालेली आहे आणि पंथ तेवढाच शिल्लक राहिलेला आहे.

वर्तमानकाळ या पुस्तिकेचा प्रारंभ अशा विधानानिशी होतो की वर्तमानकाळ हा भूतकाळाचे अपत्य असून भविष्यकाळाचा जनक आहे, पण कोणत्याही बाबतीत हा **नवे युग** आहे.

या नव्या युगाचे पहिले प्रकटीकरण म्हणजे **सुधारक पोप**. हातात बायबल घेऊन पोप नवव्या पायसला व्हॅटिकनमधून ख्रिस्ती जगताला उद्देशून "सत्याच्या सिद्धान्ताचा" उपदेश करायला हवा होता.

" तीनशेहून अधिक वर्षांपूर्वी सेंट पीटरच्या सिंहासनाला तातडीची कायदेशीर नोटीस मिळाली [....a] अधिकृत आज्ञा, स्वर्गाच्या न्यायकोर्टात रजिस्टर केलेली आणि तेव्हापासून सगळ्या शूर पुरुषांच्या हृदयांवर वाचता येण्याजोगी असलेली, त्याने स्वतःला घेऊन जाण्याची— निघून जाण्याची, आणि त्याच्याशी b आणि त्याच्या भ्रमांशी आणि अपवित्र बडबडींशी आपल्याला अतःपर काहीएक कर्तव्य राहू देऊ या नको; --आणि तेव्हापासून त्याची रोजच्या रोज बैठक चालू आहे [....] त्याच्या स्वतःच्या विनाशकारी जबाबदारीवर [....] आणि त्याची अशी बैठक चालू असलेल्या प्रत्येक दिवसागणिक त्याला काटेकोर नुकसानभरपाई द्यावी लागेल. सत्याचा सिद्धान्त ! या पोपशाहीला सत्याच्या सिद्धान्ताशी काय करायचे होते, त्याने आपल्या घाणेरड्या वेड्यावाकड्या जीवनावर पाणी सोडायला हवे होते, त्याचे जीवन म्हणजे देवांना आणि माणसांना ताप आहे; त्याने प्रामाणिकपणे मरायला हवे होते आणि आपले दफन करून घ्यायला हवे होते !

" गरीब बिचाऱ्या पोपने पतकरलेली गोष्ट याहून दूरची होती [....];-- आणि असे असूनही ती एकंदरीने मूलतः देखील हीच होती. " सुधारक पोप ! " [....] तुर्गो आणि नेकर याच्यापुढे काहीच नव्हते.

" परमेश्वर महान आहे; आणि एखादा निंदास्पद प्रकार समाप्त व्हायचा असतो, त्या वेळी तो कुणातरी भक्ताला त्याचा ताबा घ्यायला आणतो आशेनिशी, निराशेनिशी नव्हे ! " c

आपल्या सुधारणेच्या जाहीरनाम्यानिशी पोपने प्रश्न उपस्थित केले,

---

a ही आणि यापुढील पेटीकंसांतील खूण एन्गल्सने गाळलेल्या मजकुराची निदर्शक आहे.—संपादक

b हे आणि यानंतरचे अधोरेखन कार्लाइलच्या संहितेबरहुकुम आहे. -- संपादक

c लॅटर-डे पॅम्फ्लेटस्, संपादक थॉमस कार्लाइल, लंडन, १८५०, पृष्ठ ३-- संपादक

"वावटळींच्या, वणव्यांच्या, भूकंपाच्या माता [....] असे प्रश्न की जे सगळ्या अधिकृत पुरुषांनी अखेरच्या ईश्वरी न्याय-निवाड्याच्या दिवसापर्यंत लांबणीवर टाकावेत अशी मनीषा धरली, आणि जवळजवळ a आशा धरली. खुद्द ईश्वरी न्यायनिवाड्याचा दिवस आलेला होता; ते भयंकर सत्य होते." b

सत्याचा सिद्धान्त जाहीर करण्यात आला.

सिसिलीवासी

"ही अशी पहिली लक्षणीय मंडळी c होती के जिने सार्वत्रिक पित्याने d मंजूर केलेला हा नवा [....]नियम लागू करायला सुरुवात केली; [....] सत्याच्या सिद्धान्तानुसार आम्ही नेपल्सवासी नव्होत आणि या नेपल्सवासी अधिकाऱ्यांच्या अखत्यारीतले नव्होत; स्वर्गाच्या आणि पोपच्या कृपेने आम्ही यांच्या तावडीतून मुक्त होऊ."

म्हणून सिसिलियन क्रान्ति झाली.

फ्रेंच जनता ही स्वतः एक "प्रेषित जनतेचा प्रकार" असल्याचे समजते, "स्वातंत्र्याचे निवडलेले सैनिक" असल्याचे समजते, आणि तिला अशी धास्ती वाटली की गरीब, तिरस्कृत सिसिलियन लोक हा व्यापार--म्हणजे फेब्रुवारीची क्रान्ति--कदाचित आपल्या हातातून काढून घेतील.

"जणू काय सहानुभूतिपर भूमिगत विद्युत्प्रवाहांच्या योगाने, सगळ्या युरोपखंडाचा विस्फोट झाला, अमर्याद, अनावर; आणि आम्हाला १८४८ साल मिळाले, युरोपियन जगाने कधी पाहिली नसतील अशा एकंदरीत मानखंडना करणाऱ्या वर्षांपैकी एक असे हे अत्यंत अपूर्व, सर्वनाशकारी, आश्चर्यकारक असे हे साल मिळाले. [....] सगळीकडे राजे, आणि राज्यावर आलेल्या व्यक्ती, अचानक घाबरून टकमका बघत राहिल्या, सगळ्या जगाचा आवाज त्यांच्या कानीकपाळी डरकाळ्या फोडीत राहिला, 'चालते व्हा, अरे महामूर्ख ढोंगबाजांनो, वीर नसलेल्या दांभिकांनो! चालते व्हा, व्हा चालते!'-- आणि जी वैशिष्ट्यपूर्ण व लक्षणीय गोष्ट या

---

a एन्गल्सने दिलेल्या अवतरणात "almost" ऐवजी "most" असा शब्द आहे. — संपादक

b कार्लाइल, कित्ता, पृष्ठ ४. --संपादक

c एन्गल्सने दिलेल्या अवतरणात "first notable body" ऐवजी "The first people" अशी शब्द योजना आहे. --संपादक

d एन्गल्सने दिलेल्या अवतरणात "General Father" ऐवजी "Holy Father" अशी शब्दयोजना आहे, --संपादक

वर्षामध्ये होती ती म्हणजे पहिल्या प्रथमच, a सगळे राजे लोक जायच्या घाईत होते, जणू काय ते असे उद्‌गारत होते, 'आम्ही आहोत गरीब बिचारे दांभिक, नक्कीच;—तुम्हाला वीर पुरुष हवे b होते काय? आम्हाला ठार मारू नका; आमचा नाइलाज झाला!' त्यांच्यापैकी एकजण देखील मागे वळला नाही, आणि आपल्या राजेपणावर ठाम उभा राहिला नाही, ज्याच्यासाठी त्याला मरणे परवडले असते किंवा आपली चामडी घोक्यात घालणे परवडले असते, त्याच्यासाठी एकजणदेखील उभाच राहिला नाही [...] मी म्हणतो c की हे प्रचलित काळातील चिंताजनक वैशिष्ट्य आहे. या नव्या प्रसंगी लोकशाहीला असे आढळून येते की सगळ्या राजे लोकांना आपण नाटकातील नट असल्याची जाणीव आहे [....] ते जीव घेऊन पळतच सुटले, त्यातले काही जण तर ज्याला आपण सर्वोत्कृष्ट नादानपणा म्हणू अशा प्रकारे पळत सुटले,—तुरुंगात चक्की पिसावी लागेल किंवा याहूनही अधिक वाईट प्रसंग येईल या धाकाने पळत सुटले. आणि जनता किंवा लोकसमूह आपले स्वतःचे सरकार आपल्या स्वतःकडे घेतो; आणि उघडउघड 'बिनराजेपणा' ज्याला आपण अराजक म्हणतो--अराजक अधिक रस्त्यावरचा पोलिस शिपाई असे असते तर कितीतरी सुखाचे झाले असते!— ते सर्वत्र रूढ झाले आहे. असा हा इतिहास होता, बाल्टिक समुद्रापासून भूमध्य समुद्रापर्यंत, इटलीत, फ्रान्समध्ये, प्रशियात, ऑस्ट्रियात, युरोप खंडाच्या या टोकापासून त्या टोकापर्यंत, १८४८ च्या त्या मार्च महिन्याच्या दिवसांमध्ये [....]

"आणि अशा प्रकारे, मग युरोपखंडात राजा मुळी राहिलाच नाही; राजा नाही; राहिला तो जाहीर भाषणे करणारा, पिंपावर उभा राहून बेंबीच्या देठापासून ओरडणारा, अग्रलेखातून ओरडणारा; किंवा स्वतःला राष्ट्रीय पार्लमेंटाच्या समुदायात गुंतवून घेऊन ओरडण्याची सोय करून घेतलेला. d आणि सुमारे चार महिनेपर्यंत सगळ्या फ्रान्स देशभर, आणि बऱ्याच मोठ्या प्रमाणात साऱ्या युरोपखंडभर

---

a एन्गल्सने दिलेल्या अवतरणात "For the first time" ऐवजी "Learn for the first time" अशी शब्दयोजना आहे. --संपादक

b एन्गल्सने दिलेल्या अवतरणात "want" ऐवजी "need" असा शब्द आहे. --संपादक

c एन्गल्सने दिलेल्या अवतरणात "say" ऐवजी "repeat" असा शब्द आहे. --संपादक

d या शब्दांच्या नंतर एन्गल्सने दिलेल्या अवतरणात "or assembling with his like in the National Parliament" अशी शब्दयोजना आहे. --संपादक

हर प्रकारच्या पिसाटपणाच्या आहारी गेलेल्या अस्वस्थ जमावाचा हलकल्लोळ चालू होता, त्याच्या अध्यक्षपदी होता मशूर द लामार्टिन होटेल-द-व्हिल्ले येथे [....] गरीब बिचारा तो मशूर द लामार्टिन, तो अधिकारावर टिकला होता त्या मुदतीत विचारवन्तांना हे दुःखदायक दृश्य वाटत होते; त्याच्या अंगी गोड आवाजा-खेरीज आणि soft sowder खेरीज अन्य काहीच नव्हते. दुसरे उदासवाणे दृश्य : सावळ्या गोंधळाच्या पुनरागमनाचा बोलका a ताजा अवतार; स्वतःच्या वतीने बोलायला समर्थ आणि ते विश्व (cosmos) आहे हे पटवण्याच्या भूमिकेवरून जाहीर करायला समर्थ ! परंतु असल्या बाबतीत आपल्याला थोडा वेळच थांबावे लागते; सगळे फुगे [....] आपला गॅस वस्तूंच्या दडपणामुळे सोडून दिल्याखेरीज गत्यंतर नसलेले, आणि लवकरच पुरेशा दुःखद रीतीनेb सपाट होऊन पडलेले असतात."c

ही विश्वव्यापी क्रान्ति ज्याने घेटवून दिली तो कोण होता ? त्याच्यासाठी लागणारे जळण अर्थात् हाताशी होतेच !

" विद्यार्थी, तरुण साहित्यिक, वकील, संपादक,d गरम डोक्याचे अननुभवी उत्साही लोक किंवा मर्यकर व न्याय्यपणे दिवाळखोर असलेले आततायी लोक [...] आतापर्यंत तरुण लोकांनी आणि जवळजवळ पोरवयातल्या लोकांनी मानवी व्यवहारां-वर एवढे प्रभुत्व कधीही गाजविलेले नव्हते. सीनियर (सेइन्यूर किंवा एल्डर) हा शब्द " धनी " किंवा वरिष्ठ हा अर्थ दर्शविणारा म्हणून प्रथम उपयोगात आणण्यात आला तेव्हापासून काळ बदलला-- माणसांच्या सगळ्या भाषांमध्ये ही शब्दयोजना जशी आपल्याला आढळते तशीच ही आहे [....] अधिक बारकाईने पाहिल्यास [....] तुम्हाला असे आढळून येईल, की [....] [वृद्ध माणूस] हा आदरणीय राहिलेला नाही, आणि तिरस्करणीय होऊ लागलेला आहे; हा अजून मूर्ख पोरगा झालेला आहे, मात्र तरुण पोरांचे डौल, उदारपण व भरपूर सामर्थ्य या गुणविशेषांचा अभाव असलेला असा हा पोरगा झालेला आहे [....] प्रकरणांची ही वेडपट अवस्था अर्थात् लवकरच स्वतःला सावरून घेईल, सर्वत्र जशी याची सुरुवात झाली आहे तशीच; माणसांच्या दैनंदिन अस्तित्वाच्या साध्यासुध्या आवश्यकता याच्याशी मिळत्याजुळत्या होऊ शकत नाहीत, अन्य काहीही बाजूला टाकण्यात आले तरी या आवश्यकता आपला मार्ग

---

a एन्गल्सने दिलेल्या अवतरणात "eloquent" ऐवजी "most eloquent" अशी शब्दयोजना आहे. --संपादक

b एन्गल्सने दिलेल्या अवतरणात "wretched" ऐवजी "repulsively flabby" अशी शब्दयोजना आहे. --संपादक

c कार्लाइल, कित्ता, पृष्ठ ८-१० --संपादक

d एन्गल्सने दिलेल्या अवतरणात 'वृत्तपत्रलेखक' अशी शब्दयोजना आहे. --संपादक

काढतीलच काढतील. नव्या रंगानिशी व बदलण्यात आलेल्या रूपानिशी जुन्या यंत्राची काहीशी पुनरुभारणी बहुधा लवकरच बहुतेक देशांमध्ये चालू होईल. जुने नाटकी राजे काही अटींवर, 'राज्यघटनांच्या' अखत्यारीत, राष्ट्रीय पार्लमेंटांनिशी, किंवा अशाच सारख्या फॅशनेबल उपायांसह, परत दाखल करून घेण्यात येतील; आणि सर्वत्र जुने दैनंदिन जीवन पुन्हा सुरू होण्याचा प्रयत्न करील. परंतु असल्या व्यवस्था कायम स्वरूपाच्या होऊ शकतील अशी आशा आता मुळीच राहिलेली नाही. [....]

"असे त्रासदायक हेलकावे खात, उसळत्या अथांग लाटांच्या व परस्परविरोधी सागरी प्रवाहांमध्ये सांपडल्याप्रमाणे तरंगत, पक्क्या पायावर असल्याप्रमाणे सुस्थिर नसलेला युरोपियन समाज झोके खात राहिला पाहिजे, मध्येच तो सर्वनाश ओढवल्याप्रमाणे कोसळतो, मग खूप कष्टाने स्वतःला पुन्हा सावरून घेतो, सतत अधिकाधिक कमी मुदतीत हे चाललेले असते--शेवटी नवा खडकाचा पाया एकदाचा दृग्गोचर होतो आणि बंडाचे आणि बंड करायच्या जरूरीचे सर्वव्यापी महापूर पुन्हा ओसरतात." a

हे झाले इतिहासाबाबत, हे या स्वरूपांत देखील जुन्या जगाला अत्यंत अल्प दिलासा देते. आता तात्पर्याबाबत काय आहे ते बघूया.

"कारण विश्वव्यापी लोकशाहीने, तिच्याविषयी आपला विचार काहीही असला तरी, ज्या काळात आपण वावरत आहोत त्या काळातली एक अनिवार्य वस्तुस्थिती या नात्याने b स्वतःला जाहीर करून घेतले आहे."c

लोकशाही म्हणजे काय ? तिला काहीतरी अर्थ असलाच पाहिजे, नाहीतर ती अस्तित्वातच राहणार नाही. म्हणून ही सगळी बाब म्हणजे लोकशाहीचा खरा अर्थ शोधून काढणे हीच आहे. या बाबतीत जर आपण यशस्वी झालो तर आपल्याला तिचा समाचार घेता येतो; जर यशस्वी झालो नाही, तर आपला कारभारच आटोपला असे होईल. फेब्रुवारी क्रान्ति ही "तोतयेगिरीची विश्वव्यापी दिवाळखोरी होती; तिची ही संक्षिप्त व्याख्या असावी." d खऱ्याखुऱ्या संबंधांच्या व वस्तूंच्या ऐवजी, एकसारखेपणाचे आणि बनावटगिरीचे प्रकार, "सोंगाडेपणाचे," "भ्रमाचे," "कल्पना तरंगाचे" प्रकार, ज्यांचा सगळा अर्थ नाहीसा झालेला आहे अशी नावे,--एका शब्दात

---

a कार्लाइल, कित्ता, पृष्ठे ८-१०. -- संपादक

b एन्गल्सने उधृत केलेल्या उताऱ्यात "याना त्याने" (as) ऐवजी "आहे" (is) अशी शब्दयोजना आहे. --संपादक

c कार्लाइल कित्ता, पृष्ठ १०. —संपादक

d कार्लाइल, कित्ता पृष्ठ १४--संपादक

सांगायचे म्हणजे सत्याऐवजी असत्यांनी आधुनिक काळात प्रभुत्व गाजविले आहे. या खोटेपणांच्या व कल्पना-तरंगांच्या तावडीतून व्यक्तिगत व सामाजिक फारकत घेणे, हे सुधारणेचे कार्य आहे, आणि सगळ्या सोंगाडेपणाचा व फसवेगिरीचा नाश करण्याची आवश्यकता नाकारता येत नाही.

"असे असूनही अनेक माणसांना हे नक्कीच विचित्र दिसत असते; a आणि ज्यांना सुसंस्कृत वर्ग म्हणतात अशातल्या, आपले आरोग्यदायक पुडिंग पचवीत असलेल्या अनेक इंग्रजांना तर हे भलतेच विचित्र दिसते; ही एक वेडसर अडाणी समजूत, अगदीच पाखंडी, आणि नुसत्याच विनाशाने भरलेली. हा इंग्रज फार पूर्वीच अर्थशून्य ठरलेल्या प्रतिष्ठित प्रकारांना सरावलेला असतो, कामचलाऊ पद्धतींना, थाटदार असलेल्या गंभीर विधींना सरावलेला असतो—यालाच आपण आपल्या मूर्तिभंजक प्रवृत्तीनुसार सोंगाडेपणाचे प्रकार म्हणतो—त्यांच्या सगळ्या आयुष्यभर हेच चाललेले असते; त्यात कसलीही हानी असते असे त्याने कधी ऐकलेलेच नसते, त्यांच्याशिवाय कसलीही प्रगती होते असे त्याने कधी ऐकलेलेच नसते. कापसाने आपली सूतकताई साधलेली नव्हती का, गोमांस वाढलेले नव्हते का, आणि पूर्वेकडला व पश्चिमेकडला किराणा माल व मसाले अगदी आरामशीरपणे या सोंगाड्यांच्या हाताशी आले नाहीत का?" b

लोकशाही आता ही आवश्यक सुधारणा, ही सोंगाड्यांपासून मुक्तता, साधणार नाही का?

"लोकशाही ही एका काळी मताधिकारांच्या c नमुन्याबरहुकूम तयार करण्यात आलेली होती [...] ती स्वतःच हा हितकारक सार्वत्रिक बदल भ्रमातून वास्तवातd साधून देईल, आणि क्रमाक्रमाने एक नवे शुभंकर जग घडविणार आहे ना?" e

कार्लाइलला हे नामंजूर आहे. खरे तर, त्याला लोकशाही आणि सार्वत्रिक मताधिकार जो दिसतो, तो पार्लमेंटरी सरकारच्या स्खलनशून्यतेवरील इंग्रजांच्या सनातनी विश्वासाचा सगळ्या राष्ट्रांना झालेला केवळ संसर्ग, अशा स्वरूपात दिसतो.

---

a एन्गल्सने दिलेल्या उताऱ्यात "दिसत असते" (it does seem) याच्याऐवजी "दिसण्याचा संभव आहे" (may seem) अशी शब्दयोजना आहे. --संपादक

b कार्लाईल, कित्ता, पृष्ठ १५. --संपादक

c एन्गल्सने दिलेल्या उताऱ्यात "ती सार्वत्रिक मताधिकाराच्या साधनाने संघटित केलेली असताना" अशी शब्दयोजना आहे. --संपादक

d एन्गल्स "खोट्यातून खऱ्यामध्ये" असे शब्द मध्ये घालतो. --संपादक

e कार्लाइल, कित्ता, पृष्ठ १७. --संपादक

केप हॉर्नला वळसा घालताना दिशा चुकलेल्या जहाजावरचे खलाशी असतात ना, त्यांनी वाऱ्यावर व हवेवर लक्ष ठेवायच्या ऐवजी आणि होकायंत्राचा वापर करायच्या ऐवजी दिशा कोणती ठरवायची यावर मतदान घेतलेले असते आणि बहुमताचा निर्णय अचूक असल्याचे जाहीर केलेले असते--यालाच म्हणतात सार्वत्रिक मताधिकार आणि हाच राज्याचे मार्गदर्शन करण्यावर दावा सांगतो. जसा प्रत्येक व्यक्तीच्या बाबतीत तसेच समाजाच्या बाबतीत हा प्रकार म्हणजे विश्वाचे खरे नियम शोधून काढण्याचा असतो, विशिष्ट कामगिरीशी संबंधित असे निसर्गाचे चिरकालीन नियम शोधून काढण्याचा आणि तद्नुसार वर्तन करायचा हा प्रकार असतो. जो कोणी हे चिरकालीन नियम उघड करून दाखवतो त्याचे आम्ही अनुयायी होऊ, "मग तो रशियन अरेराव असो, ते चार्टिस्टांचे पार्लमेंट असो, तो ग्रँड लामा [....] असो, (किंवा) कँटरबरीचा आर्चबिशप असो. a" b परंतु परमेश्वराचे हे चिरकालीन आदेश आपण शोधून कसे काढायचे ? काही झाले तरी सार्वत्रिक मताधिकार म्हणजे प्रत्येक माणसाला एकेक मतपत्रिका मिळते व डोक्यांची मोजदाद होते, ही असे करण्याची सगळ्यांत जास्त वाईट पद्धती म्हणायला हवी. विश्व हे फारच बंदिस्त स्वरूपाचे आहे आणि त्याने आपली रहस्ये केवळ काही निवडक लोकांनाच सतत उघड करून दाखविली आहेत, म्हणजे उदात्त-मनस्क व शाहण्या अशा लहानशा अल्पसंख्य गटालाच तेवढी उघड करून दाखविली आहेत. याच कारणास्तव कोणतेही राष्ट्र कधीही लोकशाहीच्या आधारावर तग धरू शकले नाही. ग्रीक आणि रोमन यांच्याविषयी विचारता ? आज आपल्याला सगळ्यांना हे ठाऊक झाले आहे की त्यांच्या या लोकशाह्या नव्हत्या. त्यांच्या राज्यसंस्थांचा आधार गुलामगिरी हा होता. विविध फ्रेंच प्रजासत्ताकाच्या बाबतीत काहीएक सांगायची जरूरीच नाही. आणि उत्तर अमेरिकेच्या आदर्श प्रजासत्ताकाचे काय ? अमेरिकनांनी अजून राष्ट्र किंवा राज्यसंस्था स्थापन केली आहे असे म्हणता येत नाही. अमेरिकन लोकसंख्या सरकाराशिवायच जगते, तिथे जे घटनात्मक स्वरूप आहे ते म्हणजे अराजक आणि त्याच्या मदतीला रस्त्यावरचा पोलीस. ही परिस्थिती शक्य झाली आहे याचे कारण म्हणजे तिथे अजून नांगराखाली न आलेली अफाट जमीन आहे आणि पोलिसाच्या दंड्याविषयीचा इंग्लंडहून आणलेला आदर जाग्यावर आहे. लोकसंख्या जसजशी वाढत जाईल तसतशी ही परिस्थिती देखील राहणार नाही.

"आपल्याला, पूजा करता येईल किंवा निष्ठेने कौतुक करता येईल असा

---

a एन्गल्सने दिलेल्या उताऱ्यात "कँटरबरीचा आर्चबिशप किंवा दलाई लामा" अशी शब्दयोजना आहे.--संपादक

b कार्लाइल, कित्ता, पृष्ठ २०.-संपादक

कोणता तरी महान मानवी आत्मा, कोणता तरी महान विचार, कोणती तरी महान उदात्त वस्तू तिथे अजून पैदा करण्यात आली आहे काय ?a b"

तिने आपली लोकसंख्या दर वीस वर्षांनी दुप्पट केलेली आहे--व्होइला'तूत.*

अशा प्रकारे अटलांटिक महासागराच्या या आणि त्या किनाऱ्यावर लोकशाही कायमची अशक्य आहे. खुद्द विश्व हेच राजेशाही व अधिकारपरंपरा आहे. असे एकही राष्ट्र नाही की ज्यामध्ये अडाण्यांचे मार्गदर्शन व नियंत्रण करण्याचे ईश्वरी व चिरंतन कर्तव्य मोठ्यात मोठ्या सरदारांकडे, त्याच्या निवडक अशा अधिक मोठ्या सरदारी अधिकाऱ्यांसमवेत, सोपविलेले नाही; जिथे रामराज्य आहे, किंवा जे निसर्गाच्यां चिरंतन नियमांचे पालनही करत नाही.

आता आपल्याला देखील आधुनिक लोकशाहीचे रहस्य, तिचा उगम आणि तिची आवश्यकता माहीत होते. हे नुसते एका वस्तुस्थितीत सामावलेले आहे. ती म्हणजे ही की सोंगाडे-उदात्त वर चढविण्यात आले आहे आणि परंपरेने किंवा नव्याने शोधून काढलेल्या भ्रमांनी त्याला पावित्र्य मिळवून दिले आहे.

आणि हे खरे रत्न, तसेच अधिक लहान मानवी रत्ने व मोती यांचे त्याला असलेले एकंदर कोंदण, यांचा शोध कुणी लावायचा ? सार्वत्रिक मताधिकार याचा शोध नक्कीच लावणार नाही, कारण सरदारच सरदाराला पारखू शकतो. आणि म्हणून कार्लाइल असे जाहीर करतो की इंग्लंडच्या संग्रही अजूनही असले अनेक सरदार व "राजे" आहेत आणि पृष्ठ ३८ वर तो त्यांना आपल्याकडे बोलावून घेतो.

यावरून आपल्याला असे दिसून येते की "सरदारा"च्या बाबतीत कार्लाइल जो प्रारंभ करतो तो सर्वस्वी बहुदैवतात्मक दृष्टिकोनातून केलेला आरंभ आहे. इतिहासाची सगळी प्रक्रिया खुद्द जिवंत समुदायाच्या विकासाने निश्चित केलेली नसते; अर्थात हा विकास विशिष्ट बदलत्या परिस्थितीवर अवलंबून असतो, आणि खुद्द ही परिस्थिती आपल्या परीने इतिहासाची निर्मिती असते; ही निर्मिती निसर्गाच्या चिरंतन नियमाने निश्चित करून ठेवलेली असते; हा नियम सारा काळ अपरिवर्तनीय असतो; याच्यापासून ही प्रक्रिया आज दूर जाते आणि पुन्हा उद्या याच्याकडे परत येते, आणि ज्याच्या बिनचूक आकलनावर सर्व काही अवलंबून असते असा हा नियम असतो. निसर्गाच्या या चिरंतन नियमाचे बिनचूक आकलन हेच चिरंतन सत्य असते, आणि बाकीचे सगळे असत्य असते. या दृष्टिकोनानुसार सगळे खरेखुरे वर्गसंघर्ष, मग ते सगळे कितीही विविध प्रकारचे असोत व वेगवेगळ्या कालखंडांतले

---

a एन्गल्सने दिलेल्या उताऱ्यात "अमेरिकेने अजून पैदा केली आहे काय ?" अशी शब्दयोजना आहे.--संपादक

b कार्लाइल, कित्ता, पृष्ठ २५.--संपादक

* बस्स, येवढेच. --संपादक

असोत, ते सगळे अखेरीस एकाच महान चिरंतन संघर्षात विलीन होतात. ज्यांनी निसर्गाच्या चिरंतन नियमाचा ठाव घेतलेला आहे व जे तदनुसार कृती करतात ते शहाणे व सरदार एका बाजूला; आणि जे या नियमाविषयी गैरसमज करून घेतात, याला विकृत स्वरूप देतात असे मूर्ख आणि लफंगे दुसऱ्या बाजूला;—याच्या दरम्यानचा हा चिरंतन संघर्ष असतो. अशा प्रकारे, वर्गांच्या दरम्यानचा ऐतिहासिकदृष्ट्या निर्माण झालेला वेगळेपणा हा नैसर्गिक वेगळेपणा होतो, आणि खुद्द हा वेगळेपणाच निसर्गाच्या चिरंतन नियमाचा एक भाग म्हणून मान्य करावा लागतो. त्याची पूजा बांधावी लागते, निसर्गाचे सरदार व शाहणे यांना वंदन करून हे करावे लागते : हाच तो प्रतिभावंताचा पंथ. इतिहासाच्या विकासप्रक्रियेची एकंदर संकल्पनाच मागल्या पिढीतील इल्ल्यूमिनाती व फ्रीमेसन्स[१७१] यांच्या पंथाची उथळ अवकळा घेऊन राहिलेली आहे, जादूच्या मुरलीत[१७२] आपल्याला आढळणाऱ्या साध्या नैतिकतेचे रूप घेऊन राहिलेली आहे, आणि कमालीची अधोगती गाठलेल्या व क्षुल्लक झालेल्या सेंट सायमनवादाची मजल गाठून राहिलेली आहे. आणि तिथे अथांतच आपली जुन्या प्रश्नाशी गाठ पडते, आणि तो म्हणजे, तर मग अखेर शेवटी राज्य कुणी करायचे ? याची खूप सविस्तर चर्चा होते, आणि तीत स्वतःला महत्त्व देणारा उथळपणा असतो, आणि शेवटी याचे असे उत्तर मिळते की सरदारांनी, शाहण्यांनी आणि जाणकारांनी राज्य करावे; यातून अगदी स्वाभाविकपणे असा निष्कर्ष निघतो की राज्य मोठ्या प्रमाणात, फार मोठ्या प्रमाणात करायचे असते आणि राज्य करण्याचा अतिरेक कधी होऊच शकत नाही. कारण तसे म्हटले तर राज्य करणे हा बहुजन समाजाच्या संबंधांतल्या निसर्गाच्या नियमाचा सततचा आविष्कार व त्याचे आग्रहपूर्वक पालनच असते. परंतु या सरदारांचा आणि शाहण्यांचा शोध कसा लावायचा ? कोणत्याही स्वर्गीय चमत्कारातून ते उघडकीस येणार नाहीत; त्यांना शोधून काढावे लागेल. आणि इथे ऐतिहासिक वर्गीय वेगळेपणा, जो केवळ नैसर्गिक वेगळेपणात रूपांतरित करण्यात आलेला असतो, तो पुन्हा एकदा आपले डोके वर काढतो. सरदार हा सरदार असतो. कारण तो अधिक शाहणा व अधिक जाणकार असतो. म्हणून ज्या वर्गाकडे शिक्षणाची मक्तेदारी असते, त्या वर्गामध्ये त्याचा शोध घ्यावा लागेल—म्हणजे खास हक्क असलेल्या वर्गांमध्ये त्याचा शोध घ्यावा लागेल; आणि ज्यांना तो आपल्यात दिसतो तेच हे वर्ग असतील आणि सरदारकीच्या व शहाणपणाच्या दर्जावर तो सांगत असलेल्या दाव्यांचा तेच न्यायनिवाडा करणार असतील. अशा प्रकारे खास हक्क असलेले वर्ग रेखीवपणे होत नसले तरी आपोआपच सरदारांचे व शाहण्यांचे वर्ग होतात. नंतर ते किमानपक्षी "बोलका" वर्ग होतात; दलित वर्ग हे अर्थातच "अबोल" वर्ग असतात, आणि अशा प्रकारे वर्गीय राजवटीला नव्याने मान्यता मिळते. हे सगळे भयंकर संतप्तयणाचे प्रदर्शन म्हणजे अस्तित्वात असलेल्या वर्गीय राजवटीला विरविरीत पडद्याआडून दिलेली मान्यता असल्याचे

उघडकीस येते. यात एकमेव कुरकुर व तक्रार ही असते की भांडवलदार लोक आपल्या बिनमान्यताप्राप्त प्रतिभावंतांना समाजाच्या उच्च पदावरील स्थान देत नाहीत, आणि खूपच व्यावहारिक कारणांस्तव त्यांची कल्पनारम्य बडबड विचारात घेत नाहीत. ओघाओघात सांगायचे म्हणजे जडजंबाल बडबड तिच्या नेमके उलट रूप कसे घेते, आणि सरदार, जाणकार व शाहण्या माणसाचे परिवर्तन व्यवहारात नादान, अडाणी व मूर्ख माणसात कसे होते याची ठळक उदाहरणे कार्लाइल आपल्याला उपलब्ध करून देतो.

त्याच्या लेखी प्रत्येक गोष्ट कणखर सरकारावर अवलंबून असते, म्हणून तो विमोचनासाठी व मुक्ततेसाठी चाललेल्या हाकाटीवर अत्यंत संतापाने तोंडसुख घेतो :

" आपण सगळे एकमेकांपासून ' स्वतंत्र ' होऊ या [...] रोख रक्कम चुकती करायच्या संबंधाशिवाय कसलेही बंधन किंवा संबंध नसलेले असे स्वतंत्र होऊ या; वाजवी दिवसाच्या कामासाठी वाजवी दिवसाची मजुरी; घासाघीस करून a राजी-खुशीच्या करारानुसार, आणि पुरवठा व मागणी या कायद्यानुसार ठरविलेली; माणूस आणि माणूस यांच्या दरम्यान ज्या अडचणी आल्या व जे अन्याय घडले, त्या सगळ्यांची खरी सोडवणूक ही आहे असे मानतात. तर मग दोन माणसांच्या दरम्यान जो संबंध अस्तित्वात असतो, तो दुरुस्त करण्यासाठी तो संपविण्याच्या पद्धतीखेरीज कसलीच पद्धती उपलब्ध नाही काय ?b

माणसांमाणसांच्या दरम्यानच्या सगळ्या बंधनांचा व सगळ्या संबंधांचा विच्छेद हा साहजिकच आपली अंतिम मर्यादा अराजकात गाठतो. अराजक म्हणजे बेकायदेशीरपणाचा कायदा. ज्या परिस्थितीत बंधनांचे बंधन असे जे सरकार असते, त्याचे पूर्णपणे तुकडे तुकडे करून टाकणे अशी परिस्थिती. आणि हेच इंग्लंड आणि त्याच्याचप्रमाणे युरोपखंड करायच्या खटपटीत आहेत, आणि " भक्कम जर्मनी " देखील हेच करायच्या खटपटीत आहे.

कार्लाइलचा थयथयाट कित्येक पानेच्या पाने असा चाललेला आहे. लाल प्रजासत्ताक, बंधुत्व, लुई ब्लांक यांची अत्यंत चिंताजनक घर्तीवर खुला व्यापार, धान्यावरील जकात रद्द करणे, इत्यादींशी अत्यंत तापदायक रीतीने मोट बांधलेली आहे. पाहा, पृष्ठे २९-४२. अजून परंपरेनुसार टिकवून ठेवलेल्या सरंजामशाहीच्या अवशेषांचा नाश, जी अनिवार्यपणे आवश्यक आहे आणि सर्वस्वी सगळ्यांत जास्त स्वस्त आहे अशा अवस्थेप्रत राज्यसंस्थेला आणून ठेवणे, भांडवलदारांकडून मुक्त स्पर्धेची संपूर्ण अंमलबजावणी, —या सगळ्या गोष्टींची अशा प्रकारे सरमिसळ

---

a एन्गल्सने दिलेल्या उताऱ्यात " निश्चित केलेली " अशी शब्दयोजना आहे. —संपादक

b कार्लाइल, किस्सा, पृष्ठ २९. —संपादक

कार्लाइलने केलेली आहे आणि यांतच याच भांडवलदारी परिस्थितीच्या नाशाचा, भांडवल आणि मोल-मजुरी यांच्या दरम्यानचा संघर्ष संपविण्याचा, आणि कामगार-वर्गाकडून भांडवलदारांच्या उलथणुकीचा साक्षात्कार घडविला आहे. जिच्यातील सगळी मांजरे करड्या रंगाची आहेत अशा "सर्वंकष रात्री" कडे हे तेजस्वी परत जाणे आहे! आपल्या सभोवार काय घडत आहे त्याच्याविषयी पहिली गोष्ट ठाऊक नसलेल्या "जाणकार माणसाचे" हे सखोल ज्ञान आहे! सरंजामशाहीच्या नाशाबरोबर किंवा खुल्या स्पर्धेच्या अमदानीत माणसामाणसांच्या दरम्यानचे सगळे संबंध रद्द होतात असा विश्वास बाळगणारी ही विलक्षण बुद्धी आहे! "निसर्गाच्या चिरंतन नियमाचे" हे अथांग आलोडन आहे; ज्या क्षणी आईबाप स्वतःला लग्नबंधनात "बांधून घेण्यासाठी" मेइरीजकडे जायचे बंद होतील त्या क्षणापासून त्यांना पुढे अधिक मुले होणार नाहीत असा त्यांना गंभीरपणे विश्वास वाटत होता.

अफूट अज्ञान दर्शविणारा हा शहाणपणाचा ज्ञानदायक दाखला दिल्यानंतर कार्लाइल पुढे जी गोष्ट निदर्शनाला आणून देतो ती म्हणजे ही की स्वभावाची उच्च तत्त्वनिष्ठ उदात्तता आपल्या शाब्दिक आतषबाजीच्या स्वर्गातून खऱ्याखुऱ्या संबंधांच्या जगामध्ये उतरताक्षणी तिचे परिवर्तन उघडउघड क्षुद्र मनोवृत्तीत होते.

"सगळ्या युरोपियन देशांमध्ये, विशेषतः इंग्लंडमध्ये, माणसांवर अधिकार गाजवणाऱ्या कप्तानांचा एक वर्ग, काल्पनिक नव्हे, तर नव्या खऱ्याखुऱ्या 'सरदार मंडळाचा' प्रारंभ दर्शविणारा या नात्याने ओळखू येणारा असा वर्ग, अगोदरच काही प्रमाणात स्वतःचा विकास करून घेऊन राहिलेला आहे: उद्योगधंद्याचे कप्तान—आनंदाची गोष्ट म्हणजे सगळ्यात जास्त प्रमाणात [....] या वर्गाची या वेळी जरूरी आहे [....] आणि उलटपक्षी हे तर नक्कीच आहे की ज्यांच्यावर हुकूमत गाजवायची जरूरी आहे अशा माणसांची कमतरता मुळीच नाही: हा आपल्या बांधवांचा दुःखी वर्ग आहे. त्याचे वर्णन 'हॉज याचे बंधमुक्त घोडे,' दुष्काळापायी भटकायची पाळी आलेले, असे करणे आम्हाला भाग पडले, a या वर्गाने देखील सगळ्या देशामध्ये आपला विकास करून घेतलेला आहे, आणि घातक भूमिती श्रेणीने तो सतत आपला अधिकाधिक विकास साधत आहे, इतक्या झपाट्याने, की सगळ्यांची घाबरगुंडी उडालेली आहे. या कारणास्तव [....] असे खरोखरीच म्हणता यायचा संभव आहे की "श्रमाची संघटना, ही जगाची विश्वव्यापी जिव्हाळ्याची समस्या आहे."b

अशा प्रकारे कार्लाइलने पहिल्या चाळीस पृष्ठांमध्ये पुन्हा पुन्हा आपला सगळा सात्विक संताप ज्या गोष्टींविरुद्ध प्रदर्शित केलेला आहे, त्या अशाः स्वार्थीपणा, खुली

---

a एन्गल्सने दिलेल्या उताऱ्यात "वर्णन केले आहे" अशी शब्दयोजना आहे. — संपादक

b कार्लाइल, कित्ता, पृष्ठे ४२-४३,

स्पर्धा, माणसामाणसांच्या दरम्यानची सरंजामी बंधने नष्ट होणे, मागणी व पुरवठा, खुला व्यापार,[१७३] कापूसकताई, रोख रकमा देणे, वगैरे, वगैरे. आणि आता आपल्याला अचानक असे आढळून येते की या सोंगाडेपणाचे प्रमुख प्रवर्तक जे औद्योगिक भांडवलदार, त्यांची गणना सुप्रसिद्ध वीरपुरुषांमध्ये आणि प्रतिभावन्तांमध्ये केलेली आहे इतकेच नव्हे, तर ते या वीरपुरुषांचा एक जिव्हाळ्याचा अनिवार्य भाग देखील आहेत असे म्हटले आहे आणि भांडवलदारी संबंधांवर व विचारांवर त्याने केलेल्या सगळ्या हल्ल्यांतील हुकुमी पत्ता म्हणजे भांडवलदारी व्यक्तीला देवतुल्य मानणे हा आहे. याहूनही अधिक विचित्र दिसते ते म्हणजे हे की श्रमिकांवर हुकमत गाजविणाऱ्यांचा व हुकुमत गाजवून घेणाऱ्यांचा शोध लावल्यावर, दुसऱ्या शब्दात सांगायचे म्हणजे श्रमाच्या विशिष्ट संघटनेचा शोध लावल्यावर, तरी देखील ही संघटना म्हणजे सोडवणूक हवी असलेली मोठी समस्या असल्याचे कार्लाइल जाहीर करतो. पण आपली फसवणूक व्हायला नको आहे. हा जो प्रश्न आहे तो शिस्त लावलेल्या कामगारांच्या संघटनेचा नसून, शिस्त न लावलेल्या व कसानशून्य असलेल्या कामगारांच्या संघटनेचा आहे आणि हा प्रश्न कार्लाइलने स्वतःकडे राखून ठेवलेला आहे. त्याच्या पुस्तिकेच्या शेवटी आपल्याला तो अचानक इंग्लंडच्या पंतप्रधानाच्या in paribus[१७४] भूमिकेत दिसतो, तीस लाख आयरिश लोकांना व इतर भिकाऱ्यांना, धडधाकट 'नाही-रे' ना, भटक्यांना आणि स्थिर असलेल्यांना, श्रम-गृहातील व श्रम-गृहाबाहेरील इंग्रज कंगालांच्या सार्वत्रिक राष्ट्रीय असेंब्लीला तो आवाहन करतो आणि त्यांच्यापुढे एक "दणदणीत" भाषण ठोकतो; पूर्वी वाचकांना विश्वासात घेऊन जे सांगितले आहे ते सगळे प्रथम 'नाही-रे' ना उद्देशून तो या भाषणात पुन्हा सांगतो आणि नंतर निवडक श्रोत्यांना उद्देशून पुढीलप्रमाणे भाषण करतो :

"भटक्या 'नाही-रे' नो, a तुमच्यापैकी बहुतेक मूर्ख असलेल्यांनो, तुमच्यापैकी अनेक गुन्हेगार असलेल्यांनो, सगळ्या दुःखी असलेल्यांनो, तुम्हाला पाहिल्यावर मी आश्चर्यभरित व निराश होतो. [....] इथे तुमच्यातले सुमारे तीस लाख आहेत. [....] तुमच्यातले अनेक जण उघड उघड भिकारीपणाच्या गर्तेत येऊ पडलेले आहेत; आणि भीतिप्रद विचार असा मनात येतो, की या गर्तेत येऊन पडणारा प्रत्येक नवा गट इतरांना ओढून नेत असलेल्या शृंखलेवर कितीतरी अधिक वजन ठेवत आहे, कड्याच्या टोकावर अगणित कोट्यवधी लटकत आहेत; मला असे सांगण्यात आले की दररोज १२०० या प्रमाणात त्यांची वाढ होत आहे [....], ते पडत आहेत; एकामागून एक पडत आहेत; आणि शृन्खला अवजडb होत आहे [....];

---

a एन्गल्सने दिलेल्या उताऱ्यांत "नाही-रे आणि निरुपयोगी ठरलेले" अशी शब्दयोजना आहे. --संपादक.

b एन्गल्सने दिलेल्या उताऱ्यात "सतत अधिक अवजड" अशी शब्दयोजना आहे. --संपादक

आणि शेवटी उभा कोण राहणार ? तुमचे काय करायचे ? [....] इतर जे अजूनही उभे आहेत त्यांच्या स्वतःच्या अडचणी आहेत, मी सांगू शकतो तुम्हाला ! —परंतु तुम्ही, अर्धवट उत्साह असलेले, आणि भूक फालतू ठरवून राहिलेले, फार कमी काम करत असल्यामुळे व फार बीयर पीत असल्यामुळे, तुम्ही [....] असे सिद्ध केले आहे की, तुम्हाला ते करता येत नाही ! [...].

" तुम्ही हे जाणून घ्या, की ' स्वातंत्र्याचे पुत्र ' कोणीही असोत, तुम्ही तुमच्या परीने तसे नाही आहात आणि तसे होऊ शकत नाही. ' स्वतंत्र ' नसलेले तुम्ही [....] तुम्ही उघड उघड कैद झालेले आहात[....] तुम्ही गुलामांच्या स्वरूपातले आहात, —किंवा तुम्हाला हा शब्द जर अधिक पसंत असेल, तर तुम्ही भटक्यांच्या [....] स्वरूपातले आहात, आणि ज्यांना धनी सापडू शकत नाही असे उडाणटप्पू नोकर आहात तुम्ही [....]. स्वातंत्र्याचे वैभवशाली दुर्दैवी पुत्र म्हणून नव्हेत, तर मान्यताप्राप्त कैदी, अधःपतित दुर्दैवी बांधव या नात्याने मी तुमच्यावर आधिपत्य गाजवायची जरूरी असलेले, आणि तशीच गरज असल्यास मी तुमच्यावर नियंत्रण ठेवावे व तुम्हाला भाग पाडावे,a तुमच्या आमच्या दरम्यान यापुढे हा संबंध असू शकतो [....]. स्वर्गासमक्ष व पृथ्वीसमक्ष, आपल्या सगळ्यांचा कर्ता परमेश्वर याच्या समक्ष, मी असे जाहीर करतो की तुमच्या ठायी असले जीवन ठेवलेले बघणे लांच्छनास्पद आहे, तुमच्या बांधवांच्या घामाची व हृदयातील रक्ताची शपथ घेऊन मी हे सांगतोय; आणि आम्हाला जर ते दुरुस्त करता येत नसेल, तर मरण अधिक बरे [....]. अरे तुम्ही गरीब भटक्या लुटारूंनो, माझ्या आयरिश, स्कॉच व इंग्रज ' नव्या युगाच्या रेजिमेंटांमध्ये' दाखल व्हा; आज्ञापालन करा, काम करा, हाल सोसा, अलिप्त राहा, जसे आम्हाला सगळ्यांना करावे लागत आहे तसे करा [...] औद्योगिक कर्नल्स, वर्कमास्टर्स, टास्कमास्टर्स, लाइफ-कमांडर्स, ग्रहादामान्थुसप्रमाणेच समतावादी व त्याच्याचप्रमाणे बिन-लवचिकः अशांची [....] तुम्हाला जरूरी आहेच आहे; आणि सैनिकांना कायद्याच्या अमलात ठेवतात त्याप्रमाणे तुम्हाला एकदा कायद्याच्या अमलात ठेवल्यावर अशांचा तुमच्यासाठी शोध करता येईल [....] तुमच्यापैकी प्रत्येकाला मग मी असे म्हणेन : इथे तुमच्यासाठी काम आहे; पुरुषासारख्या, सैनिकासारख्या आज्ञाधारकपणानिशी आणि अन्तःकरणपूर्वक त्याच्यावर तुटून पडा, इथे नेमून दिलेल्या पद्धतींनुसार, b — पगार तुमच्यासाठी अडचणीशिवाय पाठोपाठ येईल [...] नकार द्या [....]; अवजड श्रम चुकवा, नियमांचा भंग करा,—मी

---

a एन्गल्सने दिलेल्या उताऱ्यात " त्यांच्यावर आधिपत्य गाजविणे... नियंत्रण ठेवणे व त्यांना भाग पाडणे," अशी शब्दयोजना आहे. —संपादक

b एन्गल्सने दिलेल्या उताऱ्यात " मी इथे हुकूम देतो " अशी शब्दयोजना आहे.— संपादक

तुमची कानउघाडणी करीन. तुम्हाला चेतवायचा प्रयत्न करीन; जर ते व्यर्थ ठरले, तर मी तुम्हाला फटके मारीत, त्यातूनही व्यर्थ ठरले, तर शेवटी मी तुम्हाला गोळी घालीन." a

ज्यामध्ये प्रतिभावंत राज्य करतात ते "नवे युग" अशा प्रकारे जुन्या युगाहून मुख्यत्वेकरून अशा वस्तुस्थितीच्या बाबतीत वेगळे आहे की चावकाला आपल्या अंगी प्रतिभा आहे असे वाटते. प्रतिभावंत कार्लाइल हा कोणत्याही तुरुंगाच्या सेरेब्रसहून किंवा गरिबांच्या कायद्याच्या अंमलदाराहून वेगळा आहे तो त्याच्या सात्विक संतापाच्या बाबतीत, आणि कंगालांना आपल्या पातळीवर चढविण्यासाठीच केवळ त्यांना झोडपायच्या नैतिक जाणिवेच्या बाबतीत. इथे आपल्याला हा उच्च तत्त्वनिष्ठ प्रतिभावंत जगाला जाग आणायच्या आपल्या संतापाच्या भरात भांडवलदारांच्या नीच कृत्यांचे अजब प्रकारे अतिशयोक्तिपूर्ण समर्थन करतो आहे. जर इंग्रज भांडवलदारांनी कंगालपणाला अद्दल घडविणारा इलाज निर्माण करण्यासाठी कंगालांची बरोबरी गुन्हेगारांशी केली आणि १५३४ चा गरिबांचा कायदा निर्माण केला, तर कार्लाइल कंगालांवर देशद्रोहाचा आरोप करतो; कारण कंगालपणा हा कंगालपणा निर्माण करतो. ज्याप्रमाणे पूर्वीच्या काळी इतिहासाच्या ओघात उदयास आलेला राज्यकर्ता वर्ग, म्हणजे औद्योगिक भांडवलदार वर्ग हा केवळ राज्य करणारा म्हणून प्रतिभावंत ठरला, त्याप्रमाणे आता कोणताही दलित वर्ग, त्याच्यावर जितका अधिक जुलूम करावा, तितका तो प्रतिभेतून अधिकच वगळण्यात येतो आणि मान्यता नसलेल्या आपल्या सुधारकाच्या संतापाला तो अधिकच पात्र होतो. हाच न्याय इथे कंगालांना लागू पडतो. परंतु त्याचा नैतिकदृष्ट्या सात्विक संताप जो उच्चांक गाठतो तो जे सर्वस्वी नीच व हलकट, "बदमाष" म्हणजे गुन्हेगार असतात, त्यांच्या बाबतीत गाठतो. आदर्श तुरुंगाविषयीच्या आपल्या पुस्तिकेत तो यांच्यावर इलाज करतो.

ही पुस्तिका पहिलीहून वेगळी आहे ती केवळ हिच्यातला संताप खूपच अधिक मोठा आहे येवढ्यापुरतीच वेगळी आहे. असे असूनही या संतापाचा रोख प्रचलित समाजातून अधिकृतरीत्या हाकलून काढलेल्याविरुद्ध आहे. तुरुंगाच्या गजांआडच्या लोकांविरुद्ध आहे म्हणून हा अधिकच स्वस्तातला वाटतो. हा संताप म्हणजे सर्वसामान्य भांडवलदार सोजन्याखातर अजूनही जी अल्पस्वल्प लाज प्रदर्शित करतो ती देखील ज्याने टाकून दिलेली आहे, असा हा संताप आहे. ज्याप्रमाणे पहिल्या पुस्तिकेत कार्लाइल सरदारांची एक संपूर्ण परंपरा उभी करतो आणि सरदारांच्या सर्वश्रेष्ठ सरदारांपर्यंत भिडवतो, त्याचप्रमाणे तो तशीच परिपूर्ण अशी बदमाषांची व हलकटांची सोपानपरंपरा उभी करतो आणि वाईटातल्या सगळ्यांत जास्त वाईटापर्यंत, इंग्लंडमधील सर्वोच्च बदमाषापर्यंत ती भिडवतो, आणि त्याला फाशी द्यायच्या

---

a कार्लाइल, कित्ता, पृष्ठे ४५-५५. — संपादक

अत्युत्कृष्ट आनंदाचा लाभ त्याला हवा असतो; म्हणून तो हे करतो. त्याने त्याला पकडला आणि फाशी दिला असे गृहीत धरल्यास मग आणखी एक सगळ्यांत जास्त वाईट त्याच्या जागी येईल आणि त्यालाही त्याच्या परीने फाशी दिलेच पाहिजे आणि पुन्हा आणखी एक येईल आणि शेवटी सरदाराची पाळी येईल, नंतर अधिक मोठ्या सरदाराची पाळी येईल आणि शेवटी कार्लाइलखेरीज कुणी शिल्लकच राहणार नाही; कारण कार्लाइल हाच सगळ्यांत मोठा सरदार शिल्लक राहणार, हा बदमाषांचा छळिक आहे तसाच हा सरदाराचा खून करणारा आहे, आणि बदमाषांमध्ये जो सरदार आहे त्याचाही त्याने खून केलेला आहे. राहता राहिला सरदारांतला सगळ्यांत जास्त मोठा सरदार. याचे अचानक परिवर्तन हलकटांतल्या हलकट बदमाषामध्ये होते आणि म्हणून याने स्वतःलाच फास लावून घेतला पाहिजे. याच्या बरोबर सरकार, राज्यसंस्था, कामाची संघटना आणि सरदाराची सोपान परंपरा यांबाबतच्या सगळ्या समस्यांची सोडवणूक होईल आणि निसर्गाच्या चिरंतन नियमाची अखेरीस अंमलबजावणी होईल.

कार्ल मार्क्स आणि फ्रेडरिक एन्गल्स,
"नंतरच्या काळातील पुस्तिका, थॉमस कार्लाइलकडून संपादित"

मार्क्स/एन्गल्स, वेर्के खंड ७ वा, १९६९, पृष्ठे २५५-६५.

एकोणिसाव्या शतकाच्या मध्यकाळातील इंग्रज वास्तववादी

इंग्लंडमधील सध्याच्या कादंबरी-लेखकांची सुंदर बंधुता आहे. सगळ्या व्यावसायिक राजकारण्यांनी, पत्रकारांनी, नीतिवाद्यांनी मिळून जेवढी राजकीय व सामाजिक सत्ये उच्चारली असतील त्यांच्याहून अधिक या कादंबरीकारांच्या ठसठशीत व वक्तृत्वपूर्ण पाना-पानांतून जगाला सादर झाली आहेत. सर्व प्रकारच्या घंद्याला ग्राम्य मानणाऱ्या "उच्चवर्गीय अतिसभ्य" व्यालखाऊ थैलीशहापासून ते वकिलाच्या कारकुनापर्यंत मध्यम वर्गाच्या प्रत्येक विभागाचे वर्णन त्यांनी केले आहे. आणि डिकन्स व थॅकरे, मिस ब्रॉंटी व मिसेस गॅस्केल यांनी त्यांचे चित्रण कसे केले आहे? आगाऊपणा, चढेलपणा, क्षुद्र जुलूमशाही आणि अज्ञान या दुर्गुणांनी ओतप्रोत भरलेला असा हा मध्यम वर्ग त्यांनी दर्शविलेला आहे; आणि 'बरच्या लत्ता झेलित माथां, खालच्यास तो हाणित लाथा' असे जे विदारक बिरुद सुधारलेल्या जगाने या वर्गाच्या

ललाटावर चिकटविले आहे, त्याच्या योगाने त्यांच्या निर्णयावर त्या जगाकडून शिक्कामोर्तबच झाले आहे.

कार्ल मार्क्स, "इंग्रज मध्यम वर्ग"
मार्क्स आणि एन्गल्स, इंग्लंडवरील लेख,
मॉस्को, १९७१, पृष्ठ २१३

कार्लेटन

मी इथे आल्यापासून कोणत्याही वृत्तपत्रांकडे ढुंकून पाहिलेले नाही आणि वस्तुतः कार्लेटनकृत आयरिश शेतकरीवर्गाची स्वभाववैशिष्ट्ये व कथा याच्या पहिल्या खंडाखेरीज अन्य काहीएक वाचलेले नाही. पहिला खंड पालथा घालणे हे पुरेशा परिश्रमाचे काम होते आणि अधिक चांगली वेळ लाभेपर्यंत दुसरा खंड मी बाजूला सारून ठेवणार आहे. या ग्रंथात स्फुट कथा आहेत आणि त्यांत आयरिश शेतकरी जीवन एकदा एका अंगाने तर एकदा दुसऱ्या अंगाने चित्रित केले आहे; म्हणजे एका दमात गट्ट करता येण्याजोगा असा हा ग्रंथ नाही. नेमक्या याच कारणास्तव हा ग्रंथ विकत घेऊन संग्रही ठेवलाच पाहिजे असा आहे. म्हणजे au fur mesure a आपल्याला एकदा हा पदार्थ चाखून तर एकदा तो पदार्थ चाखून आपली हौस भागविता येईल. कार्लेटन चांगला शैलीकार लेखकही नाही किंवा रचनाकुशलही नाही. त्याच्या निर्मितीचा स्वतंत्रपणा त्याने केलेल्या वर्णनांच्या सच्चेपणात आहे. एका शेतकऱ्याचा पुत्र या नात्याने त्याला आपला विषय लिव्हर्स व लव्हर्स यांच्यापेक्षा अधिक चांगला ठाऊक आहे.

मार्क्स यांचे एन्गल्स यांना पत्र,
तारीख १४ ऑगस्ट १८७९
मार्क्स/एन्गल्स, वेर्के, खंड ३४ वा, १९६६, पृष्ठे ९०-९१

बर्नार्ड शॉ

साहित्यिक कोडे असलेला शॉ--लेखक या नात्याने फारच बुद्धिमान कोटिबाज परंतु अर्थशास्त्रज्ञ व राजकारणी या नात्याने सपशेल निरुपयोगी, मात्र प्रामाणिक आहे आणि पुढे पुढे करणारा नव्हे.

एन्गल्स यांचे कार्ल कौट्स्कीला पत्र,
तारीख ४ सप्टेंबर १८९२

मार्क्स आणि एन्गल्स, निवडक पत्रव्यवहार,
मॉस्को, १९७५, पृष्ठ ४२२

---

a गरजेनुसार.—संपादक

ॲन्हेलिंग

१

ॲन्हेलिंगचे नाटक मी अपेक्षिले होते त्याच्यापेक्षा अधिक चांगले वठले—ते स्वभावचित्र आहे, आणि फार चांगले उतरले आहे, परंतु त्याचा शेवट--इब्सेनच्या धर्तीनुसार--समस्येच्या सोडवणुकीशिवायच होतो आणि इथल्या पब्लिकला त्याचा अजून सराव झालेला नाही. या प्रयोगाच्या पाठोपाठ आणखी एक प्रयोग झाला-- बेबी रोजचा किंवा आणखी कुणाचा तरी--एचेगारेच्या confiictors entre dos deberes a याचे खूपच स्वैर असे इंग्रजी रूपांतर. यात खळबळजनक गोष्टींचा खूपच मिरचीमसाला असल्यामुळे त्याचे स्वागत फार चांगले झाले. मात्र हे बोजड व ग्राम्य आहे आणि इंग्रजांच्या अभिरुचीला साजेसे आहे.

एन्गल्स यांचे पॉल लाफार्गला पत्र,
तारीख १७ मे १८८९

फ्रेडरिक एन्गल्स, पॉल आणि लॉरा लाफार्ग,
पत्रव्यवहार, खंड २ रा, मॉस्को १९६०, पृष्ठे २५४-५५

२

ॲन्हेलिंग त्याच्या नाट्य प्रयत्नात प्रगती करीत आहे असे दिसते; अगदी ताजे नाटक--पंधरवड्यापूर्वीचे--चांगलेच गाजले.

एन्गल्स यांचे फॉर्नॅड श्मिड्टला पत्र,
तारीख ९ डिसेंबर १८८९

मार्क्स/एन्गल्स, वेर्के, खंड ३७ वा,
१९६७, पृष्ठ ३२५

विल्यम मॉरिस

गेल्या शुक्रवारी b सो(शल) डे(मोक्रॅटिक) फेडरेशन[१७५] याच्यासाठी एक धर्मार्थ कार्यक्रम झाला. तुस्सी आणि एडवर्ड c यांनी एका प्रवेशात काम केले—मी

---

a जोस एचेगारेकृत नाटक दोन कर्तव्यांचा संघर्ष, लेखनकाल १८८२.--संपादक

b तारीख २१ नोव्हेंबर. --संपादक

c ॲन्हेलिंग. --संपादक

गेलो नाही; कारण अजून मला सतत तीन तास ताठ खुर्चीवर बसणे जमत नाही. निम सांगते की त्यांचा प्रवेश फार चांगला वठला—तो प्रवेश म्हणजे, असे ती सांगते, कमी-अधिक प्रमाणात त्यांचा इतिहासच होता. मदर राइट हिने वाचन केले--फारच चांगले केले--बॅक्स पियानो वाजवीत होता—प्रकरण जरासे लांबले—एका रात्री मॉरिस इथे आलेला होता आणि माझ्या टेबलावर ओल्ड नॉर्स एड्डा असल्याचे पाहून स्वारी खूपच खूष झाली—तो आइस्लँडिक भाषेचा प्रेमी आहे—मॉरिसने आपल्या कवितेच्या काही ओळी वाचून दाखविल्या. एड्डाइक हेल्रेइड ब्रिन्हिल्डारचा एक "refonte" (म्हणजे सिगूर्डच्या प्रेतासमवेत ब्रिन्हिल्डच्या स्वतःला जाळून घेण्याचे वर्णन) वगैरे वगैरे वाचन फार छान झाले—त्यांची कला त्यांच्या साहित्यापेक्षा आणि त्यांचे काव्य त्यांच्या गद्यापेक्षा जरा अधिक चांगले असल्याचे दिसते.

एन्गल्स यांचे लॉरा लाफार्गला पत्र,
तारीख २३ नोव्हेंबर १८८४

फ्रेडरिक एन्गल्स, पॉल आणि लॉरा
लाफार्ग, पत्रव्यवहार,
खंड १ ला, मॉस्को, १९५९, पृष्ठे २४५-४६

जर्मन साहित्य

सतराव्या शतकाच्या मध्यभागापासून ते एकोणिसाव्या शतकाच्या आरंभापर्यंतची जर्मनीची आणि जर्मन संस्कृतीची परिस्थिती

१

१६४८-१७८९

अ) राजकीय परिस्थिती. जर्मन संस्थानिक वेस्टफालियाच्या शांतता तहनाम्याचा फायदा उठवितात, परकीय सत्तेकडे स्वतःला विकून घेण्यासाठी ते एकमेकांशी चढाओढ करतात, आणि या सत्ता--फ्रान्स आणि संस्थानिक--जर्मनीचा सगळा फ्रेंच मुलूख क्रमाक्रमाने ताब्यात घेण्यासाठी व आल्सासच्या सरहद्दी सलग करून घेण्यासाठी जर्मनीच्या दुबळेपणाचा फायदा उठवितात. फ्रान्सचा ऐतिहासिक हक्क आणि ट्यूटन लोकांकडून "लुंड्यालूट" असा ओरडा. डावीकडले व्होस्जेस जिल्हे वगळून इ. स. १००० पासून भाषिक सरहद्दीचे अभंगत्व (मेन्के पाहा). सर्वसाधारणपणे हे असे आहे. विशेषतः उत्तरेकडे ऑस्ट्रिया व साम्राज्य यांच्याशी स्पर्धा करणारी सत्ता या नात्याने प्रशियाचा उदय. उत्तर आणि दक्षिण असे विभाजन व्यवहारात यायला प्रारंभ झाला आहे. प्रशियन इतिहासावरील टीका. दुसरा फ्रेडरिक--रशियाचा उदय आणि रशियन धोरणाला दुसऱ्या फ्रेडरिकचा अंकेतपणा--प्रशियाच्या पायी आता यादवी युद्धे ही ऑस्ट्रिया व प्रशिया यांच्या दरम्यानच्या स्पर्धेची युद्धे झाली आहेत.

आ) आर्थिक प्रकरणे. काहीही असले तरी तीस वर्षांच्या युद्धाच्या परिणामातून मंद गतीने सावरणूक, भांडवलदार पुन्हा वरचढ होण्यासाठी धडपडायला लागतात. अशा परिस्थितीत हे पुनरुज्जीवन बदनाम गुणांच्या जोरावरच होणे शक्य आहे. हे सगळे कसेही असले तरी देखील आर्थिक प्रगती ही केवळ राजकीय हस्तक्षेपाच्या योगाने, संस्थानिकांच्या बदमाषीच्या योगाने आणि परदेशांतून त्याना मिळणाऱ्या पैशाच्या योगानेच केवळ शक्य झालेली आहे. जर्मनीच्या आर्थिक नामुष्कीच्या सखोलपणाचे प्रत्यंतर यावरून मिळते. हा कालखंड म्हणजे पितृसत्ताक राजवटीचा

उद्‌गम आहे. १६४८ नंतर राज्यसंस्थेवर सामाजिक कामगिऱ्या पार पाडण्याची जबाबदारी खरोखरी येऊन पडलेली आहे आणि तिला हे द्रव्याच्या आवश्यकतेपायी करणे भाग पडत आहे; जिथे तिने त्यांच्याकडे दुर्लक्ष केले--तिथे कुजवणूक (वेस्टफॅलियन बिशपांच्या अखत्यारीतील मुलुखामध्ये). केवढी नामुष्कीची अवस्था ही ! आणि किती क्षुल्लक स्वरूप आहे राज्यीय मदतीचे ! जागतिक बाजारपेठेच्या संबंधात शुद्ध निष्क्रियता; मोठ्या प्रमाणावरील जागतिक युद्धांमध्ये केवळ तटस्थ म्हणून थोडासा नफा कमावता येतो (अमेरिकन आणि १८०१ पर्यंतची क्रान्तिकारक युद्धे). उलट-पक्षी लुटारू राज्यांच्या विरुद्ध पौरुषहीन. (फ्रेंच राज्यक्रान्तीच्या प्रभावाच्या योगाने युरोप खंडातील ही लाजिरवाणी अवस्था नष्ट करण्यात आली).

इ) साहित्य आणि भाषा यांचा संपूर्ण ऱ्हास; धर्मशास्त्र म्हणजे दगड बनलेली ठोकळेबाजी; ज्ञानाच्या इतर शाखांमध्ये जर्मनीची संपूर्ण अधोगती झालेली आहे, परंतु अजूनही प्रकाश लुकलुकतो आहे : याकोब बोहमे (आगामी तत्त्वचिंतकांची नवी निशाणी), केप्लर, लीबनीझ--प्रस्तुतापासून, वास्तवापासून पुन्हा अलग होणे. बाख.

ई) १७८९ सालातील जर्मनीतली परिस्थिती.--अ) शेती--शेतकऱ्यांची अवस्था, भूदासपद्धती, फटके मारणे, कराची भरपाई. आ) उद्योगधंदे--सर्रास उपासमार, मुख्यत्वेकरून शारीरिक श्रम, परंतु इंग्लंडमध्ये मोठ्या प्रमाणावरील उद्योग-धंद्याला अगोदरच प्रारंभ झालेला आहे, तर जर्मनीमध्ये उद्योगधंदा पूर्णपणे विकसित व्हायच्या अगोदरच मृत्युपंथाला लागला आहे. इ) व्यापार--निष्क्रिय. ई) हुन्नर संघातील कारागिरांची अवस्था, सरदार लोक व सरकार यांच्या संबंधांत. उ) विकासाच्या मार्गातील राजकीय धोंड : तुकडे होणे, मेन्केच्या म्हणण्यानुसार वर्णन. जकाती, नद्यतील वाहतुकीत अडथळा; विघटनापायी खुला व्यापार अंतर्गत सरहद्दींमध्ये मर्यादित; जकाती बहुतांशी म्युनिसिपल ग्राहक कर आहेत.

हे संस्थानिक, चांगली सुविद्य माणसे असतानादेखील, भले करायला असमर्थ --श्चूबार्ट यांच्या प्रोटेक्टर्सप्रमाणे, आणि कार्ल ऑगस्ट--सगळ्यांनी युद्ध शेवट-पर्यंत लढण्याऐवजी ऱ्हीनबुंडमध्ये प्रवेश करणे अधिक पसंत केले. याचा पुरावा म्हणजे १८०६ ची स्वारी. तीमध्ये आपल्या गळ्यांवर सुरा रोखला आहे अशी आपली अवस्था झाल्याचे त्यांना आढळून आले. याच्या भरीला, या १००० संस्थानिकांपैकी प्रत्येकजण निरंकुश राजा आहे--रासवट, अशिक्षित, बदमाष, यांच्यामध्ये सहकार्याची कधीही अपेक्षाच करता येत नाही, पण हे सदैव लहरींचे असंख्य प्रकार असतात (श्लोझेर) अमेरिकन युद्धाच्या अवधीत सैनिक-विक्रीचा व्यापार--परंतु त्यांची सगळ्यांत जास्त लाजिरवाणी कृती म्हणजे त्यांचे नुसते अस्तित्व हीच होती. आणि त्यांना लागून, पूर्व सरहद्दीवर, प्रशिया उत्तरेला आणि ऑस्ट्रिया दक्षिणेला, हावरटपणाने नव्या क्षेत्रांसाठी आपले हात लांब करत असलेले; ज्यांना परिस्थिती अजूनही सावरता येत होती अशी ही केवळ दोनच राज्ये, म्हणजे

दोहोपैकी केवळ एकच अस्तित्वात असते. परंतु त्यांच्या अपरिहार्य स्पर्धेत कसलीही सोडवणूक बादच करून टाकली. म्हणजे खरीखुरी आंधळी गल्ली आहे; (cul-de-sac);; मदत केवळ बाहेरूनच येऊ शकली—ती फ्रेंच राज्यक्रान्तीने आणली. धुगधुगीची फक्त दोनच लक्षणे : लष्करी कर्तृत्व आणि साहित्य, तत्त्वज्ञान, विधिपूर्वक आत्मनिष्ठ शास्त्रीय संशोधन. तर तिकडे फ्रान्समध्ये राजकीय लेखन जरी पहिल्या दर्जाचे असले तरीदेखील १८ व्या शतकाइतक्या अव्वल काळात वर्चस्व गाजवून राहिलेले होते, तर इकडे जर्मनीत हे सगळे अध्यात्माच्या क्षेत्रामध्ये वास्तवातून उड्डाण चाललेले होते. मूळ माणूस आणि भाषेचा विकास : १७०० साली बर्बरावस्था, १७५० साली लेसिंग आणि कान्ट, लवकरच गटे, शिलर, वायलँड, हेर्डेर, हान्डेल, ग्लुक, मोझार्ट.

१७८९–१८१५

१. आल्सास-लॉरेनमधील फ्रेंच भाषिकांच्या मधोमध अडकलेली जर्मन-भाषिक क्षेत्रे, इत्यादि—तीं अगोदरच अर्धवट फ्रेंच सार्वभौमत्वाखाली असलेली—त्यांनी फ्रेंच राज्यक्रान्तीशी दोस्ती केली, आणि अशा प्रकारे त्यांनी युद्धाला सबब मिळवून दिली. प्रशिया आणि ऑस्ट्रिया यांची आता अचानक एकजूट झाली. वाल्मी. तोफखान्याच्या जमावटीच्या वापराने एका रेषेत युद्ध करायच्या डावपेचांचा पराभव. फ्ल्यूरस आणि जेम्मापेस. लष्करी ठाण्यांच्या साखळीवर आधारलेल्या ऑस्ट्रियन डावपेचांचा पराभव? ऱ्हाइन नदीच्या डाव्या तीराचा पाडाव. शेतकऱ्यांचा व स्वतंत्र वृत्तीच्या नगरांचा जल्लोष, जबरदस्तीने करवसुली करण्याच्या व्यक्तिगत उदाहरणांनी किंवा नेपोलियनच्या रक्त-कर वसुलीने देखील या जल्लोषावर पाणी पडले नाही. अमीन्सचा शान्तता तहनामा आणि बादशाही प्रतिनिधींचा मुख्य निर्णय—जर्मन साम्राज्याची बरखास्ती. ऱ्हीनबुंड. नेपोलियनकडून छोट्या संस्थानांना अर्धचंद्र; दुर्दैवाची गोष्ट म्हणजे हे पुरेसे मुळीच नाही. संस्थानिकांच्या संबंधांत तो सदैव क्रान्तिकारक असतो आणि जर छोट्या संस्थानिकांनी त्याच्यासमोर इतक्या लाचारपणाने शरणागती पतकरली नसती तर त्याने आणखी पुढची मजल गाठली असती. १८०६—नेपोलियनची चूक म्हणजे त्याने प्रशियाचा संपूर्ण नायनाट केला नाही. युरोपखंडातून इंग्लंडची नाकेबंदी झाली त्या अवधीतील जर्मनीची आर्थिक अवस्था.—परदेशांकडून मोठ्यात मोठी मानखंडना होण्याचा हा कालखंड साहित्यातील व तत्त्वज्ञानातील महान तेजस्वीपणाच्या कालखंडाशी मिळता जुळता झालेला असतो, तर संगीताने बीथोव्हनच्या रूपाने उच्चांक गाठलेला असतो.

फ्रेडरिक एन्गल्स, "जर्मनीवरील टिपणे"
मार्क्स/एन्गल्स, वेर्के, खंड १८ वा, १९६९,
पृष्ठे ५९१-९३

२

गेल्या शतकाच्या अखेरीच्या सुमारास जर्मनीची अवस्था ही अशी होती. ही सगळी जिवंत सामुदायिक सडणुकीची व ओंगळवाण्या अधोगतीची अवस्था होती. कुणालाही स्वस्थपणा वाटत नव्हता. देशातील दुकानदारी, व्यापार, उद्योधंदे आणि शेती यांची अवस्था जवळ जवळ शून्यावर येऊन ठेपलेली होती. शेतकरी, व्यापारी आणि कारखानदार यांना रक्तशोषक सरकार आणि व्यापाराची वाईट अवस्था यांचे दुहेरी दडपण जाणवत होते; सरदारांना आणि संस्थानिकांना असे आढळून आले की आपल्या कनिष्ठांना पिळून काढत असताना सुद्धा आपल्या उत्पन्नांना आपल्या वाढत्या खर्चाची मजल गाठायला लावता येत नाही; सगळाच बिघाड झालेला होता आणि सार्वत्रिक अस्वस्थपणा साऱ्या देशभर पसरलेला होता. शिक्षण नाही, बहुजन समाजाच्या मनावर प्रभाव पाडायची साधने मुळी उपलब्धच नाहीत, मुद्रणस्वातंत्र्य नाही, सार्वजनिक भावना नाही, इतर देशांशी विस्तारित व्यापार देखील नाही—क्षुद्रपणा आणि स्वार्थीपणा यांच्याखेरीज काहीच नाही—क्षुद्र, चोरटा व्यवहार करणारी, नादान दुकानदारीची वृत्ती साऱ्या जनतेच्या रोमरोमात भरून राहिली. सगळेच जीर्ण झालेले, ढासळत असलेले, झपाट्याने विनाशाकडे जात असलेले, लाभदायक फेरबदल होण्याची काडीइतकी देखील आशा नसलेली, मृत संस्थांची सडलेली मढी उचलून दूर नेण्याला पुरेशी झाली असती येवढी ताकद देखील राष्ट्राच्या अंगी राहिलेली नव्हती.

अधिक चांगली स्थिती यायची एकमेव आशा म्हणजे देशाच्या साहित्यामध्ये दिसत होती. हे लाजिरवाणे राजकीय व सामाजिक युग म्हणजे त्याच वेळी जर्मन साहित्याचे महान युग होते. १७५० च्या सुमारास जर्मनीतले सगळे महान प्रतिभावान जन्माला आले; कविवर्य गटे आणि शिलर, तत्त्वज्ञ कान्ट आणि फिख्टे, आणि त्यानंतर वीस वर्षे लोटली असतील नसतील येवढ्यात शेवटचा महान जर्मन अध्यात्मवेत्ता[१७६] हेगेल. या काळातला प्रत्येक नाव घेण्याजोगा ग्रंथ हा त्या वेळी अस्तित्वात असलेल्या एकंदर जर्मन समाजाविरुद्ध आव्हानाच्या व बंडाच्या बाण्याने रसरसलेला होता. गटेने Goetz von Berlichingen ही नाट्यपूर्ण श्रद्धांजली एका बंडखोराच्या स्मृतीला अनुलक्षून लिहिली. शिलरने आपल्या Robbers या कृतीत सगळ्या समाजाविरुद्ध युद्ध पुकारून राहिलेल्या उदारमनस्क तरुणाचे चित्रण साजरे केले. परंतु त्यांच्या या तरुणपणीच्या कृती होत्या; ते वयस्कर झाल्यावर त्यांची सगळी आशा सुटली; गटेने सगळ्यांत जास्त बोचक उपरोधाचे बंधन स्वतःला घालून घेतले आणि शिलरला जर विज्ञान आणि विशेषेकरून प्राचीन ग्रीसचा व रोमचा महान इतिहास यांनी दिलेला आधार लाभला नसता, तर तो हताश झाला असता. हे दोघे इतरांचे दाखले म्हणून मानायला हरकत नाही. राष्ट्राच्या सर्वोत्तम व सगळ्यांत जास्त सामर्थ्यशाली मनांनीदेखील आपल्या देशाच्या भवितव्याविषयीची सगळी आशाच सोडून दिली.

आणि अचानक, एखाद्या वज्राघाताप्रमाणे, या जर्मनी नामक सावळ्या गोंधळात फ्रेंच राज्यक्रान्तीने टोला हाणला. परिणाम प्रचंड झाला. सामान्य जनता, जवळ जवळ अशिक्षित, जुलूम करून घ्यायच्या प्राचीन सवयीत भलतीच गढून गेलेली, तिच्यावर काही एक परिणाम न होता ती तशीच राहिली. परंतु सगळे मध्यम वर्ग आणि सरदार मंडळीचा अधिक चांगला भाग, यांनी फ्रान्सच्या नॅशनल असेम्ब्लीला आणि फ्रान्सच्या जनतेला आनंदभरल्या आरोळीनिशी मान्यता दिली. हजारो, लाखो, अशा सगळ्या हयात जर्मन कवींपैकी एकानेही फ्रेंच जनतेच्या पराक्रमाचे गीत गाण्यात कसूर केली नाही. परंतु हा उत्साह जर्मन धर्तीचा होता, हा केवळ आध्यात्मिक होता, फ्रेंच क्रान्तिकारकांच्या केवळ तत्त्वविचारांना लागू करण्यापुरताच याचा उद्देश होता.

सत्य घटनांच्या वजनाने व प्रचंड राशीने हे तत्त्वविचार पार्श्वभूमीवर ढकलून दिले जाताक्षणी; फ्रेंच दरबार आणि फ्रेंच जनता यांचे तात्त्विक ऐक्य १७९१ च्या तात्त्विक राज्यघटनेने घडवून आणलेले असताना देखील व्यवहारात त्यांचे मतैक्य अशक्य होताक्षणी; "१० ऑगस्ट रोजी"[१७७] जनतेने आपले सार्वभौमत्व व्यावहारिक रीत्या ठासून मांडताक्षणी; आणि जिरॉन्डिस्टांचा [१७८] मोड करून तारीख ३१ मे १७९३ रोजी तत्त्वविचाराला सर्वस्वी गप्प करण्यात येताक्षणी—मग जर्मनीतील या उत्साहाचे परिवर्तन क्रान्तीविरुद्ध पिसाट द्वेष उफाळण्यामध्ये झाले. अर्थात् हा उत्साह तारीख ४ ऑगस्ट १७८९ रोजी रात्री घडलेल्या कृतींनाच तेवढा लागू होणार असा याचा अर्थ होता. त्या रात्री सरदार मंडळींनी आपल्या खास हक्कांवर पाणी सोडले होते. परंतु उदारमतवादी तत्त्वविचारक जे निष्कर्ष काढतील असा संभव होता त्यांच्याकडून खूप वेगळे परिणाम अशा कृतींच्या बाबतीत व्यवहारात घडून येतील असा विचार चांगल्या जर्मनांच्या मनात कधीही आला नाही. आपणा सर्वांना हे ठाऊकच आहे की हे परिणाम जरासे गंभीर आणि अनेक पक्षांना अप्रिय होते आणि त्यांना मान्यता द्यायचा विचार जर्मनांच्या मनात कधीच नव्हता. म्हणून सगळा बहुजनसमाज जो सुरुवातीला क्रांतीचा उत्साही मित्र झालेला होता, तो आता तिचा मोठ्यात मोठा वैरी झाला. अर्थात त्याला लाचार जर्मन वृत्तपत्रांकडून पॅरिसच्या अत्यंत विकृत बातम्या मिळत होत्या. म्हणून प्रकार असा घडला की ज्या जनतेने गुलामगिरीच्या बेड्या तडकेने झुगारून दिल्या होत्या, आणि सगळ्या अरेरावांना, सरदारांना आणि धर्मगुरूंना रोखठोक आव्हान दिले होते, तिच्या प्रचंड कामगिरीला पसंती न देता आपल्या जुन्या प्रशान्त पवित्र रोमन साम्राज्याचा उकिरडा[१७९] या बहुजनसमाजाने अधिक पसंत केला.

फ्रेडरिक एन्गल्स, "जर्मनीची राज्यसंस्था"
इंग्रजीत लिहिलेला लेख
द नॉर्दर्न स्टार, तारीख २५ ऑक्टोबर १८४५

शिलर
त्याच्या कवितेतील उणीवा

कान्ट[१८०] याने प्रतिपादन केलेली नेभळट "ठाशीव आवश्यकता"—नेभळट म्हणण्याचे कारण म्हणजे तो अशक्य गोष्टीचा आग्रह धरते आणि म्हणून कोणतेही वास्तव कधीच गाठत नाही—हिच्यावर हेगेलच्या पेक्षा अधिक कडक टीकाप्रहार अन्य कोणीही केलेले नाहीत तसेच शिलरने न गाठता येण्याजोग्या ध्येयांविषयी जो तुच्छतावादी भावनाप्रधान उत्साह प्रदर्शित केला आहे, त्याचा उपहास हेगेलपेक्षा अधिक क्रूरपणाने कोणीच केलेला नाही, आणि हा हेगेल तर नेमका संपूर्ण अध्यात्मवादी होता. (पाहा, त्याचा फिनॉमेनॉलॉजी हा ग्रंथ.)

फ्रेडरिक एन्गल्स, लुडविग फॉयरबाख
आणि अभिजात जर्मन तत्त्वज्ञानाचा अन्त

मार्क्स आणि एन्गल्स, निवडक ग्रंथ, खंड ३ रा,
मॉस्को, १९७३, पृष्ठ ३५२

गटे

१

सर्वस्वी क्रान्तिकारक विचारपद्धतीने अत्यंत मवाळ निष्कर्ष का काढला, याचा खुलासा करायला [हेगेलच्या] पद्धतीच्या अंतर्गत आवश्यकता त्यांच्या परीने म्हणूनच पुरेशा आहेत. वस्तुतः या निष्कर्षाचे खास स्वरूप ज्या गोष्टीतून उद्भवते ती गोष्ट म्हणजे ही, की हेगेल हा जर्मन होता आणि त्याचा समकालीन गटे याच्याप्रमाणेच तुच्छतावाद्यांच्या रांगेचा एक भाग त्याच्या मागे लटकलेला होता. या दोघांपैकी प्रत्येक जण आपल्या स्वतःच्या क्षेत्रात ऑलिम्पिक पर्वतावरील झ्यूस होता आणि असे असूनही त्यांच्यापैकी एकानेही जर्मन तुच्छतावादातून स्वतःची सुटका पूर्णपणे अशी करून घेतलेलीच नाही.

फ्रेडरिक एन्गल्स, लुडविग फॉयरबाख आणि
अभिजात जर्मन तत्त्वज्ञानाचा अन्त

मार्क्स आणि एन्गल्स, निवडक ग्रंथ, खंड ३ रा,
मॉस्को, १९७३, पृष्ठ ३४१

२

तुच्छतावाद्यांना शोभण्याजोग्या विषयांवरील त्याची [डूहरिंगची] शब्दबंबाळ भाष्ये, म्हणजे जीवनाचे मूल्य आणि जीवनाचा उपभोग घ्यायचा सर्वोत्तम मार्ग यांजसारखी भाष्ये, ही खुद्द भाष्येच तुच्छतावादामध्ये इतकी ओतप्रोत भरून राहिलेली आहेत की गटेच्या फाऊस्टविषयीच्या त्याच्या संतापाचा उलगडा त्यांच्या योगानेच होतो. गटेने बिननैतिक फाऊस्ट याला आपला नायक कल्पावे आणि वास्तवाचा गंभीर तत्त्वज्ञ वाग्नर याला आपला नायक करू नये हा गटेचा खरोखरी अक्षम्य अपराधच होता म्हणायचा.

फ्रेडरिक एन्गल्स, ॲन्टी-डूहरिंग,
मॉस्को, १९७५, पृष्ठ १६५

३

हेगेलवादी विचारपद्धतीच्या सर्व नियमांनुसार जे वास्तव आहे त्या प्रत्येकाच्या बुद्धियुक्ततेच्या प्रस्तावाची परिणती ज्या दुसऱ्या प्रस्तावामध्ये होते तो हा असतो : जे अस्तित्वात आहे ते सगळे नष्ट होण्याच्या लायकीचे आहे. १८१

फ्रेडरिक एन्गल्स, लुडविग फॉयरबाख आणि
अभिजात जर्मन तत्त्वज्ञानाच्या अन्त

मार्क्स आणि एन्गल्स, निवडक ग्रंथ, खंड ३ रा,
मॉस्को, १९७३, पृष्ठे ३३८-३९

४

हे सगळे या " प्रेषित " गटेच्या साहित्यात देखील सापडायचा संभव आहे. आणि जो डोळे उघडे ठेवून वाचत असेल असा कोणीही माणूस हे त्याच्या ओळींच्या दरम्यानचे अध्याहृत विचार वाचू शकतो. गटेला " परमेश्वराशी " संबंध ठेवणे आवडत नसे; हा शब्दच त्याला अस्वस्थ करायचा. केवळ मानवी व्यवहारात तो मनापासून रमायचा. आणि ही माणुसकी, धर्माच्या शृंखलांतून ही कलेची मुक्तता, हिच्यांतच नेमके गटेचे मोठेपण साठवलेले आहे. प्राचीन कवी म्हणा, किंवा शेक्स्पियर

म्हणा, त्यांच्यापैकी एकही या बाबतीत त्याची बरोबरी करू शकत नाही. परंतु ही श्रेष्ठ माणुसकी, धार्मिक द्वंद्वावरचे हे मात करणे, त्याच्या संपूर्ण ऐतिहासिक महत्त्वानिशी फक्त त्यांनाच आकलन होऊ शकते, की जे जर्मन राष्ट्रीय विकासाच्या अन्य एका उपांगाशी म्हणजे तत्त्वज्ञानाशी, अपरिचित नसतात. गटेला जे केवळ स्वयंस्फूर्त पणे व्यक्त करता येत होते, आणि म्हणून खरे म्हणजे एका विशिष्ट अर्थाने तो हे जे "प्रेषिताच्या धर्तीवर" व्यक्त करत होता, ते समकालीन जर्मन तत्त्वज्ञानामध्ये विकसित करण्यात आले आहे आणि त्याला आधार देण्यात आला आहे.

फ्रेडरिक एन्गल्स, "थॉमस कार्लाइलकृत
इंग्लंडची परिस्थिती. जुनी आणि सध्याची"

मार्क्स आणि एन्गल्स, संकलित ग्रंथ,
खंड ३ रा, मॉस्को, १९७५, पृष्ठ ४६५.

५

थुनविषयी सांगायचे म्हणजे—गटेविषयीच्या त्याच्या लेखात मी दुरुस्त्या करीन, एका फॉर्मचा अर्धा ते पाऊण हिस्सा एवढी त्याच्यात काटछाट करीन, आणि आपल्या प्रकाशनात बसण्याजोगता तो करून घेईन, मात्र हे तुम्हाला मान्य असले तरच, आणि याच्या विषयी तुम्ही मला शक्य तितक्या लवकर लिहून कळवावे. ग्रंथ तसा अत्यंत वैशिष्ट्यपूर्ण आहे. गटेच्या सगळ्या तुच्छतावादांचा गौरव थुन मानवी म्हणून करतो, आणि गटेला तो फ्रँकफूर्टचा रहिवासी करतो, अधिकारी करतो, त्या नात्याने त्याला "अस्सल माणसाचे" रूप देतो, आणि मोठेपणाच्या व प्रतिभेच्या प्रत्येक अभिव्यक्तीकडे मात्र दुर्लक्ष करतो किंवा तिला नावे ठेवतो. अशा प्रकारे माणूस म्हणजे जर्मन मध्यम वर्गीय या समीकरणाचा अत्यंत तेजस्वी पुरावा हा ग्रंथ आपल्याला उपलब्ध करून देतो. मी हे नुसते सूचित केलेले आहे, परंतु याचा विकास मी करू शकतो आणि उरलेल्या लेखात बरीच काटछाट करू शकतो, कारण तसा तो आपल्या प्रकाशनासाठी सोईचा नाही. तुमचे मत काय आहे?

एन्गल्स यांचे मार्क्स यांना पत्र,
तारीख १५ जानेवारी १८४७

मार्क्स / एन्गल्स, वेर्के, खंड २७ वा, १९६५,
पृष्ठ ७५-७६

६

कार्ल ग्रुन

Uber Gothe vom Menschitchen Standpunkte

डार्मस्टाड्ट, १८४६

आपल्या मातृभूमीतील सामाजिक चळवळीच्या @ अभावावर नजर टाकून "Soziale Bewegung in Frankreich und Belgien" या आपल्या ग्रंथावरील परिश्रमानंतर हेर ग्रुन आराम करतो आहे. रुचिपालट म्हणून तो वयोवृद्ध गटेच्या "मानवी उपांगाकडे" नजर टाकायचे ठरवतो आहे. त्याने आपले सात-लीग रपेटीचे बूट काढून ठेवून त्यांच्या ऐवजी गालिच्यावर वापरायचे स्लिपर्स पायात घातले आहेत, आणि आपला ड्रेसिंग गाऊन अंगात चढवून, आत्मसंतुष्टपणाने परिप्लुत होत्साता आपल्या आरामखुर्चीवर तो पहुडला आहे :

"आम्ही समीक्षा लिहीत नाही आहोत, आम्ही जे सगळ्यांना दिसण्याजोगे आहे तेच फक्त निवडून काढत आहोत" (पृष्ठ २४४).

त्याने सगळ्या गोष्टी स्वतःसाठी कशा खरोखरी सुखकारक करून ठेवल्या आहेत :

"मी माझ्या खोलीत काही गुलाब व कॅमेलियाज फुलदाणीत घालून ठेवलेले होते आणि उघड्या खिडकीनजीक मिग्नोनेट्स आणि व्हायोलेट्स ठेवलेली होती." (पृष्ठ III) "आणि सगळ्यात जास्त महत्त्वाची गोष्ट म्हणजे भाष्ये मुळीच करायची नाहीत!.... परंतु इथे समग्र ग्रंथ टेबलावर आहेत आणि गुलाब व मिग्नोनेट्स यांचा मंद सुवास खोलीत दरवळतो आहे! आता आपण कोठपर्यंत मजल मारायची हे जरा बघू या....केवळ लफंगाच तेवढा आपल्याजवळ असते त्यापेक्षा अधिक देऊ करतो!" (पृष्ठे IV,V). [....]

अखेरीस आपण गटेच्या अधिक निकट चाललो आहोत. पृष्ठ १५ वर हेर ग्रुन जिवंत राहायचा हक्क गटेला बहाल करतो. कारण गटे आणि शिलर हे "कामगिरी-शिवाय सुख" म्हणजे वायलँड आणि "सुखाशिवाय कामगिरी" म्हणजे क्लॉप्स्टॉक यांच्या दरम्यानच्या अन्तर्विरोधाची निष्कृति आहेत. "लेसिंगने पहिल्या प्रथम माणसाला त्याच्या स्वतःवर आधारले" (या कसरतीच्या प्रयोगाच्या बाबतीत त्याचे अनुकरण हेर ग्रुन करू शकतो की नाही याचा मला उलगडा होत नाही.)-- या

---

a जर्मन भाषेत Bewegung—चळवळ आणि Stillstand—चळवळीचा अभाव— या शब्दांवर श्लेष आहे. —संपादक

तात्त्विक रचनेमध्ये आपल्याला हेर्र ग्रुन याचे सगळे आधार एकत्र उपलब्ध आहेत. रचनेचे रूप, एकंदर गोष्टीचा आधार म्हणजे परस्परविरोधी गोष्टींचा मेळ घालण्यासाठी हेगेलची जगप्रसिद्ध क्लृप्ति हाताशी आहे. "माणूस स्वतःवर आधारलेला" ही फॉयरबाखला लागू केलेली हेगेलियन परिभाषा आहे. "कामगिरीशिवाय सुख" आणि "सुखाशिवाय कामगिरी" यांच्या ज्या अन्तर्विरोधावर बायलँड आणि क्लॉप्स्टॉक यांना उपरोक्त पर्यायांसाठी हेर्र ग्रुन उपयोजितो आहे, तो अन्तर्विरोध मो (झेस) हेस्स याच्या समग्र ग्रंथांतून उसना घेतलेला आहे. जो एकमेव आधार आम्हाला सापडत नाही तो म्हणजे खुद्द साहित्याचा इतिहास. या इतिहासाला उपरोक्त खिचडी दूरान्वयाने देखील ज्ञात नाही, म्हणून त्याच्याकडे हेर्र ग्रुनने यथायोग्यपणे दुर्लक्ष केले आहे.

शिलरच्या विषयाचा आपण विचार करतो आहोत म्हणून हेर्र ग्रुनचा पुढील अभिप्राय प्रसंगोचित ठरावा : "आपण गटे नसलो म्हणजे आपण जे होऊ शकतो ते सर्व काही शिलर होता" (पृष्ठ ३११). माफ करा हं, आपण हेर्र ग्रुन देखील होऊ शकतो. --ओघाओघाने सांगायचे म्हणजे बन्हेरियाच्या लुडविगने जे नांगराचे तास झालून ठेवले आहे, त्यांतूनच हा आमचा लेखक नांगरट करतो आहे :

> हे रोमनगरी, नेपल्सच्या अंगी जे गुण आहेत त्यांची तुझ्या ठायी उणीव आहे, आणि तू ज्या गुणांवर दावा सांगतेस त्यांची उणीव नेपल्सच्या ठायी आहे; म्हणून तुम्ही दोघी जर एकच असता, तर जगाला हे भलतेच भारी झाले असते. a

ही ऐतिहासिक रचना जर्मन साहित्यांत गटेचा प्रवेश व्हायला मार्ग मोकळा करून देते. लेसिंगने "स्वतःवर आधारलेला माणूस" हा केवळ गटेच्या हातीच आपली उत्क्रान्ति चालू ठेवू शकतो. कारण गटेतील "माणूस" शोधून काढण्याचे श्रेय हेर्र ग्रुन याच्याकडे जाते. मला हा माणूस म्हणजे स्त्री-पुरुषांच्या लैंगिक सौख्यांतून निर्माण झालेला माणूस नव्हे, तर उच्च अर्थाने माणूस, विरोधविकासवादी माणूस, अर्कपात्रातून काढलेला caput mortuum b, ज्यांतून पिता परमेश्वर, पुत्र आणि पवित्र भूत याचा अवतार झाला, त्यांतून अवतरलेला Faust नाटकातील होमुन्कुलसचा [१८२] cousin germain —थोडक्यात सांगायचे म्हणजे गटे ज्या माणसाविषयी सांगतो आहे तो माणूस नव्हे, तर ज्याच्याविषयी हेर्र ग्रुन सांगतो आहे तो माणूस या नात्याने माणूस. तर मग हेर्र ग्रुन ज्या "माणूस या नात्याने" असलेल्या माणसाविषयी सांगतो आहे, तो आहे तरी कोण ?

"जे मानवी आशय नाही, असे गटेच्या लेखनात काहीही नाही" (पृष्ठ XVI) --पृष्ठ XXI वर आपल्याला असे ऐकायला मिळते की "गटेने माणूस या नात्याने

---

a बन्हेरियाचा पहिला लुडविग, "फ्लॉरेन्झ" (शब्दान्तर केलेले) —संपादक

b अर्क काढलेली पैदास, अर्क. --संपादक

माणसाचे जे चित्रण केले आणि त्याची संकल्पना केली, ते आज आम्ही त्याची जाण करून घेऊ इच्छितो त्याप्रमाणे असते." पृष्ठ XXII वर असे म्हटले आहे : "आजच्या घडीला गटे म्हणजे त्याचे ग्रंथ असा याचा अर्थ होतो, आणि हे ग्रंथ म्हणजे मानव जातीचे खरे संकलन आहे."—गटे म्हणजे "परिपूर्ण झालेली मानवता आहे" (पृष्ठ XXV)-- "गटेचे साहित्यिक ग्रंथ म्हणजे (!) मानवी समाजाचा आदर्श आहेत" (पृष्ठ १२)--गटे हा राष्ट्रीय कवि होऊ शकला नाही कारण जे मानवी आहे त्या सगळ्याचा कवि व्हायचे त्याच्या अदृष्टात होते" (पृष्ठ २५)-- असे असूनही पृष्ठ १४ नुसार, "आमचे राष्ट्र" -- म्हणजे जर्मन जनता--तरी देखील "आपला स्वतःचा गाभा" गटेमध्ये परिवर्तित झालेला बघणार आहे" असे समजण्यात येते.

"माणसाच्या गाभ्या" विषयीचा हा पहिला साक्षात्कार आहे आणि या प्रकरणी आपण हेर्र ग्रुन याजवर अधिकच विश्वास ठेवायला हरकत नाही; कारण त्याने जास्तीत जास्त आमूलाग्र रीतीने "माणसाच्या संकल्पनेची छाननी केलेली आहे" यात मुळीच शंका नाही. गटे "माणसाचे" चित्रण जसे ग्रुन याला त्याची जाणीव व्हायला हवी आहे तसे करतो, आणि त्याच वेळी तो परिवर्तित झालेल्या जर्मन राष्ट्राचे चित्रण करतो —अशा प्रकारे "माणूस" म्हणजे "परिवर्तित झालेल्या जर्मना" खेरीज अन्य काहीच नाही, याची आपल्याला आरंभापासून अखेरपर्यंत खातरजमा झालेली आहे. ज्याप्रमाणे गटे हा "राष्ट्रीय कवी" नाही, परंतु "जे मानवी आहे त्या सगळ्याचा कवी" आहे, त्याचप्रमाणे जर्मन राष्ट्र हे "राष्ट्रीय" राष्ट्र नाही, परंतु "जे मानवी आहे त्या सगळ्याचे" राष्ट्र आहे. या कारणास्तव आपल्याला पृष्ठ XVI वर पुन्हा असे वाचायला मिळते: "गटेचे साहित्यिक ग्रंथ, जीवनातून पुढे आलेले असून...त्यांचा वास्तवतेशी काहीएक संबंध नव्हता आणि नाही." म्हणजे "माणसा"प्रमाणे, म्हणजे "जर्मना"प्रमाणे. आणि पृष्ठ ४ वर : "नेमक्या याच वेळी फ्रेंच समाजवाद फ्रान्सला सुख आणून द्यायचे उद्दिष्ट ठेवतो, तर जर्मन लेखकांनी मानवजातीवर आपली नजर रोखली आहे." (याच्या उलट "मानव जात" ही बहुतांशी "त्यांच्या नजरे" समोर असायला सरावलेली नसून मानवी शरीराच्या काहीशा उलट भागासमोर असायला सरावलेली आहे.) म्हणून असंख्य प्रसंगी ग्रुन ज्या वस्तुस्थितीविषयी आपला आनंद प्रदर्शित करतो ती म्हणजे ही असते की गटेला "माणसाला आतून मुक्त करायला" हवे होते (उदाहरणार्थ, पृष्ठ २२५), हा मुक्ततेचा खराखुरा जर्मन प्रकार "आतून" बाहेर यायला आतापर्यंत नकार देऊन राहिला आहे!

तर मग आपण या पहिल्या साक्षात्काराची योग्य ती नोंद घेऊ या : "माणूस" म्हणजे "परिवर्तित झालेला" जर्मन.

"जे काही मानवी आहे त्या सगळ्याच्या कवीला", "गटेमधील मानवी आशयाला", हर ग्रुन कसे अभिवादन करतो, त्याचे आपण आता निरी-

क्षण करू या. म्हणजे ज्याच्याविषयी ग्रुन सांगतो आहे तो "माणूस" कोण आहे याचा आपल्याला याच्या योगाने उत्तम प्रकारे शोध लागेल. इथे हेर्र ग्रुन खऱ्या समाजवादाचे १८३ अत्यंत गुप्त विचार उघड करून दाखवितो असे आपल्याला आढळून येईल. आपल्या सगळ्या भगतगणांच्या पेक्षा अधिक मोठ्याने ओरडाआरडा करायची त्याची सर्वसाधारण धडपड त्याला अविचारीपणाने अशा गोष्टींचा जगापुढे डांगोरा पिटायला प्रवृत्त करते, की ज्या गोष्टी त्याच्या टोळीतले उर्वरित लोक आपल्या मनातच ठेवणे अधिक पसंत करतात. ओघाओघाने सांगायचे म्हणजे "जे जे काही मानवी आहे त्या त्या सगळ्याचा" कवी असे जे गटेचे परिवर्तन त्याने केले ते गटेला स्वतःलाच "माणूस" व "मानवी" या शब्दांचा वापर एक खास प्रकारचा भर देऊन करायची सवय होती, या वस्तुस्थितीमुळे त्याला सोईस्कर झाले. आता हे तर खरेच आहे की गटेने या शब्दांचा वापर केवळ त्याच अर्थाने केला की ज्या अर्थाने त्यांची योजना त्याच्या स्वतःच्या काळात आणि नंतर देखील हेगेलकडून होत होती. उदाहरणार्थ, हेगेलकडून "मानवी" ही संज्ञा पाखंडी व ख्रिस्ती धर्मरांच्या विरोधात विशेषेकरून ग्रीकांना बहाल झाली होती. या संज्ञांना फॉयरबाखच्या द्वारा त्यांचा गूढ तत्त्वज्ञानात्मक अर्थ त्यांना प्राप्त झाला त्याच्या किती तरी अगोदर ही गोष्ट घडलेली होती. विशेषतः गटेच्या लेखी त्या संज्ञांना अत्यंत बिन-तत्त्वज्ञानात्मक आणि व्यवहारी जगातला अर्थ सर्वसाधारणपणे असतो. गटेचे परिवर्तन फॉयरबाखचा शिष्य म्हणून आणि खरा समाजसत्तावादी म्हणून पहिल्या प्रथम करणारा म्हणजे ग्रुन, म्हणून त्याचे श्रेय ग्रुनकडे जाते.

आपल्याला अर्थात इथे खुद्द गटेविषयी फारशा तपशिलानिशी सांगता येणार नाही. आम्ही फक्त एकाच मुद्याकडे लक्ष वेधतो आहोत. गटेच्या ग्रंथांमध्ये समकालीन जर्मन समाजाविषयीची त्याची वृत्ती दुहेरी आहे. कधी कधी या समाजाविषयी त्याचा वैरभाव असतो; त्यामध्ये त्याला जे ओंगळवाणे आढळते त्याच्यापासून तो पळ काढायचा प्रयत्न करतो. उदाहरणार्थ Iphigenie मध्ये आणि त्यातल्या त्यात इटलीच्या सगळ्या प्रवासात अथपासून इतिपर्यंत. गोट्झ, प्रोमिथ्यूस आणि फाऊस्ट यांच्याप्रमाणे तो या समाजाविरुद्ध बंड करून उठतो, मेफिस्टोफेलिसप्रमाणे तो त्याला आपल्या अत्यंत कडवट उपरोधाचे फटकारे लगावतो. परंतु तसे म्हटले तर कधी कधी तो त्याच्याशी मैत्री जोडतो, त्याच्याशी आपल्याला "जुळते करून घेतो," म्हणजे Zahme Xenien च्या बहुसंख्य भागांमध्ये आणि अनेक गद्य लेखनकृतींमध्ये त्याने केले आहे त्याप्रमाणे; तो ही मैत्री साजरी करतो. उदाहरणार्थ, Maskenzuge तल्याप्रमाणे, किंबहुना इतिहासाच्या पुढे सरसावणाऱ्या हालचालीच्या विरुद्ध तो या समाजाचे समर्थन करतो, विशेषेकरून फ्रेंच राज्यक्रान्तीविषयी तो जे जे काही सांगतो त्या त्या आपल्या सगळ्या लेखनामध्ये त्याचे हे समर्थन आहे. जर्मन जीवनातल्या केवळ काही उपांगांचा स्वीकार, त्याला तिरस्करणीय वाटत

असलेल्या इतर उपांगांच्या विरोधात तो करतो, अशातला हा प्रकार नाही. अनेक प्रसंगी तो ज्या वेगवेगळ्या मूड्स्मध्ये असतो त्यांच्यावरही या गोष्टी अवलंबून असतात; आपल्या वातावरणाच्या कंगालपणाचा उबग आलेला त्याच्यातला प्रतिभावंत कवी, आणि फ्रँकफूर्टच्या धनिक घराण्यातला सावध पुरुष या दोहोंमध्ये त्यांच्या अंतर्गत सतत लढाई चाललेली असते, किंवा आपल्याला या समाजाशी जुळते करून घेणे व याचा सराव करून घेणे भाग असलेला याच्यांतल्या वायमरचा प्रीव्ही कौन्सिलर आणि याच्यातला प्रतिभावंत कवी यांच्या दरम्यान त्याच्या अंतरंगात सतत लढाई चाललेली असते अशा प्रकारे गटे ही एका क्षणी एक उतुंग व्यक्ती असते, तर दुसऱ्या क्षणी एक क्षुद्र व्यक्ति असते; एका क्षणी जगाविषयी तिरस्काराने संपूर्ण व्यापलेला असा हट्टी, उपहास करणारा हा कवी असतो, दुसऱ्या क्षणी हा सावध, ढिला, संकुचित वृत्तीचा तुच्छतावादी इसम असतो. जर्मनीच्या कंगालपणावर गटेला देखील मात करता आली नाही; उलटपक्षी या कंगालपणानेच त्याच्यावर मात केली; आणि या सर्वश्रेष्ठ जर्मनावर कंगालपणाने केलेली ही मात म्हणजे त्या कंगालपणावर "आतून" अजिबात मात करता येणार नाही याचा हा अत्यंत निर्णायक असा पुरावा आहे. गटे हा भलताच विश्वव्यापी, भलताच क्रियाशील वृत्तीचा, भलताच व्यवहारी माणूस होता आणि म्हणूनच त्याला आपल्या या कंगालपणापासून शिलरप्रमाणे पळ काढून कान्टवादी ध्येयाचा आसरा शोधावासा वाटला नाही; त्याची दृष्टी भलतीच भेदक होती आणि म्हणूनच अंतिमदृष्ट्या असले पलायन म्हणजे कंगालपणाच्या गद्य प्रकाराच्या बदल्यात कंगालपणाचाच दिव्यभव्य प्रकार घेण्यापलिकडे अन्य काहीच नाही हे त्याला दिसत होते. त्याचा स्वभाव, त्याची तडफ, त्याची एकंदर मनोवृत्ती त्याला व्यवहारी जीवनाकडे वळवून राहिली, आणि आपल्या सभोवारचे व्यवहारी जीवन कंगाल असल्याचे त्याला आढळून आले. आपण ज्या वातावरणाचा केवळ तिरस्कारच करू शकतो, त्याच वातावरणात आपल्याला राहणे भाग पडणे आणि असे असूनही ज्यामध्ये आपण क्रियाशील राहू शकतो, अशा याच एकमेव वातावरणाला बांधून घेणे, ही श्रृंगापत्ती गटेसमोर सदैव उभी होती, आणि जसजसे त्याचे वय वाढत गेले तसतसा हा सामर्थ्यशाली कवि de guerre lasse @ क्षुद्र वायमार मंड्याच्या आड विलीन झाला. बोर्ने आणि वेन्झेल यांच्यावर जशी आपण टीका करतो तशी टीका आपण गटेवर तो उदारमतवादी b नसल्याबद्दल करत नाही, परंतु तो अधूनमधून तुच्छतावादी देखील होतो म्हणून आपण त्याच्यावर टीका करतो. जर्मन स्वातंत्र्यासाठी तो फसल्याही उत्साहाच्या

---

a लढ्याला कंटाळून.— संपादक

b एल. बोर्ने, Parisieier Briefe; डब्ल्यू. मेन्झेल, Die deusche Literature. — संपादक

आहारी जात नाही म्हणून आपण त्याच्यावर टीका करत नाही. परंतु सगळ्या प्रमुख समकालीन ऐतिहासिक चळवळींच्या मध्यमवर्गीय धास्तीला आपल्या अधूनमधून उसळी घेणाऱ्या अधिक सच्च्या सौंदर्यवादी उपजतबुद्धीचा तो बळी देतो म्हणून आपण त्याच्यावर टीका करतो. तो दरबारी माणूस आहे म्हणून आपण त्याच्यावर टीका करत नाही, परंतु ज्या वेळी गुरांचा प्रचंड घाणेरडा गोठा असलेल्या जर्मनीची साफसफाई नेपोलियन करत होता, अशा वेळी अत्यंत लहान अशा जर्मन दरबाराचे अत्यंत क्षुद्र व्यवहार आणि menus plaisirs@ येवढ्या गंभीरपणे गटे करत होता, म्हणून आम्ही त्याच्यावर टीका करतो. आम्ही त्याच्यावर नैतिक किंवा पक्षीय दृष्टिकोनातून टीका करीत नाही, परंतु जास्तीत जास्त प्रमाणात सौंदर्यविषयक व ऐतिहासिक दृष्टिकोनातून आम्ही त्याच्यावर टीका करतो; आम्ही गटेचे मोजमाप नैतिक किंवा राजकीय किंवा "मानवी" परिमाणांनी देखील करत नसतो. गटेचा त्याच्या एकंदर युगाशी असलेला संबंध, त्याचे साहित्यिक पूर्वसूरी व समकालीन यांच्याशी त्याचा असलेला संबंध, त्याच्या विकासाची प्रक्रिया व जीवनातील त्याचे स्थान—यांचे वर्णन करण्यात इथे आम्हाला गुंतवून घेता येत नाही.

गटेचे ग्रंथ हे यांपैकी कोणत्या उपांगांच्या बाबतीत "मानवतेचे खरे संकलन" आहेत, "परिपूर्ति लाभलेली मानवता" आहेत, आणि "मानवी समाजाचा आदर्श" आहेत, हे आपण पाहू.

सर्वप्रथम आपण प्रचलित समाजावरील गटेची टीका विचारात घेऊ आणि नंतर "मानवी समाजाच्या आदर्शाच्या" व्यावहारिक वर्णनाकडे वळू. ग्रुनच्या ग्रंथाचा समृद्ध आशय लक्षात घेतल्यास कोणत्याही क्षेत्रामधील काही वैशिष्ट्यपूर्ण तेजस्वी मुद्यांचाच तेवढा आम्ही समाचार घेणार आहोत हे सांगायला नकोच.

समाजाचा टीकाकार या नात्याने गटे खरोखरीच चमत्कार करून दाखवतो. माणसाच्या ठायी जे वैशिष्ट्यपूर्ण व ठळक आहे, ते सगळे संस्कृती पुसट करून टाकते अशा काही अद्भूतरम्यतावादी तक्रारींना वाचा फोडून तो "संस्कृतीचा धिःक्कार करतो" (पृष्ठ ३४-३६). Prometheus मध्ये tout bennement b असे खाजगी मालमत्तेच्या उगमाचे चित्रण करून तो "भांडवलदारांच्या जगाचे भविष्य वर्तवतो" (पृष्ठ ७८). पृष्ठ २२९ वर तो "जगाचा न्यायनिवाडा करणारा होतो...., तो संस्कृतीचा Minos होतो." परंतु या सगळ्या गोष्टी म्हणजे अगदीच क्षुल्लक प्रकार आहेत.

पृष्ठ २५३ वर हेर ग्रुन Catechisation मधला उतारा देतो :

---

a (पुरवणी खर्चासकट) क्षुल्लक सरबराया.—संपादक

b अगदी साधेपणाने.—संपादक

विचार कर रे माझ्या बाळा! बुद्धी तुज ही कुठुन मिळाली?
तुझ्यातून ती आपोआपच आली असणे शक्यच नाही--
अहो, बाबांनी मज सगळी दिधली.
अन् बाबांना ती दिधली कोणी?--माझ्या आजोबांनी दिधली--
छे छे, तसे नव्हे रे, बाळा,
आजोबांना तुझ्या मिळाली असणारच ती कुणाकडून?--
अहो त्यांनी ती नुसतीच घेतली.

हुर्रे! हेर ग्रुन बेंबीच्या देठापासून आरोळी ठोकतो, la propriete, c'est le vol @ — खुद्द प्रुधाँच! b

Leverrier आपल्या ग्रहासमवेत खुशाल घरी जाऊ शकतो. आपले पदक हेर ग्रुनच्या स्वाधीन करू शकतो—कारण ही Leverrier पेक्षा कसली तरी अधिक मोठी कर्तबगारी आहे, ही कसली तरी जॅकसनच्या पेक्षा आणि त्याच्या सल्फ्यूरिक ईथर फ्यूम्सपेक्षा देखील अधिक मोठी कर्तबगारी आहे; कारण ज्या माणसाने प्रुधाँचा चोरीचा सिद्धान्त संक्षेपाने मांडलेला आहे, हा सिद्धान्त भांडवलदारवर्गाच्या अनेक सदस्यांना खरोखरीच चिंताग्रस्त करणारा आहे, आणि त्या माणसाने हा सिद्धान्त गटेच्या उपरोक्त सूक्तीच्या निरुपद्रवी आकारात सादर केला आहे—त्याबद्दल त्याला एकमेव बक्षीस म्हणजे लेजन ऑफ ऑनरचे ग्रँड कॉर्डन हेच आहे.

Burgergeneral याच्या बाबतीतील अधिक अडचणी आहेत. हेर ग्रुन त्याचे काही काळ प्रत्येक बाजूकडून निरीक्षण करतो. काही संशयास्पद अशा विचित्र मुद्रा करतो, ही गोष्ट त्याच्या बाबतीत नेहमीची नव्हे, आणि मग तो मनाशी म्हणायला लागतो: "खरेच....काहीसे मोघमातले....याचा निष्कर्ष क्रान्तीचा धिक्कार करणे असा निघत नाही" (पृष्ठ १५०). ....थांबा! आता त्याला मुद्दा सापडला! वादाचा विषय काय आहे? दुधाची चरवी[१८४] आणि म्हणून: "आपण हे....विसरू या नको की इथे पुन्हा एकदा मालमत्तेचा प्रश्नच पुढे आणण्यात आला आहे...." (पृष्ठ १५१).

हेर ग्रुन याच्या खिडकीखाली दोन म्हाताऱ्या बाया खारवलेल्या हेरिंग माशाच्या डोक्याबाबत भांडत असतील तर हेर ग्रुन "गुलाबाच्या" व मॅग्नोनेटच्या सुगंधाने दरवळलेल्या आपल्या खोलीतून खाली उतरणे फारसे त्रासदायक कधीच मानणार नाही आणि तो त्यांना देखील असे सांगणार की त्यांच्या बाबतीत देखील "मालमत्तेचा प्रश्नच पुढे आणण्यात आला आहे." योग्य विचार करणाऱ्या सगळ्या लोकांची कृतज्ञता हे त्याला सर्वोत्तम बक्षीस ठरेल.

---

a मालमत्ता म्हणजे चोरी.—संपादक

b पी. जे. प्रुधाँकृत Quest-ce que la propriete? याला अनुलक्षून हा संदर्भ आहे.—संपादक

गटेने Werther लिहून टीकालेखनाचा एक मोठ्यात मोठा पराक्रम केला आहे. Werther ही कोणत्याही प्रकारे एक नुसतीच भावनाविवश प्रेमकथा नाही. ज्यांनी आतापर्यंत गटेचे वाचन "मानवी उपलक्षणातून" केले आहे, त्यांचे असे मत होते, पण तशातला हा प्रकार नाही.

Werther मध्ये "मानवी आशयाला इतका सुयोग्य आकार लाभलेला आहे की जगातल्या कोणत्याही साहित्यातली अशी कोणतीही कृती याच्या शेजारी दूर अंतरावर देखील मांडण्याच्या योग्यतेची सापडणे शक्य नाही." (पृष्ठ ९६). वेर्टरचे लोट्टेविषयीचे प्रेम हे निव्वळ साधन आहे, भावनेच्या जहाल बहुदैवतवादाच्या शोकान्तिकेचे एक वाहन आहे... वेर्टर असा माणूस आहे की त्याच्या पाठीत मणकाच नाही, तो अजून विषय झालेला नाही" (पृष्ठ ९८ [९४]). वेर्टर स्वतःवर गोळी झाडून घेतो तो प्रेमापायी नव्हे, परंतु "कारण तो दुःखी बहुदैवतवादी आत्मा जगाशी जुळते करून घेऊ शकेना." (पृष्ठ ९४). "Werther हा ग्रंथ समाजाच्या एकंदर सडलेल्या अवस्थेचे चित्रण कलात्मक प्रभुत्वानिशी करतो. समाजाच्या अनिष्ट गोष्टी तो त्यांच्या खोलात खोल गेलेल्या मुळांसकट पकडतो, त्यांच्या तात्त्विक-धार्मिक आधारानिशी पकडतो" (हा "आधार" त्या "अनिष्ट गोष्टी"पेक्षा अधिक अलीकडे जन्माला आलेला आहे हे सगळ्यांना ठाऊक आहे), "मोघम आणि धूसर समजुतीनिशी....खऱ्या मानवी स्वभावाच्या शुद्ध, हवेशीर संकल्पना (आणि सगळ्यांत जास्त महत्त्वाची गोष्ट म्हणजे मणका, अहो हेर्र ग्रुन, मणका!) "त्या कंगालपणाच्या अवस्थेचा मृत्यू ठरतील, ज्याला आपण भांडवलदारी जीवन म्हणतो, त्याची वाळवी लागलेली ढासळती अवस्था ठरते!" [पृष्ठ ९५].

"Werther मध्ये समाजाच्या सडक्या अवस्थेचे चित्रण कलात्मक प्रभुत्वानिशी" कसे केलेले आहे, त्याचे एक उदाहरण देतो. वेर्टर लिहितो :

"साहसे? या खुळचट शब्दाचा वापर मी का करतो?....[१८५] आमचे खोटे भांडवलदारी संबंध, ती खरी साहसे आहेत, त्या खऱ्या राक्षसी गोष्टी आहेत!"a

भांडवलदारी वास्तवता आणि या वास्तवतेविषयीचे तितकेच भांडवलदारी भ्रम यांच्या दरम्यानचा फरक बघून या रडक्या भावनाविवश माणसाने चालविलेला हा विलाप, सर्वस्वी अत्यंत साध्या अनुभवाच्या अभावातूनच उद्भवलेला हा भेदरट सुस्कारा, याचे वर्णन हेर्र ग्रुनने पृष्ठ ८४ वर भेदक सामाजिक टीका असे केले आहे. याच्याही पुढे जाऊन हेर्र ग्रुन असे प्रतिपादन करतो, की उपरोक्त शब्दांनी व्यक्त केलेली "ही जीवनाची नैराश्यमय वेदना, गोष्टींना किमानपक्षी वेगळे स्वरूप प्राप्त व्हावे म्हणून त्यांना त्यांच्या डोक्यावर उभ्या करण्याची ही रोगट प्रेरणा" (!) "अखेरीस

---

a जे. डब्ल्यू. गटे, "Briefe aus der Schweiz" (Die Leiden des jungen werthers च्या मुख्य पात्राच्या कागदपत्रांमध्ये सापडलेल्या अशी समजूत करून घेतलेल्या अनेक पत्रांतल्या उताऱ्यांच्या रूपाने लिहिलेली कथा).—संपादक

स्वतःसाठी फ्रेंच राज्यक्रान्तीचा खड्डा खणून घेऊन राहिली.'' जी क्रान्ति अगोदर मॅकियाव्हेलियानिझमची परिपूर्ती होती, ती इथे तरुण वेर्टरच्या क्लेशांची नुसतीच परिपूर्ती होत आहे. प्रेस द ला रेव्होल्यूशनचे गिलोटिन हे वेर्टरच्या पिस्तुलाचे केवळ फिकट अनुकरण आहे म्हणायचे.

त्याच धर्तीवर पृष्ठ १०८ च्या अनुरोधाने हे स्वयंसिद्ध आहे की Stella मध्ये देखील गटे "सामाजिक सामुग्रीचा" परामर्श घेत आहे, मात्र इथे केवळ "अत्यंत लांच्छनास्पद परिस्थितीचे" (पृष्ठ १०७) चित्रण केले आहे. खरा समाजवाद हा आपल्या येशू ख्रिस्ताच्या पेक्षा अधिक उदारमनस्क आहे. कारण जिथे दोघे अथवा तिघे एकत्र जमा होतात—त्यांनी त्याच्या निमित्ताने देखील हे करायची जरूरी नाही—तिथे मग त्यांच्या मध्येच आणि तिथेच "सामाजिक सामुग्री" असते. त्याचा शिष्य हेर्र ग्रुन याच्याप्रमाणेच "त्या प्रकारचा मठ, आत्मसंतुष्ट उचापत्या सगळ्या गोष्टी हाताळतो परंतु कशाचाच तळ गाठत नाही," (पृष्ठ ४७) त्याच्याशी याचा ठळक सारखेपणा सर्वसाधारणपणे असतो.

आमच्या वाचकांना विल्हेल्म मीस्टरने आपल्या मेव्हण्याला a लिहिलेले पत्र बहुधा आठवत असेल. Lehrjahre च्या शेवटच्या खंडात हे पत्र असून सुस्थितीतील असलेल्या कुटुंबात लहानाचे मोठे होण्याविषयीच्या फायद्यांवर त्यात थोडीशी जरा क्षुल्लक टीका केल्यानंतर संकुचित मनोवृत्तीच्या भांडवलदारांपेक्षा सरदार मंडळी बरचढ असल्याचे मान्य केले आहे आणि सध्या यात बदल करणे शक्य नाही या कारणास्तव भांडवलदारांच्या तसेच इतर तगळ्या बिन-सरदारीवर्गाची अंकितपणाची भूमिका मंजूर करण्यात आली आहे. त्यात असे म्हटले आहे की केवळ व्यक्तीच विशिष्ट परिस्थितीत सरदार मंडळीच्या बरोबरीची पातळी गाठायला समर्थ असते. b या संदर्भात हेर्र ग्रुन असा अभिप्राय देतो :

"वरिष्ठ वर्ग हा सुशिक्षित वर्गाचाच समानार्थक असेल तर समाजातील वरिष्ठ वर्गांच्या श्रेष्ठपणाविषयी गटे जे म्हणतो ते सर्वस्वी खरे आहे, आणि गटेच्या बाबतीत हे असेच आहे" (पृष्ठ [पृष्ठ] २६४ [-६५]).

आणि हे प्रकरण तिथेच राहू दे.

आपण बरीच चर्चा झालेल्या मध्यवर्ती मुद्याकडे येऊ या. तो म्हणजे राजकारणाविषयी व फ्रेंच राज्यक्रांतीविषयी गटेची प्रवृत्ती. या बाबतीत हेर्र ग्रुनचा ग्रंथ शेवटपर्यंत टिकून राहू पाहणारा असा घडा उपलब्ध करून देतो. इथे हेर्र ग्रुनची भक्ति चांगलीच कारणी लागते.

---

a वेर्नर.—संपादक

b जे. डब्ल्यू. गटे, Wilhelm Meisters Lehrjahre, Buch 5, Kap. 3 — संपादक.

फ्रेंच राज्यक्रांतीविषयीची गटेची प्रवृत्ती समर्थनीय दिसावी म्हणून गटे अर्थातच क्रांतीच्या वर असायला पाहिजे आणि ती घडून येण्यापूर्वी देखील त्याने हा तिच्यावरचा वरचढपणा गाठला असला पाहिजे. म्हणून आपण पृष्ठ XXI इतक्या अगोदरच्या पानावर अशी माहिती घेतो :

" गटेने आपल्या युगांतील व्यावहारिक विकास आतापर्यंत इतका मागे टाकलेला होता की त्याच्या बाबतीत नकाराचीच प्रवृत्ती, स्वसमर्थनाचीच प्रवृत्ती केवळ आपण धारण करू शकतो असे त्याला वाटले."

आणि पृष्ठ ७४ वर, Werther संबंधात,—आणि हा वेर्टर म्हणजे संपूर्ण क्रान्तीच in nuce @ मूर्त स्वरूपांत आहे हे आपण अगोदरच पाहिलेले आहे—असे म्हटले आहे: " इतिहास १७८९ दर्शवितो, तर गटे १८८९ दर्शवितो." तशाच प्रमाणे पृष्ठे २८ व २९ वर गटेला काही थोड्या संक्षिप्त शब्दांमध्ये " स्वातंत्र्याविषयींचा सगळा आरडा ओरडा जहालपणे बाजूला सारणे" भाग पडते; कारण सत्तरीच्या दशकाइतक्या पूर्वीच्या काळात त्याने Frankfurter Gelcherte Anzeigen मध्ये १८६ एक लेख b प्रसिद्ध करविला होता. या लेखात " हाकाटी करणारे " ज्या स्वातंत्र्याची मागणी करत आहेत त्यांची चर्चा मुळीच केलेली नाही. हा लेख खुद्द स्वातंत्र्याविषयी, स्वातंत्र्याच्या संकल्पनेविषयी, थोडेसे सर्वसाधारण आणि बरेचसे समंजस विचारच तेवढे मांडण्यात गुंतलेला दिसतो. याच्या भरीला ग्रुन पुढे असे सांगतो : ज्या अर्थी गटेने आपल्या पीएचडीच्या प्रबंधात c असा सिद्धान्त मांडला की कायदेमंडळाच्या प्रत्येक सदस्याचे कर्तव्य ईश्वरभक्तीचा विशिष्ट प्रकार चालू करणे हे आहे—हा सिद्धान्त खुद्द गटेच केवळ एक मनोरंजक कोडे असल्याचे मानतो आणि फ्रँकफुर्ट येथील लहान गावातल्या सर्व प्रकारच्या कारकुनी कटकटीतून आपल्याला या सिद्धान्ताची स्फूर्ती मिळाली असे सांगतो (हेर ग्रुन स्वतःच हा उतारा उद्धृत करतो)—याच कारणास्तव "विद्यार्थी गटे याने क्रान्तीच्या एकंदर दुहेरीपणाचा आणि सध्याच्या फ्रेंच राज्याचा त्याग जुन्या बुटांचा त्याग करतात तसा केला" (पृष्ठे २६ व २७). जणू काय ग्रुन याजकडे " विद्यार्थी गटेचे जीर्ण बूट " वारसा हक्काने आले असावेत आणि त्यांचा वापर त्याने आपल्या " सामाजिक चळवळी "च्या सातलीगवाल्या बुटांना तळवे लावण्यासाठी केला असावा असे दिसते.

अर्थात ही गोष्ट आता फ्रेंच राज्यक्रांतीविषयीच्या गटेच्या विधानांवर एक नवा प्रकाश टाकते असे आपल्याला दिसते. आता हे स्पष्ट झालेले आहे की क्रान्तीच्या

@ बीज रूप.— संपादक

b जे. डब्ल्यू. गटे, "Alexander von Jock Uber Belohnung and Strafen nach turkischen Gesetzen".—संपादक

c जे. डब्ल्यू. गटे, "De Legislatoribus"

खूप वर असल्यामुळे, "जुन्या बुटांचा त्याग करतात त्याप्रमाणे त्याने क्रान्तीचा त्याग" केलेला असला तरी," आणि तो क्रान्तीच्या पुढे शंभर वर्षे असल्यामुळे, त्याला तिच्याविषयी कसलीही सहानुभूती असणे शक्य नव्हते आणि "स्वातंत्र्यासाठी आरडा ओरडा करणारांच्या" राष्ट्राविषयी त्याला कसलीही गोडी वाटणे शक्य नव्हते आणि तिच्या बाबतीतला आपला हिशेब त्याने १७७३ इतक्या जुन्या काळातच चुकता केलेला होता. हेर ग्रुनला आता त्या बाबतीत हायसे वाटते. गटे आपल्याकडे वारसा हक्काने आलेले क्षुद्र शहाणपण हव्या तितक्या सुडौल दोन दोन ओळींच्या काव्यपंक्तींमध्ये सादर करो; तो हव्या तितक्या क्षुद्र संकुचित मनोवृत्तीचे त्याच्यावर तात्त्विक भाष्य करो; तो त्याच्या शान्ततापूर्ण कवि-कोषाच्या धोका आणणाऱ्या महान हिमनद्यांपासून हव्या तितक्या मध्यमवर्गीय घास्तीनिशी मागे हटो; तो हव्या तितक्या क्षुद्रपणाचे व लाचारपणाचे वर्तन करो; परंतु त्याचे धीराने समर्थन करणाऱ्या लेखकाच्या लेखी गोष्टी भलत्याच थराला नेल्या जाऊ शकत नाहीत. हेर ग्रुन त्याला आपल्या अथक खांद्यांवर बसवून घेतो आणि त्याला चिखलातून अलगद घेऊन जातो; खरे म्हणजे हा सगळा चिखल तो खऱ्या समाजवादाच्या खाती वर्ग करून टाकतो; गटेचे बूट स्वच्छ राहावेत येवढ्याचीच पक्की तरतूद करायला त्याला हवी असते. Campagne in Frankreich पासून ते Naturliche Tochter पर्यंत हेर ग्रुन सगळ्या गोष्टींची (पृष्ठे १३३-१७०) जबाबदारी, कसलाही अपवाद राहू न देता आपल्याकडे घेतो.

तो येवढी निष्ठा दर्शवितो की ती बघून एखाद्या Buchez च्या डोळ्यांत पाणी यावे. आणि याचा जणू काय काहीच उपयोग होत नाही असे बघून, आणि चिखल जर भलताच खोल असेल तर, अधिक उच्च सामाजिक समर्थन या कार्याला जुंपण्यात येते, मग हेर ग्रुन (पृष्ठ १३७) पुढील काव्य-पंक्तीमध्ये आपला आशय सादर करतो:

फ्रान्सच्या उदास भवितव्याचा
बलिष्ठांनी करावा विचार,
परंतु खरे सांगायचे म्हणजे
खालच्यांनी घ्यावी त्याची अधिक गंभीर दखल.
बलिष्ठ नष्ट झाले; परंतु गर्दीचा बचाव
गर्दीपासून कोण करणार? गर्दी स्वतःच
स्वतःवर जुलूम करते.[१८७]

"बचाव कोण करणार!" असा हेर ग्रुन बेंबीच्या देठापासून ओरडा आरडा करतो; तो शब्दांचे अधोरेखन करतो, प्रश्नचिन्हे घालतो; "भावनेच्या जहाल बहुदैवतवादाच्या शोकान्तिकेच्या सगळ्या वाहनांनिशी" तो आक्रोश करतो, "विशेषेकरून बिनमालमत्तावाल्या जमावाचा बचाव, मालमत्तावाल्या जमावापासून,

कायदे करणाऱ्या बाजारबुणग्यांपासून, कोण करतो ?" (पृष्ठ १३७). हेर्र ग्रुनपासून "विशेषेकरून" गटेचा "बचाव कोण करतो ?"

अशा प्रकारे व्हेनिशियन एपिग्राम्मे यांतील व्यवहारी भांडवलदारी सूक्तींच्या समग्र मालिकेचा खुलासा हेर्र ग्रुन करून दाखवतोः

त्या "हर्क्युलसच्या हाताने श्रीमुखात दिलेल्या थपडीसारख्या आहेत, आणि त्या आता मात्र" (तुच्छतावाद्याच्या लेखी धोका टळल्यावर) "खरोखरी सहिष्णुपणाने चांगल्याच बसलेल्या दिसतात, कारण आम्हाला आता त्यांचा मोठा व कटु अनुभव राहिलेला आहे" (तुच्छतावाद्यांच्या लेखी खरोखरीच कटु) "आमच्या मागे (पृष्ठ १३६).

Belagerung Von Mainz यातून हेर्र ग्रुन

पुढील उतारा काय वाटेल ते झाले तरी ओलांडून पुढे जायला मागणार नाहीः "मंगळवारी....मी घाईघाईने.... महाराजांना अभिवादन करायला गेलो आणि माझे महान सुदैव म्हणजे राजेसाहेबांची....माझ्या सदैव कृपाळू धन्याची सेवा चाकरी करायला मला मिळाली," इत्यादि. [पृष्ठ १४७].

ज्या उताऱ्यामध्ये गटे आपली नम्र भक्ती प्रशियाच्या राजाच्या a जनानखान्याला स्त्रियांचा पुरवठा करणाऱ्या सरदार हेर्र रिएट्झ याच्या चरणी अर्पण करतो, तो उतारा सादर करणे हेर्र ग्रुन याला प्रशस्त वाटत नाही.

Burgergeneral आणि Ausgewandeste[१८८] यांच्या संबंधात आपल्याला हे वाचायला मिळते :

"क्रान्तीविषयीचा गटेचा सगळा द्वेष, ज्या ज्या वेळी तो साहित्यिक स्वरूपात व्यक्त झाला, त्या त्या वेळी त्याचा संबंध, सुस्थितीतल्या आणि चांगल्या सरावातल्या परिस्थितीतील मालमत्तेवरून लोकांची हकालपट्टी झालेली पाहताना स्फुरलेल्या सततच्या विलापाशी होता....ही मालमत्ता कारस्थान्यांनी आणि इसाळखोर कौरे लोकांनी बळकावलेली होती....हाच तो लुटारूपणाचा अन्याय....त्याचा शांततापेमी माणसाळलेला स्वभाव मालमत्तेच्या हक्कावरील या अतिक्रमणावर संतापला; अतिक्रमणाचा हा हल्ला मनमानीपणाने चढविण्यात आल्यामुळे याच्यापायी लोकांचे जथ्थेच्या जथ्थे कंगाल व निर्वासित करण्यात आले. (पृष्ठ १५१).

विशेष तसदी न घेता आपण हा उतारा अशा "माणसाच्या" खाती टाकू या की ज्याचा "शान्ततापेमी, माणसाळलेला स्वभाव" "सुयोग्य व नीट सरावलेल्या," रोखठोकपणे सांगायचे म्हणजे, "मालमत्तेच्या परिस्थितीच्या" चांगल्या कमाईत इतका सुखावतो, की ही sans facon परिस्थिती निपटून काढणारे क्रान्तीचे तुफान म्हणजे "अरेरावी" आणि "कारस्थान्यांचे व इसाळखोर लोकांचे" वगैरे काम असल्याचे तो जाहीर करतो.

---

a फ्रेडरिक दुसरा विल्यम.—संपादक

ही गोष्ट विचारात घेतल्यानंतर Hermann Und Sorothea या भांडवलदारी रम्यकथेत हेर्र ग्रुन याला "अतिशुद्ध आनंद गवसतो" (पृष्ठ १६५) याचे आपल्याला आश्चर्य वाटत नाही. या कथेतले भेकड व्यवहारी लहान-नगर-वासी आणि रडत सुटलेले शेतकरी sansculotte लष्कराला व युद्धाच्या भयानक हाल-अपेष्टांना घाबरून पळ कसे काढतात याचे वर्णन आहे. हेर्र ग्रुन

"अखेरीस....जर्मन जनतेला जी लाचार भूमिका दिलेली आहे ती देखील सुटकेचा निःश्वास सोडून स्वीकारतो :

शोभे न जर्मनाला अग्रस्थळी राहावे, अन् घाबरून पळावे,
घर-सोड ना करावी; ही बाजु वा धरावी, ती बाजु वा धरावी."[१८९]

क्रूर काळाला बळी पडलेल्यांविषयीच्या सहानुभूतीचे अश्रू ढाळणे हे हेर्र ग्रुनचे करणे बरोबर आहे आणि दैवाच्या अशा फटक्यांनी देशाभिमानी नैराश्य आणल्याच्या भरात तो स्वर्गाकडे डोळे लावून बसतो हे त्याचे करणेही बरोबर आहे. तसे पाहिले तर नागवलेले व अधोगतीला गेलेले पुरेसे लोक आहेतच, त्यांच्या हृदयकपाटात "मानवी" अन्तःकरणच नाही, प्रजासत्ताकाच्या गोटात सामील होऊन Marseille हे क्रान्तिगीत गाणे ते अधिक पसंत करतात, आणि बहुधा ते डोरोथीच्या रिकाम्या शयनागारात अश्लील विनोद देखील करतात. हेर्र ग्रुन हा सभ्य माणूस आहे, आणि उदाहरणार्थ, एखादा हेगेल ज्या भावनाशून्यतेने इतिहासाच्या झपाट्यात पायदळी चिरडलेल्या "चिमुकल्या, मुक्या फुलांकडे" तुच्छतेने बघतो आणि "जागतिक इतिहासाच्या कृतींविरुद्ध आणि त्या घडवणाऱ्यांविरुद्ध"[१९०] उभारलेल्या "नम्रता, लीनता, आपल्या बांधवांविषयीची आपुलकी व दातृत्व या खासगी सद्गुणांच्या कर्मकांडाचा उपहास करतो, तिच्यापुढे तो संतापाचे प्रदर्शन करतो." हेर्र ग्रुन याचे हे करणे योग्यच आहे आणि याच्याबद्दल त्याला त्याचे बक्षीस स्वर्गात मिळेल यात शंकाच नाही.

क्रान्तीविषयीच्या या "मानवी" अभिप्रायांचा समारोप आपण पुढीलप्रमाणे करू या. "खऱ्या विनोदी लेखकाला खुद्द कन्व्हेन्शनच कमालीचे हास्यापद आहे असे वाटण्याचे स्वातंत्र्य तो खुशाल घेवो, आणि हा "खरा विनोदी लेखक" सापडेपर्यंत दरम्यानच्या काळात हेर्र ग्रुन आवश्यक त्या सूचना उपलब्ध करून देतो. (पृष्ठे १५१, १५२).

त्याचप्रमाणे क्रान्तीनंतर गटेची जी राजकारणाविषयीची प्रवृत्ती होती तिच्यावर हेर्र ग्रुन काहीसा आश्चर्यकारक प्रकाश पाडतो. याचे फक्त एकच उदाहरण. "माणसाच्या" हृदयात उदारमतवाद्यांविषयी जी सखोल भावना असते तिची माहिती आपल्याला अगोदरच झालेली आहे. या उदारमतवाद्यांची जी खास करून हजेरी घेतल्याखेरीज, मेसर्स वेल्केर, इट्झ्स्टीन आणि त्यांचे खुषमस्कऱ्ये यांच्या नावावर

एक सुस्पष्ट निवेदन चिकटल्याखेरीज, "सर्व काही मानवी असलेल्याच्या कवीला" अर्थातच विश्रांती घेऊ देता कामा नये. निवेदन आमचा "आत्मसंतुष्ट शोधक" Zahme Xenien याच्या पुढील काव्यचरणातून उकरून काढतो (पृष्ठ ३१९):

जे जे काही असे तेच जुने क्षुद्र,
त्याला त्याला जरूर लाभते काही तरी प्रतिष्ठा !
सदान कदा नका राहू नुसतेच एका जागी पाय आपटत,
परंतु काही तरी करा प्रगती !

यावर गटेचा निवाडा : "बहुमताहून अधिक ओंगळवाणे काहीच नसते. कारण त्यात मूठभर बलदंड नेत्यांचा समावेश असतो, त्यात स्वतःची सोय करून घेणाऱ्या लफंग्यांचा समावेश असतो, स्वतःला जुळते करून घेणाऱ्या दुर्बलांचा समावेश असतो आणि आपल्याला काय हवे आहे याची ओझरती सुद्धा कल्पना नसताना मागोमाग चाललेल्या मोठ्या समुदायाचा समावेश असतो,"[१९१]—हा निवाडा तुच्छतावाद्याला शोभेसा आहे; या तुच्छतावाद्याचे अज्ञान आणि संकुचित दृष्टिकोन लहानशा जर्मन संस्थानाच्या संकुचित चतुःसीमेतच असणे शक्य आहे, आणि हेर्र ग्रुनला हा निवाडा म्हणजे "नंतरच्या" (म्हणजे आधुनिक) "सनदशीर राज्यावरील a टीका" आहे असे वाटते.

ही टीका किती महत्त्वाची आहे याचा शोध आपल्याला "उदाहरणार्थ, आपल्या पसंतीच्या कोणत्याही कायदेमंडळात लागेल." (पृष्ठ २६८). हिच्या अनुरोधाने, केवळ अज्ञानापोटीच फ्रेंच चेंबरचे [१९२] "पोट" स्वतःची आणि आपल्यासारख्याची काळजी इतक्या सर्वोत्कृष्ट रीतीने घेते. आणखी काही पृष्ठांनंतर, पृष्ठ २७१ वर, हेर्र ग्रुन याला "जुलै महिन्यातली क्रान्ती" ही "कुमार्गाने जन्माला घातलेली" आहे असे आढळून येते, आणि कितीतरी अगोदर पृष्ठ ३४ वर कस्टम्स युनियन [१९३] वर कडक टीका करण्यात आलेली आहे, कारण ते "सिंहासनाचे आधारस्तंभ (!!) असलेल्यांना, उदारमनस्क द्रव्य-धन्यांना (जे साऱ्या कस्टम्स युनियनमध्ये "सिंहासना" चे विरोधक असल्याचे सगळ्यांना ठाऊक आहे) "अधोगतीला काहीसा अधिक प्रतिकार करणारे व्हावेत म्हणून ते "ज्या चिंध्या कपडे नसलेल्यांना व थंडीत कुडकुडणाऱ्यांना आपली लाज राखण्यासाठी हव्या आहेत त्या चिंध्या याहूनही अधिक महागड्या करून ठेवते." जेव्हा जेव्हा जर्मनीत संरक्षक जकातींचा किंवा अन्य कोणत्याही पुरोगामी भांडवलदारी इलाजाचा सामना करण्याचा प्रश्न उपस्थित होतो तेव्हा तेव्हा "कपडे नसलेल्यांना" व "थंडीत कुडकुडणाऱ्यांना" तुच्छतावादी नेहमीच कसे पुढे करतात हे सगळ्यांना ठाऊक आहे, आणि "माणूस" त्यांच्यात सामील होतो.

---

a मूळ जर्मन भाषेत "Gesetzesstaat" असा शब्द आहे.—संपादक

हेर ग्रुनच्या नजरेने पाहिल्यानुसार गटेची समाजावरील व राज्यसंस्थेवरील टीका "माणसाच्या गाभ्यावर" कोणता प्रकाश टाकते ?

पहिली गोष्ट म्हणजे, पृष्ठ २६४ ला अनुसरून, "माणूस" हा सर्वसाधारणपणे "सुशिक्षित वर्गाविषयी" अत्यंत लक्षणीय असा आदर प्रदर्शित करतो आणि विशेषेकरून उच्च सरदार मंडळींविषयी नजरेत भरण्याजोगा बहुमान प्रदर्शित करतो. आणि नंतर त्याचे वैशिष्ट्य हे आहे की कोणत्याही सामुदायिक चळवळीची आणि कोणत्याही निर्धारयुक्त सामाजिक कृतीची त्याला भयंकर घास्ती वाटते आणि अशी चळवळ सुरू होताच तो एक तर मेकडपणाने आपल्या शेकोटीच्या कोपऱ्यात परत चटदिशी आसरा घेतो किंवा आपली सगळी चीजवस्तू घेऊन पळ काढतो. जोपर्यंत असली चळवळ टिकून असते तोपर्यंत हा त्याच्या लेखी "एक कटू अनुभव" असतो; मात्र ती संपताक्षणी तो रंगभूमीच्या अग्रस्थानी वरचढ पवित्रा घेतो आणि हर्क्युलसच्या हाताने तो तोंडावर अशा थपडा लगावतो, की ज्या त्याला आता मात्र खरोखरीच सुसह्य आवाज करत असलेल्या दिसतात आणि एकंदर प्रकार "कमालीचा हास्यास्पद" असल्याचे त्याला आढळून येते. अणि या सगळ्या काळामध्ये तो "सुयोग्य व सुपरिचित मालमत्तेच्या परिस्थितीशी" मनःपूर्वक इमान राखून राहतो; त्याच्याशिवाय त्याचा फारच "शान्ततापूर्ण आणि माणसाळलेला" स्वभाव असतो, त्याच्या काही एक मागण्या नसतात आणि तो नम्र असतो आणि आपल्या निवांत लहान सहान सुखांना कोणत्याही वादळांची बाधा होऊ नये अशी त्याची इच्छा असते. "माणूस मर्यादित क्षेत्राच्या अंतर्गत सुखी असतो" (पृष्ठ १९१, दुसऱ्या भागाचे पहिलेच वाक्य आहे त्याप्रमाणे); त्याला कुणाचाही हेवा वाटत नसतो, आणि जर त्याला निवांत राहू दिले तर तो आपल्या जन्मदात्या परमेश्वराचे आभार मानतो. थोडक्यात सांगायचे म्हणजे, आपण अगोदरच पाहिले आहे तदनुसार "माणूस" हा जन्माने जर्मन असतो आणि तो क्रमाक्रमाने जर्मन मध्यम वर्गीयाचे तंतोतंत रूप धारण करतो.

हेर ग्रुन याने सादर केल्यानुसार, समाजावरील गटेच्या टीकेचे प्रत्यक्षात सार काय आहे ? "माणसाला" समाजात आक्षेपार्ह असे काय आढळते ? पहिली गोष्ट म्हणजे समाज त्याच्या भ्रमांशी मिळता जुळता नसतो. परंतु हे भ्रम नेमके विचारसरणीत मश्गुल असलेल्या तुच्छतावाद्यांचे भ्रम असतात, त्यातल्या त्यात तरुण तुच्छतावाद्यांचे असतात आणि तुच्छतावादी वास्तवता जर या भ्रमांशी मिळती जुळती नसेल तर याचे कारण म्हणजे ते भ्रम असतात हेच असते. नेमक्या त्याच कारणासाठी हे भ्रम अधिकच पूर्णपणे तुच्छतावादी वास्तवतेशी मिळते जुळते असतात. एखाद्या सर्वसाधारण परिस्थितीची वैचारिक अभिव्यक्ती ही त्या परिस्थितीहून वेगळी असते, तेवढेच हे भ्रम त्या वास्तवतेहून वेगळे असतात आणि म्हणून ते अंमलात आणण्याचा पुढचा प्रश्नच असू शकत नाही. याचे ठळक उदाहरण हेर ग्रुनने Werther वर केलेल्या भाष्यामध्ये उपलब्ध करून दिले आहे.

दुसरी गोष्ट म्हणजे "माणसाचा" टीकेचा रोख जर्मनीच्या तुच्छतावादी राजवटीला जे जे काही धोका आणते त्याच्या त्याच्या विरुद्ध आहे. क्रान्तीविरुद्ध त्याची एकंदर टीका म्हणजे तुच्छतावाद्यांचीच टीका आहे. उदारमतवादी लोक, जुलै क्रान्ति आणि संरक्षक जकाती यांच्याविषयी त्याचा वाटत असलेला द्वेष म्हणजे स्वतंत्र, पुरोगामी भांडवलदाराविरुद्ध दलित, दुर्दम्य मध्यम वर्गीयाला जो द्वेष वाटत असतो, त्याच द्वेषाची सर्वस्वी अचूक अभिव्यक्ती असते. याची आणखी दोन उदाहरणे आपण देऊ या.

हुन्नरसंघाची पद्धती ही मध्यम वर्गीयांच्या भरभराटीच्या कालखंडाची निदर्शक होती हे सर्वश्रुत आहे. पृष्ठ ४० वर, हेर्र ग्रुन हा गटेच्या वतीने बोलतांना, दुसऱ्या शब्दात सांगायचे म्हणजे "माणसाच्या" वतीने बोलताना असे म्हणतो : "मध्ययुगामध्ये हुन्नरसंघाने एका बलदंड माणसाला इतर बलदंड माणसांशी संरक्षक दोस्तीच्या स्वरूपांत एकत्र आणले." त्या काळातले हुन्नरसंघवाले हे "माणसाच्या" दृष्टीनुसार "बलदंड माणसे" आहेत.

परंतु गटेच्या काळात हुन्नरसंघाच्या पद्धतीचा अगोदरच ऱ्हास व्हायला लागलेला होता, स्पर्धा सगळ्या बाजूंनी आत घुसत होती. एक खराखुरा तुच्छतावादी या नात्याने आपल्या आत्मचरित्रातील a एका स्थळी गटे एका हृदयद्रावक आक्रोशाचे प्रदर्शन करतो आणि त्याचा उतारा हेर्र ग्रुन याने पृष्ठ ८८ वर दिलेला आहे. हा आक्रोश आहे मध्यम वर्गामध्ये सुरू झालेल्या सडणुकीविषयी, सुस्थितीतल्या कुटुंबांच्या वाताहतीविषयी, याच्याशी संबंधित असलेल्या कौटुंबिक जीवनाच्या अधोगतीविषयी; कौटुंबिक बंधने शिथिल होत असल्याविषयी, आणि अशाच इतर मध्यम वर्गीय आक्रोशांविषयी सुधारलेल्या देशांमध्ये या आक्रोशांची वासलात त्यांना सुयोग्य अशा तिरस्कारानिशी लावण्यात येते. या उताऱ्यामध्ये हेर्र ग्रनला आधुनिक समाजावरील श्रेष्ठ टीकेचा वास येतो, आणि तो आपल्या आनंदाला जवळजवळ मुळीच आवर न घालता या उताऱ्याचा सगळा "मानवी आशय" त्याने अधोरेखित करून छापून घेतला आहे.

आता आपण गटेच्या ठायी असलेल्या विधायक "मानवी आशयाकडे" वळू या. आता आपण "माणसाचा" मागोवा घेतच आहोत, म्हणून आपण अधिक चटकन् सुरुवात करू शकतो.

सगळ्या गोष्टींच्या अगोदर आपण ही आनंदाची बातमी सांगू या, की "विल्हेल्म मीस्टर आपल्या आईवडिलांचे घर सोडून जातो" आणि Egmont मध्ये "ब्रुसेल्सचे नागरिक खास हक्कांची व स्वातंत्र्यांची मागणी करत आहेत," ती अन्य कोणत्याही कारणासाठी नसून "माणसे होण्यासाठी" करत आहेत (पृष्ठ xvll).

@ J. W. Goethe, Aus meinem Leben, Teil 2, Buch 7.

--संपादक

हेर्र ग्रुनने याच्या पूर्वी एकदा प्रुधाँशी वयस्क गटेची साधर्म्ये शोधून काढली आहेत. पृष्ठ ३२० वर त्याला हा आनंद पुन्हा एकदा लाभलेला आहे.

"आपली व्यक्तिमत्वे वाचविण्यासाठी जे आपल्याला हवे आहे, जे आपणा सर्वांना हवे आहे, ते म्हणजे अराज्यवाद. त्याच्या खऱ्या अर्थानिशी. या विषयाबाबत गटेला जे म्हणायचे आहे ते पुढे दिले आहे:

आता अराज्यवादाचे मज
आधुनिक काळामध्ये
इतुके आकर्षण का असावे ?
हरेक माणूस जगतो आपल्या मतानुसार
अन् याचा लाभ मजला देखिल असे, इत्यादि" १९४

इथे ग्रुन आनंदाने बेभान झालेला आहे. कारण जो अराज्यवाद पहिल्या प्रथम प्रुधाँने जाहीर केला आणि जो जर्मन खऱ्या समाजवाद्यांनी गौरवपूर्वक स्वीकारला तो खराखुरा "मानवी" सामाजिक अराज्यवाद गटेच्या ठायी असल्याचे त्याला आढळून आले. तथापि या वेळी त्याची चूक झालेली आहे. गटे अगोदरच अस्तित्वात असलेल्या "आधुनिक काळातील अराज्यवादाविषयी" बोलत आहे, तो अगोदरच त्याला फायदेशीर "झालेला आहे", आणि त्याला अनुसरून प्रत्येक माणूस आपल्या मतानुसार जगतो, दुसऱ्या शब्दात सांगायचे म्हणजे समाज-संबंधित व्यवहारामध्ये त्याला स्वातंत्र्य असते. हे स्वातंत्र्य सरंजामी पद्धतीच्या आणि हुन्नरसंघांच्या विघटनाने घडवून आणले आहे, भांडवलदार वर्गाच्या उदयाने घडवून आणले आहे आणि सुशिक्षित वर्गाच्या सामाजिक जीवनातून पितृसत्ताक पद्धतीची वगळणूक होण्याने घडवून आणले आहे. म्हणून साध्या व्याकरणात्मक कारणासाठी उच्चतर अर्थाने हेर्र ग्रुनच्या आवडत्या भावी अराज्यवादाचा तिथे कसलाच प्रश्न असू शकत नाही. गटे इथे "त्याला काय हवे होते" याविषयी अजिबात बोलत नाही, परंतु त्याच्या समोवार जे त्याला आढळून आले, त्याच्याविषयी तो बोलत आहे.

परंतु असल्या लहानशा चुकीने आपल्याला अस्वस्थ करू नये. कारण आपल्याकडे Eigentum ही कविता आहेच:

ठावे मजला काहीही मम स्वतःचे नाही
केवळ विचार, जो माझ्या चैतन्यातुन
शान्तपणे स्वतःच झरतो,
आणि सुखाच्या दरेक क्षणाचा,
उदार भवितव्य मला, पूर्णपणे
आस्वाद घ्यावया देते.

या कवितेत "आतापर्यंत अस्तित्वात असलेली मालमत्ता धुरात विरून जाते" (पृष्ठ ३२०), असे जर स्पष्ट होत नसेल तर हेर्र ग्रुनचे आकलन इथेच थांबून राहिले आहे.

परंतु हेर्र ग्रुनची ही मनोरंजक लहान सहान शब्दकोशात्मक विषयांतरे त्यांच्या नशिबावरच सोपवून देऊ या. तसे म्हटले तर ती खूपच आहेत, आणि त्यातले प्रत्येक याहूनही आश्चर्यकारक अशा इतरांकडे नेत राहते. यापेक्षा आपण आपला "माणसाचा" शोध पुढे चालू ठेवणे अधिक बरे.

"माणूस हा मर्यादित क्षेत्रात सुखी असतो" हे आपण वाचलेले आहेच. तसाच तुच्छतावादी असतो.

"गटेच्या लेखी रोजच्या घडामोडी देखील परकीय वस्तू होतात, त्या एक तर त्याच्या भांडवलदारी सुखांमध्ये भर तरी घालतात किंवा त्यातून त्या बाद तरी होतात, आणि त्या त्याच्या ठायी मानवी आस्था जागृत करतील असा संभव असतो. परंतु त्या राजकीय आस्था जागृत करतील असा संभव कधीही नसतो" (पृष्ठ २०).

हेर्र ग्रुनला "अशा प्रकारे एका गोष्टीच्या बाबतीत मानवी आस्था सापडते," मात्र ती गोष्ट "एक तर त्याच्या मानवी सुखांमध्ये भर घालते किंवा त्यातून ती बाद होते" असे त्याला दिसत असेल तरच. इथे हेर्र ग्रुन शक्य तितक्या उघडपणे कबूल करतो की भांडवलदारी सुखे ही "माणसाच्या" लेखी मुख्य गोष्ट असते.
Faust आणि Wilhelm Meister यांच्यावर खास प्रकरणे लिहायची संधी हेर्र ग्रुनला उपलब्ध होते. प्रथम आपण Faust घेऊ या.

पृष्ठ ११६ वर आपल्याला असे सांगण्यात येते :

"वनस्पतींच्या संघटनेचे रहस्य सांगणारा मुद्दा गटेला सापडला या एकाच गोष्टीने" त्याला "मानवतावादी माणसाचे चित्रण पूर्ण करायला" समर्थ केले. (कारण "मानवी" माणसाला टाळायचा "गटेच्या आरंभीच्या रचना शुद्ध सामाजिक" (म्हणजे मानवी) स्वरूपाच्या होत्या....जे जास्तीत जास्त तात्कालिक, लहानात लहान, जास्तीत जास्त घरगुती होते, त्याला गटे चिकटून राहिला." (पृष्ठ ८८).

"माणसाविषयी" आपल्याला ज्या पहिल्या विधायक गोष्टीचा शोध लागतो, ती म्हणजे मध्यम वर्गीयाच्या "लहानात लहान, घरगुती" निवांत जीवनात त्याला आनंद वाटतो, ही.

हेर्र ग्रुनने केलेल्या संक्षेपानुसार गटे म्हणतो, की "जर आपल्याला जगामध्ये असे स्थळ सापडू शकेल, की जिथे आपल्या मालकीच्या वस्तूसह आपल्याला आराम करता येईल, आपल्याला अन्न उपलब्ध करून देणारे एक शेत असेल, आपल्याला आसरा देणारे एक घर असेल--म्हणजे आपल्यासाठी ही पितृभूमीच नव्हे काय?"

आणि हेर्र ग्रुन उद्गारतो :

"आणि हे शब्द आजचे आपले अत्यंत सखोल विचार कसे प्रदर्शित करतात बरे!" (पृष्ठ ३२).

मूलतः "माणूस" redingote a la proprietaire हा पोशाख केलेला असतो आणि त्या योगे तो पक्का epicier असल्याचे स्वतःच उघड करून दाखवितो.

जर्मन भांडवलदार फार फार झाले तर एका क्षणापुरताच, त्याच्या तरुणपणी, स्वातंत्र्यासाठी झपाटलेला असतो हे सर्वश्रुत आहे. "माणसाचे" देखील तेच वैशिष्ट आहे. गटे आपल्या उत्तरायुष्यात "स्वातंत्र्याच्या प्रेरणेचा" कसा "धिक्कार करतो" याचा निर्देश हेर्र ग्रुन पसंतीनिशी करतो. ही स्वातंत्र्याची प्रेरणा "स्वतंत्र व वाईट वळण लागलेल्या मुलाची पैदास" जो गोट्झ, त्याला अजूनही जाणवत असते. गटेच्या मेकड स्वातंत्र्यत्यागाचे वर्णन हेर्र गुनने पृ.४३ वर सविस्तर उद्धृत केले आहे. स्वातंत्र्याचा अर्थ हेर्र गुन कसा लावतो याचे अनुमान त्याच उताऱ्यावरून निघू शकते. त्या उताऱ्यात त्याने फ्रेंच राज्यक्रांतीचे स्वातंत्र्य हे गटेच्या स्विट्झर्लंडमधील प्रवासाच्या वेळच्या स्वतंत्र स्विस लोकांच्या स्वातंत्र्यासारखेच असल्याचे म्हटले आहे. दुसऱ्या शब्दात सांगायचे म्हणजे हे स्वातंत्र्य आधुनिक, सनदशीर व लोकशाहीवादी स्वातंत्र्य असते, त्यात मध्ययुगीन बादशाही शहरांतल्या वरिष्ठ वर्गीयांचा व हुन्नर संघाचा वरचष्मा असतो. आणि विशेषेकरून आपल्या पर्वतातील पशुपालक टोळयांच्या प्राचीन जर्मन बर्बरतेचा वरचष्मा असतो. बर्न येथील ओबरलँडच्या मॉन्टानार्ड्सचे[१९५] नाव देखील नॅशनल कन्व्हेन्शनच्या मॉन्टानार्ड्सच्या नावासारखेच असते!

प्रतिष्ठित भांडवलदार हा धर्माच्या बाबतीतील सगळ्या स्वैराचाराचा व धर्माच्या विडंबनाचा कट्टर वैरी असतोः "माणूस" देखील तसाच असतो. या विषयाबाबत विविध प्रसंगी गटेने खरोखरीच्या भांडवलदारी धर्तीचे मतप्रदर्शन केले असेल तर हेर्र ग्रुन याला "गटेच्या मानवी आशयाचे" आणखी एक उपांग असे मानतो. आणि हा मुद्दा अगदी विश्वसनीय करण्यासाठी तो हे सुवर्णकण एकत्र करतो इतकेच नव्हे, तर पृष्ठ ६२ वर त्यात तो स्वतःच्या अनेक सद्गुणसंपन्न भावनांची भर देखील घालतो. तो म्हणतोः "जे लोक धर्माचे विडंबन करतात....ते पोकळ भांडी असतात आणि बावळट असतात," इत्यादि. "माणूस" आणि भांडवलदार या नात्याने त्याच्या भावनांना याचे भरपूर श्रेय मिळते.

भांडवलदार "त्याची भक्ती असलेल्या राजा" शिवाय, त्याला प्रिय असा त्याच्या देशाचा पिता असल्याशिवाय जगूच शकत नाही. तसाच "माणूस" ही जगू शकत नाही. याच कारणास्तव पृष्ठ १२९ वर कार्ल ऑगस्ट हा गटेच्या लेखी "अत्यंत उत्कृष्ट संस्थानिक" आहे. वृद्ध हेर्र ग्रुन १८४६ साली अजूनही अत्यंत उत्कृष्ट संस्थानिकाविषयी उत्साह दर्शवितो!

@ वाणी – संपादक.

एखादी घडामोड ज्या अंशाने भांडवलदाराच्या खासगी परिस्थितीवर थेट प्रभाव पाडते, त्याच अंशाने तिच्यात त्याला गोडी वाटते.

"गटेच्या लेखी रोजच्या घडामोडीदेखील परकीय वस्तू होतात आणि या वस्तू एक तर त्याच्या भांडवलदारी सुखसोईंमध्ये भर तरी घालतात किंवा त्यांत उणीवा तरी ठेवतात, आणि त्यांच्यामुळे त्यांच्या ठायी सौंदर्यविषयक किंवा मानवी आस्था जागृत होण्याचा संभव असतो, परंतु राजकीय आस्था जागृत होण्याचा संभव कधीही नसतो." (पृ. २०).

हेर्र ग्रुनला "अशा प्रकारे वस्तूमध्ये मानवी आस्था सापडते," मात्र ती "एक तर त्याच्या भांडवलदारी सुखसोईंमध्ये भर तरी घालते किंवा त्यांत उणीवा ठेवते" हे जर त्याच्या ध्यानात आले तरच ती सापडते. इथे हेर्र ग्रुन शक्य तितक्या उघडपणे कबूल करतो की भांडवलदारी सुखसोई या "माणसाच्या" लेखी मुख्य गोष्ट असतात.

फाऊस्ट आणि विल्हेल्म मीस्टर हे खास प्रकरणासाठी हेर्र ग्रुनला निमित्त उपलब्ध करून देतात. आपण फाऊस्ट प्रथम विचारात घेऊ या.

पृष्ठ ११६ मध्ये आपल्याला सांगण्यात येते :

"गटेला वनस्पतींच्या संघटनेचे रहस्य उलगडणारे गमक गवसले आणि केवळ या वस्तुस्थितीनेच" त्याला "मानवतावादी माणसाचे चित्रण परिपूर्ण करायला समर्थ केले (कारण "मानवी" माणसापासून पळ काढायचा कोणताच मार्ग उपलब्ध नाही) "म्हणजे फाऊस्ट. कारण फाऊस्टला त्याच्या स्वभावाच्या शिखरावर आणून ठेवण्यात आले आहे" (!) "निसर्गविज्ञानाने जितके आणून ठेवले आहे तितकेच."

तो "मानवतावादी माणूस" म्हणजे हेर्र ग्रुन याला "त्याच्या स्वभावाच्या शिखरावर निसर्गविज्ञानाने कसे आणून ठेवले आहे" याची उदाहरणे आपल्याला अगोदरच मिळालेली आहेत. ही गोष्ट या वंशाच्या अंगभूतच आहे असे आम्ही म्हणतो.

त्यानंतर पृष्ठ २३१ वर आपल्याला असे ऐकायला मिळते की पहिल्या प्रवेशातील "पशूंच्या व मानवी सांगाड्यातील हाडे" ही "आपल्या एकंदर जीवनाच्या अमूर्त रूपांची" निदर्शक आहेत—आणि हेर्र ग्रुन सर्वसाधारणपणे Faust म्हणजे जणू काय धर्मशास्त्रज्ञ सेंट जॉन याचा दिव्य देखावाच आपल्यासमोर उभा आहे तशाच नेमक्या प्रकारे त्याची संभावना करतो. स्थूल वस्तू "हेगेलियन तत्त्वज्ञानाची" निदर्शक आहे, आणि गटे हा प्रवेश ज्या वेळी लिहीत होता १९६ (१८०६) त्या वेळी हे तत्त्वज्ञान हेगेलच्या केवळ डोक्यातच होते किंवा फार झाले तर, phanomenology या ग्रंथाचे लेखनकार्य तो करत होता म्हणून हे त्याच्या हस्तलिखितात होते. कालानुक्रमाला "मानवी आशयाशी" काय करायचे आहे?

मरणोन्मुख पवित्र रोमन साम्राज्याचे जे चित्रण Faust च्या दुसऱ्या भागात आहे (पृष्ठ २४०) त्याच्याविषयी हेर्र ग्रुन अधिक तसदी न घेता अशी कल्पना करतो की हे चौदाव्या लुईच्या राजेशाहीचे चित्रण आहे. याच्या भरीला तो असे सांगतो की " यामध्ये आपल्याला आपोआपच राज्यघटना आणि प्रजासत्ताक ही मिळतात ! " " माणसाला " साहजिकच " त्याच्या परीने " सर्व काही " असतेच; " इतर लोकांना मात्र श्रम व प्रयत्न करून हे स्वतःसाठी प्रथम उपलब्ध करून घ्यावे लागते.

पृष्ठ २४६ वर हेर्र ग्रुन आपल्याला विश्वासात घेऊन सांगतो की Faust चा दुसरा भाग, त्याच्या शास्त्रीय उपांगाच्या बाबतीत, " आधुनिक काळाचा सिद्धान्त " झालेला आहे, ज्याप्रमाणे डान्टेचे Divine Comedy हे महाकाव्य म्हणजे मध्ययुगाचा सिद्धान्त होता तसा." ही गोष्ट आपण निसर्गविज्ञानवेत्त्यांकडे सोपवू ; त्यांनी आतापर्यंत Faust च्या दुसऱ्या भागात फारच अल्प शोधून काढले आहे; आणि इतिहासकारांकडे सोपवू, त्यांनी फ्लॉरेन्सच्या या महाकवीच्या घिब्बेलाइन-वादी १९७ महाकाव्यात " मध्ययुगाच्या सिद्धान्ता " हून काही तरी निराळे शोधून काढले आहे ! जणू असेच दिसत आहे की गटेने पृष्ठ ४९ वर म्हटले आहे त्याप्रमाणे. ज्या डोळ्यांनी आपल्या स्वतःच्या पूर्वकाळाकडे पाहिले, त्याच डोळ्यांनी हेर्र ग्रुन इतिहासाकडे पाहत आहे. " इटलीमध्ये गटेने आपला पूर्वकाळ बेल्व्हेडियर अपोलोच्या डोळ्यांनी पाहिला," आणि या डोळ्यांच्या ठायी pour comble de malheur@ मुळी बुबुळेच नाहीत. Wilhelm Meister हा " कम्युनिस्ट " आहे, म्हणजे ' तत्त्वविचाराच्या दृष्टीने, सौंदर्यविषयक दृष्टिकोनाच्या आधारावर." (! !) (पृष्ठ २५४.)

भरवसा फारसा धरतो तो न कशाचा
अन् तरीही अवघे जग हे आहे हो त्याचेच.[१९८] (पृष्ठ २५७).

अर्थात, त्याच्याजवळ पुरेसा पैसा आहे, आणि जग त्याच्या मालकीचे आहे, तसे ते प्रत्येक भांडवलदाराच्या मालकीचे असतेच, यासाठी त्याला " सौंदर्यवादी दृष्टिकोनाच्या आधारावर कम्युनिस्ट " होण्याची तसदी घ्यायची जरूरी नसते.--या ज्या " न कशाचा " वर विल्हेल्म मीस्टर एवढा मोठा भरवसा ठेवतो ते, आपण पृष्ठ २५६ वर पाहतो तदनुसार, खरोखरीच विस्तृत आणि अत्यंत भरीव असे " न कशाचा " असते, नशेनंतरच्या झापडीदेखील नष्ट करण्यात आलेल्या असतात. हेर्र ग्रुन " मद्याचा प्रत्येक कप शेवटच्या थेंबापर्यंत रिता करतो, त्याचा त्याच्यावर काहीएक गैर परिणाम होत नाही, डोकेदुखी होत नाही. " " माणसाच्या " लेखी हे अधिकच चांगले, तो आता बिनधास्तपणे मद्यदेवतेची पूजा निर्वांतपणे करायला मोकळा होतो. या सगळ्या गोष्टी ज्या दिवशी घडून येतील त्या दिवसासाठी दरम्यान हेर्र ग्रुन याने अगोदरच " खऱ्या माणसासाठी " मद्याचे गाणे शोधून काढले आहे—

@ अखेरचे दुर्दैव म्हणजे. -- संपादक

ते म्हणजे भरवसा फारसा धरतो मी न कशाचा. "—हे गाणे मानव जातीने आपल्याला शोभेशा रीतीने आपल्या व्यवहारांची व्यवस्था लावली असेल तेव्हा गाइले जाईल; परंतु हेर्र ग्रुन याने त्या गाण्याचा संक्षेप तीन कडव्यांमध्ये केलेला आहे आणि तरुणांना व " माणसाला " सोईस्कर नसलेले भाग त्यातून काढून टाकलेले आहेत.

W(ilhelm) M(eister) मध्ये गटे

" मानवजातीचा आदर्श " उभा करतो. " मानव हा शिकविता नव्हे, परंतु जिवंत, क्रियाशील व निर्मितिक्षम प्राणी आहे." " विल्हेल्म मीस्टर हा तो माणूस." " माणसाचा गाभा म्हणजे क्रियाशीलता " (या गाभ्याची भागीदारी तो कोणत्याही माशीशी करतो), पृष्ठे २५७, २५८, २६१.

शेवटची गोष्ट म्हणजे Wahlverwandtschaften. ही कादंबरी तिच्या परीने पुरेशी नैतिक आहेच आणि हेर्र ग्रुन याने तिचे अधिकच नैतिकीकरण केले आहे, म्हणजे जवळ जवळ असे दिसते की जणू काय ही कादंबरी तरुणीच्या शाळांसाठी सोइस्कर पाठ्यपुस्तक म्हणून लावून घ्यायची शिफारस करायच्या तो बेतात होता. हेर्र ग्रुन असा खुलासा करतो की गटे

"प्रेम आणि विवाह यांच्या दरम्यान फारक करत असे, म्हणजे त्याच्या लेखी प्रेम हा विवाहाचा शोध होता आणि विवाह ही सापडलेल्या प्रेमाची परिपूर्ती होती." (पृष्ठ २८६).

मग या हिशेबाने प्रेम म्हणजे " सापडलेल्या प्रेमाचा " शोध असतो. याचा आणखी अधिक खुलासा असा करण्यात आलेला आहे की " तारुण्यसुलभ प्रेमाच्या स्वातंत्र्यानंतर " विवाह हा " प्रेमाचा अंतिम नातेसंबंध " म्हणून घडून आलाच पाहिजे (पृष्ठ २८७). नेमक्या याच प्रमाणे सुधारलेल्या देशांमध्ये शाहणा पिता प्रथम आपल्या पुत्राला काही वर्षे स्वैराचार करायला मोकळीक देतो आणि नंतर " अंतिम नातेसंबंध " म्हणून त्याच्यासाठी एक सोईस्कर पत्नी शोधून काढतो. तथापि सुधारलेल्या देशांतील लोकांनी हा " अंतिम नातेसंबंध " म्हणजे काही तरी नैतिकदृष्ट्या बंधनकारक मानायचा हा टप्पा फार पूर्वीच ओलांडलेला आहे, आणि याच्या उलट त्या देशांमध्ये पती रखेल्या ठेवतो आणि त्याची पत्नी स्वैराचार करून त्याचा सूड घेते. पुन्हा एकदा हेर्र ग्रुनचा बचाव तुच्छतावादी करतो.

" माणसाला जर खरोखरीच खुली पसंती असती....जर दोन व्यक्तींनी आपले मीलन आपल्या परस्पर बुद्धिनिष्ठ इच्छांवर आधारलेले असते (इथे वासना, शरीर यांचा निर्देश मुळीच नाही) " तर हा नातेसंबंध क्षुल्लक म्हणून उधळून लावणे हीं गोष्ट मानायला स्वैराचाराचा दृष्टिकोन लागेल. म्हणजे गटेने जसे एवढे यातनाकारक व सुखविघातक मानले तसे न मानणे. परंतु गटेच्या बाबतीत स्वैराचाराचा मुळी प्रश्नच असू शकत नाही." (पृष्ठ २८८).

हा उतारा म्हणजे हेर ग्रुन अधूनमधून नैतिकतेविरुद्ध भीत भीत टीका करायची मोकळीक स्वतःला देतो तिला आवर घालणारा आहे. या तुच्छतावाद्यांच्या हे ध्यानात आलेले आहे की तरुण पिढीच्या वर्तनाकडे दुर्लक्ष करणे भाग पडायला तसेच सबळ कारण आहे, म्हणजे नेमके तेच अत्यंत बदफैली तरुण लोक नंतर सर्वोत्तम पती होतात. परंतु विवाहानंतर पुन्हा जर ते गैरवर्तन करायला लागले, तर मग त्यांना दया माया नाही; कारण तसे करायला "स्वैराचाऱ्याच्या दृष्टिकोनाची जरूरी लागेल."

"स्वैराचाऱ्याचा दृष्टिकोन!" "स्वैराचारवाद!" आपण "माणसाचे" पूर्णाकृती चित्र आपल्या समोर उभे करू शकतो. त्याने आपल्या छातीवर हात ठेवलेला आहे आणि अभिमानाने ओसंडून जाऊन तो उद्‌गारतोः नाही! मी शुद्ध आहे! सर्व प्रकारच्या स्वैरपणातून मी मुक्त आहे! मी "अविवाहितेशी संबंध ठेवलेला नाही आणि बदफैलीपणा केलेला नाही." मी कधीही जाणूनबुजून संतुष्ट विवाहाच्या सौख्यात बिब्बा घातलेला नाही, मी सदैव इमानदारीचे व प्रामाणिकपणाचे पालन केले आहे आणि माझ्या शेजाऱ्याच्या पत्नीवर कधीही कामुक नजर ठेवलेली नाही—मी मुळीच "स्वैराचारी" नाही!

"माणसाचे" बरोबर आहे. सुंदर स्त्रियांशी प्रेमाचे व्यवहार करणाऱ्यांपैकी तो नव्हे. त्याने आपले मन कधीही फुसलावणीकडे व व्यभिचाराकडे वळविलेले नाही; तो "स्वैराचारी" मुळीच नाही, परंतु तो सदसद्विवेकबुद्धीला स्मरून वागणारा, सन्माननीय, सद्‌गुणी जर्मन तुच्छतावादी आहे. तो आहे,

....L'epicier pacifique,
Fumant sa pipe au fond de sa boutique;
Il craint sa famme et son ton arrogant,
De la maison signe obeit sons mot dire
Et vit ainsi cocu, battu, content. @
(Parny, Goddam, chant III.)

आपल्या दुकानाच्या पिछाडीला चिलीम ओढत असलेला;
त्याला त्याच्या बायकोची भीती वाटते,
तिच्या दरडावणीच्या स्वराची भीती वाटते;
घराचा कारभार तो तिच्यावर सोपवतो,
एक शब्दही न बोलता तो तिच्या नुसत्या इशाऱ्यावर नाचतो;
असा तो जगतो, बायकोचे जारकर्म सोसत,
तिचा मार खात आणि संतुष्ट राहात.

—संपादक

@ ....शान्ततापिय दुकानदार,

आम्हाला एकच मुद्दा मांडायला राहतो. आम्ही जर वर सांगितल्याप्रमाणे गटेच्या एकाच उपांगाचा विचार केला असेल, तर तो अपराध एकट्या हेर ग्रुन याचाच आहे. तो गटेची उत्तुंग प्रतिभा मुळी सादरच करत नाही. ज्या कलाकृतींच्या बाबतीत गटे खरोखरीच महान व प्रतिभाशाली होता, म्हणजे "स्वैराचारी" गटेचे Romische Elegien, यांजसारख्यांच्या बाबतीत एक तर तो घाईघाईने वरवरची पाहणी करतो, किंवा तो क्षुल्लक गोष्टींच्या महान लोंढ्यात त्यांना वाहवत नेतो, म्हणजे तो त्यांचे काहीच करू शकत नाही हेच केवळ सिद्ध होते. उलट पक्षी त्याच्या लेखी जो असामान्य उद्योग आहे, त्याच्या योगाने तो तुच्छतावादाचे, क्षुद्र अहंपणाचे व संकुचित मनोवृत्तीचे प्रत्येक उदाहरण शोधून काढतो, त्यांची सरसानिरसता ठरवतो, खरोखरीच्या साहित्यिक हमालाच्या धर्तीवर त्यांचे अतिशयोक्तिपूर्ण वर्णन करतो, आणि आपल्या स्वतःच्या संकुचित मनोवृत्तीच्या मतांना गटेकडून दुजोरा शोधतो आणि तो सापडताक्षणी प्रत्येक वेळी तो हर्षभरित होतो, आणि अशा प्रकारे याच्याही पुढे जाऊन तो अनेकदा गटेलाच विकृत स्वरूप देतो.

ज्या ज्या वेळी इतिहास गटेच्या सन्मुख झाला त्या त्या प्रत्येक वेळी गटेने त्याच्याकडे दुर्लक्ष केले. म्हणून इतिहासाने त्याच्यावर जो सूड घेतला, तो मात्र मेन्झेलचे भुंकणेही नव्हते किंवा बोर्नेची संकुचित टीकाही नव्हती. ही दोन्हीही नव्हती.

पऱ्यांच्या जादूमय भूमीमाजी जसा
टिटानियाला निज बाहुपाशी
निक बॉटम गवसला तसा. १९९

तसा एका सकाळी गटेला हेर ग्रुन आपल्या बाहुपाशात गवसला. हेर ग्रुनची क्षमायाचना, प्रत्येक तुच्छतावादी शब्दागणिक तो गटेला तोतऱ्या शब्दात देत असलेले हार्दिक धन्यवाद, हाच अत्यंत कडवट शब्दांतला सूड नाराज इतिहास या सर्वश्रेष्ठ जर्मन कवीवर घेऊ शकला आहे.

तथापि हेर ग्रुन मात्र "आपण माणूस असण्याच्या आपल्या भवितव्याला काळिमा फासलेला नाही हे ध्यानी आणून आपले डोळे मिटून घेऊ शकतो."

फ्रेडरिक एन्गल्स, कवितेतला व गद्यातला
जर्मन समाजवाद

मार्क्स आणि एन्गल्स, संकलित ग्रंथ, खंड ६ वा,
मॉस्को, १९७६, पृष्ठे २४९, २५६-७३



हायने

१

ज्याप्रमाणे फ्रान्समध्ये अठराव्या शतकात, त्याचप्रमाणे जर्मनीत एकोणिसाव्या शतकात, तत्त्वज्ञानात्मक क्रान्तीने राजकीय क्रान्तीची नांदी म्हटली. परंतु या दोन क्रान्त्या किती तरी वेगळ्या दिसल्या! फ्रेंचांनी सगळ्या सरकारी विज्ञानाविरुद्ध, धर्म-पीठाविरुद्ध आणि अनेकदा राज्यसंस्थेविरुद्ध उघड सामना दिला; त्यांचे लेखन सरहद्दीपलीकडे हॉलंडमध्ये किंवा इंग्लंडमध्ये छापण्यात आले, आणि अनेकदा ते स्वतः बास्टिलच्या तुरुंगात कैद होण्याचा धोका होता. उलट पक्षी, जर्मन हे प्राध्यापक होते, युवकांचे सरकारनियुक्त शिक्षक होते; त्यांचे लेखन सरकार-मान्य पाठ्य-पुस्तकांच्या स्वरूपात होते, आणि एकंदर विकासाची अंतिम पद्धती—हेगेलियन पद्धती— हिला तर, जणू काय, राज्याच्या राजेशाही प्रशियन तत्त्वज्ञानाच्या दर्जापर्यंत वर चढविण्यात आले. या प्रोफेसरांच्या, त्यांच्या दुर्बोध विद्वत्ताप्रचुर शब्द-समुच्चयांच्या, त्यांच्या जडजंबाल कंटाळवाण्या वक्तव्यांच्या, पाठीमागे क्रान्तीला लपता आले असेल हे शक्य होते काय? जे लोक त्या वेळी क्रान्तीचे प्रतिनिधी मानले जात असत, म्हणजे उदारमतवादी लोक, तेच लोक नेमके या मेंदूत गोंधळ माजविणाऱ्या तत्त्वज्ञानाचे अत्यंत कडवे विरोधक नव्हते काय? परंतु जे सरकारलाही दिसले नाही आणि उदारमतवाद्यांनाही दिसले नाही, ते १८३३ इतक्या अव्वल काळात किमान एका माणसाला दिसले, आणि हा माणूस म्हणजे खरोखरी दुसरा तिसरा कोणी नसून हाइनरिख हायने २०० हाच होता.

फ्रेडरिक एन्गल्स, लुडविग फॉयरबाख आणि अभिजात जर्मन तत्त्वज्ञानाचा अन्त
मार्क्स आणि एन्गल्स, निवडक ग्रंथ, खंड ३ रा,
मॉस्को, १९७३, पृष्ठ ३३७.

२

त्यांच्या खेरीज, सगळ्या हयात जर्मन कवींमध्ये सर्वश्रेष्ठ असा हाइनरिख हायने हा आमच्या पक्षात सामील झालेला आहे आणि याने राजकीय कवितांचा संग्रह प्रसिद्ध केलेला आहे, या संग्रहात काही कवने समाजवादाचा प्रचार करणारी देखील आहेत. सुप्रसिद्ध सिलेशियन विणकरांचे गाणे या गाण्याचा लेखक हाच आहे. या गाण्याचे गद्यात्मक भाषांतर मी तुम्हाला सादर करतो, परंतु मला असे भय वाटते की हे भाषांतर इंग्लंडमध्ये महापाप मानले जाईल. ते काहीही असो, मी तर

ते तुम्हाला सादर करतोच आहे आणि एवढा एकच अभिप्राय देऊन ठेवतोय की या गाण्यात १८१३ सालातील प्रशियनांच्या युद्ध-घोषणेचा निर्देश आहे— "राजासाठी आणि पितृभूमीसाठी, देवाच्या समवेत!" ही घोषणा तेव्हापासून राजनिष्ठ पक्षाची आवडती म्हण झालेली आहे. परंतु गाणे तर हे असे आहे :[२०१]

"तयांच्या उग्र नेत्रात
अश्रुचा टिपुसही नाही
मागाशी बसुन राहिलेले
मुखावरि निराशेचा उद्वेग;
"अम्हि हाल सोशिले, भुके राहिलो
बहुत बहुत काळ
हे जुन्या जर्मनी, तव कफनासाठी
अम्हि कापड हे विणतो
अन् तिहेरी शाप देउनी विणतो,
"अम्हि विणतो, अम्हि विणतो!

"पहिला शाप अमुचा देवाला, या आंधळ्या बहिऱ्या देवाला,
या देवावरि अम्हि विसंबलो, जशी मुले विसंबति
आपल्या पितयावरी
अम्हि धरली याची आशा अन् तयावरि
भरवसाहि ठेवला
परि विटंबना अमुची त्याने केली, आम्हास फसविले त्याने
"अम्हि विणतो, अम्हि विणतो!

"दुसरा शाप अमुचा त्या धनिक राजाला,
आमुचे दुःख पाहुनी न द्रवले हृदय तयाचे
आमुची पै अन् पै हा राजा
सक्तीने वसूल करतो
अन् धाडितो सैनिक अपुले आम्हावरि गोळ्या झाडाया
कुत्र्यावरि झाडतात तैशा
" अम्हि विणतो, अम्हि विणतो!

आमुचा शाप त्या खोट्या पितृभूमीला
ती अम्हास दुःखच देते, ती अम्हा लाज आणते
इथे अम्हि सोसले हाल, झालो कंगाल, भुकेने मेलो,
हे जुन्या जर्मनी, तव कफनाचे कापड विणतो अम्हि
"अम्हि विणतो, अम्हि विणतो!"

हे गाणे याच्या मूळ जर्मन स्वरूपात माझ्या माहितीतल्या अत्यंत सामर्थ्यशाली गाण्यांमध्ये गणना होणारे आहे. या गाण्यासमवेत मी तुमचा या वेळी निरोप घेतो. आमच्या पुढच्या प्रगतीविषयीचा व सामाजिक साहित्याविषयीचा अहवाल मी लवकरच धाडू शकेल अशी मला आशा वाटते.

फ्रेडरिक एन्गल्स, "जर्मनीतील कम्युनिस्ट"
इंग्रजीत लिहिलेला लेख,
न्यू मॉरल वर्ल्ड,
तारीख १३ डिसेंबर १८४४

३

आपल्या तुच्छतावादी जर्मन पब्लिकविषयी[२०२] हायने पुढील उद्‌गारांपेक्षा अधिक तिरस्काराने बोलू शकला नाही : "प्रस्तुत लेखक शेवटी आपल्या पब्लिकला सरावतो, जणू काय तो समजंस प्राणी असल्याप्रमाणे सरावतो."

फ्रेडरिक एन्गल्स, "भांडवल, खंड ३ रा याची पुरवणी"
कार्ल मार्क्स, भांडवल, खंड ३ रा, मॉस्को, १९७४, पृष्ठ ८९४.

४

प्रिय मित्रा,

उद्या तुला भेटायला मला वेळ मिळेल अशी मी आशा धरून आहे, माझे जाणे सोमवारसाठी [२०३] निश्चित झाले आहे.

प्रकाशक लेस्के नुकताच मला भेटायला आला होता. तो डार्मस्टाड्ट येथील एक बिन-सेन्सॉर केलेले त्रैमासिक [२०४] प्रसिद्ध करतो. एन्गल्स, हेस्स, हेर्वेध, जुंग इत्यादि आणि मी त्यात लिहितो. त्याने मला तुझ्याकडे लिहिण्यासाठी शब्द टाकायची विनंती केलेली आहे, कविता म्हणा किंवा गद्य म्हणा. तू नकार नक्कीच देणार नाहीस, कारण आपण स्वतःला जर्मनीत प्रस्थापित करून घेण्यासाठी प्रत्येक संधीचा उपयोग करून घेतला पाहिजे.

ज्यांना सोडून देणे मला भाग पडत आहे, त्या सगळ्यांमध्ये हायनेचा निरोप घेणे मला सगळ्यात जास्त जड जात आहे. तुला माझ्याबरोबर घेऊन जाणे मला फार

फार आवडेल. माझ्याकडून व माझ्या पत्नीकडून तुला आणि तुझ्या सुपत्नीला प्रेमळ शुभेच्छा.

तुझा
कार्ल मार्क्स

मार्क्स यांचे हाइनरिख हायने यास पत्र,
तारीख १२ जानेवारी १८४५
मार्क्स/एन्गल्स, वेर्के, खंड २७ वा, १९६५,
पृष्ठ ४३४

५

मत्प्रिय हायने,

हे पत्र घेऊन येणारे एक मनमिळावू व सुसंस्कृत रशियन श्री. आन्नेकोव तिकडून पुढे जात आहेत म्हणून या वस्तुस्थितीचा फायदा घेऊन मी तुला माझ्या शुभेच्छा धाडत आहे.

काही दिवसांपूर्वी मला तुझ्याविरुद्ध एक छोटेसे बदनामीकारक प्रकरण चुकून सापडले—बोर्ने याची त्याच्या निधनानंतर प्रसिद्ध झालेली पत्रे. ही पत्रे उघड करून दाखवितात तसा तो बेचव, क्षुद्र आणि पाणचट असेल असा मला कधीच विश्वास वाटला नसता आणि गुट्झ्कौने लिहिलेला ताजा कलम वगैरे म्हणजे कसला क्षुद्र कचरा आहे तो. तू बोर्नेविषयी[२०५] लिहिलेल्या पुस्तकावर मी एका जर्मन नियतकालिकात सविस्तर समीक्षण लिहिणार आहे. तुझ्या पुस्तकाची ख्रिश्चन-जर्मन गादवानी जशी मूर्खपणाची संभावना केली तिच्याहून अधिक मूर्खपणाची संभावना कोणत्याही साहित्यिक कालखंडामध्ये सापडणे जवळ जवळ अशक्य आहे, आणि खरे म्हणजे कोणत्याही जर्मन साहित्यिक कालखंडात मूर्खपणाचा मुळीच तुटवडा नाही.

तुला जर तुझ्या पुस्तकाविषयी मला काही "खास" सांगायचे असेल, तर ते काम मात्र ताबडतोब कर.

तुझा
कार्ल मार्क्स

मार्क्स यांचे हाइनरिख हायनेला पत्र
अंदाजे तारीख ५ एप्रिल १८४६
मार्क्स/एन्गल्स, वेर्के, खंड २७ वा, १९६५, पृष्ठ ४४१

६

हायने झपाट्याने खचत आहे. पंधरवड्यापूर्वी मी त्याला भेटलो, त्याला नर्व्हस झटका येऊन तो अंथरुणात पडून होता. काल तो उठून बसला पण त्याला फारच अशक्तता आलेली होती. त्याला धड मिंतीला टेकून चार पावलेही चालता येत नाहीत, तो कसाबसा खुरडत खुरडत आरामखुर्चीतून बिछान्यापर्यंत आणि परत तसाच जातो-येतो. याच्या मरीला त्याच्या घरात गोंगाट चाललेला असतो, सुतार काम, घणाचे घाव इत्यादि, त्याच्यामुळे त्याला वैताग येतो. मानसिक दृष्ट्या देखील तो तितकासा ठीक नाही. हाइन्झेन त्याला भेटायला मागत होता, परंतु त्याला येऊ दिले नाही.

एन्गल्स यांचे मार्क्स यांना पत्र,
तारीख १४ जानेवारी १८४८
मार्क्स/एन्गल्स, वेर्के, खंड २७ वा, १९६५,
पृष्ठ ११०.

"तरुण जर्मनी"

१८३०२०६ सालातील घडामोडींच्या योगाने साऱ्या युरोपभर जी राजकीय खळबळ माजलेली होती तिचा प्रभाव जर्मन साहित्यावर देखील पडलेला होता. त्या काळातले बहुतेक सगळे लेखक रासबट सनदशीरवादाचा किंवा त्याहून रासबट प्रजासत्ताकवादाचा प्रचार करत होते. त्या वेळी, विशेषेकरून कनिष्ठ दर्जाच्या साहित्यिकांना, आपल्या लेखनातील हुशारीची उणीव भरून काढण्यासाठी राजकीय संदर्भ द्यायची अधिकाधिक सवय लागलेली होती आणि हे संदर्भ वाचकांचे लक्ष हमखास वेधून घेत असत. कविता, कादंबरी, समीक्षण, नाट्य, प्रत्येक साहित्यिक कलाकृती जिला "प्रवृत्ती" म्हणत असत तिने ओतप्रोत भरलेली असे, म्हणजे कमी-अधिक प्रमाणांत तीत सरकार-विरोधी बाण्याचे भीत भीत प्रदर्शन असे. १८३० नंतर जर्मनीत विचारांच्या गोंधळाचे जे अभिराज्य चाललेले होते त्याला परिपूर्णता आणण्यासाठी राजकीय विरोधाच्या या घटकांच्या जोडीला नीट न पचविलेले जर्मन तत्त्वज्ञानाचे विद्यापीठीय स्मरणाचे प्रकार आणि चुकीचा समज करून घेतलेले फ्रेंच समाजवादाचे वेचे विशेषेकरून सेंट-सायमनवाद, यांचे मिश्रण असे; आणि विचारांच्या या पंचमेळ खिचडीचा खुलासा करून राहिलेला लेखकांचा गट स्वतःला आगाऊपणाने "तरुण जर्मनी" किंवा "आधुनिक पंथ" म्हणवून घेत असे. त्यानंतर त्यांना

आपल्या तारुण्यसुलभ पापांचा पश्चात्ताप झालेला असला तरी त्यांनी आपल्या लेखन-शैलीत सुधारणा केलेली नाही.

फ्रेडरिक एन्गल्स, जर्मनीतील क्रान्ति आणि प्रतिक्रान्ती
मार्क्स आणि एन्गल्स, निवडक ग्रंथ,
खंड १ ला, मॉस्को, १९७३, पृष्ठ ३०९.

अलेक्झांडर जुंग

शेवटी लेखक सुरुवातीपासूनच ज्या गोष्टीचा आटापिटा करत होता ती गोष्ट म्हणजे तरुण जर्मनी, त्याच्यापर्यंत येऊन ठेपतो. त्याच्या लेखी तो म्हणजे "आधुनिकाचा" सर्वोच्च आविष्कार असतो. तो बोर्नेपासून सुरुवात करतो. प्रत्यक्षात तरुण जर्मनीवर बोर्नेचा प्रभाव तेवढा मोठा नाही; मूनट्स आणि कूहने तर म्हणत असत की त्याला वेड लागले आहे; लॉबे त्याला फाजील लोकशाहीवादी, फाजील आग्रही मानत असे, आणि केवळ गुट्झ्कौ आणि विएन्बर्ग यांच्यावर तेवढा त्याचा अधिक सातत्याने प्रभाव पडलेला होता. विशेषेकरून गुट्झ्कौवर बोर्नेचे बरेच मोठे ऋण आहे. बोर्नेचा सगळ्यात जास्त मोठा प्रभाव म्हणजे राष्ट्रावर त्याची छाप होती. राष्ट्राने त्याचे ग्रंथ पवित्र वस्तू म्हणून जपून ठेवले आणि १८३२ ते १८४० या धामधुमीच्या काळात त्यांच्यापासून सामर्थ्य आणि पाठिंबा मिळविला. Briefe aus paris २०७ या ग्रंथाच्या लेखकाचे खरे सुपुत्र नव्या, तत्त्वज्ञानी उदारमतवाद्यांच्या रूपाने उदयास येईपर्यंत हे चालू राहिले. बोर्नेच्या प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष प्रभावाच्या अभावी हेगेल-पासून सुरू झालेली स्वतंत्र प्रवृत्ती साकार होणे किती तरी अधिक कठीण गेले असते. त्या वेळी जे काही करायला हवे होते ते एवढेच होते की हेगेल आणि बोर्ने यांच्या दरम्यानच्या विचारांचे गाळ साठलेले मार्ग साफ करणे, आणि ते काही तितकेसे कठीण नव्हते. हे दोघे पुरुष वरकरणी दिसत होते त्यापेक्षा एकमेकांच्या अधिक निकट होते. बोर्नेचा रोखठोकपणा व निरोगी दृष्टिकोन म्हणजे हेगेलच्या जे मनात होते, किमान-पक्षी तत्त्वविचारिकदृष्ट्या मनात होते, त्याची व्यावहारिक बाजू असल्याचे सिद्ध झाले. साहजिकच हेर्र जुंग हे देखील बघत नाही. आता हे खरेच आहे की त्याच्या लेखी बोर्ने हा काही प्रमाणात एक आदरणीय व्यक्ती आहे, किंबहुना एक इज्जतवान माणूस आहे, त्या परिस्थितीत ही गोष्ट खूपच मौल्यवान आहे हे उघड आहे; त्याच्या अंगी वादातीत गुण होते, तसे ग्रहुधा वार्महागेन व पूक्लर यांच्या अंगीही आहेत, आणि विशेषेकरून तो चांगली नाट्यसमीक्षा लिहीत असे, परंतु तो पिसाट आणि दहशतवादी होता. आणि अशांच्या तावडीतून परमेश्वर आमची सुटका करो! जो माणूस केवळ आपल्या विचारपद्धतीच्या योगाने आपल्या काळाचा ध्वज-धारक झाला,

त्याच्या बाबतीत असली पाणचट, भेकड संकल्पना करण्याचा धिःक्कार असो ! हा जुंग सर्वंकष संकल्पनेतून तरुण जर्मनी व गुट्झ्कौचे व्यक्तिमत्व यांची रचना करू इच्छितो, आणि हा बोर्नेसारख्या साध्या व्यक्तिमत्त्वाचे आकलन करायला देखील असमर्थ ठरतो; बोर्नेच्या अत्यंत सखोल अंतरंगातून कसे अनिवार्यपणे व तर्कसंगतपणे अत्यंत अतिरेकी, अत्यंत जहाल विचार प्रकट होतात हे याला दिसत नाही. बोर्ने हा त्याच्या खुद्द स्वभावानुसारच प्रजासत्ताकवादी होता, तसेच अशा माणसाच्या लेखी Briefe aus Paris याचे लेखन फाजील कडक शब्दात झालेले नाही, हे याला दिसत नाही. किंवा एखादा स्विस माणूस अगर उत्तर अमेरिकन माणूस राजेशाही राज्यांविषयी बोलत असलेला हेर्र जुंग याने कधी ऐकलेलाच नाही काय ! आणि "जीवनाचा विचार केवळ राजकीय दृष्टिकोनातून" करण्याबद्दल बोर्नेला दोष कोण देईल ! हेगेल तेच नाही का करत ! त्याच्या लेखी देखील राज्यसंस्था ही जागतिक इतिहासात तिचे संक्रमण होत असताना, आणि म्हणून अन्तर्गत व परराष्ट्रीय घोरणाच्या परिस्थितीत ती सर्वंकष चैतन्याचे व्यावहारिक वास्तव नसते काय ! आणि हास्यास्पद गोष्ट म्हणजे--हेगेलच्या अधिक व्यापक दृष्टिकोनाची परिपूर्णता लाभलेला आणि अत्यंत आश्चर्यकारक रीतीने त्याच्याशी मिळता जुळता असलेला बोर्नेचा हा थेट, बालसुलभ दृष्टिकोन समोर असताना तरी देखील हेर्र जुंग असा निष्कर्ष काढतो की बोर्नेने "राजकारणाची व जनतेच्या सुखाची पद्धति रूपरेखेच्या स्वरूपांत मांडली," म्हणजे ही एक प्रकारची अमूर्त, धूसर संकल्पना होती आणि त्याच्या मते तिच्यातून बोर्नेच्या एकांगीपणाचा व हट्टीपणाचा उलगडा झालाच पाहिजे ! बोर्नेचे महत्त्व, त्याचा पोलादी, दुर्दम्य स्वभाव, त्याची प्रभावी इच्छाशक्ति यांची काडीइतकीही कल्पना हेर्र जुंगला नाही आणि याचे नेमके कारण हेच आहे की हेर्र जुंग हा स्वतःच एक क्षुद्र, नरम दिलाचा, असहाय्य, लाचार असा प्राणी आहे. व्यक्तिमत्व या दृष्टीने बोर्ने हा जर्मन इतिहासांत अपूर्व आहे, हे त्याला ठाऊक नाही; बोर्ने हा जर्मन स्वातंत्र्याचा ध्वज-धारक होता, त्याच्या काळातील जर्मनीतला तो एकमेव खंदा माणूस होता, हे त्याला ठाऊक नाही; चार कोटी जर्मनांच्या विरुद्ध उभा ठाकणे आणि विचाराच्या अधिराज्याची ग्वाही फिरविणे याचा अर्थ काय याची तो कल्पनाच करू शकत नाही; बोर्ने हा नव्या युगाचा जॉन द बॅप्टिस्ट आहे, आणि तो आत्मसंतुष्ट जर्मनांना पश्चात्तापाचा उपदेश करतो आहे आणि त्यांना सांगतो आहे की झाडाच्या मुळाशी कुऱ्हाड अगोदरच उगारलेली आहे आणि आणखी एक अधिक सामर्थ्यशाली असा पुरुष येईल आणि तो आगीचा बाप्तिस्मा देईल, खळ्यातून निर्घृणपणे भुसकट झाडून काढील, हे त्याला समजू शकत नाही. आपण स्वतःच या भुसकटाचा एक भाग आहोत हे हेर्र जुंगने पाहायला हवे. शेवटची गोष्ट म्हणजे हेर्र जुंग आपल्या आवडत्या तरुण जर्मनीपर्यंत दाखल होतो आणि हाइनेवर सुसह्य परंतु फाजील तपशीलवार टीका आरंभतो. मागाहून इतरांचा आळीपाळीने ऊहापोह करण्यात येतो, प्रथम

लॉबे, मून्ड्ट, आणि कूह्ने, नंतर विएन्बार्ग, या विएन्बार्गला त्याच्या योग्यतेनुसार आदरांजली वाहण्यात येते, आणि शेवटी जवळ जवळ ५० पृष्ठे गुट्झ्कौसाठी खर्ची घातलेली आहेत. पहिल्या तिघांची नेहमीची juste-milcau संभावना केलेली आहे, त्यांच्याविषयी बरीचशी पसंती दर्शविलेली आहे आणि त्यांची फारच माफक निंदा केलेली आहे; विएन्बार्गला निश्चित प्राधान्य देण्यात आलेले आहे, परंतु त्याच्या वाट्याला फक्त चारच पृष्ठे देण्यात आली आहेत; आणि शेवटची गोष्ट म्हणजे, निर्लज्ज लाचारपणाने, गुट्झ्कौ याला "आधुनिका"चा ध्वज-धारक करण्यात आले आहे, त्याची प्रतिमा हेगेलियन संकल्पनांच्या योजनेनुसार रचण्यात आलेली आहे आणि त्याला पहिल्या रांगेतील व्यक्तिमत्वाचा बहुमान देण्यात आलेला आहे.

एखाद्या तरुण उदयोन्मुख लेखकाने असे निवाडे सादर केले असते, तर आपण त्या गोष्टीकडे दुर्लक्ष केले असते; असे अनेक लोक आहेत की जे तरुण साहित्याविषयी आशा धरून असतात आणि अपेक्षित भावी काळावर नजर ठेवून त्याच्या ग्रंथांचा विचार एरव्ही त्यांना जेवढा समर्थनीय वाटू शकला असता त्याच्यापेक्षा अधिक उदारपणाने करणारे असतात. विशेषेकरून जर्मन विचाराच्या विकासाचे अलीकडील टप्पे ज्याच्या मनाने पार केलेले आहेत अशा कोणाही माणसाला केव्हा ना केव्हा तरी मून्ड्ट, लॉबे किंवा गुट्झ्कौ यांच्या ग्रंथांविषयी खास आवड वाटली असली पाहिजे. परंतु तेव्हापासून या प्रवृत्तीपलीकडील प्रगती भलतीच तडफदारपणाने झालेली आहे, आणि तरुण जर्मनांपैकी बहुतेकांचा पोकळपणा भयंकर प्रमाणात उघड झालेला आहे.

तरुण जर्मनीने धामधुमीच्या काळातल्या अस्पष्टपणातून स्वतःची सुटका करून घेतली, परंतु त्याला स्वतःलाच या अस्पष्टपणाची बाधा होऊन राहिली. जे विचार त्या काळी जनतेच्या मनात अजूनही आकारहीन व अविकसित स्वरूपात खदखदत होते आणि जे केवळ त्या नंतरच्या काळातच तत्त्वज्ञानाच्या मदतीने जाणीवपूर्वक ध्यानात घेण्यात आले, त्यांचा वापर तरुण जर्मनीने कल्पनेचा खेळ खेळण्यासाठी केला. म्हणूनच खुद्द तरुण जर्मनांच्या मध्येच मोघमपणा, संकल्पनांचा गोंधळ बोकाळला. आपल्याला काय हवे आहे हे गुट्झ्कौ व विएनबार्ग यांना अधिक चांगले ठाऊक होते, लॉबे याला सगळ्यात कमी ठाऊक होते; कूह्ने याच्या ठायी हेगेलचा काही अंश दिसत होता आणि त्याने योजना व वर्गीकरणे केली. परंतु विचाराचा सर्वसाधारण अस्पष्टपणा असताना त्यांतून मौल्यवान असे काहीच निष्पन्न होऊ शकले नाही. इंद्रियगम्यतेच्या समर्थनाचा विचार हायनेच्या उदाहरणाचा मागोवा घेत रास-वट आणि उथळ रीतीने मनात आणण्यात आला; उदारमतवादी राजकीय तत्त्वे विविध व्यक्तिमत्वांमध्ये वेगवेगळी होती आणि स्त्रियांच्या भूमिकेच्या बाबतीत अत्यंत निरर्थक व गोंधळलेले वाद उद्भवले. आपली भूमिका अन्य व्यक्तीच्या बाबतीत काय आहे हे कोणालाच ठाऊक नव्हते. या लोकांच्या विरुद्ध विविध सरकारांनी जे इलाज अमलात आणले त्यांचे कारण देखील त्या काळातला सार्वत्रिक

गोंधळ हेच होते. या मतांचा प्रचार ज्या अंकलातून स्वरूपात करण्यात येत होता त्याच्या योगाने आणखी अधिक गोंधळालाच प्रेरणा मिळू शकली. तरुण जर्मनांच्या ग्रंथाचा बाह्य झगझगाट, त्यांची विनोदी, बोचक, चुरचुरीत शैली, मुख्य घोषणांना देण्यात आलेले रहस्यमय गूढवादी स्वरूप आणि त्यांच्या प्रभावाखालील साहित्यिक नियतकालिकांतून येणाऱ्या टीकेचे व जिवंतपणाचे पुनरुज्जीवन, यांच्या योगाने तरुण जर्मन्स लवकरच अधिक तरुण लेखकांच्या मोठ्या समुदायाला आकर्षित करून राहिले आणि लवकरच, विएन्नार्ग हा अपवाद म्हणून बगळल्यास त्यांच्यापैकी प्रत्येकाला त्याचे स्वतःचे अनुयायी मिळाले. जुन्या मिसमिशीत ललित साहित्याला तरुण-शक्तींकडून आलेल्या दडपणापुढे नामोहरम व्हावे लागले आणि "तरुण साहित्याने" या जिंकलेल्या क्षेत्राचा तावा घेतला, ते वाटून घेतले,—आणि या विभाजनाच्या ओघात त्याचे विघटन झाले. अशा प्रकारे तत्त्वाचा अपुरेपणा उघडकीस आला. त्या सगळ्यांच्या एकमेकाविषयी चुकीच्या समजुती झाल्या. तत्त्वे विलयाला गेली; आता राहिले केवळ व्यक्तिमत्त्वांचे प्रकरण. गुट्झ्कौ किंवा मून्ड्ट, असा प्रश्न उपस्थित झाला. नियतकालिकाची पृष्ठे गटांच्या कारवाया, कटकटी आणि निरर्थक वाद यांनी भरभरून येत राहिली.

फ्रेडरिक एन्गल्स, "अलेक्झांडर युंग,
'आधुनिक जर्मन साहित्यावरील व्याख्याने,'"
मार्क्स आणि एन्गल्स, संकलित ग्रंथ, खंड २ रा,
मॉस्को, १९७५, पृष्ठे २८८-९१

जर्मन, किंवा "खरा" समाजवाद

१

फ्रान्सचे समाजवादी व कम्युनिस्ट साहित्य, सत्ताधारी भांडवलदारांच्या दडपणाखाली उदयास आलेले साहित्य आणि या सत्तेच्या विरुद्ध चाललेल्या लढ्याची अभिव्यक्ति असलेले साहित्य,—हे साहित्य अशावेळी जर्मनीत रूढ झाले, की ज्या वेळी त्या देशातील भांडवलदारांनी सरंजामी अरेरावीविरुद्ध आपला संघर्ष नुकता कुठे सुरू केलेला होता.

जर्मन तत्त्वज्ञान्यांनी, भावी तत्त्वज्ञान्यांनी, beaux esprits श्रेष्ठ बुद्धिमंतांनी उत्सुकतेने हे आत्मसात केले, परंतु ज्या वेळी हे लेखन फ्रान्समधून जर्मनीत स्थलान्तरित झाले, त्या वेळी त्यांच्या समवेत फ्रेंच सामाजिक परिस्थिती जर्मनीत स्थलान्तरित झाली नाही, या गोष्टीचा मात्र या अभ्यासकांना विसर

पडला. जर्मन सामाजिक परिस्थितीच्या संपर्कात आल्यावर हे फ्रेंच साहित्य आपले तात्कालिक व्यावहारिक महत्त्व हरवून बसले, त्याने केवळ साहित्यिक उपांग धारण केले. अशा प्रकारे, अठराव्या शतकातील जर्मन तत्त्वज्ञान्यांना, पहिल्या फ्रेंच राज्यक्रान्तीच्या मागण्या या सर्वसाधारणपणे "व्यावहारिक बुद्धीच्या" मागण्या वाटत होत्या, आणि क्रान्तिकारक फ्रेंच भांडवलदारांच्या इच्छेची वक्तव्ये, ही त्यांच्या दृष्टीने शुद्ध इच्छेच्या नियमांची निदर्शक होती, सर्वसाधारणपणे खऱ्याखुऱ्या मानवी इच्छेची निदर्शक होणे जिला भाग होते अशा इच्छेच्या नियमांची निदर्शक होती.

जर्मन साहित्यिकांचे काम म्हणजे या नव्या फ्रेंच विचारांचा मेळ आपल्या प्राचीन तत्त्वज्ञानात्मक सदसद्विवेकबुद्धीशी घालणे एवढेच होते, किंवा याहून अधिक म्हणजे, आपला स्वतःचा तत्त्वज्ञानात्मक दृष्टिकोन न सोडता हे फ्रेंच विचार सामील करून घेणे एवढेच होते.

एखादी परकीय भाषा जशी सामील करून घेण्यांत येते, म्हणजे भाषांतराच्या योगाने सामील करून घेण्यांत येते, त्याच रीतीने हे सामिलीकरण घडून आले.

प्राचीन बिनख्रिस्ती धर्मज्ञांचे अभिजात ग्रंथ ज्या हस्तलिखितांमध्ये लिहिण्यात आलेले होते, त्यांच्या वरच कॅथोलिक संतांची मूर्खपणाची चरित्रे ख्रिस्ती साधू लिहीत असत हे सर्वश्रुत आहे. जर्मन साहित्यिकांनी पाखंडी फ्रेंच साहित्याच्या बाबतीत या प्रक्रियेला उलट रूप दिले. त्यांनी आपला तत्त्वज्ञानविषयक मूर्खपणा मूळ फ्रेंच साहित्याच्या खाली लिहिला. उदाहरणार्थ, पैशाच्या आर्थिक कामगिऱ्यांवरील फ्रेंच टीकेच्या खाली त्यांनी "मानवजातीचे अलगीकरण" असे लिहिले आणि भांडवलदारी राज्यसंस्थेवरील फ्रेंच टीकेच्या खाली त्यांनी "सर्वसाधारणाच्या कक्षेची पदच्युति" असे लिहिले, इत्यादि.

फ्रेंच ऐतिहासिक टीकांच्या पाठीशी रूढ केलेल्या या तत्त्वज्ञानात्मक शब्द-योजनांना ते "कृतीचे तत्त्वज्ञान", "खरा समाजवाद", "समाजवादाचे जर्मन शास्त्र", "समाजवादाचे तत्त्वज्ञानात्मक आधार" इत्यादि नावे देत राहिले.

अशा प्रकारे फ्रेंच समाजवादी आणि कम्युनिस्ट साहित्य संपूर्णपणे खच्ची करण्यात आले आणि जर्मन माणसाच्या हाती एका वर्गाचा संघर्ष दुसऱ्या वर्गाशी व्यक्त करण्याचे साधन म्हणून ते राहिले नाही म्हणून आपण "फ्रेंच एकांगीपणावर" मात केल्याची त्याला जाणीव आली; खऱ्या गरजांचे प्रतिनिधित्व नव्हे, तर सत्याच्या गरजांचे प्रतिनिधित्व करण्याची त्याला जाणीव आली; कामगारवर्गाच्या हितसंबंधांचे प्रतिनिधित्व नव्हे, तर मानवी स्वभावाच्या, सर्वसाधारणपणे माणसाच्या हितसंबंधांचे प्रतिनिधित्व करण्याची त्याला जाणीव आली; असा माणूस, की जो कोणत्याही वर्गाचा नाही, ज्याला वास्तवता नाही, जो तत्त्वज्ञानात्मक रचनेच्या धुकट साम्राज्यांतच केवळ अस्तित्वात आहे.

या जर्मन समाजवादाने आपली शाळकरी कामगिरी इतक्या गंभीरपणाने व पवित्र भावनेने मनावर घेतली आणि आपल्या कंगाल विचारसंग्रहाचा एवढ्या विदूषकी धर्तीवर गौरव केला, की दरम्यानच्या काळात क्रमाक्रमाने तो आपला विद्वत्ताप्रचुर निरागसपणा घालवून बसला.

सरंजामी सरदारशाहीविरुद्ध आणि एकतंत्री राजेशाहीविरुद्ध जर्मन भांडवलदारांचा आणि त्यातल्या प्रशियन भांडवलदारांचा लढा, दुसऱ्या शब्दांत सांगायचे म्हणजे उदारमतवादी चळवळ ही अधिक कळकळीची झाली.

याच्या योगाने फार पूर्वीपासून हवी असलेली संधी "खऱ्या" समाजवाद्यांना उपलब्ध झाली. ती संधी म्हणजे राजकीय चळवळीच्या पुढ्यात समाजवादी मागण्या मांडणे; उदारमतवादाविरुद्ध प्रातिनिधिक सरकारविरुद्ध, भांडवलदारी स्पर्धेविरुद्ध, भांडवलदारी मुद्रणस्वातंत्र्याविरुद्ध, भांडवलदारी कायदेकानूविरुद्ध व भांडवलदारी स्वातंत्र्याविरुद्ध व समतेविरुद्ध पारंपारिक टीकांचा वर्षाव करण्याची संधी आणि या भांडवलदारी चळवळीपासून बहुजनसमाजाला कसलाही लाभ नाही आणि त्याचे सगळे नुकसानच आहे असे बहुजनसमाजाला समजावून सांगण्याची संधी. जर्मन समाजवाद ऐन वेळी हे विसरला की ज्या फ्रेंच टीकेचा हा मूर्खपणाचा प्रतिध्वनी होता, त्या टीकेमध्ये आधुनिक भांडवलदारी समाजाचे अस्तित्व गृहीत धरलेले होते, जीवनाची तदनुषंगिक आर्थिक परिस्थिती गृहीत धरलेली होती आणि तिला मिळतीजुळती अशी राजकीय राज्यघटना गृहीत धरलेली होती; म्हणजे जर्मनीतील आगामी लढ्याचे उद्दिष्ट ज्या गोष्टी साध्य करणे हे होते, त्याच गोष्टी गृहीत धरलेल्या होत्या.

एकतंत्री सरकारे व त्यांचे धर्मगुरू, प्राध्यापक, ग्रामीण सरदार व अधिकारी या सगळ्यांना हा धमकी देणाऱ्या भांडवलदारांविरुद्ध स्वागतार्ह बुजगावणे म्हणून कामी आला.

नेमक्या त्याच वेळी जर्मन कामगारवर्गाच्या उठावांना याच सरकारांनी फटके मारून व गोळ्या झाडून अशा कडू गोळ्यांचे डोस दिल्यानंतरचा हा गोड शेवट होता.

हा "खरा" समाजवाद अशा प्रकारे जर्मन भांडवलदारांशी लढण्याचे हत्यार म्हणून सरकारांच्या कामी आला आणि त्याच वेळी त्याने एका प्रतिगामी हितसंबंधाचे प्रतिनिधित्व केले, हा म्हणजे जर्मन तुच्छतावाद्यांचा हितसंबंध. जर्मनीमध्ये मध्यम वर्ग हा सोळाव्या शतकाचा अवशेष आहे आणि तेव्हापासून निरनिराळ्या रूपांनी हा सतत डोके वर काढत असतो आणि सध्याच्या परिस्थितीचा हाच खरा सामाजिक आधार आहे.

हा वर्ग टिकवून ठेवणे म्हणजे जर्मनीतील सध्याची परिस्थिती टिकवून ठेवणे होय. भांडवलदारांचे औद्योगिक व राजकीय वर्चस्व त्याच्या हमखास नाशाची धमकी देत आहे; एका अंगाने, भांडवलाचे केन्द्रीकरण; दुसऱ्या अंगाने क्रान्तिकारक कामगारवर्गाचा उदय; या दोहोकडून त्याच्या हमखास नाशाची धमकी दिली जात

आहे. "खरा" समाजवाद हे दोन पक्षी एकाच दगडाने मारणार असे दिसत होते. एखाद्या साथीच्या रोगासारखा त्याचा प्रसार झाला.

कल्पना तरंगांच्या जळमटांचा झगा, त्याच्यावर अलंकारिक भाषेच्या फुलांचे भरतकाम, रोगट भावनांच्या दव्यामध्ये भिजून निघालेला--अशा या समाधियोगाच्या झग्यात जर्मन समाजवादाने आपली केवळ चर्म व अस्थि या स्वरूपात असलेली क्षुद्र "चिरंतन सत्ये" गुंडाळून ठेवलेली असून, असल्या जनतेमध्ये त्यांच्या मालाची विक्री अजब प्रकारे वाढवायला याचा उपयोग झाला.

आणि जर्मन समाजवादाने आपल्या परीने मध्यमवर्गीय तुच्छतावाद्याचा बढाईखोर प्रतिनिधी म्हणून आपला स्वतःचा व्यवसाय अधिकाधिक प्रमाणात ओळखून घेतला आहे.

याने जर्मन राष्ट्र हे आदर्श राष्ट्र म्हणून जाहीर केले आहे आणि जर्मन मध्यमवर्गीय तुच्छतावादी हा नमुनेदार माणूस म्हणून जाहीर केला आहे. या आदर्श माणसाच्या प्रत्येक दुष्ट नीचपणाला त्याने गुप्त भसा उच्चतर समाजवादी अर्थ दिला. त्याच्या खऱ्या स्वरूपाच्या नेमका उलट अर्थ दिला. कम्युनिझमच्या "पाशवी विनाशकारी" प्रवृत्तीला थेट विरोध करायची अंतिम मर्यादा याने गाठली आहे आणि सगळ्या वर्गविरोधांचा आपण कमालीचा व निःपक्षपाती तिरस्कार करतो असे जाहीर करण्याची अंतिम मर्यादा याने गाठली आहे. काही थोडे अपवाद वगळल्यास आता (१८४७ साली) जर्मनीत प्रसृत होत असलेले सगळे तथाकथित समाजवादी व कम्युनिस्ट साहित्य हे अशा घाणेरड्या व निरुत्साहजनक स्वरूपाचे आहे. *

कार्ल मार्क्स आणि फ्रेडरिक एन्गल्स,
कम्युनिस्ट पक्षाचा जाहीरनामा
मार्क्स आणि एन्गल्स, संकलित ग्रंथ, खंड ६ वा,
मॉस्को, १९७६, पृष्ठे ५१०-१३

२

खऱ्या समाजवादाने वस्तुतः किती तरी तरुण-जर्मन साहित्यिक लोकांना, वैदूंना आणि इतर साहित्यिकांना सामाजिक चळवळ राबवायला समर्थ केले आहे.

---

* १८४८ च्या क्रान्तिकारक तुफानाने या सगळ्या घाणेरड्या प्रवृत्तीला भिरकावून दिले आणि तिच्या पुरस्कर्त्यांना समाजवादामध्ये आणखी अधिक लुडबुड करायच्या इच्छेतून मुक्त केले. या प्रवृत्तीचा प्रमुख प्रतिनिधी आणि अभिजात नमुना म्हणजे हेर्र कार्ल ग्रुन हा आहे. [१८९० च्या जर्मन आवृत्तीला जोडलेली एन्गल्सची टीप]
--संपादक

सामाजिक चळवळ देखील प्रथमतः केवळ साहित्यिक चळवळच होती कारण जर्मनीत खऱ्याखुऱ्या, आवेशयुक्त, व्यावहारिक पक्षीय लढ्यांचा अभावच होता. खरा समाजवाद म्हणजे कसल्याही खऱ्याखुऱ्या पक्षीय हितसंबंधांशिवायच जन्माला आलेल्या सामाजिक साहित्यिक चळवळीचे परिपूर्ण उदाहरण आहे आणि आता, कम्युनिस्ट पक्षाची स्थापना झाल्यानंतर त्याला जरूर मुळीच नसताना तो टिकून राहू पाहत आहे. जर्मनीत खऱ्याखुऱ्या कम्युनिस्ट पक्षाचा उदय झाल्यानंतर खऱ्या समाजवाद्यांचे क्षेत्र अधिकाधिक प्रमाणात मध्यमवर्गीयांपुरते आणि त्यांचे प्रतिनिधित्व करणाऱ्या भाकड व उध्वस्त साहित्यिकांपुरते मर्यादित राहील.

कार्ल मार्क्स आणि फ्रेडरिक एन्गल्स,
जर्मन विचारसरणी,

मार्क्स आणि एन्गल्स, संकलित ग्रंथ,
खंड ५ वा. मॉस्को, १९७६, पृष्ठ ४५७.

कार्ल बेक Lieder vom Armen Mann,

किंवा खऱ्या समाजवादाचे काव्य a

१

थेट सुरुवातीलाच तो आपल्या मध्यमवर्गीय भ्रमाची नोंद करतो. म्हणजे "सोन्याची राजवट" रॉथ्श्चील्डच्या "लहरींचे" पालन करते; हा भ्रम आहे आणि रॉथ्श्चील्डच्या घराण्याच्या सामर्थ्याविषयी अद्‌भुत कल्पनांची एक समग्र मालिकाच या भ्रमातून उदयास येते.

रॉथ्श्चील्डच्या खऱ्या सत्तेचा नाश, ज्या सामाजिक परिस्थितीवर ती आधारलेली आहे तिचा नाश कवीला अभिप्रेत नाही; ही सत्ता माणुसकीला धरून लागू व्हावी एवढीच त्याची इच्छा आहे. बँकर लोक हे समाजवादी दानशूर नाहीत, परंतु नुकतेच—बँकर्स आहेत याचे त्याला दुःख होते. बेक आपल्या कवितांमध्ये भेकड, मध्यमवर्गीय हलाखीचे वर्णन करतो; "गरीब माणसाचे," paure honteax चे वर्णन, त्याच्या सगळ्या व्यक्त स्वरूपांनिशी "छोट्या माणसाच्या," त्याच्या दरिद्री,

---

a कार्ल बेक, Lieder vom Armen Mann, लिपझिक, १८४६.—संपादक

धर्मनिष्ठ व परस्परविरोधी इच्छांचे वर्णन तो करतो; आणि अभिमानी, धाक देणाऱ्या आणि क्रान्तिकारक कामगारवर्गीयाचे वर्णन तो करत नाही. रॉथ्श्चील्डच्या घराण्यावर बेक ज्या धमक्यांचा व दोषारोपांचा वर्षाव करतो, ते एखाद्या कॅप्युचिनच्या धर्मोपदेशापेक्षा देखील वाचकाला अधिक हास्यास्पद वाटतात, मग त्याचे सगळे सद्हेतु कसेही असोत. हे दोषारोप रॉथ्श्चील्ड घराण्याच्या सत्तेविषयीच्या अत्यंत पोरकट भ्रमावर आधारलेले आहेत; ही सत्ता आणि सध्याची परिस्थिती यांच्या दरम्यानच्या संबंधांच्या संपूर्ण अज्ञानावर आधारलेले आहेत; सत्ता संपादन करण्यासाठी आणि सत्ता टिकविण्यासाठी रॉथ्श्चील्ड घराण्याला जी साधने उपयोगात आणावी लागली, त्यांच्या विषयींच्या संपूर्ण चुकीच्या समजुतींवर आधारलेले आहेत. लाचारपणा (pucillanimity) आणि समजुतीचा अभाव, बायकी भावनाविवशता आणि मध्यमवर्गीयांच्या कंगाल गद्यमय समंजस प्रवृत्ती -- हे या कवीचे स्फूर्तिस्रोत आहेत, आणि भयंकर दिसण्याच्या प्रयत्नापायी ते स्वतःवरच निरर्थक अत्याचार करतात. ते केवळ हास्यास्पद दिसतात. त्यांचा ओढूनताणून आणलेला घनगंभीर स्वर सतत विदूषकी चिरकण्यात रूपान्तरित होतो, एखाद्या एन्सेलाडूसच्या महाप्रचंड लढ्याचे नाट्यात्मक रूपान्तर हे कळसूत्री बाहुलीचे फार्सवजा हिसके निर्माण करण्यातच तेवढे यशस्वी होते.

२

एक रेजिमेंट बँडच्या तालावर कूच करत आहे. जनता सैनिकांना आपल्याशी एकी करायचे आवाहन करीत आहे. कवीने अखेरीस धैर्य धारण केले आहे म्हणून वाचक खुष होत आहे. परंतु कसचे काय नि कसचे काय ! आपल्याला शेवटी असा शोध लागतो की हा प्रसंग म्हणजे बादशहाचा नुसताच वाढदिवस आहे (name-day) आणि जनतेचे उद्गार म्हणजे ही परेड पाहणाऱ्या युवकाचे अबोल स्वप्नरंजन आहे. बहुधा हा शाळकरी मुलगा असावा.

असे स्वप्न रंगवी युवक हा जळत्या हृदयानिशी [पृष्ठ ७६]

उलटपक्षी हायनेच्या हाती जर तोच विषय असता, मुद्दा तोच असता, तर त्यात जर्मन जनतेविषयी अत्यंत कटु उपरोध आला असता, तर बेकच्या बाबतीत जे काही सगळे प्रकट होत आहे ते खुद्द कवीविषयीचाच उपरोध आहे. हा कवी तरुणाच्या नेभळट आनंदाशी एकरूप झालेला आहे. हायनेच्या बाबतीत भांडवलदारांचा आनंद जाणूनबुजून वरच्या पट्टीवर नेलेला असतो, म्हणजे मग तितक्याच जाणूनबुजून केलेल्या वर्णनात त्यांना आपटी दिलेली असते, बेकच्या बाबतीत खुद्द कवीच या कल्पनातरंगाशी संबंधित झालेला असतो आणि तो जमिनीवर कोसळतो त्या वेळी

तो देखील साहजिकच याचे परिणाम भोगतो. हायनेच्या बाबतीत भांडवलदारांना कवीच्या आगाऊपणाचा संताप येतो, तर बेकच्या बाबतीत त्यांना समाइक मनोवृत्तीचा दिलासा मिळतो.

३

कथा सांगण्यातली व प्रसंगाच्या निर्मितीतली ही संपूर्ण असमर्थता या पुस्तकात अथपासून इतिपर्यंत उघड दिसत आहे आणि खऱ्या समाजवादाच्या कवितेचे हेच वैशिष्ट्य आहे. खरा समाजवाद हा त्याच्या मोघमपणापायी कथानकातल्या व्यक्तिगत सत्य घटनांचा संबंध सर्वसाधारण परिस्थितीशी जोडायची, आणि त्यांच्या बाबतीत लक्षणीय व महत्त्वाचे काय आहे हे उघड करून दाखवायची कसलीही संधि मुळी उपलब्धच करून देत नाही. याच कारणास्तव खरे समाजवादी त्यांच्या गद्य लेखनाच्या बाबतीतदेखील इतिहासापासून तोंड लपवतात. जिथे त्यांना इतिहास टाळता येत नाही, तिथे ते एक तर तत्त्वज्ञानात्मक रचनांवर स्वतःचे समाधान मानून घेतात, किंवा दुर्दैवाच्या अलग अलग उदाहरणांची आणि सामाजिक प्रकरणांची रुक्ष कंटाळवाणी यादी निर्माण करण्यात स्वतःचे समाधान मानून घेतात. आणखी अधिक सांगायचे म्हणजे, त्या सगळ्यांच्या ठायी गद्यात्मक व काव्यात्मक अशा दोन्ही बाबतीतल्या कथाकथनाला आवश्यक असलेल्या कल्पकतेचा अभाव आहे, आणि याचा संबंध त्यांच्या एकंदर दृष्टिकोनांतल्या मोघमपणाशी आहे.

४

बेक याच्या ठायी बहुतेक जर्मन बोरूबहाद्दरांपेक्षा निर्विवादपणे अधिक कल्पकता आणि सुरुवातीला अधिक उत्साह देखील आहे. त्याची मोठी रडकथा म्हणजे जर्मन दुःख, आणि त्याच्या वैचारिक प्रदर्शनामध्ये देखील बेकचा भलताच भावनाविश समाजवाद आणि तरुण जर्मन स्मृतिचित्रे सामील आहेत. वर्गांच्या दरम्यान अधिक स्पष्ट वेगळेपणा येण्याच्या योगाने जर्मनीतील सामाजिक संघर्षांना अधिक तीव्र स्वरूप मिळेपर्यंत आणि भांडवलदारांकडून राजकीय सत्ता क्षणिक स्वरूपात संपादन होईपर्यंत, खुद्द जर्मनीत जर्मन कवीला कसलीच आशा असू शकत नाही. एका अंगाने त्याला जर्मन समाजात क्रान्तिकारक भूमिका अंगिकारणे अशक्य आहे; कारण खुद्द क्रान्तिकारक घटकच अजून पुरेसे विकसित झालेले नाहीत; आणि दुसऱ्या अंगाने त्याला सर्व बाजूंनी घेरून राहिलेले सततचे दुःख त्याच्यावर इतका निरुत्साहजनक परिणाम करते की त्या दुःखावर मात करायचे सामर्थ्य मिळवायला, त्या दुःखापासून मुक्त व्हायला आणि त्या दुःखाच्या आधीन स्वतःला होऊ न देता त्या दुःखाकडे बघून हसायला त्याला वावच मिळत नाही. सध्याच्या काळी ज्या जर्मन कवींच्या ठायी

अजून देखील थोडीशी कल्पकता आहे त्या सगळ्यांना आम्ही एकमेव सल्ला देऊ शकतो, तो म्हणजे हा की त्यांनी सुधारलेल्या देशांकडे स्थलांतर करावे.

फ्रेडरिक एन्गल्स, कवितेतील आणि
गद्यातील जर्मन समाजवाद

मार्क्स आणि एन्गल्स, संकलित ग्रंथ,
खंड ६ वा, मॉस्को १९७६, पृष्ठे २३५-३६,
२४४, २४४-४५, २४८–४९

गॉट्टफ्रिएड किन्केल

"गात रहा हे अमर आत्म्या,
पापी मानवजातीच्या उद्धाराचे गीत"[२०८]—
गॉट्टफ्रिएड किन्केल याच्या द्वारा

१

गॉट्टफ्रिएड किन्केल याचा जन्म सुमारे ४० वर्षांपूर्वी झाला. गॉट्टफ्रिएड किन्केल, कवितेशिवाय सत्य. एक चरित्रात्मक टिपणांचे पुस्तक. प्रकाशक ॲडोल्फ स्ट्रॉड्टमॅन, (हॅम्बुर्ग, हॉफमान्ने आणि काम्पे, १८५०, अष्टपत्री) या आत्मचरित्राच्या स्वरूपात त्याची जीनकथा आपल्याला उपलब्ध करून देण्यात आली आहे.

गॉट्टफ्रिएड हा जर्मनीत देशभक्तिपर उदासवाण्या रडगाण्यांचा जो अखंड लोंढा सिएग्वार्ट युगात[२०९] वाहत होता त्या युगातला "हिरो" म्हणून गाजला. एक साधा भावगीतकार सिएग्वार्ट म्हणून त्याने आपल्या कवित्वाचा प्रारंभ केला.

आम्ही पुढे दिलेल्या माहितीबाबत अपॉसल स्ट्रॉड्टमन याचे आम्ही ऋणी आहोत. त्याने या भूतलावर केलेल्या यात्रेचे वर्णन रोजनिशीच्या धर्तीच्या टिपणातून वाचकाला सादर झालेले आहे आणि यात उबदकीस आणलेल्या प्रकारांमध्ये सारासार विवेकाचा दळदळीत अभाव आहे. या दोन्ही गोष्टी या "कथनात्मक जत्री-तल्याच" आहेत....

२

किंकेलला अटक झाल्यावर त्याच्या आयुष्यातील एका नव्या युगाचा प्रारंभ झाला, आणि त्याचबरोबर जर्मन तुच्छतावादाच्या इतिहासातील एका नव्या युगाचा प्रारंभ झाला. त्याला अटक झाल्याची बातमी मे.-बग कलबच्या २१० कानावर गेली असेल नसेल

येवढ्यात त्या मंडळींनी सगळ्या जर्मन वृत्तपत्रांना लिहून कळविले की महान कवी किन्केल याच्यावर लष्करी कोर्टात खटला होऊन त्याला गोळी घातली जाण्याचा धोका निर्माण आहे, आणि म्हणून जर्मन जनतेला आणि त्यातल्या त्यात तिच्यातील सुशिक्षितांना आणि सगळ्यांत जास्त महत्त्वाची गोष्ट म्हणजे स्त्रियांना व मुलींना आमची अशी कळकळीची विनंती आहे की त्यांनी या अटक झालेल्या कवीचे प्राण वाचविण्यासाठी शक्य ते सर्व काही करावे. याच सुमारास आम्हाला असे सांगण्यात आले की किन्केलने स्वतःच एक कविता लिहिली आणि तीमध्ये त्याने स्वतःची तुलना "आपला मित्र आणि गुरु ख्रिस्त" याच्याशी केली आणि याच्या भरीला असे म्हटले की "माझे रक्त तुझ्याशी सांडले गेले." या वेळेपासून बासरी हे त्याचे बोधचिन्ह झाले. अशा रीतीने जर्मनीला अचानक असे कळले की किन्केल हा कवी आहे, यात भरीला भर म्हणजे हा महान कवी आहे आणि या क्षणापासून पुढे जर्मन तुच्छतावाद्यांचा व सौंदर्यवादी कविब्रुवांचा जमाव आमच्या हाइन्दिख फॉन ऑफ्टरडिन्गेनने सादर केलेल्या ब्ल्यू फ्लॉवर या फार्समध्ये सामील झाला.

दरम्यान प्रशियनांनी त्याला लष्करी कोर्टापुढे हजर केले. दीर्घ कालावधीनंतर पहिल्या प्रथमच त्याला आपल्या भोत्यांच्या अश्रुपाताला आवाहन करणारे आपले हृदय हेलावून सोडणारे एखादे भाषण प्रयोग म्हणून करायची संधी त्याला मिळाली. पूर्वी कलोन येथे दुय्यम धर्मोपदेशक म्हणून त्याला--मोकेल teste @--या क्षेत्रात केवढे तरी यश लाभलेले होते. कलोन शहराच्या नशिबी देखील या क्षेत्रातील त्याच्या अत्यंत वैभवशाली कामगिरीचे साक्षी होणे लवकरच येणार होते. लष्करी कोर्टापुढे त्याने स्वतःच्या बचावाचे भाषण केले. हे भाषण दुर्दैवाने एका मित्राच्या सारासार विवेकशून्यतेमुळे बर्लिन येथील आबेन्डपोस्ट या वृत्तपत्राने जनतेला उपलब्ध करून दिले. या भाषणात किन्केल म्हणाला :

"माझ्या कामगिऱ्या व माझ्या माहितीप्रमाणे अखेरीस दुर्दैवाने या क्रान्तीने चिकटलेली घाण यांच्या दरम्यान कसलाही संबंध असल्याचा मी इन्कार करतो."[२११]

या कट्टर-क्रान्तिकारक भाषणानंतर किन्केल याला वीस वर्षे एका किल्ल्यात तुरुंगवास भोगायची शिक्षा मिळाली. त्याच्यावर मेहेरबानी म्हणून या शिक्षेचे रूपान्तर सक्त मजुरीत करण्यात आले आणि त्याला नौगार्ड येथे हलविण्यात आले. तिथे त्याला म्हणे लोकरीचा धागा कातायचे काम देण्यात आले आणि म्हणून पूर्वी त्याने प्रथम जसे गोणपाटाच्या थैलीचे बोधचिन्ह घेतले होते, नंतर पिस्तुलाचे घेतले होते आणि त्यानंतर बासरीचे बोधचिन्ह घेतले होते, तसे आता त्याने चरख्याचे बोधचिन्ह घेतले. मागाहून आपल्याला तो थैलीच्या बोधचिन्हानिशी सागरावर भटकन्ती करत असलेला दिसणार आहे.

@ याच्या म्हणण्यानुसार --संपादक

दरम्यान जर्मनीमध्ये एक विलक्षण प्रसंग घडला. जर्मन तुच्छतावाद्याला निसर्गाकडून सुंदर आत्म्याची देणगी मिळालेली असते ही गोष्ट सर्वश्रुत आहे. आता त्याला असे आढळून आले की १८४९ या वर्षाने दिलेल्या जोरदार तडाख्यांनी आपल्या अत्यंत आवडत्या भ्रमांचा क्रूरपणे चक्काचूर केलेला आहे. एका देखील आशेला वास्तव रूप मिळाले नाही आणि तरुणांची उदात्त हृदये देखील पितृभूमीच्या भवितव्याबाबत निराश होऊ लागली. प्रत्येक हृदय रडव्या ग्लानीला शरण गेले आणि एखाद्या लोकशाहीवादी खिस्ताची जरूरी सर्वत्र जाणवू लागली; कारण असा खराखुरा किंवा काल्पनिक क्लेश भोगणारा असावा आण त्याने आपल्या क्लेशांच्या योगाने तुच्छतावाद्यांच्या जगाची पापे एखाद्या कोकराच्या सहनशीलतेने आपण स्वतः भोगावीत आणि याच्या कळकळीला आत्यंतिक स्वरूपात सगळ्या तुच्छतावाद्यांच्या समुदायाच्या नित्याच्या रडव्या आत्मनिंदेचे मूर्त रूप लाभावे. मोकेलच्या नेतृत्वाखालील मे-बग क्लबाने ही सार्वत्रिक गरज भागवायला सुरुवात केली. आणि खरोखरीच या महान कळकळीच्या फार्सचा प्रयोग करायला आमचा कैदेतला कळकळीचा पुष्पराज, चरखा चालविणारा किन्केल, याच्यापेक्षा अधिक योग्य कोण असणार? भावनाविवश अश्रूंचे अक्षय महापूर वाहवायला समर्थ असा हा रड्या कवि, याच्या भरीला हा धर्मोपदेशक, ललितकलांचा प्राध्यापक, संसद-सदस्य, राजकीय नेता, पिस्तुल-बहादूर, नव्याने शोधून काढलेला कवी, आणि जुना नाट्यदिग्दर्शक– या सगळ्या गुणांनी मंडित झालेला होता ना हा? किन्केल या क्षणी योग्य असा माणूस होता आणि त्या अर्थाने जर्मन तुच्छतावाद्यांनी तावडतोब त्याचा स्वीकार केला. या तुरुंगातल्या कवीच्या हकीकती, शब्दचित्रे, कविता, आठवणी-यांची भाऊगर्दी प्रत्येक वृत्तपत्रामध्ये झालेली होती. त्याचे तुरुंगातील वृद्ध हजार पटींनी फुगवून प्रसिद्ध होत होते आणि त्याला पुराणकथेचे रूप प्राप्त झाले होते; त्याचे केस पांढरे झाल्याची बातमी महिन्यातून किमान एकदा तरी प्रसिद्ध होत होती. प्रत्येक भांडवलदारी सभास्थानी आणि प्रत्येक चहापानाच्या कार्यक्रमात त्याची आठवण करण्यात येत होती व त्याच्या विषयीच्या दुःखाचे प्रदर्शन होत होते. सुशिक्षित वर्गातल्या मुलीबाळी त्याच्या कविता वाचून सुस्कारे सोडत होत्या आणि जरठ कुमारींना विरह म्हणजे काय हे ठाऊक असल्यामुळे त्या पितृभूमीच्या विविध शहरांतून त्याच्या उध्वस्त झालेल्या पौरुषाच्या विचाराने विव्हल होऊन अश्रुमोचन करत होत्या. चळवळीचे इतर सगळे अधार्मिक बळी, गोळ्यांना बळी पडलेले सगळे, लढाईत कामास आलेले किंवा तुरुंगात डांबून पडलेले––हे सगळे शून्यात लुप्त झाले आणि हा एकच तेवढा, हे बळीचे कोकरू, स्त्री-पुरुष तुच्छतावाद्यांच्या हृदयसिंहासनावरचा हा हीरो, हा एकच तेवढा सगळ्यांच्या पुढ्यात राहिला. त्याच्या एकट्याच्या साठीच अश्रूंच्या नद्या वाहिल्या, आणि, खरे तर, तोच तेवढा त्यांना तशाच धर्तीचा प्रतिसाद द्यायला समर्थ होता. थोडक्यात सांगायचे म्हणजे तो लोकशाहीवादी सिएग्वार्ट युगाची परिपूर्ण प्रतिमा होऊन राहिला, आदल्या शतकातील साहित्यिक सिएग्वार्ट

युगापुढे तिने कोणत्याही बाबतीत माघार घेतली नाही, आणि सिएग्वार्ट-किन्केल याला या भूमिकेखेरीज अन्य कोणतीही भूमिका मानवली नाही. या भूमिकेत तो मोठा दिसू शकत होता, म्हणजे त्याने जे केले त्यामुळे नव्हे, तर त्याने जे केले नाही त्यामुळे. तो मोठा दिसला तो अंगच्या बळामुळे व प्रतिकारशक्तीमुळे नव्हे, तर त्याच्या दुबळेपणामुळे—ज्या परिस्थितीत त्याची एकमेव कामगिरी म्हणजे ताठ मानेने व भावनाप्रधानतेने सहन करणे ही होती, तीत त्याने लाचारपणाचे वर्तन केले, त्यामुळे. तथापि मोकेलने जनतेच्या हळव्या मनाचा व्यावहारिक फायदा करून घ्यायच्या बाबतीत पुरेशी कर्तबगारी व अनुभवीपणा यांचे प्रत्यंतर आणून दिले आणि तिने ताबडतोब एक अत्यंत कार्यक्षम उद्योग संघटित केला. तिने गॉट्ट्फ्रिएडचे सगळे प्रसिद्ध व अप्रसिद्ध ग्रंथ जमा केले, ते चालू फॅशन झालेले होते व त्यांना अचानक खूप मागणी आलेली होती आणि ते छापून घेतले व त्यांचा प्रचार केला. कीटक जगतातील स्वतःच्या जीवनानुभवांनादेखील तिला बाजारपेठ सापडली. उदाहरणार्थ, तिने लिहिलेली "काजव्याची कथा". तिने गॉट्ट्फ्रिएडच्या अत्यंत गुप्त भावना प्रदर्शित करणाऱ्या रोजनिशा जमवायचे काम मे-बग स्ट्रॉड्टमान्न याच्यावर सोपविले आणि बरीच मोठी रक्कम घेऊन या डायऱ्यांचा बाजार मांडला आणि त्या जनतेत प्रसृत केल्या; तिने हर प्रकारचे फंड संघटित केले, आणि सुशिक्षित लोकांच्या भावनांचे रूपांतर रोख रकमांमध्ये करण्यांत सर्वसाधारणपणे निर्विवाद व्यापारी कसब व खूपच चिकाटी या गुणांचे प्रदर्शन केले. याच्या भरीला तिला एक समाधान लाभले, ते म्हणजे

"ॲडॉल्फ स्टाहर सारखे जर्मनीतले मोठमोठे पुरुष तिच्या स्वतःच्या छोट्या खोलीत रोजच्या रोज जमत असलेले तिला बघायला मिळत होते."

तथापि, या एकंदर सिएग्वार्ट पिसाटपणाचा कळसाध्याय कलोन येथील कोर्टात घडायचा होता. तिथे १८५० च्या आरंभी गॉट्ट्फ्रिएड हजर झाला. सिएग्बुर्ग येथे जो उठावाचा प्रयत्न झाला, त्यांतून हा खटला उद्भवलेला होता. आणि या प्रसंगी किन्केलला कलोन येथे आणण्यात आले. या शब्दचित्रामध्ये किन्केलच्या रोजनिशांकडे एवढी प्रमुख भूमिका असल्यामुळे तिथे समक्ष हजर असलेल्या एका माणसाच्या रोजनिशी-तील उतारा इथे सादर करणे प्रसंगोचितच ठरेल.

"किन्केलची पत्नी तुरुंगात त्याला भेटायला गेली. तिने गजांआडून त्याला पद्यमय अभिवादन केले; माझ्या माहितीप्रमाणे त्याने तिला सहा सहा कडव्यांचा (हेक्झामीटर्स) काव्यमय प्रतिसाद दिला; यानंतर दोघांनी एकमेकांसमोर गुडघे टेकले आणि तिथे जवळच उभ्या असलेल्या वयोवृद्ध सार्जंट मेजर तुरुंग-इन्स्पेक्टरला असा प्रश्न पडला की आपली वेड्या लोकांशी गाठ पडली आहे, का विदूषकांशी. सरकारी वकिलाने त्यांच्या संभाषणाचा आशय त्याला मागाहून विचारला, तेव्हा त्याने चक्क सांगून टाकले की 'हे जोडपे खरोखरीच जर्मन भाषेत बोलले, परंतु मला त्यातले

ओ किंवा ठो काही एक कळू शकले नाही.' "यावर फ्राऊ किन्केल हिने म्हणे ताडकन असे सांगितले की 'जो माणूस कला व साहित्य यांच्या बाबतीत इतका सर्वस्वी अनभिज्ञ आहे, त्याला इन्स्पेक्टरच्या हुद्यावर नेमूच नये.'"

ज्यूरीला तोंड देताना किन्केलने शुद्ध रडव्याची भूमिका करून आपली कशीबशी सुटका करून घेतली. वेर्टरच्या दुःखांच्या जुन्या काळाची आठवण करून देणारा हा सिएग्वार्ट युगांतील कवि म्हणाला :

"कोर्टाचे सदस्य, ज्यूरीचे सद्गृहस्थ हो!--माझ्या मुलांचे घारे डोळे--व्हाईन नदीचे हिरवे पाणी--कामगारवर्गीयाशी हस्तांदोलन करण्यात कमीपणा नसतो--कैद्याचे फिकट ओठ--आपल्या घरातले शांत वातावरण--आणि अशाच प्रकारचे थातुरमातुर, असाच या सुप्रसिद्ध भाषणाचा आशय होता आणि जनता, ज्यूरी, सरकारी वकील आणि पोलीस देखील अत्यंत शोकाकुलपणे अश्रुपात करीत होते आणि खटल्याचा शेवट एकमताने सुटका होण्यात झाला आणि तेवढ्याच एकमताने शेवटी रडारड झाली. किन्केल हा निःसंशयपणे प्रिय, चांगला माणूस आहे; परंतु त्याचबरोबर तो धार्मिक, राजकीय व साहित्यिक आठवणींची ओंगळवाणी खिचडी आहे."

आपल्याला मळमळायला व्हायला एवढे पुरेसे आहे.

सुदैवाने हा दुःखाचा कालखंड, स्पान्डॉ जेलमधून किन्केलची अद्भुतरम्य मुक्तता होण्याच्या योगाने लवकरच समाप्त झाला. त्याची मुक्तता म्हणजे रिचर्ड लायन हार्ट आणि ब्लॉन्डेल [२१२] यांच्या कथेची पुनरावृत्ति होती. फरक एवढाच होता की या वेळी ब्लॉन्डेल तुरुंगात होता आणि लायनहार्ट बाहेर बॅरेल-ऑर्गन हे वाद्य वाजवत होता; आणि ब्लॉन्डेल हा साधा शाहीर होता आणि लायनहार्ट हा मूलतः सशाहून फारसा अधिक नव्हता. वस्तुतः लायनहार्ट हा मे-बग क्लबातील श्चूर्झचा विद्यार्थी होता, मोठ्या महत्त्वाकांक्षा असलेला आणि मर्यादित कर्तृत्वाचा छोटासा कारस्थानी होता. तथापि "जर्मन लामार्टिन"चे बिंग ओळखण्याइतका पुरेसा हुशार होता! सुटका झाल्यानंतर लवकरच विद्यार्थी श्चूर्झ याने पॅरिस शहरी असे जाहीर केले की ज्या किन्केलचा आपण वापर करतो आहोत तो Luamen mundi मुळीच नाही हे आपल्याला फार चांगले ठाऊक आहे, आणि याच्या उलट आपण म्हणजेच श्चूर्झ, आणि अन्य कोणीही नाही, आपणच जर्मन प्रजासत्ताकाचे भावी अध्यक्ष होणार आहोत. हा manykin एका काळी गॉट्टफ्रिएड आपली उदास नजर ज्याच्यावर लावून असे, त्या "खाकी कोट व फिकट निळे ओव्हरकोट घातलेल्या" विद्यार्थ्यांपैकीच एक जण, हा कुणा गरीब बिचाऱ्या वॉर्डरला बळी देऊन किन्केलची सुटका करण्यात यशस्वी झाला आणि तो वॉर्डर आता तुरुंगात

शिक्षा भोगत आहे आणि स्वातंत्र्यासाठी—म्हणजे गॉट्रफ्रिएड किन्केलच्या स्वातंत्र्यासाठी—बलिदान केल्याची उदात्त भावना मनाशी बाळगून आहे.

कार्ल मार्क्स आणि फ्रेडरिक एन्गल्स,
" हीरोज ऑफ द एक्झाइल " (परागंदा अवस्थेतले पराक्रमी लोक)
मार्क्स / एन्गल्स, वेर्के, खंड ८ वा, १९६९, पृष्ठे २३५, २६१-६४

फ्राइलिग्राथ

१

[" न्यूए ऱ्हेइनिश्चे झायटुंग " या वृत्तपत्राच्या पुनरागमनाविषयी संपादकीय [२१३] निवेदन]

" न्यूए ऱ्हेइनिश्चे झायटुंग " हे वृत्तपत्र टिकवून ठेवण्यासाठी विशेषतः कलोन येथे जी आस्था दर्शविण्यात आली, तिच्या योगाने आम्हाला आणीबाणीच्या पायी आलेल्या आर्थिक अडचणींवर मात करता आली आणि वृत्तपत्र पुन्हा चालू करता आले. संपादकमंडळ तेच आहे. फर्डिनान्ड फ्रायलिग्राथ त्यांत नव्याने सामील झाले आहेत.

कार्ल मार्क्स
न्यूए ऱ्हेइनिश्चे झायटुंगचे मुख्य संपादक
मार्क्स आणि एन्गल्स, संकलित ग्रंथ,
खंड ७ वा, मॉस्को, १९७६, पृष्ठ ४५८

२

आम्ही नुकतेच कवितांविषयी सांगतो आहोत, म्हणून आमचे फ्रायलिग्राथ यांनी Ca ira Herisau, १८४६ या मथळ्यानिशी प्रसिद्ध केलेल्या, क्रान्तीला दिलेल्या सहा चिथावण्या, यांच्याविषयी आम्ही चार शब्द सांगतो. यातली पहिली कविता म्हणजे जर्मन Marseillaise (क्रान्तिगीत) आहे आणि हे " साहसी चांच्यांचे " गुणगान आहे, यालाच " प्रशियातल्या प्रमाणे ऑस्ट्रियात क्रान्ति म्हणतात. " हे जहाज स्वतःचा ध्वज फडकावते आणि in partibus infidelium[२१४]

(अस्तित्वात नसलेल्या) सुप्रसिद्ध जर्मन आरमारात दाखल झालेल्या नव्या कुमकेचे प्रतिनिधित्व करते. या जहाजाला उद्देशून पुढील विनंति केलेली आहे :

वाम मार्गाने मिळविलेल्या नफ्यांच्या चंदेरी आरमारांविरुद्ध
तोफांचे मोर्चे वळवा शूरपणाने
सागराच्या सडक्या तळाशी
हावरटपणाची फळे सडून राहू देत. [पृष्ठ ९]

ओघाओघाने सांगायचे म्हणजे हे गाणे इतक्या सहजपणाच्या मनोवृत्तीत लिहिलेले आहे, की ते वृत्तबद्ध असून देखील "खलाशांनो उठा, नांगर उचलायला"@ या गाण्याच्या चालीवर ते उत्तम गाता येते.

सगळ्यात जास्त वैशिष्ट्यपूर्ण अशी कविता म्हणजे "Wie man's mucht" b म्हणजे : फ्रायलिग्राथ क्रान्ति कशी करतो. वाईट दिवस आले आहेत, जनता उपाशी आहे, तिच्या अंगावर लक्तरे आहेत : "तिला रोटी व कपडा कसा मिळविता येणार!" अशा परिस्थितीत एक "साहसी माणूस" पुढे सरसावतो, काय करायला हवे हे त्याला ठाऊक असते. तो सगळ्या जमावाचे नेतृत्व करतो आणि पोलीस खात्याच्या स्टोअर्सवर चाल करून जातो आणि तिथे सापडलेले गणवेश वाटून टाकतो आणि हे गणवेश तिथल्या तिथे लोक अंगावर चढवतात. जमाव "प्रयोग म्हणून" रायफली देखील घेतो आणि त्या घेणे म्हणजे "गंमत आहे" असे जमावाला वाटते. त्या क्षणी आमच्या या "साहसी माणसाच्या" ध्यानात येते की "कपड्यांच्या या गमतीला कदाचित बंडावा, घरफोडी व दरोडा असे देखील नाव मिळायचा संभव आहे" आणि म्हणून आपल्याला "आपल्या कपड्यांसाठी लढायला तयार व्हावे लागणार" आहे आणि म्हणून शिरस्त्राणे, काडतुसांचे पट्टे देखील घेण्यात येतात आणि भिकाऱ्याची गोण हा ध्वज म्हणून उभारण्यात येते. मग "राजाचे सैन्य" येते, सेनापति गोळ्या झाडायचा हुकुम देतो, परंतु सैनिक आनंदाने या गणवेशधारी पोलिसांना मिठ्या मारतात. आणि ते आता पुढे सरसावले असल्यामुळे ते राजधानीवर चाल करून जातात, ते देखील "गंमत" म्हणून. तिथे त्यांना पाठिंबा मिळतो, आणि अशा प्रकारे "कपड्यांच्या बाबतीतील गंमतीच्या" परिणामी : "सिंहासन आणि राजमुकुट कोसळून पडतात. राज्य आपल्या पायासकट हादरते" आणि "विजयोत्साहाने जनता आपली दीर्घकाल पददलित असलेली मस्तके उंचावते." सगळ्या गोष्टी इतक्या झपाट्याने व सुरळीतपणे घडतात

@ विल्हेम गेर्‌हार्डची कविता "matrose" ["खलाशी"] हिच्यातून उद्धृत.—संपादक

b "ती कशी केली जाते"—संपादक

की या एकंदर प्रक्रियेत "कामगारवर्गीय बट्टेलियनच्या" एकाही सदस्याची पाइप विझल्याचे आढळून येत नाही. आमच्या फ्रायलिग्राथच्या डोक्यात क्रान्त्या जितक्या आनंदाने व जितक्या सहजपणाने घडून येतात तितक्या कुठेही साध्य होत नाहीत. असल्या निरुपद्रवी, कल्पनारम्य सफरीत राजद्रोह शोधून काढायचा म्हणजे आल्गेमेइने प्व्यूसिश्चे झायटुंग या वृत्तपत्राच्या दुष्ट मनोवृत्तीचा सगळा रोगभ्रम खरोखरीच कामी यायला हवा.

फ्रेडरिक एन्गल्स, "खरे समाजवादी"

मार्क्स आणि एन्गल्स, संकलित ग्रंथ,
खंड ५ वा, मॉस्को, १९७५, पृष्ठे ५६९-७०

३

मूरिश राजा,[२१५]

सोबत एव्नरचे पत्र जोडले आहे.

आज मला वेडेमेयेरकडूनही आणखी एक पत्र आले. इतर गोष्टींच्या जोडीला तो लिहितो :

"काही दिवसांपूर्वी लंडन ॲजिटेशन युनियनचा[२१६] एक प्रतिनिधी किन्केल कर्जांना विरोध करण्यासाठी आला. या लोकांची बहुधा अशी कल्पना असावी की इथे अमेरिकेत सगळे लोक किन्केल-धार्जिणे व किन्केल-विरोधी अशा दोन गटांमध्ये विभागले गेले आहेत, कारण मूठभर पळपुट्यांनी राईचा पर्वत करून ठेवला आहे. कोस्सुथच्या खळबळीने फार पूर्वीच किन्केलला विस्मृतप्राय माणूस करून ठेवले आहे आणि म्हणून त्याने गोळा केलेले काही हजार डॉलर्स एवढा गाजावाजा करायच्या योग्यतेचे नाहीत.

"ते काहीही असले तरी मी तुमच्यासाठी रेव्हय्यूच्या विक्रीची व्यवस्था करू शकतो. फ्रायलिग्राथच्या आणखी काही नव्या कवितांची देखील इथे सोय लागू शकते."

वे(डेमेयेरने) आम्हाला आणखी एक धक्का दिल्यानंतर असे लिहिले आहे :

"परंतु प्रथम आणि सर्वप्रथम फ्रायलिग्राथची कविता हवी : हे सगळ्यात जास्त मोठे आकर्षण आहे."

हे मनावर घे आणि नव्या जगाला उद्देशून एक नववर्षाचे गाणे रचून टाक. सध्याच्या परिस्थितीत माझ्या मते गद्यापेक्षा पद्यांत लिहिणे खरोखरीच अधिक सोपे आहे, मग ते गंभीर असो वा विनोदी असो. ओघाओघाने सांगायचे म्हणजे तुझ्या

आफ्रिकी राजेपणाचे वैशिष्ट्य असा खासगी जीवनांतला विनोद कलात्मक स्वरूपात सादर करायचा जर कधी काळी प्रयत्न करशील तर याही विनोदप्रकारात तू भूमिका बजावशील अशी मला खात्री वाटते. कारण तुझ्या पत्नीने यथायोग्य नोंद घेतली आहे तद्नुसार तू आतून लुच्चा आहेस.

मार्क्स यांचे फर्डिनांड फ्रायलिग्राथ यास पत्र
तारीख २७ डिसेंबर १८५१
मार्क्स/एन्गल्स, वेर्के, खंड २७ वा, १९६५,
पृष्ठ ५९७

४

उलट पक्षी, मी सोबत फ्रायलिग्राथची एक कविता व त्याचे एक खासगी पत्र जोडले आहे. आता मी तुम्हाला पुढील गोष्टी करायची विनंती करतो :

१. कविता योग्य रीतीने छापवून घ्या, कडव्यांच्या दरम्यान वाजवी सूट ठेवा. जागा वाचवायचा प्रयत्न करू नका. कविता जर गचडी करून ढिगाऱ्याच्या धर्तीवर छापल्या तर त्यांचे स्वारस्य खूपच नाहीसे होते. २. फ्रायलिग्राथला एक स्नेहशील पत्र लिहा. गौरवपर लिहिण्यात फाजील काटकसर करू नका. कारण सगळे कवि, सर्वोत्तम देखील, plus au moins a courtisanes (स्तुतिप्रिय) असतात आणि il faut les cajoler, pour les faire chanter b आपला F[reiligrath] हा खासगी जीवनात अत्यंत मनमिळाऊ व साधासुधा माणूस आहे. आपल्या खऱ्याखुऱ्या bonhomie (मनमोकळेपणा) च्या आड तो un esprit tres fin et tres railleur c लपवून ठेवतो. त्याची भावना सत्य असते आणि ती त्याला "विमर्शन-शून्य" आणि "भोळसट" होऊ देत नाही. तो अस्सल क्रान्तिकारक आहे आणि अत्यंत प्रामाणिक आहे—आणि असे फारच थोड्या माणसांच्या बाबतीत म्हणता येते. असे असूनही, तो कशाही प्रकारचा homme [माणूस] असला, तरी कवीला स्तुति व कौतुक हवे असते. माझ्या मते खुद्द या साहित्यप्रकाराचीच ही गरज असते. मी तुम्हाला हे सगळे सांगतो आहे ते एवढेच दाखवून देण्यासाठी सांगतो आहे की

---

a कमी अधिक प्रमाणात. -- संपादक
b त्यांना गायला लावण्यासाठी आपण त्यांना गोंजारावे लागते. -- संपादक
c अत्यंत भेदक व दाहक मन. -- संपादक

फ्रायलिग्राथबरोबरच्या तुमच्या पत्रव्यवहारात तुम्ही "कवि" आणि "समीक्षक" यांच्या दरम्यानचा फरक विसरू नये.

मार्क्स यांचे जोसेफ वेडेमेयेर यास पत्र,
तारीख १६ जानेवारी १८५२
मार्क्स/एन्गल्स, वेर्के, खंड २८ वा, १९६३,
पृष्ठ ४७५

५

या एकंदर फ्रायलिग्राथ प्रकरणामुळे मी सपशेल वैतागलोय. या साहित्यिक बाजारबुणग्यांच्या बाबतीत ही नेहमीचीच जुनी गोष्ट असते; त्यांना वृत्तपत्रांकडून सदैव आपली भरमसाट स्तुति व्हायला हवी असते आणि आपली नावे लोकांच्या नजरेसमोर असायला हवी असतात. त्यांनी लिहिलेली अत्यंत वाईट कविता त्यांच्या लेखी इतिहासातील मोठ्यात मोठ्या घडामोडींपेक्षा अधिक महत्त्वाची असते. आणि एखाद्या कंपूच्या संघटनेशिवाय हे घडवून आणता येत नाही, म्हणून ही प्रमुख गरज होते हे स्वाभाविकच असते. आणि दुर्दैवाची गोष्ट अशी, की आम्ही अभागी कम्युनिस्ट लोक या बाबतीत अगदी कुचकामी असतो. याहूनही वाईट गोष्ट म्हणजे ही सगळी फसवेगिरी आम्हाला ठाऊक असते, या du sucee's a च्या संघटनेचा आम्ही तिरस्कार करतो आणि लोकप्रिय व्यक्ती व्हायची आम्हाला जवळ जवळ गुन्हेगारी शिसारी असते. या कारणास्तव असला कवी असल्या पक्षामध्ये जर अस्वस्थ-मनस्क होत असेल, तर हे खरोखरीच अत्यंत संकुचित मनोवृत्तीचे लक्षण असते. कारण इतर सर्व ठिकाणी त्याला जी स्पर्धा हमखास आढळते, ती त्याला इथे अजिबात नसते; आणि थेट सुरुवातीपासूनच जिथे त्याला किन्केलच्या स्पर्धेला तोंड द्यावे लागते अशा गटाच्या गळ्यांत जर तो जाऊन पडला, तर तो याहूनही अधिक मोठा असा मनाचा संकुचितपणा दर्शवितो. Mais gue voalsvous? b कवीला त्याच्या खुद्द अस्तित्वासाठीच धूप लागतो, खूपखूप धूप लागतो....

याच्या भरीला हे सांगावेच लागते की अलीकडील काही वर्षांच्या अवधीत फर्डिनांडच्या काव्यगंगेचा ओघ आटलेला आहे आणि आपल्या टाळक्यांतून जे थोडेसे तो अजून ओढून ताणून बाहेर काढतो ते कमालीचे सुमार असते. म्हणून आपल्याला विविध पळवाटांचा अवलंब करावा लागतो, म्हणजे समग्र ग्रंथ, वगैरे, आणि हे काम

---

a यशाच्या. —संपादक

b पण तुम्ही करू काय शकता? —संपादक

रोजच्या रोज करता येत नाही आणि आपला विसर पडायला नको असेल, तर दर सरत्या दिवसागणिक जाहिरात करणे अधिक आवश्यक होत असते. १८४९ ते १८५८ या मुदतीत फ्रायलिग्राथविषयी वस्तुतः कोण कोण बोलले ! कुणीही नाही. फक्त बेट्टिझिएच याने या अभिजात कवीचा पुन्हा शोध लावला आहे. याचा विसर इतक्या मोठ्या प्रमाणात पडलेला आहे की याचा वापर केवळ नाताळची किंवा वाढदिवसाची भेट म्हणूनच होत होता; आणि खुद्द साहित्यात हा प्रकट झालेला दिसण्यापेक्षा हा अगोदरच साहित्याच्या इतिहासात प्रकट होऊन राहिलेला आहे. याचा एकमेव दोष साहजिकच कार्ल मार्क्सकडे, त्याच्या "श्वसना"कडे जातो. परंतु जर का फ्रायलिग्राथला एकदा Gartenlaube च्या a धूपाची ऊब पुन्हा मिळाली, की मग कशा प्रकारचे काव्य त्याच्या निःश्वसितांतून बाहेर पडेल, हे तुम्हाला दिसेलच !

या कवीचे प्रकरण म्हणजे कसले क्षुद्र, कंगाल, नादान काम असते ! याच कारणास्तव मी सायबेलची प्रशंसा करतो. अर्थात तो खरोखरीच वाईट कवि आहे, परंतु आपण अथपासून इतिपर्यंत बंडलबाज आहोत हे तो जाणून आहे आणि त्याची इच्छा एवढीच आहे की काळाचा आवश्यक proceđe म्हणून आपल्याला जाहिरातीच्या व्यापारात वाव दिला जावा, कारण याच्याशिवाय तो शून्यच ठरेल.

एन्गल्स यांचे जेन्नी मार्क्स हिला पत्र,
तारीख २२ डिसेंबर १८५९

मार्क्स / एन्गल्स, वेर्के, खंड २९ वा,
१९६७, पृष्ठ ६३७

६

कौटुंबिक कवी फ्रायलिग्राथ याने त्याच्या "रॉबेरे" आणि "कोर्बार"--व्हिएन्नाचा माणूस या कवितांनी माझी खूप करमणूक केली.

मार्क्स यांचे एन्गल्स यांस पत्र,
तारीख १७ जुलै १८६९

मार्क्स / एन्गल्स, वेर्के, खंड ३२ वा,
१९६५, पृष्ठ ३३९

---

a बगीचा.--संपादक

b व्यवसाय.--संपादक

७

फ्रायलिग्राथ : "हुर्रा ! जर्मानिया !" या कंटाळवाण्या लांबलचक कवितेत "देवांची" ही आणि "गॉलची" ही हजेरी लागायची राहिलेली नाही.

असला यमक्या शाहीर होण्यापेक्षा
मी मांजराचे पिलू होऊन म्याव म्याव करीन [२१७]

मार्क्सयांचे एन्गल्स यांना पत्र,
तारीख २२ ऑगस्ट १८७०
मार्क्स / एन्गल्स, वेर्के, खंड ३३ वा,
१९६६, पृष्ठ ४७

८

कौटुंबिक कवि फ्रायलिग्राथ याच्याविषयी तुम्हाला काय म्हणायचे आहे ? सध्याची ऐतिहासिक महासंकटे [२१८] देखील त्याला केवळ आपल्या स्वतःच्या पौरांचा गौरव करायच्या कामी येतात. आणखी अधिक सांगायचे म्हणजे हा स्वयंसेवी "वैद्यकीय मदतनीस" इंग्रजांच्या लेखी याच्या योगाने "सर्जन"चे रूप धारण करून राहिला आहे.

मार्क्स यांचे एन्गल्स यांना पत्र,
तारीख २ सप्टेंबर १८७०
मार्क्स/एन्गल्स, वेर्के, खंड ३३ वा,
१९६६, पृष्ठ ५०

९

उदात्त कवि फ्रायलिग्राथ या क्षणी आपल्या मुलीकडे राहायला आलाय. मला आपले तोंड दाखवायची त्याला हिंमत होत नाही. जर्मन तुच्छतावाद्याने त्याला जे ५०,००० टेलर्स दिले, [२१९] त्यांच्या बदल्यात "जर्मानिया, अगे अभिमानी महिले" [२२०] अशा प्रकारची टिर्टाइयन गाणी वगैरे रचणे त्याला भाग आहे.

मार्क्स यांचे सीग्फ्रीड मायेर यास पत्र,
तारीख २१ जानेवारी १८७१
मार्क्स/एन्गल्स, वेर्के, खंड ३३ वा,
१९६६, पृष्ठ १७३

वीर्थ

"उमेदवार कामगारांचे गाणे"
कवि : जॉर्ज वीर्थ (१८४६)

चेरी वृक्षांना मोहोर आला अशा वेळी,
आम्ही राहात होतो फ्रँकफुर्ट शहरी.
चेरी वृक्षांना मोहोर आला अशा वेळी,
आम्ही राहात होतो या शहरी.

यजमान माझा, घरवाला माझा, फटकन् बोलला हो :
"कोटांच्या तुमच्या झाल्या आहेत जीर्ण चिंध्या."

"हे बघ रे, ए घाणेरड्या घरमालका,
तुला त्याच्याशी काही एक करायचे नाय,
"आता दे आम्हाला मद्य तुझे,
आणि दे आम्हाला तुझी बीयर,
आणि बीयर व मद्य यांच्या जोडीला,
आण इथे आमच्यासाठी तळलेले मांस."

कोंबडा आरवे खुराड्यामधी,
वाहत येते बाहेर छान काही तरी
आणि आमच्या तोंडात चव आहे त्याची
लघवी केल्यापरी

आणि मग त्याने आणला ससा
पार्स्लीच्या पानात गुंडाळलेला
आणि हा मेलेला बिचारा ससा बघून
आम्ही सगळेच गेलो घाबरून

आणि आम्ही रात्री बिछान्यात झोपलो
रात्रीची प्रार्थना म्हणत म्हणत,
लवकर झोपा, उशीरा झोपा
ढेकूण चावत राहतातच.

हे घडले एकदा फ्रँकफुर्ट शहरी,
किती छान आणि सुंदर ते शहर,
त्याला ठाऊक आहे एका काळी तिथे कोण कोण राहात होते
आणि तिथे कोणी कोणी हाल काढले. a

---

a इंग्रजी अनुवाद : आलेक्स मिलर. — संपादक

आमचा मित्र वीर्थ याची ही कविता मला मार्क्सच्या कागदपत्रांत पुन्हा सापडली. वीर्थ हा जर्मन कामगार वर्गाचा पहिला आणि सगळ्यात जास्त महत्त्वाचा कवि. व्हाइनलँडमधील आईवडिलांचा पुत्र. तो डेट्मोल्ड येथे जन्मला. तिथे त्याचे वडील चर्च सुपरिंटेंडंट होते. १८४३ साली माझे वास्तव्य मॅन्चेस्टर येथे असताना वीर्थ ब्रॅडफोर्डला आपल्या जर्मन कंपनीचा एजंट म्हणून आला, आणि आम्ही अनेक आनंददायक रविवार एकत्र घालविले. १८४५ साली मी आणि मार्क्स ब्रुसेल्स येथे वास्तव्य करून असताना वीर्थने आपल्या कंपनीची युरोपची एजन्सी घेतली आणि त्याने गोष्टी अशा जमवून आणल्या की त्याला देखील ब्रुसेल्स हे आपले मुख्य ठाणे करता आले. १८४८ च्या मार्च महिन्यातील क्रान्तीनंतर आम्ही सगळे कलोन येथे न्यूए व्हेनिश्चे झायटुंग या वृत्तपत्राची स्थापना करण्यासाठी एकत्र जमलो. वीर्थने आपल्याकडे हास-परिहासाचे लेखन घेतले. आणि अन्य कोणत्याही वृत्तपत्रामध्ये असला घणाघाती व हसविणारा हास-परिहास असेल असे मला वाटत नाही. "Leben und Thaten des beruhmten Ritters Schnapphahnski" यामध्ये प्रिन्स लिच्नोव्स्की याच्या साहसांचे वर्णन असायचे. या प्रिन्सला हे नाव कवि हायने याने आपल्या "अट्टा ट्रोल" या कवितेत दिलेले आहे. या त्याच्या लेखाची गणना त्याच्या अत्यंत महत्त्वाच्या लेखांमध्ये होते. घटना सगळ्या सत्य होत्या; त्या आम्ही हस्तगत कशा केल्या, याची हकीकत कदाचित पुन्हा केव्हा तरी सांगू. संकलित केलेले Schnapphahnski हास परिहास हे हॉफ्फमान आणि कॅम्पे यांनी १८४९ साली पुस्तकरूपाने प्रसिद्ध केले आणि ते अजून आज देखील खूपच करमणूक करतात. तथापि तारीख १८ सप्टेंबर १८४८ रोजी Schnpphanski-Lichnowski हा प्रशियन जनरल फॉन ऑयेर्सवाल्ड (हा देखील पार्लमेंटचा सदस्य होता) याच्या समवेत शेतकऱ्यांच्या तुकड्यांवर हेरगिरी करायला घोड्यावर स्वार होऊन निघाला. या शेतकरी तुकड्या फ्रॅंकफूर्ट येथील मेढेकोटांवर लढणाऱ्या लढवय्यांना सामील व्हायला चाललेल्या होत्या. शेतकऱ्यांनी त्याला व ऑयेर्सवाल्डला या दोघांनाही हेर म्हणून यथायोग्यपणे ठार केले आणि म्हणून जर्मन बादशाही सरकारने मृत लिच्नोव्स्कीचा अपमान केल्याच्या आरोपावरून वीर्थवर खटला भरला. वीर्थ हा फार पूर्वीच इंग्लंडला निघून गेलेला होता आणि न्यूए व्हेनिश्चे झायटुंग हे वृत्तपत्र प्रतिगाम्यांनी बंद पाडल्यानंतर किती तरी वेळाने वीर्थला तीन महिन्यांची कैदेची शिक्षा फर्मावली. मागाहून वीर्थने ही तीन महिन्यांची शिक्षा प्रत्यक्षात भोगली, कारण त्याला त्याच्या धंद्यासाठी वारंवार जर्मनीला जावे लागत होते.

१८५०-५१ साली तो ब्रॅडफोर्डच्या आणखी एका कंपनीसाठी स्पेनला गेला, तिथून वेस्ट इंडीजला गेला आणि त्याने जवळजवळ सगळी दक्षिण अमेरिका पालथी घातली. थोड्या मुदतीसाठी युरोपला भेट दिल्यानंतर तो परत आपल्या लाडक्या वेस्ट इंडीजला गेला. तिथे त्याला लुई नेपोलियन तिसरा याची अस्सल मूर्ति म्हणजे

हैटी येथील नीग्रो राजा सूलूके याचे दर्शन घ्यायचा आनंद त्याला हातचा सोडायला नको होता. तथापि, तारीख २८ ऑगस्ट १८५६ रोजी डब्ल्यू. वूल्फ याने मार्क्सला लिहिले तदनुसार, त्याला "क्वारंटाइन अधिकाऱ्यांच्या अडचणी आल्या, आणि तो विचार त्याला सोडून द्यावा लागला. या प्रवासात त्याला (यलो) फीवरची बाधा झाली आणि तो ताप तसाच घेऊन तो हॅव्हाना येथे गेला. या तापाने आजारी असतानाच त्याला मॅंदूज्वराने देखील गाठले आणि जुलै महिन्यात तारीख २० रोजी हॅव्हाना येथे आमचा वीर्थ कालवश झाला."

मी त्याला जर्मन कामगार वर्गाचा पहिला आणि सगळ्यात जास्त महत्त्वाचा कवि म्हटले आहे. खरे सांगायचे म्हणजे त्याच्या समाजवादी व राजकीय कविता स्वतंत्र प्रज्ञा आणि विनोदीपणा या गुणांच्या बाबतीत, आणि त्यांतल्या तडफदार भावनाशीलतेच्या बाबतीत फ्रायलिग्राथच्या कवितांच्या मानाने खूपच उजव्या आहेत, तो अनेकदा हायनेच्या काव्यप्रकारांचा वापर करीत असे, परंतु तो करताना तो सर्वस्वी स्वतंत्र, नवीन आशय त्यात ओतत असे. यात भरीला भर म्हणजे इतर बहुतेक सगळ्या कवींच्यापेक्षा त्याचे वेगळेपण हे होते की एकदा लिहून झाल्यानंतर आपल्या कवितांविषयी तो अगदी उदासीन असे.

मार्क्सला किंवा मला कवितांची प्रत धाडून दिल्यानंतर तो आपल्या कविता तशाच पडून राहू देत असे आणि त्या छापून घ्यायच्या कामी त्याचे मन वळविणे अनेकदा फार कठीण जात असे. फक्त न्यूए ऱ्हेनिश्चे झायटुंग प्रसिद्ध होत होते त्या काळात तेवढा मामला वेगळा होता. वीर्थने तारीख २८ एप्रिल १८५१ रोजी हाम्बुर्ग येथून मार्क्सला धाडलेल्या एका पत्रातला पुढील उतारा याचे कारण दाखवून देतो :

"ओघाओघांत सांगायचे म्हणजे जुलै महिन्याच्या आरंभी मी तुम्हाला पुन्हा लंडन येथे भेटायची उमेद धरून आहे, कारण हाम्बुर्ग शहरातल्या या टोळभैरवांची संगत मला अतःपर सहन होऊ शकत नाही. इथे मला खरोखरी सुंदर जीवनाचा धोका उद्भवला आहे आणि त्याची मी धास्ती घेतलेली आहे. अन्य प्रत्येक जण ते दोन्ही हातांनी गपकन पकडून घेईल. परंतु तुच्छतावादी व्हायचे आता माझे वय राहिलेले नाही आणि सागरापलीकडे दूरस्थ वेस्ट इंडीज आहेच ....

"अलीकडे मी सर्व प्रकारचे काहीबाही लिहिलेले आहे, परंतु त्यांतल्या कशा चीच पूर्तता केलेली नाही, कारण या सगळ्या लेखनामध्ये मला कसलाच उद्देश, कसलेच ध्येय दिसत नाही. तुम्ही अर्थशास्त्रावर काही तरी लिहिता तेव्हा त्यांत काही तरी अर्थ असतो, समंजसपणा असतो. पण मी ? सपक विनोदी चुटके आणि नेभळट टीकाप्रहार या पितृभूमीतल्या कुरूप चेहऱ्यांवर बावळट स्मिताची रेषा चुचकारून उमटवायला लावण्यासाठी लिहायचे--मी मनापासून सांगतो आहे, याहून अधिक तिरस्करणीय असे काही असेल हे मला तरी मुळीच ठाऊक नाही. लेखक या नात्याने माझी कामगिरी न्यूए ऱ्हेनिश्चे झायटुंग याच्या समवेत निश्चितपणे संपली.

"गेली तीन वर्षे मी निरर्थक दवडली आहेत, नक्कीच निरर्थक दवडली आहेत, याचा जसा मला खेद होतोय, तसाच, कलोन येथील आपले जीवन आठवू लागल्यावर मला आनंद होतोय, हे मला कबूल करणे भाग आहे. आम्ही स्वतःला कोणाच्याही आहारी जाऊ दिले नाही! हीच सगळ्यांत जास्त महत्त्वाची गोष्ट आहे. फ्रेडरिक द ग्रेट नंतर न्यूए ऱ्हेनिश्चे झायटुंगने जर्मन जनतेला जितक्या संपूर्ण en Canaille a वागविले, तितके कोणीही वागविलेले नाही.

"आणि ही माझी कर्तबगारी होती असे मी म्हणत नसलो तरी मी तिथे होतोच....

"ओ पोर्तुगाल! ओ स्पेन!" (वीर्थ नुकताच तिकडून आलेला होता) "तुमचे सुंदर आकाश, तुमचे मद्य, तुमची संत्री आणि मिर्टल्स जर आमच्याकडे असती तर किती छान झाले असते! पण नाही, ते सुद्धा नाही. पाऊस आणि लांब नाके आणि धुरावलेले मांस यांच्याशिवाय काहीच नाही.

"पाऊस आणि लांब नाक यांच्यासमवेत, तुमचा,

जी. वीर्थ"

वीर्थचे प्रभुत्व ज्या बाबतीत आहे, ज्या बाबतीत तो हायनेपेक्षा वरचढ आहे (कारण तो अधिक निरोगी व अधिक अस्सल आहे) आणि ज्या बाबतीत जर्मन भाषेत फक्त गटेच्या खालोखाल त्याचा क्रमांक लागतो, तो गोष्ट म्हणजे नैसर्गिक धष्टपुष्ट शृंगारिकतेची व शारीरिक मस्तीची त्याची अभिव्यक्ती ही होय. न्यूए ऱ्हेनिश्चे झायटुंगमधील हास-परिहास सदरातील काही हास्यकथा मी जर पुनर्मुद्रित केल्या तर सोत्तियाल देमोक्रातच्या [२२१] अनेक वाचकांना धक्काच बसेल. असे करणे माझ्या स्वप्नात देखील येणार नाही, परंतु एक भाष्य केल्यावाचून मला राहवत नाही. ते भाष्य म्हणजे हे की हा शेवटचा जर्मन तुच्छतावादी पूर्वग्रह जर्मन समाजवाद्यांनी उघडपणे दूर झुगारून द्यायचा क्षणदेखील आलाच पाहिजे. हा दोंगी मध्यमवर्गीय शिष्टपणा म्हणजे कोणत्याही बाबतीत चोरून चाललेल्या बदफैलीपणावरील हे पांघरूण आहे, याहून अधिक काहीही नाही. उदाहरणार्थ, फ्रायलिग्राथच्या कवितांचे वाचन करताना आपल्याला असे ठामपणे वाटायला लागते की लोकांच्या ठायी लैंगिक अवयव मुळी नाहीतच. परंतु हा जो फ्रायलिग्राथ आपल्या कवितेत इतका अतिसोज्ज्वळ आहे, त्याच्या इतका अधिक आनंद चोरून एखादा घाणेरडा विनोद ऐकून कोणालाच होत नसेल. किमानपक्षी जर्मन कामगारांनी तरी आपण ज्या गोष्टी दररोज दिवसा अगर रात्री करतो, ज्या गोष्टी स्वाभाविक, अपरिहार्य व असामान्य सुखकारक असतात त्यांच्याविषयी मोकळेपणाने बोलायचा सराव करायला हवा. असे मोकळेपणाने बोलायचे की जसे रोमान्स लोक बोलत असत, होमर बोलत असे आणि प्लेटो,

---

a. सौजन्यशून्यपणाने. — संपादक

होरेस आणि जूवेनाल हे बोलत असत, बायबलचा जुना करार बोलत असे आणि न्यूए ऱ्हेनिश्चे झायटुंग बोलत असे.

ओघाओघात सांगायचे म्हणजे वीर्थ देखील कमी धक्कादायक कविता लिहीत असे आणि त्यांतल्या काही अधून मधून सोत्सियाल देमोक्रातच्या हास-परिहास सदरासाठी मी पाठवत जाईन.

फ्रेडरिक एन्गल्स,
"'शिकाऊ उमेदवारांचे गाणे'
कवि जॉर्ज वीर्थ"
मार्क्स/एगल्स, वेर्के,
खंड २१ वा, १९६२, पृष्ठे ५-८

कामगारवर्गीय चळवळीतील श्रेष्ठ व्यक्तिमत्त्वे. योहान फिलिप बेकर

१

प्रिय बेबेल,

मी हे पत्र तुम्हाला लिहितोय ते वयोवृद्ध योहान फिलिप बेकर यांच्याशी माझे जे संभाषण झाले त्याच्यामुळे लिहितो आहे. ते माझ्यासमवेत इथे दहा दिवस राहिले आणि आता ते जीनीव्हाला परत गेले असतील पॅरिसमार्गे (दुर्दैवाने तिथे त्यांना आपली कन्या अनपेक्षितपणे निधन पावलेली आढळली!) या वृद्ध महापुरुषाची पुन्हा भेट झाल्यामुळे मी फारच खूष झालो; ते शारीरिक दृष्ट्या जरी वृद्ध झालेले असले तरीही ते अजून आनंदी असतात आणि त्यांनी आपला चांगला लढाऊ बाणा टिकवून ठेवलेला आहे. तो आपल्या ऱ्हाइन फ्रँकिश पुराणकथेतील मूर्तरूप धारण केलेले Nibelungenlied -- फिडलवाला फोल्कर--खुद्द थेट तोच आहेत.

कित्येक वर्षे झाली, मी त्यांना आपल्या आठवणी व अनुभव लिहून काढायला सांगितले. आणि आता ते सांगतात की तुम्ही आणि इतरांनी देखील या बाबतीत त्यांना उत्तेजन दिले आहे आणि ते अनेक प्रसंगी लिहायला सुरुवात देखील करून राहिले; परंतु त्यांना खरेखुरे उत्तेजन अत्यल्प मिळाले. फुटकळ प्रकाशन तेवढे झाले (ही गोष्ट न्यूए वेल्ट[२२२] याच्या बाबतीत घडली. काही वर्षांपूर्वी त्यांनी त्याच्याकडे

कित्येक अगदी छान छान गोष्टी घाडल्या; तथापि, त्या पुरेशा "कादंबरीच्या स्वरूपातल्या" नसल्याचे आढळून आले; मॉट्टेलर यांच्या द्वारा लीबनेख्टने त्यांना असे कळविले.)

एन्गल्स यांचे ऑगस्ट बेबेल यास पत्र,
तारीख ८ ऑक्टोबर १८८६

मार्क्स/एन्गल्स, वेर्के, खंड ३६ वा, १९६७,
पृष्ठ ५४१

२

बेकर हा दुर्मिळ दानतीचा माणूस होता. एकाच शब्दात त्याचे संपूर्ण वर्णन करता येते; तो शब्द म्हणजे **निरोगी** : तो शरीर आणि मन या दोन्ही बाबतीत शेवटपर्यंत निरोगी होता. दणगट बांध्याचा देखणा माणूस आणि प्रचंड शारीरिक सामर्थ्य असलेला. त्याची आनंदी मनोवृत्ती व निरोगी कामगिरी यांच्या योगाने त्याने आपल्या शालेय शिक्षण न घेतलेल्या, परंतु अजिबात असंस्कृत नसलेल्या मनाची मशागत आपल्या शरीराप्रमाणेच सुसंवादीपणाने केली. योग्य मार्गाने जाण्यासाठी ज्यांना केवळ आपल्या नैसर्गिक उपजत बुद्धीलाच अनुसरणे भागण्याजोगे असते अशा अगदी थोड्या पुरुषांमध्ये त्याची गणना होत होती. याच कारणास्तव त्याला क्रान्तिकारक चळवळीच्या विकासाच्या बरोबरीने वावरणे आणि वयाच्या अठराव्या वर्षातल्याप्रमाणेच अठ्ठ्याहत्तराव्या वर्षी तितक्याच तडफेनिशी आघाडीच्या दलांमध्ये राहणे त्याला सोपे गेले. १८१४ साली आपल्या देशांतून जाणाऱ्या कोसाकांशी खेळणारा मुलगा, १८२० साली कोझेब्यूचा मारेकरी सँड याला फाशी दिलेले ज्याने पाहिले तो मुलगा, मोठा होता होता विशीच्या दशकात अनिश्चित विरोधकाच्या भूमिकेतून सतत विकास करून घेत घेत १८८६ साला देखील तो चळवळीच्या अग्रभागी राहिला. तसेच १८४८ सालातील बहुसंख्य "गंभीर" रिपब्लिकनांसारखा तो उदासवाणा उच्चतत्त्ववादी अडाणी माणूस नव्हता; तर तो आनंदी फ्राल्सचा सच्चा पुत्र होता, जीवनाची आवड असलेला, मद्य, मदिराक्षी आणि गाणे यांचा इतर कोणाही प्रमाणे प्रेमी होता. वर्म्सनजीक Nibelungenlied च्या देशात तो लहानाचा मोठा झालेला होता. आणि आपल्या उत्तरायुष्यात देखील तो आमच्या प्राचीन महाकाव्यातल्या व्यक्तिरेखेसारखा दिसत असेः तरवारीचे वार करता करताना मध्येच आनंदाने व उपहासाने शत्रूला आवाहन करणारा, आणि हाणामारी करण्याजोगे काहीच नसेल तेव्हा

लोकगीतांची रचना करणारा असा तो होता--असाच आणि केवळ असाच तो दिसला असला पाहिजे, फिडलवाला फोल्कर!

फ्रेडरिक एन्गल्स, "योहान फिलिप बेकर"
मार्क्स/एन्गल्स, वेर्के, खंड २१ वा, १९६२,
पृष्ठ ३२३-२४.

३

लीब्नीझ आणि "आल्लेस वूर्स्ट" यांच्यावरील तुमच्या दोन छोट्या कवितांनी मी भलताच मोहित झालो, तुम्ही (माझी सूचना तुम्हाला मान्य असेल तर) वेडेमेयरला धाडायच्या पहिल्याच पत्राला त्या जोडल्यात तर चांगले होईल.

मार्क्स यांचे योहान्न फिलिप बेकर यास पत्र,
तारीख ९ एप्रिल १८६०
मार्क्स/एन्गल्स, वेर्के, खंड ३० वा, १९६४,
पृष्ठ १२७.

रशियन साहित्य

रशियन भाषा

१

मी १८७० च्या आरंभी रशियन भाषेचा अभ्यास सुरू केला हे मी तुम्हाला सांगितले का नाही माझ्या लक्षात नाही. आता मी रशियन भराभर वाचतो. हे घडून आले याचे कारण म्हणजे पीटर्सबर्ग येथून "रशियातील कामगारवर्गाची (त्यातल्यात्यात शेतकऱ्यांची) स्थिती" या विषयावरील फ्लेरोव्स्कीचे फार महत्त्वाचे पुस्तक माझ्याकडे धाडण्यात आले आणि दुसरे कारण म्हणजे मला देखील चेर्निशेव्स्कीच्या सर्वोत्कृष्ट अर्थशास्त्रीय ग्रंथांचा परिचय करून घ्यायला हवा होता (या कामगिरीचे बक्षीस म्हणून चेर्निशेव्स्कीला सैबेरियन खाणीत सक्तमजुरी करायची शिक्षा मिळालेली आहे आणि तिथेच तो गेली सात वर्षे शिक्षा भोगत आहे). माझ्या वयाच्या माणसाने अभिजात, जर्मानिक आणि रोमान्स भाषिक गटांहून खूप मोठ्या प्रमाणात वेगळी असलेल्या भाषेवर प्रभुत्व मिळवायचा प्रयत्न केला आणि तो प्रयत्न कारणी लागला. आजच्या घडीला रशियात जी बौद्धिक चळवळ चाललेली आहे तिच्यावरून ही खळबळ पृष्ठभागाच्या खाली खूप खोलवर गेली असल्याचे प्रत्यंतर मिळते. मने सदैव अदृश्य धाग्यांनी जनतेच्या शरीराशी जोडलेली असतात.

मार्क्स यांचे सीग्फ्रीड मेयेर यास पत्र,
तारीख २१ जानेवारी १८७१

मार्क्स आणि एन्गल्स, निवडक पत्रव्यवहार,
मॉस्को, १९७५, पृष्ठ २४१.

२

रशियन चळवळीतील अनेक विचित्र घटितांचा उलघडा ज्या वस्तुस्थितीमुळे होतो ती अशी : बराच काळपर्यंत प्रत्येक रशियन ग्रंथ हा पाश्चात्यांच्या लेखी सात

सिले लावलेला बंदिस्त ग्रंथ होता आणि बाकूनिन आणि कंपनीला आपल्या कामगिऱ्या लंपवून ठेवणे सोपे झाले. वस्तुतः या कामगिऱ्या फार पूर्वीपासूनच रशियनांना, म्हणजे पश्चिमेकडील रशियनांना माहीत होत्या....आता हे बंद झाले आहे. रशियन भाषेचे ज्ञान हे अतःपर, किमानपक्षी जर्मन सोशल डेमोक्रॅटांमध्ये, फारसे दुर्मिळ राहिलेले नाही. रशियन भाषेचा अभ्यास भरपूर फलदायी आहे. ही भाषा उपलब्ध सगळ्या भाषांमध्ये अत्यंत विचारप्रदर्शनक्षम आणि समृद्ध आहे आणि हिचे साहित्यही समृद्ध आहे. या दोन्ही कारणांसाठी हिचा अभ्यास भरपूर फलदायी आहे-- आणि हिच्यामध्ये उपलब्ध असलेले साहित्य अतःपर निदानपक्षी जर्मन सोशल डेमोक्रॅटांमध्ये तरी फारसे दुर्मिळ राहिलेले नाही.

फ्रेडरिक एन्गल्स, "Fluchatlingsliteratur"
मार्क्स / एन्गल्स, वेर्के, खंड १८ वा, १९६९,
पृष्ठे ५४४-४५

३

माझ्या पुस्तिकेचा तुम्ही केलेला अनुवाद मला उत्कृष्ट वाटतो.[२२३] रशियन भाषा किती सुंदर आहे ! तिच्या ठायी जर्मन भाषेचे सगळे चांगले गुण आहेत, मात्र जर्मन भाषेचा भयंकर खडखडीतपणा तिच्यांत नाही.

एन्गल्स यांचे वेरा झासुलिच हिला पत्र,
तारीख ६ मार्च १८८४

मार्क्स आणि एन्गल्स, निवडक पत्रव्यवहार,
मॉस्को, १९७५, पृष्ठ ३४९

द ले ऑफ इगोर्स होस्ट

एड्खहॉफकृत Histoire de la langue et de la litterature des slaves (पॅरिस १८३९) (स्लाव लोकांच्या भाषेचा व साहित्याचा इतिहास) हा फारच कंगाल ग्रंथ आहे. व्याकरणविषयक भागाविषयी मला अभिप्राय देता येत नाही, तो एक असो (तथापि लिथुआनियन व लात्वियन यांना स्लाव म्हणून जाहीर करण्यात आल्याची मी नोंद घेतली. हा मूर्खपणा नव्हे काय ?), उर्वरित भाग बहुतांशी साफारिकच्या ग्रंथांतून चोरलेला आहे. याने स्लाव लोकांच्या राष्ट्रीय कवितांचे नमुने मुळातले दिले आहेत व त्यांच्या सोबत त्यांचे फ्रेंच अनुवाद दिले आहेत. त्यांमध्ये

मला द ले ऑफ इगोर्स होस्ट ही कविता सापडली. या कवितेचा गाभा म्हणजे मोगल फौजांच्या स्वारीच्या जरा अगोदर, रशियन संस्थानिकांना एकी करायचे आवाहन आहे. हिच्यातला एक उतारा अगदीच विचित्र आहे : "Voici les jolies filles des Gothes entonnent leurs chants au bord de la Mer Noire." @याच्या अनुरोधाने असे दिसते की गेथ्स किंवा गॉथ्स हे टर्किश पोलोव्त्सीचा रशियन लोकांवरचा विजय साजरा करीत होते. एकंदर पोवाडा वीररसात्मक-ख्रिस्ती स्वरूपाचा आहे, मात्र त्यांतले बिनख्रिस्ती घटक अजून खूपच जाणवतात. बोहेमियन वीररसात्मक महाकाव्य Zaboi (samo?) हे बोहेमियन लोकांच्या[२२४] वीररसात्मक कवितांच्या संग्रहातले असून ते Hanka and swoboda यांनी जर्मन अनुवादरूपाने प्रसिद्ध केलेले आहे. ते उलट पक्षी अगदी टीकात्मक आणि कट्टर जर्मन-विरोधी आहे. त्याचा रोख डागोबेर्टचा जर्मन कॅप्टन याच्या विरुद्ध असून बोहेमियनानी त्याचा पराभव केलेला असतो. परंतु जर्मनांविरुद्ध सूड घ्यायचे जसे हे आवाहन आहे तसेच हे ख्रिस्ती धर्माविरुद्धही सूड घ्यायचे आवाहन आहे, मात्र ओघाओघाने सांगायचे म्हणजे यांत जर्मनांवर एक फारच पोरकट काव्यमय स्वरूपाचा आक्षेप घेतलेला आहे. तो म्हणजे हा की शूर बोहेमियनांवर एकाच पत्नीवर संतुष्ट राहण्याची सक्ती करायला जर्मनांना हवी आहे.

मार्क्स यांचे एन्गल्स यास पत्र,
तारीख ५ मार्च १८५६
मार्क्स/एन्गल्स, वेर्के, खंड २९ वा, १९६७,
पृष्ठ २३

लोमोनोसोव
स्लाविक भाषा आणि भाषाशास्त्र[२२५]

रोस्सीइस्काया आन्तोलोगियाः रशियन कवींच्या कवितांचे नमुने. अनुवादक जे. बोव्रिंग, दुसरी आवृत्ती, लंडन, १८२१.

Vam, Vam pletut charity
Bezsmetnyje vency !
Ja vami Zde's vkusaju
Vostorgi Pierid,

---

a "गॉथ लोकांच्या सुंदर युवती काळ्या समुद्राच्या किनाऱ्यावर आपली गाणी गात असलेल्या बघा."--संपादक

I vradosti vzyvaju
O muzy ! ja hiit ! a

मिखाइल वासीलियेविच लोमोनोसोव यांचा जन्म खोल्मोगोरी येथे १७११ साली झाला. ते एका नाविकाचे पुत्र होते. त्यांनी झाकोनोस्पास्काया शाळेत अभ्यास केला. १७३४ b साली ते बादशाही अकादमीमध्ये दाखल झाले आणि १७३६ साली त्यांना विद्यार्थी म्हणून जर्मनीला धाडण्यात आले; नंतर ते सेंट पीटर्सबर्ग शहरी रसायनशास्त्राचे प्राध्यापक झाले; १७५१ c साली त्यांना अकादमीचे सदस्य करण्यात आले, आणि १७६० साली त्यांना अकादेमिकल जिम्नॅशियमचे व विद्यापीठाचे संचालक म्हणून नेमण्यात आले. १७६५ साली त्यांचे निधन झाले. समग्र ग्रंथांचे प्रकाशन पीटर्सबर्ग आकादमीने केले, तिसरी आवृत्ती, १८०४.

क्रात्कीय ल्येतोपीसेक (संक्षिप्त रशियन बखरी).
द्रेव्नेया रोस्स. इस्तोरिया—ख्रिस्तपूर्व १०५४ पर्यंत.
रोस्सियास्काया ग्राम्मातिका.
क्रात्कोये रुकोवोद्स्त्वो क क्रास्नोरेसीयू (अलंकार शास्त्र).
पी'स्मो ओब् प्राविलाच् रोस्स. स्तिचोत्वोस्त्वा.
प्रेदिस्लोविये ओब् पोल्झे क्नीग स्येर्कोव्निच.
स्लोवो पोच्वा'ल्नोये (य'लोगे) इम्पे येलिसावेते पहिली.
दो इम्पेरातोरू पेत्रु वेलिकोमू
स्लोवो ओ पो'ल्झे खिमीयी (रसायन-शास्त्राच्या उपयोगाविषयी)
दो ओ याव्लेनियेख वोइद्युस्निख ओत एलेक्त्रीसेस्कोइ सीली प्रोइझ्खोदेस्सिच (विद्युत्शक्तीने घडविलेल्या वातावरणविषयक घटितांविषयी)
दो ओ प्रोइझ्खोझ्देदेनिया स्वेता, नोवूयू तेओरीयू ओ स्वेताख प्रेद्स्तावल्ये-यूस्सेये (प्रकाशाच्या उद्गमाविषयीचा, रंगांविषयीचा नवा सिद्धांत)

---

a स्वर्गीय वृंदगायकांनो ! आशीर्वचने सगळी लपेटून राहिली आहेत
सगळ्या ईश्वरी हारांची तुम्हावरी;
आणि तुमच्या समवेत मी आनंदांचे घुटके घेतोय
पिएरियन झऱ्यासभोवार लखलखत असलेल्या,
आणि मी गातोय दिव्यानंदाच्या बेहोशीत,
"Ed io anche son pittore".

b बोव्रिंग याची ही चूक आहे. १७३४ नव्हे, १७३६. --संपादक

c बोव्रिंग याची ही चूक आहे. ते १७४५ साल हवे. --संपादक

दो ओ रोइदेनियू मेताल्लोव ओत् त्रेसेनिया झेम्ली [भूकंपाच्या योगाने धातूंमध्ये झालेल्या बदलांविषयी)

रोझ्झइदेनिये ओ बोल्सेइ तोक्नोस्ती मोस्कोवो पूता

याव्ल्येनिये वॅनेरी ना सोल्म्से.

प्रोग्रामा सोसिनेन्नाया प्री (१) नाचाले स्तेनिये इस यासेनिये फिझीकी (भौतिक शास्त्रावरील व्याख्यानांच्या पूर्वतयारीचा कार्यक्रम)

ओपिसानिये व नाचाले १७४४ चा जेव्रीवसेयास्या कोमेतू.

पेर्विये ओझ्नोवानिये मेतालूर्गीयी.

शेस्त्नाद्झात पीसेम क जे. जे. सुवालोवू.

कविता. पियोत्र वेलीकीये, महाकाव्य.

तामीरा इ सेलिम, शोकनाट्य.

पीस्मो ओ पोल्झे, स्तेक्ला (काचेच्या गुणधर्माविषयी काव्यमय वर्णन) (याचा फ्रेंच गद्य अनुवाद, पॅरिस, १८००).

(लोमोनोसोव) a

ओदा ना स्चास्तिये (सौख्य गीत).

वान्चान्नाया नाद्येझ्दा रोस्सीइस्कोवो इम्पेरीइ

हारमंडित आशा, वगैरे, जर्मन भाषेत अनुवाद प्रोफेसर युंकरकृत.

अकरा आध्यात्मिक स्तोत्रे; स्तुतिपर गीते, ४९ अर्पणपत्रिका, शोभेच्या दारूकामाचे वर्णन; आनाक्रियोन वगैरेचे अनुवाद व अनुकरणे, तसेच लूसियेनकृत मृतांच्या संवादाचा अनुवाद b

फ्रेडरिक एन्गल्स, "लोमोनोवविषयींची टिपणे"
वप्रोसी फिलोसोफीई, १९५०, अंक ३ रा, पृष्ठ १२२

देर्झाविन

सुमारे ऐंशी वर्षांपूर्वी कॅथेराइन दुसरी हिच्या विजयी सेना प्रान्तांमागून प्रान्त टर्कीपासून तोडून घेत असताना आणि त्यांचे परिवर्तन आता ज्याला दक्षिण रशिया म्हणतात त्यामध्ये होत असताना कवि देर्झाविन याने आपल्या भावगीत लेखनाच्या उत्साहाच्या भरात महाराणीचा गुणगौरव केला नसला तरी तिच्या विजयांचा आणि

---

a इथे लोमोनोसोवविषयीचा पहिला विभाग समाप्त होतो.— संपादक

b हा संदर्भ लोमोनोसोवने अनुवादिलेल्या लूसियेनकृत "मृत्यूच्या राज्यातील संवाद" तील उताऱ्यांना अनुलक्षून आहे. —संपादक.

तिच्या साम्राज्याच्या वैभवाचा उत्सव साजरा करता करता दोन संस्मरणीय काव्य-चरण लिहिले आणि त्यांमध्ये झारशाहीच्या घोरणाचा तुच्छतापूर्ण बेडरपणा व स्वावलंबन यांचा अर्क अजून आपल्याला सांपडतो. ते चरण असे :

"आणि, हे रूस, पर्वा काय तुला कोणत्याही दोस्ताची ?
पुढे चाल कर आणि सगळे विश्व तुझेच आहे !" २२६

फ्रेडरिक एन्गल्स, "डान्यून नदीवरील युद्ध,"
इंग्रजीत लिहिलेला लेख,
न्यूयॉर्क डेली ट्रिब्यून,
तारीख २५ जुलै १८५४

पुश्किन

तुमच्या बाबतीत चांगले पीकपाणी म्हणजे धान्याचे भाव उतरणे असा याचा हमखास अर्थ नसतो, या वरवरच्या अन्तर्विरोधाबाबतची तुमची टिपणे फारच मजेशीर आहेत. विविध देशांतील अणि संस्कृतीच्या विविध टप्प्यांवरील आर्थिक संबंधांचा अभ्यास आपण करतो, तेव्हा १८ व्या शतकाचे बुद्धिवादी सर्वसाधारण निष्कर्ष कितीतरी चुकीचे व अपुरे दिसतात—वयोवृद्ध सज्जन ॲडाम स्मिथचेच बघा ना; त्याने एडिन्बर्गची व लोथियन्सची परिस्थिती नेहमीची म्हणजे विश्वाची म्हणून गृहीत धरली ! पुश्किनला अगोदरच ठाऊक होते की

....इ पचेमू
न्ये नूझनो झोलोता येमू
कग्दा प्रसोइ प्रोदुक्तं इमेयेत.
अत्येत्स पन्यात् येवो न्ये मोग
इ इयेम्ली अत् दावाल व झालोगa

एन्गल्स यांचे निकोलाय दानियेल्सन यास पत्र,
तारीख २९-३१, १८९१
मार्क्स आणि एन्गल्स, निवडक पत्रव्यवहार,
मॉस्को, १९७५, पृष्ठ ४१३

---

a सोन्याचा उपयोग काय तया ? संपत्ति जयाची निसर्गाचि निर्मिती
वडिलांना अपुला पुत्र उमगला नाही
टाकिली तयानी सगळी जमिन गहाण२२७

चेर्निशेव्स्की आणि दोब्रोल्यूबोव

१

ज्या देशाने दोब्रोल्यूबोव व चेर्निशेवस्की यांच्या तोलाचे दोन लेखक निर्माण केलेले आहेत, म्हणजे दोन समाजवादी लेसिंग निर्माण केलेले आहेत, तो देश बाकूनिनसारखा भंपकराव व मूठभर अर्धे कच्चे विद्यार्थी त्याच वेळी जन्माला घालतो म्हणून काही तेवढ्याचसाठी त्याचा अधःपात होणार नाही. हे मूठभर लोक बड्या बड्या शब्दांचा वापर करतात, बेडकांसारखे फुगतात आणि शेवटी एकमेकांना गट्ट करतात. खरे सांगायचे म्हणजे रशियन लोकांच्या नव्या पिढीत देखील उत्कृष्ट तात्त्विक व व्यावहारिक कर्तृत्व असलेले आणि महान तडफ असलेले लोक आम्हाला माहीत आहेत. हे लोक भाषांचे आकलन करण्याच्या जोरावर वेगवेगळ्या देशांतील चळवळीचे अगदी जवळून ज्ञान संपादन करण्याच्या हिशेबी, इंग्रजांवर व फ्रेंचांवर ताण करतात आणि व्यावहारिक हुशारीच्या बाबतीत जर्मनांवर ताण करतात. ज्या रशियनांना कामगारांच्या चळवळीचे आकलन आहे आणि जे तीमध्ये भाग घेतात, त्यांना हे मात्र विचारात घेता येते की बाकुनिनवादी नीच क्लृप्त्यांविषयीच्या जबाबदारीतून त्यांना मुक्त करण्यात आले आहे आणि ही सेवा त्यांच्याकडे रुजू करण्यातआली आहे.

फ्रेडरिक एन्गल्स, "फ्युय्खट्लिंगलितेरातूर"
मार्क्स / एन्गल्स, वेर्के, खंड १८ वा, १९६९,
पृष्ठ ५४०

२

तुमच्या देशबांधवांवर तुम्ही काहीसा अन्याय करत नाही काय? आम्हा दोघांना म्हणजे मार्क्स आणि एन्गल्स यांना त्यांच्याविरुद्ध तक्रार करायला कसलीही कारणे नव्हती. काही पंथ जरी आपल्या शास्त्रीय अभ्यासापेक्षा आपल्या क्रान्तिकारक उत्साहाच्या बाबतीत अधिक लक्षणीय ठरत असले, जरी त्यांच्या ठायी इकडे तिकडे थोडेसे चाचपडणे होते व अजूनही आहे, तरी, उलट पक्षी, तिथे समीक्षणात्मक बाण्याने आपले स्वरूप प्रगट केले आहे आणि ज्या राष्ट्राने द्रोब्रोल्यूबोव व चेर्निशेवूस्की यांजसारख्यांना जन्माला घातले त्या राष्ट्राच्या योग्यतेची शुद्ध तत्त्वविचारावरील निष्ठा देखील त्यांनी प्रगट केली आहे. मी केवळ क्रियाशील क्रान्तिकारक समाजवाद्यांविषयी बोलतो आहे इतकेच नव्हे, तर रशियन साहित्यातील ऐतिहासिक व समीक्षणात्मक पंथाविषयी देखील बोलतो आहे. अधिकृत ऐतिहासिक विज्ञानाने या

क्षेत्रात जर्मनीत किंवा फ्रान्समध्ये जे काही निर्माण केले आहे त्या सगळ्यावर या साहित्याने फार मोठ्या प्रमाणात मात केली आहे.

एन्गल्स यांचे दानियेल्सन यास पत्र,
तारीख २६ जून १८८४
मार्क्स आणि एन्गल्स, निवडक पत्रव्यवहार
मॉस्को, १९७५, पृष्ठ ३५४

३

एहरलिच याच्या ग्रंथाशी माझा अंशतः परिचय आहे. लेखक या नात्याने मी त्याची तुलना लेसिंग व दीदरो यांच्याशी करतो.

मार्क्स यांचे निकोलाय दानियेल्सन यास पत्र
तारीख ९ नोव्हेंबर १८७१
इंग्रजीत लिहिलेले
मार्क्स/एन्गल्स, वेर्के, खंड ३३ वा, १९६६,
पृष्ठ ३११

पंडित व समीक्षक या नात्याने चेर्निशेव्स्कीचे मूल्यमापन

जे अजून काहीशा शास्त्रीय दर्जावर दावा सांगत होते आणि निव्वळ शब्दच्छळ करणारे व राज्यकर्त्या वर्गाचे स्तुतिपाठक असण्यापेक्षा अधिक काही व्हायची आकांक्षा बाळगून होते, त्यांनी भांडवलाच्या अर्थशास्त्राचा मेळ अतःपर दुर्लक्षिता न येणाऱ्या कामगार वर्गाच्या हक्कांशी घालायचा प्रयत्न केला. म्हणून यातून उथळ समन्वयवाद निर्माण झाला आणि याचा सर्वोत्तम प्रतिनिधी आहे जॉन स्टुअर्ट मिल्ल. भांडवलदारी अर्थव्यवस्थेचे हे दिवाळखोरीचे जाहीर प्रदर्शन मांडले आहे, आणि या प्रसंगाला अनुलक्षून महान रशियन पंडित व समीक्षक एन्. चेर्निशेव्स्की याने आपल्या "मिल्ल यांच्या भूमिकेनुसार अर्थशास्त्राच्या रूपरेखा" या ग्रंथामध्ये श्रेष्ठ विमर्शक मनाचा प्रकाशझोत टाकला आहे.

कार्ल मार्क्स, भांडवल, खंड १ ला,
मॉस्को, १९७४, पृष्ठ २५.

चेर्निशेव्स्की आणि रशियन ग्रामपंचायती

१

भांडवल या ग्रंथाच्या दुसऱ्या जर्मन आवृत्तीच्या उपसंहारात.... मी एका "महान रशियन पंडिताच्या व समीक्षकाच्या" a संबंधात त्याच्या योग्यतेला शोभेशा उच्च विचारानिशी बोलतो आहे. आपल्या लक्षणीय लेखांमध्ये या लेखकाने ज्या प्रश्नाचा ऊहापोह केलेला आहे तो म्हणजे हा, की रशियाचे उदारमतवादी अर्थशास्त्रज्ञ प्रतिपादन करतात तदनुसार रशियाने भांडवलदारी राजवटीत दाखल होण्यासाठी आपल्या ग्रामपंचायतींचा नाश करूनच याचा आरंभ केला पाहिजे का! किंवा उलट पक्षी, या राजवटीचे छळवाद न अनुभवता खास आपल्या स्वतःच्या ऐतिहासिक परिस्थितीचा विकास साधून या राजवटीची सगळी फळे त्याला आपल्या पदरात पाडून घेता येतात का!

तो या प्रश्नाच्या दुसऱ्या सोडवणुकीला अनुकूलता प्रदर्शित करतो.

मार्क्स यांचे अतेचेस्त्वेन्निये झापिस्की
या नियतकालिकाच्या संपादक मंडळाला पत्र

मार्क्स आणि एन्गल्स, निवडक पत्रव्यवहार,
मॉस्को, १९७५, पृष्ठ २९२

२

परंतु रशियन ग्रामपंचायतीने ज्यांचे लक्ष वेधून घेतले होते व ज्यांची मान्यता संपादन केलेली होती, ते, इझेंन प्रभृति आणि त्काचोव प्रभृति यांच्यापेक्षा किती तरी अधिक उच्चतर पातळीवरचे होते. निकोलाय चेर्निशेव्स्की याची गणना त्यांच्यामध्ये होत होती. या महान विचारवन्ताचे रशियावर फार मोठे ऋण आहे आणि सैबेरियातील याकुत जमातीच्या लोकांमध्ये अनेक वर्षे हद्दपारीवर राहिल्यामुळे याचा झिजून झिजून झालेला नाश हा झार दुसऱ्या अलेक्झांडरच्या, या "विमोचकाच्या," स्मृतीवर लाजिरवाणा कलंक राहील.

रशिया आणि पश्चिम यूरोप यांना एकमेकांपासून अलग करणाऱ्या बौद्धिक अडसरापायी चेर्निशेव्स्कीने मार्क्स यांचे कोणतेही ग्रंथ वाचलेले नव्हते आणि ज्या वेळी

---

a. —संपादक

क्षेत्रात जर्मनीत किंवा फ्रान्समध्ये जे काही निर्माण केले आहे त्या सगळ्यावर या साहित्याने फार मोठ्या प्रमाणात मात केली आहे.

एन्गल्स यांचे दानियेल्सन यास पत्र,
तारीख २६ जून १८८४
मार्क्स आणि एन्गल्स, निवडक पत्रव्यवहार
मॉस्को, १९७५, पृष्ठ ३५४

३

एहरलिच याच्या ग्रंथाशी माझा अंशतः परिचय आहे. लेखक या नात्याने मी त्याची तुलना लेसिंग व दीदरो यांच्याशी करतो.

मार्क्स यांचे निकोलाय दानियेल्सन यास पत्र
तारीख ९ नोव्हेंबर १८७१
इंग्रजीत लिहिलेले
मार्क्स/एन्गल्स, वेर्के, खंड ३३ वा, १९६६,
पृष्ठ ३११

पंडित व समीक्षक या नात्याने चेर्निशेव्स्कीचे मूल्यमापन

जे अजून काहीशा शास्त्रीय दर्जावर दावा सांगत होते आणि निव्वळ शब्दच्छळ करणारे व राज्यकर्त्या वर्गाचे स्तुतिपाठक असण्यापेक्षा अधिक काही व्हायची आकांक्षा बाळगून होते, त्यांनी भांडवलाच्या अर्थशास्त्राचा मेळ अतःपर दुर्लक्षिता न येणाऱ्या कामगार वर्गाच्या हक्कांशी घालायचा प्रयत्न केला. म्हणून यातून उथळ समन्वयवाद निर्माण झाला आणि याचा सर्वोत्तम प्रतिनिधी आहे जॉन स्टुअर्ट मिल्ल. भांडवलदारी अर्थव्यवस्थेचे हे दिवाळखोरीचे जाहीर प्रदर्शन मांडले आहे, आणि या प्रसंगाला अनुलक्षून महान रशियन पंडित व समीक्षक एन्. चेर्निशेव्स्की याने आपल्या "मिल्ल यांच्या भूमिकेनुसार अर्थशास्त्राच्या रूपरेखा" या ग्रंथामध्ये श्रेष्ठ विमर्शक मनाचा प्रकाशझोत टाकला आहे.

कार्ल मार्क्स, भांडवल, खंड १ ला,
मॉस्को, १९७४, पृष्ठ २५.

चेर्निशेव्स्की आणि रशियन ग्रामपंचायती

१

भांडवल या ग्रंथाच्या दुसऱ्या जर्मन आवृत्तीच्या उपसंहारात.... मी एका "महान रशियन पंडिताच्या व समीक्षकाच्या" a संबंधात त्याच्या योग्यतेला शोभेशा उच्च विचारांनिशी बोलतो आहे. आपल्या लक्षणीय लेखांमध्ये या लेखकाने ज्या प्रश्नाचा ऊहापोह केलेला आहे तो म्हणजे हा, की रशियाचे उदारमतवादी अर्थशास्त्रज्ञ प्रतिपादन करतात तदनुसार रशियाने भांडवलदारी राजवटीत दाखल होण्यासाठी आपल्या ग्रामपंचायतींचा नाश करूनच याचा आरंभ केला पाहिजे का! किंवा उलट पक्षी, या राजवटीचे छळवाद न अनुभवता खास आपल्या स्वतःच्या ऐतिहासिक परिस्थितीचा विकास साधून या राजवटीची सगळी फळे त्याला आपल्या पदरात पाडून घेता येतात का!

तो या प्रश्नाच्या दुसऱ्या सोडवणुकीला अनुकूलता प्रदर्शित करतो.

मार्क्स यांचे अतेचेस्त्वेन्निये झापिस्की
या नियतकालिकाच्या संपादक मंडळाला पत्र

मार्क्स आणि एन्गल्स, निवडक पत्रव्यवहार,
मॉस्को, १९७५, पृष्ठ २९२

२

परंतु रशियन ग्रामपंचायतीने ज्यांचे लक्ष वेधून घेतले होते व ज्यांची मान्यता संपादन केलेली होती, ते, इझेंन प्रभृति आणि त्काचोव प्रभृति यांच्यापेक्षा किती तरी अधिक उच्चतर पातळीवरचे होते. निकोलाय चेर्निशेव्स्की याची गणना त्यांच्यामध्ये होत होती. या महान विचारवन्ताचे रशियावर फार मोठे ऋण आहे आणि सैबेरियातील याकुत जमातीच्या लोकांमध्ये अनेक वर्षे हद्दपारीवर राहिल्यामुळे याचा झिजून झिजून झालेला नाश हा झार दुसऱ्या अलेक्सांडरच्या, या "विमोचकाच्या," स्मृतीवर लाजिरवाणा कलंक राहील.

रशिया आणि पश्चिम यूरोप यांना एकमेकांपासून अलग करणाऱ्या बौद्धिक अडसरापायी चेर्निशेव्स्कीने मार्क्स यांचे कोणतेही ग्रंथ वाचलेले नव्हते आणि ज्या वेळी

---

a. —संपादक

भांडवल प्रसिद्ध झाले त्या वेळी तो खेद्ने-विल्यूइस्क[२२८] येथे याकुत लोकांच्या सहवासात होता. त्याचा आत्मिक विकास या बौद्धिक अडसराने निर्माण केलेल्या परिस्थितीतच सर्वस्वी चालू राहावा लागला होता. झारशाही सेन्सॉरशिपने जे येऊ दिले नाही, ते रशियापुरते तरी जवळ जवळ किंवा सर्वस्वी अस्तित्वातच नव्हते. म्हणून जर त्याच्या लेखनामध्ये एखादे कमजोर स्थळ अधून मधून सापडले आणि क्षितिजाचा काहीसा संकुचितपणा सापडला, तर आश्चर्याची गोष्ट ही आहे की असे फारसे अधिक त्यात नाहीच.

चेर्निशेव्स्कीला असेही दिसून आले की रशियन ग्रामपंचायत (कम्यून) हे प्रचलित सामाजिक प्रकारातून विकासाच्या नव्या टप्प्यामध्ये संक्रान्त होण्याचे साधन आहे; एका अंगाने हा टप्पा रशियन ग्रामपंचायतीपेक्षा उच्चतर आहे, आणि दुसऱ्या अंगाने तो वर्गीय विरोधांनी युक्त अशा पाश्चात्य भांडवलदारी समाजापेक्षा उच्चतर आहे. रशियाजवळ असले काही साधन होते, तर याच्या उलट पाश्चात्यांजवळ असले साधन मुळीच नव्हते. ही गोष्ट, चेर्निशेव्स्की याच्या मते, रशियाच्या फायद्याची होती.

"पश्चिम युरोपमध्ये व्यक्तीच्या हक्कांच्या अमर्याद विस्ताराच्या योगाने तिथे अधिक चांगली सुव्यवस्था चालू करण्याला फार मोठा अडथळा येतो... ज्याचा उपभोग घ्यायचा आपल्याला सराव असतो, त्याच्या अगदी क्षुल्लक अशा अल्पशा हिश्श्याचा देखील त्याग करणे सोपे नसते, आणि पाश्चात्य देशांमध्ये व्यक्तीला अमर्याद खासगी हक्कांचा सराव झालेला असतो. परस्पर सबलतींची उपयुक्तता व आवश्यकता केवळ कटु अनुभवाच्या व प्रदीर्घ विचाराच्या योगानेच शिकता येते. पाश्चात्य देशांमध्ये आर्थिक संबंधांची अधिक चांगली पद्धती ही त्यागाशी निगडित झालेली असते आणि याच कारणास्तव ती प्रस्थापित करणे कठीण असते. इंग्रज आणि फ्रेंच शेतकऱ्यांच्या सवयीच्या ती विरोधात असते." परंतु "जी गोष्ट एका देशामध्ये मनोराज्य असल्याचे दिसते तीच गोष्ट अन्य देशांमध्ये वस्तुस्थिती म्हणून अस्तित्वात असते.... ज्या सवयी आपल्या राष्ट्रीय जीवनात रूढ करणे इंग्रजाला व फ्रेंच माणसाला अत्यंत कठीण असल्याचे आढळून येते, त्याच सवयी रशियन लोकांच्या राष्ट्रीय जीवनात वस्तुतः अस्तित्वातच आहेत....ज्या सुव्यवस्थेसाठी पाश्चात्य देश एवढ्या कठीण व दूरच्या मार्गाने जाण्याचा प्रयत्न करीत आहेत, ती सुव्यवस्था आमच्या ग्रामीण जीवनातील सामर्थ्यशाली राष्ट्रीय प्रथांमध्ये आमच्या देशात अजूनही अस्तित्वात आहे....पाश्चात्य देशांमध्ये सामाजिक शेती कसवणुकीच्या हानीमुळे केवढे शोचनीय परिणाम झाले आणि पाश्चात्य जनता जे घालवून बसल्या, ते त्यांना परत देणे किती कठीण होऊन बसले आहे हे आपल्याला दिसते. पाश्चात्यांचे उदाहरण आमच्या बाबतीत फुकट जाता कामा नये." (चेर्निशेव्स्की, समग्र ग्रंथ, जीनीव्हा आवृत्ती,

खंड ५ वा, पृष्ठे १६-१९; प्लेखानोवकृत नाशि देझ्नोग्लासिया, a जीनीव्हा, १८८५, यातून उद्धृत)

ऊरल पर्वताच्या प्रदेशातील कोसाक जमातीमध्ये जमिनीची समाइक मशागत करणे आणि मागाहून पैदाशीची विभागणी व्यक्तिगत कुटुंबामध्ये करणे ही पद्धती अजूनही रूढ असून त्यांच्याबिषयी तो पुढीलप्रमाणे सांगतो :

"ऊरल पर्वताच्या प्रदेशातील जनता तिच्या सध्याच्या पद्धतीत जर धान्य पैदाशीत यंत्रांचा वापर होऊ लागलेला पाहील तर शेकडो देस्यातिन आकाराच्या मोठ्या प्रमाणावरील शेतीसाठी यंत्रांचा वापर करू देणारी पद्धती आपल्यामध्ये टिकून आहे याचा तिला फारच आनंद होईल." (कित्ता, पृष्ठ १३१ b).

मात्र हे लक्षात ठेवायला हवे की ऊरल पर्वताच्या प्रदेशातल्या या कोसाकांची जी जमीन कसायची समाइक रीत आहे ती लष्करी कारणांसाठी सांभाळून ठेवण्यात आलेली आहे (तसे पाहिले तर आपल्या इथेही लष्करी बराकीतला कम्युनिझम असतोच), आणि हे कोसाक लोक रशियामध्ये अगदी वेगळे असे लोक आहेत, जवळ जवळ मोसेले नदीकाठच्या आमच्या स्वतःच्या घरगुती पंचायतींसारखेच (Geheferschafen) आहेत, यांच्यामध्येही ठराविक वेळोवेळी पैदाशीची फेरवाटणी होत असते आणि यंत्रसामुग्रीचा वापर सुरू होईपर्यंत सध्याची व्यवस्था जर अशीच्या तशीच चालू राहिली, तर याचा फायदा त्यांना न होता रशियन लष्करी खात्याला होईल, कारण हे लोक त्या खात्याचे नोकर आहेत.

काहीही म्हटले तरी वस्तुस्थिती अशी आहे : इकडे पश्चिम युरोपात भांडवलदारी समाजव्यवस्था विघटित होत चाललेली आहे आणि तिच्या स्वतःच्या विकासाच्या अटळ अन्तर्विरोधांच्या योगाने तिच्यावर विनाशाचा धोका ओढवून राहिला आहे, तर तिकडे रशियामध्ये लागवडीखाली असलेल्या जमिनीपैकी जवळ जवळ निम्मी जमीन समाइक मालमत्ता म्हणून ग्रामपंचायतींच्या हाती राहिलेली आहे. जर पाश्चात्य देशांतील अन्तर्विरोधांची निष्कृती समाजाच्या नव्या संघटनेच्या द्वारा एक आवश्यक अट म्हणून उत्पादनाच्या सगळ्या साधनांचे आणि परिणामतः जमिनीचे देखील हस्तान्तर गृहीत धरत असेल, म्हणजे त्यांच्यावर एकंदर समाजाची मालकी होणार असेल तर मग, जी अजून युरोपात स्थापन व्हायची आहे ती समाइक मालमत्ता, आणि रशियामध्ये जी अगोदरच अस्तित्वात आहे, किंवा जी अजूनही अस्तित्वात आहे ती ग्रामपंचायतीची मालमत्ता, यांच्या

---

a आमचे मतभेद. पाहा ज्योर्जी प्लेखानोव, निवडक तत्त्वज्ञानात्मक ग्रंथ, खंड १ ला, मॉस्को, १९७४, पृष्ठ १३५.—संपादक

b जी. प्लेखानोव, कित्ता, पृष्ठ १५४.—संपादक

दरम्यानचा संबंध काय आहे ? जनतेच्या चळवळीचा प्रारंभिक बिंदु म्हणून ही कामी येऊ शकेल काय ? म्हणजे ही चळवळ, एकंदर भांडवलदारी कालखंडावरून पलीकडे उड्डाण करून तावडतोब रशियन शेतकरी कम्युनिझमचे परिवर्तन सगळ्या उत्पादन-साधनांच्या आधुनिक समाजवादी समाईक मालमत्तेत करील ? भांडवलदारी युगातील सगळ्या तांत्रिक यशःसिद्धींनिशी तिला समृद्ध करील ? किंवा पुढे उद्धृत केलेल्या[२२९] एका पत्रात मार्क्सने चेर्निशेव्स्कीचा एक विचार सूत्रबद्ध केला त्याप्रमाणे होईल ? : "रशियाचे उदारमतवादी अर्थशास्त्रज्ञ इच्छितात तद्नुसार भांडवलदारी पद्धतीचा अंगिकार करण्यासाठी रशियाने कम्यूनचा (ग्रामपंचायतीचा) नाश करण्यापासून सुरुवात केलीच पाहिजे का ? किंवा या पद्धतीच्या सगळ्या हालअपेष्टा न सोसता स्वतःचा ऐतिहासिक वारसा विकसित करताना या पद्धतीचे सगळे लाभ हस्तगत करायची पक्की तरतूद करावी ?"

या प्रश्नाची मुटी मांडणीच उत्तर कोठे आहे हे दाखवून देते. रशियन जमात अनेक शतके अस्तित्वात आहे आणि तिने स्वतःचे परिवर्तन सामायिक मालमत्तेच्या उच्चतर प्रकारामध्ये करून घेण्याची स्वतःच्या ठायीची अन्तःप्रेरणा एकदाही निर्माण न करता ती तशीच राहिलेली आहे. जर्मन मार्क, केल्टिक जमात, आणि भारतीय व इतर ग्रामपंचायती आपल्या प्राथमिक कम्युनिस्ट व्यवस्थांनिशी जशा आहेत तीच गोष्ट रशियन जमातीच्या बाबतीत आहे. कालाच्या ओघात आणि त्यांच्या सभोवार असलेल्या व अन्तर्गत विकसित झालेल्या आणि क्रमाक्रमाने त्यांना व्यापून राहिलेल्या कुटुंबांच्या व व्यक्तींच्या दरम्यान क्रयवस्तूंचे उत्पादन व विनिमय चालू असण्याच्या प्रभावामुळे त्या सगळ्या आपल्या कम्युनिस्ट स्वरूपाचा अधिकाधिक प्रमाणात त्याग करू लागल्या आणि त्यांचे विघटन होऊन एकमेकांपासून स्वतंत्र अशा जमीनमालकांच्या जमाती होऊन राहिल्या. परिणामतः, रशियन ग्रामपंचायतीला वेगळे व अधिक चांगले भवितव्य आहे किंवा नाही हे विचारणे जर शक्यच असेल तर याचे कारण तिच्या अंतर्गत नाही. तर हे कारण केवळ जी वस्तुस्थिती आहे ती अशी : एका युरोपियन देशात तिने आपली सापेक्ष व्यवहार्यता अशा वेळेपर्यंत टिकवून ठेवलेली आहे की, ज्यावेळी पश्चिम युरोपात क्रयवस्तूंचे सर्वसाधारण उत्पादन इतकेच नव्हे तर त्याचा सर्वोच्च व अंतिम प्रकार—म्हणजे भांडवलदारी उत्पादन—त्याने स्वतःच निर्माण केलेल्या उत्पादक शक्तींच्या विरोधात उभे ठाकते; अशा वेळी ही भांडवलदारी व्यवस्था या शक्तींना काबूत ठेवायला असमर्थ असल्याचे स्वतःच दाखवून देते, आणि या अन्तर्गत विरोधांच्या योगाने तदनुषंगिक वर्गीय संघर्षाच्या योगाने तिचा विध्वंस होऊ लागलेला असतो. केवळ यावरूनच असे अनुमान निघते की रशियन ग्रामपंचायतीचे असे अंतिम परिवर्तन केवळ तिच्यातूनच कधीही घडून येऊ शकत नाही, परंतु ते पाश्चात्य देशांतील केवळ औद्योगिक कामगारवर्गातूनच घडून येऊ शकते. पश्चिम युरोपियन कामगारवर्गाने भांडवलदारवर्गावर विजय प्रस्थापित करणे

आणि तदनुषंगाने भांडवलदारी उत्पादनाच्या जागी सामाजिक व्यवस्थापन असलेली अर्थव्यवस्था येणे—हीच रशियन ग्रामपंचायतीला विकासाच्या त्याच वरच्या टप्प्यावर नेऊन पोचविणारी पूर्वअट आहे.

फ्रेडरिक एन्गल्स, " 'रशियांतील सामाजिक संबंधांविषयी' या लेखाचा उपसंहार "

मार्क्स आणि एन्गल्स, निवडक ग्रंथ,, खंड २ रा, मॉस्को, १९७३, पृष्ठे ३९९-४०२

क्रान्तिकारक या नात्याने चेर्निशेव्स्कीची भूमिका

१

दुसऱ्या लेखाचा [२३०] मथळा आहे : " कारणाच्या पूर्वीच्या व सध्याच्या संकल्पनेवर दृष्टिक्षेप. " इंटरनॅशनलच्या परदेशस्थ रशियन मुखपत्राला [२३१] बाकूनिन व नेचायेव धमकी देत आहेत हे आपण नुकतेच पाहिले आहे. या लेखात ते चेर्निशेव्स्कीवर घसरले असल्याचे आपल्याला दिसेल. चेर्निशेव्स्की म्हणजे असा माणूस आहे की त्याने रशियामध्ये विद्यार्थी-युवकांना समाजवादी चळवळीत आणण्यासाठी जास्तीत जास्त कार्य केले आहे. आणि या युवकांचेच आपण प्रतिनिधित्व करतो आहोत असा या दोघांचा दावा आहे.

कार्ल मार्क्स आणि फ्रेडरिक एन्गल्स, आन्तरराष्ट्रीय कामगार संघ आणि सोशल डिमॉक्रसी यांची दोस्ती पहिल्या इंटरनॅशनलची हेग काँग्रेस मॉस्को, १९७६, पृष्ठे ५६४-६५

२

मला लों[पाटिन]कडून असे कळले की १८६४ साली चेर्निशेव्स्कीला सैबेरियन खाणीत काम करण्याची आठ वर्षांची travaux forces @ शिक्षा झाली; म्हणजे त्याची शिक्षा भोगायची आणखी दोन वर्षे बाकी आहेत. पहिल्या कोर्टाने पुरेशी सौजन्यशीलता दर्शवून असे जाहीर केले की त्यांच्याविरुद्ध पुरावा असा अजिबात कसलाही नाही आणि ती तथाकथित गुप्त कटाबाबतची पत्रे ही उघड

a सक्तमजुरी. —संपादक

उघड बनावट आहेत (आणि खरोखरीच ती तसली होती). परंतु झारच्या आदेशानुसार सेनेटने हा निवाडा रद्द ठरविला आणि शिक्षेच्या हुकुमात म्हटले आहे तदनुसार "हा कावेबाज माणूस इतका कुशल आहे की तो आपल्या ग्रंथांचे स्वरूप कायद्याचा आक्षेप येणार नाही असे ठेवतो आणि तरीही त्यांमधून उघडपणे विषारी प्रचार करतो"; आणि म्हणून त्याला सैबेरियाला धाडले. Voila la justice russe (a)

फ्लेरोव्स्कीची अवस्था अधिक चांगली आहे. त्याला मॉस्को आणि सेंट पीटर्सबर्ग यांच्या दरम्यान असलेल्या कसल्या तरी कंगाल स्थळी नुसत्याच राज्यकारभारविषयक हद्दपारीवर धाडले आहे.

मार्क्स यांचे एन्गल्स यास पत्र,
तारीख ५ जुलै १८७०
मार्क्स/एन्गल्स, वेर्के, खंड ३२ वा,
१९६५, पृष्ठ ५२१

३

पाश्चात्य देशांमध्ये चेर्निशेव्स्कीविषयी थोडीशी सहानुभूति जागृत करण्यासाठी त्याच्या जीवनाविषयीची व व्यक्तिमत्त्वाविषयीची [२३२] काही ना काही तरी माहिती मला छापायला हवी आहे. परंतु यासाठी मला थोडीशी साधनसामुग्री लागेल.

मार्क्स यांचे निकोलाय दानियेल्सन यास पत्र,
तारीख १२ डिसेंबर १८७२
मार्क्स/एगन्स वेर्के, खंड ३३ वा, १९६६,
पृष्ठ ५५९.

४

चेर्निशेव्स्की विषयी सांगायचे म्हणजे त्याच्या केवळ शास्त्रीय कामगिरीचाच मी परामर्श घ्यावा किंवा त्याच्या कामगिरीच्या दुसऱ्या बाजूचाही परामर्श घ्यावा, हे सर्वस्वी तुमच्यावर अवलंबून आहे. [२३३] माझ्या ग्रंथाच्या [२३४] दुसऱ्या खंडामध्ये तो अर्थातच केवळ अर्थशास्त्रज्ञ म्हणूनच निर्दिष्ट होईल. त्याच्या ग्रंथांच्या बहुतांश भागाशी माझा परिचय आहे.

मार्क्स यांचे निकोलाय दानियेल्सन यास पत्र,
तारीख १८ जानेवारी १८७३
मार्क्स/एन्गल्स, वेर्के, खंड ३३ वा,
१९६६, पृष्ठ ५५९

---

a हा बघा रशियन न्याय! —संपादक

५

इथे आम्हाला Н Г Ч @ याच्या मृत्यूची बातमी खूपच दुःख व सहानुभूति यांच्या निशी ऐकायला मिळाली. परंतु बहुधा हेच अधिक चांगले.

एन्गल्स यांचे निकोलाय दानियेल्सन यास पत्र,
तारीख १० जून १८९०
इंग्रजीत लिहिलेले,
फोटो-प्रतीनुसार प्रकाशित

श्चेद्रिन

श्चेद्रिनच्या Ckazku (b) तुम्ही धाडल्या याबद्दल मी तुमचा फार फार आभारी आहे, त्या मी शक्य तितक्या लवकर हाती घेईन; डाव्या डोळ्याला कंजंक्टिवायटिसची किंचित बाधा झाल्यामुळे सध्या त्याच्या वाचनात मला अडथळा आला आहे, कारण रशियन टाईप वाचतांना माझ्या डोळ्यांवर फार ताण पडतो.

एन्गल्स यांचे निकोलाय दानिएल्सन यास पत्र,
तारीख १९ फेब्रुवारी १८८७
इंग्रजीत लिहिलेले
फोटोकॉपीनुसार प्रकाशित

फ्लेरोव्स्की

मी फ्लेरोवस्कीच्या पुस्तकाची[२३५] पहिली १५० पाने वाचली आहेत. (यात सैबेरिया, उत्तर रशिया आणि आस्त्राखान हे भाग आहेत.) रशियाच्या आर्थिक परिस्थितीविषयीचे सत्य सांगणारा हा पहिलाच ग्रंथ आहे. हा माणूस "रशियन आशावाद" म्हणून ज्याला तो संबोधतो, त्याचा निग्रही वैरी आहे. या कम्युनिस्टी दिव्य जीवनाविषयी माझे फारसे चांगले मत कधीच नव्हते, तथापि फ्लेरोव्स्की सगळ्या अपेक्षांच्या पलीकडे पोचला आहे. पीटर्सबर्ग शहरी असली गोष्ट छापली जाऊ शकते हे खरोखरी विचित्रच आहे, हे नक्कीच आकस्मिक बदलाचे लक्षण आहे.

---

a एन्. जी. चेर्निशेव्स्की. — संपादक

b कथा. —संपादक

"आमच्याकडे फारच थोडे कामगारवर्गीय आहेत, परंतु आमच्या कामगार-वर्गाचा बहुजनसमाज श्रमिक लोकांचा आहे आणि त्यांची अवस्था कोणत्याही कामगारवर्गीयाच्या पेक्षा अधिक वाईट आहे."(a)

विषय मांडण्याची पद्धती अगदी स्वतंत्र अशीच आहे; अधून मधून ती बहुतेक बाबतीत मॉन्टीलची आठवण करून देते. या माणसाने सर्वत्र प्रवास केलेला आहे आणि स्वतः सगळ्या गोष्टी पाहून घेतलेल्या आहेत हे आपल्याला दिसू शकते. जमीनदार, भांडवल व सरकारी अधिकारी यांचा जळजळीत द्वेष प्रत्ययाला येतो. समाजवादी सिद्धांत नाही, जमिनीविषयीचा गूढवाद नाही (मात्र मालकीच्या समाइक प्रकाराला अनुकूलता आहे). तुच्छतावादी अतिशयोक्ती नाही. अधून मधून काही प्रमाणात सद्हेतुप्रेरित चर्‍हाट आहे, तथापि, जिच्यासाठी हे पुस्तक लिहिलेले आहे, त्या जनतेने गाठलेल्या विकासाच्या टप्प्याशी हे जुळणारे आहे. काही झाले तरी **इंग्लंडमधील कामगार वर्गाची परिस्थिती** या तुमच्या ग्रंथानंतर प्रसिद्ध झालेला हा सगळ्यांत जास्त महत्त्वाचा ग्रंथ आहे. रशियन शेतकऱ्याचे कौटुंबिक जीवन, लग्नाच्या बायकांना प्राण जाई तो भयंकर मारहाण करणे, वोडका दारूचे व्यसन, आणि रखेल्या ठेवणे यांचे चित्रण देखील चांगले केलेले आहे. म्हणून नागरिक हर्झेन याच्या अद्भुत बनावटगिऱ्या जर तुम्ही माझ्याकडे धाडल्यात तर ते फारच प्रसंगोचित ठरेल.

मार्क्स यांचे एन्गल्स यास पत्र,
तारीख १० फेब्रुवारी १८७०
मार्क्स/एन्गल्स, वेर्के, खंड ३२ वा,
१९६५, पृष्ठ ४३७

---

a पत्रामध्ये अवतरण रशियन भाषेत दिलेले आहे. —संपादक

जुन्या काळातील क्रान्तिकारक व विडंबनात्मक लोकगीते

हेर्र टिड्मान्न

मी या लोकांच्याकडे [२३६] टिड्मान्न विषयीचे छोटेसे डॅनिश लोकगीत धाडून देतो आहे. शेतकऱ्यांवर नवे कर लादल्याबद्दल याला अमुकढमुक ठिकाणी म्हाताऱ्याकडून ठार मारण्यात आले. हे गीत क्रान्तिकारक आहे, आणि असे असूनही आक्षेप घेण्याजोगे नाही. आणि सगळ्यात जास्त महत्त्वाची गोष्ट म्हणजे, याचा रोख सरंजामी सरदारांविरुद्ध आहे, आणि या सरदारांना या वृत्तपत्राने कडाडून विरोध केलाच पाहिजे. मी त्याला योग्य असा काही थोडा टीकात्मक मजकूरही जोडला आहे.

एन्गल्स यांचे मार्क्स यास पत्र,
तारीख २७ जानेवारी १८६५
मार्क्स/एन्गल्स, वेर्के, खंड ३१ वा,
१९६५, पृष्ठ ४५

एके दिवशी सकाळी तांबडे फुटायच्या वेळेला
हेर्र टिड्मान्न बिछान्याशी पोशाख करीत राहीला
आणि त्याने झकास शर्ट अंगात घातला
इतका झकास की
सुडेरवाले सगळे लोक कौतुक करीत राहीले

आणि त्याने झकास शर्ट अंगात घातला
त्याचा हिरवा रेशमी कोट शूरपणाने झगझगला
बकस्किन बुटांचे बंद त्याने पायांना बांधीले
आणि सुडेरवाले सगळे लोक कौतुक करीत राहीले

बकस्किन बुटांचे बंद त्याने पायांना बांधीले
जडावाच्या टाचा त्याने नीटनेटक्या घातल्या
आणि तो गेला सुडेर जिल्ह्यातल्या
अमुक ढमुक ठिकाणाला
आणि सुडेरवाले सगळे लोक कौतुक करीत राहीले

गेला तो सुडेर जिल्ह्यातल्या
अमुक ढमुक ठिकाणाला
प्रत्येक येदेलिंगकडून त्याने कराची वसुली मागितली
एकेका माणसाच्या नांगरामागे सात सात बुशेल राय.
आणि सुडेरवाले सगळे लोक कौतुक करीत राहीले

एकेका माणसाच्या नांगरामागे सात सात बुशेल राय
चौघांचौघात एकेक डुक्कर लष्ट करायचा जंगलातून
पण मग तिथे उभा राहिला एक म्हातारबुवा
आणि सुडेरवाले सगळे लोक कौतुक करीत राहिले

मग तिथे उभा राहिला एक म्हातारबुवा :
" असले कर आमच्यापैकी देऊ शकत नाही कोणीही
एवढा भारी कर आम्ही द्यायच्या आधी--"
आणि सुडेरवाले सगळे लोक कौतुक करीत राहीले

" एवढा भारी कर आम्ही द्यायच्या आधी,
या अमुक ढमुकमधून कुणीही निघून जायचा नाही.
अरे सुडेरवाल्या शेतकऱ्यांनो, कोंडाळे करून राहा उभे. "
आणि सुडेरवाले सगळे लोक कौतुक करीत राहीले.

" अरे सुडेरवाल्या शेतकऱ्यांनो, कोंडाळे करून राहा उभे.
हेर्र टिड्मान्न या अमुक ढमुकमधून जिवंतपणी
निघून जाणार नाही "
म्हातारबुवाने हाणला थेट पहिलाच टोला,
आणि सुडेरवाले सगळे लोक कौतुक करीत राहीले.

म्हातारबुवाने हाणला थेट पहिलाच टोला,
हेर्र टिड्मान्न झाला जमीनदोस्त

पडला आहे हेर्र टिड्मान्न रक्ताच्या थारोळ्यात
आणि सुडेरवाले सगळे लोक कौतुक करीत राहीले.

पडला आहे हेर्र टिड्मान्न रक्ताच्या थारोळ्यात
परंतु नांगर चाले मुक्तपणे काळ्या जमिनीतून
डुकरे भटकतात मुक्तपणे लठ्ठ करायच्या जंगलातून
आणि सुडेरवाले सगळे लोक कौतुक करीत राहीले.a

फ्रेडरिक एन्गल्स, "हेर्र टिड्मान्न"
(जुने डॅनिश लोकगीत)
मार्क्स/एन्गल्स, वेर्के, खंड १६ वा, १९६८,
पृष्ठ ३३-३४

स्तेन्का राझीनविषयीची लोकगीते

त्या काळी कोसाक लोक वोल्गा नदीच्या दोन्ही तीरांवर वेगळी जमात म्हणून वास्तव्य करून होते. सतराव्या शतकाच्या आरंभीच्या धामधुमीच्या कालखंडात त्यांनी आपले अस्तित्व जाणवून दिले आणि पोल आणि तुर्क लोकांबरोबरच्या युद्धामध्ये ते गुंतलेले होते. व्लॉदिस्लॉने त्यांना उत्तेजन दिले आणि त्यांना बक्षिसे दिली. यावरून कोसाक लोकांच्यामध्ये अस्तित्वात असलेल्या आपसातल्या बंधनांचा बोध होतो. युक्रेनियन कोसाक लोक पोल लोकांच्या मदतीला आल्याबरोबर वोल्गा नदीच्या मैदानी प्रदेशांतील कोसाक लोक देखील मदतीला आले (तुर्कांच्या विरुद्ध पोल लोकांना मदत करायला २०,००० कोसाक आले). वोल्गा नदीच्या काठाकाठाने वस्ती करून राहिलेल्या कोसाकांच्या जोडीला डॉन नदीच्या प्रदेशांतून, याइक नदीच्या प्रदेशांतून आणि रशियन भूमीच्या सगळ्या प्रदेशांतून कोसाक लोक लुटालूट करायला आले. वोल्गा नदी हा मुख्य व्यापारी जलमार्ग त्यांच्या साहसाला आव्हान देत राहिला. १६२१ साली त्यांनी जहाजांचा एक काफिला लुटला, आणि याची परिणति चोर्नीयार या नगराची स्थापना होण्यात झाली. १६५४ साली कोसाकांनी नीझनी याइक उचुंग याच्यावर हल्ला चढविला (उचुंग म्हणजे मासे पकडायचा अडसर. हा नदीवर आडवा घालायचा असतो आणि यात मासे अडकून पडतात.) हा उचुंग

---

a इंग्रजी अनुवाद आलेक्स मिलर यांनी केलेला आहे. —संपादक

कोणा गुर्येव याच्या मालकीचा होता. कोसाकांनी हा उचुंग नष्ट केला आणि त्याच्या कामगारांना आपल्याकडे वळवून घेतले. सामान्य लोकांमध्ये कोसाकांविषयी खूपच सहानुभूती होती. वोल्गा नदीचा अफाट विस्तार हे "चोऱ्या करणाऱ्या कोसाकांचे" लुटालूट करायचे क्षेत्र होते. त्यांच्या पराक्रमांची गाणी लोक गात असत आणि लोकांमध्ये त्यांना सर्वसाधारण अर्थाने मामुली लुटारू मानले जात नसे, कारण त्यांची ही लुटालूट प्रचंड प्रमाणावर चालत असते. त्यांच्या स्वतःच्या गाण्यांमध्ये ते स्वतः-विषयी म्हणतात :

"आम्ही चोर नव्होत, आम्ही लुटारू नव्होत—
आम्ही आहोत छान छान शूर लोक."

जनतेच्या कल्पना-विश्वात आणि तिच्या गाण्यांमध्ये (यांत ग्रेट रशियन लोकांच्या गाण्यांचाही समावेश आहे) त्यांना ग्रीक लोकांच्या वीर पुरुषांसमान, पश्चिम युरोपांतील धर्मयोद्ध्यांसमान, सर्बियाच्या यूनाकांसमान काहीसे मानण्यात येत असे.

कार्ल मार्क्स, "कोमारोवकृत
स्तेन्का राझीन याचे बंड या विषयींची टिपणे"
टंकलिखित प्रतीनुसार प्रकाशित

ब्रे गावचा भटजी

भल्या चार्ल्स राजाच्या सोनेरी काळात
राजनिष्ठेला बाधा होत नव्हती तेव्हा
मी होतो निष्ठावंत देवभक्त
आणि म्हणून मी लोकांना पसंत पडलो
माझ्या देवभक्तांना मी शिकवायला कधी नाही चुकलो,
राजांच्या नेमणुका देवाने असतात केलेल्या,
आणि जे राजांचा प्रतिकार करतात ते नरकात जातात.
किंवा जे देवाचा अभिषेक झालेल्यांच्या वाटेला जातात
ते नरकात जातात.
आणि या कायद्याचे मी पालन करीन.
मी आमरण या कायद्याचे पालन करीन.
जो कोणी राजा राज्य करीत असेल
त्याचा मी ब्रे गावचा भटजी राहीन

जेम्स राजाला राजमुगुट मिळाला
आणि पोपचे अधिराज्य चालू झाले
फौजदारी कायद्यांचा मी धिःकार केला
आणि पोपचे निवेदन मी वाचले
रोमचे धर्मपीठ माझ्या प्रकृतीला पुरते मानवेल असे
आढळून आले मला
आणि क्रान्ति जर झाली नसती तर
मी जेजुइट झालो असतो
आणि या कायद्याचे मी पालन करीन

विल्यम आमचा राजा म्हणून ग्वाही फिरली
राष्ट्राच्या गाऱ्हाण्याचे समाधान करायला;
या नव्या वाऱ्याशी मी जमवून घेतले,
आणि त्याच्या निष्ठेची शपथ घेतली:
जुन्या तत्त्वांचा मी त्याग केला,
सदसद्विवेकबुद्धीला दूर ठेवले;
मुकाटपणे आज्ञापालन ही होती थट्टा,
अप्रतिकार हा होता विनोद.
आणि या कायद्याचे मी पालन करीन

राजस ॲन झाली आमची राणी,
इंग्लंडचे धर्मपीठ वैभवाला चढले,
आणि एक नवे रूप दिसायला लागले
आणि मी झालो हुजूरपक्षवाला
अधूनमधून हीन धर्मनिष्ठांचा
मी धिःकार केला त्यांच्या नेमस्तपणाचा,
आणि अशा दुटप्पीपणाने
धर्मपीठ जरी धोक्यात आले
आणि या कायद्याचे मी पालन करीन

आणि जॉर्ज राजा आला गादीवर
आणि मामुली लोक लागले मोठे दिसायला हो;
मी पुन्हा मारली मांजरासारखी कोलांट-उडी
आणि मग झालो मी व्हिग-पक्षीय हो;

आणि आमच्या नव्या धर्मरक्षकाकडून
मी अशी माझी नेमणूक करून घेतली
आणि जवळ जवळ रोजच मी धुडकावले
पोपला आणि तोतयाला.
आणि या कायद्याचे मी पालन करीन.

हॅनोव्हरचे गौरवशाली राजघराणे
आणि प्रॉटेस्टंट पंथाची वंशवेल,
यांना मी वाहतोय शपथपूर्वक निष्ठा—
ते अधिकारावर असेत तोपर्यंत.
कारण माझ्या श्रद्धेत व निष्ठेत
मी पुन्हा कधीही लटपटणार नाही
आणि जॉर्ज राहील माझा कायदेशीर राजा—
काळात नक्कीच बदल होईपर्यंत
आणि या कायद्याचे मी पालन करीन.
मी आमरण या कायद्याचे पालन करीन हो,
कोणताही राजा राज्य करो
मी ब्रे गावचा भटजी राहीन हो ! a

वर उद्धृत केलेले गाणे एकशेसाठ वर्षांहून अधिक काळ इंग्लंडमध्ये लोकप्रियता मिळवून राहिलेले एकमेव राजकीय लोकगीत आहे. याचे श्रेय बऱ्याच मोठ्या प्रमाणात त्याच्या अजब चालीकडेही जाते, आजदेखील ते सर्वत्र गाइले जाते.

फ्रेडरिक एन्गल्स, "ब्रे गावचा भटजी"
मार्क्स/एन्गल्स, वेर्के, खंड १९ वा, १९६२,
पृष्ठे ३०९-११

---

a ही मूळ इंग्रजी कविता इथे जोसेफ रिट्सनकृत निवडक इंग्रजी गाण्यांचा संग्रह, तीन खंड, दुसरी आवृत्ति, खंड २ रा, लंडन, १८१३, पृष्ठे १४१-४३ यांतून उद्धृत केलेली आहे. —संपादक

जर्मन क्रान्तिकारक गाणी

कवितांविषयी म्हणाल तर :

"Eine feste Burg ist unser Gott"@ [२३७] हे शेतकरी युद्धाचे Marseillaise (क्रान्तिगीत) होते. या गाण्याचे शब्द व याची चाल ओजस्वी असून देखील आजच्या घडीला आपण ती त्या धर्तीवर पतकरू शकतही नाही आणि पतकरूही नयेत. लोकगीतांच्या संग्रहांमध्ये त्या काळातली इतर गाणी आहेत, म्हणजे Des Knaben Wunderhorn. [२३८] इत्यादि; त्यात आणखी अधिक काही गोष्टी बहुधा सापडायचा संभव आहे. तथापि, त्या काळात देखील आमच्या लोक-कवितेवर Landsknecht चा अगोदरच पक्का पगडा बसलेला होता.

परकीय गाण्यांविषयी म्हणाल तर मला फक्त हेर्र हिड्मान्न विषयीचे सुंदर जुने डॅनिश गीतच तेवढे माहीत आहे आणि याचा अनुवाद मी १८६५ साली बर्लिन येथील सोत्सियाल देमोक्रात या वृत्तपत्रासाठी करून दिलेला आहे.

चार्टिस्टांची गाणी तशी पुष्कळच होती, आता मात्र ती अतःपर राहिलेली नाहीत. त्यांतल्या एकाची सुरुवात अशी होती :

ब्रिटानियेच्या पुत्रांनो तुम्हि गुलाम जरि असलात,
तरि तुमच्या निर्मात्या देवाने तुम्हा मुक्त केले;
सगळ्यांना त्याने जीवन अन् स्वातंत्र्य दिले,
परि कधीहि त्याने कोणालाही गुलाम नच केले.
अधिक मला आठवत नाही.

ते सगळे नाहीसे झाले आहे. ते काहीही असले तरी कविता फारशी मोलाची नव्हतीच.

१८४८ साली दोन गाणी रूढ होती व त्या दोहोंची चाल एकच होती.

१. श्लेस्विग्-हॉल्स्टीन. [२३९]
२. हेक्करचे गाणे. [२४०]

जर्मन-व्हाइन नदीच्या काठाकाठाने खालपावतर
हेक्कर तुझे नाव अधिकाधिक गाजत राहील
तुझे उदार हृदय, तुझे खुद्द डोळे
आमच्या ठायी अगोदरच श्रद्धेला स्फूर्ति देतात
हेक्कर, तू जर्मनीचा माणूस
स्वातंत्र्यासाठी मरणाला तयार.

---

a "अमुचा देव अजून आहे सुरक्षित बालेकिल्ला." —संपादक

मला वाटते येवढे पुरेसे आहे. मग त्यात चाल बदलून या ओळी आहेत :

हेक्कर, स्ट्रूवे, ब्लेन्कर, झिट्झ आणि ब्लुम्

जर्मन सरदारशाही पाडा हाणून !

सर्वसाधारणपणे सांगायचे म्हणजे मागच्या क्रान्त्यांचे काव्य— एकटे "Marceillaise" तेवढे नेहमीच वगळून— नंतरच्या काळात क्रान्तिकारक परिणाम फारच अल्प साधणार, कारण बहुजन समाजावर प्रभाव पाडण्यासाठी त्यांत त्या काळातल्या लौकिक पूर्वग्रहांचे प्रतिबिंब देखील असावे लागते— म्हणून ते सगळे धार्मिक खूळ त्यांत आलेले असते, चार्टिस्टांमध्ये देखील ते असते.

एन्गल्स यांचे हेर्मान्न श्वूटर यास पत्र
तारीख १५ मे १८८५
मार्क्स/एन्गल्स, वेर्के, खंड ३६ वा, १९६७,
पृष्ठे ३१४-१५

विणकरांचे गाणे [२४१]

जर्मन कामगारांच्या परिस्थितीची तुलना फ्रेंच व इंग्रज कामगारांच्या परिस्थितीशी करता यावी म्हणून प्रथम "प्रशियनाला" [२४२] इंग्रज व फ्रेंच कामगारांच्या चळवळीच्या पहिल्या इयत्तेची, प्रारंभाची तुलना, नुकत्या कुठे सुरू होत असलेल्या जर्मन चळवळीशी करावी लागेल. हे करण्यात त्याच्या हातून कसूर झाली. परिणामत: त्याच्या युक्तिवादांची परिणती क्षुल्लक विधानांमध्ये होते. उदाहरणार्थ, जर्मनीतील उद्योगधंदा अजून इंग्लंडमधल्या इतका विकसित झालेला नाही, किंवा चळवळही तिच्या प्रारंभाच्या वेळी तिच्या नंतरच्या चळवळीच्या प्रगतीहून वेगळी दिसते. त्याला जर्मन कामगारांच्या चळवळीच्या खास वैशिष्ट्या-विषयी सांगायला हवे होते. परंतु त्याच्या या विषयाच्या बाबतीत तो एक शब्दही बोलत नाही.

उलट पक्षी समजा "प्रशियनाने" बिनचूक दृष्टिकोन अंगिकारला असता. मग त्याला असे आढळून येईल की इंग्रज व फ्रेंच कामगारांच्या उठावांपैकी एकालाही सायलेशियन विणकरांच्या उठावाइतके तात्त्विक व जाणीवयुक्त वैशिष्ट्य नव्हते.

पहिली गोष्ट म्हणजे विणकरांच्या गाण्याची आठवण करा. हे गाणे म्हणजे संघर्षाचे साहसी आवाहन आहे. त्यात धराधाराचा, कारखान्याचा व जिल्ह्याचा नामनिर्देश देखील नाही, परंतु त्यात कामगार वर्ग हा तावडतोब, ठळक, कडकडीत, अनिर्बंध व सामर्थ्यशाली रीतीने खासगी मालमत्तेच्या समाजाला आपला विरोध

जाहीर करतो. जिथे फ्रेंच व इंग्रज कामगारांचे उठाव संपतात, तिथूनच साधलेशियन कामगारांचा उठाव नेमका सुरू होतो, तो कामगार वर्गाच्या स्वरूपाच्या जाणिवेनिशी सुरू होतो.

फार्ल मार्क्स, " 'प्रशियाचा राजा आणि सामाजिक सुधारणा. लेखक एक प्रशियन' या लेखाच्या समासातील टीकात्मक टिपणे "

मार्क्स आणि एन्गल्स, संकलित ग्रंथ, खंड ३ रा, मॉस्को, १९७५, पृष्ठ २०१

१८४८ च्या जर्मन क्रान्तीची गाणी

१

थोडक्यात सांगायचे म्हणजे भांडवलदारांना प्रशियन ममताळूपणाविषयी कसलेही भ्रम नव्हते. १८४० सालापासून प्रशियन वर्चस्वाचा विचार त्यांच्यामध्ये लोकप्रिय झाला तो केवळ याच कारणासाठी व याच प्रमाणात होता की प्रशियन भांडवलदारांनी आपल्या अधिक शीघ्र आर्थिक विकासाच्या योगाने जर्मन भांडवलदारांचे आर्थिक व राजकीय नेतृत्व आपल्याकडे घेतले; केवळ याच कारणासाठी व याच प्रमाणात जुन्या सनदशीर दक्षिणेतल्या रॉट्टेक प्रभृतींना व वेल्कर प्रभृतींना प्रशियन उत्तरेतल्या कँपहौसेन प्रभृतींनी, हान्सेमान्न प्रभृतींनी आणि मिल्डे प्रभृतींनी मागे सारले; आणि वकिलांना व प्राध्यापकांना व्यापाऱ्यांनी व कारखानदारांनी मागे सारले. खरे सांगायचे म्हणजे १८४८ च्या अगदी अगोदरच्या नजीकच्या काही वर्षांच्या अवधीत दक्षिणेकडील प्रदेशवादी उदारमतवाद्यांच्या ठायी असलेल्या क्रान्तिकारक प्रवृत्तीच्या पेक्षा फार मोठ्या प्रमाणात वेगळी असलेली क्रान्तिकारक प्रवृत्ती प्रशियन उदारमतवाद्यांच्या ठायी आणि त्यातल्या त्यात व्हाइन नदीच्या परिसरातील प्रशियन उदारमतवाद्यांच्या ठायी विकसित झाली. त्या काळी १६ व्या शतकापासूनच्या काळातील दोन सर्वोत्तम राजकीय लोकगीते गाजली. त्यातले एक होते बर्गोमीस्टर त्स्खेख याच्या विषयीचे आणि दुसरे होते बॅरनेस फॉन ड्रोस्टे-फिश्शरिंग हिच्या विषयीचे. यांचा वाह्यातपणा आता वयोवृद्ध झालेल्या लोकांना धक्कादायक वाटतो, पण तेच लोक १८४६ साली रंगात येऊन गात होते :

माणसाच्या वाट्याला कधी काळी एवढे दुर्दैव आले होते का,
जेवढे आमच्या गरीब बिचाऱ्या बर्गोमीस्टर त्स्खेखच्या वाट्याला आले !

त्याने झाडली गोळी दोन पावले अंतरावर असलेल्या जाड्यावर
आणि तरी देखील त्याची गोळी भलतीकडेच गेली !

फ्रेडरिक एन्गल्स " इतिहासात जबरदस्तीची भूमिका "
मार्क्स आणि एन्गल्स, निवडक ग्रंथ,
खंड ३ रा, मॉस्को, १९७३, पृष्ठे ३९०-९१

२

छत्तीस सिंहासने कोसळतील तरच
जर्मन प्रजासत्ताक मुक्तपणे भरभराटू शकते
बांधवांनो, निर्घृणपणे उलथून पाडा त्या सगळ्यांना
रक्ताची, प्राणांची मालमत्तेची पर्वा न करता
प्रजासत्ताकासाठी मरायला तयार होणे
हे उदात्त आणि महान भवितव्य आहे,
आमच्या धैर्याचे हे ध्येय आहे.

विलिखचे हंगामी मुख्य कार्यालय शोधून काढायला मी न्यूस्टाड्टकडे चालला होतो, त्या वेळी रेल्वेवरचे स्वयंसेवक हे गाणे गात होते.

म्हणजे आतापासून पुढे, प्रजासत्ताकासाठी मरायला तयार होणे हे माझ्या धैर्याचे ध्येय होते, किंवा निदान पक्षी तसे असल्याचे समजले जात होते. हे नवे ध्येय असणे मला बिचित्र दिसत होते. मी स्वयंसेवकांवर नजर टाकली. तरुण, देखणे, तडफदार पोऱ्ये होते ते. त्या क्षणी तरी त्यांच्या धैर्याचे ध्येय प्रजासत्ताकासाठी मरायला तयार होणे हे असल्याचे त्यांच्या चेहऱ्यांवरून तरी नक्कीच दिसत नव्हते.

फ्रेडरिक एन्गल्स, " बादशाही राज्यघटनेसाठी जर्मन मोहीम "
मार्क्स / एन्गल्स, वेर्के, खंड ७ वा, १९६९, पृष्ठ १६२

लुई बोनापार्टविरुद्ध विडंबनात्मक लोकगीत

अलीकडेच, बोनापार्ट हा आपल्या पत्नीसह ओडियोन [२४३] नाट्यगृहात होता त्या वेळी नाटकाला गर्दी करून राहिलेले विद्यार्थी "Sire de France Boissy"

हे गाणे त्यांतल्या त्यात काही ठळक कडव्यांवर खास भर देऊन एकसारखे गात होते. पॅरिसचे कामगार जे गाणे गातात त्याचे ध्रुवपद असे आहे :

तो चालला रे चालला, तो चालला रे चालला,
छोटासा हिंगमिऱ्या वाणी.
तो चालला आपल्या मातृभूमीला
आपला सगळा माल व चीजवस्त घेऊन

पोलिसांनी या गाण्यावर बंदी घातली, म्हणजे हा छोटा हिंगमिऱ्या वाणी कोण होता हे सगळ्यांना ठाऊक झाले.

एन्गल्स यांचे मार्क्स यास पत्र,
तारीख ७ फेब्रुवारी १८५६
मार्क्स/एन्गल्स, वेर्के,
खंड २९ वा, १९६७, पृष्ठ ९

त्याने झाडली गोळी दोन पावले अंतरावर असलेल्या जाड्यावर
आणि तरी देखील त्याची गोळी भलतीकडेच गेली !

फ्रेडरिक एन्गल्स " इतिहासात जबरदस्तीची भूमिका "
मार्क्स आणि एन्गल्स, निवडक ग्रंथ,
खंड ३ रा, मॉस्को, १९७३, पृष्ठे ३९०-९१

२

छत्तीस सिंहासने कोसळतील तरच
जर्मन प्रजासत्ताक मुक्तपणे भरभराटू शकते
बांधवांनो, निर्घृणपणे उलथून पाडा त्या सगळ्यांना
रक्ताची, प्राणांची मालमत्तेची पर्वा न करता
प्रजासत्ताकासाठी मरायला तयार होणे
हे उदात्त आणि महान भवितव्य आहे,
आमच्या धैर्याचे हे ध्येय आहे.

विलिखचे हंगामी मुख्य कार्यालय शोधून काढायला मी न्यूस्टाड्टकडे चालले होतो, त्या वेळी रेल्वेवरचे स्वयंसेवक हे गाणे गात होते.

म्हणजे आतापासून पुढे, प्रजासत्ताकासाठी मरायला तयार होणे हे माझ्या धैर्याचे ध्येय होते, किंवा निदान पक्षी तसे असल्याचे समजले जात होते. हे नवे ध्येय असणे मला विचित्र दिसत होते. मी स्वयंसेवकांवर नजर टाकली. तरुण, देखणे, तडफदार पोऱ्ये होते ते. त्या क्षणी तरी त्यांच्या धैर्याचे ध्येय प्रजासत्ताकासाठी मरायला तयार होणे हे असल्याचे त्यांच्या चेहऱ्यांवरून तरी नक्कीच दिसत नव्हते.

फ्रेडरिक एन्गल्स, " बादशाही राज्यघटनेसाठी जर्मन मोहीम "
मार्क्स / एन्गल्स, वेर्के, खंड ७ वा, १९६९, पृष्ठ १६२

लुई बोनापार्टविरुद्ध विडंबनात्मक लोकगीत

अलीकडेच, बोनापार्ट हा आपल्या पत्नीसह ओडियोन [२४३] नाट्यगृहात होता त्या वेळी नाटकाला गर्दी करून राहिलेले विद्यार्थी "Sire de France Boissy"

हे गाणे त्यांतल्या त्यात काही ठळक कडव्यांवर खास भर देऊन एकसारखे गात होते. पॅरिसचे कामगार जे गाणे गातात त्याचे ध्रुवपद असे आहे :

तो चालला रे चालला, तो चालला रे चालला,
छोटासा हिंगमिऱ्या वाणी.
तो चालला आपल्या मातृभूमीला
आपला सगळा माल व चीजवस्त घेऊन

पोलिसांनी या गाण्यावर बंदी घातली, म्हणजे हा छोटा हिंगमिऱ्या वाणी कोण होता हे सगळ्यांना ठाऊक झाले.

एन्गल्स यांचे मार्क्स यास पत्र,
तारीख ७ फेब्रुवारी १८५६
मार्क्स/एन्गल्स, वेर्के,
खंड २९ वा, १९६७, पृष्ठ ९

मार्क्स आणि एन्गल्स यांचे
कबुलीजबाब

कार्ल मार्क्स
कबुलीजबाब [२१४]

तुमचा आवडता सद्‌गुण ..... साधेपणा
तुमचा आवडता पुरुषाच्या ठायींचा सद्‌गुण ..... सामर्थ्य
तुमचा आवडता स्त्रीच्या ठायींचा सद्‌गुण ..... दौर्बल्य
तुमचे खास वैशिष्ट्य ..... एकमार्गीपणा
तुमची सुखाची कल्पना ..... संघर्ष
तुमची दुःखाची कल्पना ..... शरणागती
तुम्ही जास्तीत जास्त माफ करता असा दोष ..... भोळसटपणा
तुम्हाला जास्तीत जास्त तिरस्कार वाटणारा असा दोष ..... लाचारपणा
तुम्हाला शिसारी आणणारा माणूस ..... मार्टिन टप्पर
आवडता व्यवसाय ..... ग्रंथवाचनात गढून जाणे
कवी ..... शेक्सपियर, एस्किलस, गटे
गद्य लेखक ..... दीदरो
वीर पुरुष ..... स्पार्टाकस, केप्लर
वीर रमणी ..... ग्रेट्‌चेन
फूल ..... दा पने
रंग ..... लाल
नाव ..... लॉरा, जेनी
पक्वान्न ..... मासे
आवडते सुभाषित ..... Nihil humani a me alienum puto
आवडते ब्रीद वाक्य ..... De omnibus dubitandum.

कार्ल मार्क्स

इंग्रजीत लिहिलेला मजकूर
मार्क्स आणि एन्गल्स यांच्या आठवणी,
मॉस्को, १९५६, पृष्ठ २६६

फ्रेडरिक एन्गल्स
कबुलीजबाब [२४५]

लंडन, एप्रिल महिन्याचा आरंभ, १८६८

तुमचा आवडता सद्‌गुण	....	आनंदीपणा
– पुरुषाच्या ठायीचा सद्‌गुण	....	आपले काम बरे, आपण बरे
– स्त्रीच्या ठायीचा सद्‌गुण	....	वस्तू भलतीकडेच न ठेवणे
मुख्य वैशिष्ट्य	...	सगळ्या गोष्टींचे अर्धवट ज्ञान
सुखाची कल्पना	....	शॅतो मार्गो १८४८@
दुःखाची कल्पना	....	दंतवैद्याकडे जाणे
तुम्ही माफ करता असा दोष	....	कोणत्याही प्रकारचा अतिरेक
तुम्ही तिरस्कार करता असा दोष	....	भंपकपणा
तुम्हाला शिसारी आणणारी गोष्ट	....	गर्विष्ठ स्त्री
तुम्हाला जास्तीत जास्त न आवडणारी पात्रे	....	स्पूर्जन
आवडता व्यवसाय	....	थट्टा करणे आणि थट्टा करून घेणे
– वीरपुरुष	....	कुणीच नाही
– वीररमणी	....	खूपच आहेत, एकच अशी सांगता येत नाही.
कवी	....	Reineke de Vc se, शेक्स्पियर, एरिओस्ट, इत्यादी
गद्य लेखक	....	गटे, लेस्सिंग, डॉ. सामेल्सन @
फूल	....	ब्ल्यूबेल
रंग	...	ॲनिलाईन नसलेला कोणताही
पक्वान्न	....	थंड सॅलड; गरम आयरिश स्टयू
सुभाषित	....	कसलेच नसणे
ब्रीदवाक्य	....	सगळे इशारी न्या

एफ. एन्गल्स
इंग्रजीत लिहिलेला मजकूर
टंकलिखित प्रतीनुसार प्रकाशित

---

a) एक प्रकारचे मद्य. सनाचा निर्देश १८४८ च्या क्रांतिकारक घडामोडींना अनुलक्षून आहे. — संपादक

b) लोकप्रिय बॅप्टिस्ट धर्मोपदेशक, कट्टर धर्मवेडा. —संपादक

c) एन्गल्स "Reineke Fuchs" या गटेच्या कवितेचा निर्देश करतो.—संपादक

d मॅन्चेस्टर येथील एक जर्मन नेत्रचिकित्सक, त्या वेळी एन्गल्सवर याने उपचार केले; एका साहित्यिक क्लबचा सदस्य. —संपादक

मार्क्स आणि एन्गल्स यांच्या आठवणींतील उतारे

मार्क्स यांच्या आठवणीतील उतारे

१

पॉल लाफार्ग

त्याला हायने व गटे तोंडपाठ होते आणि आपल्या संभाषणांमध्ये अनेकदा त्यांचे उतारे तो देत असे; सगळ्या युरोपियन भाषांतील कवींचा तो कष्टाळू वाचक होता. दरवर्षी तो मूळ ग्रीक भाषेतून एस्किलसचे वाचन करीत असे. त्याच्या मते तो आणि शेक्स्पियर हे मानवजातीने जन्माला घातलेले सर्वश्रेष्ठ प्रतिभावंत नाटककार आहेत. शेक्स्पियरविषयी त्याला अमर्याद आदर होता. त्याने त्याच्या ग्रंथांचा तपशीलवार अभ्यास केलेला होता आणि त्याच्या नाटकातली कमीत कमी महत्त्वाची पात्रे देखील त्याला परिचित होती. त्याचे सगळे कुटुंबच या महान इंग्रज नाटककाराचे खरोखरीचे भक्त होते. त्याच्या तिघी मुलींना त्याची अनेक नाटके तोंडपाठ होती. १८४८ नंतर त्याला आपले इंग्रजीचे ज्ञान परिपूर्ण करावेसे वाटले, तसे त्याला इंग्रजीचे वाचन अगोदरच करता येत होते, म्हणून त्याने सेक्स्पियरच्या सगळ्या मूळ शब्द-प्रयोगांचा शोध घेऊन त्यांचे वर्गीकरण केले. हीच गोष्ट त्याने विल्यम कॉबेट याच्या चर्चात्मक ग्रंथांच्या बाबतीत केली; कॉबेटला तो फार मोठा लेखक मानत असे. डान्टे आणि रॉबर्ट बर्न्स हे त्याच्या आवडत्या कवींपैकी होते आणि त्याच्या मुली या स्कॉटिश कवीची विडंबन काव्ये किंवा पोवाडे तोंडपाठ म्हणत किंवा गाऊन दाखवत असताना तो मोठ्या आनंदाने ऐकत असे.

२

अधूनमधून तो सोफ्यावर आडवा होऊन एखादी कादंबरी वाचत असे; तो कधी कधी अशा दोन किंवा तीन कादंबऱ्या आलटून पालटून वाचत असे. डार्विन-प्रमाणे तो कादंबऱ्यांचे खूप वाचन करीत असे; त्यातल्या त्यात त्याला अठराव्या

शतकातल्या कादंबऱ्या अधिक पसंत असत. विशेषेकरून फील्डिंगची टॉम जोन्स ही कादंबरी त्याच्या आवडीची होती. अधिक आधुनिक कादंबरीकारांपैकी त्याचे अत्यंत आवडते म्हणजे पॉल डे कॉक, चार्ल्स लीव्हर, अलेक्झांडर ड्यूमा थोरला आणि वॉल्टर स्कॉट हे होत. स्कॉटची ओल्ड मॉर्टालिटी ही त्याच्या मते सर्वश्रेष्ठ होती. साहस आणि विनोद असलेल्या कथा त्याला निश्चितपणे अधिक पसंत असत.

सेर्व्हान्टिस व बाल्झॅक यांना इतर सगळ्या कादंबरीकारांपेक्षा तो वरचढ मानत असे. डॉन क्विक्झोट या कादंबरीत मृत्युपंथाला लागलेल्या स्त्री-दाक्षिण्य युगाच्या महाकाव्याचे दर्शन त्याला घडत असे; या युगाच्या गुणांचा उगवत्या भांडवलदारी जगाकडून उपहास होत असे व ते तुच्छ मानले जात असत. बाल्झॅकचे तर तो एवढे कौतुक करीत असे की आपला अर्थशास्त्रविषयक ग्रंथ पूर्ण केल्यानंतर लगेच त्याच्या La comedie humaine या कादंबरी-मालेचे समीक्षण लिहायचा त्याचा मनोदय होता. त्याच्या मते बाल्झॅक हा त्याच्या काळातला इतिहासकार होता इतकेच नव्हे, तर तो अशा पात्रांचा भविष्यवेत्ता निर्माता होता की जी पात्रे लुई फिलिपच्या अमदानीत अजून गर्भावस्थेतच होती आणि ज्यांचा विकास त्याच्या मृत्यूनंतर तिसऱ्या नेपोलियनच्या अमदानीपर्यंत पूर्ण झालेला नव्हता.

मार्क्स सगळ्या युरोपियन भाषांतील वाङ्मय वाचू शकत असे आणि जर्मन, फ्रेंच व इंग्रजी या तीन भाषांतून तो लिहू शकत असे. भाषांच्या विशेषज्ञांना याचे कौतुक वाटत असे. "परकीय भाषा हे जीवन-कलहातील हत्यार आहे--" ही म्हण पुन्हा पुन्हा सांगण्याची त्याला आवड असे.

भाषाज्ञानामध्ये त्याला फार मोठी गती होती आणि त्याच्या मुलींनी त्याच्याकडून हा वारसा घेतलेला होता. त्याची पन्नाशी उलटल्यावर त्याने रशियन भाषेचा अभ्यास आरंभला, आणि त्याला अवगत असलेल्या कोणत्याही आधुनिक वा प्राचीन भाषेशी त्या भाषेचे कसलेही निकटचे साधर्म्य नसताना देखील सहा महिन्यांच्या अवधीत रशियन कवींचे व गद्य लेखकांचे साहित्य वाचण्याचा आनंद घेण्याइतके त्या भाषेचे पुरेसे चांगले ज्ञान त्याला झाले. त्याचे आवडते लेखक पुश्किन, गोगोल आणि श्चेद्रिन हे होते. त्याने रशियन भाषेचा अभ्यास सरकारी चौकशांचे दस्तऐवज वाचता यावेत म्हणून केला. या दस्तऐवजांमध्ये राजकीय बिंगे उघडकीस येत असत म्हणून रशियन सरकार ते दाबून टाकत असे. निष्ठावंत मित्रांनी हे दस्तऐवज मार्क्सला उपलब्ध करून दिले आणि त्यांचे ज्ञान असलेला पश्चिम युरोपातला तो नक्कीच एकमेव अर्थशास्त्रज्ञ होता.

३

रविवारी त्याच्या मुली त्याला काम करू देत नसत. तो सबंध दिवसभर त्याच्यावर त्यांची मालकी असे. हवामान उत्तम असेल तर सगळे कुटुंब ग्रामीण भागात

फिरायला जात असे. वाटेत एखाद्या साध्या हॉटेलात थांबून ते ब्रेड, खवा व जिंजर बीयर घेत असत. मुली लहान होत्या तेव्हा त्यांना लांबलचक अद्‌भुत गोष्टी सांगून त्यांचे प्रदीर्घ चालणे कमी झाल्याचे त्यांना भासवत असे. त्यांना चालावे लागणाऱ्या अंतराच्या हिशेबाने तो या गोष्टी जाता जाताच रचून त्यांच्यातल्या गुंतागुंती वाढवत असे आणि ऐकता ऐकता या बालिकांना चालण्याचा शीण विसरायला होत असे.

त्याची कल्पनाशक्ती अतुलनीयपणे समृद्ध होती; त्याचे पहिले साहित्यिक लेखन काव्यरचना हे होते. सौ. मार्क्स यांनी आपल्या पतीने तरुणपणी लिहिलेल्या कविता काळजीपूर्वक सांभाळून ठेवल्या होत्या आणि त्या कोणालाही कधीही दाखविल्या नव्हत्या. त्याच्या आई-वडिलांनी आपला मुलगा साहित्यिक होईल किंवा प्राध्यापक होईल असे स्वप्नरंजन केलेले होते आणि तो समाजवादी चळवळीत आणि अर्थ-शास्त्राच्या अभ्यासात गुंतून स्वतःला कमीपणा आणत आहे असे त्यांना वाटत असे; त्या काळी हे विषय जर्मनीत तिरस्करणीय मानले जात असत.

मार्क्सने आपल्या मुलींच्यासाठी ग्राच्चींच्या विषयावर नाटक लिहायचे. त्यांना अभिवचन दिले होते. दुर्दैवाने त्याला हा शब्द पाळता आला नाही. "वर्गलढ्याचा सरदार" ही उपाधी लाभलेल्या मार्क्सने प्राचीन जगातील वर्गलढ्यांतल्या त्या भयंकर व दिव्य प्रसंगाचा नाट्यरूप ऊहापोह कसा केला असता हे पाहणे मजेशीर ठरले असते.

पॉल लाफार्ग, "मार्क्सच्या आठवणी,"
समकालीनांच्या नजरेतून मार्क्स आणि एन्गल्स, मॉस्को, १९७९.
पृष्ठे २५, २६, ३३

ईलियानॉर मार्क्स-ॲव्हेलिंग

आणि नंतरची अनेकानेक वर्षे मार्क्सने आपल्या मुलींना गोष्टी सांगितल्या. माझ्या बहिणींना मी त्यावेळी फारच लहान होते— तो फिरायला जाताना गोष्टी सांगायचा आणि या गोष्टींचे मोजमाप प्रकरणांवरून न होता मैलांवरून होत असे. "आम्हाला आणखी एक मैल सांग," असा या दोन्ही मुलींचा आग्रह असे. माझ्यापुरते म्हणाल, तर मूरने मला ज्या कितीतरी अजब गोष्टी सांगितल्या, त्यातली सगळ्यात जास्त अजब, अत्यंत मजेशीर गोष्ट म्हणजे "हान्स रॉकल" ही गोष्ट होती. ती महिनेच्या महिने चालायची; ती गोष्टींची एक सबंध मालिकाच होती. इतक्या काव्यमय, रसाळ विनोदी गोष्टी असत त्या; त्या लिहून घ्यायला कुणी नव्हते याचे आता वाईट वाटते! हान्स रॉकल हा हॉफ्फमानसारखा जादुगार होता. त्याचे एक खेळण्याचे दुकान असायचे, आणि तो सदा "पैशाच्या अडचणीत" असायचा.

त्याच्या दुकानात खूप खूप मजेशीर खेळणी असायची—लाकडी बुवे-बाया, राक्षस आणि ठेंगू, राजे आणि राण्या, कामगार आणि मालक, प्राणी व पक्षी, बायबलमधील नोआहच्या जहाजांवरील प्राण्यांइतकी गर्दी असायची त्या दुकानात; टेबले, खुर्च्या, घोडागाड्या, सर्व प्रकारच्या व आकारांच्या पेट्या. तो हान्स जादुगार असला तरी सैतानाची किंवा खाटकाची देणी काही त्याला चुकविता येत नसत, आणि म्हणून त्याच्या इच्छेविरुद्ध त्याला आपली खेळणी सैतानाला विकून टाकणे भाग पडत असे. नंतर या खेळण्यांना अनेक अजब साहसे करावी लागत आणि शेवटी ती हमखास हान्स रॉकलच्या दुकानात परत येत असत. त्यांतली काही साहसे तर उग्र आणि भयंकर असत, हॉफमान्नच्या साहसांसारखीच. काही विनोदी प्रसंग असत; या सगळ्यांचे कथन अखंड उत्साहाने व विनोदपूर्ण शैलीत होत असे.

आणि मूर आपल्या मुलींना पुस्तके वाचून देखील दाखवत असे. मला, आणि अगोदरच्या माझ्या दोघी बहिणींना त्याने होमर सबंध वाचून दाखविला, **नायबेलुन्गेन लाइड, गुद्रुन, डॉन क्विक्झोट, अरेबियन नाइट्स** इत्यादि पुस्तके त्याने सबंध वाचून दाखविली. मी सहा वर्षांची असतानाच शेक्स्पियरच्या नाटकातले प्रवेशच्या प्रवेश मला तोंडपाठ झालेले होते.

माझ्या सहाव्या वाढदिवसाला मूरने मला पहिली कादंबरी भेट म्हणून दिली. **पिटर सिंपल** @ ही अमर कादंबरी. तिच्या पाठोपाठ मरायट आणि कूपर यांच्या सगळ्या कादंबऱ्या वाचायला मिळाल्या. आणि या कादंबऱ्यांचे माझे वाचन चालू असताना माझे बाबादेखील त्या सगळ्या प्रत्यक्ष वाचत असत आणि त्यांची चर्चा गंभीरपणे आपल्या छोट्या कन्येशी करीत असत. आणि ही छोटी कन्या मरायटच्या सागर-कथांनी उत्साहित होऊन सांगायची की आपण "पोस्ट-कॅप्टन" होणार (मग त्याचा काय अर्थ असेल तो असो) आणि आपल्याला "पुरुषासारखा पोषाख करता येईल किंवा नाही" आणि "पळून जाऊन लढाऊ जहाजावर दाखल होता येईल किंवा नाही" याविषयी ती आपल्या बाबांशी सल्लामसलत करीत असे. बाबा तिला आश्वासन देत असत की सगळे काही करता येईल असे आपल्याला तर वाटते, परंतु सगळ्या योजना नीट परिपक्व होईपर्यंत आपण याची वाच्यता कोणाजवळही करता कामा नये. परंतु या परिपक्व व्हायच्या अगोदरच स्कॉटच्या कादंबऱ्यांचे वेड चालू झालेले होते आणि आपण स्वतःच अंशतः दुष्ट कॅबेलच्या जमातीतले आहोत हे ऐकून या छोट्या कन्येच्या अंगावर शहारे आले. भग हायलँडर्सचा उठाव करण्यासाठी आणि "पंचेचाळीसांचे" b पुनरुज्जीवन करण्यासाठी कट शिजू लागले. याच्या भरीला

---

a) इंग्रज लेखक फ्रेडरिक मरायट याची साहसपूर्ण कादंबरी. —संपादक

b वॉल्टर स्कॉटच्या वेव्हर्ले या कादंबरीतील १७४५ साली इंग्रज राजवटीविरुद्ध स्कॉटिश लोकांनी केलेल्या उठावाच्या वर्णनाला अनुलक्षून हा संदर्भ आहे.—संपादक

मला एवढेच सांगायचे आहे की स्कॉट हा लेखक मार्क्सला पुन्हा पुन्हा वाचावासा वाटत असे आणि बाल्झॅक व फील्डिंग यांचे जसे कौतुक तो करीत असे, तसेच स्कॉटचेही तो कौतुक करीत असे. आणि या व इतर अनेक ग्रंथांविषयी तो बोलत असे. त्या वेळी या छोट्या कन्येला सर्वस्वी अभावितपणे त्याच्याकडून त्यातली उत्तमोत्तम सौंदर्यस्थळे तिला दाखवून दिली जात असत, हे तो तिला शिकवत असे, परंतु तिला मात्र आपण काही शिकत आहोत असे कधीच वाटत नसे,--तसे वाटले असते तर तिने हरकत घेतली असती--स्वतः प्रयत्न करावा व विचार करावा, स्वतः समजून घ्यायचा प्रयत्न करावा अशी त्याची शिकवण असे.

ईलियानॉर मार्क्स-ॲव्हेलिंग "कार्ल मार्क्स"

समकालीनांच्या नजरेतून मार्क्स आणि एन्गल्स,
मॉस्को, १९७२, पृष्ठे १५५-५६

फ्रान्झिस्का कुगेलमान्न

मार्क्सची अभिरुचि कवितेच्या बाबतीत त्याचप्रमाणे विज्ञानाच्या न अनुकरणात्मक कलांच्या बाबतीत अत्यंत उच्च दर्जाची होती. त्याचे वाचन अफाट होते आणि त्याची स्मरणशक्ती जबरदस्त होती. माझ्या वडिलांच्या सारखीच त्याला अभिजात ग्रीसचे महाकवि, शेक्स्पियर आणि गटे यांची खूप आवड होती. चामिस्सो आणि रुकेर्ट या दोघां कवींची गणना देखील त्यांच्या आवडत्या कवींमध्ये होत असे. चामिस्सोची अन्तःकरणाला चटका लावणारी कविता **भिकारी आणि त्याचा कुत्रा** तो तोंडपाठ म्हणत असे. रुकेर्टच्या लेखनकलेचे तो कौतुक करीत असे आणि हारीरीच्या **माक्कामास** या ग्रंथाच्या त्याने केलेल्या उत्कृष्ट अनुवादाची तो विशेष प्रशंसा करीत असे. नंतर अनेक वर्षांनी मार्क्सने त्या काळाची आठवण म्हणून माझ्या आईला हे पुस्तक भेटीदाखल दिले.

मार्क्सचे भाषांचे ज्ञान अपूर्व होते. इंग्रजीच्या जोडीला त्याला फ्रेंच भाषा इतकी चांगली अवगत होती की, त्याने स्वतःच भांडवल या ग्रंथाचा फ्रेंच भाषेत अनुवाद केला. @ आणि त्याचे ग्रीक, लॅटिन, स्पॅनिश आणि रशियन या भाषांचे ज्ञान इतके चांगले होते की त्यांचे अनुवाद तो बघता बघता करू शकत असे. तो

---

a मार्क्सने भांडवल, खंड १ ला याचा अनुवाद फ्रेंच भाषेत केला नाही. परंतु त्याने जे. रॉयकृत फ्रेंच अनुवादाचे काळजीपूर्वक संपादन केले. कारण तो अनुवाद त्याला समाधानकारक वाटला नव्हता. — संपादक

स्वतःच्या हिंमतीवर रशियन शिकला, ते त्याला झालेल्या काळपुळीच्या व्याधीचा "विसर पडावा म्हणून" शिकला.

त्याच्या मते तुर्गेयेव हा रशियन आत्म्याची वैशिष्ट्ये आपल्या अवगुंठित स्लाव्होनिक संस्कारितेनिशी अजब प्रकारे प्रदर्शित करतो. त्याच्या मते लेर्मोन्तोवची वर्णन शैली क्वचितच कुणाला साधली असेल आणि तिची बरोबरी क्वचितच कुणी केली असेल.

स्पॅनिश लेखकांपैकी त्याचा आवडता लेखक काल्डेरॉन हा होता. त्याचे कित्येक ग्रंथ त्याच्याकडे होते आणि अनेकदा त्यातले भाग तो आम्हाला वाचून दाखवत असे.

आमच्या फ्लॅटमध्ये एक मोठी खोली होती. तिला पाच खिडक्या होत्या. आम्ही तिला हॉल म्हणत असू आणि तिथे आम्ही संगीतसाधना करीत असू. घरचे मित्र तिला ऑलिम्पस म्हणत असत, कारण भिंतीच्या कडेकडेने तिथे ग्रीक देवतांचे अर्धपुतळे ठेवलेले होते. त्यांच्या अग्रस्थानी झ्यूस ओत्रिकोलस विराजमान झालेला होता.

माझ्या वडिलांच्या मते मार्क्सचे फार मोठे साम्य या झ्यूसशी होते, आणि अनेक लोक या बाबतीत त्यांच्याशी सहमत होते. दोघांनाही भव्य मस्तक होते, भरपूर केस होते, उत्कृष्ट विचारमग्न भालप्रदेश होता आणि हुकुमी असूनही प्रेमळ आविर्भाव होता. माझ्या वडिलांच्या मते मार्क्सची प्रशांत परंतु प्रेमळ व आनंदी वृत्ती, त्याला भ्रान्तिष्ठपणाचा व खळबळीचा लवलेशही माहीत नसलेला, या गुणांमुळेही तो माझ्या वडिलांच्या आवडत्या ऑलिम्पियन दैवतांसारखा दिसत असे. "अभिजात साहित्यांतली दैवते कसल्याही आवेशाशिवाय चिरविश्राम घेत असतात" या आक्षेपाला मार्क्सने दिलेले उत्तर उद्धृत करायला माझ्या वडिलांना आवडत असे. मार्क्स म्हणायचा, "गोष्ट याच्या उलट आहे. कसल्याही असंतोषाशिवाय ती चिरंतन आवेश असतात." जे लोक मार्क्सला आपल्या राजकीय पक्षाच्या कार्यातील चळवळीत ओढून न्यायचा प्रयत्न करीत असत, त्यांच्याविषयी आपले मत प्रदर्शित करताना माझे वडील फारच चिडत असत. त्यांना असे हवे होते की मार्क्स हा देवांच्या व माणसांच्या ऑलिम्पियन पित्याप्रमाणे आपल्या विजेचा प्रकाश जगावर पाडू दे आणि अधून मधून जगाविरुद्ध आपली घनगर्जना करू दे, परंतु दैनंदिन चळवळीत तो आपला मौल्यवान वेळ व्यर्थ दवडू दे नको.

फ्रान्झिस्का कुगेलमान्न,
"मार्क्सच्या महान स्वभावातील लहान लक्षणे"
समकालीनांच्या नजरेतून मार्क्स आणि एन्गल्स,
मॉस्को, १९७२, पृष्ठे १८४-८६

आन्सेल्मो लॉरेन्झो

थोड्याच वेळात आम्ही एका घरासमोर थांबलो. दरवाज्याच्या चौकटीत एक वयोवृद्ध माणूस दिसला, त्याचा अविर्भाव प्राचीन आदरणीय पितामहांसारखा दिसला.

मी संकोचयुक्त आदरानिशी त्याच्याकडे गेलो आणि इंटरनॅशनलच्या स्पॅनिश फेडरेशनचा प्रतिनिधी म्हणून मी स्वतःचा परिचय करून दिला. त्याने मला कवेत घेतले आणि माझ्या कपाळाचे चुंबन घेऊन स्पॅनिश भाषेत मला उद्देशून प्रेमळ उद्‌गार काढत मला घरात नेले. तो होता कार्ल मार्क्स.

कुटुंबातल्या मंडळीची अगोदरच निजानीज झालेली होती, आणि त्याने स्वतःच मला कमालीच्या आपुलकीने फराळाचे वाढले. नंतर आम्ही चहा घेतला आणि बराच वेळ क्रांतिकारक विचार, प्रचार आणि संघटना या विषयांवर बोलत बसलो. स्पेनमध्ये आम्ही जे साधले होते त्याविषयी मार्क्सने मोठे समाधान प्रदर्शित केले.

आम्ही चालू विषयावरचे बोलणे संपवलेले असो किंवा माझा सन्माननीय यजमान आपल्या पसंतीच्या कोणत्यातरी विषयावर विस्ताराने बोलू इच्छीत असो, हे मला ठाऊक नाही, परंतु तो स्पॅनिश साहित्याविषयी बोलायला लागला. या साहित्याचे त्याला तपशीलवार व सखोल ज्ञान होते. आमची प्राचीन रंगभूमी, तिचा इतिहास, तिचे चढउतार आणि तिची प्रगती यांचा त्याला संपूर्ण परिचय होता आणि तिच्याविषयी त्याने जे सगळे सांगितले ते ऐकून मी चकितच झालो. काल्डेरॉन, लोपेद वेगा, तिर्सो आणि इतर महान साहित्यकार, केवळ स्पॅनिश रंगभूमीचे इतकेच नव्हे, तर युरोपियन नाटकार देखील,—या सगळ्यांचे त्याने थोडक्यात विश्लेषण केले आणि मला तर हे अगदी अचूक मूल्यमापन वाटले.

या महापुरुषासमोर आपण फार म्हणजे फारच लहान आहोत मसे मला वाटल्यावाचून राहवले नाही. माझ्या अज्ञानाचे शोचनीय प्रदर्शन होऊ नये म्हणून मी प्रचंड प्रयत्न केला आणि काल्डेरॉन व शेक्स्पियर यांच्या दरम्यानची नेहमीची तुलना केली आणि सेर्वान्टीसचीही आठवण करून दिली. या सगळ्या विषयांवर मार्क्सने महान तेजस्वी भाष्य केले आणि हिडाल्गो द ला मान्चा याचे आपल्याला खूप कौतुक वाटत असल्याचे त्याने सांगितले.

आन्सेल्मो लॉरेन्झो, "पहिल्या इंटरनॅशनलच्या आठवणी"

मार्क्स आणि एन्गल्स यांच्या आठवणी,
मॉस्को, १९५६, पृष्ठे २८९-९०

एन्गल्सच्या आठवणींतून

एन्. एस. रुसानोव

अचानक एन्गल्स चटकन उठून उभा राहिला आणि म्हणाला :

" थांबा हं, मी तुम्हाला मार्क्सच्या जुन्या रशियन ग्रंथसंग्रहातील थोडेसे वाचून दाखवतो... त्याच्या या संग्रहातल्या रशियन ग्रंथांपैकी बहुतेक मी इतर संस्थांना व लोकांना दिले, ते त्यांचा अधिक चांगला उपयोग करू शकतात म्हणून....परंतु काही थोडे मी माझ्याकडे ठेवले आहेत...." त्याने स्नेहशील रीतीने मला आपल्याबरोबर दुसऱ्या खोलीत यायला सांगितले. ती तशीच भरपूर उजेड असलेली व प्रशस्त होती— ते त्याचे ग्रंथालय होते. भिंतींच्या कडेकडेने पुस्तकांच्या लांबलचक मांडण्या होत्या म्हणून ते ग्रंथालय असावे असे मला वाटले. एन्गल्स पहिल्यासारखाच चटकन एका मांडणीकडे गेला आणि पटकन एका जुन्या बांधणीचे पुस्तक काढून ते त्याने मला दाखविले : पुश्किनच्या **येवगेन्टी ओनेगिन** या खंडकाव्याच्या जुन्या आवृत्त्यांपैकी ते होते.

जणू कुणी तरी माझ्या स्मरणाला बटन दाबून उजाळा दिला असे मला वाटले. त्यावेळी माझी स्मरणशक्ति चांगलीच होती. मला एन्गल्सला हे दाखवायला हवे होते की आम्ही " राजकीय अद्‌भुतरम्यतावादाच्या आहारी गेलेले लोक आहोत आणि आम्ही थोडेसे वाचन केलेले आहे आणि आम्हाला काहीतरी ज्ञान आहे.

" अहो, त्यांतले काही तरी तुम्ही मला वाचून दाखवावे म्हणतोय ? ज्या उताऱ्याकडे तुम्ही माझे लक्ष वेधायला मागत आहात, तोच मी तुम्हाला वाचून दाखवतो. "

एन्गल्सने स्नेहशीलपणाने टिंगल करायच्या धर्तीवर माझ्याकडे तिरप्या नजरेने पाहिले :

" वाचा. "

त्याने ते पुस्तक माझ्या हाती दिले.

मी ते मिटले आणि स्मरणांतून पुढील ओळी तोंडपाठ म्हणून दाखविल्या :

....चिताइ आदामा स्मीता
इ बुइल् ग्लुबोकीइ एकोनोम
तो येस्त् उम्येल् सुदीत् ओ तोम्
काक् गसुदास्त्वों बगातीत्
इ अत्चीवो इ पचेमू
न्ये नूझ्नो झोलोता येमू,
कग्दा सुइरोइ प्रोदूक्त इमेयेत्....
यवो अत्येत्स पन्यात् न्ये मोग्
इ झ्येम्ली अद्दावाल् व झालोग a

"Donnerwetter I ..... Potztausend....." एन्गल्स कित्येकदा उद्गारला.

"अरेच्चा ! तुम्ही बरोबर हेरलंत...तोच, नेमका तोच उतारा मी तुम्हाला वाचून दाखवायचा बेत केलेला होता. तुम्हाला ते कसं सुचलं ?"

"विचारांचा सहसंभव."

"कोणत्या ?"

"रशियन जीवनाच्या अपरिहार्य मागासलेपणाला अनुलक्षून कोणतातरी उतारा वाचून दाखवायला तुम्हाला हवा होता हे उघड दिसत होते. तत्काळ मला असे आठवले की, मार्क्सने आपल्या अर्थशास्त्रावरील टीका-टिप्पणी या ग्रंथात नेमका हाच उतारा दिलेला आहे आणि तो देखील रशियन भाषेतला दिला आहेः

यवो अत्येत्स पन्यात् न्ये मोग्
इ झ्येम्ली अद्दावाल् व झालोगय्

भूदासांच्या श्रमावर आधारलेल्या समाजाला भांडवलदारी अर्थशास्त्राचे विचार लागू करता येत नाहीत हे सिद्ध करण्यासाठी त्याने हा उतारा दिला..."

एन्. एस्. रुस्तनोव, "एन्गल्सशी माझा परिचय"
मार्क्स आणि एन्गल्स यांच्या आठवणी,
मॉस्को, १९५६, पृष्ठे ३२२-२३

---

a ॲडाम स्मिथचा अभ्यास केल्यावर
आणि राज्य कोणत्या साधनांनी भरभराटते ते सगळे माहीत करून घेतल्यावर
त्याला जगायला काय लागते आणि साध्या पैदाशीची
तरतूद करून घेतल्यावर सोन्याची उणीव त्याला कशी चालते
हे त्याने माहीत करून घेतले; त्याच्या वडिलांनी
त्याच्याकडे लक्षच दिले नाही; त्यांनी आपल्या जमिनी
बेबडक गहाण टाकल्या.

फान्नी क्राव्चिन्स्काया

पाहुण्यांचा आपसात कडाक्याचा वाद चाललेला होता. ते वर्दळीवर आले, एकमेकांवर ओरडू लागले आणि एन्गल्सला त्या प्रश्नाचे उत्तर विचारायला लागले.

अचानक एन्गल्स माझ्याकडे वळला आणि मला परकीय भाषा कोणत्याच माहीत नव्हत्या ही गोष्ट हिशेबांत घेऊन तो रशियन भाषेत बोलला. त्याने पुश्किनचा उतारा म्हणून दाखविला :

V

सर्वसाधारण नियम म्हणजे शिक्षण देतात
आपल्याला केवळ वरवरचे;
आमच्या लेखी ज्ञानाचा लौकिक घालविणे म्हणजे
सपशेल मूर्ख ठरणे होते.
कडक शिस्तीचे भोक्ते आणि कधीही संशय घेणारे असे अनेक
म्हणत की येव्गेनी "चांगलाच विद्वान पोऱ्या आहे," परंतु
"त्याला थोडी "ग" ची बाधा झालेली आहे."
आमच्या नायकाला हजरजबाबीपणा चांगलाच अवगत होता,
सहजपणी बोलणे, शाहणा दिसणे आणि मौन पाळणे
—या कला त्याला चांगल्याच अवगत होत्या. आणि आयत्या वेळच्या
क्लृप्त्या योजून स्त्रियांचे चेहरे स्मित करायची
कला त्याला चांगलीच अवगत होती.

VI

अलीकडे लॅटिनची कुणी पर्वाच करीत नाहीत
आमच्या नायकाला भाषांतर करण्यापुरते लॅटिनचे ज्ञान होते.
मात्र फारसे यथायोग्यपणे नव्हे,
फार तर एखादे सुभाषित,
जूवेनालेविषयी एखादा शब्द सांगायचा
पत्राच्या शेवटी Vale म्हणायचे
आणि एक दोन चुकांनिशी
व्हर्जिलच्या दोन ओळी तुम्हाला म्हणून दाखवायच्या.
काळाने साठवलेल्या धुळीच्या ढिगाखालून
खोलात शिरून जुनी वैभवे उकरून काढायची खोड नव्हती त्याला,
अभिजाताचे पण पुष्पहार तो सुकून जाऊ देत असे

परंतु अत्यंत मनोरंजक अशा सगळ्या कथा
प्रत्येक शतकातल्या व प्रत्येक देशातल्या
तो कोणत्याही वेळी स्मरणातून सांगू शकत असे.

VII

यमक जुळवायसाठी जीव टाकण्यातला आनंद
त्याला उमगत नव्हता.
एकही वृत्त त्याला सांगता येत नव्हते
कितीही वेळ खर्च केला तरी.
तो थिओक्रिटस व होमर यांच्यावर चिडत असे
परंतु ॲडाम स्मिथचा अभ्यास करून त्याने मोठी पदवी मिळविली असती
आणि राज्य कोणत्या साधनांनी भरभराटते ते सगळे माहीतीत करून घेतल्यावर
त्याला जगायला काय लागते आणि साध्या पैदाशीची
तरतूद करून घेतल्यावर सोन्याची उणीव त्याला कशी चालते
हे त्याने माहीत करून घेतले; त्याच्या वडिलांनी त्याच्याकडे
लक्षच दिले नाही; त्यांनी आपल्या जमिनी बेधडक गहाण टाकल्या.

त्याने हा संबंध उतारा सुंदर रशियनमध्ये म्हणून दाखविला. मी टाळ्या वाजवून दाद दिली, पण एन्गल्स म्हणाला : "वाईट एवढेच वाटते की माझे रशियन भाषेचे ज्ञान याच्या पलीकडे गेलेले नाही."

त्याचा माझ्यावर उमटलेला ठसा कधीही पुसला जाणार नाही, तो किती तरी आतिथ्यशील व दिलखुलास होता.

फान्नी क्राव्चिन्स्काया, "आठवणी"
समकालीनांच्या नजरेतून मार्क्स आणि एन्गल्स,
मॉस्को, १९७७, पृष्ठे २०४-०६

जेन्नी मार्क्स हिचे समीक्षणात्मक लेख[२४६]

१

लंडनच्या रंगभूमी जगतातून

लंडन, नोव्हेंबर [१८७५]

जॉन बुल आपल्या वैभवशाली राज्यघटनेचा खूपच अभिमानी आहे; त्याला परिचय नसलेल्या त्याच्या मिल्टनचा, त्याला फारच चांगला परिचय असलेल्या त्याच्या डुकराच्या मांसाच्या करंजीचा आणि शेवटची पण सगळ्यात जास्त महत्त्वाची गोष्ट म्हणजे त्याच्या शेक्स्पियरचा तो खूपच अभिमानी आहे. पण हे सगळे शब्दावडंबर आहे; याहून अधिक काहीच नाही. (मात्र आपल्या डुकराच्या मांसाच्या करंजीचाच तेवढा तो गंभीरपणे विचार करतो). सगळाच राष्ट्रीय चढेलपणा आणि ढोंग! "ॲव्हॉनचा राजहंस," सगळ्या कवींमध्ये सर्वश्रेष्ठ, याचे जर स्मारक उभारायचा प्रश्न उपस्थित झाला, तर समाजाच्या खालच्या थरांतल्या लोकांकडून मिळणाऱ्या अल्प स्वल्प देणग्यांतूनच असली कामगिरी फत्ते करता येईल. आपल्या शेक्स्पियरवर प्रेम करणारी केवळ नट मंडळी, आणि एकेक शिलिंगवाल्या स्वस्त आवृत्त्यांच्या द्वारा त्याचे संपूर्ण ज्ञान असलेले आणि आपल्या "बिल्"ला हृदयात सखोल साठवून ठेवून राहिलेले कामगार--हेच तेवढे अकरा वर्षांपूर्वी शेक्स्पियरच्या ३०० व्या वाढदिवसाच्या स्मरणार्थ प्रिमरोज हिल्वर एक लहानसा ओक वृक्ष लावला त्या वेळी त्याच्या सभोवार गर्दी करून राहिलेले होते. वीस अधिक वर्षांच्या पूर्वी फेल्प्स या नटाने लंडनच्या ईस्ट एन्ड भागातील एका लहानशा नाट्यगृहात कामगारांमध्ये शेक्स्पियरविषयीची अभिरुची जिवंत ठेवायचे कार्य अनेक वर्षे करण्यात यश मिळविले. त्याच वेळी वेस्ट एन्ड भागामध्ये, तथाकथित सुशिक्षित वर्ग चार्ल्स कीनकृत "शेक्स्पियरच्या पुनरुज्जीवनाला" गर्दी करीत होते. तथापि ते नाट्यगृहात मोठ्या संख्येने जमत होते ते शेक्स्पियरची सुंदर भाषा ऐकण्या-

साठी नव्हे; त्यांना सोस होता सोनेरी केसांच्या स्वरूपसुंदर राणी ॲन बोलीनचे उत्कृष्ट भरजरी कपडे पाहायचा. आठव्या हेनरीच्या मेजवान्या व भव्य मिरवणुकी पाहून त्यांना आपल्या डोळ्यांचे पारडे फेडून घ्यायला हवे असे. हे सगळे देखावे कीन अस्सल ऐतिहासिक तपशिलांनिशी आणि विजेच्या दिव्यांच्या रोषणाईनिशी देखील सादर करीत असे.

अनेक वर्षांपूर्वी एक अत्यंत गुणसंपन्न आयरिश नट बॅरी सुलिव्हन याने शेक्स्पियरला विस्मृतीतून सोडवायचा प्रयत्न केला. त्याच्या जोडीला मिसेस हर्मान व्हेझिन ही नटी भूमिका करीत असे. शेक्स्पियरच्या नायिकांच्या भूमिका करणारी ही एकमेव सर्वोत्तम नटी होती. परंतु यांचे सगळे प्रयत्न व्यर्थ गेले. ऑथेल्लो आणि डेस्डिमोना, हॅम्लेट आणि ऑफेलिया, किंग लियर आणि कॉर्डेलिया, यांच्या भूमिका रिकाम्या नाट्यगृहांमध्ये सादर होत असत. ऑस्ट्रेलियात शेक्स्पियरची नाटके सादर करून मिळविलेला सगळा पैसा सुलिव्हनने इथे घालविला आणि हे नाट्यप्रयोग बंद करणे भाग पडले. ही उणीव भरून काढायला ओल्ड ड्रुअरी लेन पुढे सरसावले. केम्बल, कीन, मिसेस सिडॉन्स आणि मॅक्रीडी या नटनट्यांच्या आठवणींचा लौकिक या संस्थेने अजून जपून ठेवलेला होता. तरीही नाट्यगृह रिकामेच राहिले आणि काही आठवडे लोटल्यावर "शेक्स्पियर म्हणजे दिवाळखोरी" असे मॅनेजरला जाहीर करावे लागले. अशा प्रकारे शेक्स्पियरचा संपूर्णपणे विसर पडला; फक्त अधून मधून एखादा हॅम्लेट किंवा एखादा मॅक्बेथ कामगारांच्या वस्तीत प्रकट होत असे आणि तोही लवकरच पुन्हा लुप्त होत असे. यानंतर एक वर्षापूर्वी हेन्री आयर्व्हिंग या तरुण नटाने हॅम्लेटला पुन्हा एकदा रंगभूमीवर सादर करायचा हिय्या धरला. या नटाला फक्त जिल्ह्यांमध्येच प्रसिद्धी मिळालेली होती आणि त्याने लंडनच्या रंगभूमीवर मेलोड्रामांमध्ये भूमिका घेऊन पदार्पण केलेले होते. आयर्व्हिंगने जुन्या, कायम ठशाच्या परंपरांना आव्हान द्यायचे धाडस केले आणि नेहमीच्या, सगळ्यांना खूपच सुपरिचित अशा हॅम्लेटऐवजी स्वतःच्या स्वतंत्र शैलीनिशी मुळाबरहुकुम शेक्स्पियरचे चित्रण सादर केले. नाट्यसमीक्षक कुरकुरायला लागले. त्याच्या मागे भुणभुण लावायला लागले, त्याचे दोष काढत बसले, एक म्हणायला लागला की आयर्व्हिंगच्या ठायी हॅम्लेटच्या भूमिकेला शोभेसे जवळ जवळ काहीच नाही; दुसरा म्हणायला लागला की त्याची चालच बरोबर नाही; तिसऱ्याला ओढून ताणून चंद्रबळ आणल्यासारखे वाटले; आणि चौथा म्हणाला, याचा अभिनय मेलो-ड्रामाटिक आहे. असे असूनही त्याचे प्रयोग हाऊसफुल्ल होत राहिले. आणि मग अचानक वाऱ्याची दिशा बदलली आणि समीक्षक दोष काढीनासे झाले आणि वस्तुतः त्याची वारेमाप स्तुती करायला लागले. अश्रुतपूर्व असा प्रकार घडला. सतत दोनशे प्रयोगांनी प्रेक्षकांचे लक्ष वेधून घेतले, ते मंत्रमुग्ध होऊन भरमसाट गर्दी करू लागले. आयर्व्हिंगची हॅम्लेटची भूमिका पाहणे ही फॅशन होऊन बसली. शेक्स्पियरविषयी उत्साहाने बोलणे हे शिष्टाचाराचे लक्षणच झाले!

या तरुण नटाच्या बाबतीत फार मोठी कौतुकास्पद गोष्ट म्हणजे या स्तुतिवर्षावाने तो चढून गेला नाही. आपली भूमिका परिपूर्ण स्वरूपात व्हावी म्हणून त्याने प्रयत्न चालूच ठेवले, जास्तीत जास्त मन लावून व खूप मेहनत घेऊन तो काम करू लागला. चांगला सल्ला व गंभीर टीका विचारात घेऊन तो तत्परतेने आपल्यात सुधारणा करायला सदैव तयार असायचा. परिणामतः, त्याचा हॅम्लेट अजूनही ज्या उणीवा दर्शवीत असे, त्यांच्यावर त्याने रोजच्या रोज वाढत्या प्रमाणांत मात केली आणि शेवटी त्याने परिपूर्ण, समृद्ध आणि सुसंगत असे हॅम्लेटचे चित्रण सादर केले. त्यांत कसलाही दोष काढता येईना. दोनशेवा प्रयोग झाल्यानंतर आम्ही या आदर्श हॅम्लेटचा निरोप घेतला.

आता गेला महिनाभर तो आम्हाला मॅक्बेथचा प्रयोग सादर करतो आहे. त्याच्या हॅम्लेटच्या निर्मितीविरुद्ध जशी कुरकुर, ओरड, भुणभुण चालायची, तशीच आता या प्रयोगाच्या बाबतीतही चालू झाली; परंतु या वेळी टीकेत कडवटपणाची व विषारीपणाची भर पडली. केवळ टाइम्सने मात्र या तरुण होतकरू कलाकाराला न्याय दिला, त्याची कर्तबगारी मान्य केली आणि त्याला उत्तेजन दिले. बड्या दैनिकांनी प्रदीर्घ व अगदी परस्परविरोधी समीक्षणांची झोड उठविली आणि त्यांच्यात एकमेकांपासून वेगळेपणा कशात आहे हे शोधून काढणे कठीण पडते; त्यांच्यापैकी एकानेही शेक्स्पियरचा सखोल अभ्यास केलेला नाही आणि त्याच्या ऐवजी फालतू व क्षुल्लक गोष्टींवर भर देणे चालू ठेवले. "छोट्या दैनिकांनी" क्षुद्र व निव्वळ व्यक्तिगत टीकेचे हल्ले चढविले, आणि त्यावरून त्यांना हेवा वाटत होता, नेमळट द्वेष त्यांत प्रदर्शित होत होता. असे असूनही रोजच्या रोज हाऊसफुल्ल प्रयोग होत आहेत आणि कित्येक आठवडे आगाऊ तिकिटे घ्यावी लागत आहेत. प्रेक्षक श्वास रोखून धरून मंत्रमुग्धपणे प्रयोग पाहत असतात; परंतु या तरुण कलाकाराला उत्तेजन देण्यासाठी ते स्वयंस्फूर्तपणे उत्साह दर्शवीत नाहीत, त्यांच्या पसंतीची पावती केवळ क्षीण स्वरूपात मिळते. सगळे प्रेक्षक समाधि लागल्यासारखे आपल्या जागी हूं का चूं न करता स्तब्धपणे खिळून बसलेले असतात. प्रेक्षकांच्या या वृत्तीचा खुलासा कसा करायचा? शेक्स्पियरशी निगडित झालेल्या सदभिरुचीच्या बंधनांचा कंटाळा इंग्रज मध्यम वर्गाला पुन्हा आला आहे काय? haute volee (a) ला सच्च्या कलाकृतीपासून पळ काढून नेत्रदीपक सीनसीनरीचे मेलोड्रामा, जळती जहाजे, कोसळणारे डोंगर व खऱ्याखुऱ्या घोडागाड्या, घोडे, उंट आणि बोकड यांच्या नादी लागणे हवे झाले आहे काय? बहुधा बड्या घराण्यांतल्या महिलांना सादॉ याच्या आधुनिक कलाकृतीचा सुमार अनुवाद, त्यातली ज्यूइश चेरी ब्रँडीसारखी गोड गोड शब्दयोजना, गुदगुल्या करणारे शब्दप्रयोग आणि हीन शृंगारिक प्रसंग यांची गुप्त ओढ लागलेली आहे काय? किंवा

---

a उच्च समाजाला—संपादक

जनतेने टीकाकारांच्या दमबाजीला घाबरून जाण्याइतका मनाचा कच्चेपणा अंगिकारला आहे काय ? इंग्रज तुच्छतावाद्याच्या ठायी स्वतःचे ठाम मत मांडायचे धैर्य क्वचितच असते. तो खासगी जीवनातच तेवढा सिंहासारखा शूर असतो. त्याचे मन आळशी असते आणि दररोज सकाळी त्याच्या सक्तीच्या बेकन व अंडी या न्याहारीबरोबर पेनीवाला दैनिक पेपर वाचायचा त्याचा कार्यक्रम असतो आणि हा पेपरच त्याच्यासाठी विचार करायचे काम करतो. त्या पेपरमधले तयार अभिप्राय खिशात ठेवून बसमध्ये चढायचे, शहरात किंवा क्लबात जायचे, किंवा संध्याकाळी नाट्यगृहात बॉक्समध्ये बसून नाट्यप्रयोग बघणे किती तरी सोईस्कर असते ! नेमक्या त्याच सकाळी डेली न्यूज [२४७] या दैनिकाने त्याला माहिती दिलेली असते की आयर्व्हिंगने सादर केलेली मॅक्बेथची भूमिका चुकीची आहे. मॅक्बेथ हा मनमोकळा, शूर, साहसी सेनापती आहे आणि आयर्व्हिंगने त्याचे चित्रण क्रूर, भेकड, खुनी असे केलेले आहे आणि आयुष्याच्या अखेरीसच तेवढा तो साहसी, सामर्थ्यशील व शूर असल्याचे दर्शविलेले आहे. केवढा हा परस्परविरोध ! असा डेली न्यूजचा अभिप्राय आहे आणि आमचा हा वृत्तपत्रवाचक नागरिक आपल्या डेली न्यूजवरच विश्वास ठेवतो. त्याच्या शेजारी स्टँडर्ड[२४८] वाचणारा तुच्छतावादी किंवा सॅटर्डे रिव्हयूवर[२४९] विश्वास ठेवणारा बसलेला असतो. यांच्यापैकी प्रत्येकाच्या खिशात तयार अभिप्राय ठेवलेले असतात. कामगारवर्गीय प्रेक्षकांचे एक मोठे फायद्याचे कलम असते. श्रमिक माणूस वृत्तपत्रांना त्याच्या मनाचा गोंधळ उडवायला वाव देत नसतो; तो नाट्यगृहात जातो, स्वतःच्या डोळ्यांवर व कानांवर भिस्त ठेवतो आणि आपल्या भावना आणि योग्य काय आहे याविषयीचे आपले मत व आपली जाण जी प्रेरणा देईल तिला अनुसरून तो टाळ्या वाजवितो किंवा नापसंतीदर्शक आवाज काढतो. म्हणून चांगल्या नटाच्या लेखी पिट आणि गॅलरी निर्णायक महत्त्वाच्या असतात. याच कारणास्तव एडमंड कीनने तिसऱ्या रिचर्डची भूमिका केली असताना सगळे पिट एकदम एकसाथ उभे राहिले म्हणून त्याला येवढा आनंद झाला आणि तो अभिमानाने उद्‌गारला : "पिट माझ्या गौरवार्थ उभे राहिले."

आपण अशी आशा धरून आहोत की वृत्तपत्रांच्या कोल्हेकुईवरून आयर्व्हिंग भलताच गैरसमज करून घेणार नाही आणि प्रेक्षकांच्या वरपांगी थंडेपणापायी आपले शेक्स्पियरचा शोध घ्यायचे कार्य सोडून देणार नाही आणि त्याला जो शोभतो असे मानण्यात येते त्या मेलोड्रामाकडे तो परत जाणार नाही.

त्याचा मॅक्बेथ ही अजून परिपूर्ण कलाकृती झालेली नाही. पहिल्या अंकामध्ये त्याचा एकंदर रागरंग असलग, चाचपडता आणि म्हणून असमाधानकारक आहे, कमालीची चिंता कधी कधी आवाजात अपयश घडवून आणते, आणि त्याची शैलीही प्रसंगी सदोष असते. दुसऱ्या आणि तिसऱ्या अंकात त्याचा अभिनय ठळक उंची गाठतो. त्याचे चेटकिणींचे दृश्य ताकतीने सादर केलेले आहे आणि मेजवानीचा प्रवेश

जबरदस्त पकड घेतो. शेवटच्या समग्र अंकामध्ये आयर्व्हिंगचा अभिनय अजोड आहे. प्रेक्षकांना हा हताश माणूस बघून खरोखरीच हादरा बसतो; याचा चेहरा दुःखाने वेडावाकडा व वयस्कर झालेला, निःशब्द वेदना लेडी मॅक्बेथच्या मृत्यूच्या बातमीने त्या बोलक्या चेहऱ्याला व्यापून राहिलेली असते, बेफाम संतापाने व बेफिकीर धैर्याने तो स्वतःला लढाईत झोकून देतो, मॅकडफशी लढतानाचे त्याचे पिसाट साहस व हताशपणा, आणि शेवटी त्याचा मृत्यू, या गोष्टी जबरदस्त प्रभाव पाडतात.

आमची अशी पक्की खात्री आहे की आयर्व्हिंग आपल्या सदसद्विवेक बुद्धीला जागणारा असून गंभीर टीका मान्य करायची त्याची तयारी असते आणि या टीकेचा उपयोग करून घेऊन आपल्या उणीवांवर, कमजोऱ्यांवर व आपल्या मॅक्बेथच्या असलग भागांवर तो मात करील आणि शेवटी तो परिपूर्ण कलात्मक निर्मिती सादर करील आणि ही भूमिका त्याच्या हॅम्लेटच्या शेजारी ठेवायला योग्य ठरेल. या गंभीर आणि मनापासूनच्या प्रयत्नामध्ये या तरुण कलाकाराला त्याच्या आत्मिक तसेच शारीरिक गुणांची मोठी मदत होत आहे; त्याचा सुंदर, मुलायम, धारदार, परंतु फारसा जोरदार नव्हे असा आवाज, त्याचा धीरोदात्त, बोलका चेहरा, आणि त्याच्या मुद्रेचा ठळक बिभ्रम व सुंदर आविर्भाव.

आपण अशी आशा धरू या की हा कलाकार जर्मन प्रेक्षकांपुढे आपले प्रयोग सादर करील; या प्रेक्षकांना शेक्स्पियर चांगला ठाऊक आहे व तो त्यांचा आवडता आहे आणि हे प्रेक्षक या हेतुनिष्ठ माणसाला अभिवादन करतील, त्याच्या कलेविषयी उदार आस्था दर्शवितील व त्याला उत्तेजन देतील. आपण अशीही आशा धरू या की भावी काळात त्याच्या सहकारी नटांचा त्याला अधिक चांगला पाठिंबा मिळेल, आणि शेवटची गोष्ट म्हणजे अधिक योग्य, कमी परस्परविरोधी व प्रेक्षकांची कमी दिशाभूल करणारा असा टीकात्मक प्रतिसाद त्याला मिळेल.

२

लंडनचा मोसम

लंडन, मार्च महिन्याची अखेर [१८७६]

लंडनचा मोसम सुरू झाला आहे. पार्लमेंटचे अधिवेशन चालू आहे आणि "आतले" व "बाहेरचे" २५० एकमेकांशी भांडत आहेत. विरोधी पक्षांतला शिडशिडीत ग्लॅडस्टन अधिकारारूढ सरकारातल्या मुरब्बी डिझरायलीवर हल्ला चढवतो आहे, पूर्वी एकदा डिझरायली जसा ग्लॅडस्टनवर हल्ला चढवत असे तसा ग्लॅडस्टन आता डिझरायलीवर हल्ला चढवत आहे, पंतप्रधानाच्या रशियन-विरोधी धोरणां-

विरुद्ध टाइम्स गर्जना करतो आहे. राणी आता महाराणी झाली आहे आणि जर्मनीला [२५१] जात आहे आणि जॉन बुल हाशहुश करतोय आणि बारा वर्षांच्या प्रिन्स ऑफ वेल्सखेरीज अन्य कुणीच राज्य करायला हजर नाही म्हणून तो चिडलाय. भारताची संपत्ती जहाजावर भरपूर लादून घेऊन वेर्टखेन युलिसिस आपल्या घरी आपल्या पीनीलोपकडे व "मुलांकडे" परततोय, हत्तीवरून भटकण्यापासून आलेला थकवा घालवायसाठी, आणि दिवाणखान्यांतले मान-सन्मान घेण्यासाठी आणि महाराणीच्या [२५२] दरबारांना हजर राहण्यासाठी तो परततोय. वसंत ऋतूतल्या व उन्हाळ्यातल्या सर्वोत्तम कपड्यांचे प्रदर्शन दुकानांनी मांडले आहे आणि प्रचंड प्रदर्शनी खिडक्या ताज्यांतल्या ताज्या फॅशननिशी झगझगत आहेत. फिकट निळा आणि गडद निळा म्हणजे केंब्रिज आणि ऑक्सफर्ड हे होड्या वल्हवायच्या कलेत तारीख १ एप्रिल रोजी वार्षिक होड्यांच्या शर्यतीत एकमेकांचे पाणी जोखतील (इथे मतांची स्पर्धा नसते). या उत्सवाच्या दिवशी सगळ्या लंडनचे दोन तट पडतात; ऐटबाज महिला व्हायोलेट-निळ्या रेशमी पोशाखात मिरवत आहेत, शाळकरी मुले केंब्रिजच्या किंवा ऑक्सफर्डच्या निशाण्या मिरवीत आहेत आणि गाडीवान व घोडे यांनी देखील फिकट निळा किंवा गडद निळा असे रंग परिधान केले आहेत. लंडनवासीयांचा हा खराखुरा सणाचा दिवस आहे.

इटालियन ऑपेराने हा मोसम विल्हेल्म टेल् या प्रयोगानिशी प्रारंभला आहे. इटालियन गायक चिमण्यांसमवेत येतात. त्यांतले बहुतेक जण प्रामाणिक जर्मन, फ्रेंच, हंगेरियन आणि रशियन आहेत; त्यांनी आपल्या नावांना कसल्या तरी इटालियन शब्दावयवाची जोड शेवटी दिलेली आहे, एक प्रकारचा Cachet [शिक्का] असावा म्हणून. सोमवारच्या लोकप्रिय संगीताच्या कार्यक्रमात जोआकिम आणि क्लारश्च्चुमान्त हे बहुतांशी संगीतातल्या तुच्छतावाद्यांना आनंद देतात. शेक्स्पियरचे चाहते पूर्वीप्रमाणेच आयर्व्हिंगचा ऑथेल्लो बघायला लाइसियम थिएटरची यात्रा करतात. तिथे ऑथेल्लो, हॅम्लेट व मॅकबेथ यांचे सकाळचे प्रयोग जाहीर करण्यात आलेले आहेत. राजघराण्यातले राजपुत्र व राजकन्या यांना न वगळता सगळा उच्च समाज (शेक्स्पियरच्या प्रयोगांना ठळकपणे गैरहजर राहून) टॉम टेलर याच्या मामुली नाटकातील पेग वॉफिंग्टनच्या भूमिकेत मारी विल्टनला पाहायला छोट्या प्रिन्स ऑफ वेल्स नाट्यगृहात गर्दी करत आहेत. तिचा आकर्षकपणा, तिचा सहजसुंदर अभिनय, तिच्या अभिनयाचा स्वतंत्रपणा, आणि आपल्या सगळ्या भूमिकांमध्ये जी अपूर्व व्यक्तिगत जादू ती प्रदर्शित करते, यांच्या योगाने मारी विल्टन ही अकाली निधन पावलेल्या आयमी देक्ली हिचे स्मरण करून देते, आणि त्याचप्रमाणे छोट्या व तडफदार सेलिने चामोन्त हिची देखील आठवण करून देते. सादींकृत "Pattes de mauche" याचा लंगडा व मोडतोड केलेला अनुवाद कोर्ट थिएटरमध्ये सादर होतोय. डिकन्सच्या ब्लीक हाऊस या कादंबरीचे नाट्यमय

रूपांतर ग्लोब थिएटरमध्ये सादर झाले आहे. छोटा भिकारी पोऱ्या जो याची भूमिका जेनी ली सखोल परिणाम करणाऱ्या करुण-रसानिशी सादर करीत आहे.

इतर तीन नाट्यगृहे परकीयांचे यथायोग्य स्वागत करण्यासाठी मोठी तयारी करीत आहेत. हे पाहुणे जगाच्या सगळ्या भागांतून इथे गर्दी करतील, तसेच आमच्या ग्रामीण भावंडाकडेही गर्दी करतील. दिवाणखाने, दरबार, संगीताचे कार्यक्रम, नृत्याचे कार्यक्रम, विविध कार्यक्रम, बगीच्यांतल्या पाटर्या, आणि फुले, कुत्री, मांजरे आणि ससे यांची प्रदर्शने सगळी दर वर्षी वसंत ऋतूत भरत असतात. या मोसमात आमच्या भल्या जॉन बुलच्या समृद्धीत दोन राष्ट्रीय संस्थांची भर पडलेली आहे— स्केटिंगचे मैदान आणि स्पेलिंगचा खेळ. तुमच्या लंडनच्या प्रतिनिधीने या दोहोंचेही वर्णन अगोदरच केलेले आहे, आणि म्हणून मी काही थोड्या पूरक विचारांपुरतेच माझे म्हणणे मर्यादित करीन.

स्केटिंगचे मैदान म्हणून वापरण्यासाठी मोठ्यात मोठे मैदान शोधून काढतात. तिथली जमीन अस्फाल्टाची किंवा गुळगुळीत केलेल्या लाकडाची असते. या निसरड्या क्षेत्रासाठी वापरायच्या स्केट्स्ना चार चार छोटी चाके असतात. इंग्रज Petits creves @ इथे "पातळ बर्फावर" चालताना पायघोळ नाईट शर्टासारखा पोशाख करतात; त्याच्या बटणांत व्हायोलेट्स किंवा कॅमेलियाचे फूल खोचलेले असते; तरुण "रोटी लोणी बालिका" b आणि अधिक परिपक्व सुंदरी घाबरून थरथरत उंच टाचांच्या बुटांनिशी चालतात; त्यात स्प्रिंगा लपवून ठेवलेल्या असतात आणि त्यामुळे सपाट इंग्रज पायांना कृत्रिम सरदारी उंचपणा मिळतो.

स्पेलिंगच्या स्पर्धा अलीकडील काही महिन्यांत अळंब्यांसारख्या उगवल्या आहेत आणि त्यांची संख्या अगोदरच तीनशेहून अधिक झालेली आहे. समिती, अध्यक्ष, पंच, परीक्षक, आणि बक्षिसे देणारे यांची निवड या स्पेलिंग स्पर्धांसाठी करण्यात येते आणि ५० पौंडांपासून ५ शिलिंगपर्यंत बक्षिसे देण्यात येतात. गेल्या आठवड्यातच सेंट जेम्स हॉलमध्ये मोठी स्पेलिंग स्पर्धा भरली. प्रख्यात साहित्यिक, वकील व लष्करी लोक समितीवर होते; परीक्षक एक भटजी होता आणि अध्यक्ष होता "एक शूर व धीट सरदार, परंतु त्याचा चेहरा आणि त्याचे कुटुंब अजब प्रकारे म्हातारे होते." दोनशे महिलांनी या स्पेलिंगच्या लढाईत उडी घेतली, प्रचंड शब्दकोशांच्या स्वरूपातल्या अवजड तोफा त्यांनी आणलेल्या होत्या. बक्षिसाची रक्कम होती ५० पौंड.

स्पर्धेला सुरुवात सोप्या सोप्या अँग्लो-सॅक्सन शब्दांनिशी झाली आणि सगळे काही छान व मजेत चालले होते. मग कठीण, विचित्र शब्द आले, ग्रीक मूळ असलेले

---

a शहरी तरुण लोक.

b तेरा ते एकोणीस वयाच्या मुली.

शब्द आले. स्पर्धेतील महिलांचा आकडा एकोणचाळीस इतका खाली घसरला. तांत्रिक संज्ञा सुरू झाल्यावर एकोणीसपेक्षा अधिक स्पर्धक शिल्लक राहिले नाहीत. शेवटी केवळ दोघे रिचमंड [२५३] रणांगणावर शिल्लक राहिले आणि त्यांच्यापैकी एकाने बक्षीस पटकावले. नंतर यावर चर्चा सुरू झाली, औपचारिक तपशिलांबाबत तंटे झाले, परीक्षेच्या पद्धतीवर टीकेचा हल्ला झाला आणि "अनुकूल" व "प्रतिकूल" अशी वादावादी करण्यात वातावरण गरम झाले. ओरडा ओरडा, कोलाहल वाढत गेला आणि सरदाराला आपली हॅट आपल्या सरकारी डोक्यावर चढविणे भाग पडले आणि जमाव भयंकर वादावादीत व कमालीच्या गोंधळात पांगून गेला.

जुन्या आनंदी इंग्लंडा!— "स्केटिंगचे मैदान व स्पेलिंगची होड,
यांची तुला का रे येवढी ओढ?"

आणि आम्ही विचारतोय-- पुढे काय?

३

इंग्लंडमधील शेक्स्पियरचा अभ्यास

लंडन, डिसेंबर महिन्याची अखेर, [१८७६]

तीन वर्षांपूर्वी एक नवी शेक्स्पियर सोसायटी इथे स्थापन झाली. "या महान लेखकाला मान द्यावा आणि त्याच्या ग्रंथांच्या गंभीर व बुद्धिनिष्ठ अभ्यासाला प्रेरणा मिळावी व त्याची सोय व्हावी आणि ती लोकसंख्येतल्या सगळ्या वर्गांना उपलब्ध व्हावी" असा या संस्थेचा विचार होता. पत्रव्यवहार करणारे सदस्य असलेल्या संलग्न संस्था साऱ्या इंग्लंड, स्कॉटलंड व आयर्लंडभर स्थापन झाल्या आहेत. आणि वसाहतींतून व उत्तर अमेरिकेत त्या स्थापन झाल्या आहेत. अनेक जर्मन शेक्स्पियर गट तीत सामील झाले आहेत आणि दुर्मिळ असे फ्रेंच शेक्स्पियरभक्त हे देखील सभासद झाले आहेत. बॉन येथील प्रोफेसर डेलियर्स हे या सोसायटीचे एक अत्यंत निष्ठावंत व क्रियाशील सहकार्यकर्ते झाले आहेत. लंडन शहरी सोसायटीचे शेकड्यांवारी सदस्य आहेत आणि त्यांच्यापैकी प्रत्येक जण वार्षिक एक गिनी वर्गणी देतो आणि दर चार आठवड्यांनी लंडन विद्यापीठाच्या इमारतीत एक सभा भरते, तीत पत्रे, निबंध, टीकात्मक टिपणे व संशोधनपर लेख वाचण्यात येतात व त्यांवर चर्चा होते. या उपक्रमाच्या भरीला या संस्थेचे क्रियाशील, कर्तबगार व उत्साही अध्यक्ष फ्रेडरिक फर्निवाल यांच्या नेतृत्वाखाली सोसायटी शेक्स्पियरच्या जुन्यात जुन्या आवृत्त्यांचे नियमित पुनर्मुद्रण कालानुक्रमवार करीत आहे आणि त्याचबरोबर अत्यंत दुर्मिळ व मौल्यवान असे त्या कालखंडांतले ग्रंथ आणि महत्त्वाचे आधुनिक समीक्षणात्मक व

संशोधनपर ग्रंथ छापत आहे. अशा रीतीने शेक्सिपयरवरील अत्यंत मौलिक व भक्कम पायावर आधारलेले साहित्य क्रमाक्रमाने तयार करण्यात येईल.

या वर्षी प्रत्येक सदस्याला सुंदर रीतीने छापलेल्या पुढील ग्रंथांच्या प्रती मिळाल्या :

(अ) टेल्-ट्रोथ्स न्यू इयर गिफ्ट, १५९३, पॅशनेट मॉस्सिसमवेत; (ब) जॉन लेनकृत टॉम टेल्ट्रॉथ्स मेसेज आणि त्याची पेन्स कंप्लेंट, १६००; (क) थॉमस पॉवेलकृत टॉम ऑफ ऑल ट्रेड्स; किंवा द प्लेन पाथवे टु प्रिफरमेंट, १६३१; (ड) द ग्लासे ऑफ गॉडली लव्ह, १५६९.

विल्यम स्टॅफोर्ड्स् कॉम्पेन्डियस ऑर ब्रीफ एक्झामिनिशन ऑफ सर्टन ऑर्डिनरी कंप्लेन्ट्स ऑफ डायव्हर्स ऑफ अवर कंट्रीमेन इन दीज अवर डेज, १५८१ (राइट ऑनरेबल अर्ल ऑफ डर्बी यांनी सादर केलेला).[२५४]

फिलिप स्टुब्बेकृत ॲनाटॉमी ऑफ ॲब्यूजेस, तारीख १ मे १५८३, त्यांच्या व त्यांच्या पत्नीच्या जीवनातील उताऱ्यांनिशी, १५९१.

नाटके : द टू नोबल किन्समेन, शेक्सिपयर व फ्लेचरकृत, १६३४ च्या क्वार्टोवरून पुनर्मुद्रित, आणि ट्रिनिटी कॉलेज डब्लिन येथील हॅरोल्ड लिटलडेल यांच्या दुरुस्त्या व टीपा यांसह याच नाटकाची एक आवृत्ती.

मिसलेनिया. परलोकवासी प्रोफेसर डब्ल्यू-स्पार्लिंग यांचे द टू नोबेल किन्समेन याच्या लेखकांबाबतचे पत्र, शेक्सिपयरच्या शैलीची वैशिष्ट्यपूर्ण उपलक्षणे आणि त्याच्या श्रेष्ठत्वाचे रहस्य, १८३३.

१८७७ साठीचे पहिले प्रकाशन आता तयार आहे.

शेक्सिपयरचे इंग्लंड. विल्यम हॅरिसनकृत इंग्लंडचे वर्णन, १५७७, १५८७ प्रकाशने फर्निवाल यांनी प्रसिद्ध केलेले, व्हॅनडेन कीरेकृत लंडनच्या नकाशासह, १५९३, एच. व्हीटले यांच्या टीपांसह.

पुढील प्रकाशने छापत आहेत:

१. द ट्रॅन्झॅक्शन्स; [२५५] २. शेक्सिपयरमधील महाकाव्याचा घटक या विषयावरील प्रोफेसर डेलियस यांचा लेख. इंग्रजीत अनुवाद दोन महिलांनी केलेला, एक इंग्रज व दुसरी जर्मन.[२५६] ३. सहावा हेन्री भाग २ व ३ यांचा अभ्यास आणि त्यांचे मूळ स्रोत, लेखिका मिस जेना ली, डब्लिनचे आर्चबिशप यांची कन्या.

२. टू नोबल किन्स्मेन लेखक शेक्सिपयर आणि फ्लेचर, हॅरोल्ड लिटलडेल यांच्या प्रस्तावनेसह व सूचीसह. सूचीमध्ये शेक्सिपयरचा वेगळेपणा फ्लेचरपासून दर्शविणारे सगळे शब्द आहेत.

३. सिंबलाइन. १६२३ च्या क्वार्टो व फर्स्ट फोलियोवरून पुनर्मुद्रित, त्यांच्यातला फरक दर्शविणाऱ्या रचनेसह आणि या नाटकाची दुरुस्त आवृत्ति.

४. पाचवा हेन्री. क्वार्टो व फर्स्ट फोलियो यांतील समान्तर संहितांसह, त्यांच्यातला फरक दर्शविणाऱ्या रचनेसह आणि या नाटकाची दुरुस्त आवृत्ति.

मिस्टरीज. १५ व्या शतकातील मिस्टरीज, डिग्बी एम. एस. १३३ मधून घेतलेल्या मोरॅलिटीसह. एकमेव एम. एस. बरहुकुम फर्निवाल यांनी प्रकाशित केलेले. एलिझाबेथ व जेम्स यांच्या कारकीर्दीतील नटांची व लेखकांची मृत्युपत्रे.

तिसरा एडवर्ड. पहिला क्वार्टो, १५९६, यावरून पुर्नमुद्रित आणि दुसरी आवृत्ति टीपांसह, नाटकाचे स्रोत, फ्रोइसार्ट आणि पेन्टरकृत पॅलेस ऑफ प्लेझर याच्यासह.

रॉबर्ट चेस्टरकृत लव्ह्ज मार्टिर, यांतूनच शेक्स्पियरच्या फिनिक्स ॲन्ड टर्टल या कविता घेण्यात आल्या.

मूळ स्रोत व ॲनालोग्ज. A. शेक्स्पियर हॉलिंग्जहेड क्रॉनिकल व ऐतिहासिक नाटके, यांची तुलना, लेखक डब्ल्यू. स्टोन.

काही खूपच चटकदार ग्रंथ पुढील वर्षी प्रसिद्ध करण्याचे योजिले आहे.

आतापर्यंत सभांना हजेरी फार तुरळक असे, तथापि, शेक्स्पियर-भक्तांच्या छोट्या मेळाव्यात काही वेळ खर्च करणे म्हणजे खरा आनंद असतो. हे सगळे भक्त (महिलांना न बगळता) शेक्स्पियरचा अभ्यास गंभीरपणे करतात आणि आपल्या टीकात्मक व कधी कधी फारच स्वतंत्र व तपशीलवार संशोधनाने साहित्याची एखादी शाखा समृद्ध करीत आहेत.

या शेक्स्पेरियन लॉजमध्ये बंधुत्वाचा खरा बाणा नांदत आहे; नुकती मिसरूड फुटलेल्या तरुणांपासून दाढीवाल्या वृद्धांपर्यंत प्रत्येक नवागताचे स्नेहशील स्वागत होते आणि खरीखुरी माल्व्होलियो धर्तीची स्मिते व हंशे या धन्याच्या द्राक्षबागेतील लहानात लहान मजुराला अभिवादन करतात.

इंग्रजाला कसल्यातरी बाबतीत उत्साह वाटायला लागला, म्हणजे (आणि या रोखठोक व्यवहारी राष्ट्रामध्ये वस्तुतः अनेक उत्साही लोक आहेत) आणि एकदा का जॉन बुल आपल्या डोक्यांत एखादा विचार घेतो, आणि मग सहजच तो idee fixe (पक्का विचार) होतो, एक वेड होते, एक फॅड होते, एक जाहीर केलेला छंद होतो. ही भंपकरावांची व पिसाटांची जन्मभूमि आहे; यांतूनच पंथ निर्माण होतात. परंतु या पंथांच्या अनुयायांमध्ये आपल्याला बावनकशी प्रामाणिक स्त्रीपुरुष मोठ्यात मोठ्या संख्येनिशी भेटतात—मी तर असे म्हणेन की हा केवळ एकमेव प्रामाणिक स्त्रीपुरुषांचा समूह असतो की ज्यांची तत्त्वे विक्रीला काढलेली नसतात. प्रामाणिक tonte pure (अत्यंत शुद्ध) अत्यंत दुर्मिळ आहे आणि म्हणून अनेकदा त्याच्या जोडीला तऱ्हेवाइकपणाची किंचित छटा, विक्षिप्तपणा व चढेलपणा यांचा अधिवास असतो.

आमच्या सन्माननीय शेक्स्पियर-भक्तांना ही गोष्ट लागू पडते. तीच गोष्ट क्रॉम्प्टिस्टांच्या सुमारे तिसांच्या गटाला लागू पडते. भुऱ्या केसांचे प्रोफेसर्स व पांढऱ्या

केसांचे डॉक्टर्स व वकील दर रविवारी आपल्या पंथाची यात्रा करतात, आपल्या कांखोटीला आपली बायबले घेऊन जातात. आपला मानवतावादी ईश्वर ऑगस्टे कॉम्टे यांच्या पुढे आणि त्याच्या जंत्रीतील संतांपुढे धूप जाळतात आणि ही गोष्ट उर्क्युहार्ट याच्या अनुयायांनाही लागू पडते. हे महमदाच्या व त्याचा प्रेषित "डेव्हिड" याच्या नावाने शपथ घेतात आणि डिप्लोमॅटिक रिव्हयू या आपल्या नियतकालिकात उत्कृष्टपणे लिहिलेल्या वस्तुनिष्ठ लेखांच्या योगाने (अगोदरच्या काही वर्षांमध्ये त्यांचा सर्वोत्कृष्ट लेखक उर्क्युहार्ट हाच होता, परंतु जवळ जवळ ऐंशी वर्षांच्या वयाला या वृद्धाच्या प्रतिभेची धार आता काहीशी बोथटली आहे.) अत्यंत चटकदार अशा दुर्मिळ दस्तऐवजांच्या व राजनैतिक कागदपत्रांच्या पुनर्मुद्रणांच्या योगाने ते असे दाखवून देतात की परराष्ट्रीय घोरणाविषयी व "पौर्वात्य प्रश्नाविषयी" सेंट जेम्स हॉलमधील a भाषणबाजांच्या पेक्षा व शांततेच्या तुताऱ्या वाजविणाऱ्यांपेक्षा आपल्याला अधिक ज्ञान आहे.

शेक्स्पियर सोसायटीच्या लाभदायक फलश्रुती अगोदरच विविध मार्गांनी उघड दिसत आहेत. अनेक वर्षे पूर्णपणे दुर्लक्षिलेला या महान कवीचा अभ्यास जनतेच्या विस्तृत विभागांमध्ये पुनरुज्जीवित झालेला आहे; तथापि जनतेमधील वाढत्या आस्थेविषयी आपण बोलायला लागलो की हेन्री आयर्व्हिंगने केलेल्या महान व निर्विवाद सेवेकडे पुन्हा पुन्हा वळल्याखेरीज आपल्याला राहवत नाही. त्यानेच बहुजन समाजामध्ये विजेचा संचार केलेला आहे; आणि त्याचे स्वतःचे नाटयगृह दर रात्रीच्या प्रयोगाला तुडुंब भरलेले असते इतकेच नव्हे, तर पूर्वी रिकाम्या असलेल्या नाटयगृहांमध्ये देखील शेक्स्पियर प्रेक्षकांना खेचून आणायला लागलेला आहे.

आयर्व्हिंग प्रांतातून दौरे करतो आहे. स्कॉटलंड व आयर्लंड या प्रांतांचा दौरा सहा महिने चालला. यात त्याला हुषार व आकर्षक केट भगिनी इसाबेल व व्हर्जिनिया बेटमन यांचा पाठिंबा मिळाला. सुरुवातीपासून शेवटपर्यंत दौरा यशस्वी ठरला, परंतु डब्लिन येथील उत्साही प्रेक्षकांमध्ये त्याने उच्चांक गाठला.

आयर्व्हिंगसाठी "विश्वव्यापी महोत्सव" संघटित करून कलाकाराला देण्यात येण्याजोगा सर्वश्रेष्ठ बहुमान आयर्व्हिंगला देण्यात आला. हा बहुमान फक्त एकाच अन्य नटीला देण्यात आला आणि तो २५ वर्षांपूर्वी हेलन फॉसिटने ॲन्टीगनीमध्ये भाग घेतला त्या वेळी तिला देण्यात आला. ही अत्यंत गुणी व आकर्षक नटी त्या वेळी मॅक्रीडीसमवेत चमकली. थिओडोर मार्टिनची ती पत्नी. या मार्टिनने अलीकडेच राणीने मान्यता दिलेले प्रिन्स आल्बर्टचे चरित्र प्रसिद्ध केले. जर्मन व डॅनिश ग्रंथांचा सर्वोत्तम अनुवादक म्हणून तो प्रख्यात आहे.

---

a तारीख ८ डिसेंबर १८७६ रोजी पौर्वात्य प्रश्नावरील राष्ट्रीय परिषद लंडन येथे भरविण्यात आली होती.

काही काळापूर्वी आयर्व्हिंगला डब्लिन विद्यापीठाच्या पदवीधरांकडून व विद्यार्थ्यांकडून मानपत्र मिळाले. प्राध्यापक, पंडित व शेक्स्पियरचे प्रख्यात अधिकारी अभ्यासक यांच्यासकट बारा जणांच्या समितीने हे मानपत्र त्याला अर्पण केले. या मंडळींत डॉक्टर्स इन्ग्राम व डौडेन हे होते. राणीचे कौन्सेलर व खासदार एडवर्ड गिब्सन यांनी या शिष्टमंडळाचे नेतृत्व केले. त्यांनी प्रास्ताविकात सांगितले की "एवढा महान कलाकार, एवढा गुणवान सद्गृहस्थ आणि एवढा आकर्षक मित्र, याच्याविषयी आमचे महान कौतुक व आदर दर्शवितांना पदवीधर वगैरेंच्या वतीने मला विशेष आनंद होत आहे." नंतर त्यांनी मानपत्र वाचून दाखविले. त्यांत आयर्व्हिंगच्या अभिनयाने आपल्याला दुर्लभ आनंद कसा मिळवून दिला, शेक्स्पियरचा अत्यंत कसून अभ्यास केलेल्यांना देखील त्याने हॅम्लेटच्या स्वभावदर्शनात नवा अर्थ कसा प्रदर्शित करून दिला आणि सगळ्यांच्या अन्तःकरणात सर्वोत्तम कवितेविषयी नवी गोडी त्याने कशी जागृत केली, हे त्यांनी सांगितले. "तुमच्या-सारख्यांचा अभिनय रंगभूमीचे उदात्तीकरण करतो व तिची प्रतिष्ठा वाढवितो आणि बौद्धिक व नैतिक संस्कृतीची सामर्थ्यशाली तरफ या नात्याने रंगभूमीला तिच्या खऱ्या व्यवसायाकडे तिला वळवायला उपयोगी पडतो." आयर्व्हिंगने आभारप्रदर्शक चार शब्द बोलून या मानपत्राला प्रतिसाद दिला. त्याच दिवशी "कॉलेजची सायंकाळ" हा कार्यक्रम झाला. त्याला विद्यापीठाचे प्रख्यात प्राध्यापक आणि ड्यूक ऑफ कॉनॉट राजपुत्र आर्थर हे देखील हजर होते (शेक्स्पियरच्या नाट्यप्रयोगांना राजपुत्र लोक क्वचितच हजर असतात किंवा कधीच हजर असलेले दिसत नाहीत). हॉलमध्ये चिकार गर्दी झालेली होती आणि उत्साह खरोखरी आयरिश धर्तीचा होता. शनिवारी आयर्व्हिंग लंडन शहरी आपल्या मित्रांकडे व चाहत्यांकडे परत येत आहे. कॉडरचा थेन (मॅक्बेथ) या नात्याने त्याचे स्वागत करायला त्यांना सानंद अभिमान वाटेल.

४

लंडनच्या लायसियम नाट्यगृहात
शेक्स्पियरच्या 'तिसऱ्या रिचर्ड'चा प्रयोग

लंडन, तारीख १ फेब्रुवारी [१८७७]

परिषद[२५७] अयशस्वी झाल्यापासून "पूर्वेच्या प्रश्ना"बाबत खंड पडलेला आहे. कॉन्स्टॅन्टिनोपल, व्हिएन्ना व बर्लिन येथून येणारे अहवाल वाचण्याची अतःपर घाई-गर्दी राहिलेली नाही किंवा खास किंवा बिन-खास प्रतिनिधींची म्हणजे पेरा[२५८] येथील गाल्लेगांची आणि बर्लिन येथील आबेल्सची लांबलचक बातमीपत्रे आधाशीपणे

गट्ट करायची घाईगर्दी राहिलेली नाही. "युद्धाची तुतारी मुग्ध झालेली आहे" आणि राजकारणाची उठाठेव करणारे सट्टेबाज तुच्छतावादी आता आपली चिंतामग्न डोकी मुकाट्याने टेकून शांतपणे झोपा काढू शकतात आणि शांततेच्या व भरभराटीच्या सोनेरी स्वप्नांमध्ये गुंग होऊन राहू शकतात.

राजकीय क्षेत्रातील या मंदीमुळे या आठवड्यातील मोठा प्रसंग म्हणजे लायसियम नाट्यगृहातील शेक्स्पियरच्या 'तिसऱ्या रिचर्ड'च्या प्रयोगाने सर्वसाधारण घ अनन्य लक्ष वेधून घेतले आहे. शेक्स्पियरच्या जर्मन भक्ताला ही गोष्ट अविश्वसनीय व अश्रुतपूर्व वाटेल की या महान नाटककाराने स्वतःच आपल्या तिसऱ्या रिचर्ड चा प्रयोग ग्लोब आणि ब्लॅकफायर्स या नाट्यगृहांमध्ये केला तेव्हापासून ते या सोमवार सायंकाळच्या प्रयोगापर्यंत हे नाटक त्याच्या मूळ स्वरूपात इंग्रज प्रेक्षकांपुढे कधीही सादर करण्यांत आलेले नव्हते. शेक्स्पियरच्या निधनानंतर हे नाटक अर्धं शतकभर रंगभूमीवरून संपूर्णपणे अदृश्यच झाले. १७०० साली कॉली सिब्बरने सादर केलेली तिसऱ्या रिचर्डची सर्वस्वी मोडतोड केलेली विसंगत संहिता त्यांत जडजंबाल, अर्थशून्य व मेलोड्रॅमॅटिक उतारे घुसडून रंगभूमीवर आली. याहूनही अधिक कमजोर अशी या नाटकाची संहिता १८२१ साली रंगभूमीवर आली, पण हे स्वरूप देखील रंगभूमीवर आपले अस्तित्व टिकवू शकले नाही.

हे नाटक त्याच्या मूळ शुद्ध स्वरूपांत सादर करायचे अनेक प्रयत्न झाले, परंतु ते सगळे अपयशी ठरले. गॅरिक किंवा कुंभ, एडमंड कीन किंवा मॅक्रीडी यांच्यापैकी कोणीही जुन्या चाकोरीबाहेर गेला नाही. आणि म्हणून हा घेडगुजरी प्रयोग १७ वर्षे रंगभूमीवर आपले निष्कंटक अधिराज्य गाजवीत राहिला; खरे सांगायचे म्हणजे केवळ काही थोड्या महिन्यांपूर्वीच सिब्बरच्या रूढ स्वरूपात रिचर्ड ओल्ड ड्रुअरीच्या रंगमंचावर येऊन गेला. या देशातील प्रत्येक संस्था, प्रत्येक रूढी आणि प्रथा, प्रत्येक विचार, दगडासारखा होतो, घट्ट मूळ धरून बसतो, गंजतो, आणि "ऐतिहासिक" परंपरा बनतो, श्रद्धेचे कलम होतो—आणि या बुरसट परंपरांना जो धक्का लावील त्याची गय केली जात नाही. या सखोल पाळेमुळे असलेल्या पूर्वग्रहांना आव्हान देण्याचा धीट विचार हेन्री आयव्हिंगच्या मनात आला आणि धैर्याने व तडफेने जनतेसमोर त्याने शेक्स्पियरला शुद्ध, अविकृत व मूळ स्वरूपात रंगभूमीवर सादर केले.

हा धोकेबाज प्रयोग किती यशस्वी झाला, त्याचे प्रत्यंतर सोमवारी आले. लायसियम नाट्यगृहाला प्रचंड जमावांनी घेराव घातला. पिट आणि गॅलरी जवळ जवळ हल्ला केल्याप्रमाणे तुडुंब भरली. बॉक्सेसमध्ये व स्टॉल्सवर समाजातल्या उच्च वर्गांच्या सौंदर्याचे, तारुण्याचे, शालीनतेचे प्रदर्शनच विराजमान झालेले होते. त्या तेजस्वी मेळ्यामध्ये एक तरुण नटी उठून दिसत होती. तिने आपल्या भुऱ्या कुरळ्या केसांवर डॉली वॉर्डन घर्तीची उंच टोपी ऐटीत घातलेली होती. (हे एक प्रकारचे ब्लॅक फॉरेस्ट घर्तीचे शेतकरी शिरोभूषण असते); ती जरीचा झगा

घातलेल्या केस पांढरे झालेल्या एका डचेसच्या शेजारी बसलेली होती; खूप पावडर लावलेल्या गरुडनाक्या शुद्ध रक्ताच्या सरदाराशेजारी त्याच्याहूनही अधिक प्राचीन सरदार घराण्यातली एक सुंदर तरुणी बसलेली होती. ही सगळी बडी मंडळी जिकडे तिकडे विखुरलेली दिसत होती. पुढल्या रांगांवर, वाद्यवृंदाच्या लगतच, "स्टार चेंबर" कोर्ट म्हणजे छोट्या-मोठ्या वृत्तपत्रांचे प्रतिनिधी बसलेले होते. हे मनाचे सरदार, किंवा अधिक समर्पकपणे लेखणी-शाईचे सरदार, औपचारिक काळे कोट व मलमलीचे टाय घालून दुसऱ्या दिवशी सकाळच्या अंकात जन्मठेपेची शिक्षा सुनावण्याची तयारी करत असल्याचे दिसत होते जणू!

वेळ, स्थळ आणि प्रयोगक्षमता या विचारांनी थोडीशी काटछाट, थोडासा संक्षेप आणि अर्थांतला बदल करावा लागणे साहजिकच होते. गोष्ट हुशारीने, निःसंकोचपणाने व हिकमतीने कशी साधलेली होती आणि हे जुने व अपूर्व नाटक आजच्या रंगभूमीशी संपूर्ण मेळ साधून कसे सादर करण्यात आलेले होते याचे प्रत्यंतर तुडुंब गर्दी केलेल्या प्रेक्षकांवर त्याने पाडलेल्या जादूसारख्या प्रभावावरून आले. ग्लॉस्टरचे पहिले स्वगत :

"आता आमच्या असंतोषाचा हा हिवाळा
या यॉर्कपुत्राने वैभवशाली उन्हाळा करून ठेवला आहे"[२५९]

हे सुरू होताक्षणी श्रोत्यांमध्ये तावडतोब स्तब्धता पसरली, आणि बडबड करणाऱ्या उच्चवर्णीय "देवता" मंत्रमुग्ध होऊन ऐकू लागल्या.

रिचर्डच्या भूमिकेचा अर्थ लावताना आयर्व्हिंगने सगळ्या जुन्या परंपरा भिरकावून दिलेल्या आहेत. हा मेफिस्टोफेलिसचा ठराविक ठशाचा आविर्भाव आणणारा राठ भुंग्यांचा "खलपुरुष" रंगमंचावर दाणदाण पावले टाकणारा असा सादर झालेला नाही. त्याचा कुरूपपणा त्याला ओंगळ दिसायला लावण्याइतका ठळक नाही. डावा खांदा उंचावलेला व किंचित लंगडत चालणे, एवढ्याच त्याच्या खुणा आहेत. परंतु हा महाढोंगी आणि बनवाबनवीतला वाकबगार, त्याची गुन्हेगारी मनोवृत्ती महत्त्वाकांक्षेने आटोक्यात ठेवलेली; आणि त्याचा नीचपणा हा फसवणूक, ढोंग व दुटप्पीपणा यांच्या नाजुक आवरणाने झाकून ठेवलेला; अत्यंत सूक्ष्म आविर्भावांनी, मुद्राभिनयाच्या बारीकसारीक जवळ जवळ ध्यानात न येण्याइतक्या हालचालींनी, दाबून धरलेल्या ओठांच्या पुसट हालचालींनी; आणि सूक्ष्म, उपरोधिक ओझरत्या स्मितांनी; हातांच्या हालचालींनी व आवाजाच्या चढउतारांनी— ही भूमिका कशी सादर करायची याची आयर्व्हिंगला किती छान जाणकारी आहे. सगळ्यात जास्त महत्त्वाची गोष्ट म्हणजे आयर्व्हिंग कधीही अतिरंजितपणा करत नाही. आवेगाच्या अत्यंत निकराच्या क्षणी देखील तो एक प्रकारचा मूलभूत प्रतिष्ठितपणा टिकवून ठेवतो, आणि मेलो-ड्रामामधल्या ग्राम्य, ओरडा आरडा करणाऱ्या

खलपुरुषाच्या पातळीइतका खाली तो कधीही उतरत नाही. एका लेखाच्या संकुचित मर्यादेत त्याच्या भूमिकेतला प्रत्येक तेजस्वी क्षण, त्याच्या स्वभाव चित्रणातल्या बारीक सारीक नाजुक तपशिलांपासून ते शेवटच्या प्रवेशांतील प्रभावशाली तडफेपर्यंत, आणि नाटक संपायच्या वेळचा रिचर्डशी आलेला खड्ग-युद्धाचा प्रसंग—या सगळ्यांचे वर्णन करणे अशक्य आहे. आम्ही त्यांतल्या विशेषेकरून यशस्वी अशा चार-दोन प्रवेशांवरच तेवढा भर देऊ : उदाहरणार्थ, लेडी ॲन हिचा पहिल्या अंकांतला शेवटचा प्रवेश; छापील मजकुरावरून त्याचे आकलन जवळ जवळ होतच नाही. परंतु आपण जेव्हा गुळगुळीत व लवचिक शब्दांचा वापर करणारा, ऐटबाज, दाक्षिण्ययुक्त, गमत्या व पश्चात्तप्त खुशामत्या बघतो, तेव्हा तिचा हुबळेपणा आपल्या ध्यानी येतो. दोन तरुण राजपुत्रांच्या प्रवेशातील त्याचे स्नेहशील, हळुवार व आर्जवी काम देखील फारच वैशिष्ट्यपूर्ण आहे—त्या राजपुत्रांच्या भूमिका दोन तरुण मुलींनी अत्यंत समजूतदारपणाने केलेल्या आहेत. आपल्या सज्जन ग्लॉस्टर काकाला ही लहान मुले बिलगलेली आपल्याला प्रत्यक्षात दिसतात आणि त्याची आई यॉर्कची वयोवृद्ध उचेस हिचे उद्गार अभावितपणे आपल्याला आठवतात :

> तुझे तान्हेपण हट्टी व लहरी होते.
> तुझे शालेय जीवन भयंकर, बेफाम, पिसाट आणि संतप्त होते.
> तुझे ऐन तारुण्य साहसी, धीट आणि आक्रमक होते.
> तुझे वयस्करपण पक्के, अभिमानी, सूक्ष्म, कावेबाज आणि रक्तलांच्छित होते,
> अधिक सौम्य परंतु तरीही अधिक घातक, द्वेषात प्रेमळ, असे होते.[२६०]

आणि विशेष नोंद घेण्याजोगा आणखी एक प्रवेश म्हणजे दोन आर्च-बिशपांसमवेतचा गॅलरीतला प्रवेश. त्यात बनेल ढोंगी इसम "चांगुलपणा, गुणीपणा व पवित्र नम्रता" यांनी भरलेली आपली नजर तो बायबलवरून स्वर्गापर्यंत भिडवतो.[२६१]

अशा श्रेष्ठ कलाकाराला त्याच्या सहकाऱ्यांकडून इतकी चांगली साथ क्वचितच मिळते. मिस बेटमन हिच्या मार्गारेटच्या भूमिकेचे जितके कौतुक करावे तितके थोडेच होईल—तिची ती उत्कृष्ट उसने अवसान आणणारी अगम्य मूर्ति, नजर खिळलेली, चर्या दुःखाने विकृत झालेली, तिचे बेफाम तुफानी उद्गार, आणि पिसाट हताशपणातून उफाळलेली तिची शापवाणी !

तिची धाकटी बहीण इसाबेल हिने लेडी ॲन हिची भूमिका भुरळ घालणाऱ्या आकर्षकपणानिशी आणि मनमोहक गोडपणानिशी साकार केलेली आहे. रिचर्डच्या तंबूत तिने आपले अल्पसे उद्गार खास भावनेनिशी अन्तःकरणापासून बोलून दाखविले. इतर सगळे देखावे, कपडे, यांच्याप्रमाणेच ते तंबू देखील त्यांच्या तपशिलांच्या चित्रविचित्र अचूकपणानिशी प्रशंसनीय होते. त्याने प्राचीन काळ ठसठशीतपणे प्रेक्षकांसमोर उभा केला. सगळ्या लहान सहान भूमिका, म्हणजे एलिझाबेथ,

यॉर्कची उचेस, क्लॅरेन्स, रिचमंड आणि बकिंगहॅम—यादेखील फारच चांगल्या वठल्या होत्या आणि ही गोष्ट अगदी लहानातल्या लहान भूमिकांना देखील लागू पडत होती. उदाहरणार्थ, कॅट्स्बी, रिव्हर्स, मारेकरी, आणि शेवटची परंतु सगळ्यांत जास्त महत्त्वाची भूमिका तरुण राजकन्येची—या सगळ्यांनी या महान नाट्य प्रयोगाच्या यशाला हातभार लावला.

आयर्व्हिंगला ज्या तुफानी उत्साहाने अभिवादन करण्यात आले, आणि प्रेक्षकांच्या आग्रहाखातर पुन्हा पुन्हा पडदा वर करून त्याला पुढे यायला लावले, त्या खळबळ उडविणाऱ्या देखाव्याचे वर्णन करणे केवळ अशक्य आहे. इंग्रजांच्या लेखी हा प्रयोग म्हणजे या जुन्या श्रेष्ठ कलाकाराचा नवा आविष्कार ठरला. आणि प्रयोग पाहतांना ते बिजेने भारल्यासारखे बसून राहिले. एकंदर कलाकृतीचा सुंदर मेळ साधलेला, हेतूचा स्पष्टपणा आणि निश्चितपणा, कथानकाचा क्रमाक्रमाने होणारा विकास, स्वभावचित्रणांतली परिपूर्णता, आणि सगळ्यात जास्त महत्त्वाची गोष्ट म्हणजे काव्य आणि भावनांचा आवेग यांचा अखंडपणे तुडुंब वाहणारा झरा या गोष्टींचे ते कौतुक करीत राहिले. त्यांच्या डोळ्यांवरील झापडे गळून पडली आणि त्यांना आपला शेक्स्पियर आपल्या सिब्बरपेक्षा अधिक मोठा असल्याचे दिसून आले. आमच्या आसपासचा एकच जर्मन समीक्षक तेवढा मोडक्या तोडक्या इंग्रजीत असे म्हणत असल्याचे ऐकू आले की "शेक्स्पियरच्या पेक्षा सिब्बरच्या अंगी 'दमदारपणा' अधिक आहे!" अरे तुझ्या राष्ट्रांतल्या अपूर्व माणसा!

५

लंडनची रंगभूमी

लंडन, तारीख २२ मे [१८७७]

लाइसियम नाट्यगृहात आणखी शुभारंभाचा प्रयोग झाला. आणि मोठ्या संख्येनिशी नाटकाला हजर राहणारे व क्रमाक्रमाने वाढत असलेले प्रेक्षक आपल्या आवडत्या नाट्यगृहात नवे नाटक पाहायला आव्हानपूर्वक हजर झाले. गेली तीन वर्षे शेक्स्पियरची नाटके जवळ जवळ अखंडपणे रंगभूमीवर आणण्याच्या कामी मिसेस बेट्मन यशस्वी झालेली आहे आणि याचे श्रेय हेन्री आयर्व्हिंग याच्या स्वतंत्र व तेजस्वी प्रयोगांकडे जाते. यासाठी असंख्य अडचणींवर मात करावी लागली; क्षुद्र, हेकेखोर व अन्यायी अशा वृत्तपत्रीय टीकाकारांच्या कंपूशी लढे झाले; शेक्स्पियरशी बराच काळ परिचय नसलेल्या उदासीन व निरुत्साही प्रेक्षकांना प्रथम आकर्षित करून शिक्षित करावे लागले; उच्च समाजाने दुर्लक्ष केले; या समाजाला सार्दी व

डयुमा यांच्या इंग्रजी अवतारांच्या निर्लज्ज आकर्षणांना गर्दी करणे हा चांगला शिष्टाचार वाटत होता; आणि शेवटची गोष्ट म्हणजे राजघराण्याच्या पाठिंब्याचा अभाव; प्रिन्स आल्बर्ट याच्या निधनानंतर या राजघराण्याने शेक्स्पियरविषयी खरोखरी धाकाची वृत्ती धारण केली आणि क्रायटीरियन नाट्यगृहात द रोज-कलर्ड डॉमिनो यांजसारख्या क्षुद्र प्रयोगांवर आपली एकनिष्ठ मेहेरबानी केली.

कमालीचा शारीरिक व मानसिक ताण सोसल्यानंतर आयर्व्हिंगला विश्रांतीची व आरामाची संधी द्यावी म्हणून आणि तहानेले हरिण थंड पाण्यासाठी धापा टाकते त्याप्रमाणे मेलोड्रामासाठी हपापलेल्या प्रेक्षकांच्या एका विभागाला खूष करावे म्हणून— हे दोन्ही हेतू समोर ठेवून लाइसियमच्या व्यवस्थापनाने शेक्स्पियरचे प्रयोग बंद करायचे ठरविले आहे आणि त्यांच्या ऐवजी थोडा काळ मेलोड्रामावर भर द्यायचे ठरविले आहे. शनिवारी लियॉन्स मेल [२६२] या नाटकाचे स्वागत ज्या उत्साही व आनंदी टाळ्यांच्या कडकडाटाने झाले त्यावरून नव्या नाटकाच्या पसंतीच्या बाबतीत मिसेस बेट्स किती नशीबवान ठरल्या याचे प्रत्यंतर आले.

हे नाटक मुळात १८५० साली पॅरिस शहरी गॅइटे नाट्यगृहात सादर झाले. डायरेक्टरांच्या [२६३] अमदानीत १७९४ साली फ्रान्समध्ये जो सुप्रसिद्ध खटला झाला, त्याच्यावर नाटक हे आधारलेले आहे. न्यायाधीश व साक्षीदार यांची दिशाभूल करण्याइतका पुरेसा ठळक असा चेहऱ्यातील शारीरिक सारखेपणा हे एका गुन्ह्याचा आरोप एका बदमाषाने केलेल्या एका निरपराधी माणसावर होण्याला कारण झाले.

पॅरिस-लियॉन्स मार्गावर ल्यूरसॅट नामक एक खेडे आहे. त्या खेड्यात लियॉन्सला टपाल घेऊन जाणाऱ्या गाडीवर लुटारूंच्या एका टोळीने हल्ला केला. जहाजाची वल्ही मारायची सक्तमजुरीची शिक्षा भोगत असलेला व तिथून पळून गेलेला गुन्हेगार दुबोस्क हा या टोळीचा पुढारी होता. त्याने टपालवाल्याला ठार मारले आणि ७५,००० फ्रँक एवढी रक्कम चोरली. जोसेफ लेसूर्क्वे याच्या वयोवृद्ध वडिलांच्या घरानजीक हा गुन्हा घडला. हा जोसेफ गुन्हा झाला त्या क्षणी जवळपासच होता. खरा गुन्हेगार दुबोस्क पळून गेला, टोळीतले काही लोक चोरीच्या काही रकमेसह पकडले गेले, आणि घटनांच्या असामान्य साखळीच्या परिणामी जोसेफवर या गुन्ह्याचा आरोप आला, त्याला शिक्षा झाली आणि वस्तुतः त्याचा शिरच्छेद झाला, आणि त्याचा तोतया निसटला. शेवटच्या क्षणी जोसेफ आपण गुन्ह्याच्या स्थळी नसल्याचे सिद्ध करू शकला, परंतु कोर्टाने आधीच निकाल दिलेला होता आणि तो निकाल रद्द करण्यात आला नाही. कायद्याने केलेल्या या खुनाला बळी पडलेल्या दुर्दैवी माणसाच्या वारसांनी नाटककाराविषयी आणि जिथे हा नाट्यप्रयोग सादर झाला त्या नाट्यगृहाच्या व्यवस्थापनाविषयी कृतज्ञता प्रदर्शित केली आणि त्यांना अशी स्पष्ट विनंती केली की आपले आजोबा जोसेफ लेसूर्क्वे यांच्या खऱ्या नावाचा वापर नाट्यप्रयोगामध्ये करावा

म्हणजे भावी पिढीला त्यांच्या निरपराधीपणाची खात्री पटेल. आणखी एक मजेशीर प्रकार असा आहे की तिसऱ्या साम्राज्याच्या[२६४] अमदानीत या बळी गेलेल्या जोसेफच्या वारसांनी आपले जप्त झालेले पैसे परत मिळावेत असा अर्ज सरकारकडे केला आणि त्यांचे वकीलपत्र जूल्स फाव्रे याने घेतले. एका औपचारिक चुकीमुळे कोर्टाने या कुटुंबाच्या विरुद्ध निकाल दिला. १८५४ साली या नाट्यप्रयोगाने पॅरिस शहरी खूप खळबळ उडविलेली होती. याचे विशेष कारण म्हणजे लेक्रेसोनियेरे या नटाचा उत्कृष्ट अभिनय. हे नाटक चार्ल्स रीड याने इंग्रजीत अनुवाद केलेल्या स्वरूपात प्रिन्सेस नाट्यगृहात सादर केले. याचे दिग्दर्शन चार्ल्स बो याने केले आणि मुख्य भूमिकाही त्यानेच केली.

या नाटकात साध्या, चटका लावणाऱ्या प्रसंगांची रेलचेल आहे, त्यांत खळबळ उडविणारे प्रवेश आहेतं, चटकदार स्थळे आहेत. फ्रेंच लेखकांचा सुपरिचित गुण जो खुबीदारपणा त्याच्या योगाने नाटकाची रचना व्यवस्थित झालेली आहे. प्रत्येक अंकाच्या शेवटी एक परिणामकारक टाब्लो आणि मेलो-ड्रामाला आवश्यक असलेली संगीताची साथ आहे.

हेन्री आयर्विंग या नाटकात दुहेरी भूमिका करतो--एक प्रेमळ, हळवा पितामह, आपल्या निरपराधीपणाची खात्री असलेला, आणि दुसरा म्हणजे धंदेवाईक खुनी व चोर, हलकट, दंगेखोर आणि दारुडा. आणि केवढ्या हिकमतीने, केवढ्या परिपूर्ण कलेने तो अत्यंत रेखिवपणे ही दोन्ही स्वभावचित्रे त्यांच्या सगळ्या वेगळेपणानिशी उभी करतो, अगदी बारीक सारीक तपशील संभाळतो आणि सगळ्या साक्षीदारांना व खुद्द आरोपीच्या वडिलांना देखील फसविणारा सारखेपणा एकदाही न घालवता, चमत्कार-सदृश अशा वेषान्तरांनिशी तो ही भूमिका वठवतो. ही सगळी एकंदर सर्वांग परिपूर्ण अशी कलाकृती आहे आणि ती अनेकदा जबरदस्त व अन्तकरणाला पीळ पाडणारा प्रभाव घडवून आणते. जोसेफ लेसुर्क्वे याच्या वडिलांची भूमिका रीड याने केली ती सर्वोत्तम वठली. नाटकातल्या सर्वोत्तम प्रवेशांना व यशाला या तडफदार व प्रतिष्ठित भूमिकेने मूलतः हातभार लावला.

दोघी बहिणी इसाबेल आणि व्हर्जिनिया बेट्मन यांचा खास निर्देश करायला हवा. व्हर्जिनियाने लेसुर्क्वेची कन्या ज्युलिया ही छोटीशी व बिनमहत्त्वाची भूमिका केलेली आहे व तिचा जास्तीत जास्त फायदा उठविलेला आहे. त्या काळातला चित्रविचित्र व वैशिष्ट्यपूर्ण पोशाख, ठळक बारीक कमर, घट्ट बसणारा स्कर्ट, आणि कुरळ्या केसांची केशभूषा हे सगळे तिला विशेषेकरून शोभून दिसते आणि तिच्या तारुण्यसुलभ भुऱ्या केसांच्या सौंदर्याला उठाव आणते. आपल्या वडिलांना दोषी ठरविल्याचे ती ऐकते त्या प्रवेशात ती वडिलांच्या मिठीत स्वतःला झोकून देते आणि मोठ्याने हुंदके देत ती वडिलांच्या गळ्याला लटकते त्या वेळी ती प्रेक्षकांवर मोठाच प्रभाव पाडते आणि अनेकांचे डोळे आसवांनी भरून येतात. इसाबेल बेट्मन हिची भूमिका अधिक कठीण

आहे. दुबोस्कने फशी पाडलेल्या व टाकून दिलेल्या जिआनेतची भूमिका ती करते. दु:खी कष्टी, हताश अशी ही तरुणी भटकत असते. तिचा प्रथम प्रवेश खरोखरी चटका लावणारा आहे अणि प्रेक्षकांची सहानुभूति ती चटकन् मिळवून घेते. दुबोस्कवर ती आरोत करते त्या प्रवेशात ती खराखुरा नाट्यपूर्ण आवेश प्रत्ययाला आणून देते. नाटकाच्या शेवटी दुबोस्कने जखमी केल्यानंतर ती खचून जमिनीवर कोसळते आणि लगेच स्वत:ला सावरून भेलकांडत रंगमंचावरून जाते त्या वेळी खऱ्याखुऱ्या शोककारी स्वरूपाच्या कलात्मक मोठेपणाची उंची ती गाठते.

या नाट्यगृहातील कपडे, सीनसीनरी आणि रंगमंच रचना सुसंगतपणे उत्कृष्ट असून टपालगाडी ओढणारे दोन पांढरे शुभ्र घोडे देखील आपल्या भूमिका छान बजावतात आणि एकंदर आकर्षक देखाव्याच्या चित्रविचित्र परिणामात भर घालतात.

हेन्री आयर्व्हिंग इंग्रज जनतेसमोर आणखी एका दुहेरी भूमिकेत अलीकडेच आलेला आहे, ती म्हणजे नट आणि लेखक. आणि या क्षेत्रात देखील त्याला मान्यता नाकारता येत नाही.

नाइन्टीन्थ सेंचरी या नियतकालिकाच्या दोन अंकांमध्ये आयर्व्हिंगने दोन लेख प्रसिद्ध केले आहेत. या नियतकालिकाच्या लेखकांमध्ये इंग्लंडचे प्रमुख साहित्यिक व शास्त्रज्ञ यांचा समावेश असतो. "शेक्स्पियरविषयी एका अभिनेत्याची टिपणे" [२६५] हा मथळा असलेल्या या दोन लेखांमध्ये शेक्स्पियरचा कौशल्यपूर्ण व तपशीलवार अभ्यास सादर झालेला आहे.त्यातल्या एकात मॅक्बेथ नाटकांतील तिसऱ्या खुन्याचा ऊहापोह आहे आणि दुसऱ्यात हॅम्लेट व ऑफेलिया यांच्या दरम्यानच्या प्रेमाच्या संबंधाचे विवेचन आहे, आणि त्यांत नटांना व रंगमंच व्यवस्थापनांना व्यावहारिक सल्लामसलती व सूचना आहेत.

त्याच अंकात राजकवि टेनिसन यांची एक कविता आहे आणि ग्लॅडस्टनचा एक लेख आहे. दोहोंचा विषय मॉंटेनिग्रोची शूर जनता हा आहे. त्यांत आर्चबिशप मॅनिंग यांचा "व्हॅटिकनचा खरा इतिहास" हा लेख आहे. आणि त्याचबरोबर "धार्मिक श्रद्धेच्या ऱ्हासाचा नीतीवर प्रभाव" या विषयावरील सध्याच्या "परिसंवादावर" हक्स्लेचा लहानसा लेख आहे. या चर्चेत अगोदर भाग घेणाऱ्यांमध्ये निरीश्वरवादी, कॉम्प्टिस्ट आणि पाएटिस्ट यांचा समावेश आहे. या साहित्यिक महापुरुषांमध्ये आपले स्थान आयर्व्हिंगला भूषविता आले याचे महान श्रेय त्याच्याकडे जाते.

खरे सांगायचे म्हणजे स्वतंत्र विचार आणि भाषेची उत्कृष्ट शुद्धता यांच्या द्वारा आयर्व्हिंग उठून दिसतो. त्याचे लेख अगदी साधे आहेत आणि रोजची खर्डेघाशी करणाऱ्या व इतर बोलूवहाद्दरांच्या लेखनातल्या मसाल्याचा त्यांत लवलेशही नाही आणि यामुळेच त्यांना एवढा ताजेपणा लाभला आहे. लिहिण्यासाठी लिहायचे असा आयर्व्हिंगचा खाक्या नाही. तो आपल्या विषयामध्ये आपले अन्त:करण ओततो

आहे आणि संपूर्ण गंभीरपणे त्याचा ऊहापोह करतो आहे आणि म्हणून त्यात यत्किंचितही आढ्यताखोरपणा नाही.

याच्या विरोधात उपरोक्त नियतकालिकातला त्याचा साहित्यिक शेजारी बडबड्या साहित्यिक लफंग्यांच्या वर्गात मोडणारा आहे. तो आहे मिस्टर राल्स्टन. या स्वारीने काही काळ रशियात घालविलेला आहे आणि तो थोडेसे मोडकेतोडके रशियन बोलू शकतो, येवढ्या भांडवलावर हा रशियाविषयी आपण अधिकारी माहितगार असल्याचा आव आणतो आणि सभांतून व वृत्तपत्रांतून आपल्या अकलेचे तारे तोडतो. नाइन्स्टीन्थ सेंचरीच्या a गेल्या अंकात याने रशियातील प्रचलित क्रान्तिकारक साहित्य आणि अगदी ताजे क्रान्तिकारक उद्रेक या विषयावर एक लेख लिहिलेला आहे. त्याने त्यात असे जाहीर केले आहे की कुणीतरी धार्मिक किंवा व्यक्तिगत निष्ठेसाठी स्वतःचे बलिदान कसे करू शकतो हे आपल्याला पूर्णपणे समजते, परंतु इतर अपरिपक्व विचारांसाठी कुणी स्वतःचे कसे बलिदान करू शकतो हे आपल्याला समजत नाही. म्हणून अगदी ताज्या छोट्याशा क्रान्तिकारक उद्रेकात ज्यांना चुकीचा समज असलेल्या का होईना; परंतु स्वातंत्र्यासाठी स्वतःचे बलिदान करता आले त्या दुर्दैवी बळींच्या विषयी हा लेखक उपहास, विटंबना व तिरस्कारच दर्शवितो, अन्य काहीच दर्शवीत नाही, याचे मुळीच आश्चर्य वाटायला नको. ज्या गरीब बिचाऱ्या तरुण मुली या चळवळीत सामील झाल्या आणि प्रारंभिक चौकशीतच ज्यांच्या तब्बेती अगोदरच ढासळलेल्या आहेत, आणि ज्या आता सैबेरियात पंधरा वर्षांच्या सक्त मजुरीची शिक्षा भोगत आहेत, म्हणजे कणाकणाने ज्यांचे खून होत आहेत, त्यांचा धिःक्कारच केला पाहिजे म्हणायचा.

मिस्टर राल्स्टन आपल्या लेखात एन्. चेर्निशेव्स्की, आजचे मोठ्यात मोठे क्रान्तिकारक लेखक, यांचा नामनिर्देशही करीत नाही हे कसे काय? जॉन स्टुअर्ट मिल्ल यांच्या अर्थशास्त्राची मूलतत्त्वे [२६६] या या ग्रंथावरील टीकाटिप्पणीचे स्वरूप असलेला "अर्थशास्त्र" हा चेर्निशेव्स्की यांचा प्रमुख ग्रंथ या मिस्टर राल्स्टन याला ठाऊकच नाही असे असू शकेल काय? इतिहास, सौंदर्यशास्त्र, तत्त्वज्ञान, साहित्य आणि राजकारण या क्षेत्रातील बहुतांश टीकालेख असलेल्या त्यांच्या संकलित लेखांचे

---

a हा लेख १८७७ च्या मे महिन्याच्या अंकात "रशियन क्रान्तिकारक साहित्य" या मथळ्यानिशी प्रसिद्ध झाला. इतर गोष्टींच्या जोडीला त्यात "५० जणांवरील खटला" याची तपशीलवार छाननी केलेली आहे. हा खटला सेंट पीटर्सबर्ग येथे १८७७ च्या मार्च व एप्रिल महिन्यात भरला होता आणि त्यांत क्रान्तिकारक "नारोदनिकांच्या" एका गटाला शिक्षा झाल्या. (पाहा: मार्क्सने एन्गल्सला तारीख १८ सप्टेंबर १८७८ रोजी लिहिलेले पत्र आणि कोवालेव्स्कीकृत कार्ल मार्क्सच्या आठवणी).

आता वीस घसघशीत खंड झालेले आहेत (काय केले पाहिजे? हा मथळा असलेली कादंबरी याशिवाय वेगळी आहेच) हे राल्स्टनला ठाऊक नाही काय! चेर्निशेव्स्की यांचे (सोव्रेमेन्निक) समकालीन[२६७] हे नियतकालिक राल्स्टनच्या परिचयाचे नाही काय? या नियतकालिकाने भूदासांना मुक्त करायचा आग्रह रशियन सरकारजवळ धरला (ही मुक्तता वस्तुतः ज्या रीतीने अंमलात आणण्यात आली, तिच्याहून नक्कीच वेगळ्या रीतीने करायचा आग्रह धरला), आणि आपल्या काळातल्या पीटर्सबर्ग येथील वृत्तपत्रांच्या बनावट उदारमतवादावर केवळ्या तरी निर्दय कठोरपणाने कोरडे ओढले आणि सरकारने त्यांना जेव्हा सैबेरियात हद्दपारीवर रवाना केले त्या वेळी या वृत्तपत्रांच्या विद्वान प्रतिनिधींना आपल्या डोक्यावरचे एक मोठे ओझे उतरले असे वाटले. कारण एक साधा टीकाकार आणि पंडित रशियात पहिल्या-प्रथमच एक सार्वजनिक शक्ती झालेला होता. आमचा हा साहित्यिक महाशय, कोणत्याही विचारासाठी स्वतःचे बलिदान करणार नाही असे म्हणणारा हा साहित्यिक महाशय तुच्छतावाद आणि बनावट लग्ने यांच्याविषयी एवढे चुरूचुरू लिहीत असताना या माणसाविषयी एवढी मुग्धता का पतकरतो?

परंतु **नाइन्टीन्थ सेंचरी**तल्या या विषयान्तरानंतर आपण ज्या मुद्यापासून सुरुवात केली त्या मुद्याकडे— म्हणजे रंगभूमीकडे— पुन्हा वळू या. आयर्व्हिंगचे स्वागत पुन्हा एकदा लेखकाच्या भूमिकेत करायची आपण आशा धरू या आणि लवकरच, त्याचबरोबर त्याचा जन्मजात घटक म्हणजे नवी शेक्स्पियर निर्मिती— या भूमिकेत त्याचे स्वागत करायची आपण आशा धरू या.

Beitrage Zur Geschichte der
Deutschen Arbeitor bewegung,
अंक ६ वा, १९६६

टीपा

१. हा संदर्भ कार्ल गुट्झ्कौकृत व्लासेडौउन्ड सैन सोह्ने या कादंबरीला अनुलक्षून आहे. हिचे प्रकाशन १८३३ साली स्टुट्टगार्ट येथे झाले. पृ. ४५

२. हा संदर्भ प्लाटेनकृत पाच प्रवेशांच्या डेर रोमान्टिश्चे ओइडिपस या आनंदपर्यवसायी नाटकाला अनुलक्षून आहे. पृ. ४५

३. हा संदर्भ आय. वी. थिर्यस्चकृत "इच बिन् आइन् प्रयूबे" या गीताला अनुलक्षून आहे. पृ. ४६

४. बायबलमधील जेनेसिस यांतल्या हकीकतीचा हा उल्लेख आहे. लॉटच्या बायकोने ती दोघे सोडोमपासून पळून जातांना मागे वळून पाहिले म्हणून ती मिठाचा खांब झाली. (जेनेसिस XIX) पृ. ४७

५. काल्व्हिनिस्ट सायनॉडची बैठक डॉड्रेल्ट (हॉलंड) येथे तारीख १३ नोव्हेंबर १६१८ ते ९ मे १६१९ या मुदतीत भरली आणि तिने विरोधी मतांबद्दल आर्मेनियन पंथाचा धिःकार केला आणि कट्टर काल्व्हिनिस्ट सनातनी मतांचा पुनरुच्चार केला. पृ. ४७

६. हा संदर्भ फर्डिनांड फ्रायलिग्राथ आणि लेविन श्चूर्किंग कृत डास माइयेरिश्चे उण्ड रोमान्टिश्चे वेस्टफालेन या पुस्तकाची दुसरी आवृत्ती बार्मेन आणि लीपझीग येथे १८४० साली प्रसिद्ध झाली तिला अनुलक्षून आहे. पृ. ५१

७. एन्गल्सचा मुक्काम मन्स्टर येथे असताना १८४० च्या मे महिन्यात उपरोक्त पुस्तकाची एक प्रत लेविन श्चूर्किंगने त्याला भेट म्हणून दिली आणि तिच्यावर 'मन्स्टरची आठवण म्हणून' अशी अर्पणपत्रिका लिहिली. अन्नेटे एलिझाबेथ फॉन ड्रास्टे हुल्शॉफ हिचा गेडिख्टे हा कविता-संग्रह १८३८ साली डी. एच. या आद्याक्षरांनिशी प्रसिद्ध झाला. पृ. ५१

८. पाएटिझम (लॅटिन पाएटास–पाविन्य)––लूथेरन धर्मपीठातली एक शाखा जर्मनीत सतराव्या शतकात उदयास आलेली. पृ. ५१

९. रूसोच्या मते लोक मुळात नैसर्गिक राज्यात वास्तव्य करून राहात असत आणि तेथे सगळे समान असत. खासगी मालमत्तेचा उदय आणि मालमत्तेतील

विषमतेचा विकास झाल्यामुळे नैसर्गिक राज्याचे संक्रमण मुलकी राज्यामध्ये आणि सामाजिक करारावर आधारलेल्या राज्याच्या स्थापनेमध्ये झाले. तथापि राजकीय विषमतेचा आणखी अधिक विकास होण्याच्या परिणामी सामाजिक कराराचा भंग झाला. नव्या सामाजिक करारावर आधारलेले नवे बुद्धिनिष्ठ राज्य त्याच्या जागी येणार होते. (याच ग्रंथाची पृष्ठे २७३-७५ पाहा) पृ. ६०

१०. **मर्कंटाइलिझम**—१५ व्या ते १८ व्या शतकाच्या अवधीत अनेक युरोपियन राज्यांनी अंगिकारलेल्या आर्थिक मतांची व आर्थिक धोरणांची पद्धती. मर्कंटाइलिझमचे तत्त्वविशारद संपत्तीचा उगम उत्पादन प्रक्रियेत शोधत नसून अभिसरणाच्या प्रक्रियेत शोधत असत आणि पैसा म्हणजेच संपत्ती मानत असत. मर्कंटाइल पद्धतीचे पुरस्कर्ते देश हे आयातीपेक्षा निर्यात अधिक करण्यासाठी आपल्या परराष्ट्रीय व्यापाराचे नियंत्रण करण्याचा प्रयत्न करीत असत.

फिजिओक्रॅट्स्—अठराव्या शतकातील मांडवलदारी अर्थशास्त्रातील एक प्रवृत्ती. हिचे प्रमुख प्रवर्तक म्हणजे फ्रान्समध्ये फ्रान्स्वा क्वेस्ने आणि ए. आर. एफ. तुर्गो. फिजिओक्रॅट्स्नी मांडवलदारी उत्पादनाच्या शास्त्रीय विश्लेषणाचा पाया घातला. वरकड मूल्याच्या उगमाचा प्रश्न त्यांनी अभिसरणाच्या क्षेत्रातून काढून उत्पादनाच्या क्षेत्रात आणून ठेवला. तथापि त्यांच्या मते शेतीवरील श्रम हाच तेवढा उत्पादक श्रमाचा एकमेव प्रकार होता आणि औद्योगिक कामगारांना ते "बिनउत्पादक वर्ग" मानत असत. पृ. ६१

११. **डाय न्यूए झीट**—जर्मन सोशल डेमोक्रॅटिक पक्षाचे राजकीय व तात्त्विक वृत्तपत्र. स्टुट्टगार्ट येथे ते १८८३ ते १९२३ या मुदतीत प्रकाशित होत असे. याचे संपादन १९१७ पर्यंत कार्ल कौट्स्की करत असे. १८८५ ते १८९४ या मुदतीत एन्गल्सने या वृत्तपत्रात अनेक लेख प्रसिद्ध केले. याच्या संपादकांना तो अनेकदा सल्ला देत असे आणि मार्क्सवादापासून विचलित झाल्याबद्दल त्यांच्यावर बऱ्याच वेळा टीका करीत असे. पृ. ६२

१२. हा संदर्भ १८८० च्या दशकातल्या एन्गल्सकृत **जर्मनीतील शेतकरी युद्ध** या संकल्पित ग्रंथाच्या पहिल्या प्रकरणाला अनुलक्षून आहे. या ग्रंथाची योजना आखून एन्गल्सने याचे पुनर्लेखन चालू केले परंतु त्याच्या हातून ते पूर्ण झाले नाही. पृ. ६२

१३. **तीस वर्षांचे युद्ध** (१६१८-४८)—हे पहिले अखिल युरोपियन युद्ध. युरोपियन राज्यांच्या वेगवेगळ्या गटांच्या दरम्यानचे अन्तर्विरोध निकराचे येणे हे या युद्धाचे कारण. याला प्रॉटेस्टंट व कॅथोलिक या पंथांच्या दरम्यानचा लढा असे स्वरूप प्राप्त झाले. जर्मनी हे या युद्धाचे मुख्य क्षेत्र. या युद्धात भाग घेतलेल्यांनी लूट व मुलुखगिरी हे उद्देश आपल्यापुढे ठेवलेले होते. जर्मनीचे

राजकीय तुकडे करण्याला मान्यता देणाऱ्या वेस्टफॅलियाच्या तहनाम्याने या युद्धाची समाप्ती केली. पृ. ६३

१४. एन्गल्सने हे पत्र पॉल अर्न्स्ट याच्या पत्राला उत्तरादाखल लिहिले आहे. तारीख ३१ मे १८९० रोजी एन्गल्सला लिहिलेल्या आपल्या पत्रात पॉल अर्न्स्टने आपण हेर्मान्स बाहर या ऑस्ट्रियन इंप्रेशनिस्ट लेखकाशी केलेल्या वादात घेतलेल्या भूमिकेविषयी मत द्यायची विनंती एन्गल्सला केली होती. वादाचा विषय स्कँडिनेवियन देशांतील स्त्रियांची भूमिका व या स्त्रियांची चळवळ हा होता. पृ. ७०

१५. **कम्युनिस्ट पक्षाचा जाहीरनामा** (मार्क्स आणि एन्गल्स, **संकलित ग्रंथ**, खंड ६ वा, पृ. ५०२) यातून उद्धृत पृ. ७२

१६. प्राचीन प्रजासत्ताकीय गुणविशेषांचे हे वीरपुरुष महान फ्रेंच राज्यक्रान्तीच्या काळात लोकप्रिय होते. वक्ते आणि कवी त्यांचा अनेकदा निर्देश करीत असत. सीझरिझम हा नेपोलियनच्या काळातील कॉन्सुलेटचा व साम्राज्याचा नमुना होता. पृ. ७६

१७. **रॉबर्ट्स अँड कंपनी**—लोखंड पोलादाचा कारखाना; **क्रेदित मोबिलिगे**—प्रख्यात फ्रेंच बँक; प्रिंटिंग हाऊस—लंडन टाइम्सचे मुद्रणालय. पृ. ७८

१८. **स्टेफान फॉन गिल्लेन्हॉफ** ही मिन्ना कौट्स्की लिखित पहिली कादंबरी पृ. ८३

१९. **साल्व्हेशन आर्मी**— (मुक्तिफौज) डब्ल्यू. बूथ या इंग्रज धर्मोपदेशकाने इंग्लंडमध्ये १८६५ साली स्थापन केलेली भांडवलदारी धर्मादाय संघटना (हिची लष्करी धर्तीवर पुनर्घटना झाल्यानंतर हे नाव हिने धारण केले.) पृ. ८६

२०. **द लेजिटिमिस्टस**—१७९२ साली पदच्युत करण्यात आलेल्या फ्रान्समधील बुर्बोन राजघराण्याचे पाठिराखे. जमीनदारी सरदारशाहीच्या हितसंबंधांचे प्रतिनिधित्व ते करीत असत. पृ. ८८

२१. एन्गल्स इथे मेंढेकोटांवरील लढाईचा निर्देश करतो. पॅरिस येथे तारीख ५ व ६ जून रोजी मानवी हक्कांचा व नागरिकांचा समाज या रिपब्लिकन पक्षान्तर्गत डाव्या गटाचे बंडखोर आणि लुई फिलिपचे लष्कर यांच्या दरम्यान क्लोइत्रे सेंट मेरी नजीक ही लढाई झाली. बाल्झॅकने आपल्या **इल्यूसिओन्स पेर्दुए** आणि **लेस सीक्रेत्स दे ला प्रिन्सेसे दे कादिग्नान** या कादंबऱ्यांमध्ये या लढाईत कामास आलेला रिपब्लिकन मायकेल क्रेतियेन याचे चित्रण केले आहे. पृ. ८८

२२. हा संदर्भ १८४८-४९ सालातील क्रान्तीच्या मध्यमवर्गीय डेमोक्रेटिक नेत्यांना अनुलक्षून आहे. पृ. ८८

२३. ए. चेनू कृत **लेस कॉन्स्पिरेतूर्स. एल्. दे ला होद्देकृत ला नाइस्सान्स दे ला रेपुब्लीक.** पृ. ८९

२४. इंग्लंडमधील १८९२ च्या पार्लमेंटरी निवडणुकांमध्ये कामगार प्रतिनिधींनी अनेक मतदारसंघांमध्ये बहुमत मिळविले. पृ. ९२

२५. होम रूल--इंग्रज साम्राज्याच्या चौकटीत राहून आयर्लंडला स्वराज्य देण्याचा नेमस्त उदारमतवादी-भांडवलदारी कार्यक्रम. पृष्ठ ९३

२६. द फेबियन्स--१८८१ साली स्थापन झालेल्या फेबियन सोसायटी या इंग्रज सुधारणावादी संघटनेचे सदस्य. फेबियन सोसायटीचे सदस्य बहुतांशी भांडवलदारी बुद्धिजीवी--शास्त्रज्ञ, लेखक, राजकारणी--लोक होते (सिडने आणि बिअॅट्रिस वेब, जॉर्ज बर्नार्ड शॉ, रॅम्से मॅक्डोनाल्ड यांचा त्यात समावेश होता). कामगारवर्गीय लढा आणि समाजसत्तावादी क्रान्ति यांची आवश्यकता त्यांना अमान्य होती. आणि भांडवलशाहीचे संक्रमण समाजसत्तावादात होणे हे केवळ सुधारणांच्या योगानेच साध्य होऊ शकते असा त्यांचा दावा होता. पृ. ९३

२७. या शेतकऱ्यांच्या गुप्त मंडळ्या होत्या आणि यांच्या कृतीतूनच जर्मनीतील १५२४ २५ च्या शेतकरी युद्धाचा मार्ग मोकळा झाला. पृ. १०२

२८. हा निर्देश मार्क्सकृत भांडवल या ग्रंथाला अनुलक्षून आहे. पृ. १०७

२९. हा निर्देश वरकड मूल्याचे तत्त्वविचार या ग्रंथाला अनुलक्षून आहे. पृ. १०७

३०. जोसेफ ग्रिम्म याने आपले ग्रंथ हप्त्यां हप्त्यांनी प्रसिद्ध केले पृ. १०७

३१. व्होस्सिश्चे झायटुंग -- बर्लिन येथील भांडवलदारी वृत्तपत्र. स्थापना १७८५. एच. व्ही. टी. या सहीनिशी "झूर ब्यूएर्टायलुंग फॉन कार्ल मार्क्स" या मथळ्याचा लेख तारीख २४ मे १८८३ रोजी प्रसिद्ध झाला. त्याचा निर्देश इथे एन्गल्सने केला आहे. या लेखाच्या लेखकाने मार्क्सचे सर्वस्वी विकृत चित्रण केले आहे. पृ. १०८

३२. लूजो ब्रेन्टानो या जर्मन अर्थशास्त्रज्ञाने १८७२ साली जर्मन उद्योगपतींचे मुखपत्र कॉन्कॉर्डिया यामध्ये "कार्ल मार्क्स अवतरणे कशी देतात याची रीत" हा निनावी लेख प्रसिद्ध केला. इंग्रज उदारमतवादी मंत्री ग्लॅडस्टन याने कॉमन्स सभेत (१८७३ साली) केलेल्या भाषणाचे अवतरण मार्क्स यांनी प्रथम "पहिल्या इंटरनॅशनलच्या उद्घाटनपर भाषणात" आणि नंतर भांडवल ग्रंथाच्या प्रथम खंडात चुकीचे दिल्याबद्दल ब्रेन्टानोने मार्क्स यांना दोष दिला. ब्रेन्टानोचा हा लेख म्हणजे शास्त्रज्ञ या नात्याने मार्क्स यांना बदनाम करण्याचा नीच प्रयत्न होता.

ब्रेन्टानोच्या या हल्ल्यातून प्रदीर्घ वादाला प्रारंभ झाला. मार्क्स यांनी आणि त्यांच्या निधनानंतर इलियानॉर मार्क्स आणि फ्रेडरिक एन्गल्स यांनी ब्रेन्टानोला उत्तरादाखल लेख लिहिले. मार्क्स यांनी दिलेले अवतरण मुळाशी तंतोतंत जुळत

असल्याचा निर्विवाद पुरावा मार्क्स आणि एन्गल्स यांनी आपल्या लेखातून सादर केला आहे. पृ. १०९

३३. द नॉर्दर्न स्टार--इंग्रजी साप्ताहिक. चार्टिस्टांचे मध्यवर्ती मुखपत्र. १८३७ पासून १८५२ पर्यंत प्रकाशित होत होते. पृ. १११

३४. हा निर्देश सोत्सियाल्डेमोक्राट या साप्ताहिकाला अनुलक्षून आहे; समाजवादी-विरोधी कायद्याच्या काळांतील जर्मन सोशालिस्ट कामगार पक्षाचे मध्यवर्ती मुखपत्र; १८७९ पासून १८९० पर्यंत प्रकाशित होत होते. पृ. १११

३५. हा निर्देश दुसरा विल्यम याचा १८७८ साली खून करण्याचे प्रयत्न झाले त्यांना अनुलक्षून आहे. सोशल डेमोक्रॅटांचा छळ पराकोटीला नेण्यासाठी आणि समाजवादी-विरोधी कायदा राइष्टागने पास करावा अशी मागणी करण्यासाठी सबब म्हणून या गोष्टींचा उपयोग बिस्मार्कने केला. पृ. १११

३६. न्यूए वेल्ट--एक नियतकालिक. जर्मन सोशल डिमॉक्रसीच्या संघिसाधू गटाचे मुखपत्र. पृ. ११२

३७. जॉर्ज वीर्थ याच्या कवितेची पहिली ओळ. पृ. ११२

३८. हा निर्देश रॉय यांनी फ्रेंच भाषेत अनुवादिलेल्या आणि मार्क्स यांनी संपादित केलेल्या भांडवल ग्रंथाच्या पहिल्या खंडाला अनुलक्षून आहे (१८७२). पृ. ११४

३९. हा निर्देश कम्युनिस्ट पक्षाचा जाहीरनामा याच्या अमेरिकन आवृत्तीला अनुलक्षून आहे. पृ. ११५

४०. हा निर्देश मार्क्सकृत तत्त्वज्ञानाचे दारिद्र्य या ग्रंथाचा अनुवाद फ्रेंच भाषेतून जर्मन भाषेत बर्नस्टीन यांनी १८८४ साली केला त्याला अनुलक्षून आहे. पृ. ११५

४१. हा निर्देश बेरँगरच्या गाण्याच्या अनुवादाला अनुलक्षून आहे. १८८० च्या अखेरीस लॉरा लाफार्ग ही जर्मन व फ्रेंच कवींचे अनुवाद इंग्रजीत करण्यात गुंतलेली होती. या कामात एन्गल्स तिचे मार्गदर्शन करीत होते, तिला लिहिलेल्या पत्रांतून तिच्या काव्यानुवादांची चर्चा करीत होते आणि तिला सल्ला देत होते. पृ. ११७

४२. पहिल्या नेपोलियनच्या साम्राज्याला एन्गल्स यांनी दिलेले उपरोधिक नाव (दुसऱ्या साम्राज्यापासून त्याचा वेगळेपणा दर्शविण्यासाठी). पृ. ११८

४३. या पत्रासोबत एन्गल्स यांनी वॉल्थर फॉन डेर व्होगेल्वेइडे कृत "उंटर डेन लिन्डेन" या सुप्रसिद्ध गाण्याची प्रत जोडलेली होती (पाहा वेर्के, खंड ३७ वा, पृष्ठे ३३४-३७). पृ. ११८

४४. मार्क्स यांनी हा निर्देश व्हॉल्टेअरविरुद्ध लेसिंगने आपल्या हाम्बुर्गिश्चे ड्रामाटुर्गी (१७६७-६८) या ग्रंथात जो वाद घातला, त्याला अनुलक्षून केलेला आहे. पृ. १३८

४५. व्हॉल्टेअर कृत कविता. फ्रेंच राजा चौथा हेन्री यावर लिहिलेली. प्रथम प्रकाशन १७२३ साली. पृ. १३८

४६. तारीख ७ जानेवारी १८८४ रोजी लिहिलेल्या पत्रात पॉल लाफार्ग याने कित्येक उदाहरणे दिलेली आहेत आणि असे दाखवून दिले आहे की एन्गल्स यांनी दिलेल्या यादीतील, विशेषतः जर्मन बनावटीच्या आयात वस्तूंशी फ्रेंच उद्योग-धंद्यातील देशी बनावटीच्या वस्तू यशस्वीपणे स्पर्धा करीत आहेत. पृ. १३८

४७. कुचुक कैनार्जीचा तहनामा—रशिया आणि टर्की यांच्या दरम्यानच्या या तहनाम्यावर तारीख २१ (१०) जुलै १७७४ रोजी सह्या झाल्या. रुस्सो-टर्किश युद्ध १७६८ ते १७७४ पर्यंत चालू होते, ते रशियाचा विजय झाल्यानंतर संपले. या तहनाम्याने रशियाला काळ्या समुद्राच्या उत्तर किनाऱ्याचा काही भाग, अझोवचा समुद्र, कर्च आणि येनिकाले हे प्रदेश मिळवून दिले आणि क्रिमियाच्या स्वातंत्र्याला मान्यता मिळवून दिली. रशियन आरमाराला बॉस्फरस व डार्डानेल्स या सामुद्रधुन्यांतून खुला संचार करायचा हक्क मिळाला. या तहनाम्यानुसार सुलतानाने रशियन धर्मपीठाला अनेक खास हक्क द्यायचे ठरले. पृ. १४७

४८. मान्डेविल्ले, बी. कृत द फेबल ऑफ द बीज ऑर प्रायव्हेट व्हाइसेस, पब्लिक बेनेफिट्स, लंडन, १७२८, पृ. ४२८. या ग्रंथाची पहिली आवृत्ती १७०५ साली प्रसिद्ध झाली. पृ. १५३

४९. हा निर्देश हॉल्बॅचकृत ले सिस्तिमे दे ला नेचर याला अनुलक्षून आहे. पृ. १६०

५०. हा निर्देश केस्ट-से के ला प्रोप्राइते? (१८४०) या त्याच्या पुस्तिकेला अनुलक्षून आहे. पृ. १६१

५१. सन १८१४ च्या ऑगस्ट महिन्यात इंग्लंड-अमेरिका यांच्या दरम्यानच्या युद्धात इंग्रज फौजांनी वॉशिंग्टन सर केल्यावर कॅपिटॉल, व्हाइट हाऊस आणि इतर सार्वजनिक इमारती पेटवून दिल्या. १८६० च्या ऑक्टोबर महिन्यात इंग्लंड आणि फ्रान्स यांनी चीन विरुद्ध वसाहती सर करायचे युद्ध लढत असताना इंग्रज आणि फ्रेंच फौजांनी पेकिंग नजीकचा समर पॅलेस लुटला आणि नंतर जाळून फस्त केला. चिनी वास्तुशिल्पाचा व कलांचा हा सर्वोत्कृष्ट संग्रह होता. पृ. १६४

५२. हा निर्देश पॅरिस कम्यूनला अनुलक्षून आहे. पॅरिस येथे कामगारवर्गीय क्रान्तीच्या अवधीत स्थापन केलेले हे कामगार वर्गाचे क्रान्तिकारक सरकार. कामगार वर्गाच्या सर्वाधिकारशाहीचा हा पहिला ऐतिहासिक अनुभव होता. हे राज्य ७२ दिवस टिकले (तारीख १८ मार्च पासून २८ मे १८७१ पर्यंत). पृ. १६४

५३. प्लेस व्हेन्डोमवरील स्तंभ. पहिल्या नेपोलियनच्या पुतळ्याचा आधार असलेला. त्याच्या विजयांचे स्मारक म्हणून पॅरिस शहरी १८०८-१० या मुदतीत उभा-

रण्यात आला. कम्यूनच्या फर्मानानुसार लष्करशाहीचे प्रतीक म्हणून तारीख १६ मे १८७१ रोजी तो पाडण्यात आला. परंतु प्रतिगाम्यांच्या विजयानंतर १८७५ साली तो पुन्हा उभारण्यात आला. पृ. १६५

५४. साँइर--फ्रेंच रिपब्लिकन भांडवलदारी दैनिक. पॅरिस येथे १८६७ पासून प्रकाशित. पृ. १६६

५५. आर्क द ट्रायोम्फे पहिल्या नेपोलियनच्या विजयांचे स्मारक म्हणून टुइलेरिस राजवाड्याच्या बागेत प्लेस द इ एतोइले येथे १८०६ साली उभारण्यात आली. पृ. १६६

५६. हा निर्देश मनोराज्यवादी समाजवाद्यांना (त्यांतल्या त्यात फूरिअर व त्याचे अनुयायी यांना) अनुलक्षून आहे. भांडवलशाहीच्या अमदानीतील उत्पादनाच्या अराजकाला प्रतिद्वंद्वी म्हणून यांनी सुधारणेच्या द्वारा तथाकथित "श्रमाची संघटना" करण्याच्या योगाने समाजाची पुनर्घटना करण्याच्या मनोराज्यवादी योजनेचा पुरस्कार केला. पृ. १७३

५७. होमरकृत इलियड, ओड II पृ. १८५

५८. इलियड, ओड I, कविता १२७-२८, १६१-६२, इत्यादि पृ. १८५

५९. होमरकृत ऑडिस्सी, ओड XIV कविता ३, ४८ इत्यादि पृ. १८५

६०. होमरकृत ऑडिस्सी, ओड VIII कविता ४७२, ओडXVIII, कविता ४२४. पृ. १८५

६१. एस्किल्सकृत ओरेस्टेया. यूमेनाइडेस, कविता ६०८ पृ. १८६

६२. मॉर्गन याने शोधून काढलेला यूथ विवाहाचा एक प्रकार. एन्गल्स यांनी विवाहाच्या या प्रकाराचे विश्लेषण कुटुंबसंस्था, खासगी मालमत्ता आणि राज्यसंस्था यांचा उगम (प्रकरण दुसरे) या आपल्या ग्रंथात दिले आहे. पृ. १८७

६३. पाहा कार्ल मार्क्सकृत "ल्यूइस मॉर्गन याच्या प्राचीन समाज या ग्रंथावरील टिपणे" (मार्क्स/एन्गल्स, उबेर कुन्स्ट उन्ड लिटेराटूर, खंड १ ला, बर्लिन, १९६७, पृ. ६३०) पृ. १८९

६४. होमरकृत ओडिस्सी, ओड I, कविता ३५२-५६ पृ. १९६

६५. एस्किल्सकृत ओरेस्टेया. आगामेम्नॉन पृ. १८९

६६. हा निर्देश प्लूटार्ककृत आपोफ्थेग्माता लॅकोनिका, ५४२ B., प्रकरण V याला अनुलक्षून आहे;
त्याचप्रमाणे पाहा जी. एफ. श्वोएमान्नकृत ग्रिएचिश्चे आल्टरयूमेट खंड १ ला, बर्लिन, १८५५, पृ. २६८. पृ. १९०

६७. स्पार्टियेट्स--प्राचीन स्पार्टाचे नागरिक. संपूर्ण नागरिक हक्क असलेले.
हेलॉट्स--प्राचीन स्पार्टाचे नागरिक, सर्व हक्कांना पारखे असलेले. त्यांना

शेतीकामाला जोडलेले असे आणि जमिनीचे मालक असलेल्या स्पार्टियेट्ससाठी खास सेवांची परिपूर्ति करायला ते बांधलेले असत. वस्तुतः त्यांची अवस्था गुलामांच्या पेक्षा वेगळी नव्हती. पृ. १९०

६८. ॲरिस्टोफेनीस कृत थेस्मोफोरियाझुसाये कविता ७१७-१८ पृ. १९०

६९. हेरोडोटसकृत **हिस्टोरियाए**, खंड VIII, प्र. १०५, त्याचप्रमाणे पाहा डब्ल्यू. वाख्समूथ कृत **हेलेनिश्चे आल्टरथुम्कुंडे औस डेम गेसिएट पुन्क्टे डेस स्टाटेस** खंड २ रा प्र. २ रे, हाल्ले, १८३०, पृ. ७७ पृ. १९१

७०. यूरीपीडीसकृत **ओरेस्टेस** कविता ९२० पृ. १९१

७१. सिसेरोकृत **प्रो कायेलियो**, I, ३८-३९ पृ. १९४

७२. प्लूटार्ककृत **कॉमेन्टारियुस ने सुआविटेर क्विडेम व्हीव्ही पॉस्से सेकुन्डुम एपिक्यूरी डेक्रेटा, डोसेन्स** पृ. १९४

७३. **कास्पियन** समुद्राचे प्राचीन नाव पृ. १९५

७४. ॲरिस्टॉटल, **डे कायेलो**, II, १२ पृ. १९५

७५. एपिक्युरसने मेनोएस्यूस याला लिहिलेल्या पत्रांतील अवतरण मार्क्स यांनी दिले आहे, पाहा **डायोजेनेस लायर्टीई डे क्लॅरोरुम फिलॉसोफोरुम व्हाइटिस डॉग्माटिबुस एट आपोथेग्माटिबुस लिब्री डेसेम** (X, १२३). पृ. १९७

७६. एस्किलसकृत **प्रॉमिथ्यूस बाऊन्ड** पृ. १९७

७७. एस्किलसकृत **प्रॉमिथ्यूस बाऊन्ड** पृ. १९८

७८. मार्क्स यांनी उद्धृत केलेला लेख **कोलिनिश्चे झायटुंगसाठी** याच पत्राचा एक संपादक आणि प्रतिगामी पत्रकार कार्ल हर्मेस याने लिहिलेला होता. पृ. १९९

७९. **क्यूरेटेस** हे झ्यूसची आई रिया हिचे पुजारी. ग्रीक पुराणकथांनुसार तान्ह्या झ्यूसचे रडणे ऐकू येऊ नये म्हणून क्यूरेटेस यांनी आपल्या हत्यारांचा खणखणाट केला. अशा प्रकारे झ्यूसचा पिता क्रोनुस याच्या तावडीतून झ्यूसला वाचविले. हा क्रोनुस आपली मुले आपल्याला सत्ताभ्रष्ट करतील या भीतीने स्वतःच खाऊन टाकत असे. पृ. २०१

८०. लुक्रीशियसकृत **डे रेरुम नेचूर**, खंड १ ला. पृ. २०२

८१. स्पिनोझाकृत **नीतिशास्त्र** भाग ५ वा, प्रॉपो. ४२ पृ. २०३

८२. एन्गल्स यांनी हायनेच्या चरित्रातील प्रसंगांचे स्मरण दिले आहे. लुई फिलिपकडून हायनेला पेन्शन मिळालेले होते आणि हायने याने १८३० च्या दशकात प्रशियन सरकारला असा मनसुबा सादर केला की "प्रशियन बाण्याचे" एक वृत्तपत्र पॅरिस येथे प्रसिद्ध करावे. पृ. २०३

८३. पाहा ल्यूसियनकृत **पेरेग्रिनसच्या मृत्यूविषयी** आणि बनावट ल्यूसियनकृत **फिलोपात्रिस** पृ. २०४

८४. मध्ययुगांच्या आरंभ-काळातील कायद्याची कलमे आणि न्याय-कोर्टांचे निवाडे पृ. २०७

८५. **नायबेलुन्गेन्लिएड** — प्राचीन जर्मन पुराणकथा आणि पोवाडे, एक्झोडसच्या कालखंडातील III-V शतके), यांच्यावर आधारलेले प्रमुख जर्मन वीररसात्मक महाकाव्य. या महाकाव्याची उपलब्ध संहिता इ. स. सुमारे १२०० सालापासूनची आहे. पृ. २०९

८६. **नायबेलुन्गेन्लिएड, गीत** X. पृ. २०९

८७. तेराव्या शतकातील जर्मन महाकाव्य. पृ. २०९

८८. मार्क्स यांनी लिहिलेले हे पत्र उपलब्ध नाही. एन्गल्स यांनी तारीख ११ एप्रिल १८८४ रोजी कौट्स्की यास लिहिलेल्या पत्रात या पत्राचा निर्देश केलेला आहे. पृ. २१०

८९. हा संदर्भ स्कॅंडिनेवियन महाकाव्य एड्डा आणि जर्मन महाकाव्य **नायबेलुन्गेन्लिएड** यांच्या आधारावर रिचर्ड वाग्नर याने लिहिलेल्या **रिंग ऑफ द नायबेलुन्गज** या तीन भागांच्या ऑपेराच्या संहितेला अनुलक्षून आहे. पाहा आर. वाग्नर कृत **डेर रिंग डेर नायबेलुन्गेन, एर्स्टर टाग, डाय वाल्कुरे**, अंक २ रा. पृ २१०

९०. एड्डा—स्कॅन्डिनेवियन पुराणकथा, वीररसात्मक पोवाडे आणि लोकगीते यांचा संग्रह; हस्तलिखित स्वरूपात १३ व्या शतकापासून उपलब्ध. याचा शोध आइस्लॅंडचे बिशप स्वेइन्सोन यांनी १६४३ साली लावला (**एल्डर किंवा काव्यमय एड्डा**); आणि स्नोर्री स्तूर्लसत याने ११७९-१२४१ या मुदतीत लिहिलेला स्कील्ड्सच्या कवितेवरील प्रबंध (**यंगर एड्डा**). "आगिस्डेका" हे गाणे **एल्डर एड्डा** मधून घेतलेले आहे. या संग्रहाच्या नंतरच्या संहितांमध्ये ते सापडते. एन्गल्स यांनी या गाण्याच्या ३२ व ३६ या कडव्यांतून उतारे घेतलेले आहेत. पृ. २१०

९१. **आयेसीद** आणि **वानीर**—स्कॅन्डिनेवियन पुराणकथातील देवांचे दोन गट. यून् गिलन्गा सागा—नॉर्वेजियन राजे लोकांविषयीच्या ग्रंथातील पहिली सागा (प्राचीन काळापासून १२ व्या शतकापर्यंतची)—हिचा मथळा आहे **ऑर्ब ऑफ द वर्ल्ड**. याचे लेखन मध्ययुगीन आइस्लॅन्डिक कवि व बखरकार स्नोरी स्टुर्लुसोन याने १३ व्या शतकाच्या आरंभी केले. त्याने आधारादाखल नॉर्वेजियन राजे यांच्या विषयींच्या ऐतिहासिक बखरी आणि आइस्लॅंडिक व नॉर्वेजियन जमातींच्या सागा घेतल्या. एन्गल्स यांनी या सागाच्या ४ थ्या प्रकरणांतून एक उतारा उद्धृत केलेला आहे. पृ. २११

९२. **डेमॅगॉग्ज**— हे नाव १८१९ पासून जर्मनीतील प्रतिगाम्यांनी आपल्या विरुद्ध चळवळ करणाऱ्या जर्मन बुद्धिजीवींना व विद्यार्थ्यांना दिले होते. नेपोलियोनिक फ्रान्स विरुद्धच्या युद्धांनंतर जर्मन संस्थानांच्या प्रतिगामी राजकीय पद्धतीला या

बुद्धिजीवींनी व विद्यार्थ्यांनी विरोध आरंभून जर्मनीच्या एकीकरणाच्या मागणी-साठी निदर्शने संघटित केली. प्रतिगामी अधिकाऱ्यांनी त्यांचा छळ केला. पृ २१२

९३. हा निर्देश १८४० साली फ्रेडरिक चौथा विल्यम याच्या राज्याभिषेकानिमित्त राजबंद्यांना शिक्षेची माफी मिळाली तिला अनुलक्षून आहे. पृ. २१२

९४. **पूर्वपदस्थापना**––नेपोलियॉनिक युद्धांची समाप्ती झाल्यावर फ्रान्समध्ये बुर्बोन घराण्याची पूर्वपदस्थापना झाली ती दर्शविणारा कालखंड (१८१४, १८१५-३०). पृ. २१२

९५. एन्गल्स यांनी हा संदर्भ **रेरम हिबेर्निकॅरम स्किप्टोरेस व्हेटेरेस** ("आयर्लंडचे बखरकार") या संग्रहाला अनुलक्षून दिलेला आहे. याचे चार खंड १८१४, १८२५ व १८२६ साली चार्ल्स ओ'कॉन्नर याने बेकेनहॅम येथे प्रसिद्ध केले. पृ. २१४

९६. हा संदर्भ १७९८ सालातील आयरिश उठावाला अनुलक्षून आहे. आर्थर ओ'कॉन्नरने यांत भाग घेतलेला होता. पृ. २१५

९७. **सेन्चुस-मोर**––प्राचीन आयरिश कायद्यांचा संग्रह. प्रकाशन १८६५-७३. या प्रकाशनाचा तिसरा खंड [डब्लिन, १८७३] एन्गल्स यांनी हा मजकूर लिहिल्यानंतर प्रसिद्ध झाला. प्राचीन आयरिश कायद्यांच्या या संग्रहाचे एक ऐतिहासिक साधनग्रंथ या नात्याने खरे महत्त्व ध्यानात घेणारे एन्गल्स हेच पहिले होते. पृ. २१५

९८. सरंजामशाहीला मजबुती येण्याच्या कालखंडातील हे जमीन लागणीचे दोन वेगवेगळे प्रकार होते. जमीन कसणारा, सर्वसामान्य माणूस आणि जमिनीचा व गुरांचा मालक असलेल्या आरमाराठी त्याने करायची विविध कर्तव्ये यांच्या योगाने त्याच्या व्यक्तिगत स्वातंत्र्यावर अंशतः गदा येत असे. या संबंधांचे प्रतिबिंब **सेन्चुस-मोर** यामध्ये आढळते. एन्गल्स यांनी "पुढे पाहा" असा जो संदर्भ दिलेला आहे तो आयर्लंडच्या इतिहासावरील त्यांच्या ग्रंथाच्या एका विभागाला अनुलक्षून आहे, परंतु हा ग्रंथ लिहायचा तसाच राहून गेला. पृ. २१७

९९. प्राचीन आयर्लंड व स्कॉटलंड ज्यांनी जिंकले त्या केल्टिक लोकांचा गट. पृ. २१७

१००. हा मजकूर मार्क्स यांची ज्येष्ठ कन्या जेनी हिच्या विनंतीवरून एन्गल्स यांनी लिहिला. थॉमस मूरने शब्दबद्ध केलेल्या **एरिन्स-हार्प** या आयरिश गाण्यांच्या संग्रहाला प्रस्तावनेदाखल हा मजकूर होता. त्या वेळी त्याच्या प्रकाशनाची तयारी चाललेली होती. पृ २१७

१०१. हा संदर्भ स्कॉटिश कवि मॅक्फर्सन लिखित **ऑस्टियनच्या कविता** या काव्य-संग्रहाला अनुलक्षून आहे. त्याने हा संग्रह १७६०-६५ साली प्रसिद्ध केला. पुराणकाळातला केल्टिक शाहीर ऑस्सियन याला या कवितांचे श्रेय कवीने

दिले आले. एका प्राचीन आयरिश महाकाव्याला नंतर स्कॉटिश रूप प्राप्त झाले, त्याच्या आधारावर मॅक्फर्सनने या कविता लिहिल्या. पृ. २१८

१०२. ही कविता राग्नार लॉडब्रुक (९ वे शतक) या कैद झालेल्या डॅनिश व्हायकिंगचे मृत्युगीत म्हणून रचण्यात आली. पुराणकथेनुसार राग्नरची पत्नी क्राका हिने हे गाणे आपल्या मुलांना आपल्या पित्याच्या मृत्यूचा सूड घ्यायला उत्स्फूर्त करण्यासाठी म्हणून दाखविले. पृ. २१९

१०३. व्हल्गेट—बायबलचे लॅटिन भाषेतील शास्त्रपूत भाषांतर. पृ. २२६

१०४. दक्षिण फ्रान्समधील गरीब नगरवासीयांमध्ये १२ व्या शतकाच्या अखेरीस उदयास आलेला धार्मिक पंथ. त्यांनी खासगी मालमत्तेचा त्याग केला. कॅथोलिक धर्मपीठाने चालविलेल्या धनसंचयाचा धिक्कार केला आणि प्रारंभीच्या ख्रिस्ती धर्माच्या परंपरा पुन्हा चालू करण्याचा पुरस्कार केला. वाल्डेन्सेस यांचा हा बंडखोरपणा नैर्ऋत्य स्वित्झर्लंडमधील पहाडी जिल्हे व सेव्हॉय या भागातील ग्रामीण लोकांमध्ये विशेषेकरून प्रसृत झाला. तिथे याला प्राचीन ग्रामपंचायत पद्धतीच्या व पितृसत्ताक संबंधांच्या अवशेषांचे रक्षण करण्याचे स्वरूप प्राप्त झाले. पृ. २२६

१०५. हा निर्देश "पर्सेव्हाल", "विल्लेहाल्म...." आणि "टिटचुरेल" यांना अनुलक्षून आहे. [यातली शेवटची पूर्ण झालेली नाही] पृ. २२७

१०६. हा निर्देश १३६० साली इंग्लंड व फ्रान्स यांच्या दरम्यान झालेल्या ब्रेटिग्नीच्या तहाला अनुलक्षून आहे (शंभर वर्षांच्या युद्धाच्या काळात). पृ. २२७

१०७. जोसेफ फॉन गोरेस कृत डाय डॉयश्चेन फोक्स बुखेर, हायलेडबर्ग, १८०७. पृ. २३०

१०८. आयने वुन्डेरश्रोने हिस्टोरिये फॉन डेम गेहोर्नटेन सिएफ्रिएड. वास वुंडरलिखे एबेन्थ्यूएर डायेसेर थ्यूरे रिट्टे औसोस्टान्डेन सेहर डेन्क्वुरडिग उण्ड मिट लूस्ट झू लेसेन. गेड्रक्ट इन डायेसेम जाहरे, कोल्न (एन्. डी.) पृ. २३१

१०९. इथे निर्दिष्ट केलेले प्रकाशन असे : लेबेन उण्ड थाटेन डेस ग्रोस्सेन हेल्डेन हाइन्रिख डेसलोवेन, हेझॉ झू ब्राउन्सवीग, आइनबेक (एन. डी.) पृ. २३२

११०. हा संदर्भ जर्मन फेडरल असेंब्लीने तारीख १० डिसेंबर १८३५ रोजी मंजूर केलेल्या ठरावाला अनुलक्षून आहे. या ठरावानुसार तरुण जर्मन लेखक—हायने, गुट्झ्कौ, लॉवे, विएनबर्ग आणि मून्ड्ट—यांच्या ग्रंथांवर बंदी घालण्यात आली. यातल्या काही ग्रंथांनी, उदाहरणार्थ, गुट्झ्कौकृत वाल्ली, यामध्ये स्त्रियांच्या बंधविमोचनाच्या प्रश्नाला वाचा फोडलेली होती.

फेडरल असेंब्ली [दिये]—जर्मन कॉन्फेडरेशनने १८१५ साली स्थापन केलेली मध्यवर्ती सत्ता. जर्मन संस्थानांचे प्रतिनिधी तीत असत; १८६६ पर्यंत ती अस्तित्वात होती. पृ. २३४

१११. **तरुण जर्मनी** (जुंगेस डॉयश्चलॅन्ड)---जर्मनीमध्ये १८३० च्या दशकात उदयास आलेला साहित्यिक गट. याच्यावर हाइनरिख हायने आणि लुडविग बोर्ने यांचा प्रभाव होता. आपल्या ललित व वृत्तपत्रीय लेखनात या गटाचे लेखक विरोधी पक्षीय मध्यमवर्गीयांच्या भावना व्यक्त करीत असत. विचार-स्वातंत्र्याचा व मुद्रण स्वातंत्र्याचा-पुरस्कार करीत असत. त्यांची राजकीय मते मोघम आणि विसंगत होती; त्यांच्यापैकी अनेक जण लवकरच भांडवलदारी उदारमतवादी झाले. पृ. २३५

११२. लुडविग टिएककृत **कैसर ऑक्टोव्हियानस** या सुखान्त नाटकाला अनुलक्षून हा संदर्भ आहे. या नावाच्या लोकप्रिय जर्मन पुस्तकावर हे नाटक आधारलेले आहे. पृ. २३५

११३. हा संदर्भ गॉट्ट फ्रिएड फॉनस्ट्रासबुर्गकृत **ट्रिस्टान उंड इसोल्डे** या कवितेला अनुलक्षून आहे. १३ व्या शतकाच्या आरंभी ती प्रकाशात आली. पृ. २३५

११४. एल्. बोर्नेकृत **ब्रियेफे औस पॅरिस.** पृ. २३६

११५. हा संदर्भ के. गुट्झ्कौ कृत **वाल्ली, डाय श्वेइफ्लेरिन** या कादंबरीला अनुलक्षून आहे. हिचे प्रकाशन १८३५ साली मान्हीम येथे झाले. हिच्यावर प्रतिगामी धर्ममार्तंडांनी टीकेची झोड उठविली. पृ. २३६

११६. एन्गल्स यांनी आपल्या टिपण्यांच्या पृष्ठ ११ चा हा निर्देश केलेला आहे. त्या पृष्ठावर त्यांनी नव्या शोधांचा कालानुक्रमवार तक्ता दिलेला आहे. (एन्गल्स कृत **निसर्गाचा विरोधविकास**, मॉस्को, १९७२, पृष्ठे १९१-९२). पृ. २४०

११७. एन्गल्स यांनी पेट्रार्कच्या **राइन इन ह्विटा ए मॅटॅ डी मॅडोन्ना लॉरा** या सुनीत मालिकेतील २६१ वे सुनीत उद्धृत केले आहे. पृ. २४३

११८. हा निर्देश सोळाव्या शतकाला अनुलक्षून आहे [इटालियन " सिन्क्वेसेन्टो " या शब्दावरून] पृ. २४५

११९. या शब्दांचा वापर प्राचीन रोममध्ये जग, या अर्थी करीत असत पृ. २४५

१२०. मार्टिन लूथरचे गाणे " झाइन् ' फेस्टे बूर्ग इस्ट उन्सेर गॉट्ट " हे १५२४–२५ सालातील शेतकरी युद्धामध्ये बंडखोर शेतकऱ्याचे व इतर गरीब लोकांचे मार्सेले (स्वातंत्र्यगीत) झाले. पृ. २४६

१२१. मॅन्चेस्टर येथे १८५७ साली एक कला-प्रदर्शन संघटित करण्यात आले. त्या वेळी एन्गल्स यांचे वास्तव्य तिथेच होते. पृ. २४७

१२२. **न्यू यॉर्क डेली ट्रिब्यून** -- अमेरिकन पुरोगामी वृत्तपत्र. १८५१ ते १८६२ या मुदतीत मार्क्स आणि एन्गल्स यांचे अनेक लेख त्यात प्रसिद्ध झाले. पृ. २४७

१२३. टेरेन्सकृत सुखान्त नाटक यूनूक्हस यातल्या बढाईखोर व मूर्ख लढवय्या पात्राला अनुलक्षून हा संदर्भ आहे. पृ. २४८

१२४. **सालोमोन ॲण्ड मार्कोल्फ** (किंवा मोरोल्फ)— १४ व्या व १५ व्या शतकातील उपरोधिक जर्मन लघुकथांतील पात्रे : सालोमोन हा शाहणा परंतु व्यवहारशून्य राजा असतो आणि मार्कोल्फ हा लुच्चा शेतकरी असतो. पृ. २४८

१२५. कार्ल कौट्स्कीकृत थॉमस मोअर उन्ड सेइने युटोपिए. मिट आइनेर हिस्टोरीश्रेन आइन्लेइटुंग, स्टटगार्ट, १८८८. पृ. २५१

१२६. **सेमिरामे** (१७४८) या शोकान्तिकेला लिहिलेल्या " प्राचीन व आधुनिक शोकान्तिका " या प्रस्तावनेत व्हॉल्टेअरने शेक्स्पिअरच्या हॅम्लेटविषयी लिहिले आहे ते असे : " आपल्याला असे वाटायला लागते की हे नाटक दारुड्या रानटी इसमाच्या कल्पनासृष्टीने निर्माण केलेले असावे. परंतु शिष्टाचाराच्या या रासवट अतिक्रमणांमध्ये—आणि आतादेखील याच्यापायी इंग्लिश रंगभूमि इतकी हास्यास्पद व रानटी झालेली आहे—हॅम्लेट नाटकात त्याच्या अधिक मोठ्या वैशिष्ट्यांच्या जोडीला खऱ्याखुऱ्या प्रतिभावन्ताला शोभेसे उदात्त विचार आपल्याला आढळतात. " पृ. २५२

१२७. **पॅन्टालून** [पॅन्टालोने]—इटालियन सुखान्त लोकनाट्यातील एक पात्र—हा एक श्रीमंत परंतु चिक्कू व मूर्ख असा व्हेनिसवासी व्यापारी असतो. पृ. २५२

१२८. हा निर्देश १८५३-५६ च्या क्रिमियन युद्धाला अनुलक्षून आहे. इंग्लंड, फ्रान्स, टर्की व सार्डिनिया यांच्या दोस्तीविरुद्ध मध्यपूर्वेतील वर्चस्वासाठी रशिया हे युद्ध लढला. पृ. २५२

१२९. आर. बेनेडिक्सकृत डाय शेक्स्पियरोमानिये या ग्रंथाला अनुलक्षून हा संदर्भ आहे. या ग्रंथाचा रोख जर्मन नाट्यावरील शेक्स्पियरच्या प्रभावाला विरोधी असा होता. पृ. २५२

१३०. शेक्स्पियरकृत टू जंटलमेन ऑफ व्हेरोना या सुखान्तिकेतील एक पात्र पृ. २५२

१३१. शेक्स्पियरकृत **टिमन ऑफ अथेन्स** अंक ४ था, प्रवेश ३ रा पृ. २५३

१३२. शेक्स्पियरकृत लव्ह्ज लेबर्स लॉस्ट अंक ५ वा, प्रवेश २ रा पृ. २५४

१३३. नेपोलियॉनिक वर्चस्वाविरुद्ध चाललेल्या लढ्याच्या कालखंडातील स्पेनमधील मध्यवर्ती सरकारच्या गटाला अनुलक्षून हा निर्देश आहे. पृ. २५४

१३४. पाहा सेर्वान्टिस कृत कलोक्वीज डे लॉस पेरॉस सिपिओन उ बर्गान्झा पृ. २५६

१३५. **तीन एकवाक्यता** हा १७ व्या शतकांतील फ्रेंच अभिजाततावादाच्या कालखंडातल्या नाट्यसिद्धान्ताचा आधार होता. त्यात नाट्याचा काळ एक दिवस व रात्र असाच असायला पाहिजे (काळाची एकता), नाट्य एकाच स्थळी घडले पाहिजे (स्थळाची एकता), आणि एकाच इच्छेने ते प्रेरित झाले असले पाहिजे (कृतीची एकता) असा हा सिद्धान्त होता. पृ. २६४

१३६. फ्रान्स्वा द ला रोचेफोको कृत रिफ्लेक्सियों औ सेंतेन्सेस एत् माक्सिमेस

मोरालेस (सुभाषिते आणि नैतिक चिन्तन). मार्क्स यांनी क्रमांक १९, ९३, १९२, २५७, २९३, ३०४, ३१२, ५०९ ही चिन्तने उद्धृत केली आहेत. पृ. २६१

१३७. जी. डब्ल्यू. एफ. हेगेलकृत व्होर्लेसुन्गेन उबेर डाय फिलॉसॉफिचे डेर ग्रेश्चिख्टे, वेर्के, खंड ९ वा, २, औपल, बर्लिन, १८४०, पृष्ठ ५३५-३६. पृ. २६३

१३८. कार्टेसियानिझम-- देकार्तचे तत्त्वज्ञान (लॅटिन भाषेत कार्तेसियस); त्याच्या अनुयायांनी त्यातून भौतिकवादी निष्कर्ष काढले. पृ. २६४

१३९. एन्गल्स यांनी १८८९ साली घटना परिषदेकडून मंजूर झालेल्या दिक्लेरेसियो देस द्रॉइत द ल होम्मे एत् दू सितोयेन याचा निर्देश केला आहे. नव्या भांडवलदारी पद्धतीची राजकीय तत्त्वे त्यात मांडलेली होती. पृ. २६४

१४०. हा संदर्भ सी. एन्. स्टार्केकृत लुडविग फॉयरबाख, स्टटगार्ट, १८८५, या ग्रंथाला अनुलक्षून आहे. पृ. २७१

१४१. जी. डब्ल्यू. एफ्. हेगेलकृत फिनॉमेनॉलॉगिए डेस गेइस्टेस; पाहा वेर्के, खंड २ रा, बर्लिन, १८४१, पृष्ठे ३८१-८५ पृ. २७२

१४२. जूल्स गाब्रियेल जानिनकृत ला फिन दउन मोन्दे एत् दू नेवेऊ दे रामेआऊ पृ. २७२

१४३. हा संदर्भ रूसोकृत दिस्कोर्स सूर ल' ओरिजिने एत् लेस फॉन्देमेन्स दे लइनेगालिते पार्मी लेस होम्मे, आम्स्टर्डाम, १७५५, या ग्रंथाला अनुलक्षून आहे. पृ. २७३

१४४. ॲंटी-डूहरिंग ची "प्रस्तावना" पृ. २७६

१४५. थॉमस कार्लाइलकृत भूतकाळ आणि वर्तमानकाळ, लंडन, १८४३. पृ. १९८ पृ. २७७

१४६. यंग इंग्लंड — टोरी सरदारांचा गट (डिझरायली, बर्थविक, लॉर्ड ॲंरले आणि इतर) १८४० च्या दशकारंभी स्थापन झालेला भांडवलदारांच्या वाढत्या आर्थिक व राजकीय सामर्थ्याबाबत जमीनदार-सरदारांचा असंतोष व्यक्त करणारा आणि भांडवलदारांविरुद्धच्या लढ्यात कामगारवर्गाच्या पाठिंब्याची पक्की तरतूद करण्यासाठी कामगार वर्गाला आपल्या प्रभावाखाली आणू पाहणारा पृ. २८०

१४७. इंग्रज पदार्थ-विज्ञानशास्त्रज्ञ मॅथ्यू टिन्डाल याने निसर्गातून ईश्वराला मनाई केली परंतु भावनांच्या क्षेत्रात त्याला स्थान दिले. पृ. २८३

१४८. कॉंग्रेस द व्हेरोने — शेतोब्रियाँचा ग्रंथ. व्हेरोनाची कॉंग्रेस (१८२२) ही १८१५ साली स्थापन झालेल्या ऑस्ट्रिया, रशिया व प्रशिया यांच्या पवित्र दोस्तीची शेवटची बैठक. क्रान्तिकारक चळवळी दडपून टाकणे आणि सरंजामी व राजेशाही राजवटी सत्तेवर ठेवणे हा या दोस्तीचा उद्देश. स्पेनमधील क्रान्ति-

कारक उठावासंबंधात ही व्हेरोनाची काँग्रेस भरलेली होती. फ्रान्सचा राजनैतिक प्रतिनिधी म्हणून शेतोब्रियाँ हिला हजर होता. पृ. २८३

१४९. सेन्ते-बोवे कृत शेतोब्रियाँ एन् सोन् ग्रूपे लितराइरे सूस ल' एम्पिरे पृ. २८४

१५०. सन १८४८ ची क्रान्ति पृ. २८६

१५१. हा संदर्भ तारीख २ डिसेंबर १८५१ रोजी लुई बोनापार्ट याने अचानक प्रतिक्रांतिकारक सत्ता स्थापन केली तिला अनुलक्षून आहे. तारीख २ डिसेंबर १८५२ रोजी त्याने तिसरा नेपोलियन हे नाव घेऊन स्वतः फ्रेंचांचा बादशहा असल्याचे जाहीर केले. (पाहा. मार्क्सकृत लुई बोनापार्टचे अठरावे ब्रुमेअर) पृ. २८६

१५२. हा संदर्भ १८७०-७१ च्या फ्रँको-जर्मन युद्धाला अनुलक्षून आहे. पृ. २८८

१५३. एन्गल्स यांचा रोख दोन गोष्टींवर आहे : तारीख १० सप्टेंबर रोजी राप्पेल या वृत्तपत्रात औ आल्लेमान्द्स (जर्मनांना उद्देशून) हे व्हिक्टर ह्यूगोचे आवाहन प्रसिद्ध झाले आणि तारीख ७ सप्टेंबर १८७० रोजी पहिल्या विल्यमने आपली पत्नी औगुस्ते हिला लिहिलेले पत्र प्रसिद्ध झाले. पृ. २८८

१५४. गटेकृत झाहमे झेनियेन ।× पृ. ३०३

१५५. पॉल लाफार्गकृत समाजवाद आणि डार्विनवाद, प्रोग्रेस, १८८३, खंड २ रा पृ. ३०६

१५६. पॉल लाफार्गचा लेख "ले बिये एन् अमेरीके" ("अमेरिकेतील धान्य") जूर्नाल देस इकॉनॉमिस्तेस १८८४, खंड २७ वा, अंक ७-८ पृ. ३०६

१५७. पॅरिस येथील सेन्ते-पेलागिये तुरुंगात असताना पॉल लाफार्ग याने संकल्पिलेली कादंबरी. ती कधीच लिहून झाली नाही. पृ. ३०६

१५८. हा संदर्भ एदुआर्द पिन्दार याला अनुलक्षून आहे. हा रशियाहून परागंदा झालेला असून १८९० च्या दशकारंभी याने एन्गल्स यांना रशियन भाषेच्या अभ्यासात मदत केली. पृ. ३०७

१५९. आर्थर रॅन्ककृत ले रोमान द' उने कोन्स्पिराशियों, पॅरिस, १८६९. पृ. ३०८

१६०. लासालचा उपरोधिक निर्देश पृ. ३०८

१६१. अर्नेस्ट रेनान कृत हिस्तोइर देस ओरिजिनेस दू खिस्तियानिस्मे, पॅरिस, १८६३-८३ पृ. ३०९

१६२. तारीख ३१ जानेवारी १८८७ रोजी पृ. ३१०

१६३. तारीख १ फेब्रुवारी १८८७ रोजी एन्गल्स यांना लिहिलेल्या पत्रात लॉरा लाफार्ग हिने ले क्री दू प्यूपल या वृत्तपत्राचा प्रकाशक बौलांन्गिस्ट कॅरोलिन सेबेरिने आणि त्याचे संपादक मंडळ (जूल्स गेस्डे व इतर समाजवादी यांच्या नेतृत्वाखालचे) यांच्या दरम्यानच्या तंट्याविषयीची माहिती दिली. पृ. ३१०

१६४. National Zeitung — बर्लिन शहरी १८४८ ते १९१५ या मुदतीत प्रसिद्ध होत असलेले भांडवलदारी दैनिक पृ. ३१३

१६५. त्या दोन ओळी अलेक्झांडर पोपकृत डन्सियड त्रिखंडात्मक वीररसात्मक काव्य, या उपरोधिक कविता ग्रंथातील पहिल्या खंडातल्या आहेत. पृ. ३१३

१६६. सन १७४५-४६ साली स्कॉटिश हायलँडर जमातींनी इंग्लंडचे व स्कॉटलंडचे जमीनदार, सरदार व भांडवलदार यांच्याकडून होत असलेल्या दडपशाहीविरुद्ध व हकालपट्ट्यांविरुद्ध बंड पुकारले. हायलँडर लोकांच्या या असंतोषाचा फायदा स्कॉटिश हायलँडर सरदारांच्या एका विभागाने घेतला; कारण त्यांना सरंजामी जमात पद्धती टिकवून ठेवायला हवी होती, म्हणून त्यांनी इंग्लंडच्या गादीवर स्टुअर्ट राजघराणे परत स्थापन करणे हा बंडाचा उद्देश असल्याचे जाहीर केले. कित्येक अल्पकालीन विजयांनंतर बंडखोरांच्या फौजेचा पराभव झाला. पृ. ३१४

१६७. एल. एच. मॉर्गन, प्राचीन समाज, लंडन, १८७७, पृष्ठे ३५७, ३५८ पृ. ३१५

१६८. दि पूअर लॉ, १८३४ साली मंजूर झालेल्या या कायद्याने सरकारी गरीब-घरात राहणाऱ्यांखेरीज इतर गरीब लोकांना मदत करण्यावर बंदी घातली. या गरीब-घरांत खरोखरीच्या तुरुंगासारखी व्यवस्था होती. गरीब लोक या गरीब-घरांना गरीब लोकांचा बॅस्टिल (तुरुंग) असे म्हणत असत. पृ. ३१५

१६९. हा निर्देश गुइझोकृत पूर्क्वा ला रेव्होल्यूसिओ द आंग्लेतर्रे आ-तेल्ले रेउस्सी? (इंग्लंडची क्रान्ति यशस्वी का झाली?), पॅरिस, १८५०, या ग्रंथाला अनुलक्षून आहे. पृ. ३१९

१७०. पेक्स्निफ--चार्ल्स डिकन्सकृत मार्टिन चुझल्विट या कादंबरीतील एक पात्र. हा लाळघोट्या ढोंगी इसम असतो. पृ. ३२०

१७१. इल्ल्यूमिनाती--फ्रीमेसन चळवळीतील एका पंथाचे सदस्य. अठराव्या शतकाच्या उत्तरार्धात मुख्यत्वेकरून बव्हेरियात यांचे कार्य चालू होते.
फ्रीमेसन्स — सतराव्या शतकाच्या उत्तरार्धात आणि अठराव्या शतकाच्या पूर्वार्धात इंग्लंडमध्ये उदयास आलेली धार्मिक व तात्त्विक चळवळ. तिचा अनेक देशांमध्ये विस्तृत प्रसार झाला. फ्रीमेसन्स यांची गुप्त लॉजेसची संघटना असे आणि गूढ विधींचा त्यांच्या कामगिऱ्यांत समावेश असे. पृ. ३२९

१७२. द मॅजिक फ्लूट (डाय झॉबेर फ्लोटे) — मोझार्टकृत ऑपेरा (संगीतिका). बालिश परीकथेच्या स्वरूपात. निसर्गाच्या शक्तींचा आविष्कार करणाराला व त्याच्या नियमांचे पालन करणाराला लाभ होतो, आणि दुष्कृत्ये करणाऱ्यांना यथायोग्य शिक्षा मिळते, असे सूचित करते. पृ. ३२९

१७३. लेसेझ फेअर, लेसेझ आल्लेर — खुला व्यापार आणि अर्थव्यवस्थेत सरकारचा बिनहस्तक्षेप यांचा पुरस्कार करणाऱ्या भांडवलदारी अर्थशास्त्रज्ञांचे ब्रीदवाक्य. पृ. ३३२

१७४. इन् पारिबुस इन्फिडेलियम (शब्दशः, सैतानाच्या प्रदेशात) — बिनख्रिस्ती देशांमध्ये निव्वळ नाममात्र धर्म-विभागांवर अधिराज्य गाजविणाऱ्या कॅथोलिक बिशपांच्या पदव्यांना जोडलेले सूत्र. पृ. ३३२

१७५. द सोशल डेमोक्रॅटिक फेडरेशन--सन १८८४ च्या ऑगस्ट महिन्यात स्थापन झालेली इंग्रज समाजवादी संघटना. विविध समाजवादी घटक, मुख्यत्वेकरून बुद्धिजीवी लोक हिने एकत्र आणले. प्रदीर्घ काळपर्यंत हे फेडरेशन हाइन्डमन याच्या नेतृत्वाखालील सुधारणावाद्यांच्या वर्चस्वाखाली होते. हाइन्डमन संधिसाधू व एकांगी धोरण चालवीत असे. या धोरणाच्या विरोधात फेडरेशनमधील क्रान्तिकारक मार्क्सवादी (ईलियानॉर मार्क्स-ॲव्हेलिंग, एडवर्ड ॲव्हेलिंग, टॉम मॅन्न आणि इतर) हे सामुदायिक कामगार चळवळीशी निकटची बंधने प्रस्थापित करण्यासाठी कार्य करीत होते.

१८८४ च्या पावसाळ्यात फूट पडून डाव्या गटाच्या सदस्यांची स्वतंत्र संघटना (डिसेंबर १८८९) स्थापन झाल्यानंतर फेडरेशनमधील संधिसाधूंचा प्रभाव अधिक मजबूत झाला. तथापि बहुजन समाजाच्या क्रान्तिकारक भावनांच्या प्रभावामुळे संधिसाधू नेत्यांवर असंतुष्ट असलेले घटक फेडरेशनमध्ये पुन्हा मूळ धरू लागले. पृ. ३३७

१७६. इथे मेटॅफिजिक्स ही संज्ञा अनुभवाच्या कक्षेबाहेरील गोष्टींचा ऊहापोह करणारे तत्त्वज्ञान या अर्थाने योजिलेली आहे. पृ. ३४२

१७७. सन १७९१ ची राज्यघटना. भांडवलदारी घटना परिषदेने मंजूर केलेली. हिने फ्रान्समध्ये सनदशीर राजेशाहीची स्थापना केली. तारीख १० ऑगस्ट १७९२ रोजी जनतेच्या उठावाने राजाला पदच्युत केले आणि याच्या परिणामी ही राज्यघटना रद्द करण्यात आली. पृ. ३४३

१७८. द जिरॉन्डिस्ट्स -- फ्रेंच राज्यक्रान्तीतील एक राजकीय गट. क्रान्ति आणि प्रतिक्रान्ति यांच्या दरम्यान हेलकावे खात असलेल्या आणि राजेशाहीशी तडजोड करणाऱ्या नेमस्त भांडवलदारांच्या हितसंबंधांचे प्रतिनिधित्व हा गट करीत असे. पृ. ३४३

१७९. हा संदर्भ पवित्र रोमन साम्राज्याला (९६२-१८०६) अनुलक्षून आहे. यांत जर्मनी (वरचढ सत्ता) आणि अनेक राज्ये, ड्यूकांच्या व संस्थानिकांच्या जहागिरी समाविष्ट होत्या. पृ. ३४३

१८०. कान्ट याच्या मतानुसार, केवळ अशाच कृती नैतिक असतात, की ज्या कसलीही व्यावहारिक गरज भागविण्यासाठी केलेल्या नसतात, परंतु शुद्ध

नैतिक ध्येयासाठी केलेल्या असतात, बिनशर्तपणे बंधनकारक नैतिक जबाबदारीच्या प्रेरणेतून केलेल्या असतात. आणि याला त्याने "कॅटेगॉरिकल इम्पेरेटिव्ह" ("भाग पाडणारी आवश्यक जबाबदारी") असे नाव दिलेले होते. पृ. ३४४

१८१. गटेकृत फाऊस्ट (भाग १ ला, प्रवेश ३ रा, "फाऊस्टची अभ्यासिका") मधील मेफिस्टोफेलिसच्या शब्दांची वेगळ्या शब्दात मांडणी. पृ. ३४५

१८२. होमुन्कुलुस (लॅटिन, होमो–माणूस याचा संक्षेप) गटेकृत फाऊस्ट (भाग २रा) यातील फाऊस्टचा शिष्य वाग्नर याने एका कुकुर्बिटमध्ये निर्माण केलेला मॅन्निकिन. पृ. ३४८

१८३. खरा समाजवाद—१८४४ साली जर्मनीत विस्तृत प्रसार झालेली शिकवण; जर्मन मध्यमवर्गीयांची प्रतिगामी विचारसरणी व्यक्त करणारी. "खऱ्या समाजवादाचे" तत्त्वविशारद (म्हणजे कार्ल ग्रुन, मोझेस हेस, हेर्मान्न क्रीगे आणि इतर) यांनी समाजवादी विचारांच्या जागी प्रेमाच्या व बंधुत्वाच्या भावनाविवश उपदेशाची स्थापना केली आणि जर्मनीत भांडवलदारी-लोकशाही क्रान्तीची गरज नसल्याचे प्रतिपादन केले. पृ. ३५०

१८४. गटेचे सुखान्त नाटक डेर बुर्गेर्जेनरल. यांत फ्रेंच राज्यक्रान्तीचा उपहास केलेला आहे. खेड्यातला न्हावी स्चूनप्स हा आपण "जॅकोबिन सेनापती" असल्याचा बहाणा करतो, दुधाची चरवी हस्तगत करतो आणि तीतले दूध पिऊन टाकतो--तिच्यावर मालकी सांगणाऱ्या शेतकऱ्यांमध्ये झटापट लावून देतो. पृ. ३५३

१८५. गटेकृत ब्रिएफे औस डेर स्चवेइझ, भाग १ ला. डाय लीडेन डेस जुन्गेन वेर्थेर्स याच्या प्रकाशनानंतर याचे लेखन झाले. वेर्थेरच्या कागदपत्रात सापडलेली पत्रे अशी भूमिका घेऊन त्यातील उतारे या ग्रंथात दिलेले आहेत. पृ. ३५४

१८६. फ्रान्कफुर्टेर गेलेहर्टे आन्झेइगेन--फ्रँकफूर्ट येथे १७७२ ते १७९० या मुदतीत प्रसिद्ध होत असलेले नियतकालिक. १७७२ साली संपादक मंडळात गटे, हर्डेर आणि इतर पुरोगामी विचाराचे लेखक व शास्त्रज्ञ यांचा समावेश होता. पृ. ३५६

१८७. गटेकृत व्हेनेझियानिश्चे एपिग्राम्मे या मालिकेतून पृ. ३५७

१८८. हा संदर्भ उन्टर हाल्टुन्गेन डॉयश्चेर औस्गेवान्डेर्टेन (जर्मन परागंदा लोकांची संभाषणे) या लघुकथेला अनुलक्षून आहे. पृ. ३५८

१८९. गटेकृत हेर्मान्न उण्ड डोरोथिया, IX. गेसांग. पृ. ३५९

१९०. जी. डब्ल्यू. एफ. हेगेल कृत व्होर्लेसुन्गेन उबेरे डाय फिलॉसॉफिये गेश्चिख्टे, आइन्लेइटुंग पृ. ३५९

१९१. गटेकृत उबेर नाटुर्विस्सेंन्श्राफ्ट इम ओल्गेमेइनेन, एइन्झेल्ने बेट्राख्टुन्गेन उण्ड ॲफोरिझमेन. पृ. ३६०

१९२. हा संदर्भ गुइझोच्या सरकारला पाठिंबा देणारे फ्रेंच चेंबर ऑफ डेप्युटीज-मधील प्रतिगामी बहुसंख्य सदस्य यांना अनुलक्षून आहे. पृ. ३६०

१९३. कस्टम्स युनियन, जर्मन संस्थानांचे, हे १८३४ साली स्थापन झाले. त्यांत क्रमाक्रमाने सगळी जर्मन संस्थाने सामील झाली. अपवाद फक्त ऑस्ट्रिया व इतर काही थोडी छोटी संस्थाने. प्रशियाने युनियनमध्ये प्रमुख भूमिका बजावली. अखिल-जर्मन बाजारपेठ निर्माण करायच्या गरजेतून अस्तित्वात आणलेले हे युनियन मागाहून जर्मनीच्या राजकीय ऐक्याला देखील पोषक ठरले. पृ. ३६०

१९४. गटेकृत झाहमे झेनियेन, IV. पृ. ३६३

१९५. मॉन्टाग्नार्ड्स—फ्रेंच राज्यक्रान्तीच्या अवधीतील कन्व्हेन्शनमधील क्रान्तिकारक लोकशाहीवादी प्रतिनिधींचा गट. पृ. ३६५

१९६. गटेकृत फाऊस्ट, भाग १ ला, प्रवेश १ ला, "रात्र" पृ. ३६६

१९७. घिबेल्लिनेस—१२ व्या ते १५ व्या शतकातील इटालियन सरंजामी सरदारांचा राजकीय पक्ष. पोप आणि जर्मन बादशहा यांच्या संघर्षात घिबेल्लिनेस जर्मन बादशहांना पाठिंबा देत असत. पृ. ३६७

१९८. गटेकृत "व्हॅनिटास, व्हॅनिटाटुम, व्हॅनिटास" या कवितेतील उताऱ्याचा अनुवाद. पृ. ३६७

१९९. गटेची चार ओळींची कविता "वार्नुंग" (झुक्लुस एपिग्राम्पाटिश्च) हिच्या-तून. टिटानिया आणि बॉटम— शेक्स्पियरकृत मिड-समर-नाइट्स-ड्रीम या नाटकातील पात्रे. पृ. ३७०

२००. हा संदर्भ हायनेकृत "झूर गेस्चिख्टे डेर रिलिजन उन्ड फिलॉसॉफिए इन डॉयश्चलँड" या निबंधसंग्रहातील जर्मनीतील तत्त्वज्ञानात्मक क्रान्तीबाबतच्या विधानांना अनुलक्षून आहे. हायनेच्या मते हेगेलच्या तत्त्वज्ञानात परिणत होणारी तत्त्वज्ञानात्मक क्रान्ति ही जर्मनीतील आगामी लोकशाही क्रान्तीची नांदी होती. पृ. ३७१

२०१. एन्गल्स यांनी हा अनुवाद हायनेच्या कवितेच्या एका अगोदरच्या संहितेवरून केला. फोर्वार्ट्स ! या वृत्तपत्राच्या तारीख १० जुलै १८४४ रोजीच्या ५५ व्या अंकात प्रथम प्रसिद्ध झालेल्या संहितेहून या कवितेचा वेगळेपणा म्हणजे अनुवादाच्या पहिल्या कडव्यात तिसरी ओळ ही जादा ओळ आहे. पृ. ३७२

२०२. हा संदर्भ रोमन्झेरोच्या उपसंहाराला अनुलक्षून आहे. पृ. ३७३

२०३. मार्क्स यांनी फोर्वार्ट्स ! या वृत्तपत्राच्या संपादनात भाग घेतल्याबद्दल गुइझो सरकारने त्यांची फ्रान्समधून हकालपट्टी केली. हकालपट्टीचा हुकूम प्रशियन

सरकारच्या दडपणावरून तारीख १६ जानेवारी १८४५ रोजी जारी करण्यात, आला. मार्क्स यांनी तारीख ३ फेब्रुवारी रोजी, म्हणजे त्यांनी मुळात बेत केला होता त्याच्यापेक्षा काहीसे उशीरा ब्रुसेल्सला स्थलांतर केले. पृ. ३७३

२०४. ह्हेइनिश्चे जार्बुखेर झूर गेसेल्श्चाफ्लिचेन रिफॉर्म हे वार्षिक. याचे दोन खंड १८४५-४६ साली प्रसिद्ध झाले. पृ. ३७३

२०५. हा संदर्भ हाइनरिख हायने उबेर लुडविग बोर्ने, हाम्बुर्ग, १८४०, या ग्रंथाला अनुलक्षून आहे. पृ. ३७४

२०६. हा संदर्भ १८३० सालातील फ्रान्समधील जुलै महिन्यातल्या क्रान्तीला अनुलक्षून आणि तिच्या पाठोपाठ बेल्जियम, पोलंड, जर्मनी आणि इटली या देशांमध्ये झालेल्या उठावांना अनुलक्षून आहे. पृ. ३७५

२०७. लुडविग बोर्नेकृत ब्रीफे औस पॅरिस, १-२, थियेले, हाम्बुर्ग, १८३२; ३-६. थियेले, पॅरिस, १८३३-१८३४. पृ. ३७६

२०८. फ्राइडरिख गॉट्टलिएब क्लॉप्स्टॉककृत डेर मेसायाज, एर्स्टर गेसँग. पृ. ३८६

२०९. हा संदर्भ जर्मन साहित्यांतील भावनाप्रधान प्रवृत्तीला अनुलक्षून आहे. हिचा नमुना म्हणजे जे. एम्. मिलरकृत सिएग्वार्ट. एइने क्लॉस्टरगेश्चिख्टे. ही कादंबरी. ही १७७६ साली प्रसिद्ध झाली. १८ व्या शतकाच्या उत्तरार्धात ती खूपच लोकप्रिय होती. पृ. ३८६

२१०. मे बुग क्लबाची स्थापना गॉट्टफ्रिएड किन्केल आणि योहान्ना मोकेल यांनी केली आणि हा १८४८ पर्यंत अस्तित्वात होता. पृ. ३८६

२११. किन्केलने तारीख ४ एप्रिल १८४९ रोजी रास्टाट्ट येथील लष्करी कोर्टापुढे केलेले भाषण आबेन्ड पोस्ट या बर्लिन येथील भांडवलदारी-लोकशाहीवादी वृत्तपत्रात तारीख ६ व ७ एप्रिल १८५० रोजी प्रसिद्ध झाले. मार्क्स आणि एन्गल्स यांनी न्यू ह्हेइनिश्चे झायटुंग या वृत्तपत्रात त्याच्यावर कडाडून टीका केली. पृ. ३८७

२१२. तिसऱ्या क्रूसेडवरून (धर्मयुद्ध मोहिमेवरून) (११९०-९२) परत येताना वाटेत इंग्लंडचा राजा पहिला रिचर्ड (लायन हार्ट) याला ऑस्ट्रियाचा ड्यूक पहिला लिओपोल्ड याने कैद केले. पारंपरिक माहितीनुसार, त्याचा दरबारी कवि फ्रेंच शाहीर ब्लॉन्डेल याच्या मदतीने त्याने अटकेतून आपली कशीबशी सुटका करून घेतली. पृ. ३९०

२१३. न्यूए ह्हेइनिश्चे झायटुंग. ऑर्गन डेर डेमोक्राटिए— दैनिक वृत्तपत्र. मार्क्स यांनी संपादन केलेले. ते कलोन येथून तारीख १ जुलै १८४८ ते १९ मे १८४९ या मुदतीत प्रसिद्ध होत होते. पृ. ३९१

२१४. इन पार्टिबुस इन्फिडेलियम—पाहा टीप क्रमांक १७४. या संदर्भात या शब्दयोजनेचा अर्थ "अस्तित्वात नसलेले" असा होतो. एन्गल्स यांनी

इथे दोन कवितांचा निर्देश केलेला आहे. त्यांतली एक आहे जॉर्ज हेर्वेघकृत "डाय डांयश्चो फ्लोट्टे" (१८४१) आणि दुसऱ्या दोन आहेत फर्डिनान्ड फ्रायलिग्राथकृत "फ्लोट्टेन-ट्रोमे" (१८४३) आणि "इवेई फ्लाग्गेन" (१८४४) आणि यांचा विषय आहे अजून अस्तित्वात नसलेल्या जर्मन आरमाराचा गौरव करणे. पृ. ३९१

२१५. मूरिश प्रिन्स—फ्राइलिग्राथकृत याच मथळ्याच्या कवितेचा नायक. मार्क्स अनेकदा हे नाव खुद्द कवीला देत असत. पृ. ३९३

२१६. वेडेमेयर यांना लिहिलेल्या पत्रांत मार्क्स यांनी "उंदीर आणि बेडूक यांच्या दरम्यानचे युद्ध" हा प्रसंग वर्णन केलेला आहे. (ही शब्दयोजना मार्क्स यांची आहे.) लंडन येथील दोन जर्मन परागंदा संघटना—म्हणजे आर्नोल्ड रूगे यांचे ॲजिटेशन युनियन आणि गॉट्टफ्रिएड किन्केल यांचा एमिग्रंट क्लब—यांनी एकमेकांविरुद्ध चालविलेले हे युद्ध होते. किन्केल यांच्या मते क्रान्तीच्या यशासाठी लागणारी मुख्य गोष्ट म्हणजे "पैशाची भरपूर तरतूद असलेला छोटासा शस्त्रसज्ज गट" ही होती. म्हणून जर्मनीत क्रान्तीची संघटना करण्यासाठी लागणारे कर्ज मिळवायच्या उद्देशाने किन्केल "क्रान्तिकारक चळवळीच्या व करमणुकीच्या" दौऱ्यावर अमेरिकेला रवाना झाले. पृ. ३९३

२१७. शेक्स्पियरकृत किंग हेन्री द फोर्थ, भाग १ ला, अंक ३ रा, प्रवेश १ ला. पृ. ३९७

२१८. हा निर्देश फ्रँको-जर्मन युद्धाच्या काळात (तारीख १२ ऑगस्ट १८७० रोजी) फ्रायलिग्राथने रणांगणावर स्वयंसेवक म्हणून लढायला गेलेल्या आपल्या मुलाला उद्देशून लिहिलेल्या "आन वूल्फगँग इम् फेल्ड" (रणांगणावरील वूल्फगँगला उद्देशून) या कवितेला अनुलक्षून आहे. पृ. ३९७

२१९. हा उल्लेख जर्मनीतील व न्यूयॉर्क शहरातील जर्मन मध्यमवर्गीय डेमाक्रॅट्सनी फ्रायलिग्राथला इंग्लंडहून जर्मनीस परत यायला मिळावे म्हणून १८६७ साली जमा केलेल्या देणग्यांना अनुलक्षून आहे. सुमारे ६०,००० टेलर्स जमा करण्यात आले. फ्राइलिग्राथने या देणग्या जमविण्याला संमति दिली हे मार्क्स यांना नैतिक कारणांवरून नापसंत होते. पृ. ३९७

२२०. "हुर्रा जर्मानिया!" या फ्राइलिग्राथकृत कवितेची पहिली ओळ. पृ. ३९७

२२१. टीप क्रमांक ३४ पाहा. पृ. ४०१

२२२. टीप क्रमांक ३६ पाहा. पृ. ४०२

२२३. वेरा झासुलिच हिने एन्गल्सकृत "समाजसत्तावाद : मनोराज्यात्मक व शास्त्रीय" या पुस्तिकेचा अनुवाद रशियन भाषेत १८८४ साली केला. पृ. ४०६

२२४. मार्क्स यांनी उल्लेखलेला वीररसात्मक शेक कवितांचा संग्रह म्हणजे रुकोबिस

क्रादोवेद्वोस्की याचा अनुवाद जर्मन भाषेत १८२९ साली झेक राष्ट्रीय चळवळीतील हान्का व स्वोबोदा या दोन प्रमुख व्यक्तींनी केला. अनुवादकांचा दावा असा होता की हे हस्तलिखित १३ व्या शतकातील झेक गाण्यांच्या संग्रहातील हरवलेल्या हस्तलिखिताचा एक भाग होते. प्रत्यक्षांत या दोघांनी स्वतःच ही गाणी लिहिलेली होती. यांतली "झाबोज आ स्लावोज" ही कविता झाबोज व स्लावोज या दोघा वीरपुरुषांनी परकीय राजाच्या अमलातून झेकांचे बंधविमोचन कसे केले याचे वर्णन करते. पृ. ४०७

२२५. या संहितेत इंग्रज कवि व अनुवादक जॉन बौरिंग याच्या पुस्तकांतून एन्गल्स यांनी काढलेली टिपणे आहेत. पृ. ४०७

२२६. देर्झाविनकृत "वॉर्सा शहराचा पाडाव." पृ. ४१०

२२७. पुश्किनकृत येव्गेनी ओन्येगिन पृ. ४१०

२२८. एन्गल्स यांच्या संहितेतील ही चूक आहे. १८६७ साली चेर्निशेव्स्की हे बैकाल सरोवराच्या पूर्वेकडील अलेक्सान्द्रोव्स्की झावोद येथे सक्तमजुरीची शिक्षा भोगत होते, आणि तिथून १८७२ साली विल्यूइस्क येथे त्यांचे स्थलान्तर करण्यात आले. पृ. ४१४

२२९. पाहा ओस्तेचेस्त्वेन्निये झापिस्की (पितृभूमीविषयीची टिपणे) याच्या संपादक मंडळाला मार्क्स यांनी १८७७ च्या नोव्हेंबर महिन्यात धाडलेले पत्र. पृ. ४१६

२३०. मार्क्स व एन्गल्स यांनी केलेला हा उल्लेख नेचायेव आणि बाकूनिन यांनी प्रसिद्ध केलेल्या एका निनावी अराज्यवादी पुस्तिकेतील लेखाला अनुलक्षून आहे. पृ. ४१७.

२३१. हा उल्लेख इंटरनॅशनलच्या रशियन विभागाचे मुखपत्र नारोद्नोये देलो (जनतेचा कैवार) याला अनुलक्षून आहे. ते जीनीव्हा येथे १८६८ व १८६९ या वर्षी प्रसिद्ध होत होते आणि त्याने इंटरनॅशनलच्या कार्यक्रमाचा व संघटनात्मक एकात्मतेचा पाठपुरावा केला. पृ. ४१७

२३२. चेर्निशेव्स्की यांना अनुलक्षून एक लेख लिहायचा बेत करून मार्क्स यांनी जरूर ते चरित्र-रेखात्मक साहित्य आपल्याकडे धाडण्याविषयी डानियेल्सन यास पुन्हा पुन्हा विनंति केली. तथापि, तारीख २० मार्च (१ एप्रिल) १८७३ रोजीच चेर्निशेव्स्की यांजविषयीचे चरित्रात्मक टिपण डानिएल्सन हा धाडू शकला. चेर्निशेव्स्की यांचे साहित्यिक कार्य व त्यांजवरील राजकीय खटला या विषयींचे साहित्य मिळविणे डानियेल्सन याला जमले नाही. म्हणून संकल्पित लेख लिहूनच व्हायचा राहून गेला. पृ. ४१८

२३३. हा निर्देश चेर्निशेव्स्की यांच्या क्रान्तिकारक कामगिऱ्यांना अनुलक्षून आहे. पृ. ४२१

२३४. हा संदर्भ कार्ल मार्क्सकृत भांडवल या ग्रंथाला अनुलक्षून आहे. पृ. ४१८

२३५. मार्क्स यांनी फ्लेरोव्स्कीकृत रशियातील कामगारवर्गाची परिस्थिती हा ग्रंथ मूळ भाषेतून (म्हणजे रशियन भाषेतून) वाचला. पृ. ४१९

२३६. हा निर्देश सोशल डेमोक्रॅट (स्थापना १८६४) या वृत्तपत्राला अनुलक्षून आहे. लासालचा अनुयायी योहान बॅप्टिस्ट श्वाइट्झर याच्या नियंत्रणाखालील जनरल असोसिएशन ऑफ जर्मन वर्कर्स या संस्थेचे हे मुखपत्र. या पेपराने युंकर राजेशाहीशी तडजोड करायचे धोरण चालविले. पृ. ४२३

२३७. हे स्तोत्र मार्टिन लूथरने लिहिले. हायने याने याला धर्म सुधारणा युगाचे क्रान्तिगीत असे नाव दिले. पृ. ४२९

२३८. डेस खाबेन वुंडरहॉर्न—हा जर्मन लोकगीतांचा संग्रह रोमॅन्टिसिस्ट कविद्वय क्लेमेन्स ब्रेन्टानो आणि आचिम फॉन आर्निम याने १८०६ ते १८०८ या कालखंडात प्रसिद्ध केला. पृ. ४२९

२३९. हा संदर्भ "श्लेस्विग् हॉल्स्टीन मीरुम्श्लुन्गेन" (श्लेस्विग-हॉल्स्टीन सागर-भेट) या गीताला अनुलक्षून आहे. याची रचना एम्. एफ. चेम्निट्झ याने १८४४ साली केली आणि डॅनिश राजवटीतून श्लेस्विग्-हॉल्स्टीन याच्या मुक्तिलढ्याच्या काळी हे विशेषेकरून लोकप्रिय झाले. पृ. ४२९

२४० हेक्केर सॉन्ग—जर्मन क्रान्तिकारक गीत. हे बाडन येथील १८४८ च्या एप्रिल महिन्यातील प्रजासत्ताकीय उठावाविषयी असून हे १८४८-४९ साली लोकप्रिय होते. या उठावाचे नेतृत्व फ्राड्रिख हेक्केर आणि गुस्ताव स्ट्रूव्हे यांनी केले. पृ. ४२९

२४१ हा संदर्भ "डास ब्लुट्गेरिख्ट" (रक्तपात) या क्रान्तिकारक गाण्याला अनुलक्षून आहे. १८४४ साली विणकरांचा उठाव झाला त्याच्या सुमारास सायलेशियन गिरण्यांच्या भागांमध्ये या गाण्याचे कार्यक्रम सर्वत्र होत असत. पृ. ४३०

२४२. आनोल्ड रूगे हा फोर्वार्ट्स! या वृत्तपत्रात "एक प्रशियन" या टोपण नावाने लेख लिहीत असे. पृ. ४३०

२४३. पॅरिस शहरातील एक नाट्यमंदिर. पृ. ४३२

२४४. "कबुलीजबाब" (१८६५) हे त्या काळी इंग्लंडमध्ये व जर्मनीत प्रसृत केलेल्या प्रश्नावलीला मार्क्स यांची उत्तरे आहेत. या उत्तरांची रचना अर्धवट-थट्टेखोर धर्तीची असली तरी त्यांच्या योगाने मार्क्स यांच्या व्यक्तिमत्त्वावर प्रकाश पडतो. पृ. ४३४

२४५. एन्गल्सकृत "कबुलीजबाब" हे विनोदी स्वरूपाचे असून यांचे प्रकाशन मार्क्स यांची ज्येष्ठ कन्या जेनी हिच्या आल्बममधील संहितेबरहुकुम केलेले आहे. पृ. ४३५

२४६. पुढील पाच अहवाल जर्मन डेमोक्रॅटिक वृत्तपत्र फ्रॅन्कफुर्टर त्साय्टुंग उण्ड हान्डेल्स्ब्लाट्ट याच्या १८७५ सालातील नोव्हेंबर महिन्याच्या तारीख २१ च्या, १८७६ सालातील एप्रिल महिन्याच्या तारीख ४ च्या आणि १८७७ सालातील जानेवारी महिन्याच्या तारीख ३ च्या, फेब्रुवारी महिन्याच्या तारीख ८ च्या आणि मे महिन्याच्या तारीख २५ च्या अंकांतून नावाशिवाय प्रसिद्ध झाले. अहवालांच्या खाली —"— अशी खूण होती. हे अहवाल मार्क्स यांची पत्नी व सहकारी जेनी मार्क्स हिने लिहिलेले होते ही गोष्ट त्या वर्षांच्या अवधीत देखील केवळ काही थोड्या निकटवर्ती स्नेह्यांनाच तेवढी माहीत होती. मार्क्स आणि त्यांचे नातेवाईक व स्नेही यांच्या निधनानंतर जेनीच्या या लेखनकर्तृत्वाच्या वस्तुस्थितीचा विसर पडला.

या अहवालांचा शोध पूर्वजर्मनीतील इतिहासकार लुइझे डॉर्नेमान्न आणि बर्नहार्ड ड्रूम यांनी लावला आणि नव्वद वर्षांनंतर यांचे पुनर्मुद्रण १९६६ साली बेइट्रागे झूर गेस्खिख्टे डेर डॉयश्चेन आर्बीटर बेवेगुंग या नियतकालिकाच्या ६ व्या अंकात करण्यात आले.

जेनी मार्क्स हिचे हे लेखनकर्तृत्व कार्ल मार्क्स आणि त्यांचे इतर कुटुंबीय यांच्या पत्रांच्या आधारे संशयातीतपणे सिद्ध झाले आहे. पृ. ४४७

२४७. द डेली न्यूज — इंग्लिश दैनिक वृत्तपत्र. औद्योगिक भांडवलदारांचे मुखपत्र. या मथळ्यानिशी हे लंडन येथे १८५५ ते १९३८ या मुदतीत प्रसिद्ध होत होते. पृ. ४५०

२४८. द स्टँडर्ड — इंग्लिश हुजूरपक्षीय दैनिक. याची स्थापना लंडन येथे १८२७ साली झाली. पृ. ४५०

२४९. द सॅटर्डे रिव्हयू ऑफ पॉलिटिक्स, लिटरेचर, सायन्स ॲन्ड आर्ट—ब्रिटिश हुजूरपक्षीय साप्ताहिक. लंडन शहरी १८५५ पासून १९३८ पर्यंत प्रसिद्ध होत होते. पृ. ४५०

२५०. राज्यकर्ता पक्ष आणि विरोधी पक्ष. पृ. ४५१

२५१. राणी व्हिक्टोरिया (१८१९-१९०१) हिच्या नावाची ग्वाही भारताची सम्राज्ञी म्हणून १८७६ साली फिरविण्यात आली; हिचे वास्तव्य १८७६ साली तारीख ३१ मार्चपासून २० एप्रिलपर्यंत जर्मनीत कोब्लुर्ग येथे होते. पृ. ४५२

२५२. हा संदर्भ आल्बर्ट एडवर्ड (१८४१-१९१०), राणी व्हिक्टोरिया हिचा ज्येष्ठ पुत्र, याला अनुलक्षून आहे. हा प्रिन्स ऑफ वेल्स होता आणि १९०१ सालापासून ग्रेट ब्रिटन, आयर्लंड आणि डोमीनियन्स यांचा राजा (सातवा एडवर्ड) होता. १८७५ च्या सप्टेंबर महिन्यापासून १८७६ च्या मे महिन्यापर्यंत हा भारतात प्रवास करीत होता. पृ. ४५२

२५३. रिचमंड—शेक्स्पियरचे ऐतिहासिक नाटक तिसरा रिचर्ड यातील एक पात्र. इथे याचा उल्लेख वैरी, विरोधक या अर्थाने केलेला आहे. पृ. ४५४

२५४. इंग्रज भांडवलदारी अर्थशास्त्रज्ञ विल्यम स्टॅफोर्ड याच्या ग्रंथावर लेखक म्हणून डब्ल्यू. एस. अशी त्याची आद्याक्षरे येत असत. बराच काळपर्यंत या ग्रंथाचे कर्तृत्व शेक्स्पियरकडे दिले जात असे आणि १७५१ साली तर हा ग्रंथ त्याच्या नांवानिशी देखील प्रसिद्ध झाला. मार्क्स यांनी स्टॅफोर्डच्या आर्थिक मतांचे विश्लेषण भांडवल या ग्रंथाच्या पहिल्या खंडात केलेले आहे. पृ. ४५५

२५५. ट्रॅन्झॅक्शन्स ऑफ द न्यू शेक्स्पियर सोसायटी पृ. ४५५

२५६. या लेखाच्या काही भागाचा इंग्रजीत अनुवाद ईलियानॉर मार्क्स हिने केलेला होता. पृ. ४५५

२५७. रशिया आणि इंग्लंड यांच्या पुढाकारानिशी १८७६ च्या डिसेंबर महिन्यात कॉन्स्टॅन्टिनोपल येथे आन्तरराष्ट्रीय परिषद भरविण्यात आली. हिचा उद्देश बाल्कन समस्येची उकल शान्ततेच्या मार्गाने करणे हा होता. टर्कीच्या हटवादी वृत्तीपायी परिषदेचा हा उद्देश फसला. पृ. ४५८

२५८. पेरा — बहुतांश युरोपियनांचे वास्तव्य असलेला कॉन्स्टॅन्टिनोपलचा विभाग. पृ. ४५८

२५९. शेक्स्पियरकृत नाटक तिसरा रिचर्ड, अंक १ ला, प्रवेश १ ला. पृ. ४६०

२६०. कित्ता, अंक ४ था, प्रवेश ४ था. पृ. ४६१

२६१. कित्ता, अंक ३ रा, प्रवेश ६ वा. पृ. ४६१

२६२. ले कुरियेर दे लियॉन – नाटककार लुई मोरो (१८०६-१८७७) याचा ५ अंकांचा व ८ प्रवेशांचा मेलोड्रामा, व्हॉडेव्हिल्लेस पॉल सिराउदिन (१८१३-१८८३) याचा लेखक आणि वैद्य व व्हॉडेव्हिल्लेस आल्फ्रेड डेलाकूर याचा लेखक. पृ. ४६३

२६३. द डायरेक्टरी (हिचे पाच सदस्य असत आणि त्यांतल्या एकाची फेर-निवड-णूक दर वर्षी होत असे.)-- फ्रान्स देशात १७९४ साली जॅकोबिनांच्या क्रांतिकारक हुकूमशाहीचा पाडाव झाल्यानंतर मान्य झालेल्या १७९५ च्या राज्यघटनेनुसार स्थापन झालेली सर्वोच्च कार्यकारी संस्था. डायरेक्टरीने लोकशाहीवादी शक्तींच्या विरुद्ध दहशतीचे सत्र चालविले आणि बड्या भांडवलदारांच्या हितसंबंधांचे रक्षण केले; १७९९ साली बोनापार्टने अचानक हल्ला करून सत्ता काबीज केल्याच्या परिणामी डायरेक्टरी रद्द करण्यात आली. पृ. ४६३

२६४. हा संदर्भ तिसऱ्या रिपब्लिकला अनुलक्षून आहे, यालाच "रिपब्लिकन्सशिवाय

रिपब्लिक" असे म्हणत असत. त्याच्या स्थापनेसाठीचा लढा १८७१ साली पॅरिस कम्यूनची दडपणूक झाल्यानंतर सुरू झाला. पृ. ४६४

२६५. **द नाइन्टीन्थ सेंचरी**—— इंग्रजांचे उदारमतवादी मासिक; या नावाने ते १८७७ ते १९०० पर्यंत चालू होते. शेफिल्डयरवरील आयर्व्हिंगचे लेख अंक १ व ३ यांमध्ये मार्च व मे १८७७ या महिन्यांत प्रसिध्द झाले. पृ. ४६५

२६६. चेर्निशेव्स्की यांनी जॉन स्टुअर्ट मिल्ल याच्याविरुध्द रोख असलेले दोन ग्रंथ लिहिले : **ॲंडेन्डा ॲन्ड नोट्स टू द फर्स्ट व्हाल्यूम ऑफ जॉन स्टुअर्ट मिल्स पोलिटिकल इकॉनॉमी** (जीनीव्हा, १८६९) आणि **स्टडीज इन् पोलिटिकल इकॉनॉमी** (ॲकॉर्डिंग टु मिल्ल) १८७० च्या दशकात. मार्क्स यांनी रशियन शिकून घेतले होते आणि त्यांनी हे ग्रंथ मूळ रशियनमधून वाचले. या ग्रंथांच्या प्रती मार्क्स यांच्या ग्रंथसंग्रहालयात जपून ठेवलेल्या असून त्यांच्या मार्जिन्समध्ये मार्क्स यांच्या हातच्या बऱ्याचशा टीपा आहेत. पृ. ४६६

२६७. **सोव्रेमेन्निक** (समकालीन)——साहित्यिक व सामाजिक-राजकीय विषयांना वाहिलेले रशियन नियतकालिक. संस्थापक पुश्किन. सेंट पीटर्सबर्ग येथे १८३६ ते १८६६ पर्यंत प्रकाशित. बेलिन्स्की, दोब्रोल्यूबोव आणि चेर्निशेव्स्की यांचे लेख यात येत असत; १८६० च्या दशकांत हे नियतकालिक रशियन क्रान्तिकारक डिमॉक्रसीचे जवळ जवळ मुखपत्रच होते. पृ. ४६७



नाम सूचि

अ, आ

अॅडम, जीन व्हिक्टर व्हिन्सेंट (१८०१-१८६७) --फ्रेंच चित्रकार. --१३१

अॅन (स्टुअर्ट) (१६६५-१७१४) --इंग्लंडची राणी (१७०२-१४).--४२७

अॅप्पियन ऑफ अलेक्झांड्रिया (पहिल्या शतकाची अखेर-दुसऱ्या शतकाची सत्तरी) --रोमन इतिहासकार, रोमच्या इतिहासाच्या ग्रंथांचा लेखक.--२५४

अरागो, डोमिनीक फ्रान्स्वा (१७८६-१८५३) --फ्रेंच खगोलशास्त्रज्ञ, गणिती व भौतिक शास्त्रज्ञ. --१७४

अॅबर्डीन, जॉर्ज गॉर्डन, अर्ल ऑफ (१७८४-१८६०) -- इंग्रज मुत्सद्दी, टोरी; १८५० पासून पीलाइट्सचा नेता; परराष्ट्रीय मंत्री (१८२८-३०, १८४१-४६) आणि संयुक्त सरकारचा पंतप्रधान (१८५२-५५). --२५२

ॲरिस्टॉटल (खि. पू. ३८४-३२३) --ग्रीक तत्त्वज्ञ आणि पंडित. --१९५, १९९, २६१, २६६.

ॲरिस्टोफेनीस (खि. पू. ४४६-३८५) --ग्रीक नाटककार, राजकीय उपहासिकांचा लेखक.--८४, १९०

ॲन्हेलिंग, एडवर्ड (१८५५-१८९८) --इंग्रज सोशालिस्ट, सोशालिस्ट लीगचा एक संस्थापक; लेखक. --८५, ३३७

अनाक्झागोरास ऑफ ग्लाझोमेने (खि. पू. ५००-४२८)— ग्रीक भौतिकवादी तत्त्वज्ञ.-- १९६

अनाक्झांड्रियास (खि. पू. सहावे शतक)— स्पार्टाचा राजा.-- १९०

अर्न्स्ट, पॉल (१८६६-१९३३) --जर्मन पत्रकार, समीक्षक व नाटककार; १८८० च्या दशकात तो सोशल डेमोक्रॅट होता व न्यू झीट मध्ये लिहीत असे. १८९० च्या दशकात तो "यंग"च्या अराज्यवादी विरोधी पक्षीय नेत्यांपैकी एक होता; नंतरच्या आयुष्यात तो नॅशनल सोशालिस्ट झाला.--७०

अलेक्झांडर ऑफ मॅसिडोन (अलेक्झांडर द ग्रेट) (खि. पू. ३५६-३२३) --मॅसिडोनचा राजा (खि. पू. ३३६-३२३); प्राचीन काळांतील सेनापति. --७४, १९९, २१४

अलेक्झांडर पहिला (१७७७-१८२५) रशियाचा बादशहा (१८०१-२५). --२८४

अलेक्झांडर दुसरा (१८१८-१८८१) -- रशियाचा बादशहा (१८५५-१८८१).--४१३

ऑगस्टस, ऑक्टेव्हियानस (खि. पू. ६३-इ. स. १४)-- रोमन बादशहा (खि. पू. २७- इ. स. १४). --२०३, २३५

ऑयर्स्वाल्ड, हॅन्स ॲडॉल्फ एर्डमान्न (१७९२-१८५८)-- प्रशियन सेनापति, फ्रँकफूर्टच्या नॅशनल असेंब्लीचा सदस्य; १८४८ च्या सप्टेंबर महिन्यात फ्रँकफूर्ट येथील उठावात जनतेकडून ठार — ३९९

आनाक्रिओन (खि. पू. ५७०-४७८) -- ग्रीक भावकवि.--२०८, ४०९

आन्नेकोव, पावेल वासिल्येविच (१८१२-१८८७) -- रशियन साहित्यिक; उदारमतवादी जमीनदार; याचा मार्क्स यांच्याशी पत्रव्यवहार होता.--३७४

आबेल, कार्ल (जन्म १८३७) -- जर्मन भाषाशास्त्रज्ञ व पत्रकार, द डेली टेलिग्राफ पत्राचा बर्लिनचा वार्ताहर. --४५८

आयर्व्हिंग, हेन्री (जॉन हेन्री ब्रॉड्रिब)-- (१८३८-१९०५) --इंग्रज नट व रंगमंच व्यवस्थापक; १८५८ पासून लाइसियम थिएटरचा दिग्दर्शक. --४४८, ४५०-४५१, ४५७-४६०, ४६२, ४६३-४६६.

आरिस्टोन (खि. पू. सहावे शतक) --स्पार्टाचा राजा.--१९०

इ

इगोर पहिला, स्व्यातोस्लावोविच (११५१-१२०२)-- (११७८ पासून) प्रिन्स ऑफ नोवगोरोद-सेवेर्स्की आणि (११९८ पासून) किंग ऑफ चेर्निगोव; द ले ऑफ इगोर्स होस्ट या पोवाड्याचा नायक. --४०७

इत्झस्टीन, योहान्न (१७७५-१८५५) -- जर्मन राजकारणी; उदारमतवादी. --३५९

इन्ग्राम, जॉन केल्स (१८२७-१९०७) --आयरिश अर्थशास्त्रज्ञ आणि भाषाशास्त्रज्ञ. --४५८

इब्सेन, हेन्रिक (१८२८-१९०६) --नॉर्वेजियन नाटककार.--७०, ७३, ३३७

उ

उर्कहार्ट, डेव्हिड (१८०५-१८७७)-- इंग्रज मुत्सद्दी व प्रबंधकार. --४५७

उह्लँड, लुडविग फॉन (१७८७-१८६२) -- जर्मन रोमँटिक कवि, फ्रँकफुर्ट नेशनल असेंब्लीचा सदस्य. --२२१, २२३

ए

एइखहॉफ, फ्रेडरिक गुस्तावे (१७९९-१८७५)--फ्रेंच भाषाशास्त्रज्ञ. --८६, ४०६

एइचहॉफ कार्ल विल्हेल्म (१८३३-१८९५)--जर्मन सोशालिस्ट; मार्क्स व एन्गल्स यांचा मित्र. --८६

एचेगारे उ एइझाग्विर्रे, जोसे (१८३२-१९१६)--स्पॅनिश नाटककार.--३३७

एब्नर, हेर्मान्न (१८०५-१८५५)--जर्मन पत्रकार; १८१० च्या व १ ५० च्या दशकात ऑस्ट्रियन सरकारच्या सेवेतला गुप्त हेर. --३९३

एन्के योहान्न फ्रॅन्झ (१७९१-१८६७) -- जर्मन खगोलशास्त्रज्ञ. --१७४

एपिक्युरस (ख्रि. पू. ३४१-२७०)--ग्रीक भौतिकवादी तत्त्वज्ञ. --१९४, १९६, १९७, २००, २०१, २०३, २९५

एरिओस्ट, लोदोविको (१४७४-१५३३) --ज्ञानजागृतीचा इटालियन कवि, ल' ओर्लान्दो फ्यूरिओसो या काव्याचा लेखक. --४३५

एलिझाबेथ पहिली (१५३३-१६०३)--इंग्लंडची राणी (१५५८-१६०३). --२१८, ४५८

एलिझाबेथ पेत्रोव्ना (१७०९-१७६१)--रशियाची महाराणी (१७४१-६१), पीटर पहिला याची कन्या. --४०८

एल्ला (मृत्यू ८६७) -- नॉर्दंब्रियाचा (उत्तर इंग्लंडचा) राजा ८६३ पासून. --२१९

एस्किलस (ख्रि. पू. ५२५-४७६)--ग्रीक नाटककार. --८४, ९१, १८६-१८९, ४३४, ४३६

एहर्लियेब--पाहा दोब्रोल्यूबोव, निकोलाय आलेक्सान्द्रोविच

ओ

ओ'कॉन्नर, आर्थर (१७६३-१८५२) --आयरिश क्रान्तिकारक, आयर्लंड-मधील १७९८ च्या उठावातील युनायटेड आयरिशमेन असोसिएशनचा एक नेता.--२१५

ओ'कॉन्नर, चार्ल्स (१७६४-१८२८)--आयरिश इतिहासकार आणि पुरातत्त्व विशारद.--२१४

ओ'कॉन्नर, फियर्गस (१७९४-१८५५) --चार्टिस्ट चळवळीतील डाव्या गटाचा नेता; द नॉर्दर्न स्टार या वृत्तपत्राचा संस्थापक व संपादक; १८४८ नंतर रिफॉर्मिस्ट. --१११, ११५

ओ'कॉन्नर्स--कॉन्नॉट (श्रिम आयर्लंड) मधील आयरिश राजघराणे. --२१५

ओ'केरी, मायकेल (१५७५-१६४३) --आयरिश बखरकार. --२१४

ओ'डोनोव्हान, जॉन (१८०९-१८६१) --आयरिश भाषाशास्त्रज्ञ; आयरिश प्राचीन कलावस्तूंचा अभ्यास केला. --२१४

ओवेन, रॉबर्ट (१७७१-१८५८)--इंग्रज मनोराज्यवादी सोशालिस्ट. --८६, २६६

क

कॅथेराइन दुसरी (१७२९-१७९६)--रशियाची महाराणी (१७६२-९६). --२७०, ४०९

कॅपेफीग, जीन बॅप्तिस्त (१८०२-१८७२) --फ्रेंच लेखक आणि इतिहासकार, राजपक्षीय.--३०६

कॅबेट, एतियेन्ने (१७८८-१८३६)--फ्रेंच मनोराज्यवादी कम्युनिस्ट, व्हॉएज एन् लियरी या कादंबरीचा लेखक. --२६६

कॅम्पहौसेन, लुडोल्फ (१८०३-१८९०) --जर्मन बँकर, ऱ्हेनिश उदारमतवादी भांडवलदारांचा नेता. —४३१

कॅम्पे (काम्पे), ज्युलियस (१७९२-१८६७) जर्मन पुस्तकविक्रेता आणि प्रकाशक, हँम्बुर्ग येथील हॉफमान्न अँड कॅंपे पब्लिशिंग हाऊसचा प्रमुख; हायनेचे आणि इतर डाव्या लेखकांचे ग्रंथ प्रकाशित केले. --३८६, ३९९

कॅरोलान (ओ' कॅरोलान), तोर्लोघ (१६७०-१७३८) आयरिश शाहीर, अनेक लोकगीतांचा कवि. -- २१७

कॅल्व्हिन, जीन (१५०९-१५६४)-- धर्मसुधारणेचा नेता, प्रॉटेस्टट पंथाची शाखा कॅल्व्हिनिझम या पंथाचा संस्थापक. --४८, ६०

कॅव्हेग्नाक, लुई युजीनी (१८०२-१८५७)-फ्रेंच सेनापति व राजकारणी; नेमस्त भांडवलदारी रिपब्लिकन; १८४८ च्या मे आणि जून महिन्यांत युद्धमंत्री; पॅरिसच्या कामगारांचा जून महिन्यातील उठाव याने क्रूरपणाने दडपून टाकला.—२८६

कॉबेट, विल्यम (१७६२-१८३५)-- इंग्रज राजकारणी आणि निबंधकार; इंग्रज राज्ययंत्रणेच्या लोकशाहीकरणाचा पुरस्कर्ता.—११०-११, ३१५-१८, ३२०, ४३६, ४३८

(कॉन्स्तन्त) द रेबेक्वे, आंरी बेंजामिन (१७६७-१८३०)--फ्रेंच उदारमतवादी-भांडवलदारी राजकारणी, पत्रकार व लेखक.--७६

कॉरमॅक मॅक कुइलेन्नेन (८३६-९०८) -कॅशेलचा राजा आणि बिशप (९०१-०८).— २१६

कॉर्क (५ वे शतक)-- मन्स्टरचा (दक्षिण आयर्लंडचा) राजा-- २१५

कॉस्सिदिये, मार्क (१८०८-१८६१)-- फ्रेंच डाव्या गटाचा रिपब्लिकन, १८४८ च्या फेब्रुवारी क्रान्तीनंतर पॅरिस शहरातील पोलिसांचा प्रमुख.—९१

कान्ट, इमॅन्युएल (१७२४-१८०४)-- अभिजात जर्मन तत्त्वज्ञानाचा संस्थापक, अध्यात्मवादी--५५, ६०, १०५, ३४१, ३४२, ३४४, ३५१.

कार्लाइल, थॉमस (१७९५-१८८१)— इंग्रज लेखक व इतिहासकार; अध्यात्मवादी तत्त्वज्ञ; आपल्या आरंभीच्या ग्रंथामध्ये त्याने कामगारवर्गाचे क्रूर शोषण करण्याबद्दल इंग्रज भांडवलदारांवर टीका केली, परंतु १८४८ नंतर तो प्रतिगामी व कामगारवर्गाचा वैरी झाला.-- २७७, ३१९, ३२०, ३२१, ३२२, ३२४, ३२५, ३२६, ३२७, ३३०, ३३१, ३३२, ३३४, ३३५

कार्लेटन, विल्यम (१७९४-१८६९)-- आयरिश कादंबरीकार.--३३६

काल्डेरॉन द ला बार्सा पेद्रो (१६००-१६८१) स्पॅनिश कवि व नाटककार.— २५४, २५५, ४४१, ४४२

किन्केल, योहान्न गॉट्टफ्रिएड (१८१५-१८८२)--जर्मन कवि; मध्यम वर्गीय डेमोक्रॅट; १८४९ साली बाडेन येथील उठावात भाग घेतलेला; एका किल्ल्यात कैदेत ठेवायची शिक्षा झालेला, परंतु

तुरुंगातून पळाला, इंग्लंडमध्ये स्थलान्तर करून लंडन शहरी वास्तव्य केलेला; मार्क्स आणि एन्गल्स यांना विरोध करणारा.--३८६, ३८७, ३८९, ३९०, ३९१, ३९३

किन्केल, योहान्ना (ऊर्फ मोकेल) (१८१०-१८५८)-जर्मन लेखिका, गॉट्फ्रिएड किन्केल याची पत्नी.--३८७, ३८८, ३८९

कीन, एडमंड (१७८७-१८३३)-- इंग्रज ट्रॅजिक नट.-- ४४८, ४५०, ४५९

कीन, चार्ल्स (१८११-१८६८) इंग्रज नट व लंडन येथील प्रिन्सेस थिएटरचा नाट्य निर्माता. --४४७

कीरे व्हॅन डेन. -- ४५५.

कुरिये द मेरे, पॉल लुई (१७१२-१८२५)--फ्रेंच राजेशाहीच्या पूर्व पदस्थापनेचा राजकीय लेखक.--११०

कूपर, फेनिमोर (१७८९-१८५९)-- अमेरिकन लेखक.--४३९

कूर्बे, गुस्ताव (१८१९-१८७७)-फ्रेंच चित्रकार, कम्युनार्ड.--१६५

कूहने, फर्डिनान्ड गुस्ताव (१८०६-१८८८)--जर्मन लेखक, तरुण जर्मनी साहित्यिक गटाचा सदस्य.--३७६, ३७८

केप्लर, योहान्नेस (१५७१-१६३०)-- जर्मन खगोलशास्त्रज्ञ. --३४०, ४३४.

केम्बल, जॉन फिलिप (१७५७-१८६३) --प्रमुख इंग्रज ट्रॅजिक नट. --४४८.

केनेंच (५२६-५९८)--आयरिश बिशप. --२१५

कोकोस्की, सॅम्युएल (१८३८-१८९९) --जर्मन सोशल डेमोक्रॅट; लेखक.--११४

कोट्झेबुए ऑगुस्ट फ्राएड्रिख फर्डिनांड (१७६१-१८१९)--जर्मन प्रतिगामी लेखक आणि पत्रकार.--२७२, ४०३

कोस्सुथ, लाजोस (लुडविग) (१८०२-१८९४)--हंगेरियन राष्ट्रीय बंधविमोचन चळवळीचा नेता; १८४८-४९ साली भांडवलदारी-लोकशाही वादी फौजांचे नेतृत्व केले; क्रान्तीच्या पराभवानंतर परागंदा झाला; १८५७ च्या दशकात बोनापार्टिस्ट वर्तुळांचा पाठिंबा मिळवायचा प्रयत्न केला. --३९३

कौट्स्की, कार्ल (१८५४-१९३८)-- जर्मन सोशल डेमोक्रॅट, न्यू झीट चा संपादक (१८८३-१९१७); १८८० च्या दशकात मार्क्सवादाशी निष्ठावंत होता; मागाहून त्याने संधिसाधू भूमिका घेतली आणि तो सेंट्रिझमचा (कौट्स्कीइझमचा) तत्त्वविशारद झाला.--८५, २५१.

क्लॅप्प, आल्बर्ट (१७९८-१८६४)-- जर्मन कवि, धार्मिक स्तोत्रांचा लेखक; पाएटिस्ट.--५२

क्रॉमवेल, ऑलिव्हर (१५९९-१६५८) -- १७ व्या शतकातील इंग्लंडमधील क्रान्तीच्या अवधीत भांडवलदार व भांडवलदार झालेले सरदार यांचा नेता; १६५३ पासून इंग्लंड, स्कॉटलंड व आयर्लंड यांचा लॉर्ड प्रोटेक्टर.--७६, २१८, ३२०.

कॉम्टे, ऑगुस्ते (१७९८-१८५७) --फ्रेंच तत्त्वज्ञ आणि समाजशास्त्रज्ञ, पॉझिटिव्हिझमचा संस्थापक. —४५६
क्लॉप्स्टॉक, फ्रायेड्रिख गॉट्टलिएब (१७२४-१८०३)—जर्मन कवि.—३५२
कौझिन, विक्तर (१७९२-१८६७) --फ्रेंच अध्यात्मवादी तत्त्वज्ञ, निवडवादी.—७६
क्रेग, विल्यम.—४५५
क्रॅस्सुस, मार्कस लिसिनियस (ख्रि. पू. ११५-५३) –रोमन सेनापति व राजकारणी; ७१ साली त्याने स्पार्टाकसच्या नेतृत्वाखालील गुलामांचे बंड चिरडून टाकले; पहिल्या त्रिकूटाचा (ज्यूलियस सीझर, पॉम्पे, क्रॅस्सुस) सदस्य.—२५४
क्विन्टाना, मॅनुएल जोसे (१७७२-१८५७)—स्पॅनिश कवि आणि राजकारणी.—२५५
क्रूग विल्हेल्म टौगॉट्ट (१७७०-१८४२) –जर्मन अध्यात्मवादी तत्त्वज्ञ.—१०५
कॉक, पॉल डे (c १७९४-१८७१)—फ्रेंच लेखक.—४३७

ग

गॅरिक, डेव्हिड (१७१७-१७७९) --इंग्रज नट, शेक्स्पीरियन नाटकातील अभिनेता म्हणून रंगभूमीवर गाजलेला.— ४५९
गॅरिबाल्डी, ग्यूसेप्पे (१८०७-१८८२)—इटालियन क्रान्तिकारक, राष्ट्रीय बंधविमोचनाच्या व देशाच्या एकीकरणाच्या लढ्यांतील इटालियन जनतेचा नेता —२४०, २४१, २५४.
गॅस्केल, एलिझाबेथ (१८१०-१८६५) इंग्रज लेखिका.—३३५
गटे, योहान्न वूल्फगँग फॉन (१७४९-१८५२)—जर्मन लेखक आणि विचारवन्त—९५, १३१, २११, २३३, २५५, ३०३, ३४१-४२, ३४४-३६०, ३६१-३६८, ३७०, ४०१, ४३४-४३६, ४४०
ग्रॅक्कस, गेयस (ग्रॅच्ची) (ख्रि. पू. १५३-१२१) आणि त्याचा भाऊ टायबेरियस (ख्रि.पू. १६३-१३३)—रोमन ट्रिब्यून्स; शेतकरी आणि खालच्या थरातील लोक यांच्या हितसंबंधांप्रीत्यर्थ जमीन मालकी सुधारणा अंमलात आणण्यासाठी यांनी लढा दिला.—७६, ४३८
गॉटफ्रिएड (गॉडफ्रे) फॉन बूइल्लॉन (c. १०६०-११००), ड्यूक ऑफ लोअर लॉरेन (१०८९-११००) पहिल्या धर्मयुद्धाच्या नेत्यांपैकी एक—२३२
गॉट्फ्रिएड फॉन स्ट्रासबुर्ग (जन्म:१२२०) --जर्मन कवि, ट्रिस्टान उन्ड इसोल्डे या महाकाव्याचा लेखक.—२३५
गाल्लेन्गा, ॲन्टोनियो (लेखनातले टोपणनाव मारिओत्ती) (१८१२-१८९५) --इटालियन पत्रकार आणि लेखक, इटलीतील राष्ट्रीय बंधविमोचन चळवळीत याने भाग घेतला; १८३० सालापासून मुख्यत्वेकरून इंग्लंडमध्ये वास्तव्य; टाइम्समध्ये लेख लिहीत असे.—४५८
गॉट्श्रेड, योहान्न ख्रिस्तोफ (१७००-१७६६)—जर्मन लेखक आणि समीक्षक, जर्मनीतील प्रारंभिक ज्ञानजागृतीचा प्रतिनिधी.—१ ६

गॉड्विन, विल्यम (१७५६-१८३६) ——इंग्रज लेखक, बुद्धिवादी, अराज्यवादाच्या संस्थापकांपैकी एक.——१६१
गानिल्ह, चार्ल्स (१७५५ १८८२) ——फ्रेंच अर्थशास्त्रज्ञ, न्यू मर्कंटाइलिझमचा प्रतिनिधी.——१४१
गिब्सन एडवर्ड (१८३७-१९१३) ——आयरिश मुत्सद्दी आणि इतिहासकार; इंग्रजी साहित्याचा विशेषज्ञ; मागाहून आयर्लंडचा लॉर्ड चान्सेलर.——४५८
ग्रिम्म, जेकब (१७८५-१८६३)——जर्मन भाषाशास्त्रज्ञ; लोककथा नव्या स्वरूपात सादर करणारा लेखक; जर्मन भाषेचा इतिहासकार.——४६, १०७, २३७, २७८
ग्रिम्म, विल्हेल्म (१७८७-१८५९) ——जर्मन भाषाशास्त्रज्ञ; आपला भाऊ जेकब याच्या प्रमुख ग्रंथांचा सह-लेखक.——४६
गी, योहान्न विल्हेल्म (१७ ९-१८५४) ——जर्मन धर्मोपदेशक, लहान मुलांसाठी लोककथा व कविता लिहिणारा लेखक. ——२६६
ग्रीन, थॉमस (जन्म १८२०)——इंग्रज राजकारणी, हुजूरपक्षीय खासदार, पील याच्या पक्षाचा.——२२८
गुइझो, फ्रान्स्वा प्येर गिल्लॉमे (१७८७-१८७४)— फ्रेंच उदारमतवादी इतिहासकार आणि राजकारणी. ——७६, ३१९
गुटझ्कौ, कार्ल (१८११-१८७८)——जर्मन नाटककार, कादंबरीकार आणि पत्रकार, "तरुण जर्मनी" या साहित्यिक गटाचा सदस्य.—— ३७४, ३७६-३७९
गेनीन, फ्रान्स्वा (१८०३-१८५६)—— फ्रेंच भाषाशास्त्रज्ञ.——२२४
गेस्स्नेर, सालोमन (१७१०-१७८८) ——स्विस कवि आणि चित्रकार——२७६
गोगोल, निकोलाय वासील्येविच (१८०९-१८५२)——रशियन लेखक. ——४३७
गोरेस, योहान्न जोसेफ फॉन (१७७६-१८४८)——जर्मन लेखक, भाषाशास्त्रज्ञ आणि इतिहासकार.——२३०, २३१, २३६, २३८
ग्लॅड्स्टन, विल्यम इवार्ट (१८०९-१८९८)—— इंग्रज मुत्सद्दी.—— ४५१, ४६५
ग्लुक, ख्रिस्तोफ विल्लिबाल्ड (१७१४-१७८७)——जर्मन संगीतकार.——३४१
ग्रुन, कार्ल (१८१७-१८८७)——जर्मन मध्यमवर्गीय लेखक, "खऱ्या समाजवादाचा" प्रमुख प्रतिनिधी.——३४६-३७०, ३८२

च

चॉसर, जिऑफ्री (१३४०-१४००) ——इंग्रज कवि.——२२८
चामिस्सो, आडेल्बर्ट फॉन (१७८१-१८३८)—— जर्मन रोमॅन्टिक कवि. ——४४०
चामोन्त, सेलिने.—— ४५२
चार्ल्स ऑगस्टस (कार्ल ऑगस्ट) (१७५७-१८२८)——ग्रँड ड्यूक ऑफ सॅक्से-वायमार; त्याच्या दरबारी वास्तव्य केलेल्या गटेला त्याने आश्रय दिला. ——३४०, ३६५
चार्ल्स दुसरा (१६३०-१६८५)

–इंग्लंडचा राजा (१६६०-८५)––४२६
चार्ल्स पाचवा (१५००-१५५८)–चार्ल्स पहिला या नात्याने स्पेनचा राजा (१५१६-५६) आणि पवित्र रोमन साम्राज्याचा बादशहा (१५१९-१५५६).––९६
चेर्निशेव्स्की, निकोलाय गाव्रिलोविच (१८२८-१८८९)––रशियन क्रान्तिकारक डेमोक्रॅट, लेखक आणि समीक्षक. ––४०५, ४११-४१९, ४६६-४६७
चेस्टर, रॉबर्ट.––४५६.

ज

जॅक्सन, चार्ल्स थॉमस (१८०५-१८८०) ––अमेरिकन वैद्यक शास्त्रज्ञ आणि रसायन शास्त्रज्ञ; ईथरचा वापर ॲनास्थेटिक (भूल देण्याचे औषध) म्हणून याने केला.––३५३
जॉन्स्टन, जेम्स (मृत्यु १७९८)––प्राचीन स्कॅन्डिनेवियन महाकाव्यांचा संग्राहक आणि प्रकाशक.––२२०
जॉर्ज, हेन्री (१८३९-१८९७) ––अमेरिकन अर्थशास्त्रज्ञ आणि लेखक. ––११५
जानीन, जूल्स (१८०४-१८७४) ––फ्रेंच कादंबरीकार, उपहासगर्भ लेखक आणि समीक्षक.––२७२
जिरासिम (मृत्यू ४७५)–– पॅलेस्टाइन ॲबॉट, आन्द्रोनिकस या गुलामाची कथा हिचा तथाकथित लेखक.––२३२
जीन पॉल–– पाहा रिख्टर योहान्न.
जोआकिम, जोसेफ (१८३१-१९०७) ––४५२
जुंग, जॉर्ज (१८१४-१८८६) –वकील आणि पत्रकार; तरुण (यंग) हेगेलियन; ज्हेनिश्चे झायटुंग (१८४२) या वृत्तपत्राच्या संस्थापकांपैकी एक, १८४८ साली डेमोक्रॅट आणि मागाहून नॅशनल लिबरल.––३७३
जेम्स स्टुअर्ट पहिला (१५६६-१६२५) ––इंग्लंडचा (ग्रेट ब्रिटनचा व आयर्लंडचा) राजा (१६०३-२५).––२१८, ४२७, ४५६
जेम्स स्टुअर्ट दुसरा (१६३३–१७६१) ––इंग्लंडचा (ग्रेट ब्रिटनचा व आयर्लंडचा) राजा (१६८५-८८).––४२७
ज्युलियन द ॲपॉस्टेट (c. ३३१-३६३) रोमन बादशहा (३६१-३६३). ––१९९
जूवेनाल (डेसिमस ज्यूनियस जूवेनालीस) (c -६० c.१२७)–– रोमन कवि आणि उपहासगर्भ लेखक.––४०२

झ

झायूख्लिन्स्की, फ्रॅन्झ झायूख्लिन फान (स्झोलिगा) (१८१६-१९००)–– ––प्रशिक्षण अधिकारी, समीक्षक आणि पत्रकार; यंग हेगेलियन.––२८९ २९०, २९३,२९४, ३०४
झिट्झ, फ्रॅन्झ (१८०३-१८४७) ––जर्मन वकील, डेमोक्रॅट; १८४८ साली फ्रँकफूर्टच्या नॅशनल असेंब्लीचा सदस्य; जर्मनीतील १८४८-४९ च्या क्रान्तीच्या पराभवानंतर अमेरिकेला स्थलान्तरित. ––४३०
झोला, एमिल (१८४०-१९०२) ––फ्रेंच लेखक. ––८७,३१०

ट

टॅसिटस, कॉर्नेलियस (इ. ५५-१२०) --रोमन इतिहासकार.-१९४, २०५, २०६

टॉलेमी, (क्लॉडियस टॉलेमियस) (दुसरे शतक)--ग्रीक खगोलशास्त्रज्ञ आणि भूगोल विशारद, विश्वाच्या जिओसेन्ट्रिक संकल्पनेचा संस्थापक. --२१५

टप्पर, मार्टिन (१८१०-१८८९) --इंग्रज कवि.--४३४

टायबेरियस (टायबेरियस क्लॉडियस नीरो सीझर) (खि. पू. ४२-इ. स. ३७) --रोमन बादशहा (इ. स. १४-३७) --२०५

टिन्डल, जॉन (१८२०-१८९५) --इंग्रज भौतिकशास्त्रज्ञ.--२८३

टीएक, लुडविग (१७७३-१८५३) --जर्मन कवि, कादंबरीकार आणि नाटककार; रोमॅन्टिसिझमचा प्रतिनिधी; जर्मन लोकप्रिय ग्रंथ नव्या स्वरूपात सादर करणारा लेखक.--२३१, २३५, २३८

टीशियन (टीझियानो वेसेल्लियो) (c. १४७५-१५७६)--इटालियन चित्रकार, पुनरुज्जीवन काळातला. --१७३, २४७

टेनिसन आल्फ्रेड (१८०९-१८९२) --इंग्रज रोमॅन्टिक कवि.--४६५

टुरोल्डुस--नॉर्मन बखरींमध्ये अनेकदा आढळणारे नाव; चान्सोन दे रोलाँ या ग्रंथाचा तथाकथित लेखक.--२२४

टेल्हेफेर-नॉर्मन जुंगल्यूर.-२२३

टलर, थॉमस (१८१७-१८८०) इंग्रज नाटककार आणि पत्रकार.--४५२

ड

डर्बी, एडवर्ड जिऑफ्री स्मिथ स्टॅन्ले, अर्ल (१७९९-१८६९)--इंग्रज मुत्सद्दी.--४५५

डागोबेर्ट पहिला-- फ्रँकिश राजा (६२९-३९).--४०७

डायरे (दायरे) (पाचवे शतक)--अल्स्टर (उत्तर आयर्लंड) मधील एक संस्थानिक. --२१५

डान्टन (दान्तन) ज्यॉर्जी जेक्स (१७५९-१७९४)--फ्रेंच राज्यक्रान्तीतील जॅकोबिनांच्या उजव्या गटाचा नेता.--७५, ९१, ३२०

डान्टे, आलिघेरी (१२६५-१३२१) --इटालियन कवि--८४, २४०-४२, ३६७, ४३६

डार्विन, चार्ल्स रॉबर्ट (१८०९-१८८२) --इंग्रज निसर्गशास्त्रज्ञ, शास्त्रीय उत्क्रान्तियुक्त जीवशास्त्राचा संस्थापक. --४३६.

डिओडोरस (दिओदोरुस) (दायोदोर), सिक्युलस (c. खि. पू. ८०-२९)--ग्रीक इतिहासकार.-- ४१-४२

डिकन्स, चार्ल्स (लेखनातले टोपण नाव बॉझ) (१८१२-१८७०)--इंग्रज लेखक. --२८९, ३३५, ४५२

डिझरायली, बेंजामिन, अर्ल ऑफ बीकन्सफील्ड-- (१८०४-१८८१)-- इंग्रज मुत्सद्दी आणि लेखक.--४५१

डीफो, डॅनियल (c. १६६०-१७३१) --ज्ञानजागृतीच्या कालखंडातील इंग्रज

लेखक, रॉबिन्सन क्रूसो या ग्रंथाचा लेखक.—३११

डुबर्थॅच – आयरिश वकील आणि पाचव्या शतकाच्या पूर्वार्धातला राजकवि.—२१५

डयुमा, अलेक्झांडर (डयुमा फिल्स) —फ्रेंच कादंबरीकार आणि नाटककार. — २८४, ३०९, ४३७

डयुरेर आल्ब्रेख्ट (१४७१-१५२८) (रेनेसान्सच्या) पुनरुज्जीवनाच्या कालखंडातील जर्मन चित्रकार.— २४६

डूहरिंग, यूजीन (१८३८-१९२१) —जर्मन एक्लेक्टिक (निवडवादी) तत्त्वज्ञ आणि रासवट अर्थशास्त्रज्ञ; मध्यमवर्गीय सोशालिस्ट.—२७३, ३४५

डयुमा, अलेक्झांडर (डयुमा पेरे) (१८०३-१८७०)– फ्रेंच नाटककार. —२८४, ३०९, ४३७

डेमुथ, हेलन ('लेन्चेन', 'निम') मार्क्स यांचे घर सांभाळणारी, सगळ्या कुटुंबाची मैत्रीण; मार्क्स यांच्या निधनानंतर एन्गल्स यांच्या घरी वास्तव्य.—८५

डेलियस निकोलॉस (१८१३-१८८८) —जर्मन भाषाशास्त्रज्ञ. शेक्स्पियरन. —४५४, ४५५

डौडेन, एडवर्ड (१८४३-१९१३)— आयरिश साहित्यिक इतिहासकार आणि समीक्षक; डब्लिन विद्यापीठातील इंग्रजी साहित्याचा प्राध्यापक, शेक्स्पीयरवरील ग्रंथांचा लेखक) तसेच इंग्रजी रोमँटिसिझम आणि फ्रेंच साहित्य या विषयांवरील ग्रंथांचा लेखक.—४५८

ड्रॉस्टे (द्रोस्ते) - हुल्शॉफ, अन्नेट एलिझाबेथ (१७९७-१८४८)—जर्मन लेखिका आणि कवयित्री.—५१, ५२

त

तिर्सो दे मोलिना (तेल्लेझ, गॅब्रियेल) (१५७१-१६४८)—स्पॅनिश नाटककार.—४४२

तुर्गेनेव्ह, इवान सेर्गेयेविच (१८१८-१८८३)—रशियन लेखक.—४४१

तुर्गो, ॲनी रॉबेर्त जेक्स (१७२७-१७८१)—फ्रेंच मुत्सद्दी आणि अर्थशास्त्रज्ञ; फिजिओक्रॅट.—३२१

तुस्सी—पाहा मार्क्स, ईलियानॉर.

तुर्र, इस्त्वान (१८२५ १९०८)—हंगेरियन अधिकारी; इटलीतील व जर्मनीतील १८४८-४९ च्या क्रान्तीत भाग घेतलेला.—३२१

त्रिबोनी, जोआचिम —जिनोवा येथील प्रवासी.—२४३

त्रोचू, लुई जूल्स (१८१५-१८९६) —फ्रेंच सेनापती आणि राजकारणी. —१६५

थ

थॅकरे, विल्यम मेफपीस (१८११-१८६३)—इंग्रज लेखक.—९८, ३३५

थिओक्रिटस (ख्रि. पू. ३ रे शतक) —ग्रीक कवि.—१९३, २०८, ४४६

थियर्स, ॲडोल्फ (१७९७-१८७७) —फ्रेंच इतिहासकार आणि मुत्सद्दी; १८७१ साली व्हर्साय सरकारचा प्रमुख, पॅरिस कम्यूनची कत्तल करणारा खाटीक.— १६४, १६५

थियेर्श, बर्नार्ड (१७९४-१८५५) —जर्मन शिक्षक आणि कवि.—४६

थेमिस्टोकल्स (८. खि. पू. ५२५-४६०) --ग्रीक मुत्सद्दी आणि ग्रीक-पर्शियन युद्धांच्या काळातील सेनापति.--२००
थोर्वाल्डसेन, बेर्टेल (१७६८-१८४४) --डॅनिश शिल्पकार.--१२५
त्काचोव, प्योत्र निकीतिच (१८४४-१८८६)--रशियन समीक्षक आणि पत्रकार, क्रान्तिकारक नारोद्निक. --११०, ४१३

द

द मेस्ले, जोसेफ (१७५३-१८२१) --फ्रेंच लेखक, फ्रेंच राज्यक्रान्तीचा वैरी, राजघराण्याच्या पूर्वपदस्थापनेचा वैचारिक पुरस्कर्ता.--२८१
दासियेन (दासियेर), आन्द्रे (१६५१-१७२२) --फ्रेंच भाषाशास्त्रज्ञ, ॲरिस्टॉटलच्या पोएटिका या ग्रंथाच्या सटीक आवृत्तीचा निर्माता.--२६१
दीदरो, डेनिस (१७१३-१७८४)--फ्रेंच भौतिकवादी तत्त्वज्ञ, लेखक आणि समीक्षक; एन्सायक्लोपीडियाचा (ज्ञानकोशाचा) संपादक आणि प्रकाशक. --१६१, २४९, २६७, २७०, २७१, २७२, ४१२, ४३४
देकार्त (कार्टेसियस), रेनी (१५९६-१६५०)--फ्रेंच तत्त्वज्ञ, गणितशास्त्रज्ञ आणि निसर्गशास्त्रज्ञ.--२६४, २६६
देझामी, थिओडोर (१८०३-१८५०) --फ्रेंच लेखक, मनोराज्यवादी कम्युनिझममधील क्रान्तिकारक प्रवृत्तीचा प्रतिनिधी.--२६६
देर्झाविन, गाव्रीइल रोमानोविच (१७४३-१८१६)--रशियन कवि, अभिजाततावादाचा प्रतिनिधी.--४०९
देस्क्ली, आयमी (१८३६-१८५४)--फ्रेंच नटी.--४५२
देस्मौलिन्स, कॅमील (१७६०-१७९४) --फ्रेंच लेखक; फ्रेंच राज्यक्रान्तीत प्रामुख्याने भाग घेतला, उजव्या गटाचा जॅकोबिन.--७५
दोब्रोल्यूबोव, निकोलाय आलेक्झान्द्रोविच (एहरलिच) (एहरसिएव) (१८३६-१८६१)--रशियन क्रान्तिकारक डेमोक्रॅट, समीक्षक आणि भौतिकवादी तत्त्वज्ञ.--४११
द्युपाँ, प्येर (१८२१-१८७४)--फ्रेंच कवि, कामगारांमध्ये लोकप्रिय असलेल्या गाण्यांचा लेखक.--२९२, ३१६, ४६५

न

नेकर, जेक्स (१७३२-१८०४)--फ्रेंच बँकर आणि राजकारणी; सोळाव्या लुईच्या अमदानीत अर्थमंत्री.--३२१
नीरो (३७-६८)--रोमन बादशहा (५४-६८).--२०३, २०५
नेचायेव, सेर्गेइ गेन्नादियेविच (१८४७-१८८२)--रशियन अराज्यवादी, रशियातील विद्यार्थ्यांच्या कट-कारस्थानी गटांचा संघटक; १८७२ साली स्विस अधिकाऱ्यांनी याला पकडून रशियन सरकारच्या स्वाधीन केले; पीटर-ॲंड पॉल किल्ल्यात कैदेत असताना मरण पावला.--४१७
नेपोलियन पहिला (नेपोलियन बोनापार्ट) (१७६९-१८२१)--फ्रान्सचा बादशहा (१८०४-१४ आणि १८१५).--५४, ७५, २५४, २७७, ३४१, ३५२

नेपोलियन तिसरा (लुई नेपोलियन) (१८०८-१८७३)—फ्रान्सचा बादशहा (१८५२-७०).—९२, १६५, ३९९, ४३२, ४३७

न्यूटन, आयझॅक (१६४२-१७२७) —इंग्रज भौतिकशास्त्रज्ञ, खगोलशास्त्रज्ञ आणि गणितशास्त्रज्ञ.—४६

प

पॅट्रिक (c ३८४-c-४८३)—आयरिश मिशनरी, आयर्लंडमधील कॅथोलिक धर्मपीठाचा संस्थापक.— ३२३

पॅरिस, पॉलीन—(१८००-c-१८८१) —फ्रेंच भाषाशास्त्रज्ञ व साहित्याचा इतिहासकार.—२२३

"पम्प्स"— पाहा बर्न्स, मेरी ॲलन

पॉम्पे (ग्नॅकस पॉम्पेयस मॅग्नस) (खि. पू. १०६-४८).—रोमन सेनापति आणि मुत्सद्दी.—२५४

पकर-मुशाऊ, हेर्मान्न, प्रिन्स (१७८५-१८७१)— जर्मन लेखक.— ३८०

पागानिनी, निकोलो (१७८२-१८४०) —इटालियन व्हायोलिनवादक आणि संगीतकार.— १२५

पायस नववा (१७९२-१८७८)—पोप (१८४६-७८).—३२१

पार्नी, एवारिस्ते देसीरे विकोम्ते (१७५३-१८१४)—फ्रेंच कवि.—३६९

पार्नेल, चार्ल्स स्टुअर्ट (१८४६-१८९१) —आयरिश राजकारणी आणि मुत्सद्दी, खासदार, होमरूलचा पुरस्कर्ता.—९२

पियेपर, विल्हेल्म (जन्म १८२६) —जर्मन भाषाशास्त्रज्ञ आणि पत्रकार; कम्युनिस्ट लीगचा सदस्य; स्थलान्तरित होऊन लंडन शहरी वास्तव्य; १८५० च्या दशकात मार्क्स आणि एन्गल्स यांचा निकटवर्ती होता.— ११३

पीटर पहिला (१६७२-१७२५)—१६८२ पासून रशियाचा झार; १७२१ पासून सगळ्या रशियाचा बादशहा.— ४०८

पुश्किन, अलेक्झांडर सेर्गेयेविच (१७९९-१८३७) — रशियन कवि.— ४१३, ४३९, ४४५, ४४७

पेट्रार्च, फ्रॅन्सेस्को (१३०४-१३७४) —इटालियन कवि.— २४२

पेन, थॉमस (१७३७-१८०२)—इंग्रज जहाल लेखक; रिपब्लिकन; अमेरिकन स्वातंत्र्ययुद्धात आणि फ्रेंच राज्यक्रान्तीत भाग घेतलेला.—१६०

पेन्टर, विल्यम (१५४०-१५९४) हेरोडोटस, प्लूटार्क, टॅसिटस, बोक्काशियो व इतर लेखक यांच्या ज्या लघुकादंबऱ्यांचा उपयोग शेक्स्पियरने आपल्या नाटकांच्या कथानकांसाठी केलेला आहे त्यांच्या अनुवादांचा संग्रह सौख्याचा प्रासाद (पॅलेस ऑफ प्लेझर) या नावाने करणारा लेखक.— ४५६

पेरिक्लीज (खि. पू. ४९०-४२९) —अथीनियन मुत्सद्दी.— १९९

पेर्सियस (औलस पेर्सियस फ्लॅक्कस) (३४-६२)— रोमन कवि व उपहासकार. — २०३

पोप, अलेक्झांडर (१६८८-१७४१) —इंग्रज कवि आणि उपहासगर्भ लेखक, डन्सियड या उपहासगर्भ काव्याचा लेखक — ३१३

पोलो, मार्को (१२५४-१३६४)—इटा-

लियन प्रवासी, १२७१ ते १२९५ या मुदतीत चीनपर्यंत प्रवास करून आला. --२४०

प्रुधाँ, प्येर जोसेफ (१८०९-१८६५) --फ्रेंच मध्यमवर्गीय समाजवादी;मागाहून अराज्यवादाचा एक संस्थापक.--११०, १६४, १६५, २८३, २८६, २९५, ३५७, ३६७

प्रेव्होस्त, आन्तोइने फ्रान्स्वा (१६९७-१७६३)--फ्रेंच लेखक. -- २८३

प्लाटेन (प्लाटेन हेल्लरमुन्डे), ऑगस्ट (१७९६-१८३५)--जर्मन कवि.--१५

प्लेटो (ख्रि. पू. c-४२७-३४७)--ग्रीक अध्यात्मवादी तत्त्वज्ञ.-- ४०१

प्लूटार्क (C. ४६- C. १२६)--ग्रीक लेखक, अध्यात्मवादी तत्त्वज्ञ.--१९०, १९४, २०२

प्लेखानोव, ज्योर्जी वालेन्तिनोविच (१८५६-१९१८)--रशियन मार्क्सवादी, १८७०च्या दशकात नारोदनिक मताचा; कामगार बंध-विमोचन मंडळाचा संघटक; जिनीव्हा येथे १८८३ साली पहिल्या रशियन मार्क्सवादी मंडळाचा संघटक; रशियात मार्क्सवादाचा तत्त्वज्ञ आणि प्रचारक; १९०३ साली रशियन सोशल डेमोक्रॅटिक लेबर पार्टीच्या दुसऱ्या काँग्रेसनंतर मेन्शेविक झाला.--४१५

पुब्लिकोला (पुब्लियस व्हॅलेरियस पुब्लिकोला (ख्रि. पू. सहावे शतक) --रोमन प्रजासत्ताकाचा पारंपरिक संस्थापक.--८१

फ

फर्निवाल, फ्रेडरिक जेम्स (१८२५-१९१०)--इंग्रज भाषाशास्त्रज्ञ, शेक्स्पीरियन, न्यू शेक्स्पियर सोसायटीचा संस्थापक.--४५५, ४५६

फॉयरबाख, लुडविग (१८०४-१८७२) --मार्क्स-पूर्वकालीन कालखंडातील जर्मन भौतिकवादी तत्त्वज्ञ.--१०६, ३४८, ३५०

फॉरियेल क्लॉड (१७७२-१८४२) --फ्रेंच इतिहासकार आणि समीक्षक. --२२३

फॉसिट, हेलेना (१८१७-१८९८) --इंग्रज ट्रेजिक नटी.--४५७

फाव्रे, जूल्स (१८०९-१८८०)--फ्रेंच वकील आणि राजकारणी; परराष्ट्रमंत्री (१८७०-७१); पॅरिस कम्यूनची कत्तल करणारा खाटीक.-- ४६४

फिख्टे (फिच्चे), योहान्न गॉट्टलियेब (१७६२-१८१४)--जर्मन अभिजात तत्त्वज्ञ, आत्मनिष्ठ अध्यात्मवादी. --६०, ३४२

फिलिप ऑगस्टस (११६५-१२२३) --फ्रेंचाचा राजा (११८०-१२२३), तिसऱ्या धर्मयुद्धात भाग घेतलेला.--६१

फील्डिंग, हेन्री (१७०७-१७५४) --इंग्रज कादंबरीकार आणि नाटककार. --४३७, ४४०

फूरियर, चार्ल्स (१७७२-१८३७) --फ्रेंच मनोराज्यवादी सोशालिस्ट. --१०६, १७७

फेर्गुस (पाचवे शतक)--आयरिश शाहीर, सेन्चुस मोर या संग्रहाच्या संग्राहकांपैकी एक.-- २१५

फेल्प्स, सॅम्युएल (१८०४-१८७०)

—इंग्रज नट आणि लंडन शहरातील सॅडलर्स वेल्स थिएटराचा व्यवस्थापक. —४४७

फ्राइज, जेकब फ्रायड्रिख (१७७३-१८४३)—जर्मन अध्यात्मवादी तत्त्वज्ञ. —१०५

फ्रायलिग्राथ, फर्डिनान्ड (१८१०-१८७०)—जर्मन क्रान्तिकारक कवि; न्यूए ऱ्हेनिश्चे झायटुंग या पत्राचा संपादक आणि कम्युनिस्ट लीगचा सदस्य; १८५१ ते १८६८ या मुदतीत निर्वासित म्हणून लंडन शहरी वास्तव्य; १८५० च्या दशकात क्रान्तिकारक कामगिऱ्यांतून निवृत्त.—४७,३९१-३९७,४००·०१

फ्रेडरिक दुसरा (१७१२-१७८६) —प्रशियाचा राजा (१७४०-८६). —३३९, ४०१

फ्रेडरिक विल्यम (१६२०-१६८८) —ब्रान्डेनबुर्गचा इलेक्टर (१६४० -८८).—६२

फ्रोइसार्ट, जीन (१३३७-१४१०)— फ्रेंच बखरकार.—१२७, ४५६

फ्लेचर, जॉन (१५७०-१६२५) —इंग्रज नाटककार.—४५५

फ्लेरोव्स्की, एन्, (बेर्वी वासिली वासील्येविच) (१८२९-१९१८) —रशियन लेखक; नारोद्निक; रशियातील कामगारवर्गाची परिस्थिती या ग्रंथाचा लेखक.—४०५, ४१८, ४१९

ब

बॅरो (बॅरट) ओदिलॉन (ओडिलॉन) (१७९१-१८७३)—फ्रेंच राजकारणी, १८४८ च्या फेब्रुवारी महिन्यापर्यंत राजघराण्याच्या पुरस्कर्त्या उदारमतवादी विरोधी पक्षाचा नेता; १८४८ च्या डिसेंबर महिन्यापासून १८४९ च्या ऑक्टोबर महिन्यापर्यंत राजेशाही पक्षांच्या प्रतिक्रांतिकारक गटाचे पाठबळ असलेल्या मंत्रिमंडळाचा नेता.—२५४

बार्थ, पॉल (१८५४-१९२२)— जर्मन समाजशास्त्रज्ञ आणि इतिहासकार, मार्क्सवादाचा विरोधक.— ५७, ५९, ६१

बॅस्टाइड, जूल्स (१८००-१८७९)—फ्रेंच राजकारणी आणि लेखक; भांडवलदारी रिपब्लिकन वृत्तपत्र ल नाशनाल याचा संपादक (१८३६-४६); परराष्ट्रमंत्री (मे ते डिसेंबर १८४८).—२८६

बॅक्स, अर्नेस्ट बेल्फास्ट (१८५४-१९२६)—इंग्रज सोशालिस्ट; इतिहासकार, तत्त्वज्ञ आणि पत्रकार; इंग्लंडमधील मार्क्सवादाच्या पहिल्या प्रचारकांपैकी एक, सोशालिस्ट लीगचा व ब्रिटिश सोशालिस्ट पक्षाचा संस्थापक. —३३८

बॉडहाऊस, जॉन—पाहा हाइंडमन, हेन्री मायर्स.

ब्रॉन्टी, शार्लट (लेखनांतील टोपण नाव कुरेर बेल (१८१६-१८५५)—इंग्रज वास्तववादी कादंबरी लेखिका.—३३९

ब्रूटस, मार्कस जूनियस (C. खिस्तपूर्व ८५-४२)— रोमन राजकारणी, रिपब्लिकन, ज्यूलियस सीझरच्या हत्येत भाग घेतला —८१

बॉल, जॉन (मृत्यु १३८१)—इंग्रज

धर्मोपदेशक, वॅट टेलरच्या उठावाचा नेता.—२२७, २२८
बॉझ—पाहा डिकन्स, चार्ल्स.
बर्न्स, मेरी ॲलन "पम्प्स" (जन्म c-१८६०)—एन्गल्स यांच्या पत्नीची भाची.—८९,४३३
बर्नार्डिन दे (हे) सेंट-प्येर, जेक्स हेन्री (१७३७-१८१४)—फ्रेंच लेखक. —२५५
बर्नस्टीन, एदुआर्द (१८५०-१९३२) —जर्मन सोशल डेमोक्रॅट, डेर सोशल-डेमोक्राट (१८८१-९०) या सोशल डेमोक्रॅटिक वृत्तपत्राचा संपादक; एन्गल्स यांच्या निधनानंतर तत्त्वविचार आणि डावपेच यांच्या प्रमुख समस्यांबाबत मार्क्सवादाची दुरुस्ती करण्याचा पुरस्कर्ता.—११५
बाल्झॅक ऑनर दे (१७९९-१८५०)— फ्रेंच कादंबरीकार.—८७, ८८, ३०५-०७, ४३७, ४४०
बायरन, जॉर्ज नोएल गॉर्डन (१७८८-१८२४)—इंग्रज कवि, क्रान्तिकारक रोमॅन्टिसिझमचा प्रतिनिधी.—५५, १६२, १६४, ३२०
बाकूनीन, मिखाईल आलेक्झान्द्रोविच (१८१४-१८७६)—रशियन क्रान्तिकारक; लेखक; अराज्यवादाच्या तत्त्वविशारदांपैकी एक आणि पहिल्या इंटरनॅशनलमध्ये मार्क्सवादाचा वैरी; याच्या फूटपाड्या कारवायांपायी तिच्यातून हेग काँग्रेसने १८७२ साली याची हकालपट्टी केली.—४०६, ४११, ४१७
बाब्बेज्ज, चार्ल्स (१७९२-१८७१) —इंग्रज अर्थशास्त्रज्ञ.—१५२
बाख, योहान्न सेबास्टियन (१६८५-१७५०)—जर्मन संगीतकार. —३४०
बाचोफेन, योहान्न जेकब (१८१५-१८७७)—स्विस वकील आणि इतिहासकार, डास मुट्टरेंलट या ग्रंथाचा लेखक.—१८६-८७
बाह्र, हेर्मान्न (१८६३-१९३४) —ऑस्ट्रियन पत्रकार, समीक्षक आणि नाटककार.—७०, ७१, ७३
बात्युश्कोव, कोन्स्तन्तीन निकोलायेविच (१७८७-१८५५)—रशियन कवि. —४०८
बिस्मार्क, ऑट्टो (१८१५-१८९८) —प्रशियाचा आणि जर्मनीचा चॅन्सेलर (पंतप्रधान), प्रतिगामी युंकर्सचा विचारमार्गदर्शक; १८६० च्या व १८७० च्या दशकांत प्रशियन वर्चस्वाखाली जर्मनीचे "वरून" एकीकरण पार पाडले; सोशालिस्टांविरुद्धच्या "एक्सेप्शनल लॉ"चा प्रणेता.—६२, १०९, १११, १९०
ब्लाँक, लुई (१८११-१८८२)—फ्रेंच मध्यमवर्गीय सोशालिस्ट आणि इतिहासकार, १८४८ सालातील हंगामी सरकारच्या मंत्रिमंडळाचा सदस्य.—९१, २८४, ३०६, ३३०
ब्रियान बोरुम्हा (९२६-१०१४) —आयर्लंडचा राजा (१००१-१४), १०१४ साली क्लॉन्टार्फ येथे नॉर्मनांचा धुव्वा उडविला.—२२५
ब्रुखेझ, फिलिप (१७९६-१८६६) —फ्रेंच राजकारणी आणि इतिहासकार; मागाहून फ्रान्समधील ख्रिश्चन सोशालिझमचा वैचारिक मार्गदर्शक.—३६१
बेस्सेल, फ्राइड्रिख विल्हेल्म (१७८४-

१८४६)--जर्मन खगोल शास्त्रज्ञ. --१७४

बेटमन, इसाबेल--इंग्रज नटी १८७० च्या दशकात लंडन शहरी लोकप्रिय. --४५७, ४६१, ४६४

बेटमन, केट जोसेफाइन (१८४२-१९१७)--इंग्रज नटी १८६० च्या व १८७० च्या दशकात लोकप्रिय, शेक्स्पीरियन पात्रांच्या भूमिका करणारी. -- ४५७, ४६१, ४६४

बेटमन, व्हर्जिनिया--१८७० च्या दशकातील इंग्रज नटी.-- ४५७, ४६१, ४६४

बेली, प्येर (१६४७-१७०६)--फ्रेंच संशयवादी तत्त्वज्ञ, धार्मिक पोथीनिष्ठतेचा टीकाकार.--२४९

बेबेल, ऑगस्ट (१८४०-१९१३)--जर्मन आणि आंतरराष्ट्रीय कामगारवर्गीय चळवळीचा नेता; जर्मन सोशल डेमोक्रॅटिक पार्टीच्या आणि दुसऱ्या इंटरनॅशनलच्या संस्थापकांपैकी एक, मार्क्स आणि एन्गल्स यांचा स्नेही व कॉमरेड-इन्-आर्म्स.--४०२

बेक, कार्ल (१८१७-१८७९)--जर्मन कवि, १८४० च्या दशकात "खऱ्या सोशालिझमशी" निष्ठावन्त होता. --३८३-८५

बेकर, योहान्न फिलिप (१८०९-१८८६) जर्मन कम्युनिस्ट कार्यकर्ता, १८४८-४९ च्या क्रान्तीत भाग घेतलेला; खिन्झर्लंडला स्थलान्तर केल्यानंतर पहिल्या इंटरनॅशनलची जीनीव्हा शाखा संघटित करण्यात भाग घेतला; मार्क्स आणि एन्गल्स यांचा स्नेही.--४०२, ४०३

बीथोव्हन, लुडविग फॉन (१७७०-१८२७)--जर्मन संगीतकार.--३४१

बेनडिक्स, ज्यूलियस रॉडेरिख (१८११-१८७३)--जर्मन नाटककार; एल्बर फेल्ड येथील रंगभूमीचा दिग्दर्शक. --२५२

बेट्टझिएच, हाइन्रिख (१८१३-१८७६) --जर्मन लेखक आणि पत्रकार; मध्यमवर्गीय डेमोक्रॅट, लंडन शहरी स्थलान्तरित झाला.--३९६

बेनिग्नुस (बेनिगुस) (मृत्यु ४६८) --आयरिश धर्मगुरु, आर्माघचा बिशप, सान्चुस मोर याच्या रचनाकारांपैकी एक. --२१५

बेन्थॅम, जेरेमी (१७४८-१८३२)-- इंग्रज राजकारणी, उपयुक्ततावादाचा तत्त्वविशारद.--१६१, २६६

बेरँजर, प्येर जीन दे (१७८०-१८५७) --फ्रेंच लोकशाहीवादी कवि, राजकीय उपहासिकांचा लेखक.--१४४

ब्रेन्टानो, लूजो (१८४४-१९३१) --जर्मन रासवट भांडवलदारी अर्थशास्त्रज्ञ, काथेडर-सोशालिझमच्या प्रमुख प्रवर्तकांपैकी एक.--११३, ११४

बो, चार्ल्स.--४६४

बोमार्शाय, प्येर ऑगस्टिन कारोन दे (१७३२-१७९४)-- फ्रेंच नाटककार.--११०

बोर्ने, लुडविग (१७८६-१८३७) जर्मन डेमोक्रॅटिक लेखक व समीक्षक, तरुण जर्मनी चळवळीचा वैचारिक मार्गदर्शक. --२३६, ३५१, ३७०, ३७४, ३७६-७७

बोव्रिंग, जॉन (१७९२-१८७२)

—इंग्रज राजकारणी, भाषापंडित आणि साहित्यिक; बेन्थॅमचा अनुयायी, खुल्या व्यापाराचा पुरस्कर्ता.—४०८

बोनाल्ड, लुई गॅब्रियेल ॲम्ब्रोइसे वायकोम्ते (१७५४-१८४०)—फ्रेंच राजकारणी आणि लेखक; राजपक्षीय, पूर्वपद स्थापनेच्या काळातील प्रतिगामी सरदार व धर्मगुरू यांच्या वैचारिक मार्गदर्शकांपैकी एक.—२८१

बोह्मे, जेकब (१५७५-१६२४)—जर्मन कारागीर, गूढवादी तत्त्वज्ञ.—३४०

बोलीन, ॲन (c. १५०७-१५३६)—इंग्लंडचा राजा आठवा हेन्री याची द्वितीय पत्नी (१५३३ पासून), राणी एलिझाबेथ पहिली हिची आई; आठव्या हेन्रीकडून ठार मारण्यात आली.—४४८

बोक्काशियो, जिओवान्नी (१३१३-१३७५)—पुनरुज्जीवनाच्या काळातील इटालियन कादंबरीकार आणि कवि.—२४४

ब्लेन्कर, लुडविग (लुई) (१८१२-१८६३)—जर्मन लष्करी अधिकारी, १८४९ साली बाडन प्फाल्झ येथील उठावात भाग घेतलेला, मागाहून अमेरिकेत स्थलान्तरित झाला, अमेरिकन यादवी युद्धात उत्तरवाल्यांच्या बाजूकडून लढला.—४३०.

ब्लॉन्डेल दे नीले—१२ व्या शतकाच्या अखेरीचा आणि तेराव्या शतकाच्या आरंभीचा फ्रेंच त्रोबादूर (शाहीर).—३९०

ब्लुम, रॉबर्ट (१८०७-१८४८)—जर्मन मध्यमवर्गीय डेमोक्रॅट, पत्रकार, फ्रँकफूर्ट नॅशनल असेंब्लीतल्या डाव्या गटाचे नेतृत्व केले.—४३०

म

मॅकियाव्हेली, निक्कोलो (१४६९-१५२७)—इटालियन राजकारणी, लेखक आणि इतिहासकार.—२४१, २४६, ३५५

मॅक्फर्सन, जेम्स (१७३६-१७९६)—स्कॉटिश कवि, फिंगल आणि टेमोरा या कवितांचा लेखक.—२१८

मॅक्रिनस (मॅक्तिनस), ऑपेल्लियस (१६४-२१८)—रोमन बादशहा (२१७-१८).—२०५

मॅक्रीडी, विल्यम चार्ल्स (१७९३-१८७३)—इंग्रज नट आणि नाट्यनिर्माता.—४४८, ४५७, ४५९

मॉन्डेविल्ले (मॅन्डेव्हिल्ल), बर्नार्ड दे (१६७०-१७३३)—इंग्रज नैतिकतावादी लेखक आणि उपहासकर्ता.—१५२, २६५

मॅनिंग, हेन्री एडवर्ड (१८०८-१८९२)—इंग्लंडमधील कॅथोलिक धर्मपीठाचा प्रमुख, १८७५ पासून कार्डिनल.—४६५.

महमद (मुहम्मद) (५७०-६८२)—मुस्लिम धर्माचा संस्थापक.—१८३, ४५७

मरायट, फ्रेडरिक (१७९२-१८४८)—इंग्रज आरमारी अधिकारी आणि कादंबरीकार; साहसविषयक कादंबऱ्यांचा लेखक.—४३९

मॉट्टेलर, ज्यूलियस (१८३३-१९०७) ——जर्मन सोशल डेमोक्रॅट; सोशालिस्टांविरुद्धच्या एक्सेप्शनल लॉजच्या अमदानीत झूरिच येथे निर्वासित म्हणून वास्तव्य केले आणि मागाहून लंडन शहरी वास्तव्य केले.— ४०३

मॉन्तालेम्बर्ट, मार्क रीनी (१७१४-१८००) ——फ्रेंच लष्करी इंजिनियर, तटबंदीच्या नव्या पद्धतीचा प्रवर्तक.——२४६

मॉन्टील, आमान्स अलेक्सिस (१७६९-१८५०)——फ्रेंच इतिहासकार.—४२०

मॉन्टेस्क्यू, चार्ल्स लुई (१६८९-१७५५) ——फ्रेंच समाजशास्त्रज्ञ, अर्थशास्त्रज्ञ आणि लेखक; ज्ञानजागृतिकार.——६०

मॉरिस, विल्यम (१८३४-१८९६) ——इंग्रज कवि आणि चित्रकार; सोशालिस्ट लीगचा नेता.——३३७, ३३८

मॉर्गन, ल्यूइस हेन्री (१८१८-१८८१) ——अमेरिकन मानववंशशास्त्रज्ञ, पुरातत्त्वविशारद आणि आदिम समाजाचा इतिहासकार. ——३१४

मार्को पोलो—— पाहा **पोलो.**

मार्क्स, इलियानॉर (तुस्सी) (१८५५-१८९८)—— कार्ल मार्क्स यांची कनिष्ठ कन्या, इंग्रज आणि आन्तरराष्ट्रीय कामगारवर्गीय चळवळीची प्रतिनिधी; १८८४ पासून एडवर्ड ॲव्हेलिंग याची पत्नी. —— ३३७, ४३८

मार्क्स, लॉरा (१८४५-१९११)—— कार्ल मार्क्स यांची कन्या, १८६८ पासून पॉल लाफार्ग याची पत्नी; फ्रान्समधील कामगारवर्गीय चळवळीत क्रियाशील होती. ——१०९, ११८

मार्वाच ओस्वाल्ड (१८१०-१८९०) —— जर्मन लेखक आणि कवि; जर्मन मध्ययुगीन महाकाव्यांच्या सुबोध रूपांचा लेखक आणि जर्मन लोकप्रिय ग्रंथांचा प्रकाशक.——२३३, २३४, २३७

मार्टिन, थिओडोर (१८१६-१९०९) ——इंग्रज लेखक आणि अनुवादक. ——४५७

माल्थस, थॉमस रॉबर्ट (१७६६-१८३४) —इंग्रज धर्मगुरू आणि अर्थशास्त्रज्ञ; लोकसंख्याविषयक मानवद्वेष्ट्या सिद्धान्ताचा प्रणेता. —— १०७, १४०, १५९

मार्स्टेइन —— आयर्लंडचा पारंपारिक राज्यकर्ता. —— २२०

मायकेल, फ्रॅन्सिस्के झेवियर (१८०९-१८८७)——फ्रेंच भाषाशास्त्रज्ञ आणि साहित्यिक इतिहासकार.——२२४

मिथ्राइडेट्स सहावा, द ग्रेट (खि. पू. १३२-६३)——पॉन्टुसचा राजा (१२०-६३).——२५४

मिल्टन, जॉन (१६०८-१६७४)—— इंग्रज कवि, पत्रकार आणि राजकारणी. ——१४१, ४४७

मिल्डे, कार्ल ऑगस्ट (१८०५-१८६१) ——बडा सिलेशियन कारखानदार; उदारमतवादी जर्मन भांडवलदारांचा प्रतिनिधी.——४३१

मिल्ल, जॉन स्टुअर्ट (१८०६-१८७३) ——इंग्रज अर्थशास्त्रज्ञ आणि तत्त्वज्ञ ——४१२, ४६६

मीड, एडवर्ड——इंग्रज कामगार कवि; द नॉर्थर्न स्टार या चार्टिस्ट वृत्तपत्रात याने आपल्या कविता प्रसिद्ध केल्या.——३१७

मुन्झेर, थॉमस (c १४९०-१५२५) ––जर्मन क्रान्तिकारक, धर्मसुधारणेच्या अमदानीत आणि १५२४-२५ सालातील जर्मनीतल्या शेतकरी युद्धाच्या काळात शेतकरी आणि तळगाळातला बहुजनसमाज यांचा नेता आणि वैचारिक मार्गदर्शक.––९६

मुल्नर, ॲडोल्फ (१७७४-१८२९) ––जर्मन लेखक आणि समीक्षक. ––१५१

मूण्ड्ट, थिओडोर (१८०८-१८६१) ––जर्मन लेखक, यंग जर्मनी साहित्यिक गटाचा सदस्य.––२३४, ३७६, ३७८, ३७९

मेन्के, हाइनरिख थिओडोर (१८१९-१८९२)––जर्मन भूगोलतज्ज्ञ; के. स्प्रूनरकृत हान्डट्लास फूर डाय गेस्किख्टे डेस मिट्टेलाल्टर्स उन्ड न्यूएरेन झीट हा ग्रंथ सुधारून दिला ––३३९, ३४०

मेन्झेल, वूल्फगँग (१७९८-१८७३) ––जर्मन प्रतिगामी लेखक आणि समीक्षक; राष्ट्रवादी.––३७०

मेहरिंग, फ्रॅन्झ (१८४६-१९१९)––जर्मन सोशल-डेमोक्रॅटिक पार्टीचा डाव्या गटाचा नेता; १९१८-१९ साली जर्मन कम्युनिस्ट पार्टीच्या संस्थापकांपैकी एक; इतिहासकार आणि समीक्षक; मार्क्स आणि एन्गल्स यांजवरील ग्रंथांचा लेखक. ––५८-६४

मोकेल, योहान्ना–पाहा किन्केल, योहान्ना

मोपासां, हेन्री रीनी आल्बर्ट गी दे (१८५०-१८९३)––फ्रेंच लेखक. ––३१०

मोअर, थॉमस (१४७८-१५३५) ––इंग्रज राजकारणी आणि मानवतावादी लेखक; मनोराज्यवादी कम्युनिझमचा अज्वल काळातील एक प्रतिनिधी, युटोपिया या ग्रंथाचा लेखक. ––२५०, २५१

मोस्चुस (ख्रि. पूर्व दुसरे शतक) ––ग्रीक कवि.––१९३, २०८

मोझार्ट वूल्फगँग आमाडियूस (१७५६-१७९१) ––ऑस्ट्रियन संगीतकार. ––१७३

र

रँक, आर्थर (१८३१-१९०८) ––फ्रेंच राजकारणी आणि पत्रकार.––३०८

रॉमेर, फ्रायेड्रिख (१७८१-१८७३) ––जर्मन प्रतिगामी इतिहासकार आणि राजकारणी.––२७५

राइट––इंग्रज सोशालिस्ट, सोशल-डेमोक्रॅटिक फेडरेशनची सदस्य.––३३८

राडोवित्झ, जोसेफ फॉन (१७९७-१८५३)––प्रशियन सेनापति आणि मुत्सद्दी; १८४८-४९ सालातील फ्रँकफूर्ट नॅशनल असेंब्लीतल्या उजव्या गटाच्या नेत्यांपैकी एक.––२५६

राझिन, स्तेपान तिमोफियेविच, (मृत्यु १६७१)––रशियातील (१६६६-७१) या मुदतीतल्या सरंजामशाही-विरोधी शेतकऱ्यांच्या व कोसाकांच्या उठावाचा नेता.––४२५

राफेल (राफ्फायेल्लो सान्ती) (१४८३-१५२०)––रेनेसान्सच्या (पुनरुज्जीवनाच्या) काळातील इटालियन चित्रकार.––८९, १२५, १७३

राल्स्टन, विल्यम राल्स्टन शेडेन (१८२८-१८८९) —— इंग्रज लेखक; १८६० च्या दशकात आणि १८७० च्या दशकात कित्येकदा रशियाला भेटी देऊन आला; रशियन साहित्य आणि इतिहास या विषयांवरील ग्रंथांचा लेखक. ——४६६,४६७

रॉट्टेक, कार्ल (१७७३-१८४०)——जर्मन इतिहासकार आणि राजकारणी, उदारमतवादी.— ४३१

रॉथ्शील्ड्स— धनपतींचे घराणे; अनेक देशांमध्ये याच्या मालकीच्या बँका होत्या. — ३८३, ३८४

रॉश्शेर, विल्हेल्म (१८१८-१८९४) ——जर्मन अर्थशास्त्रज्ञ, 'हिस्टॉरिकल स्कूल'चा('ऐतिहासिक विचारसरणी'चा) संस्थापक.—१५१

रॉबस्पियर, मॅक्झिमिलियन मारी(१७५८-१७९४)——फ्रेंच राज्यक्रांतीचा एक नेता; जॅकोबिन सरकारचा प्रमुख. ——७५,९१

रिख्टर, योहान्न पॉल (जीन पॉल)फ्रायड्रिख (१७६३-१८२५) —— जर्मन लेखक. ——३२०

रीड, चार्ल्स (१८१४-१८८४)—इंग्रज कादंबरीकार आणि नाटककार—४६४

रूसो, जीन जेक्स (१७१२-१७७८) ——फ्रेंच डेमोक्रॅटिक लेखक आणि तत्त्वज्ञ; ज्ञानजागृतिकार; मध्यमवर्गीयांचा वैचारिक नेता. —— ६०, १५९, १६०, २६३, २६७, २७१, २७३-७५, २९७

रेनुआर्द, आन्तोइने ऑगस्टिन (१७५६-१८५३)——फ्रेंच साहित्यिक, इतिहासकार आणि ग्रंथसूचिकार.——२२६

रेनान, अर्नेस्ट (१८२३-१८९२)——फ्रेंच धर्मशास्त्रज्ञ आणि इतिहासकार, अध्यात्मवादी तत्त्वज्ञ, व्हीये डे जीसस या ग्रंथाचा लेखक.——३०८, ३०९

रेम्ब्रंट व्हे रिज्न (१६०६-१६६९) —डच चित्रकार——८९, १४३

रोज, एडवर्ड (१८४९-१९०४)——इंग्रज नाटककार आणि समीक्षक.——३३७

रोस्सा (५ वे शतक) —आयरिश वकील. ——२१५

रोयेर-कोल्लार्ड, प्येर पॉल (१७६३-१८४५)—— फ्रेंच प्रतिगामी राजकारणी आणि तत्त्वज्ञ.—— ७६

रूकेर्ट, फ्राइड्रिख (१७८८-१८६६) —— ——जर्मन रोमॅन्टिक कवि, पौर्वात्य कवितेचा अनुवादक.— ४४०

ल

लँग्लँड विल्यम (१३३२-१४००)—— इंग्रज कवि.——२२७, २२८

लॉक, जॉन (१६३२-१७०४) ——इंग्रज तत्त्वज्ञ आणि अर्थशास्त्रज्ञ.——५५, ७६, २६७

लाँगुस (इ. स. २ रे व ३ रे शतक) —— ग्रीक लेखक, डाफ्नीस आणि क्लो या मेंढपाळविषयक कादंबरीचा लेखक.——२०

लॉरा —— पाहा मार्क्स, लॉरा

लॉबे, हाइनरिख (१८०६-१८८४)—— जर्मन लेखक, यंग जर्मनी साहित्यिक गटाचा सदस्य.——४६, ३७६, ३७८

ला रॉचे फोंको, फ्रान्स्वा, ड्यूक (१६१३-१६८०)——फ्रेंच लेखक आणि

फ्रॉन्डेच्या कालखंडातील राजकारणी. —— ६१

ला केसोनियेरे, लुई (१८१९-१८९८) ——फ्रेंच नाट्यसृष्टीतील नट, ले कुरियेर दे लियॉन्स या मेलोड्रामामध्ये याने दोन भूमिका केल्या.——४६४

लाफार्ग, पॉल (१८४२-१९११)——फ्रेंच कामगारवर्गीय चळवळीतील मार्क्सवादी गटाचा एक नेता; पहिल्या इंटरनॅशनलचा सदस्य, फ्रेंच सोशालिस्ट वर्कर्स पार्टीच्या संस्थापकांपैकी एक (१८८०); इतिहासविषयक व साहित्यविषयक ग्रंथांचा लेखक.——१३८, १३९, ३०९, ३१०, ४३६

लामार्टाइन, आल्फोन्झे (१७९०-१८६९) ——फ्रेंच कवि, इतिहासकार आणि भांडवलदारी राजकारणी; १८४८ साली फ्रान्सच्या हंगामी सरकारच्या मंत्रिमंडळातील परराष्ट्रीय मंत्री.——२८५, २८६, ३२४, ३९०

लास्कर, एदुआर्द (१८२९-१८८४)—— जर्मन राजकारणी, नॅशनल लिबरल पार्टीच्या संस्थापकांपैकी व नेत्यापैकी एक.——१०९

लासाल, फर्डिनान्ड (१८२५-१८६४) ——जर्मन मध्यमवर्गीय सोशालिस्ट; लेखक; जनरल असोसिएशन ऑफ जर्मन वर्कर्स या संस्थेच्या संस्थापकांपैकी एक; कामगारवर्गीय चळवळीत संधिसाधूपणाचा (लास्सालियानिझमचा) स्रोत झालेल्या तत्त्वविचारात्मक ग्रंथांचा लेखक.——९४-१०३

लाय घाइरे (मृत्यु ४५८)—आयर्लंडचा राजा (४२८-५८).——२१५

लिओनार्दो दा विन्सी (१४५२-१५१९) —— (रेनेसान्सच्या) पुनरुज्जीवनाच्या कालखंडातील इटालियन चित्रकार, पंडित आणि इंजिनियर.——१७३, २४६

लिटलडेल, हॅरोल्ड——४५५

लिच्नोव्स्की, फेलिक्स (१८१४-१८४८) ——१८४८ साली फ्रँकफूर्ट नॅशनल असेंब्लीचा सदस्य, लेजिटिमिस्ट (सरकार पक्षीय); १८४८ च्या सप्टेंबर महिन्यात शेतकरी उठावाच्या प्रसंगी ठार झाला.——२५६, ३९९.

लीब्नीझ, गॉट्टफ्रिएड विल्हेल्म (१६४६-१७१६) —— जर्मन गणितशास्त्रज्ञ; अध्यात्मवादी तत्त्वज्ञ. —— ३४०, ४०४

लीब्नेख्ट, विल्हेल्म (१८२६-१९००) —— कम्युनिस्ट लीगचा सदस्य, १८४८-४९ च्या क्रान्तीतील सहभागी, जर्मन सोशल-डेमोक्रॅटिक पार्टीच्या संस्थापकांपैकी एक; मार्क्स आणि एन्गल्स यांचा स्नेही. ——११४, ४०३

लीव्हर, चार्ल्स जेम्स (१८०६-१८७२) —— इंग्रज कादंबरीकार, जन्माने आयरिश.——३३६, ४३७.

ली, जेन —— ४५५

ली, जेन्नी —— ४५३

लुई चौदावा (१६३८-१७१५) —— ——फ्रान्सचा राजा (१६४३-१७१५) ——२६१, ३६७

लुई अठरावा (१७५५-१८२४) —— फ्रान्सचा राजा (१८१४-१५ आणि १८१५-२४).——७६

लुई फिलिप पहिला (१७७३-१८५०) ——फ्रान्सचा राजा (१८३०-१८४८) ——८९, २७२, ४३७

लुक्रीशियस (टायटस लुक्रीशियस कॅरस) (खि. पू. c-९५-५५)--रोमन कवि आणि भौतिकवादी तत्त्वज्ञ, डे रेरम नॅचरा या कवितेचा लेखक--१९९, २०१, २०२

लुडविग पहिला बव्हेरियाचा (१७८६-१८६८) -- बव्हेरियाचा राजा (१८२८-४८). --३४८

लुसुल्लस, लुसियन लिसिनियस (खि. पू. c-१०६ c-५७)--ग्रीस व आशिया यांजविरुद्धच्या लष्करी मोहिमांचा रोमन सेनापती अफाट पैशाचा संग्रह करून राहिला. --२५४

लूथर, मार्टिन (१४८३-१५४६)-- धर्मसुधारणेचा नेता, जर्मनीतील प्रॉटेस्टंट पंथाचा (लूथेरिझमचा) नेता; जर्मन दुकानदारांचा वैचारिक मार्गदर्शक.--६०, ७५, ९६, २४६

लूसियेन (c-१२०-१८०) --ग्रीक उपहासगर्भ लेखक-- ९१, १९९, २०४, २१०, ४०९

लेस्के, कार्ल विल्हेल्म (मृत्यु c १८४५) --डार्मस्टाड्ट येथील प्रकाशक. --३७३

लेसिंग, गॉट्टहोल्ड एफ्राइम (१७२९-१७८१) --जर्मन लेखक, समीक्षक आणि तत्त्वज्ञ; प्रमुख ज्ञानजागृतिकार. --५८, ५९, १०८, १३८, १४६, ३४१, ३४७, ४११, ४१२, ४३५

लेव्हेरियेर, उर्बेन जीन जोसेफ (१८११-१८७७)--फ्रेंच खगोलशास्त्रज्ञ--३५३

लेन्चेन — पाहा डेमुथ, हेलन

लेर्मोन्तोव, मिखाइल यूर्येविच (१८१४-१८४१) -- रशियन कवि. --४४१

लोपे दे वेगा कार्पियो (१५६२-१६३५) --स्पॅनिश लेखक.--४४२

लोमोनोसोव, मिखाइल वासीलियेविच (१७११-१७६३) -- रशियन पंडित आणि कवि, रशियन साहित्यिक भाषेचा सुधारक--४०७, ४०८

लोरिया, ॲचिली (१८५७-१९४३)-- इटालियन समाजशास्त्रज्ञ आणि अर्थशास्त्रज्ञ, मार्क्सवाद खोटा ठरविणारा. --२४१

लोपाटिन, हेर्मान्न आलेक्झांद्रोविच (१८४५-१९१८)--रशियन क्रान्तिकारक नारोद्निक, पहिल्या इंटरनॅशनलचा सदस्य, मार्क्स आणि एन्गल्स यांचा स्नेही.--४१७

लव्हर, सॅम्युएल (१७७९-१८६८) --आयरिश कादंबरीकार--३३६.

व

वॅट्स, जॉन (१८१८-१८८७)--इंग्रज लेखक, ओवेनचा अनुयायी --१६०

वॅग्नर, रिचर्ड (१८१३-१८८३) -- जर्मन संगीतकार --२१०

वॉल्थेर फॉन डेर वोगेल्वीड्डे (c-११७०-१२३०)--जर्मन मिन्नेसिंगर.--११८

वॉला बेल्ले, ॲचिली दे (१७९९-१८७९) --फ्रेंच इतिहासकार आणि राजकारणी, नेमस्त भांडवलदारी रिपब्लिकन --३०६

वार्नहागेन फॉन एन्से, कार्ल ऑगस्ट (१७८५-१८५८)-- जर्मन लेखक आणि उदारमतवादी समीक्षक-- ३७६

बाख्स्मुथ, अर्न्स्ट विल्हेल्म (१७८४-१८६६)-- जर्मन इतिहासकार, -- ६१, १९१

विन्के, अर्न्स्ट फ्राइड्रिख जॉर्ज (१८११-१८७५)--जर्मन लिबरल राजकारणी; फ्रँकफुर्ट नॅशनल असेंब्लीचा सदस्य आणि मागाहून प्रशियन चेंबर ऑफ डेप्युटीजचा व प्रशियन प्रांतिक दियेचा सदस्य.--२५६

विझेतेल्ली, हेन्री (१८२०-१८९४)--इंग्रज प्रकाशक आणि पत्रकार.--८५

वियेरेक, लुई (१८५१-१९२१)--जर्मन सोशल-डेमोक्रॅट, "सोशालिस्टांविरुद्ध एक्सेप्शनल लॉ" अमलात असताना पार्टीच्या उजव्या गटाच्या नेत्यांपैकी एक; १८८४ ते १८८७ या मुदतीत बादशाही दियेचा सदस्य; १८९६ साली अमेरिकेला स्थलान्तरित झाला आणि सोशालिस्ट चळवळीतून निवृत्त झाला.--१११

विलिख, ऑगस्ट (१८१०-१८७८)--प्रशियन लष्करी अधिकारी; राजकीय मतांपायी लष्करातून निवृत्त; कम्युनिस्ट लीगचा सदस्य; १८५३ साली अमेरिकेला स्थलान्तरित; अमेरिकन यादवी युद्धात उत्तरविभागीयांच्या वतीने लढला.--४३२

विल्टन, मारी--नटी--४५२

विल्यम पहिला (१७९७-१८८८)--प्रशियाचा राजा (१८६१-८८) आणि जर्मनीचा बादशहा (१८७१-८८).--६२, ९२

विल्यम, तिसरा ऑफ ऑरेंज (१६५०-१७०२)--डच रिपब्लिकचा स्टाड-होल्डर (१६७१-१७०२) आणि इंग्लंडचा राजा (१६८९-१७०२)--२१८, ४२७

वीर्थ, जॉर्ज लुडविग (१८२१-१८५६)--जर्मन कामगारवर्गीय कवि, न्यूए न्हेनिश्ये झायटुंग या वृत्तपत्रांतील हास-प्रिहास विभागाचा संपादक; कम्युनिस्ट लीगचा सदस्य; मार्क्स आणि एन्गल्स यांचा स्नेही.--३९८, ४०२

विदोक, फ्रान्स्वा युजीन (१७७५-१८५७)--फ्रेंच गुन्हेगार, मागाहून पोलिसांचा गुप्त हेर.--२९१

विएन्बार्ग, लुडोल्फ (१८०२-१८७२)--जर्मन लेखक आणि समीक्षक, यंग जर्मनी साहित्यिक गटाचा सदस्य.--३७६, ३७८, ३७९

वूल्फरॅम फॉन एश्शेन्बाच (C-११७०-१२२०)--जर्मन कवि.--२२७.

वूल्फ, विल्हेल्म ("लूपूस") (१८०९-१८६४)--कम्युनिस्ट लीगचा एक संघटक आणि लीगच्या मध्यवर्ती समितीचा सदस्य; न्यू ए न्हेनिश्ये झायटुंग या वृत्तपत्राच्या संपादकांपैकी एक; मार्क्स आणि एन्गल्स यांचा स्नेही.--४००.

वेइटलिंग, विल्हेल्म (१८०३-१८७१)--जर्मन कामगारवर्गीय चळवळीच्या अव्वल अमदानीतील प्रमुख कार्यकर्ता; मनोराज्यवादी इहवादी कम्युनिझमचा एक वैचारिक मार्गदर्शक; व्यवसायाने शिंपी.--१६२, १६३

बेल्केर, कार्ल थिओडोर (१७९०-१८६९)--जर्मन वकील आणि लेखक; १८३० च्या व १८४० च्या दशकात जर्मन लिबरलांचा एक नेता.--३५९, ४३१

बेडेमेयर, जोसेफ (१८१८-१८६६)--कम्युनिस्ट लीगचा सदस्य; जर्मनीतील १८४८-४९ च्या क्रान्तीत सहभागी,

१८५१ साली अमेरिकेला स्थलान्तरित, अमेरिकन यादवी युद्धात उत्तर-विभागीयांच्या वतीने लढला; मार्क्स आणि एन्गल्स यांचा स्नेही आणि सह-योद्धा.--३९३, ३९५, ४०४

वेर्ने, होरेस (१७८९-१८६३) -- फ्रेंच चित्रकार, लढायांचे चित्रण करणारा.--१७४

व्हीटले, एच. बी.--४५५.

वायलँड, खिस्तोफ मार्टिन (१७३३-१८१३) -- ज्ञानजागृतिकार जर्मन लेखक.--३४१, ३४८

व्हॉल्टेअर, फान्स्वा मारी आरौएट डे (१६९४-१७७८) -- फ्रेंच तत्त्वज्ञ, उपहासगर्भ लेखक आणि इतिहासकार. ज्ञानजागृतिकार.--११०, १४६ १५९, १६०, २०४, २४९, २५२, २६९-७१, २८३

वेझिन, जर्मेन -- नटी -- ४४८

व्लॉदिस्लॉ चवथा सिगिस्मुंड (१५९५-१६४८)--पोलंडचा राजा (१६३२-४८)--४२५

श

शॉ, जॉर्ज बर्नार्ड (१८५६-१९५०) --इंग्रज नाटककार आणि राजकारणी; १८८० च्या दशकाच्या उत्तरार्धापासून फेबियन सोसायटीचा एक नेता--३३६

शार्लमेन (चार्ल्स द ग्रेट) (७४२-८१४) -- फ्रँकिश राजा (७६८-८००) आणि रोमन बादशहा (८००-१४). --२२४, २३६

शिलर, फ्राइड्रिख फॉन (१७५९-१८०५) -- जर्मन लेखक. --८४, ९६, १५१, ३४१, ३४२, ३४४, ३४८, ३५१

शुवालोव, इवान इवानोविच (१७२७-१७९७)--रशियन मुत्सद्दी, महाराणी एलिझाबेथ पेत्रोव्ना हिच्या मर्जीतला. --४०८.

शेक्स्पियर, विल्यम (१५६४-१६१६) --इंग्रज नाटककार आणि कवि--५०, ७८, ९६, ९९-१०१, १३१-३३, १५१, २५२, २५३, २५४, ३४५, ४३४, ४३५, ४३६, ४३९, ४४०, ४४२, ४४७-४५१, ४५४-४५९, ४६२, ४६३, ४६५, ४६७

शेले (शेली), पर्सी बायशी (१७९२-१८२२) --इंग्रज कवि--४४, ५१, १५९-१६१, ३१४.

शेतोब्रियां फ्रान्स्वा, रीनी व्हायकॉम्प्टे (१७६८-१८४८) -- फ्रेंच लेखक, प्रतिगामी मुत्सद्दी व डिप्लोमॅट; १८२२ साली व्हेरोना कॉंग्रेसमध्ये फ्रान्सचा प्रतिनिधी. --२५५, २८३, २८४

शोपेनहॉअर, आर्थर (१७८८-१८६०) -- जर्मन अध्यात्मवादी तत्त्वज्ञ --१०५

श्लोस्सेर, फ्राइड्रिख खिस्तोफ (१७७६-१८६१) --जर्मन लिबरल भांडवलदारी इतिहासकार, वेल्टगेस्चिख्टे या ग्रंथाचा लेखक. --२५४

श्लोझेर, ऑगस्ट लुडविग (१७३५-१८०९)-- जर्मन इतिहासकार--३४०

श्मिड्ट, कॉनरॅड (१८६३-१९३२) -- जर्मन सोशल-डेमोक्रॅट; याचा एन्गल्स यांच्याशी पत्रव्यवहार होता; मागाहून

हा दुरुस्तीवादी व कान्टियन झाला—— ३०९

श्रोमान्न, जॉर्ज फ्राइड्रिख (१७९३-१८७९)—— जर्मन इतिहासकार व भाषापंडित, ग्रीस विषयक ग्रंथकार. —— १९०

श्चूट्झ, खिश्चन गॉट्फ्रिएड (१७४७-१८३२)——जर्मन भाषाशास्त्रज्ञ——१८८

श्वाब, गुस्ताव (१७९२-१८५०) ——जर्मन रोमँटिक कवि, जर्मन महाकाव्ये आणि अभिजात पुराणकथा यांचा रूपान्तरकार.——२३१

श्वेद्रिन —पाहा साल्तिकोव एम. वाय.

शेली, मेरी (१७९७-१८५१)——इंग्रज कादंबरी लेखिका, कवि पर्शी बायशी शेले याची द्वितीय पत्नी.——५२

श्चूकिंग, लेविन (१८१४-१८८३)—— जर्मन लेखक आणि पत्रकार.——५१

श्चुमान्न, क्लारा——४५२

श्चूर्झ, कार्ल (१८२९-१९०६) जर्मन मध्यमवर्गीय डेमोक्रॅट, १८४९ सालाच्या बाडन-प्फाल्झ येथील उठावात सहभागी, १८५२ साली किन्केलचे तुरुंगातून पलायन याने संघटित केले; अमेरिकेला स्थलान्तरित. ——३९०

श्चूबार्ट, खिश्चन फ्राइड्रिख डानियल (१७३९-१७९१)—— कवि आणि लेखक; सरंजामी अरेरावशाही-विरोधी ग्रंथलेखनापायी याला एका किल्ल्यात डांबून ठेवण्यात आले. ——३४०

स

सँड, जॉर्ज (दुदेवान्त, ऑरोरे) (१८०४-१८७६)——फ्रेंच कादंबरीकार——५२, २८९

सँड, कार्ल लुडविग (१७९५-१८२०) ——जर्मन विद्यार्थी; जर्मन बुद्धिजीवी वर्गाच्या लिबरल चळवळीतील सहभागी; प्रतिगामी लेखक कोटझेतुहा याचा खून केल्याबद्दल फाशी गेला ——२९७, ४०३

सॅक्स, इमॅन्यूएल हॅन्स (१८५७-१८९६) ——ऑस्ट्रियन अर्थशास्त्रज्ञ, कवि आणि पत्रकार.——१३९

सॉक्रेटीस (खि. पू. ४६९-३९९)——ग्रीक अध्यात्मवादी तत्त्वज्ञ.——१९६, १९९

स्टॅफोर्ड, विल्यम (१५५४-१६१२) ——इंग्रज अर्थशास्त्रज्ञ.——४५५

स्कॉट, वॉल्टर (१७७१-१८३२) ——स्कॉटिश कादंबरीकार —— ३१४, ४३२, ४४०.

सार्दो, विक्तोरिएन (१८३१-१९०८) ——फ्रेंच नाटककार——४४९, ४५२, ४६२

सायबेल, कार्ल (१८३६-१८९८)—— जर्मन कवि, फ्रेडरिक एन्गल्स यांचा एक दूरचा नातेकाईक——९९, ३९६.

साफारिक, पावेल जोसेफ (१७९५-१८६१)——झेक भाषाशास्त्रज्ञ आणि इतिहासकार——४००

सान्चो——पाहा स्टिर्नर, मॅक्स

साल्तिकोव, मिखाइल येवग्राफोविच (लेखनातील टोपणनाव एन्. श्चेद्रिन) (१८२६-१८८९)——रशियन उपहासगर्भ लेखक——४१९, ४३७

सिडॉन्स, सारा (१७५५-१८३१) ——इंग्रज ट्रॅजिक नटी——४४८.

सिब्बर, कॉली (१६७१-१७५७) ——इंग्रज नट, नाटककार आणि कवि ——४५९, ४६२

सिमरॉक, कार्ल जोसेफ (१८०२-१८७६)--जर्मन कवि आणि भाषा-शास्त्रज्ञ; मध्ययुगीन जर्मन कवितांचा अनुवादक आणि जर्मन लोकप्रिय ग्रंथांचा प्रकाशक.--२३३, २३७, २५४

सिसेरो, मार्कस टुलियस (ख्रि. पू. १०१-४३) रोमन वक्ता आणि मुत्सद्दी; एक्लेक्टिक (निवडवादी) तत्त्वज्ञ--१९४, १९९, २४२

सिस्बाओथ (ख्रि. पू. तिसरे शतक) --अल्स्टरचा (उत्तर आयर्लंडचा) राजा--२१४

सिस्माँडी, जीन चार्ल्स लिओनार्ड सिस्माँडी डे (१७७३-१८४२)--स्विस मध्यम वर्गीय इतिहासकार आणि अर्थशास्त्रज्ञ.--२८०

सीझर, गेयस ज्यूलियस (ख्रि. पू. १००-४४)--रोमन सेनापति आणि मुत्सद्दी--७६, १८४, २५४

सुलिव्हन, बॅरी--आयरिश नट.--४४८

सुल्के, फौस्टीन (C. १७८२-१८६७)--हैतीच्या रिपब्लिकचा अध्यक्ष; १८४९ साली त्याने बादशहा म्हणून (फौस्तीन पहिला) स्वतःची ग्वाही फिरविली; १८५९ साली त्याला उलथून पाडण्यात आले.--४००

सुए, युजीनी (युजीन) (१८०४-१८५७)--फ्रेंच कादंबरीकार.--२८९, २९०, २९२, २९७, २९८

सुल्ला, लुसियस कॉर्नेलियस (ख्रि. पू. १३८-७८)--रोमन सेनापति आणि मुत्सद्दी.--२५४

से, जीन बॅप्टिस्ट (१७६७-१८३२) --फ्रेंच अर्थशास्त्रज्ञ, ॲडाम स्मिथचा शिष्य.--७६

सेंट ब्यूव्हे, चार्ल्स ऑगस्टिन (१८०४-१८६९)--फ्रेंच समीक्षक, कवि आणि साहित्यिक इतिहासकार.--२८४

सेंट-जस्ट आन्तोइन (१७६७-१७९४) --फ्रेंच राज्यक्रान्तीत प्रामुख्याने पुढे आलेला; जॅकोबिन नेता--७५

सेंट-सायमन, क्लॉड हेन्री (१७६०-१८२५)--फ्रेंच मनोराज्यवादी सोशा-लिस्ट--८६, १०६, ३२९, ३७५

सेनेका, लूसियस ॲन्नियस (C. ख्रि. पू. ४-इ. स. ६५)--रोमन स्टोइक तत्त्वज्ञ आणि नाटककार--२०३.

सेप्टिमियस सेव्हेरस (१४६-२११) --रोमन बादशहा (१९३-२११) --२०५.

सेर्वान्टीस (सेर्व्हान्टिस) सावेद्रा मिगुएल दे (१५४७-१६१६)--स्पॅनिश लेखक--८४, २५६, ४३७, ४४२

सेर्टोरियस, क्विन्टुस (ख्रि. पू. C. १२३-७२)--रोमन सेनापती --२५४

स्टार्के, कार्ल निकोलाय (१८५८-१९२६) --डॅनिश तत्त्वज्ञ आणि समाजशास्त्रज्ञ. --२७१

स्टर्न, लॉरेन्स (१७१३-१७६८)--इंग्रज लेखक, सेन्टिमेन्टॅलिझमचा (भावना विवशतेचा) प्रतिनिधी--२६१.

स्टाहर, ॲडोल्फ विल्हेल्म (१८०५-१८७६)--जर्मन लेखक, ऐतिहासिक कादंबऱ्यांचा लेखक आणि कला व साहित्य यांच्या इतिहासावरील अभ्यास-पूर्ण ग्रंथकार.--३८९

स्टिर्नर, मॅक्स (श्मिडट, योहान्न कॅस्पार) (१८०६-१८५६)--जर्मन तत्त्वज्ञ,

यंग हेगेलियन, मध्यमवर्गीय अराज्य वादाचा वैचारिक मार्गदर्शक.—१७४.

स्टोन, डब्ल्यू.—४५६.

स्ट्राऊस, डेव्हिड फ्राइडरिख (१८०८-१८७४)—जर्मन धर्मशास्त्रज्ञ, डाव्या गटाचा हेगेलियन, डास लेबेन जेसू या ग्रंथाचा लेखक (१८३५).—१५९, १६१, ३२१.

स्टॉडट्मॅन्न, ॲडोल्फ (१८२९-१८७९) —जर्मन लेखक, भांडवलदारी डेमोक्रॅट.—३८६, ३८९

स्ट्रूवे, गुस्ताव (१८०५-१८७०)—जर्मन मध्यमवर्गीय डेमोक्रॅट, पत्रकार; बाडन आणि बाडन-फाल्झ येथील उठावांच्या नेत्यांपैकी एक.—४३०

स्टुब्बे, फिलिप्प.—४५५

स्वोबोदा, वाक्लाक (१७९१-१८४९) —झेक कवि आणि भाषाशास्त्रज्ञ, रुकोपिस क्रालोवेद्वोर्स्की या ग्रंथाचे त्याने जर्मन भाषेत भाषांतर केले.—४०७

स्विफ्ट, जोनाथन (१६६७-१७४५)— इंग्रज उपहासगर्भ लेखक.—३१३

स्झेलिगा—पाहा झायूख्लिन्स्की, फ्रॅन्झ —२८९, २९०, २९३, २९४, ३०४

स्पाल्डिंग डब्ल्यू.—प्रोफेसर.—४५५

स्पार्टाकस (मृत्यु ख्रि. पू. ७१)—रोमन गुलामांच्या उठावाचा नेता (ख्रि. पू. ७३-७१).—२५४, ४३४

स्मिथ, ॲडम (१७२३-१७९०)—इंग्रज अर्थशास्त्रज्ञ.—६१, १४०, १४३, १५९, ४१०, ४४४, ४४६

स्पिनोझा, बारुच (बेनेडिक्टस) डे (१६३२-१६७७)—डच भौतिकवादी तत्त्वज्ञ, नास्तिक.—२६६

स्तोर्च, हाइनरिख (आन्द्रेइ कार्लोविच) (१७६६-१८३५)—रशियन अर्थशास्त्रज्ञ आणि आकडेशास्त्रज्ञ.—१३७, १३८

ह

ह.—पाहा, हर्मीज, कार्ल हाइनरिख

हेकेल, अर्न्स्ट हाइनरिख (१८३४-१९१९)—जर्मन निसर्गवेत्ता, चार्ल्स डार्विनचा अनुयायी; भौतिकवादी. —२७३

हक्स्ले थॉमस हेन्री (१८२५-१८९५) —इंग्रज निसर्गवेत्ता आणि तत्त्वज्ञ— ४६५.

हाइंडमन, हेन्री मायर्स (लेखनातील टोपणनाव जॉन ब्रॉडहाऊस), (१८४२-१९२१)—इंग्रज सोशालिस्ट, सुधारणावादी.—११७.

हर्मीज, कार्ल हाइनरिख (एच.) (१८००-१८५६)— जर्मन प्रतिगामी लेखक.—१९९

ह्यूगो, व्हिक्टर (१८०२-१८८५)— फ्रेंच लेखक.—२८६, २८७-८८, २९६-९७.

हर्झेन, अलेक्झांडर इवानोविच (१८१२-१८७०) — रशियन क्रान्तिकारक डेमोक्रॅट, भौतिकवादी तत्त्वज्ञ आणि लेखक— ४१३, ४२०

हर्शेल, विल्यम (१७३८-१८२२) —इंग्रज खगोलशास्त्रज्ञ. —७४१

हेर्वे जॉर्ज (१८१७-१८७५) —— जर्मन क्रान्तिकारक कवि, मध्यमवर्गीय डेमोक्रॅट—— ३७३

हेर्बार्ट, योहान्न फ्रायड्रिख (१७७६-१८४१) —— जर्मन अध्यात्मवादी तत्त्वज्ञ, मानसशास्त्रज्ञ आणि शिक्षक. ——१०५

हॅरिसन, विल्यम—— ४५५

हार्टमान्न, मॉरिट्झ (१८२१-१८७२) ——ऑस्ट्रियन कवि; १८४० च्या दशकात "खऱ्या सोशालिझमशी" एकनिष्ठ राहिला.——१०५.

हॉफमान्न, अर्न्स्ट थिओडोर आमाडेन्स (१७७६-१८२२)——जर्मन रोमँटिक लेखक——३८६, ४०३

हॉफमान्न —— हॅम्बर्ग येथील प्रकाशक, १८१८ साली स्थापन झालेल्या हॉफमान्न आणि कॅम्पे पब्लिशिंग हाऊसचा सह चालक —— ३९०, ४०३

हॉब्ज, थॉमस (१५८८-१६७९) ——इंग्रज तत्त्वज्ञ, यांत्रिक भौतिकवादाचा संस्थापक —— ५५, २६७

हॉलिन्सहेड, राफेल (मृत्यु C. १५८०) ——इंग्रज बखरकार; त्याच्या क्रॉनिकल्स ऑफ इंग्लंड, स्कॉटलंड अँड आयर्लंड या बखरींचा बापर शेक्स्पियरने आपल्या ऐतिहासिक नाटकांमध्ये केला.—— २५१

हॉल्बॅच, पॉल हेन्री (१७२३-१७८९) फ्रेंच भौतिकवादी तत्त्वज्ञ, नास्तिक; अठराव्या शतकातील फ्रेंच क्रांतिकारक भाडवलदारांचा एक वैचारिक मार्गदर्शक —— १५९, १६१, २६७, २६८

हान्का, वाक्लाव (१७९१-१८६१)—— झेक पंडित आणि कवि, राष्ट्रीय बंध विमोचन चळवळीचा एक नेता; झेलेनोग्राद्स्की आणि क्रालोवेद्वोर्स्की या हस्तलिखितांचा प्रकाशक म्हणून हा गाजला; प्राचीन झेक काव्य वाङ्मयाचे हे अवशेष असल्याचा याने बहाणा केला; मागाहून ही साहित्यिक बनाबटगिरी असल्याचे सिद्ध झाले. ——४०७

हान्डेल, जॉर्ज फ्राइडरिख (१६८५-१७५९) ——जर्मन संगीतकार——३४३

हान्सेमान्न, डेव्हिड (१७९०-१८६४) ——बडा जर्मन भांडवलदार, लिबरल रहेनिश भांडवलदारांचा एक नेता. ——४३१

हायने, हाइनरिख (१७९७-१८५६) ——जर्मन क्रान्तिकारक कवि.—— ९२, १०८, २०३, ३७१-७५, ३७७, ३७८, ३८४, ३९९, ४००-०१, ४३६

हाइन्झेन, कार्ल (१८०९-१८८०) ——जर्मन लेखक, भांडवलदारी डेमोक्रॅट; मार्क्स आणि एन्गल्स यांचा विरोधक; १८४८-४९ च्या क्रान्तीत सहभागी; मागाहून अमेरिकेला स्थलान्तरित ——३७५, ४१०

हार्कनेस, मार्गारेट (लेखनातील टोपणनाव जॉन लॉ)——१८८० च्या दशकातील इंग्रज सोशालिस्ट लेखिका——८५-८८

हेक्कर, फ्राइड्रिख कार्ल (१८११-१८८१) ——जर्मन डेमोक्रॅट, १८४८ च्या एप्रिल महिन्यातील बाडन येथील उठावाचा एक नेता; मागाहून अमेरिकेला स्थलांतर केले; अमेरिकन यादवी युद्धात उत्तर-विभागीयांच्या वतीने लढला.——४३०

हेगेल, जॉर्ज विल्हेल्म फ्राइडरिख (१७७०-१८३१)--जर्मन तत्त्वज्ञ, वस्तुनिष्ठ अध्यात्मवादी; अध्यात्मवादी विरोधविकासाचे विवरण केले. ४९, ५५, ६०, ९१, १०५, १०६, १५४, २६३, २६६, २६८, २७१, २७२, २७३, ३२०, ३४२, ३४४, ३४५, ३४८, ३६६, ३७१, ३७६, ३७७, ३७८

हेस्स, मोझेस (१८१२-१८७५) --जर्मन मध्यमवर्गीय लेखक, "खऱ्या सोशालिझमचा" वैचारिक मार्गदर्शक --३४८, ३७३

हेल्वेटियस, क्लॉड एड्रियन (१७१५-१७७१)--फ्रेंच भौतिकवादी तत्त्वज्ञ, ज्ञानजागृतिकार.--१६१, २६६, २६७, २६८

हेन्री आठवा (१४९१-१५४७) --इंग्लंडचा राजा (१५०९-१५४७) --२५१, ४४८

हेन्री द लायन (११२९-११९५) --ड्यूक ऑफ सॅक्सनी (११३९-८१) आणि बव्हेरिया (११५६-८१). --२३२

हेर्डेर, योहान्न गॉट्टफ्रिएड फॉन (१७४४-१८०३) -- जर्मन ज्ञानजागृतिकार, लेखक आणि तत्त्वज्ञ.--३४१

हेरोडोटस (खि. पू. c. ४८४- c. ४२५) --ग्रीक इतिहासकार.--१९१

होमर--प्राचीन ग्रीसचा महाकवि, इलियड आणि ऑडिस्सी या महाकाव्यांचा लेखक.--१८४, १८५, १९०, २०१, २३३, ४०१, ४३९, ४४६

होरेस (क्विन्टस हॉरॅशियस फ्लॅक्कस) (खि. पू. ६५-c) --रोमन कवि.--२०३, ४०२

हौस्मान्न, जॉर्जीस युजीन (१८०९-१८९१)-- फ्रेंच राजकारणी, बोनापार्टिस्ट, सीन विभागाचा प्रिफेक्ट (१८५३-१८७०); पॅरिस शहराच्या पुनर्बांधणीच्या कामाचा मार्गदर्शक. --१६५.

साहित्यिक आणि पौराणिक नामसूचि

अॅचिलीस--ग्रीक पुराणकथांनुसार ट्रोजन युद्धाचा महान वीरपुरुष.--७८, १८५, १८९

आदम (बायबल)--१५६, २२८

अँटीगनी--सोफोक्लीस आणि एस्किलस यांच्या शोकान्तिकांतील प्रमुख पात्र.--४५७

अँड्रोनिकस--पॅलेस्टिनियन मठातील महंत जिरासिम याने लिहिली असा समज असलेल्या गुलाम अॅन्ड्रोनिकस याच्या कथेतील प्रमुख पात्र--२३२

अथेना (ग्रीक पुराणकथेतील)--युद्ध आणि शहाणपण याची देवता.--१८६, १८७, २००

अपोल्लो (ग्रीक पुराणकथेतील)--कलांचा अधिष्ठाता ग्रीक देव.--१८६, १८७, १९६

आगामेम्नॉन-ग्रीक पुराणकथांतील नायक, होमरकृत इलियड आणि एस्किलसकृत ओरेस्टेया आणि आगामेम्नॉन या शोकान्तिका यांमधील प्रमुख पात्र--१८५, १८६, १८९

आयेगिस्थस (एजिस्थुस)--एस्किलसकृत ओरेस्टेया या नाटकातील पात्र--१८६

आयेजिप्टस (ईजिप्टुस)--एस्किलसकृत द सुप्लिसेस या नाटकातील पात्र.--१८८.

आयेनियास--ट्रॉय शहराचा संरक्षक, व्हर्जिलकृत आयेनीड या महाकाव्यातले प्रमुख पात्र.--२१४

आहासुक्रुस--मध्ययुगीन पुराणकथा आणि डेर एविगे जूडे हा लोकप्रिय जर्मन ग्रंथ यांतील पात्र.--२३३

आर्थर ग्रॅट--मार्गारेट हार्कनेसकृत सिटी गर्ल या कादंबरीतील पात्र.--८६

आर्नोल्ड - मिन्ना कौट्स्कीकृत डाय आल्टेन उन्ड डाय न्यूएन या कादंबरीतील पात्र.--८४

इओ (ग्रीक पुराणकथांतील)--आर्गोसचा राजा इनाचुस याची कन्या आणि झ्यूसची प्रेयसी, हिला गेराकडून कालवडीचे रूप मिळाले.--१९४

इसोल्दे--मध्ययुगीन स्त्रीदाक्षिण्ययुक्त कादंबरी त्रिस्तान आणि इसोल्दे हिच्यातील प्रमुख पात्र.--३५

ईव्ह-(बायबल) --२२८

उटे द नॉर्वेजियन--तेराव्या शतकांतील जर्मन महाकाव्य गुद्रुन यांतील पात्र.--२०९

उल्रिच फॉन हुट्टेन—लासालकृत फ्रॅन्झ फॉन सिकिन्जेन–या नाटकातील एक पात्र.— ९५, ९६, ९७, १००, १०२

एट्झेल—नायबेलुन्गोन्लिएड या काव्य-ग्रंथातील एक पात्र.–२०९

एन्सेलाडुस—ग्रीक पुराणकथातील एक पात्र.— ३८४

एयुमाएयुस—होमरकृत ऑडिस्सी या महाकाव्यातील एक पात्र.—१८५

एरिन्येस—(ग्रीक पुराणकथांतील)—राक्षसिणी; एस्किलसकृत युमेनाइडेस या नाटकातील एक पात्र—१८२

एल्सेबार्र (एल्सा)—मिन्ना कौट्स्कीकृत डाय आल्टेम उन्ड डाय न्यूएन या कादंबरीतील एक पात्र—८४

ऑडिस्यूस—होमरकृत ऑडिस्सी व इलियड या महाकाव्यांचा मुख्य नायक.—१८५

ऑथेल्लो—शेक्स्पिअरकृत याच नावाच्या नाटकाचा नायक—४४८, ४५२

ओरेस्टेस—एस्किलसकृत ओरेस्टेया या नाटकत्रयीचा मुख्य नायक—१८६

ऑफेलिया—शेक्स्पिअरकृत हॅम्लेट या नाटकातील एक पात्र—४४८

ओलुफ—"हेर ओलुफ" या प्राचीन डॅनिश पोवाड्याचा मुख्य नायक —२२२, २२३

कॅस्सान्ड्रा (ग्रीक पुराणकथेतील)—प्रियामची कन्या, भविष्यकथनाची देणगी लाभलेली; एस्किलसकृत ॲगॅमेम्नॉन या शोकांतिकेतील एक पात्र.—१८९

कायसेर—आयरिश बखरीनुसार नोआची नात. — २१४

कॉर्डेलिया — शेक्स्पियरकृत किंग लियर या नाटकातील एक पात्र — ४४८

क्रिएमहिल्ड — नायबेलुन्गोन्लिएडमधील एक पात्र — २०९

क्लॉडियस — कैसर ऑक्टेव्हियानस या लोकप्रिय जर्मन ग्रंथातील एक पात्र. —२३५

क्लारिन—काल्डेरॉनकृत एल् मॅजिशियो प्रॉडिजिओसो या नाटकातील एक पात्र. —२५६

क्लिटेम्नेस्ट्रा (ग्रीक पुराणकथेतील)—एस्किलसकृत ओरेस्टेया या नाटकातील ॲगॅमेम्नॉन याची पत्नी; ती याचा खून करते.—१८६

क्लेमेन्ट्स—कैसर ऑक्टेव्हियानस या लोकप्रिय जर्मन ग्रंथातील एक पात्र. —२३५

क्लो–लोन्गुस या ग्रीक लेखकाच्या डाफ्निस आणि क्लो या कादंबरीची नायिका.—२०८

ख्रिस्त, जीसस (बायबल) — २०४, ३५५, ३८७, ३८८

गनीमीड (ग्रीक पुराणकथा)—एक देखणा मुलगा, झ्यूसने वर ऑलिम्पसकडे नेलेला; झ्यूसचा हुजऱ्या.— १९१

गुन्द्रुन—जर्मन महाकाव्यातील प्रमुख पात्र.—२०९

गुन्थर -- नायबेलुन्गेन्लिडमधील एक पात्र.--२०९
गोट्झ फॉन बेर्लिचिन्जेन--गटेकृत याच नावाच्या नाटकाचा नायक.--९५
गोल्डस्मिथ--वाल्झॅककृत याच नावाच्या लघु कादंबरीचा नायक.--३१३
ग्रियो, दे--प्रिव्होस्तकृत मानोन लेस्कॉ या कादंबरीतील एक पात्र.--२८३
ग्रिसेल्डिस--लोकप्रिय जर्मन ग्रंथातील प्रमुख पात्र.--२३४
ग्रेट्चेन--गटेकृत फाऊस्ट या नाटकातील प्रमुख पात्र.--४३४

चार्ल्स पाचवा--जर्मन बादशहा, याचे चित्रण लासालने फ्रॅन्झ फॉन सिकिन्जेन या आपल्या नाटकात केलेले आहे. --९७, १००
चौरीनूर--युजीन सुएकृत लेस मिस्टेरेस दे पॅरिस या कादंबरीतील एक पात्र. --२९०, २९१, २९३, २९४, २९५

जर्मेन--युजीन सुएकृत लेस मिस्टेरेस दे पॅरिस या कादंबरीतील एक पात्र. --२९३
जॉर्ज, मादाम--युजीन सुएकृत लेस मिस्टेरेस दे पॅरिस या कादंबरीतील एक पात्र.--२९८, २९९, ३०१
जेनोव्हेफा--याच नावाच्या लोकप्रिय जर्मन ग्रंथातील प्रमुख पात्र.-२३४, २३५
जीसस--पाहा ख्रिस्त, जीसस
जॉस, फ्रिझ--लासालकृत फ्रॅन्झ फॉन सिकिन्जेन या नाटकातील एक पात्र --१०१
जुडास इस्केरियॉट (बायबल)--२३३
जुपिटर (गुरु) (रोमन पुराणकथा)--रोमन लोकांचा सर्वश्रेष्ठ देव--७८, २०४

इयूस--सर्वश्रेष्ठ ग्रीक देव--३४४, ४४१

टेलेमाचुस -- होमरकृत ऑडिस्सीमधील एक पात्र. -- १८९
टेलामान--होमरकृत इलियडमधील एक पात्र.--१८९
टयूक्रोस -- होमरकृत इलियडमधील एक पात्र. -- १८९

डानाइडेस (ग्रीक पुराणकथा) आर्गोसचा राजा. डानाऊस याच्या कन्यका --१८८
डानाऊस (ग्रीक पुराण कथा)--आर्गोसचा राजा--१८८
डाफ्निस लोन्गुसकृत डाफ्निस आणि क्लो या कादंबरीतील प्रमुख पात्र.--२०८
डेव्हिड--युजीन सुएकृत लेस मिस्टेरे दे पॅरिस या कादंबरील एक पात्र.--२९१
डेमोडोकुस -- होमरकृत ऑडिस्सी या महाकाव्यातील एक पात्र.--१८५
डेस्डिमोना--शेक्स्पियरकृत ऑथेल्लो या नाटकाची नायिका.--४४८
डॉन क्विक्झोट--सेर्व्हान्टिसकृत याच नावाच्या कादंबरीचा नायक.--९५, २३५, २४८, २५७
डो(सो)रोथिया -- गटेकृत हर्मान्न उन्ड डोरोथिया या कादंबरीची नायिका.--३५९
डुल्कामारा--इटालियन कळसूत्री बाहुल्यांच्या खेळातील एक पात्र.--२४१

डन्स पहिला (मठ्ठ नंबर एक)—पोपकृत डन्सियड या कवितेतील एक पात्र—३१३

डन्स दुसरा (मठ्ठ नंबर दोन)—पोपकृत डन्सियड या कवितेतील एक पात्र—३१३

त्रिस्तान— मध्ययुगीन स्त्री दाक्षिण्य युक्त कादंबरी त्रिस्तान उन्ड इसोल्डे हिच्यातील प्रमुख पात्र—२३७

नॅजोर्द (नॉर्वेजियन पुराणकथा)—नाविकांचा संरक्षक देव—२११

नोआ (बायबल)—२१४

पॅन (ग्रीक पुराणकथा)—कुरणांचा व जंगलांचा देव, मेंढपाळ व गुरे यांचा रक्षणकर्ता—४४

पॅन्टालून (पॅन्टालोने) — इटालियन सुखाना लोकनाट्यातील एक पात्र—२५२

पॉल (बायबल) — ७५

पेक्स्निफ् — डिकन्सकृत मार्टिन चुझ्झलिट या कादंबरीतील एक पात्र — ३२०

पेग वॉफिंग्टन — टॉम टेलर आणि चार्ल्स रीड या लेखकद्वयाच्या मास्क्स अॅन्ड फेसेस या नाटकातील प्रमुख पात्र —४५२

पीनीलोप — होमरकृत ऑडिस्सी या महाकाव्यातील एक पात्र — ४५२

पॉन्टुस — लोकप्रिय जर्मन ग्रंथ पॉन्टुस उन्ड सिडोनिया यातील प्रमुख पात्र — २३६

प्रॉमिथ्यूस (ग्रीक पुराणकथा) — अॅलिम्पसमधून माणसासाठी अग्नि चोरून आणणारा महाराक्षस; एस्किलकृत प्रॉमिथ्यूस बाऊंड या शोकान्तिकेतील पात्र. — १८८, १९८, ३५०

प्रॉमिथ्यूस — गटेकृक याच नावाच्या कवितेचा नायक.—३५२.

फाल्स्टाफ—शेक्स्पियरकृत मेरी वाइव्हज ऑफ विंडसर आणि हेनरी चौथा या नाटकांतील पात्र.—१०१.

फामा (रोमन पुराणकथा)—अफवेचे मूर्तरूप.—७८

फाऊस्ट — एका लोककथेचा व गटेच्या नाटकाचा नायक. — २३३, २५६, ३४५, ३५०, ३६४

फायेरब्रास — लोकप्रिय जर्मन ग्रंथाचा नायक.—२३६

फिन्गल—मॅकफर्सनकृत ऑस्सियनमधील एक पात्र —२१८

फिन्न मॅक कुम्हाल — आयरिश महाकाव्यांचा नायक.—२१८

फोल्कर— नायबेलुंगेन्लिएड मधील एक पात्र.—४०२

फ्लर दे मारी—युजीन सुएकृत लेस मिस्तेरेस दे पॅरिस या कादंबरीची नायिका.—२९४, २९६, २९८-३०५

फ्लॉरेन्स—लोकप्रिय जर्मन ग्रंथ कैसर ऑक्टोव्हियानुस यांतील एक पात्र.—२३५

फ्रासोन—टेरेन्सकृत यूनूथूस या सुखान्त नाटकातील एक पात्र

फ्रॅन्झ फॉन सिकिन्जेन—लासालकृत याच नावाच्या नाटकाचा नायक.—९५, ९६, ९७, १००, १०२

फ्रेया (नॉर्वेजियन पुराणकथा)--प्रेम आणि साफल्य यांची देवता.--२१०
फ्रायडे — डीफोकृत रॉबिन्सन क्रूसो या कादंबरीतील एक पात्र--३११

बाल्थासार -- लासालकृत फ्रॅन्झ फॉन सिकिन्जेन या नाटकातील एक पात्र.--९५, ९६, १००
ब्रिनहिल्ड (बुनहिल्ड) -- नायबेलुन्गेन्लिएड व एड्डा या महाकाव्यांची नायिका.—२०९, ३३८

मॅकडफ--शेक्स्पियरकृत मॅक्बेथ नाटकांतील एक पात्र--४५१
मॅकबेथ--शेक्स्पियरकृत याच नावाच्या नाटकाचा नायक —४४८, ४४९, ४५०, ४५१
मानोन लेस्को-- प्रेव्होस्तकृत याच नावाच्या कादंबरीचा नायक— २८३
मारी—लासालकृत फ्रॅन्झ फॉनसिकिन्जेन या नाटकातील एक पात्र--२७
माल्व्होलियो--शेक्स्पियरकृत ट्वेल्फथ-नाइट या सुखान्त नाटकातील एक पात्र.—४५६
मिनॉस (ग्रीक पुराणकथा)--क्रीटचा राजा, त्याच्या मृत्यूनंतर पाताळातील सर्वोच्च न्यायाधीश.--३५२
मेफिस्टोफलिस--गटेकृत फाऊस्ट या नाटकातील पात्र.--२१०, ३५०
मेर्कादे--वाल्झेककृत ले फैस्यूर या सुखान्त नाटकातील एक पात्र.--३०७
मैत्र द इकोले — युजीन सुएकृत लेस मिस्टेरेस दे पॅरिस या कादंबरीतील एक पात्र.—२९१, २९३
मुर्फ—युजीन सुएकृत लेस मिस्टेरेस दे पॅरिस या कादंबरीतील एक पात्र.--२१३

मुलिओस -- होमरकृत ऑडिस्सी या महाकाव्यातील एक पात्र.--१८५
मोझेस (बायबल)--२१४
मॉरोल्फ (मार्कोल्फ)-- जर्मन लोकप्रिय ग्रंथ सालोमॉन उन्ड मॉरोल्फ याचा नायक.--२४८
मास्कोन--काल्डेरॉनकृत एल् मॅजिशियो प्रॉडिजिओसो या नाटकातील एक पात्र.--२५६
मॉर्गन ल फे (केल्टिक पुराणकथा) केल्ट-जमातीच्या नऊ संरक्षक देवतांपैकी एक.--२९३
राझर लॉड ब्रॉक -- पाचीन स्कॅन्डिनेवियन महाकाव्य क्राकुमाल यांतील एक पात्र. -- २१९
रामेओ -- दीदरोकृत ले नेव्यू दे रामेओ या कादंबरीतील एक पात्र. -- २७१, २७३
रॉबिन्सन -- डीफोकृत रॉबिन्सन क्रूसो या कादंबरीचा नायक. -- ३११, ३१२
रिचर्ड ऑफ ट्रियर--लासालकृत नाटक फ्रॅन्झ फॉन सिकिन्जेन यातील एक पात्र.--९
रोलां--प्राचीन फ्रेंच महाकाव्य चान्सोन दे रोलां याचा नायक.--२२३
रुडोल्फ, प्रिन्स ऑफ गेरोल्डस्टीन—युजीन सुएकृत लेस मिस्टेरे दे पॅरीस या कादंबरीतील एक पात्र.--२९०, २९१, २९२, २९३, २९४, २९५,

२९६, २९७, २९८, २९९, ३००, ३०४

रेइनाल्ड--लोकप्रिय जर्मन ग्रंथ डाय हैमॉन्सकिंडर यांतील एक पात्र.--२३५

ऱ्हादामान्थुस (ग्रीक पुराणकथा)--पाताळातील न्यायाधीश.--३३३

लाऊन्स--शेक्स्पियर कृत टू जंटलमेन ऑफ व्हेरोना या सुखान्त नाटकातील एक पात्र.--२५२

लाझारस (बायबल)--२०४, ३०८

लापोर्ते युजीन सुएकृत लेस मिस्टेरेस दे पॅरिस या कादंबरीतील एक पात्र.--२९८, २९९, ३०१.

लियर--शेक्स्पियरकृत याच नावाच्या नाटकाचा नायक --४४८.

लोकी--नॉर्वेचा अग्निदेव, एल्डर एड्डा या प्राचीन स्कँडिनेवियन महाकाव्यातील एक पात्र.--२१०.

लॉट (बायबल).--४७.

लोट्टे (शार्लट) गटेकृत डाय लीडेन डेस जुंगेन वेर्टर या कादंबरीतील पात्र. --३५४

वाग्नर--गटेकृत फाऊस्ट या नाटकातील फाऊस्टचा शिष्य.--३४५

वाल्थर, मार्कग्राफ--जर्मन लोकप्रिय ग्रंथ ग्रिसेल्डिस यातील एक पात्र.--२३४

विल्हेल्म मीस्टर--गटेकृत विल्हेल्म मीस्टर लेह्र-उन्ड वान्डर जाह्रे या कादंबरीचा नायक.--३५५, ३६४, ३६६

वेर्टर--गटेकृत डाय लीडेन डेस जुंगेन वेर्टर या कादंबरीचा नायक.--३५४, ३५५

व्हल्कन--रोमन अग्निदेव व धातुकामाचा देव.--७८

सँको पान्झा--सेर्वान्टिसकृत डॉन क्विक्झोट या कादंबरीतील एक पात्र. --२४८

सॅम्युएल (बायबल)--हिब्रू प्रेषित; कार्ल गुरश्कौकृत कोनिगसॉल या नाटकातील एक पात्र.--२२६

सालोमोन--जर्मन लोकप्रिय ग्रंथ सालोमोन उन्ड मोरोल्फ यांतील प्रमुख पात्र --२४८

सिगूर्ड--प्राचीन स्कॅन्डिनेवियन महाकाव्याच्या प्रमुख नायकांपैकी एक.--३३८

सिगेबान्ट ऑफ आयर्लंड--१३ व्या शतकातील गुद्रुन या महाकाव्यातील एक पात्र.--२०९

सिएग्वार्ट--जे. एम्. मिलरकृत याच नावाच्या कादंबरीचा नायक.--३८६ ३८९

सीग्फ्रीड ऑफ मोरलँड--तेराव्या शतकातील गुद्रुन या महाकाव्यातील एक पात्र.--२११, २१३, २३५

स्नानारेल्ले-इटालियन कळसूत्री बाहुल्यांच्या खेळातील एक पात्र.--२४१

हर्क्युलस (हेराक्लीस) ग्रीक पुराणकथातील वीर पुरुष--३५८, ३६१

हर्मीस (हर्मीज) (ग्रीक पुराणकथा)--

देवांचा जासूद आणि गौरवकर्ता आणि प्रवासी, व्यापारी व चोर यांचा आश्रय दाता.--७८, १९८

हॅम्लेट--शेक्स्पियरकृत याच नावाच्या नाटकाचा नायक.--४४८, ४४९, ४५१, ४५८, ४६५

हाइनरिख फॉन ऑफ्टरडिंगेन--नेवालीसकृत कादंबरीचा नायक.--३-७

हाबाकुक (बायबल).--७६

हार्टमुट ऑफ ओर्मानी--तेराव्या शतकातील गुद्रुन या जर्मन महाकाव्यातील एक पात्र.--२०९

हिर्लान्डा--लोकप्रिय जर्मन ग्रंथातील प्रमुख पात्र.--२३४

हेट्टेल ऑफ हेगेलिन्गेन--तेराव्या शतकातील गुद्रुन या जर्मन महाकाव्यातील एक पात्र.--२०९

हेलेना--लोकप्रिय जर्मन ग्रंथातील प्रमुख पात्र.--२३५

हेर्विग ऑफ सीलँड--तेराव्या शतकातील गुद्रुन या जर्मन महाकाव्यातील एक पात्र.--२०९

मराठी ग्रंथ संग्रहालय पुणे
दा. क्र. 27-2-62
ग्रंथ शाखा (स्थळ प्रत)

REFBK-0024272

काही महत्त्वाच्या दुरुस्त्या

मूळ अनुवाद छापायच्या अगोदर प्रस्तावनेचा अनुवाद छापला गेल्यामुळे तीतील पृष्ठांचे संदर्भ इंग्रजीतले आहेत त्या ऐवजी पुढीलप्रमाणे मराठी पृष्ठांक वाचावेत.

प्रस्तावनेचे पृष्ठ	इंग्रजी पृष्ठांक	मराठी पृष्ठांक
१८	१२८-१२९	१२४-१२५
१८	१७७	१७३
१८	८३	७८
१९	८४	७९
१९	८४	७९
२०	८२	७७
२०	१४१	१३८
२२	९०	८६
२२	३३९	३३५
२३	९१	८७-८८
२३	९८-१०७	९४-१०३
२३	९८	९५
२४	८८	८४
२४	८८	८४
२६	२१५	२०८
२७	२५२-२५३	२४५-२४६
२७	२५३	२४६
२७	२५३	२४६
२७	२५३	२४६
२८	२४७	२४०
२८	२४८	२४१
२८	४३९	४३७
२९	४३८	४३६

२९	२६०	२५२
२९	२६९	२६१
३०	२७९	२७१
३०	२७९	२७१
३०	३४६	३४०
३०	३४९	३४४
३१	३५१-३७४	३४७-३७०
३२	४१४	४११
३२	४१५	४१२
३२	४१५	४१२
३३	३७५	३७१
३३	४०२	३९९
३४	८९-९२	८५-८८
३४	१८३	१७८

पृष्ठ २७३ वर 'रूसो' या मथळ्याखालील मजकुरात १० व्या ओळींत 'हेगेलने' असे आहे त्या ऐवजी 'हेकेलने' असे पाहिजे.

पृष्ठ ४५५ वरील शेवटची ओळ गळलेली आहे ती अशी पाहिजे : डब्लिन येथील ट्रिनिटी कॉलेजचे डब्ल्यू. जी. क्रेग यांची प्रस्तावना व टीप यांसह.

काही ठिकाणी संदर्भाचे आकडे राहून गेले आहेत ते योग्य जागी घालावेत :

पृष्ठ	संदर्भाचे शब्द	संदर्भाचा आकडा
६३	"तीस वर्षांचे युद्ध"	१३
८९	दोन प्रकाशनांनी	२३
११२	WORLD	३७
११८	घाडतो आहे	४३
१६४	आग लावली	५१
२०४	सामोसाताचा लुसियन	८३

मूल्य : २५ रुपये